श्री गुरु ग्रंथ साहिब

मूळवाणी, देवनागरी लिप्यंतर, पंजाबी शब्दांचे
मराठी अर्थ
मराठी भावानुवाद

खंड-५

विनायक लिमये
तारासिंह गोरोवाडा

प्रकाशक
सिख धर्म प्राचार कमिटी, पुणे.
राजमुद्रा गृहरचना सो. सी ब्लॉक १ समोर,
घ. क्र. १०३७ धनकवडी, गुरूनानक मार्ग पुणे ४११०४३.
फोन : (नि.) (०२०) २४३७५२९६
मोबाईल : ९८२२८६७७७८

प्रकाशक :

तारासिंह गोरोवाडा

सिख धर्म प्रचार कमिटी, पुणे,

घ. क्र. १०३७ धनकवडी, गुरु नानक मार्ग, पुणे-४११ ०४३

फोन-(०२०)२४३७५२९६

मोबाईल-९८२२८६७७७८

© सर्व हक्क प्रकाशकांचे आधीन

अक्षर जुळणी :

सौ. स्मिता खेडेकर

कोमल एंटरप्राईजेस

स. नं. ३७, विद्यानगरी, जवाहर बेकरी शेजारी,

धनकवडी, पुणे - ४११ ०४३

प्रथमावृत्ती - ऑगस्ट २००९

मुद्रण :

शेखर धुमाळ

ओंकार प्रिंटिंग ॲन्ड बाईंडिंग

१४६/८ गारमाळ धायरी पुणे ४११०४१

मुखपृष्ठ:

संजय पेठकर

मुद्रित संशोधन

विवेक विसाळ

१२५ सोमवार पेठ, पुणे ४११०११

मोबाईल-९४२३५७४५३८

या खंडाचे देणगी मूल्य रू. ३५०/- मात्र

गुरुवाणी ही ईश्वरीय वाणी आहे, त्याचा योग्य तो आदर व्हावा.

प्रकाशकीय

आज 'श्री गुरु ग्रंथ साहिब' मराठी भावानुवादचा पाचवा खंड वाचकांच्या हाती देताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. ठरवलेल्या आराखड्याप्रमाणे ह्या प्रकाशन कार्याची वाटचाल होत आहे हे पाहून मनास समाधान प्राप्त होत आहे.

ह्या पाचव्या खंडाअखेर श्री गुरु ग्रंथ साहिबच्या ९८८ अंगांचा (पृष्ठांचा) अनुवाद मराठी वाचकांस आम्ही सादर केला आहे. उरलेल्या ४४२ अंगांचा अनुवाद पुढील दोन खंडात आम्ही सादर करणार आहोत. त्यामुळे त्या दोन खंडांची पृष्ठसंख्या पहिल्या पाच खंडांपेक्षा अधिक राहणार आहे. तसेच त्याच्या छपाई मूल्यातही वाढ होणार आहे. वाढत्या महागाईमुळे विशेषत: छपाईसाठी लागणाऱ्या कागदाच्या व इतरही खर्चात होणारी वाढ लक्षात घेऊन आम्ही खंड ३ पासून देणगी मूल्यात थोडी थोडी वाढ केली आहे. सातव्या खंडाअखेर एकूण देणगीमूल्य रु. २२००/- होणार आहे. तरीही ज्यांनी आजपर्यंत रु. १५००/- भरून आपली नोंदणी केली आहे त्यांना सर्व खंड त्याच देणगी मूल्यात प्राप्त होणार आहेत. एवढेच नव्हे तर डिसेंबर २००९ अखेर जे नागरिक रु. १५०० भरून आपला संच आरक्षित करतील, त्यांनाही तो त्याच सवलत देणगी मूल्यास प्राप्त होईल. तरी वाचकांनी आपल्या संपर्कातील नागरिक बंधू-भगिनींना ग्रंथ घेण्यास प्रेरित करावे, ही नम्र विनंती.

नेहमीप्रमाणेच अनुवादाचे काम श्री. विनायक लिमये यांनी, अक्षरजुळणीचे काम सौ. स्मिता धनंजय खेडेकर यांनी, छपाईचे काम श्री. शेखर धुमाळ यांनी तर मुद्रित संशोधनाचे काम श्री. विवेक विसाळ यांनी समर्थपणे केले आहे. इतरही अनेक लोकांनी अनेक प्रकारे ह्या कार्यास साहाय्य केले आहे. सिख धर्म प्रचार कमिटी ह्या सर्वांची ऋणी आहे.

तारासिंह गोरोवाडा

कार्याध्यक्ष

सिख धर्म प्रचार कमिटी, पुणे.

सिख धर्म प्रचार कमिटी, पुणे

गुरु नानकमार्ग, १०३७ धनकवडी, पुणे-४११०४३.

नोंदणी क्र. ए-४५५७ दि. २६-४-२००६

सन्माननीय विश्वस्त

अध्यक्ष

सरदार गुरनामसिंघ जैमलसिंघ होरा

मो. : ९३२५६३६१३६

■

कार्याध्यक्ष

सरदार तारासिंघ गुरांदित्तामल गोरोवाडा

■

कोषाध्यक्ष

सरदार कुलजितसिंघ अत्तरसिंघ चौधरी

■

सचिव

सरदार चरणजितसिंघ जसवंतसिंघ साहनी

■

विश्वस्त

सरदार जगजित सिंघ खालसा

सरदार इकबालसिंघ तारासिंघ गोरोवाडा

श्री. विनायक नारायण लिमये

अनुवादकाचे मनोगत

आज आम्ही वाचकांच्या हाती श्री गुरु ग्रंथ साहिब मराठी भावानुवाद या ग्रंथाचा ५ वा खंड सादर करत आहोत. त्यात श्री गुरु ग्रंथ साहिबमधील पान क्र. ७९५ ते ९९८ पर्यंतच्या भागाचा समावेश केला गेला आहे. त्यात श्री गुरु ग्रंथ साहिबमधील बिलावलु, गौड, रामकली, नट नारायण व मालीगउडा ह्या रागांतील सर्व पदांचा समावेश आहे.

ह्या खंडात अनेक महत्त्वपूर्ण रचना आहेत. त्याकडे आम्ही वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो.

राग बिलावलमध्ये थिती (तिथी) ही श्री गुरु नानक देवांची रचना सतवार (सातवार) ही श्री गुरु अमरदासांची रचना तसेच रामकली रागातील रुति (ऋतू) ही श्री गुरु अमरदासांची रचना ह्या तीन रचनांतून श्री गुरुमहाराजांनी वर्षातील सर्व वार, सर्व तिथी व सर्व महिने, सर्व ऋतू ईश्वरचिंतनासाठी, नामस्मरणासाठी योग्य आहेत, शुभ आहेत. कोणतीही वेळ, वा दिवस अशुभ नाही. त्या काळी शुभवेळ, अशुभ वेळ, पंचांगात मुहूर्त पाहणे ह्यावर सर्वत्र भर दिला जात होता. त्याचे वैयर्थ दाखविणाऱ्या ह्या रचना आहेत. शीख समाजात कोणत्याही कामासाठी मुहूर्त वगैरे पाहत नाहीत.

राग रामकलीमध्ये श्री गुरु अमरदासजी यांची 'अनंदू' ही रचना आहे. ती शीख बांधवांच्या नित्य पठाणातील रचना आहे. जीवनातील कोणत्याही आनंददायक प्रसंगी ती गायली जाते. त्याचे कारण असे, की ही रचना श्री गुरु अमरदासजी यांना त्यांच्या नातवाच्या जन्माचे वेळी स्फुरली. पुढे त्या नातवाचे नामकरण 'आनंद' असे करण्यात आले. पण ह्यात भौतिक व सांसारिक आनंदाचा उल्लेखही नाही. केवळ आत्मिक आनंद, ब्रह्मानंदाचेच विवरण केले आहे. संस्कृत वाङ्मयात 'आनंदो ब्रह्म', 'रसो वइ सा।' अशी वचने आढळतात. ह्याचाच अर्थ आनंद म्हणजेच ब्रह्म व तोच सर्व रसात्मक आहे. सर्व रसात श्रेष्ठ रस म्हणजे 'ब्रह्म रस' होय. अनंदू ह्या रचनेत ब्रह्माचा ओहापोहा करून नामभक्तीद्वारा ईश्वरभक्ती करून आत्मिक आनंद प्राप्त करण्याचा मार्ग सांगितला आहे.

दुसरी महत्त्वाची वाणी म्हणजे 'सद'. सद म्हणजे साद, हाक, बोलावणे. प्रभूचे बोलावणे म्हणजेच मृत्यू. श्री गुरु अमरदासजींच्या परलोक गमन प्रसंगी त्यांचे शिष्य बाबा सुंदरदासजी यांनी म्हटली आहे. मृत्युसमयी दिला गेलेला उपदेश असे त्याचे स्वरूप आहे. वास्तविक जीव ह्या जगात फार थोड्या काळाकरिता आला आहे. त्याचे खरे स्थान परलोकात प्रभू परमात्म्यापाशी आहे. म्हणून मृत्यू हा दुःखाचा प्रसंग नसून आनंद सोहळा आहे. असा ह्या पदाचा भाव आहे. संत तुकाराम महाराजांच्या 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' ह्या अभंगात मृत्यूस आनंद सोहळा म्हटले आहे.

ह्या खंडातली आणखी एक महत्त्वपूर्ण रचना म्हणजे 'ओअंकार' ही श्री गुरुनानक देवांची वाणी असून ती रामकली रागात निबद्ध आहे. श्री क्षेत्र ओंकारनाथ येथे एक पंडित आपल्या विद्यार्थ्यांना मुळाक्षरे शिकवत

असताना श्री गुरु नानकदेवांनी त्या पंडितास खरे शिक्षण कसे असावे हे समजावून सांगताना ही वाणी उच्चारली. आजही आदर्श शिक्षण व्यवस्था कशी असावी ह्याचा विचार करताना 'व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास करणारी व्यवस्था' असे म्हटले जाते. श्री गुरु नानकदेवांच्या मते शिक्षणचा मूळ हेतू व्यक्तीस 'स्वस्वरूपा'ची जाणीव करून देणे व त्यायोगे आत्मज्योत परमज्योतीत विलीन करण्यास सहाय्य करणे हा आहे.

ह्या खंडातील आणखी एक महत्त्वपूर्ण रचना म्हणजे 'सिध गोसटी' ही पूर्णपणे तत्त्वज्ञानाची चर्चा करणारी रचना आहे. ह्यात 'योगमार्ग' व 'भक्तिमार्ग' ह्याबद्दल सविस्तर चर्चा असून योगमार्ग हा खडतर, क्लेशदायक असून व्यक्ती पदभ्रष्ट होण्याचा खूप धोका आहे. त्यापेक्षा संसारात अलिप्तपणे राहून प्रभुभक्तीत रममाण झाल्याने सहज ईश्वरप्राप्ती होऊ शकते हे श्री नानकदेवांनी सप्रमाण सिद्ध करून दाखविले आहे.

वाचकांनी हे सर्व ध्यानी घेऊन ह्या खंडाचे वाचन- मनन- चिंतन करावे, ही त्यांना नम्र विनंती.

॥ हरी ओम तत् सत् ॥

– विनायक लिमये

(०२०) २६९६२९०९

॥ १ ओअंकार सतिगुरु प्रसादि ॥

श्री गुरु ग्रंथ साहिब

खंड ५

अनुक्रमणिका

पद	पृष्ठ क्र.
राग बिलावल	
(महला १)	
तू सुलतानु कहा हउ	१
मनु मंदरु तनु वेस	२
आपे सबदु आपे	२
गुरबचनी मनु सहज	३
(महला ३)	
धिगु धिगु खाइआ	४
अतुलु किउ तोलिआ	५
साहिब ते सेवकु सेव	६
पूरा थाटु बणाइआ	७
गुरमुखि प्रीति जिसनो	८
पूरे गुर ते वडिआई	९
(महला ४)	
उतम मति प्रभ अंतर जा मी	१०
हम मूरख मुगध	११
हमरा चितु लुभत मोहि	१२
आवहु संत मिलहु	१२
खत्री ब्राह्मणु सूदु वैसु	१३
अनद मूल धिआइओ	१४
बोलहु भइआ राम नामु	१५
(महला ५)	
नदरी आवै तिसु सिउ	१६
सरब कलिआण कीए	१७
सुख निधान प्रीतम	१७
मै मनि तेरी टेक मेरे	१८
बिखै बन फीका तिआगि	२०
एक रूप सगलो	२१
आपि उपावन आपि	२१
भूले मारगु जिनहि	२२
तनु मनु धनु अरपउ	२३
मात पिता सुत साथि	२३
गुर पूरा वडभागी	२४
गुर का सबदु रिदे	२४
सगल मनोरथ पाईअहि	२५
मोहि निरगुन सभ	२५
कवनु जानै प्रभ तुम्हरी	२६
मात गरभ महि हाथ दे	२६
मात पिता सुत बंधप	२७
स्रव निधान पूरन	२८
कवन संजोग मिलउ	२८
चरन कमल प्रभ	२८
सांति पाई गुरि सति	२९
ममता मोह ध्रोह मदि	२९
सगल अनंदु कीआ	३०
जिसु ऊपरि होवत	३०
मन महि सिंचहु हरि	३१
रोगु गइआ प्रभि	३१
सतिगुर करि दीने	३१
ताप संताप सगले	३२
काहू संगि न चालही	३२

सहज समाधि अनंद ३३
म्रित मंडल जगु साजि ३३
लोकन कीआ वडिआईआ ३४
लाल रंगु तिस कउ ३५
राखहु अपनी सरणि ३६
दोसु न काहू दीजीऐ ३६
मिरतु हसै सिर ऊपरे ३७
पिंगुल परबत पारि ३८
अहंबुद्धि परबाद नीत ३९
चरन भए संत बोहिथा ३९
बिनु साधु जो जीवना ४०
टहल करउ तेरे दास ४१
कीता लोड़हि सो करहि ४२
साध संगति कै बासबै ४२
पाणी पखा पीसु दास ४३
स्त्रवनी सुनउ हरि हरि ४४
अटल बचन साधू ४५
माटी ते जिनि साजिआ ४५
एक टेक गोविंद की ४६
महा तपति ते भई ४७
सोई मलीनु दीनु ४८
जलु ढोवउ इह सीस ४८
इहु सागरु सोई तरै ४९
बंधन काटे आपि प्रभ ५०
भै ते उपजै ५१
त्रिसन बुझी ममता ५१
हरि भगा का आसरा ५२
बंधन काटै सो प्रभु ५३
कवनु कवनु नही ५३
उदमु करत आनदु ५४
जिनि तू बंधि करि ५५
खोजत खोजत मै फिरा ५६
जीअ जंत सुप्रसन्न भए ५७
सिमरि सिमरि पूरन ५७
हरि हरि हरि ५८
अवरि उपाव सभि ५९
करु धरि मसतकि ५९
चरण कमल का ६०
मनि तनि प्रभु आराधीऐ ६०
जीअ जुगति वसि प्रभू ६१
सिमरि सिमरि प्रभु ६१
दास तेरे की बेनती ६२
सरब सिधि हरि गाई ६२
अरदासि सुणी ६३
मीत हमारे साजना ६३
गुरु पूरा आराधिआ ६४
धरति सुहावी सफल ६४
रोगु मिटाइआ आपि ६५
मरि मरि जनमे जिन ६५
ताती वाउ न लगई ६६
अपणे बालक आपि ६६
मेरे मोहन स्रवनी इह ६७
प्रभ जी तू मेरे प्रान ६८
सुनीअत प्रभ तउ ६८
संतन कै सुनीअत प्रभ ६९
राखि लीए अपने जन ६९
तापु लाहिआ गुर ७०
सतिगुर सबदि ७०
बिनु हरि कामि न ७१
हरि हरि नामु ७२
गोबिंद गोबिंद ७३
किआ हम जीअ जंत ७३
अगम रूप अबिनासी ७४
संत सरणि संत टहल ७४
मन किआ कहता हउ ७५
निंदकु ऐसे ही झरि ७५
ऐसे काहे भूलि परे ७६
मन तन रसना हरि ७७
गुरि पूरै मेरी राखि ७७
सदा सदा जपीऐ ७८
मन तन अंतरि प्रभु ७८
धीरउ देखि तुम्हारे ७९

अचुत पूजा जोग ७९
सिमरत नामु कोटि ८०
सुलही ते नाराइण ८०
पूरे गुर की पूरी सेव ८१
ताप पाप ते राखे आप ८१
जिस ते उपजिआ तिसहि ८२
दोवै थाव रखे गुर सूरे ८२
दरसनु देखत दोख ८३
तनु धनु जोबन चलत ८३
आपना प्रभु आइआ ८४
गोबिदु सिमरि होअ ८५
पारब्रहम प्रभ भए ८५
मू लालन सिउ प्रीति ८६
हरि के चरन जपि ८६
राखि लीए सतिगुर ८७
मै नाही प्रभ सभ किछु ८७
तुम्हा समरथा कारन ८८
ऐसी किरपा मोहि ८८
ऐसी दीखिआ ८९
जिउ भावै तिउ ९०
राखु सदा प्रभ ९०
अपने सेवक कउ ९१
आगै पाछै कुसलु ९१
बिनु भै भगती तरनु ९२
आपहि मेलि लए ९२
जीवउ नामु सुनी ९३
मोहन नीद न आवै ९३
मोरी अहं जाइ दरसन ९४

(महला ९)

दुख हरता हरि नामु ९५
हरि के नाम बिना दुखु ९५
जा मै भजनु राम को ९६

बिलावलु असटपदिआ
(महला १)

निकटि वसै देखै सभु सोइ ९७
सो गिआनी जिनि सबदि ९७
मन का कहिआ मनसा ९८
सूकर सुआन गरधभ ९९

बिलावलु असटपदी
(महला ३)

जगु कउआ मुखि १००
साचा नामु साचै सबदि १०१

बिलावलु असटपदिआ
(महला ४)

आपै आपु खाइ हउ मेटै १०१
हरि गुण गावै सदा १०२
हरि हरि नामु सीतल १०३
परम बैरागु नित नित १०४
गुरमुखि अगम अगोचरु १०५
इहु मनु नाचै सतिगुर आगै १०५
सतिगुरु परचै मनि मुंद्रा १०६
आसण सिध सिखहि १०७
अंतरि पिआस उठी १०८
खिमा सिगार करे प्रभ १०८
मै मनि तनि प्रेमु अगम १०९
सेज एक एको प्रभु ११०

बिलावलु असटपदी
(महला ५)

उपमा जात न कही १११
तिन्ह नाही नरक १११
प्रभ जनम मरन निवारि ११२
प्रभ तुझ बिना नही होर ११३

बिलावल थिती
(महला १)

एकम एकंकारु निराला ११४
पंचमी पंच भूत ११६
नाउ नउमी नवे नाथ ११७
दुआदसी दइआ दान ११९

बिलावल वार सत

(महला ३)
आदित वारि आदि पुरखु है १२०
वीरवारि वीर भरमि भुलाए १२२
आदि पुरखु आपे स्रिसटि १२३
इकि सेवक इकि भरमि १२४

बिलावलु छंत दखणी
(महला १)
मुंध नवेलड़ीआ १२५
मै मनि चाउ घणा १२७

छंत बिलावलु
(महला ४) **मंगल**
मेरा हरि प्रभ सेजै १२९
हरि प्रभ सजणु लोड़ि १३०

बिलावलु छंत
(महला ५)
मंगल साजु मइआ प्रभु १३१
भाग सुलखणा हरि कंतु १३३
सखी आउ सखी वसि १३५
सुंदर सांति दइआल प्रभ १३७
हरि खोजहु वड भागिहो १३८

बिलावल की वार
(महला ४)
हरि उतमु हरि प्रभ १४०
दूजै भाइ बिलावलु १४१
ब्रहमु बिंदहि ते १४२
सतिगुर ते खाली को नही १४३
ध्रिग एह आसा १४४
पूरै भागि सतिगुरु पाइऐ १४५
अंदरि कपटु सदा दुखु १४६
इसु जुग महि भगती १४८
गुरमुखि संसा मूलि न होवई १४९
जगत जलंदा रखि लै १५१
कोई वाहे को लुणै को १५२
जिन्ही नामु विसारिआ १५२
आपणा आपु न पछाणई १५४

वाणी भगता की
(कबीर जीउ की)
ऐसो इहु संसारु १५५
बिदिआ न परउ बादु १५६
ग्रिहु तजि बन खंड १५६
नित उठ कोरी १५७
कोऊ हरि समानि नही १५८
राखि लेहु हम ते १५९
दरमादे ठाढ़े १५९
डंडा मुंद्रा खिंथा १६०
इन्हि माइआ जगदीस १६१
सरीर सरोवर भीतरे १६१
जनम मरन का भ्रमु १६२
चरन कमल जा कै १६३

(नामदेव जी की)
सफल जनमु मो कउ १६३

(रविदास भगत की)
दारिदु देखी सभ को १६४
जिह कुल साधु बैसनौ १६५

(सधने की)
त्रिप कंनिआ के कारनै १६६

राग गौड
(महला ४)
जे मनि चिति आस १६७
ऐसा हरि सेवीऐ नित १६८
हरि सिमरत सदा १६९
जितने साह पातिसाह १७०
हरि अंतरजामी सभ १७१
हरि दरसन कउ मेरा १७२

(महला ५)
सभु करता सभु भुगता १७२
फाकिओ मीन कपिक १७३
जीअ प्रान कीए जिनि १७४

नाम संगि कीनो १७५
निमाने कउ जो देतो १७६
जा कै संगि इहु मनु १७६
गुर की मूरति मन महि १७७
गुरू गुरू गुरू करि १७८
गुरु मेरी पूजा गुरु १७९
राम राम संगि करि १७९
उन कउ खसमि कीनी १८०
कलि कलेस मिटे हरि १८१
गुर के चरन कमल १८२
धूप दीप सेवा गोपाल १८२
करि किरपा सुख १८३
हरि हरि नामु जपहु १८४
भवसागर बोहिथ १८५
संत का लीआ धरति १८५
नामु निरंजन नीरि १८६
जा कउ राखै राखणहारु १८७
अचरज कथा महा १८८
संतन कै बलिहारै १८९

राग गोंड
असटपदीआ
(महला ५)
करि नमसकार पूरे १८९

राग गौंड वाणी भगता की.
(कबीर जी)
संतु मिलै किछु सुनीऐ १९१
नरु मरै नरु कामि १९२
आकासि गगनु १९२
भुजा बांधि मिला करि १९३
ना इहु मानसु ना इहु १९४
तूटे तागे निखुटी १९५
खसमु मरै तउ नारि १९६
ग्रिहि सोभा जा कै रे १९७
जैसे मंदर महि १९८
कूटनु सोइ जु मन १९९
धंनु गुपाल धंनु गुर १९९

(नामदेउ जी की)
असुमेध जगने २००
नाद भ्रमे जैसे मिरगाए २०१
मो कउ तारि ले रामा २०२
मोहि लागती तालाबेली २०२
हरि हरि करत मिटे २०३
भैरउ भूत सीतला २०४
आजु नामे बीठलु २०४

(रविदास जीउ की)
मुकंद मुकंद जपहु २०५
जे ओहु अठसठि २०६

रामकली
(महला १)
कोई पड़ता सहसाकिरता २०८
सरब जोति तेरी २०९
जितु दरि वसहि २०९
सुरति सबदु साखी २१०
सुणि माछिंद्रा नानकु २११
हम डोलत बेड़ी पाप २१२
सुरती सुरति रलाईऐ २१३
तुधनो निवणु मंनणु २१४
सागर महि बूंद बूंद २१४
जा हरि प्रभि किरपा २१५
छादनु भोजनु मागतु २१६

(महला ३)
सतजुगि सचु कहै सभु २१७

(महला ४)
जे वडभाग होवहि २१८
राम जना मिलि २१९
हरि के सखा साध जन २२०
जे वडभाग होवहि वड २२१
सतगुर दइआ करहु २२१
सतगुरु दाता वडा २२२

(महला ५)
किरपा करहु दीन के २२३
पवहु चरणा तलि २२४
आवत हरख न जावत २२५
त्रै गुण रहत रहै निरारी २२५
अंगीकारु कीआ प्रभि २२६
तू दाना तू अबिचलु २२७
कर करि ताल पखावजु २२८
ओअंकारि एक धुनि २२९
कोई बोलै राम राम २३०
पवनै महि पवनु २३०
जपि गोबिंदु गोपाल २३१
चारि पुकारहि ना तू २३२
तागा करि कै लाई २३३
करन करावन सोई २३४
सेवकु लाइओ अपनी २३५
तन ते छुटकी अपनी २३५
मुख ते पड़ता टीका २३६
कोटि बिघन नही २३७
दोसु न दीजै काहू लोग २३८
पंच सबद तह पूरन २३९
भेटत संगि पारब्रहमु २३९
तेरै काजि न ग्रिहु २४०
सिंचहि दरबु देहि २४१
करि संजोगु बनाई २४२
जो किछु करै सोई सुखु २४३
कोटि जाप ताप बिस्राम २४४
बीज मंत्रु हरि कीरतनु २४४
संत कै संगि राम रंग २४५
गहु करि पकरी न २४६
आतम रामु सरब २४७
दीनो नामु कीओ पवितु २४८
कउडी बदलै २४८
रैणि दिनसु जपउ २४९
तेरी सरणि पूरे गुरदेव २५०
रतन जवेहर नाम २५१
महिमा न जानहि बेद २५२
किछहू काजु न कीओ २५२
राखनहार दइआल २५३
सगल सिआनप छाडि २५४
होवै सोई भल मानु २५५
दुलभ देह सवारि २५६
जिस की तिस की करि २५६
मन माहि जापि २५७
बिरथा भरवासा लोक २५८
कारन करन करीम २५९
कोटि जनम के बिनसे २६०
दरसन कउ जाईऐ २६०
किसु भरवासै बिचरहि २६१
इह लोके सुखु पाइआ २६२
गऊ कउ चारे सारदूलु २६३
पंच सिंघ राखे प्रभि २६४
ना तनु तेरा ना मनु २६५
राजा राम की सरणाइ २६५
ईंधन ते बैसंतरु भागै २६६
जो तिसु भावै सो थीआ २६७
ऐसा पूरा गुरदेउ २६८
गावहु राम के गुण २६९
गुरु पूरा मेरा गुरु २६९
नर नरह नमसकारं २७०
रूप रंग सुगंध भोग २७०
(महला ९)
रे मन ओट लेहु हरि नामा २७१
साधो कउनु जुगति २७१
प्रानी नारायण सुधि २७२
म. १ असटपदिआ
सोइ चंदु चंड़हि २७३
आखु गुणा कलि आईऐ २७३
जगु परबोधहि मड़ी २७४
भेख करहि खिंभा २७५
खटु मटु देही मनु २७६

अलिपत गुफा महि २७७
साहा गणहि न करहि २७७
गणत गणीऐ सहसा २७८
हठु निग्रहु करि काइआ २७९
अंतरि मैलु तीरथ २८०
अंतरि उतभुजु अवरु २८०
जतन करै बिंदु २८१
जिउ आइआ तिउ जावहि २८२
सुख संपति कउ आवत देखै २८३
जतु सतु संजमु २८४
अउहठि हसत २८५
काइआ सोधि तरै भव २८६
रामकली म ३
असटपदिआ
सरमै दीआ मुंद्रा कंनी २८७
नदरी आवदा सभु २८८
भगति खजाना गुरमुखि २८९
भरमि न भूलहु सतिगुरू २९०
त्रैगुण अचेत नामु चेतहि नाही २९०
काइआ नगरी सबदे खोजे २९१
हरि की पूजा दुलंभ है २९१
गुरमुखि होवै सु २९२
हम कुचल कुचील अति २९३
बिनु हरि साचे को २९४
नामु खजाना गुर ते पाईआ २९५
आपे दुखु सुखु पाए २९६
रामकली म. ५
असटपदिआ
किनही कीआ परविरति २९७
किनही घूघर निरति २९८
इसु पानी हे जिनि तू २९९
पेखन कउ नेत्र सुनन २९९
काहू बिहावै रगं रस ३००
काहू बिहावै दिनु रैनि ३०१
दावा अगनि रहे हरि ३०२
जिउ पावक संगि ३०२
जीअ जंत सभि ३०३
दरसनु भेटत पाप सभि ३०४
नामु निधानु पाइआ ३०५
रामकली म. ५ (सलोकु)
सिखहु सबदु पिआरिहो ३०५
मन बच क्रमि राम ३०६
रामकली म. ३ अनंदु
आनंदु भइआ मेरी माए ३०७
ए मन मेरिआ तू ३०८
साचे साहिबा किआ ३०८
साचा नामु मेरा आधारो ३०९
वाजे पंच सबद तितु ३०९
साची लिवै बिनु देह ३१०
आनंदु आनंदु सभु को ३१०
बाबा जिसु तू देहि ३११
आवहु संत पिआरिहो ३११
ए मन चंचला चतुराई ३१२
ए मन पिआरिआ तू ३१२
अगम अगोचरा तेरा अंत ३१३
सुरि नर मुनि जन अभ्रितु ३१३
भगता की चाल निराली ३१४
जिउ तू चलाइहि तिव ३१४
एहु सोहिला सबदु सुहावा ३१५
पवितु होए से जना ३१५
करमी सहजु न उपजै ३१६
जीअहु मैले बाहरहु निरमल ३१६
जीअहु निरमल बारहु निरमल ३१७
जे को सिखु गुरू सेती ३१७
जे को गुर ते वेमुखु होवै ३१८
आवहु सिख सतिगुरू ते पिआरिहो ३१८
सतिगुरु बिना होर ३१९
गुर का सबदु रतंनु है ३१९
सिव सकति आपि उपाइ के ३२०

सिम्रिति सासत्र पुंन पाप ३२०
माता के उदर महि प्रितपाल ३२१
जैसी अगनि उदर महि ३२१
हरि आपि अमुलकु है मुलि न ३२२
हरि रासि मेरी मनु ३२३
ए रसना तू अनरसि राचि ३२३
ए सरीरा मेरिआ हरि ३२४
मनि चाउ भइआ प्रभ ३२४
ए सरीरा मेरिआ इसु ३२५
ए नेत्रहु मेरिहो हरि ३२५
ए स्रवनहु मेरिहो साचै ३२६
हरि जीउ गुफा अंदरि ३२६
एहु साचा सोहिला साचै घरि ३२७
अनदु सुणहु वडभागीहो ३२७

रामकली सदु

जगि दाता सोइ भगति ३२८
हरि भाणा गुर भाइआ ३२९
मेरे सिख सुणहु पुत ३२९
सतिगुरि भाणै आपणै ३३०
अंते सतिगुरु बोलिआ ३३१
सतिगुरु पुरखि जि बोलिआ ३३१

रामकली म. ५ छंत

साजनड़ा मेरा साजनड़ा निकटि ३३२
हरि हरि धिआइ मना ३३४
रुणझुणो सबदु अनाहत ३३५
चरन कमल सरणागती ३३७
रसना उचरै हरि हरे ३३८

रामकली महला ५ रुती सलोकु

करि बंदन प्रभ पारब्रहम ३३९
उदमु अगमु अगोचरो ३४०
साध संगति बिनु भ्रमि ३४१
सरधा लागी संगि प्रीतमै ३४१
आस पिआसी मै फिरउ ३४२
जलणि बुझी सीतल भए ३४३
हरि धनु पाइआ सोहागणी ३४४
संत सहाई जीअ के ३४५

रामकली महला १
दखणी ओअंकारु

ओअंकारि ब्रह्मा उतपति ३४६
ससै सभु जगु सहजि ३४६
धधै धरमु धरे ३४७
ङि आनु गवाइआ दूजा ३४७
एको एकु कहै सभु कोई ३४८
इसु करते कउ किउ ३४८
एकु अचारु रंग इकु रूपु ३४९
ऊरम धूरम जोति उजाला ३४९
उगवै सुरु असुर संधारै ३५०
राजन राम रवै ३५०
रोसु न की जै अंम्रित ३५१
लाज मरंती मरि गई ३५१
लाहा नामु रतनु जपि ३५२
आई विगुता जगु जम पंथु ३५२
जुगि जुगि थापि ३५३
विणु नावै वेरोधु सरीर ३५३
गुण वीचारै गिआनी ३५४
कामु क्रोधु काइआ कउ ३५४
खोजत खोजत अंम्रितु पीआ ३५५
गगन गभीरु गगनंतरि ३५५
घर दर फिरि थाकी ३५६
गुरमुखि गावै गुरमुखि बोलै ३५७
चंचलु चीतु न रहई ३५७
छीजै देह खुलै ३५८
जापै आपि प्रभू ३५८
झखि बोलणु किआ ३५९
जिआनो बोलै आपै ३५९
टूटै नेहु कि बोलहि ३६०
ठाकहु मनूआ ३६०
डोलत डोलत हे सखी ३६१
ढंढोलत ढूढत हउ फिरी ३६२
णा को मेरा किसु गही ३६३

तरवरु काइआ पंखि ३६३
थर थर कंपै जीअड़ा ३६४
दइआ दानु दइआलु ३६५
धनि गइऐ बहि ३६५
नाना करत न छूटीऐ ३६६
पापु बुरा पापी कउ ३६७
फिरि फिरि फाही ३६७
बीरा बीरा करि रही ३६८
भनि भनि घड़ीऐ ३६९
माइआ माइआ करि मुए ३७०
जो आवहि से जाहि ३७०
राणा राउ न को रहै ३७१
लसकरीआ घर संमले ३७२
बीजउ सूझै को नही ३७३
ड़ाड़ै रूड़ा हरि ३७४
सुइना रुपा संचिए ३७४
खिमा विहूणे खपि ३७५
स्रिसटे भेउ न जाणै कोइ ३७६
हेरत हेरत हे सखी ३७६
लेखु न मिटई हे सखी ३७७
पाधा पड़िआ आखीऐ ३७८
पाधा गुरमुखि आखीऐ ३७८

रामकली महला १
सिध गोसटि

सिध सभा करि आसणि बैठे ३७९
कवन तुमे किआ नाउ ३७९
घटि घटि बैसि ३८०
दुनिआ सागरु दुतरु ३८०
जैसे जल महि ३८०
सुणि सुआमी अरदासि ३८१
हाटी बाटी रहहि निराले ३८१
हाटी बाटी नीद न आवै ३८२
दरसनु भेखु करहु जोगिंद्रा ३८२
अंतरि सबदु निरंतर मुद्रा ३८२
ऊंधउ खपरु पंच भू ३८३
कवन सु गुपता ३८३
घटि घटि गुपता ३८३
किउकरि बाधा ३८४
दुरमति बाधा सरमनि ३८४
सुंन निरंतरि दीजै ३८४
किसु कारणि ग्रिहु तीजओ ३८५
गुरमुखि खोजत भए उदासी ३८५
कितु बिधि पुरखा ३८५
सतिगुर कै जनमे ३८६
आदि कउ कवनु विचारु ३८६
कहा ते आवै कहा इहु ३८६
आदि कउ बिसमादु ३८७
अविगतो निरमाइलु उपजे ३८८
साचौ उपजै साचि समावै ३८८
मनि मुखि भूलै जम की काणि ३८९
गुरमुखि साचे का भउ ३८९
गुरमुख परचे बेद बीचारी ३९०
गुरमुखि अकथु कथै ३९०
गुरमुखि धरती साचै साजी ३९०
गुरमुखि असट सिधी ३९१
नामे राते हउमै जाइ ३९१
नामि रते सिध गोसटी होइ ३९२
पुरे गुर ते नामु पाइआ ३९२
गुरमुखि रतनु लहै ३९३
गुरमुखि नामु दानु ३९३
गुरमुखि सासत्र सिम्रिति बेद ३९४
बिनु गुर भरमै ३९४
जिसु गुरु मिलै ३९५
गुरमुखि बांधिओ सेतु ३९५
गुरमुखि चुकै आवण जाणु ३९५
गुरमुखि नामु निरंजन पाए ३९६
कवण मूलु कवण मति ३९६
पवन अरंभू ३९७
मैण के दंत ३९७
हउ हउ मै मै ३९८
सचु भै राता ३९८

कवन मुखि चंदु हिवै धरु ३९९
सबदु भाखत ३९९
नाम ततु सभ ही ३९९
अंतरि सुंनं बाहरि सुंनं ४००
सुंनो सुंनु कहै सभू कोई ४००
नउ सर सुभर ४०१
सहज भाइ मिलीऐ ४०१
कुबुधि चवावै ४०२
कुबुधि मिटै ४०२
साचु वखरु धनु ४०२
सु सबद हा कहा ४०३
सु सबद कउ निरंतर वासु ४०४
त्रै सत अंगुल वाई अवधु ४०४
मन का जीउ पवनु ४०५
रंगि न राता ४०५
गुर परसादी रंगे राता ४०६
इहु मन मैगुलु ४०६
इहु मन निहचलु ४०७
जा इहु हिरदा देह न होती ४०७
हिरदा देह न होती अवधु ४०८
कितु कितु बिधि जगु ४०९
गुरमुखि साचु सबदु बिचारै ४०९
बिनु सतिगुर सेवे ४०९
गुरमुखि मनु जीता ४१०
सबदै का निबेड़ा सुणि तू ४१०
तेरी गति मिती ४११

रामकली की वार महला ३

सतिगुरु सहजै दा खेतु है ४१२
वाहु वाहु सचे पातिसाह ४१३
भरमि भुलाई सभु जगु ४१४
कबीर कसउटी राम की ४१५
मन का झूठा झूठु कमावै ४१६
अभिआगत एहि न आखीअनि ४१७
रैणाइर माहि अनंतु है ४१८
इहु तनु सभो रतु है ४१९
बिनु सतिगुर सेवे ४२०
सचा नामु धिआइ तू ४२१
बाबाणीआ कहाणीआ ४२२
सति पापु करि सतु कमाहि ४२३
हिंदू के घरि हिंदू आवै ४२४
ना सति दुखीआना सति सुखीआ ४२५
सो पाखंडी जि काइआ पखाले ४२७
मूरखु होवै सो सुणै ४२८
सहंसर दान ते इंद्रु ४२९
नानक अंधा होइ कै ४३१
अंधे कै राहि दसिऐ ४३१
सावणु राति अहाड़ु दिहु ४३२
नानक चिंता मति करहु ४३३
वेलि पिंञाइआ ४३५
आसा अंदरि सभु को ४३६
सरवर हंस धुरे ही मेला ४३७

रामकली की वार महला ५

जैसा सतिगुरु सुणीदा ४३८
सुणि साजण प्रीतम मेरिआ ४३९
भीड़हु मोकलाई कीतीअनु ४४०
धंनु सु राग सुरंगड़े ४४१
हरि इकसै नालि मै ४४२
हरणाखी कू सचु वैणु ४४४
अंदरहु अंना बहरहु अंना ४४६
पंडितु आखाए बहुती राही ४४७
करि किरपा किरपाल आपे ४४८
होहु क्रिपाल सुआमी मेरे ४५०
दूजा तिसु न बुझावहु ४५१
आपै वैदु आपि नारायणु ४५२
अंम्रित बाणी अमिउ रसु ४५३
मित्रु पिआरा नानक ४५४
उसतति निंदा नानक ४५५
तैडी बंदसि मै कोइ न डिठा ४५६
हभि गुण तेडै नानक ४५७
सोइ सुणदंडी मेरा तनु मनु ४५८
जां पिरु अंदरि ता धन ४५९

छतड़े बाजार सोहनि ४५९
कबीर धरती साध की ४६०
फरीदा भूमी रंगावली ४६१
मुहबति जिसु खुदाई दी ४६२

रामकली की वार
राइ बलवंडि तथा सतै डूमि आखी

नाउ करता कादरु करे ४६३
लहणे दी फेराईऐ नानका ४६४
जिनि कीती सो मंनणा ४६५
होरिंओ गंग वहाईऐ ४६६
फेरि वसाइआ फेरूआणि ४६६
सो टिका सो बैहणा ४६७
धंनु धंनु रामदास गुरु ४६८
चारे जागे चहु जुगी ४६९

रामकली बाणी भगता की
(कबीर जीउ)

काइआ कलालनि ४७०
गुड़ु करि गिआनु ४७१
तूं मेरो मेरु परबतु ४७१
संता मानउ दूता ४७३
जिह मुख बेदु गाइत्री ४७४
तरवरु एकु अनंत ४७५
मुंद्रा मोनि दइआ ४७५
कवन काज सिरजे ४७६
जिह सिमरनि होइ ४७७
बंधचि बंधनु पाइआ ४७९
चंदु सूरजु दुइ जोति ४८०
दुनीआ हुसीआर ४८०

(नामदेउ जीउ की)

आमीले कागदु ४८१
बेद पुरान सासत्र ४८२
माइ न होती बापु न ४८३
बानारसी तपु करै ४८४

(रविदास जी की)

पड़ीऐ गुनीऐ नामु ४८५

(बेणी जीउ की)

इड़ा पिंगुला अउर ४८६
कर पलव साखा ४८७

रागु नट नाराइन
(महला ४)

मेरे मन जपि अहिनिसि ४८८
राम जनि जन रामै ४८९
मेरे मन जपि हरि हरि नामु ४९०
मेरे मन जपि हरि हरि राम ४९१
मेरे मन जपि हरि ४९२
मेरे मन कलि कीरति ४९२
मेरे मन सेव सफल ४९३
मन मिलु संत संगति ४९४
कोई आनि सुनावै हरि ४९५

(महला ५)

राम हउ किआ जाना ४९५
उलाहनो मै काहू न ४९६
जा कउ भई तुमारी ४९७
अपना जनु आपहि ४९७
हरि हरि मन महि ४९८
चरन कमल संगि ४९८
मेरे मन जपु जपि ४९९
मैरै सरबसु नामु ४९९
हउ वारि वारि जाउ ५००
कोऊ है मेरो साजनु मीत ५००

नट असटपदीआ महला ४

राम मेरे तनि मनि ५०१
रसना साद चखै भाइ दूजै ५०२
राम हम पाथर निरगुनी आरे ५०२
उगवै दिनसु आलु जालु ५०३
राम हरि अंम्रित सरि ५०४
साकत सिउ मन मेलु ५०४

वाचन सुरू करण्यापूर्वी
वाचकांस सूचना

वाचक हो,

श्री गुरु गंथ साहिब हा ग्रंथ पंजाबी भाषेत व गुरुमुखी लिपीत लिहिलेला आहे. मराठी वाचकास गुरुमुखी लिपीचे ज्ञान नसल्याने मूळ ग्रंथ वाचता येत नाही म्हणून आम्ही तो देवनागरी लिपीत लिप्यांतर करून छापला आहे. त्यामुळे मराठी वाचकास तो वाचणे सुलभ होईल असे वाटते.

पंजाबी भाषेत ळ, क्ष व ज्ञ ही अक्षरे नाहीत 'ळ' ऐवजी 'ल' लिहितात. 'क्ष' ऐवजी 'ख' लिहितात तर 'ज्ञ' ऐवजी 'गिय' लिहितात. उदा. 'आज्ञा' शब्द 'अगिया' असा लिहितात.

पंजाबी भाषेत जोडाक्षरे नसतात. 'नमस्कार' हा शब्द 'नमसकार', 'बक्षीस' हा 'बखसीस' असा लिहितात. 'विद्या' हा शब्द 'विदिआ' असा लिहितात.

पंजाबी भाषेत शब्दाच्या शेवटच्या अक्षरास 'इ' कार अथवा 'उ' कार लागला असेल, तर त्याचा उच्चार करत नाहीत. उदा – 'जपु' ह्याचा उच्चार 'जप' असा करतात 'जुगादि' ह्याचा उच्चार 'जुगाद' असा करतात.

पंजाबी भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शब्दाच्या आधी 'अ', 'स' ही अक्षरे लावणे. त्यामुळे मात्र मराठी वाचकाच्या मनात गोंधळ निर्माण होणे शक्य आहे. उदा. 'असथिरु' म्हणजे मराठी वाचकास अस्थिर असे वाटेल, पण तो खरा 'स्थिर' अशा अर्थी आहे. तसेच 'अकृतग्य', 'कृतज्ञ' ह्या अर्थी पंजाबीत वापरतात. 'स्त्री' ऐवजी 'इसतरी' असे लिहितात.

पंजाबी भाषेत बहुतांश शब्द मूळ संस्कृत भाषेतून आले आहेत. त्यामुळे ते मराठी वाचकास समजणे सोपे जातील. काही शब्द फारशी आहेत. ते संदर्भावरून समजू शकतात. काही अवघड पंजाबी शब्दांचे अर्थ आम्ही पदाचे खाली दिले आहेत.

वरील सूचना लक्षात घेऊन पदाचे वाचन केल्यास मराठी वाचकास पद वाचणे व अर्थ समजणे सोपे होईल असे वाटते.

राग – बिलावल

१ ओअंकार सतिनामु करता पुरखु निरभउ निरवैरु
अकाल मूरति अजूनी सैभं गुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाम सत्य आहे. तो कर्तापुरुष आहे. तो निर्भय आहे. तो निर्वैर आहे. तो कालातीत आहे. अयोनीसंभव, स्वयंभू आहे, सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

॥ रागु बिलावलु महला १ चउपदे घरु १ ॥

तू सुलतानु कहा हउ मीआ मेरी कवन वडाई ॥
जो तू देहि सु कहा सुआमी मै मूरख कहणु न जाई ॥ १ ॥
तेरे गुण गावा देहि बुझाई ॥ जैसे सच महि रहउ रजाई ॥ १ ॥ रहाउ ॥
जो किछु होआ सभु किछु तुझ ते तेरी सभ असनाई ॥
तेरा अंतु न जाणा मेरे साहिब मै अंधुले किआ चतुराई ॥ २ ॥
किआ हउ कथी कथे कथि देखा मै अकथु न कथना जाई ॥
जो तुधु भावै सोई आखा तिलु तेरी वडिआई ॥ ३ ॥
एते कूकर हउ बेगाना भउका इसु तन ताई ॥
भगति हीणु नानकु जे होइगा ता खसमै नाउ न जाई ॥ ४ ॥ १ ॥(श्री गु. ग्रं. सा. ७९५)

शब्दार्थ : **सुलतानु** – सम्राट. **मीआ** – मीयाँ. **वडाई** – महिमा. **सु** – तेच. **कहा** – कथन केले. **रजाई** – आज्ञेत. **असनाई** – जाण, ज्ञान. **किआ** – काय. **तुधु** – तुला. **भावै** – आवडते. **तिलु** – तिळमात्र. **कुकर** – कुत्रा. **बेगाना** – वेडा. **भउका** – भुंकतो. **ताई** – करिता, साठी.

भावार्थ : हे प्रभू ! तू महान सम्राट आहेस. पण जर मी तुला 'मियाँ' म्हटले तर त्यात तुझी महती ती काय राहिली ? पण मी तरी काय करणार ? जशी तू बुद्धी देतोस तसे मी बोलतो. मी तर मूर्ख आहे, काय बोलावे हे मला समजत नाही. ॥ १ ॥ हे प्रभो ! तुझे गुण कसे गावेत, ते मला समजावून सांग. तुझ्या आज्ञेत मी राहीन. ॥ १ ॥ रहाउ ॥ ह्या सृष्टीत जे काही उत्पन्न झाले आहे ते सारे तूच केले आहेस. ह्या सगळ्याची तुलाच जाण आहे. मी पामर, मला तुझा अन्त कळू शकत नाही. मी मोहमायेने अंध झालो आहे. माझ्या अंगी तुला जाणण्याचे काय सामर्थ्य ? ॥ २ ॥ मी तुझे गुणवर्णन काय करणार ? मी जो जो तुझे वर्णन करतो, तो तो मला कळून येते की तू अकथनीय आहेस. तुझे गुणवर्णन करण्याची माझ्या अंगी क्षमता नाही. तुला जसे भावले तसे मी सांगितले. पण जे काही सांगितले त्यातून मी तुझी केवळ तिळमात्र महती सांगू शकलो. ॥ ३ ॥ नानक सांगतात, हे प्रभो ! मी भक्तिहीन आहे. तरीही ते काहीही असले तरी मी तुझाच आहे. मी प्रभुनामाचे स्मरण करतो. तुझे नाम कधीही व्यर्थ जाणार नाही. ॥ ४ ॥ १ ॥

॥ बिलावलु महला १ ॥

मनु मंदरु तनु वेस कलंदरु घट ही तीरथि नावा ॥
एकु सबदु मेरै प्रानि बसतु है बाहुड़ि जनमि न आवा ॥ १ ॥
मनु बेधिआ दइआल सेती मेरी माई ॥
कउणु जाणै पीर पराई ॥ हम नाही चिंत पराई ॥ १ ॥ रहाउ ॥
अगम अगोचर अलख अपारा चिंता करहु हमारी ॥
जलि थलि महीअलि भरिपुरि लीणा घटि घटि जोति तुम्हारी ॥ २ ॥
सिख मति सभ बुधि तुम्हारी मंदिर छावा तेरे ॥
तुझ बिनु अवरु न जाणा मेरे साहिबा गुण गावा नित तेरे ॥ ३ ॥
जीअ जंत सभि सरणि तुम्हारी सरब चिंत तुधु पासे ॥
जो तुधु भावै सोई चंगा इक नानक की अरदासे ॥ ४ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ७९५)

शब्दार्थ : **एकु** – एकमेव प्रभू. **बसतु** – वास करतो. **बाहुडि** – परत. **बेधिआ** – वेधले. **कवणु** – कोण. **पराई** – दुसऱ्याची, परक्याची. **चिंत** – चिंता, विचार. **सिख** – उपदेश. **छावा** – स्थान, आश्रय.

भावार्थ : माझे मन हे प्रभू परमात्म्याचे मंदिर आहे. माझे शरीर हा वैराग्याचा वेश आहे. (शरीर मायेपासून मुक्त आहे. मी माझ्या हृदयरूपी तीर्थात स्नान करतो. (कारण हृदयात प्रभूचा वास आहे.) एकमात्र प्रभूचे नाम माझ्या अंत:करणात वास करते. त्यामुळे मला परत जन्म घ्यावा लागणार नाही. ॥ १ ॥ हे माझ्या माते ! त्या दयाळू प्रभू परमात्म्याने माझे मन वेधले आहे. माझ्या मनीची प्रभुप्रेमाची व्यथा अन्य कोणी कसा जाणणार ? मलाही अन्य कशाची चिंता नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! तू अगम्य, अगोचर, अलक्ष्य व अपार आहेस. आता माझी चिंता तुलाच. तू जळी, स्थळी, अंतराळी सर्वत्र पूर्णपणे भरून राहिला आहेस. प्रत्येक शरीरात तुझीच ज्योत प्रकाशमान आहे. ॥ २ ॥ सर्व शरीरे ही तुझीच घरे, मंदिरे आहेत. सर्व जीवांना ज्ञान, बुद्धी सारे काही तूच प्रदान केले आहेस. हे प्रभो ! मी तुझ्याशिवाय अन्य कोणासही ओळखत नाही. मी सदैव तुझेच गुणगान गातो. ॥ ३ ॥ सर्व जीव जंतू तुलाच शरण येतात. तुलाच सर्वांची चिंता आहे. हे प्रभो ! जे तुला आवडते तेच चांगले. नानकाची तुझ्या चरणी हीच प्रार्थना आहे, की जे तुला आवडते त्यातच माझे मन रममाण होवो. ॥४॥२॥

॥ बिलावलु महला १ ॥

आपे सबदु आपे नीसानु ॥ आपे सुरता आपे जानु ॥
आपे करि करि वेखै ताणु ॥ तू दाता नामु परवाणु ॥ १ ॥
ऐसा नामु निरंजन देउ ॥ हउ जाचिकु तू अलख अभेउ ॥ १ ॥ रहाउ ॥
माइआ मोहु धरकटी नारि ॥ भूंडी कामणि कामणिआरि ॥
राजु रूपु झूठा दिन चारि ॥ नामु मिलै चानणु अंधिआरि ॥ २ ॥
चखि छोडी सहसा नही कोइ ॥ बापु दिसै वेजाति न होइ ॥
एके कउ नाही भउ कोइ ॥ करता करे करावै सोइ ॥ ३ ॥

सबदि मुए मनु मन ते मारिआ ॥ ठाकि रहे मनु साचै धारिआ ॥
अवरु न सूझै गुर कउ वारिआ ॥ नानक नामि रते निसतारिआ ॥ ४ ॥ ३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ७९५)

शब्दार्थ : **सबदु** – शब्द. **निसानु** – चिन्ह. **सुरता** – श्रोता. **जानु** – ज्ञाता. **वेखै** – पाहतो, संभाळ करतो. **ताणू** – बल. **करि** – करतो. **जाचिकु** – याचक. **अलख** – अलक्ष्य, अदृश्य. **अभेउ** – अभेद. **धरकटी** – तिरस्कृत. **भूंडी** – कुरूप, दुराचारी. **कामणिआरि** – जादूटोणा करणारी. **चानणु** – प्रकाश **सहसा** – शंका, संशय. **बापु** – बाप. **दिसै** – दिसतो. **वेजाति** – जातीहीन. **भउ** – भय. **सोइ** – तोच प्रभू. **ठाकि** – थांबवले. **निसतारिआ** – मुक्त झाला.

भावार्थ : हे प्रभो ! तू शब्दरूप आहेस आणि तेच तुझे चिन्ह आहे, तीच तुझी ओळख आहे. ते ऐकणाराही तूच आहेस, त्याचा अर्थ जाणणारा ज्ञाताही तूच आहेस. ही सारी सृष्टी तूच उत्पन्न केली आहेस व तिचा संभाळही तूच करतोस. नामाचे दान देणारा तूच आहेस व त्याचा स्वीकार करणाराही तूच आहेस. ॥ १ ॥ हे मायातीत प्रभो ! मला ते नाम दे. हे प्रभो ! तू अदृश्य व भेदभाव न करणारा आहेस. मी याचक बनून तुझ्याकडे तुझ्या नामाची याचना करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! तुझी माया ही तिरस्कारणीय, व्यभिचारिणी स्त्रीसारखी आहे. ती कुरूप, दुराचारी माया जादूटोणा करणारी आहे, तिने सर्व जीवांना वश करून घेतले आहे. पण हे राजवैभव, हे सुंदर रूप सारे काही खोटे आहे, मायावी आहे, नश्वर आहे. नामाची प्राप्ती झाली की अज्ञान, अंधकार नष्ट होऊन अंतरात दैवी ज्ञानाचा प्रकाश पसरतो. ॥ २ ॥ ज्यांनी मायेचा त्याग करून प्रभुनामाची चव घेतली त्याच्या मनात कोणताही संशय राहत नाही. ज्याचा पिता माहीत आहे त्यास कोणी वेश्यापुत्र, अनौरस म्हणत नाहीत. ज्याचा तो एकमेव प्रभू परमेश्वर पिता आहे त्यास कोणतेही भय उरत नाही. तो कर्ताप्रभूच सर्व काही करणारा आणि करवून घेणाराही तोच आहे. ॥ ३ ॥ जेव्हा जीव प्रभुनामात लीन होऊन अहंकारास मारून टाकतो, मनाला ताब्यात ठेवतो, त्याच्या हृदयात सत्याची धारणा होते, त्यास प्रभुशिवाय अन्य काही सुचत नाही. तो स्वत:स प्रभुचरणी समर्पित करतो. नानक सांगतात, जो प्रभुनामात तल्लीन झाला तो भवसागर तरून जातो. जन्म मरणाच्या चक्रातून मुक्त होतो. ॥ ४ ॥ ३ ॥

॥ बिलावलु महला १ ॥

गुरबचनी मनु सहज धिआने ॥ हरि कै रंगि रता मनु माने ॥
मनमुख भरमि भुले बउराने ॥ हरि बिनु किउ रहीऐ गुरसबदि पछाने ॥ १ ॥
बिनु दरसन कैसे जीवउ मेरी माई ॥
हरि बिनु जीअरा रहि न सकै खिनु सतिगुरि बूझ बुझाई ॥ १ ॥ रहाउ ॥
मेरा प्रभु बिसरै हउ मरउ दुखाली ॥ सासि गिरासि जपउ अपुने हरि भाली ॥
सद बैरागनि हरि नामु निहाली ॥ अब जाने गुरमुखि हरि नाली ॥ २ ॥
अकथ कथा कहीऐ गुर भाइ ॥ प्रभु अगम अगोचरु देइ दिखाइ ॥
बिनु गुर करणी किआ कार कमाइ ॥ हउमै मेटि चलै गुरसबदि समाइ ॥ ३ ॥
मनमुखु विछुड़ै खोटी रासि ॥ गुरमुखि नामि मिलै साबासि ॥

हरि किरपा धारी दासनि दास ॥ जन नानक हरि नाम धनु रासि ॥ ४ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ७९६)

शब्दार्थ : **गुरबचनी** – सतगुरूच्या उपदेशाने. **रता** – रममाण झाला. **बउराने** – वेडा. **जीवउ** – जीवन जगू. **जीअरा** – जीव. **बिसरै** – विसरला. **दुखाली** – दु:खाने. **भाली** – शोध घेणे. **निहाली** – प्रसन्न, कृतार्थ. **नाली** – जवळ. **कार** – कार्य. **मेटि** – नष्ट करून. **साबासि** – शाबासकी.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाने मन सहज ध्यानात निमग्न होते. मन प्रभुरंगात रंगून जाऊन प्रभुविषयी विश्वस्त होते. स्वेच्छाचारी जीव मायेच्या भ्रमात वेड्यासारखा भटकत राहतो. जीव प्रभू परमात्म्याशिवाय, सतगुरूकडून प्रभुनाम जाणल्याशिवाय कसा काय राहू शकेल ? ॥ १ ॥ हे माझ्या मते प्रभुदर्शनाशिवाय मी कसा जिवंत राहू ? सतगुरूकडून ज्ञान प्राप्त झाल्याने आता मी प्रभू परमात्म्याशिवाय क्षणभरही जगू शकत नाही. ॥१॥ रहाउ ॥ मला जर प्रभू परमात्मा विसरला तर मी दु:खाने मरून जाईन. मी प्रत्येक श्वासा-घासागणिक प्रभुनामाचे स्मरण करते व प्रभू परमात्म्याचा शोध घेते. मी मोहमायेपासून विरक्त होऊन, प्रभुनामात तल्लीन होऊन कृतार्थ होते. आता मला कळले आहे, तो प्रभू परमात्मा माझ्याजवळच आहे, माझ्या अंतरातच आहे. ॥२॥ सतगुरूवर पूर्ण श्रद्धा ठेवून त्या अवर्णनीय प्रभूचे गुणगान करावे. म्हणजे सतगुरूच त्या अगम्य अगोचर प्रभू परमात्म्याचे दर्शन घडवतो. सतगुरूशिवाय कोणतेही कार्य सफल होत नाही म्हणून अहंकार सोडून सतगुरूच्या उपदेशात स्वत:ला लीन कर. ॥ ३ ॥ स्वेच्छाचारी जीव प्रभूकृपेस पारखे होतात कारण त्यांचे कर्मच खोटे असते. गुरूच्या उपदशाप्रमाणे आचरण केल्यानेच प्रभूनाम प्राप्त होते व त्यानेच या जीवनाचे सार्थक होते. प्रभूने कृपा केली व मला त्याच्या दासांचा दास केले. नानक सांगतात, प्रभुनाम हेच खरे धन. हीच खरी संपत्ती. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ बिलावलु महला ३ घरु १ ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाम सत्य आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

धिगु धिगु खाइआ धिगु धिगु सोइआ धिगु धिगु कापडु अंगि चडाइआ ॥
धिगु सरीरु कुटंब सहित सिउ जितु हुणि खसमु न पाइआ ॥
पउड़ो छुड़की फिरि हाथि न आवै अहिला जनमु गवाइआ ॥ १ ॥
दुजा भाउ न देई लिव लागणि जिनि हरि के चरण विसारे ॥
जगजीवन दाता जन सेवक तेरे तिन के तै दूख निवारे ॥ १ ॥ रहाउ ॥
तू दइआलु दइआपति दाता किआ एहि जंत विचारे ॥
मुकत बंध सभि तुझ ते होए ऐसा आखि वखाणे ॥
गुरमुखि होवै सो मुकतु कहीऐ मनमुख बंध विचारे ॥ २ ॥
सो जनु मुकतु जिसु एक लिव लागी सदा रहै हरि नाले ॥
तिन की गहण गति कही न जाई सचै आपि सवारे ॥

भरमि भुलाणे सि मनमुख कहीअहि ना उरवारि न पारे ॥ ३ ॥
जिस नो नदरि करे सोई जनु पाए गुर का सबदु सम्हाले ॥
हरि जन माइआ माहि निसतारे ॥
नानक भागु होवै जिसु मसतकि कालहि मारि बिदारे ॥ ४ ॥ १ ॥(श्री गु. ग्रं. सा. ७९६)

शब्दार्थ : **धिगु** – धिक्कार. **खाइआ** – खाणे. **सोइआ** – झोपणे. **चडाइआ** – परिधान करणे. **जितु** – ज्यामुळे. **हुणि** – ह्या मानवजन्मात. **पउडी** – शिडी, संधी. **छुडकी** – निसटली, गेली. **अहिला** – सुंदर. **विसारे** – विस्मरण झाले. **तिन** – तू. **निवारे** – निवारण केले. **मुकत** – मुक्ती. **बंध** – बंधन. **आखि** – सांगून. **वखाणे** – वर्णन करतात. **गहण** – गहन. **सि** – ते. **न उरवारि न पारे** – न आर न पार. **सम्हाले** – स्मरण करतात. **बिदारे** – नष्ट करतो.

भावार्थ : ज्यामुळे हा मानवजन्म प्राप्त करूनही प्रभू परमात्मा प्राप्त होत नाही. त्या खाण्याचा, झोपण्याचा, अंगावरील वस्त्रांचा धिक्कार असो. त्या शरीराचा, त्या कुटुंबाचा की ज्याच्या मोहात अडकल्यामुळे ह्या जन्मात प्रभू प्राप्त होत नाही, त्याचा धिक्कार असो. एकदा ह्या सुंदर मानवजन्माची ही आलेली सुसंधी हातची निसटली की परत हाती येत नाही. ॥ १ ॥ द्वैतभावामुळे प्रभुचरणांचा विसर पडतो व मन प्रभू स्मरणात एकाग्र होऊ शकत नाही. हे जीवन देणाऱ्या प्रभू तुझ्या सेवकांचे सर्व दु:ख तू दूर करतोस. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! तू दयाळू आहेस, कृपावंत आहेस, दाता आहेस. हे सारे जीव तुझ्यापुढे तुच्छ आहेत, नगण्य आहेत. जीवांना मोहमायेच्या बंधनात अडकवणारा तूच आहेस व जीवांना मुक्त करणाराही तूच आहेस, असेच सर्वजण तुझे वर्णन करतात. जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो. त्यास मुक्त समजावे. जो स्वेच्छाचारी जीव प्रभूस विसरून आपल्या मनाच्या इच्छेप्रमाणे वागतो, तो मायेच्या बंधनात अडकतो असे समजावे. ॥ २ ॥ ज्याचे चित्त प्रभुनामात एकाग्र झाले, तो प्रभुसेवक मोहमायेतून मुक्त होऊन सदैव प्रभू परमात्म्याच्या संगतीत रममाण होऊन राहतो. त्यांना परमगती प्राप्त होते. प्रभू परमात्मा स्वत: त्यांना भवसागर तारून नेतो. जो मोहमायेच्या भ्रमात अडकला तो स्वेच्छाचारी. तो इहलोकीही सुख प्राप्त करू शकत नाही व परलोकातही प्राप्त करू शकत नाही. ॥ ३ ॥ ज्याच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते त्यास सतगुरू प्राप्त होतो व तो सदैव प्रभुनामाचे स्मरण करतो. हरीचे सेवक मोहमायेच्या पार जातात. नानक सांगतात, ज्यांच्या भाग्यात असेल तो मृत्यूस मारून अमर होतो. जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. ॥ ४ ॥ १ ॥

॥ बिलावलु महला ३ ॥

अतुलु किउ तोलिआ जाइ ॥ दूजा होइ त सोझी पाइ ॥
तिस ते दूजा नाही कोइ ॥ तिस दी कीमति किकू होइ ॥ १ ॥
गुरपरसादि वसै मनि आइ ॥ ता को जाणै दुबिधा जाइ ॥ १ ॥ रहाउ ॥
आपि सराफु कसवटी लाए ॥ आपे परखे आपि चलाए ॥
आपे तोले पूरा होइ ॥ आपे जाणै एको सोइ ॥ २ ॥
माइआ का रूपु सभु तिस ते होइ ॥ जिस नो मेले सु निरमलु होइ ॥

जिस नो लाए लगै तिसु आइ ॥ सभु सचु दिखाले ता सचि समाइ ॥ ३ ॥
आपे लिव धातु है आपे ॥ आपि बुझाऐ आपे जापे ॥
आपे सतिगुरु सबदु है आपे ॥ नानक आखि सुणाए आपे ॥ ४ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ७९७)

शब्दार्थ : **अतुलु** – अतुल्य. **किउ** – कसे. **दुजा** – दुसरा कोणी. **सोझी पाए** – समजू शकेल. **किकु** – कशी. **जाणै** – जाणतो. **कसवटी** – कसोटी, सोन्याचा कस पाहण्याचा दगड. **चलाए** – मोल प्राप्त करून देतोस. **पूरा** – पूर्ण. **मेले** – मिलन घडवतो. **दिखाले** – दाखवतो. **लिव** – एकाग्रता. **धातु** – धावणे.

भावार्थ : तो प्रभू परमात्मा अतुलनीय आहे. त्याची तुलना कोण कशी करू शकणार ? जर त्याच्या समान अन्य कोणी असेल तरच ते शक्य होईल पण त्याच्या बरोबरीचा अन्य कोणीही नाही. मग प्रभूची किंमत कोण ठरवणार ? ॥ १ ॥ सतगुरुकृपेने जीवाच्या मनात प्रभूचा वास होतो. त्यास जाणल्याने मनातील द्वैतभाव नष्ट होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा स्वत: सराफ आहे. सर्व जीवांना कसोटी लावून त्यांची पारखही तोच करतो. तो प्रभू परमात्मा जीवांची पारख करून, त्याची योग्यता ठरवून, त्यांना योग्य ते स्थान देतो. केवळ तोच एकमात्र जीवाचा मोल करणारा आहे. स्वत:चे मूल्यही तोच जाणतो. ॥ २ ॥ मायेची जितकी रूपे आहेत ती त्यानेच निर्माण केली आहेत. तो ज्यास आपल्या रूपात एकरूप करून घेतो तो जीव निर्मल होतो, पवित्र होतो. ज्याला मोहमायेशी जोडतो त्यास माया आपल्या बंधनात अडकवते. परंतु ज्यास तो आपले सत्यस्वरूप दाखवतो तो सत्यरूप प्रभूशी एकरूप होऊन जातो. ॥ ३ ॥ प्रभूचे ठायी चित्त एकाग्र करणाराही तोच (प्रभू) आहे व मायेचे रूप धारण करणाराही तोच आहे. स्थिर राहणाराही तोच आहे आणि धावाधाव करणारा चंचलही तोच आहे. त्याच्या उपदेशाचे मनन, चिंतन करणारा, स्मरण करणाराही तोच आहे. नानक सांगतात, 'तोच सांगणारा आहे व ऐकणाराही तोच आहे. ॥ ४ ॥ २ ॥

॥ बिलावलु महला ३ ॥

साहिब ते सेवकु सेव साहिब ते किआ को कहै बहाना ॥
ऐसा इकु तेरा खेलु बनिआ है सभ महि एकु समाना ॥ १ ॥
सतिगुरि परचै हरि नामि समाना ॥
जिसु करमु होवै सो सतिगुरु पाए अनदिनु लागै सहज धिआना ॥ १ ॥ रहाउ ॥
किआ कोई तेरी सेवा करे किआ को करे अभिमाना ॥
जब अपुनी जोति खिंचहि तू सुआमी तब कोई करउ दिखा वखिआना ॥ २ ॥
आपे गुरु चेला है आपे आपे गुणी निधाना ॥
जिउ आपि चलाए तिवै कोई चालै जिउ हरि भावै भगवाना ॥ ३ ॥
कहत नानकु तू साचा साहिबु कउणु जाणै तेरे कामां ॥
इकना घर महि दे वडिआई इकि भरमि भवहि अभिमाना ॥ ४ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ७९७)

शब्दार्थ : **बहाना** – वितर्क, असत्य. **बनिआ** – निर्माण केला. **परचै** – परिचय. **जिसु** – ज्याच्यावर, ज्याला. **करमु** – कृपा (भाग्यात). **किआ** – काय. **अभिमान** – गर्व, अहंकार. **खिंचहि** – खेचून घेणे, काढून घेणे. **जिउ** – ज्याप्रमाणे, जसे. **तिवै** – तसे. **कउणु** – कोण. **कामां** – कार्य.

भावार्थ : प्रभू परमात्मा ज्यास आपला सेवक बनवतो तोच प्रभूचा सेवक बनतो व प्रभूची सैवा करू लागतो. ह्यात कुतर्क तो काय ? ह्यात खोटे काय ? तू ह्या सृष्टीचा खेळ असा काही रचला आहेस की सर्वत्र एकमेव तूच सामावून राहिला आहेस. ॥ १ ॥ सतगुरूची भेट झाली की जीव प्रभुनामात लीन होतो. ज्याच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते त्यास सतगुरू प्राप्त होतो व तो सदैव सहजावस्थेत जाऊन प्रभूचे ध्यान करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तुझ्या कृपेशिवाय तुझी सेवा कोणी करू शकेल काय ? मग सेवकाने सेवेचा एवढा गर्व तरी कशाला करावा ? जर प्रभूने स्वत:ची शक्ती जीवातून काढून घेतली तर जीव प्रभू परमात्म्याचे वर्णन तरी करू शकेल काय ? प्रभूची शक्ती पाठीशी असल्याशिवाय कोणीही काहीही करू शकत नाही. ॥ २ ॥ प्रभू परमात्माच स्वत: गुरू आहे व तोच स्वत: शिष्य आहे व तोच गुणांचे भांडार आहे. तो प्रभू परमात्मा जीवास जसे चालवतो तसा तो चालतो. जशी प्रभू परमात्म्याची इच्छा असेल तसेच जगात घडते. ॥ ३ ॥ नानक सांगतात, 'हे प्रभो ! तूच खरा साऱ्या जगाचा स्वामी आहेस, तुझे कार्य कोण जाणू शकेल ? एखाद्यास तू घरबसल्या मोठेपणा प्राप्त करून देतोस तर एखाद्यास मायेच्या भ्रमात गर्वाने भ्रमत ठेवतोस. ॥ ४ ॥ ३ ॥

॥ बिलावलु महला ३ ॥

पूरा थाटु बणाइआ पूरै वेखहु एक समाना ॥
इसु परपंच महि साचे नाम की वडिआई मतु को धरहु गुमाना ॥ १ ॥
सतिगुर की जिस नो मति आवै सो सतिगुर माहि समाना ॥
इह बाणी जो जीअहु जाणै तिसु अंतरि रवै हरि नामा ॥ १ ॥ रहाउ ॥
चहु जुगा का हुणि निबेड़ा नर मनुखा नो एकु निधाना ॥
जतु संजम तीरथ ओना जुगा का धरमु है कलि महि कीरति हरि नामा ॥ २ ॥
जुगि जुगि आपो आपणा धरमु है सोधि देखहु बेद पुराना ॥
गुरमुखि जिनी धिआइआ हरि हरि जगि ते पूरे परवाना ॥ ३ ॥
कहत नानकु सचे सिउ प्रीति लाए चूकै मनि अभिमाना ॥
कहत सुणत सभे सुख पावहि मानत पाहि निधाना ॥ ४ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ७९७)

शब्दार्थ : **पूरा** – पूर्ण. **थाट** – संसाराची रचना. **बणाइआ** – केली. **वेखहु** – पाहतो. **परपंच** – प्रपंच. **मतु** – नकोस. **मति** – बुद्धी. **जीवहु** – अंत:करणपूर्वक. **जाणै** – जाणतो. **रवै** – रममाण होते, वास करते. **निबेडा** – निर्णय, निष्कर्ष. **जतु** – यती. **ओना** – त्या, तेथे. **कीरती** – कीर्ती. **सोधि** – शोध घेणे. **अभिमाना** – गर्व, ताठा. **मानत** – मनन. **निधाना** – खजिना.

भावार्थ : त्या पूर्णप्रभूने ह्या सृष्टीची निर्मिती केली. तो तिचा संभाळही करतो. तो सर्वत्र भरून राहिला आहे.

ह्या प्रपंचात केवळ प्रभुनामाचीच महती आहे. हे जीवा ! तू आपल्या शरीराचा, धनसंपतीचा गर्व करू नकोस. ॥१॥ ज्यास सतगुरू बुद्धी देतो तो सतगुरूशी एकरूप होतो. जो प्रभू परमात्म्याची वाणी जाणतो, प्रभुनाम जाणतो त्याच्या अंत:करणात प्रभुनाम वास करते. ॥ १ ॥ रहाउ ॥ चारही युगांत हाच न्याय चालू आहे की जीवास प्रभुनाम हीच सर्व संपत्ती आहे. इतर तीन युगात, यती होणे, इंद्रिय निग्रह व तीर्थाटन हे युग धर्म मानले जात असत पण कलियुगात प्रभू परमात्म्याचे नाम संकीर्तन हाच एकमेव धर्म आहे. वेद शास्त्रपुराणांचा अभ्यास केला तर त्यातही हेच दिसून येईल. गुरूमुखी होऊन ज्यांनी प्रभुनामाचे स्मरण केले ते प्रभू दरबारी स्वीकृत होतात. ॥ ३ ॥ नानकांच्या मते प्रभूवर प्रेम केल्याने मनातील अहंकार नष्ट होतो. प्रभुनामाचे उच्चारण केल्याने, प्रभुनाम श्रवण केल्याने व प्रभूस अनुरूप असे आचरण केल्याने सुखाचे सर्व भांडार प्राप्त होते. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ बिलावलु महला ३ ॥

गुरमुखि प्रीति जिस नो आपे लाए ॥ तितु घरि बिलावलु गुर सबदि सुहाए ॥
मंगलु नारी गावहि आए ॥ मिलि प्रीतम सदा सुखु पाए ॥ १ ॥
हउ तिन बलिहारै जिन्ह हरि मंनि वसाए ॥
हरि जन कउ मिलिआ सुखु पाईऐ हरि गुण गावै सहजि सुभाए ॥ १ ॥ रहाउ ॥
सदा रंगि राते तेरै चाए ॥ हरि जीउ आपि वसै मनि आए ॥
आपे सोभा सद ही पाए ॥ गुरमुखि मेलै मेलि मिलाए ॥ २ ॥
गुरमुखि राते सबदि रंगाए ॥ निजघरि वासा हरि गुण गाए ॥
रंगि चलूलै हरि रसि भाए ॥ इहु रंगु कदे न उतरै साचि समाए ॥ ३ ॥
अंतरि सबदु मिटिआ अगिआनु अंधेरा ॥
सतिगुर गिआनु मिलिआ प्रीतमु मेरा ॥
जो सचि राते तिन बहुड़ि न फेरा ॥
नानक नामु द्रिड़ाए पूरा गुरू मेरा ॥ ४ ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ७९८)

शब्दार्थ : **बिलवलु** – आनंद. **सुहाए** – सुख. **मिलिआ** – भेटून. **चाए** – तुझ्या प्रेमात. **निजघरि** – स्वस्वरूप. **चलूलै** – गर्द लाल. **उतरै** – विटणे, फिका होणे. **तिन** – त्याला. **फेरा** – जन्म-मृत्यूचा फेरा. **द्रिडाए** – दृढ करतो.

भावार्थ : ज्यास प्रभू परमात्मा स्वतः प्रेरणा देतो, तो गुरूमार्गी चालून प्रभू परमात्म्यावर प्रेम करू लागतो. त्याचे हृदय गुरूच्या उपदेशाने आनंदाने भरून जाते. साऱ्या जीवस्त्रिया मंगलगीत गातात. व प्रियकरास (प्रभूस) प्राप्त करून सुखी होतात. ॥ १ ॥ ज्यांच्या हृदयात प्रभू परमात्मा वास करतो, त्यांच्यावर मी माझा जीव ओवाळून टाकतो. प्रभुसेवकांची भेट झाल्याने सुख प्राप्त होते व जीव सहजभावे हरीचे गुणगान करू लागतो. ॥ १ ॥रहाउ॥ तुझ्या भक्तीने उत्साहित राहून जीव सदैव तुझ्या रंगात रंगून जातात व स्वतः प्रभू परमात्मा अशा जीवांच्या अंतःकरणात वास करतो व सदैव शोभायमान दिसतो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्रभूशी मिलन

होते. प्रभू स्वतः त्यास आपल्यात सामावून घेतो. ॥ २ ॥ गुरूमार्गी चालणारा जीव प्रभूच्या प्रेमरंगात रंगून जातो. तो प्रभूचे गुण गात स्वस्वरूपी वास करतो. तो प्रभुप्रेमाच्या गर्द लाल रंगाने रंगून जातो. हा प्रभुप्रेमरंग कधीही फिका होत नाही व असा जीव सत्यरूप प्रभू परमात्म्यात विलीन होतो. ॥ ३ ॥ अंतःकरणात प्रभुनामाचा वास झाला की अज्ञान, अंधकार नष्ट होतो. मला जेव्हा सतगुरूकडून ज्ञान प्राप्त झाले, तेव्हा मला माझा प्रियकर (प्रभू) भेटला. जो सत्यरूप प्रभूत रममाण झाला, त्यास परत जन्म घ्यावा लागत नाही. तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. नानक सांगतात माझा पूर्णगुरू माझ्या मनात प्रभुनाम दृढ करतो. ॥ ४ ॥ ५ ॥

॥ बिलावलु महला ३ ॥

पूरे गुर ते वडिआई पाई ॥ अंचित नामु वसिआ मनि आई ॥
हउमै माइआ सबदि जलाई ॥ दरि साचै गुर ते सोभा पाई ॥ १ ॥
जगदिस सेवउ मै अवरू न काजा ॥
अनदिनु अनदु होवै मनि मेरै गुरमुखि मागउ तेरा नामु निवाजा ॥ १ ॥ रहाउ ॥
मन की परतीति मन ते पाई ॥ पूरे गुर ते सबदि बुझाई ॥
जीवन मरणु को समसरि वेखै ॥ बहुड़ि न मरै ना जमु पेखै ॥ २ ॥
घर ही महि सभि कोट निधान ॥ सतिगुरि दिखाए गइआ अभिमानु ॥
सद ही लागा सहजि धिआन ॥ अनदिनु गावै एको नाम ॥ ३ ॥
इसु जुग महि वडिआई पाई ॥ पूरे गुर ते नामु धिआई ॥
जह देखा तह रहिआ समाई ॥ सदा सुखदाता कीमति नही पाई ॥ ४ ॥
पूरै भागि गुरू पूरा पाइआ ॥ अंतरि नामु निधानु दिखाइआ ॥
गुर का सबदु अति मीठा लाइआ ॥
नानक त्रिसन बुझी मनि तनि सुखु पाइआ ॥ ५ ॥ ६ ॥ ४ ॥ ६ ॥ १० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ७९८)

शब्दार्थ : **वडिआई** – महानता, मोठेपणा. **हउमै** – अहंकार. **दरि** – दारी. **काजा** – कार्य. **मागउ** – मागतो. **निवाजा** – हे कृपाळू. **परतीति** – प्रचिती, विश्वास. **बुझाई** – समजावले. **समसरि** – समदृष्टीने. **पेखै** – पाहतो. **गइआ** – निघून गेला. **जह** – जेथे. **तह** – तेथे. **त्रिसन** – तृष्णा. **बुझी** – नष्ट झाली, निमाली.

भावार्थ : ज्याने पूर्णगुरूच्या कृपेने महती प्राप्त केली, त्याच्या मनात सदैव चिंतामुक्त करणारे प्रभुनाम वास करते. प्रभुनामामुळे मनातील मोहमाया, अहंकार सारे काही जळून जाते. असा जीव सतगुरूमुळे प्रभूच्या दारी सन्मान प्राप्त करतो. ॥ १ ॥ मी सदैव जगदिशाची सेवा करावी, त्याशिवाय मी अन्य कोणतेही काम करू नये अशी माझी इच्छा आहे. मला बाकी काही नको. मी गुरूमार्गी होऊन सदैव प्रभुदारी सन्मान प्राप्त करून देणाऱ्या तुझ्या नामाची याचना करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ मनाची प्रचिती मनानेच येते. पूर्णगुरूने प्रभुनामाचे ज्ञान दिले. जो जन्म व मरण दोघांना सम समान जाणतो त्यास परत मरण येत नाही. यमराज सुद्धा त्याच्याकडे आपली नजर वळवत नाही. ॥ २ ॥ आपल्या अंतःकरणात सर्व सुखाचा प्रभुनामाचा खजिना बंदिस्त आहे. सतगुरूने तो दाखवल्यामुळे

मनातील अंहकार गळून पडला व मन सदैव सहजसमाधीत लीन झाले. आता मी सदैव एकमेव प्रभू परमात्म्याचे नाम गातो. ॥ ३ ॥ जीवाने सतगुरूच्या माध्यमातून प्रभुनामाचे ध्यान करावे, त्यानेच ह्या युगात महानता प्राप्त होते. जेथे पाहावे तेथे तो प्रभू परमात्मा भरून राहिला आहे. सदैव सुख देणाऱ्या प्रभू परमात्म्याचे मोल कोणीही करू शकत नाही. ॥ ४ ॥ पूर्ण भाग्याने पूर्णगुरू प्राप्त होतो. तो जीवास अंतरात वास करीत असणाऱ्या प्रभुनामाचे भांडार दाखवतो. सतगुरूचा उपदेश मला फार गोड वाटला. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशाने माझी तहान शमली व माझ्या तनमनास सुखाची प्राप्त झाली. ॥ ५ ॥ ६ ॥ ४ ॥ ६ ॥ १० ॥

॥ बिलावलु महला ४ घरु ३ ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

उदम मति प्रभ अंतरजामी जिउ प्रेरे तिउ करना ॥
जिउ नटूआ तंतु वजाए तंती तिउ वाजहि जंत जना ॥ १ ॥
जपि मन राम नामु रसना ॥
मसतकि लिखत लिखे गुरू पाइआ हरि हिरदै हरि बसना ॥ १ ॥ रहाउ ॥
माइआ गिरसति भ्रमतु है प्रानी रखि लेवहु जनु अपना ॥
जिउ प्रहिलादु हरणाखसि ग्रसिओ हरि राखिओ हरि सरना ॥ २ ॥
कवन कवन की गति मिति कहीऐ हरि कीए पतित पवंना ॥
ओहु ढोवै ढोर हाथि चमु चमरे हरि उधारिओ परिओ सरना ॥ ३ ॥
प्रभ दीन दइआल भगत भव तारन हम पापी राखु पपना ॥
हरि दासन दास दास हम करीअहु जन नानक दास दासंना ॥ ४ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ७९८)

शब्दार्थ : **उदम** – उद्योग. **प्रेरे** – प्रेरणा देतो. **नटुआ** – नट. **तंतु** – तंतुवाद्य, वीणा. **वजाए** – वाजवतो. **गिरसति** – ग्रस्त. **ओहु** – तो (भक्त रविदास.) **ढोवै** – ओढतो. **ढोर** – मेलेली जनावरे. **चमु** – चामडे. **चमरे** – चांभाराच्या. **पपना** – पापापासून.

भावार्थ : तो प्रभू परमात्मा प्रत्येक जीवास उद्योग करण्याची; कर्म करण्याची प्रेरणा देतो. तो जशी प्रेरणा देतो त्याप्रमाणे जीव कर्म करतो, उद्योग करतो. मनुष्य हा नट आहे. प्रभू परमात्मा त्यास जी भूमिका करावयास सांगतो, तीच भूमिका जीवास पार पाडावी लागते. वादक वाद्यातून जसे सूर काढू इच्छितो, त्याचप्रमाणे त्या वाद्यातून सूर उमटतात. प्रभू हा वादक आहे. मनुष्य हा त्याच्या हातचे वाद्य आहे. ॥ १ ॥ हे मना ! जिव्हेद्वारा रामनामाचा जप कर. भाग्यात लिहिले असेल त्याप्रमाणे सदगुरू प्राप्त होतो व हृदयात हरिनामाचा वास होतो. ॥१॥रहाउ॥ सारे जीव मायेने ग्रस्त झाले आहेत. हे प्रभो ! तू आपल्या सेवकांचे रक्षण कर. ज्याप्रमाणे हिरण्यकश्यपूच्या छळापासून तू भक्त प्रल्हादाचे

रक्षण केलेस, त्याप्रमाणे प्रभूस शरण आलेल्या भक्तांचे रक्षण कर. ॥२॥ कोणाकोणाच्या गतीचे वर्णन करू ? अनेक पतितांना हरीने पावन केले आहे. तो भक्त रविदास मेलेली जनावरे ओढीत होता. त्या चांभाराच्या हाती सदैव चामडेच होते. तो जेव्हा प्रभू परमात्म्यास शरण गेला तेव्हा प्रभूने त्याचा उद्धार केला. ॥ ३ ॥ हे प्रभो, हे दीन दयाळा ! तू भक्तांना भवसागरातून तारून ने. आम्हा पाप्यांचेही पापापासून रक्षण कर. हे प्रभो ! मला तुझ्या दासांचा दास कर. नानक सांगतात, हे प्रभो ! मला त्या दासांचाही दास कर. ॥ ४ ॥ १ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

हम मूरख मुगध अगिआन मती सरणागति पुरख अजनमा ॥
करि किरपा रखि लेवहु मेरे ठाकुर हम पाथर हीन अकरमा ॥ १ ॥
मेरे मन भजु राम नामै रामा ॥
गुरमति हरि रसु पाईऐ होरि तिआगहु निहफल कामा ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि जन सेवक से हरि तारे हम निरगुन राखु उपमा ॥
तुझ बिनु अवरु न कोई मेरे ठाकुर हरि जपीऐ वडे करंमा ॥ २ ॥
नाम हीन ध्रिगु जीवते तिन वड दूख सहंमा ॥
ओइ फिरि फिरि जोनि भवाईअहि मंदभागी मूड़ अकरमा ॥ ३ ॥
हरि जन नामु अधारु है धुरि पूरबि लिखे वड करमा ॥
गुरि सतिगुरि नामु द्रिड़ाइआ जन नानक सफलु जनंमा ॥ ४ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ७९९)

शब्दार्थ : **अजनामा** – जन्मरहित. **अकरमा** – कर्महीन, दुर्दैवी. **गुरमति** – गुरूच्या उपदेशाने. **होरि** – अन्य. **निहफल** – निष्फळ. **कामा** – कर्म, कार्य. **वडे करमा** – सौभाग्य. **ध्रिगु** – धिक्कार. **सहंम्रा** – सहन करणे. **भवाईअहि** – भटकणे, फिरत राहणे. **मंदभागी** – कमनशिबी.

भावार्थ : हे अजन्मा ! परमपुरुषा ! आम्ही जीव मूर्ख आहोत, अडाणी आहोत, अज्ञानी आहोत, मतिमंद आहोत. आम्ही तुला शरण आलो आहोत. आम्ही दगडासारखे हीनकर्मी आहोत. हे माझ्या स्वामी, आमच्यावर कृपा कर व आमचे रक्षण कर. ॥ १ ॥ हे माझ्या मना ! तू सदैव राम, राम असा नामोच्चार करून रामाची सेवा कर. सतगुरूच्या उपदेशाने प्रभुनामामृत प्राप्त होते. म्हणून हे माझ्या मना निष्फल कर्माचा त्याग कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! तू आपल्या सेवकांना भवसागर पार करून नेतोस. आम्हा गुणहीनांनाही भवसागरात बुडण्यापासून वाचवतोस. त्यातच तुझे मोठेपण आहे. हे प्रभो ! मला तुझ्याशिवाय अन्य कोणाचाही आधार नाही. महाभाग्याने तुझे नाम प्राप्त होते. ॥२॥ नामविहीन जीवनाचा धिक्कार असो. अशा जीवांना महादु:ख सहन करावे लागते. त्या दुर्भागी मूर्ख लोकांना वारंवार जन्ममरणाच्या चक्रात फिरावे लागते. ॥ ३ ॥ प्रभूच्या सेवकांना प्रभुनामाचाच आधार असतो. त्यांच्या पूर्वजन्मीच्या शुभ कर्माचे फळ म्हणून त्यांच्या भाग्यलेखात तसे लिहिलेले असते. नानक सांगतात, माझ्या मनात सतगुरूने प्रभुनाम दृढ केले त्यामुळे दास नानकाचा जन्म सफल झाला.॥ ४ ॥ २ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

हमरा चितु लुभत मोहि बिखिआ बहु दुरमति मैलु भरा ॥
तुम्हरी सेवा करि न सकह प्रभ हम किउ करि मुगध तरा ॥ १ ॥
मेरे मन जपि नरहर नामु नरहरा ॥
जन ऊपरि किरपा प्रभि धारी मिलि सतिगुर पारि परा ॥ १ ॥ रहाउ ॥
हमरे पिता ठाकुर प्रभ सुआमी हरि देहु मती जसु करा ॥
तुम्हरै संगि लगे से उधरे जिउ संगि कासट लोह तरा ॥ २ ॥
साकत नर होछी मति मधिम जिन्ह हरि हरि सेव न करा ॥
ते नर भागहीन दुहचारी ओइ जनमि मुए फिरि मरा ॥ ३ ॥
जिन कउ तुम्ह हरि मेलहु सुआमी ते न्हाए संतोख गुर सरा ॥
दुरमति मैलु गई हरि भजिआ जन नानक पारि परा ॥ ४ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ७९९)

शब्दार्थ : **चितु** – चित्त. **लुभत** – लोभिष्ट. **बिखिआ** – विष. **किउकरि** – कशाप्रकारे. **नरहर** – नृसिंह. **जिउ** – जसे. **कासट** – काष्ठ, लाकूड. **साकत** – शाक्त. **होछि** – तुच्छ, हीन. **मधिम** – मध्यम. **भागहीन** – भाग्यहीन, दुर्दैवी. **दुहचारी** – दुराचारी. **न्हाए** – नाहतात. **सरा** – सरोवर.

भावार्थ : आमचे मन मोहमायेने, विषयविकारांनी लोभावले आहे. त्यामुळे ते दुर्मतीच्या मळाने भरलेले आहे. त्यामुळे आम्ही तुझी सेवा करू शकत नाही. हे प्रभो ! आम्ही मूर्ख हा भवसागर कसा तरून जाणार ? ॥ १ ॥ हे माझ्या मना ! तू सर्व दु:खे हरण करणाऱ्या त्या नरहरीचा नृसिंहाचा जप कर. हे प्रभो ! ह्या तुझ्या सेवकावर कृपा कर. त्याची सतगुरूशी भेट घडव आणि ह्या जीवास भवसागरातून पार कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! तू आम्हा जीवांचा पिता आहेस, स्वामी आहेस, आम्हास अशी बुद्धी दे की ज्यामुळे आम्ही तुझे यशोगान गावे. ज्याप्रमाणे काष्ठाच्या संगतीने लोखंड तरून जाते, त्याप्रमाणे हे प्रभो ! तुझ्या संगतीने आम्ही भवसागर तरून जाऊ. ॥२॥ शाक्त लोक हे हीन बुद्धीचे असतात, प्रभूपासून दूर गेलेले असतात. हरीची सेवा केली नाही ते मध्यम बुद्धीचे होत. असे लोक भाग्यहीन व दुराचारी असतात. ते जन्मतात– मरतात, पुन्हा जन्मतात, पुन्हा मरतात अशा रीतीने वारंवार जन्ममरणाच्या चक्रात फिरतच राहतात. ॥ ३ ॥ हे प्रभो ! ज्यांना तू स्वत:मध्ये एकरूप करून घेतोस ते गुरुरूपी संतोष सरोवरात स्नान करतात. प्रभूची भक्ती केल्याने दुर्मतीचा मळ नष्ट झाला व दास नानक भवसागर पार करून गेला. ॥ ४ ॥ ३ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

आवहु संत मिलहु मेरे भाई मिलि हरि हरि कथा करहु ॥
हरि हरि नामु बोहिथु है कलजुगि खेवटु गुर सबदि तरहु ॥ १ ॥
मेरे मन हरि गुण हरि उचरहु ॥
मसतकि लिखत लिखे गुन गाए मिलि संगति पारि परहु ॥ १ ॥ रहाउ ॥
काइआ नगर महि राम रसु ऊतमु किउ पाईऐ उपदेसु जन करहु ॥

सतिगुरु सेवि सफल हरि दरसनु मिलि अंम्रितु हरि रसु पीअहु ॥ २ ॥
हरि हरि नामु अंम्रितु हरि मीठा हरि संतहु चाखि दिखहु ॥
गुरमति हरि रसु मीठा लागा तिन बिसरे सभि बिख रसहु ॥ ३ ॥
राम नामु रसु राम रसाइणु हरि सेवहु संत जनहु ॥
चारि पदारथ चारे पाए गुरमति नानक हरि भजहु ॥ ४ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ७९९)

शब्दार्थ : **बोहिथु** – जहाज. **खेवटु** – नावाडी. **उचरहु** – उच्चार कर. **पिअहु** – प्राशन करा. **चाखि** – चाखून. **दिखहु** – पाहा. **बिख** – विष. **चारि पदारथ** – चार पुरुषार्थ, (धर्म अर्थ, काम, मोक्ष.)

भावार्थ : हे माझ्या भावांनो, संतजनहो ! एकत्र या. एके ठिकाणी जमून प्रभू परमात्म्याचे गुणगान करूया. हरिनाम हे कलियुगातील भवसागर पार करून नेणारे जहाज आहे. शब्दगुरू हा त्या जहाजाचा नावाडी आहे. ॥१॥ हे माझ्या मना तू प्रभू परमात्म्याच्या गुणांचा उच्चार कर. ज्याच्या भाग्यात तसे लिहिले असेल तोच प्रभुगुण गातो व संतसंगत प्राप्त करून मुक्त होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ देहरूपी नगरात प्रभुप्रेमरूपी उत्तम अमृत सरोवर आहे. हे प्रभुसेवकांनो ! ते अमृत कसे प्राप्त करावे ते सांगा. सतगुरूची सेवा प्रभुदर्शनाने सफल होते व हरिनामामृत प्राशन करता येते. ॥ २ ॥ प्रभुनामामृताची चव अत्यंत मधुर आहे. हे संतजनहो ! हे अमृत चाखून तर पाहा. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्रभुनामामृताची माधुरी कळते व ते प्राशन करणाऱ्याच्या मनातील मायेच्या विषारी स्वादाचा विसर पडतो. ॥ ३ ॥ रामनाम हे अमरत्व प्राप्त करून देणारे रसायन आहे. हे हरीच्या सेवकांनो ! हे संतजनहो ! प्रभू परमात्म्याच्या सेवेत तल्लीन व्हा. सतगुरूच्या उपदेशाने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ प्राप्त होतात. नानक सदैव प्रभू परमात्म्याची भक्ती करतात. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

खत्री ब्राह्मणु सूदु वैसु को जापै हरि मंत्रु जपैनी ॥
गुर सतिगुरू पारब्रहमु करि पूजहु नित सेवहु दिनसु सभ रैनी ॥ १ ॥
हरि जन देखहु सतिगुरु नैनी ॥
जो इछहु सोई फलु पावहु हरि बोलहु गुरमति बैनी ॥ १ ॥ रहाउ ॥
अनिक उपाव चितवीअहि बहुतेरे सा होवै जि बात होवैनी ॥
अपना भला सभु कोई बाछै सो करे जि मेरै चिति न चितैनी ॥ २ ॥
मन की मति तिआगहु हरि जन एहा बात कठैनी ॥
अनदिनु हरि हरि नामु धिआवहु गुर सतिगुर की मति लैनी ॥ ३ ॥
मति सुमति तेरै वसि सुआमी हम जंत तू पुरखू जंतैनी ॥
जन नानक के प्रभ करते सुआमी जिउ भावै तिवै बुलैनी ॥ ४ ॥ ५ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८००)

शब्दार्थ : **सूदु** – शूद्र. **वैसु** – वैश्य. **को** – कोणीही. **जपैनी** – जप करण्यास योग्य. **परब्रहमु** – परब्रह्म. **पूजहू** – पूजा करा. **बैनी** – वाणीद्वारा. **अनिक** – अनेक. **उपाव** – उपाय. **चिततीअहि** – चिंतन करणे.

बहुतेरे – खूप. **होवैनी** – होणारे. **वाछै** – इच्छितात. **चितैनी** – चिंतिले. **कठैनी** – कठीण. **लैनी** – घेऊन. **वसि** – अधीन, ताब्यात. **जंत** – वाद्य. **जंतैनी** – वादक. **करते** – कर्तापुरुष. **बुलैनी** – बोलावतो.

भावार्थ : क्षत्रिय, ब्राह्मण, शूद्र, वैश्य कोणीही जप करण्यायोग्य अशा हरिनामाचा जप करावा. सतगुरूस परब्रह्म मानून त्याची पूजा करावी. रात्रंदिवस त्याची सेवा करावी. ॥ १ ॥ प्रभुसेवकहो ! सतगुरूच्या रूपाने प्रभू परमात्म्याचे आपल्या डोळ्यांनी दर्शन घ्या. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभुनामाचे स्मरण करा व मनोवांछित फल प्राप्त करा. ॥ १ ॥ रहाउ ॥ आपण मनात अनेक गोष्टी व्हाव्यात असा विचार करतो. पण जे घडणार असते तेच घडते. सर्वजण आपले भले व्हावे असे चिंतितो. पण प्रभू परमात्मा जे काही करतो त्याचा आपण कधीही विचार केलेला नसतो.॥ २ ॥ हे प्रभुभक्तांनो ! आपल्या मनाप्रमाणे वागणे सोडून द्या. हे करणे अवघड आहे; पण ते करा आणि सदैव प्रभुनामाचे स्मरण करा. सतगुरूंच्या उपदेशाप्रमाणे आचरण करा. ॥ ३ ॥ हे प्रभो ! चांगली वा वाईट बुद्धी देणे हे सर्वस्वी तुझ्याच हाती आहे. आम्ही केवळ वाद्य आहोत. वाजवणारा तू आहेस. दास नानक सांगतात, तो प्रभू परमात्मा त्याच्या इच्छेप्रमाणे जीवास बोलावयास लावतो. ॥ ४ ॥ ५ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

अनद मूलु धिआइओ पुरखोतमु अनदिनु अनद अनंदे ॥
धरमराइ की काणि चुकाई सभि चूके जम के छंदे ॥ १ ॥
जपि मन हरि हरि नामु गोबिंदे ॥
वडभागी गुरु सतिगुरु पाइआ गुण गाए परमानंदे ॥ १ ॥ रहाउ ॥
साकत मूड़ माइआ के बधिक विचि माइआ फिरहि फिरंदे ॥
त्रिसना जलत किरत के बाधे जिउ तेली बलद भवंदे ॥ २ ॥
गुरमुखि सेव लगे से उधरे वडभागी सेव करंदे ॥
जिन हरि जपिआ तिन फलु पाइआ सभि तूटे माइआ फंदे ॥ ३ ॥
आपे ठाकरु आपे सेवकु सभु आपे आपि गोविंदे ॥
जन नानक आपे आपि सभु वरतै जिउ राखै तिवै रहंदे ॥ ४ ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८००)

शब्दार्थ : **काणि** – उपकार. **छंदे** – मेहेरबानी. **साकत** – शाक्त, दुराचारी. **मूड** – मूढ, मूर्ख. **फिरंदे** – फिरतात. **किरत** – कर्म. **बाधे** – बद्ध, बांधलेले. **बलद** – बैल. **भवंदे** – फिरतो. **सेव** – सेवा. **उधरे** – उद्धार होतो. **करंदे** – करतात. **जिउ** – ज्याप्रमाणे. **रहंदे** – राहतात.

भावार्थ : आनंदाचा मूळ स्रोत, जो प्रभु पुरूषोत्तम, त्याचे स्मरण करावे. म्हणजे सदैव आनंदी आनंदच प्राप्त होतो. धर्मराजाच्या मेहेरबानीची गरज राहत नाही. यमाचीही भीती राहत नाही. हे मना ! तू प्रभू परमात्म्याचे, त्या गोविंदाचे स्मरण कर. महत्भाग्याने सतगुरूची प्राप्ती झाली आहे. आता प्रभूचे गुण गाऊन परमानंद प्राप्त कर. ॥१॥रहाउ॥ शाक्त, मूर्ख लोक मायेच्या बंधनाने बांधले गेलेले असतात व त्या मायेतच ते फिरत राहतात.

मोहमायेच्या तृष्णेने जळणारे, कर्मबंधनाने जखडलेले जीव तेल्याच्या घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतात. ॥ २ ॥ जे गुरुमार्गी होऊन प्रभुसेवेस लागले त्यांचा उद्धार होतो. महत् भाग्याने जीव प्रभुसेवा करू लागतो. ज्याने हरिनामाचा जप केला त्यांना त्याचे योग्य ते फळ प्राप्त होते. त्याचे मायापाश तुटून जातात. ॥ ३ ॥ हे प्रभू परमात्मा ! तू स्वत:च स्वामी आहेस अणि सेवकही तूच आहेस. सर्व काही तुझा तूच आहेस. दास नानक सांगतात,तो प्रभू परमात्मा स्वत: सर्व कार्यशील आहे व जीव तो जसे ठेवतो तसा राहतो. ॥ ४ ॥ ६ ॥

रागु बिलावलु महला ४ पडताल घरु १३ ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाम सत्य आहे. तो कर्तापुरुष आहे. तो निर्भय आहे. तो निर्वैर आहे. तो कालातीत आहे. अयोनीसंभव, स्वयंभू आहे, सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

बोलहु भईआ राम नामु पतित पावनो ॥ हरि संत भगत तारनो ॥
हरि भरिपुरे रहिआ ॥ जलि थले राम नामु ॥
नित गाईऐ हरि दूख बिसारनो ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि कीआ है सफल जनमु हमारा ॥ हरि जपिआ हरि दूख बिसारनहारा ॥
गुरु भेटिआ है मुकति दाता ॥ हरि कीई हमारी सफल जाता ॥
मिलि संगती गुन गावनो ॥ १ ॥
मन राम नाम करि आसा ॥ भाउ दूजा बिनसि बिनासा ॥
विचि आसा होइ निरासी ॥ सो जनु मिलिआ हरि पासी ॥
कोई राम नाम गुन गावनो ॥ जनु नानकु तिसु पगि लावनो ॥२॥१॥७॥४॥६॥७॥१७॥

(श्री गु. ग्रं. सा. ८००)

शब्दार्थ : **तारनो** – तारणारा. **बिसारनो** – नाशक. **बिसरनहारा** – नाश करणारा. **जाता** – यात्रा, जीवनयात्रा. **भाउ** – प्रेम. **दूजा** – द्वैतभाव. **पासी** – जवळ.

भावार्थ : हे बंधू ! पतितांना पावन करणाऱ्या प्रभुनामाचा उच्चार कर. रामनाम हे संतांना, भक्तांना भवसागरातून तारून नेते. प्रभू परमात्मा सर्वत्र भरून राहिलेला आहे. जळी, स्थळी सर्वत्र प्रभुनामच भरलेले आहे. ह्या रामनामाचे सदैव गायन करावे. ते दु:ख नष्ट करते. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्म्याने माझा जन्म सफल केला आहे. हरी दु:खाचा नाश करणारा आहे म्हणून हरीचे नित्य ध्यान करावे. त्यामुळे मुक्ती प्रदान करणारा प्रभू परमात्मा प्राप्त होतो. हरीने माझी जीवनयात्रा सफल केली. हे जीवांनो ! संतसंगतीत एकत्र बसून प्रभू परमात्म्याचे गुण गावेत. ॥ १ ॥ हे मना ! तू केवळ रामनामाची आशा धर. तेच मनातील द्वैतभावाविषयीचे प्रेम नष्ट करते. जे सर्व सांसारिक आसक्तीपासून विरक्त होतात ते प्रभूशी एकरूप होतात. दास नानक सांगतात, अशांच्या मी पाया पडतो. ॥ २ ॥ १ ॥ ७ ॥ ४ ॥ ६ ॥ ७ ॥ १७ ॥

राग बिलावलु महला ५ चउपदे घरु १

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

नदरी आवै तिसु सिउ मोहु ॥ किउ मिलीऐ प्रभ अबिनासी तोहि ॥
करि किरपा मोहि मारगि पावहु ॥ साध संगति कै अंचलि लावहु ॥ १ ॥
किउ तरीऐ बिखिआ संसारु ॥ सतिगुरु बोहिथु पावै पारि ॥ १ ॥ रहाउ ॥
पवन झूलारे माइआ देइ ॥ हरि के भगत सदा थिरु सेइ ॥
हरख सोग ते रहहि निरारा ॥ सिर ऊपरि आपि गुरू रखवारा ॥ २ ॥
पाइआ वेडु माइआ सरब भुइअंगा ॥ हउमै पचे दीपक देखि पतंगा ॥
सगल सीगार करे नही पावै ॥ जा होइ क्रिपालु ता गुरू मिलावै ॥ ३ ॥
हउ फिरउ उदासी मै इकु रतनु दसाइआ ॥ निरमोलकु हीरा मिलै न उपाइआ ॥
हरि का मंदरु तिसु महि लालु ॥ गुरि खोलिआ पड़दा देखि भई निहालु ॥ ४ ॥
जिनि चाखिआ तिसु आइआ सादु ॥ जिउ गूंगा मन महि बिसमादु ॥
आनद रूपु सभु नदरी आइआ ॥ जन नानक हरिगुण आखि समाइआ ॥ ५ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०१)

शब्दार्थ : **नदरी** – दृष्टीला दिसते. **तोहि** – तुला. **मोहि** – माझ्यावर. **अंचलि** – आश्रय. **झुलारे** – झुलविते. **देइ** – देते. **थिरु** – स्थिर. **भुइअंगा** – सर्पिणी. **देखि** – पाहून. **जा** – जेंव्हा. **मंदरु** – मंदिर, हृदय मंदिर. **तिसुमहि** – त्यामध्ये. **लालु** – परमेश्वर. **निहालु** – प्रसन्न. **चाखिआ** – चाखले. **सादु** – स्वाद, चव. **गुंगा** – मुका. **जिउ** – ज्याप्रमाणे.

भावार्थ : ह्या दृश्यमान जगात जीव मोहून जातो. मग त्याला अविनाशी प्रभू कसा प्राप्त होणार ? हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर. मला प्रभुप्राप्तीचा मार्ग दाखव. मला साधुसंतांच्या संगतीचा आसरा दे. ॥ १ ॥ हा विषमय संसारसागर कसा पार करता येईल ? सतगुरुरूपी जहाज प्राप्त करून त्या आधारे भवसागर पार करता येतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याप्रमाणे वारा वस्तू हलवितो त्याप्रमाणे माया जीवास इकडे तिकडे झुलवत ठेवते. पण जे प्रभूचे भक्त असतात ते सदैव स्थिर असतात. ते हर्ष, शोक आदी विकारांपासून अलिप्त असतात. कारण तो प्रभू परमात्माच त्याचे रक्षण करतो. ॥ २ ॥ मायारूपी सर्पिणीने सर्वांना वेढून टाकले आहे. ज्याप्रमाणे पतंग ज्योतीला पाहून त्यावर झडप घालून मरून जातो त्याप्रमाणे अहंकाराने जीव मायेत लिप्त होऊन जळत राहतो. जीवस्त्रीने कितीही वरवरचा शृंगार केला तरी तिला प्रभुपती प्राप्त होत नाही, पण जर प्रभू परमात्म्याची जीवस्त्रीवर कृपा झाली तर तो तिची सतगुरूशी भेट घडवितो. (मग सतगुरूच्या माध्यमातून तिला प्रभुपती प्राप्त होतो.) ॥ ३ ॥ मी विरक्त होऊन प्रभुपतीरूपी रत्नाच्या शोधात हिंडत आहे. पण अद्याप कोणत्याही मार्गाने मला ते अमूल्य रत्न प्राप्त झाले नाही. वास्तविक प्रभुरूप रत्न तर जीवाच्या हृदयातच आहे. सतगुरू जेव्हा मनावरील मायेचा पडदा दूर करतो तेव्हा त्या प्रभुरूपी रत्नाचे दर्शन होते व मन प्रसन्न होते. ॥ ४ ॥ ज्याने प्रभुनामामृत चाखले त्यालाच त्याची गोडी कळते.

ज्याप्रमाणे मुका स्वाद प्राप्त करून आश्चर्यचकित होतो. (तो मुखाने त्याचे वर्णन करू शकत नाही.) तशी जीवाची अवस्था होते. त्याला सर्वत्र आनंदरूप प्रभूच दिसू लागतो. नानक सांगतात, असा जीव प्रभूचे गुण गात गात प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. ॥ ५ ॥ १ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सरब कलिआणु कीए गुरदेव ॥ सेवकु अपनी लाइओ सेव ॥
बिघनु न लागै जपि अलख अभेव ॥ १ ॥
धरति पुनीत भई गुन गाए ॥ दुरतु गइआ हरि नामु धिआए ॥ १ ॥ रहाउ ॥
सभनी थांई रविआ आपि ॥ आदि जुगादि जा का वड परतापु ॥
गुर परसादि न होइ संतापु ॥ २ ॥
गुर के चरन लगे मनि मीठे ॥ निरबिघन होइ सभ थांई वूठे ॥
सभि सुख पाए सतिगुर तूठे ॥ ३ ॥
पारब्रहम प्रभ भए रखवाले ॥ जिथै किथै दीसहि नाले ॥
नानक दास खसमि प्रतिपाले ॥ ४ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०१)

शब्दार्थ : **कीए** – केले. **लाइओ** – लावले. **बिघनु** – विघ्न. **अलख** – अलक्ष्य, अदृश्य. **अभेव** – अज्ञेय. **दुरतु** – पाप. **परतापु** – प्रताप. **संतापु** – दु:ख. **वुठे** – वास करतो. **तूठे** – संतुष्ट, प्रसन्न. **रखवाले** – रक्षक. **नाले** – जवळ.

भावार्थ : हे बंधू ! सतगुरूने माझे सर्व प्रकारे कल्याण केले आहे. त्याने ह्या आपल्या सेवकास प्रभुसेवेस लावले आहे. त्या अलक्ष्य अज्ञेय प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने कोणतेही विघ्न बाधा आणित नाही. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्याचे गुणगान गाऊन हृदयरूपी धरती पवित्र झाली. प्रभुनामाचे ध्यान केल्याने सर्व पाप नष्ट झाले. ॥१॥रहाउ॥ तो प्रभू परमात्मा सर्वत्र व्याप्त आहे. त्याचा महाप्रताप जेव्हा काहीही नव्हते, तेव्हाही होता व सर्व युगांपूर्वीही होता. सतगुरूच्या कृपेने जीवास कोणतेही दु:ख होत नाही. ॥ २ ॥ मनाला सतगुरुचरणाची गोडी लागते. जीव कोठेही निर्विघ्नपणे वास करतो. सतगुरू प्रसन्न झाल्याने सर्व सुखाची प्राप्ती होते. ॥ ३ ॥ तो परब्रह्म परमात्मा स्वत: जीवाचे रक्षण करतो. तिथे पाहावे तेथे तो जवळच दिसतो. दास नानक सांगतात प्रभू परमात्मा स्वत: आपल्या सेवकाचा प्रतिपाळ करतो. ॥ ४ ॥ २ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सुख निधान प्रीतम प्रभ मेरे ॥ अनगत गुण ठाकुर प्रभ तेरे ॥
मोहि अनाथ तुमरी सरणाई ॥ करि किरपा हरि चरन धिआई ॥ १ ॥
दइआ करहु बसहु मनि आइ ॥ मोहि निरगुन लीजै लड़ि लाइ ॥ रहाउ ॥
प्रभु चिति आवै ता कैसी भीड़ ॥ हरि सेवक नाही जम पीड़ ॥
सरब दूख हरि सिमरत नसे ॥ जा कै संगि सदा प्रभु बसै ॥ २ ॥

प्रभ का नामु मनि तनि आधारु ॥ बिसरत नामु होवत तनु छारु ॥
प्रभ चिति आए पूरन सभ काज ॥ हरि बिसरत सभ का मुहताज ॥ ३ ॥
चरन कमल संगि लागी प्रीति ॥ बिसरि गई सभ दुरमति रीति ॥
मन तन अंतरि हरि हरि मंत ॥ नानक भगतनकै घरि सदा अनंद ॥ ४ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०१)

शब्दार्थ : **अगनत** – अगणित. **मोहि** – मी. **निरगुन**– गुणहीन. **लीजै** – घे. **लडिआइ** – जवळ, हृदयाशी. **भीड** – दु:ख, संकट. **नसे** – नाश पावते. **छारु** – भस्म. **मंत** – मंत्र.

भावार्थ : माझा प्रियतम प्रभू सुखाचे भांडार आहे. हे प्रभो ! तुझे गुण अगणित आहेत. मी अनाथ तुला शरण आलो आहे. माझ्यावर कृपा कर व मी तुझ्या चरणाचे ध्यान करावे अशी मला बुद्धी दे. ॥ १ ॥ माझ्यावर दया कर व माझ्या मनात वास कर. मला गुणहीनाला तू तुझ्या हृदयाशी धर. ॥ रहाउ ॥ ज्याच्या हृदयात प्रभू परमात्म्याचा वास झाला त्याला कोणतेही दु:ख त्रास देऊ शकत नाही. हरीच्या सेवकाला यमाची पीडाही त्रास देऊ शकत नाही. हरीचे स्मरण केल्याने सर्व दु:ख नष्ट होते. त्यांच्या चित्तात सदैव प्रभू परमात्म्याचा वास असतो. ॥ २ ॥ प्रभुनाम हा तन–मनाचा आधार आहे. प्रभुनामाचा विसर पडला तर जीवन मातीमोल होते. चित्तात प्रभूचा वास झाल्यावर सर्व कार्य पूर्ण होते. हरीचे विस्मरण झाले तर सारे जीवन दयनीय होते. ॥ ३ ॥ मनात प्रभुचरणाबद्दल प्रेम निर्माण झाल्याने सर्व दुर्बुद्धी नष्ट होते. आचरण शुद्ध होते. तन–मनात प्रभुनामाचा मंत्र वास करतो. नानक सांगतात, अशा भक्ताच्या मनात सदैव आनंद भरून राहतो. ॥ ४ ॥ ३ ॥

रागु बिलावलु महला ५ घरु २
यानड़ीए कै घरि गावणा ॥

हे पद श्री गुरुग्रंथ साहिब पान ७२२ वरील तिलंग रागातील श्री गुरूनानक देव यांच्या ''इआनड़िए'' च्या चालीवर गावे.

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

मै मनि तेरी टेक मेरे पिआरे मै मनि तेरी टेक ॥
अवर सिआणपा बिरथीआ पिआरे राखन कउ तुम एक ॥ १ ॥ रहाउ ॥
सतिगुरु पूरा जे मिलै पिआरे सो जनु होत निहाला ॥
गुर की सेवा सो करे पिआरे जिस नो होइ दइआला ॥
सफल मूरति गुरदेउ सुआमी सरब कला भरपूरे ॥
नानक गुरु पारब्रहमु परमेसरु सदा सदा हजूरे ॥ १ ॥
सुणि सुणि जीवा सोइ तिना की जिन्ह अपुना प्रभु जाता ॥
हरि नामु अराधहि नामु वखाणहि हरि नामे ही मनु राता ॥

सेवकु जन की सेवा मागै पूरै करमि कमावा ॥
नानक की बेनंती सुआमी तेरे जन देखणु पावा ॥ २ ॥
वडभागी से काढीअहि पिआरेसंतसंगति जिना वासो ॥
अंम्रित नामु अराधीऐ निरमलु मनै होवै परगासो ॥
जनम मरण दुखु काटीऐ पिआरे चूकै जम की काणे ॥
तिना परापति दरसनु नानक जो प्रभ अपणे भाणे ॥ ३ ॥
ऊच अपार बेअंत सुामी कउणु जाणै गुण तेरे ॥
गावते उधरहि सुणते उधरहि बिनसहि पाप घनेरे ॥
पसू परेत मुगध कउ तारे पाहन पारि उतारै ॥
नानक दास तेरी सरणाई सदा सदा बलिहारै ॥ ४ ॥ १ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०२)

शब्दार्थ : **टेक** – आधार, आश्रय. **सिआणपा** – शहाणपण, बुद्धिचातुर्य. **बिरथिआ**– व्यर्थहीन. **राखन** – रक्षण. **निहाला** – प्रसन्न, निश्चिंत. **कला** – शक्ती. **हजूरे** – समक्ष. **जीवा** – जगतो. **जाता** – जाधले. **वखाणहि** – कथन करणे. **राता** – रंगला. **करमि** – कर्म, कार्य. **देखणु** – दर्शन, पाहणे. **काढिअहि** – मोजले जाते. **जीना** – ज्याचा. **काणे** – बंधन, त्रास. **भाणे** – आवडले. **बेअंत** – अनंत. **गावते** – गायन केल्याने. **उधरहि** – उद्धार होतो. **सुणते** – ऐकल्याने. **बिनसहि** – नष्ट होते. **घनेरे** – . **पसु** – पशु. **मुगध** – मूर्ख, मुग्ध. **पाहन** – पाषाण.

भावार्थ : हे माझ्या प्रिय प्रभू ! माझ्या मनाला केवळ तुझाच आधार आहे. तूच माझे एकमेव आश्रयस्थान आहेस. अन्य सारे बुद्धिचातुर्य व्यर्थ आहे. तूच एकमेव माझा रक्षणकर्ता आहेस. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रिय बंधू ! ज्याला पूर्ण सतगुरू प्राप्त झाला तो प्रभुसेवक निश्चिंत झाला. आनंदी झाला. ज्याच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते तो गुरुसेवेस लागतो. माझा स्वामी, माझा सतगुरू सफल मूर्ती आहे. तो सर्व शक्तीने परिपूर्ण भरलेला आहे. नानक सांगतात, तो परब्रह्म, परमात्मा गुरू सदैव समक्ष समोर उभा आहे. ॥ १ ॥ ज्याने प्रभू परमात्मा जाणले त्याच्या तोंडून प्रभूचा महिमा ऐकून ऐकून तर मी जीवन जगतो. असा प्रभुसेवक हरिनामाची आराधना करतो. नामाचा महिमा सांगतो. त्याचे मन हरिनामात रंगलेले असते. हे प्रभो ! मी तुझा सेवक, तुझ्या अशा सेवकाची सेवा मागतो की ज्यामुळे माझे भाग्य पूर्ण होईल. नानक म्हणतात, हे प्रभो ! माझी तुझ्या चरणी एकच विनंती आहे तुझ्या सेवकाचे मला दर्शन घडावे. ॥ २ ॥ जे संतजनांच्या संगतीत राहतात त्यांनाच भाग्यशाली जीव म्हणावे. जो प्रभूच्या अमृतनामाची आराधना करतो त्याचे मन निर्मल होऊन त्यात प्रभू परमात्म्याचा प्रकाश पसरतो. त्याचे जन्ममरणाचे दु:ख नष्ट होते. यमाचे बंधनही नष्ट होते. नानक सांगतात, जे प्रभू परमात्म्यास आवडतात त्यांनाच त्याची प्राप्ती होते. ॥ ३ ॥ हे प्रभो ! तू अत्यंत श्रेष्ठ आहेस. अपार, अनंत आहेस. तुझे गुण कोण जाणू शकणार ? तुझे गुण गाणारे ह्या भवसागरातून तरून जातात. ऐकणारेही उद्धरून जातात. त्यांची अनंत पापे नष्ट होतात. हे प्रभू ! तू पशू, प्रेत, मूर्ख, पाषाणांही तारले आहेस. हा दास नानक तुला शरण आला आहे. तुझ्यावर सदैव मी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥ ४ ॥ १ ॥ ४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

बिखै बनु फीका तिआगि री सखीए नामु महारसु पीओ ॥
बिनु रस चाखे बुडि गई सगली सुखी न होवत जीओ ॥
मानु महतु न सकति ही काई साधा दासी थीओ ॥
नानक से दरि सोभावंते जो प्रभि अपुनै कीओ ॥ १ ॥
हरिचंदउरी चित भ्रमु सखीए म्रिग त्रिसना द्रुम छाइआ ॥
चंचलि संगि न चालती सखीए अंति तजि जावत माइआ ॥
रसि भोगण अति रूप रस माते इन संगि सूखु न पाइआ ॥
धंनि धंनि हरि साध जन सखीए नानक जिनी नामु धिआइआ ॥ २ ॥
जाइ बसहु वडभागणी सखीए संता संगि समाईऐ ॥
तह दूख न भूख न रोगु बिआपै चरन कमल लिव लाईऐ ॥
तह जनम न मरणु न आवण जाणा निहचलु सरणी पाईऐ ॥
प्रेम बिछोहु न मोहु बिआपै नानक हरि एकु धिआईऐ ॥ ३ ॥
द्रिसटि धारि मनु बेधिआ पिआरे रतड़े सहजि सुभाए ॥
सेज सुहावी संगि मिलि प्रीतम अनद मंगल गुण गाए ॥
सखी सहेली राम रंगि राती मन तन इछ पुजाए ॥
नानक अचरजु अचरज सिउ मिलिआ कहणा कछू न जाए ॥ ४ ॥ २ ॥ ५ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०२)

शब्दार्थ : **बिखै** – विषयविकार. **बुडिगई** – बुडून गेले. **सगली** – संपूर्ण सृष्टी. **मानु** – सन्मान. **महतु** – मोठेपणा. **सकति** – शक्ती. **काइ** – काही. **साधा** – साधू, सत्पुरुष. **थिओ** – व्हावे, होऊन जावे. **किओ** – केले. **हरिचंदउरी** – गंधर्वनगरी (काल्पनिक वस्तू). **द्रुम** – वृक्ष. **मते** – मस्त. **जाई** – जा. **बहसु** – बस. **तह** – तेथे. **रतडे** – रंगून जाणे. **बिछोहु** – वियोग, विरह. **सुहावि** – सुंदर, सुखदायी. **पूजाए** – पूर्ण.

भावार्थ : हे सखी ! विषयविकाररूपी तुच्छ, नश्वर रसांचा त्याग करून तू प्रभुनामरूपी अमृतरसाचे पान कर. सारी सृष्टी प्रभुनामरस न चाखल्याने मोहमायेत बुडून गेली आहे. त्यामुळे जीवास ह्या संसारात सुख प्राप्त होत नाही. हे सखी, तुला ह्या जगात कोणताही मान नाही, मोठेपणा नाही. तुझ्या अंगी कोणीतीही शक्ती नाही. तू साधुसंतांच्या दारी त्यांची दासी होऊन राहा. नानक सांगतात की, ज्यांना प्रभू आपलेसे करून घेतो तेच शोभायमान होतात. ॥ १ ॥ हा संसार, ही गंधर्वनगरी मृगजळासारखी मायावी आहे, फसवी आहे. वृक्षाच्या छायेसारखी क्षणभंगूर आहे. हे सखी, हे सारे चंचल आहे. हे कधीही कायम बरोबर राहणारे नाही. शेवटी हे सर्व सोडूनच जावे लागणार आहे. जे ह्या मायावी रसांचा उपभोग घेतात, ह्याच रंगात रंगून जातात त्यांना कधीही सुख प्राप्त होत नाही. नानक सांगतात, हे सखी ! जे प्रभुनामाचे स्मरण करतात ते साधुसंत धन्य होत. ॥ २ ॥ हे महाभाग्यवान सखे, जा. त्या साधुसंतांच्या संगतीत सामावून जा. तेथे दु:ख, भूक, भवरोग, जीवास व्यापत

नाहीत. जीव प्रभुचरणाशी एकरूप होऊन जातो. सतगुरूला शरण गेल्याने असे निश्चल स्थान प्राप्त होते की तेथे जन्मही नाही आणि मृत्यूही नाही. संसारात येणे-जाणेही नाही. नानक सांगतात, त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने प्रभूचे प्रेम प्राप्त होते. कधीही त्याचा वियोग होत नाही. जीवाला मोह व्यापू शकत नाही म्हणून हे सखी तू सदैव प्रभुनामाचे स्मरण कर. ॥ ३ ॥ त्या प्रभू परमात्म्याने माझ्यावर आपली कृपादृष्टी धारण केली आहे. त्याने माझे मन वेधले आहे. आता मी सहजावस्थेत राहून त्याच्या प्रेमरंगात रंगून गेले आहे. प्रभुपतीची संगत प्राप्त झाल्याने माझी सेज सुखदायी झाली आहे. आता मी आनंद उपभोगत आहे. त्याच्या मंगल गुणांचे गीत गात आहे. हे सखे, हे मैत्रिणी ! रामरंगात रंगून गेल्याने माझ्या तन-मनाच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या आहेत. नानक सांगतात, ही स्थिती म्हणजे एक आश्चर्य दुसऱ्या आश्चर्यात एकरूप होऊन जाण्यासारखे आहे. त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.॥४॥२॥५॥

रागु बिलावलु महला ५ घरु ४

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

एक रूप सगलो पासारा ॥ आपे बनजु आपि बिउहारा ॥ १ ॥
ऐसो गिआनु बिरलो ई पाए ॥ जत जत जाईऐ तत द्रिसटाए ॥ १ ॥ रहाउ ॥
अनिक रंग निरगुन इक रंगा ॥ आपे जलु आप ही तरंगा ॥ २ ॥
आप ही मंदरु आपहि सेवा ॥ आप ही पूजारी आप ही देवा ॥ ३ ॥
आपहि जोग आप ही जुगता ॥ नानक के प्रभ सद ही मुकता ॥ ४ ॥ १ ॥ ६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०३)

शब्दार्थ : **वनजु** – व्यापारी. **विउहारा** – व्यवहार, व्यापार. **बिरलोई** – विरळा. **जत** – जेथे. **तत** – तेथे. **द्रिसटाए** – दिसतो. **जोग** – योग. **जुगता** – युक्ती, योग जाणणारा.

भावार्थ : हा संसार, हा त्या एकमेव प्रभू परमात्म्याचाच पसारा आहे. तो प्रभूच व्यापारी आहे. तोच व्यापार आहे. ॥ १ ॥ हे ज्ञान एखाद्या विरळ्या जीवासच प्राप्त होते. त्यास तो जेथे जातो तेथे एकमेव प्रभूच दृष्टीस दिसतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्या निर्गुण प्रभूचा एकच रंग अनेक रंगातून प्रकट होतो. जलही तोच आहे व त्यावर उठणारे तरंगही तोच आहे. ॥ २ ॥ तोच मंदिर आहे. तोच सेवा आहे. तोच पुजारी आहे आणि देवही तोच आहे. ॥३॥ प्रभू परमात्मा स्वत:च योग आणि आणि त्या योगाची युक्ती जाणणारा योगीही तोच आहे. नानकाचा प्रभू सर्वव्याप्त असूनही सर्वांपासून अलिप्त आहे. मुक्त आहे. ॥ ४ ॥ १ ॥ ६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

आपि उपावन आपि सधरना ॥ आपि करावन दोसु न लैना ॥ १ ॥
आपन बचनु आप ही करना ॥ आपन बिभउ आपही जरना ॥ १ ॥ रहाउ ॥
आप ही मसटि आप ही बुलना ॥ आप ही अछलु न जाई छलना ॥ २ ॥

आप ही गुपत आपि परगटना ॥ आप ही घटि घटि आपि अलिपना ॥ ३ ॥
आपे अविगतु आप संगि रचना ॥ कहु नानक प्रभ के सभि जचना ॥ ४ ॥ २ ॥ ७ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०३)

शब्दार्थ : **उपवन** – उद्यान. **सधरना** – संभाळ करणारा, माळी. **करावन** – करवून घेणारा. **दोसु** – दोष. **लैना** – घेणे. **बचनु** – वचन, उपदेश. **करना** – कर्ता, करणारा. **आपन** – आपले. **बिभउ** – वैभव. **जरना** – सहन करणारा. **मसटि** – मौनी. **बुलना** – बोलणारा, वाचाळ. **अलिपना** – अलिप्त. **अविगतु** – अव्यक्त. **संगी** – भरून राहिलेला. **जचना** – कौतुक.

भावार्थ : हे संसाररूपी उद्यान तोच आहे. त्याचा संभाळ करणारा माळीही तोच आहे. तोच सर्व जीवांकडून कर्म करून घेतो पण कर्माचा दोष मात्र स्वत:स लागू देत नाहीत. ॥ १ ॥ उपदेश देणाराही तोच आहे व त्यानुरूप आचरण करणाराही तोच आहे. हे सारे वैभव तोच आहे. दु:ख सहन करणाराही तोच आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ मौन धारण करणारा तोच आहे आणि बडबड करणाराही तोच आहे. प्रभू परमात्मा अछल आहे. त्यास माया छळू शकत नाही. ॥ २ ॥ गुप्तही तोच आहे. प्रगटही तोच आहे. प्रत्येक घराघरात (देहात) तोच सामावलेला आहे. पण तरीही त्या सर्वांपासून तो अलिप्त आहे. ॥ ३ ॥ तो स्वत: अव्यक्त आहे. पण ह्या सृष्टीत तो भरून राहिला आहे. त्या रूपात तो व्यक्त झाला आहे. नानक सांगतात, हे जीवा ! तू तेच कर जे त्या प्रभू परमात्म्यास आवडेल. ॥ ४ ॥ २ ॥ ७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

भूले मारगु जिनहि बताइआ ॥ ऐसा गुरु वडभागी पाइआ ॥ १ ॥
सिमरि मना रामु नामु चितारे ॥ बसि रहे हिरदै गुरचरन पिआरे ॥ १ ॥ रहाउ ॥
कामि क्रोधि लोभि मोहि मनु लीना ॥ बंधन काटि मुकति गुरि कीना ॥ २ ॥
दुख सुख करत जनमि फुनि मूआ ॥ चरन कमल गुरि आस्त्रमु दीआ ॥ ३ ॥
अगनि सागर बूडत संसारा ॥ नानक बाह पकरि सतिगुरि निसतारा ॥ ४ ॥ ३ ॥ ८ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०३)

शब्दार्थ : **जिनहि** – ज्याने. **बताइआ** – दाखवला. **चितारे** – स्मरण कर. **लीना** – ताब्यात आणले. **कीना** – केला. **फुनि** – परत. **आस्त्रमु** – आश्रय.

भावार्थ : मला माझ्या महाभाग्याने असा गुरू प्राप्त झाला आहे, की ज्याने माझ्यासारख्या पथभ्रष्ट झालेल्यास परत सन्मार्गावर आणले आहे. ॥ १ ॥ हे मना ! तू आपल्या चित्तात सदैव रामनामाचे स्मरण कर. आपल्या हृदयात सतगुरूचे चरण धारण कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझे मन काम, क्रोध, लोभ आदी विकारात मग्न झाले होते पण सतगुरूने माझ्या मनाची सगळी बंधने तोडून मला सर्व विकारांपासून मुक्त केले आहे. ॥ २ ॥ हा जीव सुख-दु:खात फिरत राहण्यासाठीच ह्या जगात वारंवार जन्म घेतो. पण मला सतगुरूने आपल्या चरणकमलाजवळ आश्रय दिला आहे. त्यामुळे मी जन्ममरणातून मुक्त झालो आहे. ॥ ३ । सारा संसार मायारूपी अग्नीत जळत आहे. नानक सांगतात, ह्यातून सतगुरूच जीवास हाती धरून त्यातून पार करून नेतो. ॥ ४ ॥ ३ ॥ ८ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

तनु मनु धनु अरपउ सभु अपना ॥ कवन सुमति जितु हरि हरि जपना ॥ १ ॥
करि आसा आइओ प्रभ मागनि ॥ तुम्ह पेखत सोभा मेरै आगनि ॥ १ ॥ रहाउ ॥
अनिक जुगति करि बहुतु बीचारउ ॥ साध संगि इसु मनहि उधारउ ॥ २ ॥
मति बुधि सुरति नाही चतुराई ॥ जा मिलीऐ जा लए मिलाई ॥ ३ ॥
नैन संतोखे प्रभ दरसनु पाइआ ॥ कहु नानक सफलु सो आइआ ॥ ४ ॥ ४ ॥ ९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०४)

शब्दार्थ : **सुमति** – सुबुद्धी. **जितु** – ज्यामुळे. **मागनि** – मागण्यासाठी. **आगनि** – हृदयरूपी अंगणात. **अनिक** – अनेक. **जुगति** – युक्ती.

भावार्थ : जो कोणी मला अशी सुबुद्धी देईल, की ज्यामुळे मी प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करीन, त्याच्यावर मी माझे तन- मन- धन सारे काही अर्पण करीन. ॥ १ ॥ हे प्रभो ! मोठ्या आशेने मी तुझ्याकडे मागणी करत आहे. तुझ्या दर्शनाने माझे हृदयरूपी अंगण शोभायमान होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी अनेक प्रकारच्या युक्त्या, प्रयुक्त्या करून पाहिल्या. अनेक प्रकारे मनन, चिंतन, विचार करून पाहिला की कशा प्रकारे मी संतसंगत प्राप्त करू शकेन. ॥ २ ॥ पण माझ्या हे लक्षात आले आहे, की माझ्या अंगी अशी कोणतीही युक्ती, बुद्धिचातुर्य नाही की ज्यामुळे मी तुला प्राप्त करू शकेन. जर तूच मला तुझ्यात एकरूप करून घेतलेस तरच मी तुला प्राप्त करू शकेन. ॥ ३ ॥ नानक सांगतात, प्रभुदर्शनाने ज्याचे डोळे संतुष्ट होतात त्याच्या जन्माचे सार्थक झाले. ॥४॥४॥९॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मात पिता सुत साथि न माइआ ॥ साध संगि सभु दूखु मिटाइआ ॥ १ ॥
रवि रहिआ प्रभु सभ महि आपे ॥ हरि जपु रसना दुखु न विआपे ॥ १ ॥ रहाउ ॥
तिखा भूख बहु तपति विआपिआ ॥ सीतल भए हरि हरि जसु जापिआ ॥ २ ॥
कोटि जतन संतोखु न पाइआ ॥ मनु त्रिपताना हरि गुण गाइआ ॥ ३ ॥
देहु भगति प्रभ अंतरजामी ॥ नानक की बेनंती सुआमी ॥ ४ ॥ ५ ॥ १० ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०४)

शब्दार्थ : **तिखा** – तृष्णा. **जसु** – यश. **जतन** – यत्न. **त्रिपताना** – तृप्त झाले. **देहु** – दे. **बेनंती** – विनंती.

भावार्थ : माता, पिता, पुत्र, मित्र ही सारी माया आहे. ह्यापैकी अखेर बरोबर काही येत नाही. साधुसंतांची संगत प्राप्त झाल्यानेच सारे दु:ख नष्ट होते. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा स्वत: सर्वत्र रममाण झालेला आहे. हे जिव्हे तू सदैव प्रभुनामाचा जप कर म्हणजे तुला कोणतेही दु:ख सहन करावे लागणार नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ हा जीव मोहमायेच्या तृष्णेने व वासनाविकारांच्या आगीत जळत होता पण प्रभू परमात्म्याचे यशोगान गायल्याने तो अग्नी विझून मन शांत झाले. ॥ २ ॥ अनेक प्रयत्न केले पण मनाला संतोष प्राप्त झाला नाही. पण प्रभू परमात्म्याचे गुणगान

केल्याने मन तृप्त झाले. ॥ ३ ॥ नानक स्वामी प्रभू परमात्म्यास विनंती करतात, की हे प्रभो ! मला तुझी भक्ती प्रदान कर. ॥ ४ ॥ ५ ॥ १० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

गुरु पूरा वडभागी पाईऐ ॥ मिलि साधू हरि नामु धिआईऐ ॥ १ ॥
पारब्रहम प्रभ तेरी सरना ॥ किलबिख काटै भजु गुर के चरना ॥ १ ॥ रहाउ ॥
अवरि करम सभि लोकाचार ॥ मिलि साधू संगि होइ उधार ॥ २ ॥
सिंम्रिति सासत बेद बीचारे ॥ जपीऐ नामु जितु पारि उतारे ॥ ३ ॥
जन नानक कउ प्रभे किरपा करीऐ ॥ साधू धूरि मिलै निसतरीऐ ॥ ४ ॥ ६ ॥ ११ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०४)

शब्दार्थ : **किलबिख** – पाप. **काटै** – नष्ट केले. **अवरि** – अन्य. **करम** – कर्म. **लोकाचार** – अवडंबर. **सिंम्रिति** – स्मृती. **सासत** – शास्त्रे. **बेद** – वेद. **जितु** – ज्यामुळे. **धुरि** – धूळ. **निसतरीऐ** – तरून जातात.

भावार्थ : महाभाग्याने पूर्णगुरूची प्राप्ती होते व जीव अशा सतगुरूच्या साधुपुरुषाच्या संगतीत राहून प्रभुनामाचे स्मरण करतो. ॥ १ ॥ हे परब्रह्म प्रभू ! मी तुला शरण आलो आहे. सतगुरुचरणाशी बसून प्रभुनामाचे स्मरण कल्याने सर्व पाप नष्ट होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ अन्य सर्व कर्मकांड हे निव्वळ अवडंबर आहे. त्याने प्रभू प्राप्त होत नाही. साधुसंतांच्या संगतीने जीवाचा उद्धार होतो. ॥ २ ॥ स्मृती, शास्त्रे, वेद आदी धर्मग्रंथांचा अभ्यास केल्यावर हेच लक्षात येते, की प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणानेच जीव भवसागर पार करून जातो. ॥ ३ ॥ दास नानक सांगतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर. मला अशा साधुसंतांची चरणधूळ प्राप्त होऊ दे की जी मस्तकी धारण केल्याने जीवाचा उद्धार होतो. ॥ ४ ॥ ६ ॥ ११ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

गुर का सबदु रिदे महि चीना ॥ सगल मनोरथ पूरन आसीना ॥ १ ॥
संत जना का मुखु ऊजलु कीना ॥ करि किरपा अपुना नामु दीना ॥ १ ॥ रहाउ ॥
अंध कूप ते करु गहि लीना ॥ जै जैकारु जगति प्रगटीना ॥ २ ॥
नीचा ते ऊच ऊन पूरीना ॥ अंम्रित नामु महा रसु लीना ॥ ३ ॥
मन तन निरमल पाप जलि खीना ॥ कहु नानक प्रभ भए प्रसीना ॥ ४ ॥ ७ ॥ १२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०४)

शब्दार्थ : **रिदै** – हृदयात. **चिना** – ओळखला, जाणला. **आसिना** – सर्व आशा. **ऊजलु** – उज्ज्वल. **दीना** – दिले. **करु** – हात. **गहि** – धरून. **गहिलीना** – बाहेर काढले. **उन** – उणीव, कमीपणा. **पूरीना** – पूर्ण करणारा. **खीना** – क्षीण.

भावार्थ : ज्या जीवाने आपल्या हृदयातील शब्दगुरूस ओळखले त्याच्या सर्व आशा, सर्व मनोरथ पूर्ण झाले.

॥ १ ॥ प्रभू परमात्मा ज्यास आपले नाम प्रदान करतो अशा संतजनांच्या मुखावर उजळ तेजाची कांती झळकते. त्यांच्या चेहऱ्यावर एक उजळ तेज दिसू लागते. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा जीवांना ह्या संसाररूपी अंधाऱ्या विहिरीतून हात देऊन बाहेर काढतो. संपूर्ण विश्वात त्याचा जयजयकार घुमू लागतो. ॥ २ ॥ तो प्रभू परमात्मा नीच जीवाच्या उणिवा दूर करून तेथे सतगुण भरून त्यास उच्च स्थानी नेऊन बसवतो, तो असा जीव प्रभुनामरूपी अमृतरसात रंगून जातो. ॥ ३ ॥ त्यामुळे त्यांचे तन-मन निर्मल होते. पाप जळून नष्ट होते. नानक सांगतात, अशा जीवांवर प्रभू परमात्मा प्रसन्न झालेला असतो. ॥ ४ ॥ ७ ॥ १२ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सगल मनोरथ पाईअहि मीता ॥ चरन कमल सिउ लाईऐ चीता ॥ १ ॥
हउ बलिहारी जो प्रभू धिआवत ॥ जलनि बुझै हरि हरि गुन गावत ॥ १ ॥ रहाउ ॥
सफल जनमु होवत वडभागी ॥ साध संगि रामहि लिव लागी ॥ २ ॥
मति पति धनु सुख सहज अनंदा ॥ इक निमख न विसरहु परमानंदा ॥ ३ ॥
हरि दरसन की मनि पिआस घनेरी ॥ भनति नानक सरणि प्रभ तेरी ॥ ४ ॥ ८ ॥ १३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०४)

शब्दार्थ : **पाइअहि** – प्राप्त होतात. **मीता** – मित्र. **निमख** – निमिष. **परमानंदा** – परम आनंदरूप प्रभू. **घनेरी** – खूप. **भनती** – सांगतात.

भावार्थ : हे मित्रा ! प्रभू परमात्म्याच्या चरणकमली चित्त एकाग्र केल्याने सर्व मनोरथ, सर्व आशा पूर्ण होतात. ॥ १ ॥ हरीचे गुणगान केल्याने मनातील विकाररूपी अग्नी विझून जातो. जे सदैव प्रभू परमात्म्याचे ध्यान करतात, त्यांच्या चरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ जे साधुसंतांच्या संगतीत रामनामी आपले चित्त एकाग्र करतात, त्या भाग्यवंतांचे जीवन सफल होते. ॥ २ ॥ जो त्या परमानंदरूपी प्रभू परमात्म्यास क्षणभरही विसरत नाही त्यास सुबुद्धी, प्रतिष्ठा, धन, सुख, आनंद व सहजावस्था प्राप्त होते. ॥ ३ ॥ नानक सांगतात, माझ्या मनाला प्रभुदर्शनाची आत्यंतिक ओढ लागली आहे. म्हणून मी हे प्रभू, तुझ्या चरणी शरण आलो आहे. ॥ ४ ॥ ८ ॥ १३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मोहि निरगुन सभ गुणह बिहुना ॥ दइआ धारि अपुना करि लीना ॥ १ ॥
मेरा मनु तनु हरि गोपालि सुहाइआ ॥ करि किरपा प्रभु घर महि आइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
भगति वछल भै काटनहारे ॥ संसार सागर अब उतरे पारे ॥ २ ॥
पतित पावन प्रभ बिरदु बेदि लेखिआ ॥ पारब्रहमु सो नैनहु पेखिआ ॥ ३ ॥
साध संगि प्रगटे नाराइण ॥ नानक दास सभि दूख पलाइण ॥ ४ ॥ ९ ॥ १४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०५)

शब्दार्थ : **सुहाइआ** – सुंदर झाले. **भै** – भय. **काटनहारे** – नष्ट करणारा. **बिरदु** – ब्रीद. **बेदि** – वेदात.

लेखिआ – लिहिले आहे. **नैनहु** – डोळ्यांनी. **पेखिआ** – पाहिला. **पलाइण** – पळून गेले.

भावार्थ : मी गुणहीन आहे. सर्व गुणांना मी वंचित झालो आहे. पण प्रभू परमात्म्याने मला आपलासा केला आहे. माझा स्वीकार केला आहे. ॥ १ ॥ माझे तन–मन प्रभूशी एकरूप झाल्याने सुंदर झाले आहे. प्रभूने माझ्यावर कृपा केली आहे. तो माझ्या हृदयातच वास करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो प्रभू परमात्मा भक्तवत्सल आहे. भय दूर करणारा आहे. त्याच्या कृपेने जीव भवसागर पार करून जातो. ॥ २ ॥ वेदही सांगतात, की पतितांना पावन करणे हेच प्रभू परमात्म्याचे ब्रीद आहे. अशा ह्या प्रभू परमात्म्यास मी माझ्या डोळ्यांनी पाहिला आहे. ॥ ३ ॥ साधुसंतांच्या संगतीत प्रभू परमात्मा अंत:करणात प्रगट होतो. दास नानक सांगतात तो प्रभू आपल्या सेवकांचे सर्व दु:ख दूर करतो. ॥ ४ ॥ ९ ॥ १४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

कवनु जानै प्रभ तुम्हरी सेवा ॥ प्रभू अविनासी अलख अभेवा ॥ १ ॥
गुण बेअंत प्रभ गहिर गंभीरे ॥ ऊच महल सुआमी प्रभ मेरे ॥
तू अपरंपर ठाकुर मेरे ॥ १ ॥ रहाउ ॥
एकस बिनु नाही को दूजा ॥ तुम्ह ही जानहु अपनी पूजा ॥ २ ॥
आपहु कछू न होवत भाई ॥ जिसु प्रभु देवै सो नामु पाई ॥ ३ ॥
कहु नानक जो जनु प्रभ भाइआ ॥ गुण निधान प्रभु तिन ही पाइआ ॥ ४ ॥ १० ॥ १५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०५)

शब्दार्थ : **अभेवा** – अनाकलनीय. **बेअंत** – अनंत. **अपरंपर** – अपरंपार. **एकस** – एकमेव. **जानहु** – जाणतोस. **आपहु** – आपण स्वत:. **जिसु** – ज्याला. **भाइआ** – आवडला.

भावार्थ : हे प्रभो ! तुझी सेवा कशी करावी हे कोण जाणतो? तो प्रभू परमात्मा अविनाशी आहे, अलक्ष्य आहे. अनाकलनीय आहे. ॥ १ ॥ त्याचे गुण अनंत आहेत. तो प्रभू गहन गंभीर आहे. माझा स्वामी प्रभूचे घर फार उंच आहे. तो माझा स्वामी अपरंपार आहे. त्याच्यापर्यंत कोणीही पोहचू शकत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा एकमेव आहे. त्याच्याशिवाय ह्या सृष्टीत कोणीही नाही. हे प्रभू ! तूच तुझी सेवा जाणतोस. ॥ २ ॥ जीव स्वत: काहीही करू शकत नाही. ज्यास प्रभू परमात्मा आपल्या सेवेस लावतो तो तोच प्रभुनाम प्राप्त करतो. ॥३॥ नानक सांगतात, जो प्रभुसेवक प्रभू परमात्म्यास आवडला त्यासच गुणसागर प्रभू प्राप्त होतो. ॥४॥१०॥१५॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मात गरभ महि हाथ दे राखिआ ॥
हरि रसु छोडि बिखिआ फलु चाखिआ ॥ १ ॥
भजु गोबिद सभ छोडि जंजाल ॥
जब जमु आइ संघारै मूड़े तब तनु बिनसि जाइ बेहाल ॥ १ ॥ रहाउ ॥
तनु मनु धनु अपना करि थापिआ ॥ करनहारु इक निमख न जापिआ ॥ २ ॥
महा मोह अंध कूप परिआ ॥ पारब्रहमु माइआ पटलि बिसरिआ ॥ ३ ॥

वडै भागि प्रभ कीरतनु गाइआ ॥ संत संगि नानक प्रभु पाइआ ॥ ४ ॥ ११ ॥ १६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०५)

शब्दार्थ : **बिखिआ** – विषारी. **जमु** – यम. **संघारै** – संहार. **मूडे** – मूर्ख. **बेहाल** – वाईट हाल. **थापिआ** – धरून ठेवले. **करनहारु** – कर्ता प्रभू. **परिआ** – पडला. **पटलि** – आवरण.

भावार्थ : जीव मातेच्या गर्भात असताना प्रभू परमात्म्याने त्याचे रक्षण केले. पण जन्माला आल्यावर मात्र जीव प्रभू परमात्म्यास विसरला व तो मोहमायेत, विषयविकारात रंगून गेला. ॥ १ ॥ हे जीवा ! हा सारा मायेचा पसारा सोड व त्या प्रभू परमात्म्याचे भजन कर. जेंव्हा यम तुझा संहार करण्याकरता येईल, तेव्हा तो तुझे हाल हाल करील. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! तू क्षणभरही प्रभुनामाचा जप केला नाहीस. सदैव तन, मन, धनालाच आपले मानून त्याला कवटाळून बसलास. ॥ २ ॥ मोहमायेच्या अंधकारमय कूपात पडलास. मोहमायेच्या आवरणाखाली परब्रह्म परमात्म्यास विसरलास. ॥ ३ ॥ नानक सांगतात, महाभाग्याने जीव प्रभू परमात्म्याची कीर्ती गातो व संतजनांच्या संगतीत राहून प्रभू परमात्मा प्राप्त करतो. ॥ ४ ॥ ११ ॥ १६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मात पिता सुत बंधप भाई ॥ नानक होआ पारब्रहमु सहाई ॥ १ ॥
सूख सहज आनंद घणे ॥
गुरु पूरा पूरी जा की बाणी अनिक गुणा जा के जाहि न गणे ॥ १ ॥ रहाउ ॥
सगल सरंजाम करे प्रभु आपे ॥ भए मनोरथ सो प्रभु जापे ॥ २ ॥
अरथ धरम काम मोख का दाता ॥ पूरी भई सिमरि सिमरि बिधाता ॥ ३ ॥
साध संगि नानकि रंगु माणिआ ॥ घरि आइआ पूरै गुरि आणिआ ॥ ४ ॥ १२ ॥ १७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०५)

शब्दार्थ : **सहाई** – साहाय्यकर्ता. **होआ** – झाला. **अरथ** – अर्थ. **धरम** – धर्म. **मोख** – मोक्ष. **रंग माणिआ** – आनंद उपभोगला. **आणिआ** – आणला.

भावार्थ : नानक सांगतात, माता, पिता, पुत्र, मित्र या रूपाने तो परब्रह्म परमात्मा जीवास साहाय्य करत असतो. ॥ १ ॥ त्याच्याच साहाय्याने जीव सुख, आनंद व सहजावस्था प्राप्त करतो. तो प्रभू पूर्ण आहे. त्याची वाणी पूर्ण आहे. त्याचे गुण अनंत आहेत. ज्याची गणती करणेही शक्य नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्म्याने सारी व्यवस्था करून ठेवली आहे. जो प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करतो त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतात. ॥ २ ॥ तो प्रभू परमात्मा जीवास धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारीही पुरुषार्थ प्रदान करतो. अशा प्रभू परमात्म्याचे सदैव स्मरण केल्याने जीवनाचे सार्थक होते. ॥ ३ ॥ नानक सांगतात, जो साधुसंतांच्या संगतीत राहून प्रभुप्रेमरंगात रंगून जातो, त्यास प्रभू स्वगृही घेऊन येतो. ॥ ४ ॥ १२ ॥ १७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सब निधान पूरन गुरदेव ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि हरि नामु जपत नर जीवे ॥ मरि खुआरु साकत नर थीवे ॥ १ ॥
राम नामु होआ रखवारा ॥ झख मारउ साकतु वेचारा ॥ २ ॥
निंदा करि करि पचहि घनेरे ॥ मिरतक फास गलै सिरि पैरे ॥ ३ ॥
कहु नानक जपहि जन नाम ॥ ता के निकटि न आवै जाम ॥ ४ ॥ १३ ॥ १८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०६)

शब्दार्थ : **सब** – सर्व. **जीवे** – जीवन जगतो. **खुआरु** – दुःखी. **रखवारा** – रक्षक. **पचहि** – दुःखी होतो, नष्ट होतो. **मिरतक** – मृत्यू.

भावार्थ : प्रभू परमात्मा सर्व गोष्टींचे भांडार आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूचे नामस्मरण करूनच मनुष्य खऱ्या अर्थाने जीवन जगतो. प्रभूपासून दूर गेलेला शाक्त दुःखी होऊन मरून जातो. ॥ १ ॥ रामनाम जीवाचे रक्षण करते. शाक्त बिचारे झक मारतात. ॥ २ ॥ ते (शाक्त) इतरांची निंदा करत करत अत्यंत दुःख भोगत राहतात. ते पायापासून डोक्यापर्यंत, नखशिखांत मृत्यूच्या पाशाने जखडलेले असतात. ॥ ३ ॥ नानक सांगतात, हे प्रभुसेवका तू सदैव प्रभुनामाचा जप कर. त्यामुळे यम तुझ्या जवळसुद्धा येणार नाही. ॥४॥१३॥१८॥

रागु बिलावलु महला ५ घरु ४ दुपदे

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

कवन संजोग मिलउ प्रभ अपने ॥ पलु पलु निमख सदा हरि जपने ॥ १ ॥
चरन कमल प्रभ के नित धिआवउ ॥ कवनु सु मति जितु प्रीतमु पावउ ॥ १ ॥ रहाउ ॥
ऐसी क्रिपा करहु प्रभ मेरे ॥ हरि नानक बिसरु न काहू बेरे ॥ २ ॥ १ ॥ १९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०६)

शब्दार्थ : **निमख** – निमिष. **जपने** – जप करून. **धिआवउ** – ध्यान करतो. **सुमति** – सुबुद्धी. **पावउ** – प्राप्त करणे. **काहू** – . **बेरे** – .

भावार्थ : मी माझ्या प्रभू परमात्म्यास कशाप्रकारे प्राप्त करू शकेन ? मी क्षणोक्षणी, सदैव प्रभुनामाचे स्मरण करतो. ॥ १ ॥ मी सदैव प्रभुचरणांचे ध्यान करतो. पण कोणत्या सुबुद्धीने मी माझ्या प्रिय प्रभूस प्राप्त करू शकेन? ॥ १ ॥ रहाउ ॥ नानक म्हणतात, हे प्रभो ! माझ्यावर अशी कृपा कर की मला कधीही तुझा विसर पडू नये. ॥ २ ॥१॥ रहाउ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

चरन कमल प्रभ हिरदै धिआए ॥ रोग गए सगले सुख पाए ॥ १ ॥
गुरि दुखु काटिआ दीनो दानु ॥ सफल जनमु जीवन परवानु ॥ १ ॥ रहाउ ॥

अकथ कथा अंम्रित प्रभ बानी ॥ कहु नानक जपि जीवे गिआनी ॥ २ ॥ २ ॥ २० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०६)

शब्दार्थ : **हिरदै** – हृदयात. **परवानु** – स्वीकृत, मान्य, सफल.

भावार्थ : प्रभू परमात्म्याचे चरणकमल हृदयात धारण केल्याने सर्व भवरोग नष्ट होतात व सगळे सुख प्राप्त होते. ॥ १ ॥ सतगुरुने मला असे दान दिले, की त्यामुळे माझे सारे दुःख दूर झाले व माझे जीवन सफल झाले. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूची वाणी अमृतमय आहे. त्याचे वर्णनही करता येत नाही. नानक सांगतात, ज्ञानवान मनुष्य सदैव प्रभुनामाचा जप करून आपले जीवन जगतो. ॥ २ ॥ २ ॥ २० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सांति पाई गुरि सतिगुरि पूरे ॥ सुख उपजे बाजे अनहद तूरे ॥ १ ॥ रहाउ ॥
ताप पाप संताप बिनासे ॥ हरि सिमरत किलविख सभि नासे ॥ १ ॥
अनदु करहु मिलि सुंदर नारी ॥ गुरि नानकि मेरी पैज सवारी ॥ २ ॥ ३ ॥ २१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०६)

शब्दार्थ : **सांति** – शांति. **उपजे** – उत्पन्न झाले. **तूरे** – आवाज. **बिनासे** – नष्ट होतात. **किलविख** – पाप. **नासे** – नष्ट होते. **पैज** – प्रतिष्ठा.

भावार्थ : पूर्ण सतगुरू प्रभू प्राप्त झाल्याने मनास आत्मिक शांती प्राप्त झाली. अंत:करणात अनाहत नाद वाजू लागल्याने सुख उत्पन्न झाले. ॥ १ ॥ रहाउ ॥ हरीचे स्मरण केल्याने पाप, ताप, संताप सारे नष्ट झाले. मनातील किल्मिषही नष्ट झाले. ॥ १ ॥ हे सुंदर नारींनो, सत्संगी जीवांनो ! एकत्र येऊन आनंद साजरा करा. नानक सांगतात, प्रभूने माझी प्रतिष्ठा राखली. ॥ २ ॥ ३ ॥ २१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

ममता मोह द्रोह मदि माता बंधनि बाधिआ अति बिकराल ॥
दिनु दिनु छिजत बिकार करत अउध फाही फाथा जम कै जाल ॥ १ ॥
तेरी सरणि प्रभ दीन दइआला ॥
महा बिखम सागरु अति भारी उधरहु साधू संगि रवाला ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रभु सुखदाते समरथ सुआमी जीउ पिंडु सभु तुमरा माल ॥
भ्रम के बंधन काटहु परमेसर नानक के प्रभ सदा क्रिपाल ॥ २ ॥ ४ ॥ २२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०६)

शब्दार्थ : **द्रोह** – कपट, द्रोह. **मदि** – नशा. **माता** – मस्त. **बिकराल** – विक्राळ. **छिजत** – झिजत. **अउध** – आयुष्य. **फाही** – फाशी. **फाथा** – पाश, बंधन. **बिखम** – विषम, कठीण. **रवाला** – चरणधूळ, रज. **माल** – संपत्ती.

भावार्थ : जो जीव मोह, ममता, कपट, अहंकार आदी विकारात मस्त झाला, तो मायेच्या विक्राळ बंधनात अडकून पडतो. तो दिवसेंदिवस विकारांचा उपभोग घेत घेत झिजत झिजत यमाच्या पाशात अडकतो. ॥ १ ॥ हे दीनदयाळा प्रभू परमात्मा ! मी तुला शरण आलो आहे. हा संसारसागर अत्यंत कठीण आहे. दुस्तर आहे. मला साधुसंतांची संगत व साधुसंतांची चरणधूळ देऊन माझा उद्धार कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे समर्थ प्रभू ! तू सर्व जीवांना सुख देणारा आहेस. जीव, शरीर, आत्मा ही सारी तूच दिलेली तुझीच संपत्ती आहे. नानक प्रभू परमात्म्यास विनंती करतात, की हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर व माझी सारी भ्रममूलक बंधने नष्ट कर. ॥ २ ॥ ४ ॥ २२ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सगल अनंदु कीआ परमेसरि अपणा बिरदु सम्हारिआ ॥
साध जना होए किरपाला बिगसे सभि पर वारिआ ॥ १ ॥
कारजु सतिगुरि आपि सवारिआ ॥
वडी आरजा हरि गोबिंद की सूख मंगल अलिआण बीचारिआ ॥ १ ॥ रहाउ ॥
वण त्रिण त्रिभवण हरिआ होए संगले जीअ साधारिआ ॥
मन इछे ननक फल पाए पूरन इछ पुजारिआ ॥ २ ॥ ५ ॥ २३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०६)

शब्दार्थ : **बिरदु** – बीद्र. **सम्हारिआ** – संभाळले. **विगसे** – प्रसन्न झाला. **आरजा** – आयुष्य. **बिचारिआ** – विचार केला. **बन** – वन. **तृण** – गवत. **हरिआ** – प्रफुल्लित. **साधारिआ** – आश्रय दिला. **पुजारिआ** – पूर्ण केली.

भावार्थ : हे प्रभू ! तू सर्वत्र आनंदी आनंद निर्माण करून आपले ब्रीद राखलेस. साधुसंतांच्या कृपेने सारा परिवार प्रफुल्लित झाला. ॥ १ ॥ सतगुरूने स्वतः सर्व कार्य पूर्ण केले. हर गोविंदना आयुष्य वाढवून सर्व जीवांच्या सुख व कल्याणाकडे लक्ष दिले, सर्वत्र मंगल केले. ॥ १ ॥ रहाउ ॥ नानक सांगतात, ज्या प्रभू परमात्म्याच्या कृपेने वन, तृण, त्रिभुवन प्रफुल्लित होते. तो प्रभू परमात्मा सर्व जीवांना आधार देतो. त्या प्रभूच्या कृपेने मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात. ॥ २ ॥ ५ ॥ २३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

जिसु ऊपरि होवत दइआलु ॥ हरि सिमरत काटै सो कालु ॥ १ ॥ रहाउ ॥
साध संगि भजीए गोपालु ॥ गुन गावत तूटै जम जालु ॥ १ ॥
आपे सतिगुरू आपे प्रतिपाल ॥ नानकु जाचै साध रवाल ॥ २ ॥ ६ ॥ २४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०७)

शब्दार्थ : **जिसु** – ज्याच्या. **होवत** – होतो. **सो** – तो. **पतिवसल** – प्रतिपाल करणारा. **जाचै** – याचना करतो. **रवाल** – चरणधूळ.

भावार्थ : ज्याच्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो. तो प्रभू परमात्म्याचे स्मरण करून मृत्यूवर मात करतो. ॥१॥

रहाउ ॥ साधुसंतांच्या संगतीत राहून प्रभू गोपाळाचे स्मरण करावे. प्रभू परमात्म्याचे गुणगान केल्याने यमाचे पाश तुटून जातात. ॥ १ ॥ तो प्रभू परमात्माच सतगुरू आहे. तोच साऱ्या जीवांचा प्रतिपाळ करतो. नानक फक्त साधुसंतांच्या चरणरजांची याचना करतो. ॥ २ ॥ ६ ॥ २४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मन महि सिंचहु हरि हरि नाम ॥ अनदिनु कीरतनु हरि गुण गाम ॥ १ ॥
ऐसी प्रीती करहु मन मेरे ॥ आठ पहर प्रभ जानहु नेरे ॥ १ ॥ रहाउ ॥
कहु नानक जा के निरमल भाग ॥ हरि चरनी ता का मनु लाग ॥ २ ॥ ७ ॥ २५ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०७)

शब्दार्थ : **सिंचहु** – सिंचन करा. **जानहु** – जाणा. **नेरे** – जवळ. **भाग** – भाग्य.

भावार्थ : हे जीवांनो ! मन हरिनामाने सिंचित करा व रात्रंदिवस प्रभूचे कीर्तन करा. हरीचे गुणगान गा. ॥ १ ॥ हे माझ्या मना ! तू प्रभूशी अशी प्रीती कर की तो अष्टौ प्रहर तुझ्या जवळच आहे असे तुला जाणवेल. ॥१॥रहाउ॥ नानक सांगतात, ज्याचे भाग्य निर्मळ आहे त्याचे मन हरिचरणी लीन होते. ॥ २ ॥ ७ ॥ २५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

रोगु गइआ प्रभि आपि गवाइआ ॥ नीद पई सुख सहज घरू आइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
रजि रजि भोजनु खावहु मेरे भाई ॥ अंम्रित नामु रिद माहि धिआई ॥ १ ॥
नानक गुर पुरे सरनाई ॥ जिनि अपने नाम की पैज रखाई ॥ २ ॥ ८ ॥ २६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०७)

शब्दार्थ : **गइआ** – गेला. **रजि** – तृप्त होऊन.

भावार्थ : हे बंधू ! माझा भवरोग नष्ट झाला. प्रभू परमात्म्याने स्वतःच तो नष्ट केला. आता मी सर्व दुःखापासून मुक्त होऊन सुखाने झोपी जातो. सहजावस्था प्राप्त होऊन मी स्वस्वरूपात लीन झालो आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवांनो ! प्रभुनामाचे भोजन करून तृप्त व्हा. रात्रं-दिवस हृदयात प्रभूच्या अमृतनामाचे स्मरण करा. ॥ १ ॥ नानक सांगतात, मी पूर्णगुरूस शरण गेलो. त्यानेही आपल्या नामाची प्रतिष्ठा राखून माझे रक्षण केले. ॥२॥८॥२६॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सतिगुर करि दीने असथिर घर बार ॥ रहाउ ॥
जो जो निंद करै इन ग्रिहन की तिसु आगै ही मारै करतार ॥ १ ॥
नानक दास ता की सरनाई जा को सबदु अखंड अपार ॥ २ ॥ ९ ॥ २७ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८०७)

शब्दार्थ : **असथिर** – स्थिर. **निंद** – निंदा. **ग्रिहन** – घर. **करतार** – कर्ताप्रभू. **ता** – तो. **जा** – जो.

भावार्थ : सतगुरूने माझे मन स्थिर केले आहे. ॥ रहाउ ॥ जो कोणी सतगुरूच्या अशा भक्तांची निंदा करतो त्यास तो प्रभू नष्ट करून टाकतो. ॥ १ ॥ दास नानक त्यास (प्रभूस) शरण गेला आहे की ज्याचा शब्द अखंड व अपार आहे. ॥ २ ॥ ९ ॥ २७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

ताप संताप सगले गए बिनसे ते रोग ॥
पारब्रहमि तू बखसिआ संतन रस भोग ॥ रहाउ ॥
सरब सुखा तेरी मंडली तेरा मनु तनु आरोग ॥
गुन गावहु नित राम के इह अवखद जोग ॥ १ ॥
आइ बसदु घर देस महि इह भले संजोग ॥
नानक प्रभ सुप्रसंन भए लहि गए बिओग ॥ २ ॥ १० ॥ २८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०७)

शब्दार्थ : **बिनसे** – नष्ट झाले. **बखसिआ** – कृपा केली. **मंडली** – . **अवखद** – औषध. **जोग** – योग्य. **लहिगए** – लयाला गेले, नष्ट झाले.

भावार्थ : परब्रह्म परमात्म्याच्या कृपेने माझे सारे भव, ताप, दुःख, रोग, नाश पावले. त्याने मला संतसंगतरूपी अमृत प्रदान केले. ॥ रहाउ ॥ हे जीवा ! सतगुरूच्या सान्निध्याने तू पूर्णपणे सुखी झाला आहेस व तुझे तन, मन आरोग्यपूर्ण झाले आहे. त्यासाठी रामनाम, प्रभूचे गुणगान हेच योग्य औषध आहे. ॥ १ ॥ संतसंगतीत राहून जीवास आपले मन स्थिर करून प्रभुनामात चित्त एकाग्र करून राहण्याचा सुअवसर प्राप्त झाला आहे. नानक सांगतात, प्रभू परमात्मा प्रसन्न झाला की प्रभुवियोग लयाला जातो. जीवाचे जीवाशी मिलन होते. ॥२॥१०॥२८॥

॥ बिलावलु महल ५ ॥

काहू संगि न चालही माइआ जंजाल ॥
ऊठि सिधारे छत्रपति संतन कै खिआल ॥ रहाउ ॥
अहंबुधि कउ बिनसना इह धुर की ढाल ॥
बहु जोनी जनमहि मरहि बिखिआ बिकराल ॥ १ ॥
सति बचन साधू कहहि नित जपहि गुपाल ॥
सिमरि सिमरि नानक तरे हरि के रंग लाल ॥ २ ॥ ११ ॥ २९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०७)

शब्दार्थ : **काहू** – कोण. **सिधारे** – निघून गेले. **खिआल** – विचार. **अहंबुधि** – अहंकारी वृत्ती. **बिनसना** – नष्ट केली. **ढाल** – रीत, नियम.

भावार्थ : संतांच्या विचारानुसार, जगात प्राप्त होणारे सारे ऐश्वर्य हे निव्वळ मायाजाल आहे. हे सारे नश्वर आहे. मोठमोठे राजे-महाराजेही सारे काही येथेच सोडून निघून गेले. ॥ रहाउ ॥ शेवटी अहंकारी वृत्तीचा नाशच होतो. हा पूर्वीपासून चालत आलेला नियम आहे. जीव अनेक योनीत जन्मून विषयविकाराने भयानक मृत्यू प्राप्त

करतो. ॥ १ ॥ साधुसंत सत्यवचन सांगतात की जीवांनो प्रभू परमात्म्याचे स्मरण करा. नानक सांगतात, जे हरिनामाचे सतत स्मरण करून प्रभुरंगात रंगून जातात, ते हा भवसागर तरून जातात. ॥ २ ॥ ११ ॥ २९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सहज समाधि अनंद सूख पूरे गुरि दीन ॥
सदा सहाई संगि प्रभ अंम्रित गुण चीन ॥ रहाउ ॥
जै जैकारु जगत्र महि लोचहि सभि जीआ ॥
सुप्रसंन भए सतिगुर प्रभू कछु बिघनु न थीआ ॥ १ ॥
जा का अंगु दइआल प्रभ ता के सभ दास ॥
सदा सदा वडिआईआ नानक गुर पासि ॥ २ ॥ १२ ॥ ३० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०७)

शब्दार्थ : **दीन** – दिले. **सहाई** – सहायक. **चीन** – ओळख, जाण. **लोचहि** – इच्छितात. **अंगु** – पाठीशी.

भावार्थ : मला सतगुरुकृपेने सहजसमाधीचा आनंद प्राप्त झाला आहे. ज्याने प्रभू परमात्म्याचे गुण जाणले आहेत, तो प्रभू परमात्म्याच्या संगतीत राहतो व प्रभू त्यास साहाय्य करतो. ॥ रहाउ ॥ सर्व जीव, जगाने आपला जयजयकार करावा अशी इच्छा करतात. पण ज्याच्यावर सतगुरू प्रसन्न होतो त्याची सारी विघ्ने दूर होतात व त्याचे सारे जग कौतुक करते. ॥ १ ॥ ज्याच्या पाठीशी तो दयावंत प्रभू परमात्मा उभा राहतो, सारे लोक त्याचे दास होतात. नानक सांगतात, सतगुरूच्या संगतीत राहिल्याने जीवास महती प्राप्त होते. ॥ २ ॥ १२ ॥ ३० ॥

रागु बिलावलु महला ५ घरु ५ चउपदे

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

म्रित मंडल जगु साजिआ जिउ बालू घर बार ॥
बिनसत बार न लागई जिउ कागद बूंदार ॥ १ ॥
सुनि मेरी मनसा मनै माहि सति देखु बीचारि ॥
सिध साधिक गिरही जोगी तजि गए घर बार ॥ १ ॥ रहाउ ॥
जैसा सुपना रैनि का तैसा संसार ॥
द्रिसटिमान सभू बिनसीऐ किआ लगहि गवार ॥ २ ॥
कहा सु भाई मीत है देखु नैन पसारि ॥
इकि चाले इकि चालसहि सभि अपनी वार ॥ ३ ॥
जिन पूरा सतिगुरु सेविआ से असथिरु हरि दुआरि ॥
जनु नानकु हरि का दासु है राखु पैज मुरारि ॥ ४ ॥ १ ॥ ३१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०८)

शब्दार्थ : **म्रित** – मर्त्य. **जिउ** – ज्याप्रमाणे. **बार** – वेळ. **बुंदार** – थेंबाने. **मनसा** – मनीषा. **सति** – सत्य.

गिरहि – गृहस्य. **तजि** – सोडून. **रैनि** – रात्र. **द्रिसटिमान** – दृश्यमान, दिसणारे. **लगहि** – चिकटून राहणे, रममाण होणे. **गवार** – मूर्ख, अडाणी. **कहा** – कोठे. **मित** – मित्र. **पसारि** – उघडून. **असथिरु** – स्थिर.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने हा मर्त्य संसार निर्माण केला आहे. ज्याप्रमाणे वाळूचे घर क्षणात नष्ट होते, कागद पाण्याच्या संतत धारेत विरघळून जातो, त्याप्रमाणे हा संसारही नश्वर आहे. ॥ १ ॥ हे बंधू ! माझे विचार नीट ध्यान देऊन ऐक. मी सांगत असलेल्या सत्य गोष्टीचा विचार कर. सिद्ध, साधक, गृहस्थ, योगी सारे लोक हा संसार सोडून गेले. ॥ १ ॥ रहाउ ॥ जसे रात्रीचे स्वप्न असते तसा हा संसार आहे. निव्वळ भास आहे. ह्या जगात जे जे दृश्यमान आहे ते सारे नष्ट होणार आहे. अरे मूर्खा ! त्यात तू आपले मन का गुंतवतोस ? ॥ २ ॥ जरा नीट डोळे उघडे ठेवून बघ. कोठे आहेत ते तुझे मित्र ? तुझे ते बांधव ? कोणी हे जग सोडून गेले. कोणी जग सोडून जाण्याच्या मार्गावर आहेत. प्रत्येकावरच हे जग सोडून जाण्याची वेळ येणार आहे. ॥ ३ ॥ ज्याने पूर्ण सतगुरूची सेवा केली त्यांना प्रभूच्या द्वारी अढळपद प्राप्त झाले. नानक प्रभूस विनंती करतात, हे प्रभो ! मी तुझा दास आहे. माझी लाज राख. मला जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त कर. ॥ ४ ॥ १ ॥ ३१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

लोकन कीआ वडिआईआ बैसंतरि पागउ ॥
जिउ मिलै पिआरा आपना ते बोल करागउ ॥ १ ॥
जउ प्रभ जीउ दइआल होइ तउ भगती लागउ ॥
लपटि रहिओ मनु बासना गुर मिलि इह तिआगउ ॥ १ ॥ रहाउ ॥
करउ बेनती अति घनी इहु जीउ होमागउ ॥
अरथ आन सभि वारिआ प्रिअ निमख सोहागउ ॥ २ ॥
पंच संगु गुर ते छुटे दोख अरु रागउ ॥
रिदै प्रगासु प्रगट भइआ निसि बासुर जागउ ॥ ३ ॥
सरणि सोहागनि आइआ जिसु मसतकि भागउ ॥
कहु नानक तिनि पाइआ तनु मनु सीतलागउ ॥ ४ ॥ २ ॥ ३२ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८०८)

शब्दार्थ : **लोकन** – लोक. **बैसंतरि** – अग्नी. **पागउ** – टाकून दे. **जिउ** – ज्यामुळे. **करागउ** – कर. **लागउ** – लागतो. **लपटि** – लिप्त. **बासना** – वासना. **इह** – ही. **होमागउ** – समर्पित करीन. **अरथ** – धन, संपत्ती. **वारिआ** – अर्पण करीन. **निमख** – क्षणभर. **सोहागउ** – सौभाग्य. **पंच** – पाच विकार (काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार.) **दोख** – दोष. **रागउ** – राग. **बासुर** – दिवस. **निसि** – रात्र. **जागउ** – जागृत राहणे. **सीतलागउ** – शांत.

भावार्थ : लोकांनी दिलेला मोठेपणा मी आगीत जाळून टाकीन. ज्यामुळे मला माझा प्रिय प्रभू प्राप्त होईल असेच शब्द (प्रभुनाम) मी उच्चारीन. ॥ १ ॥ ज्याच्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो तोच प्रभूची भक्ती करू लागतो. हे मन वासनांमध्ये लिप्त राहते पण ज्यास सतगुरू प्राप्त होतो तो वासनेतून मुक्त होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥

मी प्रभू परमात्म्यास अति नम्रतापूर्वक विनंती करतो, की मी प्रभुचरणी माझे प्राण अर्पण करतो. जर मला क्षणभरही प्रभुमिलनाचे सौभाग्य प्राप्त होणार असेल, तर त्यासाठी मी तन, मन, धन सर्व काही त्याच्या चरणी समर्पित करीन. ॥ २ ॥ सतगुरूच्या संगतीने माझ्यातील सारे दोष, राग, पंचविकार सारे काही नष्ट झाले. आता माझ्या मनात प्रभू परमात्म्याचा दिव्य प्रकाश प्रगट झाला आहे. आता मी रात्रंदिवस मोहमाया, वासना, विकार यापासून सावध असतो. ॥ ३ ॥ जिच्या भाग्यात जसा योग असेल ती जीवस्त्री प्रभुपतीस शरण जाऊन सौभाग्य प्राप्त करते. नानक सांगतात, ज्या जीवस्त्रीस प्रभू प्राप्त झाला तिचे तन, मन तृप्त झाले. आत्मा शांत झाला.॥४॥२॥३२॥

॥ बिलावलु महला ५ ॥

लाल रंगु तिस कउ लगा जिस के वडभागा ॥
मैला कदे न होवई नह लागै दागा ॥ १ ॥
प्रभु पाइआ सुखदाईआ मिलिआ सुख भाइ ॥
सहजि समाना भीतरे छोडिआ नह जाइ ॥ १ ॥ रहाउ ॥
जरा मरा नह विआपई फिरि दूखु न पाइआ ॥
पी अंम्रितु आघानिआ गुरि अमर कराइआ ॥२॥
सो जानै जिनि चाखिआ हरि नामु अमोला ॥
कीमति कही न जाईऐ किआ कहि मुखि बोला ॥ ३ ॥
सफल दरसु तेरा पारब्रहम गुणनिधि तेरी बाणी ॥
पावउ धूरि तेरे दास की नानक कुरबाणी ॥ ४ ॥ ३ ॥ ३३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०८)

शब्दार्थ : **मैला** – मलिन. **दागा** – डाग. **सुखदाइना** – सुखदाता. **मिलिआ** – प्राप्त झाला. **भाइ** – भाव. **सहजि** – सहजावस्था, सहजसमाधी. **छोडिआ** – सोडून. **जरा** – वृद्धत्व. **मरा** – मरण. **अघानिआ** – तृप्त झाला. **जानै** – जाणतो. **अमोला** – अमूल्य. **पावउ** – प्राप्त करीन. **धूरि** – धूळ.

भावार्थ : ज्याचे महाभाग्य असेल त्यासच प्रभुनामाचा लाल रंग प्राप्त होतो. हा प्रभुभक्तीचा रंग कधीही मायेने मलिन होत नाही किंवा त्यास विकाराचा डाग लागत नाही. ॥ १ ॥ तो सुखदाता प्रभू प्राप्त झाल्याने सुखाच्या भावनेने माझे मन आनंदित झाले आहे. प्रभुकृपेने सहजावस्था प्राप्त झाल्याने आता माझे मन प्रभूपासून दूर जाऊच शकत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ आता ह्या जीवास वृद्धत्व वा मरण व्यापू शकत नाही. त्यास आता परत कधीही दु:ख भोगावे लागणार नाही. असा जीव प्रभुनामामृत प्राशन करून तृप्त होतो. सतगुरूने त्यास अमर केले आहे. ॥ २ ॥ हरिनामामृताची गोडी अमूल्य आहे. पण ही गोष्ट ज्याने प्रभुनामामृताची चव चाखली आहे तोच ती जाणतो. त्याचे (प्रभुनामामृताचे) मोल करणेही अशक्य आहे. ॥ ३ ॥ ज्याच्या दर्शनाने जीवनाचे सार्थक होते तो परब्रह्म परमात्म्याची वाणी गुणांचे भांडार आहे. नानक म्हणतात, हे प्रभो ! मला तुझ्या दासांच्या चरणरजांची जरी प्राप्ती झाली, तरी मी त्यांच्यावर माझे जीव ओवाळून टाकीन. ॥ ४ ॥ ३ ॥ ३३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

राखहु अपनी सरणि प्रभ मोहि किरपा धारे ॥
सेवा कछू न जानऊ नीचु मूरखारे ॥ १ ॥
मानु करउ तुधु ऊपरे मेरे प्रीतम पियारे ॥
हम अपराधी सद भूलते तुम्ह बखसनहारे ॥ १ ॥ रहाउ ॥
हम अवगन करह असंख नीति तुम्ह निरगुन दातारे ॥
दासी संगति प्रभू तिआगि ए करम हमारे ॥ २ ॥
तुम्ह देवहु सभु किछु दइआ धारि हम अकिरतघनारे ॥
लागि परे तेरे दान सिउ नह चिति खसमारे ॥ ३ ॥
तुझ ते बाहरि किछु नही भव काटनहारे ॥
कहु नानक सरणि दइआल गुर लेहु मुगध उधारे ॥ ४ ॥ ४ ॥ ३४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८०९)

शब्दार्थ : निचु – नीच. मूरखारे – मूर्ख. मानु – अभिमान. बखसनहारे – क्षमा करणारा. तिआगी – सोडून. ए – असे. देवहु – देतोस. अकिरतघनारे – कृतघ्न. परे – . खसमारे – प्रभू परमात्मा. काटनहारे – तोडणारा.

भावार्थ : हे प्रभो ! मी तुला शरण आलो आहे. मी नीच आहे. मूर्ख आहे. तुझी सेवा कशी करावी हे मला कळत नाही. माझ्यावर कृपा कर आणि माझे रक्षण कर. ॥ १ ॥ माझ्या प्रिय परमेश्वरा ! मला तुझा अभिमान वाटतो. मी तर अनंत चुका करणारा अपराधी जीव आहे. तू तर क्षमा करणारा आहेस. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी तर असंख्य अवगुणांनी भरलेलो आहे. तू तर सर्व गुणावगुणांच्या पलीकडे निर्गणरूप आहेस. महान दाता आहेस. मी प्रभूस सोडून त्याची दासी असलेल्या मायेच्या संगतीत रममाण झालो आहे. ॥ २ ॥ तू आमच्या सर्व गरजा पुरवतोस. आम्हास सर्व काही देतोस पण आम्ही कृतघ्न तुलाच विसरून जातो. तू दिलेल्या दानातच त्या मायावी पदार्थातच आम्ही रमून जातो आणि ते देणाऱ्या प्रभू परमात्म्याची आम्हास आठवणही येत नाही. ॥ ३ ॥ हे प्रभो ! तू जीवांचे भवपाश तोडणारा आहेस. तुझ्या बाहेर ह्या सृष्टीत अन्य काहीही नाही. तू सर्व व्याप्त आहेस. नानक सांगतात हे दीनदयाळ प्रभू परमेश्वरा ! मी तुला शरण आलो आहे. माझ्या ह्या मुग्ध जीवाचा तू उद्धार कर. ॥ ४ ॥ ४ ॥ ३४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

दोसु न काहू दीजीऐ प्रभू अपना धिआईऐ ॥
जितु सेविऐ सुखु होइ घना मन सोई गाईऐ ॥ १ ॥
कहीऐ काइ पिआरे तुझु बिना ॥
तुम्ह दइआल सुआमी सभ अवगन हमा ॥ १ ॥ रहाउ ॥
जिउ तुम्ह राखहु तिउ रहा अवरू नही चारा ॥

नीधरिआ धर तेरीआ इक नाम अधारा ॥ २ ॥
जो तुम्ह करहु सोई भला मनि लेता मुकता ॥
सगल समग्री तेरीआ सभ तेरी जुगता ॥ ३ ॥
चरन पखारउ करि सेवा जे ठाकुर भावै ॥
होहु क्रिपालु दइआल प्रभ नानकु गुण गावै ॥ ४ ॥ ५ ॥ ३५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०९)

शब्दार्थ : दोसु – दोष. काहु – कोणाला. घना – पुष्कळ. कहीऐ – सांगणे. हमा – माझ्यात. चारा – उपाय, मार्ग, आधार. जुगता – युक्ती. पखारउ – धुतो.

भावार्थ : हे जीवांनो ! तू अन्य कोणालाही दोष न देता केवळ आपल्या प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. हे मना ! ज्याची सेवा केल्याने अत्यंत सुख प्राप्त होते त्या प्रभू परमात्म्याचे गुणगान कर. ॥ १ ॥ हे प्रिय प्रभो ! मी तुझ्याशिवाय अन्य कोणास माझी व्यथा सांगू ? हे स्वामी ! तू दयाळू आहेस. माझ्या अंगी सारे अवगुण भरलेले आहेत. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! तू जसे ठेवशील तसाच मी राहीन अन्य कोणताही उपाय नाही. मी निराधार आहे. तुझे नाम हाच माझा एकमेव आधार आहे. ॥ २ ॥ जो प्रभू परमात्मा करतो ते चांगलेच असते असे मानतो तो जीव मुक्त समजावा. तो असे मानतो की ह्या सृष्टीतील साऱ्या गोष्टी तुझ्याच (प्रभूच्याच) आहेत. ही सृष्टी कशी चालवावी हेही तूच जाणतोस.॥ ३ ॥ हे प्रभो ! जर तुझी इच्छा असेल तुला आवडणार असेल, तर मी तुझी सेवा करीन. तुझे चरण प्रक्षालन करीन. हे प्रभो ! तू माझ्यावर कृपा कर. माझ्यावर दया कर की ज्यायोगे हा नानक तुझेच गुणगान गात राहील.॥ ४ ॥ ५ ॥ ३५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मिरतु हसै सिर ऊपरे पसूआ नही बूझै ॥
बाद साद अहंकार महि मरणा नही सूझै ॥ १ ॥
सतिगुरु सेवहु आपना काहे फिरहु अभागे ॥
देखि कसुंभा रंगुला काहे भूलि लागे ॥ १ ॥ रहाउ ॥
करि करि पाप दरबु कीआ वरतण कै ताई ॥
माटी सिउ माटी रली नागा उठि जाई ॥ २ ॥
जा कै कीऐ स्रमु करै ते बैर बिरोधी ॥
अंत कालि भजि जाहिगे काहे जलहु करोधी ॥ ३ ॥
दास रेणु सोई होआ जिसु मसतकि करमा ॥
कहु नानक बंधन छुटे सतिगुर की सरना ॥ ४ ॥ ६ ॥ ३६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०९)

शब्दार्थ : मिरतु – मृत्यू. पसुआ – पशू. वाद – भांडण. साद – स्वाद. कसुंभा – कुसूंब फूल, नश्वर, माया. दरबु – द्रव्य. वरतण – उपजीविका. नागा – नग्न. भजि – सोडून. जाहिगे – जातील.

भावार्थ : माणूस पशूसमान अडाणी आहे. मृत्यूची तलवार डोक्यावर टांगलेली असूनही ते त्याला समजत

नाही. भांडणतंटे, मौजमजा, अहंकार ह्यापुढे त्याला मृत्यूची आठवणही होत नाही. ॥ १ ॥ अरे अभाग्या असा उगाच मायेमागे का भटकतोस ? त्याऐवजी आपल्या सतगुरूची सेवा कर. मायेचा रंग हा कुसुंब फुलाप्रमाणे नश्वर आहे. त्याला का भुललास ? ॥ १ ॥ रहाउ ॥ आपल्या ऐष आरामासाठी पाप करून धन गोळा करतोस पण शेवटी नागडाच जगातून निघून जाणार आहेस. शेवटी हा मातीचा देह मातीतच एकरूप होऊन जाणार आहे. ॥ २ ॥ तुझ्या आप्त स्वकीयांसाठी हे सगळे परिश्रम केलेस तेच तुझे वैरी व विरोधक झाले. शेवटी ते सारे आप्तेष्ट तुला सोडून जातील. मग तू क्रोधाने का जळत राहतोस ? ॥ ३ ॥ ज्याच्या भाग्यात तसे लिहिले असेल तोच प्रभूचा दास प्रभुचरणांची धूळ होऊन राहतो. नानक सांगतात, जो सतगुरूला शरण गेला त्याची सर्व बंधने तुटून तो मुक्त होतो. ॥ ४ ॥ ६ ॥ ३६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

पिंगुल परबत पारि परे खल चतुर बकीता ॥
अंधुले त्रिभवण सूझिआ गुर भेटि पुनीता ॥ १ ॥
महिमा साधू संग की सुनहु मेरे मीता ॥
मैलु खोई कोटि अघ हरे निरमल भए चीता ॥ १ ॥ रहाउ ॥
ऐसी भगति गोविंद की कीटि हसती जीता ॥
जो जो कीनो आपनो तिसु अभै दानु दीता ॥२॥
सिंघु बिलाई होइ गइओ त्रिणु मेरु दिखीता ॥
स्त्रमु करते दम आढ कउ ते गनी धनीता ॥ ३ ॥
कवन वडाई कहि सकउ बेअंत गुनीता ॥
करि किरपा मुहि नामु देहु नानक दर सरिता ॥ ४ ॥ ७ ॥ ३७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८०९)

शब्दार्थ : **पिंगुल** – पांगळा. **खल** – मूर्ख. **बकीता** – वक्ता. **अंधुले** – अंधळा. **सुझिआ** – ज्ञान. **पुनीता** – पवित्र. **सुनहु** – ऐक. **मीता** – मित्रा. **अघ** – पाप. **कीटी** – कीडा, कीटक. **हसती** – हत्ती. **सिंघु**– सिंह. **बिलाइ** – मांजर. **दिखीता** – दिसतो. **दम** – दमडी. **आढ** – अर्धी. **धनिता** – श्रीमंत. **गनी** – धनवान. **गुनीता** – गुणवंत. **सरिता** – गुलाम.

भावार्थ : पवित्र गुरू भेटला तर पांगळाही पर्वत चढून जातो. मूर्ख माणूसही शहाण्यासारखा बोलू लागतो. अंधळ्याला त्रिभुवनाचे ज्ञान प्राप्त होते. ॥ १ ॥ माझ्या मित्रा साधुसंतांच्या संगतीचा महिमा ऐक. संतसंगतीने मनातील विकारांचा मळ नष्ट होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्म्याच्या भक्तीने कीटक हत्तींवर विजय प्राप्त करू शकतो. परमात्मा ज्यास आपलासा करतो त्यास तो अभयदान देतो. सिंह मांजर होतो. भाव: अहंकारी जीव नम्रतापूर्वक वागतो व क्षुद्र गवत मेरू पर्वतासमान श्रेष्ठ होते. जे दारिद्र्यात जीवन कंठत होते ज्यांना अर्धी दमडी प्राप्त करण्यासाठी परिश्रम करावे लागत होते, त्यांची गणना आता धनवानात केली जाते. ॥३॥ त्या अनंत प्रभूचे किती म्हणून गुण सांगू ! नानक सांगतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर व मला तुझ्या दारीचा गुलाम बनव.॥ ४ ॥ ७ ॥ ३७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

अहंबुधि परबाद नीत लोभ रसना सादि ॥
लपटि कपटि ग्रिहि बेधिआ मिथिआ बिखिआदि ॥ १ ॥
ऐसी पेखी नेत्र महि पूरे गुरपरसादि ॥
राज मिलख धन जोबना नाचै बिनु बादि ॥ १ ॥ रहाउ ॥
रूप धूप सोगंधता कापर भोगादि ॥
मिलत संगि पापिसट तन होए दुरगादि ॥ २ ॥
फिरत फिरत मानुखु भइआ खिन भंगन देहादि ॥
इह अउसर ते चूकिआ बहु जोनि भ्रमादि ॥ ३ ॥
प्रभ किरपा ते गुर मिले हरि हरि बिसमाद ॥
सूख सहज नानक अनंद ता कै पूरन नाद ॥ ४ ॥ ८ ॥ ३८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१०)

शब्दार्थ : **परबाद** – भांडण. **सादि** – स्वाद. **ग्रिहि** – गृहस्थधर्म. **बेधिआ** – बद्ध. **बिखिआदि** – विषयविकार. **पेखि** – पाहिले. **मिलख** – मुलुख, जाहगिरी. **जोबना** – यौवन. **बादि** – व्यर्थ. **सोगंधता** – सुगंध. **कापर** – कपडे. **पापिसट**– महापापी. **दुरगादि** – दुर्गंधित. **खिन भंगन** – क्षणभंगूर.

भावार्थ : माणूस नेहमी अहंकारामुळे भांडत राहतो. लोभात आणि भोगात रममाण होऊन राहतो. गृहप्रपंचात बद्ध होऊन खोट्या विषयविकारात लिप्त होऊन राहतो. ॥ १ ॥ पण सतगुरुकृपेने त्यास हे कळून येते की प्रभुनामाशिवाय राज्य, जमीनजुमला, धनसंपत्ती, यौवन सारे काही व्यर्थ आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ देह सुंदर असला, त्यावर सुगंधी द्रव्ये चोपडली असली, उत्तम पोशाख परिधान केला असला, नाना भोग भोगले तरी तो जीव महापापी असेल तर त्याच्या संगतीने हे सारे दुर्गंधित होते. ॥ २ ॥ अनेक योनीतून फिरल्यानंतर हा मनुष्यजन्म प्राप्त होतो. पण त्यातही प्राप्त झालेला हा मानव देह हा क्षणभंगूर आहे. केव्हा नष्ट होईल ह्याचा नेम नाही. प्रभुप्राप्तीसाठी मिळालेला असा हा अवसर, अशी ही सुगंधी वाया घालवली तर परत अनेक योनीत फिरावे लागेल. ॥ ३ ॥ ज्यास प्रभुकृपेने सतगुरूचा लाभ होतो त्याच्यात आश्चर्यकारक बदल होतो. तो प्रभुभक्तीत लीन होऊन जातो. नानक सांगतात, त्यास सहजावस्थेचे सुख प्राप्त होते व त्याच्या अंत:करणात आनंदरूपी अनाहत नाद निनादू लागतो. ॥ ४ ॥ ८ ॥ ३८ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

चरन भए संत बोहिथा तरे सागरु जेत ॥
मारग पाए उदिआन महि गुरि दसे भेत ॥ १ ॥
हरि हरि हरि हरि हरि हरे हरि हरि हरि हेत ॥
ऊठत बैठत सोवते हरि हरि हरि चेत ॥ १ ॥ रहाउ ॥
पंच चोर आगै भगे जब साध संगेत ॥

पूंजी साबतु घणो लाभु ग्रिहि सोभा सेत ॥ २ ॥
निहचल आसणु मिटी चिंत नाही डोलेत ॥
भरमु भुलावा मिटि गइआ प्रभ पेखत नेत ॥ ३ ॥
गुण गभीर गुन नाइका गुण कहीअहि केत ॥
नानक पाइआ साध संगि हरि हरि अंम्रेत ॥ ४ ॥ ९ ॥ ३९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१०)

शब्दार्थ : **भए** – झाले. **बोहिथा** – जहाज. **उदिआन** – जंगल. **दसे** – दाखवला. **भेत** – भेद, रहस्य. **हेत** – प्रेम. **चेत** – चिंतन कर, स्मरण कर. **भगे** – पळून गेले. **साबतु** – सुरक्षित. **सेत** – सहित. **नेत** – नेत्र, डोळे. **केत**– किती.

भावार्थ : हा भवसागर तरून जाण्यासाठी संतजनांचे चरण हे जहाज आहे. सतगुरूकृपेने मोहमायेच्या जंगलातून वासनाविकारांच्या जंजाळातून मार्ग प्राप्त होतो. सतगुरू जीवनाचे रहस्य समजावून सांगतो. ॥ १ ॥ हे जीवा ! तू उठता बसता झोपेतही हरिनामाचे स्मरण कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ साधुसंतांची संगत प्राप्त झाल्याने पंचविकार (काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार) पळून जातात. आता जीवाची प्रभुनामरूपी पुण्याची धनसंपत्ती सुरक्षित राहून जीभ प्रभुप्रेमाचा लाभ प्राप्त करून स्वस्वरूपात लीन होते. ॥ २ ॥ त्यास अढळ स्थान प्राप्त होते. चिंता नष्ट होते व मनाची चंचलता नष्ट होते. प्रभू परमात्म्याच्या प्रत्यक्ष दर्शनाने मोहमायेचा भ्रम नष्ट होतो. ॥ ३ ॥ तो प्रभू गुणांचा सागर आहे, गुणनायक आहे. त्याचे किती किती गुण सांगू ? नानक सांगतात, केवळ साधुसंतांच्या संगतीतच प्रभुनामामृताची प्राप्ती होते. ॥ ४ ॥ ९ ॥ ३९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

बिनु साधु जो जीवना तेतो बिरथारी ॥
मिलत संगि सभि भ्रम मिटे गति भई हमारी ॥ १ ॥
जा दिन भेटे साध मोहि उआ दिन बलिहारी ॥
तनु मनु अपनो जीअरा फिरि फिरि हउ वारी ॥ १ ॥ रहाउ ॥
एत छडाई मोहि ते इतनी द्रिड़तारी ॥
सगल रेन इहु मनु भइआ बिनसी अपधारी ॥ २ ॥
निंद चिंद परदूखना ए खिन महि जारी ॥
दइआ मइआ अरु निकटि पेखु नाही दूरारी ॥ ३ ॥
तन मन सीतल भए अब मुकते संसारी ॥
हीत चीत सभ प्रान धन नानक दरसारी ॥ ४ ॥ १० ॥ ४० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१०)

शब्दार्थ : **तेतो** – ते सर्व. **बिरथारी** – व्यर्थ आहे. **मोहि** – मला. **उआ** – तो. **जीअरा** – प्राण, जीव. **एक** – अहंकार. **इतनी** – इतकी. **अपधारी** – अहंकार. **परदुखना** – परपीडा, दुसऱ्यास त्रास देणे. **दुरारी** – दूर. **हीत** – प्रेम.

भावार्थ : संतसंगतीशिवाय जीवन व्यर्थ आहे. संतसंगती प्राप्त झाल्याने सर्व भ्रम नष्ट झाले व मला परमगती, मुक्ती प्राप्त झाली. ज्या दिवशी मला साधुसंत भेटतात त्या दिवसावर मी माझे प्राण ओवाळून टाकतो. त्यावर मी माझे तन, मन, प्राण सर्व काही वारंवार समर्पित करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्या संतजनांनी मला अहंकारापासून मुक्त केले व माझ्या मनात इतकी नम्रता दृढ केली की माझा अहंभाव नष्ट होऊन मी सर्वांची चरणधूळ बनून गेलो. ॥ २ ॥ संतसज्जनांनी माझ्या मनातील निंदा, दुसऱ्यास त्रास देण्याची वृत्ती सारे क्षणात नष्ट केले. आता सर्वांप्रती माझ्या मनात दया, माया, प्रेम वास करते. आता ते मला जवळचे वाटतात. परके वाटतच नाहीत. कारण तो परमात्माच सर्वांमध्ये मला दिसतो. ॥ ३ ॥ मी आता संसारातून मुक्त झालो आहे. माझे तन, मन आता शांत झाले आहे. आता प्रभुदर्शन हेच माझे धन, प्रेम, चित्त, माझे सर्वस्व आहे. ॥४॥१०॥४०॥

॥ बिलावलु महला ५ ॥

टहल करउ तेरे दास की पग झारउ बाल ॥
मसतकु अपना भेट देउ गुन सुनउ रसाल ॥ १ ॥
तुम्ह मिलते मेरा मनु जीओ तुम्ह मिलहु दइआल ॥
निसि बासुर मनि अनदु होत चितवत किरपाल ॥ १ ॥ रहाउ ॥
जगत उधारन साध प्रभ तिन्ह लागहु पाल ॥
मोकउ दीजै दानु प्रभ संतन पग राल ॥ २ ॥
उकति सिआनप कछु नही नाही कछु घाल ॥
भ्रम भै राखहु मोह ते काटहु जम जाल ॥ ३ ॥
बिनउ करउ करुणापते पिता प्रतिपाल ॥
गुण गावउ तेरे साध संगि नानक सुख साल ॥ ४ ॥ ११ ॥ ४१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१०)

शब्दार्थ : **टहल** – सेवा. **झारउ** – झाडीन. **चितावत** – चिंतन करतो. **पाल** – पाय. **पगराल** – चरणरज. **घाल** – परिश्रम.

भावार्थ : हे प्रभो ! मी तुझ्या दासांची सेवा करीन. माझ्या केसांनी त्यांचे पाय झाडीन. त्यांच्या चरणी माझे मस्तक अर्पण करीन व त्यांच्याकडून तुझे रसदार गुणगान ऐकेन. ॥ १ ॥ हे प्रभो ! तुझ्या दर्शनानेच मी जीवन जगतो. कृपा करून मला दर्शन दे. हे कृपाळू प्रभू रात्रंदिवस सदैव तुझे चिंतन केल्याने मनाला आनंद प्राप्त होतो. ॥ १ ॥ रहाउ॥ साधुसंत जगाचा उद्धार करतात. त्यांना शरण जावे. त्यांचा आश्रय घ्यावा. हे प्रभो ! मला अशा संतजनांच्या चरणरजांचे दान दे. ॥ २ ॥ माझी वाणी मधुर नाही, माझ्याजवळ कोणतेही शहाणपण नाही. मी कधी प्रभुसेवा करण्याचे कष्ट घेतले नाहीत. सदैव मोहमायेतच गुंतून राहिलो. हे प्रभो ! माझे ह्या मोहमायेच्या भ्रमापासून रक्षण कर व माझी यमपाशातून सुटका कर. ॥ १ ॥ हे करुणापते, हे जगपालक प्रभुपिता ! मी तुला नम्र विनंती करतो, की मी सदैव साधुसंतांच्या संगतीत राहून सुखनिधान परमेश्वराचे गुणगान करावे. ॥ ४ ॥ ११ ॥ ४१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

कीता लोड़हि सो करहि तुझ बिनु कछु नाहि ॥
परतापु तुम्हारा देखि कै जमदूत छडि जाहि ॥ १ ॥
तुम्हरी क्रिपा ते छूटीऐ बिनसै अहंमेव ॥
सरब कला समरथ प्रभ पूरे गुरदेव ॥ १ ॥ रहाउ ॥
खोजत खोजत खोजिआ नामै बिनु कूरु ॥
जीवन सुखु सभु साध संगि प्रभ मनसा पूरु ॥ २ ॥
जितु जितु लावहु तितु तितु लगहि सिआनप सभ जाली ॥
जत कत तुम्ह भरपूर हहु मेरे दीन दइआली ॥ ३ ॥
सभु किछु तुम ते मागना वडभागी पाए ॥
नानक की अरदासि प्रभ जीवा गुन गाए ॥ ४ ॥ १२ ॥ ४२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८११)

शब्दार्थ : कीता – . लोड़हि – इच्छा करणे. अहंमेव – अहंकार, अहंमन्यता. खोजिआ – शोधले. कूरु – खोटे. पूरु – पूर्ण. सिआनप – चातुर्य. हहु – आहेस.

भावार्थ : हे प्रभू परमात्मा ! तू जे काही करायचे ठरवतोस तेच करतोस. तुझ्या इच्छेबाहेर कोणी काहीही करू शकत नाही. तुझा प्रताप पाहून यमदूतही पळून जातात. ॥ १ ॥ तुझ्याच कृपेने जीवास मुक्ती प्राप्त होते. अहंभाव नष्ट होतो. सतगुरूच्या कृपेने त्या शक्तिमान समर्थ प्रभूची प्राप्ती होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ खूप शोध केल्यानंतर असे लक्षात आले की प्रभुनामाशिवाय इतर सर्व काही खोटे आहे. साधुसंतांच्या संगतीतच सारे सुख साठवलेले आहे. प्रभूच जीवाच्या साऱ्या मनोकामना पूर्ण करतो. ॥ २ ॥ हे प्रभो ! तू ज्यांना ज्यांना प्रभुभक्तीच्या मार्गावर आणतोस तेच प्रभुभक्ती करू लागतात. तू सर्व चतुराई जाळून टाकतोस. हे प्रभो ! दीनदयाळा ! जिकडे पाहावे तिकडे सर्वत्र तूच भरून राहिला आहेस. ॥ ३ ॥ सर्व काही तुझ्याकडेच मागावे. महाभाग्याने ते प्राप्त होते. हे प्रभो ! नानकाची तुझ्या चरणी एकच विनंती आहे, की मी तुझे गुण गात गात जीवन जगावे. ॥४॥१२॥४२॥

॥ बिलावलु महला ५ ॥

साध संगति कै बासबै कलमल सभि नसना ॥
प्रभ सेती रंगि रातिआ ता ते गरभि न ग्रसना ॥ १ ॥
नामु कहत गोविंद का सूची भई रसना ॥
मन तन निरमल होईहै गुर का जपु जपना ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि रसु चाखत ध्रापिआ मनि रसु लै हसना ॥
बुधि प्रगास प्रगट भई उलटि कमलु बिगसना ॥ २ ॥
सीतल सांति संतोखु होइ सभ बूझी त्रिसना ॥
दहदिस धावत मिटि गए निरमल थानि बसना ॥ ३ ॥

राखनहारै राखिआ भए भ्रम भसना ॥
नामु निधान नानक सुखी पेखि साध दरसना ॥ ४ ॥ १३ ॥ ४३ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८११)

शब्दार्थ : बासबै – वास. कलमल – पाप. नसना – नष्ट होते. रातिआ – रंगला. ग्रसना – फसणे, भोगावा लागणे. सूची – पवित्र. होहीहै – होते. ध्रापिआ – तृप्त झाला. हसना – प्रसन्न. उलटी – परावर्तित होऊन. भए – भय. भसना – भस्म.

भावार्थ : साधुसंतांच्या संगतीत राहिल्याने सर्व पाप नष्ट होते. जो प्रभू परमात्म्याच्या प्रेमरंगात रंगून गेला त्यास परत गर्भवास भोगावा लागत नाही. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्याच्या नामाचा उच्चार केल्याने वाणी पवित्र होते. प्रभुनामाचा जप केल्याने तन, मन निर्मल होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनामामृत चाखल्याने मन तृप्त होते. नामरसाने ते प्रसन्न होते. अंत:करणात प्रभुनाम प्रकट झाल्याने बुद्धी मोहमायेपासून परावृत्त होऊन हृदयकमल विकसित होते. ॥ २ ॥ मनास शांती व संतोष प्राप्त होऊन मायेची तृष्णा नष्ट होते. मनाची चंचलता नष्ट होऊन त्याचे दशदिशांना धावणे बंद होते व एके ठिकाणी (प्रभुचरणी) स्थिर होते. ॥ ३ ॥ रक्षणकर्त्या प्रभूने रक्षण केल्याने मायेचे सर्व भय आणि भ्रम नष्ट झाले. नानक सांगतात, साधुसंतांच्या दर्शनाने व त्यांच्याकडून प्रभुनाम प्राप्त झाल्याने मी सुखी झालो. ॥ ४ ॥ १३ ॥ ४३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

पाणी पखा पीसु दास कै तब होहि निहालु ॥
राज मिलख सिकदारीआ अगनी महि जालु ॥ १ ॥
संत जना का छोहरा तिसु चरणी लागि ॥
माइआधारी छत्रपति तिन्ह छोडउ तिआगि ॥ १ ॥ रहाउ ॥
संतन का दाना रूखा सो सरब निधान ॥
ग्रिहि साकत छतीह प्रकार ते बिखू समान ॥ २ ॥
भगत जना का लूगरा ओढि नगन न होइ ॥
साकत सिरपाउ रेसमी पहिरत पति खोई ॥ ३ ॥
साकत सिउ मुखि जोरिऐ अध वीचहु टूटै ॥
हरि जन की सेवा जो करे इत ऊतहि छूटै ॥ ४ ॥
सभ किछु तुम्ह ही ते होआ आपि बणत बणाई ॥
दरसनु भेटत साध का नानक गुण गाई ॥ ५ ॥ १४ ॥ ४४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८११)

शब्दार्थ : पिसु – दळणे. निहालु – प्रसन्न. मिलख – जमीनजुमला. सिकदारिआ – सरदारकी. छोहरा – छोकरा, मूल. माइआधारी – श्रीमंत, धनवान. दाना – अन्न. रूखा – कोरडे. छतीह – छत्तीस. बिखु – विष. लुगरा – जीर्णवस्त्र. ओढी – पांघरीन. सिरपाउ – सन्मान वस्त्र. अध – मध्येच. इत – इहलोक. उत – परलोक.

भावार्थ : हे जीवा ! प्रभुसेवकाच्या घरी तू पाणी भर, त्याला वारा घाल, त्याच्या घरी दळण दळ. सर्व तऱ्हेने त्याची सेवा कर. असे केल्याने तू सुख प्राप्त करशील. प्रभुसेवकांच्या सेवेपुढे राजवैभव, जमीनजुमला, सरदारकी सारे काही तुच्छ होय. ते जाळून टाक. ॥ १ ॥ त्यापेक्षा तू संतसज्जनांच्या पोराच्या पाया पड. श्रीमंत, धनवान, राजेरजवाडे यांची संगत सोड. । १ ॥ रहाउ ॥ संतांकडची कोरडी भाकरीच सर्व सुखाचे भांडार आहे. शाक्ताच्या घरचे छत्तीस प्रकारचे मिष्टान्न भोजन विषतुल्य असते. ॥ २ ॥ प्रभुभक्ताकडचे फाटके जुनेपाने वस्त्र नेसलास तरी त्याने तुझे लज्जारक्षण होईल. पण शाक्ताने दिलेल्या रेशमी वस्त्राने तुझी प्रतिष्ठा धुळीला मिळेल. ॥ ३ ॥ शाक्ताशी जोडलेली मैत्री मध्येच तुटते पण प्रभुसेवकांची जो सेवा करतो, तो इह-परलोकातून मुक्त होतो. ॥ ४ ॥ हे प्रभो ! तूच सर्व काही करणारा आहेस. ह्या सृष्टीची रचना तूच केली आहेस. तूच सृष्टीचा निर्माणकर्ता आहेस. नानक सांगतात, साधुसंतांचे दर्शन करून त्यांच्या संगतीत राहून प्रभू परमात्म्याचे गुणगान गावे. ॥ ५ ॥ १४ ॥ ४४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

स्रवनी सुनउ हरि हरि हरे ठाकुर जसु गावउ ॥
संत चरण कर सीसु धरि हरि नामु धिआवउ ॥ १ ॥
करि किरपा दइआल प्रभ इह निधि सिधि पावउ ॥
संत जना की रेणुका लै माथै लावउ ॥ १ ॥ रहाउ ॥
नीच ते नीचु अति नीचु होइ करि बिनउ बुलावउ ॥
पाव मलोवा आपु तिआगि संत संगि समावउ ॥ २ ॥
सासि सासि नह वीसरै अन कतहि न धावउ ॥
सफल दरसन गुरु भेटीऐ मानु मोहु मिटावउ ॥ ३ ॥
सतु संतोखु दइआ धरमु सीगारु बनावउ ॥
सफल सुहागणि नानका अपुने प्रभ भावउ ॥ ४ ॥ १५ ॥ ४५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१२)

शब्दार्थ : **स्त्रवनी** - कानानी. **कर** - हात. **सीसु** - डोक्यावर. **बिनउ** - विनयाने. **मलोवा** - रगडणे, चेपणे. **सीगारु** - शृंगार. **भावऊ** - आवडेन.

भावार्थ : हे जीवा ! तू आपल्या कानांनी हरिनाम श्रवण कर व मुखाने प्रभू परमात्म्याचे गुणगान गा. संतजनांच्या चरणी मस्तक ठेवून हरिनामाचे स्मरण कर. ॥ १ ॥ हे दयाळू प्रभू तुझ्या कृपेनेच नामभांडार व सर्व सिद्धी प्राप्त होते. हे जीवा ! तू संतजनांची चरणधूळ आपल्या मस्तकी धारण कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ क्षुद्राहून क्षुद्र होऊन नम्रतापूर्वक विनंती करून प्रभू परमात्म्यास आळवावे. अहंकाराच्या संगतीत एकरूप होऊन जावे. ॥ २ ॥ प्रत्येक श्वासागणिक त्याचे विस्मरण होऊ देऊ नये. मन अन्यत्र कोठेही जाऊ देऊ नकोस. मोह, माया, अहंकार यांचा त्याग करून सतगुरूचे घेतलेले दर्शन सफल होते. ॥ ३ ॥ हे जीवस्त्री ! तू सत्य, संतोष, दया, धर्म ह्यांचा शृंगार कर म्हणजे तुझे सौभाग्य सफल होईल व तू प्रभुपतीस आवडशील. ॥ ४ ॥ १५ ॥ ४५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

अटल बचन साधू जना सभ महि प्रगटाइआ ॥
जिसु जन होआ साध संगु तिसु भेटै हरि राइआ ॥ १ ॥
इह परतीति गोविंद की जपि हरि सुखु पाइआ ॥
अनिक बाता सभि करि रहे गुरु घरि लै आइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
सरणि परे की राखता नाही सहसाइआ ॥
करम भूमि हरि नामु बोइ अउसरु दुलभाइआ ॥ २ ॥
अंतरजामी आपि प्रभु सभ करे कराइआ ॥
पतित पुनीत घणे करे ठाकुर बिरदाइआ ॥ ३ ॥
मत भूलहु मानुख जन माइआ भरमाइआ ॥
नानक तिसु पति राखसी जो प्रभि पहिराइआ ॥ ४ ॥ १६ ॥ ४६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८१२)

शब्दार्थ : **प्रगटाइआ** - प्रगट आहे. **परतीति** - प्रतीत, प्रचिती. **सहसाइआ** - शंका, संशय. **बोइ** - बी पेरणी, बीजारोपण. **दुलभाइआ** - दुर्लभ. **बिरदाइआ** - ब्रीद, स्वभाव. **पहिराइआ** - सन्मानित झाला.

भावार्थ : सर्वजण हे जाणतात की साधुसंतांचे वचन अटळ असते. ज्यांनी साधुसंतांची संगत धरली त्यांना प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ १ ॥ ह्याची ही प्रचिती की असा प्रभुसेवक हरिनामाचे स्मरण करून सुख प्राप्त करतो. अनेक लोक अनेक गोष्टी सांगतात पण सतगुरूने मला हे दाखवून दिले आहे, की परमेश्वर माझ्या हृदयातच आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा शरण येणाऱ्याचे रक्षण करतो यात जराही संशय नाही. मानवीजन्म ही कर्मभूमी आहे. प्रभुनामाचे बीजारोपण करण्याची ही दुर्लभ संधी परमेश्वराने प्रत्येक जीवास दिली आहे. ॥ २ ॥ तो अंतर्यामी प्रभू परमात्माच सर्व काही करतो व करवून घेतो. पतितांना पावन करणे हेच प्रभू परमात्म्याचे ब्रीद आहे. ॥ ३ ॥ हे मानवा ! तू हा मानवजन्म मायेच्या भ्रमात सापडून वाया घालवू नकोस. प्रभू परमात्म्यास विसरू नकोस. नानक सांगतो, ज्यास प्रभू परमात्म्याने सन्मानित केले, त्यांचे तो स्वत: रक्षण करतो. ॥४॥१६॥४६॥

॥ बिलावलु महला ५ ॥

माटी ते जिनि साजिआ करि दुरलभ देह ॥
अनिक छिद्र मन महि ढके निरमल द्रिसटेह ॥ १ ॥
किउ बिसरै प्रभु मनै ते जिस के गुण एह ॥
प्रभ तजि रचे जि आन सिउ सो रलीऐ खेह ॥ १ ॥ रहाउ ॥
सिमरहु सिमरहु सासि सासि मत बिलम करेह ॥
छोडि प्रपंचु प्रभ सिउ रचहु तजि कूडे नेह ॥ २ ॥
जिनि अनिक एक बहु रंग कीए है होसी एह ॥

करि सेवा तिसु पारब्रहम गुर ते मति लेह ॥ ३ ॥
ऊचे ते ऊचा वडा सभ संगि बरनेह ॥
दास दास को दासरा नानक करि लेह ॥ ४ ॥ १७ ॥ ४७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१२)

शब्दार्थ : **माटी** – माती. **साजिआ** – निर्माण केले. **छिद्र** – दोष. **ढके** – झाकणे. **द्रिसटेह** – दिसते. **रचे** – रममाण होतो. **खेह** – राख, धूळ. **बिलम** – विलंब. **नेह** – स्नेह, प्रेम. **होसी** – होता. **एह** – हा. **बरनेह** – वर्णन.

भावार्थ : ज्या प्रभू परमात्म्याने मातीतून हा दुर्लभ मानवी देह घडवला, तो बाह्यात्कारी कितीही निर्मल दिसत असला तरी त्यामध्ये अनेक दोष दडलेले आहेत. ॥ १ ॥ हे मना ! ज्या प्रभू परमात्म्याच्या अंगी अनंत गुण आहेत. त्याला तू कसा काय विसरलास ? जे प्रभू परमात्म्यास सोडून अन्य मायावी गोष्टीत रममाण होतात ते धुळीस मिळतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! आता क्षणभराचाही विलंब करू नकोस. प्रत्येक श्वासागणिक प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. अन्य मायावी गोष्टींबद्दलचा स्नेह सोडून दे. प्रपंच सोडून प्रभूवर प्रेम कर. प्रभुसेवेत रममाण हो. ॥२॥ तो प्रभू परमात्मा वास्तविक एकमेव आहे. तोच नाना रूपे घेऊन ह्या संसाररूपी लीला करत आहे. हे जीवा ! तू सतगुरूने दाखविलेल्या मार्गाने प्रभूची सेवा कर. ॥ ३ ॥ तो प्रभू परमात्मा अत्यंत श्रेष्ठ असूनही तो सर्वत्र भरून राहिला आहे. असेच त्याचे वर्णन सर्व लोक करतात. नानक म्हणतात, हे प्रभो ! मला तुझ्या दासांच्या दासांचा दास कर. ॥ ४ ॥ १७ ॥ ४७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

एक टेक गोविंद की तिआगी अन आस ॥
सभ ऊपरि समरथ प्रभ पूरन गुण तास ॥ १ ॥
जन का नामु अधारु है प्रभ सरणी पाहि ॥
परमेसर का आसरा संतन मन माहि ॥ १ ॥ रहाउ ॥
आपि रखै आपि देवसी आपे प्रतिपारै ॥
दीन दइआल क्रिपानिधे सासि सासि सम्हारै ॥ २ ॥
करणहारु जो करि रहिआ साई वडिआई ॥
गुरि पूरै उपदेसिआ सुखु खसम रजाई ॥ ३ ॥
चिंत अंदेसा गणत तजि जनि हुकमु पछाता ॥
नह बिनसै नह छोडि जाइ नानक रंगि राता ॥ ४ ॥ १८ ॥ ४८ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८१२)

शब्दार्थ : **टेक** – आधार, आश्रय. **आस** – आशा. **गुणतास** – गुणनिधी. **देवसी** – देतो. **प्रतिपारै** – प्रतिपाळ करतो. **सम्हारे** – संभाळ करतो. **करणहारु** – कर्ता. **साई** – तीच. **रजाइ** – आज्ञापालन. **चिंत** – चिंत. **अंदेसा** – संशय. **पछाता** – जाणला. **रंगी** – प्रेमरंगात. **राता** – रममाण झाला.

भावार्थ : मला केवळ एकमेव प्रभू परमात्म्याचा आधार आहे. बाकी सर्व आशांचा मी त्याग केला आहे. तो प्रभू परमात्मा सर्वश्रेष्ठ आहे, सर्वसमर्थ आहे व सर्व गुणांचे भांडार आहे. ॥ १ ॥ प्रभूचे सेवक प्रभुशरण जाऊन प्रभुनामाचा

आधार प्राप्त करतात. संतसज्जनांच्या मनाला केवळ प्रभू परमात्म्याचाच आधार असतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो प्रभू परमात्मा आपल्या सेवकांचे रक्षण करतो. त्यांना तो सर्व काही देऊन त्यांचा प्रतिपाळ करतो. तो दीनदयाळ कृपानिधी प्रभूच सर्व जीवांचा सदैव संभाळ करतो. ॥ २ ॥ तो कर्ता प्रभूच सर्व काही करतो. हीच त्याची महती आहे. सतगुरूने असा उपदेश केला आहे, की सर्व जीवांनी प्रभू परमात्म्याच्या आज्ञेत राहावे. त्यातच जीवाचे सुख सामावलेले आहे. ॥ ३ ॥ प्रभूचे सेवक सर्व चिंता, सर्व संशय, सर्व नफातोट्याचा हिशोब सोडून प्रभूची आज्ञा शिरसावंद्य मानतात. नानक सांगतात, ते प्रभूच्या प्रेमरंगात इतके रंगून जातात की तो रंग त्यांना कधीही सोडून जात नाही. ॥ ४ ॥ १८ ॥ ४८ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

महा तपति ते भई सांति परसत पाप नाठे ॥
अंध कूप महि गलत थे काढे दे हाथे ॥ १ ॥
ओइ हमारे साजना हदू उन की रेन ॥
जिन भेटत होवत सुखी जीउ दानु देन ॥ १ ॥ रहाउ ॥
परा पूरबला लीखिआ मिलिआ अब आइ ॥
बसत तिहु लोक के पाए सुख थान ॥
दइआ करी समरथ गुरि बसिआ मनि नाम ॥ ३ ॥
नानक की तू टेक प्रभ तेरा आधार ॥
करण कारण समरथ प्रभ हरि अगम अपार ॥ ४ ॥ १९ ॥ ४९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१३)

शब्दार्थ : **तपति** – अग्नी. **परसत** – स्पर्शाने. **नाठे** – नष्ट केले. **गलत** – पडणे. **काढे** – काढले. **रेन** – धूलिकण. **परा पूरबला** – पूर्व जन्मातील कर्मानुसार. **आसाइ** – आशा. **तिहु** – तिनही.

भावार्थ : सतगुरूच्या स्पर्शाने सर्व पाप नष्ट होते व जीवास मोहमायेच्या महातापापासून शांती प्राप्त होते. तो जीवास हाती धरून मायारूपी अंधकारमय कुपातून बाहेर काढतो. ॥ १ ॥ तोच (प्रभू) माझा सखा मी त्याच्या चरणीची धूळ. त्याच्या मिलनाने सुख प्राप्त होते. तोच जीवाला प्राण दान देतो. जीवाचा उद्धार करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ फार पूर्वीपासून माझ्या पूर्वकर्मानुसार माझ्या भाग्यात प्रभूने लिहून ठेवले होते ते आता प्राप्त झाले आहे. साधुसंतांची संगत प्राप्त झाल्याने, त्यांच्या संगतीत राहिल्याने माझ्या मनाच्या सर्व आशा आता पूर्ण झाल्या आहेत. ॥ २ ॥ सतगुरूकृपेने माझे तीनही लोकीचे भय नष्ट झाले व मला सुखाचे स्थान असलेला प्रभू परमात्मा प्राप्त झाला. समर्थ गुरूने माझ्यावर दया करून माझ्या मनात प्रभुनाम दृढ केले. ॥ ३ ॥ नानक म्हणतात, हे प्रभू ! तूच माझा आधार, तूच माझे आश्रयस्थान, मला केवळ तुझाच आधार आहे. हे प्रभो ! तूच सर्व काही करण्यास व करवून घेण्यास समर्थ आहेस. तुझा महिमा अपार आहे. अगम्य आहे. ॥ ४ ॥ १९ ॥ ४९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सोई मलीनु दीनु हीनु जिसु प्रभु बिसराना ॥
करनैहारू न बूझई आपु गनै बिगाना ॥ १ ॥
दुखू तदे जदि वीसरै सुखु प्रभ चिति आए ॥
संतन कै आनंदु एहु नित हरि गुण गाए ॥ १ ॥ रहाउ ॥
ऊचे ते नीचा करै नीच खिन महि थापै ॥
कीमति कही न जाईऐ ठाकुर परतापै ॥ २ ॥
पेखत लीला रंग रूप चलनै दिनु आइआ ॥
सुपने का सुपना भइआ संगि चलिआ कमाइआ ॥ ३ ॥
करण कारण समरथ प्रभ तेरी सरणाई ॥
हरि दिनसु रैणि नानकु जपै सद सद बलि जाई ॥ ४ ॥ २० ॥ ५० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८१३)

शब्दार्थ : **बिसराना** – विस्मृत केले, विसरला. **बिगाना** – . **तदे** – तेव्हा. **जादे** – जेव्हा. **चलनै** – जाण्याचा, मृत्यूचा.

भावार्थ : जो प्रभू परमात्म्यास विसरला तो मलिन, दीन, हीन होय. तो त्या कर्त्या प्रभूस विसरतो व स्वतःस श्रेष्ठ समजतो. ॥ १ ॥ जेव्हा प्रभू परमात्म्याचा विसर पडतो, तेव्हा दुःख होते. जेव्हा मनात प्रभू परमात्म्याचे स्मरण होते, प्रभू अंतःकरणात वास करतो तेव्हा सुख प्राप्त होते. संतजन सदैव प्रभू परमात्म्याचे गुण गातात. त्याचा त्यांना आनंद वाटतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो प्रभू श्रेष्ठस्थानी बसलेल्यास खाली ओढतो तर पद दलितास उच्च स्थानी नेऊन बसवतो. त्याच्या प्रतापाचे मोल कोणीही करू शकत नाही. ॥ २ ॥ त्याच्या लीला, त्याचे रंग, रूप पाहता पाहता जीवाची ह्या जगातून निघून जाण्याची वेळ येऊन ठेपते. जीवाने जीवनामध्ये जी काही स्वप्ने पाहिलेली असतात ती अखेर स्वप्नेच ठरतात. ती साध्य होऊ शकत नाहीत. पण मानवीजन्मात त्याने केलेली प्रभुभक्ती, प्रभुनाम संकीर्तन मात्र अखेरीस त्याच्या बरोबर येते. ॥ ३ ॥ हे कर्त्या करवित्या प्रभो ! मी तुला शरण आलो आहे. नानक रात्रंदिवस प्रभू परमात्म्याचे स्मरण करतो व त्याच्या चरणी आपले सर्वस्व समर्पित करतो.॥ ४ ॥ २० ॥ ५० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

जलु ढोवउ इह सीस करि कर पग पखलावउ ॥
बारि जाउ लख बेरिआ दरसु पेखि जीवावउ ॥ १ ॥
करउ मनोरथ मनै माहि अपने प्रभ ते पावउ ॥
देउ सूहनी साध कै बीजनु ढोलावउ ॥ १ ॥ रहाउ ॥
अंम्रित गुण संत बोलते सुणि मनहि पीलावउ ॥

उआ रस महि सांति त्रिपति होइ बिखै जलनि बुझावउ ॥ २ ॥
जब भगति करहि संत मंडली तिन्ह मिलि हरि गावउ ॥
करउ नमसकार भगत जन धूरि मुखि लावउ ॥ ३ ॥
ऊठत बैठत जपउ नामु इहु करमु कमावउ ॥
नानक की प्रभ बेनती हरि सरनि समावउ ॥ ४ ॥ २१ ॥ ५१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१३)

शब्दार्थ : **ढोवउ** – पाणी भरीन. **पखलावउ** – धुवीन. **बेरीआ** – वेळा. **जीवावउ** – जीवन जगतो. **पावउ** – प्राप्त करीन. **देउ** – . **सूहनी** – . **बीजनु** – पंखा. **ढोलवउ** – वारा घालीन. **पिलावउ** – पाजतो. **उआ** – त्याच. **बिखै** – विषयविकार. **धूरि** – धूळ. **बेनती** – विनंती.

भावार्थ : मी प्रभू परमात्म्याच्या दारी पाणी भरतो. स्वहस्ते त्याचे चरणकमल धुतो. त्याच्या चरणी लाखो वेळा सर्वस्व समर्पित करतो व त्याचे दर्शन करून जीवन जगतो. ॥ १ ॥ मी मनात जे मनोरथ करतो ते सारे मला प्रभूकडून प्राप्त होतात. मी साधुसंतांच्या घरी केर काढतो, त्यांना पंख्याने वारा घालतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ संतसज्जनांनी उच्चारलेले अमृत मधुर बोल मी माझ्या मनास पाजतो. त्या नामरसाने मनास शांती प्राप्त होते. मनातील विषयविकार नष्ट होतात. ॥ २ ॥ जेव्हा संतमंडळी प्रभू परमात्म्याची भक्ती करत असतात, तेव्हा त्याच्या संगतीने मीही हरिनाम गातो. मी प्रभुभक्तांना नमस्कार करतो व त्यांची चरणधूळ मुखात धारण करतो. हेच माझे धर्म कर्म. नानक म्हणतात, हे प्रभो ! मी तुला शरण आलो आहे. माझी तुझ्या चरणी एकच विनंती आहे की मी तुझ्यात एकरूप होऊन जावे.॥ ४ ॥ २१ ॥ ५१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

इहु सागरु सोई तरै जो हरि गुण गाए ॥
साध संगति कै संगि वसै वडभागी पाए ॥ १ ॥
सुणि सुणि जीवै दासु तुम्ह बाणी जन आखी ॥
प्रगट भई सभ लोअ महि सेवक की राखी ॥ १ ॥ रहाउ ॥
अगनि सागर ते काढिआ प्रभि जलनि बुझाई ॥
अंम्रित नामु जलु संचिआ गुर भए सहाई ॥ २ ॥
जनम मरण दुख काटिआ सुख का थानु पाइआ ॥
काटी सिलक भ्रम मोह की अपने प्रभ भाइआ ॥ ३ ॥
मत कोई जाणहु अवरु कछु सभ प्रभ कै हाथि ॥
सरंब सूख नानक पाए संगि संतन साथि ॥ ४ ॥ २२ ॥ ५२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१३)

शब्दार्थ : **सोई** – तोच. **तरे** – तरून जातो. **आखी** – सांगितली. **लोअ** – लोक. **राखी** – रक्षण केले. **काढिआ** – काढले. **संचिआ** – शिंपडले. **सहाइ** – साहाय्यकर्ता. **थानु** – स्थान. **सिलक** – साखळदंड, दोर, बंधन.

भावार्थ : जो प्रभू परमात्म्याचे गुणगान गातो, तोच भवसागर तरून जातो. साधुसंगतीत बसणारा भाग्यशाली जीव प्रभू परमात्म्यास प्राप्त करतो. ॥ १ ॥ तुझे दास जी वाणी उच्चारतात ती ऐकून ऐकून मी जीवन जगतो. प्रभू परमात्मा सर्व लोकांत प्रगट होऊन आपल्या भक्तांचे रक्षण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा जीवास मोहमायेच्या तृष्णारूपी अग्नीतून बाहेर काढून ती आग विझवतो. सतगुरूने मनावर प्रभुनामाचे सिंचन करून साहाय्य केले. ॥२॥ जेव्हा प्रभूस मी आवडलो, तेव्हा त्याने माझे जन्ममरणाचे दु:ख दूर केले. त्याच्याच कृपेने मला त्याच्या चरणी सुखस्थान प्राप्त झाले. त्यानेच माझी मोहमायेच्या भ्रमाची बंधने तोडून टाकली. ॥३॥ कोणीही ह्याशिवाय अन्य कोणताही विचार करू नये. सारे काही त्या प्रभू परमात्म्याच्या हाती आहे. नानक सांगतात, साधुसंतांची संगत प्राप्त झाल्यामुळे मला सर्व सुख प्राप्त झाले. ॥ ४ ॥ २२ ॥ ५२ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

बंधन काटे आपि प्रभि होआ किरपाल ॥
दीन दइआल प्रभ पारब्रहम ता की नदरि निहाल ॥१॥
गुरि पूरै किरपा करी काटिआ दुखु रोगु ॥
मनु तनु सीतलु सुखी भइआ प्रभ धिआवन जोगु ॥ १ ॥ रहाउ ॥
अउखधु हरि का नामु है जितु रोगु न विआपै ॥
साध संगि मनि तनि हितै फिरि दूखु न जापै ॥ २ ॥
हरि हरि हरि हरि जापीऐ अंतरि लिव लाई ॥
किलविख उतरहि सुधु होइ साधू सरणाई ॥३॥
सुनत जपत हरि नाम जसु ता की दूरि बलाई ॥
महा मंत्रु नानकु कथै हरि के गुण गाई ॥ ४ ॥ २३ ॥ ५३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१४)

शब्दार्थ : **नदरि** – कृपादृष्टी. **निहाल** – प्रसन्न. **धिआवन** – ध्यान करणे. **जोगु** – योग्य. **हितै** – प्रेम करून. **लिवलाई** – एकाग्र करून. **उतरहि** – नष्ट होते. **सुधु** – शुद्ध. **जसु** – यश. **बलाई** – पीडा, चिंता. **कथै** – सांगतात.

भावार्थ : प्रभू परमात्म्याची कृपा झाल्यावर तो जीवाची सारे बंधने तोडून टाकतो. त्या दीनदयाळ परब्रह्म परमात्म्याच्या कृपादृष्टीमुळे मन प्रसन्न होते. ॥ १ ॥ पूर्णगुरूच्या कृपेने माझे दु:ख, भवरोग नष्ट झाले. तन, मन शांत झाले. तो एकमेव प्रभू परमात्मा ध्यान करण्यायोग्य आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ हरिनाम हे असे एकमेव औषध आहे की ज्यामुळे भवरोग जीवास व्यापू शकत नाहीत. साधुसंतांच्या संगतीत राहिल्याने तन, मन प्रभुप्रेमात रंगून जाते. अशा जीवास परत कधीही दु:ख व्यापू शकत नाही. ॥ २ ॥ सदैव मुखाने हरी हरी हरी असा नाममंत्राचा जप केल्याने चित्त प्रभुचरणी एकाग्र होते. साधुसंतांना शरण गेल्याने पाप नष्ट होते. चित्त शुद्ध होते. ॥ ३ ॥ जो जीव प्रभुनामाचा जप करतो. प्रभूचे यशोगान श्रवण करतो. त्याची सर्व पीडा दूर होते. नानक सांगतात, प्रभुनाम हा महामंत्र आहे. सदैव हरीचे गुण गावेत. ॥ ४ ॥ २३ ॥ ५३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

भै ते उपजै भगति प्रभ अंतरि होइ सांति ॥
नामु जपत गोविंद का बिनसै भ्रम भ्रांति ॥ १ ॥
गुरु पूरा जिसु भेटिआ ता कै सुखि परवेसु ॥
मन की मति तिआगीऐ सुणीऐ उपदेसु ॥ १ ॥ रहाउ ॥
सिमरत सिमरत सिमरीऐ सो पुरखु दातारु ॥
मन ते कबहु न वीसरै सो पुरखु अपारु ॥ २ ॥
चरन कमल सिउ रंगु लगा अचरज गुरदेव ॥
जा कउ किरपा करहु प्रभ ता कउ लावहु सेव ॥३॥
निधि निधान अंम्रितु पीआ मनि तनि आनंद ॥
नानक कबहु न वीसरै प्रभ परमानंद ॥ ४ ॥ २४ ॥ ५४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१४)

शब्दार्थ : **बिनसै** – नाश पावते. **परवेसु** – प्रवेश करते. **सिमरीए** – स्मरण कर. **दातारु** – दाता. **रंगु** – प्रेम.

भावार्थ : प्रभू परमात्म्याविषयी आदरयुक्त भीती मनात बाळगल्याने मनात प्रभुभक्ती उत्पन्न होते. प्रभू परमात्म्याचे नामस्मरण केल्याने मनातील भ्रम व भ्रांती नाश पावते. ॥ १ ॥ ज्या जीवास पूर्णगुरू भेटला त्याच्या अंत:करणात आत्मिक सुखाचा प्रवेश होतो. हे जीवा ! आपल्या मनाच्या इच्छेप्रमाणे वागणे सोडून दे व सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ सदैव त्या दात्या प्रभूचे, कर्त्यापुरूषाचे स्मरण कर. तुझ्या मनाला त्या परमपुरूषाचे कधीही विस्मरण होऊ देऊ नकोस. ॥ २ ॥ सतगुरू हा महा आश्चर्यकारक आहे. त्याच्या कृपेने मन प्रभू प्रेमात रंगून जाते. ज्याच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते त्यास तो प्रभुसेवेस लावतो. ॥ ३ ॥ सर्व निधींचे भांडार असलेले प्रभुनामरूपी अमृत प्राशन केल्याने तन, मन आनंदित होते. नानक सांगतात, हे जीवा ! तू त्या परमानंद स्वरूप प्रभू परमात्म्यास कधीही विसरू नकोस. ॥ ४ ॥ २४ ॥ ५४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

त्रिसन बुझी ममता गई नाठे भै भरमा ॥
थिति पाई आनदु भइआ गुरि कीने धरमा ॥ १ ॥
गुरु पूरा अराधिआ बिनसी मेरी पीर ॥
तनु मनु सभु सीतलु भइआ पाइआ सुखु बीर ॥ १ ॥ रहाउ ॥
सोवत हरि जपि जागिआ पेखिआ बिसमादु ॥
पी अंम्रितु त्रिपतासिआ ता का अचरज सुआदु ॥ २ ॥
आपि मुकतु संगी तरे कुल कुटंब उधारे ॥
सफल सेवा गुरदेव की निरमल दरबारे ॥ ३ ॥

नीचु अनाथु अजानु मै निरगुनु गुणहीनु ॥
नानक कउ किरपा भई दासु अपना कीनु ॥ ४ ॥ २५ ॥ ५५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१४)

शब्दार्थ : **गुरि** – प्रभू. **धरमा** – कृपा. **पीर** – पीडा, दुःख. **बीर** – बंधू. **जगिआ** – जागृत झाला. **बिसमादु** – आश्चर्य, नवल. **त्रिपतासिआ** – तृप्त झालो. **आपि** – प्रभू स्वत:. **अजानु** – अज्ञानी. **किरपा** – कृपा. **भइ** – झाली. **कीनु** – केले.

भावार्थ : जेव्हा प्रभू परमात्म्याची कृपा झाली, तेव्हा माझ्या मनातील मोहमायेची तृष्णा नष्ट झाली. माया, ममता संपली. मोहमायेने उत्पन्न केलेले भ्रम व भ्रांती नष्ट झाली. ॥ १ ॥ पूर्णगुरूची (प्रभू परमात्म्याची) आराधना केल्यामुळे माझी सर्व पीडा नष्ट झाली. हे बंधु ! माझे तन, मन शांत झाले व सुखाची प्राप्ती झाली. ॥ १ ॥रहाउ॥ जेव्हा अज्ञानरूपी रात्रीत निद्रिस्त असलेला जीव हरिनामाचा जप केल्याने जागृत होऊन प्रभू परमात्म्याचा साक्षात्कार करतो, तेव्हा त्या प्रभू परमात्म्याच्या आश्चर्यकारक लीला पाहून थक्क होतो. असा जीव प्रभुनामरूपी अमृतरसाचे प्राशन करून त्याच्या नवलपूर्ण स्वादात तृप्त होतो. ॥ २ ॥ असा जीव स्वत: मुक्त होतो व आपले कुटुंब, आपल्या संपूर्ण कुलाचाही उद्धार करतो. त्याने केलेली प्रभुसेवा सफल होते व तो निर्मल होऊन प्रभू दरबारात स्थान प्राप्त करतो. ॥ ३ ॥ नानक सांगतात, मी नीच होतो, अनाथ होतो, अडाणी होतो, गुणहीन होतो पण प्रभूने माझ्यावर कृपा करून मला आपला दास केला. ॥ ४ ॥ २५ ॥ ५५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

हरि भगता का आसरा अन नाही ठाउ ॥
ताणु दीबाणु परवार धनु प्रभ तेरा नाउ ॥ १ ॥
करि किरपा प्रभि आपणी अपने दास रखि लीए ॥
निंदक निंदा करि पचे जमकालि ग्रसीए ॥ १ ॥ रहाउ ॥
संता एकु धिआवना दूसर को नाहि ॥
एकसु आगै बेनती रविआ सभ थाइ ॥ २ ॥
कथा पुरातन इउ सुणी भगतन की बानी ॥
सगल दुसट खंड खंड कीए जन लीए मानी ॥ ३ ॥
सति बचन नानकु कहै परगट सभ माहि ॥
प्रभ के सेवक सरणि प्रभ तिन वउ भउ नाहि ॥ ४ ॥ २६ ॥ ५६ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८१५)

शब्दार्थ : **ठाउ** – स्थान. **ताणु** – शक्ती. **दिबाणु** – दरबार. **पचे** – मेले, जळाले. **ग्रसीए** – गिळून टाकले. **एकु** – एकमेव प्रभू. **रविआ** – व्याप्त. **इउ** – ह्याप्रकारे. **लीए माना** – आदर केला, सन्मान केला. **सति** – सत्य. **परगट** – प्रगट. **भउ** – भय.

भावार्थ : प्रभुसेवकांना प्रभू परमात्मा हा एकमेव आधार असतो. त्यांना अन्य कोणताही आधार नसतो. प्रभुनाम हेच त्यांचे धन, हाच त्यांचा परिवार, हेच त्यांचे बळ, त्यांचा दरबार. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा आपल्या भक्तांवर कृपा

करून त्याचे रक्षण करतो. तो प्रभुसेवकांची निंदा करणाऱ्या निंदकांना नष्ट करतो. त्यांना यम गिळून टाकतो. ॥१॥ रहाउ ॥ संतजन केवळ त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे ध्यान करतात. अन्य कोणाचेही नाही. तो एकमेव प्रभू परमात्माच सर्व ठिकाणी वास करतो. त्या सर्वव्याप्त एकमेव प्रभू परमात्म्याच्या चरणी विनंती करावी. ॥ २ ॥ भक्तांच्या तोंडून अशी एक पूर्वापार चालत आलेली कथा ऐकण्यात आली आहे, की तो प्रभू सर्व दुष्टांचे तुकडे तुकडे करून नष्ट करतो व आपल्या सेवकांचा सन्मान करतो. ॥ ३ ॥ नानक सत्यवचन सांगतात, की तो प्रभू परमात्मा सर्व सृष्टीत प्रगट झाला आहे व जे प्रभू परमात्म्यास शरण जातात त्यांना कसलेही भय शिल्लक राहत नाही. ॥ ४ ॥ २६ ॥ ५६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

बंधन काटै सो प्रभू जा कै कल हाथ ॥
अवर करम नही छूटीऐ राखहु हरि नाथ ॥ १ ॥
तउ सरणागति माधवे पूरन दइआल ॥
छूटि जाइ संसार ते राखै गोपाल ॥ १ ॥ रहाउ ॥
आसा भरम बिकार मोह इन महि लोभाना ॥
झूठु समग्री मनि वसी पारब्रहमु न जाना ॥ २ ॥
परम जोति पूरन पुरख सभि जीअ तुम्हारे ॥
जिउ तू राखहि तिउ रहा प्रभ अगम अपारे ॥ ३ ॥
करण कारण समरथ प्रभ देहि अपना नाउ ॥
नानक तरीऐ साध संगि हरि हरि गुण गाउ ॥ ४ ॥ २७ ॥ ५७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१५)

शब्दार्थ : **अवर** – अन्य. **बिकार** – विकार.

भावार्थ : तो प्रभू परमात्मा, ज्याच्या हाती सारे सामर्थ्य आहे तो जीवाची सारी बंधने तोडून टाकतो. अन्य कोणत्याही कर्मकांडाने मायेची बंधने तुटत नाहीत. हे प्रभो ! तू आमचे रक्षण कर. ॥ १ ॥ हे माधवा, पूर्ण दयाळू परमात्मा ! मी तुला शरण आलो आहे. जो जीव प्रभू गोपालास शरण जातो तो संसारातून मुक्त होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ हा जीव आशा, भ्रम, विकार, मोह ह्यांच्यात लोभून गेला आहे. त्याचे मन ह्या नश्वर मायेतच अडकून पडले आहे. त्यामुळे तो प्रभू परमात्म्यास जाणण्याचा प्रयत्नही करत नाही. ॥ २ ॥ हे परम ज्योतिस्वरूप पूर्णपुरुषा ! हे सारे जीव तुझेच आहेत. हे अगम्य, अपार परमात्म्या तू जसे ठेवतोस तसेच ते राहतात. ॥ ३ ॥ सर्व काही करण्यास व करवून घेण्यास तू समर्थ आहेस. मला तुझे नाम दे. नानक सांगतात, साधुसंतांच्या संगतीत हरीचे गुणगान गाऊन जीव भवसागर तरून जातो. ॥ ४ ॥ २७ ॥ ५७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

कवनु कवनु नही पतरिआ तुम्हरी परतीति ॥
महा मोहनी मोहिआ नरक की रीति ॥ १ ॥
मन खुटहर तेरा नही बिसासु तू महा उदमादा ॥

खर का पैखरु तउ छूटै जउ ऊपरि लादा ॥ १ ॥ रहाउ ॥
जप तप संजम तुम्ह खंडे जम के दुख डांड ॥
सिमरहि नाही जोनि दुख निरलजे भांड ॥ २ ॥
हरि संगि सहाई महा मीतु तिस सिउ तेरा भेदु ॥
बीधा पंच बटवारई उपजिओ महा खेदु ॥३॥
नानक तिन संतन सरणागती जिन मनु वसि कीना ॥
तनु धनु सरबसु आपणा प्रभि जन कउ दीन्हा ॥ ४ ॥ २८ ॥ ५८ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८१५)

शब्दार्थ : **कवनु** – कोण. **पतरिआ** – पतन होणे. **परतीति** – विश्वास. **महामोहनि** – माया. **मोहिआ** – मोहित केले. **खुटहर** – खोटे. **बिसासु** – विश्वास. **उदमादा** – उन्मत्त. **खर** – गाढव. **पैखरु** – पायखुट. **जउ** – जेव्हा. **खंडे** – तुकडे केले. **डांड** – दंडा. **सहाइ** – साहाय्यकर्ता. **मीतु** – मित्र. **भेद** – वैर. **बिधा** – बद्ध. **बटवारई** – वाटेकरी. **खेदु** – दुःख. **वयिकीना** – वश केले, ताब्यात ठेवले. **दिना**– दिले.

भावार्थ : **हे** मना ! तू नीट विचार करून पाहा. ह्या मोहमायेच्या नादी लागून कोणाकोणाचे म्हणून पतन झाले नाही ? सर्वांचेच झाले. ही मोहमाया हा नरकात जाण्याचा मार्ग आहे. ॥ १ ॥ हे मना ! तू खोटारडा आहेस. तू अहंकाराने उन्मत्त झाला आहेस. तुझा काहीच भरवसा नाही. ज्याप्रमाणे उधळणाऱ्या गाढवाच्या पायात पायखुट घालतात. त्याच्या पाठीवर बोजा लादल्यावर ते पायखुट सोडतात. त्याप्रमाणे मन इतस्ततः धावू नये म्हणून त्यास ताब्यात ठेवण्यासाठी प्रभुनाम स्मरणरूपी खोडा घालून त्यास ताब्यात ठेवता येते. ॥ १ ॥ रहाउ ॥ पण हे मना ! तू जप, तप, संयम आदी मार्गाने जाण्याचे सोडून मोहमायेत गुंतून पडल्याने वारंवार मरणाच्या दुःखाचा धनी झाला आहेस. पण तरीही हे द्वाड, निर्लज्ज मना तू प्रभूचे स्मरण करण्याचे सोडून जन्ममरणाचे दुःख भोगत आहेस. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्याची संगत हीच खरी संगत आहे. प्रभू परमात्मा हाच खरा मित्र आहे, साहाय्यकर्ता आहे. पण त्याच्याशीच तुझे वैर आहे. त्यामुळे तू पंचविकाररूपी चोरांकडून नित्य लुटला जात आहेस हेही तुला कळत नाही. हीच खरी मानवजन्माची शोकांतिका आहे. ॥ ३ ॥ नानक सांगतात, की ज्यांनी आपले मन ताब्यात ठेवले आहे अशा संतांना मी शरण गेलो आहे. मी माझे तन, मन, धन, सर्वस्व प्रभुसेवकांचे चरणी अर्पण केले आहे. ॥ ४ ॥ २८ ॥ ५८ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥
उदमु करत आनदु भइआ सिमरत सुख सारु ॥
जपि जपि नामु गोबिंद का पूरन बीचारु ॥ १ ॥
चरन कमल गुर के जपत हरि जपि हउ जीवा ॥
पारब्रहमु आधारते मुखि अंम्रितु पीवा ॥ १ ॥ रहाउ ॥
जीअ जंत सभि सुखि बसे सभ कै मनि लोच ॥
परउपकारु नित चितवते नाही कछु पोच ॥ २ ॥
धंनु सु थानु बसंत धंनु जह जपीऐ नामु ॥

कथा कीरतनु हरि अति घना सुख सहज बिस्रामु ॥ ३ ॥
मन ते कदे न वीसरै अनाथ को नाथ ॥
नानक प्रभ सरणागती जा कै सभु किछु हाथ ॥ ४ ॥ २९ ॥ ५९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८१५)

शब्दार्थ : **उदमु** – उद्योग, व्यवसाय. **आनदु** – आनंद. **भइआ** – झाला. **सारु** – श्रेष्ठ. **बिचारु** – विचार, मनन, चिंतन. **जीवा** – जगतो. **लोच** – इच्छा. **कछु** – थोडासाही. **पोच** – दंभ. **धंनु** – धन्य. **बसंत** – बसणारे.

भावार्थ : माणूस आपल्या चरितार्थासाठी उद्योग व्यवसाय करण्यात आनंद मानतो. पण प्रभूचे नामस्मरण करणे हा खरा श्रेष्ठ उद्योग आहे. हे जीवा ! तू सदैव प्रभूचे स्मरण कर. त्याचेच मनन, चिंतन कर. ॥१॥ मी तर सतगुरूची चरणसेवा व प्रभूचे नामस्मरण करून जीवन जगतो. परब्रह्म परमात्म्याची आराधना करून मुखाने प्रभुनामरूपी अमृत प्राशन करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सर्व जीव आपण सुखी जीवन जगावे अशी मनात आशा बाळगतात. पण दुसऱ्यांवर उपकार करणे, दुसऱ्याचे भले चिंतणे व त्यात दंभाला यत्किंचितही स्थान न देणे ह्यात खरे सुख सामावलेले आहे. ॥ २ ॥ जेथे बसून प्रभुनामाचा जप करता येतो तो सत्संग, ते स्थान धन्य होय. अशा ठिकाणी सदैव हरीचे कीर्तन होत असते. तेथे जीवास सहजावस्था प्राप्त होते. महासुख व विश्राम प्राप्त होतो. ॥३॥ हे जीवा ! तुला त्या अनाथांच्या नाथाचा, त्या प्रभू परमात्म्याचा कधीही विसर पडू नये. नानक सांगतात, ज्याच्या हाती सर्व काही आहे अशा प्रभू परमात्म्यास शरण जावे. ॥ ४ ॥ २९ ॥ ५९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥
जिनि तू बंधि करि छोडिआ फुनि सुख महि पाइआ ॥
सदा सिमरि चरणा बिंद सीतल होताइआ ॥ १ ॥
जीवतिआ अथवा मुइआ किछु कामि न आवै ॥
जिनि एहु रचनु रचाइआ कोऊ तिस सिउ रंगु लावै ॥ १ ॥ रहाउ ॥
रे प्राणी उसन सीत करता करै घाम ते काढै ॥
कीरी ते हसती करै टूटा ले गाढै ॥ २ ॥
अंडज जेरज सेतज उतभुजा प्रभ की इह किरति ॥
किरत कमावन सरब फल रवीऐ हरि निरति ॥ ३ ॥
हम ते कछू न होवना सरणि प्रभ साध ॥
मोह मगन कूप अंध ते नानक गुर काढ ॥ ४ ॥ ३० ॥ ६० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१६)

शब्दार्थ : **जिनि** – ज्याने. **बंधि** – बद्ध केले. **छोडिआ** – सोडवले. **फुनि** – परत, पुन्हा. **मुइआ** – मृत. **जिवतिआ** – जिवंत. **कोउ** – कोणी. **रंगु** – प्रेम. **उसन** – उष्ण. **सीतु** – थंड. **घाम** – ताप. **कीरी** – कीटक.

हसती – हत्ती. **टुट** – तुटलेला, दूर गेलेला. **गाढै** – जवळ आणतो, एकरूप करतो. **किरत** – कर्म. **कमावत** – प्राप्त होते. **स्वीऐ** – उच्चारणे. **निरति** – अनुरक्त. **काढ** – काढले.

भावार्थ : ज्या प्रभू परमात्म्याने तुला नाना योनीत बद्ध केले होते, त्यानेच तुझी त्यातून मुक्तता केली व तुला परत एकदा सुख प्रदान केले. अशा ह्या प्रभू परमात्म्याच्या चरणारविंदाचे स्मरण केल्याने आत्म्यास शांती प्राप्त होते. ॥ १ ॥ ही माया जिवंतपणी वा मेल्यावरही मुळीच उपयोगी पडत नाही. ज्याने ह्या सृष्टीची रचना केली त्या प्रभू परमात्म्याच्या प्रेमात रंगून जा. ॥ १ ॥ रहाउ ॥ अरे प्राण्या ! तो परमात्माच गर्मी सर्दी निर्माण करतो. तोच जीवाला भवतापापासून मुक्त करतो. तोच क्षुद्र, कीटकाला हत्तीचे बळ देतो व तोच प्रभूपासून दूर गेलेल्याचे प्रभूशी पुनर्मिलन घडवतो. ॥ २ ॥ अंडज, जारज, स्वेदज व उदभिज या चारही योनी प्रभूनेच निर्माण केल्या आहेत. प्रत्येक जीव आपापल्या कर्माचे फळ भोगतो. जो प्रभू परमात्म्यावर अनुरक्त होऊन सदैव त्याचे नामस्मरण करतो. त्याचे जीवन सफल होते. ॥ ३ ॥ आम्ही जीव काहीही करू शकत नाही म्हणून जीवाने साधुसंतांना शरण जावे. नानक सांगतात, मोहमायेत मग्न होऊन अज्ञान, अंधकाराच्या खाईत पडलेल्यास सतगुरु त्यातून बाहेर काढतो. ॥ ४ ॥ ३० ॥ ६० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

खोजत खोजत मै फिरा खोजउ बन थान ॥
अछल अछेद अभेद प्रभ ऐसे भगवान ॥ १ ॥
कब देखउ प्रभु आपना आतम कै रंगि ॥
जागन ते सुपना भला बसीऐ प्रभ संगि ॥ १ ॥ रहाउ ॥
बरन आस्त्रम सासत्र सुनउ दरसन की पिआस ॥
रूपु न रेख न पंच तत ठाकुर अबिनास ॥ २ ॥
ओहु सरूपु संतन कहहि विरले जोगीसुर ॥
करि किरपा जा कउ मिले धनि धनि ते ईसुर ॥३॥
सो अंतरि सो बाहरे बिनसे तह भरमा ॥
नानक तिसु प्रभु भेटिआ जाकेपूरन करमा ॥ ४ ॥ ३१ ॥ ६१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१६)

शब्दार्थ : **अछल** – निष्कपट. **अछेद** – अविनाशी. **आतम** – आत्मा. **जागन** – जागणे. **बरन** – वर्ण. **आस्त्रम** – आश्रम. **सासत्र** – शास्त्र. **सरूपु** – स्वरूप. **जोगीसुर** – योगेश्वर. **जाकउ** – ज्याला. **धनि** – धन्य. **इसरु** – ईश्वर. **तह** – त्याचा.

भावार्थ : निष्कपट, अविनाशी असा जो प्रभू परमात्मा त्याला शोधत मी रानावनात सर्वत्र हिंडलो. ॥ १ ॥ मला तो प्रभू परमात्मा माझ्या आत्मरंगात केव्हा प्राप्त होईल ? जागेपणापेक्षा स्वप्न बरे कारण स्वप्नात तरी मी प्रभूचा संग प्राप्त करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी जेव्हा जेव्हा वर्ण, आश्रम, आदी सांगणारी शास्त्रे ऐकतो, तेव्हा माझ्या मनातील हरिदर्शनाची तहान अधिकच तीव्र होते. पण प्रभू परमात्म्यास ना रूप, ना रंग, ना आकार. तो पंचतत्त्वांच्याही अतीत असून अविनाशी आहे. ॥ २ ॥ अशा योगेश्वराचे वर्णन केवळ संतजनच करू शकतात.

ज्यांच्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो त्यास ईश्वर प्राप्त होतो ते जीव धन्य होत. ॥ ३ ॥ तो प्रभू परमात्मा प्रत्येक जीवाच्या अंतरात आहे. बाहेरही सर्वत्र तोच भरून राहिला आहे. तोच सारे भ्रम नष्ट करतो. नानक सांगतात, ज्याचे भाग्य पूर्ण झाले त्यासच प्रभू परमात्मा भेटतो. ॥ ४ ॥ ३१ ॥ ६१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

जीअ जंत सुप्रसंन भए देखि प्रभ परताप ॥
करजु उतारिआ सतिगुरू करि आहरु आप ॥ १ ॥
खात खरचत निबहत रहै गुर सबदु अखूट ॥
पूरन भई समगरी कबहू नही तूट ॥ १ ॥ रहाउ ॥
साध संगि आराधना हरि निधि आपार ॥
धरम अरथ अरु काम मोख देते नही बार ॥ २ ॥
भगत अराधहि एक रंगि गोबिंद गुपाल ॥
राम नाम धनु संचिआ जा का नही सुमारु ॥ ३ ॥
सरनि परे प्रभ तेरीआ प्रभ की वडिआई ॥
नानक अंतु न पाईऐ बेअंत गुसाई ॥ ४ ॥ ३२ ॥ ६२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१६)

शब्दार्थ : **करजु** – कर्ज. **उतारिआ** – फेडले. **आहरु** – उद्योग. **निबहत** – निर्वाह. **अखूट** – अक्षुण्ण, न संपणारा. **कबहु** – कधीही. **बार** – वेळ, विलंब. **संचिआ** – संग्रह केला. **गुसाइ** – जगाचा स्वामी.

भावार्थ : प्रभू परमात्म्याचा प्रताप पाहून सर्व जीवजंतू सुप्रसन्न होतात. सतगुरूने परिश्रमपूर्वक माझ्या मनात प्रभुनाम दृढ केले व माझी प्रभू परमात्म्याच्या ऋणातून मुक्तता केली. ॥ १ ॥ सतगुरूने दिलेली प्रभुनाम ही अशी संपत्ती आहे की जी कितीही खाल्ली, खर्च केली, त्यावर पूर्ण आयुष्याची गुजराण केली तरी ती संपत नाही. ती अक्षुणच राहते. त्यात जराही कमतरता येत नाही. ती सामग्री सदैव भरून राहिलेली असते. ॥ १ ॥ रहाउ ॥ साधुसंतांच्या संगतीत राहून प्रभू परमात्म्याची आराधना केल्याने तो अपार नामनिधी प्राप्त होतो. मग धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारही पुरुषार्थ प्राप्त होण्यास जराही वेळ लागत नाही. ॥ २ ॥ भक्त प्रभुप्रेमरंगात मन एकाग्र करून प्रभू परमात्म्याची आराधना करतात व ज्याचा पार लागत नाही अशा अपार प्रभुनामाचा संग्रह करतात. ॥ ३ ॥ नानक सांगतात, त्या प्रभू परमात्म्याचा महिमा थोर आहे. मी त्यास शरण गेलो आहे. तो प्रभू परमात्मा अनंत आहे. त्याचा पार कोणासही लागत नाही. ॥ ४ ॥ ३२ ॥ ६२ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सिमरि सिमरि पूरन प्रभू कारज भए रासि ॥
करतारपुरि करता वसै संतन कै पासि ॥ १ ॥ रहाउ ॥
बिघनु न कोऊ लागता गुर पहि अरदासि ॥
रखवाला गोबिंद राइ भगतन की रासि ॥ १ ॥

तोटि न आवै कदे मूलि पूरन भंडार ॥
चरन कमल मनि तनि बसे प्रभ अगम अपार ॥ २ ॥
बसत कमावत सभि सुखी किछु ऊन न दीसै ॥
संत प्रसादि भेटे प्रभू पूरन जगदीसै ॥ ३ ॥
जैजैकारु सभै करहि सचु थानु सुहाइआ ॥
जपि नानक नामु निधान सुख पूरा गुरु पाइआ ॥ ४ ॥ ३३ ॥ ६३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८१६)

शब्दार्थ : **भए रासि** – सफल होते. **करतारपुरि** – करतारपूर म्हणजे सत्संग भूमी. **रखवाला** – रक्षक. **रासि** – संपत्ती. **बसत** – वस्तू. **थानु** – स्थान. **सुहाइआ** – सुंदर.

भावार्थ : त्या पूर्ण प्रभू परमात्म्याचे सदैव स्मरण केल्याने सर्व कार्ये सिद्धीस जातात. करतारपूर नगरीत म्हणजे सत्संगात कर्ता प्रभू संतजनांमध्ये वास करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरुसंगतीत राहून केलेल्या प्रभू परमात्म्याच्या प्रार्थनेमुळे कोणतीही बाधा त्रास देत नाही. तो गोविंदप्रभू हीच भक्तांची संपत्ती. तोच भक्तांचे रक्षण करतो. ॥ १ ॥ त्याचे भांडार सदैव पूर्ण भरलेले असते. त्यात कधीही काहीही कमी होत नाही. त्या अगम्य अपार प्रभू परमात्म्याचे चरणकमल तन, मनात वास करते. ॥ २ ॥ संत सज्जनांच्या संगतीत राहिल्याने सर्व सुखांची प्राप्ती होते. काहीही न्यून उरत नाही. संतांच्या कृपेने त्या जगदीशाची, त्या पूर्णप्रभूची प्राप्ती होते. ॥३॥ तो प्रभू परमात्मा ह्या सुंदर अशा करतारपूर नगरात वास करतो व सर्व लोक त्याचा जयजयकार करतात. नानक सांगतात, अशा ह्या नगरात प्रभुनामाचा जप केल्याने नामभांडार, सुख व पूर्णगुरु प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ ४ ॥ ३३ ॥ ६३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

हरि हरि हरि आराधीऐ होईऐ आरोग ॥
रामचंद की लसटिका जिनि मारिआ रोगु ॥ १ ॥ रहाउ ॥
गुरु पूरा हरि जापीऐ नित कीचै भोगु ॥
साध संगति कै वारणै मिलिआ संजोगु ॥ १ ॥
जिसु सिमरत सुखु पाईऐ बिनसै बिओगु ॥
नानक प्रभ सरणागती करण कारण जोगु ॥ २ ॥ ३४ ॥ ६४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१७)

शब्दार्थ : **होहिऐ** – होतो. **अरोगा** – निरोगी. **लसटिका** – काठी. **जापीऐ** – जप करावा. **कीचै** – कर. **वारणै** – समर्पण. **विओगु** – वियोग, विरह.

भावार्थ : हे जीवा ! सत प्रभू परमात्म्याची आराधना केल्याने सर्व रोग दूर होऊन आरोग्य प्राप्त होते. रामनामरूपी काठीने सारे रोग नष्ट होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्या पूर्णगुरूप्रभूचे स्मरण केल्याने नित्य आनंद प्राप्त होतो. मी त्या संतसंगतीवर माझे सर्वस्व समर्पित करतो. संतसंगतीमुळेच प्रभुप्राप्तीचा योग जुळून येतो. ॥१॥ प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने सुखाची प्राप्ती होते. प्रभूचा वियोग नष्ट होतो. नानक अशा प्रभुचरणी शरण गेला आहे,

की जो सर्व काही करण्यास व करवून घेण्यास समर्थ आहे. ॥ २ ॥ ३४ ॥ ६४ ॥

रागु बिलावलु महला ५ दुपदे घरु ५

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूच्या कृपेने ते प्राप्त होते.

अवरि उपाव सभि तिआगिआ दारू नामु लइआ ॥
ताप पाप सभि मिटे रोग सीतल मनु भइआ ॥ १ ॥
गुरु पूरा आराधिआ सगला दुखु गइआ ॥
राखनहारै राखिआ अपनी करि मइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
बाह पकड़ि प्रभि काढिआ कीना अपनइआ ॥
सिमरि सिमरि मन तन सुखी नानक निरभइआ ॥ २ ॥ १ ॥ ६५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८१७)

शब्दार्थ : **अवरि** – अन्य. **उपाव** – उपाय. **दारू** – औषध. **माइआ** – कृपा. **बाह** – बाहू, हात. **कीना** – केले. **अपनाइआ** – आपलासा. **नरभइआ** – निर्भय झाला.

भावार्थ : हे जीवा ! अन्य सारे उपाय सोडून तू प्रभुनामरूपी औषध घे. असे केल्याने तन, मन शांत होऊन सर्व पाप, ताप नष्ट होतील. ॥ १ ॥ पूर्णगुरूची आराधना केल्याने सगळे दु:ख नष्ट झाले. त्या रक्षणकर्त्या प्रभूने मला आपला म्हणून माझे रक्षण केले. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्या प्रभू परमात्म्याने मला हाती धरून वासना विकाराच्या मोहमायेच्या खाईतून बाहेर काढून माझा स्वीकार केला. नानक सांगतात, प्रभुनामाचे स्मरण केल्याने माझे तन, मन सुखी झाले व मी निर्भय झालो. ॥ २ ॥ १ ॥ ६५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

करु धरि मसतकि थापिआ नामु दीनो दानि ॥
सफल सेवा पारब्रहम की ता की नही हानि ॥१॥
आपे ही प्रभु राखता भगतन की आनि ॥
जो जो चितवहि साध जन सो लेता मानि ॥ १ ॥ रहाउ ॥
सरणि परे चरणारबिंद जन प्रभ के प्रान ॥
सहजि सुभाइ नानक मिले जोती जोति समान ॥ २ ॥ २ ॥ ६६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८१७)

शब्दार्थ : **थापिआ** – स्थापित केले. **राखता** – रक्षणकर्ता. **आनि** – प्रतिष्ठा. **चितवहि** – चिंतितो, इच्छा करतो. **मानि** – मान्य करतो.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने स्वत: माझ्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून मला ह्या पदावर स्थापित केले

व मला आपले नाम प्रदान केले. परब्रह्म परमात्म्याची केलेली सेवा नेहमीच फलदायी होते व जो ती सेवा करतो त्याला कधीही तोटा सहन करावा लागत नाही. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा स्वत: आपल्या भक्तांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करतो. साधुजन मनात जी जी इच्छा करतात ती ती तो पूर्ण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूचे सेवक प्रभूच्या चरणकमली शरण जातात. त्यांना प्रभू परमात्मा प्राणाहूनही प्रिय वाटतो. नानक सांगतात, अशा प्रभुसेवेमुळे सेवक सहजावस्था प्राप्त करतो व त्याची आत्मज्योत परमज्योतीत विलीन होते. ॥ २ ॥ २ ॥ ६६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

चरण कमल का आसरा दीनो प्रभि आपि ॥
प्रभ सरणागति जन परे ता का सद परतापु ॥ १ ॥
राखनहार अपार प्रभ ता की निरमल सेव ॥
राम राज रामदासपुरि कीन्हे गुरदेव ॥ १ ॥ रहाउ ॥
सदा सदा हरि धिआईऐ किछु बिघनु न लागै ॥
नानक नामु सलाहीऐ भइ दुसमनं भागै ॥ २ ॥ ३ ॥ ६७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१७)

शब्दार्थ : **दीनो** – दिला. **राखनहार** – रक्षणकर्ता. **रामदासपुरि** – अमृतसरचे पूर्वीचे नाव. **सलाहीऐ** – स्तुती करणे. **भइ** – भय.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने स्वत: मला आपल्या चरणी आश्रय दिला. प्रभूचे सेवक प्रभू परमात्म्यास शरण जातात हाही प्रभूचाच प्रताप. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा अपार आहे. तो जीवांचा रक्षणकर्ता आहे. त्याची सेवा करण्याने मन निर्मल होते. सतगुरूप्रभूने, रामरायाने रामदासपूरमध्ये रामराज्य निर्माण केले. ॥ १ ॥ रहाउ ॥ जो सदैव प्रभू परमात्म्याचे ध्यान करतो त्यास कोणतेही विघ्न बाधा देऊ शकत नाही. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याची नामद्वारा स्तुती केल्याने सर्व भय व शत्रूपीडा नष्ट होते. ॥ २ ॥ ३ ॥ ६७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मनि तनि प्रभु आराधीऐ मिलि साध समागै ॥
उचरत गुन गोपाल जसु दूर ते जमु भागै ॥ १ ॥
राम नामु जो जनु जपै अनदिनु सद जागै ॥
तंतु मंतु नह जोहई तितु चाखु न लागै ॥ १ ॥ रहाउ ॥
काम क्रोध मद मान मोह बिनसे अनरागै ॥
आनंद मगन रसि राम रंगि नानक सरनागै ॥ २ ॥ ४ ॥ ६८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१७)

शब्दार्थ : **समागै** – सत्संगाद्वारा, समागम. **उचरत** – उच्चारून. **जागै** – जागृत. **तंतु** – तंत्र. **मंतु** – मंत्र. **जोहई** – पाहणे. **तितु** – त्याला. **चाखु** – दृष्ट लागणे. **सरनागै** – शरण गेल्याने.

भावार्थ : साधुसंतांच्या संगतीत तन, मन एकाग्र करून प्रभू परमात्म्याची आराधना करावी. प्रभूच्या गुणांचे यशोगान गायल्याने यम दूर पळून जातो. ॥ १ ॥ जो प्रभुसेवक रामनामाचा जप करतो, तो सदैव जागृत असतो. अशा प्रभुसेवकावर जारण-मारणादी तंत्रामंत्राचा प्रभाव पडू शकत नाही. त्यास कोणाची दृष्टही लागत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनामाच्या स्मरणामुळे मनातील काम, क्रोध, अहंकार, मद, मोह हे पंचविकार नष्ट होतात. प्रभुकृपेने राग व द्वेषही नष्ट होतात. नानक सांगतात, जे प्रभुसेवक प्रभू परमात्म्यास शरण जातात, ते रामनामाच्या रंगात रंगून आनंदमग्न होऊन राहतात. ॥ २ ॥ ४ ॥ ६८ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

जीअ जुगति वसि प्रभू कै जो कहै सु करना ॥
भए प्रसंन गोपालराइ भउ किछु नही करना ॥ १ ॥
दूखु न लागै कदे तुधु पारब्रहमु चितारे ॥
जमकंकरु नेड़ि न आवई गुरसिख पिआरे ॥ १ ॥ रहाउ ॥
करण कारण समरथु है तिसु बिनु नही होरु ॥
नानक प्रभ सरणागती साचा मनि जोरु ॥ २ ॥ ५ ॥ ६९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१८)

शब्दार्थ : **वसि** – ताब्यात, वश. **भउ** – भय. **कदे** – कधीही. **चितारे** – स्मरण करणे. **जमकंकरु** – यमदूत. **जारु** – जोर, शक्ती.

भावार्थ : प्रत्येक जीवाला जगण्यासाठी लागणाऱ्या साऱ्या गोष्टी त्या प्रभू परमात्म्याच्या हाती आहेत. तो जे सांगेल तेच जीवास करावे लागते. प्रभू परमात्मा प्रसन्न झाल्यावर कशाचीही भीती उरत नाही. ॥१॥ परब्रह्म परमात्म्याचे स्मरण केल्याने जीवास कोणतेही दु:ख त्रास देऊ शकत नाही. यमदूत सतगुरूच्या प्रिय शिष्यांकडे फिरकतही नाहीत. ॥ १ ॥ रहाउ ॥ सर्व काही करण्यास आणि करवून घेण्यास प्रभू परमात्मा समर्थ आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणी काहीही करू शकत नाही. नानक सांगतात, प्रभू परमात्म्यास शरण गेल्याने जीवास सत्याची शक्ती प्राप्त होते. ॥ २ ॥ ५ ॥ ६९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सिमरि सिमरि प्रभु आपना नाठा दुख ठाउ ॥
बिस्राम पाए मिलि साध संगि ताते बहुड़ि न धाउ ॥ १ ॥
बलिहारी गुर आपने चरनन्ह बलि जाउ ॥
अनद सूख मंगल बने पेखत गुर गाउ ॥ १ ॥ रहाउ ॥
कथा कीरतनु राग नाद धुनि इहु बनिओ सुआउ ॥
नानक प्रभ सुप्रसंन भए बांछत फल पाउ ॥ २ ॥ ६ ॥ ७० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१८)

शब्दार्थ : **नाठा** – नष्ट झाले. **ठाउ** – स्थान. **बहुडि** – परत. **धाउ** – . **चरनन्ह** – चरणी. **पेखत** – पाहून.

धुनि – ध्वनी. सुआउ – स्वभाव. बांछत – इच्छिलेले.

भावार्थ : सदैव प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने सर्व दु:ख नाहीसे झाले. साधुसंतांच्या संगतीने मन प्रभू परमात्म्याच्या ठायी स्थिर झाले. मनात शांतता पसरली व जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्तता झाली. मी माझ्या सतगुरुचरणी सर्वस्व समर्पित करतो. त्याच्या दर्शनाने, त्याचे गुणगान केल्याने आनंद, सुख व कल्याण प्राप्त होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ आता प्रभू परमात्म्याचे कथा, कीर्तन करणे, त्याच्या प्रेमात त्याचे गुणगान गात राहणे, त्याच्या रंगात रंगून राहणे हा माझा स्वभाव बनला आहे. नानक सांगतात, अशा प्रकारे जेव्हा ईश्वर प्रसन्न होतो, तेव्हा मनोवांछित फल प्राप्त होते. ॥ २ ॥ ६ ॥ ७० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

दास तेरे की बेनती रिद करि परगासु ॥
तुम्हरी कृपा ते पारब्रहम दोखन को नासु ॥ १ ॥
चरन कमल का आसरा प्रभ पुरख गुणतासु ॥
कीरतन नामु सिमरत रहउ जब लगु घटि सासु ॥ १ ॥ रहाउ ॥
मात पिता बंधप तूहै तू सरब निवासु ॥
नानक प्रभ सरणागती जा को निरमल जासु ॥ २ ॥ ७ ॥ ७१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१८)

शब्दार्थ : बेनती – विनंती. परगासु – प्रकाशित. दोखन – दोष. नासू – नाश. गुणतासु – गुणनिधी. घटी – शरीरात. जासु – यश.

भावार्थ : हे प्रभो ! तुझ्या ह्या दासाची तुझ्या चरणी एकच विनंती आहे. माझ्या मनात प्रभुप्रेमाचा प्रकाश पसरू दे. हे परब्रह्म परमात्मा ! तुझ्या कृपेने सर्व दोष नष्ट होतात. ॥ १ ॥ हे परमपुरुषा ! हे गुणनिधे ! तुझ्या चरणकमलाचा मला आसरा लाभू दे. मी माझ्या जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत तुझे नामस्मरण करावे, तुझे गुणगान गावे. ॥ १ ॥ रहाउ ॥ तूच माझी माता, तूच माझा पिता, तूच माझा बंधू ! माझे सर्व काही तूच आहेस. ज्याचे यश निर्मल आहे अशा प्रभू परमात्म्यास नानक शरण गेला आहे. ॥ २ ॥ ७ ॥ ७१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सरब सिधि हरि गाईऐ सभि भला मनावहि ॥
साधु साधु मुख ते कहहि सुणि दासु मिलावहि ॥१॥
सूख सहज कलिआण रस पूरै गुरि कीन्ह ॥
जीअ सगल दइआल भए हरि हरि नामु चीन्ह ॥ १ ॥ रहाउ ॥
पूरि रहिओसरबं महि प्रभ गुणी गहीर ॥
नानक भगत अनंद मैं पेखि प्रभ की धीर ॥ २ ॥ ८ ॥ ७२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१८)

शब्दार्थ : सिधि – सिद्धी. मनावही – मानतात, इच्छितात. मिलावहु – भेटण्यासाठी, प्राप्त करण्यासाठी.

किन्ह – केले. चिन्ह – चिंतन. पेखि – पाहून. धीर – धैर्य.

भावार्थ : सर्वसिद्धीदात्या प्रभूचे गुणगान केल्याने कल्याण होते. सर्वांची हीच इच्छा असते. मुखाने साधुसंतांनी दिलेल्या प्रभुनामाचा उच्चार केल्याने, श्रवण केल्याने प्रभुसेवकाचे प्रभू परमात्म्याशी मिलन होते. ॥१॥ पूर्णगुरूने सहजसुख व कल्याण केले. प्रभुनामाचे चिंतन करून सर्व जीव दयाळू होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो गुणगंभीर प्रभू सर्वत्र पूर्णरूपाने वास करतो. नानक सांगतात, सर्व लोक प्रभुदर्शनाने धैर्य प्राप्त करून आनंदित होतात.॥२॥८॥७२॥

॥ बिलावलु महला ५ ॥

अरदासि सुणी दातारि प्रभि होए किरपाल ॥
राखि लीआ अपना सेवको मुखि निंदक छारु ॥ १ ॥
तुझहि न जोहै को मीत जन तूं गुर का दास ॥
पारब्रहमि तू राखिआ दे अपने हाथ ॥ १ ॥ रहाउ ॥
जीअन का दाता एकु है बीआ नही होरु ॥
नानक की बेनंतीआ मै तेरा जोरु ॥ २ ॥ ९ ॥ ७३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१८)

शब्दार्थ : अरदासि – प्रार्थना. दातारि – देणारा, दाता. छारु – राख. जोहै – वाईट नजर. बीआ – . जोरु – शक्ती.

भावार्थ : त्या दात्या प्रभूने कृपापूर्वक माझी प्रार्थना ऐकली व आपल्या सेवकाची लाज राखली व निंदकांच्या तोंडात राख घातली. ॥ १ ॥ हे जीवा ! तू प्रभूचा दास झाल्यावर तुझ्याकडे वाईट नजरेने कोणीही पाहू शकत नाही. तो परब्रह्म परमात्मा स्वत: हाती धरून आपल्या सेवकाचे रक्षण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ जीवनदान देणारा एकमेव प्रभू परमात्मा आहे. अन्य कोणी नाही. नानक प्रभूस विनंती करतात, की हे प्रभो ! तूच माझे सामर्थ्य आहेस. मला केवळ तुझाच आधार आहे. ॥ २ ॥ ९ ॥ ७३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मीत हमारे साजना राखे गोविंद ॥
निंदक मिरतक होइ गए तुम्ह होहु निचिंद ॥ १ ॥ रहाउ ॥
सगल मनोरथ प्रभि कीए भेटे गुरदेव ॥
जै जैकारु जगत महि सफल जा की सेव ॥ १ ॥
ऊच अपार अगनत हरि सभि जीअ जिसु हाथि ॥
नानक प्रभ सरणागती जत कत मेरै साथि ॥ २ ॥ १० ॥ ७४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१८)

शब्दार्थ : मीत – मित्र. मिरतक – मृतवत. होहू – व्हा. निचिंद – निश्चिंत. अगनत – अगणित.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने माझ्या मित्रांचे, सवंगड्यांचेही रक्षण केले व निंदकांना मारून टाकले व मला निश्चिंत केले. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूने माझी सतगुरूशी भेट करून देऊन माझे सर्व मनोरथ पूर्ण केले. ज्याची सेवा सफल झाली, त्याचा साऱ्या जगात जयजयकार होतो. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा सर्वश्रेष्ठ आहे. अपार आहे. अगम्य आहे. सारे जीव त्याच्याच कृपेने जीवन जगतात. नानक सांगतात, मी प्रभू परमात्म्यास शरण गेलो आहे. मी जेथे असतो तेथे तो माझ्या संगती असतो. ॥ २ ॥ १० ॥ ७४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

गुरु पूरा आराधिआ होए किरपाल ॥
मारगु संति बताइआ तूटे जम जाल ॥ १ ॥
दूख भूख संसा मिटिआ गावत प्रभ नाम ॥
सहज सूख आनंद रस पूरन सभि काम ॥ १ ॥ रहाउ ॥
जलनि बुझी सीतल भए राखे प्रभि आप ॥
नानक प्रभ सरणागती जा का वड परताप ॥ २ ॥ ११ ॥ ७५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१९)

शब्दार्थ : **बताइआ** – दाखवला. **संसा** – संशय, शंका. **काम** – कार्य.

भावार्थ : जेव्हा संतांनी मला प्रभुभक्तीचा मार्ग दाखवला व मी जेव्हा त्यानुसार प्रभू परमात्म्याची आराधना केली, तेव्हा तो प्रभू माझ्यावर कृपावंत होऊन त्याने माझी यमपाशातून सुटका केली. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्याचे नामस्मरण केल्याने सर्व दुःख, विकारांची भूक, संशय सारे काही नष्ट होतात. सर्व कार्य सिद्धीस जातात व प्रेमपूर्ण आनंद, सुख व सहजावस्था प्राप्त होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा स्वत: अशा जीवाचे रक्षण करतो, त्यामुळे त्याचा भवाग्नी विझून जाऊन तन, मन शांत होते. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याचा प्रताप महान आहे. त्यास शरण जावे. ॥ २ ॥ ११ ॥ ७५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

धरति सुहावी सफल थानु पूरन भए काम ॥
भउ नाठा भ्रमु मिटि गइआ रविआ नित राम ॥ १ ॥
साध जना कै संगि बसत सुख सहज बिस्राम ॥
साई घड़ी सुलखणी सिमरत हरि नाम ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रगट भए संसार महि फिरते पहनाम ॥
नानक तिसु सरणागती घट घट सभ जान ॥ २ ॥ १२ ॥ ७६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१९)

शब्दार्थ : **सुहावी** – सुंदर. **रतनु** – स्थान. **रविआ** – रंगून जाणे. **साई** – तीच. **सुलखणी** – सुलक्षणी, **शुभ. पहनाम** – गुप्तपणे.

भावार्थ : जेथे प्रभुनामाचा जप होतो ती धरती, ते स्थान सुंदर होय. नित्य प्रभुनामात रममाण झाल्याने भ्रम, भय नष्ट होते व कार्य सफल होते. ॥ १ ॥ साधुसंतांच्या संगतीत राहिल्याने विश्राम, सुख व सहजावस्था प्राप्त होते. ज्या वेळी प्रभुनामाचे स्मरण केले जाते. तीच वेळ शुभवेळ होय. ॥ १ ॥ रहाउ ॥ जे कधी कोणाच्या खिजगणतीतही नव्हते, कोणास माहीतही नव्हते, ते प्रभुनामामुळे जगविख्यात झाले. नानक सांगतात, जो सर्व जीवांच्या अंतरीची व्यथा जाणतो त्या प्रभू परमात्म्यास मी शरण गेलो आहे. ॥ २ ॥ १२ ॥ ७६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

रोगु मिटाइआ आपि प्रभि उपजिआ सुखु सांति ॥
वड परतापु अचरज रूपु हरि कीन्ही दाति ॥ १ ॥
गुरि गोविंदि क्रिपा करी राखिआ मेरा भाई ॥
हम तिस की सरणागती जो सदा सहाई ॥ १ ॥ रहाउ ॥
बिरथी कदे न होवई जन की अरदासि ॥
नानक जोरु गोविंद का पूरन गुणतासि ॥ २ ॥ १३ ॥ ७७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१९)

शब्दार्थ : **मिटाइआ** – नष्ट केले. **उपजिआ** – उत्पन्न केले. **कीन्ही** – केले. **सहाई** – साहाय्यकर्ता. **बिरथी** – व्यर्थ. **जोरु** – शक्ती, बळ. **गुणतासि** – गुणनिधी.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने स्वत: माझ्या मनातील भवरोग दूर करून तेथे सुख व शांती निर्माण केली. त्या प्रभू परमात्म्याचा प्रताप आश्चर्यकारक आहे. तोच सर्वांना सर्व काही देत असतो. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्याने कृपावंत होऊन माझ्या सत्संगी बांधवांचेही रक्षण केले आहे. जो सदैव साहाय्य करतो अशा प्रभू परमात्म्यास मी शरण गेलो आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुसेवकांनी प्रभू परमात्म्याची केलेली प्रार्थना, विनवणी कधीही वाया जात नाही. नानक सांगतात, तो पूर्णपुरुष गुणनिधी परमात्मा हीच माझी शक्ती आहे. तोच माझा आधार आहे.॥२॥१३॥७७॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मरि मरि जनमे जिन बिसरिआ जीवन का दाता ॥
पारब्रहमु जनि सेविआ अनदिनु रंगि राता ॥ १ ॥
सांति सहजु आनदु घना पूरन भई आस ॥
सुखु पाइआ हरि साध संगि सिमरत गुणतास ॥ १ ॥ रहाउ ॥
सुणि सुआमी अरदासि जन तुम्ह अंतरजामी ॥
थान थनंतरि रवि रहे नानक के सुआमी ॥ २ ॥ १४ ॥ ७८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१९)

शब्दार्थ : **बिसरिआ** – विसरला. **आस** – आशा, मनीषा.

भावार्थ : जो जीव प्रभू परमात्म्यास विसरला तो वारंवार जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतो. जो प्रभू परमात्म्याची सेवा करतो तो रात्रंदिवस प्रभूच्या प्रेम रंगात रंगून जातो. ॥ १ ॥ साधूसंतांच्या संगतीत गुणनिधी प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने आत्मिक सुखाची प्राप्ती होते. शांती व आनंद प्राप्त होतो. सहजावस्थेचा लाभ होऊन मनाच्या सर्व आशा पूर्ण होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे स्वामी प्रभू ! तू अंतर्यामी आहेस. तू आपल्या भक्तांची प्रार्थना ऐकतोस व त्यांच्यावर कृपा करतोस. नानक माझा स्वामी सर्व स्थानी, संपूर्ण सृष्टीत व्याप्त आहे.॥ २ ॥ ४ ॥ ७८ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

ताती वाउ न लगई पारब्रहम सरणाई ॥
चउगिरद हमारै रामकार दुखु लगै न भाई ॥ १ ॥
सतिगुरु पूरा भेटिआ जिनि बणत बणाई ॥
राम नामु अउखधु दीआ एका लिव लाई ॥ १ ॥ रहाउ ॥
राखि लीए तिनि रखनहारि सभ बिआधि मिटाई ॥
कहु नानक किरपा भई प्रभ भए सहाई ॥ २ ॥ १५ ॥ ७९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१९)

शब्दार्थ : **ताती वाउ** – तप्त हवा, दु:ख कष्ट. **चउगिरद** – चारही बाजूस. **रामकार** – रामाचे रक्षाकवच, रामरेषा. **बणत बनाई** – सृष्टीची रचना केली. **अउखद** – औषध. **बिआधि** – व्याधी.

भावार्थ : प्रभू परमात्म्यास शरण गेल्याने मोहमायेचा, वासनाविकारांचा ताप सहन करावा लागत नाही. चोहोबाजूस रामाचे संरक्षक कवच लाभल्याने ती रामरेषा ओलांडून दु:ख, जीवास स्पर्श करू शकत नाही. ॥ १ ॥ सतगुरूने माझे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवून आणले. त्या प्रभूनेच ह्या सृष्टीची रचना केली आहे. सतगुरूने मला रामनामरूपी औषध दिले. ज्यायोगे माझे चित्त प्रभूशी एकरूप झाले. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्या रक्षणकर्त्या प्रभूने माझे रक्षण केले आहे. त्यामुळे माझ्या सर्व व्याधी नष्ट झाल्या. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याची कृपा प्राप्त झाली की तो जीवास सर्व प्रकारे साहाय्य करतो. ॥ २ ॥ १५ ॥ ७९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

अपणे बालक आपि रखिअनु पारब्रहम गुरदेव ॥
सुख सांति सहज आनद भए पूरन भई सेव ॥ १ ॥ रहाउ ॥
भगत जना की बेनती सुणी प्रभि आपि ॥
रोग मिटाई जीवालिअनु जा का वड परतापु ॥ १ ॥
दोख हमारे बखसिअनु अपणी कल धारी ॥
मन बांछत फल दितिअनु नानक बलिहारी ॥ २ ॥ १६ ॥ ८० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८१९)

शब्दार्थ : **अपणे** – आपल्या. **जीवालिअनु** – जीवन दिले. **बखसिअनु** – क्षमा केली. **दितिअनु** – दिले.

भावार्थ : परब्रह्म परमात्म्याने स्वत: आपल्या बालकाचे रक्षण केले व त्यास सुख, शांती व आनंद प्रदान करून त्याची सेवा सफल केली. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्म्याने आपल्या भक्तांची विनंती ऐकून आपल्या सामर्थ्याने त्यांचे भवरोग दूर करून त्यांना आत्मिक जीवन प्रदान केले. ॥ १ ॥ आपल्या शक्तीने प्रभूने आमच्या साऱ्या दोषांना क्षमा करून आम्हास मनोवांछित फल प्रदान केले. नानक प्रभुचरणी आपले सर्वस्व समर्पित करतो.॥२॥१६॥८०॥

रागु बिलावलु महला ५ चउपदे दुपदे घरु ६

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

मेरे मोहन स्रवनी इह न सुनाए ॥
साकत गीत नाद धुनि गावत बोलत बोल अजाए ॥ १ ॥ रहाउ ॥
सेवत सेवि सेवि साध सेवउ सदा करउ किरताए ॥
अभै दानु पावउ पुरख दाते मिलि संगति हरि गुण गाए ॥ १ ॥
रसना अगह अगह गुन राती नैन दरस रंगु लाए ॥
होहु क्रिपाल दीन दुख भंजन मोहि चरण रिदै वसाए ॥ २ ॥
सभहू तलै तलै सभ ऊपरि एक द्रिसटि द्रिसटाए ॥
अभिमानु खोइ खोइ खोइ खोई हउ मोकउ सतिगुर मंत्रु द्रिडाए ॥ ३ ॥
अतुलु अतुलु अतुलु नह तुलीऐ भगति वछलु किरपाए ॥
जो जो सरणि परिओ गुर नाकन अभै दानु सुख पाए ॥ ४ ॥ १ ॥ ८१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२०)

शब्दार्थ : **स्रवनी** – कानांनी. **धुनि** – ध्वनी. **अजाए** – व्यर्थ. **किरताए** – कार्य. **अगह** – अगाध. **होहु** – झाला. **तलै** – तळाला. **हउ** – अहंकार. **मोकउ** – मला, माझ्या मनात.

भावार्थ : हे मोहन प्रभू ! माझ्यावर कृपा कर. प्रभूपासून दूर गेलेल्या मोहमायेत निमग्न झालेल्या पापी लोकांचे बोल, गीत, अभद्र नादध्वनी माझ्या कानी कधीही पडू देऊ नकोस. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी साधुसंतांची सेवा करावी. पुन:पुन्हा त्यांच्या सेवेत रममाण होऊन राहावे हेच माझे जीवित कार्य व्हावे. मी संतजनांच्या संगतीत राहून प्रभूचे गुणगान गाऊन त्या परमपुरुषाकडून अभयपद प्राप्त करावे. ॥ १ ॥ माझी जिव्हा प्रभुगुण गाण्यात रंगून जावी. डोळे प्रभुदर्शनात रंगून जावेत. हे दीनांचे दु:ख हरण करणाऱ्या प्रभू माझ्यावर कृपा कर. माझ्या हृदयात तुझ्या चरणांचा वास व्हावा. ॥ २ ॥ हे प्रभो ! मी अत्यंत नम्र व्हावे. निचाहून नीच व्हावे. सर्वांच्या पदतली राहावे अशी दृष्टी मला दे. त्यामुळे माझ्यातील अहंकार नष्ट होईल व सतगुरूने दिलेला नाममंत्र दृढ होईल. ॥ ३ ॥ हे प्रभो ! तू अतुल्य आहेस. तुझी अन्य कोणाशीही तुलनाच होऊ शकत नाही. तू भक्तवत्सल आहेस, कृपाळू आहेस. नानक सांगतात, जो जो प्रभू परमात्म्यास शरण गेला त्यास प्रभूने अभयदान दिले व त्यामुळे त्यास सुख प्राप्त झाले. ॥ ४ ॥ १ ॥ ८१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

प्रभ जी तू मेरे प्रान अधारै ॥
नमसकार डंडउति बंदना अनिक बार जाउ बारै ॥ १ ॥ रहाउ ॥
ऊठत बैठत सोवत जागत इहु मनु तुझहि चितारै ॥
सूख दूख इसु मन की बिरथा तुझ ही आगै सारै ॥ १ ॥
तू मेरी ओट बल बुधि धनु तुम ही तुमहि मेरै परवारै ॥
जो तुम करहु सोई भल हमरै पेखि नानक सुख चरनारै ॥ २ ॥ २ ॥ ८२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२०)

शब्दार्थ : **डंडउति** – दंडवत. **चितारै** – चिंतन करणे. **सारै** – सांगतो. **ओट** – आश्रय,आधार. **परवारै** – परिवार. **चरनारै** – चरण.

भावार्थ : हे प्रभू ! तूच माझा प्राणाधार आहेस. मी वारंवार दंडवत घालून, नमस्कार घालून तुला वंदन करतो. तुझ्यावर माझ्या प्राणांची कुरवंडी करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ उठता, बसता, झोपेत, जागेपणी सदैव मी तुझेच चिंतन करतो. माझ्या मनीचे सुख–दु:ख, माझ्या मनीची व्यथा हे प्रभो, मी तुझ्याचपाशी सांगतो. ॥ २ ॥ हे प्रभू तूच माझे आश्रयस्थान आहेस. माझे बल, बुद्धी, धन सारे सारे तूच आहेस. तूच माझा परिवार आहेस. तुझ्याशिवाय माझे कोणीही नाही. तू जे काही करतोस ते चांगलेच आहे. अशी माझी दृढ श्रद्धा आहे. नानक सांगतात, हे प्रभो ! तुझ्या चरणदर्शनातच माझे सुख साठविलेले आहे. ॥ २ ॥ २ ॥ ८२ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सुनीअत प्रभ तउ सगल उधारन ॥
मोह मगन पतित संगि प्रानी ऐसे मनहि बिसारन ॥ १ ॥ रहाउ ॥
संचि बिखिआ ले ग्राहजु कीनी अंम्रितु मन ते डारन ॥
काम क्रोध लोभ रतु निंदा सतु संतोखु बिदारन ॥ १ ॥
इन ते काढि लेहु मेरे सुआमी हारि परे तुम्ह सारन ॥
नानक की बेनंती प्रभ पहि साध संगि रंक तारन ॥ २ ॥ ३ ॥ ८३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२०)

शब्दार्थ : **सुनिअत** – ऐकतो. **बिसारन** – विसरलो. **संचि** – संचय केला. **बिखिआ** – विष. **ग्राहजु** – ग्रहण करून. **डारन** – टाकून दिले. **रतु** – रंगून गेलो. **बिदारन** – नष्ट करणे. **काढि** – बाहेर काढ. **हारि** – पराभूत होऊन. **सारन** – शरण. **रंक** – कंगाल, आत्मिकदृष्ट्या भिकारी.

भावार्थ : हे प्रभो ! तू सगळ्या जीवांचा उध्दार करतोस असे मी ऐकून आहे. मी मोहमग्न होऊन पतित लोकांच्या संगतीत रममाण होऊन गेलो. माझ्या मनास हे प्रभो तुझा विसर पडला. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी सदैव विषरूपी मायेचा संग्रह केला. प्रभुनामामृत सोडून मायारूपी विषच ग्रहण करण्यायोग्य मानले. काम, क्रोध, लोभात रंगून सदैव परनिंदाच करत राहिलो. मी आपल्या करणीनेच सत्य, संतोषास दूर लोटले. ॥ १ ॥ हे स्वामी ! मी पूर्णपणे हरून तुला शरण आलो आहे. मला ह्या कर्मातून बाहेर काढ. नानक सांगतात, हे प्रभो ! माझी तुझ्या चरणी एक विनंती आहे, की माझ्यासारख्या रंकास साधुसंतांची संगत प्राप्त करून देऊन मला ह्या भवसागरातून तारून ने.॥२॥३॥८३॥

॥ बिलावलु महला ५ ॥

संतन कै सुनीअत प्रभ की बात ॥
कथा कीरतनु आनंद मंगल धुनि पूरि रही दिनसु अरू राति ॥ १ ॥ रहाउ ॥
करि किरपा अपने प्रभि कीने नामु अपुने की कीनी दाति ॥
आठ पहर गुन गावत प्रभ के काम क्रोध इसु तन ते जात ॥ १ ॥
त्रिपति अघाए पेखि प्रभ दरसनु अंम्रित हरि रसु भोजनु खात ॥
चरन सरन नानक प्रभ तेरी करि किरपा संत संगि मिलता ॥ २ ॥ ४ ॥ ८४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२०)

शब्दार्थ : **कै** – कडून. **इसु** – ह्या. **त्रिपति** – तृप्ती. **अघाए** – पूर्णपणे. **खात** – खातात. **मिलात** – मिलन.

भावार्थ : संतांकडून प्रभूच्या गोष्टी ऐकायला मिळतात. त्याच्या संगतीत सदैव प्रभू परमात्म्याच्या कथा–कीर्तनाचा मंगलध्वनी व आनंद दुमदुमत राहतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्म्याने माझा स्वीकार करून मला आपल्या नामाचे दान दिले. आता मी अष्टौप्रहर प्रभू परमात्म्याचे गुण गातो, त्यामुळे ह्या तन, मनातील कामक्रोध आदी विकार नष्ट होतात. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्याच्या दर्शनाने मन पूर्णपणे तृप्त होऊन हरिरसामृताचे भोजन करतो. नानक म्हणतात, हे प्रभो ! मी तुझ्या चरणी शरण आलो आहे. माझ्यावर तू कृपा कर व मला साधुसंतांची संगत प्राप्त करून दे. ॥ २ ॥ ४ ॥ ८४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

राखि लीए अपने जन आप ॥
करि किरपा हरि हरि नामु दीनो बिनसि गए सभ सोग संताप ॥ १ ॥ रहाउ ॥
गुण गोविंद गावहु सभि हरि जन राग रतन रसना आलाप ॥
कोटि जनम की त्रिसना निवरी राम रसाइणि आतम ध्राप ॥ १ ॥
चरण गहे सरणि सुखदाते गुर कै बचनि जपे हरि जाप ॥
सागर तरे भरम भै बिनसे कहु नानक ठाकुर परताप ॥ २ ॥ ५ ॥ ८५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२१)

शब्दार्थ : **सोग** – शोक. **राग** – गायनातील राग. **रतन** – रत्न. **निवरी** – नष्ट झाली. **ध्राप** – तृप्त. **गहे** – ग्रहण करणे. **भै** – भय.

भावार्थ : प्रभूने आपल्या सेवकांचे स्वतः रक्षण केले. त्याने सेवकांवर कृपा करून त्यांना हरिनाम प्रदान केले त्यामुळे त्यांचा सर्व शोक संताप नष्ट झाला. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूचे सर्व सेवक हो, तुम्ही प्रभू परमात्म्याचे गुणगान करा. आपल्या जिव्हेद्वारा निरनिराळ्या रागरूपी रत्नांनी प्रभुगीते आळवा. रामनामरूपी रसायनाने माझा आत्मा तृप्त झाला आहे. माझी कोटी जन्माची तृष्णा निमाली आहे. ॥ १ ॥ सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभुनामाचा जप करून त्या सुखदात्या प्रभूस शरण जाऊन त्याचे चरण घट्ट धरून ठेवले. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याच्या प्रतापाने माझे सर्व भय, भ्रम नष्ट झाले व मी भवसागर तरून गेलो. ॥ २ ॥ ५ ॥ ८५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

तापु लाहिआ गुर सिरजनहारि ॥
सतिगुर अपने कउ बलि जाई जिनि पैज रखी सारै संसारि ॥ १ ॥ रहाउ ॥
करू मसतकि धारि बालिकु रखि लीनो ॥
प्रभि अंम्रित नामु महा रसु दीनो ॥ १ ॥
दास की लाज रखै मिहरवानु ॥
गुरु नानकु बोलै दरगह परवानु ॥ २ ॥ ६ ॥ ८६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८२१)

शब्दार्थ : **बोलै** – बोलतो. **परवानु** – स्वीकृत होते.

भावार्थ : त्या सृजनकर्त्या प्रभूने गुरुद्वारा भवताप दूर केला. ज्या सतगुरूने माझी संसारात लाज राखली, त्या सतगुरूवर मी माझे सर्वस्व अर्पण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्म्याने ह्या बालकाच्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेवून त्याचे रक्षण केले व त्यास प्रभुनामामृत पाजले. ॥ १ ॥ प्रभूने कृपावंत होऊन आपल्या सेवकांची लाज राखली. नानक सांगतात, सतगुरूचा प्रत्येक बोल प्रभू दरबारी स्वीकृत होतो. ॥ २ ॥ ६ ॥ ८६ ॥

रागु बिलावलु महला ५ चउपदे दुपदे घरू ७

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

सतिगुर सबदि उजारो दीपा ॥
बिनसिओ अंधकार तिह मंदरि रतन कोठड़ी खुल्ही अनूपा ॥ १ ॥ रहाउ ॥
बिसमन बिसम भए जउ पेखिओ कहनु न जाए वडिआई ॥
मगन भए ऊहा संगि माते ओति पोति लपटाई ॥ १ ॥
आल जाल नही कछू जंजारा अहंबुधि नही भोरा ॥
ऊचन ऊचा बीचु न खीचा हउ तेरा तूं मोरा ॥ २ ॥

एकाकरू एकु पासारा एकै अपर अपारा ॥
एकु बिसथीरनु एकु संपूरनु एकै प्रान अधारा ॥ ३ ॥
निरमल निरमल सूचा सूचो सूचा सूचो सूचा ॥
अंत न अंता सदा बेअंता कहु नानक ऊचो ऊचा ॥ ४ ॥ १ ॥ ८७ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८२१)

शब्दार्थ : **उजारो** – प्रकाशित झाला. **बिनसिओ** – विनाश झाला. **खुल्ही** – उघडली. **बिसमन** – आश्चर्यचकित. **जड** – जेव्हा. **पोखिओ** – पाहिले. **ऊहा** – त्याचा. **ओति पाति** – ओतप्रोत. **आल जाल** – संसाराचा पाश. **जंजारा** – जंजाल. **भोरा** – लवमात्रही. **बीचु** – मध्ये. **एकंकारू** – एकमेव प्रभू. **बिसथीरनु** – विस्तीर्ण. **संपूरनु** – संपूर्ण. **एकै** – एकमेव. **सूचा** – पवित्र.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे माझ्या अंतःकरणातील अज्ञान, अंधकार नष्ट झाला व हृदयमंदिरातील अमूल्य प्रभुनामरूपी रत्नांची तिजोरी उघडली गेली. ॥ १ ॥ रहाउ ॥ परमात्म्याच्या दर्शनाने मन आश्चर्यचकित झाले. त्या आश्चर्याचे, त्या प्रभूचे वर्णन शब्दात सांगणे अशक्य आहे. माझे मन त्याच्या संगतीत पूर्णपणे लिप्त झाले आहे. ॥ १ ॥ आता माझ्या मनावर सांसारिक गोष्टींचा जराही प्रभाव पडत नाही. कारण माझ्या मनात जराही अहंकार शिल्लक उरला नाही. मी तुझाच आहे व तू माझाच आहेस. तू व मी एकरूप झालो आहोत. ॥२॥ तो प्रभू परमात्मा एकमेव आहे. ही सृष्टी म्हणजे त्या एकमेव परमात्म्याचाच पसारा आहे, व सर्वत्र तो एकच अपार प्रभू पसरलेला आहे. तो प्रभू परमात्मा विस्तारित असला तरी एकच व संपूर्ण आहे. तो एकमेव प्रभू सर्व जीवांचा प्राणाधार आहे. ॥ ३ ॥ तो निर्मलाहून निर्मल व पावित्र्याहून पवित्र आहे. त्यास अंत नाही. तो अनंत आहे. नानक सांगतात, तो सर्वश्रेष्ठ आहे.॥ ४ ॥ १ ॥ ८७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

बिनु हरि कामि न आवत हे ॥
जा सिउ राचि माचि तुम्ह लागे ओह मोहनी मोहावत हे ॥ १ ॥ रहाउ ॥
कनिक कामिनी सेज सोहनी छोडि खिनै महि जावत हे ॥
उरझि रहिओ इंद्री रस प्रेरिओ बिखै ठगउरी खावत हे ॥ १ ॥
त्रिण को मंदरू साजि सवारिओ पावकु तलै जरावत हे ॥
ऐसे गड़ महि ऐठि हठीलो फूलि फूलि किआ पावत हे ॥ २ ॥
पंच दूत मूड परि ठाढे केस गहे फेरावत हे ॥
द्रिसटि न आवहि अंध अगिआनी सोइ रहिओ मद मावत हे ॥ ३ ॥
जालु पसारि चोग बिसथारी पंखी जिउ फाहावत हे ॥
कहु नानक बंधन काटन कउ मै सतिगुरू पुरखु धिआवत हे ॥ ४ ॥ २ ॥ ८८ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८२१)

शब्दार्थ : **राचि** – . **माची** – . **ओह** – तो. **मोहावत** – मोहावश. **सोहनि** – सुंदर. **उरझी** – गुंतून पडला. **प्रेरिओ** – प्रेरित. **विखै** – विषयविकार. **ठकऊरी** – विषारी औषधी. **त्रिण** – तृण, गवत. **पावकु** – अग्नी. **जराबत** – पेटवतो. **ऐठी** – ऐठीत. **हठीलो** – हट्टाने. **पावत** – प्राप्त. **मूड** – मुंडक्यावर. **ठाढे** – उभे. **फेरावत** – फिरवतो. **जालु** – जाळे. **चोग** – आमिष. **फाहावत** – फसवतो

भावार्थ : ह्या जगात प्रभुशिवाय अन्य काहीही कामाचे नाही. हे जीवा ! तू ज्या ज्या गोष्टीत रममाण झाला आहेस, ते सारे तुला मोहमायेच्या पाशात अडकवत आहेत. ॥ १ ॥ रहाउ ॥ कनक, कामिनी, सुंदर शय्या हे सर्व क्षणात सोडून जावे लागणार आहे. हे जीवा ! इंद्रियांच्या विकारात विषयविकाराने प्रेरित होऊन तू गुंतून पडला आहेस. हे म्हणजे विषाची मुळी खाण्यासारखे आहे. अरे वेड्या तू गवताचे मंदिर बांधून त्याखाली अग्नी प्रदीप्त केला आहेस व त्यात ऐटीत हट्टाने बसला आहेस. अशाने काय प्राप्त होणार आहे ? केवळ सर्वनाश. पंचविकार तुझ्या डोक्यावर उभे आहेत. तुझे केस धरून ते तुला फरफटत नेत आहेत. अरे अंधळ्या अडाण्या ! हे तुझ्या कसे लक्षात येत नाही. तू त्या विकारातच मस्त होऊन राहिला आहेस ! ज्याप्रकारे पारधी जाळे पसरून त्याखाली आमिष टाकून पक्ष्यांना फसवून पकडतो. त्याप्रमाणे ह्या मोहमायेने तुला आपल्या जाळ्यात पकडले आहे. नानक सांगतात, हे मोहमायेचे बंधन तोडण्यासाठीच मी त्या परमपुरूषाचे, प्रभू परमात्म्याचे ध्यान करतो. ॥४॥२॥८८॥

॥ बिलावलु महला ५ ॥

हरि हरि नामु अपार अमोली ॥
प्रान पिआरो मनहि अधारो चीति चितवउ जैसे पान तंबोली ॥ १ ॥ रहाउ ॥
सहजि समाइओ गुरहि बताइओ रंगि रंगी मेरे तन की चोली ॥
प्रिअ मुखि लागो जउ वडभागो सुहागु हमारो कतहु न डोली ॥ १ ॥
रूप न धूप न गंध न दीपा ओति पोति अंग अंग संगि मउली ॥
कहु नानक प्रिअ रवी सुहागनि अति नीकी मेरी बनी खटोली ॥ २ ॥ ३ ॥ ८९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२२)

शब्दार्थ : **अमोली** – अमूल्य. **पिआरो** – प्रिय. **चीति** – चित्त. **चितवड** – चिंतन करणे. **तंबोली** – तांबोली. **कतहु** – कधीही. **डोली** – डळमळीत होणे. **रवी** – रममाण. **नीकी** – सुंदर. **खटोली** – शय्या.

भावार्थ : प्रभुनाम हे अपार व अमोल आहे. हे हरिनाम मला प्राणाहूनही प्रिय, माझ्या मनाचा तो एकमेव आधार आहे. मी आपल्या चित्तात त्याचे असे चिंतन करतो जसे तांबोळी सदैव आपली पाने हलवीत ठेवतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरूकडून शिक्षा प्राप्त करून मी सहजावस्थेत सामावून गेलो आहे व माझे मनरूपी वस्त्र प्रभुप्रेमरंगाने रंगले आहे. जेव्हा माझे महाभाग्य उदयाला आले, तेव्हा मी माझ्या प्रिय पतीस सन्मुख झाले. आता माझे सौभाग्य कधीही ढळणार नाही. ॥ १ ॥ माझ्या जवळ ना रूप, ना धूप, ना सुगंध, ना दीपक, प्रभुपूजेचे कोणतेही साहित्य नाही व मला त्याची जरुरीही नाही. कारण मी आता त्याच्याशी एकरूप होऊन गेले आहे. नानक सांगतात, तो प्रभुपती माझ्याशी सौभाग्यशालिनीशी रममाण आहे. माझी शरीररूपी शय्या आता सुंदर झाली आहे.॥२॥३॥८९॥

॥ बिलावलु महला ५ ॥

गोबिंद गोबिंद गोबिंद मई ॥
जब ते भेटे साध दइआरा तब ते दुरमति दूरि भई ॥ १ ॥ रहाउ ॥
पूरन पूरि रहिओ संपूरन सीतल सांति दइआल दई ॥
काम क्रोध त्रिसना अहंकारा तन ते होए सगल खई ॥ १ ॥
सतु संतोखु दइआ धरमु सुचि संतन ते इहु मंतु लई ॥
कहु नानक जिनि मनहु पछानिआ तिन कउ सगली सोझ पई ॥ २ ॥ ४ ॥ ९० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२२)

शब्दार्थ : **गोबिंद मई** – गोविंदमय. **दइआरा** – दयाळू. **जब** – जेव्हा. **तब** – तेव्हा. **भइ**–झाली, गेली. **दई** – दीप्तिमान, प्रकाशमान. **खई** – नष्ट. **सतु** – सत्य. **सुचि** – पवित्रता. **मंतु** – मंत्र. **लई** – घेतला. **सोझ** – ज्ञान. **पई** – प्राप्त झाले.

भावार्थ : मी गोविंद गोविंद असा प्रभुनामाचा जप करता करता गोविंदरूप झालो. मला जेव्हा दयाळू साधू भेटला तेव्हा माझी दुर्बुद्धी दूर पळाली. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो पूर्ण प्रभू संपूर्णपणे माझ्यात एकरूप झाल्याने माझ्या मनास त्या प्रकाशमान परमात्म्याने शीतल शांती प्रदान केली. आता माझ्यातून काम, क्रोध, अहंकार आदी विकार नष्ट झाले. ॥ १ ॥ मला संतांकडून सत्य, संतोष, दया, धर्म, पावित्र्य ह्याचा मंत्र प्राप्त झाला आहे हे ज्याने ओळखले त्यास सारे ज्ञान प्राप्त झाले. ॥ २ ॥ ४ ॥ ९० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

किआ हम जीउ जंत बेचारे बरिन न साकह एक रोमाई ॥
ब्रहम महेस सिध मुनि इंद्रा बेअंत ठाकुर तेरी गति नही पाई ॥ १ ॥
किआ कथीऐ किछु कथनु न जाई ॥
जह जह देखा तह रहिआ समाई ॥ १ ॥ रहाउ ॥
जह महा भइआन दूख जम सुनीऐ तह मेरे प्रभ तूहै सहाई ॥
सरनि परिओ हरि चरन गहे प्रभ गुरि नानक कउ बूझ बुझाई ॥ २ ॥ ५ ॥ ९१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२२)

शब्दार्थ : **किआ** – काम. **वरनि** – वर्णन. **साकह** – शक्य. **रोमाई** – केस(अंगावरील रोम). **कथिऐ**– सांगावे. **भइआन** – भयाण. **सहाई** – साहाय्यकता.

भावार्थ : आम्ही बिचारे जीव प्रभू परमात्म्याचे काय वर्णन करणार ? ते अशक्य आहे. आम्ही त्याच्या एका केसाचेही वर्णन करू शकत नाही. हे अनंत प्रभू, ब्रह्मा, महेश, सिद्ध मुनी, इंद्र कोणासही तुझे ज्ञान झाले नाही.॥१॥ काय सांगावे तेही सांगता येत नाही. जेथे जेथे पाहावे तेथे तो प्रभू परमात्मा सामावून राहिला आहे. ॥ १ ॥रहाउ॥

जेथे जेथे महाभयानक यमाचे दुःख आहे तेथे तेथे हे प्रभो तू माझा साहाय्यकर्ता आहेस. मी तुझ्या चरणी शरण आलो आहे. नानक म्हणतात, हे प्रभो ! सतगुरूद्वारा मला ज्ञान दे. ॥ २ ॥ ५ ॥ ९१ ॥

॥ बिलवलु महला ५ ॥

अगम रूप अबिनासी करता पतित पवित इक निमख जपाईऐ ॥
अचरजु सुनिओ परापति भेटुले संत चरन चरन मनु लाईऐ ॥ १ ॥
कितु बिधीऐ कितु संजमि पाईऐ ॥
कहु सुरजन कितु जुगती धिआईऐ ॥ १ ॥ रहाउ ॥
जो मानुखु मानुख की सेवा ओहु तिस की लई लई फुनी जाईऐ ॥
नानक सरनि सरनि सुखसागर मोहि टेक तेरो इक नाईऐ ॥ २ ॥ ६ ॥ ९२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२२)

शब्दार्थ : **अगम** – अगम्य. **करता** – कर्ता. **निमख** – क्षणभर. **अचरजु** – आश्चर्य. **बिधीऐ**–मार्गाने. **सुरजन** – श्रेष्ठ पुरुष. **कितु** – कोणत्या. **जुगती** – युक्ती. **लई लई** – वारंवार. **फुनी** – परत. **टेक** – आधार. **नाईऐ** – नामाचा.

भावार्थ : तो कर्तापुरुष प्रभू परमात्मा अगम्य आहे. त्याचे क्षणभर स्मरण केल्याने पतित पावन होतात. जनहो ऐका, असा विस्मयकारक प्रभू संत भेटल्यावर संतजनांच्या चरणी मन लीन केल्याने प्रभू प्राप्त होतो. ॥१॥ कोणत्या मार्गाने गेल्याने कशा प्रकारे मनः संयमन केल्याने प्रभू प्राप्त होईल ? हे श्रेष्ठ पुरुष हो मला ती युक्ती सांगा मी त्या प्रमाणे स्मरण करीन. ॥ १ ॥ रहाउ ॥ जर माणूस दुसऱ्या माणसाने केलेली सेवा सतत आठवणीत ठेवतो (त्याप्रमाणे प्रभूची केलेली सेवा ही कधी वाया जात नाही.) नानक सांगतात, हे सुखसागर प्रभू मी तुला शरण आलो आहे. तुझे नाम हाच माझा एकमेव आधार आहे. ॥ २ ॥ ९ ॥ ९२ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

संत सरणि संत टहल करी ॥
धंधु बंधु अरू सगल जंजारो अवर काज ते छूटि परी ॥ १ ॥ रहाउ ॥
सूख सहज अरु घनो अनंदा गुर ते पाइओ नामु हरी ॥
ऐसो हरि रसु बरनि न साकउ गुरि पूरै मेरी उलटि धरी ॥ १ ॥
पेखिओ मोहनु सभ कै संगे ऊन न काहू सगल भरी ॥
पूरन पूरि रहिओ किरीपा निधि कहु नानक मेरी पूरी परी ॥ २ ॥ ७ ॥ ९३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२२)

शब्दार्थ : **टहल** – सेवा. **धंधु** – धंद्याचे. **बंधु** – बंधन. **जंजारो** – जंजाळ. **बरनि** – वर्णन. **उलटी** – परावृत्त. **भरी** – परिपूर्ण.

भावार्थ : हे जीवा ! संतांना शरण जा. त्यांची सेवा कर. त्यामुळे धंद्याची बंधने, संसाराचे जंजाळ व अन्य कामातून तुझी मुक्तता होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरूकडून प्रभुनाम प्राप्त झाल्याने सहजसमाधीचे सुख व आनंद प्राप्त होतो. अशा प्रभुनामरसाचे वर्णनही मी करू शकत नाही. सतगुरुकृपेने बाहेर धावणारी माझी वृत्ती आता अंतर्मुख झाली आहे. ॥ १ ॥ मला आता तो प्रभू परमात्मा सर्वत्र भरून राहिलेला दिसतो. तो स्वतः पूर्ण आहे. त्यात यत्किंचितही न्यून नाही. नानक सांगतात, तो कृपानिधी परिपूर्ण आहे व त्याच्या प्राप्तीमुळे मीही परिपूर्ण झालो आहे. ॥ २ ॥ ७ ॥ ९३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मन किआ कहता हउ किआ कहता ॥
जान प्रबीन ठाकुर प्रभ मेरे तिसु आगै किआ कहता ॥ १ ॥ रहाउ ॥
अनबोले कउ तुही पछानहि जो जीअन महि होता ॥ १ ॥
रे मन काइ कहा लउ डहकहि जउ पेखत ही संगि सुनता ॥ १ ॥
ऐसो जानि भए मनि आनद आन नै बीओ करता ॥
कहु नानक गुर भए दइआरा हरि रंगु न कबहु लहता ॥ २ ॥ ८ ॥ ९४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२३)

शब्दार्थ : **किआ** – काय. **जान** – ज्ञाता. **प्रबीन** – प्रवीण. **अनबोल** – न बोलता. **डहकहि** – फसवाफसवी. **जानि** – जाणून. **बीओ** – दुसरा. **दइआरा** – दयाळू. **लहता** – फिका होणे, विटणे.

भावार्थ : हे मना ! तू काय सांगणार व मी काय सांगणार? तो सर्वज्ञ प्रभू सर्व काही जाणतो. त्याच्यापुढे मी काय सांगू ? ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! न सांगताच तू आमच्या जीवनात जे काही घडत आहे ते सर्व काही जाणतोस. हे मना ! तो प्रभू परमात्मा सर्व काही पाहतो आहे, ऐकतो आहे, जाणतो आहे तर त्याच्यापासून काय लपवू शकणार ? ॥ १ ॥ त्याच्याशिवाय या जगात अन्य कोणीही नाही हे जाणल्याने माझे मन आनंदित झाले आहे. नानक सांगतात, सतगुरूने कृपावंत होऊन मला प्रभुप्रेमरंगाने असे काही रंगवले आहे की तो कधीही विटत नाही. ॥ २ ॥ ८ ॥ ९४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

निंदकु ऐसे ही झरि परीऐ ॥
इह नीसानी सुनहु तुम भाई जिउ कालर भीति गिरीऐ ॥ १ ॥ रहाउ ॥
जउ देखै छिद्रु तउ निंदकु उमाहै भलो देखि दुख भरीऐ ॥
आठ पहर चितवै नही पहुचै बुरा चितवत चितवत मरीऐ ॥ १ ॥
निंदकु प्रभू भुलाइआ कालु नेरै आइआ हरि जन सिउ बादु उठरीऐ ॥
नानक का राखा आपि प्रभु सुआमी किआ मानस बपुरे करीऐ ॥ २ ॥ ९ ॥ ९५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२३)

शब्दार्थ : **निंदकु** – निंदक. **झरि** – झडून. **नीसानी** – निशाणी, खूण. **कालर** – वाळू. **भीति** – भिंत. **छिद्रु** – छिद्र, दोष. **उमाहै** – उत्साह. **भरीऐ** – भरते येते. **चितवै** – चिंतितो. **भुलाइआ** – भुलवले. **नेरै** – निकट, जवळ. **राखा** – रक्षक. **बपुरे** – बापडे. **करीऐ** – करणे.

भावार्थ : ज्याप्रमाणे झाडाची पाने आपोआप झडून जातात, त्याप्रमाणे निंदकही आपोआप नष्ट होतात. ही खूण लक्षात घ्या की ज्याप्रमाणे वाळूची भिंत आपोआप ढासळून पडते त्याप्रमाणे निंदकही नष्ट होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ कोठे काही न्यून दिसले की निंदकास आनंद होतो. कोठे काही चांगले दिसले की त्याला दु:खाचे भरते येते. अष्टौप्रहर तो दुसऱ्याचे वाईट व्हावे असे चिंतित असतो व अशी चिंता करत करतच तो मरून जातो. ॥ १ ॥ निंदक व्यक्ती प्रभू परमात्म्यास विसरलेले असतात. ते सदैव प्रभुसेवकांशी भांडत असतात. नानकांचा रक्षक स्वत: प्रभू परमात्माच आहे. त्याचे कोण काय वाईट करू शकणार ? ॥ २ ॥ ९ ॥ ९५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

ऐसे काहे भूलि परे ॥
करहि करावहि मूकरि पावहि पेखत सुनत सदा संगि हरे ॥ १ ॥ रहाउ ॥
काच बिहाझन कंचन छाडन बैरी संगि हेतु साजन तिआगि खरे ॥
होवनु कउरा अनहोवनु मीठा बिखिआ महि लपटाइ जरे ॥ १ ॥
अंध कूप महि परिओ परानी भरम गुबार मोह बंधि परे ॥
कहु नानक प्रभ होत दइआरा गुरु भेटै काढै बाह फरे ॥ २ ॥ १० ॥ ९६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२३)

शब्दार्थ : **ऐसे** – अशी. **मूकरि** – तोंड फिरविणे. **कांच** – काच. **बिहाझन** – खरेदी करतो. **छाडन** – सोडून. **बैरी** – वैरी. **होवन** – अस्तित्वमान प्रभू, शाश्वत. **अनहोवन** – अशाश्वत. **कउरा** – कडू. **बिखिआ** – विष, विषयविकार. **जरे** – जळतो. **गुबार** – घोर अंधार. **फरे** – पकडून, धरून.

भावार्थ : हे जीवा ! तुला अशी कशी भुरळ पडली की ज्यामुळे तो (प्रभू परमात्मा) सदैव तुझ्यासोबत आहे, जो सर्व काही करणारा, करवून घेणारा, सर्व काही पाहणारा, ऐकणारा आहे, त्याच्याकडे तू पाठ फिरवतोस? ॥१॥ रहाउ ॥ तू सोने टाकून काच विकत घेतो आहेस. खऱ्या सज्जनमित्राचा त्याग करून तू तुझ्या वैऱ्याची संगत धरली आहेस. जो शाश्वत आहे, सदैव अस्तित्वमान आहे त्या प्रभू परमात्म्यास तू कडू समजतोस व जे अशाश्वत आहे, नश्वर आहे त्याला व त्या मायेला तू गोड मानतोस व विषयविकारात लिप्त होऊन जळत राहतोस. ॥ १ ॥ असा जीव अज्ञान, अंधकाराच्या गर्तेत पडतो. भ्रमाच्या घोर अंधकारात मोहाच्या बंधनात पडतो. नानक सांगतात, जेव्हा प्रभू परमात्मा अशा जीवावर कृपा करतो, तेव्हा त्यास सतगुरूची प्राप्ती होते व तो त्यास हाती धरून त्या अज्ञानाच्या अंधकारमय गर्तेतून बाहेर काढतो. ॥ २ ॥ १० ॥ ९६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मन तन रसना हरि चीन्हा ॥
भए अनंदा मिटे अंदेसे सरब सूख मोकउ गुरि दीन्हा ॥ १ ॥ रहाउ ॥
इआनप ते सभ भई सिआनप प्रभु मेरा दाना बीना ॥
हाथ देइ राखै अपने कउ काहू न करते कछु खीना ॥ १ ॥
बलि जावउ दरसन साधू कै जिह प्रसादि हरि नामु लीना ॥
कहु नानक ठाकुर भारोसै कहू न मानिओ मनि छीना ॥ २ ॥ ११ ॥ ९७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२३)

शब्दार्थ : **रसना** – जीभ. **चीन्हा** – जाणले. **भए** – झाला. **अंदेसे** – चिंता. **दीन्हा** – दिले. **इआनप** – अज्ञान, असमंजसपणा. **सिआनप** – शहाणपणा. **दाना** – ज्ञाता. **बीना** – द्रष्टा. **खीना** – हानी.

भावार्थ : मी माझ्या तन, मनाने, जिव्हेने प्रभू परमात्म्यास जाणले आहे. माझ्या सर्व चिंता मिटल्या. मला आनंद झाला. मला माझ्या सतगुरूने सर्व सुख प्रदान केले. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझे सर्व अज्ञान दूर झाले. शहाणपण प्राप्त झाले. आता मला हे ज्ञान प्राप्त झाले आहे की तो प्रभू परमात्माच सर्वज्ञ असून सर्व काही पाहणारा आहे. तो आपल्या सेवकांना हाती धरून त्यांचे रक्षण करतो. त्यास कोणीही कोणत्याही प्रकारची हानी पोहचवू शकत नाही. ॥ १ ॥ ज्या साधुसंतांमुळे मी प्रभुमार्गी होऊन प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करू लागलो, त्या साधुसंतांवरून मी माझा जीव ओवाळून टाकतो. नानक सांगतात, की मी माझे सारे जीवन प्रभू परमात्म्याच्या भरवशावर सोपवले आहे. मी क्षणभरही अन्य कोणाचा मनात विचारसुद्धा आणला नाही. ॥ २ ॥ ११ ॥ ९७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

गुरि पूरै मेरी राखि लई ॥
अंम्रित नामु रिदे महि दीनो जनम जनम की मैलु गई ॥ १ ॥ रहाउ ॥
निवरे दूत दुसट बैराई गुर पूरे का जपिआ जापु ॥
कहा करै कोई बेचारा प्रभ मेरे का बड परतापु ॥ १ ॥
सिमरि सिमरि सिमरि सुखु पाइआ चरन कमल रखु मन माही ॥
ता की सरनि परिओ नानक दासु जा ते ऊपरि को नाही ॥ २ ॥ १२ ॥ ९८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२३)

शब्दार्थ : **रिदे** – हृदयात. **निवरे** – दूर झाली. **बैराइ** – वैरी. **वड** – महान.

भावार्थ : पूर्णगुरूने माझ्या प्रतिष्ठेचे रक्षण केले. माझ्या मनात प्रभूचे अमृतनाम दृढ केले. जन्मजन्मांतरीचा मळ नष्ट झाला. ॥ १ ॥ रहाउ ॥ पूर्णगुरूचे स्मरण केल्याने कामक्रोधादी यमाचे दूत, माझे दुष्ट शत्रू माझ्यापासून दूर पळाले. माझे कोण काय वाईट करणार ? कारण माझ्या प्रभूचा प्रताप महान आहे. ॥ १ ॥ मी प्रभू परमात्म्याचे

चरणकमल माझ्या हृदयात धारण केले आहेत व त्याचे सदैव स्मरण करून सुख प्राप्त केले आहे. नानक सांगतात, की ज्याच्याहून अन्य कोणीही श्रेष्ठ नाही अशा सर्वश्रेष्ठ प्रभूपरमात्म्यास हा दास नानक शरण गेला आहे.॥२॥१२॥९८॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सदा सदा जपीऐ प्रभ नाम ॥
जरा मरा कछु दूखु न बिआपै आगै दरगह पूरन काम ॥ १ ॥ रहाउ ॥
आपु तिआगि परीऐ नित सरनी गुर ते पाईऐ एहु निधानु ॥
जनम मरण की कटीऐ फासी साची दरगह का नीसानु ॥ १ ॥
जो तुम्ह करहु सोइ भल मानउ मन ते छूटै सगल गुमानु ॥
कहु नानक ता की सरणाई जा का कीआ सगल जहानु ॥ २ ॥ १३ ॥ ९९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२४)

शब्दार्थ : **जरा** – वृद्धत्व. **मरा** – मरण. **दरगहु** – प्रभू दरबारात. **आपु** – अहंकार. **निधानु** – निधी, संपत्ती. **नीसानु** – चिन्ह, निशाणी. **मानउ** – मानतो. **गुमानु** – गर्व. **जहानु** – संसार.

भावार्थ : हे जीवा ! तू सदैव प्रभुनामाचे स्मरण कर. असे केल्याने वृद्धत्व, मरण आदी दुःख तुला व्यापू शकणार नाहीत व पुढे प्रभू दरबारीही तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील. ॥ १ ॥ रहाउ ॥ अहंकाराचा त्याग करून सदैव प्रभू परमात्म्यास शरण गेल्याने प्रभुनामाचा खजिना प्राप्त होतो. जन्ममरणाचे पाश तुटून जातात. प्रभूनाम हीच प्रभू दरबारात स्थान प्राप्त करण्याचा परवाना आहे. ॥ १ ॥ हे प्रभो ! तू जे काही करतोस ते चांगले असते असे मी मानतो. त्यामुळे माझ्या मनातील सर्व अहंकार गळून पडतो.नानक सांगतात, ज्या प्रभू परमात्म्याने हा सारा संसार निर्माण केला त्यास मी शरण गेलो आहे. ॥ २ ॥ १३ ॥ ९९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मन तन अंतरि प्रभु आही ॥
हरि गुन गावत परउपकार नित तिसु रसना का मोलु किछु नाही ॥ १ ॥ रहाउ ॥
कुल समूह उधरे खिन भीतरि जनम जनम की मलु लाही ॥
सिमरि सिमरि सुआमी प्रभु अपना अनद सेती बिखिआ बनु गाही ॥ १ ॥
चरन प्रभू के बोहिथु पाए भवसागरु पारि पराही ॥
संत सेवक भगत हरि ता के नानक मनु लागा है ताही ॥ २ ॥ १४ ॥ १०० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२४)

शब्दार्थ : **आही** – आहे, वास करतो. **मोलु** – मोल, किंमत. **लाही** – नष्ट होतो. **बनु** – अरण्य. **गाही** – पार केले. **बोहिथु** – जहाज. **ताही** – त्यात, त्या प्रभूमध्ये.

भावार्थ : ज्याच्या तन, मनात प्रभू परमात्म्याचा वास आहे, तो प्रभुसेवक सदैव प्रभुनामाचे स्मरण करतो व सदैव परोपकार करतो. त्याच्या जिव्हेवर प्रभूनाम वास करते. त्या जिव्हेचे मोल कोणी करू शकत नाही. ॥ १ ॥रहाउ॥ त्याच्या सर्व कुळाचा क्षणात उद्धार होतो व जन्मजन्मांतरीचा मळ नष्ट होतो. असा प्रभुसेवक प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करत विषयविकारांच्या ह्या संसाररूपी जंगलातून आनंदाने वाट काढून ते पार करतो. ॥१॥ तो प्रभूचरणरूपी जहाज प्राप्त करून भवसागर पार करतो. संतमहात्मे प्रभूचे सेवक त्या प्रभूचे ठायी मन एकाग्र करतात. ॥ २ ॥ १४ ॥ १०० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

धीरउ देखि तुम्हारे रंगा ॥
तूही सुआमी अंतरजामी तूही वसहि साध कै संगा ॥ १ ॥ रहाउ ॥
खिन महि थापि निवाजे टाकुर नीच कीट ते करहि राजंगा ॥ १ ॥
कबहू न बिसरै हीए मोरे ते नानक दास इही दानु मंगा ॥ २ ॥ १५ ॥ १०१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२४)

शब्दार्थ : **धीरउ** – धैर्य. **तूही** – तूच. **संगा** – संगतीत. **निवाजे** – मोठेपणा प्रदान करतो. **राजंगा** – राजा. **हीए** – हृदयापासून. **मंगा** – मागतो.

भावार्थ : हे प्रभू ! तुझ्या लीला पाहून माझ्या मनात धैर्य प्राप्त होते. हे प्रभू ! तू अंतर्यामी आहेस. तू साधुसंतांच्या संगतीत वास करतोस. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे ठाकूर ! तू क्षणात एखाद्यास मोठेपणा प्रदान करतोस. एखाद्या क्षुद्र रंकास राज्यपदी स्थापित करतोस. ॥ १ ॥ नानक सांगतात, हे प्रभो ! माझे तुझ्या चरणी एकच मागणे आहे की माझ्या हृदयास कधीही तुझा विसर पडू देऊ नकोस. हेच दान मला दे. ॥ २ ॥ १५ ॥ १०१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

अचुत पूजा जोग गोपाल ॥
मनु तनु अरपि रखउ हरि आगै सरब जीआ का है प्रतिपाल ॥ १ ॥ रहाउ ॥
सरनि समरथ अकथ सुखदाता किरपासिंधु बडो दइआल ॥
कंठि लाइ राखै अपने कउ तिस नो लगै न ताती बाल ॥ १ ॥
दामोदर दइआल सुआमी सरबसु संत जना धन माल ॥
नानक जाचिक दरसु प्रभ मागै संत जना की मिलै रवाल ॥ २ ॥ १६ ॥ १०२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२४)

शब्दार्थ : **अचुत** – अच्युत. **जोग** – योग्य. **आगै** – समोर, पुढे. **समरथ** – समर्थ. **बडो** – महान. **राखै** – रक्षण करतो. **ताती** – तप्त हवा. **बाल** – . **सरबासु** – सर्व विभूती. **जाचिक** – याचक. **दरसु** – दर्शन. **रवाल** – चरणधूळ.

भावार्थ : जो प्रभू परमात्मा अढळ आहे, अच्युत आहे, शाश्वत आहे, तोच पूजा करण्यायोग्य आहे. तोच सर्व जीवांचे पालनपोषण करतो. मी माझे तन, मन त्याच्यापुढे अर्पण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो कृपासिंधू, दयाळू, सुखदाता, अवर्णनीय प्रभू परमात्माच जीवास शरण देण्यास, अभय देण्यास समर्थ आहे. तो ज्यास हृदयाशी धरतो, त्यास परत गर्भवास भोगावा लागत नाही. संसाराचा भवताप भोगावा लागत नाही. ॥ १ ॥ तो प्रभू परमात्मा दयाळू आहे व सर्व विभूतींचा स्वामी आहे. तो संतजनांची धनसंपत्ती आहे. नानक सांगतात, हे प्रभो ! मी तुझ्याकडे तुझ्या दर्शनाची याचना करतो. हे प्रभो ! मला संतजनांच्या चरणीची धूळ दे. ॥२॥१६॥१०२॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सिमरत नामु कोटि जतन भए ॥
साध संगि मिलि हरि गुन गाए जमदूतन कउ त्रास अहे ॥ १ ॥ रहाउ ॥
जेते पुनहचरन से कीन्हे मनि तनि प्रभ के चरण गहे ॥
आवण जाणु भरमु भउ नाठा जनम जनम के किलविख दहे ॥ १ ॥
निरभउ होइ भजहु जगदीसै एहु पदारथु वडभागि लहे ॥
करि किरपा पूरन प्रभ दाते निरमल जसु नानक दास कहे ॥ २ ॥ १७ ॥ १०३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२४)

शब्दार्थ : **जतन** – यत्न, साधना. **जेते** – जितके. **पुनहचरण** – प्रायश्चित्त. **आवण** – जन्म. **जाणु**– मृत्यू. **नाठा** – नष्ट झाले. **किलविख** – पाप. **दहे** – जळून जातात. **लहे** – प्राप्त होतात. **जसु** – यश.

भावार्थ : केवळ नामस्मरणाने अनेक साधना संपन्न होतात. जेव्हा यमदूतांचा त्रास होतो, तेव्हा साधुसंतांच्या संगतीत बसून प्रभू परमात्म्याचे गुणगान करावे.॥ १ ॥ रहाउ ॥ केवळ मनात प्रभुचरण धारण केल्याने अनेक प्रायश्चित्ते केल्याचे फळ लाभते. जन्ममरणाचे भय नष्ट होते. जन्मोजन्मीचे पाप जळून जाते. ॥ १ ॥ हे जीवा ! तू निर्भय होऊन जगदीशाचे भजन कर. महाभाग्यानेच प्रभुनाम प्राप्त होते. दास नानक प्रभू परमात्म्यास हीच विनंती करतात, की हे पूर्ण निर्मल प्रभू माझ्यावर तुझी सदैव कृपा असावी. ॥ २ ॥ १७ ॥ १०३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

सुलही ते नाराइण राखु ॥
सुलही का हाथु कही न पहुचै सुलही होइ मूआ नापाकु ॥ १ ॥ रहाउ ॥
काढि कुठारु खसमि सिरु काटिआ खिन महि होइ गइआ है खाकु ॥
मंदा चितवत चितवत पचिआ जिनि रचिआ तिनि दीना धाकु ॥ १ ॥
पुत्र मीत धनु किछू न रहिओ सु छोडि गइआ सभ भाई साकु ॥
कहु नानक तिसु प्रभ बलिहारी जिनि जन का कीनो पूरन वाकु ॥ २ ॥ १८ ॥१०४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२५)

शब्दार्थ : **सुलही** – सुलहीखान, जहागीरचा सरदार. **नापाकु** – अपवित्र. **कुठारु** – कुऱ्हाड, तलवार. **खसमि** – प्रभू परमात्म्याने. **खाकु** – राख. **मंदा** – दुष्ट बुद्धीचा. **धाकु** – धक्का. **साकु** – आप्तसंबंधी. **कीनो** – केले. **वाकु** – वाक्य.

भावार्थ : नारायणाने सुलहीखानापासून माझे रक्षण केले. सुलहीखानचा हात माझ्यापर्यंत पोहोचू शकला नाही. सुलहीखान मारला गेला व परलोकातही तो अपवित्रच ठरला. ॥ १ ॥ रहाउ । प्रभू परमात्म्याने आपले अस्त्र फेकून त्यास क्षणात मारून त्याची राख केली. तो दुष्ट लोकांचे वाईट चिंतत चिंतत मरून गेला.॥१॥ त्याचे पुत्र, मित्र, धन दौलत काहीही शिल्लक उरले नाही. आप्तस्वकीयांस सोडून त्यास ह्या जगातून जावे लागले. नानक सांगतात, ज्या प्रभू परमात्म्याने आपल्या सेवकांचे वचन पूर्ण केले त्या प्रभुचरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥२॥१८॥१०४॥

॥ बिलावलु महला ५ ॥

पूरे गुर की पूरी सेव ॥
आपे आपि वरतै सुआमी कारजु रासि कीआ गुरदेव ॥ १ ॥ रहाउ ॥
आदि मधि प्रभु अंति सुआमी अपना थाटु बनाइओ आपि ॥
अपने सेवक की आपे राखै प्रभ मेरे को वड परतापु ॥ १ ॥
पारब्रहम परमेसुर सतिगुर बसि कीन्हे जिनि सगले जंत ॥
चरन कमल नानक सरणाई राम नाम जपि निरमल मंत ॥ २ ॥ १९ ॥ १०५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२५)

शब्दार्थ : **वरते** – व्याप्त. **रासि** – सफल. **थाटु** – संसार रचना. **बसि** – वश, ताब्यात ठेवणे. **मंत**– मंत्र.

भावार्थ : पूर्णगुरूची सेवा पूर्ण फलदायी होते. तो प्रभू परमात्मा सर्वव्याप्त आहे. सर्वत्र कार्यशील आहे. गुरूदेव प्रभूने माझे कार्य संपन्न केले आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ आदी मध्य व अंतीही तो प्रभू परमात्माच अस्तित्वमान आहे. त्यानेच ह्या साऱ्या संसाराची रचना केली आहे व त्याचा संभाळही तोच करतो. माझ्या प्रभू परमात्म्याचा प्रताप महान आहे. तो स्वतः आपल्या सेवकाचे रक्षण करतो. ॥ १ ॥ तो परब्रह्म परमात्माच सतगुरू आहे. सारे जीव त्याच्याच सांगण्याप्रमाणे आचरण करतात. नानक सांगतात, मी त्या प्रभूच्या चरणी शरण गेलो आहे व मी सदैव प्रभुनामरूपी निर्मल मंत्राचा जप करतो. ॥ २ ॥ १९ ॥ १०५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

ताप पाप ते राखे आप ॥
सीतल भए गुरचरनी लागे राम नाम हिरदे महि जाप ॥ १ ॥ रहाउ ॥
करि किरपा हसत प्रभि दीने जगत उधार नवखंड प्रताप ॥
दुख बिनसे सुख अनद प्रवेसा त्रिसन बुझी मन तन सचु धाप ॥ १ ॥

अनाथ को नाथु सरणि समरथा सगल स्त्रिसटि को माई बापु ॥
भगति वछल भै भंजन सुआमी गुण गावत नानक आलाप ॥ २ ॥ २० ॥ १०६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२५)

शब्दार्थ : **हसत** – हात. **अनद** – आनंद. **प्रवेसा** – प्रवेश केला. **ध्राप** – तृप्त झाला. **आलाप**– उच्चारतो..

भावार्थ : प्रभू परमात्म्याने पाप–तापापासून माझे रक्षण केले आहे. सतगुरुचरणी शरण गेल्याने माझे मन शांत झाले आहे. मी माझ्या हृदयात रामनामाचा जप करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याचा प्रताप नवखंड पृथ्वीत गाजत आहे, अशा जगदोद्धारक प्रभूने मला हाती धरले. माझे सारे दुःख नष्ट झाले. माझ्या हृदयात आनंदाने प्रवेश केला. माझी मायेची तृष्णा नष्ट झाली. सत्याच्या प्राप्तीमुळे माझे तन, मन तृप्त झाले. ॥ १ ॥ तो प्रभू परमात्मा अनाथांचा नाथ आहे. शरण देण्यास समर्थ आहे. सर्व सृष्टीचा तो मायबाप आहे. नानक सांगतात, त्या भक्तवत्सल, भयाचा नाश करणाऱ्या प्रभू परमात्म्याचे मी सदैव गुणगान गातो. ॥ २ ॥ २० ॥ १०६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

जिस ते उपजिआ तिसही पछानु ॥
पारब्रहम परमेसरू धिआइआ कुसल खेम होए कलिआन ॥ १ ॥ रहाउ ॥
गुरू पुरा भेटिओ बडभागी अंतरजामी सुघडु सुजानु ॥
हाथ देइ राखे करि अपने बड समरथु निमाणिआ को मानु ॥ १ ॥
भ्रम भै बिनसि गए खिन भीतरि अंधकार प्रगटे चानाणु ॥
सासि सासि आराधै नानकु सदा सदा जाईऐ कुरबाणु ॥ २ ॥ २१ ॥ १०७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२५)

शब्दार्थ : **जिस** – ज्याने, ज्यापासून. **पछानु** – ओळख. **सुघड** – सुंदर. **सुजाण** – ज्ञानी. **निमाणीआ** – मानहीन. **चानाणु** – प्रकाश.

भावार्थ : हे जीवा ! ज्या प्रभू परमात्म्याने तुला निर्माण केले त्यास ओळख. त्या परब्रह्म परमात्म्याचे स्मरण केल्याने कुशल, मंगल, क्षेम, कल्याण प्राप्त होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ महत्भाग्याने त्या सुंदर ज्ञानी अंतर्यामी पूर्णगुरूची प्राप्ती होते. तो स्वतः हाती धरून मानहीनांना आपल्या महासामर्थाने सन्मान प्रदान करतो. ॥ १ ॥ त्याच्या कृपेने जीवाचे भय, भ्रम नष्ट होते. अज्ञान, अंधकार नष्ट होऊन त्या जागी ज्ञानरवी प्रकाशित होतो. नानक त्या प्रभूचे प्रत्येक श्वासागणिक स्मरण करतो व त्याच्या चरणी आपले सर्वस्व समर्पित करतो.॥२॥२१॥१०७॥

॥ बिलावलु महला ५ ॥

दोवै थाव रखे गुर सूरे ॥
हलत पलत पारब्रहमि सवारे कारज होए सगले पूरे ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि हरि नामु जपत सुख सहजे मजनु होवत साधू धूरे ॥

आवण जाण रहे थिति पाई जनम मरण के मिटे बिसूरे ॥ १ ॥
भ्रम भै तरे छुटे भै जम के घटि घटि एकु रहिआ भरपूरे ॥
नानक सरणि परिओ दुख भंजन अंतरि बाहिरे पैखि हजूरे ॥ २ ॥ २२ ॥ १०८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२५)

शब्दार्थ : **दोवै** – दोन्ही. **थाव** – स्थानी. **रखे** – रक्षण करतो. **सुरे** – शूरवीर. **हलत** – इहलोक. **पलत** – परलोक. **सवारे** – सावरले. **धूरे** – चरणधूळ. **थिति** – स्थिरता. **बिसुरे** – दुःख. **एकु** – एकमेव प्रभू. **हजूरे** – प्रत्यक्ष.

भावार्थ : शूरवीर गुरूने माझे दोन्ही लोकात (इह–परलोकात) रक्षण केले. परब्रह्म परमात्म्याने इहलोही व परलोकी रक्षण केले व माझे सर्व कार्य सफल केले. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनामाचे सदैव स्मरण केल्याने सहजसमाधीचे सुख प्राप्त होते व संतांच्या चरणरजांनी स्नान होते. जन्ममरणाच्या चक्रातून मुक्तता होते. ॥ १ ॥ मी प्रभुकृपेने भय व भ्रमाचा भवसागर तरून गेलो. मला आता कळले आहे की तो प्रभू परमात्मा सर्व जीवांमध्ये वास करतो. नानक म्हणतात, मी दुःखाचा नाश करणाऱ्या प्रभू परमात्म्यास शरण गेलो आहे. आता मला तो प्रभू परमात्मा माझ्या अंतरात, बाहेर सर्वत्र आहे याचा साक्षात्कार झाला आहे. ॥ २ ॥ २२ ॥ १०८ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

दरसनु देखत दोख नसे ॥ कबहु न होवहु द्रिसटि अगोचर जीअ कै संगि बसे ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रीतम प्रान अधार सुआमी ॥ पूरि रहे प्रभ अंतरजामी ॥ १ ॥
किआ गुण तेरे सारि सम्हारी ॥ सासि सासि प्रभ तुझहि चितारी ॥ २ ॥
किरपा निधी प्रभ दीन दइआला ॥ जीअ जंत की करहु प्रतिपाला ॥ ३ ॥
आठ पहर तेरा नामु जनु जापे ॥ नानक प्रीति लाई प्रभि आपे ॥ ४ ॥ २३ ॥ १०९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२६)

शब्दार्थ : **दोख** – दोष. **नसे** – नष्ट होतात. **कबहु** – कधीही. **सारि** – स्मरण. **चितारी** – चिंतन करतो.

भावार्थ : प्रभू परमात्म्याच्या दर्शनाने सर्व दोष नष्ट होतात. तो प्रभू परमात्मा कधीही दृष्टीपासून दूर होत नाही. तो सदैव जीवाच्या संगतीतच वास करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो प्रिय प्रभू माझ्या जीवाचा आधार आहे. माझ्या सर्वस्वाचा स्वामी आहे. तो अंतर्यामी माझ्यात ओतप्रोत भरून राहिला आहे. ॥ १ ॥ हे प्रभू ! मी तुझ्या कोणकोणत्या गुणांचे स्मरण करू ? कोणते गुण हृदयात संभाळून ठेवू ? हे प्रभो ! मी तुझे प्रत्येक श्वासागणिक चिंतन करतो.॥२॥ हे कृपानिधे, हे दीनदयाळू प्रभू ! तूच साऱ्या जीवांचा प्रतिपाळ करतोस. ॥३॥ नानक सांगतात, हे प्रभो ! मी अष्टौप्रहर तुझेच नामस्मरण करतो. प्रभू परमात्म्याने स्तःच मला प्रभुभक्तीस लावले आहे. ॥ ४ ॥ २३ ॥ १०९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

तनु धनु जोबनु चलत गइआ ॥
राम नाम का भजनु न कीनो करत बिकार निसि भोरु भइआ ॥ १ ॥ रहाउ ॥

अनिक प्रकार भोजन नित खाते मुख दंता धसि खीन खइआ ॥
मोरी मोरी करि करि मूठउ पाप करत नह परी दइआ ॥ १ ॥
महा बिकार घोर दुख सागर तिसु महि प्राणी गलतु पइआ ॥
सरनि परे नानक सुआमी की बाह पकरि प्रभ काढि लइआ ॥ २ ॥ २४ ॥ ११० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२६)

शब्दार्थ : **तनु** – शरीर. **धनु**– धन. **जोबनु** – यौवन. **चलतगइआ** – नश्वर आहे. **निसि** – रात्र. **दंता** – दात. **घासि** – घासून. **खीन** – क्षीण. **खइआ** – नष्ट झाले. **मूठउ** – लुटला गेला.

भावार्थ : **हे** जीवा ! हे तन, धन, यौवन नश्वर आहे. हे सारे नष्ट होणार आहे. जीवनाचा उपभोग घेता घेता जीवनरूपी रात्र संपली पण तू क्षणभरही रामनामाचे स्मरण केले नाहीस. ॥ १ ॥ रहाउ ॥ रोज नाना प्रकारचे स्वादिष्ट भोजन करता करता दात घासून घासून क्षीण होऊन पडून गेले. वृद्धत्व आले. आयुष्यभर माझे माझे करत अहंकारात बुडून गेलास. पाप करताना तुला दुसऱ्यांची मुळी सुद्धा दया आली नाही. ॥ १ ॥ महा विकाररूपी घोर दुःखसागरात बुडून हा जीव नष्ट झाला. नानक सांगतात, जो प्रभू परमात्म्यास शरण जातो. त्यास हाती धरून त्यास प्रभू परमात्मा बाहेर काढतो. ॥ २ ॥ २४ ॥ ११० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

आपना प्रभु आइआ चीति ॥
दुसमन दुसट रहे झख मारत कुसलु भइआ मेरे भाई मीत ॥ १ ॥ रहाउ ॥
गई बिआधि उपाधि सभ नासी अंगीकारु कीओ करतारि ॥
सांति सूख अरु अनद घनेरे प्रीतम नामु रिदै उरहारि । १ ॥
जीउ पिंडु घनु रासि प्रभ तेरी तूं समरथु सुआमी मेरा ॥
दास अपुने कउ राखनहारा नानक दास सदा है चेरा ॥ २ ॥ २५ ॥ १११ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२६)

शब्दार्थ : **चिति** – चित्तात. **कुसलु**– कुशल. **भइआ** – झाले. **बिआधी** – व्याधी. **उपाधी** – मनोरोग. **नासि** – नष्ट झाले. **उपहारि** – हृदयात धारण केले. **राखनहारा** – रक्षक. **चेरा** – दास, सेवक.

भावार्थ : मी माझ्या हृदयात माझ्या प्रभूस धारण केले आहे. त्यामुळे माझे शत्रू झक मारत बसले. ते माझे काहीही अहित करू शकले नाहीत. हे माझ्या बंधू ! माझ्या मित्रा ! माझे मात्र सर्व कुशल, मंगल झाले.॥१॥रहाउ॥ त्या कर्त्यापुरुषाने प्रभू परमात्म्याने माझा अंगीकार केल्यामुळे माझ्या साऱ्या व्याधी, उपाधी नष्ट झाल्या. प्रिय प्रभूचे नाम हृदयात धारण केल्याने मला शांती, सुख व परमानंद प्राप्त झाला. ॥ १ ॥ हे प्रभो ! हा जीव, शरीर, धनसंपत्ती सारी तुझीच आहे. तूच माझा समर्थ स्वामी आहेस. प्रभू परमात्मा आपल्या सेवकांचा रक्षणकर्ता आहे. नानक सांगतात, मी सदैव त्याचाच सेवक होऊन राहिलो आहे. ॥ २ ॥ २५ ॥ १११ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

गोबिदु सिमरि होआ कलिआणु ॥
मिटी उपाधि भइआ सुखु साचा अंतरजामी सिमरिआ जाणु ॥ १ ॥ रहाउ ॥
जिस के जीउ तिनि कीए सुखाले भगत जना कउ साचा तणु ॥
दास अपुने की आपे राखी भै भेजन ऊपरि करते माणु ॥ १ ॥
भई मित्राई मिटी बुराई द्वसट दूत हरि काढे छाणि ॥
सूख सहज आनंद घनेरे नानक जीवै हरि गुणह बखाणि ॥ २ ॥ २६ ॥ ११२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२६)

शब्दार्थ : **होआ** – होते. **जाणु**– ज्ञानी. **सुखाले** – सुखी. **ताणु** – शक्ती. **माणु** – सन्मान. **द्वसट** – दुष्ट. **छाणि** – शोधून. **जीवै** – जीवन. **वखाणि** – सांगतो.

भावार्थ : प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने जीवाचे कल्याण होते. सर्व उपाधी नष्ट होतात. त्या अंतर्यामी, सर्वज्ञाता प्रभूचे स्मरण केल्याने सुखाची प्राप्ती होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्या प्रभू परमात्म्याने ह्या जीवास निर्माण केले त्यानेच त्यास सुखी केले. प्रभू परमात्मा हेच भक्तांचे खरे सामर्थ्य होय. प्रभू परमात्मा आपल्या भक्तांचे रक्षण करतो व त्यांचे भय नष्ट करून त्यास सन्मान प्राप्त करून देतो. ॥ १ ॥ प्रभूने शोधून काढून दुष्ट दूतांचे निर्दालन केले. उरलेल्यांशी वैर नष्ट होऊन मित्रता निर्माण केली. अशा रीतीने दुष्टता नष्ट झाली आहे. नानक सांगतात, हरीचे गुणगान केल्याने सहजावस्था प्राप्त होते, सुख व परमानंद प्राप्त होते. ॥ २ ॥ २६ ॥ ११२ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

पारब्रहम प्रभ भए क्रिपाल ॥
कारज सगल सवारे सतिगुर जपि जपि साधू भए निहाल ॥ १ ॥ रहाउ ॥
अंगीकारु कीआ प्रभि अपनै दोखी सगले भए रवाल ॥
कंठि लाइ राखे जन अपने उधरि लीए लाइ अपनै पाल ॥ १ ॥
सही सलामति मिलि घरि आए निंदक के मुख होए काल ॥
कहु नानक मेरा सतिगुरु पूरा गुरप्रसादि प्रभ भए निहाल ॥ २ ॥ २७ ॥ ११३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२६)

शब्दार्थ : **कारज** – कार्य. **सवारे**– सफल केले. **निहाल** – प्रसन्न. **दोखी** – वैरी. **खाल** – धूळ. **कंठी** – गळ्यात. **पाल** – पदर. **काल** – काळे.

भावार्थ : परब्रह्म परमात्मा कृपावंत झाल्यास तो भक्ताची सर्व कार्ये यशस्वी करतो. साधुसंत प्रभुनामाचा जप करून प्रसन्नचित्त होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्म्याने भक्ताचा अंगीकार केला की त्याच्या वैऱ्याची तो धूळदाण करून टाकतो. प्रभू परमात्मा आपल्या भक्तांना हृदयाशी धरून त्यांचा उद्धार करून त्यास आपल्या पदरात घेतो.

॥१॥ भक्त सहीसलामत आपल्या स्वस्वरूपात लीन होतो व त्याच्या निंदकाचे तोंड काळे होते. नानक सांगतात, माझा सतगुरू पूर्ण आहे व गुरुकृपेने प्रभू माझ्यावर प्रसन्न झाला आहे. ॥ २ ॥ २७ ॥ ११३ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मू लालन सिउ प्रीति बनी ॥ रहाउ ॥
तोरी न तूटै छोरी न छूटै ऐसी माधो खिंच तनी ॥ १ ॥
दिनसु रैनि मन माहि बसतु है ॥ तू करि किरपा प्रभ अपनी ॥ २ ॥
बलि बलि जाउ सिआम सुंदर कउ अकथ कथा जा की बात सुनी ॥ ३ ॥
जन नानक दासनि दासु कहीअत है मोहि करहु क्रिपा ठाकुर अपुनी ॥४॥२८॥११४॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२७)

शब्दार्थ : **मू** – माझी. **लालन**– प्रभू परमात्मा. **तोरी** – तोडली. **छोरा** – सोडली. **माधो** – माधव. **रैनी** – रात्र. **बसतु** – वास करतो. **सिआम सुंदर** – श्यामसुंदर. **कहिअत** – सांगतात.

भावार्थ : माझी प्रिय प्रभूशी इतकी घट्ट प्रीती जडली, की ती तोडली तरी तुटत नाही. माझी माधवाशी अशी घट्ट प्रीती जडली आहे.॥ १ ॥ रात्रंदिवस तो माझ्या मनात वास करतो व त्याची माझ्यावर निरंतर कृपा आहे. ॥२॥ मी त्या श्यामसुंदरावर माझे सर्वस्व समर्पित करतो. त्याची अवर्णनीय कथा मी नेहमी ऐकतो. ॥३॥ हे प्रभो ! हा तुझा सेवक, तुझा दासानुदास तुला विनंती करतो की हे प्रभू माझ्यावर सदैव तुझी कृपा असू दे. ॥४॥२८॥११४॥

॥ बिलावलु महला ५ ॥

हरि के चरन जपि जांउ कुरबानु ॥
गुरु मेरा पारब्रहम परमेसरु ता का हिरदै धरि मन धिआनु ॥ १ ॥ रहाउ ॥
सिमरि सिमरि सिमरि सुखदाता जा का कीआ सगल जहांनु ॥
रसना रवहु एकु नाराइणु साची दरगह पावहु मानु ॥ १ ॥
साधु संगु परापति जा कउ तिनही पाइआ एहु निधानु ॥
गावउ गुण कीरतनु नित सुआमी करि किरपा नानक दीजै दानु ॥ २ ॥ २९ ॥ ११५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२७)

शब्दार्थ : **ताका** – त्याला. **जाका**– ज्याला. **जहानु** – संसार. **रवहु** – उच्चारणे. **दरगह** – प्रभू दरबार. **पाइआ** – प्राप्त केला. **एहु** – हा.

भावार्थ : मी हरिचरणांचे स्मरण करत हरिचरणी माझे सर्वस्व समर्पित करतो. माझा गुरू परब्रह्म परमेश्वर आहे. त्यास मी हृदयात धारण करतो व त्याचे ध्यान करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्या प्रभू परमात्म्याने ही सर्व सृष्टी निर्माण केली, त्याचे मी सदैव स्मरण करतो. माझी जिव्हा सदैव त्या एकमेव नारायणाच्या नामाचा उच्चार करते. त्याच्या दरबारात अशा जीवास सन्मान प्राप्त होतो. ॥ १ ॥ ज्याला साधुसंतांची संगत प्राप्त झाली, त्यासच

प्रभुनामरूपी खजिना प्राप्त होतो. हे नानक म्हणतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर व मला तुझ्या नामाचे दान दे म्हणजे मी सदैव तुझे गुणगान करीन. ॥ २ ॥ २९ ॥ ११५ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

राखि लीए सतिगुर की सरण ॥
जै जै कारु होआ जग अंतरि पारब्रहमु मेरो तारण तरण ॥ १ ॥ रहाउ ॥
बिस्वंभर पूरन सुखदाता सगल समग्री पोखण भरण ॥
थान थनंतरि सरब निरंतरि बलि बलि जांई हरि के चरण ॥ १ ॥
जीअ जुगति वसि मेरे सुआमी सरब सिधि तुम कारण करण ॥
आदि जुगादि प्रभु रखदा आइआ हरि सिमरत नानक नही डरण ॥२॥३०॥११६॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२७)

शब्दार्थ : **पोखण** – पोषण. **वसि**– ताब्यात. **जुगादि** – युगांच्याही पूर्वी. **आदि** – आद्य. **डरण** – भीती.

भावार्थ : जे प्रभुसेवक सतगुरूला शरण जातात त्यांचे प्रभू परमात्मा रक्षण करतो. सर्व जग त्यांचा जयजयकार करते. परब्रह्म परमात्मा हे भवसागर तारून नेणारे जहाज आहे. ॥ १ । रहाउ ॥ विश्वंभर सर्व सुखांचा दाता आहे. त्याने सर्व जीवांना भरणपोषणाची सर्व सामग्री दिली आहे. त्याचा सर्व ठिकाणी निरंतर वास असतो. मी त्याच्या चरणी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ १ ॥ सर्व जीवांच्या जीवनाची सारी व्यवस्था प्रभू परमात्म्याच्या हाती आहे. सर्व सिद्धीही त्याच्याच हाती आहेत. सर्व काही करणारा तोच कर्ता आहे. जेव्हा काहीही नव्हते तेव्हाही तो अस्तित्वमान होता. युगांच्याही आधी तो अस्तित्वमान होता. तो सदैव सर्व जीवांचे रक्षण करत आला आहे. नानक सांगतात, जे प्रभू परमात्म्याचे स्मरण करतात त्यांना कोणतीही भीती उरत नाही.॥२॥३०॥११६॥

रागु बिलावलु महला ५ दुपदे घरु ८

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

मै नाही प्रभ सभु किछु तेरा ॥
ईघै निरगुन ऊघै सरगुन केल करत बिचि सुआमी मेरा ॥ १ ॥ रहाउ ॥
नगर महि आपि बाहरि फुनि आपन प्रभ मेरे को सगल बसेरा ॥
आपे ही राजनु आपे ही राइआ कह कह ठाकुरु कह कह चेरा ॥ १ ॥
का कउ दुराउ का सिउ बलबंचा जह जह पेखउ तह तह नेरा ॥
साध मूरति गुरु भेटिओ नानक मिलि सागर बूंद नही अन हेरा ॥ २ ॥ १ ॥ ११७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२७)

शब्दार्थ : **सभू** – सर्व. **कुछ**– काही. **इधै** – इकडे, एकीकडे. **उधै** – तिकडे, दुसरीकडे. **केल** – लीला, क्रीडा. **बिचि** – मध्ये. **नगर**– देहरूपी शहर. **फुनी**– पुन्हा, परत. **बसेरा**– निवास. **राजनु**– राजा. **राइआ**– प्रजा. **चेरा**– सेवक. **दुराउ**– लपवणे. **बलबंचा**– धाकदपटशा. **नेरा**– निकट, जवळ. **हेरा**– वेगळा.

भावार्थ : हे प्रभो ! ह्या जगात माझे काहीच नाही. सारे काही तुझेच आहे. एकीकडे तो निर्गुण आहे तर दुसरीकडे तो सगुण आहे. तो ह्या दोनही रूपात क्रीडा करत आहे. ही सारी सृष्टी ही त्याचीच लीला आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ ह्या शरीररूपी नगरात तोच वास करतो. परत बाहेरही तोच आहे. माझा प्रभू परमात्मा सर्वत्र वास करतो. तोच राजा आहे. तोच प्रजा आहे. कधी कधी तो स्वामी असतो. कधी कधी तो सेवक असतो. ॥ १ ॥ मी जिकडे पाहतो तिकडे तो माझ्या जवळच आहे. आता मी कोणापासून काय लपवणार ? कुणावर जुलूम जबरदस्ती करणार ? नानक सांगतात, साधुसंतांच्या रूपाने मला प्रभू परमात्मा भेटला आहे. ज्याप्रमाणे पाण्याचा थेंब सागरात पडल्यावर सागररूप होऊन जातो, त्याप्रमाणे मी प्रभू परमात्म्याशी एकरूप झालो आहे. ॥ २ ॥ १ ॥ ११७ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

तुम्हा समरथा कारन करन ॥
ढाकन ढाकि गोबिद गुर मेरे मोहि अपराधी सरन चरन ॥ १ ॥ रहाउ ॥
जो जो कीनो सो तुम्ह जानिओ पेखिओ ठउर नाही कछु ढीठ मुकरन ॥
बड परतापु सुनिओ प्रभ तुम्हरो कोटि अघा तेरो नाम हरन ॥ १ ॥
हमरो सहाउ सदा सद भूलन तुम्हरो बिरदु पतित उधरन ॥
करुणामै किरपाल क्रिपानिधि जीवन पद नानक हरि दरसन ॥ २ ॥ २ ॥ ११८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२८)

शब्दार्थ : **समरथा** – समर्थ. **ढाकन**– पांघरूण, आवरण. **कीनो** – केले. **जानिओ** – जाणतोस. **पेखिओ** – पाहतोस. **ठउर** – स्थान, आश्रयस्थान. **ढीठ**– धीट, निर्लज्ज. **मुकरन** – तोंड फिरविणे, नाकारणे. **अघा**– पाप. **हरन**– नष्ट करणारा. **सहाउ**– स्वभाव. **पद**– पदवी, अवस्था.

भावार्थ : हे प्रभो ! तू सर्वसमर्थ आहेस. सर्व काही करणारा व करवून घेणाराही तूच आहेस. हे प्रभो ! माझ्या दोषांवर पांघरूण घाल. हे माझ्या गुरुदेवा, मी अपराधी आहे. मी तुझ्या चरणी शरण आलो आहे. ॥१॥ रहाउ ॥ मी जे जे काही केले ते ते तू पाहिले आहेस, जाणले आहेस. मला आता कोठेही आधार नाही. मी कितीही निर्लज्ज असलो तरी मी तुझ्यापासून काहीही लपवू शकत नाही. मी तुझा महाप्रताप ऐकला आहे. तुझे नामस्मरण केल्याने कोटी कोटी पापांचा नाश होतो. ॥ १ ॥ चुका करणे हा माझा स्वभाव आहे तर पतितांचा उद्धार करणे हे तुझे ब्रीद आहे. हे करुणामय कृपाळू कृपानिधे परमेश्वरा तुझे दर्शन हेच माझे जीवन आहे.॥२॥२॥११८॥

॥ बिलावलु महला ५ ॥

ऐसी किरपा मोहि करहु ॥
संतह चरण हमारो माथा नैन दरसु तनि धूरि परहु ॥ १ ॥ रहाउ ॥

गुर को सबदु मेरै हीअरै बासै हरि नामा मन संगि धरहु ॥
तसकर पंच निवारहु ठाकुर सगलो भरमा होमि जरहु ॥ १ ॥
जो तुम्ह करहु सोई भल मानै भावनु दुबिधा दूरि टरहु ॥
नानक के प्रभ तुम ही दाते संतसंगि ले मोहि उधरहु ॥ २ ॥ ३ ॥ ११९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२८)

शब्दार्थ : **मोहि** – माझ्यावर. **धूरि**– धूळ. **परहु** – पडो. **हिअरै** – हृदय. **बासै** – वास करतो. **तसकर** – चोर. **निवारहु**– नष्ट कर. **सगलो**– सगळे. **होमी**– अग्नीत. **जरहू**– जळून जावोत. **टरहू**– टाळणे.

भावार्थ : हे प्रभो ! माझ्यावर अशी कृपा कर की माझे मस्तक सदैव संतांच्या चरणी विनम्र राहील व माझ्या शरीरावर त्यांची चरणधूळ पडेल. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरूचे शब्द माझ्या हृदयात वसतील. माझे मन हरीच्या संगात रममाण होईल. काम क्रोधादी विकारांपासून माझे रक्षण कर. हे प्रभो ! माझ्या मनातील मोहमायेचे, वासनाविकाराचे सारे भ्रम अग्निकुंडात जाळून टाक. ॥ १ ॥ हे प्रभो ! तू जे काही करतोस ते चांगलेच आहे असे मी मानतो. माझ्या मनातील द्वैतभावना नष्ट कर. नानक म्हणतात, हे प्रभो ! सर्व काही देणारा दाता तूच आहेस. मला संतांच्या संगतीत ठेवून माझा उद्धार कर. ॥ २ ॥ ३ ॥ ११९ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

ऐसी दीखिआ जन सिउ मंगा ॥ तुम्हरो धिआनु तुम्हारो रंगा ॥
तुम्हरी सेवा तुम्हारे अंगा ॥ १ ॥ रहाउ ॥
जन की टहल संभाखनु जन सिउ ऊठनु बैठनु जन कै संगा ॥
जन चर रज मुखि माथै लागी आसा पूरन अनत तरंगा ॥ १ ॥
जन पारब्रहम जा की निरमल महिमा जन के चरन तीरथ कोटि गंगा ॥
जन की धूरि कीओ मजनु नानक जनम जनम के हरे कलंगा ॥ २ ॥ ४ ॥ १२० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२८)

शब्दार्थ : **दीखिआ** – दीक्षा. **रंगा**– प्रेम. **अंगा** – साथसंगत. **टहल** – सेवा. **संभाखनु** – संभाषण. **चर रज** – चरणधूळ. **हरे**– नष्ट होणे. **कलंगा**– कलंक.

भावार्थ : हे प्रभो ! मी तुझ्या सेवकांकडे अशी दीक्षा मागतो की माझे मन सदैव तुझ्या प्रेमरंगात रंगून जावे व मी सदैव तुझेच स्मरण करावे. मी सदैव तुझीच सेवा करावी व मला सदैव तुझीच संगत प्राप्त होवो. ॥ १ ॥रहाउ॥ मी सदैव प्रभुसेवकांची सेवा करावी. त्यांच्याशी वार्तालाप करावा. त्यांच्यात उठबस करावी सदैव प्रभुसेवकांचा संग मला प्राप्त व्हावा. माझ्या मुखी, माझ्या मस्तकी प्रभुसेवकांची चरणधूळ पडावी व मनात उठणाऱ्या नाना विचार तरंगातून निर्माण होणाऱ्या सर्व आशा पूर्ण व्हाव्यात. ॥ १ ॥ परब्रह्म परमात्म्याच्या सेवकाचा महिमा अपार आहे. प्रभुसेवकाच्या चरणगंगेत कोटी कोटी तीर्थांचा वास असतो. नानक सांगतात, प्रभुसेवकांच्या चरणधुळीने स्नान केल्याने जन्मजन्मांतरीची पापे नष्ट होतात. ॥ २ ॥ ४ ॥ १२० ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

जिउ भावै तिउ मोहि प्रतिपाल ॥
पारब्रहम परमेसर सतिगुर हम बारिक तुम्ह पिता किरपाल ॥ १ ॥ रहाउ ॥
मोहि निरगुण गुणु नाही कोई पहुचि न साकउ तुम्हरी घाल ॥
तुमारी गति मिति तुमही जानहु जीउ पिंडु सभु तुमरो माल ॥ १ ॥
अंरजामी पुरख सुआमी अनबोलत ही जानहु हाल ॥
तनु मनु सीतलु होइ हमारो नानक प्रभ जीउ नदरि निहाल ॥ २ ॥ ५ ॥ १२१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२८)

शब्दार्थ : **बारिक** – बालक. **घाल** – परिश्रम. **अनबरेलत** – न सांगता. **हाल** – अवस्था. **नदरि** – कृपादृष्टी.

भावार्थ : हे प्रभू परमात्मा ! तुला जसे योग्य वाटेल तसा माझा प्रतिपाळ कर. हे परब्रह्म परमात्मा सतगुरु राया ! मी बालक आहे. तू माझा कृपाळू पिता आहेस. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! मी गुणहीन आहे. माझ्या अंगी कोणतेही गुण नाहीत. मी कितीही परिश्रम केले तरी मी तुझ्यापर्यंत पोहचू शकत नाही. हे प्रभो ! तुझी कार्यशैली तूच जाणतोस. हे सारे जीव तुझीच मालमत्ता आहे. त्यांच्यावर तुझाच अधिकार आहे. ॥ १ ॥ हे परमपुरुषा तू अंतर्यामी आहेस. न सांगताही तू सर्व जाणतोस. नानक सांगतात, जेव्हा प्रभू परमात्मा माझ्याकडे आपली कृपादृष्टी वळवतो तेव्हा माझे तन, मन शांत होते व आत्मा सुखी होऊन प्रसन्न होतो. ॥ २ ॥ ५ ॥ १२१ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

राखु सदा प्रभ अपनै साथ ॥
तू हमरो प्रीतम मनमोहनु तुझ बिनु जीवनु सगल अकाथ ॥ १ ॥ रहाउ ॥
रंक ते राउ करत खिन भीतरि प्रभु मेरो अनाथ को नाथ ॥
जलत अगनि महि जन आपि उधारे करि अपुने दे राखे हाथ ॥ १ ॥
सीतल सुखु पाइओ मन त्रिपते हरि सिमरत स्त्रम सगले लाथ ॥
निधि निधान नानक हरि सेवा अवर सिआनप सगल अकाथ ॥ २ ॥ ६ ॥ १२२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२८)

शब्दार्थ : **राखु** – ठेव. **प्रीतमु** – परमप्रिय, प्रियतम. **अकाथ** – व्यर्थ. **त्रिपते** – तृप्त झाले. **स्त्रम** – श्रम. **लाथ** – समाप्त झाले.

भावार्थ : हे प्रभो ! मला सदैव तुझ्याच संगतीत ठेव. तूच माझा प्रियतम मनमोहन. तुझ्याशिवाय सगळे जीवन व्यर्थ आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ तू क्षणात रंकाचा राव करतोस. हे प्रभो ! तू अनाथांचा नाथ आहेस. तो प्रभू आपल्या सेवकांचे विकार वासनांच्या जळत्या अग्नीपासून हाती धरून रक्षण करतो. ॥ १ ॥ हरीचे स्मरण केल्याने मन शांत होते. मनास सुख प्राप्त होते. सर्व श्रम समाप्त होतात. नानक सांगतात, प्रभुसेवेतच सर्व निधींचे भांडार साठवलेले आहे. बाकी सारे शहाणपण व्यर्थ आहे. ॥ २ ॥ ६ ॥ १२२ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

अपने सेवक कउ कबहु न बिसारहु ॥
उरि लागहु सुआमी प्रभ मेरे पूरब प्रीति गोबिंद बीचारहु ॥ १ ॥ रहाउ ॥
पतित पावन प्रभ बिरदु तुम्हारो हमरे दोख रिदै मत धारहु ॥
जीवन प्रान हरि धनु सुखु तुम ही हउमै पटलु क्रिपा करि जारहु ॥ १ ॥
जल बिहून मीन कत जीवन दूध बिना रहनु कत बारो ॥
जन नानक पिआस चरन कमलन्ह की पेखि दरसु सुआमी सुख सारो ॥२॥७॥१२३॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२९)

शब्दार्थ : **बिसारहु** – विसरणे. **पूरब** – पूर्वजन्माची. **बिचारहु** – विचार कर, आठव. **बिरदु** – ब्रीद. **रिदै** – हृदयात. **धारहु** – धरणे, धारण करणे. **हउमै** – अहंकार. **पटलु** – पडदा. **जारहु** – जाळून टाक. **पिआस** – तहान. **सारो** – सार.

भावार्थ : हे प्रभो ! तू आपल्या सेवकांना कधीही विसरु नकोस. आपली पूर्वजन्माची प्रीती लक्षात ठेवून हे प्रभू मला आपल्या हृदयात धर. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! पतितांना पावन करणे हे तुझे ब्रीद आहे. माझे दोष तू लक्षात घेऊ नकोस. हे प्रभो ! माझे जीवन, माझे सुख, प्राण, धन सारे काही तूच आहेस. कृपा करून माझ्यावर आलेला हा अहंकाराचा पडदा जाळून टाक. ॥ १ ॥ पाण्याशिवाय मासा व मातेच्या दुधाशिवाय मूल जिवंत तरी राहू शकेल का ? त्याचप्रमाणे तुझ्याशिवाय माझे जीवन अशक्य आहे. ह्या तुझ्या सेवकास, नानकास तुझ्या चरणकमलाची तहान लागली आहे. हे स्वामी ! तुझे दर्शन हेच माझ्या सुखाचे सार सर्वस्व आहे. ॥२॥७॥१२३॥

॥ बिलावलु महला ५ ॥

आगै पाछै कुसलु भइआ ॥
गुरि पूरै पूरी सभ राखी पारब्रहमि प्रभि कीनी मइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
मनि तनि रवि रहिआ हरि प्रीतमु दूख दरद सगला मिटि गइआ ॥
सांति सहज आनद गुण गाए दूत दुसट सभि होए खइआ ॥ १ ॥
गुनु अवगुनु प्रभि कछु न बीचारिओ करि किरपा अपुना करि लइआ ॥
अतलु बडाई अचुत अबिनासी नानकु उचरै हरि की जइआ ॥ २ ॥ ८ ॥ १२४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२९)

शब्दार्थ : **आगै पाछै** – इह-परलोकी. **कुसल** – कुशल, आनंद. **मइआ** – माया, कृपा. **रवि रहिआ** – व्यापून राहिला. **खइआ** – क्षय, नाश. **बढाई** – महती. **जइआ** – जयजयकार.

भावार्थ : आता माझ्या पुढे- मागे सर्वत्र आनंदीआनंद पसरला आहे. परब्रह्म परमात्म्याने माझ्यावर कृपा केली व पूर्णगुरूने माझे पूर्णपणे रक्षण केले. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझ्या प्रियमत हरीने माझे तन-मन पूर्णपणे व्यापून टाकले आहे. त्यामुळे सर्व दुःख कष्ट लयाला गेले. प्रभू परमात्म्याचे गुणगान केल्याने सहजावस्था प्राप्त होऊन

शांती व आनंद प्राप्त झाला. सारे दुष्ट विकार क्षीण होऊन नष्ट झाले. ॥ १ ॥ प्रभूने माझे गुण-अवगुण कशाचाही विचार न करता माझ्यावर कृपा केली व माझा स्वीकार केला. प्रभू परमात्मा अढळ आहे. अविनाशी आहे. त्याची महती अतुलनीय आहे. नानक त्या प्रभू परमात्म्याचा जयजयकार करतात. ॥ २ ॥ ८ ॥ १२४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

बिनु भै भगती तरनु कैसे ॥
करहु अनुग्रह पतित उधारन राखु सुआमी आप भरोसे ॥ १ ॥ रहाउ ॥
सिमरनु नही आवत फिरत मद मावत बिखिआ राता सुआन जैसे ॥
अउध बिहावत अधिक मोहावत पाप कमावत बुडे ऐसे ॥ १ ॥
सरनि दुख भंजन पुरख निरंजन साधू संगति रवणु जैसे ॥
केसव कलेस नास अघखंडन नानक जीवत दरस दिसे ॥ २ ॥ ९ ॥ १२५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२९)

शब्दार्थ : **बिनु** - विना. **तरनु** - पार करणे. **अनुग्रह** - कृपा. **भरोसे** - भरवसा, विश्वास. **मावत** - मस्त. **राता** - रममाण. **सुआन** - श्वान, कुत्रा. **अउध** - आयुष्य. **बिहावत** - व्यतीत केले. **मोहावत** - मोहात. **खणु** - स्मरण. **कलेश** - क्लेश. **अघखंडन** - पापनाशक. **जीवत** - जीवन जगतो.

भावार्थ : प्रभू परमात्म्याविषयी मनात आदरयुक्त भीती व भक्तिभावाशिवाय हा भवसागर कसा तरून जाता येईल ? पतितांचा उद्धार करणाऱ्या प्रभू माझ्यावर अनुग्रह कर. मी तुझ्यावरच अवलंबून आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ मला नामस्मरण कसे करावे हे सुद्धा कळत नाही. मी मोहमायेने मत्त होऊन कुत्र्यासारखा विषयविकारात रममाण झालो आहे. अशा प्रकारे मायेच्या मोहात फसून मी माझे आयुष्य वाया घालवून पापाची कमाई करण्यात बुडून गेलो आहे. ॥ १ ॥ हे दु:खांचा नाश करणाऱ्या प्रभू मी तुला शरण आलो आहे. कसेही करून मला साधुसंतांची संगत प्राप्त होऊदे म्हणजे त्यांच्या संगतीत मी प्रभुनामाचे स्मरण करीन. तो केशव प्रभू दु:ख, कष्टांचा नाश करणारा आहे. तो पापांचाही नाश करतो. नानक त्याचे दर्शन करूनच आपले जीवन जगतो. ॥ २ ॥ ९ ॥ १२५ ॥

रागु बिलावलु महला ५ दुपदे घरु ९

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

आपहि मेलि लए ॥
जब ते सरनि तुमारी आए तब ते दोख गए ॥ १ ॥ रहाउ ॥
तजि अभिमानु अरु चिंत बिरानी साधह सरन पए ॥
जपि जपि नामु तुम्हारो प्रीतम तन ते रोग खए ॥ १ ॥
महा मुगध अजान अगिआनी राखे धारि दए ॥
कहु नानक गुरु पूरा भेटिओ आवन जान रहे ॥ २ ॥ १ ॥ १२६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२९)

शब्दार्थ : **अरु** - आणि. **चिंत** - चिंता. **बिरानी** - अन्य. **साधह** - साधुसंतांना. **खए** - क्षीण झाले, नष्ट झाले. **मुगध** - मूर्ख. **अजान** - अडाणी. **दए** - दया. **भेटिओ** - भेटला, प्राप्त झाला.

भावार्थ : जेव्हा मी प्रभू परमात्म्यास शरण गेलो, तेव्हा त्याने माझे सर्व दोष नष्ट केले व स्वत: मला त्याच्याशी एकरूप करून घेतले. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी अभिमानाचा त्याग केला, अन्य सर्व चिंता सोडून दिल्या व साधुसंतांना शरण गेलो. हे प्रिय प्रभू ! सदैव तुझे नामस्मरण केल्याने शरीराचे सर्व रोग नाश पावले. ॥ १ ॥ मूर्ख, अडाणी, अज्ञानी जीवांवर तू दया करून त्यांचे रक्षण केलेस. नानक सांगतात, पूर्णगुरू भेटल्याने माझी जन्ममरणाच्या चक्रातून सुटका झाली. ॥ २ ॥ १ ॥ १२६ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

जीवउ नामु सुनी ॥
जउ सुप्रसंन भए गुर पूरे तब तेरी आस पुनी ॥ १ ॥ रहाउ ॥
पीर गई बाधी मनि धीरा मोहिओ अनद धुनी ॥
उपजिओ चाउ मिलन प्रभ प्रीतम रहनु न जाइ खिनी ॥ १ ॥
अनिक भगत अनिक जन तारे सिमरहि अनिक मुनी ॥
अंधुले टिक निरधन धनु पाइओ प्रभ नानक अनिक गुनी ॥ २ ॥ २ ॥ १२७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८२९)

शब्दार्थ : **जीवउ** - जीवन जगतो. **जउ** - जेव्हा. **पुनी** - पूर्ण झाली. **पीर** - पीडा. **बाधी** - बांधला. **धीरा** - धीर. **उपजिओ** - उत्पन्न झाले. **चाउ** - इच्छा, ओढ. **खिनी** - क्षणभर. **टिक** - आधार.

भावार्थ : हे प्रभो ! मी तुझे नाम ऐकून जीवन जगतो. जेव्हा पूर्णगुरू माझ्यावर प्रसन्न झाला, तेव्हा माझी आशा पूर्ण झाली. ॥ १ ॥ रहाउ ॥ पूर्णगुरू माझ्यावर प्रसन्न झाल्याने माझी सर्व पीडा नष्ट झाली. माझ्या मनात धैर्य उत्पन्न झाले व अंत:करणात प्रभुमिलनाची तीव्र ओढ निर्माण झाली. आता मी प्रभुमिलनाशिवाय क्षणभरही राहू शकत नाही. अनेक भक्त, अनेक प्रभुसेवक, अनेक मुनी नामस्मरण करून भवसागर पार करून गेले. नानक सांगतात, तो प्रभू नाना गुणांनी नटलेला आहे. तो अंधळ्याचा आधार आहे. निर्धनाची धनसंपदा आहे.॥२॥२॥१२७॥

रागु बिलावलु महला ५ घरु १३ पडताल

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

मोहन नीद न आवै हावै हार कजर बसत्र अभरन कीने ॥
उडीनी उडीनी उडीनी ॥ कब घरि आवै री ॥ १ ॥ रहाउ ॥
सरनि सुहागनि चरन सीसु धरि ॥ लालनु मोहि मिलावहु ॥ कब घरि आवै री ॥ १ ॥

सुनहु सहेरी मिलन बात कहउ सगरो अहं मिटावहु तउ घर ही लालनु पावहु ॥
तब रस मंगल गुन गावहु ॥ आनद रूप धिआवहु ॥
नानकु दुआरै आइओ ॥ तउ मै लालनु पाइओ री ॥ २ ॥
मोहन रूपु दिखावै ॥ अब मोहि नीद सुहावै ॥ सभ मेरी तिखा बुझानी ॥
अब मै सहजि समानी ॥ मीठी पिरहि कहानी ॥
मोहनु लालनु पाइओ री ॥ रहाउ दूजा ॥ १ ॥ १२८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३०)

शब्दार्थ : हावै – निःश्वास. कजर – काजळ. बसत्र – वस्त्र. अभरन – दागदागिने. उडीनी – उदास. सीसु – मस्तक. लालनु – प्रियकर प्रभू. मिलावहु – भेटवा. सहेरी – सखे. अहं – अहंकार. सगरो – सगळा. दुआरै – द्वार.

भावार्थ : हे मोहना ! मी काजळ घातलंय, गळ्यात हार घातलाय, सुंदर वस्त्रे धारण केली आहेत. दागदागिने घालून साज शृंगार केला आहे पण तुझ्या विरहाने उसासे सोडत बसले आहे. हे प्रियकरा ! तू कधी रे घरी येशील ? ॥ १ ॥ रहाउ ॥ मी इतर सौभाग्यवतींच्या (सतसंगी सख्यांच्या) चरणावर मस्तक ठेवून त्यांना काकुळतीने विनवीत आहे, हे सख्यांनो ! मला माझा प्राणप्रिय भेटवा गं. हे प्रियकरा, तू कधी रे घरी येशील ? ॥ १ ॥ हे सखी ऐक मी तुला प्रभुमिलनाचा मार्ग (युक्ती) सांगते. सर्वप्रथम तू तुझ्या मनातील अहंकार समूळ नष्ट करून टाक म्हणजे तुला तुझा प्रियकर तुझ्या हदयातच प्राप्त होईल. तेव्हा पतिमिलनाच्या आनंदात निमग्न होऊन तू आनंदाने पतीचे मंगलगुण गाऊ लागशील. तू त्या आनंदस्वरूप प्रभूचे ध्यान करशील. नानक सांगतात, मी प्रभुद्वारी येऊन पोहोचले तेव्हा मी त्यास प्राप्त केले. ॥ २ ॥ त्या मनमोहनाने आपले रूप मला दाखवले. आता मला शांत झोप लागते. आता माझी सारी तृष्णा निमाली आहे. आता मी सहजसमाधीत रंगून गेले आहे. आता मला प्रिय प्रभूचा प्रत्येक बोल गोड वाटतो. मला माझा प्रिय मोहन आता प्राप्त झाला आहे. ॥ रहाउ दुसरा ॥ १ ॥ १२८ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

मोरी अहं जाइ दरसन पावत हे ॥
राचहु नाथ ही सहाई संतना ॥ अब चरन गहे ॥ १ ॥ रहाउ ॥
आहे मन अवरु न भावै चरनावै चरनावै उलझिओ अलि मकरंद कमल जिउ ॥
अनरस नही चाहै एकै हरि लाहै ॥ १ ॥
अन ते टूटीऐ रिख ते छूटीऐ ॥ मन हरि रस घूटीऐ संगि साधू उलटीऐ ॥
अन नाही नाही रे ॥ नानक प्रीति चरन चरन हे ॥ २ ॥ २ ॥ १२९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८३०)

शब्दार्थ : मोरी – माझी. राचहु – रंगून जा. आहे – . चरनावै – चरणकमली. उलझिओ – अडकला. अलि – भुंगा, भ्रमर. मकरंद – पराग, मध. अनरस – अन्य रस. लाहै – शोध घेणे. रिख – यमराज. घुटीऐ – घोट घेणे, प्राशन करणे. उलटीऐ – विमुख होणे.

भावार्थ : प्रभू परमात्म्याचे दर्शन होताच माझा अहंभाव नष्ट झाला. साधुसंतांना साहाय्य करणाऱ्या प्रभू परमात्म्याच्या चरणी रममाण होऊन गेलो. ॥ १ ॥ रहाउ ॥ आता माझे मन अन्य कोठेही भटकत नाही त्यास अन्य काही आवडत नाही. माझे मन प्रभू परमात्म्याच्या चरणारविंदी अडकून पडले आहे. ज्याप्रमाणे भ्रमर मधुपान करण्यासाठी सदैव कमळाभोवती रुंजी घालतो, त्याप्रमाणे माझे मन प्रभुचरणी रुंजी घालत आहे. आता मला एकमात्र हरिरसाशिवाय अन्य कोणताही रस आवडत नाही. ॥ १ ॥ मन अन्य सर्व वासनाविकारांपासून मुक्त झाले की जीवाची यमाच्या पाशातूनही मुक्तता होते. साधुसंतांच्या संगतीमुळे मन अन्य साऱ्या गोष्टींपासून निवृत्त होऊन हरिरसात निमग्न होते. नानक सांगतात, ह्या जगात प्रभू परमात्म्याखेरीज अन्य काहीही नाही. केवळ प्रभुचरणांवर प्रेम करावे. ॥ २ ॥ २ ॥ १२९ ॥

रागु बिलावलु महला ९ दुपदे

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

दुख हरता हरि नामु पछानो ॥
अजामलु गनका जिह सिमरत मुकति भए जीअ जानो ॥ रहाउ ॥
गज की त्रास मिटी छिनहु महि जब ही रामु बखानो ॥
नारद कहत सुनत धुअ बरिक भजन माहि लपटानो ॥ १ ॥
अचल अमर निरभै पदु पाइओ जगत जाहि हैरानो ॥
नानक कहत भगत रछक हरि निकटि ताहि तुम मानो ॥ २ ॥ १ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८३०)

शब्दार्थ : पछानो – ओळखा. जिअ – जीव. छिनहु महि – क्षणात. बखानो – वाखाणणी करा, जाहा करा. बारिक – बालक. लपटानो – रंगला गेला, मग्न झाला. हैरानी – आश्चर्य.

भावार्थ : हरीचे नामस्मरण सर्व दु:खांचा नाश करते हे जाणून घे. नामस्मरणाने, अजामीळ, गणिका कान्होपात्रा यांचा उद्धार झाला. ते मुक्त झाले हे जाण. नारदमुनींच्या उपदेशाने ध्रुव बालक नामस्मरणात निमग्न झाला व त्यामुळे त्याने असे अचल, अमर, निर्भय अढळपद प्राप्त केले की, सारे जग आश्चर्यचकित झाले. नानक सांगतात, तूही त्या भक्तरक्षक हरीला जवळ कर. त्याच्या नामस्मरणाचा आधार घे, आणि जीवनांचे सार्थक कर. ॥ २ ॥ १ ॥

हरि के नाम बिना दुखु पावै ॥
भगति बिना सहसा नह चुकै गुर इह भेदु बतावै ॥ १ ॥ रहाउ ॥
कहा भइओ तीरथ ब्रत कीए राम सरनि नही आवै ॥
जोग जग निहफल तिह मानउ जो प्रभु जसु बिसरावै ॥ १ ॥

मान मोह दोनो कउ परहहि गोबिंद के गुन गावै ॥
कहु नानक इह बिधि को प्रानी जीवन मुकति कहावै ॥ २ ॥ २ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८३०)

शब्दार्थ : **सहसा** – अधिकतर. **भेदु** – रहस्य. **निहफल** – निष्फळ. **कहा भइओ** – काय झाले? (काय मिळणार, काही होणार नाही.) **परहरि** – त्याग करून, सोडून देऊन.

भावार्थ : प्रभुभक्तिरहित जीवन हे दु:खमय होते. ह्या मोहमयी जगात मोहपाशातून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग ईश्वरभक्तीच होय. भक्ती केल्याशिवाय सहसा हे दु:ख दूर होत नाही. हे रहस्य तुला गुरूकडून प्राप्त होईल. ईश्वरास शरण गेला नाहीस व कितीही व्रते, तीर्थयात्रा आदी कर्मे केलीस तरी ती व्यर्थ होत. प्रभूचे गुणगान करण्याचे सोडून तू कितीही यज्ञयाग केलेस, योगसाधना केलीस तरी ती निष्फळच होणार. म्हणून नानक सांगतात, 'ज्याने मायारूपी जगाचा मोह सोडून, मनातला अहंकार दूर केला त्यालाच जीवनमुक्त म्हणावे. ॥ २ ॥ २ ॥

जा मै भजनु राम को नाही ॥
तिह नर जनमु अकारथु खोइआ यह राखहु मन माही ॥ रहाउ ॥
तिरथ करै ब्रत फुनि राखै नह मनुआ बसि जा को ॥
निहफल धरमु ताहि तुम मानहू साचु कहत मै था कउ ॥ १ ॥
जैसे पाहनु जल महि राखिओ भेदै नाहि तिहि पानी ॥
तैसे ही तुम ताहि पछानहु भगति हीन जो प्रानी ॥ २ ॥
कल मै मुकति नाम ते पावत ॥ गुर यह भेदु बतावै ॥
कहु नानक सोई नरू गरूआ ॥ तो प्रभ के गुन गावै ॥ ३ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३१)

शब्दार्थ : **नह** – नाही. **ताहि** – त्याला. **कउ** – याला. **पाहनि** – पाषाण. **भेदै** – भेदणे, आत शिरणे. **कल** – कलियुग. **गुरुआ** – थोर, श्रेष्ठ. **सोई** – तोच.

भावार्थ : ज्याच्या मनात ईश्वर भक्ती नाही, त्याने हा दुर्लभ नरदेह प्राप्त करूनही आपला जन्म वाया घालवला; हे नीट लक्षात घे. ज्या माणसाच्या मनात प्रभुभक्ती नाही, त्याने कितीही तीर्थयात्रा केल्या, व्रत-वैकल्ये केली, आणि मन ताब्यात नसेल तर त्याचे हे सर्व धर्माचरण निष्फळ आहे. हे माझे सांगणे तुम्ही सत्य माना. जसा एखादा दगड तुम्ही कितीही वेळ पाण्यात बुडवून ठेवा, जराही पाणी त्या दगडात शिरत नाही. तसेच भक्तिहीन मानवाने केलेले धर्माचरण व्यर्थ आहे. गुरुमुखातून तू हेच रहस्य समजावून घे की, कलीयुगात ईश्वराचे नामस्मरण हाच मुक्तीचा एकमेव मार्ग आहे. नानक सांगतात, जो माणूस ईश्वर भजनात निमग्न झाला, तोच माणूस श्रेष्ठ होय. ॥ ३ ॥ ३ ॥

बिलावलु असटपदीआ महला १ घरु १०

१ ओअंकार सतिगुर प्रसादि

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

निकटि वसै देखै सभु सोई ॥ गुरमुखि विरला बूझै कोई ॥
विणु भै पइऐ भगति न होई सबदि रते सद सुखु होइ ॥ १ ॥
ऐसा गिआनु पदारथु नामु ॥ गुरमुखि पावसि रसि रसि मानु ॥ १ ॥ रहाउ ॥
गिआनु गिआनु कथै सभु कोई ॥ कथि कथि बादु करे दुखु होई ॥
कभि कहणै ते रहे न कोई ॥ बिनु रस राते मुकति न होई ॥ २ ॥
गिआनु धिआनु सभु गुर ते होई ॥ साची रहत साचा मनि सोई ॥
मनमुख कथनी है परू रहत न होई ॥ नावहु भूले थाउ न कोई ॥ ३ ॥
मनु माइआ बंधिओ सर जालि ॥ घटि घटि बिआपी रहिओ बिखु नालि ॥
जो आंजै सो दीसै कालि ॥ कारजु सीधो रिदै सम्हालि ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३१)

शब्दार्थ : **निकटी** – जवळ. **सबदि** – नामात. **बादु** – वाद, भांडण. **रहत** – राहणी, आचरण. **नावहु** – नामापासून. **बंधिओ** – बद्ध. **सर** – सरोवर. **जालि** – जल. **बिखु** – विष. **आंजे** – उत्पन्न झाला. **काली**– मृत्यू. **सीधो** – सफल. **सम्हालि** – स्मरण कर.

भावार्थ : तो प्रभू परमात्मा सदैव जवळच असतो व तो सर्व काही पाहतो पण कोणी सतगुरूच्या उपदेशाप्रमाणेच आचरण करणारा वीर माणूसच हे जाणतो. मनात प्रभू परमात्याविषयी आदरयुक्त भीती असल्याशिवाय प्रभुभक्ती मनात उत्पन्न होत नाही. जो प्रभुनामात दंग झाला त्यासच सुख प्राप्त होते. ॥ १ ॥ प्रभुनाम हे असे ज्ञान आहे की जे सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्यानेच प्राप्त होते व नामरसाचा सन्मानपूर्वक आनंद प्राप्त होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सगळेच लोक ज्ञान ज्ञान असे म्हणतात. ज्ञान म्हणजे काय, ह्या विषयावर वादविवाद करतात. बोलण्याचे कोणी थांबत नाही. पण प्रभुनामरूपी अमृत प्राप्त झाल्याशिवाय मुक्ती लाभत नाही. ॥ २ ॥ ज्ञान, ध्यान सारे काही गुरूकडून प्राप्त होते. मनात सत्यरूप प्रभुनामाचा वास झाल्यावर माणूस सत्याचरण करू लागतो. स्वेच्छाचारी माणूस तोंडाने खूप बोलतो पण त्याच्याकडून तसे आचरण मात्र होत नाही. जो प्रभुनाम विसरला त्यास प्रभू दरबारात स्थान प्राप्त होत नाही. ॥ ३ ॥ मायेने जीवास संसाराच्या जाळ्यात अडकवून ठेवले आहे. सर्व जीव मोहमायेच्या विषाने व्याप्त झाले आहेत. जो जीव जन्मला तो अखेर मरणार आहे. अंतःकरणात प्रभुनामाचे स्मरण केल्याने मानवी जीवनाचे सार्थक होते. ॥ ४ ॥

सो गिआनी जिनि सबदि लिव लाई ॥ मनमुखि हउमै पति गवाई ॥
आपे करतै भगति कराई ॥ गुरमुखि आपे वडिआई ॥ ५ ॥
रैणि अंधारी निरमल जोति ॥ नाम बिना झूठे कुचल कछोति ॥

बेदु पुकारै भगति सरोति ॥ सुणि सुणि मानै वेखै जोति ॥ ६ ॥
सासत्र सिम्रिति नामु द्रिड़ामं ॥ गुरमुखि सांति ऊतम करामं ॥
मनमुखि जोनी दूख सहामं ॥ बंधन तूटे इकु नामु वसामं ॥ ७ ॥
मंने नामु सची पति पूजा ॥ किसु वेखा नाही को दूजा ॥
देखि कहउ भावै मनि सोइ ॥ नानकु कहै अवरू नही कोइ ॥ ८ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३१)

शब्दार्थ : **सो** – तो. **मनमुखि** – स्वेच्छाचारी. **हउमै** – अहंकार. **पति** – पत, प्रतिष्ठा. **करतै** – कर्तापुरुष. **रेणि** – रात्र. **कुचल** – वाईट चालीचा, अपवित्र. **कछोति** – अस्पृश्य. **सरोति** – ध्वनी श्रृती. **सासत्र** – शास्त्र. **सिम्रिति** – स्मृती. **द्रिडामं** – दृढ. **करामं** – केल्याने. **सहामं** – सहन करतो, भोगतो. **मने** – मनन. **किसु** – कोणास. **वेखा** – पाहू. **दुजा** – दुसरा.

भावार्थ : ज्याने आपले मन प्रभुनामात लीन केले तोच खरा ज्ञानी होय. स्वेच्छाचारी जीव अहंकारामुळे आपली पत घालवून बसतो. तो कर्तापुरुष, प्रभू परमात्मा स्वतः जीवांकडून आपली भक्ती करवून घेतो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्यास प्रभू स्वतः महती प्राप्त करून देतो. ॥ ५ ॥ मानवी जीवन हे अंधकारमय आहे. त्यात प्रभू परमात्म्याची निर्मल ज्योती प्रकाश देते. प्रभुनामाशिवाय अन्य सर्व खोटे व स्पर्शही न करण्यासारखे आहे. वेदही उच्चस्वराने भक्तीचा महिमाच वर्णन करतात. जो ते ऐकतो, त्याचे मनन, चिंतन करतो त्यास प्रभुनाम ऐकल्याने प्रभू परमात्म्याचे दर्शन होते ॥ ६ ॥ सर्व शास्त्रे, स्मृती आदी धर्मग्रंथ जीवांच्या मनात प्रभुनाम दृढ करतात. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे जो नामस्मरणरूपी श्रेष्ठ कर्म करतो, त्यास शांती प्राप्त होते. स्वेच्छाचारी जीवास अनेक योनीत जन्म घेऊन दुःख भोगावे लागते. प्रभूचे नाम हृदयात स्थिर झाल्याने जीवाची सर्व बंधनातून मुक्तता होते. ॥ ७ ॥ प्रभुनामाचे मनन करणे हीच खरी पूजा होय व त्यानेच सत्य प्रतिष्ठा प्राप्त होते. मी प्रभू परमात्म्याशिवाय अन्य कोणाचे दर्शन करू? मला तरी असा अन्य कोणी दिसत नाही. सर्व गोष्टी पाहून, नीट विचार करून मी हे सांगतो, की तो प्रभू परमात्माच माझ्या मनास भावला आहे. नानक सांगतात, त्या एकमेव प्रभू परमात्म्याशिवाय जगात अन्य कोणीही नाही. ॥ ८ ॥ १ ॥

॥ बिलावलु महला १ ॥

मन का कहिआ मनसा करै ॥ इहु मनु पुंनु पापु उचरै ॥
माइआ मदि माते त्रिपति न आवै ॥ त्रिपति मुकति मनि साचा भावै ॥ १ ॥
तनु धनु कलतु सभु देखु अभिमाना ॥ बिनु नावै किछु संगि न जाना ॥ १ ॥ रहाउ ॥
कीचहि रस भोग खुसीआ मन केरी ॥ धनु लोकां तनु भसमै ढेरी ॥
खाकु खाकु रलै सभु फैलु ॥ बिनु सबदै नही उतरै मैलु ॥ २ ॥
गीत राग धन ताल सि कूरे ॥ त्रिहु गुण उपजै बिनसै दूरे ॥
दूजी दुरमति दरदु न जाइ ॥ छुटै गुरमुखि दारू गुण गाइ ॥ ३ ॥
धोती ऊजल तिलकु गलि माला ॥ अंतरि क्रोध पडहि नाटसाला ॥

नामु विसारि माइआ मदु पीआ ॥ बिनु गुर भगति नाही सुखु थीआ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३२)

शब्दार्थ : **मनसा** – . **उचरै** – उच्चारतो, बोलतो. **त्रिपति** – तृप्ती. **कलतु** – पत्नी. **कीचहि** – . **भसमै** – राखेचा. **ढेरी** – ढीग. **खाकु** – माती. **रलै** – मिसळून. **फैलू** – जगाचा पसारा. **कूरे** – खोटे. **त्रिहू** – तीन . **उपजै** – निर्माण होते. **बिनसै** – नष्ट होते. **दारू** – औषध. **पडहि** – वाचतात. **नाटसाला** – नाट्यगृह. **पिआ** – प्याला. **थिआ** – झाले होते.

भावार्थ : जीव मनात येईल तसे करतो. हेच मन पाप–पुण्याच्या गोष्टी सांगते. हे मन मायेत मस्त होऊन राहते आणि कितीही माया गोळा केली तर त्याचे समाधान होत नाही. पण मनात सत्यरूप प्रभू परमात्म्याचा वास झाल्यानेच तृप्ती व मुक्ती प्राप्त होते. ॥ १ ॥ हे जीवा ! तू हे जाण की हे शरीर, धन, पत्नी ही सारी मायेचीच रूपे आहेत. अंति प्रभुनामाशिवाय अन्य काहीही बरोबर येणार नाही ॥ १ ॥ रहाउ ॥ या सत्ता, संपत्तीच्या उपभोगाने मन खुष होणार असेल, तरी हे सारे नश्वर आहे. ही धनसंपत्ती मेल्यावर इतरांचीच होणार आहे व हा देह अखेर मातीचा ढिगाराच होणार आहे. हा सारा जगाचा पसारा अखेर केवळ मातीचा आहे व अखेर मातीलाच मिळणार आहे. प्रभुनामाशिवाय मनाला लागलेला मळ नष्ट होत नाही. ॥ २ ॥ प्रभुप्रेमाशिवाय संगीताचे ध्वनी, राग, ताल, सारे व्यर्थ आहे. कारण त्यातून त्रिगुणरूपी मायेचीच उत्पत्ती होते. त्यामुळे द्वैतभाव, दुर्मती, दुःख नष्ट होत नाही. प्रभुनाम हेच त्यावर औषध आहे. सतगुरूने दाखवलेल्या मार्गाने गेल्यानेच मुक्ती प्राप्त होते. ॥ ३ ॥ पांढरेशुभ्र धोतर, गळ्यात माळा, कपाळाला गंध असा बाह्यवेश केला तरी जोपर्यंत मनात क्रोध आहे, तोपर्यंत अशा माणसाने केलेला धर्मोपदेश हा निव्वळ रंगभूमीवरील अभिनयच वाटतो. असे लोक प्रभुनामास विसरून मायारूपी मद्य प्राशन करून मत्त होतात. प्रभुभक्तीशिवाय सुखाची प्राप्ती होत नाही. ॥ ४ ॥

सूकर सुआन गरधभ मंजारा ॥ पसू मलेछ नीच चंडाला ॥
गुर ते मुहु फेरे तिन्ह जोनि भवाईऐ ॥ बंधनि बाधिआ आईऐ जाईऐ ॥ ५ ॥
गुर सेवा ते लहै पदारथु ॥ हिरदै नामु सदा किरतारथु ॥
साची दरगह पूछ न होइ ॥ माने हुकमु सीझै दरि सोइ ॥ ६ ॥
सतिगुरु मिलै त तिस कउ जाणै ॥ रहै रजाई हुकमु पछाणै ॥
हुकमु पछाणि सचै दरि वासु ॥ काल बिकाल सबदि भए नासु ॥ ७ ॥
रहै अतीतु जाणै सभु तिस का ॥ तनु मनु अरपै है इहु जिसका ॥
ना ओहु आवै ना ओहु जाइ ॥ नानक साचे साचि समाइ ॥ ८ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३२)

शब्दार्थ : **सुकर** – डुक्कर. **सुआन** – कुत्रा. **मंजारा** – मांजर. **पसु** – पशु. **मलेछ** – म्लेंछ. **भवाइऐ** – फिरवतो. **लहै** – प्राप्त होते. **किरतारथू** – कृतार्थ, सफल. **दरगह** – प्रभू दरबार. **सीझै** – सफल. **रजाइ** – प्रभूची आज्ञा. **काल** – . **निकाल** – . **अतितु** – अलिप्त. **आहू** – तो.

भावार्थ : ज्याप्रमाणे पशूंमध्ये डुक्कर, कुत्रा, मांजर आदी नीच योनी आहेत, त्याप्रमाणे माणसात म्लेंच्छ व

चांडाळ ह्या नीच योनी गणल्या जातात. जे आपले तोंड प्रभूपासून दूर करतात ते नीच योनीत फिरत राहतात. ते मायेच्या बंधनात बांधले जाऊन वारंवार जन्मतात आणि मरतात. ॥ ५ ॥ सतगुरूची सेवा केल्याने प्रभुनामाची प्राप्ती होते. हृदयात नामाचा वास झाला की जीवन कृतार्थ होते. सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या दरबारात त्याच्या पापपुण्याचा जाब विचारला जात नाही. जो प्रभू परमात्म्याच्या आज्ञेत राहतो त्यास प्रभू दरबारात स्थान प्राप्त होते. ॥ ६ ॥ ज्यास सतगुरू प्राप्त झाला तो प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करतो. तो प्रभू परमात्म्याची आज्ञा जाणून त्याची इच्छा मान्य करतो व त्याप्रमाणे आचरण करतो. ज्याने प्रभू परमात्म्याची आज्ञा जाणली, त्यास सत्यरूप प्रभूच्या दरबारात स्थान प्राप्त होते. प्रभुनामामुळे जन्ममृत्यूचे भय नष्ट होते. ॥ ७ ॥ ज्याने प्रभू परमात्म्यास जाणले तो ह्या संसाराच्या मायापाशातून अलिप्त राहतो. ज्याने आपले तन, मन प्रभुचरणी अर्पण केले आहे, तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. नानक सांगतात, असा जीव सत्यरूप प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. ॥ ८ ॥ २ ॥

बिलावलु महला ३ असटपदी घरु १०

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

जगु कऊआ मुखि चुंच गिआनु ॥ अंतरि लोभु झदू अभिमानु ॥
बिनु नावै पाजु लहगु निदानि ॥ १ ॥
सतिगुर सेवि नामु वसै मनि चीति ॥
गुरू भेटे हरि नामु चेतावै बिनु नावै होर झूठु परीति ॥ १ ॥ रहाउ ॥
गुरि कहिआ सा कार कमावहु ॥ सबदु चीन्हि सहज घरि आवहु ॥
साचै नाइ वडाई पावहु ॥ २ ॥
आपि न बूझै लोक बुझावै ॥ मन का अंधा अंधु कमावै ॥
दरु घरु महलु ठउरू कैसे पावै ॥ ३ ॥
हरि जीउ सेवीऐ अंतरजामी ॥ घट घट अंतरि जिस की जोति समानी ॥
तिसु नालि किआ चलै पहनामी ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३२)

शब्दार्थ : **कऊआ** – कावळा. **चुंच** – चोच. **झुठु** – खोटा. **अभिमानु** – अहंकार. **पाजू** – पाखंडी. **लहगु** – उघड होते. **निदानि** – शेवटी. **चेतावे** – चिंतन करतो. **परीति** – प्रीती. **चीन्हि** – चिंतन केल्याने, ज्ञान प्राप्त केल्याने. **वडाई** – महती. **पावहु** – प्राप्त होते. **आपि** – स्वत:. **भउरू** – स्थान. **समानी** – सामावलेली. **किआ** – कोणतीही. **चलै** – चालणे. **पहनामी** – लपवा छपवी.

भावार्थ : जगातील लोक कावळ्यासारखे आहेत. त्यांच्या मुखी ज्ञानाची भाषा असते. पण अंतरात लोभ व वृथा अभिमान असतो. पण त्यांच्या अंत:करणात प्रभुनाम नसल्याने त्यांचे हे पाखंड अंति उघड होते. ॥ १ ॥ सतगुरूची सेवा केल्याने मनात, चित्तात प्रभुनामाचा वास होतो. सतगुरू भेटल्याने प्रभुनाम हृदयात दृढ होते.

नामाशिवाय अन्य कशावरही केलेले प्रेम हे खोटे असते. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! तू सतगुरू सांगेल ते काम कर. त्यामुळे तू प्रभुनामाद्वारे प्रभू परमात्म्यास जाणशील व सहजसमाधी प्राप्त करशील. सत्यरूप प्रभुनामामुळेच जीवास महत्त्व प्राप्त होते. ॥ २ ॥ स्वेच्छाचारी जीव स्वत: काहीही जाणत नाही व इतरांना मात्र ज्ञानाच्या गोष्टी सांगतो. असा मनाने अंध असलेला अंधत्वच उत्पन्न करतो. अशा जीवास प्रभुद्वारी, प्रभू दरबारी स्थान कसे प्राप्त होणार ? ॥ ३ ॥ हे जीवा ! त्या अंतर्यामी प्रभू परमात्म्याची सेवा कर. त्याचीच ज्योत प्रत्येक जीवाच्या अंतरात सामावलेली आहे. त्याच्यापासून कोणतीही गोष्ट लपवता येत नाही. ॥ ४ ॥

साचा नामु साचै सबदि जानै ॥ आपै आपु मिलै चूकै अभिमानै ॥
गुरमुखि नामु सदा सदा वखानै ॥ ५ ॥
सतिगुरि सेविऐ दूजी दुरमति जाई ॥ अउगण काटि पापा मति खाई ॥
कंचन काइआ जोती जोति समाई ॥ ६ ॥
सतिगरि मिलिऐ वडी वडिआई ॥ दुखु काटै हिरदै नामु वसाई ॥
नामि रते सदा सुखु पाई ॥ ७ ॥
गुरमति मानिआ करणी सारु ॥ गुरमति मानिआ मोख दुआरु ॥
नानक गुरमति मानिआ परवारै साधारु ॥ ८ ॥ १ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३३)

शब्दार्थ : **साचे नामु** – सत्यरूप प्रभुनाम. **साचै सबदि** – सतगुरूच्या उपदेशाने. **अभिमानै** – अहंकार. **तखानै** – कथन करतो. **पापा** – पापी. **मति** – बुद्धी. **खाइ** – नष्ट होते. **सारु** – श्रेष्ठ.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाने सत्यरूप प्रभुनामाचे ज्ञान प्राप्त होते. जीवाची आत्मज्योत परमात्म्याच्या परमज्योतीत सामावून जाते व जीवाचा अहंकार गळून पडतो. असा जीव गुरुमार्गी होऊन सदैव प्रभुनामाचा उच्चार करतो. ॥ ५ ॥ सतगुरूची सेवा केल्याने द्वैतभाव, दुर्बुद्धी नष्ट होते. अवगुण निघून जातात. पापवासना नष्ट होते. शरीर तेजस्वी होते. आत्मज्योत प्रभूच्या परमज्योतीत विलीन होते. ॥ ६ ॥ सतगुरू प्राप्त झाल्याने जीवास महत्त्व प्राप्त होते. हृदयात प्रभुनामाचा वास झाल्याने भवदु:ख नष्ट होते. जो प्रभुनामात रंगून गेला त्याला सर्व सुखे प्राप्त होतात. ॥ ७ ॥ सतगुरूचा उपदेश मान्य करून त्याप्रमाणे आचरण केल्याने जीवनाच्या अंतिम तत्त्वाची जाण येते. म्हणून असे आचरण श्रेष्ठ आचरण होय. जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो. त्यास मोक्षाचे दार उघडले जाते. नानक सांगतात, असा जीव आपल्या परिवाराचा भक्कम आधार बनतो.॥८॥१॥३॥

बिलावलु महला ४ असटपदीआ घरु ११

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

आपै आपु खाइ हउ मेटै अनदिनु हरि रस गीत गवईआ ॥
गुरमुखि परचै कंचन काइआ निरभउ जोती जोति मिलईआ ॥ १ ॥

मै हरि हरि नामु अधारु रमईआ ॥
खिनु पलु रहि न सकउ बिनु नावै गुरमुखि हरि हरि पाठ पड़ईआ ॥ १ ॥ रहाउ ॥
एकु गिरहु दस दुआर है जा के अहिनिसि तसकर पंच चोर लगईआ ॥
धरमु अरथु सभु हिरि ले जावहि मनमुख अंधुले खबरि न पईआ ॥ २ ॥
कंचन कोटू बहु माणकि भरिआ जागे गिआन तति लिव लईआ ॥
तसकर हेरू आइ लुकाने गुर कै सबदि पकड़ि बंधि पईआ ॥ ३ ॥
हरि हरि नामु पोतु बोहिथा खेवटु सबदु गुरु पारि लंघईआ ॥
जमु जागाती नेड़ि न आवै ना को तसकरु चोरु लगईआ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३३)

शब्दार्थ : **खाइ** – खाऊन टाक, नष्ट कर. **परचै** – परिचय, अनुभूती. **अधारु** – आधार. **पडईआ** – शिकवला. **गिरहु** – घर. **खबरि** – पत्ता, ज्ञान. **जागै** – जागा हो. **तति** – परमतत्त्व. **हेरू** – लुटारू. **लुकाने** – लपून. **पोतु** – . **बोहिथा खेवटु** – नावाडी. **जमु** – यम. **जागाती** – जकात घेणारा. **नेडि** – जवळ.

भावार्थ : हे जीवा ! तू आपला अहंभाव व अहंकार टाकून दे व सदैव हरिनामाचे गीत गा. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने परमतत्त्वाची अनुभूती प्राप्त होईल व शरीर सोन्यासारखे देदीप्यमान व निर्भय होऊन आत्मज्योत परमज्योतीत विलीन होईल. ॥ १ ॥ मला सर्वत्र रममाण असणाऱ्या प्रभू परमात्म्याचाच आधार आहे. मी प्रभुनामाशिवाय क्षणभरही राहू शकत नाही. सतगुरूनेच मला हरिनामाचा धडा शिकवला आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ शरीररूपी घराला दहा इंद्रियरूपी दारे आहेत. त्यांच्या माध्यमातून कामक्रोधादी पंचविकाररूपी चोर रात्रंदिवस जीवास लुटत असतात. ते जीवाची धर्मअर्थाची कमाई लुटून नेतात. स्वेच्छाचारी जीवास त्याचा पत्तासुद्धा लागत नाही. ॥ २ ॥ हे शरीर हा एक सुवर्णदुर्ग आहे. ते अनेक रत्नामाणकांनी भरलेले आहे. क्वचित कोणी ज्ञानी हे श्रेष्ठत्व जाणतो व प्रभू परमात्म्याच्या ठायी आपले चित्त एकाग्र करतो. वासनाविकाररूपी चोर, लुटारू ह्या शरीरात लपून बसले आहेत. पण जागृत व्यक्ती सतगुरूच्या उपदेशाने प्रभुनामाच्या साहाय्याने त्यांना पकडून बांधून ठेवतो. ॥ ३ ॥ प्रभुनाम हे भवसागर पार करून नेणारे जहाज आहे. शब्दगुरू हा नावाडी आहे. तो जीवास पार करून नेतो. अशा प्रभुभक्ताच्या जवळपासही यम फिरकत नाही व कोणीही चोर लुटारू त्यास लुटू शकत नाहीत. ॥ ४ ॥

हरि गुण गावै सदा दिनु राती मै हरि जसु कहते अंतु न लहीआ ॥
गरमुखि मनूआ इकतु घरि आवै मिलउ गोपाल नीसानु बजईआ ॥ ५ ॥
नैनी देखि दरसु मनु त्रिपतै स्त्रवन बाणी गुर सबदु सुणईआ ॥
सुनि सुनि आतमदेव है भीने रसि रसि राम गोपाल रवईआ ॥ ६ ॥
त्रैगुण माइआ मोहि विआपे तुरीआ गुणु है गुरमुखि लहीआ ॥
एक द्रिसटि सभ सम करि जाणै नदरी आवै सभु ब्रहमु पसरईआ ॥ ७ ॥
राम नामु है जोति सबाई गुरमुखि आपे अलखु लखईआ ॥
नानक दीन दइआल भए है भगति भाइ हरि नामि समईआ ॥ ८ ॥ १ ॥ ४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८३३)

शब्दार्थ : **लहिआ** – प्राप्त होणे. **इकतु** – एकमेव. **निसानु** – डंका. **बजईआ** – वाजतो. **भीने** – भिनले, तृप्ती. **खइआ** – उच्चारणे. **तूरीआ** – तूर्यावस्था, चतुर्थावस्था. **पसरिआ** – पसारा. **सबाई** – सर्वत्र, सर्वांमध्ये. **अलखु** – अलक्ष्य. **लखईआ** – दाखवले.

भावार्थ : मी रात्रंदिवस प्रभूचे गुण गातो, हरियश गातो पण तरीही मला त्याचे पूर्ण ज्ञान झाले नाही. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने मन प्रभुरूपात एकाग्र होते व ते प्रभुनामाचा डंका वाजवते. ॥ ५ ॥ डोळ्यांनी प्रभुदर्शन करून मन तृप्त होते. सतगुरूकडून प्रभुनाम ऐकून कान तृप्त होतात. प्रभुनामाचे सतत श्रवण करून आत्मा प्रसन्न होतो व त्या आनंदात रममाण होऊन जीव प्रभू परमात्म्याचे स्मरण करतो. ॥ ६ ॥ जीव त्रिगुणात्मक मायेने व्याप्त असतो पण सतगुरूच्या आदेशाने त्यापलीकडे असलेली चतुर्थावस्था, तूर्यावस्था प्राप्त होते. असा जीव सर्वांकडे समदृष्टीने पाहतो. त्यास कळून येते की सृष्टीचा महापसारा हा त्या परब्रह्माचाच पसारा आहे. सर्वत्र तो एकच प्रभू भरलेला आहे. ॥ ७ ॥ सर्व जीवांमध्ये त्या एकमेव रामाची ज्योत वास करते. सतगुरूच्या मार्गाने जाऊन त्या अलक्ष्य परमेश्वराचे दर्शन होते. नानक सांगतात, तो प्रभू परमात्मा दीनांवर दया करतो व भक्तीच्या मार्गाने जाऊन त्याच्याशी एकरूप होता येते. ॥ ८ ॥ १ ॥ ४ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

हरि हरि नामु सीतल जलु धिआवहु हरि चंदन वासु सुगंध गंधईआ ॥
मिलि सतसंगति परम पदु पाइआ मै हिरड पलास संगि हरि बुहीआ ॥ १ ॥
जपि जगंनाथ जगदीस गुसईआ ॥
सरणि परे सेई जन उबरे जिउ प्रहिलाद उधारि समईआ ॥ १ ॥ रहाउ ॥
भार अठारह महि चंदनु ऊतम चंदन निकटि सभ चंदनु हुईआ ॥
साकत कूड़े ऊभ सुक हूए मनि अभिमानु विछुड़ि दूरि गईआ ॥ २ ॥
हरि गति मिति करता आपे जाणै सभ बिधि हरि हरि आपि बनईआ ॥
जिसु सतिगुरु भेटे सु कंचनु होवै जो धुरि लिखिअ सु मिटै न मिटईआ ॥ ३ ॥
रतन पदारथ गुरमति पावै सागर भगति भंडार खुल्हईआ ॥
गुरचरणी इक सरधा उपजी मै हरि गुण कहते त्रिपति न भईआ ॥ ४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८३३)

शब्दार्थ : **धिआवहु** – ध्यान करा. **गंधाइआ** – गंधित होतो. **हिरड** – एरंड. **पलास** – पळस. **बुहीआ** – सुगंधित. **गुसईआ** – पृथ्वीपती, गोस्वामी. **उबरे** – उद्धार झाला, वाचला. **कूडे** – खोटे. **सुक** – शुष्क, वाळले. **ऊभ** – उभ्यानेच. **विछुडि** – दूर. **खुल्हइआ** – उघडते. **सरधा** – श्रद्धा. **उपजी** – उपजली, निर्माण झाली. **भइआ** – झालो.

भावार्थ : प्रभुनाम हे थंड जलाप्रमाणे आत्म्याला शांती देते. तर प्रभू हा चंदनासाररखा मन सुगंधित करणारा आहे. मी संतसंगतीत राहिल्यामुळे परमपद प्राप्त केले. वास्तविक मी एरंड किंवा पळसासारखा निरुपयोगी क्षुद्र जीव.

पण संतसंगतीने माझे जीवन सुगंधित झाले. ॥ १ ॥ हे जीवा ! तू जगाचा नाथ असलेल्या जगदीशाला शरण जा. ज्याप्रमाणे भक्त प्रल्हाद प्रभू परमात्म्यास शरण गेल्याने त्याचा उद्धार झाला व प्रभुरूपात सामावून गेला त्याप्रमाणे तूही प्रभू परमात्म्यास शरण जा. तुझाही उद्धार होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ सृष्टीतील सर्व वृक्षात चंदनवृक्ष श्रेष्ठ आहे. कारण चंदनाच्या संगतीत असणाऱ्या प्रत्येक वृक्षास चंदनाचा सुवास प्राप्त होतो. भाव संतजनांच्या संगतीत असणाऱ्या प्रत्येक जीवास संतत्वाचे गुण प्राप्त होतात. प्रभू परमात्म्यापासून दूर गेलेले शाक्त मात्र नष्ट होतात. कारण त्यांच्या मनात अहंकार भरलेला असतो. त्यामुळे ते प्रभू परमात्म्यापासून दूर जातात. ॥ २ ॥ तो कर्ता प्रभू प्रत्येक जीवास काय हवे, काय नको ते सर्व जाणतो. कारण त्यानेच तर सर्व जीव निर्माण केले आहेत. ज्यास सतगुरू भेटतो त्याच्या जीवनाचे सोने होते. ज्याच्या भाग्यात जे लिहिले असेल ते कोणीही पुसू शकत नाही. ॥ ३ ॥ सतगुरूच्या उपदेशाने जीवास प्रभुनामरूपी रत्न प्राप्त होते. त्याच्यापुढे सतगुरु भक्तीचे भांडारच उघडून ठेवतो. आता माझ्या मनात सतगुरूमुळे प्रभुचरणाविषयी श्रद्धा निर्माण झाली आहे व कितीही वेळ मी प्रभुनामाचे स्मरण केले तरी मन तृप्त होत नाही. म्हणून मी सदैव प्रभुनामातच दंग होऊन राहतो. ॥ ४ ॥

परम बैरागु नित नित हरि धिआए मै हरि गुण कहते भावनी कहीआ ॥
बार बार खिनु खिनु पलु कहीऐ हरि पारु न पावै परै परईआ ॥ ५ ॥
सासत बेद पुराण पुकारहि धरमु करहु खटु करम द्रिड़ईआ ॥
मनमुख पाखंडि भरमि विगूते लोभ लहरि नाव भारि बुडईआ ॥ ६ ॥
नामु जपहु नामे गति पावहु सिम्रिति सासत्र नामु द्रिड़ईआ ॥
हउमै जाइ त निरमलु होवै गुरमुखि परचै परम पदु पईआ ॥ ७ ॥
इहु जगु वरनु रूपु सभु तेरा जितु लावहि से करम कमईआ ॥
नानक जंत वजाए वाजहि जितु भावै तितु राहि चलईआ ॥ ८ ॥ २ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३४)

शब्दार्थ : **बैरागु** – वैराग्य. **भावनी** – श्रद्धेने, भक्तिभावाने. **परैपरइआ** – परात्पर. **खटु करम** – षट्कर्म. **विगुते** – नष्ट होतात. **बुडइआ** – बुडते. **भारि** – वजनाने जड होऊन. **हउमै** – अहंकार. **परचै** – तृप्त होते, संतुष्ट होते. **वरनु** – वर्ण, रंग. **जंत** – वाद्य. **वजाए** – वाजवणारे, वाजवल्याने. **वाजहि** – वाजते. **राहि** – मार्ग. **चलाइआ** – चालतो.

भावार्थ : प्रभू परमात्म्याचे सदैव नामस्मरण केल्याने मनात सांसारिक गोष्टीविषयी परमवैराग्य उत्पन्न होते. हरीचे गुण गाऊन जीव आपल्या मनातील श्रद्धाच प्रगट करतात. वारंवार क्षणोक्षणी प्रभू परमात्म्याच्या गुणांचे वर्णन केले तरी परमात्म्याचा पार लागत नाही. तो अनंत आहे. अपरंपार आहे. ॥ ५ ॥ वेद, शास्त्रे, पुराणे उच्च स्वराने धर्म व षट्कर्मे करावयास सांगत आहेत पण मनाच्या अधीन झालेला जीव पाखंडात भ्रमित होऊन लोभाच्या मोहाने जड होऊन भवसागरात बुडून नष्ट होतात. ॥ ६ ॥ हे जीवा ! तू नामस्मरण कर. नामामुळेच परमगती, मोक्ष प्राप्त होतो. स्मृतिशास्त्रे प्रभुनामच मनात दृढ करण्यास शिकवतात. अहंकार नष्ट झाला की मन निर्मळ होते. सतगुरूच्या उपदेशाने मन तृप्त हाते व जीवास परमपद प्राप्त होते. ॥ ७ ॥ हे जग, वर्ण सारे काही तुझेच रूप

आहे. तू जीवास जे कर्म करावयास सांगतोस तेच कर्म ते करतात. नानक सांगतात, हा जीव हे एक वाद्य आहे. वाजवणारा तो प्रभू परमात्मा आहे. तो जसे वाजवील तसे स्वर त्यातून उमटतात. तो ज्या मार्गाने जावयास सांगेल त्याच मार्गाने मी जातो. ॥ ८ ॥ २ ॥ ५ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

गुरमुखि अगम अगोचरु धिआइआ हउ बलि बलि सतिगुर सति पुरखईआ ॥
राम नामु मेरै प्राणि वसाए सतिगुर परसि हरि नामि समईआ ॥ १ ॥
जन की टेक हरि नामु टिकईआ ॥
सतिगुर की धर लागा जावा गुर किरपा ते हरि दरु लहीआ ॥ १ ॥ रहाउ ॥
इहु सरीरु करम की धरती गुरमुखि मथि मथि ततु कढईआ ॥
लालु जवेहर नामु प्रगासिआ भांडै भाउ पवै तितु अईआ ॥ २ ॥
दासनि दास दास होइ रहीऐ जो जन राम भगत निज भईआ ॥
मनु बुधि अरपि धरउ गुर आगै गुर परसादी मै अकथु कथईआ ॥ ३ ॥
मनमुख माइआ मोह विआपे इहु मनु त्रिसना जलत तिखईआ ॥
गुरमति नामु अंम्रित जलु पाइआ अगनि बुझी गुरसबदि बुझईआ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३४)

शब्दार्थ : **पुरखईआ** – पुरुष. **वसाए** – वसवले. **परसि** – स्पर्शाने. **टेक** – आधार. **टिकाइआ** – स्थिर केले. **धर** – आधार. **लागा जावा** – लागून राहावे. **मथि** – घुसळून. **कढईआ** – काढले. **ततु** – तत्व. **भांडे** – अंत:करण. **भाउ** – भक्तिभाव. **तिखईआ** – तृषार्त. **बुझईआ** – विझली, निमाली.

भावार्थ : मी गुरुमार्गी होऊन अगम्य अगोचर प्रभू परमात्म्याचे स्मरण करतो. मी सतगुरूरूपी सतपुरुषावर माझे सर्वस्व समर्पित करतो. सतगुरूनेच माझ्या मनात हरिनाम दृढ केले. सतगुरूच्या स्पर्शाने मी हरिनामाशी एकरूप झालो. ॥ १ ॥ सतगुरूने प्रभुसेवकांचा आधार असलेले प्रभुनाम माझ्या मनात स्थिर केले. हे जीवा ! तू सतगुरूचा आधार घे. तसे केल्याने तू प्रभुद्वारी पोहोचशील. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे शरीर कर्मभूमी आहे. गुरुमार्गी चालून मनात प्रभुनामाचे चिंतन केल्याने परमतत्त्वाचे ज्ञान प्राप्त होते. हृदयात रत्नरूपी प्रभुनाम प्रगट झाल्यावर मनात भक्तिभाव उत्पन्न होतो. ॥ २ ॥ जे भक्त प्रत्यक्ष प्रभू परमात्म्यास प्रिय झाले त्यांचे दासानुदास होऊन राहावे. सतगुरुचरणी मन, बुद्धी अर्पण करावी. सतगुरुकृपेने मी त्या अवर्णनीय प्रभूचे वर्णन करण्याची पात्रता प्राप्त केली. ॥ ३ ॥ मनमुखी जीव मोहमायेने व्यापल्याने विकारांच्या तृष्णेत जळत असतात. सतगुरूच्या उपदेशाने नामरूपी अमृत प्राप्त झाल्याने ती तृष्णा विझून गेली. शब्दगुरूनेच ती विझवली. ॥ ४ ॥

इहु मनु नाचै सतिगुर आगै अनहद सबद धुनि तूर वजईआ ॥
हरि हरि उसतति करै दिनु राती रखि रखि चरण हरि ताल पूरईआ ॥ ५ ॥
हरि कै रंगि रता मनु गावै रसि रसाल रसि सबदु रवईआ ॥

निज घरि धार चुऐ अति निरमल जिनि पीआ तिन ही सुखु लहीआ ॥ ६ ॥
मन हठि करम करै अभिमानी जिउ बालक बालू घर उसरईआ ॥
आवै लहरि समुंद सागर की खिन महि भिंन भिंन ढहि पईआ ॥ ७ ॥
हरि सरु सागरु हरि है आपे इहु जगु है सभु खेलु खेलईआ ॥
जिउ जल तरंग जलु जलहि समावहि नानक आपे आपि रमईआ ॥ ८ ॥ ३ ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३४)

शब्दार्थ : **तूर** – ध्वनी. **वजईआ** – वाजतो. **उसतति** – स्तुती. **तालपुरईआ** – तालावर नाचतो. **खईआ** – उच्चार करतो. **धारचुऐ** – धार वाहाते. **लहिआ** – प्राप्त केले. **उसराईआ** – बनवतो. **सरु** – सरोवर.

भावार्थ : हे माझे मन सतगुरूभोवती रुंजी घालते. माझ्या अंतरात शब्दगुरूचा अनाहत ध्वनी सदैव निनादत असतो. माझे मन रात्रंदिवस सदैव प्रभूस्तुती करत त्याच्यापुढे ताल धरून नाचत असते. ॥ ५ ॥ माझे मन हरिरंगात रंगून गेले आहे. माझी रसना हरिरसात रंगून प्रभुनामाचा उच्चार करते. माझ्या अंत:करणात प्रभुनामामृताची अत्यंत निर्मल धार वाहत आहे. ते नामामृत प्राशन करून मी सुख प्राप्त केले आहे. ॥ ६ ॥ मनाच्या हट्टापायी अहंकारे कर्म करणे हे लहान मुलाने वाळूचा किल्ला उभारण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे सागराच्या लाटेने तो किल्ला क्षणात ढासळून पडतो, त्याप्रमाणेच मनाच्या हट्टाने केलेले काम निष्फळ ठरते. ॥ ७ ॥ प्रभू परमात्मा सर्व सुखाचा सागर आहे. त्यानेच हा संसाररूपी खेळ मांडला आहे व तोच तो खेळ खेळत आहे. ज्याप्रमाणे सागरात उठणारे जलतरंग अखेर सागरातच विलीन होतात, त्याप्रमाणे प्रभूनेच निर्माण केलेला हा संसार अंती प्रभू परमात्म्यातच विलीन होतो असे नानक सांगतात. ॥ ८ ॥ ३ ॥ ६ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

सतिगुरु परचै मनि मुंद्रा पाई गुर का सबदु तनि भसम द्रिड़ईआ ॥
अमर पिंड भए साधू संगि जनम मरण दोऊ मिटि गईआ ॥ १ ॥
मेरे मन साध संगति मिलि रहीआ ॥
क्रिपा करहु मधसूदन माधउ मै खिनु खिनु साधू चरण पखईआ ॥ १ ॥ रहाउ ॥
तजै गिरसतु भइआ बनवासी इकु खनु मनूआ टिकै न टिकईआ ॥
धावतु धाइ तदे घरि आवै हरि हरि साधू सरणि पवईआ ॥ २ ॥
धीआ पूत छोडि संनिआसी आसा आस मनि बहुतु करईआ ॥
आसा आस करै नही बूझै गुर कै सबदि निरास सुखु लहीआ ॥ ३ ॥
उपजी तरक दिगंबरु होआ मनु दहदिस चलि चलि गवनु करईआ ॥
प्रभवनु करै बूझै नही त्रिसना मिलि संगि साथ दइआ धरु लहीआ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३५)

शब्दार्थ : **परचै** – प्रसन्न होणे. **पिंड** – शरीर. **पखइआ** – प्रक्षालन करतो. **गिरसतु** – गृहस्थधर्म. **तदै** – तेव्हा. **धीआ** – कन्या. **पूत** – पुत्र. **छोडि** – सोडून. **आसा** – आशा. **तरक** – तर्क. **दिगंबर** – नग्न. **होआ** – झाला. **गवनु** – भटकते. **प्रभवनु** – भ्रमण.

भावार्थ : सतगुरू प्रसन्न होऊन त्याने दिलेली ज्ञानरूपी मुद्रा मी कानात घातली. सतगुरूकडून प्राप्त झालेले प्रभुनामरूपी भस्म अंगास लावले. त्यामुळे माझे मन प्रभुभक्तीत दृढ झाले. साधुसंतांच्या संगतीने मी अमर झालो. माझी जन्म व मृत्यू दोघांतूनही सुटका झाली. ॥ १ ॥ हे माझ्या मना तू सदैव साधुसंतांच्या संगतीत एकरूप होऊन राहा. हे प्रभो माधवा, मधुसूदना ! माझ्यावर कृपा कर व मी साधुसंतांचे सदैव पादप्रक्षालन करावे अशी मला बुद्धी दे. ॥ १ ॥ रहाउ ॥ घरदार सोडून वनवासी बनले तरी मन एक क्षणभरही स्थिर राहत नाही. ते सदैव धावतच असते. मनाचे संकल्प-विकल्प चालूच असतात. साधूसंतांच्या चरणी शरण गेल्यानेच मनाची धावाधाव शांत होते व मन स्थिर होते. ॥ २ ॥ मुले बाळे सोडून संन्यास घेतला तरी मनात नाना आशा, आकांक्षा उत्पन्न होतच असतात. सतगुरूच्या उपदेशाने मन आशा-आकांक्षापासून मुक्त होते. निरासक्त होते व सुख प्राप्त करते. मनात संसाराप्रती घृणा पैदा होऊन एखादा मनुष्य दिगंबरपंथी झाला तरीही त्याचे मन दाही दिशांना भटकतच राहते. तो परिव्राजक बनून भ्रमण करीत राहिला तरी त्याच्या मनातील तृष्णा शांत होत नाही. पण साधुसंतांची संगत प्राप्त झाल्यावर त्याच्या मनात दयाबुद्धी उत्पन्न होते. ॥ ४ ॥

आसण सिध सिखहि बहुतेरे मनि मागहि रिधि सिधि चेटक चेटकईआ ॥
त्रिपति संतोखु मनि सांति न आवै मिलि साधू त्रिपति हरि नामि सिधि पईआ ॥ ५ ॥
अंडज जेरज सेतज उतभुज सभि वरन रूप जीअ जंत उपईआ ॥
साधू सरणि परै सो उबरै खत्री ब्राहमणु सूदु वैसु चंडालु चंडईआ ॥ ६ ॥
नामा जैदेउ कंबीरु त्रिलोचनु अउजाति रविदासु चमिआरु चमईआ ॥
जो जो मिलै साधू जन संगति धनु धंना जटु सैणु मिलिआ हरि दईआ ॥ ७ ॥
संत जना की हरि पैज रखाई भगति वछलु संगीकारु करईआ ॥
नानक सरणि परे जगजीवन हरि हरि किरपा धारि रखईआ ॥८ ॥ ४ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३५)

शब्दार्थ : **सिध** – सिद्ध. **सिखहि** – शिकतात. **मागहि** – मागतात. **चेटक** – चेटूक. **चेटकाइ**– जादूटोणा, जारणमारण विद्या. **उपइआ** – उत्पन्न केले. **सूदु** – शूद्र. **वैसु** – वैश्य. **चंडालु** – चांडाळ. **अउजानि** – अजातीय, नीच जातीचा. **चगइआ** – चांभार. **धनु** – धन्य. **जटु** – जाट.

भावार्थ : सिद्ध लोक नाना तऱ्हेची योग साधना शिकून त्याद्वारा ऋद्धी, सिद्धी, जारणमारण विद्या आदी प्राप्त करण्याची मनीषा बाळगतात. त्यामुळे त्यांना तृप्तता, संतोष, मन:शांती प्राप्त होत नाही. साधुसंतांची संगत प्राप्त झाल्यावर त्यांच्याकडून हरिनामाची सिद्धी प्राप्त करून मन तृप्त होते. ॥ ५ ॥ प्रभू परमात्म्याने अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज आदी योनी, नाना वर्ण, नाना रूपांचे जीवजंतू उत्पन्न केले. जे साधुसंतांना शरण गेले त्यांचा उद्धार झाला. मग ते ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाळ कोणीही असो. साधुसंतांना शरण जाणाऱ्याचा उद्धार होतो. ॥ ६ ॥ हेच पाहा ना ! नामदेव, जयदेव, कबीर, त्रिलोचन, नीच जातीचा रविदास चांभार धन्ना, जाट सेना जो जो

साधुसंतांना शरण गेला त्यांचा जन्म धन्य झाला. त्यांच्यावर प्रभू परमात्म्याने कृपा केली. ॥ ७ ॥ भक्तवत्सल प्रभू आपल्या सेवकांचा अंगीकार करून त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करतो. नानक सांगतात, मी जगजीवन प्रभू परमात्म्यास शरण गेलो व त्या परमात्म्याने माझ्यावर कृपा करून माझे रक्षण केले. ॥ ८ ॥ ४ ॥ ७ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥

अंतरि पिआस उठी प्रभ केरी सुणि गुरबचन मनि तीर लगईआ ॥
मन की बिरथा मन ही जाणै अवरु कि जाणै को पीर परईआ ॥ १ ॥
राम गुरि मोहनि मोहि मनु लईआ ॥
हउ आकल बिकल भई गुर देखे हउ लोट पोट होइ पईआ ॥ १ ॥ रहाउ ॥
हउ निरखत फिरउ सभि देस दिसंतर मै प्रभ देखन को बहुतु मनि चईआ ॥
मनु तनु काटि देउ गुर आगै जिनि हरि प्रभ मारगु पंथु दिखईआ ॥ २ ॥
कोई आणि सदेसा देइ प्रभ केरा रिद अंतरि मनि तनि मीठ लगईआ ॥
मसतकु काटि देउ चरणा तलि जो हरि प्रभु मेले मेलि मिलईआ ॥ ३ ॥
चलु चलु सखी हम प्रभु परबोधह गुण कामण करि हरि प्रभु लहीआ ॥
भगति वछलु उआ को नामु कहीअतु है सरणि प्रभू तिसु पाछै पईआ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३५)

शब्दार्थ : **पिआस** – तीव्र इच्छा, पिपासा. **बिरथा** – व्यथा. **पीर** – पीडा. **परईआ** – परक्याची. **आकल**– बेभान. **बिकल** – व्याकूळ. **लोटपोट** – आत्मविभोर. **फिरउ** – फिरलो. **दिसंतर** – दिशांतर. **चइआ** – इच्छा केली. **सदेसा** – संदेश. **परबोधह** – प्रबोधन करणे, समजावणे. **कामण** – जादू. **कहीअतु** – म्हणतात.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशरूपी तीराने माझे मन असे विद्ध केले आहे, की माझ्या मनात प्रभुमिलनाची तीव्र उत्कंठा उत्पन्न झाली आहे. मनाची व्यथा मनालाच कळते. अन्य परका ती कशी जाणणार ? ॥ १ ॥ हे राम ! मन मोहन गुरूने माझे मन मोहून गेले आहे. सतगुरूच्या दर्शनासाठी मी व्याकूळ झालो आहे. त्यापायी माझी शुद्ध हरपून गेली आहे. सतगुरूस पाहताच मी आत्मविभोर होऊन त्याच्या चरणी लोटांगण घातले. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझ्या मनात प्रभू दर्शनाची तीव्र ओढ निर्माण झाली आहे. त्याला शोधण्यासाठी मी दशदिशांना देशोदेशी हिंडलो आहे. पण मला त्याचे दर्शन झाले नाही. जो कोणी मला प्रभुप्राप्तीचा मार्ग दाखवेल त्याच्या चरणी मी माझे शिरकमल अर्पण करीन. ॥ २ ॥ जर कोणी मला प्रभू परमात्म्याचा संदेश आणून देईल तर मला फार आनंद होईल. जो माझे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवून आणील, त्याच्यापुढे मी माझे मस्तक काटून ठेवीन. ॥ ३ ॥ चल चल सखे आपण त्या प्रभूस चांगल्या प्रकारे समजावून घेऊ या व त्याच्या गुणगानरूपी जादूने त्यास प्राप्त करू या. त्याला सारेजण भक्तवत्सल म्हणतात. म्हणून तर मी त्यास शरण जाऊन त्याच्या मागे मागे फिरत आहे. ॥ ४ ॥

खिमा सीगार करे प्रभ खुसीआ मनि दीपक गुर गिआनु बलईआ ॥
रसि रसि भोग करे प्रभु मेरा हम तिसु आगै जीउ कटि कटि पईआ ॥ ५ ॥

हरि हरि हारु कंठि है बनिआ मनु मोतीचूरु वड गहन गहनईआ ॥
हरि हरि सरधा सेज विछाई प्रभु छोडि न सकै बहुतु मनि भईआ ॥ ६ ॥
कहै प्रभु अवरु अवरु किछु कीजै सभु बादि सीगारु फोकट फोकटईआ ॥
कीओ सीगारु मिलण कै ताई प्रभु लीओ सुहागनि थूक मुखि पईआ ॥ ७ ॥
हम चेरी तू अगम गुसाई किआ हम करह तेरै वस पईआ ॥
दइआ दीन करहु रखि लेवहु नानक हरि गुर सरणि समईआ ॥ ८ ॥ ५ ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३६)

शब्दार्थ : **खिमा** – क्षमा. **सीगार** – शृंगार. **खुसीआ** – प्रसन्न. **बलइआ** – प्रज्वलित केला. **हारु**– हार. **कंठी** – गळ्यात. **मोतीचूर** – मोत्याचा. **गहन** – ग्रहण. **गहनाईआ** – दागिना. **सरधा** – श्रद्धा. **फोकट** – व्यर्थ, वाया. **चेरी** – दासी. **वसि** – वश, शरण.

भावार्थ : क्षमेचा शृंगार केल्याने प्रभुपती प्रसन्न झाला व त्याने सतगुरुद्वारा माझ्या मनात ज्ञानदीप प्रज्वलित केला. माझा प्रभुपती अत्यंत प्रेमपूर्वक जीवरूपी स्त्री संगे रममाण होतो. हे माझ्या प्रभुपती मी तुझ्या चरणी माझे शिरकमल कापून ठेवते. ॥ ५ ॥ मी माझ्या गळ्यात हरिनामरूपी हार घातला आहे. प्रभुगुणांचे मोत्याचे दागदागिने घातले आहेत. प्रभुपतीवरील श्रद्धेची शय्या पसरली आहे. मी प्रभुपतीस सोडू शकत नाही. तो माझ्या मनात फार भरला आहे. ॥ ६ ॥ प्रभुपतीची इच्छा एक असते. तर जीवकामिनी दुसरेच काहीतरी करते, त्यामुळे तिचा सर्व शृंगार वाया जातो. प्रभुप्राप्तीसाठी अनेक जीवस्त्रिया नाना तऱ्हेचा शृंगार करतात पण जिच्या मनात प्रभुपतीविषयी खरे प्रेम आहे, तिचाच प्रभुपती स्वीकार करतो व तिला सौभाग्य प्रदान करतो. पाखंडी जीवस्त्रीचा धिक्कार करून तिला दूर सारतो. ॥ ७ ॥ हे प्रभो ! तू अगम्य आहेस. पृथ्वीचा पालक आहेस. मी तुझी क्षुद्र दासी आहे. मी तुला कोणत्या मार्गाने वश करू शकेन ? माझ्या हाती काय आहे ? माझे जीवन तुझ्याच हाती आहे. नानक सांगतात, हे प्रभो ! आम्हा दीनांवर दया कर व माझे रक्षण कर. मी तुला शरण आलो आहे. ॥८॥५॥८॥

॥ बिलावलु महला ४ ॥

मै मनि तनि प्रेमु अगम ठाकुर का खिनु खिनु सरधा मनि बहुतु उठईआ ॥
गुर देखे सरधा मन पूरी जिउ चात्रिक प्रिउ प्रिउ बूंद मुखि पईआ ॥ १ ॥
मिलु मिलु सखी हरि कथा सुनईआ ॥
सतिगुरु दइआ करे प्रभु मेले मै तिसु आगै सिरु कटि कटि पईआ ॥ १ ॥ रहाउ ॥
रोमि रोमि मनि तनि इक बेदन मै प्रभ देखे बिनु नीद न पाईआ ॥
बैदक नाटिक देखि भुलाने मै हिरदै मनि तनि प्रेम पीर लगईआ ॥ २ ॥
हउ खिनु पलु रहि न सकउ बिनु प्रीतम जिउ बिनु अमलै अमली मरि गईआ ॥
जिन कउ पिआस होइ प्रभ केरी तिन्ह अवरु न भावै बिनु हरि को दुईआ ॥ ३ ॥
कोई आनि आनि मेरा प्रभू मिलावै हउ तिसु विटहु बलि बलि घुमि गईआ ॥
अनेक जनम के विछुडे जन मेले जा सति सति सतिगुर सरणि पवईआ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३६)

शब्दार्थ : **जिउ** – ज्याप्रमाणे, जसे. **चात्रिक** – चातक. **रोमि रोमि** – रोमारोमात. **बेदन** – वेदना. **बैदक**– वैद्य. **नाटिक** – नाडी. **भुलाने** – कोड्यात पडले. **अमलै** – नशा, दारू. **अमली** – दारूडा, नाश करणारा. **भावै** – आवडणे. **दुईआ** – दुसरा. **विछुडे** – विरही, दूर गेलेले.

भावार्थ : माझ्या तनमनात प्रभुप्रेम वास करत आहे. माझ्या मनात क्षणोक्षणी प्रभू परमात्म्याविषयी श्रद्धा उत्पन्न झाली आहे. ज्याप्रमाणे चातक स्वाती नक्षत्राचे जलबिंदू प्राशन करून पियु पियु बोलतो. त्याप्रमाणे माझे मन गुरुदर्शनाने तृप्त होते. ॥ १ ॥ या सख्यांनो या, आपण एकत्र जमून हरिकथा ऐकूया. जर सतगुरू कृपा करील व माझे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवून आणील तर मी त्याच्या चरणी माझे मस्तक कापून ठेवीन. ॥ १ ॥रहाउ॥ माझ्या रोमरोमात, तनमनात एकच व्यथा छळत आहे. प्रभुदर्शनाशिवाय मला झोपही लागत नाही. वैद्याने माझी नाडीपरीक्षा केली पण त्याला माझी व्यथा कळलीच नाही. कारण ती शारीरिक व्यथा नव्हतीच. माझ्या हृदयास तनमनास प्रभुप्रेमाची, प्रभुविरहाची व्यथा जडली आहे. ॥ २ ॥ ज्याप्रमाणे दारूड्याला दारू प्याल्याशिवाय चैनच पडत नाही. व्यसनी माणसास व्यसन केल्याशिवाय चैन पडत नाही. त्याप्रमाणे प्रभुप्रेमाशिवाय मी एक क्षणभरही जगू शकत नाही. जो प्रभुप्रेमाचा भुकेला आहे त्यास हरीशिवाय अन्य कोणीही आवडत नाही. ॥ ३ ॥ कोणीतरी प्रभूस आणून त्याचे माझे मिलन घडवा हो ! असे करणाऱ्यावर मी वारंवार माझे सर्वस्व समर्पित करीन. जे सतगुरूला शरण जातात त्यांचा जन्मोजन्मीचा प्रभुविरह नष्ट होऊन त्यांचे प्रभूशी मिलन होते. ॥ ४ ॥

सेज एक एको प्रभु ठाकुरु महलु न पावै मनमुख भरमईआ ॥
गुरु गुरु करत सरणि जे आवै प्रभु आइ मिलै खिनु ढील न पईआ ॥ ५ ॥
करि करि किरिआचार वधाए मनि पाखंड करमु कपट लोभईआ ॥
बेसुआ कै घरि बेटा जनमिआ पिता ताहि किआ नामु सदईआ ॥ ६ ॥
पूरब जनमि भगति करि आए गुरि हरि हरि हरि हरि भगति जमईआ ॥
भगति भगति करते हरि पाइआ जा हरि हरि हरि हरि नामि समईआ ॥ ७ ॥
प्रभि आणि आणि महिंदी पीसाई आपे घोलि घोलि अंगि लईआ ॥
जिन कउ ठाकुरि किरपा धारी बाह पकरि नानक कढि लईआ ॥८॥६॥२॥१॥६॥९॥
(श्री गु. ग्रं. सा. ८३७)

शब्दार्थ : **सेज** – शय्या. **एको** – एकमेव. **भरमाइआ** – भटकतो. **ढीला** – उशीर. **किरिआचार**– कर्मकांड. **वधाए** – वाढवले. **लोभाइआ** – आसक्त झाला. **बेसुआ** – वेश्या. **ताहि** – त्याचा. **किआ** – कोणाचे. **जनईआ** – उत्पन्न केले. **जा** – जेव्हा. **घोलि** – वाटून. **लइआ** – लावली. **बाह** – बाहू, हात. **पकरि** – पकडून. **कढिलईआ** – बाहेर काढले.

भावार्थ : एकाच शरीररूपी शय्येवर आत्मा व परमात्मा रममाण होतात. पण मनमुखी आत्मा मात्र इतरत्र भटकत राहिल्याने त्यास परमात्म्याचा संग प्राप्त होत नाही. जी जीवस्त्री प्रभुपतीचे नामस्मरण करेल तिला क्षणाचाही विलंब न करता प्रभू मीलनाचे सौख्य प्राप्त होईल. ॥ ५ ॥ नाना कर्मकांडे करून जीव अधिकच पाखंड माजवतो व विकारात आसक्त होतो. त्यामुळे तो प्रभूस पारखा होतो. वेश्येच्या घरी पुत्र जन्मला, तरी कोणीही त्याचे

पितृत्व स्वीकारत नाही. त्या कर्मकांडाच्या भल्याबुऱ्या फळाची कोणीच जबाबदारी घेत नाही. ॥६॥ पूर्वजन्मीच्या सुकृतामुळे हा मानवजन्म प्राप्त झाला. भक्ती करून प्रभूची प्राप्ती होते व जीव हरिनामाच्या स्मरणाने प्रभूशी एकरूप होऊन जातो. ॥ ७ ॥ प्रभुपतीने स्वत: (भक्तिरूपी) मेंदी आणून घोळून घोळून माझ्या सर्वांगास लावली. भाव, भक्ती माझ्या मनात दृढ केली. नानक सांगतात, ज्यांच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते त्यास तो हाती धरून भवसागरातून बाहेर काढतो. ॥८॥६॥२॥१॥६॥९॥

रागु बिलावलु महला ५ असटपदी घरु १२

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

उपमा जात न कही मेरे प्रभ की उपमा जात न कही ॥
तजि आन सरणि गही ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रभ चरन कमल अपार ॥ हउ जाउ सद बलिहार ॥
मनि प्रीति लागी ताहि ॥ तजि आन कतहि न जाहि ॥ १ ॥
हरि नाम रसना कहन ॥ मल पाप कलमल दहन ॥
चड़ि नाव संत उधारि ॥ भै तरे सागर पारि ॥ २ ॥
मनि डोरि प्रेम परीति । इह संत निरमल रीति ॥
तजि गए पाप बिकार ॥ हरि मिले प्रभ निरंकार ॥ ३ ॥
प्रभ पेखीऐ बिसमाद ॥ चखि अनद पूरन साद ॥
नह डोलीऐ इत ऊत ॥ प्रभ बसे हरि हरि चीत ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३७)

शब्दार्थ : **ताहि** –त्याची. **कलमल** – घोर पातक. **चडि** – चढून. **डोरि** – एकाग्र. **विसमाद**– विस्मय, आश्चर्य. **साद** – स्वाद. **इत** – इकडे. **उत** – तिकडे.

भावार्थ : माझ्या प्रभू परमात्म्याचा महिमा अवर्णनीय आहे. त्याची महती कोणी वर्णन करू शकत नाही. मी बाकी सर्व गोष्टींचा त्याग करून त्याला शरण गेलो आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूचे चरणकमल अपार आहे. मी प्रभुचरणी माझे सर्वस्व समर्पित करतो. माझ्या मनात त्याच्याविषयी प्रीती उत्पन्न झाली आहे. त्याला सोडून आता मी कोठेही जाऊ शकत नाही. ॥ १ ॥ मुखाने हरीनामाचा उच्चार केल्याने, मनाचा मळ, पाप महापाप सारे काही जळून जाते. संतांनी प्रभुनामरूपी नौकेच्या साहाय्याने भवसागर पार केला. ॥ २ ॥ मन प्रभुप्रेमात एकाग्र करावे हीच साधुसंतांची आचरणाची पवित्र पद्धत आहे. त्यामुळे मनातील सर्व पापविकार नष्ट होतात व तो निराकार प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ ३ ॥ प्रभुदर्शनाने मन आश्चर्यचकित होते व पूर्ण आनंदाचा आस्वाद प्राप्त होतो. प्रभू परमात्मा मनात दृढ झाल्याने मन आता स्थिर झाले आहे. ते आता इकडे तिकडे कोठेही भटकत नाही. ॥ ४ ॥

तिन्ह नाहि नरक निवासु ॥ नित सिमरि प्रभ गुणतासु ॥
ते जमु न पेखहि नैन ॥ सुनि मोहे अनहत बैन ॥ ५ ॥

हरि सरणि सूर गुपाल ॥ प्रभ भगत वसि दइआल ॥
हरि निगम लहहि न भेव ॥ नित करहि मुनि जन सेव ॥ ६ ॥
दुख दीन दरद निवार ॥ जा की महा बिखडी कार ॥
ता की मिति न जानै कोइ ॥ जलि थलि महीअली सोइ ॥ ७ ॥
करि बंदना लख बार ॥ थकि परिओ प्रभ दरबार ॥
प्रभ करहु साधू धूरि ॥ नानक मनसा पूरि ॥ ८ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३७)

शब्दार्थ : तिन्ह - त्यांना. गुणतासु - गुणनिधी. बैन - वचन. मोहे - मोहून जाणे. वसि - ताब्यात. निगम - वेद. लहहि - प्राप्त करणे. भेव - भेद, रहस्य. बिखडी - विषम, कठीण. कार - कार्य, सेवा. मिति - मर्यादा. मनसा - इच्छा.

भावार्थ : जे सदैव त्या गुणसागर प्रभू परमात्म्याचे गुण गातात, त्यांना नरकवास भोगावा लागत नाही. यम त्यांच्याकडे डोळे वर करून पाहतही नाही. कारण असे भक्त प्रभूच्या अनाहत नादात सदैव निमग्न बनून राहतात. ॥ ५ ॥ मी शूरवीर प्रभू परमात्म्याचरणी शरण आलो आहे. तो प्रभू परमात्मा दयाळू आहे. तो भक्तांना वश होतो. वेदांनाही प्रभू परमात्म्याचे रहस्य कळले नाही. मुनीजन सदैव प्रभू परमात्म्याची सेवा करतात. ॥ ६ ॥ तो प्रभू परमात्मा दीनांचे दु:ख दूर करतो. त्याची सेवा करणे फार कठीण कार्य आहे. त्याचा पार कोणासही लागत नाही. तो जळी, स्थळी, अंतराळी सर्वत्र सामावलेला आहे. ॥ ७ ॥ त्यास लक्षलक्ष प्रणाम. हे प्रभू मी थकून भागून तुझ्या दारी आलो आहे. मला साधुसंतांची चरणधूळ कर. नानक सांगतात, तो प्रभू परमात्माच साऱ्या मनीषा पूर्ण करतो.॥८॥१॥

॥ बिलावलु महला ५ ॥

प्रभ जनम मरन निवारि ॥ हारि परिओ दुआरि ॥
गहि चरन साधू संग ॥ मन मिसट हरि हरि रंग ॥
करि दइआ लेहु लड़ि लाइ ॥ नानका नामु धिआइ ॥ १ ॥
दीना नाथ दइआल मेरे सुआमी दीना नाथ दइआल ॥
जाचउ संत रवाल ॥ १ ॥ रहाउ ॥
संसारु बिखिआ कूप ॥ तम अगिआन मोहत घूप ॥
गहि भुजा प्रभ जी लेहु ॥ हरि नामु अपुना देहु ॥
प्रभ तुझ बिना नही ठाउ ॥ नानका बलि बलि जाउ ॥ २ ॥
लोभि मोहि बाधी देह ॥ बिनु भजन होवत खेह ॥
जमदूत महा भइआन ॥ चित गुपत करमहि जान ॥
दिनु रैनि साखि सुनाई ॥ नानका हरि सरनाइ ॥ ३ ॥
भै भंजना मुरारि ॥ करि दइआ पतित उधारि ॥
मेरे दोख गने न जाहि ॥ हरि बिना कतहि समाहि ॥

गहि ओट चितवी नाथ ॥ नानका दे रखु हाथ ॥ ४ ॥
हरि गुणनिधे गोपाल ॥ सरब घट प्रतिपाल ॥
मनि प्रीति दरसन पिआस ॥ गोबिंद पूरन आस ॥
इक निमख रहनु न जाइ ॥ वडभागि नानक पाइ ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३७)

शब्दार्थ : निवारि - निवारण करतो. हारि - पराभूत होऊन. मिसट - गोड. जाचउ - याचना करतो. रवाल - चरणधूळ. तम - अंधकार. अगिआन - अज्ञान. मोहत - मोहित. धूप - खूप, पुष्कळ. ठाउ - आधार. खेह - राख. चित गुपत - चित्रगुप्त. साखि - साक्षी. दोख - दोष. गने - गणती. कतहि - कोठेही. ओट - आश्रय. चितवी - चिंतन. पिआस - तहान.

भावार्थ : हे प्रभू परमात्मा ! मला जन्ममरणातून मुक्त कर. मी तुझ्या दारी येऊन पडलो आहे. साधुसंतांच्या संगतीत राहून मला तुझा महिमा अधिकच गोड वाटू लागला आहे. माझे मन प्रभुरंगात रंगून गेले आहे. हे प्रभो ! माझ्यावर दया कर. मला आपल्या हृदयाशी धर. नानक प्रभू परमात्म्याचे ध्यान करतो. ॥ १ ॥ माझा स्वामी दीनांचा नाथ आहे. दीनानाथ आहे. तो दयाळू आहे. मी त्याच्याकडे संतांच्या चरणधुळीची याचना करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ संसार ही विषयविकारांची खाई आहे. त्यात अज्ञान अंधकार आहे व अनेक मोहाविष्ट करणाऱ्या गोष्टी आहेत. हे प्रभो ! मला हाती धरून वर काढ. मला तुझे हरिनाम दे. हे प्रभो ! मला तुझ्याशिवाय अन्य कोणाचाही आधार नाही. नानक तुझ्या चरणी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥ ३ ॥ हा देह लोभ आणि मोहाने बद्ध झाला आहे. प्रभुनामाशिवाय हा देह राख होऊन जाईल. यमदूत फार भयानक आहेत. चित्रगुप्त जीवाच्या प्रत्येक कर्माची नोंद ठेवतो व शेवटी प्रभू पुढे साक्ष देतो. नानक तर प्रभूस शरण जातो. ॥ ३ ॥ तो मुरारी जीवाचे भय नष्ट करतो. तो जीवांवर दया करतो व पतितांचा उद्धार करतो. माझ्यात असंख्य दोष आहेत. त्याची गणतीच करता येणार नाही. प्रभूशिवाय कोण मला क्षमा करणार ? हे प्रभो ! मला तुझाच आधार आहे. मी तुझेच चिंतन करतो. नानक म्हणतात, हे प्रभो ! मला हाती धरून माझे रक्षण कर. ॥ ४ ॥ हे प्रभो ! तू सर्व गुणांचे भांडार आहेस. तूच सर्व जीवांचे पालन करतोस. मला तुझ्या प्रेमाची व तुझ्या दर्शनाची तहान लागली आहे. हे प्रभो ! माझी ही आस पूर्ण कर. मला तुझ्याशिवाय क्षणभरही चैन पडत नाही. नानक सांगतात, तो प्रभू परमात्मा महाभाग्याने प्राप्त होतो.॥५॥

प्रभ तुझ बिना नही होर ॥ मनि प्रीति चंद चकोर ॥
जिउ मीन जल सिउ हेतु ॥ अलि कमल भिंनु न भेतु ॥
जिउ चकवी सूरज आस ॥ नानक चरन पिआस ॥ ६ ॥
जिउ तरुनि भरत परान ॥ जिउ लोभीऐ धनु दानु ॥
जिउ दूध जलहि संजोगु ॥ जिउ महा खुधिआरथ भोगु ॥
जिउ मात पूतहि हेतु ॥ हरि सिमरि नानक नेत ॥ ७ ॥
जिउ दीप पतन पतंग ॥ जिउ चोरु हिरत निसंग ॥
मैगलहि कामै बंधु ॥ जिउ ग्रसत बिखई धंधु ॥
जिउ जूआर बिसनु न जाइ ॥ हरि नानक इहु मनु लाइ ॥ ८ ॥

कुरंक नादै नेहु ॥ चात्रिकु चाहत मेहु ॥
जन जीवना सतसंगि ॥ गोबिदु भजना रंगि ॥
रसना बखानै नामु ॥ नानक दरसन दानु ॥ ९ ॥
गुन गाइ सुनि लिखि देइ ॥ सो सरब फल हरि लेइ ॥
कुल समूह करत उधारु ॥ संसारु उतरसि पारि ॥
हरि चरन बोहिथ ताहि ॥ मिलि साध संगि जसु गाहि ॥
हरि पैज रखै मुरारि ॥ हरि नानक सरनि दुआरि ॥ १० ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३८)

शब्दार्थ : **होर** – अन्य, दुसरा. **चंद** – चंद्र. **हेतु** – प्रेम. **भिंनु** – भिन्न. **भेतु** – भेदभाव. **भरत** – पती. **खुधिआरथ** – क्षुधार्त भुकेलेला. **भोग** – भोजन. **नेत** – नित्य. **हिरत** – हरण करतो. **निसंग** – निष्ठुरपणे. **मैगलहि** – हत्ती. **बंधु** – बाध्य, बंधनात पडतो. **बिखइ** – विषयविकार. **जुआर** – जुगारी. **बिसनु** – व्यसन. **कुरंक** – हरिण. **नादै** – नादाने. **चात्रिक** – चातक. **मेहु** – . **रंगी** – प्रेमाने. **बखानै** – उच्चार करते. **लिखि** – लिहितो. **लेइ** – प्राप्त करतो. **बोहिथ** – जहाज. **ताही** – त्याचे. **पैज** – प्रतिष्ठा.

भावार्थ : हे प्रभो ! मला तुझ्याशिवाय अन्य कोणी नाही. माझ्या मनात तुझ्याविषयी असे प्रेम आहे जसे चकोराचे चंद्रावर असते. जसे माशाचे पाण्यावर असते. मासा पाण्याशिवाय जगूच शकत नाही. भ्रमर कमलापासून भिन्न होऊच शकत नाही. त्यांच्यात अभेद असतो. ज्याप्रमाणे चकवीला सूर्योदयाची आस असते. तशी नानकाला प्रभूच्या चरणकमलाची ओढ लागली आहे. ॥ ६ ॥ ज्याप्रमाणे तरुणीला आपला पती जीव की प्राण असतो. लोभी माणसाला धन प्रिय असते. दूध आणि पाणी जसे एकरूप होऊन जातात. भुकेलेल्यास जशी अन्नाची ओढ असते. ज्याप्रमाणे मातेला बालकाबद्दल प्रेम असते, त्याप्रमाणे नानक नित्य हरीचे स्मरण करतो. ॥ ७ ॥ ज्याप्रमाणे पतंग दीपावर झेप घेतो. चोर निष्ठुरपणे द्रव्य हरण करतो. हत्ती कामातुर होऊन बंधनात अडकतो. विषयविकारात लिप्त होऊन पुरुष संसाराच्या पाशात अडकतो. ज्याप्रमाणे जुगाऱ्याचे व्यसन कधीच सुटत नाही, त्याप्रमाणे नानकाचे मनही प्रभुनामात लीन झाले आहे. ॥ ८ ॥ हरिण वाद्याच्या नादाने मोहित होतो. चातकपक्षी मेघाची उत्कंठतेने वाट पाहतो. प्रभुसेवकास सतसंग हेच जीवन असते. रसना गोविंदाच्या भजनात रंगून प्रभुनामाचा उच्चार करते त्याप्रमाणे नानक अत्यंत आर्त होऊन प्रभुदर्शनाचे दान मागतो. ॥ ९ ॥ जो प्रभू परमात्म्याचे गुण गातो, श्रवण करतो, लिखाण करतो तो प्रभूकडून सर्व फल प्राप्त करतो. तो आपल्या सर्व कुलाचा उद्धार करतो. संसारसागर पार करतो. हरिचरण हे त्याचे जहाज होते. तो साधुसंतांच्या संगतीत राहून प्रभू परमात्म्याचे यशोगान गातो. तो मुरारी प्रभू त्याच्या प्रतिष्ठेचे रक्षण करतो. नानक प्रभूच्या दारी प्रभूस शरण जातो. ॥ १० ॥ २ ॥

बिलावलु महला १ थिती घरु १० जति

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

एकम एकंकारु निराला ॥ अमरु अजोनी जाति न जाला ॥
अगम अगोचरु रूपु न रेखिआ ॥ खोजत खोजत घटि घटि देखिआ ॥

जो देखि दिखावै तिस कउ बलि जाई ॥ गुरपरसादि परम पदु पाई ॥ १ ॥
किआ जपु जापउ बिनु जगदीसै ॥ गुर कै सबदि महलु घरु दीसै ॥ १ ॥ रहाउ ॥
दूजै भाइ लगे पछुताणे ॥ जम दरि बाधे आवण जाणे ॥
किआ लै आवहि किआ ले जाहि ॥ सिरि जमकालु सि चोटा खाहि ॥
बिनु गुर सबद न छूटसि कोइ ॥ पाखंडि कीन्है मुकति न होइ ॥ २ ॥
आपे सचु कीआ कर जोड़ि ॥ अंडज फोड़ि जोड़ि विछोड़ि ॥
धरति अकासु कीए बैसण कउ थाउ ॥ राति दिनंतु कीए भउ भाउ ॥
जिनि कीए करि वेखणहारा ॥ अवरु न दूजा सिरजणहारा ॥ ३ ॥
त्रितीआ ब्रहमा बिसनु महेसा ॥ देवी देव उपाए वेसा ॥
जोती जाती गणत न आवै ॥ जिनि साजी सो कीमति पावै ॥
कीमति पाइ रहिआ भरपूरि ॥ किसु नेड़ै किसु आखा दूरि ॥ ४ ॥
चउथि उपाए चारे बेदा ॥ खाणी चारे बाणी भेदा ॥
असट दसा खटु तीनि उपाए ॥ सो बूझै जिसु आपि बुझाए ॥
तीनि समावै चउथै वासा ॥ प्रणवति नानक हम ता के दासा ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३८)

शब्दार्थ : **थिती** – तिथी. **जति** – तबला वाजवण्याची पद्धत. **एकम** – प्रतिपदा. **एकंकारु** – एकमेव. **अजोनी** – अयोनी, कोणत्याही योनीत वा योनीतून न जन्मलेला, स्वयंभू. **जाति** – जात. **जाला** – जंजाल. **खोजत** – शोधताना. **घटि** – देह. **दूजै** – द्वैत. **बाधे** – बांधून. **छूटसि** – सुटका. **अंडज** – गोल, अंड्याच्या आकाराची. **बैसण** – बसणे, निवास. **भउ** – भय. **भाव** – प्रेम. **देखणहार** – पालन करतो. **सिरजणहारा** – उत्पन्नकर्ता. **त्रितीआ** – तृतीया. **उपाए** – उत्पन्न केले. **वेसा** – वेश, रूपे. **साजी** – उत्पन्न. **किसु** – कोणाला. **नेडै** – जवळ. **चउथि** – चतुर्थी. **खाणी** – जीवयोनी. **असट दसा** – अठरा पुराणे. **खटु** – सहा दर्शने. **तीनि** – तीन गुण. **चउथै** – चौथी अवस्था, तूर्यावस्था. **प्रणवति** – विनयपूर्वक सांगणे.

भावार्थ : प्रतिपदा तिथीचा बोध– प्रतिपदा सांगते की तो प्रभू परमात्मा एकमेव आहे व सर्वांपासून अलिप्त आहे. वेगळा आहे. तो अमर आहे. कोणत्याही योनीतून जन्मलेला नसून तो अयोनीसंभव म्हणजे स्वयंभू आहे. त्यास कोणतीही जात नाही. तो सर्व बंधनातून मुक्त आहे. तो अगम्य आहे. सामान्य दृष्टीला न दिसणारा आहे. त्याला कोणतेही रूप नाही. रंग नाही. तो अरूप व अवर्ण आहे. निराकार आहे. शोध घेतल्यास तो प्रत्येक जीवाच्या अंतरातच तो आहे हे समजते. जो कोणी मला प्रभूचे दर्शन घडवील त्याच्या चरणी मी सर्वस्व अर्पण करीन. सतगुरुकृपेने परमपद प्राप्त होते. ॥ १ ॥ जगदीशाशिवाय अन्य कोणाचा जप काय कामाचा ? सतगुरूच्या उपदेशाने नामाच्या माध्यमातून तो प्रभू परमात्मा आपल्या हृदयातच आहे हा साक्षात्कार होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ द्वितियेचा बोध – द्वैतभावाने जीवावर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. द्वैतभावामुळेच जीव जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतो व यमपाशात बद्ध होतो. हे जीवा ! तू जन्माला येताना काय घेऊन आलास व जगातून जाताना

काय घेऊन जाणार आहेस ? माणूस तर सदैव यमाच्याच भीतीत वावरत असतो. प्रभुनामाशिवाय मुक्ती प्राप्त होत नाही. पाखंडी माणसास, द्वैतात अडकलेल्या जीवास कधीही मुक्ती प्राप्त होत नाही. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्याने स्वत: आपल्या हाताने ह्या सृष्टीची रचना केली. वास्तविक एक असलेल्या सृष्टीत त्याने द्वैतभाव उत्पन्न केला. ह्या द्वैतातून पुन्हा एकत्व निर्माण केले. त्यानेच जीवास राहण्यासाठी पृथ्वी व आकाश निर्माण केले. दिवस व रात्र निर्माण केली. भय आणि प्रेमभक्ती निर्माण केली. ज्याने ही सृष्टी निर्माण केली तोच तिची देखभाल करतो. त्या रचनाकार प्रभू परमात्म्याशिवाय अन्य कोणीही नाही. सर्व काही तोच आहे. ॥ ३ ॥ तृतीयेचा बोध – तृतीयेवरून ब्रह्मा, विष्णू, महेश यांचा बोध होतो. प्रभू परमात्म्याने अन्यही देव देवतांची रूपे धारण केली आहेत. आत्मा धारण केलेले अनेक जीवही त्याने निर्माण केले. त्याची गणतीही करता येत नाही. ज्या प्रभूने हे सर्व निर्माण केले तोच त्याचे मोल जाणतो. प्रभू परमात्मा त्यात पूर्णपणे व्याप्त असल्यानेच त्यास मोल प्राप्त होते. तो काहींना आपल्याजवळ करतो तर काहींना दूर लोटतो. ॥ ४ ॥ चतुर्थीचा बोध – प्रभू परमात्म्याने चार वेद निर्माण केले. चार जीवयोनी उत्पन्न केले. चार प्रकारच्या वाणी (परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी) निर्माण केल्या. अठरा पुराणे, सहा दर्शने ही सारी त्यानेच निर्माण केली. पण हे सारे त्यालाच कळते ज्यास तो प्रभू ते ज्ञान देतो. असा जीव त्रिगुणांच्या (सत्त्व, रज, तम) पलीकडे असलेल्या चतुर्थावस्थेत, तूर्यावस्थेस प्राप्त करून प्रभुरूपात सामावून जातो. नानक नम्रतापूर्वक सांगतात, की मी तर त्या प्रभू परमात्म्याचाच दास आहे. ॥ ५ ॥

पंचमी पंच भूत बेताला ॥ आपि अगोचरु पुरखु निराला ॥
इकि भ्रमि भूखे मोह पिआसे ॥ इकि रसु चाखि सबदि त्रिपतासे ॥
इकि रंगि राते इकि मरि धूरि ॥ इकि दरि घरि साचै देखि हदूरि ॥ ६ ॥
झूठे कउ नाही पति नाउ ॥ कबहु न सूचा काला काउ ॥
पिंजरि पंखी बंधिआ कोइ ॥ छेरीं भरमै मुकति न होइ ॥
तउ छूटै जा खसमु छडाए ॥ गुरमति मेले भगति द्रिड़ाए ॥ ७ ॥
खसटी खटु दरसन प्रभ साजे ॥ अनहद सबदु निराला वाजे ॥
जे प्रभ भावै ता महलि बुलावै ॥ सबदे भेदे तउ पति पावै ॥
करि करि वेस खपहि जलि जावहि ॥ साचै साचे साचि समावहि ॥ ८ ॥
सपतमी सतु संतोखु सरीरि ॥ सात समुंद भरे निरमल नीरि ॥
मजनु सीलु सचु रिदै वीचारि ॥ गुर कै सबदि पावै सभि पारि ॥
मनि साचा मुखि साचउ भाइ ॥ सचु नीसाणै ठाक न पाइ ॥ ९ ॥
असटमी असट सिधि बुधि साधै ॥ सचु निहकेवलु करमि अराधै ॥
पउण पाणी अगनी बिसराउ ॥ तही निरंजनु साचो नाउ ॥
तिसु महि मनूआ रहिआ लिव लाइ ॥ प्रणवति नानकु कालु न खाइ ॥ १० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८३९)

शब्दार्थ : **पंचभूत** – पंचमहाभूते (पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश). **बेताल** – भूतयोनी. **सबदि** – नामाने. **त्रिपतासे** – तृप्त होतात. **हदुरी** – प्रत्यक्ष, साक्षात. **पति** – प्रतिष्ठा. **नाउ** – नाम. **सूचा** – पवित्र. **छेरी** – फटी, भोके. **तउ** – तेव्हाच. **खसमु** – प्रभू परमात्मा. **खसटि** – षष्ठी. **खटु** – सहा. **खपहि** – दु:खी. **जलि** – जळून. **सपतमि** – सप्तमी. **सरीरि** – शरीर, देह. **सीलु** – सत्याचरण, चारित्र्य. **असटमी** – अष्टमी. **असट** – आठ. **निहकेवलु** – निर्लेप, अलिप्त. **मनुआ** – मन.

भावार्थ : पंचमी तिथीचा बोध– पंचमी तिथीवरून पंचमहाभूतांचा बोध होतो. पंचमहाभूतांपासून बनलेला प्राणी वेताळाप्रमाणे इतस्तत: भटकत असतो. प्रभू परमात्मा स्वत: अदृश्य आहे व तो ह्या सर्वांपासून अलिप्त आहे. काही जीव विकारांच्या भुकेने व मोहमायेच्या तृष्णेमुळे भटकत राहतात. तर काही जीव नामामृत प्राशन करून तृप्त होतात. काही प्रभुप्रेमरंगात रंगून जातात. तर काही मोहमायेत अडकून मरून धुळीला मिळतात. तर काही लोकांना प्रभू परमात्मा आपल्या हृदयातच आहे ह्याचा साक्षात्कार होतो. ॥ ६ ॥ खोट्या, असत्यचरणी लोकांना प्रभुनामाची व प्रतिष्ठेची प्राप्ती होत नाही. काळा कावळा कधीही स्वच्छ पवित्र होत नाही. पिंजऱ्यात बद्ध झालेला पक्षी कितीही धडपड केली तरी पिंजऱ्यातून बाहेर पडू शकत नाही. तो पिंजऱ्यातच फिरत राहतो. त्याप्रमाणे मोहमायेत बद्ध झालेला जीव मायेतच फिरत राहतो. भ्रमाचे जाळे तोडल्याशिवाय मुक्ती प्राप्त होत नाही. ज्यास प्रभू परमात्मा स्वत: सोडवतो, तोच मोहमायेतून मुक्त होतो. त्यास सत्गुरू प्राप्त होतो व तो त्याच्या मनात भक्तिभाव दृढ करतो. ॥ ७ ॥ षष्ठी तिथीचा बोध – प्रभू परमात्म्याने सहा दर्शने (तत्त्वे) निर्माण केली. त्याशिवाय प्रभूचा अनाहत ध्वनी वाजत असतो ते वेगळेच. जे प्रभुसेवक प्रभूस आवडतात त्यांना तो आपल्या महालात बोलावून घेतो. ज्याला प्रभुनामाचे रहस्य कळले त्यासच प्रभू दरबारी प्रतिष्ठा प्राप्त होते. स्वेच्छाचारी जीव नाना सोंगे–ढोंगे करून अखेर दु:खी होतो. सत्याचरणी लोक सत्यरूप प्रभूशी एकरूप होतात. ॥ ८ ॥ सप्तमी तिथीचा बोध – सप्तमीवरून सत्य, संतोष व शरीर यांचा बोध होतो. हे जीवा ! तू आपल्या शरीरात सत्य व संतोष हे गुण दृढ कर. जर सात समुद्र (पाच इंद्रिये, मन व बुद्धी असे सात समुद्र) प्रभुनामरूपी पवित्र जलाने भरलेले असतील तर त्यात स्नान केल्याने मनात शील व सत्याचा विचार सुरू होतो. सतगुरूच्या उपदेशाने सर्व जीव भवसागर पार करून जातात. ज्याच्या मनात सत्याचा वास आहे. मुखात सत्यरूप प्रभूचे नाम आहे, त्याच्या मार्गात कोणतेही विघ्न अडथळा आंणू शकत नाही. ॥ ९ ॥ अष्टमी तिथीचा बोध – अष्टमी तिथी असे सांगते, की अष्टसिद्धी प्राप्त झाल्या तरी मनाचा संयम सोडून नकोस. आपल्या सत्याचरणाने त्या निर्लेप प्रभूची आराधना कर. हवा, पाणी व अग्निरूपी सत्त्व, रज, तम ह्या गुणांचा त्याग केल्याने त्या निरंजन प्रभूचे नाम प्राप्त होते. त्या प्रभुनामात आपले मन एकाग्र कर. नानक विनयपूर्वक सांगतात, की अशा प्रभुसेवकास काळसुद्धा ग्रासू शकत नाही. ॥ १० ॥

नाउ नउमी नवे नाथ नव खंडा ॥ घटि घटि नाथु महा बलवंडा ॥
आई पूता इहु जगु सारा ॥ प्रभ आदेसु आदि रखवारा ॥
आदि जुगादी है भी होगु ॥ ओहु अपरंपरु करणै जोगु ॥ ११ ॥
दसमी नामु दानु इसनानु ॥ अनदिनु मजनु सचा गुण गिआनु ॥
सचि मैलु न लागै भ्रमु भउ भागै ॥ बिलमु न तूटसि काचै तागै ॥

जिउ तागा जगु एवै जाणहु ॥ असथिरु चीतु साचि रंगु माणहु ॥ १२ ॥
एकादसी इकु रिदै वसावै ॥ हिंसा ममता मोहु चुकावै ॥
फलु पावै ब्रतु आतम चीनै ॥ पाखंडि राचि ततु नही बीनै ॥
निरमलु निराहारु निहकेवलु ॥ सूचै साचे ना लागै मलु ॥ १३ ॥
जह देखउ तह एको एका ॥ होरि जीअ उपाए वेको वेका ॥
फलोहार कीए फलु जाइ ॥ रस कस खाए सादु गवाइ ॥
कूड़ै लालचि लपटै लपटाइ ॥ छूटै गुरमुखि साचु कमाइ ॥ १४ ॥
दुआदसि मुद्रा मनु अउधूता ॥ अहिनिसि जागहि कबहि न सूता ॥
जागतु जागि रहै लिव लाइ ॥ गुर परचै तिसु कालु न खाइ ॥
अतीत भए मारे बैराई ॥ प्रणवति नानक तह लिव लाई ॥ १५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८३९)

शब्दार्थ : **नउमी** – नवमी तिथी. **पूता** – पुत्र, पुतळा. **आदेसु** – नमस्कार. **आदि** – सर्वांच्या आधी. **युगादी** – युगांच्याही आधी. **होगा** – पुढेही असेल. **ओहु** – तो. **दसमी** – दशमी तिथी. **बिलमु** – विलंब. **काचै** – कच्च्या. **तागै** – धागा. **एकादसि** – एकादशी. **चीनै** – ओळख. **बीनै** – पाहणे. **वेकोवेका** – वेगवेगळ्या प्रकारचे. **दुआदसि** – द्वादशी. **अउधूता** – शुद्ध. **सूता** – झोपणे. **जागतु** – जागृत. **अतीत** – पार. **बैराइ** – वैरी.

भावार्थ : नवमी तिथीचा बोध – नवमी तिथीवरून, प्रभुनाम, नऊ नाथ व नवखंड पृथ्वीचा बोध होतो. तो प्रभू परमात्मा प्रत्येक शरीरात वास करतो. तो महाशक्तिशाली आहे. ही धरती व त्यावरील सर्व जीव यांचे नाते माता व पुत्रासारखे आहे. त्या रक्षणकर्त्या आदिपुरुषास माझा नमस्कार असो. तो प्रभू जेव्हा काही नव्हते, तेव्हाही होता. युगांच्याही पूर्वी अस्तित्वमान होता व हे सारे विश्व लयाला गेले तरी तो अस्तित्वमान असणार आहे. तो अपरंपार आहे. सर्व काही करण्यास समर्थ आहे. दशमी तिथीचा बोध – दशमी ही तिथी, नाम, दान व स्नान याचे द्योतक आहे. प्रत्येक जीवाने प्रभुनामाचे स्मरण करावे. प्रभुनामाचे दान करावे व प्रभुनामात स्नान करावे. सत्यरूप प्रभूचे गुण ग्रहण करणे हेच खरे स्नान आहे. मनात सत्यनाम दृढ झाले म्हणजे मन मलीन होत नाही. भ्रम व भय नष्ट होतात. कच्चा धागा तुटण्यास क्षणाचाही विलंब लागत नाही. हे जग हे कच्च्या धाग्यासारखे क्षणभंगूर आहे. नश्वर आहे. म्हणून जीवाने आपले मन प्रभुनामात स्थिर करून प्रभूच्या भक्तिरंगात रंगून जावे. ॥ १२ ॥ एकादशी तिथीचा बोध – एकादशी सांगते, की त्या एकमात्र परमेश्वरास आपल्या चित्तात धारण कर. मनातून हिंसा, ममता व मोह काढून टाक. आपल्या आत्म्याची ओळख पटली की सर्व व्रतांचे फल प्राप्त होते. जो पाखंडात, मोहमायेत रत झाला. त्याला ह्या परमतत्वाचे ज्ञान प्राप्त होत नाही. तो प्रभू परमात्मा पवित्र आहे. त्यास कोणतीही भूक नाही. तो निष्कलंक आहे. तो सत्य आहे. शुद्ध आहे. त्याला यत्किंचितही मळ लागत नाही. ॥ ३ ॥ जिकडे पाहावे तिकडे तो एकमेव प्रभू परमात्मा भरून राहिलेला दिसतो. त्यानेच हे निरनिराळ्या प्रकारचे जीव उत्पन्न केले आहेत. एकादशीचे दिवशी काही लोक निव्वळ फलाहार करतात पण त्यातून काहीही फलप्राप्ती होत नाही. तर काही नाना प्रकारचे मिष्टान्न खाऊनही त्यांना खरा रसास्वाद प्राप्त होत नाही. त्यांच्या मनात त्याची लालसा,

असत्याचीच लालसा लागते व ते त्यातच अडकून पडतात. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्यानेच सत्यरूप प्रभू परमात्म्याची प्राप्ती होते. ॥ १४ ॥ द्वादशी तिथीचा बोध द्वादशी तिथी योगाच्या बारा मुद्रांचे निर्देश करते. ज्याचे मन योगाच्या बारा मुद्रांच्याही पार गेले आहे तोच खरा अवधूत जाणावा. तो कधीही मोहमायेप्रती बेसावध नसतो. तो सदैव सावध असतो. सदैव जागृत राहून तो आपले चित्त प्रभुनामात एकाग्र करून ठेवतो. ज्याला प्रभू परमात्म्याची प्रचिती आली, साक्षात्कार झाला त्याला मृत्यू गिळू शकत नाही. तो सर्व विकारांपासून विरक्त असतो. तो कामक्रोधादी सर्व वैऱ्यांना मारून टाकतो. नानक विनयपूर्वक सांगतात, की असा प्रभुसेवक प्रभुरूपात विलीन होतो. ॥ १५ ॥

दुआदसी दइआ दानु करि जाणै ॥ बाहरि ज़ातो भीतरि आणै ॥
बरती बरत रहै निहकाम ॥ अजपा जापु जपै मुखि नाम ॥
तीनि भवण महि एको जाणै ॥ सभि सुचि संजम साचु पछाणै ॥ १६ ॥
तेरसि तरवर समुद कनारै ॥ अंम्रितु मूलु सिखरि लिव तारै ॥
डर डरि मरै न बूडै कोइ ॥ निडरु बूडि मरै पति खोइ ॥
डर महि घरु घर महि डरु जाणै ॥ तखति निवासु सचु मनि भाणै ॥ १७ ॥
चउदसि चउथे थावहि लहि पावै ॥ राजस तामस सम काल समावै ॥
ससीअर कै घरि सूरु समावै ॥ जोग जुगति की कीमति पावै ॥
चउदस भवन पाताल समाए ॥ खंड ब्रहमंड रहिआ लिव लाए ॥ १८ ॥
अमावसिआ चंदु गुपतु गैणारि ॥ बूझहु गिआनी सबदु बीचारि ॥
ससीअरु गगनि जोति तिहु लोई ॥ करि करि वेखै करता सोई ॥
गुर ते दिसै सो तिस ही माहि ॥ मनमुखि भूले आवहि जाहि ॥ १९ ॥
घरु दरु थापि थिरु थानि सुहावै ॥ आपु पछाणै जा सतिगुरु पावै ॥
जह आसा तह बिनसि बिनासा ॥ फूटै खपरु दुबिधा मनसा ॥
ममता जाल ते रहै उदासा ॥ प्रणवति नानक हम ताके दासा ॥ २० ॥ १ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८४०)

शब्दार्थ : **बरती** – व्रती. **निहकाम** – निष्काम. **सुचि** – शुद्ध, पवित्र. **संजम** – संयम. **तेरसि** – त्रयोदशी. **तरवर** – वृक्ष. **कनारै** – किनाऱ्यावरील. **सिखरि** – श्रेष्ठ. **डर** – भीती. **निडरु** – बेडर, निडर. **तखति** – सिंहासन. **चउदसि** – चतुर्दशी. **चउथे थावहि** – चतुर्थावस्था, तूर्यावस्था. **सत** – सात्त्विक. **ससीअर** – चंद्र. **अमावसिआ** – अमावास्या. **गैणारि** – आकाशात. **तिहु** – तीनही. **लोई** – लोक. **खपरु** – खापर, मडके.

भावार्थ : द्वादशीला लोक दान व दया करण्याचे व्रत करतात. पण द्वादशीचे खरे व्रत म्हणजे बाहेर विषयविकारांकडे ओढ घेणाऱ्या मनाला आवर घालून अंतर्मुख करणे हे होय. व्रत करणाऱ्याने निष्काम बुद्धीने व्रताचरण करावे व मुखाने उच्चार न करता मनातल्या मनात अजपाजप करावा. सर्व तिन्ही लोकांत तो एकच प्रभू परमात्मा भरून राहिला आहे हे जाणावे. असे केल्याने त्याचे मन संयमित व पवित्र होईल व त्यास सत्यरूप प्रभू

परमात्म्याचे ज्ञान होईल. ॥ १६ ॥ त्रयोदशी तिथीचा संदेश – त्रयोदशी ही तिथी जीवनाच्या अशाश्वततेचा संदेश देते. मानवी जीवन हे समुद्रतटावरील वृक्षासारखे आहे. ते केव्हा उन्मळून नष्ट होईल ते सांगता येत नाही. पण जर साधक आपल्या श्रेष्ठ स्थानी, मस्तकात प्रभू परमात्म्याचे नामामृत दृढपणे धारण करील तर त्याची जीवनमुळे दृढ होतील. जो आपल्या मनातील इतर भय मारून केवळ प्रभू परमात्म्याविषयी आदरयुक्त भीती मनात बाळगतो, तो भवसागरात कधीही बुडत नाही. पण जो प्रभू परमात्म्याविषयी बेफिकीर असतो तो आपली प्रतिष्ठा गमावून भवसागरात बुडून मरून जातो. जो आपल्या मनात प्रभू परमात्म्याविषयी आदरयुक्त भीती बाळगून जीवन जगतो त्यास प्रभू दरबारात स्थान प्राप्त होते. त्याच्या मनात प्रभूविषयी प्रेम असल्याने तो प्रभू दरबारी प्रतिष्ठा प्राप्त करतो. ॥ १७ ॥ चतुर्दशी असे सांगते, की जो भक्त चतुर्थावस्था प्राप्त करतो त्याच्या मनातील सत्त्व, रज, तम हे तीनही गुण तूर्यावस्थेत विलीन होऊन जातात. हृदयात क्षीण चंद्रप्रकाशाच्या जागी ज्ञानसूर्य प्रकाशू लागतो. प्रभू परमात्म्याशी एकरूप होण्याची युक्ती कळते. सप्तलोक व सप्तपाताळ ह्या चौदाही ठिकाणी प्रभू परमात्मा सामावलेला आहे हे कळते व तोच प्रभू परमात्मा सर्व खंड– ब्रह्मांड यात भरून राहिला आहे हे समजते. ॥ १८ ॥ अमावास्येच्या दिवशी चंद्र आकाशातून लुप्त होतो म्हणजे हृदयाकाशातील अज्ञान, अंधकार पूर्णपणे लोप पावतो. पौर्णिमेचे दिवशी जीव ज्ञानवान होऊन त्याचे पौर्णिमेचे दिवशी हृदयाकाश प्रभूच्या प्रेमाच्या शांत प्रकाशाने भरून जाते. तिन्ही लोक त्या प्रकाशाने उजळून जातात. सृष्टीनिर्माता प्रभू परमात्मा ही सारी निर्मिती करून स्वत:च ती कौतुकाने पाहतो. सतगुरूच्या उपदेशाने हे सारे ज्ञान प्राप्त होते व जीव प्रभूरूपाशी एकरूप होऊन जातो. स्वेच्छाचारी जीव मात्र जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतो. ॥ १९ ॥ तो प्रभू परमात्मा घरीदारी सर्वत्र भरून राहिला असला, तरी तो आपल्या स्थानी सुखेनैव स्थिर आहे. ज्याला सतगुरू प्राप्त झाला त्याला सतगुरूच्या माध्यमातून आत्मज्ञानाची प्राप्ती होते. जेथे आशा आहे तेथे निराशाही असते. ह्या द्वैताचे खापर फुटले, नष्ट झाले की जीवाची मायेच्या जाळ्यातून सुटका होते व तो जीव अनासक्त होतो. नानक नम्रपणे सांगतात, की मी अशा प्रभू सेवकाचा दास आहे. ॥ २० ॥ १ ॥

बिलावलु महला ३ वार सत घरु १०

१ ओअंकार सतगुरु प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

आदित वारि आदि पुरखु है सोई ॥ आपे वरतै अवरु न कोई ।
ओति पोति जगु रहिआ परोई ॥ आपे करता करै सु होई ।
नामि रते सदा सुखु होई ॥ गुरमुखि विरला बूझै कोई ॥ १ ॥
हिरदै जपनी जपउ गुणतासा ॥
हरि अगम अगोचरु अपरंपर सुआमी जन पगि लगि धिआवउ होइ दासनि दासा ॥१॥रहाउ॥
सोमवारि सचि रहिआ समाइ ॥ तिस की कीमति कही न जाइ ॥
आखि आखि रहे सभि लिव लाइ ॥ जिसु देवै तिसु पलै पाइ ॥
अगम अगोचरु लखिआ न जाइ ॥ गुर कै सबदि हरि रहिआ समाइ ॥ २ ॥

मंगलि माइआ मोहु उपाइआ ॥ आपे सिरि सिरि धंधै लाइआ ॥
आपि बुझाए सोई बूझै ॥ गुर कै सबदि दरु घरु सूझै ॥
प्रेम भगति करे लिव लाइ ॥ हउमै ममता सबदि जलाइ ॥ ३ ॥
बुधवारि आपे बुधि सारु ॥ गुरमुखि करणी सबदु वीचारु ॥
नामि रते मनु निरमलु होइ ॥ हरि गुण गावै हउमै मलु खोइ ॥
दरि सचै सद सोभा पाए ॥ नामि रते गुरसबदि सुहाए ॥ ४ ॥
लाहा नामु पाए गुरदुआरि ॥ आपे देवै देवणहारु ॥
जो देवै तिस कउ बलि जाईऐ ॥ गुरपरसादी आपु गवाईऐ ॥
नानक नामु रखहु उरधारि ॥ देवणहारे कउ जैकारु ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८४१)

शब्दार्थ : **आदित वारि** – आदित्यवार, रविवार. **सोई** – तोच, परमात्मा. **वरतै** – परिव्याप्त, भरून राहणे. **परोई** – गुंफला जाणे, भरून राहणे. **जपनी** – जपमाळ. **गुणतासा** – गुणनिधी. **पगि** – पाय. **सचि** – सत्य, परमात्मा. **आखि** – वर्णन करणे. **लिवलाई** – एकाग्र, चित्त. **जिसु** – ज्यास. **देवै** – देतो. **तिसु** – त्याला. **पलै** – पदरात. **पाइ** – प्राप्त होते. **लखिया** – वर्णन करणे. **मंगलि** – मंगळवार. **उपाइआ** – उत्पन्न करणे. **सिरिसिरि** – प्रत्येक जीवास. **हऊमे** – अहंकार. **सारु** – संभाळ करतो. **सुभाए** – शोभायमान. **लाहा** – लाभ. **देवणहारु** – देणारा.

भावार्थ : रविवार असे सांगतो, की तो प्रभू परमात्माच आद्यपुरुष आहे. सर्व काही करणारा तोच आहे. अन्य कोणी नाही. त्यानेच सर्व सृष्टी ताण्याबाण्याप्रमाणे एकत्र गुंफून आपल्या ताब्यात ठेवली आहे. तो प्रभू जे करतो तेच होते. जो प्रभुनामात रंगून गेला तोच सुखी होतो. पण हे रहस्य कोणी वीरच सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून जाणतो. ॥ १ ॥ हे जीवा ! तू हृदयरूपी जपमाळ घेऊन त्या गुणनिधी प्रभूच्या नामाचा जप कर. प्रभू परमात्मा अगम्य आहे, अगोचर आहे. अपरंपार आहे, सर्व जीवांचा तो स्वामी आहे. त्याच्या चरणी नम्र होऊन, त्याचे ध्यान करून त्याचे दासानुदास हो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सोमवार असे सांगतो, की हे जीवा तू सत्यरूप प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जा. त्याचे मोल कोणीही करू शकत नाही. अनेक महान साधूसंतांनी त्याचे ठायी चित्त एकाग्र करून त्याचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला पण अखेर त्यांनीही मौन धारण केले. ज्यास ज्ञान द्यावे असे प्रभू परमात्म्यास वाटते त्यासच ते प्राप्त होते. प्रभू परमात्मा अगम्य आहे अगोचर आहे त्याचे वर्णन करणे कोणासही शक्य नाही. सतगुरूच्या उपदेशात प्रभू परमात्मा सामावलेला असतो. ॥ २ ॥ मंगळवार असे सांगतो, की प्रभू परमात्म्याने मोहमाया आदी पंचविकार उत्पन्न केले. प्रत्येक जीवास आपापले काम नेमून दिले. ज्यास प्रभू परमात्मा स्वत: हे रहस्य समजावून देतो त्यासच हे समजते. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने त्यास प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होते. असा भक्त प्रेम आणि भक्तीत आपले मन एकाग्र करतो. सतगुरूच्या उपदेशाने त्याच्या मनातील अहंकार, मोहमाया जळून जाते. ॥ ३ ॥ बुधवार बुद्धी प्रदान करतो. असा जीव सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभुनामाचे चिंतन करून सत्कर्म करू लागतो. प्रभुनामात रंगून गेल्याने त्याचे मन निर्मल होते. हरीचे गुणगान गायल्याने अहंकाररूपी मळ निघून जातो. अशा जीवास सत्यरूप प्रभूच्या दरबारात प्रतिष्ठा प्राप्त होते. प्रभुनामात लीन होऊन सतगुरूच्या

उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने तो जगात सन्मान प्राप्त करतो. ॥४॥ असा जीव प्रभुदारी जाऊन नामाची प्राप्ती करतो. महान दाता प्रभू परमात्मा स्वतःच ते त्यास देतो. ज्यास प्रभू परमात्मा अशाप्रकारे नामाचे दान देतो. त्याचे चरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. प्रभुकृपेने अहंकार दूर होतो. नानक सांगतात प्रभुनाम चित्तात दृढपणे धारण करावे त्या दाता प्रभूचा जयजयकार करा ॥ ५ ॥

वीरवारि वीर भरमि भुलाए ॥ प्रेम भूत सभि दूजै लाऐ ॥
आपि उपाए करि वेखै वेका ॥ सभना करते तेरी टेका ॥
जीअ जंत तेरी सरणाई ॥ सो मिलै जिसु लैहि मिलाई ॥ ६ ॥
सुक्रवारि प्रभू रहिआ समाई ॥ आपि उपाइ सभ कीमति पाई ॥
गुरमुखि होवै सु करै बीचारु ॥ सचु संजमु करणी है कार ॥
वरतु नेमु निताप्रति पूजा ॥ बिनु बूझे सभु भाउ है दूजा ॥ ७ ॥
छनिछरवारि सउण सासत बीचारू ॥ हउमै मेरा भरमै संसारू ॥
मनमुखि अंधा दूजै भाइ ॥ जमं दरि बाधा चोटा खाइ ॥
गुरपरसादी सदा सुखु पाए ॥ सचु करणी साचि लिव लाए ॥ ८ ॥
सतिगुरू सेवाहि से वडभागी ॥ हउमै मारि सचि लिव लागी ॥
तेरै रंगि राते सहजि सुभाइ ॥ तू सुखदाता लैहि मिलाइ ॥
एकस ते दूजा नाही कोइ ॥ गुरमुखि बूझै सोझी होइ ॥ ९ ॥
पंद्रह थिती तै सत वार ॥ माहा रूती आवहि वार वार ॥
दिनसु रैणि तिवै संसारू ॥ आवागउणु कीआ करतारि ॥
निहचलु साचु रहिआ कलधारि ॥ नानक गुरूमुखि बुझै को सबदु वीचारि ॥ १० ॥ १ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८४१)

शब्दार्थ : **वीरवारि** – गुरुवार. **वीर** – हनुमान आदी बावन शूरवीर. **दूजै** – द्वैतभाव. **उपाए** – उत्पन्न केले. **वेखे** – पाहतो. **बेखा** – भिन्न. **करते** – प्रभू परमात्मा. **टेका** – आश्रय, आधार. **सुक्रवारि** – शुक्रवार. **वरतु** – व्रत. **छनिछरवारि** – शनिवार. **सउण** – शकून. **सासत** – शास्त्र. **सुभाइ** – स्वभाव. **एकस** – एकमेव. **सोझी** – ज्ञानी.

भावार्थ : गुरुवार असे सांगतो, की महावीरही मोहमायेच्या भमाला भुलले. भूत प्रेत आदीही द्वैतभावात गुंतून पडले. प्रभू परमात्म्यानेच नाना प्रकारचे जीव निर्माण केले व तोच त्यांचा संभाळही करतो. तो प्रभू परमात्माच सर्व जीवांचा आधार आहे. सर्व जीवजंतू तुलाच शरण जातात. ज्यांना तो स्वत:शी एकरूप करून घेतो तेच प्रभूशी एकरूप होतात. ॥ ६ ॥ शुक्रवार असे सांगतो, की प्रभू परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे. त्याने स्वत:च ही सारी सृष्टी निर्माण केली आहे व प्रत्येकाचे मूल्यही निर्धारित केले आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाराच अशा प्रकारे विचार करतो, की सत्याचरण व संयमी आचरणच हाच श्रेष्ठ आचार आहे. न समजता केलेली व्रते, नेम, नित्य नियमाने केलेली पूजाअर्चा हे सर्व द्वैतभावाचेच प्रतीक आहे. ॥ ७ ॥ शनिवार असे सांगतो,

की सारा संसार शकुन मुहूर्त पाहण्यासाठी शास्त्र धुंडाळत असतो. अज्ञानाने अंध झालेला स्वेच्छाचारी जीव द्वैतभावात अडकून पडतो. तो यमाचे द्वारी मार खातो. सतगुरूच्या कृपेनेच जीव शाश्वत सुख प्राप्त करतो. सत्याचरणानेच जीव सत्यरूप प्रभू परमात्म्यात लीन होतो. ॥ ८ ॥ जो सतगुरूची सेवा करतो तो महाभाग्यवान होय. तो अहंकारास मारून सत्यरूप प्रभूचे ठायी आपले चित्त एकाग्र करतो. प्रभू परमात्म्याच्या प्रेमरंगात रंगून जाणे हा त्याचा सहजस्वभाव बनतो. हे प्रभो ! तूच सुखाचा दाता आहेस. कृपा करून मला तुझ्या रूपात विलीन करून घे. एकमात्र प्रभू परमात्म्याशिवाय अन्य काहीही नाही. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने हे ज्ञान प्राप्त होते. ॥ ९ ॥ पंधरा तिथी, तसेच सात वार, बारा महिने, सहा ऋतू हे येतात- जातात. हे कालचक्र असेच सतत फिरत राहते. ज्याप्रमाणे रात्र व दिवस येतात आणि जातात, त्याचप्रमाणे हा सारा संसारही येत जात असतो. हे आवागमनाचे चक्रही त्या कर्त्या प्रभूनेच निर्माण केले आहे. पण तो स्वत: मात्र शाश्वत अढळ व निश्चल राहतो. नानक सांगतात, कोणी विरळाच सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून हे रहस्य जाणतो. ॥१०॥१॥

॥ बिलावलु महला ३ ॥

आदि पुरखु आपे स्त्रिसटि साजे ॥ जीअ जंत माइआ मोहि पाजे ॥
दूजै भाइ परपंचि लागे ॥ आवहि जावहि मरहि अभागे ॥
सतिगुरि भेटिऐ सोझी पाइ ॥ परपंचु चूके सचि समाइ ॥ १ ॥
जा कै मसतकि लिखिआ लेखु ॥ ता कै मनि वसिआ प्रभु एकु ॥ १ ॥ रहाउ ॥
स्त्रिसटि उपाइ आपे सभु वेखै ॥ कोइ न मेटै तेरै लेखै ॥
सिध साधिक जे को कहै कहाए ॥ भरमे भूला आवै जाए ॥
सतिगुरु सेवै सो जनु बूझै ॥ हउमै मारे ता दरु सूझै ॥ २ ॥
एकसु ते सभु दूजा हुआ ॥ एको वरतै अवरु न बीआ ॥
दूजे ते जे एको जाणै ॥ गुर कै सबदि हरि दरि नीसाणै ॥
सतिगुरु भेटे ता एको पाए ॥ विचहु दूजा ठाकि रहाए ॥ ३ ॥
जिस दा साहिबु डाढा होइ ॥ तिस नो मारि न साकै कोइ ॥
साहिब की सेवकु रहै सरणाई ॥ आपे बखसे दे वडिआई ॥
तिस ते ऊपरि नाही कोइ ॥ कउणु डरै डरु किस का होइ ॥ ४ ॥
गुरमति सांति वसै सरीर ॥ सबदु चीन्हि फिरि लगै न पीर ॥
आवै न जाइ ना दुखु पाए ॥ नामे राते सहजि समाए ॥
नानक गुरमुखि वेखै हदूरि ॥ मेरा प्रभु सद रहिआ भरपूरि ॥ ५ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८४२)

शब्दार्थ : **साजे** – निर्माण केली. **पाजे** – गुंतले. **भेटिऐ** – भेटल्याने. **वसिआ** – वास करतो. **वेखै** – संभाळ करतो. **मेटै** – मिटवणे, पुसणे. **वरते** – परिव्याप्त. **बिआ** – दुसरा. **निसाणै** – चिन्ह, निशाणी, खूण. **टाढा** – बलवान. **साहिबु** – स्वामी, मालक. **बखसे** – क्षमा करतो. **पीर** – पीडा. **हदूरि** – समक्ष, प्रत्यक्ष.

भावार्थ : त्या आदिपुरुषाने, प्रभू परमात्याने ही सारी सृष्टी उत्पन्न केली. सर्व जीवजंतू मोहमायेत अडकवले.

सारा संसार द्वैतभावात लिप्त झाला आहे. हे अभागी जीव जन्मतात– मरतात. जन्ममरणाचे दु:ख भोगतात. ज्यास सतगुरू भेटतो त्यास त्याच्याकडून हे ज्ञान प्राप्त होते, तो संसारातून मुक्त होतो व तो सत्यरूप प्रभू परमात्म्यात सामावून जातो. ॥ १ ॥ ज्याच्या भाग्यात तसा कर्मलेख लिहिलेला असतो त्याच्या अंत:करणात एकमेव प्रभू परमात्मा वास करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूने स्वत: सृष्टी निर्माण करून तिचा प्रतिपाळही तोच करतो. त्याने लिहिलेले विधिलिखीत कोणीही पुसू शकत नाही. सिद्ध व साधक काहीही सांगत असले तरी ते मोहमायेच्या भ्रमात भुलल्याने जन्ममृत्यूच्याच चक्रात फिरत राहतात. जो सतगुरूची सेवा करतो त्यास ज्ञान प्राप्त होते. तो आपल्या मनातील अहंकार नष्ट करतो व प्रभूच्या दारी पोहोचतो. ॥ २ ॥ एकमात्र प्रभू परमात्म्यापासून सर्व इतर गोष्टी निर्माण झाल्या. सर्वत्र तो एकमेव प्रभू परमात्मा भरून राहिला आहे. त्याच्याशिवाय अन्य काहीही नाही. ह्या सर्व द्वैतातही जो त्या एकमेव प्रभूस जाणतो तो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून प्रभू दरबारी स्थान प्राप्त करतो. त्याच्या मनातील द्वैतभाव नष्ट होतो. ॥ ३ ॥ ज्याचा स्वामी बलवान आहे त्यास कोणीही मारू शकत नाही. जो सेवक आपल्या स्वामीपुढे विनम्र होऊन राहतो त्यास प्रभू परमात्मा महत्ता प्राप्त करून देतो. त्याच्याहून अन्य कोणीही श्रेष्ठ नाही. त्यास मग कोणाचीही भीती वाटत नाही व त्यास कोणीही भिववू शकत नाही. ॥ ४ ॥ सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्याचे तन–मनास शांती प्राप्त होते. सतगुरूचा उपदेश जाणल्याने मग कोणतीही पीडा त्रास देत नाही. तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त्त होतो. तो सर्व दु:खातूनही मुक्त होतो. तो प्रभुनामात रंगून जाऊन सहजावस्थेत सामावून जातो. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्यास प्रभू परमात्म्याचा साक्षात्कार होतो. माझा प्रभू सर्वत्र भरून राहिला आहे.॥५॥

इकि सेवक इकि भरमि भुलाए ॥ आपे करे हरि आपि कराए ।
एको वरतै अवरु न कोइ ॥ मनि रोसु कीजै जे दूजा होइ ॥
सतिगुरु सेवे करणी सारी ॥ दरि साचै साचे वीचारी ॥ ६ ॥
थिती वार सभि सबदि सुहाए ॥ सतिगुरु सेवे ता फलु पाए ॥
थिती वार सभि आवहि जाहि ॥ गुर सबदु निहचलु सदा सचि समहि ॥
थिती वार ता जा सचि राते ॥ बिनु नावै सभि भरमहि काचे ॥ ७ ॥
मनमुख मरहि मरि बिगती जाहि ॥ एकु न चेतहि दूजै लोभाहि ॥
अचेत पिंडी अगिआन अंधारु ॥ बिनु सबदै किउ पाए पारु ॥
आपि उपाए उपावणहारु ॥ आपे कीतोनु गुर वीचारु ॥ ८ ॥
बहुते भेख करहि भेखधारी ॥ भवि भवि भरमहि काची सारी ॥
ऐथै सुखु न आगै होइ ॥ मनमुख मुए अपणा जनमु खोइ ॥
सतिगुरु सेवे भरमु चुकाए ॥ घर ही अंदरि सचु महलु पाए ॥ ९ ॥
आपे पूरा करे सु होइ ॥ एहि थिती वार दूजा दोइ ॥
सतिगुर बाझहु अंधु गुबारु ॥ थिती वार सेवहि मुगध गवार ॥
नानक गुरमुखि बूझै सोझी पाइ ॥ इकतु नामि सदा रहिआ समाइ ॥ १० ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८४२)

शब्दार्थ : **रोसु** – रोष, राग, क्रोध. **सारी** – श्रेष्ठ. **काचे** – कच्चे. **बिगती** – अधोगती. **अचेत** – नासमज, मूढ. **उपावणहारू** – उत्पन्न करणारा. **कीतोनू** – केले आहेस. **भेख** – वेश. **भवि** – संसारात. **सारी** – खेळी. **ऐथै** – येथे, इहलोकात. **आगै** – पुढे, परलोकात. **घर** – देह. **पूरा** – पूर्ण. **बाझहू** – शिवाय. **सोझी** – ज्ञान.

भावार्थ : हे प्रभो ! तू काहींना सेवाभक्तीच्या मार्गावर नेतोस तर काहींना तू मोहमायेच्या भ्रमात भूलवून ठेवतोस. सर्व काही करणारा तूच आहेस. तू करतोस तेच होते. सर्वत्र तूच भरून राहिला आहे. तुझ्याशिवाय अन्य कोणीही नाही. मनात क्रोध तेव्हाच निर्माण होतो, जेव्हा मनात द्वैतभाव असतो. सतगुरूची सेवा करणे हे श्रेष्ठ कर्म आहे. अशी बुद्धी सत्यरूप प्रभूच सेवकाच्या मनात उत्पन्न करतो. ॥ ६ ॥ प्रत्येक तिथी, प्रत्येक वार प्रभूनामामुळे शोभायमान होते. जो सतगुरूची सेवा करतो त्यास त्याचे फल प्राप्त होते. तिथी व वार येतात–जातात पण सतगुरूकडून प्राप्त झालेले नाम मात्र सदैव स्थिर व निश्चल असते. म्हणून हे जीवा ! तू सदैव सत्यरूप नामात तल्लीन होऊन जा. त्यामुळे तू प्रभुरूपाशी एकरूप होऊन जाशील. सत्यरूप प्रभूच्या नामात रंगून गेले की प्रत्येक तिथी, वार चांगलीच असते. प्रभुनामाशिवाय केलेले कर्म हे अपूर्ण व व्यर्थ आहे. ॥ ७ ॥ स्वेच्छाचारी जीव मेल्यानंतर दुर्गती प्राप्त करतो कारण त्याने कधीही प्रभू परमात्म्याचे स्मरण केलेले नसते व सदैव द्वैतभावात गुंतून गेलेला असतो. त्यातच त्यास आनंद वाटतो. तो मूढ असून त्याचे अंत:करण अज्ञान, अंधकाराने भरलेले असते. असा जीव प्रभुनामाशिवाय हा भवसागर कसा काय पार करू शकेल. ईश्वरानेच त्यास तसे बनवले आहे. हा गुरूविचार आहे. ॥ ८ ॥ स्वेच्छाचारी जीव नाना वेश धारण करून जगाला फसवत असतो. पण त्याचे हे करणे कच्चे व व्यर्थ असते. त्यास इहलोकातही सुख प्राप्त होत नाही व परलोकातही तो सुखी होत नाही. स्वेच्छाचारी जीव हा अमूल्य मानवजन्म व्यर्थ दवडून मरून जातो. जो सतगुरूची सेवा करतो, त्याच्या मनातील मोहमायेचे भ्रम नष्ट होतात. तो आपल्या हृदयातच प्रभू परमात्मा प्राप्त करतो. ॥ ९ ॥ हे प्रभो ! तू पूर्ण आहेस. तू करतोस तेच होते. तिथी, वार यांच्या शुभाशुभाचा विचार हा जीवास द्वैतभावाकडे नेतो. सतगुरूशिवाय सारा गडद अंधकार आहे. तिथी, वार यांचा विचार करणारे अडाणी व मूर्ख होत. नानक सांगतात, जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो त्यास आत्मज्ञान प्राप्त होते. तो एकमात्र प्रभू परमात्म्याच्या नामात रंगून जाऊन प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन राहतो. ॥ १० ॥ २ ॥

बिलावलु महला १ छंत दखणी

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

मुंध नवेलड़ीआ गोइलि आई राम ॥
मटुकी डारि धरी हरि लिव लाई राम ॥
लिव लाइ हरि सिउ रही गोइलि सहजि सबदि सीगारीआ ॥
कर जोड़ि गुर पहि करि बिनंती मिलहु साचि पिआरीआ ॥
धन भाइ भगती देखि प्रीतम काम क्रोधु निवारिआ ॥
नानक मुंध नवेल सुंदरि देखि पिरु साधारिआ ॥ १ ॥

सचि नवेलड़ीए जोबनि बाली राम ॥
आउ न जाउ कही अपने सल नाली राम ॥
नाह अपने संगि दासी मै भगति हरि की भावए ॥
अगाधि बोधि अकथु कथीऐ सहजि प्रभ गुण गावए ॥
राम नाम रसाल रसीआ रवै साचि पिआरीआ ॥
गुरि सबदु दीआ दानु कीआ नानका वीचारीआ ॥ २ ॥
स्रीधर मोहिअड़ी पिर संगि सूती राम ॥
गुर कै भाइ चलो साचि संगूती राम ॥
धन साचि संगूती हरि संगि सूती संगि सखी सहेलीआ ॥
इक भाइ इक मनि नामु वसिआ सतिगुरू हम मेलीआ ॥
दिनु रैणि घड़ी न चसा विसरै सासि सासि निरंजनो ॥
सबदि जोति जगाइ दीपकु नानका भउ भंजनो ॥ ३ ॥
जोति सबाइड़ीए त्रिभवण सारे राम ॥
घटि घटि रवि रहिआ अलख अपारे राम ॥
अलख अपार अपारु साचा आपु मारि मिलाईऐ ॥
हउमै ममता लोभु जालहु सबदि मैलु चुकाइऐ ॥
दरि जाइ दरसनु करी भाणै तारि तारणहारिआ ॥
हरि नामु अंम्रितु चाखि त्रिपती नानका उरधारिआ ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८४३)

शब्दार्थ : **मुंध** – मुग्धा. **नवेलडीआ** – नवयौवना. **गोइलि** – गायरान. **मटुकी** – मातीची घागर. **डारि घरी** – डोक्यावरून उतरवून. **सिगारिआ** – शृंगार केला. **पहि** – पाशी, जवळ. **पिआरिआ** – प्रियकर. **धन** – स्त्री, कामिनी. **निवारिआ** – निवारण केले, नष्ट केले. **साधारिआ** – साधार, आधार प्राप्त झाला. **नाली** – सह, जवळ. **नाह** – नाथ. **भावए** – आवडले. **अगाधि** – अगाध. **बोध** – ज्ञान. **रसाल** – रसांचे भांडार. **रसिआ** – रसिक. **रवै** – रममाण. **विचारिआ** – विचार केला. **मोहिअडी** – मोहविले. **पिर** – पती. **सूती** – झोपते. **संगूती** – संयुक्त. **संगि** – सह. **वसिआ** – वसले. **मेलीआ** – मिलन घडवले. **चसा** – क्षण. **भउ** – भय. **सबाइडीए** – सर्वव्याप्त. **आपु** – अहंकार. **हउमै** – अहंकार. **जालहु** – जाळून टाक. **चुकाईऐ** – नष्ट कर. **चाखि** – चाखून. **दरि** – द्वारी. **भाणै** – इच्छा. **त्रिपती** – तृप्ती. **उरधारिआ** – हृदयात धारण केले.

भावार्थ : हे मुग्ध नवयौवना जीवकामिनी, ज्याप्रमाणे गौपाल आपल्या गायी काही थोड्या काळाकरिता रानात चरावयास नेतात, त्याप्रमाणे तू या जगात फार थोड्या काळासाठी आली आहेस. म्हणून तू ह्या संसारातील मोहमायेचा आकर्षणांचा त्याग करून प्रभुरूपात आपले चित्त एकाग्र करून प्रभुनामाचा सहज शृंगार कर. दोन्ही कर जोडून आपल्या सतगुरूस विनंती कर की हे गुरुराया माझे माझ्या प्रियकराशी मिलन घडव. जीवकामिनीचा भक्तिभाव ओळखून प्रियकर प्रभूने तिच्या मनातील काम, क्रोध नष्ट केले. नानक सांगतात, आपल्या प्रिय पतीस पाहून त्या

मुग्ध नवयौवनेस आधार प्राप्त झाला. ॥ १ ॥ सत्यरूपात लीन झालेली चिरतरुण नवयौवना जीवस्त्री आता आपला प्रियकर आपल्या जवळच आहे हे जाणल्याने कोठेही अन्यत्र भटकत नाही. ती आपल्या पतीसह दास्य भावाने राहून त्याच्या भक्तिभावात लीन होऊन राहते. ज्या प्रभू परमात्म्याचे ज्ञान अगाध आहे. अनिर्वचनीय आहे त्याचे ती सहजभावाने कथन करते व त्याचे गुणगान गाते. रामनाम हे सर्व रसाचे भांडार आहे. प्रभू परमात्मा रसिक आहे. जी जीवकामिनी नामरसात रंगून गेली तिच्यासह तो त्या रसास्वादात रंगून जातो. नानक सांगतात, प्रभूने सतगुरुद्वारा मनास नामाचे ज्ञान दिले. नानक त्याचेच चिंतन करतो. ॥ २ ॥ जी जीवस्त्री प्रभुनामात मोहित होऊन पडली आहे तीच खरोखर प्रभुसंगे शय्यासोबत करत आहे. अशी स्त्री आपल्या सत्संगी मैत्रिणींनाही त्याचा संग प्राप्त व्हावा म्हणून घेऊन येते. एकाग्र मनाने, एकाग्र भक्तिभावाने मनात प्रभुनाम वसवल्याने सतगुरूने माझे प्रभुपतीशी मिलन घडवून आणले आहे. आता मी रात्री-दिवस कोणत्याही घटकेला कोणत्याही क्षणी प्रभूस विसरत नाही. प्रत्येक श्वासाश्वासाबरोबर त्या निरंजन प्रभूचे नामस्मरण करतो. नानक सांगतात, अशा जीवाच्या हृदयात प्रभुनामाने परमात्म्याची परमज्योत प्रज्वलित होते. व तो भवभंजन प्रभुरूपात लीन होतो. ॥ ३ ॥ त्या प्रभू परमात्म्याची परमज्योत साऱ्या त्रिभुवनात परिव्याप्त आहे. तो अलक्ष व अपार सत्यरूप प्रभू आहे. अहंभाव नष्ट केल्यावरच तो प्राप्त होतो. हे जीवा ! अहंकार, लोभ, ममता आदी विकारांना जाळून टाकून प्रभुनामाच्या साहाय्याने अंत:करणातील सर्व मलिनता दूर कर. प्रभूच्या द्वारी जाऊन त्याची आज्ञा शिरोधार्य मानून त्याचे दर्शन प्राप्त होते व तो तारणहार प्रभू जीवास भवसागर तारून नेतो. नानक सांगतात, मी हरिनामामृत चाखून तृप्त झालो आहे. आता मी प्रभुनाम माझ्या हृदयात कायमचे धारण केले आहे. ॥ ४ ॥ १ ॥

॥ बिलावलु महला १ ॥

मै मनि चाउ घणा साचि विगासी राम ॥
मोही प्रेम पिरे प्रभि अबिनासी राम ॥
अविगतो हरि नाथु नाथह तिसै भावै सो थीऐ ॥
किरपालु सदा दइआलु दाता जीआ अंदरि तूं जीऐ ॥
मै अवरू गिआनु न धिआनु पूजा हरि नामु अंतरि वसि रहे ॥
भेखु भवनी हठु न जाना नानका सचु गहि रहे ॥ १ ॥
भिंनड़ी रैणि भली दिनस सुहाए राम ॥
निजघरि सूतड़ीए पिरमु जगाए राम ॥
नव हाणि नव धन सबदि जागी आपणे पिर भाणीआ ॥
तजि कूडु कपटु सुभाए दूजा चाकरी लोकाणीआ ॥
मै नामु हरि का हारु कंठे साच सबदु नीसणिआ ॥
कर जोड़ि नानकु साचु मागै नदरि करि तुधु भाणिआ ॥ २ ॥
जागु सलोनड़ीए बोलै गुरबाणी राम ॥
जिनि सुणि मंनिअड़ि अकथ कहाणी राम ॥

अकथ कहाणी पदु निरबाणी को विरला गुरमुखि बूझए ॥
ओहु सबदि समाए आपु गवाए त्रिभवण सोझी सूझए ॥
रहै अतीतु अपरंपरि राता साचु मनि गुण सारिआ ॥
ओहु पूरि रहिआ सरब ठाई नानका उरि धारिआ ॥ ३ ॥
महलि बुलाइड़ीए भगति सनेही राम ॥
गुरमति मनि रहसी सीझसि देही राम ॥
मनु मारि रीझै सबदि सीझै त्रैलोक नाथु पछाणए ॥
मनु डीगि डोलि न जाइ कत ही आपणा पिरु जाणए ॥
मै आधारु तेरा तू खसमु मेरा मै ताणु तकीआ तेरओ ॥
साचि सूचा सदा नानक गुरसबदि झगरु निबेरओ ॥ ४ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८४३)

शब्दार्थ : **चाउ** – उत्साह. **घणा** – खूप. **मोही** – मोहून गेलो. **पिरे** – प्रभुपती. **अविगतो** – अव्यक्त. **तिसै** – त्याला. **थीऐ** – होते. **भेखु** – वेश. **जिउ** – जसे. **मीना** – मासा. **भिंनडी** – भिजून चिंब होणे, सुखदायी. **भली** – चांगली. **दिनस** – दिवस. **सुहाए** – सुखदायक. **सुतडीए** – झोपलेल्या. **नवहाणि** – नवजीवन प्राप्त झालेली. **नवघन** – नवयौवना. **भाणिआ** – आवडली. **तजि** – त्यागून. **कुड** – असत्य. **लोकाणीआ** – लोकांच्या. **हारु** – हार. **नदरि** – कृपादृष्टी. **तुघ** – तुला. **सलीनडीए** – सुनयना. **मंनिअडी** – मनन केले. **पदु** – पद. **निरबाणी** – निर्वाण, मोक्ष. **ओहु** – तो. **अतीतु** – विरक्त. **अपरंपारि** – अपरंपार, परात्पर. **राता** – अनुरक्त. **सारिआ** – स्मरण. **बुलाइडीए** – बोलावतो. **रहसी** – प्रसन्न राहतो. **सीझसि** – सफल. **रीझै** – प्रसन्न होते. **डीगिडोलि** – दोलायमान. **कत** – कोठेही. **खसमु** – प्रभुपती, स्वामी. **ताणु** – बल, सामर्थ्य. **तकिआ** – आधार. **तेरओ** – तुझा.

भावार्थ : माझ्या मनात अनंत उल्हास उत्पन्न झाला आहे. माझे मन सत्यज्ञानाने विकसित झाले आहे. मी माझ्या प्रिय पतीच्या प्रेमाने मोहित झाले आहे. माझा प्रभू अविनाशी आहे. तो अव्यक्त प्रभू नाथांचा नाथ आहे. जे त्यास व्हावेसे वाटते तेच होते. तो कृपाळू आहे. दयाळू आहे. तो जीवांचा जीव आहे. जर तो प्रभू स्वत: माझ्या अंत:करणात वास करील तर अन्य कोणत्याही ज्ञानाची, ध्यानाची, अर्चनेची मला आवश्यकता नाही. हे नानक नाना वेश धारण करून तीर्थाटन करण्यात मला मुळीच स्वारस्य नाही. आता मी माझ्या मनात प्रभू परमात्म्यास दृढपणे धारण केले आहे. ॥ १ ॥ आता त्या चिंब रात्री सुखावह झाल्या आहेत. दिवसही आनंददायक झाला आहे. आत्ममग्न अवस्थेत निद्रिस्त असलेल्या जीवस्त्रीस प्रभुपतीने स्वत: जागृत केले. आता ती चिरयौवना नववधू प्रभूनामाने जागृत झाल्याने आपल्या पतीची आवडती झाली आहे. आता तिने असत्याचरण, कपटी स्वभाव व द्वैतभावात सापडून अन्य लोकांची सेवा करणे सोडून दिले आहे. आता सत्यरूप प्रभू परमात्म्याचे प्रतीक प्रभुनामाचा हार माझ्या गळ्यात मी घातला आहे. नानक म्हणतात, मी दोन्ही कर जोडून सत्यरूप प्रभूस नम्र विनंती करतो की जर तुझी इच्छा असेल तर माझ्यावर तुझी कृपा व्हावी. ॥२ ॥ हे सुनयने ! जागृत हो व प्रभूनामाचा उच्चार कर की ज्याचे मनन हीच प्रभूची अनिर्वचनीय कथा आहे. कोणी विरळा जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून

ही अनिर्वचनीय कथा जाणतो व निर्वाणपद प्राप्त करतो. तो शब्दब्रह्मात लीन होऊन जातो. अहंकाराचा त्याग करतो त्यामुळे त्यास त्रिभुवनाचे ज्ञान प्राप्त होते. नानक सांगतात तो प्रभू सर्वत्र पूर्ण भरून राहिला आहे. त्यास आपल्या हृदयात धारण करा. ॥ ३ ॥ तो वाहिगुरू प्रभू परमात्मा भक्तांवर प्रेम करतो. त्यांना आपल्या महालात बोलावतो. हे जीवस्त्री ! तू गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून प्रसन्न झाली आहेस व आपला मानवदेह सफल केला आहेस. तू मनातील वासनाविकारास मारल्यामुळे प्रभुनामात रममाण झाल्याने तुला त्रैलोक्याचे ज्ञान झाले व प्रभू परमात्म्याची ओळख पटली आहे. आता तिच्या मनाची दोलायमान अवस्था संपून ते स्थिर झाले आहे. तिने आपल्या पतीस जाणले आहे. हे परमात्मा ! मला केवळ तुझाच आधार आहे. तूच माझा स्वामी आहेस, तूच माझे बल आहेस. नानक सांगतात, मला तूच आधार आहेस. तो प्रभू परमात्माच केवळ सत्य, शुद्ध आहे. त्याला जाणल्यानेच माझ्या मनातील सारे झगडे नष्ट झाले. ॥ ४ ॥ २ ॥

छंत बिलावलु महला ४ मंगल

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने प्राप्त होतो.

मेरा हरि प्रभु सेजै आइआ मनु सुखि समाणा राम ॥
गुरि तुठै हरि प्रभु पाइआ रंगि रलीआ माणा राम ॥
वडभागीआ सोहागणी हरि मसतकि माणा राम ॥
हरि प्रभु हरि सोहागु है नानक मनि भाणा राम ॥ १ ॥
निंमाणिआ हरि माणु है हरि प्रभु हरि आपै राम ॥
गुरमुखि आपु गवाइआ नित हरि हरि जापै राम ॥
मेरे हरि प्रभ भावै सो करै हरि रंगि हरि रापै राम ॥
जनु नानकु सहजि मिलाइआ हरि रसि हरि ध्रापै राम ॥ २ ॥
माणस जनमि हरि पाईऐ हरि रावण वेरा राम ॥
गुरमुखि मिलु सोहागणी रंगु होइ घणेरा राम ॥
जिन माणस जनमि न पाइआ तिन्ह भागु मंदेरा राम ॥
हरि हरि हरि हरि राखु प्रभ नानकु जनु तेरा राम ॥ ३ ॥
गुरि हरि प्रभु अगमु द्रिडाइआ मनु तनु रंगि भीना राम ॥
भगति वछलु हरि नामु है गुरमुखि हरि लीना राम ॥
बिनु हरि नाम न जीवदे जिउ जल बिनु मीना राम ॥
सफल जनमु हरि पाइआ नानक प्रभि कीना राम ॥ ४ ॥ १ ॥ ३ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८४४)

शब्दार्थ : **सेजै** – शय्येवर. **तूहै** – प्रसन्न, संतुष्ट. **माणा** – भोगतो. **वडभागीआ** – महाभाग्याने. **मसतकि** – माथ्यावर. **माणा** – भाग्यमणी. **साहागु** – सौभाग्य, पती. **निमाणिअ** – मानहीन, अवमानीत. **आपै** –

स्वत:. **जापै** – जप करतो. **भावै** – आवडते. **रापै** – अनुरक्त. **ध्रापै** – तृप्त. **रावण** – स्मरण. **वेरा** – वेळ, समय. **घणेरा** – पुष्कळ. **मंदेरा** – . **जिउ** – जसे, ज्याप्रमाणे.

भावार्थ : माझा प्रभुपती माझ्या शेजेवर आला. त्याच्या सहवाससुखाने माझे चित्त आनंदविभोर झाले आहे. माझा सतगुरु माझ्यावर प्रसन्न झाला व त्यामुळे मला प्रभुपती प्राप्त झाला. आता मी त्याच्या प्रेमात रंगून रममाण झाले आहे. मला प्रभुपतीकडून सौभाग्य प्राप्त झाले आहे. माझ्या महाभाग्याने प्रभूने माझ्या मस्तकी सौभाग्यमणी विराजमान केला आहे. प्रभू परमात्मा हाच सर्व जीवांचा सौभाग्य आहे. नानकाच्या मनाला तो फार आवडला आहे. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा मानहीनांना स्वत: सन्मान प्राप्त करून देतो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा आपल्या मनातील अहंकार नष्ट करून सदैव प्रभुनामाचा जप करतो. माझा हरी प्रभू त्याला जे आवडते ते तो करतो. तोच जीवास प्रभूच्या प्रेमरंगात रममाण करतो. दास नानकास तर तो सहज लाभला आहे व नानक प्रभूशी एकरूप झाल्याने प्रभुप्रेमाने तृप्त झाला आहे. ॥ २ ॥ मानव जन्मातच प्रभूची प्राप्ती होते. मानवजन्म हाच प्रभू परमात्म्याचे स्मरण करण्याचा योग्य अवसर आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्रभुमिलनाचे सौभाग्य प्राप्त होते व प्रभुप्रेमरंगाचा परमानंद प्राप्त होतो. ज्यास मनुष्यजन्मात प्रभुप्राप्ती झाली नाही तो दुर्भागी होय. हे प्रभो ! ह्या नानकाचे रक्षण कर कारण तो तुझाच दास आहे. ॥ ३ ॥ सतगुरूने माझ्या मनात प्रभुनाम दृढ केले. आता माझे मन प्रभूच्या प्रेमरंगात भिजून गेले आहे. प्रभू परमात्म्याचे नावच 'भक्तवत्सल' आहे. गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने मन प्रभुनामांत तल्लीन होते. ज्याप्रमाणे मासा पाण्याशिवाय जगूच शकत नाही, त्याप्रमाणे मी आता प्रभुनामाशिवाय जगूच शकत नाही. नानक सांगतात, प्रभुप्राप्ती झाल्याने माझा मानवजन्म सफल झाला. हे सारे त्या हरीनेच केले. ॥ ४ ॥ १ ॥ ३ ॥

॥ बिलावलु महला ४ ॥ सलोकु ॥

हरि प्रभु सजणु लोड़ि लहु मनि वसै वड़भागु ॥
गुरि पूरै वेखालिआ नानक हरि लिव लागु ॥ १ ॥
॥ छंत ॥ मेरा हरि प्रभ रावणि आईआ हउमै बिखु झागे राम ॥
गुरमति आपु मिटाइआ हरि हरि लिव लागे राम ॥
अंतरि कमलु परगासिआ गुर गिआनी जागे राम ॥
जन नानक हरि प्रभु पाइआ पूरै वडभागे राम ॥ १ ॥
हरि प्रभु हरि मनि भाइआ हरि नामि वधाई राम ॥
गुरि पूरै प्रभु पाइआ हरि हरि लिव लाई राम ॥
अगिआनु अंधेरा कटिआ जोति परगटिआई राम ॥
जन नानक नामु अधारु है हरि नामि समाई राम ॥ २ ॥
धन हरि प्रभि पिआरै रावीआ जां हरि प्रभ भाई राम ॥
अखी प्रेम कसाईआ जिउ बिलक मसाई राम ॥
गुरि पूरै हरि मेलिआ हरि रसि आघाई राम ॥

जन नानक नामि विगसिआ हरि हरि लिव लाई राम ॥ ३ ॥
हम मूरख मुगध मिलाइआ हरि किरपा धारी राम ॥
धनु धंनु गुरू साबासि है जिनि हउमै मारी राम ॥
जिन्ह वडभागीआ वडभागु है हरि हरि उरधारी राम ॥
जन नानक नामु सलाहि तू नामे बलिहारी राम ॥ ४ ॥ २ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८४५)

शब्दार्थ : **सजणु** – साजण. **लोडि** – शोधणे. **वेखालिआ** – दाखवले. **रावणि** – भोगावयास. **झागे** – पार करून, ओलांडून. **परगासिआ** – विकसित होणे. **वधाई** – . **परगटिआई** – प्रगट होणे. **धन** – जीवस्त्री. **रविआ** – उपभोगली, रममाण झाला. **अखि** – डोळे. **कसाईआ** – विस्फारलेले. **बिलक** – मांजर. **मसाई** – उंदीर. **आघाई** – तृप्त. **विगसिआ** – विकसित होणे. **मिलाइआ** – मिलन घडवते. **धारी** – धारण करणे. **सलाहि** – स्फूर्ती.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ हे जीवा ! प्रभूरूपी साजणाचा तू आपल्या मनात शोध घे. तो महाभाग्याने मनात वास करतो. नानक सांगतात, पूर्णगुरूने मला प्रभूचे दर्शन घडवले. आता मी प्रभुनामाशी एकरूप होऊन गेलो आहे. ॥ १ ॥ छंत ॥ आता जीवस्त्री आपल्या मनातील अहंकार व विषयविकारांना पार करून प्रभुपतीशी रममाण होण्यासाठी आली आहे. सतगुरूच्या उपदेशाने मनातील अहंभाव नष्ट करून ती प्रभुरूपात एकचित्त होऊन गेली आहे. सतगुरूने अंत:करणात आत्मज्ञान जागृत केल्याने हृदयकमल विकसित झाले आहे. दासनानक सांगतात, तिने महाभाग्याने प्रभुपतीस प्राप्त केले आहे. ॥ १ ॥ माझ्या मनास प्रभू प्रिय झाला व सदैव प्रभुनामाचे स्मरण केल्याने लोक माझे अभिनंदन करू लागले. पूर्णगुरूच्या कृपेने जीवस्त्रीस प्रभुपतीची प्राप्ती झाली. आता ती हरिरूपात लीन झाली. आता तिच्या मनातील अज्ञान, अंधकार नष्ट होऊन तिच्या हृदयात प्रभूची परमज्योत प्रकाशित झाली. दास नानक सांगतात, प्रभुनाम हाच जीवाचा आधार आहे व जीव हरिनामातच एकरूप होतो. ॥ २ ॥ जी जीवस्त्री प्रभूस आवडते तिच्याशीच तो रममाण होतो. ज्याप्रमाणे उंदराला पाहून मांजराचे डोळे आनंदाने विस्फारले जातात. सतगुरूने जीवस्त्रीचे प्रभूशी मिलन घडवले. आता ती प्रभूच्या प्रेमाने तृप्त झाली. दास नानक सांगतात ज्याचे मन प्रभुनामाने विकसित झाले. तो प्रभुनामात एकरूप होऊन जातो. ॥ ३ ॥ प्रभूने कृपा करून माझ्यासारख्या मूर्ख अडाणी जीवास आपल्यात सामावून घेतले. तो सतगुरू धन्य आहे. त्याची वाहवा आहे. ज्याने माझ्या मनातील अहंकार नष्ट केला. ज्या भाग्यशाली जीवांचे भाग्य पूर्ण झाले असे जीव आपल्या अंत:कारणात प्रभू परमात्म्यास आपल्या हृदयात धारण करतात. नानक सांगतात, हे जीवा ! तू प्रभुनामाने परमात्म्याची स्तुती कर व प्रभुनामावर आपले सर्वस्व समर्पित कर. ॥४॥२॥४॥

बिलावलु महला ५ छंत

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

मंगल साजु भइआ प्रभु अपना गाइआ राम ॥
अबिनासी वरु सुणिआ मनि उपजिआ चाइआ राम ॥

मनि प्रीति लागै वडै भागै कब मिलीऐ पूरन पते ॥
सहजे समाईऐ गोविंदु पाईऐ देहु सखीए मोहि मते ॥
दिनु रैणि ठाढी करउ सेवा प्रभु कवन जुगती पाइआ ॥
बिनवंति नानक करहु किरपा लैहु मोहि लड़ि लाइआ ॥ १ ॥
भइआ समाहड़ा हरि रतनु विसाहा राम ॥
खोजी खोजि लधा हरि संतन पाहा राम ॥
मिले संत पिआरे दइआ धारे कथहि अकथ बीचारो ॥
इक चिति इक मनि धिआइ सुआमी लाइ प्रीति पिआरो ॥
कर जोड़ि प्रभ पहि करि बिनंती मिलै हरि जसु लाहा ॥
बिनवंति नानक दासु तेरा मेरा प्रभु अगम अथाहा ॥ २ ॥
साहा अटलु गणिआ पूरन संजोगो राम ॥
सुखह समूह भइआ गइआ विजोगो राम ॥
मिलि संत आए प्रभ धिआए बणे अचरज जाञीआं ॥
मिलि इकत्र होए सहजि ढोए मनि प्रीति उपजी माञीआ ॥
मिलि जोति जोती ओति पोती हरि नामु सभि रस भोगो ॥
बिनवंति नानक सभ संति मेली प्रभु करण कारण जोगो ॥ ३ ॥
भवनु सुहावड़ा धरति सभागी राम ॥
प्रभु घरि आइअड़ा गुरचरणी लागी राम ॥
गुरचरण लागी सहजि जागी सगल इछा पुंनीआ ॥
मेरी आस पूरी संत धूरी हरि मिले कंत विछुंनिआ ॥
आनंद अनदिनु वजहि वाजे अहं मति मन की तिआगी ॥
बिनवंति नानक सरणि सुआमी संत संगि लिव लागी ॥ ४ ॥ १ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८४५)

शब्दार्थ : **वरु** – वर, पती. **चाइआ** – आवड. **पूरनपते** – पूर्णप्रभुपती. **देहू** – दे. **मोहि** – मला. **मते** – ज्ञान, उपदेश. **ठाढी** – उभी ठाकली. **जुगती** – युक्ती. **लैहु** – घे. **लडि** – . **समाहडा** – आनंद. **विसाहा** – खरेदी केले. **खोजी** – शोधून. **लधा** – प्राप्त केले. **पाहा** – पाशी. **पहि** – पाशी. **अगम** – अगम्य. **अथाहा** – अथांग, अगाध. **साहा** – विवाह, मुहूर्त. **अटलु** – अटल. **गणि** – मुहूर्त काढला. **संजोगो** – संयोग. **गइओ** – गेला. **विजोगो** – वियोग. **बणे** – झाले. **जाञीआ** – वराती. **ढोए** – . **माञीआ** – मुलीकडील वऱ्हाडी. **ओति पोती** – ओतप्रोत. **विनवंति** – प्रार्थना करतो. **मेली** – मिलन घडवले. **जोगो** – योग्य. **भवनु** – शरीररूपी घर. **सुहावडा** – सुंदर. **सभागी** – भाग्यवान. **आइअडा** – आला. **पूंनीआ** – पूर्ण झाल्या. **आस** – इच्छा. **धूरी** – धूळ. **विछुंनिआ** – वियुक्त. **अनदिनु** – सदैव. **वजहि** – . **वाजे** – .

भावार्थ : मंगलवाद्ये वाजू लागली. जीवात्म्याने परमात्म्याचे गुणगान केले. तिला कळाले की तिचा पती प्रभू

अविनाशी आहे. त्यामुळे तिच्या मनात त्याच्याविषयी प्रेम उत्पन्न झाले. महाभाग्यानेच प्रभुपतीविषयी मनात प्रेम उत्पन्न होते व ती प्रभुपतीशी मिलन केव्हा होते त्याची आतुरतेने वाट पाहू लागते. हे माझ्या सत्संगी सख्यांनो ! मला अशी बुद्धी द्या की मी सहजपणे प्रभुपतीशी एकरूप होऊन जाईन. मी रात्रंदिवस उभी राहून प्रभुप्राप्तीसाठी त्याची सेवा करत आहे. तुम्ही कोणत्या युक्तीने त्यास प्राप्त केलेत ? नानक विनयपूर्ण प्रार्थना करतात, की हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर व मला आपल्या पदरात घे. ॥ १ ॥ प्रभुरूपी रत्न प्राप्त झाल्याने जीवस्त्री आनंदविभोर झाली आहे. खूप शोध घेतल्यानंतर मला संतांच्या संगतीत प्रभू परमात्मा भेटला. संतांची भेट झाल्यावर त्यांनी माझ्यावर दया करून मला त्या प्रभूची अनिर्वचनीय कथा ऐकवली. त्यांनी सांगितले एकाग्र चित्ताने, एकाग्र मनाने प्रभू परमात्म्याचे ध्यान करावे व त्याच्यावर प्रेम करावे. हात जोडून त्यास विनंती करा, की प्रभो मला तुझे गुणगान करण्याचा लाभ प्राप्त व्हावा. नानक विनयपूर्वक सांगतात, की माझा प्रभू अगाध व अथांग आहे व मी त्याचा दास आहे. ॥ २ ॥ प्रभुमिलनाची पूर्व निर्धारित घटका पूर्ण भरली आहे. आता प्रभुवियोग संपून मी पूर्ण सुखी झाले आहे. सर्व संत एकत्र येऊन प्रभू परमात्म्याचे गुणगान गात आहेत. काय ही आश्चर्यकारक वरात जमली आहे ! वधूकडील सर्वजण एकत्र जमून मुलीस प्रेमपूर्वक निरोप देत आहेत. आता जीवात्म्याची आत्मज्योत प्रभुपतीच्या प्रेमात ओतप्रोत होऊन प्रभुप्रेमाचा उपभोग घेत आहे. नानक सांगतात, की सर्व संतांनी एकत्र येऊन हे मिलन घडवले आहे. प्रभू परमात्मा सर्व काही करण्यास व करवून घेण्यास समर्थ आहे. ॥ ३ ॥ हे घर सुंदर आहे. ही धरती भाग्यवान आहे कारण येथे प्रभू माझ्या हृदयात विराजमान झाला. आता मी प्रभुचरणी लीन झाले आहे. प्रभुचरणी लीन झाल्याने मला सहजावस्था प्राप्त झाली. आता माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या आहेत. संतजनांचे चरणरज प्राप्त झाल्याने माझे वियुक्त प्रभुपतीशी मिलन झाले व माझ्या सर्व आशा पूर्ण झाल्या. आता मी अहंभावाचा त्याग केल्याने माझ्या मनात सदैव आनंदाची वाद्ये वाजू लागली आहेत. नानक नम्रतापूर्वक सांगतात, की मी प्रभू परमात्म्यास शरण गेलो आहे व माझे मन संतसंगतीत एकरूप झाले आहे. ॥ ४ ॥ १ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

भाग सुलखणा हरि कंतु हमारा राम ॥
अनहद बाजित्रा तिसु धुनि दरबारा राम ॥
आनंद अनदिनु वजहि वाजे दिनसु रैणि उमाहा ॥
तह रोग सोग न दूखु बिआपै जनम मरणु न ताहा ॥
रिधि सिधि सुधा रसु अंम्रितु भगति भरे भंडारा ॥
बिनवंति नानक बलिहारि वंञा पारब्रहम प्रान अधारा ॥ १ ॥
सुणि सखीअ अहेलड़ीहो मिलि मंगलु गावह राम ॥
मनि तनि प्रेमु करे तिसु प्रभ कउ रावह राम ॥
करि प्रेमु रावह तिसै भावह इक निमख पलक न तिआगीऐ ॥
गहि कंठि लाईऐ नह लजाईऐ चरन रज मनु पागीऐ ॥
भगति ठगउरी पाइ मोहह अनत कतहू न धावह ॥

बिनवंति नानक मिलि संगि साजन अमर पदवी पावह ॥ २ ॥
बिसमन बिसम भई पेखि गुण अबिनासी राम ॥
करु गहि भुजा गहि कटि जम की फासी राम ॥
गहि भुजा लीन्ही दासि कीन्ही अंकुरि उदोतु जणाइआ ॥
मलन मोह बिकार नाठे दिवस निरमल आइआ ॥
द्रिसटि धारी मनि पिआरी महा दुरमति नासी ॥
बिनवंति नानक भई निरमल प्रभ मिले अबिनासी ॥ ३ ॥
सूरज किरणि मिले जल का जलु हूआ राम ॥
जोती जोति रली संपूरनु थीआ राम ॥
ब्रहमु दीसै ब्रहमु सुणीऐ एकु एकु वखाणीऐ ॥
आतम पसारा करणहारा प्रभ बिना नही जाणीऐ ॥
आपि करता आपि भुगता आपि कारणु कीआ ॥
बिनवंति नानक सेई जाणहि जिन्ही हरि रसु पीआ ॥ ४ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८४६)

शब्दार्थ : **भाग** – भाग्य. **सुलखणा** – सुलक्षण, चांगले. **कंत** – पती. **बाजित्रा** – वाजंत्री. **धुनि** – ध्वनी. **उमाहा** – उत्साह. **तह** – तेथे. **विआपे** – व्यापणे. **ताहा** – तेथे. **सुधा** – अमृत. **वंञा** – . **सहेलडीही** – मैत्रिणी. **रावह** – स्मरण. **तिसै** – त्याला. **लजाईऐ** – सोडणे. **पागीऐ** – . **ठगउरी** – भूल आणणारी वनस्पती. **मोहह** – मोहविले. **कतहु** – कोठेही. **पावह** – प्राप्त होते. **बिसमन** – आश्चर्यचकित. **करू** – हात. **गहि** – धरून. **लिन्ही** – घेऊन, धरून. **किन्ही** – केली. **उदोतु** – उगवला. **जणाइआ** – ज्ञान दिले. **मलन** – मलिन. **नाठे** – नष्ट झाले. **नासी** – नष्ट केली. **संपूरनु** – संपूर्ण. **थिआ** – झाले. **वखाणीऐ** – सांगणे, कथन करणे. **सेई** – तेच.

भावार्थ : माझ्या सौभाग्यामुळे मला प्रभु परमात्मा पती लाभला. त्याच्या दरबारात सतत अनाहत नाद निनादत आहे. तो ऐकून मी उत्साहित होत आहे. तेथे जीवास कोणताही रोग, शोक व्यापू शकत नाही. तेथे जन्मही नाही आणि मृत्यूही नाही. तेथे सर्व ऋद्धी, सिद्धी, नामामृत व भक्तीचे भांडार आहे. नानक विनयपूर्वक प्रार्थना करतात, की सर्व जीवांचा प्राणाधार जो परब्रह्म परमात्म्याच्या चरणी सर्वस्व अर्पण करावे. ॥ १ ॥ हे माझ्या सख्यांनो, सतसंगी मैत्रिणींनो ! ऐका, तुम्ही सर्वजणी मिळून प्रभू परमात्म्याचे मंगलगीत गा. प्रभूवर तन-मनानी प्रेम करा. प्रभूचे सदैव स्मरण करा. एक पळभरही त्यास विसरू नका. संसारातील सर्व लाजलज्जा सोडून प्रभुपतीस आपल्या हृदयाशी घट्ट धरून ठेवा. त्याच्या चरणरजात पूर्णपणे लिप्त व्हा. भक्तिरूपी मोहविणाऱ्या औषधीने त्यास मोहित करा व आपले मन त्याला सोडून अन्य कोठेही भटकू देऊ नका. नानक विनयपूर्वक सांगतात, की प्रभुपतीस प्राप्त करून अमरत्वाची पदवी प्राप्त करा. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्याचे आश्चर्यकारक गुण पाहून मन आश्चर्याने थक्क होते. तो जीवास आधार देऊन, हाती धरून त्यास यमाच्या पाशातून मुक्त करतो. त्याने माझा हात धरून मला आपली दासी केले आहे. त्याने माझ्या मनातील ज्ञानाचा अंकुर जागृत करून मला

आत्मज्ञान दिले. माझ्या मनातील सर्व मालिन्य, मोह आदी सर्व विकार नष्ट करून आता माझा प्रत्येक दिवस पवित्र झाला आहे. त्याने माझ्यावर कृपा केली. आता मनाला मोहवणारी महा दुर्बुद्धी नष्ट झाली. नानक विनयपूर्वक सांगतात की, त्या अविनाशी प्रभूशी मिलन झाल्याने माझे जीवन पवित्र झाले आहे. ॥ ३ ॥ मी व प्रभू आता इतके एकरूप झालो आहोत की जणू सूर्य व त्याचे किरण किंवा पाणी व त्यावर उठणारे तरंग. जीवाची आत्मज्योत प्रभूच्या परमज्योतीत विलीन झाली. प्रभूचाच अंश असलेला जीव आता प्रभूत विलीन झाल्याने त्याच्यासारखाच संपूर्ण झाला. आता मला सर्व परब्रह्माचेच दर्शन होते. सर्वत्र त्याचाच ध्वनी ऐकू येतो व सर्वत्र त्याचीच कथा होत आहे. आत्म्याचा विकास करणाराही प्रभूच आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही नाही. सर्व काही करणारा प्रभूच आहे. सर्व काही भोगणारा तोच आहे व सर्वांचे कारणही तोच आहे. नानक सांगतात, ज्याने प्रभुनामरसामृत प्राशन केले आहे तोच हे जाणतो. ॥ ४ ॥ २ ॥

बिलावलु महला ५ छंत

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

सखी आउ सखी वसि आउ सखी असी पिर का मंगलु गावह ॥
तजि मानु सखी तजि मानु सखी मतु आपणे प्रीतम भावह ॥
तजि मानु मोहु बिकारु दूजा सेवि एकु निरंजनो ॥
लगु चरण सरण दइआल प्रीतम सगल दुरत बिखंडनो ॥
होइ दास दासी तजि उदासी बहुड़ि बिधी न धावा ॥
नानकु पइअंपै करहु किरपा तामि मंगलु गावा ॥ १ ॥
अंम्रितु प्रिअ का नामु मै अंधुले टोहनी ॥
ओह जोहै बहु परकार सुंदरि मोहनी ॥
मोहनी महा बचित्रि चंचलि अनिक भाव दिखावए ॥
होइ ढीठ मीठी मनहि लागै नामु लैण न आवए ॥
ग्रिह बनहि तीरै बरत पूजा बाट घाटै जोहनी ॥
नानकु पइअंपै दइआ धारहु मै नामु अंधुले टोहनी ॥ २ ॥
मेहि अनाथ प्रिअ नाथ जिउ जानहु तिउ रखहु ॥
चतुराई मोहि नाहि रीझावउ कहि मुखहु ॥
नह चतुरि सुघरि सुजान बेती मोहि निरगुनि गुनु नही ॥
नह रूप धूप न नैण बंके जह भावै तह रखु तुही ॥
जै जै जइअंपहि सगल जा कउ करणापति गति किनि लखहु ॥
नानकु पइअंपै सेव सेवकु जिउ जानहु तिउ मोहि रखहु ॥ ३ ॥
मोहि मछुली तुम नीर तुझ बिनु किउ सरै ॥

मोहि चात्रिक तुम्ह बूंद त्रिपतउ मुखि परै ॥
मुखि परै हरै पिआस मेरी जीअ हीआ प्रानपते ॥
लाडिले लाड लडाइ सभ महि मिलु हमारी होइ गते ॥
चीति चितवउ मिटु अंधारे जिउ आस चकवी दिनु चरै ॥
नानकु पइअंपै प्रिअ संगि मेली मछुली नीरु न वीसरै ॥ ४ ॥
धनि धंनि हमारे भाग घरि अइआ पिरु मेरा ॥
सोहे बंक दुआर सगला बनु हरा ॥
हर हरा सुआमी सुखह गामी अनद मंगल रसु घणा ॥
नवल नवतन नाहु बाला कवन रसना गुन भणा ॥
मेरी सेज सोही देखि मोही सगल सहसा दुखु हरा ॥
नानकु पइअंपै मेरी आस पूरी मिले सुआमी अपरंपरा ॥ ५ ॥ १ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८४७)

शब्दार्थ : आउ – या. असी – सगळ्या मिळून. मानु – अभिमान. मतु – मुळीच नाही. भावह – आवडणे. दुरत – पाप. बिखंडनो – नष्ट करणारा. उदासी – . बहुडि – परत. पइअंपै – सांगतात. तामि – तेव्हा. अंधुले – अंधळा. टोहनी – काठी. ओह – तीच. जोहै – पाहते. बचित्रि – विचित्र. ढीठ – धीट, हट्टाने. ग्रिह – घर. बन – वन. तीरै – नदीकिनारी. बरत – व्रत. बाट – वाट. घाटै – घाटावर. रिझावउ – प्रसन्न करणे. सुधर – सुंदर. सुजान – ज्ञानी. बेती – तत्त्ववेत्ता. बंके – सुंदर. जइअंपहि – करतात. जा कउ – जा कोणास. सरै – जगणे, राहणे. चात्रिक – चातक. त्रिपतउ – तृप्त. लाडिले – लाडका. चितवउ – चिंतन करणे. चकवी – . सोहे – त्याचे. हरा – हिरवेगार. नवतन – नूतन. नाहु – नाथ. भणा – सांगणे, वर्णन करणे. बाला – . कवन – कोण.

भावार्थ : हे सत्संगी सख्यांनो ! या आपण सगळ्या मिळून त्या प्रभू परमात्म्याचे मंगलगीत गाऊया. सख्यांनो आपल्या मनातील अहंभावाचा त्याग करा. निराभिमानी झाल्याने कदाचित तुम्ही प्रभूस प्रिय व्हाल. अभिमान, मोह, विकार, द्वैतभाव सर्वांचा त्याग करून त्या प्रभू परमात्म्याची सेवा करा. त्या दयाळू, प्रेमळ सर्व पापांचा नाश करणाऱ्या प्रभूच्या चरणी शरण जा. उदासीनता टाकून त्याच्या दासांची दासी व्हा. अन्य कोणत्याही विधीविधानामागे, कर्मकांडामागे धावू नका. नानक सांगतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर. मी तुझे मंगलगीत गातो. ॥ १ ॥ माझ्या प्रिय प्रभूचे नाम अमृतसमान आहे. प्रभुनाम ही माझ्या अंधळ्याची काठी आहे. ही मोहमाया जीवाला अनेक प्रकारे मोहविण्याचा प्रयत्न करत असते. ही महाविचित्र व मायावी आहे. अत्यंत चंचल आहे. ती अनेक हावभाव करून जीवास मोहविते. ती धीट होऊन मानवी मनास गोडी लावते व मनास प्रभुनामाचा विसर पाडते. ती घरी, रानी, घाटावर, व्रत करताना, मार्गी सर्वत्र ही माया क्रियाशील राहून जीवास आपल्या मायाजालात अडकवते. नानक म्हणतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर. तुझे नाम हीच माझ्या अंधळ्याची काठी आहे. ॥ २ ॥ हे माझ्या प्रिय नाथा ! माझे अनाथाचे तुला योग्य वाटेल तसे रक्षण कर. माझ्या अंगी कोणतीही चतुराई नाही. मी कोणत्या मुखाने तुझी

आळवणी करू ? मी चतुर नाही, सुंदर नाही, सुज्ञ नाही, तत्त्ववेत्ता नाही, मी गुणहीन आहे. माझ्या अंगी कोणतेही गुण नाहीत. ना रूप, ना गंध, ना सुंदर नेत्रकटाक्ष. अशा माझे हे प्रभो तुला योग्य वाटेल तसे रक्षण कर. ज्या प्रभूचा सारे लोक जयजयकार करतात त्या करुणामय प्रभूची गतिविधी कोण वर्णन करू शकेल ? नानक सांगतात, मी तुझा सेवक केवळ तुझे सेवा करणे जाणतो. तुला योग्य वाटेल तसे तू माझे रक्षण कर. ॥ ३ ॥ हे प्रभो ! मी मासोळीसमान आहे. तू जळासमान आहेस. मी तुझ्याशिवाय कसा जगू शकेन ? मी चातक पक्षी तर तू स्वातीचा जलबिंदू. स्वातीचे जलबिंदू (प्रभुनाम) मुखात पडल्यानेच मी तृप्त होईन, प्रभुनामरूपी जल मुखात पडल्याने माझी तहान भागली व माझे जीवन प्रफुल्लित झाले. जसे पावसाने सारी सृष्टी हिरवीगार होते. हे प्रेम करणाऱ्या प्रेमळ प्रभू तू आम्हा सर्वांवर प्रेम कर म्हणजे आम्हास परमगती प्राप्त होईल. ज्याप्रमाणे चकवी पक्षिणीचा सूर्योदय होताच भाग्योदय होतो त्याप्रमाणे हे प्रभो तुझे मनात चिंतन करताच अंत:करणातील अज्ञान, अंधकार दूर होतो. नानक सांगतात, ज्याप्रमाणे मासा पाण्यापासून कधीही विभक्त होत नाही, त्याप्रमाणे प्रभूशी एकरूप झालेला जीव प्रभूपासून कधीच विभक्त होत नाही. ॥ ४ ॥ धन्य धन्य माझे भाग्य. माझा प्रभुपती माझ्या हृदयात वास्तव्यास आला आहे. माझे सारे जीवन सुशोभित झाले आहे व माझी हृदयरूपी धरणी हिरवीगार व प्रफुल्लित झाली आहे. सर्व सुखे देणारा माझा स्वामी मला आता अधिकच आनंददायक व मंगलदायी वाटत आहे. माझा स्वामी नवजवान व नित्य नूतन वाटणारा आहे. मी कोणत्या जिव्हेने त्याचे गुणगान करू ? माझ्या शय्येवर त्याला पाहून माझ्या सर्व चिंता व दु:ख दूर झाले. नानक म्हणतात, तो अपार प्रभुपती प्राप्त झाल्याने माझ्या सर्व आशा पूर्ण झाल्या आहेत. ॥ ५ ॥ १ ॥ ३ ॥

बिलावलु महला ५ छंत मंगल

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

॥ सलोकु ॥

सुंदर सांति दइआल प्रभ सरब सुखानिधि पीउ ॥
सुख सागर प्रभ भेटिऐ नानक सुखी होत इहु जीउ ॥ १ ॥ छंत ॥
सुख सागर प्रभु पाईऐ जब होवै भागो राम ॥
माननिमानु वञाईऐ हरि चरणी लागो राम ॥
छोडि सिआनप चातुरी दुरमति बुधि तिआगो राम ॥
नानक पउ सरणाई रामराइ थिरु होइ सुहागो राम ॥ १ ॥
सो प्रभु तजि कत लागीऐ जिसु बिनु मरि जाईऐ राम ॥
लाज न आवै अगिआन मती दुरजन बिरमाईऐ राम ॥
पतित पावन प्रभु तिआगि करे कहु कत ठहराईऐ राम ॥
नानक भगति भाउ करि दइआल की जीवन पदु पाईऐ राम ॥ २ ॥
स्री गोपालु न उचरहि बलि गईए दुहचारणि रसना राम ॥

प्रभु भगति वछलु नह सेवही काइआ काक ग्रसना राम ॥
भ्रमि मोही दूख न जाणही कोटि जोनी बसना राम ॥
नानक बिनु हरि अवरु जि चाहना बिसटा क्रिम भसमा राम ॥ ३ ॥
लाइ बिरहु भगवंत संगे होइ मिलु बैरागनि राम ॥
चंदन चीर सुगंध रसा हउमै बिखु तिआगनि राम ॥
ईत ऊत नह डोलीऐ हरि सेवा जागनि राम ॥
नानक जिनि प्रभु पाइआ आपणा सा अटल सुहागनि राम ॥ ४ ॥ १ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८४७)

शब्दार्थ : **सांति** – शांतिस्वरूप. **पीउ** – निधी. **भेटिऐ** – भेटल्याने. **होत** – झाला. **इहु** – हा. **भागो** – भाग्य. **माननी** – अभिमानी, अहंकारी. **वञाईऐ** – दूर कर. **सिआनप** – शहाणपण. **पउ** – जा. **कत** – कोठे. **जिसु** – ज्याच्या. **बिरमाईऐ** – पथभ्रष्ट होणे, भटकणे. **बलि गईए** – जळून गेली. **दुहचारणि** – दुराचारिणी. **काइआ** – काया, शरीर. **ग्रसना** – खाईल. **चाहना** – इच्छा करणे. **क्रिम** – कृमी, किडा. **भसमा** – राख. **बिरहु** – विरह. **बैरागनि** – विरक्त, बैरागीण. **चीर** – वस्त्र.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ तो प्रभुपती सुंदर, शांतिदायक, दयाळू व सर्व सुखाचा निधी आहे. नानक सांगतात, तो सुखसागर प्रभुपती प्राप्त झाल्याने हा जीव सुखी झाला. ॥ छंत ॥ जेव्हा भाग्य पूर्ण होते, तेव्हाच तो सुखसागर प्रभू प्राप्त होतो. हे अभिमानी जीवस्त्री तू अभिमान सोडून दे. प्रभुचरणी लीन हो. तुझे शहाणपण, चातुर्य, दुर्विचार, कुबुद्धीचा त्याग कर. नानक सांगतात, जी प्रभुपतीस शरण गेली तिचे सौभाग्य शाश्वत टिकते. ॥ १ ॥ ज्याच्याशिवाय आत्मिक मरण प्राप्त होते अशा प्रभुपतीस सोडून तू कुणामागे जाणार ? अज्ञानीबुद्धीने दुर्जनांच्या संगतीने पथभ्रष्ट होऊन भटकताना तुला लाज कशी वाटत नाही ? पतितपावन प्रभूस सोडून तू अन्यत्र कोठे स्थान प्राप्त करशील ? नानक सांगतात, हे जीवा ! तू त्या दयाळू प्रभूची भावपूर्ण भक्ती कर. त्यामुळे तुला परमपद प्राप्त होईल. ॥ २ ॥ श्री गोपालाचे नाम न उच्चारणारी दुराचारिणी जिव्हा जळून नष्ट होते. त्या भक्तवत्सल प्रभूची सेवा न करणारी काया कावळ्यांचे भक्ष्य बनेल. मोहमायेच्या भ्रमात भटकणारा जीव कोटी योनीत फिरण्याचे दु:ख जाणत नाही. नानक सांगतात, हरीशिवाय अन्य गोष्टींची इच्छा करणे म्हणजे विष्ठेतील किड्यासमान विष्ठेतच राख होऊन जाण्यासमान आहे. ॥ ३ ॥ विरक्त होऊन प्रभू परमात्म्याची भक्ती केल्याने त्याच्याशी मिलन होते. सुगंधी द्रव्ये, उंची वस्त्रे, अन्य रसांचा उपभोग, अहंकार हे सारे विषसमान असून त्याज्य आहेत. त्याचा त्याग कर. हे जीवा ! तू इकडे तिकडे भटकू नकोस, प्रभुसेवा करून नित्य जागृत राहा. नानक सांगतात, जिने आपल्या प्रभुपतीस प्राप्त केले ती शाश्वत सौभाग्यवती होते. ॥ ४ ॥ १ ॥ ४ ॥

॥ बिलावलु महला ५ ॥

हरि खोजहु वडभागीहो मिलि साधू संगे राम ॥
गुन गोविद सद गाईअहि पारब्रहम कै रंगे राम ॥

सो प्रभु सद ही सेवीऐ पाईअहि फल मंगे राम ॥
नानक प्रभ सरणागती जपि अनत तरंगे राम ॥ १ ॥
इकु तिलु प्रभू न वीसरै जिनि सभु किछु दीना राम ॥
वडभागी मेलावड़ा गुरमुखि पिरु चीन्हा राम ॥
बाह पकड़ि तम ते काढिआ करि अपुना लीना राम ॥
नामु जपत नानक जीवै सीतलु मनु सीना राम ॥ २ ॥
किआ गुण तेरे कहि सकउ प्रभ अंतरजामी राम ॥
सिमरि सिमरि नाराइणै भए पारगरामी राम ॥
गुन गावत गोविंद के सभ इछ पुजामी राम ॥
नानक उधरे जपि हरे सभहू का सुआमी राम ॥ ३ ॥
रस भिंनिअड़े अपुने राम संगे से लोइण नीके राम ॥
प्रभ पेखत इछा पुंनीआ मिलि साजन जी के राम ॥
अंम्रित रसु हरि पाइआ बिखिआ रस फीके राम ॥
नानक जलु जलहि समाइआ जोती जोति मीके राम ॥ ४ ॥ २ ॥ ५ ॥ ९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८४८)

शब्दार्थ : **पाईअहि** – प्राप्त होते. **इकु तिलु** – एक क्षणभर. **दीना** – दिले. **मेलावडा** – मिलन झाले. **चीन्हा** – ओळखले. **जीवै** – जगतो. **सितलु** – शांत. **सीना** – . **कहि** – सांगणे. **सिमरि** – स्मरण करणे. **पारगरामी** – पार करणारा. **पुजामी** – पूर्ण झाली. **भिंनिअडे** – भिजणे. **लोइण** – नेत्र. **नीके** – सुंदर. **बिखिआ** – विषयविकार. **मीके** – मिसळून गेली.

भावार्थ : भाग्यवान लोक साधुसंतांच्या संगतीत राहून प्रभू परमात्म्याचा शोध घेतात. परब्रह्म परमात्म्याच्या रंगात रंगून जाऊन ते सदैव गोविंदाचे गुण गातात. सदैव प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने मनोवांछित फल प्राप्त होते. नानक सांगतात, प्रभू परमात्म्यास शरण जाऊन अनंत तरंगरूपी प्रभूचा जप करावा. ॥ १ ॥ ज्या प्रभूने जीवास सर्व काही दिले आहे त्यास क्षणभरही विसरू नकोस. महाभाग्याने प्रभूची प्राप्ती होते. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्रभू परमात्म्याची ओळख पटते. प्रभू परमात्म्याने मला हाती धरून अज्ञान अंधकारातून बाहेर काढले व मला आपलासा केला. नानक सांगतात, मी प्रभुनामाच्या जपावर जगतो. प्रभू परमात्म्याच्या नामजपाने तन, मन शांत होते. ॥ २ ॥ हे अंतर्यामी प्रभू मी तुझ्या कोणकोणत्या गुणांचे वर्णन करू ? प्रभूचे सदैव स्मरण करणारा भवसागर पार करून जातो. गोविंदाचे गुणगान केल्याने मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात. नानक सांगतात, सर्व जीवांचा स्वामी प्रभू परमात्म्याचा जो जप करतो त्याचा उद्धार होतो. ॥ ३ ॥ जे नेत्र प्रभूच्या प्रेमरंगात भिजून चिंब झाले आहेत तेच नेत्र सुंदर होत. प्रभुपतीच्या दर्शनाने माझ्या सर्व इच्छा पूर्ण होतात. आता मी माझ्या साजणाशी एकरूप होऊन गेले आहे. हरिनामामृत प्राप्त झाल्यावर संसारातील विषयविकार तुच्छ वाटू लागतात. नानक सांगतात, ज्याप्रमाणे जलात जल

एकरूप होऊन जावे, त्याप्रमाणे माझी आत्मज्योत प्रभू परमात्म्याच्या परमज्योतीत सामावून गेली आहे. ॥ ४ ॥ २ ॥ ५ ॥ ९ ॥

बिलावल की वार महला ४

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

॥ सलोक म. ४ ॥

हरि उतमु हरि प्रभु गाविआ करि नादु बिलावलु रागु ॥
उपदेसु गुरू सुणि मंनिआ धुरि मसतकि पूरा भागु ॥
सभ दिनसु रैणि गुण उचरै हरि हरि हरि उरि लिव लागु ॥
सभु तनु मनु हरिआ होइआ मनु खिड़िआ हरिआ बागु ॥
अगिआनु अंधेरा मिटि गइआ गुर चानणु गिआनु चरागु ॥
जनु नानकु जीवै देखि हरि इक निमख घड़ी मुखि लागु ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ बिलावलु तब ही कीजीऐ जब मुखि होवै नामु ॥
राग नाद सबदि सोहणे जा लागै सहजि धिआनु ॥
राग नाद छोडि हरि सेवीऐ ता दरगह पाईऐ मानु ॥
नानक गुरमुखि ब्रहमु बीचारीऐ चूकै मनि अभिमानु ॥ २ ॥
॥ पउडी ॥ तू हरि प्रभु आपि अगंमु है सभि तुधु उपाइआ ॥
तू आपे आपि वरतदा सभु जगतु सबाइआ ॥
तुधु आपे ताड़ी लाईऐ आपे गुण गाइआ ॥
हरि धिआवहु भगतहु दिनसु राति अंति लए छडाइआ ॥
जिनि सेविआ तिनि सुखु पाइआ हरि नामि समाइआ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८४९)

शब्दार्थ : **मंनिआ** – मान्य केले, स्वीकारले. **धुरि** – पूर्वकर्मानुसार. **खिडिआ** – विकसित झाले. **चानणु** – प्रकाश. **चरागु** – दीपक. **जिवै** – जीवन जगतो. **मुखिलागु** – दर्शन करून. **सबदि** – उपदेश. **चिरीऐ** – विचार करणे, मनन करणे. **चुकै** – नष्ट होतो. **अगंमु** – अगम्य. **तुधु** – तूच. **उपाइआ** – उत्पन्न केले. **वरतदा** – परिव्याप्त. **सबाइआ** – संपूर्ण. **ताडि लाइए** – समाधी लावणे. **छडाइआ** – सुटका होणे.

भावार्थ : राग बिलावल हा उल्हासाचे, उत्साहाचे प्रतीक आहे. प्रभू परमात्म्याचे गुणगान बिलावल रागात करावे. भाव असा, की उल्हसित मनाने प्रभूचे गुण गान करावे. पूर्वकर्मानुसार ज्याचे भाग्य पूर्ण झाले तोच सतगुरूचा उपदेश ऐकून त्याचा स्वीकार करतो व त्याप्रमाणे आचरण करतो. असा जीव प्रभुनामात आपले चित्त एकाग्र करून रात्रंदिवस प्रभुनामाचे स्मरण करतो. त्याचे तन, मन उल्हसित होते. मनरूपी बाग हिरवीगार होते. सतगुरूने दाखविलेल्या ज्ञानदीपाच्या प्रकाशाने अंत:करण प्रकाशित झाले. त्यामुळे अंत:करणातला अज्ञान, अंधकार नष्ट

झाला. दास नानक प्रभू परमात्म्याच्या क्षणभर दर्शनाकरिता जीवन जगतो आहे. हे प्रभो ! मला दर्शन दे.॥१॥म.३॥ जर मुखात प्रभू परमात्म्याचे नाम असेल तरच बिलावल रागातून उत्साह प्राप्त होईल. जेव्हा मन सहजावस्थेत पोहोचून एकाग्र चित्ताने प्रभुनामाचे गायन केले जाईल, तेव्हाच राग, नाद सुंदर व सुमधुर होतील. राग, नाद ह्याच्या शिवायही प्रभूची सेवा, नामस्मरण केले तरी त्यास प्रभू दरबारात सन्मान प्राप्त होतो. नानक सांगतात, जो गुरूच्या उपदेशाचे चिंतन, मनन करून त्याप्रमाणे आचरण करतो त्याच्या मनातील अहंभाव गळून पडतो. ॥ २ ॥ पउडी ॥ हे प्रभो ! तू स्वत: अगम्य आहेस. ही सृष्टी, हे जीवजंतू सारे काही तूच निर्माण केले आहेस. तू स्वत: समाधीत मग्न राहून स्वत:चे गुणगान करत असतोस. हे भक्तजनहो ! रात्रंदिवस सदैव प्रभू परमात्म्याचे ध्यान करा. तोच अंती तुम्हास मुक्ती प्रदान करणार आहे. ज्यांनी ज्यांनी प्रभू परमात्म्याची सेवा केली, त्यांना सुखाची प्राप्ती झाली व ते हरिनामाशी एकरूप झाले. ॥ १ ॥

॥ सलोक म. ३ ॥

दूजै भाइ बिलावलु न होवई मनमुखि थाइ न पाइ ॥
पाखंडि भगति न होवई पारब्रहमु न पाइआ जाइ ॥
मनहठि करम कमावणे थाइ न कोई पाइ ॥
नानक गुरमुखि आपु बीचारीऐ विचहु आपु गवाइ ॥
आपे आपि पारब्रहमु है पारब्रहमु वसिआ मनि आइ ॥
जंमणु मरणा कटिआ जोती जोति मिलाइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ बिलावलु करिहु तुम्ह पिआरिहो एकसु सिउ लिव लाइ ॥
जनम मरण दुखु कटीऐ सचे रहै समाइ ॥
सदा बिलावलु अनंदु है जे चलहि सतिगुर भाइ ॥
सत संगति बहि भाउ करि सदा हरि के गुण गाइ ॥
नानक से जन सोहणे जि गुरमुखि मेलि मिलाइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ सभना जीआ विचि हरि आपि सो भगता का मितु हरि ॥
सभु कोई हरि कै वसि भगता कै अनंदु घरि ॥
हरि भगता का मेली सो भगत जन चिति करि ॥
तुधु अपडि कोइ न सकै सभ झखि झखि पवै झडि ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८४९)

शब्दार्थ : **दुजै** – द्वैत. **थाइ** – स्थान. **पाखंडि** – बाह्य अवडंबर, बाह्य देखावा. **मनहठि** – मनाच्या हट्टापायी. **आपु** – स्वत:, आत्मस्वरूप. **वसिआ** – वास करणे. **करिहु** – करा. **एकसु** – एकमात्र प्रभू. **चलहि** – चाललात. **बहि** – बसून. **से** – ते. **सोहणे** – सुंदर, श्रेष्ठ. **जि** – जे. **मितु** – मित्र. **वसि** – अधीन. **घरि** – घरात, हृदयात. **सरबत** – सर्वत्र. **सउ** – झोपा. **निसुल** – निश्चिंत. **टंग** – टांग, पायावर पाय टाकून, बिनघोर. **खसमु** – स्वामी. **चिति** – चित्तात. **अपडि** – पोचणे. **झडि** – थकून जातात.

भावार्थ : द्वैतभावात बुडालेला जीव बिलावल रागापासून उत्साह प्राप्त करू शकत नाही. स्वेच्छाचारी प्रभू

दरबारी स्थान प्राप्त करू शकत नाही. पाखंड करून बाह्य देखाव्याने खरी भक्ती होत नाही व असा जीव परब्रह्म परमात्म्यास प्राप्त करू शकत नाही. केवळ मनाच्या हट्टापायी केलेल्या कर्मकांडाने प्रभू दरबारी स्थान प्राप्त करू शकत नाही. नानक सांगतात, जो गुरू उपदेशाप्रमाणे आचरण करून आत्मतत्त्वाचा विचार करतो त्याच्या अंत:करणातील अहंकार नष्ट होतो. त्याला कळून येते, की तो स्वत:च परब्रह्म आहे व स्वत: परब्रह्म परमात्मा त्याच्या मनात वास करत आहे. तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो व त्याची आत्मज्योत परमात्म्याच्या परमज्योतीशी एकरूप होऊन जाते. ॥ १ ॥ म. ३ ॥ हे प्रियजनहो ! तुम्ही त्या एकमेव प्रभू परमात्म्यात एकाग्रचित्त होऊन बिलावल राग गाऊन हर्षोल्हासाचा आनंद प्राप्त करा. असे केल्याने जन्ममरणाचे दु:ख दूर होते व जीव सत्यरूप प्रभू परमात्म्यात सामावून जातो. जो सतगुरूच्या आज्ञेप्रमाणे आचरण करतो. त्यास बिलावल रागापासून सदैव आनंद प्राप्त होतो. असा जीव सत्संगात बसून भावपूर्ण अंत:करणाने सदैव हरीचे गुणगान गातो. नानक सांगतात, जो सेवक सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून प्रभूशी एकरूप होऊन राहतो, तोच खरा श्रेष्ठ सेवक होय. ॥ २ ॥ सर्व जीवांचे ठायी तो प्रभू परमात्मा विराजमान आहे. प्रभू परमात्मा स्वत: भक्तांचा परममित्र आहे. सर्व काही प्रभू परमात्म्याच्या अधीन आहे. प्रभुभक्तांच्या हृदयात सदैव आनंद वास करतो. प्रभू सदैव सर्वत्र आपल्या भक्तांच्या सोबतच असतो. त्यामुळे प्रभुभक्त निश्चिंतपणे पायावर पाय टाकून बिनघोर निद्रा घेऊ शकतो. प्रभू परमात्मा सर्व जीवांचा स्वामी आहे. भक्तजन त्याचेच सदैव चिंतन करतात. हे प्रभो ! तुझ्यापर्यंत कोणीही कधीही पोहोचू शकत नाही. सर्वजण प्रयत्न कर करून अखेर थकून जातात. ॥ २ ॥

॥ सलोक म. ३ ॥

ब्रहमु बिंदहि ते ब्राहमणा जे चलहि सतिगुर भाइ ॥
जिन कै हिरदै हरि वसै हउमै रोगु गवाइ ॥
गुण रवहि गुण संग्रहहि जोती जोति मिलाइ ॥
इसु जुग महि विरले ब्राहमण ब्रहमु बिंदही चितु लाइ ॥
नानक जिन्ह कउ नदरि करे हरि सचा से नामि रहे लिव लाइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ सतिगुर की सेव न कीतीआ सबदि न लगो भाउ ॥
हउमै रोगु कमावणा अति दीरघु बहु सुआउ ॥
मनहठि करम कमावणे फिरि फिरि जोनी पाइ ॥
गुरमुखि जनमु सफलु है जिस नो आपे लए मिलाइ ॥
नानक नदरी नदरि करे ता नाम धनु पलै पाइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ सभ वडिआईआ हरि नाम विचि हरि गुरमुखि धिआईऐ ॥
जि वसतु मंगीऐ साई पाईऐ जे नामि चितु लाईऐ ॥
गुहज गल जीअ की कीचै सतिगुरू पासि ता सरब सुखु पाईऐ ॥
गुरु पूरा हरि उपदेसु देइ सभ भुख लहि जाईऐ ॥
जिसु पूरबि होवै लिखिआ सो हरि गुण गाईऐ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५०)

शब्दार्थ : **ब्रहमु** – ब्रह्म. **बिंदहि** – जाणतो. **चलहि** – चालतो, आचरण करतो. **भाइ** – आज्ञा. **खहि** – स्मरण करतो. **जिन्ह** – ज्या. **कउ** – कोणावर. **कीतीआ** – केली. **सुआउ** – स्वार्थी. **धनु** – धन. **साई** – ती. **गुहज** – गुप्त. **गल** – गोष्ट. **किचै** – सांगितली. **लहि** – लयाला, नष्ट होते.

भावार्थ : जो ब्रह्म जाणतो तो ब्राह्मण. तो आपल्या सतगुरूच्या आज्ञेप्रमाणे आचरण करतो. त्याने अहंकाराचा त्याग केलेला असतो. त्याच्या हृदयात प्रभू परमात्म्याचा वास असतो. तो सदैव प्रभूचे गुणगान गातो. ईश्वरीय गुणांचा संग्रह करतो. त्याची आत्मज्योत परमज्योतीशी एकरूप झालेली असते. ह्या जगात असे ब्राह्मण फार विरळ आहेत. ते ब्रह्म जाणतात व सतत ब्रह्माचे चिंतन करतात. नानक सांगतात, ज्यांच्यावर प्रभुकृपा करतो, ते प्रभुनामात लीन होऊन जातात. ॥ १ ॥ म. ३ ॥ जो कधीही सतगुरूची सेवा करत नाही. ज्याला प्रभुनाम गोड वाटत नाही, त्याची प्रत्येक कृती अहंकाराने भरलेली असते. तो अत्यंत स्वार्थी असतो. तो मनाच्या हट्टापायी कर्म करतो. त्यामुळे त्याला परत परत योनीत जन्म घ्यावा लागतो. जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो, त्याचा जन्म सफल होतो. त्यास प्रभू परमात्मा आपल्यात सामाऊन घेतो. नानक सांगतात, कृपा करणारा प्रभू ज्याच्यावर कृपा करतो त्यास नामधन प्राप्त होते. ॥ २ ॥ पउडी ॥ सर्व मोठेपण हरिनामात साठवलेले आहे. गुरुमुखी होऊन त्याचे ध्यान करावे. जो प्रभुनामात आपले चित्त एकाग्र करतो तो जे मागतो ते त्यास प्राप्त होते. हे जीवा ! तू तुझ्या मनातील सर्व गुप्त गोष्टी सतगुरूस मोकळ्या मनाने सांग म्हणजे तुला सर्व सुखाची प्राप्ती होईल. जर पूर्णगुरू प्रभू परमात्मा जीवास उपदेश देईल तर त्याची विकारांची भूक नष्ट होईल. ज्याच्या पूर्व भाग्यात तसे लिहिले असेल तोच प्रभूचे गुणगान गातो. ॥ ३ ॥

॥ सलोक म. ३ ॥

सतिगुर ते खाली को नही मेरै प्रभि मेलि मिलाए ॥
सतिगुर का दरसनु सफलु है जेहा को इछे तेहा फलु पाए ॥
गुर का सबदु अंम्रितु है सभ त्रिसना भुख गवाए ॥
हरि रसु पी संतोखु होआ सचु वसिआ मनि आए ॥
सचु धिआइ अमरा पदु पाइआ अनहद सबद वजाए ॥
सचो दह दिसि पसरिआ गुर कै सहजि सुभाए ॥
नानक जिन अंदरि सचु है से जन छपहि न किसै दे छपाए ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ गुर सेवा ते हरि पाईऐ जा कउ नदरि करेइ ॥
मानस ते देवते भए सची भगति जिसु देइ ॥
हउमै मारि मिलाइअनु गुर कै सबदि सुचेइ ॥
नानक सहजे मिलि रहे नामु वडिआई देइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ गुर सतिगुर विचि नावै की वडी वडिआई हरि करतै आपि वधाई ॥
सेवक सिख सभि वेखि वेखि जीवन्हि ओन्हा अंदरि हिरदै भाई ॥
निंदक दुसट वडिआई वेखि न सकनि ओन्हा पराइआ भला न सुखाई ॥

किआ होवै किसही ही झख मारी जा सचे सिउ बणि आई ॥
जि गल करते भावै सा नित नित चड़ै सवाई सभ झखि झखि मरै लोकाई ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८५०)

शब्दार्थ : **का** – कोणीही. **जेहा** – जशी. **तेहा** – तशी. **सचु** – सत्यस्वरूप परमात्मा. **संतोख** – संतोष. **पसरिआ** – पसरलेले, व्यापलेले. **छपहि** – लपून राहणे. **छपाए** – लपवणे. **मानस** – माणूस. **देवते** – देवता. **सुचेही** – पवित्र. **नावै** – प्रभुनाम. **वधाइ** – वाढवली. **वेखी** – पाहून. **जीवन्हि** – जीवन जगतात. **ओन्हा** – त्यांच्या. **किआ** – काय. **होवै** – होणार. **जा** – जेव्हा.

भावार्थ : 'माझ्या प्रभू परमात्म्याने संयोगपूर्ण ज्याची सतगुरूशी भेट घडवून आणली, त्यांना सतगुरूकडून कधीही रिक्त हस्ते यावे लागत नाही. सतगुरूचे दर्शन सदैव सफल होते. जशी इच्छा करावी तसे फल प्राप्त होते. सतगुरूचा शब्द हा अमृतासमान आहे. त्यामुळे सर्व सांसारिक वासनांची भूक नष्ट होते. हरिरसामृत पिऊन मन संतुष्ट होते. मनात सत्यरूप प्रभू परमात्मा वास करतो. सत्यरूप प्रभूचे ध्यान केल्याने अमरपद प्राप्त होते. अंत:करणात अनाहत नाद सुरू होतो. गुरूप्रमाणे शांत स्वभाव असणारा प्रभू दाही दिशा व्यापून राहिला आहे. नानक सांगतात, ज्याच्या अंतरात सत्यरूप प्रभू वास करतो त्यास कोणीही कितीही लपविण्याचा प्रयत्न केला तरी तो लपून राहू शकत नाही. ॥ १ ॥ म. ३ ॥ ज्या कोणावर प्रभूची कृपा होते तो गुरूची सेवा करून प्रभू प्राप्त करतो. ज्यास तो सत्यरूप प्रभूची भक्ती देतो तो माणसाचा देव बनतो. असा माणूस आपल्या मनातील अहंकार नष्ट करून शब्दगुरूच्या माध्यमाने आपले मन पवित्र करतो. तो सहजावस्थेस पोचून प्रभू परमात्म्याशी एकरूप होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ स्वत: प्रभू परमात्म्यानेच सतगुरूमध्ये प्रभुनामाचे माहात्म्य निर्माण केले आहे. नामामुळेच नामाचे माहात्म्य वाढत असते. सेवक व शिष्य सर्वजण त्याच्या दर्शनानेच आध्यात्मिक जीवन जगत असतात. त्यांच्या अंतरात, हृदयात त्याचीच आवड उत्पन्न होते. दुष्ट निंदकांना मात्र त्यांची ही महती सहन होत नाही. दुसऱ्याचे चांगले झालेले त्यांना सहन होत नाही. पण सत्यरूप प्रभूशी सख्य जोडल्यावर कोणी कितीही झक मारली तरी काहीही होत नाही. जी गोष्ट प्रभूस आवडते ती सदैव वाढतच राहते. बाकी लोक द्वेष करून करून नष्ट होऊन जातात. ॥ ४ ॥

॥ सलोक म. ३ ॥

ध्रिगु एह आसा दूजे भाव की जो मोहि माइआ चितु लाए ॥
हरि सुखु पल्हरि तिआगिआ नामु विसारि दुखु पाए ॥
मनमुख अगिआनी अंधुले जनमि मरहि फिरि आवै जाए ॥
कारज सिधि न होवनी अंति गइआ पछुताए ॥
जिसु करमु होवै तिसु सतिगुरु मिलै सो हरि हरि नामु धिआए ॥
नामि रते जन सदा सुखु पाइन्हि जन नानक तिन बलि जाए ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ आसा मनसा जगि मोहणी जिनि मोहिआ संसारु ॥

सभ को जम के चीरे विचि है जेता सभु आकारु ॥
हुकमी ही जमु लगदा सो उबरै जिसु बखसै करतारु ॥
नानक गुर परसादी एहु मनु तां तरै जा छोडै अहंकारु ॥
आसा मनसा मारे निरासु होइ गुर सबदी वीचारु ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ जिथै जाईऐ जगत महि तिथै हरि साई ॥
अगै सभु आपे वरतदा हरि सचा निआई ॥
कूड़िआरा के मुह फिटकीअहि सचु भगति वडिआई ॥
सचु साहिबु सचा निआउ है सिरि निंदक छाई ॥
जन नानक सचु अराधिआ गुरमुखि सुखु पाई ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८५०)

शब्दार्थ : **ध्रिगु** – धिक्कार असो. **पल्हरि** – व्यर्थ. **कारज** – कार्य. **पछुताए** – पश्चात्ताप पावून. **करमु** – कृपा. **पाईन्हि** – प्राप्त होते. **आसा** – आशा. **मनसा** – मनीषा. **चिरे** – पदरात, अधीन. **जेता** – जितके. **बखसै** – क्षमा करतो. **ता** – तेव्हाच. **अगै** – परलोकात. **कुडिआरा** – खोटारडा. **फिअकीअहि** – धिक्कारले जाते.

भावार्थ : द्वैतभावातून उत्पन्न झालेल्या आशेचा धिक्कार करावा. द्वैतभावामुळे चित्तात माया, मोह उत्पन्न होतो. त्यामुळे नश्वर गोष्टींसाठी जीव प्रभुनाम सुखास पारखा होतो व परमसुखापासून वंचित होतो व अखेरीस दु:ख भोगतो. अज्ञानाने अंध झालेला स्वेच्छाचारी जीव जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतो. त्याचे कोणतेही कार्य सिद्धीस जात नाही व शेवटी पश्चात्ताप पावून मरून जातो. ज्याच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते. त्यास सतगुरू प्राप्त होतो व तो हरिनामाचे ध्यान करतो. जो जीव प्रभुनामात रंगून गेला त्यास शाश्वत सुखाची प्राप्ती होते. नानक अशा भक्तांच्या चरणी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ आशा व मनीषा सर्व जगाला मोहवितात. जगातील सर्व जीव यमाच्या अधीन आहेत. प्रभूच्या आज्ञेनेच मरण येते. ज्याच्यावर प्रभू कृपा करतो तोच ह्यातून वाचतो. नानक सांगतात, गुरुकृपेने जो अहंकाराचा त्याग करतो, तोच जीव हा भवसागर तरून जातो. सतगुरूच्या उपदेशाचे मनन, चिंतन केल्याने जीव आशा मनीषांना मारून विरक्त होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ जगात तुम्ही जेथे कोठे जाल तेथे प्रभू परमात्मा भरलेला आहे. परलोकातही प्रभू व्याप्त आहे. प्रभू परमात्माच खरा न्यायी आहे. असत्याचरणाचा धिक्कार असो. सत्याचरण करणाऱ्या भक्तांना सन्मान प्राप्त होतो. प्रभू परमात्मा सत्य आहे. त्याचा न्यायही सत्य आहे. प्रभू निंदकाच्या माथी राख पडो. नानकाने सत्याची आराधना केली व सतयुगाच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून सुख प्राप्त केले आहे. ॥ ५ ॥

॥ सलोक म. ३ ॥

पूरै भागि सतिगुरु पाईऐ जे हरि प्रभु बखस करेइ ॥
ओपावा सिरि ओपाउ है नाउ परापति होइ ॥
अंदरु सीतलु सांति है हिरदै सदा सुखु होइ ॥

अंम्रितु खाणा पैन्हणा नानक नाइ वडिआई होइ ॥ १ ॥ म. ३ ॥
ए मन गुर की सिख सुणि पाइहि गुणी निधानु ॥
सुखदाता तेरै मनि वसै हउमै जाइ अभिमानु ॥
नानक नदरी पाईऐ अंम्रितु गुणी निधानु ॥ २ ॥ पउड़ी ॥
जितने पातिसाह साह राजे खान उमराव सिकदार हहि तितने सभि हरि के कीए ॥
जो किछु हरि करावै सु ओइ करहि सभि हरि के अरथीए ॥
सो ऐसा हरि सभना का प्रभु सतिगुर कै वलि है तिनि सभि वरन चारे खाणी सभ स्रिसटि
गोले करि सतिगुर अगै कार कमावण कउ दीए ॥
हरि सेवे की ऐसी वडिआई देखहु हरि संतहु जिनि विचहु काइआ नगरी
दुसमन दूत सभि मारि कढीए ॥
हरि हरि किरपालु होआ भगत जना उपरि
हरि आपणी किरपा करि हरि आपि रखि लीए ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८५१)

शब्दार्थ : पुरै – पूर्ण. ओपावा – उपाय. ओपाउ – उपाय. नाइ – नामसाधना. पाइहि – प्राप्त होते. हहि – झाले. करावै – करवतो. अरथीए – याचक. वलि – . वरन – वर्ण. गोले – सेवक. कार – सेवा.

भावार्थ : जर जीवावर प्रभू कृपा करील व जर त्याचे भाग्य पूर्ण झाले असेल, तर त्यास सतगुरू प्राप्त होतो व सर्व उपायातून सर्वश्रेष्ठ उपाय– प्रभुनाम– त्याची प्राप्ती होते. त्याचे अंत:करण शांत होते. हृदयात शाश्वत सुख प्राप्त होते. आता प्रभुनाम हे त्याचे भोजन, हाच त्याचा पोशाख त्याचे सर्वस्व होते. नानक सांगतात, अशा जीवास प्रभुनामामुळेच मोठेपणा प्राप्त होतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ हे मना ! सतगुरूचा उपदेश ऐक व त्याप्रमाणे आचरण कर. असे केल्याने तुला तो गुणसागर प्रभू परमात्मा प्राप्त होईल. तो सुखदाता प्रभू तुझ्या मनात वास करेल. अहंकार व अभिमान नष्ट होईल. नानक सांगतात, सतगुरूच्या कृपेनेच तो गुणामृताचे भांडार असलेला प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ २ ॥ पउड़ी ॥ आजपर्यंत जे पातशहा, शहा, राजे, खान, उमराव, सिकंदर होऊन गेले ते सर्व प्रभू परमात्म्यानेच निर्माण केले. तो जे काही करवतो तेच होते. सर्वजण प्रभू परमात्म्याच्या दारी याचना करतात. असा हा हरी सर्वांचा प्रभू आहे. चारही वर्ण, चारही योनी, सर्व सृष्टी यांना सेवक बनवून सतगुरूची सेवा करण्यासाठी निर्माण केले आहे. हरिभक्तीचा महिमा असा, की संतांच्या संगतीत राहणाऱ्याच्या शरीरातील मायेच्या पंच महादूतांना (काम, क्रोध, मोह, मद, मत्सर) हाकलून दिले जाते. तो प्रभू परमात्मा आपल्या भक्तांवर कृपा करतो व स्वत: त्यांचे रक्षण करतो. ॥ ६ ॥

॥ सलोकु म. ३ ॥
अंदरि कपटु सदा दुखु है मनमुख धिआनु न लागै ॥
दुख विचि कार कमावणी दुखु वरतै दुखु आगै ॥
करमी सतिगुरु भेटीऐ ता सचि नामि लिव लागै ॥
नानक सहजे सुखु होइ अंदरहु भ्रमु भउ भागै ॥ १ ॥

॥ म. ३ ॥ गुरमुखि सदा हरि रंगु है हरि का नाउ मनिं भाइआ ॥
गुरमुखि वेखणु बोलणा नामु जपत सुखु पाइआ ॥
नानक गुरमुखि गिआनु प्रगासिआ तिमर अगिआनु अंधेरु चुकाइआ ॥ २ ॥
॥ म. ३ ॥ मनमुख मैले मरहि गवार ॥ गुरमुखि निरमल हरि राखिआ उरधारि ॥
भनति नानकु सुणहु जन भाई ॥ सतिगुरु सेविहु हउमै मलु जाई ॥
अंदरि संसा दूख विआपे सिरि धंधा नित मार ॥
दूजै भाइ सूते कबहु न जागहि माइआ मोह पिआर ॥
नामु न चेतहि सबदु न वीचारहि इहु मनमुख का बीचार ॥
हरि नामु न भाइआ बिरथा जनमु गवाइआ नानक जमु मारि करे खुआर ॥३॥
जिसनो हरि भगति सचु बखसीअनु सो सचा साहु ॥
तिस की मुहताजी लोकु कढदा होरतु हटि न वथु न वेसाहु ॥
भगत जना कउ सनमुखु होवै सु हरि रासि लए वेमुख भसु पाहु ॥
हरि के नाम के वापारी हरि भगत हहि जमु जागाती तिना नेडि न जाहु ॥
जन नानकि हरि नाम धनु लदिआ सदा वेपरवाहु ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५१)

शब्दार्थ : अंदरि – अंत:करणात . कपटु – कपट. वेखणु – पाहतो. बोलणा – बोलतो, सांगतो. प्रगासिआ – प्रकाशित झाले. चुकाइआ – दूर झाले, नष्ट झाले. मैले – मलिन. भनति – सांगतो. संसा – संशय, शंका. सूते – झोपला. चेतहि – चिंतन करणे. खुआर – अपमानीत. बखसीअनु – प्रदान केले. मुहताजी – . कढदा – करतात. होरतु – अन्य. वेसाइ – व्यापार. वेमुख – विमुख. भसु – भस्म, राख. पाहू – प्राप्त होते. जागाती – कर घेणारा. बेपरवाहु – बेपर्वा, निश्चिंत.

भावार्थ : स्वेच्छाचारी जीवाच्या अंत:करणात कपट भरलेले असते. त्यामुळे त्याचे मन प्रभुनामात स्थिर राहत नाही. तो सदैव दु:खाने व्याप्त असतो. तो जे काम करतो ते दु:खदायकच होते व परलोकातही दु:खच भोगतो. जेव्हा जीवास प्रभुकृपेने सतगुरू प्राप्त होतो तेव्हा तो सत्यरूप प्रभुनामात एकचित्त होतो. नानक सांगतात, तेव्हा स्वाभाविकपणे त्याच्या मनातील सर्व शंका व भ्रम नष्ट होतात व तो सुखी होतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्यास प्रभुनामाची आवड उत्पन्न होते व तो प्रभूच्या भक्तिरंगात रंगून जातो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा सदैव सर्वत्र प्रभूस पाहतो. सदैव प्रभूचेच बोल बोलतो. सदैव प्रभुनामाचा जप करून सुख प्राप्त करतो. नानक सांगतात, गुरूमुखी झाल्याने अंत:करणात आत्मज्ञानाचा प्रकाश पसरतो व अज्ञान, अंधकाररूपी तिमीर नष्ट होतो. ॥ २ ॥ म. ३ ॥ स्वेच्छाचारी जीव मलिन व मूर्ख असतो. गुरूमुखी जीव निर्मल असतो. तो आपल्या हृदयात प्रभूस धारण करतो. नानक सांगतात, लोकहो ऐका, सतगुरूची सेवा केल्याने अहंकाराचा मळ नष्ट होतो. स्वेच्छाचारी जीवाचे मन सदैव संशय व दु:खाने भरलेले असते व तो सदैव सांसारिक कामधंद्याने व्यापलेला असतो. द्वैतभावात निद्रिस्त झालेला जीव त्यातून कधीच जागा होत नाही. त्याला मोहमायाच प्रिय वाटते. तो कधीही प्रभुनामाचे चिंतन करत नाही. गुरूवचनाचा विचारही करत नाही. ही स्वेच्छाचारी जीवाची विचारधारा असते. नानक

सांगतात, अशा स्वेच्छाचारी जीवास प्रभुनाम आवडत नाही. ते आपला मानवजन्म वाया घालवतात. यम त्यांना अपमानित करून मारून टाकतो. ॥ ३ ॥ पवडी ॥ तोच खरा सावकार ज्यास प्रभू परमात्मा स्वत: भक्ती व सत्यज्ञान प्रदान करतो. अशा सावकाराची सर्व लोक हांजी हांजी करतात कारण नामरूपी वस्तू त्याच्याच कडून प्राप्त होते. अन्य कोठेही प्रभुनामाचा व्यापार होत नाही. भक्तजन जे प्रभू परमात्म्यास सन्मुख होतात ते प्रभूकडून नामाचे भांडार प्राप्त करतात. जे प्रभूस विमुख होतात. त्यांना केवळ राखच प्राप्त होते. केवळ हरिभक्तच हरिनामाचा व्यापार करतात. यमरूपी जकात वसूल करणारा त्यांच्या जवळपासही फिरकत नाही. दास नानक तर केवळ प्रभुनामाचाच व्यापार करतात, त्यामुळे ते सदैव निश्चिंत असतात. ॥ ७ ॥

॥ सलोक म. ३ ॥

इसु जुग महि भगती हरि धनु खटिआ होरु सभु जगतु भरमि भुलाइआ ॥
गुर परसादी नामु मनि वसिआ अनदिनु नामु धिआइआ ॥
बिखिआ माहि उदास है हउमै सबदि जलाइआ ॥
आपि तरिआ कुल उधरे धंनु जणेदी माइआ ॥
सदा सहजु सुखु मनि वसिआ सचे सिउ लिव लाइआ ॥
ब्रहमा बिसनु महादेउ त्रै गुण भुले हउमै मोहु वधाइआ ॥
पंडित पड़ि पड़ि मोनी भुले दूजै भाइ चितु लाइआ ॥
जोगी जंगम संनिआसी भुले विणु गुर ततु न पाइआ ॥
मनमुख दुखीए सदा भ्रमि भुले तिन्ही बिरथा जनमु गवाइआ ॥
नानक नामि रते सेई जन समधे जि आपे बखसि मिलाइआ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ नानक सो सालाहीऐ जिसु वसि सभु किछु होइ ॥
तिसहि सरेवहु प्राणीहो तिसु बिनु अवरु न कोइ ॥
गुरमुखि अंतरि मनि वसै सदा सदा सुखु होइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ जिनी गुरमुखि हरि नाम धनु न खटिओ से देवालीए जुग माहि ॥
ओइ मंगदे फिरहि सभ जगत महि कोई मुहि थुक न तिन कउ पाहि ॥
पराई बखीली करहि आपणी परतीति खोवनि सगवा भी आपु लखाहि ॥
जिसु धन कारणि चुगली करहि सो धनु चुगली हथि न आवै ओइ भावै तिथै जाहि ॥
गुरमुखि सेवक भाइ हरि धनु मिलै तिथहु करमहीण
लै न सकहि होर थै देस दिसंतरि हरि धनु नाहि ॥ ८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५२)

शब्दार्थ : **खटिआ** – जमवले, कमावले. **होरु** – अन्य. **विखिआ** – विषयविकार. **सिउ** – सह, शी. **वधाइआ** – वाढवले. **मौनी** – मौनव्रती. **जोगी** – योगी. **विणु** – विना, शिवाय. **तिन्ही** – त्याने. **सेई** – ते. **समधे** – समाधीत. **जि** – ज्यांना. **बखसि** – क्षमा करून. **सो** – त्याची. **सलाहीऐ** – स्तुती. **सरेवहु** – सेवा करणे, स्मरण करणे. **देवालीए** – दिवाळखोर. **मंगदे** – मागत. **बखीली** – निंदा, टीका. **खोवनी** – घालवतात. **परतीति** – विश्वास. **सगवा** – उलट. **कारणि** – करिता. **तिथहु** – तेथे. **करणहीन** – भाग्यहीन. **लै** – घेणे. **होरु** – अन्य.

भावार्थ : ॥ श्लोक म. ३ ॥ ह्या जगात फक्त भक्तलोकच हरिनामरूपी धन कमावतात. बाकी सारे जग भ्रमात भुलले आहे. गुरुकृपेने त्यांच्या मनात हरीनामाचा वास होतो व ते सदैव प्रभुनामाचे ध्यान करण्यात निमग्न होतात. ते प्रभूनामाच्या साहाय्याने अहंकार जाळून टाकतात व विषयविकारांप्रती उदासीन होतात. ते स्वत: भवसागर तरून जातात व आपल्या संपूर्ण कुलाचाही उद्धार करतात. अशा भक्तांची माता धन्य होय. ते भक्त सदैव सहजावस्थेत राहून सुखी होतात व सत्यरूप प्रभूशी आपले मन एकाग्र करतात. ब्रह्मा, विष्णू, महेश हे त्रिगुणात भुलल्याने त्यांच्या मनातील मोह व अहंकार वाढतो. पंडित ग्रंथ वाचून तर मौनव्रती आपल्या तपस्येमुळे आपल्या मनात द्वैतभाव निर्माण करतात. योगी, जंगम, संन्यासीही मोहमायेच्या भ्रमात भटकत राहतात. सतगुरूशिवाय ईशतत्त्व आत्मतत्व कोणासही प्राप्त होत नाही. स्वेच्छाचारी जीव मोहमायेत भुलून आपला जन्म वाया घालवतो. नानक सांगतात, जे प्रभुसेवक प्रभुनामात रत होतात ते समाधीत मग्न होतात. प्रभू परमात्मा त्यांच्यावर कृपा करतो व त्यांना आपल्याशी एकरूप करून घेतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ नानक सांगतात, केवळ त्या प्रभू परमात्म्याची स्तुती करा की ज्याच्या अधीन सर्व काही आहे. हे प्राणिमात्रांनो केवळ त्याचेच स्मरण करा. त्याच्याशिवाय स्मरण करण्यायोग्य अन्य कोणी नाही. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्रभू परमात्मा अंतरात वास करतो व शाश्वत सुखाचा लाभ होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ ज्यांनी सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून प्रभुनामरूपी धन कमावले नाही तो दिवाळखोर होय. तो सर्व जगभर भीक मागत हिंडतो. पण कोणी त्याच्या तोंडावर साधे थुंकतही नाहीत. ते दुसऱ्याची निंदा करतात पण त्यामुळे ते स्वत:चा आत्मविश्वास घालवून बसतात व आपले खरे स्वरूप उघडे पाडतात. ज्या धनासाठी ते परनिंदा करतात ते धन निंदा करूनही त्यांच्या हाती लागत नाही. मग ते त्यासाठी कितीही धडपड करोत. गुरुमुख होऊन सेवाभाव धारण केल्याने प्रभूनामरूपी धन प्राप्त होते. पण भाग्यहीन जीव मात्र हे हरिधन प्राप्त करू शकत नाही. नाना देश हिंडूनही, नाना प्रयत्न करूनही अन्यत्र कोठेही हरिधन प्राप्त होत नाही. ॥ ८ ॥

॥ सलोक म. ३ ॥

गुरमुखि संसा मूलि न होवई चिंता विचहु जाइ ॥
जो किछु होइ सु सहजे होइ कहणा किछू न जाइ ॥
नानक तिन क आखिआ आपि सुणे जि लइअनु पंनै पाइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ कालु मारि मनसा मनहि समाणी अंतरि निरमलु नाउ ॥
अनिदनु जागैक कदे न सोवै सहजे अंम्रित पिआउ ॥
मीठा बोले अंम्रित बाणी अनदिनु हरि गुण गाउ ॥
निज घरि वासा सोहदे नानक तिन मिलिआ सुखु पाउ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ हरि धनु रतन जवहेरी सो गुरि हरि धनु हरि पासहु देवाइआ ॥

जे किसै किहु दिसि आवै ता कोई किहु मंगि लए अकै कोई
किहु देवाए एहु हरि जोरि कीतै किसै नालि न जाइ वंडाइआ ॥
जिस नो सतिगुर नालि हरि सरधा लाए तिसु हरि धन की वंड
हथि आवै जिसनो करतै धुरि लिखि पाइआ ॥
इसु हरि धन का कोई सरीकु नाही किसै का खतु नाही
किसै कै सीव बंनै रोलु नाही जे को हरि धन की बखीली करे
तिस का मुहु हरि चहु कुंडा विचि काला कराइआ ॥
हरि के दिते नालि किसै जोरु बखीली न चलई दिहु दिहु नित नित चडै सवाइआ॥९॥

(श्री गु. ग्रं. सा. ८५३)

शब्दार्थ : **संसा** – शंका, संशय. **मूलि** – मुळीच. **कहणा** – सांगणे. **आखिया** – सांगितलेले. **कालु** – मृत्यू. **पिआउ** – पितो. **सोहदे** – शोभायमान. **देवाइआ** – देववतो. **किहु** – काही. **दिसि** – दिसते. **अकै** – अथवा. **जोरि** – बळजबरीने. **वंडाइआ** – वाटणे. **वंड** – वाटा, हिस्सा. **सरिकु** – भागीदार, वाटेकरी. **खतु** – लेख. **बखीली** – निंदा. **चहुकुंडा** – चारही दिशांना. **दिहु दिहु** – दिन प्रतिदिन.

भावार्थ : गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्याच्या मनात कोणतीही शंका राहत नाही. त्याच्या सर्व चिंता दूर होतात. जे काही घडते ते अत्यंत सहजपणे घडते. त्याबद्दल कोणीही काहीही सांगू शकत नाही. नानक सांगतात, ज्यांचे नाव प्रभूने आपल्या प्रियजनांच्या यादीत लिहिले आहे तो जे काही सांगतो ते प्रभू स्वत: ऐकतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ अशा भक्ताने मृत्यूचे भय मनातून काढून टाकलेले असते. वासनांना मनातून काढून टाकलेले असते व त्याच्या मनात प्रभूचे निर्मल नाम धारण झालेले असते. तो सदैव सावध असतो. मोहनिद्रेत कधीही झोपत नाही व सहजावस्थेत राहून प्रभुनामरूपी अमृत प्राशन करतो. त्याची अमृत वाणी सदैव गोड बोलते. तो सदैव हरीचे गुणगान गातो. तो सदैव आत्मस्वरूपात वास करतो. नानक सांगतात, त्यामुळे तो सदा शोभिवंत दिसतो. तो सदैव प्रभुरूपाशी एकरूप होऊन सुख प्राप्त करतो. ॥ २ ॥ पउडी ॥ हरीनामधन हे रत्नासारखे, जवाहरासारखे अमूल्य आहे. सतगुरू हे धन भक्तास प्रभू परमात्म्याकडून देवविती. असे धन जर कोणाजवळ दिसले तर ते धन कोणी त्याच्याकडे याचना करून प्राप्त करतो तर कोणास तो ते स्वेच्छेने देतो. पण जोरजबरदस्तीने ते हिसकावून घेता येत नाही. सतगुरूने ज्याच्या मनात प्रभूविषयी श्रद्धा जागृत केली त्यास प्रभुनामरूपी धन प्राप्त होते. ज्याच्या भाग्यात तसे आधीपासून लिहिलेले असेल त्यासच ते प्राप्त होते. ह्या धनात कोणी अन्य वाटेकरी नसतो. कोणासही तसे अधिकारपत्र प्रभूने दिलेले नाही. हरीनामरूपी धन अमर्याद आहे. अनमोल आहे. त्याच्याबद्दल कोणताही भांडणतंटा नाही. तरीही जो कोणी प्रभुनामाची निंदा करील त्याची प्रभू परमात्मा त्याचे तोंडास काळोखी फासतो व त्याची चारही दिशांत सर्वत्र नाचक्की होते. प्रभू परमात्म्याने दिलेल्या नामधनाबद्दल कोणतीही जुलूम जबरदस्ती उपयोगी पडत नाही. उलट ते दिन प्रतिदिन वाढतच राहते.॥९॥

॥ सलोक म. ३ ॥

जगतु जलंदा रखि लै आपणी किरपा धारि ॥
जितु दुआरै उबरै तितै लैहु उबारि ॥
सतिगुरि सुखु वेखालिआ सचा सबदु बीचारि ॥
नानक अवरु न सुझई हरि बिनु बखसणहारु ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ हउमै माइआ मोहणी दूजै लगै जाइ ॥
ना इह मारी ना मरै ना इह हटि विकाइ ॥
गुर कै सबदि परजालीऐ ता इह विचहु जाइ ॥
तनु मनु होवै उजला नामु वसै मनि आइ ॥
नानक माइआ का मारणु सबदु है गुरमुखि पाइआ जाइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ सतिगुर की वडिआई सतिगुरि दिती धुरहु हुकमु बुझि नीसाणु ॥
पुती भातीई जावाई सकी अगहु पिछहु टोलि डिठा लाहिओनु सभना का अभिमानु ॥
जिथै को वेखै तिथै मेरा सतिगुरू हरि बखसिओनु सभु जहानु ॥
जि सतिगुर नो मिलि मंने सु हलति पलति सिझै जि वेमुखु होवै सु फिरै भरिसट थानु ॥
जन नानक कै वलि होआ मेरा सुआमी हरि सजण पुरखु सुजानु ॥
पउदी भिति देखि कै सभि आइ पए सतिगुर की पैरी
लाहिओनु सभना किअहु मनहु गुमानु ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५३)

शब्दार्थ : **जलंदा** – जळणाऱ्या. **दुआरे** – द्वारा. **उबरै** – उद्धार. **वेखालिआ** – दाखवले. **सुझई** – सुचणे. **बखसणहारु** – क्षमा करणारा. **परजालीऐ** – चांगल्या प्रकारे जाळले जाते. **उजला** – उज्ज्वल. **मारणु** – मारणारा. **वडिआइ** – महती. **पूती** – पुत्राने. **भातीई** – भाच्याने. **जावाई** – जावई. **सकी** – सगेसोयरे, नातेवाईक. **अगहु** – पुढे. **पिछहु** – मागे. **जिथै** – जिथे, ज्याठिकाणी. **तिथै** – तेथे. **बखसिआसु** – कृपा केली. **जहानु** – संसारात. **मंने** – मनन करणे. **सिझै** – सफल होते. **वेमुखु** – विमुख. **भरिसट** – भ्रष्ट. **वलि** – रक्षक, साथीदार. **सुजानु** – सुजाण. **पउदी** – . **भिति** – . **लाहिओगु** – . **गुमान** – अभिमान, अहंकार.

भावार्थ : हे प्रभो ! हा सारा संसार मोहमायेच्या, विषयविकारांच्या अग्नीने जळत अहे. कृपा करून त्याला वाचव. त्याचे रक्षण कर. ज्या कोणत्या मार्गाने त्याचा उद्धार करणे शक्य असेल त्या मार्गाने त्याचा उद्धार कर. सतगुरूने सत्यरूप प्रभुनामाचा मार्ग दाखवला आहे. त्याचे मनन, चिंतन करून सुख प्राप्त होते. नानक सांगतात, एकमेव प्रभू परमात्म्याशिवाय कृपा करणारा अन्य कोणीही मला दिसत नाही. ॥ १ ॥ म. ३ ॥ माया जीवाला मोहविते. त्याच्या मनात अहंकार जागवते व त्यास द्वैतभावात अडकवते. ही माया मारू म्हटले तरी मरत नाही. कोणत्या तरी बाजारात विकून तिच्यापासून मुक्तता करून घेऊ म्हटले तरी ती कोठेही विकता येत नाही. पण सतगुरूकडून प्राप्त झालेल्या प्रभुनामाने मात्र तिला पूर्णपणे जाळून टाकता येते. तिच्यापासून सुटका प्राप्त करण्याचा हाच मार्ग आहे. प्रभुनाम अंत:करणात दृढ झाल्यावर तन, मन उज्ज्वल होते. नानक सांगतात, मायेला

मारणारा प्रभुनाम हाच एकमेव मार्ग आहे. हे प्रभूनाम सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्राप्त होते. ॥ २ ॥ पउडी ॥ सतगुरू प्रभूने पूर्वीच लिहून ठेवलेली आज्ञा भक्तास समजावून सांगतो. हीच खरी गुरूची महती होय. सतगुरूने पुत्र, भाचे, जावई अन्य सगेसोयरे यांची नीट पारख केली व त्यांच्या मनातील अहंकार दूर केला. जेथे जेथे पाहावे तेथे तेथे सर्वत्र माझा सतगुरू, हरिप्रभूच दृष्टीस पडतो. साऱ्या जगावर तो कृपा करतो. ज्यास सतगुरू प्राप्त झाला, त्याने त्याच्या उपदेशाचे मनन चिंतन केले, त्याचे इह-परलोकीचे जीवन सफल होते. जो सतगुरूला विन्मुख झाला तो भ्रष्टस्थानी फिरत राहतो. दास नानक सांगतात, माझा प्रभू स्वामी परमपुरुष सुजाण असून तोच माझ्या बाजूने माझे रक्षण करण्यास उभा आहे. सतगुरूकडून आध्यात्मिक भोजन प्राप्त होते हे पाहून सर्व लोक सतगुरूच्या चरणी लीन झाले. सतगुरूने सर्वांच्या मनातील अहंकार दूर केला. ॥ १० ॥

॥ सलोक म. १ ॥

कोई वाहे को लुणै को पाए खलिहानि ॥ नानक एव न जापई कोई खाइ निदानि ॥ १ ॥
॥ म. १ ॥ जिसु मनि वसिआ तरिआ सोइ ॥ नानक जो भावै सो होइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ पारब्रहमि दइआलि सागरु तारिआ ॥ गुरि पूरै मिहरवानि भरमु भउ मारिआ ॥
काम क्रोधु बिकरालु दूत सभि हारिआ ॥ अंम्रित नामु निधानु कंठि उरिधारिआ ।
नानक साधू संगि जनमु मरणु सवारिआ ॥ ११ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५४)

शब्दार्थ : **वाहे** - शेत नांगरतो. **लुणै** - कापणी करतो. **खलिहानि** - खळ्यावर आणतात. **जापई** - जाणणे. **निदानि** - दाणे, धान्य. **सागरु** - भवसागर. **मिहरवानी** - दयाळू. **बिकरालु** - विक्राळ. **सवारिआ** - सफल केले.

भावार्थ : कोणी जमीन नांगरून धान्य पेरतो, कोणी पिकाची कापणी करतो. कोणी ते खळ्यात नेऊन त्याची मळणी करतो. नानक सांगतात, पण निर्माण झालेले धान्य कोण खाणार हे कोणीच जाणत नाही. ॥ १ ॥ म. १ ॥ ज्याच्या मनात प्रभूचा वास होतो तो भवसागर तरून जातो. नानक सांगतात, जे प्रभू परमात्म्यास आवडते तेच होते. ॥ २ ॥ तो दयाळू प्रभू जीवास भवसागर तरून नेतो. पूर्णगुरूने आपल्या कृपेने भय व भ्रम नष्ट केले. काम-क्रोधासारख्या मायेच्या विक्राळ दूतांना पराभूत झाले आहेत, आता मी प्रभुनामामृत कंठी धारण केले आहे. नानक सांगतात, साधुसंतांच्या संगतीने माझे जन्ममरण सफल झाले. ॥ ११ ॥

॥ सलोक म. ३ ॥

जिन्ही नामु विसारिआ कूड़े कहण कहंन्हि ॥
पंच चोर तिना घरु मुहन्हि हउमै अंदरि संन्हि ॥
साकत मुठे दुरमती हरि रसु न जाणंन्हि ॥
जिन्ही अंम्रितु भरमि लुटाइआ बिखु सिउ रचहि रचंन्हि ॥
दुसटा संती पिरहड़ी जन सिउ वादु करंन्हि ॥
नानक साकत नरक महि जमि बधे दुख सहंन्हि ॥

पइऐ किरति कमावदे जिव राखहि तिवै रहंन्हि ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ जिन्ही सतिगुरु सेविआ ताणु निताणे तिसु ॥
सासि गिरासि सदा मनि वसै जमु जोहि न सकै तिसु ॥
हिरदै हरि हरि नाम रसु कवला सेवकि तिसु ॥
हरि दासा का दासु होइ परम पदारथु तिसु ॥
नानक मनि तनि जिसु प्रभु वसै हउ सद कुरबाणै तिसु ॥
जिन्ह कउ पूरबि लिखिआ रसु संत जना सिउ तिसु ॥ २ ॥
॥ पउडी ॥ जो बोले पूरा सतिगुरू सो परमेसरि सुणिआ ॥
सोई वरतिआ जगत महि घटि घटि मुखि भणिआ ॥
बहुतु वडिआईआ साहिबै नह जाहि गणीआ ॥
सचु सहजु अनदु सतिगुरू पासि सची गुर मणीआ ॥
नानक संत सवारे पारब्रहमि सचे जिउ बणिआ ॥ १२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५४)

शब्दार्थ : **जिन्ही** - जो. **कुडे** - असत्य. **कहण** - कथा. **कहन्हि** - सांगतात. **मुहन्हि** - लुटतात. **भरमि** - भ्रम. **बिखु** - विष. **दुसटा** - दुष्ट. **पिरहडि** - प्रेम. **वादु** - वाद, भांडण. **करंन्हि** - करतात. **साकत** - शाक्त, दुराचारी. **बधे** - बद्ध. **सहंन्हि** - सहन करतात, भोगतात. **जिव** - जसे, ज्याप्रमाणे. **तिवै** - तसे, त्याप्रमाणे. **रहंन्हि** - राहतात. **ताणु** - बल. **निताणु** - निर्बल. **तिसु** - त्याचे. **कवला** - कमला, लक्ष्मर, माया. **रसु** - प्रेम. **वरतिआ** - व्याप्त. **भणिआ** - सांगतो. **साहिबै** - परमात्मा. **मणिआ** - मणी, रत्न. **बणिआ** - बनतो, होतो. **मूठे** - ठकवले जातात.

भावार्थ : ज्या जीवांना प्रभुनामाचे विस्मरण झाले ते मिथ्या गोष्टी सांगत बसतात. पंचविकार त्याचे शरीररूपी घर लुटतात तर अहंकार त्यांचे मन ग्रासून टाकतो. शाक्त- दुराचारी लोक दुर्मतीने ठकवले जातात. त्यामुळे प्रभूनामाची गोडी त्यास कळतच नाही. ज्यांनी मोहमायेच्या भ्रमात लिप्त होऊन प्रभूनामरूपी अमृतास दूर सारले ते विषयविकारात रत होऊन जातात. त्यांना दुष्ट लोकांबद्दल प्रेम वाटते व प्रभुसेवकांशी ते भांडत बसतात. नानक सांगतात, शाक्त-दुराचारी लोकांना यम बांधून नेऊन नरकात दुःख भोगण्यासाठी टाकून देतात. प्रत्येकजण आपापल्या कर्मानुसार कार्य करत असतो. प्रभू परमात्मा त्यास जे करावयास लावतो तेच त्यास करावे लागते. ॥ १ ॥ म. ३ ॥ ज्याने सतगुरूची सेवा केली अशा निर्बलास प्रभू परमात्मा बल प्रदान करतो. प्रत्येक श्वासात, प्रत्येक घासात ज्याच्या मनात प्रभू परमात्म्याचा वास आहे त्याच्याकडे यम दृष्टिक्षेपही करू शकत नाही. ज्याच्या हृदयात हरिनामामृताविषयी प्रेम आहे, ज्याच्या मनात प्रत्यक्ष प्रभूचा वास आहे त्याची लक्ष्मी दासी होते. हरी दासांचा दास होतो व त्यास तो परमश्रेष्ठ पदार्थ- मुक्ती- प्रदान करतो. नानक सांगतात, ज्याच्या तन, मनात प्रभू परमात्म्याचा वास आहे त्याच्यावर मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ज्याच्या प्रारब्धात पूर्वकर्मानुसार तसे लिहिले असेल, त्यास संतसंगत प्राप्त होऊन प्रभुनामाची गोडी लागते. ॥ २ ॥ पउडी ॥ पूर्ण सतगुरू जे सांगतो ते प्रभू परमात्मा ऐकतो व त्या गुरूवचनाचा सर्व जगभर प्रसार होतो व प्रत्येक जीवाच्या मुखाने त्याचेच उच्चारण होते. प्रभू परमात्म्याची महती अनंत आहे. त्याची गणना कोणीही करू

शकत नाही. सतगुरूपासून सत्य, सहजावस्था व आनंद प्राप्त होते. सतगुरू हे अनमोल रत्न आहे. नानक सांगतात, अशा संतांना प्रभू परमात्मा स्वत: आश्रय देतो. त्यामुळे ते परमेश्वरासमान होतात. ते संत व परमेश्वर एकरूप होऊन जातात.॥१२॥

॥ सलोक म. ३ ॥

अपणा आपु न पछाणई हरि प्रभु जाता दूरि ॥
गुर की सेवा विसरी किउ मनु रहै हजूरि ॥
मनमुखि जनमु गवाइआ झूठै लालचि कूरि ॥
नानक बखसि मिलाइअनु सचै सबदि हदूरि ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ हरि प्रभू सचा सोहिला गुरमुखि नामु गोविंदु ॥
अनदिनु नामु सलाहणा हरि जपिआ मनि आनंदु ॥
वडभागी हरि पाइआ पूरनु परमानंदु ॥
जन नानक नामु सलाहिआ बहुड़ि न मनि तनि भंगु ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ कोई निंदकु होवै सतिगुरू का फिरि सरणि गुर आवै ॥
पिछले गुनह सतिगुरु बखसि लए सतसंगति नालि रलावै ॥
जिउ मीहि वुठै गलीआ नालिआ टोभिआ का जलु जाइ पवै विचि
सुरसरी मिलत पवित्रु पावनु होइ जावै ॥
एक वडिआई सतिगुर निरवैर विचि जितु मिलिऐ
तिसना भूख उतरै हरि सांति तड़ आवै ॥
नानक इहु अचरजु देखहु मेरे हरि सचे साह का जि
सतिगुरू नो मंनै सु सुभनां भावै ॥ १३ ॥ १ ॥ सुधु ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५४)

शब्दार्थ : **पछाणिआ** – ओळखले. **जाता** – ज्ञाता. **हजूरि** – उपस्थित. **कूरि** – असत्य. **हदुरि** – समक्ष. **सोहिला** – स्तुतिगीत, यशोगान. **सलाहणा** – स्तुती करणे. **बहुडी** – परत. **भंगु** – भंग, अंतर पडणे. **पिछले** – मागचे. **गुनह** – अपराध. **बखसि** – क्षमा. **रलावै** – एकरूप होणे. **गलिआ** – गल्ली. **नालिआ** – नाले. **टोभिआ** – ओढे. **सुरसरि** – गंगा. **तिसना** – तृष्णा. **तड** – त्वरित.

भावार्थ : जो ज्ञाता प्रभू परमात्म्यापासून दूर राहतो, त्यास आपल्या आत्मस्वरूपाचे ज्ञान होत नाही. जो गुरूसेवा विसरला तो प्रभू पुढे कसा उपस्थित होणार. स्वेच्छाचारी जीव असत्याच्या, मायेच्या खोट्या लालसेमुळे आपला जन्म वाया घालवतो. नानक सांगतात, जर प्रभू परमात्मा त्यास क्षमा करील तर तो प्रभुनामात लीन होऊन प्रभूपुढे उपस्थित होईल. ॥ १ ॥ म. ३ ॥ सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून जो प्रभू परमात्म्याचे यशोगान गातो त्यास प्रभुनाम प्राप्त होते. तो सदैव प्रभुनामाच्या माध्यमातून प्रभूची स्तुती करतो व त्यामुळे त्याचे मन आनंदाने भरून जाते. कोणी भाग्यशाली जीव पूर्ण परमानंद स्वरूप प्रभूस प्राप्त करतो. दास नानक सांगतात,

जो भक्त प्रभुनामाच्या माध्यमातून प्रभू परमात्म्याची स्तुतिगीते गातो, त्याच्या तन, मनात कोणतेही विघ्न बाधा आणू शकत नाही. ॥ २ ॥ कोणी आधी प्रभूची निंदा केली असेल पण नंतर तो प्रभूस शरण आला तर प्रभू त्यास त्याच्या मागच्या अपराधाची क्षमा करतो व त्यास संतसंगतीत रममाण करतो. पावसाचे पाणी गल्ली, नाली, ओढ्यातून वाहत जाऊन अखेर गंगेस मिळते व पवित्र होऊन जाते. हीच महती निर्वैर सतगुरूची आहे. सतगुरू प्राप्त झाल्यावर मायेची तृष्णा व विकारांची भूक नष्ट होते व मनास त्वरित शांती प्राप्त होते. नानक सांगतात, माझ्या हरी प्रभूचे हे आश्चर्य पाहा. तो सतगुरूस शरण जाणाऱ्यास आपला मानतो. असा जीव सर्व लोकांना प्रिय होतो. ॥ १३ ॥ १ ॥ (शुद्ध).

बिलावलु बाणी भगत की ॥ कबीर जीउ की ॥

१ ओअंकार सतिनामु करम पुरखु गुरि प्रसादि ॥
ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाव सत्य आहे.
तो कर्ता पुरुष आहे. गुरुकृपेने तो प्राप्त होतो.

ऐसो इहु संसारु पेखना रहनु न कोउ पइहै रे ॥
सूधे सूधे रेगि चलहु तुम नतर कुधका दिवईहै रे ॥ १ ॥ रहाउ ॥
बारे बूढे तरुने भइआ सभहू जम लै जईहै रे ॥
मानसु बपुरा मूसा कीनो मीचु बिलईआ खईहै रे ॥ १ ॥
धनवंता अरु निरधन मनई ता की कछू न कानी रे ॥
राजा परजा सम करि मारै ऐसो कालु बडानी रे ॥ २ ॥
हरि के सेवक जो हरि भाए तिन्ह की कथा निरारी रे ॥
आवहि न जाहि न कबहू मरते पारब्रह्म संगारी रे ॥ ३ ॥
पुत्र कलत्र लछिमी माइआ इहै तजहु जीअ जानी रे ॥
कहत कबीरु सुनहु रे संतहु मिलिहै सारिगपानी रे ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५५)

शब्दार्थ : **ऐसी** – असा. **इहु** – हा. **पेखना** – पाहणे. **कोउ** – कोणीही. **पईहै** – राहणे. **सूधे सूधे** – सरळ सरळ. **रेगी** – रस्त्यावर, मार्गावर. **नतर** – नाही तर. **कुधका** – धक्का. **दिवई है** – देतील. **बारे** – बालक. **बुढे** – वृद्ध. **तरुने** – तरुण. **बपुर** – बापडा, बिचारा. **मुसा** – उंदीर. **किनो** – केले, निर्माण केले. **मीचु** – मृत्यू. **बिलईआ** – मांजर. **मनई** – मानणे. **ता** – ते. **कानी** – पर्वा. **कीन** – करत नाही. **बडानी** – महान. **निरारी** – निराळी. **संगारी** – सहायक, तारक. **लछिमी** – लक्ष्मी. **इहै** – ह्यांना. **तजहु** – त्याग करून. **मिलिहै** – प्राप्त झाले, एकरूप झाले. **सारिगपानी** – सारंगपाणी, परमेश्वर.

भावार्थ : ह्या संसाराकडे, जगाकडे नीट विचारपूर्वक पाहिलेत तर असे लक्षात येईल की येथे कोणीही कायम राहण्यासाठी आलेला नाही. सारे काही नश्वर आहे. येथे तुम्ही सरळ मार्गाने सन्मार्गाने चाललात तरच तुमचा निभाव लागेल. नाही तर तुम्हाला यमराज असा धक्का देईल की तोंडघशी पडाल. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे बंधू, लहान

मूल, तरुण, म्हातारा, सगळ्यांना यम घेऊन जातो. बिचारा माणूस उंदरासारखा काळरूपी-मृत्यूरूपी मांजराचे भक्ष्य बनतो. ॥ १ ॥ कोण श्रीमंत आहे, कोण गरीब आहे, ह्याची काळ यत्किंचितही पर्वा करीत नाही. काळ इतका महान शक्तिशाली आहे की तो राजा असो की रंक, सर्वांना मृत्यूच्या मुखात लोटतो. ॥ २ ॥ मात्र ह्याला प्रभू परमात्म्याचे सेवक, हरीचे सेवक हे अपवाद आहेत. त्यांची गोष्टच निराळी आहे. ते कधी जन्मतच नाहीत आणि कधी मरतही नाहीत. तो परब्रह्म परमात्मा त्यांच्या पाठीशी सदैव उभा असतो. ॥ ३ ॥ कबीर सांगतात, हे सज्जनहो ! स्त्री, पुत्र, धन दौलत साऱ्यांचा त्याग करा, मोहमायेचा त्याग करा. तरच तुम्हाला प्रभू परमात्म्याची प्राप्ती होईल. ॥ ४ ॥ १ ॥

बिदिआ न परउ, बादु नही जानउ ॥ हरि गुन कथत सुनत बउरोना ॥ १ ॥
मेरे बाबा मै बउरा सभ खलक सैआनी मै बउरा ॥
मै बिगरिओ बिगरै मति अउरा ॥ १ ॥ रहाउ ॥
आपि न बउरा राम किओ बउरा ॥ सतिगुरू जारि गइओ भ्रमु मोरा ॥ २ ॥
मै बिगरे अपनी पति खोई ॥ मेरे भरमि भूलउ मति कोई ॥ ३ ॥
सो बउरा जो आपु न पडानै ॥ आपु पछानै त एकै जानै ॥ ४ ॥
अबहि न माता सु कबहु न माता ॥ कहि कबीर रामै रंगि राता ॥ ५ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८५५)

शब्दार्थ : **बिदिआ** – विद्या. **बादु** – वाद, भांडण. **बउरानो** – वेडा झालो. **बउरा** – वेडा. **खळक** – जग. **सैआनी** – शहाणे. **बिगरीओ** – बिघडलो. **अउरा** – इतर. **आपि** – मी स्वतः. **जारि** – जाळले. **मोरा** – माझा. **सो** – तो. **पछानै** – ओळखणे. **एकै** – एकमात्र प्रभू परमात्मा. **अबहि** – आत्ताच, ह्या जन्मातच. **माता** – प्रभू प्रेमात मस्त होणे. **मति** – नका.

भावार्थ : कबीर सांगतात– मी विद्या शिकलो नाही. मला कोणाशी वादविवाद करता येत नाही. त्या प्रभू परमात्म्याची, त्या हरीची हरिकथा सांगून, ऐकून मी वेडा झालो आहे. ॥ १ ॥ अरे बाबा मी खरोखरच वेडा झालो आहे. बाकी सारी दुनिया शहाणी आहे. मी फक्त वेडा. मी तर बिघडलोच आहे आणि माझ्या नादी लागून इतर कोणी बिघडू नका. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी स्वत: मुळात वेडा नव्हतो. त्या प्रभुरामाने मला वेडा केला. सतगुरूच्या कृपेने, सतगुरूने माझ्या मनातील सारे भ्रम जाळून टाकले. ॥ २ ॥ होय, मी बिघडलो. माझी बुद्धी नष्ट झाली. माझ्या नादी लागून तुम्ही कोणी आपली बुद्धी घालवून बसू नका ॥ ३ ॥ वेडा कोण ? ज्याने स्वत:स, आपल्या आत्मस्वरूपास ओळखले नाही तो. ज्याने आपले आत्मस्वरूप, स्वस्वरूप, जाणले तोच त्या एकमेव प्रभू परमात्म्यास जाणतो. ॥ ४ ॥ ह्या मनुष्यजन्माला येऊन जो प्रभूनामात मस्त झाला नाही तो कधीच प्रभूनामात मग्न होणार नाही. मानवजन्म ही प्रभुप्राप्तीची एकमेव सुवर्णसंधी आहे. ती घालवू नका. कबीर सांगतात, मी तर रामसंगात रंगून गेलो आहे. ॥५॥२॥

ग्रिहु तजि बन खंड जाईऐ चुनि खाईऐ कंदा ॥
अजहु बिकार न छोडई पापी मनु मंदा ॥ १ ॥
किउ छूटउ, कैसे तरउ भवजल निधि भारी ॥

राखु राखु मेरे बिठुला जनु सरनि तुम्हारी ॥ १ ॥ रहाउ ॥
बिखै बिखै की वासना तजीअ नह जाई ॥
अनिक जतन करि राखीअै फिरि फिरि लपटाई ॥ २ ॥
जरा, जीवन जोबनु गइआ किछु कीआ न नीका ॥
इहु जीअरा निरमोलको कउडी लगि मीका ॥ ३ ॥
कहु कबीर मेरे माधवा तू सरब बिआपी ॥
तुम समसरि नाही दइआलु मोहि समसरि पापी ॥ ४ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५५)

शब्दार्थ : **ग्रिहु** – गृह, घर. **तजि** – त्यागून, सोडून. **बनखंड** – अरण्य. **चुनि** – निवडून. **कंदा** – कंदमुळे. **अजहु** – अजूनही, तरीही. **विकार** – विषयविकार. **छोडई** – सुटणे, सोडणे. **मंदा** – मलिन. **किउ** – कसे. **भवजल निधि** – भवसागर. **बिखै बिखै** – विषयविकार. **जतन** – यत्न. **लिपटाई** – गुंतून. **किछु** – थोडेसुद्धा, काहीही. **किआ** – केले. **नीका** – चांगले काम. **इहु** – हे. **जीअरा** – जीवन. **निरमोलको** – अमूल्य. **कउडी** – कवडी. **मीका** – बरोबर. **संरब** – सर्व. **बिआपी** – व्यापक. **समसरि** – सारखा. **दइआलु** – दयाळू.

भावार्थ : हे बंधू ! घराचा त्याग करून वनात गेलात, कंदमुळे खाऊन उदरनिर्वाह केलात तरीही हे पापांनी मलिन झालेले मन, विषयविकारांचा त्याग करीत नाही. त्याची विषयविकारांकडील ओढ जराही कमी होत नाही. ॥ १ ॥ बा विठ्ठला ! काय केल्याने ह्या विषयविकारांची ओढ नष्ट होईल ? हा महाभयंकर भवसागर पार कसा करता येईल ? मी तुला अनन्य भावाने शरण आलो आहे. विठ्ठला ! माझे रक्षण कर ! ॥ १ ॥ रहाउ ॥ नाना प्रकारच्या विषय वासनांची ओढ इतकी लोचट आहे की कितीही प्रयत्न केले तरी ती सुटता सुटत नाही. परत परत चिकटून राहते. ॥ २ ॥ तरुणपण गेले, म्हातारपण आले, सारे जीवन संपत आले पण उभ्या आयुष्यात एकही सत्कृत्य घडले नाही. हे अनमोल आयुष्य मी कवडीमोल समजून वाया घालवले. ॥ ३ ॥ कबीर सांगतात, हे माधवा ! तू सर्वव्यापी आहेस. तुझ्याइतका दयाळू अन्य कोणीही नाही आणि माझ्याइतका पापी कोणी नाही. आता तूच माझा उद्धार कर. ॥ ४ ॥ ३ ॥

नित उठि कोरी गागरि आनै लीपत जीउ गइओ ॥
ताना बाना कछू न सूझै हरि हरि रसि लपटिओ ॥ १ ॥
हमारे कुल कउने रामु कहिओ ॥
जब की माला लई निपूते तब ते सुखु न भइओ ॥ १ ॥ रहाउ ॥
सुनहु जिठानी सुनहु दिरानी अचरज एकु भइओ ॥
सात सूत इनि मुडींए खोए इहु मुडीआ किउ न मुइओ ॥ २ ॥
सरब सुखा का एकु हरि सुआमी सो गुरि नामु दइओ ॥
संत प्रहलाद की पैज जिनि राखी हरनाखसु नख बिदरिओ ॥ ३ ॥
घर के देव पितर की छोडी गुर को सबदु लइओ ॥
कहत कबीरु सगल पाप खंडनु संतह लै उधरिओ ॥ ४ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५६)

शब्दार्थ : **नित** – नित्य, रोज. **उठि** – उठून. **कोरी** – नवी, स्वच्छ. **गागरि** – घागर (शरीर). **लीपत** – लिंपत (उदरभरण). **लपटिओ** – निमग्न झाला. **जब** – जेव्हा. **तब** – तेव्हा. **निपूते** – कुपुत्र. **जिठानी** – थोरली जाऊ. **दिरानी** – धाकटी जाऊ. **सात सुत** – घेणे, देणे. **इहू** – हे. **मुडीआ** – मुलगा. **मुइओ** – मेला. **दइओ** – दिला. **प्रहलाद** – प्रल्हाद. **हरनाखसु** – किरण्यकश्यपू. **पैज** – ब्रीद, पद, प्रतिष्ठा. **बिदरिओ** – फाडले. **छोडी** – सोडून. **लइओ** – घेतले. **सगल** – सगळे. **उघरिओ** – उद्धार केला.

भावार्थ : भक्त कबीराची आई घरातल्या अन्य स्त्रियांसमोर कबीराबद्दल तक्रार करताना म्हणते– ज्याप्रमाणे माणूस रोज सकाळी उठून आपल्या नित्य कर्मास लागतो त्याप्रमाणे जीव जन्मास आला, त्याने नवीन शरीर धारण केले, की परत मरेपर्यंत ह्या शरीराची देखभाल करण्यात, त्याचे भरणपोषण करण्यातच आयुष्य खर्च करतो. पण माझा हा मुलगा मागावर वस्त्र विणण्याचे काम करण्याचे सोडून सदैव हरिनामाचा जप करण्यातच मग्न असतो. ॥ १ ॥ आपल्या कुळात कधी कोणी रामाचे नाव तरी उच्चारले आहे का ? पण जेव्हापासून ह्या कुलक्षणी मुलाने रामनाम जपायला सुरुवात केली तेव्हापासून ह्या घरातील सुख–शांती नष्ट झाली आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ आया बायांनो ! काय विपरीत घटना घडली ! ह्या माझ्या मुलाने घरादाराकडे लक्ष देणे सोडले. मागावर सुताचा ताणाबाणा विणणे सोडले. त्यापेक्षा हा मुलगा मरून का गेला नाही ! ॥ २ ॥ ह्यावर कबीर उत्तर देतात– जो सर्व सुखांचा स्वामी, प्रभू परमात्मा, त्यानेच गुरुरूपाने मला हा प्रभुनामाचा मंत्र दिला. हा तोच आहे की ज्याने प्रल्हादाची लाज राखण्यासाठी नरसिंहाचे रूप धारण करून आपल्या तीक्ष्ण नखांनी हिरण्यकश्यपूचे पोट फाडले. ॥ ३ ॥ मी घरातील पूर्वजांचे देव सोडून केवळ गुरुच्या शब्दाचे पालन करीत आहे. कबीर सांगतात, तो प्रभू परमात्मा सर्व पापांचा नाश करतो. तोच संतसज्जनांचा उद्धार करतो. ॥ ४ ॥ ४ ॥

कोउ हरि समानि नही राजा ॥
ए भूपति सभ दिवस चारि के झूठे करत दिवाजा ॥ १ ॥ रहाउ ॥
तेरो जनु होइ सोइ कत डोलै तीनि भवन पर छाजा ॥
हाथु पसारि सकै को जन कउ बोलि सके न अंदाजा ॥ १ ॥
चेति अचेत मुड मन मेरे बाजे अनहद बाजा ॥
कहि कबीर संसा भ्रमु चूको ध्रू प्रहिलाद निवाजा ॥ २ ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५६)

शब्दार्थ : **कोऊ** – कोणी. **सानि** – सारखा, समान. **ए** – इतर, हे. **दिवस चारि के** – चार दिवसांचे, अल्पकालीन, नश्वर. **झूठे** – खोटा. **दिवाजा** – देखावा. **तेरो** – तुझे. **सोइ** – ते. **कत** – का. **डोले** – डळमळतील, विचलित होतील. **तीनि भवन** – तिन्ही लोक. **पर छाजा** – वर राज्य करतो. **हाथु** – हात. **पसारि सकै** – पसरू शकेल. **को** – कोण. **चेति** – चिंतन कर, स्मरण कर. **अचेत** – निष्काळजी. **बाजे अनहद बाजा** – अनाहत नादाची वाद्ये वाजत आहे, प्रभू परमात्म्याचा आवाज ऐकू येत आहे. **संसा** – संशय, शंका. **भ्रमु** – भ्रम. **ध्रू** – ध्रुव. **प्रहिलाद** – प्रल्हाद. **निवाजा** – सन्मान दिला.

भावार्थ : त्या प्रभू परमात्मा हरीसारखा अन्य कोणीही राजा नाही. बाकी सारे भूपती फक्त चार दिवसांचे राजे असून उगाचच दिमाख मिरवतात. ॥ रहाउ ॥ त्यांच्या त्या दिमाखाला भिऊन हरीचे भक्त जराही विचलित

होत नाहीत. कारण त्यांना माहीत असते की भक्ताचा दबदबा त्रिभुवनात असतो. तो त्रिभुवनाचा स्वामी प्रभू परमात्मा ज्यांच्या पाठीराखा आहे, त्यांना हात लावण्याची कोणाची हिंमत आहे ? कोण त्यांना वेडेवाकडे बोलण्याचे धाडस करील ? प्रभू परमात्म्याच्या महान शक्तीचा कोणी अंदाजही करू शकत नाही. ॥ १ ॥ हे माझ्या मूर्ख अडाणी मना ! त्या प्रभू परमात्म्याचे सदैव चिंतन कर. ज्यामुळे त्याचा अनाहत स्वर तुझ्या हृदयात वाजू लागेल. त्याच्याकडे लक्ष दे. त्यानेच तुला आनंद प्राप्त होईल. कबीर सांगतात, असे केल्याने तुझ्या मनातील सर्व संशय दूर होईल, सारा भ्रम निघून जाईल. त्या प्रभू परमात्म्यानेच ध्रुव व प्रल्हादासारख्या भक्तांना अढळपद देऊन त्यांना सन्मानित केले. तो तुझेही रक्षण करील. ॥ २ ॥ ५ ॥

राखि लेहु, हम ते बिगरी ।
सीलु धरमु जपु भगति न कीनि ॥
हउ अभिमान टेढ पगरी ॥ १ ॥ रहाउ ॥
अमर जानि संची इह काइआ इह मिथिआ काची गगरी ॥
जिनहि निवाजि साजि हम कीए तिसहि बिसारि अवर लगरी ॥ १ ॥
संधिक तोहि साध नही कहीअउ ॥ सरनि परे तुमरी पगरी ॥
कहि कबीर इह बिनती सुनीअहु ॥ मत घालहु जम की खबरी ॥ २ ॥ ६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८५६)

शब्दार्थ : **राखि लेहु** – रक्षण कर. **बिगरी** – अपराध. **सिलु** – शील. **कीनि** – केली. **अभिमान** – अहंकार. **टेढपगरी** – वाकडी वाट, वाईट मार्ग धरला. **जानि** – समजून. **मिथिआ** – मिथ्या, खोटी. **काची गगरी** – कच्चे मडके. **जिनहि** – ज्या. **निवाजि** – सन्मान. **साजि** – निर्माण केला. **कीए** – का. **तिसहि** – त्याला. **बिसारि** – विसरलो. **अवर** – अन्य, दुसरा. **लगरी** – नादी लागला. **संधिक** – चोर, दरोडेखोर. **पगरी** – पकडलो. **सरनि पडे** – शरण आलो. **तुमरी** – तुझे. **पगरी** – पाय पकडतो. **बिनती** – विनंती. **सुनिअहु** – ऐक. **मत घालहु** – मला दूर लोटू नकोस. **खबरी** – वार्ता. **साध** – साधक.

भावार्थ : हे प्रभू परमत्मन् ! माझे रक्षण कर, माझे हातून अनंत अपराध घडले आहेत. मी सहनशीलता जपली नाही. धर्म, जप, भक्ती काहीही केले नाही. अहंकाराने वाकड्या मार्गाने गेलो. वाईट संगतीला लागलो. ॥१॥रहाउ॥ हे शरीररूपी कच्चे नश्वर मडके मी अमर समजून त्यास सजवत बसलो, त्याचे कोडकौतुक करीत बसलो. ज्या प्रभू परमात्म्याने मला जन्म देऊन आदरपूर्वक माझा संभाळ केला त्यालाच विसरलो अणि भलत्याच्याच नादी लागलो. ॥ १ ॥ मी तुझा साधक बनण्याऐवजी चोर लुटारू बनलो. पण आता मला माझी चूक कळून आली. मी तुला अनन्यभावे शरण आलो आहे. तुझे चरण पकडून तुला नम्रपणे विनंती करतो, की मला दूर लोटू नकोस. मला यमाचे तोंडी देऊ नकोस. माझे रक्षण कर. ॥ २ ॥ ६ ॥

दरमादे ठाढे दरबारि ॥
तुझ बिनु सुरति करै को मेरी दरसनु दीजै खोल्हि किवार ॥ १ ॥ रहाउ ॥
तुम धन धनी उदार तिआगी स्त्रवनन्ह सुनीअतु सुजसु तुम्हार ॥

मागउ काहि रंक सभ देखउ तुम्ह ही ते मेरो निसतारु ॥ १ ॥
जैदेउ नामा बिप सुदामा तिन कउ क्रिपा भई है अपार ॥
कहि कबीर तुम संम्रथ दाते चारि पदारथ देत न बार ॥ २ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८५६)

शब्दार्थ : **दरमादे** – व्याकूळ होऊन विनम्र भावे. **ठाढे** – उभे. **बिनु** – विना. **सुरति** – संभाळ. **खोल्हि** – उघड. **धनधनी** – धनाचा स्वामी. **तिआगी** – त्यागी. **स्त्रवनन्ह** – कान. **सुनीअतु** – ऐकतो. **सुजसु** – सुयश. **तुम्हार** – तुझे. **मागउ** – मागतो. **काहि** – कशाला. **रंक** – दरिद्री. **देखउ** – दिसतात. **निसतारु** – मुक्ती दे. **जैदेउ** – संत जयदेव. **नामा** – संत नामदेव. **बिप सुदामा** – सुदामा ब्राह्मण. **तिनकउ** – त्यांच्यावर. **भई** – झाली, केली. **संम्रथ** – समर्थ. **चारि पदारथ** – चार पुरुषार्थ, (धर्म, अर्थ, काम, मोक्ष). **बार** – उशीर, विलंब.

भावार्थ : हे प्रभो ! मी अत्यंत व्याकूळ होऊन विनम्रभावे तुझ्यापुढे उभा ठाकलो आहे. तुझ्याशिवाय माझे कोण रक्षण करणार. मी तुझ्या दारी उभा आहे. कृपा करून दार उघडून मला दर्शन दे. तू तर सर्व बंधनांचा स्वामी आहेस, उदार आहेस, त्यागी आहेस. तुझे सुयश मी माझ्या कानांनी ऐकतो आहे. बाकी सगळे रंक आहेत. मी तुझ्याशिवाय अन्य कोणाकडे काय मागू ? तूच एक मात्र माझा मुक्तीदाता आहेस. ॥ १ ॥ संत जयदेव, संत नामदेव, सुदामा ब्राह्मण यांच्यावर तू अपार कृपा केलीस. कबीर म्हणतात, चारही पुरुषार्थ देण्यास तूच एकमेव समर्थ आहेस व ते देण्यात तू जराही उशीर करत नाहीस. ॥ २ ॥ ७ ॥

डंडा मुंद्रा खिंथा आधारी ॥ भ्रम कै भाइ भवै भेखधारी ॥ १ ॥
आसनु पवन दूरि करि बवरे ॥ छोडी कपटु नित हरि भजु बवरे ॥ १ ॥ रहाउ ॥
जिह तू जाचहि सो त्रिभवन भोगी ॥ कहि कबीर केसौ जगि जोगी ॥ २ ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८५६)

शब्दार्थ : **डंडा** – दंडा. **मुंद्रा** – नाथपंथी कानात अडकवतात मी मुद्रा. **खिंथा** – अंगातला पायघोळ अंगरखा. **आधारी** – झोळी. **भाइ** – भाव. **भवै** – फिरत, भटकत. **भेख धारी** – योग्याचा वेश धारण करणारा. **आसन** – योगासने. **पवन** – प्राणायाम. **छोडि** – सोडून दे. **कपटु** – कपट. **नित** – नित्य. **बवरे** – वेड्या. **जिह** – ज्या. **जाचहि** – याचना करतोस. **केसौ** – केशव. **जगि** – जगात. **जोगी** – योगी.

भावार्थ : हातात दंडा, कानात मुद्रा, अंगात पायघोळ अंगरखा, खांद्याला झोळी असा नाथपंथी योग्याचा वेश धारण करणारा बैरागी भ्रमाच्या भयाने इतस्तत: भटकत राहतो. ॥ १ ॥ अरे वेड्या ! ती तुझी योगासने, प्राणायाम सारे सोडून दे. मनातला हा कपटी भाव, हे सारे अवडंबर सोडून, अरे वेड्या त्या हरीचे भजन कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्या मायेला प्राप्त करण्यासाठी तू याचक बनून हिंडत आहेस तिला तर तिन्ही लोकांनी आधीच भोगली आहे. त्या ऐवजी तू प्रभुनामाची याचना कर. कबीर सांगतात, साऱ्या जगात तो एकमेव केशव आहे. तो प्रभू परमात्माच फक्त खरा योगी आहे. ॥ २ ॥ ८ ॥

इन्हि माइआ जगदीस गुसाई तुम्हरे चरन बिसारे ॥
किंचत प्रीति न उपजै जन कउ कहा करहि बेचारे ॥ १ ॥ रहाउ ॥
धिगु तनु धिगु धनु धिग इह माइआ धिगु धिगु मति बुधि फंनी ॥
इस माइआ कउ द्रिड़ु करि राखहु बांधे आप बंचनी ॥ १ ॥
किआ खेती किआ लेवा देई परपंच झूठु गुमाना ॥
कहि कबीर ते अंति बिगूते आइआ कालु निदाना ॥ २ ॥ ९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५७)

शब्दार्थ : **इन्हि** – ह्या. **माइआ** – माया. **गुसाई** – ईश्वर. **तुम्हरे** – तुझे. **बिसारे** – विसरले. **किंचत** – थोडीसुद्धा, किंचित. **उपजै** – उत्पन्न होणे. **कहा** – काय. **करहि** – करणार. **धिगु** – धिक्कार. **इह** – ह्या. **फंनि** – धोका देणे. **कउ** – कशाप्रकारे. **द्रिड़ु** – दृढ. **बांधे** – बांधलेले. **आप** – परमेश्वराचे. **बचंनी** – वचनात. **किआ** – कोणत्या. **लेवा देइ** – घेणे देणे, व्यवहार वागणे. **झूठु** – खोटा. **गुमाना** – अभिमान. **बिगूते** – दु:खी होणे. **निदाना** – अंती, अखेर.

भावार्थ : हे विरक्त प्रभू परमेश्वरा, हे जगदीशा ! ह्या मायेच्या जाळ्यात अडकून हे जीव तुला पूर्णपणे विसरून गेले आहेत. त्यांच्या मनात तुझ्याविषयी जरासुद्धा प्रेम निर्माण होत नाही. ते बिचारे जीव तरी काय करणार म्हणा ! मायेनेच त्यांना जखडून ठेवले आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ धिक्कार असो ह्या शरीराचा, धनाचा, ह्या मायेचा, धिक्कार धिक्कार असो ह्या मनाचा, ह्या धोका देणाऱ्या बुद्धीचा, साऱ्या साऱ्याचा धिक्कार असो. हे प्रभो ! ह्या मायेलाच तू तुझ्या आज्ञेत घट्ट बांधून ठेव. कारण तुझ्याच आज्ञेने आम्ही त्या मायेशी जखडले गेलो आहोत. ॥ १ ॥ ही शेतीवाडी, हा व्यापारधंदा, हा अभिमान, हा सारा संसारच खोटा आहे. सारा मायेचा पसारा आहे. कबीर सांगतात, जो ह्या मायेत अडकून राहिला त्यास शेवटी हे सर्व येथेच सोडून दु:खी होऊन मृत्यूच्या स्वाधीन व्हावे लागते. ॥ २ ॥ ९ ॥

सरीर सरोवर भीतरे आछै कमल अनूप ॥
परमजोति पुरखोतमो जा कै रेख न रूप ॥ १ ॥
रे मन हरि भजु भ्रमु तजहु जगजीवन राम ॥ १ ॥ रहाउ ॥
आवत कछू न दीसई नह दिसै जात ॥
जह उपजै बिनसै तही जैसे पुरिवन पात ॥ २ ॥
मिथिआ करि माइआ तजी सुख सहज बीचारि ॥
कहि कबीर सेवा करहु मन मंझि मुरारि ॥ ३ ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५७)

शब्दार्थ : **सरीर** – शरीर. **आछै** – आहे. **अनूप** – अनुपमेय, ज्याला उपमा नाही असे, परम सुंदर, परम पवित्र. **पुरखोतम** – पुरुषोत्तम. **रेख** – आकार. **तजहु** – टाकून दे, त्याग. **आवत** – येताना. **कछु** – काहीही. **जात** – जाताना. **जह** – जेथे, जिथून. **तही** – तेथे. **जैसे** – जसे,. **पुरिवन** – एक जल वनस्पती, तिची पाने पाण्यातून उत्पन्न होतात व त्यातच विरघळून जातात. **पात** – पान. **मिथिआ** – मिथ्या. **करि** – समजून, जाणून.

भावार्थ : ह्या शरीररूपी सरोवरात आत्मारूपी अति सुंदर, अति पवित्र, अनुपमेय कमल विराजमान आहे. त्या परमज्योतीला, त्या पुरुषोत्तमाला ना आकार ना रूप. ॥ १ ॥ हे मना ! सर्व तऱ्हेच्या भ्रमाचा, त्या मोहमायेचा त्याग कर आणि त्या जगजीवन प्रभुरामाची, त्या हरीची, त्या प्रभू परमात्म्याची सेवा कर. ॥ १ ॥रहाउ॥ हा संसार कोणी निर्माण होताना पाहिला नाही किंवा नष्ट झालेलाही पाहिला नाही. ज्या प्रमाणे पुरीन (एक जल वनस्पती) पाण्यातून निर्माण होते व अंती पाण्यातच विरून जाते त्याप्रमाणे ही सृष्टी प्रभू परमात्म्यातूनच निर्माण झाली आहे व अंती त्यातच ती विलीन होणार आहे. ॥ २ ॥ हा संसार, ही माया खोटी आहे, नश्वर आहे हे जाणले की सहजच खऱ्या सुखाचा विचार मनात सुरू होतो. कबीर सांगतात, हे जीवा ! तू मनात त्या मुरारीची, त्या प्रभू परमात्म्याची सेवा कर, म्हणजे तुला सुखाची प्राप्ती होईल. ॥ ३ ॥ १० ॥

जनम मरन का भ्रमु गइआ गोबिद लिव लागी ॥
जीवत सुंनि समानिआ गुर साखी जागी ॥ १ ॥ रहाउ ॥
कासी ते धुनि उपजै धुनि कासी जाई ॥
कासी फूटी पंडिता धुनि कहा समाई ॥ १ ॥
त्रिकुटी संधि मै पेखिआ घट हू घट जागी ॥
ऐसी बुधि समाचरी घट महि तिआगी ॥ २ ॥
आपु आप ते जानिआ तेज तेजु समाना ॥
कहु कबीर अब जानिआ गाबिदु मनु माना ॥ ३ ॥ ११ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५७)

शब्दार्थ : **लिव लागी** – एकाग्रचित्त, एकरूप होणे. **जीवत** – जिवंतपणी. **सुंन** – शून्य अवस्था. **समानिआ** – सामावून जाणे, एकरूप होणे. **साखी** – उपदेश. **कासी** – कांस्य धातू. **त्रिकुटी** – इडा, पिंगला, सुषुम्ना ह्या तीन नाड्या (योग शास्त्रानुसार प्राण ह्या तीन नाड्यातून प्रवाहित होतो.) **पेखिआ** – पाहिले, जाणले. **जागी** – जागृत. **बुधि** – बुद्धी. **समाचरी** – निर्माण झाली. **तिआगी** – त्याग केला. **जानिआ** – जाणले. **आपुआप** – आपले आपल्याला, स्वत:, स्वत:स.

भावार्थ : मी माझे मन प्रभू परमात्म्याशी एकाग्र केल्यामुळे जन्ममरणाचा भ्रम माझ्या मनातून नष्ट झाला. सतगुरूच्या उपदेशाने आत्मा जागृत होतो व जीव शून्य समाधी प्राप्त करतो. कांस्य धातूच्या भांड्यातून आवाज निर्माण होतो व अंती तो त्यातच विरून जातो. पण हे पंडित हो, हे काशाचे भांडेच फुटले तर तो आवाज कोठे जाईल ? अर्थातच अवकाशात. जीवाचेही तसेच आहे. प्रत्येक शरीरात असलेला आत्मा मरणानंतर परमात्म्यात विलीन होतो. ॥ १ ॥ ह्या त्रिगुणात्मक संसारात मी त्या प्रभू परमात्म्यास पाहिले आहे. तो प्रत्येक जीवाचे ठायी विराजमान आहे. मला आता समत्व बुद्धी निर्माण झाली आहे. त्यामुळे मी ह्या शरीरातून स्वत:स अलिप्त केले आहे. (मी म्हणजे शरीर नव्हे. मी म्हणजे आत्मा हे मी जाणले आहे. त्यामुळे माझ्यातील अहंभाव नष्ट झाला आहे.) ॥ २ ॥ मी मला ओळखले आहे.

जीवात्मा परमात्म्यात सामावून गेला आहे. कबीर म्हणतात, आता मी त्या परमात्म्यास जाणले आहे. माझे मन आता शांत संतुष्ट झाले आहे. ॥ ३ ॥ ११ ॥

चरन कमल जा कै रिदै बसहि सो जनु किउ डोलै देव ॥
मानौ सभ सुख नउनिधि ता कै सहजि सहजि जसु बोलै देव ॥ रहाउ ॥
तअ इह मति जउ सभ महि पेखै कुटिल गांठि जब खोलै देव ॥
बारं बार माइआ ते अटकै लै नरजा मनु तोलै देव ॥ १ ॥
जह उहु जाइ तही सुखु पावै माइआ तासु न झोलै देव ॥
कहि कबीर मेरामनु मानिआ राम प्रीति कीओ लै देव ॥ २ ॥ १२ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८५७)

शब्दार्थ : **रिदै** – हृदयात. **सो** – तो. **डोलै** – अस्थिर, दोलायमान. **मानौ** – समजा, गृहीत धरा. **सभ** – सगळे. **ताकै** – त्याचे जवळ. **सहजि** – सहजपणे **सहजि** – सहजावस्था. **जसु** – यश, परमेश्वराचे यशोगान. **बोलै** – बोलतो, गातो. **महि** – मध्ये. **पेखै** – पाहतो. **कुटिळ** – दुष्ट बुद्धी, कपटीपणा. **गांठी** – गाठी, समस्या. **खोलै** – खोलतो, सोडवितो. **बारंबार** – वारंवार, वरचेवर. **अटके** – अडकतो. **नरजा** – तराजु, सदसद्विवेक बुद्धीरूपी तराजू. **तोले** – तोलतो. **जह** – जेथे. **उहु** – तो. **जाइ** – जातो. **तही** – तेथे. **तासु** – त्याला त्याचे. **न झोलै** – विचलित करू शकत नाही. **मानिआ** – मानले.

भावार्थ : ज्याच्या हृदयात प्रभू परमात्म्याचे चरणकमल वास करत आहेत त्याचे मन मोहमायेने कधीतरी दोलायमान होणे शक्य आहे का ? ज्याच्या मनात त्या प्रभू परमात्म्याचा वास आहे त्यास सर्व नऊनिधी प्राप्त झाल्या आहेत असे जाणावे. तोच सहजावस्थेस सहजपणे प्राप्त करतो व सदैव प्रभू परमात्म्याचे यशोगान गात असतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्या बुद्धीतून दुष्ट विचार, कपटी विचार नष्ट झाले आहेत, जिला सर्वत्र त्या प्रभू परमात्म्याचा वास आहे ह्याची प्रचिती येते तीच खरी सदबुद्धी. जो जीव वारंवार सदसद्विवेकबुद्धीचे तराजूने आपल्या प्रत्येक कृतीचे मूल्यमापन करतो तो कधीतरी मायेच्या बंधनात अडकून पडणे शक्य आहे का ? ॥ १ ॥ असा जीव कोठेही जावो तो सुखच प्राप्त करतो. त्याचे मन मायेने यक्तिंचितही दोलायमान होत नाही. कबीर सांगतात माझ्या मनाने हे जाणले आहे. ते आता सदैव प्रभू रामाच्या प्रीतीत रंगून गेले आहे. हे देवा ! आता मला केवळ तुझाच आसरा आहे. ॥ २ ॥ १२ ॥

॥ बिलावलु बाणी भगत नामदेव जी की ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

सफल जनमु मो कउ गुर कीना ॥ दुख बिसारि सुख अंतरि लीना ॥ १ ॥
गिआन अंजनु मो कउ गुरि दीना ॥ राम नाम बिनु जीवनु मन हीना ॥ १ ॥ रहाउ ॥

नामदेइ सिमरनु करि जानां ॥ जगजीवन सिउ जीउ समानां ॥ २ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८५७)

शब्दार्थ : **मोकउ** – मला. **कीना** – केले. **बिसारि** – विसरणे. **दीना** – दिले. **मनहीना** – तुच्छ. **जाना** – जाणले. **जगजीवन** – परमेश्वर. **सिउ** – त्यात, त्याला. **नामदेइ** – नामदेवाने.

भावार्थ : सतगुरूंनी माझे जीवन सफल केले. दु:ख नष्ट करून माझे जीवन सुखी केले. सद्गुरूंनी माझ्या डोळ्यांत ज्ञानांजन घालून रामनामाशिवाय जीवन म्हणजे निव्वळ व्यर्थ, प्राणहीन, नीरस होय, ह्याचे ज्ञान दिले. रामनामाचे स्मरण करून नामदेवाने हे जाणले की ह्या जगात नामाशिवाय जीवन जगणे तुच्छ आहे, बेकार आहे, नामाशिवाय जीवन व्यर्थ आहे. नामदेवाने ईश्वराचे स्मरण करून त्या प्रभू परमात्म्यास जाणले आहे व त्याचे (नामदेवाचे) मन त्या परमात्म्यात लीन होऊन गेले आहे. नामदेव आता परमात्म्याशी एकरूप झाला आहे. ॥ २ ॥ १ ॥

॥ बिलावल बाणी रविदास भगत की ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुच्या कृपेने तो प्राप्त होतो.

दारिदु देखी सभ को हसै ऐसी दसा हमारी ॥
असट दसा सिधि कर तलै सभ क्रिपा तुमारी ॥ १ ॥
तू जानत मै किछु नही भव खंडन राम ॥
सगल जीअ सरनागती प्रभ पूरन काम ॥ १ ॥ रहाउ ॥
जो तेरी सरनागता तिन नाही भारु ॥
ऊच नीच तुम ते तरे आलजु संसारु ॥ २ ॥
कहि रविदास अकथ कथा बहु काइ करीजै ॥
जैसा तू तैसा तुही किआ उपदा दीजै ॥ ३ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५८)

शब्दार्थ : **दारिदु** – दारिद्र्य. **देखि** – पाहून. **हसै** – हसतात. **ऐसी** – अशी. **दसा** – दशा. **असटदसा** – अठरा. **सिधि** – सिद्धी. **सभ** – सर्व. **जानत** – जाणतोस. **भवखंडन** – संसारातून मुक्त करणारा, जन्ममरणातून मुक्त करणारा. **सरनागति** – शरण. **तिन** – त्यांच्यावर. **भारु** – ओझे. **अलजु** – निर्लज्ज. **कहि** – सांगतात. **अकथ** – अवर्णनीय. **काइ** – कशाला. **करीजै** – करावी.

भावार्थ : काय सांगू ! माझे दारिद्र्य पाहून सारे लोक कुत्सितपणे मला हसत होते. अशी माझी लाजीरवाणी दशा होती. पण आता अष्टदश सिद्धी माझ्या मुठीत आहेत. हे प्रभो ही सारी तुझीच कृपा आहे. ॥१॥ भवपाश तोडून मुक्ती देणाऱ्या प्रभुरामा तू सारे काही जाणतोस. मी तर अत्यंत क्षुद्र आहे. सारे काही तूच करतोस. तू तुझ्या सेवकांच्या सर्व आशाआकांक्षा पूर्ण करतोस म्हणूनच सर्व लोक तुला शरण येतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ जे तुला

शरण येतात ते पापाच्या बोजापासून मुक्त होतात म्हणूनच तुला शरण आलेले उच्च–नीच सर्वजण ह्या निर्लज्ज संसारातून तुझ्या कृपेने पार होतात. ॥ २ ॥ भक्त रविदास सांगतात, हे प्रभो ! तुझ्या गुणांची महती किती म्हणून सांगू. तुझ्या शक्तीचे वर्णन शब्दात करताच येणार नाही. मी तुझे वर्णन कसे करू ? तुला कोणती उपमा देऊ ? हे प्रभो, तुझ्यासारखा तूच. ॥ ३ ॥ १ ॥

जिह कुल साधु बैसनौ होइ ॥
बरन अबरन रंकु नही ईसुरु बिमल बासु जानीऐ जगि सोइ ॥ १ ॥ रहाउ ॥
ब्रहमन बैस सूद अरु ख्यत्री डोम चंडार मलेछ मन सोइ ॥
होइ पुनीत भगवंत भजन ते आपु तारि तारे कुल दोइ ॥ १ ॥
धंनि सु गाउ धंनि सो ठाउ धंनि पुनीत कुटंब सभ लोइ ॥
जिनि पीआ सार रसु तजे आन रस होइ रस मगन डारे बिखु खोइ ॥ २ ॥
पंडित सूर छत्रपति राजा भगत बराबरि अउरु न कोइ ॥
जैसे पुरैन पात रहै जल समीप भनि रविदास जनमे जगि ओइ ॥ ३ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ५५८)

शब्दार्थ : **जिह** – ज्या. **बैसनौ** – वैष्णव. **बरन** – वर्ण उच्च जातीचा. **अवरन** – अवर्ण, नीच जातीचा. **रंकु** – रंक, दरिद्री. **इसुरु** – धनवान. **बिमल बासु** – निर्मल सुगंध. **जानिऐ** – ओळखतात, जाणले जातात. **ब्रहमन** – ब्राह्मण. **बैस** – वैश्य. **सूद** – शूद्र. **अरु** – आणि. **ख्यत्री** – क्षत्रिय. **डोम** – डोम. **चंडार** – चांडाळ. **मलेछ** – म्लेंच्छ. **पुनीत** – पवित्र. **आपु** – आपण स्वत:. **तारि** – तरून जातो. **तारे** – तारून नेतो. **दोइ** – दोन्ही. **धंनि** – धन्य. **सु** – ते. **गाउ** – गाव. **ठाउ** – ठिकाण. **सभ लोइ** – सर्व लोक. **जिनि** – ज्यांनी. **पिआ** – प्राशन केले. **साररस** – श्रेष्ठ रस, नामामृत. **तजे** – त्याग केला. **आन** – अन्य. **पुरैन** – कमलपत्र. **समीप** – जवळ. **भनि** – सांगतो. **ओइ** – तोच.

भावार्थ : ज्या कुलात कोणी साधुसंत वा वैष्णव प्रभुभक्त जन्मतो तो उच्चवर्णीय असो वा नीचवर्णीय असो, राव असो वा रंक असो, त्याच्या प्रभुभक्तीचा सुगंध सर्व जगभर पसरतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ भगवत् भक्त मग तो ब्राह्मण, वैश्य, शूद्र, क्षत्रिय, डोम, चांडाळ, म्लेंच्छ कोणीही असो तो आपल्या भगवत् भक्तीने पवित्र होतो. एवढेच नव्हे तर स्वत: भवसागर तरून जातो व स्वत: बरोबर आपल्या मातृ पितृ वंशातील साऱ्यांना तारून नेतो. ॥ १ ॥ ते गाव धन्य होय, ते ठिकाण धन्य होय. तो परिवार धन्य होय. सर्वच लोक धन्य होत, ज्यांनी प्रभुनामामृताचे प्राशन केले व विषयविकारांना विषसमान मानून फेकून दिले. ॥ २ ॥ पंडित, शूरवीर, छत्रधारी राजा, कोणीही प्रभुभक्ताची बरोबरी करू शकत नाही. ह्या सर्वांहून प्रभुभक्त श्रेष्ठ असतो. कमलपत्र पाण्यात राहूनही कोरडे राहते, त्याप्रमाणे प्रभुभक्त संसारात राहूनही मोहमायेपासून, विषयविकारांपासून अलिप्त राहतो. ॥ ३ ॥ २ ॥

॥ बाणी सधने की रागु बिलावलु ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

त्रिप कंनिआ के कारनै इकु भइआ भेखधारी ॥
कामारथी सुआरथी वा की पैज सवारी ॥ १ ॥
तव गुन कहा जगत गुरा जउ करमु न नासै ॥
सिंघ सरन कत जाईऐ जउ जंबुकु ग्रासै ॥ १ ॥ रहाउ ॥
एक बुंद जल कारने चात्रिकु दुखु पावै ॥
प्रान गए सागरु मिलै फुनि कामि न आवै ॥ २ ॥
प्रान जु थाके थिरु नही कैसे बिरमाउ ॥
बूडि मुए नउका मिलै कहु काहि चढावउ ॥ ३ ॥
मै नाहि कछु हउ नही किछु आहि न मोरा ॥
अउसर लजा राखि लेहु सधना जनु तोरा ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८५८)

शब्दार्थ : त्रिप – राजा. कंनिआ – कन्या. इकु – एक. भइआ – झाला. भेखधारी – वेशधारी. कामरथि – कामुक. सुआरथी – स्वार्थी. वाकी – त्याची. पैज – लाज. सवारी – राखली. तव – तुझा. नासै – नाश करणे. सिंघ – सिंह. जउ – जर. जंबुकु – गिधाड. ग्रासै – घास घेतो. चात्रिकु – चातक. फुनि – पुन्हा. बिरमावउ – विसावा घेणे, आराम करणे. बूडि – बुडून. मुए – मेला. नउका – नौका. मिलै – मिळाली. आहि – येथे, ह्या संसारात. इउसर – ह्या वेळी. लजा – लाज. जनु – सेवक. तोर – तुझा.

भावार्थ : राजकन्येशी विवाह करण्यासाठी कोणा एका पाखंडी माणसाने विष्णूचे रूप धारण केले. प्रभू परमात्म्याने त्या कामी व स्वार्थी माणसाची लाज राखली. ॥ १ ॥ हे प्रभो ! तुला शरण आलेल्या सेवकाचे जर तू रक्षण केले नाहीस तर तुझे मोठेपण ते काय राहिले. जर गिधाडांची भीती कायम राहणार असेल तर सिंहाची मैत्री करण्याचा काय लाभ ॥ १ ॥ रहाउ ॥ चातक पक्षी पावसाच्या एका थेंबासाठी तडफडत असतो तो न मिळता तडफडत मरण आले तर मागून पाण्याचा समुद्र मिळाला तरी त्याचा काय लाभ ? भाव असा, की प्रभू परमात्म्याच्या कृपेसाठी तडफडणाऱ्या प्रभुभक्तास प्रभू परमात्म्याची कृपा प्राप्त झाली नाही तर मेल्यानंतर कृपा होऊन काय लाभ ? ॥ २ ॥ माझे शरीर थकले असले तरी मन अजूनही स्थिर झाले नाही. मग मन स्वस्थ कसे बसणार ? पाण्यात बुडून मेल्यानंतर नौका मिळून काय उपयोग ? ॥ ३ ॥ मी एक क्षुद्र जीव. मी कोणी नाही. येथे ह्या संसारात काहीही नाही. ह्या जीवनात माझी लाज राख. हे प्रभो ! हा सधना तुझा दास आहे. ॥ ४ ॥ १ ॥

राग – गौड

१ ओअंकार सतिनामु करता पुरखु निरभउ निरवैरु
अकाल मूरति अजूनी सैभं गुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाव सत्य आहे. तो कर्तापुरुष आहे. तो निर्भय आहे. तो निर्वर आहे. तो काळातीत आहे. तो अयोनी संभव, स्वयम् आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

॥ चउपदे महला ४ घरू १ ॥

जे मनि चिति आस रखहि हरि ऊपरि ता मन चिंदे अनेक फल पाई ॥
हरि जाणै सभु किछु जो जीइ वरतै प्रभु घालिआ किसै का इकु तिलु न गवाई ॥
हरि तिस की आस कीजै मन मेरे जो सभ महि सुआमी रहिआ समाई ॥ १ ॥
मेरे मन आसा करि जगदीस गुसाई ॥
जो बिनु हरि आस अवर काहू की कीजै सा निहफल आस सभ बिरथी जाई ॥१॥रहाउ॥
जो दीसै माइआ मोह कुटंबु सभु मत तिस की आस लगि जनमु गवाई ॥
इन्ह कै किछु हाथि नही कहा करहि इहि बपुड़े इन्ह का वाहिआ कछु न वसाई ॥
मेरे मन आस करि हरि प्रीतम अपुने की जो तुझु तारै तेरा कुटंबु सभु छडाई ॥ २ ॥
जे किछु आस अवर करहि परमित्री मत तूं जाणहि तेरै कितै कंमि आई ॥
इह आस परमित्री भाउ दूजा है खिन महि झूठु बिनसि सभ जाई ॥
मेरे मन आसा करि हरि प्रीतम साचे की जो तेरा घालिआ सभु थाइ पाई ॥ ३ ॥
आसा मनसा सभ तेरी मेरे सुआमी जैसी तू आस करावहि तैसी को आस कराई ॥
किछु किसी कै हाथि नाही मेरे सुआमी ऐसी मेरै सतिगुरि बूझ बुझाई ॥
जन नानक की आस तू जाणहि हरि दरसनु देखि हरि दरसनि त्रिपताई ॥ ४ ॥ १ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८५९)

शब्दार्थ : जे – जर. आस – आशा. ता – तर. मनचिंदे – मनात चिंतलेल्या, मनोवांछित. जीइ– मनात. वरतै – घडते. घालिआ – परिश्रम. किसैका – कोणाचेही. गुसाई – पृथ्वीपती. निहफल – निष्फल. बिरथी – व्यर्थ. वाहिआ – केलेले कार्य. तुझु – तुला. छडाई – सोडवतो. परमित्री – अन्य मित्र. झूठु – खोटे. करावहि – करवतोस. देखि – दर्शन करून. त्रिपताई – तृप्त झालो.

भावार्थ : जर मी प्रभू परमात्म्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्याची आशा धरीन तर माझ्या मनातील अनेक आशा, इच्छा पूर्ण होतील. जीवाच्या मनात काय चालले आहे ते सारे प्रभू परमात्मा जाणतो. तो कोणाचेही परिश्रम

तिळमात्रही वाया जाऊ देत नाही. हे माझ्या मना ! जो सर्वत्र भरून राहिला आहे त्या प्रभूची आशा धर. ॥ १ ॥ हे माझ्या मना ! तू त्या जगदीशाची, पृथ्वीपतीची, त्या प्रभू परमात्म्याची आशा धर. हरीशिवाय अन्य कोणाची आशा धरल्यास ती व्यर्थ जाईल. ती कधीही फलद्रूप होणार नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! हे सारे जे दिसते ते कुटूंब आदी सर्व काही माया आहे. त्याचा विश्वास धरणे म्हणजे जन्म वाया घालवण्यासारखे आहे. जीवांच्या हाती काहीही नाही. ते बिचारे तरी काय करणार. ते काहीही करू शकत नाहीत. हे माझ्या मना ! तू आपल्या प्रियतम प्रभूची आशा धर तोच तुला भवसागर तारून नेईल. तुझ्या कुटूंबाला ही भवपाशातून मुक्त करील. ॥ २ ॥ हे मना तू हे नीट लक्षात घे की तू जर अन्य कोणावर, मित्र, कुटुंबीय आदींवर भरवसा ठेवलास तर ते मुळीच कामी येणार नाहीत. परममित्रांची वा अन्य कोणाचीही आशा करणे हाही द्वैतभाव आहे. त्याचे खोटेपण क्षणात उघडे पडते. हे माझ्या मना ! तू प्रिय प्रभूवर भरवसा ठेव. तो तुझे सर्व परिश्रम सार्थकी लावेल. ॥ ३ ॥ हे प्रभू ! माझ्या मनातील सर्व आशा, मनीषा सारे काही तुझेच आहे. तू जशी मला आशा करावयास लावतोस तशीच मी करतो. हे माझ्या स्वामी ! माझ्या सतगुरूने मला समजावून सांगितले आहे, की कोणाच्या हाती काहीही नाही. सारे काही त्या प्रभू परमात्म्याच्या हाती आहे. हे प्रभो ! दास नानकाची आशा तू जाणतोस. तुझ्या दर्शनाने तो तृप्त होईल. ॥४॥१॥

॥ गोंड महला ४ ॥

ऐसा हरि सेविऐ नित धिआईऐ जो खिन महि किलविख सभि करे बिनासा ॥
जे हरि तिआगि अवर की आस कीजै ता हरि निहफल सभ घाल गवासा ॥
मेरे मन हरि सेविहु सुखदाता सुआमी जिसु सेविऐ सभ भुख लहासा ॥ १ ॥
मेरे मन हरि ऊपरि कीजै भरवासा ॥
जह जाईऐ तह नालि मेरा सुआमी हरि अपनी पैज रखै जन दासा ॥ १ ॥ रहाउ ॥
जे अपनी बिरथा कहहु अवरा पहि ता आगै अपनी बिरथा बहु बहुतु कढासा ॥
अपनी बिरथा कहहु हरि अपुने सुआमी पहि जो तुम्हरे दूख ततकाल कटासा ॥
सो ऐसा प्रभु छोडि अपनी बिरथा अवरा पहि कहीऐ अवरा पहि कहि मन लाज मरासा ॥२॥
जो संसारै के कुटंब मित्र भाई दीसहि मन मेरे ते सभि अपनै सुआइ मिलासा ॥
जितु दिनि उन्ह का सुआउ होइ न आवै तितु दिनि नेड़ै को न ढुकासा ॥
मन मेरे अपना हरि सेवि दिनु राती जो तुधु उपकरै दूखि सुखासा ॥ ३ ॥
तिस का भरवासा किउ कीजै मन मेरे जो अंती अउसरि रखि न सकासा ॥
हरि जपु मंतु गुर उपदेसु लै जापहु तिन्ह अंति छडाए जिन्ह हरि प्रीति चितासा ॥
जन नानक अनदिनु नामु जपहु हरि संतहु इहु छूटण का साचा भरवासा ॥ ४ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६०)

शब्दार्थ : **किलविख** – पाप. **लहासा** – नष्ट होते. **पैज** – प्रतिष्ठा. **बिरथा** – व्यथा, पीडा. **कहहु**– सांगतो. **कढासा** – वर्णन करून सांगणे. **ततकाल** – तत्काळ. **कटासा** – नष्ट करतो. **मरासा** – मरते. **सुआइ** – स्वार्थ. **ढुकासा** – फिरकणे. **उपकरै** – उपकार करतो. **अउसरि** – समय, वेळ. **चितासा** – चित्तात. **छुटण** –

सुटका.

भावार्थ : जो एका क्षणात सर्व पापांचा विनाश करतो अशा प्रभू परमात्म्याचे नित्य स्मरण करावे. जर प्रभू परमात्म्याचा त्याग करून तुम्ही अन्य कोणाचा भरवसा धराल तर तुमची सारी धडपड वाया जाईल. हे मना ! ज्याचे स्मरण केल्याने मायेची तृष्णा व विकारांची भूक नष्ट होते त्या सुखदात्या प्रभूचे स्मरण कर. ॥ १ ॥ हे माझ्या मना ! तू केवळ प्रभू परमात्म्यावर भरवसा ठेव. मी जेथे जातो तेथे माझा प्रभू सदैव माझ्याबरोबरच असतो. प्रभू आपल्या सेवकांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ जर कोणा दुसऱ्यास आपले दु:ख सांगायला गेलात तर उलट तोच आपल्या दु:खाचे पाढे तुमच्यापुढे वाचत बसेल. म्हणून आपले दु:ख केवळ प्रभू परमात्म्यासच सांगावे. तो तुमचे दु:ख तत्काळ दूर करील. आपले दु:ख प्रभूखेरीज अन्य कोणास सांगताना जीवास लाजेने मरणप्राय दु:ख होते. ॥ २ ॥ जीवा ! संसारात ही जी सारी कुटुंबीय मंडळी, मित्र परिवार दिसतो ना, ते सारे त्यांच्या स्वार्थापुरते तुझ्याजवळ आले आहेत. ज्या दिवशी त्यांचा स्वार्थ साध्य होत नाही हे त्यांच्या लक्षात येईल, त्या दिवसापासून ते तुमच्याकडे फिरकणारही नाहीत. हे माझ्या मना ! तू आपल्या प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. तोच तुझ्यावर उपकार करून तुझ्या दु:खाचे रूपांतर सुखात करील. ॥ ३ ॥ हे माझ्या मना ! जो तुझे अंत्यसमयी रक्षण करू शकणार नाही त्याचा भरवसा का धरावा? सतगुरूकडून उपदेश प्राप्त करून तू हरिनामाच्या मंत्राचा जप कर कारण जो अंत:करणपूर्वक प्रभूवर प्रेम करतो त्याची अंत्यसमयी तो सुटका करतो. दास नानक सांगतात, संतजनहो ! सदैव प्रभुनामाचा जप करा. तोच संसारातून मुक्ती प्राप्त करण्याचा खरा विश्वासार्ह मार्ग आहे.॥४॥२॥

॥ गोड महला ४ ॥

हरि सिमरत सदा होइ अनंदु सुखु अंतरि सांति सीतल मनु अपना ॥
जैसे सकति सूरु बहु जलता गुर ससि देखे लहि जाइ सभ तपना ॥ १ ॥
मेरे मन अनदिनु धिआइ नामु हरि जपना ॥
जहा कहा तुझु राखै सभ ठाई सो ऐसा प्रभु सवि सदा तू अपना ॥ १ ॥ रहाउ ॥
जा महि सभि निधान सो हरि जपि मन मेरे गुरमुखि खोजि लहहु हरि रतना ॥
जिन हरि धिआइआ तिन हरि पाइआ मेरा सुआमी तिनके चरण मलहु हरि दसना ॥२॥
सबदु पछाणि राम रसु पावहु ओहु ऊतमु संतु भइओ बड बडना ॥
तिसु जन की वडिआई हरि आपि वधाई ओहु घटै
न किसै की घटाई इकु तिलु तिलु तिलना ॥ ३ ॥
जिस ते सुख पावहि मन मेरे सो सदा धिआइ नित कर जुरना ॥
जन नानक कउ हरि दानु इकु दीजै नित बसहि रिदै हरी मोहि चरना ॥ ४ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६०)

शब्दार्थ : **सकति** – . **सूरु** – सूर्य. **गुरू** – गुरू. **ससि** – चंद्र. **लहि जाई**– लयाला जाते. **तपना** – ताप. **जिन** – ज्याने. **तिन** – त्याने. **दसना** – दासांचे. **बड बडना** – मोठ्यात मोठा. **ओहू** – ते. **तिलना** – तिळमात्र. **कर**

– हात. **जुरना** – जोडून. **रिदै** – हृदयात.

भावार्थ : प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने शाश्वत आनंदाची प्राप्ती होते. अंतरात्मा सुखी होतो व मन शांत व शीतल होते. मायारूपी सूर्य आपल्या सर्व सामर्थ्यानिशी जीवास ताप देत असतो पण गुरुरूपी चंद्रमास पाहताच त्याचा सर्व ताप नष्ट होतो. ॥ १ ॥ हे माझ्या मना ! तू सदैव हरिनामाचा जप कर. हरीचे स्मरण कर. जो प्रभू परमात्मा सर्वत्र तुझे रक्षण करतो त्याची तू सदैव सेवा कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे मना ! ज्या प्रभू परमात्म्याच्या ठायी सर्व निधी सामावलेले आहेत त्या प्रभूचे स्मरण कर. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून तू प्रभूरूपी रत्नाचा शोध घे. ज्याने हरीचे ध्यान केले त्यास माझा प्रभू परमात्मा प्राप्त झाला. हे जीवा ! अशा प्रभुसेवकाची तू चरणसेवा कर. ॥ २ ॥ जो जीव प्रभूचा शब्द जाणतो व रामरसामृत प्राशन करतो तो सर्वश्रेष्ठ संत होतो. अशा प्रभुसेवकाची महती प्रभू स्वत: वाढवतो. ती महती कोणीही कितीही कमी करण्याचा प्रयत्न केला तरी तिळमात्रही कमी होत नाही. ॥ ३ ॥ हे मना ! ज्याच्यामुळे तुला सुखाची प्राप्ती होते त्याचे सदैव हात जोडून स्मरण कर. दास नानक म्हणतात, हे प्रभो ! तू मला एकच दान दे की तुझे चरण सदैव माझ्या हृदयात वास करोत. ॥ ४ ॥ ३ ॥

॥ गोंड महला ४ ॥

जितने साह पातिसाह उमराव सिकदार चउधरी सभि मिथिआ झूठु भाउ दूजा जाणु॥
हरि अबिनासी सदा थिरु निहचलु तिसु मेरे मन भजु परवाणु ॥ १ ॥
मेरे मन नामु हरी भजु सदा दीबाणु ॥
जो हरि महलु पावै गुर बचनी तिसु जेवडु अवरु नाही किसै दा ताणु ॥ १ ॥ रहाउ ॥
जितने धनवंत कुलवंत मिलखवंत दीसहि मन मेरे
सभि बिनसि जाहि जिउ रंगु कसुंभ कचाणु ॥
हरि सति निरंजनु सदा सेवि मन मेरे जितु हरि दरगह पावहि तू माणु ॥ २ ॥
ब्राहमणु खत्री सूद वैस चारि वरन चारि आस्त्रम हहि जो हरि धिआवै सो परधानु ॥
जिउ चंदन निकटि वसै हिरडु बपुड़ा तिउ सतसंगति मिलि पतित परवाणु ॥ ३ ॥
ओहु सभ ते ऊचा सभ ते सूचा जाकै हिरदै वसिआ भगवानु ॥
जन नानकु तिस के चरन पखालै जो हरि जनु नीचु जाति सेवकाणु ॥ ४ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६१)

शब्दार्थ : **साह** – राजे. **पातिसाह** – महाराजे. **सिकदर** – शिकदार. **चउधरी** – चौधरी. **मिथिआ** – मिथ्या, खोटे. **जाणु** – जाण, समज. **थिरु** – स्थिर. **निहचलु** – निश्चल. **परवाणु** – स्वीकृत. **दिवाणु** – आश्रय. **ताणु** – शक्ती. **मिलखवंत** – संपत्तीवान, जमीनदार. **बिनसि** – नष्ट. **कचाणु** – कच्चा. **माणु** – सन्मान. **परधानु** – प्रधान, श्रेष्ठ. **हिरडु** – एरंड. **सूचा** – पवित्र. **पखाले** – धुतो.

भावार्थ : ह्या जगात जितके म्हणून राजे, महाराजे, उमराव, शिकदार आदी दिसतात ते सारे खोटे व द्वैतभावात अडकलेले आहेत, एकमात्र प्रभू परमात्मा अविनाशी, स्थिर, निश्चल आहे. हे माझ्या मना ! त्याने तुझा

स्वीकार करावा म्हणून तू त्याचे स्मरण कर. ॥ १ ॥ जो प्रभू परमात्मा सर्व जीवांचा आधार आहे त्याचे तू स्मरण कर. जो सतगुरूच्या वचनाप्रमाणे आचरण करून प्रभूच्या दरबारात स्थान प्राप्त करतो, त्याच्याइतका श्रेष्ठ, बलवान अन्य कोणीही नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ जगात जेवढे म्हणून धनवान, कुलीन व ऐश्वर्यवान आहेत ते सारे कुसुंबाच्या कच्च्या रंगाप्रमाणे नष्ट होऊन जाणार आहेत. हे माझ्या मना ! तू त्या सत्यस्वरूप निरंजन प्रभूचे नित्य स्मरण कर. त्यामुळे तू प्रभू दरबारात स्वीकृत होशील. ॥ ३ ॥ ज्याच्या हृदयात भगवंत वास करतो, तो सर्वश्रेष्ठ व सर्वांत पवित्र होय. नीचातल्या नीच जातीत जन्मलेल्या प्रभुसेवकाची दास नानक चरणसेवा करतात.॥४॥४॥

॥ गोड महला ४ ॥

हरि अंतरजामी सभतै वरतै जेहा हरि कराए तेहा को करईऐ ॥
सो ऐसा हरि सेवि सदा मन मेरे जो तुधनो सभदू रखि लईऐ ॥ १ ॥
मेरे मन हरि जपि हरि नित पड़ईऐ ॥
हरि बिनु को मारि जीवालि न साकै ता मेरे मन काइतु कड़ईऐ ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि परपंचु कीआ सभु करतै विचि आपे आपणी जोति धरईऐ ॥
हरि एको बोलै हरि एकु बुलाए गुरि पूरै हरि एकु दिखईऐ ॥ २ ॥
हरि अंतरि नाले बाहरि नाले कहु तिसु पासहु मन किआ चोरईऐ ॥
निहकपट सेवा कीजै हरि केरी तां मेरे मन सरब सुख पईऐ ॥ ३ ॥
जिसदै वसि सभु किछु सो सभदू वडा सो मेरे मन सदा धिअईऐ ॥
जन नानक सो हरि नालि है तेरै हरि सदा धिआ तू तुधु लए छडईऐ ॥ ४ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६१)

शब्दार्थ : **अंतरजामी** – अंतर्यामी. **सभतै** – सर्वत्र. **वरतै** – व्याप्त. **जेहा** – जसे. **तेहा** – तसे. **कराए** – करवतो. **करईऐ** – करतो. **तुधनो** – तुला. **सभदु** – सर्वांपासून. **मारि** – मारणे. **जिवाहि** – जीवदान. **काइतु** – कशाला. **कडईऐ** – चिंता करतोस. **धरइऐ** – स्थापित केली. **एको** – एकमेव. **बुलाए** – बोलावतो. **दिखाइऐ** – दाखवतो. **किआ** – काय. **चोराइए** – चोरून ठेवणार, लपवून ठेवणार. **निहकपट** – निष्कपट. **केरी** – . **जिसदै** – ज्याच्या. **वसि** – ताब्यात, आज्ञेत.

भावार्थ : तो प्रभू परमात्मा अंतर्यामी आहे. सर्वव्याप्त आहे. तो जसे करवतो तसे जीव करतो. म्हणून हे माझ्या मना ! तू प्रभू परमात्म्याचे सदैव स्मरण कर. तो तुझे सर्व दु:खापासून रक्षण करील. ॥ १ ॥ माझ्या मना, हरिनामाचा जप कर. नित्य हरीचे चिंतन कर. हरीशिवाय कोणीही मारू शकत नाही किंवा जीवन देऊ शकत नाही. तर मग माझ्या मना, तू उगाच कशाला चिंता करतोस? ॥ १ ॥ रहाउ ॥ हरीनेच सारा संसार निर्माण केला. त्यातील प्रत्येक जीवाच्या अंतरात आपली ज्योत स्थापित केली. तो एकमेव प्रभू सर्व काही बोलतो. जीवांना बोलावयास लावतो. पूर्णगुरू त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे दर्शन घडवितो. ॥ २ ॥ आपल्या अंत:करणात प्रभू परमात्मा आहे. बाहेरही सर्वत्र तोच भरून राहिला आहे. मग त्याच्यापासून कोण काय लपवू शकणार? हे माझ्या मना ! तू निरपेक्ष भावाने प्रभूची सेवा कर. असे

केल्याने तुला सर्व सुखे प्राप्त होतील. ॥ ३ ॥ ज्याच्या आज्ञेत सारी सृष्टी आहे, जो सर्वश्रेष्ठ आहे, त्या प्रभू परमात्म्याचे, हे माझ्या मना तू सदैव स्मरण कर. दास नानक सांगतात, तो प्रभू परमात्मा सदैव तुझ्याजवळच आहे. त्याचे सदैव स्मरण कर. तोच तुला भवपाशातून मुक्त करील. ॥४॥५॥

॥ गोंड महला ४ ॥

हरि दरसन कउ मेरा मनु बहु तपतै जिउ त्रिखावंतु बिनु नीर ॥ १ ॥
मेरै मनि प्रेमु लगो हरि तीर ॥
हमरी बेदन हरि प्रभु जानै मेरे मन अंतर की पीर ॥ १ ॥ रहाउ ॥
मेरे हरि प्रीतम की कोई बात सुनावै सो भाई सो मेरा बीर ॥ २ ॥
मिलु मिलु सखी गुण कहु मेरे प्रभ के ले सतिगुर की मति धीर ॥ ३ ॥
जन नानक की हरि आस पुजावहु हरि दरसनि सांति सरीर ॥ ४ ॥ ६ ॥ छका १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६१)

शब्दार्थ : **त्रिखावंतु** – तृषार्त, तहानलेला. **बेदन** – वेदना. **पीर** – पीडा. **बीर** – बंधु. **मति** – उपदेश. **धीर** – धैर्य. **पुजावहु** – पूर्ण.

भावार्थ : ज्याप्रमाणे तहानेने व्याकूळ जीव पाण्याविना तडफडत असतो, त्याप्रमाणे माझे मन हरिदर्शनासाठी व्याकूळ झाले आहे. ॥ १ ॥ माझ्या मनाला प्रभुप्रेमरूपी तीराने विद्ध केले आहे. माझी वेदना, माझ्या अंतरीची व्यथा तो प्रभू परमात्मा जाणतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ जो कोणी मला माझ्या हरी, प्रभूची कथा ऐकवील तो माझा प्रिय बंधू तोच माझा हितचिंतक. ॥ २ ॥ हे माझ्या सत्संगी सख्यांनो ! एकत्र येऊन गुरूकडून मार्गदर्शन घेऊन प्रभुपतीचे गुणगान करा. त्यामुळे तुम्हास धैर्य प्राप्त होईल. ॥ ३ ॥ दास नानक सांगतात, माझ्या सर्व आशा प्रभूने पूर्ण केल्या आहेत. त्याच्या दर्शनाने माझे तन, मन शांत झाले आहे. ॥ ४ ॥ ६ ॥ छक्का १ ॥

रागु गोंड महला ५ चउपदे घरू १

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. तो सतगुरुकृपेने प्राप्त होतो.

सभु करता सभु भुगता ॥ १ ॥ रहाउ ॥
सुनतो करता पेखत करता ॥ अद्रिसटो करता द्रिसटो करता ॥
ओपति करता परलउ करता ॥ बिआपत करता अलिपतो करता ॥ १ ॥
बकतो करता बूझत करता ॥ आवतु करता जातु भी करता ॥
निरगुन करता सरगुन करता ॥ गुरप्रसादि नानक समद्रिसटा ॥ २ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६२)

शब्दार्थ : **सभू** – सर्व काही. **भुगता** – भोगणारा. **अद्रिसटो** – अदृश्य. **द्रिसटो** – दृश्य. **ओपति** – उत्पत्ती. **परलउ** – प्रलय, विनाश. **बिआपत** – व्याप्त. **अलिपतो** – अलिप्त. **बकतो** – वक्ता. **बुझत** – समजणारा, जाणणारा. **आवतु** – जन्म घेणारा. **जातू** – जाणारा, मृत्यू पावणारा. **निरगुन** – गुणातीत. **सरगुण** – सगुण. **समद्रिसटा** – समदृष्टी असलेला.

भावार्थ : सर्व काही करणारा, सर्व काही भोगणारा तो एकमेव प्रभू परमात्माच आहे. तोच सर्व काही ऐकणारा व पाहणारा आहे. अदृश्यही तोच आहे. दृश्यही तोच आहे. सृष्टी उत्पन्न करणाराही तोच आहे व प्रलय घडविणाराही तोच आहे. तो सर्वव्याप्त असूनही सर्वांपासून अलिप्तही तोच आहे. ॥ १२ । तोच वक्ता आहे व ते जाणणाराही तोच आहे. जन्म घेणाराही तोच आहे व जगातून निघून जाणाराही तोच आहे. (जीवास जन्म देणाराही तोच आहे व जीवास मरण देणाराही तोच आहे.) तोच निर्गुण आहे. सगुणही तोच आहे. नानक सांगतात, हा समदृष्ट प्रभू गुरुकृपेने प्राप्त होतो. ॥ २ ॥ १ ॥

॥ गोंड महला ५ ॥

फाकिओ मीन कपिक की निआई तू उरझि रहिओ कुसंभाइले ॥
पग धारहि सासु लेखै लै तउ उधरहि हरि गुण गाईले ॥ १ ॥
मन समझु छोडि आवाइले ॥
अपने रहन कउ ठउरु न पावहि काए पर कै जाइले ॥ १ ॥ रहाउ ॥
जिउ मैगलु इंद्री रसि प्रेरिओ तू लागि परिओ कुटंबाइले ॥
जिउ पंखी इकत्र होइ फिरि बिछुरै थिर संगति हरि हरि धिआइले ॥ २ ॥
जैसे मीनु रसन सादि बिनसिओ ओहु मूठौ मूड लोभाइले ॥
तू होआ पंच वासि वैरी कै छूटहि परु सरनाइले ॥ ३ ॥
होहु क्रिपाल दीन दुख भंजन सभि तुम्हरे जीइ जंताइले ॥
पावउ दानु सदा दरसु पेखा मिलु नानक दास दसाइले ॥ ४ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६२)

शब्दार्थ : **फाकिओ** – अडकलेला, फसलेला. **मीन** – मासोळी. **कपिक** – माकड. **निआई** – न्यायाने. **उरझि** – फसलेला. **कुसंभाइले** – नश्वर. **सासु** – श्वास. **लै** – घे, प्रभूचे नाव घे. **तउ** – तेव्हा. **समझु** – समज. **आवाइल** – आकर्षण. **ठउरु** – स्थान. **काउ** – का, कशाला. **मैगलु** – हत्ती. **इंद्रि** – इंद्रिये, कामवासना. **प्रेरिओ** – प्रेरित होऊन. **कुटुंबाइले** – कुटुंबाच्या. **रसन** – जीभ. **सादि** – स्वाद. **बिनसिओ** – नष्ट होते. **मुठौ** – ठकवले जातात. **वासि** – ताब्यात. **सरनाइले** – शरण जा.

भावार्थ : ज्याप्रमाणे अमिषाला भुलून मासा गळाला लागतो. माकड थोड्याशा प्रलोभना भुलून पाशात अडकतो. त्याचप्रमाणे तू मायेच्या नश्वर रंगाला भुलून मायापाशात अडकून पडला आहेस. तुझी प्रत्येक हालचाल, प्रत्येक श्वास जर प्रभू परमात्म्याच्या इच्छेप्रमाणे करशील व प्रभूचे गुण गाशील तर तुझा उद्धार होईल. ॥ १ ॥ हे मना ! हे तथ्य नीट

समजावून घे व ह्या मायेच्या आकर्षणाचा त्याग कर, आपलेच स्थान पक्के नाही मग दुसऱ्यांना कशाला आमंत्रित करतोस? भाव असा, की आपलेच मन आपल्या ताब्यात नाही. आपल्याला प्रभुचरणी स्थान प्राप्त झाले नाही मग दुसऱ्यांना कशाला उपदेश करतोस? ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! ज्या कामप्रेरणेने हत्ती अडकतो, त्याचप्रमाणे तू कुटुंबाच्या पाशात अडकला आहेस. ज्याप्रमाणे पक्षी काही काळासाठी एकत्र येतात पण परत विभक्त होतात, आपापल्या ठिकाणी उडून जातात, त्याचप्रमाणे मानवी जीवन हा क्षणभराचा खेळ आहे. केवळ संतांच्या संगतीत राहून प्रभुनामाचे स्मरण केल्यानेच स्थिर जीवन प्राप्त होते. ॥ २ ॥ ज्याप्रमाणे मासा जिव्हालौल्याने गळाला अडकतो व नष्ट होतो, त्याप्रमाणे जीव मोहमायेच्या जाळ्यात अडकून ठकविला जातो. हे जीवा ! तू पंचविकाररूपी वैऱ्यांच्या पूर्ण आहारी गेला आहेस. त्यातून तुझी सुटका कशी होणार ? प्रभू परमात्म्याला शरण गेल्यानेच तुझी ह्या वासनाविकाररूपी शत्रूंपासून सुटका होईल. ॥ ३ ॥ सर्व दुःखांचा नाश करणाऱ्या प्रभू, सारे जीवजंतू तुझेच आहेत. त्यांच्यावर कृपा कर. हे प्रभो ! मला तुझ्या दासांच्या दासाला दास नानकाला असे वरदान दे, की त्यास सदैव तुझे दर्शन प्राप्त होईल. ॥ ४ ॥ २ ॥

रागु गोंड महला ५ चउपदे घरु २
१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेनेच तो प्राप्त होतो.

जीअ प्रान कीए जिनि साजि ॥ माटी महि जोति रखी निवाजि ॥
बरतन कउ सभु किछु भोजन भोगाइ ॥ सो प्रभु तजि मूड़े कत जाइ ॥ १ ॥
पारब्रहम की लागउ सेव ॥ गुर ते सुझै निरंजन देव ॥ १ ॥ रहाउ ॥
जिनि कीए रंग अनिक परकार ॥ ओपति परलउ निमख मझार ॥
जा की गति मिति कही न जाइ ॥ सो प्रभु मन मेरे सदा धिआइ ॥ २ ॥
आइ न जावै निहचलु धनी ॥ बेअंत गुना ता के केतक गनी ॥
लाल नाम जाकै भरे भंडार ॥ सगल घटा देवै आधार ॥ ३ ॥
सति पुरखु जाको है नाउ ॥ मिटहि कोटि अघ निमख जसु गाउ ॥
बाल सखाई भगतन को मीत ॥ प्रान अधार नानक हित चीत ॥ ४ ॥ १ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६२)

शब्दार्थ : **जीअ** – जीव. **प्रान** – प्राणी. **साजि** – उत्पन्न केले. **निवाजि** – सन्मानित केले. **वरतन** – प्रयोग, वापर. **कत** – कोठे. **सुझै** – समज, ज्ञान. **परकार** – प्रकार. **ओपति** – उत्पत्ती. **परलउ** – प्रलय. **मझार** – मध्ये. **बेअंत** – अनंत. **केतक** – किती. **गनी** – गणना करणे. **अघ** – पाप. **बाल** – बालपण.

भावार्थ : ज्या प्रभू परमात्म्याने जीव व प्राण उत्पन्न केले, मातीच्या ह्या पुतळ्यात ज्याने आत्मज्योत स्थापित केली, वापरासाठी सर्व काही दिले, उत्तम भोजन दिले, त्या प्रभू परमात्म्यास सोडून हे मूर्खा तू कोठे जातोस ? ॥१॥ परब्रह्म परमात्म्याची सेवा कर. सतगुरूकडून निरंजन प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त कर. ॥ १ ॥ रहाउ ॥

ज्याने ह्या सृष्टीत नाना प्रकारचे रंग भरले, जो क्षणात सृष्टीची उत्पत्ती करू शकतो व प्रलय करून ती नष्टही करू शकतो, त्या प्रभूच्या गती मितीचे कोणीही वर्णन करू शकत नाही. हे माझ्या मना ! त्या प्रभूचे सदैव ध्यान कर. ॥ २ ॥ तो प्रभू जन्मतही नाही, मरतही नाही. तो सदैव निश्चल स्वरूपात अस्तित्वमान आहे. तो अनंत गुणांनी मंडीत आहे. त्याच्या गुणांची गणती कोणीही करू शकत नाही. त्याचे भांडार नामरूपी रत्नांनी भरलेले आहे. सर्व जीवांना तो आधार देतो. ॥ ३ ॥ सत्यपुरुष असे ज्याचे नाम आहे, त्याचे क्षणभरही यशोगान केल्याने कोटी कोटी पापांचा नाश होतो. नानक सांगतात, तो माझा बालपणाचा मित्र व भक्तांचा सखा आहे. तोच माझा प्राणाधार आहे व हितचिंतक आहे. ॥ ४ ॥ १ ॥ ३ ॥

॥ गोंड महला ५ ॥

नाम संगि कीनो बिउहारु ॥ नामु ही इसु मन का अधारु ॥
नामो ही चिति कीनी ओट ॥ नामु जपत मिटहि पाप कोटि ॥ १ ॥
रासि दीई हरि एको नामु ॥ मन का इसटु गुर संगि धिआनु ॥ १ ॥ रहाउ ॥
नामु हमारे जीअ की रासि ॥ नामो संगी जत कत जात ॥
नामो ही मनि लागा मीठा ॥ जलि थलि सभ महि नामो डीठा ॥ २ ॥
नामे दरगह मुख उजले ॥ नामे सगले कुल उधरे ॥
नामि हमारे कारज सीध ॥ नाम संगि इहु मनूआ गीध ॥ ३ ॥
नामे ही हम निरभउ भए ॥ नामे आवन जावन रहे ॥
गुरि पूरै मेले गुणतास ॥ कहु नानक सुखि सहजि निवासु ॥ ४ ॥ २ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६३)

शब्दार्थ : **बिउहारु** – व्यवहार. **ओट** – आधार, आश्रय. **रासि** – संपत्ती. **इसटु** – इष्ट. **डीठा** – दिसते. **दरगह** – प्रभूचा दरबार. **गीध** – लीन होणे. **गुणतास** – गुणनिधी.

भावार्थ : मी माझे सारे जीवन व्यवहार प्रभुनामाच्या साहाय्यानेच करतो. नाम हाच माझ्या मनाचा आधार आहे. नाम हेच माझ्या चित्ताचे आश्रयस्थान आहे. प्रभुनामाने कोटी कोटी पापे नष्ट होतात. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्यानेच मला नामरूपी संपत्ती दिली आहे. मन स्थिर करण्यासाठी सतगुरूच्या संगतीत प्रभुनामाचे ध्यान करणे इष्ट आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनाम हीच माझ्या जीवनाची संपत्ती आहे. मी जेथे कोठे जातो तेथे तेथे प्रभुनाम माझ्यासोबत असते. माझ्या मनास प्रभुनाम गोड वाटते. जळी, स्थळी सर्वत्र प्रभुनामच मला दिसते. ॥२॥ प्रभुनामामुळे प्रभू दरबारात प्रतिष्ठा प्राप्त होते. प्रभुनामाने संपूर्ण कुलाचा उद्धार होतो. प्रभुनामाने कार्यसिद्धी होते. माझे मन प्रभुनामात लीन झाले आहे. ॥ ३ ॥ प्रभुनामामुळे मी निर्भय झालो आहे. प्रभुनामामुळे जीवाची जन्ममरणाच्या चक्रातून मुक्तता होते. पूर्णगुरूमुळेच गुणनिधी प्रभू परमात्मा प्राप्त होतो. नानक सांगतात, की प्रभुनामामुळे जीवास सहजावस्थेचे सुख प्राप्त होते. ॥ ४ ॥ २ ॥ ४ ॥

॥ गोंड महला ५ ॥

निमाने कउ जो देतो मानु ॥ सगल भूखे कउ करता दानु ॥
गरभ घोर महि राखनहारु ॥ तिसु ठाकुर कउ सदा नमसकारु ॥ १ ॥
ऐसो प्रभु मन माहि धिआइ ॥ घटि अवघटि जत कतहि सहाइ ॥ १ ॥ रहाउ ॥
रंकु राउ जा कै एक समानि ॥ कीट हसति सगल पूरान ॥
बीओ पूछि न मसलति धरै ॥ जो किछु करै सु आपहि करै ॥ २ ॥
जा का अंतु न जानसि कोइ ॥ आपे आपि निरंजनु सोइ ॥
आपि अकारु आपि निरंकारु ॥ घट घट घटि सभ घट आधारु ॥ ३ ॥
नाम रंगि भगत भए लाल ॥ जसु करते संत सदा निहाल ॥
नाम रंगि जन रहे अघाइ ॥ नानक तिन जन लागै पाइ ॥ ४ ॥ ३ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६३)

शब्दार्थ : निमाने - मानहीन. भूखे - भुकेलेले. राखनहारु - रक्षणकर्ता. घटि - देहात. अवघटि - देहाबाहेर. कीट - कीटक, किडा. हसति - हत्ती. पुरान - पूर्णव्याप्त. बिओ - दुसऱ्यास. जसु - यशोगान. निहाल - प्रसन्न, आनंदित. अघाइ - तृप्त.

भावार्थ : जो प्रभू परमात्मा मानहीन व्यक्तीस सन्मान प्राप्त करून देतो. भुकेलेल्यांना अन्न देतो. गर्भावस्थेत जीवाचे रक्षण करतो. अशा प्रभूस सदैव नमस्कार करावा. ॥ १ ॥ अशा प्रभू परमात्म्याचे मनात ध्यान करावे. तो जीवास अंतर्बाह्य सर्वत्र साहाय्य करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्याच्या दृष्टीस रंक आणि राव समान असतात. सामान्य कीटकापासून महाकाय हत्तीपर्यंत सर्वांमध्ये तो व्याप्त आहे. सृष्टीचा कारभार चालवताना तो अन्य कोणाचाही सल्ला घेत नाही. जे काही करावयाचे ते तो स्वत: करतो. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्याच्या सामर्थ्याची सीमा कोणीही जाणत नाही. तो निरंजन प्रभूच सर्व काही आहे. तो साकार आहे, निराकारही तोच आहे. सर्व जीवांचा तो आधार आहे. ॥ ३ ॥ प्रभूचे भक्त नामरंगात रंगून जातात. प्रभूचे यशोगान गाऊन सदैव आनंदित होतात. प्रभुसेवक नामरंगात रंगून तृप्त होतात. नानक अशा प्रभुसेवकांच्या चरणी लीन होतात. ॥ ४ ॥ ३ ॥ ५ ॥

॥ गोंड महला ५ ॥

जा कै संगि इहु मनु निरमलु ॥ जा कै संगि हरि हरि सिमरनु ॥
जा कै संगि किलबिख होहि नास ॥ जा कै संगि रिदै परगास ॥ १ ॥
से संतन हरि के मेरे मीत ॥ केवल नामु गाईऐ जा कै नीत ॥ १ ॥ रहाउ ॥
जा कै मंत्रि हरि हरि मनि वसै ॥ जा कै उपदेसि भरमु भउ नसै ॥
जा कै कीरति निरमल सार ॥ जा की रेनु बांछै संसार ॥ २ ॥
कोटि पतित जा कै संगि उधार ॥ एकु निरंकारु जा कै नाम अधार ॥
सरब जीआं का जानै भेउ ॥ क्रिपा निधान निरंजन देउ ॥ ३ ॥

पारब्रहम जब भए क्रिपाल ॥ तब भेटे गुर साध दइआल ॥
दिनु रैणि नानकु नामु धिआए ॥ सूख सहज आनंद हरि नाए ॥ ४ ॥ ४ ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६३)

शब्दार्थ : संगि - संगतीत. किलबिख - पाप. होहि - होते. नीत - नित्य. मंत्रि - मंत्र, उपदेश. नसे - नष्ट होते. सार - श्रेष्ठ. रेनु - चरणरज. वांछै - इच्छा करतात. भेउ - भेद.

भावार्थ : ज्या संतजनांच्या संगतीत राहिल्याने हे मन निर्मल होते, ज्यांच्या संगतीत राहून प्रभूचे स्मरण करता येते, ज्यांच्या संगतीत राहिल्याने मनातील सर्व पाप नष्ट होते, त्यांच्या संगतीत राहिल्याने हृदयात आत्मज्ञानाचा प्रकाश पसरतो. ॥ १ ॥ ते हरीचे संतजन माझे मित्र आहेत. त्यांच्या संगतीत राहून सदैव केवळ प्रभू परमात्म्याचे स्मरण करावे. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याच्या मंत्राने प्रभू परमात्मा अंत:करणात वास करतो, ज्याच्या उपदेशाने भय व भ्रम नष्ट होतात, ज्याची कीर्ती गायल्याने निर्मल व श्रेष्ठ असे आत्मतत्व प्राप्त होते, ज्याचे चरणरज प्राप्त व्हावेत अशी इच्छा जगातील सर्व लोक करतात, ज्याच्या संगतीने कोटी कोटी जीवांचा उद्धार होतो, ज्याला त्या एकमेव प्रभू परमात्म्याच्या नामाचाच आधार आहे, जो सर्व जीवांचे रहस्य जाणतो, तो गुरु प्रत्यक्ष कृपानिधी निरंजन प्रभुस्वरूप होय. ॥ ३ ॥ जेव्हा परब्रह्म प्रभू परमात्मा कृपा करतो, तेव्हाच दयाधन सतगुरूची प्राप्ती होते. नानक रात्रंदिवस प्रभुनामाचे स्मरण करतो. प्रभुनामामुळे सहजावस्था प्राप्त होऊन सुख व आनंदाची प्राप्ती होते. ॥ ४ ॥ ४ ॥ ६ ॥

॥ गोंड महल ५ ॥

गुर की मूरति मन महि धिआनु ॥ गुर कै सबदि मंत्रु मनु मान ॥
गुर के चरन रिदै ले धारउ ॥ गुर पारब्रहमु सदा मनसकारउ ॥ १ ॥
मत को भरमि भुलै संसारि ॥ गुर बिनु कोइ न उतरसि पारि ॥ १ ॥ रहाउ ॥
भूले कउ गुरि मारगि पाइआ ॥ अवर तिआगि हरि भगती लाइआ ॥
जनम मरन की त्रास मिटाई ॥ गुर पूरे की बेअंत वडाई ॥ २ ॥
गुरप्रसादि ऊरध कमल बिगास ॥ अंधकार महि भइआ प्रगास ॥
जिनि कीआ सो गुर ते जानिआ ॥ गुर किरपा ते मुगध मनु मानिआ ॥ ३ ॥
गुरु करता गुर करणै जोगु ॥ गुरु परमेसरु हैभी होगु ॥
कहु नानक प्रभि इहै जनाई ॥ बिनु गुर मुकति न पाईऐ भाई ॥ ४ ॥ ५ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६४)

शब्दार्थ : उरध - अधोमुख. बिगास - विकसित होते. मुगध - मूर्ख. करता - कर्तापुरुष. करणै - करण्यास. होगु - असेल. इहै - हे. जनाई - ज्ञान दिले.

भावार्थ : गुरुमूर्तीचे मनात ध्यान करावे. गुरूच्या उपदेशाचे मनात चिंतन करावे. गुरूचे चरण हृदयात धारण करावे. गुरू परब्रह्मस्वरूप आहे. त्यास नित्य नमस्कार करावा. ॥ १ ॥ हे जीवा ! संसाराच्या मोहात पडून तू हे विसरू नकोस की सतगुरूशिवाय कोणीही भवसागर पार करून गेला नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! पथभ्रष्ट

झालेल्यास सतगुरू सन्मार्गावर आणतो. अन्य मार्गांचा त्याग करावयास लावून जीवास हरिभक्ती करावयास प्रवृत्त करतो. जन्ममरणाच्या चक्रातून मुक्तता करतो. पूर्णगुरुची महती अमर्याद आहे. ॥ २ ॥ सतगुरूच्या कृपेने– अधोमुख असलेले– संसारात रमलेले हृदयरूपी कमल ऊर्ध्वमुख होऊन आत्मतेजाने प्रकाशित होते. हृदयातील अज्ञान अंधकार दूर होऊन त्या जागी आत्मज्ञान प्रकाशित होते. ज्याने ही सृष्टी उत्पन्न केली, त्या प्रभू परमात्म्याचे ज्ञान सतगुरूकडून प्राप्त होते. सतगुरुकृपेने मूर्ख माणसाचे मनही प्रभुनामाचे मनन करते. ॥ ३ ॥ सतगुरू स्वत: कर्तापुरुष आहे. सर्व काही करण्यास तो समर्थ आहे. सतगुरू परमेश्वरस्वरूप आजही अस्तित्वमान आहे व भविष्यातही अस्तित्वमान असेल. सतगुरूकडूनच प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होते. सतगुरूशिवाय कोणासही मुक्ती प्राप्त होत नाही. ॥४॥५॥७॥

॥ गोंड महला ५ ॥

गुरु गुरु गुरु करि मन मोर ॥ गुरू बिना मै नाही होर ॥
गुर की टेक रहहु दिनु राति ॥ जाकी कोइ न मेटै दाति ॥ १ ॥
गुरु परमेसरु एको जाणु ॥ जो तिसु भावै सो परवाणु ॥ १ ॥ रहाउ ॥
गुर चरणी जा का मनु लागै ॥ दूखु दरदु भ्रमु ता का भागै ॥
गुर की सेवा पाए मानु ॥ गुर ऊपरि सदा कुरबानु ॥ २ ॥
गुर का दरसनु देखि निहाल ॥ गुर के सेवक की पूरन घाल ॥
गुर का सेवक कउ दुखु न बिआपै ॥ गुर का सेवकु दह दिसि जापै ॥ ३ ॥
गुर की महिमा कथनु न जाइ ॥ पारब्रहमु गुरु रहिआ समाइ ॥
कहु नानक जा के पूरे भाग ॥ गुर चरणी ता का मनु लाग ॥ ४ ॥ ६ ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६४)

शब्दार्थ : मन मोर – माझ्या मना. होर – अन्य. टेक – आश्रय. मेटे – नष्ट करणे. मानु – सन्मान. निहाल – प्रसन्न, आनंदित. घाल – परिश्रम. जापै – जाणला जातो, प्रसिद्ध होतो.

भावार्थ : हे माझ्या मना ! तू सदैव सतगुरूचेच स्मरण कर. त्याच्याशिवाय जीवाला अन्य कोणाचाही आधार नाही. तू रात्रंदिवस गुरूच्या आश्रयाने राहा. सतगुरूकडून प्राप्त झालेले दान कोणीही नष्ट करू शकत नाही. ॥१॥ हे मना ! तू गुरू व परमेश्वर एकच आहेत हे जाण. जो त्याला आवडतो तो प्रभूकडून स्वीकारला जातो. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याचे मन गुरुचरणी लीन झाले, त्याचे दु:ख, कष्ट, भ्रम नष्ट होतात. सतगुरूच्या सेवेने सन्मान प्राप्त होतो. मी माझे सर्वस्व गुरुचरणी समर्पित करतो. ॥ २ ॥ गुरूच्या दर्शनाने मन प्रसन्न होते. सतगुरूची सेवा करणाऱ्याचे सारे परिश्रम सार्थकी लागतात. सतगुरू सेवकास दु:ख व्यापू शकत नाही. सतगुरूचा सेवक दाहीदिशात प्रसिद्ध पावतो. ॥ ३ ॥ गुरुमहिमा अवर्णनीय आहे. प्रत्यक्ष परब्रह्म परमात्मा गुरूचे ठायी सामावलेला असतो. नानक सांगतात, ज्याचे भाग्य पूर्ण झाले त्याचेच मन गुरुचरणी लीन होते. ॥ ४ ॥ ६ ॥ ८ ॥

॥ गोंड महला ५ ॥

गुरु मेरी पूजा गुरु गोबिंदु ॥ गुर मेरा पारब्रहमु गुरु भगवंतु ॥
गुरु मेरा देउ अलख अभेउ ॥ सरब पूज चरन गुर सेउ ॥ १ ॥
गुर बिनु अवरु नाही मै थाउ ॥ अनदिनु जपउ गुरू गुर नाउ ॥ १ ॥ रहाउ ॥
गुरु मेरा गिआनु गुरु रिदै धिआनु ॥ गुरु गोपालु पुरखु भगवानु ॥
गुर की सरणि रहउ कर जोरि ॥ गुरू बिना मै नाही होरु ॥ २ ॥
गुरु बोहिथु तारे भव पारि ॥ गुर सेवा जम ते छुटकारि ॥
अंध:कार महि गुर मंत्रु उजारा ॥ गुर कै संगि सगल निसतारा ॥ ३ ॥
गुरु पूरा पाईऐ वडभागी ॥ गुर की सेवा दूखु न लागी ॥
गुर का सबदु न मेटै कोइ ॥ गुरु नानकु नानकु हरि सोइ ॥ ४ ॥ ७ ॥ ९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६४)

शब्दार्थ : अलख – अलक्ष्य, अदृश्य. अभेउ – ज्याचा पार लागत नाही असा, अज्ञेय. पूज – पूजनीय. थाउ – स्थान. बोहिथु – जहाज. मंत्रु – मंत्र, उपदेश. उजारा – प्रकाश. निसतारा – मुक्ती. मेटे – नष्ट करणे.

भावार्थ : मी सदैव गुरूची पूजा करतो कारण गुरू हाच माझा परमेश्वर आहे. सतगुरू मला परब्रह्म आहे. भगवंत आहे. माझा गुरू अलक्ष्य व अपार आहे. सतगुरूची चरणसेवा ही सर्वश्रेष्ठ पूजा आहे. ॥ १ ॥ मला सतगुरूशिवाय अन्य स्थान नाही. अन्य कोणताही आधार नाही. मी सदैव गुरुनामाचाच जप करतो. ॥ १ ॥रहाउ॥ गुरू हेच माझे ज्ञान. मी माझ्या हृदयात गुरूचेच ध्यान करतो. गुरू हाच भगवंत, कर्तापुरुष गोपाल आहे. मी हात जोडून सतगुरूस शरण गेलो आहे. गुरूशिवाय मला अन्य कोणीही नाही. ॥ २ ॥ भवसागर पार करणारे गुरू हे जहाज आहे. गुरूसेवेने जीवाची यमपाशातून सुटका होते. अज्ञान, अंधकाराने भरलेल्या ह्या संसारात गुरूच प्रकाश आहे. गुरूच्या संगतीने जीवास मुक्ती प्राप्त होते. ॥ ३ ॥ महाभाग्याने पूर्णगुरूची प्राप्ती होते. गुरुसेवा करणाऱ्यास दु:ख भोगावे लागत नाही. शब्दगुरू कोणीही नष्ट करू शकत नाही. नानक सांगतात, गुरू म्हणजेच परमेश्वर व परमेश्वर म्हणजेच गुरू दोन्ही एकरूपच आहेत. ॥ ४ ॥ ७ ॥ ९ ॥

॥ गोंड महला ५ ॥

राम राम संगि करि बिउहार ॥ राम राम राम प्रान अधार ॥
राम राम राम कीरतनु गाइ ॥ रमत रामु सभ रहिओ समाइ ॥ १ ॥
संत जना मिलि बोलहु राम ॥ सभ ते निरमल पूरन काम ॥ १ ॥ रहाउ ॥
राम राम धनु संचि भंडार ॥ राम राम राम करि आहार ॥
राम राम वीसरि नही जाइ ॥ करि किरपा गुरि दीआ बताइ ॥ २ ॥
राम राम राम सदा सहाइ ॥ राम राम राम लिव लाइ ॥

राम राम जपि निरमल भए ॥ जनम जनम के किलबिख गए ॥ ३ ॥
रमत राम जनम मरणु निवारै ॥ उचरत राम भै पारि उतारै ॥
सभ ते ऊच राम परगास ॥ निसि बासुर जपि नानक दास ॥ ४ ॥ ८ ॥ १० ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८६५)

शब्दार्थ : **बिउहार** – व्यवहार. **कीरतनु** – कीर्तन. **बोलहु** – बोला, उच्चारा. **संचि** – संचय करा. **लिव लाइ** – एकाग्र चित्त. **भए** – झालो. **किलविख** – पाप. **रमत** – स्मरण. **परगास** – प्रकाश.

भावार्थ : हे जीवा ! तू रामनामाचा व्यवहार कर. राम हाच साऱ्या जीवांचा प्राणाधार आहे. हे जीवा ! तू सदैव रामाचे कीर्तन कर. राम सर्वत्र रममाण झालेला आहे. तो सर्वव्याप्त आहे. ॥ १ ॥ हे संतजनहो ! एकत्र येऊन रामनामाचा उच्चार करा. रामनाम सर्वांत पवित्र आहे व त्याच्या उच्चाराने सर्व कार्य पूर्ण होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! तू रामनामरूपी धनाचा आपल्या भांडारात संचय कर. रामनाम हाच तुझा आहार होवो. तुझ्या गुरूने तुला कृपापूर्वक रामाचे दर्शन घडवले आहे. तुला कधीही रामाचा विसर पडू देऊ नकोस. ॥ २ ॥ राम जीवास सदैव साहाय्य करतो. हे जीवा ! रामनामात तू तुझे चित्त सदैव एकाग्र कर. रामनामाच्या उच्चाराने मन पवित्र होते. रामनामाच्या उच्चाराने जन्मजन्मांतरीचे पाप नष्ट होते. ॥ ३ ॥ रामनामाच्या उच्चाराने जीवाची जन्ममरणाच्या चक्रातून मुक्तता होते. रामनामाच्या उच्चाराने जीव भवसागर पार करून जातो. प्रभुनामाचा महिमा सर्वश्रेष्ठ आहे. दास नानक रात्रंदिवस रामनामाचे स्मरण करतो. ॥ ४ ॥ ८ ॥ १० ॥

॥ गोंड महला ५ ॥

उन कउ खसमि कीनी ठाकहारे ॥ दास संग ते मारि बिदारे ॥
गोबिंद भगत का महलु न पाइआ ॥ राम जना मिलि मंगलु गाइआ ॥ १ ॥
सगल स्त्रिसटि के पंच सिकदार ॥ राम भगत के पानीहार ॥ १ ॥ रहाउ ॥
जगत पास ते लेते दानु ॥ गोबिंद भगत कउ करहि सलामु ॥
लूटि लेहि साकत पति खोवहि ॥ साध जना पग मलि मलि धोवहि ॥ २ ॥
पंच पूत जणे इक माइ ॥ उतभुज खेलु करि जगत विआइ ॥
तीनि गुणा कै संगि रचि रसे ॥ इन कउ छोडि ऊपरि जन बसे ॥ ३ ॥
करि किरपा जन लीए छडाइ ॥ जिस के से तिनि रखे हटाइ ॥
कहु नानक भगति प्रभ सारु ॥ बिनु भगती सभ होइ खुआरु ॥ ४ ॥ ९ ॥ ११ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८६५)

शब्दार्थ : उनकउ – त्यांना, विकारांना. **खसमि** – प्रभूने. **ठाकहरे** – रोखून धरले. **विदारे** – विदीर्ण केले, नष्ट केले. **महलि** – ठिकाण, स्थान. **सिकदार** – सरदार. **पानीहार** – पाणके, सेवक. **साकत** – शाक्त, दुराचारी. **पति** – पत, प्रतिष्ठा. **जणे** – जन्म दिला, उत्पन्न केले. **उदभिज** – वनस्पती. **विआइ** – जन्मास घातले. **तीनि गुणा** – त्रिगुण. **हटाइ** – दूर केले. **सारु** – श्रेष्ठ.

भावार्थ : त्या पंचविकारांना प्रभू परमात्म्याने रोखून धरले. प्रभुसेवकाच्या संगतीतून दूर करून त्यांना मारून टाकले. ते पंचविकार कधीही प्रभुसेवकांपर्यंत पोहोचू शकत नाही. राम सेवकांनो एकत्र या व प्रभू रामाचे मंगल गीत गा ॥ १ ॥ हे पंचविकार साऱ्या सृष्टीवर आपला अधिकार गाजवतात पण प्रभुभक्तांच्या दारी मात्र त्यांचे सेवक बनून त्यांची सेवा करतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ ते (पंचविकार) साऱ्या जगाकडून वसुली करतात पण प्रभुभक्तांपुढे नम्र होऊन त्यांना सलाम करतात. शाक्त, दुराचारी लोकांना लुटतात व त्यांची प्रतिष्ठा नष्ट करतात. पण तेच पंचविकार प्रभुसेवकांचे चरण प्रक्षालन करतात. ॥ २ ॥ त्या एका मायेने पंचविकाररूपी पुत्रांना जन्म दिला. त्यांनीच सर्व वनस्पती व प्राणिसृष्टी निर्माण करून हा संसाराचा खेळ मांडला आहे. त्रिगुणांच्या संगतीने हा सारा संसार पंचविकारांच्या अधीन झाला आहे. पण प्रभूचे सेवक ह्या पंचविकार व त्रिगुणांच्या अतीत होऊन श्रेष्ठ स्थानी जाऊन बसतात. ॥ ३ ॥ प्रभू परमात्म्याने आपल्या सेवकांना ह्या पंचविकारांच्या तावडीतून सोडवले आहे. ज्या प्रभू परमात्म्याचे ते (पंचविकार) सेवक होते त्या प्रभूनेच त्यांना दूर केले. नानक सांगतात, जगात प्रभुभक्तीच सर्वत्र श्रेष्ठ आहे. प्रभुभक्तीशिवाय जीवन व्यर्थ होय. ॥ ४ ॥ ९ ॥ ११ ॥

॥ गोंड महला ५ ॥

कलि कलेस मिटे हरि नाइ ॥ दुख बिनसे सुख कीनो ठाउ ॥
जपि जपि अंम्रित नामु अघाए ॥ संत प्रसादि सगल फल पाए ॥ १ ॥
राम जपत जन पारि परे ॥ जनम जनम के पाप हरे ॥ १ ॥ रहाउ ॥
गुर के चरन रिदै उरिधारे ॥ अगनि सागर ते उतरे पारे ॥
जनम मरण सभ मिटी उपाधि ॥ प्रभ सिउ लागी सहजि समाधि ॥ २ ॥
थान थनंतरि एको सुआमी ॥ सगल घटा का अंतरजामी ॥
करि किरपा जा कउ मति देइ ॥ आठ पहर प्रभ का नाउ लेइ ॥ ३ ॥
जा कै अंतरि वसै प्रभु आपि ॥ ता कै हिरदै होइ प्रगासु ॥
भगति भाइ हरि कीरतनु करीऐ ॥
जपि पारब्रहमु नानक निसतरीऐ ॥ ४ ॥ १० ॥ १२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८६५)

शब्दार्थ : नाइ – नाम. **बिनसे** – विनाश पावते. **ठाउ** – स्थान. **अघाए** – तृप्त. **अग्नीसागर** – भवतापरूपी सागर. **उपाधी** – दुःख. **मति** – उपदेश. **निसतरीऐ** – पार नेतो.

भावार्थ : प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणाने कलियुगातील सर्व दुःख, क्लेश नष्ट होतात. दुःखांचा नाश होऊन मनात सुख स्थिर होते. प्रभुनामामृताचा जप करून मन तृप्त होते. संतजनांच्या कृपेने सर्व फल प्राप्त होते. ॥१॥ प्रभुनामाचे स्मरण करून जीव भवसागर पार करून जातात. जन्मजन्मांतरीचे पाप नष्ट होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! तू सतगुरुचरण आपल्या हृदयात धारण कर. असे केल्याने तू भवाग्नीचा सागर पार करून जाशील. जन्म, मरण आदी सर्व उपाधी नष्ट होतील व प्रभुरूपात सहज समाधी लागेल. ॥ २ ॥ सर्व ठिकाणी प्रभू परमात्मा विराजमान आहे. सर्व जीवांच्या अंतरातील भाव तो जाणतो. तो कृपावंत होऊन ज्या कोणास सद्‌बुद्धी देतो, तो अष्टौप्रहर

प्रभुनामाचे स्मरण करतो. ॥ ३ ॥ प्रभू परमात्मा ज्याच्या अंतरात वास करतो, ! त्याच्या हृदयात आत्मज्ञानाचा प्रकाश पसरतो. हे जीवा ! तू भक्तिभावाने हरिकीर्तन करावे. नानक सांगतात, परब्रह्म परमात्म्याचे स्मरण केल्याने जीव भवसागर पार करून जातो. ॥ ४ ॥ १० ॥ १२ ॥

॥ गोंड महला ५ ॥

गुर के चरन कमल नमसकारि ॥ कामु क्रोधु इसु तन ते मारि ॥
होइ रहीऐ सगल की रीना ॥ घटि घटि रमईआ सभ महि चीना ॥ १ ॥
इन बिधि रमहु गोपाल गुोबिंदु ॥ मनु धनु प्रभ का प्रभ की जिंदु ॥ १ ॥ रहाउ ॥
आठ पहर हरि के गुण गाउ ॥ जीउ प्रान को इहै सुआउ ॥
तजि अभिमानु जानु प्रभु संगि ॥ साध प्रसादि हरि सिउ मनु रंगि ॥ २ ॥
जिनि तूं कीआ तिस कउ जानु ॥ आगै दरगह पावहि मानु ॥
मनु तनु निरमल होइ निहालु ॥ रसना नामु जपत गोपाल ॥ ३ ॥
करि किरपा मेरे दीन दइआला ॥ साधू की मनु मंगै रवाला ॥
होहु दइआल देहु प्रभ दानु ॥ नानकु जपि जीवै प्रभ नामु ॥ ४ ॥ ११ ॥ १३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६६)

शब्दार्थ : रीना - चरणधूळ. चीना - ओळखले, जाणले. जिंदु - जीवन. सुआउ - स्वभाव, प्रयोजन. जानु - जाण. निहालु - प्रसन्न. खाला - चरणरज.

भावार्थ : हे जीवा ! तू सदैव गुरूच्या चरणकमलांना वंदन कर. आपल्या मनातील कामक्रोधादी विकारांना मारून नष्ट कर. सगळ्यांची तू चरणधूळ होऊन राहा. इतका तू नम्र होऊन राहा. तो प्रभू परमात्मा सर्व जीवांमध्ये वास करतो हे तू जाण. ॥ १ ॥ हे जीवा ! तू अशा रीतीने त्या पृथ्वीपती प्रभू परमात्म्याचे स्मरण कर की ज्यामुळे तुझे तन, मन सर्व काही प्रभू परमात्मारूप होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! तू अष्टौप्रहर हरीचे गुण गावेस ह्यासाठीच प्रभूने तुला हे शरीर व प्राण दिले आहेत. मानवी जीवनाचे तेच प्रयोजन आहे. अभिमानाचा त्याग कर. प्रभू परमात्मा सदैव तुझ्यासोबतच आहे हे जाण. साधुसंतांच्या कृपेने मनात प्रभू परमात्म्याविषयी प्रेम उत्पन्न होते. ॥ २ ॥ हे जीवा ! ज्या प्रभू परमात्म्याने तुला निर्माण केले त्याला तू जाण. त्यामुळे पुढे तुला प्रभू दरबारी सन्मान प्राप्त होईल. जिव्हेने प्रभूनामाचा उच्चार केल्याने तन, मन पवित्र होऊन प्रसन्न होते. ॥ ३ ॥ हे दीनदयाळा प्रभू ! माझ्यावर कृपा कर. मी तुझ्याकडे साधुसंतांच्या चरणरजांची याचना करतो. हे प्रभो ! कृपा करून मला हे दान दे. दास नानक तर तुझे नामस्मरण करत जीवन जगतो. ॥ ४ ॥ ११ ॥ १३ ॥

॥ गोंड महला ५ ॥

धूप दीप सेवा गोपाल ॥ अनिक बार वंदन करतार ॥
प्रभ की सरणि गही सभ तिआगि ॥ गुर सुप्रसंन भए वडभाग ॥ १ ॥
आठ पहर गाईऐ गोबिंदु ॥ तनु धनु प्रभ का प्रभ की जिंदु ॥ १ ॥ रहाउ ॥

हरि गुण रमत भए आनंद ॥ पारब्रहम पूरन बखसंद ॥
करि किरपा जन सेवा लाए ॥ जनम मरण दुख मेटि मिलाए ॥ २ ॥
करम धरम इहु ततु गिआनु ॥ साधसंगि जपीऐ हरि नामु ॥
सागर तरि बोहिथ प्रभ चरण ॥ अंतरजामी प्रभ कारण करण ॥ ३ ॥
राखि लीए अपनी किरपा धारि ॥ पंच दूत भागे बिकराल ॥
जूऐ जनमु न कबहू हारि ॥ नानक का अंगु कीआ करतारि ॥ ४ ॥ १२ ॥ १४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६६)

शब्दार्थ : करतार - कर्तापुरुष, प्रभू. गही - ग्रहण करून. वडभागि - महाभाग्याने. जिंदु - जीवन. रमत - स्मरण केल्याने. बखसंद - क्षमा करणारा. सागर - भवसागर. विकराल - विक्राळ. जुए - जुगार. अंगु - पक्ष.

भावार्थ : वास्तविक वारंवार प्रभुनामाचे स्मरण हेच धूप, दीप आदिद्वारा ईश्वरसेवा करण्यासारखे आहे. मी सर्वस्वाचा त्याग करून प्रभू परमात्म्यास शरण गेलो आहे. महाभाग्याने माझ्यावर सतगुरू प्रसन्न झाले. ॥ १ ॥ हे जीवा ! तू अष्टौप्रहर प्रभू परमात्म्याचे गुण गा. कारण तुझे हे तन, धन, जीवन प्रभूनेच तुला दिले आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ हरीच्या गुणांचे स्मरण करण्याने आनंद प्राप्त होतो. परब्रह्म परमात्मा पूर्ण कृपाळू आहे. त्याच्या कृपेनेच त्याने सेवकांना आपल्या सेवेस लावले आहे. प्रभूनेच माझे जन्ममरणाचे दु:ख दूर करून मला आपल्याशी एकरूप करून घेतले आहे. ॥ २ ॥ साधुसंतांच्या संगतीत राहून प्रभुनामाचे स्मरण करणे हाच खरा धर्म, हेच खरे कर्म व हेच खरे तत्त्वज्ञान होय. हा भवसागर तारून नेणारे जहाज म्हणजे प्रभू परमात्म्याचे चरण होत. सर्व काही करणारा व करवून घेणारा प्रभू परमात्मा अंतर्यामी आहे. तो सारे काही जाणतो. ॥ ३ ॥ प्रभूने माझ्यावर कृपा करून माझे रक्षण केले आहे. त्याने माझ्या मनातील विक्राळ अशा पंचविकारांना पळवून लावले. हे जीवा ! तू ह्या जीवनरूपी खेळात कधीही पराजित होऊ नकोस. नानक सांगतात, त्या प्रभू परमात्म्याने स्वत: सदैव मला साहाय्य करून माझे रक्षण केले. ॥ ४ ॥ १२ ॥ १४ ॥

॥ गोंड महला ५ ॥

करि किरपा सुख अनद करेइ ॥ बालक राखि लीए गुरदेवि ॥
प्रभ किरपाल दइआल गुोबिंद ॥ जीअ जंत सगले बखसिंद ॥ १ ॥
तेरी सरणि प्रभ दीन दइआल ॥ पारब्रहम जपि सदा निहाल ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रभ दइआल दूसर कोई नाही ॥ घट घट अंतरि सरब समाही ॥
अपने दास का हलतु पलतु सवारै ॥ पतित पावन प्रभ बिरदु तुम्हारै ॥ २ ॥
अउखध कोटि सिमरि गोबिंद ॥ तंतु मंतु भजीऐ भगवंत ॥
रोग सोग मिटे प्रभ धिआए ॥ मन बांछत पूरन फल पाए ॥ ३ ॥
करन कारन समरथ दइआर ॥ सरब निधान महा बीचार ॥
नानक बखसि लीए प्रभि आपि ॥ सदा सदा एको हरि जापि ॥ ४ ॥ १३ ॥ १५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६६)

शब्दार्थ : बखसिंद – क्षमा करतो. दुसर – दुसरा, अन्य. हलतु – इहलोकी. पलतु – परलोकी. बिरदु – ब्रीद. अउखद – औषध. तंतु – तंत्र. मंतु – मंत्र. धिआए – ध्यान केल्याने. दइआर – दयाळू.

भावार्थ : गुरुदेवांनी बालकांवर कृपा करून आनंद व सुख देऊन त्यांचे रक्षण केले. ॥ १ ॥ हे प्रभो दीनदयाळा मी तुला शरण आलो आहे. मी सदैव परब्रह्म परमात्म्याचे स्मरण करतो व प्रसन्नचित्त राहतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ एकमात्र प्रभू दयाळू आहे. अन्य कोणीही नाही. सर्व जीवांच्या अंतरात तो सामावलेला आहे. तो आपल्या सेवकांचे इह परलोकी रक्षण करतो. हे प्रभो ! पतितांना पावन करणे हे तुझे ब्रीदच आहे. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्याचे स्मरण हे कोटी कोटी व्याधीवरील औषधासमान आहे. प्रभू परमात्म्याचे भजन करणे हेच सर्व तंत्रमंत्रांचे सार आहे. प्रभूचे ध्यान केल्याने सर्व रोग, शोक नष्ट होतात व मनोवांछित सर्व फले प्राप्त होतात. ॥ ३ ॥ प्रभू परमात्मा दयाळू आहे. सर्व काही करण्यास व करवून घेण्यास समर्थ आहे. त्याचा विचार हा महाविचार आहे. तोच सर्वश्रेष्ठ निधी आहे. नानक सांगतात, प्रभूने माझ्यावर कृपा केली. आता मी सदैव त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे स्मरण करतो. ॥४॥१३॥१५॥

॥ गोंड महला ५ ॥

हरि हरि नामु जपहु मेरे मीत ॥ निरमल होइ तुम्हारा चीत ॥
तन मन की सभ मिटै बलाइ ॥ दूखु अंधेरा सगला जाइ ॥ १ ॥
हरि गुण गावत तरीऐ संसारु ॥ वडभागी पाईऐ पुरखु अपारु ॥ १ ॥ रहाउ ॥
जो जनु करै कीरतनु गोपाल ॥ तिस कउ पोहि न सकै जमकालु ॥
जग महि आइआ सो परवाणु ॥ गुरमुखि अपना खसमु पछाणु ॥ २ ॥
हरि गुण गावै संत प्रसादि ॥ काम क्रोध मिटहि उनमाद ॥
सदा हजूरि जाणु भगवंत ॥ पूरे गुर का पूरन मंत ॥ ३ ॥
हरि धनु खाटि कीए भंडार ॥ मिलि सतिगुर सभि काज सवार ॥
हरि के नाम रंग संगि जागा ॥ हरि चरणी नानक मनु लागा ॥ ४ ॥ १४ ॥ १६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६६)

शब्दार्थ : मीत – मित्र. चीत – चित्त. बलाइ – दुःख, पीडा. पोहि – पोहोचणे, स्पर्श करणे. खसमु – प्रभू. पछाणु – ओळखला. उनमाद – उन्माद, माज. हजूरि – समक्ष. जाणु – जाण. मंत – मंत्र. खाटि – कमावणे. काज – कार्य.

भावार्थ : हे माझ्या मित्रा ! तू सदैव प्रभुनामाचा जप कर. त्यामुळे तुझे चित्त निर्मळ हेईल. तन, मनाचे सारे क्लेश नष्ट होतील. दुःख, अज्ञान, अंधकार सर्व काही लयाला जाईल. ॥ १ ॥ हरीचे गुण गायल्याने जीव भवसागर तरून जातो. महाभाग्याने परमपुरुष परमात्म्याची प्राप्ती होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ जो प्रभुसेवक गोपाळाचे कीर्तन करतो त्याला यम स्पर्शही करू शकत नाही. त्याचे जगात येणे सार्थकी लागते. तो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून प्रभू परमात्म्यास ओळखतो. ॥ २ ॥ असा जीव संतकृपेने हरीचे गुण गाऊ लागतो. त्यामुळे त्याच्या मनातील काम, क्रोध, उन्माद आदी सर्व विकार नष्ट होतात. प्रभू परमात्मा सदैव आपल्या समवेत आहे हे तो जाणतो.

पूर्णगुरूची हीच शिकवण आहे. ॥ ३ ॥ हे जीवा ! तू प्रभुनामरूपी धनाचा संग्रह कर. नानक सांगतात, प्रभुनामरंगात रंगलेले मन हरिचरणी लीन होते. ॥ ४ ॥ १४ ॥ १६ ॥

॥ गोंड महला ५ ॥

भवसागर बोहिथ हरि चरण ॥ सिमरत नामु नाही फिरि मरण ॥
हरि गुण रमत नाही जम पंथ ॥ महा बीचार पंच दूतह मंथ ॥ १ ॥
तउ सरणाई पूरन नाथ ॥ जंत अपने कउ दीजहि हाथ ॥ १ ॥ रहाउ ॥
सिम्रिति सासत्र बेद पुराण ॥ पारब्रहम का करहि वखिआण ॥
जोगी जती बैसनो रामदास ॥ मिति नाही ब्रहम अबिनास ॥ २ ॥
करण पलाह करहि सिव देव ॥ तिलु नही बूझहि अलख अभेव ॥
प्रेम भगति जिसु आपे देइ ॥ जग महि विरले केई केइ ॥ ३ ॥
मोहि निरगुण गुणु किछहु नाहि ॥ सरब निधान तेरी द्रिसटी माहि ॥
नानकु दीनु जाचै तेरी सेव ॥ करि किरपा दीजै गुरदेव ॥ ४ ॥ १५ ॥ १७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६७)

शब्दार्थ : बोहिथ – जहाज. मंथ – मंथन. सिम्रिति – स्मृती. सासत्र – शास्त्र. वखिआण – व्याख्या सांगणे. बैसनो – वैष्णव. रामदास – रामाचे उपासक. मिति – अनुमान, अंदाज. करण – करुण. पलाह – प्रलाप, विलाप. माहि – मध्ये. जाचै – याचना करतात. सेव – सेवा.

भावार्थ : प्रभुचरण हे भवसागर पार करणारे जहाज आहे. जो प्रभुनामाचे स्मरण करतो तो मरणापासून मुक्त होतो. जो हरीच्या गुणात रममाण झाला त्यास यमपंथास जावे लागत नाही कारण प्रभू परमात्म्याचे मनन, चिंतन केल्याने कामक्रोधादी पंचमहादूतांचा नाश होतो. ॥ १ ॥ हे पूर्णपुरुषा प्रभू ! मी तुला शरण आलो आहे. ह्या जीवास आपले मानून त्याचे रक्षण कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ स्मृती, शास्त्रे, वेद, पुराणे सर्व तुझीच व्याख्या (वर्णन) करण्याचा प्रयत्न करतात. योगी, वैष्णव, यती, रामदासी सारेजणही तुलाच जाणण्याचा प्रयत्न करतात. पण कोणासही त्या अविनाशी परब्रह्माच्या शक्तीचा अंदाजही करता येत नाही. प्रत्यक्ष शिवजी त्यास जाणण्यासाठी व्याकूळ होऊन विलाप करतात. पण तेही त्या अलक्ष्य, अभेद परमात्म्यास तिळभरही जाणू शकत नाहीत. प्रभू परमात्मा स्वत: प्रेम व भक्ती देतो. ज्यास हे ज्ञान प्राप्त होते असा जगात क्वचितच कोणी असतो. ॥ ३ ॥ हे प्रभो ! मी गुणहीन आहे. माझ्या अंगी कोणताही गुण नाही. सर्व गुणांचा निधी तुझ्या कृपादृष्टीत साठवलेला आहे. हा नानक दीन होऊन तुझ्या सेवेची याचना करतो. हे प्रभू ! कृपा करून तेवढे वरदान मला दे.॥४॥१५॥१७॥

॥ गोड महला ५ ॥

संत का लीआ धरति बिदारउ ॥ संत का निंदकु अकास ते टारउ ॥
संत कउ राखउ अपने जीउ नालि ॥ संत उधारउ ततखिण तालि ॥ १ ॥
सोई संतु जि भावै राम ॥ संत गोबिंद कै एकै काम ॥ १ ॥ रहाउ ॥

संत कै ऊपरि देइ प्रभु हाथ ॥ संत कै संगि बसै दिनु राति ॥
सासि सासि संतह प्रतिपालि ॥ संत का दोखी राज ते टालि ॥ २ ॥
संत की निंदा करहु न कोइ ॥ जो निंदै तिस का पतनु होइ ॥
जिस कउ राखै सिरजनहारु ॥ झख मारउ सगल संसारु ॥ ३ ॥
प्रभ अपने का भइआ बिसासु ॥ जीउ पिंडु सभु तिसकी रासि ॥
नानक कउ उपजी परतीति ॥ मनमुख हार गुरमुख सद जीति ॥४॥१६॥१८॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६७)

शब्दार्थ : **लीआ** – तिरस्कृत. **विदारउ** – नष्ट. **टारउ** – फेकून देणे. **तालि** – टाळी. **दोखी** – द्वेषी. **टालि** – नष्ट करतो. **बिखासु** – विश्वास. **रासि** – संपत्ती. **उपजी** – उत्पन्न झाली. **परतीति** – प्रचिती, विश्वास.

भावार्थ : जे संतांकडून तिरस्कृत केले जातात ते जगातून नष्ट होतात. जे संतांची निंदा करतात त्यांना आकाशातून खाली फेकून दिले पाहिजे, मी संतजनांना आपल्या हृदयात धारण करतो. संतजन जीवाचा क्षणात, चुटकीसरशी उद्धार करतात. ॥ १ ॥ जे प्रभुपतीस प्रिय होतात ते संतपदास पोहोचतात. संत व गोविंद एकच काम करतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ संतांवर प्रभुकृपेचा वरदहस्त असतो. तो सदैव त्यांच्या जवळच असतो. श्वासाश्वासासह प्रत्येक क्षणी तो संतांचे रक्षण करतो. संतांचा द्वेष करणाऱ्या राजासही तो पदभ्रष्ट करतो. ॥ २ ॥ कोणीही संतांची निंदा करू नये. जो कोणी संतांची निंदा करतो त्याचे पतन होते. ज्याचे प्रभू परमात्मा रक्षण करतो त्यास सारा संसार तुच्छ वाटतो. त्याचे कोणीही काहीही वाईट करू शकत नाही. ॥ ३ ॥ त्याचा प्रभू परमात्म्यावर पूर्ण विश्वास असतो. हे शरीर, हा प्राण ही सारी त्याचीच संपत्ती आहे असे तो मानतो. नानक सांगतात, त्याच्या मनात प्रभू परमात्म्याबद्दल अपार विश्वास असतो. स्वेच्छाचारी जीव जीवनात पराभूत होतो तर गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा जीवनात सदैव विजयी होतो. ॥ ४ ॥ १६ ॥ १८ ॥

॥ गोंड महला ५ ॥

नामु निरंजनु नीरि नराइण ॥ रसना सिमरत पाप बिलाइण ॥ १ ॥ रहाउ ॥
नाराइण सभ माहि निवास ॥ नाराइण घटि घटि परगास ॥
नाराइण कहते नरकि न जाहि ॥ नाराइण सेवि सगल फल पाहि ॥ १ ॥
नाराइण मन माहि अधार ॥ नाराइण बोहिथ संसार ॥
नाराइण कहत जमु भागि पलाइण ॥ नाराइण दंत भाने डाइण ॥ २ ॥
नाराइण सद सद बखसिंद ॥ नाराइण कीने सूख अनंद ॥
नाराइण प्रगट कीनो परताप ॥ नाराइण संत को माई बाप ॥ ३ ॥
नाराइण साध संगि नाराइण ॥ बारं बार नाराइण गाइण ॥
बसतु अगोचर गुर मिलि लही ॥ नाराइण ओट नानक दास गही ॥ ४ ॥ १७ ॥ १९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६७)

शब्दार्थ : **नीरि** – पाणी. **बिलाइण** – नष्ट होते, विलय पावते. **पाहि** – प्राप्त होते. **पलाइण** – पलायन. **भनि** – तोडणे, पाडणे. **डाइण** – डाकीण. **बखसिंद** – क्षमाशील. **परताप** – प्रताप. **बसतु** – वस्तू. **लही** – प्राप्त होते. **ओट** – आश्रय. **गही** – ग्रहण केले.

भावार्थ : निरंजन प्रभूचे नाम हे शुद्ध, पवित्र जलाप्रमाणे आहे. जिव्हेद्वारा त्याचे उच्चारण केल्याने पाप लयाला जाते. ॥ १ ॥ रहाउ ॥ नारायणाचा सर्वत्र वास आहे. तो सर्वव्याप्त आहे. प्रत्येक जीवाच्या अंतरात त्या प्रभू परमात्म्याचा प्रकाश विद्यमान आहे. जो प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करतो तो कधीही नरकात जात नाही. जो नारायणाची सेवा करतो त्यास सर्व फले प्राप्त होतात. ॥ १ ॥ नारायण हा मनाचा आधार आहे. नारायणाचे नाम उच्चारताच यम पळून जातो. नारायण मायारूपी डाकिणीचे दात पाडून टाकतो. ॥ २ ॥ नारायण सदैव जीवांना क्षमा करतो. नारायण जीवास सुख व आनंद प्रदान करतो. प्रभू परमात्म्याचा प्रताप सर्वत्र पसरलेला आहे. नारायण हा संतांचा मायबाप आहे. ॥ ३ ॥ साधुसंतांच्या संगतीत सदैव प्रभुनामाचा घोष चालतो. गुरूकडून मी प्रभूनाम ही अगोचर वस्तू प्राप्त केली आहे. दास नानकाने प्रभू परमात्म्याचा आश्रय घेतला आहे. ॥ ४ ॥ १७ ॥ १९ ॥

॥ गोंड महला ५ ॥

जा कउ राखै राखणहारु ॥ तिस का अंगु करे निरंकारु ॥ १ ॥ रहाउ ॥
मात गरभ महि अगनि न जोहै ॥ कामु क्रोधु लोभु मोहु न पोहै ॥
साध संगि जपै निरंकारु ॥ निंदक कै मुहि लागै छारु ॥ १ ॥
राम कवचु दास का संनाहु ॥ दूत दुसट तिसु पोहत नाहि ॥
जो जो सरणि पइआ हरि राइ ॥ सो दासु रखिआ अपणै कंठि लाइ ।
जे को बहुतु करे अहंकारु ॥ ओहु खिन महि रूलता खाकू नालि ॥ ३ ॥
है भी साचा होवणहारु ॥ सदा सदा जाई बलिहार ॥
अपणे दास रखे किरपा धारि ॥ नानक के प्रभ प्राण अधार ॥ ४ ॥ १८ ॥ २० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६८)

शब्दार्थ : **जाकउ** – ज्या कोणास. **अंगु** – पक्ष. **निरंकारु** – निराकार प्रभू. **जोहै** – स्पर्श करणे, पाहणे. **पोहै** – पोहोचणे, स्पर्श करणे. **छारु** – राख. **कवचु** – कवच. **संनाहु** – रक्षक कवच. **पोहत** – पोहोचणे. **गरबु** – गर्व. **बहुतू** – खूप. **रूलता** – . **खाकु** – राख. **होवणहारु** – भविष्यातही असेल.

भावार्थ : तो रक्षणकर्ता प्रभू ज्याचे रक्षण करतो त्याचा तो निरंकार प्रभू कैवार घेतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ अशा जीवास मातेच्या उदरात असताना गर्भाग्नीचे दु:ख भोगावे लागत नाही. काम, क्रोध, लोभ, मोह हे विकार त्यास स्पर्शही करू शकत नाहीत. असा जीव साधुसंतांच्या संगतीत राहून निराकार प्रभूचे स्मरण करतो. अशा प्रभुसेवकाच्या निंदकाच्या मुखात मात्र राख पडते. ॥ १ ॥ प्रभुनाम हे प्रभुसेवकाचे रक्षण करणारे कवच आहे. मायेचे दुष्ट दूत त्यास स्पर्शही करू शकत नाहीत. जे जन गर्व करतात ते नष्ट होतात. पण प्रभुसेवक नम्रता धारण करून प्रभूस शरण जातात. ॥ २ ॥ जो प्रभुसेवक प्रभुपदी शरण जातो त्यास प्रभू आपल्या हृदयाशी धरून

त्याचे रक्षण करतो. जे खूप अहंकार करतात ते क्षणात मातीस मिळून राख होतात. ॥ ३ ॥ तो प्रभू पूर्वीही अस्तित्वमान होता. आजही आहे व पुढेही असणार आहे. मी सदैव त्याच्यावर माझे सर्वस्व समर्पित करतो. प्रभू आपल्या सेवकांवर कृपा करून त्याचे रक्षण करतो. प्रभू परमात्मा हा नानकाचा एकमेव प्राणाधार आहे.॥४॥१८॥२०॥

॥ गोंड महला ५ ॥

अचरज कथा महा अनूप ॥ प्रातमा पारब्रहम का रूपु ॥ रहाउ ॥
ना इहु बूढा ना इहु बाला ॥ ना इसु दूखु नही जम जाला ॥
ना इहु बिनसै ना इहु जाइ ॥ आदि जुगादी रहिआ समाइ ॥ १ ॥
ना इसु उसनु नही इसु सीतु ॥ ना इसु दुसमनु ना इसु मीतु ॥
ना इसु हरखु नही इसु सोगु ॥ सभु किछु इस का इहु करनै जोगु ॥ २ ॥
ना इसु बापु नही इसु माइआ ॥ इहु अपरंपरु होता आइआ ॥
पाप पुंन का इसु लेपु न लागै ॥ घट घट अंतरि सद ही जागै ॥ ३ ॥
तीनि गुणा इक सकति उपाइआ ॥ महा माइआ ता की है छाइआ ॥
अछल अछेद अभेद दइआल ॥ दीन दइआल सदा किरपाल ॥
ता की गति मिति कछू न पाइ ॥ नानक ता कै बलि बलि जाइ ॥ ४ ॥ १९ ॥ २१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६८)

शब्दार्थ : **अचरज** – आश्चर्यकारक. **प्रातमा** – जीवात्मा. **इहु** – हा. **बुढा** – वृद्ध. **बाला** – बालक. **बिनसै** – नाश पावणे. **जाइ** – मरण. **उसनु** – उष्ण. **सीतु** – थंड, शीतल. **दुसमन** – वैरी. **मीतु** – मित्र. **हरखु** – हर्ष. **सोगु** – शोक. **जोगु** – योग्य. **अपरपरु** – परात्पर. **आइआ** – जन्मला. **लेपु** – लेप. **तीनि गुणा** – त्रिगुण. **सकति** – शक्ती, माया. **उपाइआ** – उत्पन्न केली. **अछल** – ज्यास कोणताही छल होत नाही.

भावार्थ : प्रभू परमात्मा ही एक आश्चर्यकारक गोष्ट आहे. जीवात्मा हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. ॥ रहाउ ॥ तो कधी वृद्ध होत नाही. त्याला कधी बाल्यावस्थाही नसते. तो सर्व अवस्थांच्या पलीकडे आहे. त्याला कोणतेही दु:ख होत नाही. त्यास यम ग्रासू शकत नाही. तो कधी नाश पावत नाही वा मरतही नाही. तो युगांच्याही आधीपासून अस्तित्वमान आहे व पुढेही असणार आहे. तो सर्वत्र भरून राहिला आहे. ॥ १ ॥ तो उष्णही नाही वा थंडही नाही. त्याचा कोणी शत्रू नाही. त्याचा कोणी मित्र नाही. त्याला कशाचाही हर्ष होत नाही. कशाचा शोक होत नाही. तो ह्या सर्व द्वंद्वांच्या पलीकडे आहे. ही सारी सृष्टी त्यानेच निर्माण केली आहे. सारे काही करण्यास तोच एकमेव समर्थ आहे. ॥ २ ॥ त्याला माता नाही, पिता नाही. त्यानेच त्याला उत्पन्न केले आहे. तो स्वयंभू आहे. तो परात्पर आहे व तो सदैव तसाच राहणारा आहे. त्याला पाप, पुण्य स्पर्शही करू शकत नाहीत. तो सर्व जीवांच्या अंतरात सदैव जागृत असतो. ॥ ३ ॥ त्यानेच सत्त्व, रज, तम हे तीन गुण निर्माण केले. त्याचबरोबर एक मायाही निर्माण केली. ही मोहमाया ही त्याचीच छाया आहे. त्यास कोणीही छळू शकत नाही. तो अछेद्य व अभेद्य आहे. तो दयाळू आहे. तो सदैव दीनांवर दया करणारा, कृपा करणारा आहे. त्याची गति विधी कोणीही जाणू शकत नाही. नानक स्वत:स त्याच्या चरणी समर्पित करतो. ॥ ४ ॥ १९ ॥ २१ ॥

॥ गोंड महला ५ ॥

संतन कै बलिहारै जाउ ॥ संतन कै संगि राम गुन गाउ ॥
संत प्रसादि किलविख सभि गए ॥ संत सरणि वडभागी पए ॥ १ ॥
रामु जपत कछु बिघनु न विआपै ॥ गुरप्रसादि अपुना प्रभु जापै ॥ १ ॥ रहाउ ॥
पारब्रहमु जब होइ दइआल ॥ साधू जन की करै रवाल ॥
कामु क्रोधु इसु तन ते जाइ ॥ राम रतनु वसै मनि आइ ॥ २ ॥
सफलु जनमु तां का परवाणु ॥ परब्रहमु निकटि करि जाणु ॥
भाइ भगति प्रभ कीरतनि लागै ॥ जनम जनम का सोइआ जागै ॥ ३ ॥
चरन कमल जन का आधारु ॥ गुण गोविंद रउं सचु वापारु ॥
दास जना की मनसा पूरि ॥ नानक सुखु पावै जन धूरि ॥४॥२०॥२२॥६॥२८॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६९)

शब्दार्थ : **किलविख** – पाप. **बिघनु** – विघ्न. **जापै** – दर्शन होते, ओळख पटते. **रवाल** – चरणरज. **जाणु** – जाणणे, समजणे. **भाइ** – भाव. **सोइआ** – निद्रिस्त. **जागै** – जागृत होतो. **रउं** – स्मरण. **धूरि** – चरणधूळ.

भावार्थ : मी संतजनांच्या चरणी माझे सर्वस्व समर्पित करतो. मी संतांच्या संगतीत राहून प्रभूचे गुण गातो. संतांच्या कृपेने सर्व पाप नष्ट होते. कोणी महाभाग्यवानच संतांना शरण जातो. ॥ १ ॥ रामनामाचे स्मरण केल्याने कोणतेही विघ्न बाधा पोचवू शकत नाही. सतगुरूच्या कृपेने प्रभू परमात्म्याचे दर्शन होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ जेव्हा परब्रह्म परमात्म्याची कृपा होते, तेव्हा संतजनांचे चरणरज प्राप्त होते. ह्या देहातील काम, क्रोध आदी विकार नष्ट होतात व मनात रामरूपी रत्न वास करते. ॥ २ ॥ जो हे जाणतो की तो प्रभू परमात्मा सदैव आपल्या सोबतच आहे. त्याचा जन्म सफल होतो व तो प्रभू दरबारात स्वीकृत होतो. तो भावभक्तीने प्रभूची कीर्ती गाऊ लागतो. जन्मजन्मांतरी अज्ञानात निद्रिस्त असलेला जीव आध्यात्मिकदृष्ट्या जागृत होतो. ॥ ३ ॥ प्रभू परमात्म्याचे चरणकमल हाच ज्याचा जीवनाचा आधार आहे, सदैव प्रभुगुणांचे स्मरण हा त्याचा व्यवहार बनतो. प्रभू परमात्मा अशा प्रभू सेवकांच्या सर्व मनीषा पूर्ण करतो. अशा प्रभुसेवकांची चरणधूळ प्राप्त करून नानक सुख प्राप्त करतात.॥४॥२२॥२८॥

रागु गोंड असटपदीआ महला ५ घरु २
१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

करि नमसकार पूरे गुरदेव ॥ सफल मूरति सफल जा की सेव ॥
अंतरजामी पुरखु बिधाता ॥ आठ पहर नाम रंगि राता ॥ १ ॥
गुरु गोबिंद गुरु गोपाल ॥ अपने दास कउ राखनहार ॥ १ ॥ रहाउ ॥

पातिसाह साह उमराउ पतीआए ॥ दुसट अहंकारी मारि पचाए ॥
निंदक कै मुखि कीनो रोगु ॥ जै जैकारु करै सभु लोगु ॥ २ ॥
संतन कै मनि महा अनंदु ॥ संत जपहि गुरदेउ भगवंतु ॥
संगति के मुख ऊजल भए ॥ सगल थान निंदक के गए ॥ ३ ॥
सासि सासि जनु सदा सलाहे ॥ पारब्रहम गुर बेपरवाहे ॥
सगल भै मिटे जाकी सरनि ॥ निंदक मारि पाए सभि धरनि ॥ ४ ॥
जन की निंदा करै न कोइ ॥ जो करै सो दुखीआ होइ ॥
आठ पहर जनु एकु धिआए ॥ जमूआ ता कै निकटि न जाए ॥ ५ ॥
जन निरवैर निंदक अहंकारी ॥ जन भल मानहि निंदक वेकारी ॥
गुर कै सिखि सतिगुरू धिआइआ ॥ जन उबरे निंदक नरकि पाइआ ॥ ६ ॥
सुणि साजन मेरे मीत पिआरे ॥ सति बचन वरतहि हरि दुआरे ॥
जैसा करे सु तैसा पाए ॥ अभिमानी की जड सरपर जाए ॥ ७ ॥
नीधरिआ सतिगुर धर तेरी ॥ करि किरपा राखहु जन केरी ॥
कहु नानक तिसु गुर बलिहारी ॥ जा कै सिमरनि पैज सवारी ॥ ८ ॥ १ ॥ २९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८६९)

शब्दार्थ : पतीआए - धैर्य वाढते. पचाए - नष्ट केले. थान - स्थान. सलाहे - स्तुती करतात. बेपरवाहे - निश्चिंत. दुखिआ - दु:खी. जमुआ - जम. मानहि - इच्छितो. बेकारि - अहित, वाईट. सिखि - शिष्य. जमुआ - जम. मानहि - इच्छितो. बेकारि - अहित, वाईट. सिखि - शिष्य. उबरे - उद्धार होतो. वरतहि - व्याप्त व्यवहार होतो. जड - मूळ. सरपरजाअे - नष्ट होते. निधारिआ - निराधार. धर - आधार, आश्रय. केरि - सेवक. पैज - पत, प्रतिष्ठा.

भावार्थ : ज्या पूर्णगुरूच्या दर्शनाने जीवन सफल होते ज्याची सेवा सफल होते अशा पूर्णगुरूस माझा नमस्कार असो. पूर्णगुरु हा विधाता, कर्तापुरुष असून तो अंतर्ज्ञानी आहे. तो अष्टौप्रहर प्रभुनामात रंगून गेलेला असतो.॥१॥ गुरू हा गोविंदस्वरूप गोपालस्वरूप आहे, तो आपल्या सेवकांचे रक्षण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो राजे, महाराजे, उमराव आदींचे धैर्य वाढवतो तर दुष्ट अहंकारी लोकांना मारून नष्ट करतो. प्रभूची निंदा करणाऱ्यांच्या तोंडात किडे पडतात. सर्व लोक पूर्णगुरूचा जयजयकार करतात. ॥ २ ॥ संतजनांच्या मनात महाआनंद वास करतो. ते प्रभूरूपी गुरूचा जप करतात. संतांच्या संगतीत राहणाऱ्याचे मुख उज्ज्वल होते. तर प्रभुनिंदकांना मारून नष्ट केले जाते. त्यांना कोठेही स्थान उरत नाही. ॥ ३ ॥ प्रभूचे सेवक प्रत्येक श्वासागणिक प्रभू परमात्म्याची स्तुतिस्तोत्रे गातात. परब्रह्मस्वरूप गुरू निश्चिंत असतो. त्यास शरण गेल्याने सर्व भय नष्ट होते. गुरू निंदकांना मारून जमिनीत गाडून टाकतात. ॥ ४ ॥ प्रभुसेवकांची निंदा करू नये. जो कोणी प्रभुसेवकांची निंदा करील तो दु:खी होईल. प्रभूचे सेवक अष्टौप्रहर त्या एकमेव प्रभूचे स्मरण करतात. त्यामुळे यम त्यांच्या आसपासही फिरकत नाही. ॥ ५ ॥ प्रभुसेवक कोणाशीही वैर करत नाही. निंदक मात्र अहंकारातच लिप्त होऊन राहतात. प्रभूचे सेवक सदैव सर्वांचे भले

व्हावे असे इच्छितात तर निंदक सदैव दुसऱ्याचे वाईट व्हावे असे चिंतितात. गुरूचे शिष्य सदैव प्रभू परमात्म्याचे ध्यान करतात व त्यायोगे ते हा भवसागर पार करून जातात. त्यांचा उद्धार होतो. तर निंदक नरकात पडतात.॥६॥ हे माझ्या साजणा, माझ्या प्रिय मित्रा ! ऐक, हरीच्या द्वारी सत्यवचनच उपयोगी पडते. तू जसे कर्म करशील तसे फल प्राप्त करशील. गर्वाचे घर नेहमी खालीच असते. प्रभू गर्विष्ठास मुळासह नष्ट करतो. ॥ ७ ॥ हे सतगुरू ! निराधारांचा तूच आधार आहेस. प्रभुसेवकांवर कृपा कर व त्यांचे सदैव रक्षण कर. नानक सांगतात, सतगुरूचे स्मरण केल्यानेच माझी अब्रू वाचली आहे. मी त्या सतगुरूचरणी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ ८ ॥ १ ॥ २९ ॥

रागु गोंड बाणी भगताकी ॥
कबीर जी की घरु १

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूच्या कृपेने तो प्राप्त होतो.

संतु मिलै किछु सुनीऐ कहीऐ ॥ मिलै अंसतु मसटि करि रहीऐ ॥ १ ॥
बाबा बोलना किआ कहीऐ ॥ जैसे रामनाम रवि रहीऐ ॥ १ ॥ रहाउ ॥
संतन सिउ बोले उपकारी ॥ मूरख सिउ बोले झक मारी ॥ २ ॥
बोलत बोलत बढहि बिकारा ॥ बिनु बोले किआ करहि बीचारा ॥ ३ ॥
कहु कबीर छूछा घटु बोले ॥ भरिआ होइ सु कबहु न डोलै ॥ ४ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७०)

शब्दार्थ : संतु - संतसज्जन. मिलै - भेटले. किछु - काही. सुनिऐ - ऐकावे. कहिऐ - सांगावे. असंतु - दुष्ट, दुर्जन. मसटि - नि:शब्द, गप्प. किआ - काय. रवि रहिऐ - निमग्न राहा. झकमारी - निरर्थक उद्योग. बढहि - वाढतात. छूछा - रिकामा. भरिआ - भरलेला. सु - तो.

भावार्थ : जर तुमची संतसज्जनांशी भेट झाली तर त्यांच्याशी अवश्य चर्चा करा. त्यांचा उपदेश ऐका. त्यांना तुमच्या मनातील शंकाकुशंका विचारा. पण जर का तुमची गाठ दुष्ट दुर्जनांशी पडली तर त्यांच्याशी अजिबात बोलू नका. गप्प बसून राहा. ॥ १ ॥ अरे बाबा ! संतांपाशी जाऊन तू काय चर्चा करणार? अशी चर्चा कर की त्यामुळे तुझे चित्त रामनामात एकाग्र होऊन राहील. ॥ १ ॥ रहाउ ॥ संतसज्जनांशी वार्तालाप करणे हे नेहमीच उपकारक आहे. लाभदायक आहे. मूर्खाशी बोलणे म्हणजे झक मारणे होय. त्यापासून काहीही लाभ होत नाही.॥२॥ अती बोलल्याने मनातील विषय विकार वाढतात पण बोलल्याशिवाय विचार, मनन चिंतन तरी कसे करणार ?॥३॥ कबीर सांगतात, रिकामे मडके जास्त आवाज करते. भरलेले मडके आवाज करीत नाही. मूर्ख माणसे ही रिकाम्या घड्यासारखी असतात. पण संतसज्जन हे भरलेल्या घड्यासारखे असतात. त्यामुळे ते कमी बोलतात व ते कधीही अस्थिर होत नाहीत. त्यांचे चित्त कधीही विचलित होत नाही. ॥ ४ ॥ १ ॥

नरू मरै नरु कामि न आवै ॥ पसु मरै दस काज सवारै ॥ १ ॥
अपने करम की गति मै किआ जानउ ॥ मै किआ जानउ बाबारे ॥ १ ॥ रहाउ ॥
हाड जलै जैसे लकरी का तूला ॥ केस जले जैसे घास का पूला ॥ २ ॥
कहु कबीर, तअ ही नरु जागै ॥ जम का डंडु मूंड महि लागै ॥ ३ ॥ २ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८७०)

शब्दार्थ : **नरु** – माणूस. **मरै** – मेला. **कामि** – उपयोगी. **आवै** – येणे. **पसु** – पशु. **दस** – दहा, अनेक. **सवारै** – सावरतो, होतो. **करम** – कर्म. **किआ** – कसे काय. **जानउ** – जाणतो, जाणणार. **जले** – जळतात. **जैसे** – जसे. **लकरी** – लाकूड. **तुला** – मोळी, घास, गवताची मोळी. **पूला** – भारा, पेंडी. **तब** – तेव्हा. **जागै** – जागा होतो. **जम** – यम. **डंडू** – सोटा. **मूंड** – डोके. **महि** – मध्ये. **लागै** – लागतो.

भावार्थ : माणूस मेला तर त्याच्या शरीराचा काहीही उपयोग होत नाही पण हेच जर एखादे जनावर मेले तर त्या मेलेल्या जनावराचे अनेक उपयोग होतात. ॥ १ ॥ मी माझ्या कार्मची गती कशी काय जाणणार? अरे मला खरोखरच त्याचे काही ज्ञान नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ जशी लाकडाची मोळी जळून जाते त्याप्रमाणे मेल्यावर हाडे जळून जातात. काही काही शिल्लक उरत नाही. काहीही उपयोगाला येत नाही. ॥ २ ॥ कबीर सांगतात, माणूस तेव्हाच जागा होतो जेव्हा यमराजाचा सोटा त्याच्या डोक्यावर येऊन आदळतो. ॥ ३ ॥ २ ॥

आकासि गगनु पातालि गगनु है चहुदिसि गगनु रहाइले ॥
आनद मूलु सदा पुरखोतमु घटु बिनसै गगनु न जाइले ॥ १ ॥
मोहि बैरागु भइओ ॥ इहु जीउ जाइ कहा गइओ ॥ १ ॥ रहाउ ॥
पंच ततु मिलि काइआ कीन्ही ततु कहा ते कीनु रे ॥
करम बध तुम जीउ कहत हौ करमहि किनि जीउ दीनु रे ॥ २ ॥
हरि महि तनु है तन महि हरि है सरब निरंतरि सोइ रे ॥
कहि कबीर राम नामु न छोडउ सहजे होइ सु होइ रे ॥ ३ ॥ ३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८७०)

शब्दार्थ : आकासि – आकाश. **गगनु** – परमेश्वराची चेतनाशक्ती. **पातालि** – पाताळ. **चहु दिसि** – चारही दिशांना, सगळीकडे. **आनंद मूलु** – आनंदस्वरूप. **बिनसै** – नष्ट होते. **न जाइले** – जात नाही, नष्ट होत नाही. **मोहि** – मला. **भइआ** – झाला. **पंच** – पांच. **ततु** – तत्त्वे. **काइआ** – शरीर. **किन्ही** – कोणी. **कहाते** – कोठून, कशापासून. **करम** – कर्म. **बध** – बद्ध, बांधलेला. **दीनु** – दिले. **छोडउ** – सोडणे.

भावार्थ : आकाशात प्रभू परमात्म्याची चेतनाशक्ती विद्यमान आहे. पाताळातही तीच चेतनाशक्ती आहे. प्रभू परमात्म्यारूपी चेतनाशक्ती चारही दिशांना सर्वत्र आहे. तो प्रभू परमात्मा, ती चेतना आनंदस्वरूप आहे. शरीर नष्ट झाले तरी ती चेतनाशक्ती नष्ट होत नाही. ॥ १ ॥ हे जाणल्यावर माझ्या मनात वैराग्य उत्पन्न झाले आहे. मला प्रश्न पडला आहे की हा जीव येतो कुठून ? जातो कुठे ? ॥ १ ॥ रहाउ ॥ हे शरीर पंचतत्त्वांचे बनले

आहे. पण ही तत्त्वे कोणी निर्माण केली ? कोठून निर्माण केली ? कशापासून कशी निर्माण केली ? हा जीव कर्मबंधाने बांधला गेला आहे. पण ही कर्मे जीवाला कोणी दिली ? ॥ २ ॥ परमेश्वरानेच हे शरीर निर्माण केले आहे आणि शरीरातच परमेश्वर आहे. तो प्रभू परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे. कबीर सांगतात, हे जीवा ! तू रामनाम सोडू नकोस. जे काही घडते ते सर्व त्याच्याच इच्छेने घडते हे जाणून तू जे घडेल, जसे घडेल त्याचा अगदी सहजपणे स्वीकार कर. ॥ ३ ॥ ३ ॥

राग गौड घरू २

१ ओअंकार सतगुरु प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूच्या कृपेने तो प्राप्त होतो.

भुजा बांधि भिला करि डारिओ ॥ हसती क्रोपि मूंड महि मारिओ ॥
हसति भागि कै चीसा मारे ॥ इआ मूरति कै हउ बलिहारै ॥ १ ॥
आहि मेरे ठाकूर, तुमरा जोरु ॥ काजी बकिबो, हसती तोरु ॥ १ ॥ रहाउ ॥
रे महावत तुझु डारउ काटि ॥ इसहि तुरावहु, घालहु साटि ॥
हसति न तोरै, धरे धिआनु ॥ वा कै रिदै, बसे भगवानु ॥ २ ॥
किआ अपराधु संत है कीन्हा ॥ बांधि पोट, कुंचर कउ दीन्हा ॥
कुंचर पोट लै लै नमसकारै ॥ बूझी नही काजी अंधिआरै ॥ ३ ॥
तीनि बार पतीआ भरि लीना ॥ मन कठोरु अजहू न पतीना ॥
कहि कबीर, हमरा गोबिंदु ॥ चउथे पद महि, जन की जिंदु ॥ ४ ॥ १ ॥ ४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८७०)

शब्दार्थ : भुजा – हात, दंड. **बांधि** – बांधून. **डारिओ** – टाकले. **हसती** – हत्तीवर बसलेला माहूत. **क्रोधि** – रागाने. **मूंड** – डोके. **हसति** – हत्ती. **चीसा** – चित्कार. **इआ** – ह्या. **हउ** – मी. **बलिहारै** – समर्पित करतो. **आहि** – देवारे. **तुमरा** – तुझा. **जोरु** – शक्ती, सामर्थ्य. **बकिओ** – म्हणाला. **तुझु** – तुला. **डारऊ काटि** – तुकडे तुकडे करीन. **इसहि** – ह्याला. **तुरावह** – चालवतो. **घालहु साटि** – मारून चालव. **वाकै** – त्याच्या. **रिदै** – हृदयात. **किना** – केला. **दिना** – दिले. **कुंचरु** – हत्ती. **अंधिआरे** – अंधळा. **पतिआ** – परीक्षा. **पतीना** – विश्वास. **चउथे पद** – चौथे पद, तूर्यावस्था. **जिंदु** – जीवन, प्राण.

भावार्थ : (असे सांगतात की एकदा बनारसमध्ये शिकंदर लादीने कबीराला हत्तीच्या पायी चिरडून मारण्याचा हुकूम फर्मावला तेव्हाचे हे वर्णन आहे.) कबीर सांगतात – माझे हातपाय बांधून, माझी गठडी वळून मला हत्तीच्या पुढे टाकले. माहुताने रागाने हत्तीच्या मस्तकावर अंकुशाचा प्रहार केला. हत्ती चित्कारत सैरावैरा धावत जणू ओरडून सांगत होता. ''की ह्या मूर्तीवर (कबीरावर) मी माझा जीव समर्पित करतो.'' ॥ १ ॥ तिकडे काजी जोरजोराने सांगत होता, ''घाला, हत्ती कबीराच्या अंगावर घाला'' पण हत्ती जागचा हलत नव्हता. सारे परमेश्वराचे सामर्थ्य. कबीर सांगतात, हे परमेश्वरा मला एकमेव तुझाच आधार आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ काजी

रागाने माहुतास सांगतो. जर तू हत्तीला कबीराच्या अंगावर चाल करून जाण्यास बाध्य करू शकला नाहीस तर तुझे तुकडे तुकडे करीन. पण माहुताने कितीही प्रयत्न केले तरी हत्ती जागचा मुळीच हलेना. जणू तो ध्यान लावून बसला आहे. जणू काही या हत्तीच्या हृदयात प्रत्यक्ष प्रभू परमात्मा वास करीत होता. ॥ २ ॥ तो हत्ती जणू काजीला विचारीत होता– ''ह्या संताने असा कोणता अपराध केला आहे. की त्याची तुम्ही गठडी वळून त्याला हत्तीपायी मारण्याची शिक्षा देत आहात ?'' तो हत्ती मला (कबीराला) वारंवार नमस्कार करीत होता पण सत्तामदाने अंध झालेल्या त्या काजीस मात्र हे समजत नव्हते. ॥ ३ ॥ अशा रीतीने माझी तीन वेळा परीक्षा घेण्यात आली. तिन्ही वेळा हत्तीने मला (कबीराला) तुडविण्याचे नाकारले. पण अजूनही तो पाषाण हृदयी काजी संतुष्ट झाला नाही. ज्याच्यावर परमेश्वराची कृपा आहे त्यास कोणीही मारू शकत नाही. परमेश्वर आपल्या भक्ताची रक्षा स्वत: करतो. कबीर सांगतात, की माझा गोविंद, तो प्रभू परमात्मा, तोच माझा एकमेव रक्षणकर्ता आहे. मी चतुर्थावस्थेस– तूर्यावस्थेस पोहोचलो आहे. ही अवस्था हेच खरे जीवन. ॥ ४ ॥ १ ॥ ४ ॥

ना इहू मानसु ना इहु देउ ॥ ना इहू जती कहावै सेउ ॥
ना इहु जोगी ना अवधूता ॥ ना इसु माइ न काहु पूता ॥ १ ॥
इआ मंदर माहि कौन बसाई ॥ ता का अंतु न कोऊ पाई ॥ १ ॥ रहाउ ॥
ना इहु गिरही ना ओदासी ॥ ना इहु राज न भीख मंगासी ॥
ना इसु पिंडु न रकतू राती ॥ ना इहु ब्रहमनु ना इहु खाती ॥ २ ॥
ना इहु तपा कहावै सेखु ॥ ना इहु जीवै न मरता देखु ॥
इसु मरते कउ जे कोऊ रोवै ॥ जो रोवै सोइ पति खोवै ॥ ३ ॥
गुर प्रसादि मै डगरो पाइआ ॥ जीवन मरनु दोऊ मिटवाइआ ॥
कहु कबीर इहु राम की अंसु ॥ जस कागद पर मिटै न मंसु ॥ ४ ॥ २ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७१)

शब्दार्थ : इहु – हा. देउ – देव. **जती** – यती. **सेउ** – शिव. **जोगी** – योगी. **अवधूत** – संन्यासी. **माइ** – आई. **पूता** – पुत्र. गिरही – संसारी गृहस्थ. **ओदासी** – उदासी. **मंगासी** – मागणारा. **भीख मांगासी** – भिकारी. **पिंडु** – शरीर. **रकतु** – रक्त. **राती** – रत्तीभर, कणभर. **ब्रहमनु** – ब्राह्मण. **खाती** – क्षत्रिय. **तपा** – तपस्वी. **सेखु** – शेख. जीवै – जन्मास देतो. **इसु** – ह्याला. **मरते** – मृत. **कोउ** – कोणी. **रौवै** – रडतात. **खोवै** – घालवतो. **डगरो** – मार्ग, रस्ता. **असु** – अंश. **मंसु** – शाई. **मिटै** – नष्ट होणे, पुसले जाणे.

भावार्थ : मी म्हणजे कोण हे सांगताना कबीर सांगतात. हा **देह** म्हणजे माणूस नव्हे वा देवही नव्हे. हा यती नाही किंवा कोणी शैव नाही. तो योगी नाही वा विरागी नाही. ह्याला कोणी माता नाही किंवा हा कोणाचा पुत्रही नाही. ॥ १ ॥ हे बंधू ! ह्या शरीररूपी मंदिरात कोण राहतो ? त्याचा कोणालाच अंत लागत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो संसारी गृहस्थ नाही किंवा तो विरक्तही नाही. तो राजा नाही की रंकही नाही. तो शरीरही नाही किंवा रक्तही नाही, तो ब्राह्मण नाही, क्षत्रियही नाही. तो कोणी तपी नाही वा कोणी शेख नाही. त्याला कोणी जन्मताना पाहिलेले नाही, कोणी मरताना पाहिलेले नाही. तो जन्मतही नाही किंवा मरतही नाही. जो मेला म्हणून रडत बसतो तो

अडाणीच होय. ॥ ३ ॥ सतगुरुकृपेने मला मार्ग सापडला व त्यामुळे माझी जन्ममरणाच्या चक्रातून सुटका झाली. कबीर सांगतात, माणूस हा खरोखरी रामाचा, त्या प्रभू परमात्म्याचाच अंश आहे. जसे कागदावर शाईने लिहिले की ते पुसता येत नाही, तसेच हे त्रिकालाबाधित सत्य आहे, की प्रत्येक जीव हा त्या प्रभू परमात्म्याचा अंश आहे. परमात्म्याचेच रूप आहे. ॥ ४ ॥ २ ॥ ५ ॥

तुटे तागे निखुटी पानि ॥ दुआर ऊपरि झिलकावहि कान ॥
कूच बिचारे फूए फाल ॥ इआ मुंडीआ सिरि चढिबो काल ॥ १ ॥
इहु मुंडीआ सगलो द्रबु खोई ॥ आवत जात नाक सर होई ॥ १ ॥ रहाउ ॥
तुरी नारि की छोडी बाता ॥ राम नाम वा का मनु राता ॥
लरिकी लरिकन खैबो नाहि ॥ मुंडीआ अनदिनु धापे जाहि ॥ २ ॥
इक दुइ मंदरि इक दुइ बाट ॥ हम कउ साथरु उन कउ खाट ॥
मूड पलोसि कमर बधि पोथी ॥ हम कउ चाबनु उन कउ रोटी ॥ ३ ॥
मुंडीआ मुंडीआ हुए एक ॥ ए मुंडीआ बूडत की टेक ॥
सुनि अंधली लोई बेपीरि ॥ इन्ह मुंडिअन भजि सरनि कबीर ॥ ४ ॥ ३ ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७१)

शब्दार्थ : **तागे** – धागे. **निखुटी** – संपत्ती. **पानि** – खळ. **दुआर** – दार. **झिलकावहि** – चमकत आहे. **कूच** – केस. **फुए फाळ** – अस्ताव्यस्त झाले आहेत. **मुंडीआ** – मुलगा, पोरगा. **सिर** – डोके. **सगलो** – सगळे. **द्रबु** – द्रव्य. **धन खोई** – घालवले. **नाकसर होई** – नाकी नऊ आले आहे. **तुरी** – विणलेले कापड गुंडाळण्याचे रीळ. **नारि** – नळी. **लरिकी लरिकन** – पोरेबाळे. **खैबो नाही** – खायला अन्न नाही. **अनदिनु** – दररोज. **धापै** – तृप्त होऊन. **जाहि** – जातात. **साथरु** – भूमिशय्या. **उन कउ** – त्यांना. **खाट** – बाज, पलंग. **चाबनु** – चणे. **बेपीरि** – गुरुहीन. **लोइ** – कबीराची पत्नी.

भावार्थ : कबीर साधुसंतांची सेवा करण्यात मग्न होत असे, त्यामुळे त्यांचे प्रपंचाकडे दुर्लक्ष होत असे. त्यामुळे आबाळ होत असे. त्यामुळे वैतागून जाऊन कबीराची आई म्हणते– ह्या मुलाने तर सर्व कामधंदा सोडून दिला आहे. मागावर चढवलेल्या ताणाबाण्याची खळ निघून गेल्याने त्याचे धागे तुटले आहेत. त्यामुळे दारातला माग कलाहीन झाला आहे. ह्या मुलाने तर कामधंद्याकडे दुर्लक्षच केले आहे व आपल्या पोराबाळांकडेही दुर्लक्ष केले आहे. ॥ १ ॥ आपले सगळे धन त्याच्याकडे येणाऱ्या जाणाऱ्या साधुसंतांच्या सरबराईवर उधळून टाकले आहे. ह्या येणाऱ्या–जाणाऱ्या साधूंनी तर नाकी नऊ आणले आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ ह्या पोराने आपली विणकराची सर्व कामे सोडूनच दिली आहेत. सदैव रामनामातच रंगून गेला आहे. इकडे आपल्या पोराबाळांना खायला काही नाही आणि ह्याच्याकडे येणारे साधुसंन्याशी मात्र पोटभर जेवून तृप्त होऊन जात आहेत. ॥ २ ॥ सदैव एकदोन साधु घरी मुक्कामास असतात तर दुसरे एक दोन साधू घराकडे येणारी वाट चालत असतात. घरच्या लोकांना जमिनीवर झोपावे लागते तर येणारे साधू मात्र पलंगावर झोपतात. हे साधू कमरेला पोथी बांधून डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद देतात. त्यांना सुग्रास जेवण मिळते पण आम्हाला मात्र चणे फुटाणे खाऊन भूक भागवावी लागते. ॥ ३ ॥ कबीर

सांगतात, हे सगळे साधूजन वेगवेगळे दिसत असले तरी ते अंतरी एकच आहेत. तेच आपल्या बुडत्या जीवनाचा आधार आहेत. तुम्ही मायामोहाने अंध झाले आहात. त्यामुळे तुम्हाला अद्याप सतगुरू प्राप्त झालेला नाही. माझे ऐका, ह्या साधुसंतांना शरण जा. त्यांची सेवा करा. ॥ ४ ॥ ३ ॥ ६ ॥

खसमु मरै तउ नारि न रोवै ॥ उसु रखवारा अउरो होवै ॥
रखवारे का होइ बिनास ॥ आगै नरकु इहा भोग बिलास ॥ १ ॥
एक सुहागनि जगत पिआरी ॥ सगले जीव जंत की नारी ॥ १ ॥ रहाउ ॥
सोहागनि गलि सोहै हारु ॥ संतकउ बिखु बिगसै संसारु ॥
करि सीगारु बहै पखिआरी ॥ संत की ठीठकी फिरै बिचारी ॥ २ ॥
संत भागि ओह पाछै परै ॥ गुर परसादी मारहु डरै ॥
साकत की ओह पिंड पराइणि ॥ कहकउ दिसटि परै त्रखि डाइणि ॥ ३ ॥
हम तिस का बहु जानिआ भेउ ॥ जब हूए क्रिपाल मिले गुरदेउ ॥
कहु कबीर अब बाहरि परी ॥ संसारै कै अंचलि लरी ॥ ४ ॥ ४ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७१)

शब्दार्थ : **खसमु** – पती, स्वामी, परमेश्वर. **मरै** – मरतो. **तउ** – तेव्हा. **रोवै** – रडते. **उसु** – तिचा. **रखवार** – रक्षक. **बिनास** – विनाश. **आगै** – परलोकात. **इहा** – येथे, जगात. **सुहागनि** – माया, स्त्री. **पिआरी** – प्रिय, आवडती. **सोहै** – शोभतो. **हारु** – हार. **बिगसै** – प्रसन्न होते. **बहै** – बसते. **सिगारु** – शृंगार. **पखिआरी** – वेश्या. **ठिठकी** – धिक्कारली गेलेली, तिरस्कारित. **ओह** – ती. **साकत** – शाक्त. **पराइणि** – प्राणप्रिय. **द्रिसटि** – दृष्टी. **त्रखिडाइणि** – रक्ताचा घोट घेण्यासाठी वखवखलेली डाकीण. **जानिआ** – जाणले. **तिस** – तिचे. **भेउ** – भेद, दुष्टपणा. **जब** – जेव्हा. **मिले** – प्राप्त झाले. **बाहरि परि** – बाहेर पडली.

भावार्थ : ह्या जगात माणूस मायेला आपली स्वामिनी मानून तिच्यावर प्रेम करतो. पण तो माणूस मेला की मायेला मात्र जरासुद्धा दु:ख होत नाही. ती रडत बसत नाही. लगेच दुसऱ्या माणसाला आपल्या पाशात जखडते. अशा रीतीने तिच्याशी रममाण होणाऱ्या सर्वांचा विनाश होतो. ते इहलोकात मायेच्या संगतीत भोग विलासात दंग असतात पण परलोकात मात्र नरक यातना भोगतात. ॥ १ ॥ ही माया जगातल्या सर्वच माणसांना प्रिय असते. प्रत्येकासच ती आपलीच पत्नी आहे असे वाटते व ते मायेत रममाण होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ पण ही माया संतसज्जनांना मात्र विषसमान वाटते. त्यांना माहीत असते की माया साऱ्या संसाराचा नाश करणारी आहे. ही माया माणसांना मोहविण्यासाठी वेश्येप्रमाणे नाना तऱ्हेचा शृंगार करून दारात बसते. ॥ २ ॥ संतसज्जन मात्र मायेचा तिरस्कार करतात. तिला तुच्छ लेखतात. पण तरीही ती संतांचा पिच्छा सोडीत नाही. पण संतांना गुरू प्राप्त झाला असल्याने आपणास मार खावा लागेल म्हणून ती भीत असते. शाक्त लोकांना मात्र ही माया प्राणप्रिय वाटते. पण आमच्या दृष्टीने मात्र ती माया रक्ताला चटावलेल्या डाकिणीसारखी वाटते. ॥ ३ ॥ आम्हाला प्रभू परमात्म्याच्या कृपेने सतगुरू प्राप्त झाला आहे. त्यामुळे मायेच्या लोकांना भुलविण्याच्या साऱ्या युक्त्या प्रयुक्त्या

मला माहीत झाल्या आहेत. कबीर सांगतात, जगातील लोकांना अजून ही माया मोहवीत आहे पण माझ्यापासूनच मात्र ती दूर दूर निघून गेली आहे. ॥ ४ ॥ ४ ॥ ७ ॥

ग्रिहि सोभा जा कै रे नाहि ॥ आवत पहीआ खूधे जाहि ॥
वा कै अंतरि नहि संतोखु ॥ बिनु सोहागनि लागै दोखु ॥ १ ॥
धनु सोहागनि महा पवीत ॥ तपे तपीसर डोले चीत ॥ १ ॥ रहाउ ॥
सोहागनि किरपन की पूती ॥ सेवक तजि जगत सिउ सूती ॥
साधु कै ठाढी दरबारि ॥ सरनि तेरी मोकउ निसतारि ॥ २ ॥
सोहागनि है अति सुंदरी ॥ पग नेवर छनक छनहरी ॥
जउ लगु प्रान तउ लगु संगे ॥ नाहि त चली बेगि उठी नंगे ॥ ३ ॥
सोहागनि भवन त्रै लीआ ॥ दसअठ पुराण तीरथ रस कीआ ॥
ब्रह्मा बिनसु महेसर बेधे ॥ बडे भूपति राजे है छेधे ॥ ४ ॥
सोहागनि उरवारि न पारि ॥ पांच नारद कै संग बिघवारि ॥
पांच नारद के मिटवे फूटे ॥ कहु कबीर गुर किरपा छुटे ॥ ५ ॥ ५ ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७२)

शब्दार्थ : **सोभा** – शोभा. **आवत** – आलेला. **पहिआ** – पाहुणा. **खूधे** – उपाशी, अर्धपोटी. **जाहि** – जातात. **बिनु** – विना. **सोहागनि** – माया. **दोखु** – दोष. **धनु** – धन्य. **किरपन** – कृपण, कंजूष, चिकू. **सेवक** – परमेश्वराचे भक्त. **तजि** – सोडून. **सिउ** – बरोबर. **सूती** – झोपते, रममाण होते. **पवीत** – पवित्र. **ठाढी** – उभी राहते. **नेवर** – नूपुर, पैंजण. **जउलगु** – जोपर्यंत. **तउलगु** – तोपर्यंत. **नाहि** – प्राण नाहीसे झाल्यावर, मेल्यावर. **बेगी** – चटकन. **बेगि उठी** – उठून जाते, निघून जाते, सोडून जाते. **दसअठ** – अठरा. **बेधे** – बळी पडले, विद्ध झाले, छेदले, मारले. **उरवारि न पारि** – अंत नाही, पारावार नाही. **पांच** – पाच ज्ञानेंद्रिये. **बिधवारि** – एकरूप. **मिटवै** – मातीचे भांडे. **फुटै** – फुटले.

भावार्थ : ज्याच्या घरी धनसंपत्ती नाही अशा गरिबाच्या घरी आलेला पाहुणा उपाशी पोटीच निघून जातो. त्यामुळे त्या गरिबासही वाईट वाटते. आपल्याजवळ पैसा नसल्याने आपण आलेल्या अतिथीचे नीट स्वागत करू शकलो नाही, आपण आपला गृहस्थधर्म पाळू शकलो नाही ह्याचे त्यास वाईट वाटते. ॥ १ ॥ ही माया धन्य आहे, महापवित्र आहे ! हिच्यामुळे अनेक योगी, तपस्वींचे चित्त विचलित हेऊन ते पथभ्रष्ट झाले आहेत. ॥ १ ॥रहाउ॥ ही माया कृपणाची पुत्री होऊन राहते. प्रभू परमात्म्याच्या सेवकांशिवाय अन्य साऱ्या लोकांना तिने आपल्या प्रभावाने वश केले आहे. ही माया साधुसंतांच्या दारात उभी राहून सांगत असते की मी तुम्हास शरण आले आहे. मला वाचवा. माझा उद्धार करा. ॥ २ ॥ ही माया अत्यंत रूपवती आहे. तिच्या पायातील पैंजण छनछन करून सगळ्यांना आपल्याकडे आकृष्ट करत असतात. माणसाच्या शरीरात प्राण आहे तोपर्यंत ही माया त्याला चिकटून राहते. पण प्राण गेले की लगोलग त्याला सोडून जाते. ॥ ३ ॥ ह्या मायेने सगळ्या त्रिभुवनाला व्यापले आहे. अठरा पुराणे पाठ करणाऱ्यांना, तीर्थयात्रा करणाऱ्यांनाही तिने आपल्या नादी लावले आहे. एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष ब्रह्मदेव,

विष्णू, महेश्वर देखील हिच्या तावडीतून सुटले नाहीत, मायेने त्यांनाही वेढून टाकले आहे. मोठमोठ्या बलशाली चक्रवर्ती राजांनाही हिने आपल्या नादी लावले आहे. ॥ ४ ॥ ह्या मायेच्या सामर्थ्याला ना आर ना पार, सर्व पंच ज्ञानेंद्रिये ही हिच्याच आधीन राहतात. पण केव्हा ना केव्हातरी मायेचे हे मायावी रूप उघडे पडतेच. कबीर सांगतात. सतगुरूच्या कृपेने मी मात्र ह्या मायेच्या प्रभावातून मुक्त झालो आहेत. ॥५॥५॥८॥

जैसे मंदर महि बलहर ना ठहरै ॥ नाम बिना कैसे पारि उतरै ॥
कुंभ बिना जलु न टिकावै ॥ साधु बिनु ऐसे अबगतु जावै ॥ १ ॥
जारउ तिसै जु रामु न चेतै ॥ तन मन रमत रहै महि खेतै ॥ १ ॥ रहाउ ॥
जैसे हलहर बिना जिमि नही बोईऐ ॥ सूत बिना कैसे मणी परोईऐ ॥
घुंडी बिनु किआ गंठि चढ़ाईऐ ॥ साधु बिनु तैसे अबगतु जाईऐ ॥ २ ॥
जैसे माता पिता बिनु बालु न होई ॥ बिंब बिना कैसे कपरे धोई ॥
घोर बिना कैसे असवार ॥ साधु बिनु नाही दरवार ॥ ३ ॥
जैसे बाजे बिनु नही लीजै फेरी ॥ खसमि दुहागनि तजि अउहेरी ॥
कहै कबीर एकै करि करना ॥ गुरमुखि होइ बहुरि नही मरना ॥ ४ ॥ ६ ॥ ९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७२)

शब्दार्थ : बलहर – मेढ. मंदर – घर. टिकावै – टिकणे, धरून ठेवणे. अबगतु – अधोगती, अवनती. जराउ – जाळून टाका. खेतै – शरीर. हलहर – शेतकरी. जिमी – जमीन. बोइऐ – पेरणी करणे. घुंडी– गाठ. बिंब – पाणी. घोर – घोडा. असवार – स्वार. फेरी – नाच, फेर. खसमि – प्रभू. दुहागनि – दुष्ट बुद्धी, दुर्विचार. अउहेरी – अव्हेर, तिरस्कृत. एकै – एकमेव प्रभू परमात्मा. बहुरि – परत.

भावार्थ : ज्याप्रमाणे मधल्या मेढीशिवाय घर उभे राहत नाही. त्याचप्रमाणे प्रभुनामाशिवाय हा भवसागर तरून जाता येत नाही. मडक्याशिवाय पाणी धरून ठेवता येत नाही. त्याप्रमाणेच गुरू व संतसंगतीशिवाय जीवाला गती नाही. ॥ १ ॥ ज्या जीवाच्या चित्तात रामनाम नाही, जो केवळ तनमनाचे लाड करण्यातच जन्म घालवत आहे असा जीव जाळूनच टाकावा. ॥ १ ॥ रहाउ ॥ शेतकऱ्याशिवाय जमिनीची पेरणी होत नाही, दोऱ्याशिवाय मणी ओवता येत नाहीत. जोर लावून रस्सी आवळल्याशिवाय गठडी बांधता येत नाही, तसेच संतसज्जनांच्या संगतीशिवाय जीवाला ज्ञान प्राप्त होत नाही. ॥ २ ॥ माता, पित्याशिवाय मूल जन्म घेत नाही, पाण्याशिवाय कपडे धुता येत नाहीत. घोड्याशिवाय घोडेस्वार असू शकत नाही. त्याचप्रमाणे संतसज्जनांच्या संगतीशिवाय, सतगुरूशिवाय प्रभू परमात्म्याच्या दरबारात स्थान प्राप्त होत नाही. ॥ ३ ॥ जसे वाद्यांच्या आधाराशिवाय फेर धरून नाचता येत नाही. त्याचप्रमाणे, दुर्गुणांचा त्याग केल्याशिवाय पतीप्रभूची प्राप्ती होत नाही. कबीर सांगतात, त्या एकमेव प्रभू परमात्म्याचा आश्रय घ्या. सत्गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून मरणावर मात करा.॥४॥६॥९॥

कूटनु सोइ जो मन कउ कूटै ॥ मन कूटै तउ जम ते छूटै ॥
कुटि कुटि मनु कसवटी लावै ॥ सो कूटनु मुकति बहु पावै ॥ १ ॥

कूटनु किसै कहहु संसार ॥ सगल बोलन के माहि बीचार ॥ १ ॥ रहाउ ॥
नाचनु सोइ जु मन सिउ नाचै ॥ झूठि न पतीऐ परचै साचै ॥
इसु मन आगे पूरै ताल ॥ इसु नाचन के मन रखवाल ॥ २ ॥
बजारी सो जु बजारहि सोधै ॥ पांच पलीतह कउ परबोधै ॥
नउ नाइक की भगति पछानै ॥ सो बाजारी हम गुर माने ॥ ३ ॥
तसकरु सोइ जि ताति न करै ॥ इंद्री कै जतनि नामु उचरै ॥
कहु कबीर हम ऐसे लखन ॥ धंनु गुर देव अति रूप बिचखन ॥ ४ ॥ ७ ॥ १० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७०)

शब्दार्थ : कूटनु – बत्ता. कूटै – कुटते. कसवटी – कसोटी, परीक्षा. किसै – कशाला. कहहु – म्हणतात. सगल – सगळे. बोलन – बोलणे. बीचार – विचार. नाचनु – नाचणे, नृत्य. पतीऐ – विश्वास ठेवणे. साचै – सत्य. इसु – ह्या. रखवाल – राखणहार, रक्षक. बजारी – सफाई कामगार. बजारहि – बाजारात. सोधै – शोधतो. पांच – पाच ज्ञानेंद्रिये. पलीत – अपवित्र. परबोधै – ओळखतो. तसकरु – तस्कर, चोर. ताति – ईर्षा. इंद्रि – इंद्रिये. लखन – लक्षण. बिचखन – विलक्षण.

भावार्थ : ज्याप्रमाणे बत्ता एखाद्या वस्तूचा कुटून भुगा करतो त्याप्रमाणे भक्ताने आपल्या मनाचे वारंवार दमन करून, मनात चाललेल्या संकल्प-विकल्पांचा चुरा करून टाकल्याने तो यमाच्या तावडीतून सुटतो. वारंवार मनाचे दमन करून सदसद्विवेकाच्या कसोटीवर त्याची पारख केल्याने भक्त मुक्ती प्राप्त करतो. ॥ १ ॥ ह्या संसारात अनेक लोक अनेक प्रकारे बोलत असतात. त्यांच्या मनात एक अर्थ असतो तर ऐकणारा भलताच अर्थ घेत असतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ चांगला नर्तक तोच की जो आपल्या मनाला आपल्या इच्छेप्रमाणे आपल्या इशाऱ्यावर नाचायला लावतो. मनाच्या इशाऱ्यावर नव्हे. त्याला खोटेपणा मुळीच आवडत नाही. त्याचा सत्यावर विश्वास असतो. असा नर्तक मनाला आध्यात्मिक भावात लीन करतो. अशा नर्तकाच्या मनाचे मायेच्या संकल्प विकल्यापासून तो प्रभू परमात्मा स्वत: रक्षण करतो. ॥ २ ॥ खरा सफाई कामगार तोच, की जो आपल्या इंद्रियांना काबूत ठेवतो. आपल्या पंचेंद्रियांची मलिनता धुवून त्यांचे प्रबोधन करून नवखंड पृथ्वीचा मालक जो प्रभू परमात्मा त्याला ओळखतो. असा सफाई कामगार मला महापुरुषासमान आहे. ॥ ३ ॥ खरा तस्कर तो, की जो ईर्षा करीत नाही. प्रयत्नपूर्वक आपल्या ज्ञानेंद्रियांना प्रभू परमात्म्याच्या प्रभुनामाकडे वळवतो. कबीर म्हणतात, अशा लक्षणांनी युक्त जीव अतिसुंदर, अति विलक्षण बुद्धिमान असतो व तोच अत्यंत योग्य गुरू असतो. ॥ ४ ॥ ७ ॥ १० ॥

धंनु गुपाल धंनु गुरु देव ॥ धंनु अनादि भूखे कवलु टहकेव ॥
धनु ओइ संत जिन ऐसी जानी ॥ तिन कउ मिलिबो सारिंगपानी ॥ १ ॥
आदि पुरख ते होइ अनादि ॥ जपीऐ नामु अंन कै सादि ॥ १ ॥ रहाउ ॥
जपीऐ नामु जपीऐ अंनु ॥ अंभै के संगि नीका वंनु ॥
अंनै बाहरि जो नर होवहि ॥ तीनि भवन महि अपनी खोवहि ॥ २ ॥

छोडहि अंनु करहि पाखंड ॥ ना सोहागनि ना ओहि रंड ॥
जग महि बकते दूधाधारी ॥ गुपती खावहि वटिका सारी ॥ ३ ॥
अंनै बिना न होइ सुकालु ॥ तजिऐ अंनि न मिलै गुपालु ॥
कहु कबीर हम अैसे जानिआ ॥ धंनु अनादि ठाकुर मनु मानिआ ॥ ४ ॥ ८ ॥ ११ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७३)

शब्दार्थ : **धंनु** – धन्य. **अनादि** – अन्न आदी, भोजनाचे पदार्थ. **टहकेव** – प्रफुल्लित होते. **कवलु** – हृदय. **ओइ** – ते. **जिन** – ज्यांनी. **तिन** – त्यांना. **मिलिबो** – प्राप्त होते. **सारिंगपाणी** – शारंगपाणी, प्रभू परमात्मा. **आदिपुरख** – आदिपुरुष, प्रभू. ते – पासून. **सादि** – स्वाद. **अंभै** – पाणी. **नीका** – चांगला. **वंनु** – सुंदर. **बाहरि होवेहि** – टाकून देतो, त्याग करतो. **खोवहि** – घालवतो. **रंड** – विधवा. **बकते** – म्हणतात. **दुधाधारी** – केवळ दुधाचा आहार घेणारा. **गुपती** – गुपचूपपणे, गुप्तपणे. **वटिका** – पाच शेराचे माप. **सुकालु** – चांगले दिवस, शांतता. **तजिऐ** – सोडून. **जाणिआ** – जाणले.

भावार्थ : हे माझ्या प्रभो, माझ्या गुरुदेवा ! आपण धन्य आहात. ज्याच्या सेवनाने भुकेलेल्याचे वदनकमळ फुलते ते अन्नही तुझेच रूप आहे. ते अन्नही धन्य आहे. हे ज्यांनी जाणले ते संतजनही धन्य आहेत. त्यांना शारंगपाणी – तो प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ १ ॥ अन्नादी खाद्यपदार्थ, ज्यांच्यामुळे जीवाचे भरण पोषण होते, ते सर्व त्या अनादी प्रभू परमात्म्यानेच उत्पन्न केले आहेत. त्या अन्नाच्या स्वादाइतकेच प्रभू परमात्म्याचे नामही गोड आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! अन्न आणि प्रभूचे नाम दोन्ही बरोबर चालले पाहिजे. जसे कोणत्याही वस्तूची रुचि पाण्याच्या घोटागणिक वाढते, त्याप्रमाणे अन्नाच्या प्रत्येक घासागणिक प्रभू परमात्म्याचा नामजप कर म्हणजे त्याची गोडी वाढेल. जो अन्नाचा त्याग करतो, तो तीनही लोकात आपली प्रतिष्ठा घालवून बसतो. ॥२॥ जो अन्नत्याग करतो तो ढोंगी होय. तो धड सुवासिनीही नाही आणि विधवाही नाही. तो अन्नत्याग केल्याचे सोंग आणतो. पण त्याची अन्नावरची वासना मात्र कमी झालेली नसते. तो आपण दुधाचेच सेवन करतो, अन्न घेत नाही असा टेंभा मिरवतो पण आत जाऊन पाचशेर अन्न गिळतो. असा हा ढोंगी दुधाहारी बाबा ! अन्नाशिवाय जीवास सुख नाही. अन्नाचा त्याग करून उपास करून प्रभू परमात्मा प्राप्त होत नाही. कबीर सांगतात की मी हे जाणले आहे की अन्न हे परमेश्वराचे रूप आहे. अन्नरूपी परब्रह्म धन्य होय ! ॥ ४ ॥ ८ ॥ ११ ॥

राग गोंड (गौड) बाणी नामदेउ जी की घरु १

॥ १ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरु कृपेने तो प्राप्त होतो.

असुमेध जगने ॥ तुला पुरख दाने ॥ प्राग इसनाने ॥ १ ॥
तउ न पुजहि हरि कीरति नामा ॥ अपुने रामहि भजु रे ॥ मन आलसीआ ॥१॥रहाउ॥
गइआ पिंडु भरता ॥ बनारसि असि बसता ॥ मुखि बेद चतुर पड़ता ॥ २ ॥
सगल धरम अछिता ॥ गुर गिआन इंद्रि द्रिडता ॥ खटु करम सहित रहता ॥ ३ ॥

सिवा सकति संबादं ॥ मन छोडि छोडि सगल भेदं ॥
सिमरि सिमरि गोबिंदं ॥ भजु नामा तरसि भव सिंधं ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८७३)

शब्दार्थ : **असुमेघ जग** – अश्वमेध यज्ञ. **तुला** – सुवर्णतुला. **प्राग** – प्रयाग. **आलसिआ** – आळशी माणसा. **बसता**– राहतोस. **चतुर** – चार. **पडता** – वाचलेस. **आछिता** – एकत्र. **इंद्रिद्रिडता** – इंद्रियांवर ताबा मिळवला. **खटु करम** – सहा कर्मे; (विद्या शिकणे, शिकवणे; यज्ञ करणे, करवणे; दान देणे, देवविणे; ही सहा कर्मे). **सिवा सकति संबाद** – शिव–शक्ती संवाद ही पोथी. **भवसिंध** – भवसागर, संसारसागर. **तरसि** – तरशील, पार होशील.

भावार्थ : हे प्राण्या ! तू अश्वमेध यज्ञ केलास, सुवर्णतुला करून ते भारंभार सोने दान केलेस, प्रयाग क्षेत्रात जाऊन गंगास्नान केलेस तरी हरिनामाची सर काही त्याला येणार नाही. ॥ १ ॥ अरे आळशी मना ! तू आपल्या प्रभुरामाचे नामस्मरण कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ गयेला जाऊन पिंडदान केलेस, काशी क्षेत्रात जाऊन राहिलास, तोंडाने चारही वेदांचे पठण केलेस ॥ २ ॥ सगळी षटकर्मे केलीस, तरी हे सर्व निरर्थक आहे. हे मना ! शिव व शक्ती संवाद ह्या पोथीचे वाचन करणे त्यावर चर्चा करणे वा अन्य भेदाभेदांविषयी विचार करणे सोडून दे. नामदेव सांगतात, तू गोविंदाचे स्मरण कर. त्याचेच भजन कर. त्यानेच तू हा भवसागर तरून जाशील. ॥ ४ ॥ १ ॥

नाद भ्रमे जैसे मिरगाए ॥ प्रान तजे वा को धिआनु न जाए ॥ १ ॥
ऐसे रामा ऐसे हेरउ ॥ राम छोढि चितु अनत न फेरउ ॥ १ ॥ रहाउ ॥
जिउ मीना हेरै पसूआरा ॥ सोना गढते हिरै सुनारा ॥ २ ॥
जिउ बिखई हेरै पर नारी ॥ कउडा डारत हिरै जुआरी ॥ ३ ॥
जह जह देखउ तह तह रामा ॥ हरि के चरन तिन धिआवै नामा ॥ ४ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७३)

शब्दार्थ : **भ्रमे** – पाळतो. **मिरगाए** – हरिण. **हेरउ** – पाहतो. **अनत** – अन्यत्र. **फेरउ** – फिरतो. **मिना** – मासे. **पसुआरा** – कोळी. **हिरै** – पाहतो. **बिखई** – विषयासक्त. **कउडा** – कवड्या. **डारत** – टाकून. **जुआरी** – जुगारी.

भावार्थ : ज्याप्रमाणे आवाजाला भुलून हरिण त्या दिशेने प्राण जाईपर्यंत धावत सुटते. ॥ १ ॥ त्याप्रमाणे मी माझ्या मनास प्रभुनामाशिवाय अन्यत्र कोठेही भटकू देत नाही. माझ्या मनात रामाशिवाय अन्य काहीही नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याप्रमाणे कोळी माशांकडे एकाग्र नजरेने बघतो, सुवर्णालंकार घडवताना सोनाराचं लक्ष जसं त्या सोन्यावर एकाग्र होतं. ॥ २ ॥ विषयासक्त पुरुष ज्याप्रमाणे परनारीकडे न्याहाळून पाहतो किंवा जुगारी माणसाचं लक्ष जसे जुगारातील फाशांवर केंद्रित असते. ॥ ३ ॥ तसं माझं लक्ष त्या प्रभुरामावर केंद्रित असते. नामदेव म्हणतात, मी जिकडे जिकडे पाहतो तिकडे तिकडे मला माझा प्रभुरामच दिसतो. मी सदैव हरीच्या चरणाचे ध्यान करतो. ॥ ४ ॥ २ ॥

मो कउ तारि ले रामा तारि ले ॥
मै अजानु जनु तरिबे न जानउ बाप बीठुला बाह दे ॥ १ ॥ रहाउ ॥
नर ते सुर होइ जात निमख मैं सतिगुर बुधि सिखलाई ॥
नर ते उपजि सुरग कउ जीतिओ सो अवखध मै पाई ॥ १ ॥
जहा जहा धूअ नारदु टेके नैकु टिकावहु मोहि ॥
तेरे नाम अविलंबि बहुतु जन उधरे ॥ नामे की निज मति एह ॥ २ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७३)

शब्दार्थ : **मोकउ** – मला. **अजानु** – अज्ञानी, अडाणी. **बाह** – हात. **धुअ** – ध्रुव. **नैकु टेके** – नेऊन ठेवलेस.

भावार्थ : रामा, माझ्या सख्या ! मी अडाणी, मला हा भवसागर पोहता येत नाही रे. मला तारून ने. हे बापा विठ्ठला, मला तुझ्या मदतीचा हात दे व ह्या भवसागरातून तारून ने. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझ्या सतगुरूंनी मला सांगितलंय की, रामकृपेने क्षणार्धात नराचा नारायण होतो. ज्या योगे मनुष्यास स्वर्गाची दारे खुली होतात ते नामरूपी औषध मला सतगुरूकृपेने प्राप्त झाले आहे. ॥ १ ॥ नामदेव म्हणतात – हे रामा ! तुझ्या केवळ नामस्मरणाने अनेक जीव हा भवसागर तरून गेले. हे प्रभो ! तू ध्रुवाला, नारदाला ज्या अमरपदाला नेऊन ठेवलेस त्याच अढळपदी मला नेऊन ठेव.

मोहि लागती तालाबेली ॥ बछरे बिनु गाइ अकेली ॥ १ ॥
पानीआ बिनु मीनु तलफै ॥ ऐसै राम नामा बिनु बापुरो नामा ॥ १ ॥ रहाउ ॥
जैसै गाइ का बाछा छूटला ॥ थन चोखता माखनु घूटला ॥ २ ॥
नामदेउ नाराइनु पाइआ ॥ गुरु भेटत अलखु लखाइआ ॥ ३ ॥
जैसे बिखै हेत पर नारी ॥ ऐसे नामे प्रीति मुरारी ॥ ४ ॥
जैसे तापते निरमल घामा ॥ तैसे राम नामा बिनु बापुरो नामा ॥ ५ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७४)

शब्दार्थ : **मोहि** – मला. **तालाबेली** – तडफड, ओढ. **बापुरो** – बापुडा, बिचारा. **अलखु** – अलक्ष, परमेश्वर. **लखाइआ** – मिळवला, प्राप्त केला. **बिखै** – विषयासक्त. **घामा** – ऊन, उष्णता.

भावार्थ : वासरू दूर गेल्यावर जशी गाईच्या मनाची तगमग होते, तशी ईश्वरापासून ताटातूट झाल्यामुळे माझ्या जीवाची उलघाल होते आहे. ॥ १ ॥ पाण्याबाहेर मासोळी जशी तडफडते त्याप्रमाणे हा गरीब, बापडा नामदेव रामनामाशिवाय व्याकूळ झाला आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ खुंटाला बांधलेलं वासरू खुंटावरून सुटले तर ते लगेच गाईकडे धावत जाते, कासेत तोंड घालून घालून सड चोखून सरसर दूध पिऊ लागते. त्याचप्रमाणे मी ह्या संसारबंधनातून सुटून केव्हा एकदा प्रभुनामाचे रसपान करतो असे मला झाले आहे. ॥ २ ॥ नामदेव सांगतात, सत्गुरूच्या कृपेने त्या अव्यक्त प्रभू परमात्म्याला मी पाहिले आहे. आता मला नारायण भेटला आहे. ॥ ३ ॥ जसे

परस्त्री पाहून, विषयासक्त माणसाचा जीव तडफडतो, तसा नामदेवाचा जीव त्या मुरारीच्या प्राप्तीसाठी तडफडतो आहे. ॥ ४ ॥ नामदेव म्हणतात– रणरणत्या उन्हाने जशी जीवाची उलघाल होते, तसा रामनामाशिवाय हा बिचारा नामदेव तडफडतो आहे.

राग गोंड (गौड) घरु २

॥ १ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

हरि हरि करत मिटे सभि भरमा ॥ हरिको नामु लै ऊत्तम धरमा ॥
हरि हरि करत जाति कुल हरी ॥ सो हरि अंधुले की लाकरी ॥ १ ॥
हरए नमसते हरए नमह ॥ हरि हरि करत नही दुखु जमह ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि हरनाकस हरे परान ॥ अजैमल कीओ बैकुंठहि थान ॥
सूआ पड़ावत गनिका तरी ॥ सो हरि नैनहु की पूतरी ॥ २ ॥
हरि हरि करत पूतना तरी ॥ बाल घातनी कपटहि भरी ॥
सिमरन द्रौपद सुत उधरी ॥ गऊतम सती सिला निसतरी ॥ ३ ॥
केसी कंस मथनु जिनि कीआ ॥ जिअ दानु काली कउ दीआ ॥
प्रणवै नामा ऐसो हरि ॥ जासु जपत भै अपदा टरी ॥ ४ ॥ १ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७४)

शब्दार्थ : **लाकरि** – काठी. **हरए** – हरीला दूर करतो. **जमाह** – यमाचे. **सुआ** – पोपट. **नैनहु पुतरी** – डोळ्यातील बाहुली. **घातनी** – घातकी. **सिला** – शिळा, दगड. **निसतरी** – उद्धार केला. **मथनु** – संहार, नाश. **टरि** – टळते.

भावार्थ : हरी हरी असे नामस्मरण केल्याने मनातील सर्व भ्रम, सर्व विकल्प दूर होतात. हरिनामासारखा उत्तम धर्म दुसरा कोणताही नाही. हरिनाम हाच श्रेष्ठ धर्म होय. हरिनाम जपाने जात, कुल आदी उच्च–नीच भाव नष्ट होतात. सर्वत्र हरीच आहे, सारे समान आहेत हे कळते. म्हणून म्हणतो की, हरी ही अंधळ्याची काठी आहे. समाजाच्या एकात्मतेचा आधार आहे. ॥ १ ॥ अशा ह्या हरीला माझा नमस्कार असो. मी हरीला वंदन करतो. हरी, हरी अशा नामजपाने मृत्यूचे भय नष्ट होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ हरीने हिरण्यकश्यपूचा (ज्याने विष्णुभक्त प्रल्हादाला छळले) वध केला. अजामिलास (ज्याने प्रभूनामाचा जप केला) वैकुंठात स्थान दिले. ज्या गणिकेने आपल्या पाळलेल्या पोपटाला हरिनाम घेण्यास शिकविले, त्या गणिकेचा उद्धार केला. असा हा हरी, मला प्राणप्रिय आहे. माझ्या डोळ्यांतील बाहुलीच आहे. ॥ २ ॥ बालकृष्णाचे कपटाने प्राणहरण करण्यासाठी आलेल्या पुतना राक्षसिणीच्या तोंडून अंत:काळी हरीचे नाम आल्यामुळे तिचीही संसारसागरातून सुटका झाली. हरीच्या स्मरणाने द्रौपदीच्या अब्रूचे रक्षण झाले. गौतम ऋषीची पत्नी अहल्या गौतमांच्या शापाने शिळा होऊन पडली होती. श्रीरामांच्या पदस्पर्शाने तिचा उद्धार झाला. ॥ ३ ॥ त्या हरीने केशी, कंस आदी दुष्ट राक्षसांचा संहार केला. पण

कालिया शरण आल्याने त्यास जीवदान दिले. ज्या हरीचे स्मरण केल्याने जीवाची सर्व संकटे टळतात, अशा त्या हरीस नामदेव सदैव प्रणाम करतो. त्याचेच नामस्मरण करतो. ॥ ४ ॥ १ ॥ ५ ॥

राग गोंड

भैरउ भूत सितला धावै ॥ खर बाहन उहु छारु उडावै ॥ १ ॥
हउ तउ एकु रमईआ लैहउ ॥ आन देव बदलावनि दैहउ ॥ १ ॥ रहाउ ॥
सिव सिव करते जो नरु धिआवै ॥ बरद चढे डअरू ढमकावै ॥ २ ॥
महा माई की पूजा करै ॥ नर सै नारि होइ अउतरै ॥ ३ ॥
तू कहिअत ही आदि भवानी ॥ मुकति की बरीआ कहा छपानी ॥ ४ ॥
गुरमति राम नाम गहु मीता ॥ प्रणवै नामा इउ कहै गीता ॥ ५ ॥ २ ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७४)

शब्दार्थ : **धावै** – ध्यान करतो, पूजा करतो, त्यांच्यामागे धावतो. **खर** – गाढव. **छार** – धूळ. **उहु** – तो. **हउतउ** – मी मात्र. **लैहउ** – घेईन. **बदलावनी** – बदल्यात. **दैउह** – देऊन. **धिआवै** – ध्यान करतो. **बरद** – बैल. **डअरू** – डमरू. **ढमकावै** – झमझम वाजवील. **अवतरे** – अवतार घेईल, पुढला जन्म घेईल. **बरिआ** – बारी, वेळी. **छपानी** – लपतेस. **गहु** – घे (आधार, आसरा).

भावार्थ : जो माणूस भैरव, भूत, शितलादेवी यांचा धावा करतो, पूजा करतो, तो पुढील जन्मी गाढव होऊन आपल्या खुरांनी धूळ उडवीत चालतो. ॥ १ ॥ मी मात्र इतर सर्व देवदेवतांच्या बदल्यात एकमेव रामाचा स्वीकार करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ जो माणूस शिव शिव असे शिवाचे ध्यान करतो तो पुढील जन्मी बैलावर बसून डमरू वाजवत हिंडतो. ॥ २ ॥ जो माणूस महामायेची पूजा करतो तो पुढील जन्मी स्त्रीदेह धारण करतो.॥३॥ हे भवानी माते ! तू सर्व जगाची जननी, आदिमाता पण तूही आपल्या भक्तांना मुक्ती देताना का बरं लपून बसतेस ? ॥ ४ ॥ नामदेव सांगतात, हे मित्रा ! अन्य सारी देवदैवते सोडून दे, गुरूपासून ज्ञान घेऊन त्याला शरण जाऊन रामनामाचा स्वीकार कर. अरे गीतेचाही हाच उपदेश आहे. ॥ ५ ॥ २ ॥ ६ ॥

बिलावलु गोंड

आजु नामे बिठलु देखिआ मूरख को समझाऊ रे ॥ १ ॥ रहाउ ॥
पांडे तुमरि गाइत्री लोधे का खेतु खाती थी ॥
लै करि ठेगा टगरी तोरी लांगत लांगत जाती थी ॥ १ ॥
पांडे तुमरा महादेउ धउले बलद चड़िआ आवतु देखिआ था ॥
मोदी के घर खाणा पाका वा का लड़का मारिआ था ॥ २ ॥
पांडे तुमरा रामचंदु सो भी आवतु देखिआ था ॥
रावन सेती सरबर होई घर की जोइ गवाई थी ॥ ३ ॥

हिंदू अंन्हा तुरकू काणा दुहां ते गिआनी सिआणा ॥
हिंदू पूजै देहुरा मुसलमाणु मसीति ॥
नामे सोइ सेविआ जह देहुरा न मसीति ॥ ४ ॥ ३ ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८७४)

शब्दार्थ : **आजु** – आज, ह्या जन्मी. **लोधे** – लोध जातीचा शेतकरी. **ठेगा** – सोटा. **टगरी** – तंगडी. **तोरी** – तोडली. **लंगत** – लंगडत. **मारिआ** – मारलास. **सरबर** – युद्ध, लढाई. **जोइ** – स्त्री. **गवाई** – पळवली गेली, गमावली. **अंन्हा** – अंधळा. **काणा** – चकणा, अर्धवट अंधळा. **गिआनी** – ज्ञानी. **सिआणा** – शहाणा. **देहूरा** – देऊळ, देव्हारा. **मसीत** – मशीद.

भावार्थ : निरनिराळ्या देवदेवतांचे पूजन करणाऱ्या भक्तांना उद्देशून नामदेव सांगतात– लोकहो ! आज मी प्रत्यक्ष परमात्मा पाहिला आहे. हे मूर्खांनो, तुम्ही एवढे देव देव करूनही तुम्हास परमेश्वराचे दर्शन का होत नाही हे मी तुम्हाला सांगतो. ॥ रहाउ ॥ पंडिता, तू गाईला पूज्य मानतोस. तिच्यात सर्व देव आहेत असे मानतोस. पण तीच तुझी गोमाता लोधाच्या शेतात घुसून पीक खाऊ लागली तेव्हा त्या लोधाने दांडके घेऊन तिची तंगडीच मोडली आणि ती लंगडी झाली. अरे जी स्वत:चे रक्षण करू शकली नाही ती तुझे काय रक्षण करणार ? ॥ १ ॥ हे पंडिता ! तुझा तो महादेव बैलावर बसून मोदीच्या घरी गेला. मोदीने त्याला भोजन दिले पण ते न आवडल्याने त्याने मोदीच्या मुलाला मारून टाकले. असला क्रोधी देव तुला कशी मुक्ती देईल ? ॥ २ ॥ हे पंडिता ! तू रामाची उपासना करतोस, पण त्या रामचंद्राला रावणाने त्याची बायको पळवून नेली म्हणून त्याच्याशी युद्ध करावे लागले, असा देव तुझे कसे रक्षण करणार ? ॥ ३ ॥ नामदेव सांगतात, मूर्तिपूजक हिंदू अंधळे आहेत. तर मुसलमान काणे आहेत. कारण हिंदू देवळात जाऊन मूर्तीची उपासना करतात तर मुसलमान मशिदीत जाऊन अल्लाची प्रार्थना करतात. ते हेच समजतात की, देव देवळात आहे, अल्ला मशिदीतच आहे. त्या दोहोंपेक्षा ज्ञानी माणूस चांगला कारण तो परमात्म्याचे सत्य स्वरूप जाणतो. अरे, तो प्रभू परमात्मा देवळात नाही, मशिदीत नाही. तो निर्गुण निराकार परमात्मा सर्वत्र आहे. तुमच्या अंतरात आहे. जो कोणत्याही मंदिरात व मशिदीत नाही. त्या निर्गुण निराकार परमेश्वरास नामदेवाने आपल्या अंतरातच पाहिला आहे व तो त्याचीच सेवा करतो. ॥४॥३॥७॥

राग गौड बाणी रविदास जिउ की घरू २

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

मुकंद मुकंद जपहु संसार ॥ बिनु मुकंद तनु होइ अउहार ॥
सोई मुकंदु मुकति का दाता ॥ सोई मुकंदु हमारा पित माता ॥ १ ॥
जीवत मुकंदे मरत मुकंदे ॥ ता के सेवक कउ सदा अनंदे ॥ १ ॥ रहाउ ॥
मुकंद मुकंद हमारे प्रानं ॥ जपि मुकंद मसतकि नीसानं ॥
सेव मुकंद करै बैरागी ॥ सोइ मुकंद दुरबल धनु लाधी ॥ २ ॥

एकु मुकंदु करै उपकारु ॥ हमारा कहा करै संसारु ॥
मेटी जाति हुए दरबारि ॥ तुही मुकंद जोग जुग तारि ॥ ३ ॥
उपजिओ गिआनु हुआ परगास ॥ करि किरपा लीने कीट दास ॥
कहु रविदास अब त्रिसना चूकी ॥ जपि मुकंद सेवा ताहू की ॥ ४ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७५)

शब्दार्थ : **मुकंद** – मुक्तिदाता प्रभू परमात्मा. **बिनु** – विना. **अउहार** – निष्फळ. **सोइ** – तोच. **पित**– पिता. **जीवत** – जिवंतपणी. **ता के** – त्याचे. **प्रानं** – प्राण. **मसतकि** – मस्तकी. **निसानं** – निशाणी, चिन्ह. **सेव** – सेवा. **करै** – करतात. **दुरबल** – दुर्बल. **धनु** – धन. **लाधी** – प्राप्त झाले. **मेटी** – मिटवली. **जोग** – योग. **जुग** – युग. **उपजिओ** – उत्पन्न झाले. **गिआनु** – ज्ञान. **हुआ** – झाला. **परगास** – प्रकाश. **कीट** – क्षूद्र कीटक. **कहु** – सांगतात. **त्रिसना** – तृष्णा. **चुकी** – नष्ट झाली. **ताहु** – त्याची.

भावार्थ : हे संसारातील जीवांनो ! त्या मुकुंदाचे, त्या मुक्तिदात्या प्रभू परमात्म्याचे अखंड नामस्मरण करा. प्रभूशिवाय हे जिणे व्यर्थ आहे. तो प्रभू परमात्मा मुक्तिदाता आहे. तोच आमचा पिता, तोच आमची माता ॥ १ ॥ जो सेवक जिवंतपणी व मरतानासुद्धा प्रभुनामाचे स्मरण करतो तो सदैव आनंद प्राप्त करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो प्रभू परमात्मा आमचा प्राण आहे. प्रभू परमात्म्याच्या सतत नामस्मरणाने त्याला प्राप्त करण्याचे भाग्य प्राप्त होते. प्रभू परमात्म्याची सेवा कोणी विरक्त पुरुषच करतो. माझ्यासारख्या दुबळ्या जीवालाही प्रभुनामरूपी धन प्राप्त झाले आहे. ॥ २ ॥ जर प्रभू परमात्मा आमच्यावर कृपा करील तर ह्या संसारातील मोह, विषयविकार आमचे काहीही वाईट करू शकणार नाहीत. त्या प्रभू परमात्म्याने आमच्या जातीपातीतून आमचा उद्धार करून आम्हाला प्रभू दरबारात आदराचे स्थान दिले आहे. युगानुयुगे तोच आमचा उद्धार करतो. ॥ ३ ॥ प्रभुनामजपाने मला त्याच्या सत्यस्वरूपाचे ज्ञान झाले. त्यामुळे माझ्या अंतरात आत्मज्ञानाचा प्रकाश पडला. माझ्यासारख्या क्षुद्र जीवावर कृपावंत होऊन त्या प्रभू परमात्म्याने मला त्याच्यातच सामावून घेतले आहे. भक्त रविदास सांगतात, मी प्रभू परमात्म्याचे नामस्मरण केल्याने, प्रभूची सेवा केल्यामुळे माझ्या मनातील मोहमायेची, विषयविकारांची तृष्णा नष्ट झाली. ॥ ४ ॥ १ ॥

जे ओहु अठसठी तीरथ नावै ॥ जे ओहु दुआदस सिला पूजावै ॥
जे ओहु कूप तटा देवावै ॥ करै निंद सभ बिरथा जावै ॥ १ ॥
साध का निंदकु कैसे तरै ॥ सरपर जानहु नरक ही परै ॥ १ ॥ रहाउ ॥
जे ओहु ग्रहन करै कुलखेति ॥ अरपै नारि सीगार समेति ॥
सगली सिंम्रिति स्रवनी सुनै ॥ करै निंद कवनै नही गुनै ॥ २ ॥
जे ओहु अनिक प्रसाद करावै ॥ भूमि दान सोभा मंडपि पावै ॥
अपना बिगारि विरांना सांढै ॥ करै निंद बहु जोनी हांढै ॥ ३ ॥
निंदा कहा करहु संसारा ॥ निंदक का परगटि पाहारा ॥

निंदक सोधि साधि बिजारिआ ॥
कहु रविदास पापी नरकि सिधारिआ ॥ ४ ॥ २ ॥ ११ ॥ ७ ॥ २ ॥ ४९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७५)

शब्दार्थ : **जे ओहु** – जे कोणी. **अइसठि** – अडुसष्ट. **तीरथ** – तीर्थ. **नावै** – स्नान करतात. **दुआदस**– बारा ज्योतिर्लिंगे. **पूजावै** – पूजन करतात. **कूप** – विहीर. **तटा** – घाट, तलाव. **देवावै** – बांधून देतात. **करै** – करतात. **निंद** – निंदा. **सभ** – सगळे. **बिरथा** – वृथा. **जावै** – जाते. **साध** – साधुसंत. **निंदकु** – निंदक. **कैसे** – कसे. **तरै** – तरून जाणे. **सरपर** – अवश्य. **जानहु** – जाणा. **परै** – पडतो. **ग्रहन** – ग्रहण. **कुलखेती** – कुरूक्षेत्र. **अरपै** – अर्पण करतात. **नारि** – पत्नी. **सिगार** – शृंगार. **समेति** – सह. **सगली** – सगळी. **सिंम्रिति** – स्मृती. **स्रवनि** – कान. **सुनै** – ऐकतात. **कवनै** – . **गुनै** – गणती करणे, मोजणे. **अनिक** – अनेक. **सोभा** – शोभा. **मंडपि** – जगात, संसारात. **बिगारि** – बिघडवून. **बिरांना** – इतरांचे. **सांढै** – साध्य करून देतात. **बहु** – खूप. **जोनी** – योनी. **हांढै** – फिरतो. **कहा** – का, कशाला. **परगटि** – प्रगट होते. **पहारा** – पाखंड, ढोंग. **सोधि साधि** – खोलवर शोध घेऊन. **बीचारिआ** – विचार केला. **सिधारिआ** – प्राप्त केला.

भावार्थ : ह्या पदात भक्त रविदास प्रभुनिंदेचे दुष्परिणाम वर्णन करून सांगताना म्हणतात– जर कोणी माणूस अडुसष्ट तीर्थांचे स्नान करेल. द्वादश ज्योतिर्लिंगाची पूजा करील, विहिरी, तळी खोदील, घाट बांधील, इतकी सगळी सत्कृत्ये करूनही तर तो प्रभू परमत्म्याची निंदा करील तर हे सगळे व्यर्थ जाते. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्याची निंदा करणारा भवसागर कसा तरून जाईल ? तो निश्चितच नरकात जातो हे नीट लक्षात घ्या. ॥ १ ॥ रहाउ ॥ कुरूक्षेत्री ग्रहणकाली स्नान केले. सर्व साज शृंगारासह स्वत:ची पत्नी ईश्वरार्पण केली. सर्व श्रुतींचे श्रवण केले पण जर तो प्रभू परमात्म्याची निंदा करील, तर कोणीही त्याची दखल घेणार नाही. ॥ २ ॥ अनेक प्रकारचे प्रसाद ईश्वरास अर्पण करील, भूमिदान करून महादानी म्हणून जगात ख्याती प्राप्त करील, आपला स्वार्थ सोडून परोपकारार्थ झटेल, पण प्रभुनिंदा करील तर त्याला नाना योनीत जन्म घेऊन भवतापाचे दु:ख भोगावे लागेल. भक्त रविदास सांगतात, हे जगातील लोक हो ! प्रभू निंदा कशाला बरं करावी ? निंदकाने कितीही सत्कृत्ये केली तरी त्याचे हे ढोंग कधीतरी उघडे पडतेच. ॥ ४ ॥ २ ॥ ११ ॥ ७ ॥ २ ॥ ४९ ॥

रागु रामकली

१ ओअंकार सतिनामु करता पुरखु निरभउ निरवैरु
अकाल मूरति अजूनी सैभं गुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाम सत्य आहे. तो कर्तापुरुष अहे. तो निर्भय, निर्वैर आहे. तो कालातीत आहे. तो अयोनीसंभव व स्वयंभू आहे. सतगुरूच्या कृपेने तो प्राप्त होतो.

रामकली महला १ घरु १ चउपदे ॥

कोई पड़ता सहसाकिरता कोई पड़े पुराना ॥
कोई नामु जपै जप माली लागै तिसै धिआना ॥
अब ही कब ही किछू न जाना तेरा एको नामु पछाना ॥ १ ॥
न जाणा हरे मेरी कवन गते ॥
हम मूरख अगिआन सरनि प्रभ तेरी करि किरपा राखहु मेरी लाज पते ॥ १ ॥ रहाउ ॥
कबहू जीअड़ा ऊभी चड़तु है कबहू जाइ पइआले ॥
लोभी जीअड़ा थिरु न रहतु है चारे कुंडा भाले ॥ २ ॥
मरणु लिखाइ मंडल महि आए जीवणु साजहि माई ॥
एकि चले हम देखह सुआमी भाहि बलंती आई ॥ ३ ॥
न किसी का मीतु न किसी का भाई ना किसै बापु न माई ॥
प्रणवति नानक जे तू देवहि अंते होइ सखाई ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८७६)

शब्दार्थ : **पडता** – वाचतो. **सहसाकिरता** – संस्कृत. **अब** – सद्य:स्थिती, वर्तमान. **कब** – भूतकाळ वा भविष्यकाळ, कधीही. **गते**– गत अवस्था. **पते** – पती, प्रभू. **कबहु** – केंव्हा. **जीअडा** – जीत. **ऊभी** – वर, उच्च, आध्यात्मिक अवस्था. **चडतु** – चढतो. **पइआले** – पाताळात. **थिरु** – स्थिर. **भाले** – शोधतो. **मंडल** – संसारात. **भाहि** – . **बलंती** – . **मीतु** – मित्र. **प्रणवति** – विनयपूर्वक सांगतो. **देवहि** – देतोस, देशील. **सखाई** – सहायक.

भावार्थ : कोणी संस्कृत ग्रंथ वाचतो. कोणी पुराणे वाचतो. कोणी जपमाळ घेऊन नामाचा जप करतो. कोणी ध्यान लावून बसतो. पण हे प्रभो, मी मात्र भूत– भविष्य– वर्तमान कशाचाही विचार न करता केवळ एकमेव तुलाच जाणतो. ॥ १ ॥ माझी काय गत होईल ह्याचाही कधी विचार केला नाही. हे प्रभो ! मी मूर्ख, अज्ञानी तुला शरण आलो आहे. हे माझ्या प्रभू ! कृपा करून माझी लाज राख. ॥ १ ॥ रहाउ ॥ हा जीव कधी उन्नतीच्या शिखरावर पोहोचतो तर कधी अवनतीच्या गर्तेत जाऊन पडतो. जीव लोभी असल्यामुळे तो कधीही स्थिर राहत नाही. मोहमायेच्या प्राप्तीसाठी तो चारही दिशास धावत असतो. ॥ २ ॥ ह्या संसारात येतानाच मृत्यूचा दिवसही ठरलेला असतो. तरीही आपण अमर असल्याप्रमाणे जन्मभर माया गोळा करतच राहतो. जीव आपल्या समक्ष अनेक लोकांना मरण आलेले पाहतो. हा

मृत्यूचा अग्नी सतत जळतच असतो. ॥ ३ ॥ मृत्यूनंतर कोणी कोणाचा मित्र नसतो. कोणी कोणाचा भाऊ नसतो. कोणाचा बाप नसतो की आई नसते. नानक विनयपूर्वक सांगतात, की हे प्रभू ! जर तू तुझे नाम जीवास प्रदान केलेस तर तेच अंती साहाय्यभूत होते. ॥ ४ ॥ १ ॥

॥ रामकली महला १ ॥

सरब जोति तेरी पसरि रही ॥ जह जह देखा तह नरहरी ॥ १ ॥
जीवन तलब निवारि सुआमी ॥
अंध कूपि माइआ मनु गाडिआ किउ करि उतरउ पारि सुआमी ॥ १ ॥ रहाउ ॥
जह भीतरि घट भीतरि बसिआ बाहरि काहे नाही ॥
तिन की सार करे नित साहिबु सदा चिंत मन माही ॥ २ ॥
आपे नेड़ै आपे दूरि ॥ आपे सरब रहिआ भरपूरि ॥
सतगुरु मिलै अंधेरा जाइ ॥ जह देखा तह रहिआ समाइ ॥ ३ ॥
अंतरि सहसा बाहरि माइआ नैणी लागसि बाणी ॥
प्रणवति नानकु दासनि दासा परतापपहिगा प्राणी ॥ ४ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८७६)

शब्दार्थ : **पसरि** – पसरलेला. **तलब** – इच्छा. **गाडिआ** – गाडून. **सार** – रक्षण. **नेडै**– जवळ. **सहसा** – शंका, संशय. **परतापहिगा** – पश्चात्ताप, दु:खी.

भावार्थ : हे प्रभो ! सर्व जीवांमध्ये तुझीच ज्योत प्रकाशमान आहे. सर्वत्र तुझाच प्रकाश पसरलेला आहे. हे नरहरी मी जिकडे पाहतो तिकडे तूच भरून राहिला आहेस. ॥ १ ॥ हे प्रभो ! माझ्या साऱ्या सांसारिक इच्छा नष्ट कर. मी मोहमायेच्या अज्ञान, अंधकाराने भरलेल्या गर्तेत पडलो आहे. हे प्रभो ! त्यातून मी बाहेर कसा पडू शकेन? ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! तू प्रत्येक जीवाच्या अंतरात वास करतोस मग बाहेर तू कसा नसशील? अवश्य बाहेरही तू असणारच. आहेसच. सर्व जीवांचे रक्षणही प्रभूच करतो. प्रभूला त्यांची सदैव काळजी असते.॥ २॥ प्रभू तू जीवांच्या जवळही आहेस व दूरही तूच आहेस. तू सर्वव्याप्त आहेस. ज्यास सतगुरू प्राप्त होतो त्याच्या अंत:करणातील अज्ञान, अंधकार दूर होतो. तो जिकडे पाहतो तिकडे त्यास प्रभू परमात्माच दिसतो. ॥ ३ ॥ अंतरात नाना संशय पिंगा घालत असतात तर बाहेर माया डोळ्यांना भुरळ पाडते. नानक विनयपूर्वक सांगतात, की प्रभो ! तुझ्या कृपेशिवाय हा तुझा दासानुदास दु:खी आहे. ॥ ४ ॥ २ ॥

॥ रामकली महला १ ॥

जितु दरि वसहि कवनु दरु कहीऐ दरा भीतरि दरु कवनु लहै ॥
जिसु दर कारणि फिरा उदासी सो दरु कोई आइ कहै ॥ १ ॥
किन बिधि सागरु तरीऐ । जीवतिआ नह मरीऐ ॥ १ ॥ रहाउ ॥
दुखु दरवाजा रोहु रखवाला आसा अंदेसा दुइ पट जड़े ॥
माइआ जलु खाई पाणी घरु बाधिआ सत कै आसणि पुरखु रहै ॥ २ ॥

किंते नामा अंतु न जाणिआ तुम सरि नाही अवरु हरे ॥
ऊचा नही कहणा मन महि रहणा आपे जाणै आपि करे ॥ ३ ॥
जब आसा अंदसा तब ही किउ करि एकु कहै ॥
आसा भीतरि रहै निरासा तउ नानक एकु मिलै ॥ ४ ॥
इन बिधि सागरु तरीऐ ॥ जीवतिआ इउ मरीऐ ॥ १ ॥ रहाउ दूजा ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७७)

शब्दार्थ : **जितु** – ज्याचा. **जीवतिआ** – अहंभाव. **रोहू** – क्रोध. **अंदेसा** – संशय, शंका. **बाधिआ** – बद्ध. **किंते** – कितीतरी. **सरि** – समान, सारखा. **पट** – दार.

भावार्थ : हे बंधू ! तो प्रभू परमात्मा कोठे राहतो ते मला कोणीतरी सांगा रे ! मला हेही सांगा की शरीरात तो कोठे वास करतो. तेथे पोहोचण्याचा मार्ग कोणता ? प्रभू दारी प्रवेश मिळावा म्हणून मी संन्यासी बनून जगभर फिरत राहिलो, ते प्रभू परमात्म्याचे घर कोठे आहे ते मला कोणीतरी सांगारे. ॥ १ ॥ काय केले असता, कशा रीतीने हा भवसागर तरून जाता येईल ? जिवंत असून जीवनमुक्त होण्याची कला शिकल्याशिवाय हे शक्य नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ ह्या देहरूपी शरीरास दु:खरूपी दार आहे व त्यावर क्रोधरूपी रखवालदार आहे. संशय ही त्या दाराची झडपे आहेत. ह्या देहरूपी घराभोवती मायारूपी तृष्णेच्या जलाने भरलेला खंदक आहे. ह्या शरीररूपी घरातच सत्याच्या अधिष्ठानावर प्रभू परमात्मा विराजमान आहे. ॥ २ ॥ हे प्रभू परमात्मा ! तू किती नावांनी ओळखला जातोस त्याला अंत नाही. हे हरी तुझ्या समान अन्य कोणीही नाही. अधिक काही सांगण्याची गरज नाही. आपल्या अंत:करणात त्यास दृढ करावे. कारण तो सर्व काही जाणतो व तोच सर्व काही करतो. ॥ ३ ॥ मनात नाना शंका-कुशंका असताना प्रभुनामाचे स्मरण करणे कसे शक्य आहे. नानक सांगतात, सर्व प्रकारच्या आशांप्रती उदासीन झाल्यावरच तो एकमेव प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ ४ ॥ अशा प्रकारे मनातील अहंभाव नष्ट करावा लागतो. जीवन जगत असतानाच विषय विकारांना तिलांजली द्यावी लागते. ह्याच रीतीने जीव भवसागर तरून जातो. ॥ रहाउ दुसरा ॥ ४ ॥ ३ ॥

॥ रामकली महला १ ॥

सुरति सबदु साखी मेरी सिंङी बाजै लोकु सुणे ॥
पतु झोली मंगण कै ताई भीखिआ नामु पड़े ॥ १ ॥
बाबा गोरखु जागै ॥ गोरखु सो जिनि गोइ उठाली करते बार न लागै ॥ १ ॥ रहाउ ॥
पाणी प्राण पवणि बंधि राखे चंदु सुरजु मुखि दीए ॥
मरण जीवण कउ धरती दीनी एते गुण विसरे ॥ २ ॥
सिध साधिक अरु जोगी जंगम पीर पुरस बहुतेरे ॥
जे तिन मिला त कीरति आखा ता मनु सेव करे ॥ ३ ॥
कागदु लूणु रहै घ्रित संगे पाणी कमलु रहै ॥
ऐसे भगत मिलहि जन नानक तिन जमु किआ करै ॥ ४ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८७७)

शब्दार्थ : **सुरति** – बुद्धी. **साखी** – शिकवण. **सिंडी** – शिंग. **लोकु** – लोक. **सुणै** – ऐकतात. **पतु** – पत, प्रतिष्ठा. **मंगण** – मागणे. **ताई** – . **भीखिआ** – भिक्षा. **गोरखु** – पृथ्वीचे पालन करणारा, परमात्मा. **गोइ** – पृथ्वी. **बार** – वेळ, विलंब. **बंधि** – बांधून ठेवणे. **एते** – इतके. **जे** – जेव्हा, जर. **ता** – तेव्हा, तर. **लूणु** – मीठ. **घ्रित** – घृत, तूप. **दिए** – दिवे.

भावार्थ : सतगुरूची शिकवण ही मला शिंगा (वाद्य)सारखी आहे. माझी बुद्धी शब्दगुरूशी एकरूप झाली की शिंगासारखी वाजते व लोक ती ऐकत राहतात. झोळी हे माझे भिक्षापात्र आहे. ज्यात मी प्रभुनामाची भिक्षा गोळा करतो. तीच माझी प्रतिष्ठा आहे. ॥ १ ॥ तो पृथ्वीचे पालन करणारा परमात्मा सदैव जागृत आहे. त्यानेच पृथ्वीची धारणा केली आहे. ते करण्यास त्याला जराही वेळ लागत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ ह्या प्राणाला त्याने पवन व पाण्याने बांधून ठेवले आहे. चंद्र, सूर्य यासारखे मोठे दीप दिले आहेत. जगण्या-मरण्यासाठी ही धरती दिली. पण जीव मात्र हे त्याचे सारे गुण विसरला. ॥ २ ॥ जगात अनेक सिद्ध, साधक, योगी, जंगम, पीर आदी श्रेष्ठ पुरुष आहेत. जर त्यापैकी कोणाशी माझी भेट होईल तर माझे मन प्रभुसेवेकडे वळेल. ॥ ३ ॥ कागद व मीठ तुपाच्या संगतीत राहिल्याने पाण्यापासून अप्रभावित राहतात, कमलपुष्प पाण्यात राहूनही पाण्यापासून अप्रभावित राहते, त्याप्रमाणे प्रभूचे भक्त संसारात राहूनही संसारापासून अलिप्त राहतात. नानक सांगतात, अशा प्रभुसेवकांना यमदूत जराही बाधा पोचवू शकत नाहीत. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ रामकली महला १ ॥

सुणि माछिंद्रा नानकु बोलै ॥ वसगति पंच करे नह डोलै ॥
ऐसी जुगति जोग कउ पाले ॥ आपि तरै सगले कुल तारे ॥ १ ॥
सो अउधूतु ऐसी मति पावै ॥ अहिनिसि सुंनि समाधि समावै ॥ १ ॥ रहाउ ॥
भिखिआ भाइ भगति भै चलै ॥ होवै सु त्रिपति संतोखि अमुलै ॥
धिआन रूपि होइ आसणु पावै ॥ सचि नामि ताड़ी चितु लावै ॥ २ ॥
नानकु बोलै अंम्रित बाणी ॥ सुणि माछिंद्रा अउधू नीसाणी ॥
आसा माहि निरासु वलाए ॥ निहचउ नानक करते पाए ॥ ३ ॥
प्रणवति नानकु अगमु सुणाए ॥ गुर चेले की संधि मिलाए ॥
दीखिआ दारू भोजनु खाइ ॥ छिअ दरसन की सोझी पाइ ॥ ४ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७७)

शब्दार्थ : **वसगति** – ताब्यात ठेवणे. **पंच** – पाच विकार (काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार). **सो** – तो. **अउधूत** – अवधूत, विरक्त. **अहिनिसि** – अहर्निश, रात्रंदिवस. **सुंनि** – शून्य. **भिखिआ** – भिक्षा. **त्रिपति** – तृप्त. **ताडी** – लावतो, समाधी लावतो. **बलाए** – व्यतीत करणे. **निहचउ** – निश्चय करते, कर्ताप्रभू. **अगमु** – अगम्य प्रभू. **दिखिआ** – दीक्षा, गुरुपदेश. **दारू** – औषध. **छिअ दर्शन** – सहा दर्शने. **सोझी** – ज्ञान.

भावार्थ : नानक सांगतात, हे मच्छिंद्रनाथ ! मी काय सांगतो ते नीट ध्यानपूर्वक ऐक. ज्यामुळे पंचविकार

ताब्यात राहतात. मन इकडे तिकडे डोलत नाही. सदैव स्थिर राहते. अशा तऱ्हेच्या योगाचे जो पालन करतो, तो स्वत: भवसागर तरून जातोच व संपूर्ण कुलाचाही उद्धार करतो. ॥ १ ॥ असा अवधूत विरक्त होऊन रात्रंदिवस शून्य समाधीत मग्न होऊन राहतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ भक्तिभाव व प्रभूची भीती हीच त्याची भिक्षा होय. तो तृप्त होऊन संतुष्ट व अमूल्य जीवन जगतो. तो ध्यानरूपी स्थिरासन प्राप्त करतो व सत्यरूप प्रभुनामात चित्त एकाग्र करून समाधीत स्थिर होतो. ॥ २ ॥ नानक आपल्या अमृतवाणीने सांगतात, हे मच्छिंद्रनाथ, विरक्त अवधूताची लक्षणे सांगतो ती नीट ध्यानपूर्वक ऐक. तो सर्व इच्छा आकांक्षापासून अलिप्त असतो. नानक सांगतात, त्यामुळे तो निश्चितपणे प्रभू परमात्मा प्राप्त करतो. ॥ ३ ॥ अशा रीतीने नानक योगमार्गाचे रहस्य सांगतात, की ज्यामध्ये गुरू वा शिष्य यातील भेद संपून दोघे एकरूप होतात. प्रभुसेवक व प्रभू यातील अंतर नष्ट होऊन दोघे एकरूप होतात. शिष्याला सतगुरूचा उपदेश हे सर्व व्याधींवरील औषध प्राप्त होते. सतगुरूचा उपदेश हे त्याचे भोजन असते. सतगुरूच्या उपदेशाने त्यास षट् दर्शनांचे ज्ञान होते. ॥ ४ ॥ ५ ॥

॥ रामकली महला १ ॥

हम डोलत बेड़ी पाप भरी है पवणु लगै मतु जाई ॥
सनमुख सिध भेटण कउ आए निहचउ देहि वडिआई ॥ १ ॥
गुर तारि तारणहारिआ ॥
देहि भगति पूरन अविनासी हउ तुझ कउ बलिहारिआ ॥ १ ॥ रहाउ ॥
सिध साधिक जोगी अरु जंगम एकु सिधु जिनी धिआइआ ॥
परसत पैर सिझत ते सुआमी अखरु जिन कउ आइआ ॥ २ ॥
जप तप संजम करम न जाना नामु जपी प्रभ तेरा ॥
गुरु परमेसरु नानक भेटिओ साचै सबदि निबेरा ॥ ३ ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८७८)

शब्दार्थ : **बेडी** – जीवनरूपी नौका. **सनमुख** – . **सिध** – सिद्ध, प्रभू. **देहि** – दे, प्रदान कर. **परसत** – स्पर्श करणे. **सिझत** – सफल. **करम** – कर्म, कार्य. **निबेरा** – निर्णय, जन्ममृत्यूपासून निवारण.

भावार्थ : माझी जीवनरूपी नौका पापाच्या बोझ्याने पुरेपूर भरलेली आहे. त्यामुळे ती डगमगत आहे. मला भीती वाटते की हवेच्या झोक्याने ती बुडणार तर नाही ना ? हे प्रभो ! मी तुला भेटण्यासाठी तुझ्यापुढे उभा आहे. तू निश्चितच मला तुझ्या प्राप्तीचा सन्मान प्राप्त करून देशील. ॥ १ ॥ हे भवसागर तारून नेणाऱ्या प्रभू तू मला तारून ने. हे पूर्ण अविनाशी प्रभू, मला तुझ्या भक्तीचे दान दे. मी तुझ्या चरणी समर्पित होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सिद्ध, साधक, योगी, जंगम ह्या सर्वांनी त्या एकमेव सिद्धपुरुष प्रभू परमात्म्याचे ध्यान केले आहे. तुझ्या चरणस्पर्शाने त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले. त्यांना सतगुरूकडून अविनाशी असे प्रभुनाम प्राप्त झाले. ॥ २ ॥ हे प्रभो ! मी जप, तप, संयम, कर्मकांड ह्यापैकी काहीही केले नाही. मी फक्त प्रभुनामाचे स्मरण केले. नानक सांगतात मला प्रभू परमात्मा प्राप्त झाला. सत्यरूप प्रभुनामामुळे माझी जन्ममरणाच्या चक्रातून मुक्तता झाली. ॥ ३ ॥ ६ ॥

॥ रामकली महला १ ॥

सुरती सुरति रलाईऐ एतु ॥ तनु करि तुलहा लंघहि जेतु ॥
अंतरि भाहि तिसै तू रखु ॥ अहिनिसि दीवा बलै अथकु ॥ १ ॥
ऐसा दीवा नीरि तराइ ॥ जितु दीवै सभ सोझी पाइ ॥ १ ॥ रहाउ ॥
हछी मिटी सोझी होइ ॥ ता का कीआ मानै सोइ ॥
करणी ते करि चकहु ढालि ॥ ऐथै ओथै निबही नालि ॥ २ ॥
आपे नदरि करे जा सोइ ॥ गुरमुखि विरला बूझै कोइ ॥
तितु घटि दीवा निहचलु होइ ॥ पाणी मरै न बुझाइआ जाइ ॥
ऐसा दीवा नीरि तराइ ॥ ३ ॥
डोलै वाउ न वडा होइ ॥ जापै जिउ सिंघासणि लोइ ॥
खत्री ब्राहमणु सूदु कि वैसु ॥ निरति न पाईआ गंणी सहंस ॥
ऐसा दीवा बाले कोइ ॥ नानक सो पारंगति होइ ॥ ४ ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८७८)

शब्दार्थ : **सुरती** – बुद्धीदाता परमेश्वर. **सुरति** – बुद्धी, मती. **रलाईऐ** – एकरूप करणे. **तुलहा** – नौका. **लंघहि** – पार करणे. **जेणु** – ज्यामुळे. **भाहि** – अग्नी. **दीवा** – ज्ञानदीप. **बलै** – जळत राहो. **अथकु** – निरंतर. **नीरि** – भवसागर. **सोझी** – ज्ञान. **हछी** – . **मिटी** – माती. **करणी** – सत्कर्ष. **चकहु** – चाक. **ढाली** – ठेव. **एथै** – इहलोकी. **ओथै** – परलोकी. **वाउ** – . **वडा** – . **लोइ** – . **सूदु** – शूद्र. **वैसु** – वैश्य. **निरति** – अंत, पारावार. **बाले** – लावतो. **पारंगति** – पारंगत मुक्त.

भावार्थ : बुद्धिदात्या प्रभू परमात्म्याशी आपली मती अशी एकरूप कर, की तुझी ही देहरूपी नौका भवसागर पार करून जाईल. तुझ्या अंत:करणातील विकाररूपी अग्नीस तू रोखून धर म्हणजे तुझ्या अंतरात ज्ञानदीप अखंड तेवत राहील. ॥ १ ॥ असा दीप तू आपल्या हृदयात तेवत ठेव. त्याच्या प्रकाशात तुला सर्व ज्ञान प्राप्त होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ अशा दीपकासाठी सत्विचाररूपी माती वापरा. त्यापासून बनवलेला दीपक प्रभू परमात्म्यास स्वीकारार्ह वाटतो. सदाचरणाच्या चाकावर बनवलेला ज्ञानदीप इहलोकी व परलोकी जीवास साथ देतो. ॥ २ ॥ ज्याच्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो असा कोणी विरळा जीव सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून आत्मज्ञान प्राप्त करतो. अशा गुरुमुखीच्या अंत:करणात आत्मज्ञानाचा दीपक सदैव प्रज्वलित असतो. असा दीपक पाण्यात बुडत नाही वा कधी विझतही नाही. असा दीपक हृदयरूपी जलावर तरंगत ठेव. ॥ ३ ॥ असा हा ज्ञानदीप संसारातील झंझावाताने विझत नाही वा लहान मोठा होत नाही. तो सदैव स्थिर असतो. ह्या आत्मज्ञानाच्या प्रकाशात असे दिसते की प्रत्यक्ष प्रभू परमात्मा हृदयरूपी सिंहासनावर बसला आहे. ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य, शूद्र सारे मिळून ह्या ज्ञानदीपाचे मूल्य करण्याचा प्रयत्न करतात. पण हजारो गणना करूनही त्याचा पार लागत नाही. नानक सांगतात, जो प्रभुसेवक असा आत्मज्ञानाचा दिवा आपल्या अंत:करणात प्रज्वलित करतो तो मुक्त होतो. ॥ ४ ॥ ७ ॥

॥ रामकली महला १ ॥

तुधनो निवणु मंनणु तेरा नाउ ॥ साचु भेट बैसण कउ थाउ ॥
सतु संतोखु होवै अरदासि ॥ ता सुणि सदि बहाले पासि ॥ १ ॥
नानक बिरथा कोइ न होइ ॥ ऐसी दरगह साचा सोइ ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रापति पोता करमु पसाउ ॥ तू देवहि मंगत जन चाउ ॥
भाडै भाउ पवै तितु आइ ॥ धुरि तै छोडी कीमति पाइ ॥ २ ॥
जिनि किछु कीआ सो किछु करै ॥ अपनी कीमति आपै धरै ॥
गुरमुखि परगटु होआ हरिराइ ॥ ना को आवै ना को जाइ ॥ ३ ॥
लोकु धिकारु कहै मंगत जन मागत मानु न पाइआ ॥
सह कीआ गला दर कीआ बाता तै ता कहणु कहाइआ ॥ ४ ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७८)

शब्दार्थ : **तुधनो** – तुझ्यासमोर. **निवणु** – विनम्र होणे. **मंगणु** – मानणे, मान्य करणे. **प्रापति** – प्राप्त. **पोता** – . **बैसण** – बसण्यासाठी. **थाउ** – स्थान. **बहाले** – बसण्यास. **पासि** – जवळ. **दरगह** – प्रभू दरबार. **करमु** – कृपा. **पसाउ** – . **देवहि** – देतोस. **मंगत** – याचना. **चाउ** – . **भाडै** – भांडे. **पवै** – पडते, प्राप्त होते. **धुरी** – भाग्यात.

भावार्थ : हे प्रभो ! तुझ्या नामाचे महत्त्व मानणे म्हणजेच तुझ्यापुढे नम्र होणे होय. जो तुला सत्याचरणाची भेट देतो त्यासच तू तुझ्याजवळ बसण्यास स्थान देतोस. सत्य व संतोष हीच तुझी प्रार्थना. ती ऐकून तू त्या जीवास आपल्याजवळ स्थान देतोस. ॥ १ ॥ नानक सांगतात, तो सत्यरूप प्रभू परमात्मा व त्याचा दरबार असा आहे, की जीवाने केलेले कोणतेही परिश्रम तो वाया जाऊ देत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ जो प्रभू परमात्म्याची प्रार्थना करतो त्यास प्रभू परमात्म्याचे कृपारूपी दान प्राप्त होते. मागणाऱ्याच्या मनात मागण्याची इच्छा निर्माण होते व तू त्यांना देतच राहतोस. तू त्यांचे अंत:करणरूपी भांडे भरभरून त्यास तुझे प्रेम देतोस. ज्याच्या प्रारब्धात जे लिहिले असेल तेच त्याला प्राप्त होते. ॥ २ ॥ ज्या प्रभू परमात्म्याने हे सर्व केले आहे तोच सारे करतो आहे. आपले मूल्यही तोच ठरवतो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्याच्या अंत:करणात प्रभू परमात्मा स्वत: प्रगट होतो. असा प्रभुभक्त जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. ॥ ३ ॥ लोक याचना करणाऱ्याचा धिक्कार करतात. याचकास कधीही सन्मान प्राप्त होत नाही. पण हे प्रभो ! ह्या ज्या गोष्टी मी वर सांगितल्या त्या तूच मला सांगावयास सांगितल्यास. मी माझ्या पदरचे काहीच सांगितले नाही. ॥ ४ ॥ ८ ॥

॥ रामकली महला १ ॥

सागर महि बूंद बूंद महि सागरु कवणु बुझै बिधि जाणै ॥
उतभुज चलत आपि करि चीनै आपे ततु पछाणै ॥ १ ॥
ऐसा गिआनु बीचारै कोई ॥ तिस ते मुकति परमगति होई ॥ १ ॥ रहाउ ॥

दिन महि रैणि रैणि महि दिनीअरु उसन सीत बिधि सोई ॥
ता की गति मिति अवरु न जाणै गुर बिनु समझ न होई ॥ २ ॥
पुरख महि नारि नारि महि पुरखा बूझहु ब्रहम गिआनी ॥
धुनि महि धिआनु धिआन महि जानिआ गुरमुखि अकथ कहानी ॥ ३ ॥
मन महि जोति जोति महि मनूआ पंच मिले गुर भाई ॥
नानक तिन कै सद बलिहारी जिन एक सबदि लिव लाई ॥ ४ ॥ ९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७८)

शब्दार्थ : **कवणु** – कोण. **बझै** – जाणतो. **बिधि** – . **उदभुज** – जड. **चलत** – चेतन. **चिनै** – समजतो, जाणतो. **उसन** – उष्ण. **बुझहु** – जाणतो. **धुनि** – ध्वनी. **पंच** – पाच ज्ञानेंद्रिये.

भावार्थ : सागरात बिंदू व बिंदूत सागर सामावलेला आहे. जो जीवनाची युक्ती जाणतो तोच ह्यातील रहस्य जाणतो. जड व चेतन ज्या प्रभूने निर्माण केले त्याचे रहस्यही तोच जाणतो. ॥ १ ॥ जो कोणी विरळा विचारपूर्वक हे ज्ञान प्राप्त करील तो मुक्त होईल व त्यास परमगती प्राप्त होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ दिवसामध्ये रात्र आहे व रात्रीमध्ये दिवस आहे. जे उष्ण आहे त्यातच शीतलता आहे व जे थंड आहे त्यातही उष्णता आहे. ह्याचे रहस्य अन्य कोणीही जाणत नाही. सतगुरूशिवाय ह्या रहस्याचे ज्ञान होऊ शकत नाही. ॥ २ ॥ पुरुषामध्येच नारीचा अंश व नारीमध्ये पुरुषाचा अंश ह्याचे रहस्य ब्रह्मज्ञानीच जाणतो. ध्वनीतून ध्यान व ध्यानातून आत्मज्ञान प्राप्त होते. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्रभू परमात्म्याच्या अवर्णनीय कथा जाणता येतात. ॥ ३ ॥ हे गुरुबंधू पंचज्ञानेंद्रिये एक केल्याने मनात प्रभू परमात्म्याची ज्योत स्थित आहे आणि ज्योतीमध्येच मन एकरूप झाले आहे हे समजते. नानक सांगतात ज्याने आपले मन शब्दब्रह्माशी एकरूप केले अशा प्रभुभक्तावर मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ ४ ॥ ९ ॥

॥ रामकली महला १ ॥

जा हरि प्रभि किरपा धारी ॥ ता हउमै विचहु मारी ॥
सो सेवकि राम पिआरी ॥ जो गुरसबदी बीचारी ॥ १ ॥
सो हरि जनु हरि प्रभ भावै ॥
अहिनिसि भगति करे दिनु राती लाज छोडि हरि के गुण गावै ॥ १ ॥ रहाउ ॥
धुनि वाजे अनहद घोरा ॥ मनु मानिआ हरि रसि मोरा ॥
गुर पूरै सचु समाइआ ॥ गुरु आदि पुरखु हरि पाइआ ॥ २ ॥
सभि नाद बेद गुरबाणी ॥ मनु राता सारिगपाणी ॥
तह तीरथ वरत तप सारे ॥ गुर मिलिआ हरि निसतारे ॥ ३ ॥
जह आपु गइआ भउ भागा ॥ गुर चरणी सेवकु लागा ॥
गुरि सतिगुरि भरमु चुकाइआ ॥ कहु नानक सबदि मिलाइआ ॥ ४ ॥ १० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७९)

शब्दार्थ : **सेवकि** – सेविका. **भावै** – आवडते. **घोरा** – . **मोरा** – माझे. **वरत** – व्रत.

भावार्थ : जर प्रभू परमात्म्याची कृपा होईल तर मनातील अहंकार नष्ट होतो. जी सेविका प्रभू परमात्म्यास प्रिय होते ती शब्दगुरूच्या साहाय्याने त्याचे चिंतन करते. ॥ १ ॥ जी प्रभुसेविका लोकलज्जा सोडून रात्रंदिवस हरीचे गुण गाते, अहर्निश प्रभू परमात्म्याची भक्ती करते तीच सेविका हरीस प्रिय होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ मनात अनाहत नादाचा ध्वनी निनादू लागलेला आहे व माझे मन हरिरसात रंगून गेले आहे. पूर्णगुरूच्या कृपेने माझे मन सत्यस्वरूप प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन गेले आहे. सतगुरुकृपेने मला आदिपुरुष प्रभू प्राप्त झाला. ॥ २ ॥ गुरुवाणी हाच माझा नाद. हाच माझा वेद. आता माझे मन शारंगपाणी प्रभू परमात्म्यात रंगून गेले आहे. गुरुवाणी हेच माझे तीर्थक्षेत्र, व्रत, तप सारे काही आहे. सतगुरु प्राप्त झाल्याने हरीने मला भवसागरातून तारून नेले आहे. ॥ ३ ॥ जेव्हा माझ्या मनातील अहंकार नष्ट झाला, तेव्हा माझ्या मनातील सर्व भय आपोआप नष्ट झाले. मी सतगुरुचरणी लीन होऊन त्याची सेवा करू लागलो. सतगुरूने माझ्या मनातील सारे भ्रम नष्ट केले. नानक सांगतात, सतगुरूंमुळे मी शब्दब्रह्माशी एकरूप होऊन गेलो. ॥ ४ ॥ १० ॥

॥ रामकली महला १ ॥

छादनु भोजनु मागतु भागै ॥ खुधिआ दुसट जलै दुखु आगै ॥
गुरमति नही लीनी दुरमति पति खोई ॥ गुरमति भगति पावै जनु कोई ॥ १ ॥
जोगी जुगति सहज घरि वासै ॥
एक द्रिसटि एको करि देखिआ भीखिआ भाइ सबदि त्रिपतासै ॥ १ ॥ रहाउ ॥
पंच बैल गडीआ देह धारी ॥ राम कला निबहै पति सारी ॥
धर तूटी गाडो सिर भारि ॥ लकरी बिखरि जरी मंझ भारि ॥ २ ॥
गुर का सबदु वीचारि जोगी ॥ दुखु सुखु सम करणा सोग बिओगी ॥
भुगति नामु गुर सबदि बीचारी ॥ असथिरु कंधु जपै निरंकारी ॥ ३ ॥
सहज जगोटा बंधन ते छूटा ॥ कामु क्रोधु गुर सबदी लूटा ॥
मन महि मुंद्रा हरि गुर सरणा ॥ नानक राम भगति जन तरणा ॥ ४ ॥ ११ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८७९)

शब्दार्थ : **छादणु** – वस्त्र. **भागे** – फिरतो. **खुधिआ** – भूक. **दुरमति** – दुर्बुद्धी. **सहज** – सहजावस्था, निर्विकल्प समाधी. **पंचबैल** – पाच ज्ञानेंद्रियेरूपी बैल. **गडीआ** – गाडी. **कला** – शक्ती. **निबहै** – निर्वाह, निभावून नेणे. **धर** – धुरा. **लकरी** – लाकडे. **जरि** – जळून जातात. **भुगति** – भोजन. **असथिरु** – स्थिर. **कंधु** – शरीर. **जगोटा** – लंगोट. **मुंद्रा** – मुद्रा.

भावार्थ : योगी अन्न आणि वस्त्र मिळविण्यासाठी दारोदार याचना करत फिरतात. ह्या आयुष्यात क्षुधेच्या अग्नीने जळतात तर पुढे जन्ममरणाच्या चक्राच्या दु:खाच्या अग्नीत जळत राहतात. त्याला सतगुरूचा उपदेश प्राप्त होत नाही व दुष्ट बुद्धीत लिप्त होऊन तो आपली पत गमावून बसतो. क्वचित कोणी जीव सतगुरूकडून

उपदेश प्राप्त करून प्रभुभक्ती प्राप्त करतो. ॥ १ ॥ वास्तविक योगाचा उद्देश हा आहे, की योग्याने सदैव सहजावस्थेत राहावे. असा योगी समदृष्टीने पाहतो. त्याच्या भिक्षेचा खरा अर्थ असा आहे, की त्याने प्रभुनामाने तृप्त होऊन राहावे ॥ १ ॥ रहाउ ॥ पंचज्ञानेंद्रियरूपी बैल, हा शरीररूपी गाडा ओढतात. पण ह्या शरीररूपी गाडीचा कणा (प्राण) तोच तुटल्यावर (निघून गेल्यावर) गाडी मोडून पडते. गाडीची लाकडे जळून जातात. भाव शरीरातून प्राण निघून गेल्यावर शरीर मृत होऊन पडते व देह जळून जातो. ॥ २ ॥ म्हणून हे योगी तू शब्दगुरूचे (प्रभुनामाचे) चिंतन कर. सुख-दु:ख, संयोग-वियोग ह्यांना समान मान. सतगुरुकडून प्राप्त झालेल्या प्रभुनामरूपी भोजनाचा स्वाद घे. त्याचे चिंतन कर. त्यामुळे तुझे मन स्थिर होऊन तू त्या निराकार प्रभू परमात्म्याचे स्मरण करशील. ॥ ३ ॥ हे योगी तू सहजावस्थारूपी लंगोट परिधान कर. त्यामुळे तू मोहमायेच्या बंधनातून मुक्त होशील. गुरूच्या उपदेशाने मनातील क्रोध, काम आदी विकार नष्ट होतील. त्या प्रभू परमात्म्यास शरण जाणे म्हणजेच मनात मुद्रा धारण करणे होय. नानक सांगतात, प्रभूचे सेवक रामभक्तीने हा भवसागर तरून जातात. ॥४॥११॥

॥ रामकली महला ३ घरु १ ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

सतजुगि सचु कहै सभु कोई ॥ घरि घरि भगति गुरमुखि होई ॥
सतजुगि धरमु पैर है चारि ॥ गुरमुखि बूझै को बीचारि ॥ १ ॥
जुग चारे नामि वडिआई होई ॥
जि नामि लागै सो मुकति होवै गुर बिनु नामु व पावै कोई ॥ १ ॥ रहाउ ॥
त्रेतै इक कल कीनी दूरि ॥ पाखंडु वरतिआ हरि जाणनि दूरि ॥
गुरमुखि बूझै सोझी होई ॥ अंतरि नामु वसै सुखु होई ॥ २ ॥
दुआपुरि दूजै दुबिधा होइ ॥ भरमि भुलाने जाणहि दोइ ॥
दुआपुरि धरमि दुइ पैर रखाए ॥ गुरमुखि होवै त नामु द्रिड़ाए ॥ ३ ॥
कलजुगि धरम कला इक रहाए ॥ इक पैरि चलै माइआ मोहु वधाए ॥
माइआ मोहु अति गुबारु ॥ सतगुरु भेटै नामि उधारु ॥ ४ ॥
सभ जुग महि साचा एको सोई ॥ सभ महि सचु दूजा नही कोई ॥
साची कीरति सचु सुखु होई ॥ गुरमुखि नामु वखाणै कोई ॥ ५ ॥
सभ जुग महि नामु ऊतमु होई ॥ गुरमुखि विरला बूझै कोई ॥
हरि नामु धिआए भगतु जनु सोई ॥ नानक जुगि जुगि नामि वडिआई होई ॥६॥१॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८०)

शब्दार्थ : **सतजुगी** – सत्ययुगात. **पैर** – पाय. **को** – कोणी. **नामि** – नामसाधनेने. **वडिआई** – महत्त्व, श्रेष्ठत्व. **जि** – जो. **त्रेतै** – त्रेतायुगात. **इक** – एक. **कल** – शक्ती. **वरतिआ** – व्यवहारात आले, सुरु झाले. **सोझी** – ज्ञान, समज. **दुआपुरि** – द्वापारयुगात. **दुजै** – द्वैतभाव. **दुबिधा** – द्विधा. **दोइ** – द्वैत. **दुइ** – दोन.

कलजुगि – कलियुगात. **गुबार** – अंधार. **साचा** – सत्यरूप प्रभू. **दूजा** – दुसरा. **कीरती** – कीर्ती. **वखाणे** – वर्णन करणे, कथन करणे.

भावार्थ : सत्ययुगात सर्व लोक सत्य बोलत असत. सर्व सत्याचरी होते. घरोघर लोक सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभू परमात्म्याची भक्ती करत असत. सत्ययुगात धर्म चार पायावर उभा होता. लोक सतगुरूचे मुखाने ज्ञान प्राप्त करीत. ॥ १ ॥ चारही युगात नामाचे माहात्म्य आहे. सतगुरूशिवाय नाम प्राप्त होत नाही. जो नाममार्गी झाला तो मुक्त होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्रेतायुगात धर्माची एक शक्ती नष्ट झाली. लोक पाखंडी होऊन प्रभू परमात्मा दूर आहे असे समजू लागले. सतगुरूकडून ज्यास ज्ञान प्राप्त होते तोच हे जाणतो की प्रभू जवळच आहे. त्याच्या अंत:करणात प्रभूनामाचा वास होतो व तो सुखी होतो. ॥ २ ॥ द्वापारयुगात धर्मास दोनच पाय उरले त्यामुळे द्वापारयुगात लोकांच्या मनात द्वैतभाव उत्पन्न झाल्याने त्याची द्विधा मन:स्थिती होते. लोकांच्या मनात भ्रम उत्पन्न झाल्याने ते स्वत:ला प्रभूपासून वेगळे समजू लागले. जो गुरुमुख होतो त्याच्या मनात प्रभुनाम दृढ होते. ॥ ३ ॥ कलियुगात धर्माला एकच शक्ती उरली. धर्माला एकच पाय उरला त्यामुळे मोहमाया वाढली. मोहमायेमुळे सर्वत्र अज्ञान, अंधकार पसरला. ज्यास सतगुरू भेटतो त्याचा प्रभुनामाच्या साहाय्याने उद्धार होतो. ॥ ४ ॥ सर्व युगात तो एकमेव सत्यस्वरूप परमात्मा विद्यमान आहे. सर्व जीवांचे ठायी सत्य भरून राहिले आहे. अन्य काहीही नाही. त्या प्रभू परमात्म्याची कीर्ती सत्य आहे व सुख प्राप्त करून देणारी आहे. सतगुरूच्या उपदेशाने कोणी विरळा प्रभुनाम कथन करतो. ॥ ५ ॥ सर्व युगात प्रभुनाम श्रेष्ठ आहे. कोणी विरळा सतगुरूकडून हे ज्ञान प्राप्त करतो. नानक सांगतात, जे प्रभुसेवक भक्तगण प्रभुनामाचे ध्यान करतात त्याना युगानुयुगे महती प्राप्त होते. ॥ ६ ॥ १ ॥

रामकली महला ४ घरु १

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

जे वडभाग होवहि वडभागी ता हरि हरि नामु धिआवै ॥
नामु जपत नामे सुखु पावै हरि नामे नामि समावै ॥ १ ॥
गुरमुखि भगति करहु सद प्राणी ॥
हिरदै प्रगासु होवै लिव लागै गुरमति हरि हरि नामि समाणी ॥ १ ॥ रहाउ ॥
हीरा रतन जवेहर माणक बहु सागर भरपूरु कीआ ॥
जिसु वडभागु होवै वड मसतकि तिनि गुरमति कढि कढि लीआ ॥ २ ॥
रतनु जवेहरु लालु हरि नामा गुरि काढि तली दिखलाइआ ॥
भागहीण मनमुखि नही लीआ त्रिण ओलै लाखु छपाइआ ॥ ३ ॥
मसतकि भागु होवै धुरि लिखिआ ता सतगुरू सेवा लाए ॥
नानक रतन जवेहर पावै धनु धनु गुरमति हरि पाए ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८८०)

शब्दार्थ : **जे** – जर. **वडभाग** – भाग्यवान. **ता** – तर. **नामे** – नामात. **भागहीण** – भाग्यहीन. **त्रिण** – गवत. **छपाइआ** – लपवले. **पावै** – प्राप्त करतो. **धनु** – धन्य.

भावार्थ : जर भाग्यशाली माणसाचे भाग्य महान असेल, तर तो प्रभुनामाचे स्मरण करतो. सुख प्राप्त करतो व हरिनामाशी एकरूप होऊन जातो. ॥ १ ॥ हे जीवा ! तू सतगुरूच्या उपदेशानुसार आचरण करून सदैव प्रभुभक्ती कर. गुरूच्या उपदेशाने हृदयात आत्मज्ञानाचा प्रकाश पसरतो. जीव प्रभुनामात तल्लीन होतो व प्रभुनामाशी एकरूप होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सर्व जीवांच्या शरीररूपी सागरात प्रभुनामरूपी हिरे, रत्ने, जवाहर भरून राहिली आहेत. ज्याच्या भाग्यात असेल तो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून रत्नांचा हा खजिना प्राप्त करतो. ॥२॥ सतगुरूच जीवाच्या देहात अवस्थित असलेला नाममरूपी रत्नाचा खजिना प्रगट करून दाखवतो. पण भाग्यहीन, मनमुख माणूस मात्र आपल्या भौतिक जीवनरूपी गवतात लपलेला हा लाखमोलाचा खजिना प्राप्त करू शकत नाही. ॥ ३ ॥ ज्याच्या भाग्यात आधीपासूनच तसा योग लिहिला असेल त्यास सतगुरू प्रभुसेवेस लावतो. नानक सांगतात, धन्य धन्य ते सतगुरू की ज्यांच्या उपदेशाने जीवास नामरूपी जवाहर प्राप्त होते. ॥ ४ ॥ १ ॥

॥ रामकली महला ४ ॥

राम जना मिलि भइआ अनंदा हरि नीकी कथा सुनाइ ॥
दुरमति मैलु गई सभ नीकलि सतसंगति मिलि बुधि पाइ ॥ १ ॥
राम जन गुरमति रामु बोलाइ ॥
जो जो सुणै कहै सो मुकता राम जपत सोहाइ ॥ १ ॥ रहाउ ॥
जे वडभाग होवहि मुखि मसतकि हरि राम जना भेटाइ ॥
दरसनु संत देहु करि किरपा सभु दालदु दुखु लहि जाइ ॥ २ ॥
हरि के लोग राम जन नीके भागहीण न सुखाइ ॥
जिउ जिउ राम कहहि जन ऊचे नर निंदक डंसु लगाइ ॥ ३ ॥
धिगु धिगु नर निंदक जिन जन नही भाए हरि के सखा सखाइ ॥
से हरि के चोर वेमुख मुख काले जिन गुर की पैज न भाइ ॥ ४ ॥
दइआ दइआ करि राखहु हरि जीउ हम दीन तेरी सरणाइ ॥
हम बारिक तुम पिता प्रभ मेरे जन नानक बखसि मिलाइ ॥ ५ ॥ २ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८८०)

शब्दार्थ : **नीकी** – सुंदर. **मैलु** – मळ. **बोलाइ** – स्मरण करतात. **सोहाइ** – सुंदर वाटते. **दालदु** – दारिद्र्य. **लहि** – लयाला. **डंसु** – दंश. **वेमुख** – विमुख. **पैज** – प्रतिष्ठा.

भावार्थ : रामसेवकांना भेटल्याने मला आनंद झाला. त्यांनी मला सुंदर हरिकथा ऐकवली. संत संगतीने माझ्या मनातील दुष्टबुद्धीरूपी मळ निघून गेला व मला सुबुद्धी प्राप्त झाली. ॥ १ ॥ सतगुरूच्या उपदेशाने रामसेवक रामाचे स्मरण करतात. जो जो जीव प्रभुनाम ऐकतो, सांगतो तो सुंदर असे रामनामाचा जप करून मुक्त होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याच्या मुखी, मस्तकी महाभाग्य लिहिले असेल त्यास रामसेवक भेटतात. संतजनहो ! कृपा

करून मला दर्शन द्या. त्यामुळे माझे दु:ख, दैन्य, दारिद्र्य लयास जाईल. ॥ २ ॥ हरीच्या लोकांना रामसेवक चांगले वाटतात पण भाग्यहीनांना ते आवडत नाहीत. जो जो प्रभुसेवक प्रभुनामाचे उच्चारण करतो, तो तो निंदक त्याला दंश करून त्याच्या मार्गात अडथळे आणतात. ॥ ३ ॥ अशा निंदकांचा धिक्कार असो. ज्यांना प्रभुसेवक व प्रभूचे लाडके आवडत नाहीत असे लोक चोर आहेत. प्रभू परमात्म्यापासून पराङ्मुख झाले आहेत. ते काळतोंडे आहेत. त्यांना गुरूची प्रशंसा आवडत नाही. हे प्रभो ! मी दीन तुला शरण आलो आहे. माझ्यावर दया कर व माझे रक्षण कर. नानक सांगतात, हे प्रभो ! मी तुझे बाळ आहे. तू माझा पिता आहेस. माझ्यावर कृपा कर आणि मला तुझ्याशी एकरूप करून घे. ॥ ५ ॥ २ ॥

॥ रामकली महला ४ ॥

हरि के सखा साध जन नीके तिन ऊपरि हाथु वतावै ॥
गुरमुखि साध सेई प्रभ भाए करि किरपा आपि मिलावै ॥ १ ॥
राम मोकउ हरि जन मेलि मनि भावै ॥
अमिउ अमिउ हरि रसु है मीठा मिलि संत जना मुखि पावै ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि के लोग राम जन ऊतम मिलि ऊतम पदवी पावै ॥
हम होवत चेरी दास दासन की मेरा ठाकुरु खुसी करावै ॥ २ ॥
सेवक जन सेवहि से वडभागी रिद मनि तनि प्रीति लगावै ॥
बिनु प्रीती करहि बहु बाता कूडु बोलि कूड़ो फलु पावै ॥ ३ ॥
मोकउ धारि क्रिपा जगजीवन दाते हरि संत पगी ले पावै ॥
हउ काटउ काटि बाढि सिरु राखउ जितु नानक संतु चड़ि आवै ॥ ४ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८१)

शब्दार्थ : **वतावै** – ठेवतो. **मेलि** – भेटव. **अमिउ** – अमृत. **चेरी** – दासी. **खुसी करावै** – प्रसन्न. **रिद** – हृदय. **कूडु** – असत्य.

भावार्थ : साधुसंत, हे प्रभू परमात्म्याचे मित्र, सुंदर असतात. त्यांच्यावर सदैव प्रभुकृपेचा वरदहस्त असतो. गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारे साधू प्रभू परमात्म्यास आवडतात. तो स्वत: त्यांच्यावर कृपा करून त्यांना आपल्याशी एकरूप करून घेतो. ॥ १ ॥ हे प्रभो ! मला हरिसेवक भेटव. मला ते आवडतात. प्रभुनामामृत मधुर असते. संतजनांच्या भेटीने त्याची प्राप्ती होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ हरीचे सेवक श्रेष्ठ असतात. त्याच्या संगतीत राहणारास श्रेष्ठपद प्राप्त होते. मी प्रभुसेवकांच्या दासांची दासी आहे. माझा स्वामी, प्रभू परमात्मा मला खूष करतो. ॥ २ ॥ जे प्रभूचे सेवक प्रभूची सेवा करतात ते भाग्यशाली होत. त्यांच्या हृदयात, तन, मनात सदैव प्रभू परमात्म्याबद्दल प्रेम असते. मनात प्रेम नसताना निव्वळ गोड गोड बोलणारे खोटे बोलतात. त्याचे कडू फळ त्यांना प्राप्त होते. ॥ ३ ॥ हे जगजीवन प्रभो ! माझ्यावर कृपा करा व मला संतांचे चरण लाभू द्या. मी माझे मस्तक कापून त्यांच्या मार्गावर ठेवीन. त्यावर पाय देऊन ते माझ्यापर्यंत पोहोचतील. ॥ ४ ॥ ३ ॥

॥ रामकली महला ४ ॥

जे वडभाग होवहि वड मेरे जन मिलदिआ ढिल न लाईऐ ॥
हरि जन अंम्रित कुंट सर नीके वडभागी तितु नावाईऐ ॥ १ ॥
राम मोकउ हरि जन कारै लाईऐ ॥
हउ पाणी पखा पीसउ संत आगै पग मलि मलि धूरि मुखि लाईऐ ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि जन वडे वडे ऊचे जो सतगुर मेलि मिलाइऐ ॥
सतगुर जेवडु अवरुन न कोई मिलि सतगुर पुरख धिआईऐ ॥ २ ॥
सतगुर सरणि परे तिन पाइआ मेरे ठाकुर लाज रखाईऐ ॥
इकि अपणै सुआइ आइ बहहि गुर आगै जिउ बगुल समाधि लगाईऐ ॥ ३ ॥
बगुला काग नीच की संगति जाइ करंग बिखू मुखि लाईऐ ॥
नानक मेलि मेलि प्रभ संगति मिलि संगति हंसु कराईऐ ॥ ४ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८१)

शब्दार्थ : **ढिल** – उशीर. **कुंट** – कुंड. **सर** – सरोवर. **कारै** – सेवेस. **आगै** – समक्ष. **धुरि** – धूळ. **सुआइ** – स्वार्थ. **बहहि** – बसतात. **बगुल** – बगळा. **करंग** – .

भावार्थ : जर भाग्य थोर असेल तर प्रभू परमात्म्याशी मिलन होण्यास जराही वेळ लागत नाही. हरीचे सेवक हे अमृताचे कुंड व अमृतसरोवरासारखे आहेत. भाग्यवान लोक त्यात स्नान करतात. त्यांच्या संगतीत राहतात. ॥ १ ॥ हे रामा ! मलाही संतांच्या सेवेस लाव. मी त्यांच्याकडे पाणी भरीन, त्यांना पंख्याने वारा घालीन, त्यांचे दळण दळीन, त्यांचे पाय चेपीन, त्यांच्या चरणरजांचे सेवन करीन. ॥ १ ॥ रहाउ ॥ हरीचे सेवक महान व श्रेष्ठ असतात. ते जीवाची सतगुरूशी भेट घडवतात. सतगुरूएवढा अन्य कोणीही नाही. सतगुरूमुळेच जीव प्रभू परमात्म्याचे, त्या कर्त्यापुरुषाचे ध्यान करतो. ॥ २ ॥ तो सतगुरूस शरण जातो व प्रभू परमात्मा प्राप्त करतो. प्रभू परमात्मा स्वत: त्याची लाज राखतो. कोणी आपल्या स्वार्थासाठी सतगुरूच्या पुढे येऊन बसतो. जसा बगळा समाधी लावून बसतो. ॥ ३ ॥ जो बगळा व कावळ्यासारख्या नीच लोकांची संगत धरतो. त्याच्या मुखी विष व विष्ठाच पडते. नानक सांगतात, हे प्रभो ! मला संतांची संगत प्राप्त होऊ दे. कारण संतसंगतीनेच सामान्य जीवाचे हंसात रूपांतर होते. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ रामकली महला ४ ॥

सतगुर दइआ करहु हरि मेलहु मेरे प्रीतम प्राण हरि राइआ ॥
हम चेरी होइ लगह गुर चरणी जिनि हरि प्रभ मारगु पंथ दिखाइआ ॥ १ ॥
राम मै हरि हरि नामु मनि भाइआ ॥
मै हरि बिनु अवरु न कोई बेली मेरा पिता माता हरि सखाइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
मेरे इकु खिनु प्रान न रहहि बिनु प्रीतम बिनु देखे मरहि मेरी माइआ ॥

धनु धनु वडभाग गुर सरणी आए हरि गुर मिलि दरसनु पाइआ ॥ २ ॥
मै अवरु न कोई सूझै बूझै मनि हरि जपु जपउ जपाइआ ॥
नामहीण फिरहि से नकटे तिन घसि घसि नक वढाइआ ॥ ३ ॥
मोकउ जग जीवन जीवालि लै सुआमी रिद अंतरि नामु वसाइआ ॥
नानक गुरू गुरू है पूरा मिलि सतिगुर नामु धिआइआ ॥ ४ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८२)

शब्दार्थ : **भाइआ** – आवडले. **बेली** – सखा, मित्र. **नामहीण** – . **से** – ते. **जीवालि** – आत्मिक जीवन. **नकटे** – नकटा, अप्रतिष्ठित. **नक** – नाक. **वढाइआ** – कापले.

भावार्थ : हे सतगुरू ! माझ्यावर दया कर. माझी माझ्या प्राणप्रिय हरिरायाशी भेट घडव. ज्या गुरूने मला हरीप्रभूचा मार्ग दाखवलास त्याची मी दासी होऊन त्याच्या चरणी शरण जाईन. ॥ १ ॥ हे रामा ! माझ्या मनाला प्रभुनाम आवडते. माझा हरीशिवाय अन्य कोणीही सखा नाही. हरीच माझी माता, हरीच माझा पिता. हरीच माझा सखा. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे माते ! मी प्रियतमास पाहिल्यावाचून एक क्षणभरही जगू शकत नाही. तो दिसला नाही तर मी मरून जाईन. जे गुरूला शरण जाऊन प्रभू परमात्म्याचे दर्शन प्राप्त करतात, ते भाग्यवान जीव धन्य होत. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्याशिवाय मला अन्य कोणी सुचत नाही. अन्य कोणाचा विचारही माझ्या मनात येत नाही. हे प्रभो मी केवळ तुझेच नामस्मरण करतो. प्रभुनामविहीन जीव अपमानित होऊन जगभर हिंडतात. लोकांपुढे नाक घासून घासून तुच्छ जिणे जगतात. ॥ ३ ॥ हे जगजीवन परमात्मा मला आत्मिक जीवन दे. माझ्या हृदयात प्रभुनाम वसू दे. नानक सांगतात, ज्यास पूर्णगुरू प्राप्त होतो तो सतगुरूच्या मार्गदर्शनानुसार प्रभुनामाचे स्मरण करतो. ॥ ४ ॥ ५ ॥

॥ रामकली महला ४ ॥

सतगुरु दाता वडा वड पुरखु है जितु मिलिऐ हरि उरधारे ॥
जीअ दानु गुरि पूरै दीआ हरि अंम्रित नामु समारे ॥ १ ॥
राम गुरि हरि हरि नामु कंठि धारे ॥
गुरमुखि कथा सुणी मनि भाई धनु धनु वडभाग हमारे ॥ १ ॥ रहाउ ॥
कोटि कोटि तेतीस धिआवहि ता का अंतु न पावहि पारे ॥
हिरदै काम कामनी मागहि रिधि मागहि हाथु पसारे ॥ २ ॥
हरि जसु जपि जपु वडा वडेरा गुरमुख रखउ उरिधारे ॥
जे वडभाग होवहि ता जपीऐ हरि भउजलु पारि उतारे ॥ ३ ॥
हरि जन निकटि निकटि हरि जन है हरि राखै कंठि जन धारे ॥
नानक पिता माता है हरि प्रभु हम बारिक हरि प्रतिपारे ॥ ४ ॥ ६ ॥ १८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८२)

शब्दार्थ : **उरधारे** – हृदयाशी धरतो. **समारे** – स्मरण करणे. **धिआवहि** – ध्यान करतात. **रिधि** – ऋद्धी.

भउजलु – भवसागर. **निकटि** – निकट, जवळ. **प्रतिपारे** – प्रतिपाळ करतो.

भावार्थ : सतगुरू महादाता आहे. महापुरुष आहे. ज्यास तो प्राप्त होतो तो प्रभू परमात्म्यास आपल्या हृदयात धारण करतो. पूर्णगुरूने मला आत्मिक जीवन दिले आहे. त्यामुळे मी प्रभूच्या अमृतनामाचे स्मरण करतो. ॥ १ ॥ राम हाच गुरू आहे. त्याच्याच कृपेने मी हरिनाम माझ्या कंठात धारण केले आहे. माझे महाभाग्य की मी गुरूमुखातून हरिकथा ऐकली व ती मला आवडली. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्या प्रभू परमात्म्याचे तेहेतीस कोटी देव ध्यान करतात पण कोणासही त्याचे पूर्ण ज्ञान होत नाही, त्याचा पारावार लागत नाही. त्यांच्या मनात कायम काम व कामिनीचाच विचार घोळत असतो. ते हात पसरून 'ऋद्धी' म्हणजे धन दौलत मागतात. ॥ २ ॥ हे जीवा ! गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून त्या महान श्रेष्ठ प्रभू परमात्म्यास हृदयात धारण कर व प्रभूचे यशोगान करत राहा. ज्यांचे भाग्य थोर असते ते हरिनामाचा जप करून भवसागर पार करतात. ॥ ३ ॥ हरीचे सेवक हरीच्या समीप असतात आणि हरी आपल्या सेवकांच्या समीप असतो. हरी आपल्या सेवकांना आपल्या हृदयाशी धरतो. नानक सांगतात, हरी हाच आमचा पिता, हरीच आमची माता. आम्ही त्याची बालके. तोच आमचा प्रतिपाळ करतो.॥४॥६॥१८॥

रागु रामकली महला ५ घरु १

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

किरपा करहु दीन के दाते मेरा गुणु अवगणु न बीचारहु कोई ॥
माटी का किआ धोपै सुआमी माणस की गति एही ॥ १ ॥
मेरे मन सतिगुरू सेवि सुखु होई ॥
जो इछहु सोई फलु पावहु फिरि दूखु न विआपै कोई ॥ १ ॥ रहाउ ॥
काचे भाडे साजि निवाजे अंतरि जोति समाई ॥
जैसा लिखतु लिखिआ घुरि करतै हम तैसी किरति कमाई ॥ २ ॥
मनु तनु थापि कीआ सभु अपना एहो आवण जाणा ॥
जिनि दीआ सो चिति न आवै मोहि अंधु लपटाणा ॥ ३ ॥
जिनि कीआ सोई प्रभु जाणै हरि का महलु अपारा ॥
भगति करी हरि के गुण गावा नानक दासु तुमारा ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८८२)

शब्दार्थ : **बीचारहु** – विचार करणे. **माटी** – माती. **धोपे** – धुणे. **एही** – ही, अशी. **काचे** – कच्चे. **भाडे** – भांडे. **साजि** – . **निवाजे** – . **लिखतु** – लेख. **लिखिआ** – लिहिला. **करतै** – कर्ता, प्रभू. **किरति** – कार्य. **थापि** – . **किआ** – केले. **लपटाणा** – लिप्त झाला.

भावार्थ : हे दीनदयाळा ! माझ्या गुणावगुणांचा विचार न करता माझ्यावर कृपा कर. माती कितीही धुतली तरी अखेर मातीच उरते. तशीच गत माणसाची आहे. ॥ १ ॥ हे माझ्या मना ! सतगुरूची सेवा केल्याने सुखाची प्राप्ती होते. मनोवांछित फल प्राप्त होते. परत कोणतेही दुःख जीवास व्यापू शकत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्म्याने हे

नश्वर शरीर निर्माण केले. त्यास सजवले. त्यामध्ये आपली आत्मज्योत स्थापित केली. त्यानेच माणसाच्या भाग्यलेखात जसे लिहिले असेल त्यानुसार, त्याप्रमाणेच माणूस कर्म करतो. ॥ २ ॥ माणसाने तन, मन आपलेच मानले व वास्तविक ज्याने हे त्यास दिले त्या प्रभूस मात्र तो विसरला व मोहमायेत लिप्त झाला. त्यामुळेच तो जन्ममरणाच्या चक्रात गुंतून पडला. ॥ ३ ॥ ज्याने हे सर्व केले तो प्रभू सर्व काही जाणतो. त्याचा महिमा अपार आहे. नानक म्हणतात, हे प्रभो ! मी तुझा दास तुझी भक्ती करतो व तुझे गुणगान गातो. ॥ ४ ॥ १ ॥

॥ रामकली महला ५ ॥

पवहु चरणा तलि ऊपरि आवहु ऐसी सेव कमावहु ॥
आपस ते ऊपरि सभ जाणहु तउ दरगह सुखु पावहु ॥ १ ॥
संतहु ऐसी कथहु कहाणी ॥
सुर पवित्र नर देव पवित्रा खिनु बोलहु गुरमुखि बाणी ॥ १ ॥ रहाउ ॥
परपंचु छोडि सहज घरि बैसहु झूठा कहहु न कोई ॥
सतिगुर मिलहु नवै निधि पावहु इन बिधि ततु बिलोई ॥ २ ॥
भरमु चुकावहु गुरमुखि लिव लावहु आतमु चीनहु भाई ॥
निकटि करि जाणहु सदा प्रभु हाजरु किसु सिउ करहु बुराई ॥ ३ ॥
सतिगुरि मिलिऐ मारगु मुकता सहजे मिले सुआमी ॥
धनु धनु से जन जिनी कलि महि हरि पाइआ जन नानक सद कुरबानी ॥ ४ ॥ २ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८८३)

शब्दार्थ : **पवहु** – पड. **आपस** – आपल्याहून. **परपंचु** – प्रपंच. **नवै** – नऊ. **बिलाइ** – मंथन करणे. **चीनहु** – चिंतन कर. **हाजरु** – सर्वव्याप्त.

भावार्थ : हे जीवा ! तू अशी सेवा कर की ज्यामुळे तू प्रभूच्या पायाखालची धूळ बनून राहशील. सर्व जणांना आपल्याहून श्रेष्ठ समजशील. असे केल्याने तुला प्रभू दरबारात सुख प्राप्त होईल. ॥ १ ॥ हे संतजनहो ! अशी कथा ऐकवा की जी ऐकताच देव, देवता, नर सारे क्षणात पवित्र होतील. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून अशा कथेचा उच्चार करा. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! संसारातील कोणतीही गोष्ट तू असत्य समजू नकोस. फक्त प्रपंचाचा मोह सोड व सहजावस्थेत राहा. सतगुरू प्राप्त करून त्याच्या संगतीत परमतत्त्वाचे असे मंथन कर की ज्यामुळे तुला नऊ निधी प्राप्त होतील. ॥ २ ॥ हे बंधू ! मनातील सारे भ्रम दूर कर. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून प्रभू परमात्म्याशी चित्त एकाग्र कर व आपल्या स्वस्वरूपास ओळख. तो प्रभू परमात्मा सदैव जवळच आहे. तसेच तो सर्वत्र भरलेला आहे हे जाण म्हणजे मग तुझ्या मनात कोणाही विषयी वाईट विचारही येणार नाही. ॥ ३ ॥ सतगुरू प्राप्त झाला की मुक्तीचा मार्ग सहज सापडतो व प्रभू परमात्म्याशी मिलन होते. ज्या प्रभुसेवकांनी ह्या कलियुगात प्रभू परमात्मा प्राप्त केला ते धन्य होत. नानक त्यांच्या चरणी सर्वस्व समर्पित करतो. ॥ ४ ॥ २ ॥

॥ रामकली महला ५ ॥

आवत हरख न जावत दूखा नह बिआपै मन रोगनी ॥
सदा अनंदु गुरु पूरा पाइआ तउ उतरी सगल बिओगनी ॥ १ ॥
इह बिधि है मनु जोगनी ॥
मोह सोगु रोगु लोगु न बिआपै तह हरि हरि हरि रस भोगनी ॥ १ ॥ रहाउ ॥
सुरग पवित्रा मिरत पवित्रा पइआल पवित्र अलोगनी ॥
आगिआकारी सदा सुखु भुंचै जत कत पेखउ हरि गुनी ॥ २ ॥
नह सिव सकती जलु नही पवना तह अकारु नही मेदनी ॥
सतिगुर जोग का तहा निवासा जह अविगत नाथु अगम धनी ॥ ३ ॥
तनु मनु हरि का धनु सभु हरि का हरि के गुण हउ किआ गनी ॥
कहु नानक हम तुम गुरि खोई है अंभै अंभु मिलोगनी ॥ ४ ॥ ३ ॥(श्री गु. ग्रं. सा. ८८३)

शब्दार्थ : **आवत** – येण्याने. **हरख** – हर्ष. **जावत** – जाण्याने. **उतरी** – दूर होते. **बिओगनी** – वियोग. **जोगनी** – योग. **लोगु** – लोकलज्जा. **सुरग** – स्वर्ग. **मिरत** – मृत्युलोक. **पइआल** – पाताळ. **अलोगनी** – अलौकिक. **अगिआकारी** – आज्ञाधारक. **भुंचै** – भोगतो. **सिव** – शिव. **सकती** – शक्ती. **अविगत** – अव्यक्त. **अगम** – अगम्य. **अंभु** – पाणी.

भावार्थ : मन प्रभू परमात्म्याशी एकरूप झाले की मग धनसंपत्ती आली तरी सुख होत नाही, गेली तरी दुःख होत नाही. मनाला कोणताही रोग व्यापू शकत नाही. पूर्णगुरू प्राप्त झाला की जीवास सदैव आनंद प्राप्त होतो व सर्व दुःख नष्ट होते. ॥ १ ॥ ह्या मार्गाने मन प्रभूशी एकरूप होते. अशा व्यक्तीला मग मोह, शोक, रोग, लोकलज्जा काहीही व्यापू शकत नाही. तो सदैव हरिनामरसात निमग्न होऊन राहतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्याला स्वर्गही पवित्र वाटतो. मृत्युलोकही पवित्र वाटतो व पाताळलोकही पवित्रच वाटतो. तो एक अलौकिक जीवन जगतो. तो प्रभू परमात्म्याच्या आज्ञेत राहून सदैव सुख भोगतो. जिकडे तो पाहतो तिकडे त्यास गुणसागर प्रभूचेच दर्शन घडते.॥२॥ तो अशा अवस्थेत असतो की जेथे जड नाही, चेतन नाही. सतगुरूशी एकरूप झाल्यामुळे तो अशा ठिकाणी वास करतो की त्या ठिकाणी केवळ अव्यक्त, अगम्य प्रभूचाच सर्वत्र वास असतो. ॥ ३ ॥ माझे तन, मन हे हरीचेच आहे. धनही त्याचेच आहे. प्रभू परमात्म्याच्या गुणांची गणती मी पामर काय करणार ? सतगुरूने माझ्या मनातील मी, तू हा भाव काढून टाकला आहे. मी आता प्रभू परमात्म्याशी इतका एकरूप झालो आहे की जसे पाणी पाण्यात मिसळून जाते. ॥ ४ ॥३॥

॥ रामकली महला ५ ॥

त्रै गुण रहत रहै निरारी साधिक सिध न जानै ॥
रतन कोठड़ी अंम्रित संपूरन सतिगुर कै खजानै ॥ १ ॥
अचरजु किछु कहणु न जाई ॥ बसतु अगोचर भाई ॥ १ ॥ रहाउ ॥

मोलु नाही कछु करणै जोगा किआ को कहै सुणावै ॥
कथन कहण कउ सोझी नाही जो पेखै तिसु बणि आवै ॥ २ ॥
सोई जाणै करणैहारा कीता किआ बेचारा ॥
आपणी गति मिति आपे जाणै हरि आपे पूर भंडारा ॥ ३ ॥
ऐसा रसु अंम्रितु मनि चाखिआ त्रिपति रहे आघाई ॥
कहु नानक मेरी आसा पूरी सतिगुर की सरणाई ॥ ४ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८८३)

शब्दार्थ : **त्रैगुण** – तीन गुण. सत्त्व, रज, तम. **निरारी** – वेगळी, निराळी, अलिप्त. **अचरजु** – आश्चर्य. **अगोचर** – न दिसणारी. **जोगा** – योग्य. **सोझी** – सुचणे. **पेखै** – पाहिले. **बणि आवै** – एकरूप होतो. **अघाई** – पूर्ण तृप्त.

भावार्थ : प्रभुनाम ही गोष्ट त्रिगुणापेक्षा अलिप्त व निराळीच आहे. सिद्ध वा साधक कोणासही त्याचे पूर्ण ज्ञान नाही. सतगुरूचे भांडार प्रभुनामरूपी रत्नांनी संपूर्ण भरलेले आहे. ॥ १ ॥ प्रभुनाम ही गोष्ट इतकी आश्चर्यजनक आहे की कोणीही त्याचे वर्णन करू शकत नाही. ती वस्तू मानवाच्या ज्ञानेंद्रियांच्या पलीकडची, अगोचर आहे.॥१॥रहाउ॥ त्याचे (प्रभुनामाचे) निश्चित मूल्य कोणीही करू शकत नाही. मग त्याबद्दल कोणीही काहीही सांगोत. त्याच्याबद्दल काय बोलावे, काय सांगावे हे समजतच नाही. ज्यास त्याचे दर्शन घडते तो त्याच्याशी एकरूप होऊन जातो. ॥ २ ॥ ज्या प्रभू परमात्म्याने हे सारे निर्माण केले तोच त्यास यथार्थपणे जाणतो. जीव बिचारा काय सांगणार? आपली गतिविधी तो प्रभू परमात्माच स्वत: जाणतो. प्रभू परमात्माच स्वत: परिपूर्ण नामभांडार आहे. ॥ ३ ॥ ज्याने या अमृतासमान मधुर प्रभुनामाची गोडी चाखली तो पूर्ण तृप्त होतो. नानक सांगतात की सतगुरूस शरण गेल्याने माझी आशा पूर्ण झाली. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ रामकली महला ५ ॥

अंगीकारु कीआ प्रभि अपनै बैरी सगले साधे ॥
जिनि बैरी है इहु जगु लूटिआ ते बैरी लै बाधे ॥ १ ॥
सतिगुरू परमेसरू मेरा ॥
अनिक राज भोग रस माणी नाउ जपी भरवसा तेरा ॥ १ ॥ रहाउ ॥
चीति न आवसि दूजी बाता सिर ऊपरि रखवारा ॥
बेपरवाहु रहत है सुआमी इक नाम कै आधारा ॥ २ ॥
पूरन होइ मिलिओ सुखदाई ऊन न काई बाता ॥
ततु सारू परम पदु पाइआ छोडि न कतहु जाता ॥ ३ ॥
बरनि न साकउ जैसा तू है साचे अलख अपारा ॥
अतुल अथाह अडोल सुआमी नानक खसमु हमारा ॥ ४ ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८८४)

शब्दार्थ : **अंगीकारु** – अंगीकार, स्वीकार. **साधे** – ताब्यात आणले. **जिनि** – ज्या. **बाधे** – बद्ध. **माणि** – भोगतो. **नाउ** – नाम. **भरवसा** – आश्रय, विश्वास. **रखवारा** – रक्षण. **बेपरवाहु** – निश्चिंत. **ऊन** – न्यून, उणेपणा. **ततु** – तत्त्व. **सारू** – सार. **छोडि** – सोडून. **बरनि** – वर्णन. **खसमु** – प्रभू.

भावार्थ : माझ्या प्रभू परमात्म्याने माझा स्वीकार केल्यामुळे माझे सर्व शत्रू (काम, क्रोध आदी विकार) माझ्या ताब्यात आले आहेत. ज्या वैऱ्यांनी हे सारे जग लुटले आहे त्यांना मी प्रभुकृपेने बद्ध केले आहे. ॥ १ ॥ सतगुरू हाच माझा परमेश्वर. त्याच्या कृपेनेच मी राजवैभव भोगत आहे. माझी त्याच्यावर पूर्ण श्रद्धा आहे. मी सदैव तुझे नामस्मरण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझ्या मनात आता प्रभू परमात्म्याशिवाय अन्य कोणतीही गोष्ट नाही. माझ्या मस्तकी तुझा वरदहस्त आहे. तूच माझा रक्षणकर्ता आहेस. तुझ्या नामाच्या आधारामुळे मी आता निश्चिंत होऊन गेलो आहे. ॥ २ ॥ तो सुखदायी प्रभू परमात्मा प्राप्त झाल्यामुळे मी पूर्णत्वास पोहोचलो आहे. आता मला कशाहीची उणीव नाही. मला सर्व तत्त्वाचे सार असे परमपद प्राप्त झाले आहे. माझे मन त्याला सोडून आता अन्यत्र कोठेही जात नाही. ॥ ३ ॥ हे सत्यरूप अलक्ष्य, अपार प्रभू परमात्मा तुझे यथार्थ वर्णन मी करूच शकत नाही. नानक सांगतात, माझा स्वामी प्रभू परमात्मा अतुलनीय आहे. अथांग आहे. सदा स्थिर आहे. ॥४॥५॥

॥ रामकली महला ५ ॥

तू दाना तू अबिचल तूही तू जाति मेरी पाती ॥
तू अडोलु कदे डोलहि नाही ता हम कैसी ताती ॥ १ ॥
एकै एकै एक तूही । एकै एकै तू राइआ ॥
तउ किरपा ते सुखु पाइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
तू सागरु हम हंस तुमारे तुम महि माणक लाला ॥
तुम देवहु तिलु संक न मानहु हम भुंचह सदा निहाला ॥ २ ॥
हम बारिक तुम पिता हमारे तुम मुखि देवहु खीरा ॥
हम खेलह सभि लाड लडावह तुम सद गुणी गहीरा ॥ ३ ॥
तुम पूरन पूरि रहे संपूरन हम भी संगि अघाए ॥
मिलत मिलत मिलत मिलि रहिआ नानक कहणु न जाए ॥ ४ ॥ ६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८८४)

शब्दार्थ : **दाना** – ज्ञाता. **अबिचलु** – अविचल. **पाती** – उपजात. **ताती** – चिंता. **राइआ** – राजा, राया. **देवहु** – देताना. **संक** – शंका. **भुंचह** – भोगणे. **निहाला** – प्रसन्न. **बारिक** – बालक. **खीरा** – दूध. **अघाए** – तृप्त.

भावार्थ : हे प्रभो ! तू ज्ञानी आहेस. अविचल आहेस. तूच माझी जात तूच माझी पात. तू सदैव स्थिर आहेस. कधीही डगमगत नाहीस. मग आता मला कसली चिंता ? ॥ १ ॥ हे प्रभो ! तू एकमेव आहेस. साऱ्या सृष्टीचा तू एकमेव राजा आहेस. तुझ्या कृपेनेच आम्हास सुख प्राप्त होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ तू सागर आहेस. आम्ही त्यात

विहार करणारे हंस आहोत. तुझ्यामध्ये माणके भरलेली आहेत. ती देताना तू जराही संकोच करत नाहीस. त्याचे सेवन करून आम्ही आनंदित होतो. ॥ २ ॥ आम्ही तुझी बालके आहोत. तू आमचा पिता आहेस. तू आमच्या मुखी दूध पाजतोस. आम्ही खेळतो. तू आमचे सर्व लाड पुरवतोस. तू सदैव गंभीर व गुणवान आहेस. ॥ ३ ॥ हे प्रभो ! तू पूर्ण आहेस. सर्वव्याप्त आहेस. तुझ्या संगतीने आम्ही तृप्त झालो आहोत. आम्ही तुझ्याशी हळूहळू करत संपूर्णपणे एकरूप होऊन गेलो आहोत. नानक सांगतात, हे सारे वर्णनापलीकडे आहे. त्याचे कोणीही वर्णन करू शकत नाही. ॥ ४ ॥ ६ ॥

॥ रामकली महला ५ ॥

कर करि ताल पखावजु नैनहु माथै वजहि रबाबा ॥
करनहु मधु बासुरी बाजै जिहवा धुनि आगाजा ॥
निरति करे करि मनूआ नाचै आणे घूघर साजा ॥ १ ॥
राम को निरतिकारी ॥
पेखै पेखनहारु दइआला जेता साजु सीगारी ॥ १ ॥ रहाउ ॥
आखार मंडली धरणि सबाई ऊपरि गगनु चंदोआ ॥
पवनु विचोला करत इकेला जल ते ओपति होआ ॥
पंच ततु करि पुतरा कीना किरत मिलावा होआ ॥ २ ॥
चंदु सूरजु दुइ जरे चरागा चहु कुंट भीतरि राखे ॥
दस पातउ पंच संगीता एकै भीतरि साथे ॥
भिंन भिंन होइ भाव दिखावहि सभहु निरारी भाखे ॥ ३ ॥
घरि घरि निरति होवै दिनु राती घटि घटि वाजै तूरा ॥
एकि नचावहि एकि भवावहि इकि आइ जाइ होइ धूरा ॥
कहु नानक सो बहुरि न नाचै जिसु गुरु भेटै पूरा ॥ ४ ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ८८४)

शब्दार्थ : **कर** – हात. **करताल** – टाळ. **नैनहु** – डोळे. **करनह** – कान. **जिहवा** – जीभ. **अगाजा** – प्रगट होणे, उच्चार करणे. **निरति** – नृत्य. **घुघर** – घुंगरू. **निरतिकारी** – नृत्यकार. **पेखै** – पाहतो. **पेखनहार** – पाहणारा. **आखार** – आखाडा, रंगमंच. **चंदोआ** – चंद्रमा. **विचोला** – मध्यस्थ. **इकेला** – वेगवेगळे. **ओपति** – उत्पत्ती. **पुतरा** – पुतळा. **जरे** – जळतात, प्रकाश देतात. **चरागा** – दीपक. **पातउ** – वेश्या, नाचणाऱ्या. **पंचसंगिता** – विकाररूपी गायक. **भाखे** – भाषा. **तूरा** – वाद्ये. **नचावही** – नाचवतो. **भवावहि** – फिरवतो, भटकवतो. **धूरा** – धूळ. **बहुरि** – परत.

भावार्थ : हे प्रभो ! मी हाताचे टाळ, डोळ्यांचा पखवाज, मस्तकाचा तंबोरा व कानांची मधुर बासरी वाजवत आहे. माझी जिव्हा तुझ्या गुणस्तुतीचा ध्वनी उच्चारत आहे. मन संस्काररूपी घुंगरू घालून तुझ्यापुढे नृत्य करत आहे. ॥ १ ॥ मी प्रभुरामाचा नर्तक आहे. तो दयाळू प्रभू माझा सारा साजशृंगार पाहतो आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे सारे भूमंडल हा रंगमंच आहे. वर गगनरूपी छत आहे. श्वासरूपी वायू सर्व जीवांना स्वतंत्र अस्तित्व प्रदान करत आहे.

माझे हे शरीर पंचतत्त्वांचा पुतळा आहे. ॥ २ ॥ चंद्र-सूर्य हे दोन दीपक चारही दिशा प्रकाशित करत आहेत. दहा इंद्रियरूपी नर्तिका व पाच विकार एकाच शरीरात एकत्र होऊन बसले आहेत. पण ते वेगवेगळे बोल बोलतात व वेगवेगळे हावभाव करतात व आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवतात. प्रत्येक शरीरात रात्रंदिवस हे नृत्य चालू आहे व प्रत्येक शरीरात मोहमायेची वाद्ये वाजत आहेत. कोण ह्यास नाचवत आहे. कोण ह्यास फिरवत आहे ? कोण जन्ममृत्यूच्या चक्रात धुळीस मिळत आहे ? नानक सांगतात, ज्यास सतगुरू भेटला त्यास परत मायेच्या तालावर नाचावे लागत नाही. ॥ ४ ॥ ७ ॥

॥ रामकली महला ५ ॥

ओअंकारि एक धुनि एकै एकै रागु अलापै ॥
एका देसी एकु दिखावै एको रहिआ बिआपे ॥
एका सुरति एका ही सेवा एको गुर ते जापै ॥ १ ॥
भलो भलो रे कीरतनीआ ॥ राम रमा रामा गुन गाउ ॥
छोडि माइआ के धंध सुआउ ॥ १ ॥ रहाउ ॥
पंच बजित्र करे संतोखा सात सुरा लै चालै ॥
बाजा माणु ताणु तजि लाना पाउ न बीगा घालै ॥
फेरी फेरु न होवै कब ही एकु सबदु बंधि पालै ॥ २ ॥
नारदी नरहर जाणि हदूरे ॥ घूंघर खडकु तिआगि विसूरे ॥
सहज अनंद दिखावै भावै ॥ एहु निरतिकारी जनमि न आवै ॥ ३ ॥
जेको अपने ठाकुर भावै ॥ कोटि मधि एहु कीरतनु गावै ॥
साध संगति की जावउ टेक ॥ कहु नानक तिसु कीरतनु एक ॥ ४ ॥ ८ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८८५)

शब्दार्थ : **सुरति** – ध्यान. **कीरतनीआ** – कीर्तनकार. **सुआउ** – स्वार्थ. **बजित्र** – वाद्ये. **माणु** – अभिमान. **ताणु** – बलशक्ती. **पाउ** – पाय. **बीगा** – वाकडा मार्ग, गैरमार्ग. **पालै** – पदर. **नारदी** – प्रेमभक्ती. **हदुरे** – प्रत्यक्ष समोर, जवळ. **विसूरे** – . **निरतकारी** – नर्तक. **एहू** – हा. **जावउ** – जाते. **टेक** – आश्रय, शरण.

भावार्थ : आध्यात्मिक कीर्तनकार केवळ एका ओंकाराचा ध्वनी आळवतो. त्या एकमात्र प्रभूचा राग आलापतो. तो एकमेव प्रभूच्या देशाचा रहिवासी असतो. जो प्रभू परमात्मा सर्वत्र व्यापून राहिला आहे त्याचे दर्शन घडवतो. तो त्या एकमेव प्रभूचे ध्यान करतो. एकमेव प्रभूचे स्मरण करतो. त्या एकमेव प्रभुरूपी गुरूचा जप करतो. ॥ १ ॥ शाब्बास रे कीर्तनकारा, तू सर्वत्र रममाण असलेल्या रामाचे गुण गात राहा व मायेने व्याप्त सर्व स्वार्थी धंदे सोडून दे. ॥ १ ॥ रहाउ ॥ पंचज्ञानेंद्रियांची वाद्ये करून तू संतोष आदी सात गुणांचे स्वर काढ. अभिमानाचा त्याग हे वाद्य व शक्तीचा त्याग ही तान होऊ दे. कुमार्गाकडे पाऊल न पडू देणे हा ताल होवो. एकमेव प्रभूचे नाम गाठी बांधून तू ह्या जन्माचा असा फेरा घे की परत तुला जन्म घ्यावा लागणार नाही. ॥ २ ॥ तो नारदाप्रमाणे प्रेमभक्ती करून नरहरीस सदैव आपल्यासमोर प्रत्यक्ष पाहतो. सर्व चिंतांचा त्याग हाच त्याच्या पायातील घुंगराचा नाद असतो.

त्याचे हावभाव हे सहज सुखाचे प्रतीक असतात. असा नर्तक परत जन्माला येत नाही. ॥ ३ ॥ कोट्यवधी लोकांत असा एखादाच कीर्तनकार असतो की जो आपल्या प्रभू परमात्म्यास आवडतो. नानक सांगतात, मी साधुसंतांच्या संगतीचा आश्रय घेतो कारण तेथेच प्रभू परमात्म्याचे कीर्तन होते. ॥ ४ ॥ ८ ॥

॥ रामकली महला ५ ॥

कोई बोलै राम राम कोई खुदाइ ॥ कोई सेवै गुसईआ कोई अलाहि ॥ १ ॥
कारण करण करीम ॥ किरपा धारि रहीम ॥ १ ॥ रहाउ ॥
कोई नावै तीरथि कोई हज जाइ ॥ कोई करै पूजा कोई सिरु निवाइ ॥ २ ॥
कोई पड़ै बेद कोई कतेब ॥ कोई ओढै नील कोई सुपेद ॥ ३ ॥
कोई कहै तुरकु कोई कहै हिंदू ॥ कोई बाछै भिसतु कोई सुरगिंदू ॥ ४ ॥
कहु नानक जिनि हुकमु पछाता ॥ प्रभ साहिब का तिनि भेदु जाता ॥ ५ ॥ ९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८५)

शब्दार्थ : **गुसाईआ** – गोस्वामी. **अलाहि** – अल्ला. **कारण** – कारण. **करण** – कार्य. **करीम** – दयाळू. **रहीम** – मेहेरबान. **निवाइ** – वाकवतात, झुकवतात. **कतेब** – मुसलमानांचा धर्मग्रंथ. **ओढै** – घालतात. **सुपेद** – शुभ्र पांढरे. **तुरकु** – तुर्क. **वाछे** – इच्छितात. **भिसतु** – स्वर्ग (अरबी शब्द). **सुरगिंदू** – स्वर्ग. **पछाता** – ओळखला. **जाता** – जाणला. **भेदु** – रहस्य.

भावार्थ : कोणी रामाचे नाव घेतो, कोणी खुदा म्हणतो, कोणी देवाची सेवा करतो तर कोणी अल्लाची ॥१॥ सर्व कार्याचे कारण तो दयाळू प्रभू परमात्मा आहे. हे प्रभो ! तू जीवांवर मेहेरबानी (कृपा) कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ कोणी तीर्थयात्रेला जातात तर कोणी हजयात्रेला जातात. कोणी पूजा करतात तर कोणी मस्तक नमवून नमाज पढतात. ॥ २ ॥ कोणी वेदांचे अध्ययन करतात तर कोणी कतेब वाचतात. कोणी निळी वस्त्रे परिधान करतात तर कोणी शुभ्रवस्त्र नेसतात. ॥ ३ ॥ कोणी स्वत:स तुर्क म्हणवतात तर कोणी स्वत:स हिंदू म्हणतात. कोणी मुसलमान बहिस्त (स्वर्ग) ची कामना करतात तर कोणी हिंदू स्वर्ग प्राप्तीची इच्छा धरतात. ॥ ४ ॥ नानक सांगतात, ज्याने प्रभू परमात्म्याची आज्ञा जाणली त्यांनाच प्रभू परमात्म्याचे रहस्य कळले. ॥ ५ ॥ ९ ॥

॥ रामकली महला ५ ॥

पवनै महि पवनु समाइआ ॥ जोती महि जोती रलि जाइआ ॥
माटी माटी होई एक ॥ रावनहारे की कवन टेक ॥ १ ॥
कउनु मूआ रे कउनु मूआ ॥
ब्रहमगिआनी मिलि करहु बीचारा ॥ इहु तउ चलतु भइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
अगली किछु खबरि न पाई ॥ रोवनहारु भि ऊठि सिधाई ॥
भरम मोह के बांधे बंध ॥ सुपनु भइआ भखलाए अंध ॥ २ ॥

इहु तउ रचनु रचिआ करतारि ॥ आवत जावत हुकमि अपारि ॥
नह को मूआ न मरणै जोगु ॥ नह बिनसै अबिनासी होगु ॥ ३ ॥
जो इहु जाणहु सो इहु नाहि ॥ जानणहारे कउ बलि जाउ ॥
कहु नानक गुरि भरमु चुकाइआ ॥ ना कोई मरै न आवै जाइआ ॥ ४ ॥ १० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८५)

शब्दार्थ : **पवनै** – श्वास. **पवनु** – वायु, हवा. **रलि** – एकरूप. **रोवनहारे** – रडणारे. **मुआ** – मेला. **ब्रीमगिआनी** – ब्रह्मज्ञानी. **बीचारा** – विचार. **इहू** – हे. **चलतु** – कौतुक. **भइआ** – वाटते, झाले. **अगलि** – पुढची, भविष्यातील. **सिधाई** – निघून जातो. **बांधे** – बद्ध. **बंध** – बंधन. **भखलाए** – बडबडतो. **करतारि** – कर्ता प्रभू. **बिनसै** – विनाश पावणे. **जानणहारे** – जाणणारा.

भावार्थ : मृत्यू म्हणजे श्वासाचे बाह्य हवेत मिसळून जाणे. आत्मज्योतीचे परमज्योतीत एकरूप होणे. माती मातीत मिसळून जाणे. मग कशासाठी रडायचे ? ॥ १ ॥ कोण मेला रे, कोण मेला ? अरे ब्रह्मज्ञान्यांनो एकत्र बसून विचार करा. हे तर प्रभू परमात्म्याचे कौतुक चालत आले आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ भविष्यात काय होणार आहे ह्याची कोणास काहीच कल्पना नाही. जे आज रडत आहेत ते उद्या ह्या जगातून निघून जात आहेत. सारे जग मोहमायेच्या बंधनांनी जखडले आहे. जगातले जीवाचे जीवन हे एक स्वप्न होते ते भंगले. अज्ञानाने अंध झालेले मात्र गलका करतात. ॥ २ ॥ ह्या साऱ्या सृष्टीची रचना त्या रचनाकार कर्त्या प्रभू परमात्म्याने केली आहे. त्या अपार प्रभूच्याच आज्ञेनुसार जीवाचे ह्या जगात आगमन व बहिर्गमन होते. ह्या जगात कोणीही मरत नाही, कोणीही मरणायोग्य नाही. कारण जीवात्मा अविनाशी आहे. तो कधीही विनाश पावत नाही. ॥ ३ ॥ ज्यास (शरीरास) तुम्ही जीव समजता तो तसा नाही. जो हे रहस्य जाणतो अशा ज्ञात्यावर मी माझे सर्वस्व समर्पित करतो. नानक सांगतात, त्यानेच माझ्या मनातील भ्रम नाहीसा केला आहे. आता मला समजले आहे, की ह्या जगात कोणी मरत नाही आणि कोणी जन्मतही नाही. ॥ ४ ॥ १० ॥

॥ रामकली महला ५ ॥

जपि गोबिंदु गोपाल लालु ॥
राम नाम सिमरि तू जीवहि फिरि न खाई महाकालु ॥ १ ॥ रहाउ ॥
कोटि जनम भ्रमि भ्रमि भ्रमि आइओ ॥ बडै भागि साध संगु पाइओ ॥ १ ॥
बिन गुर पूरे नाही उधारु ॥ बाबा नानकु आखै एहु बीचारु ॥ २ ॥ ११ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८५)

शब्दार्थ : **जीवहि** – जीवन जगशील. **उधारु** – उद्धार. **आखै** – सांगतो. **एहु** – हा. **बीचारु** – विचार.

भावार्थ : हे जीवा ! तू गोविंद गोपाल प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. रामनामाचे स्मरण करून तू आपले जीवन जग. असे केलेस तर तो महाकाळ तुला खाऊ शकणार नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ कोटी कोटी जन्मात मोहमायेत भ्रमत भ्रमत अखेर ह्या मनुष्ययोनीत जन्मास आला आहे. महत् भाग्याने साधुसंतांची संगत प्राप्त झाली आहे.॥१॥

पूर्णगुरूच्या प्राप्तीशिवाय उद्धार होणार नाही. बाबा नानक हा विचार सांगत आहे. ॥२॥११॥

रागु रामकली महला ५ घरु २

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

चारि पुकारहि ना तू मानहि ॥ खटु भी एका बात वखानहि ॥
दस असटी मिलि एको कहिआ ॥ ता भी जोगी भेदु न लहिआ ॥ १ ॥
किंकुरी अनूप वाजै ॥ जोगीआ मतवारो रे ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रथमे वसिआ सत का खेड़ा ॥ त्रितीए महि किछु भइआ दुतेड़ा ॥
दुतीआ अरघो अरधि समाइआ ॥ एकु रहिआ ता एकु दिखाइआ ॥ २ ॥
एकै सूति परोए मणीए ॥ गाठी भिनि भिनि भिनि तणीए ॥
फिरती माला बहु बिधि भाइ ॥ खिंचिआ सूतु त आई थाइ ॥ ३ ॥
चहु महि एकै मटु है कीआ ॥ तह बिखड़े थान अनिक खिड़कीआ ॥
खोजत खोजत दुआरे आइआ ॥ ता नानक जोगी महलु घरु पाइआ ॥ ४ ॥
इउ किंकुरी आनूप वाजै ॥ सुणि जोगी कै मनि मीठी लागै ॥१॥रहाउ दूजा॥१॥१२॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८६)

शब्दार्थ : **चारि** – चार वेद. **मानहि** – मान्य करणे. **खटु** – षट्दर्शने. **वखानहि** – सांगतात. **दस असटी** – अष्टदश, अठरा पुराणे. **कहिआ** – सांगतात. **लहिआ** – जाणणे. **किंकुरी** – एक तारवाद्य. **मतवारो** – आत्मलीन, मग्न. **प्रथमे** – पहिल्या युगात, सत्ययुगात. **वसिआ** – वसले. **खेडा** – नगर. **त्रितीए** – त्रेतायुगात. **दुतेडा** – द्वैतभाव. **दुतिआ** – द्वापारयुगात. **अरधो** – अर्धा. **एकु** – एक पाय. **एकु** – एकमेव प्रभू. **परोए** – ओवले. **गाठी** – गाठ. **तणीए** – . **खिंचिआ** – खेचले. **मटु** – निवासस्थान. **तह** – त्या. **बिखडे** – . **दुआरे** – द्वार, प्रभूचे द्वार. **महलु** – प्रभूचा महाल. **इउ** – अशाप्रकारे. **अनुप** – अनुपम.

भावार्थ : चारही वेद उच्चरवाने सांगत आहेत पण तू ते मानत नाहीस. षट्दर्शने ही केवळ एकाच परमात्म्याविषयी सांगत आहेत. अठरा पुराणे मिळून एकाच प्रभू परमात्म्याविषयी बोलत आहेत. तरीही हे योगी तू ते रहस्य स्वीकारत नाहीस. ॥ १ ॥ त्या प्रभू परमात्म्याची अनुपम वीणा वाजत आहे. पण योगी मात्र आपल्याच मस्तीत गुंगून गेला आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ पहिल्या युगात म्हणजे सत्ययुगात सत्यनगरी निर्माण झाली. त्रेतायुगात त्यात फरक पडला. द्वैतभाव निर्माण झाला. सत्यधर्माचा एक पाय गळून पडला. द्वापारयुगात अर्धा धर्मच शिल्लक राहिला. धर्माचे दोन पाय तुटून पडले. कलियुगात धर्माचा एकच पाय उरला. पण तरीही भवसागर पार करण्यासाठी त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे नामस्मरण हाच एकमेव मार्ग सांगितला आहे. ॥ २ ॥ शरीरातील मणके वास्तविक एका सूत्रात ओवलेले आहेत. पण प्रत्येक मणक्याची गाठ वेगवेगळी दिसते. भाव असा, की संसारात प्रत्येक जीव वेगवेगळे दिसत असला, तरी सर्व जीव प्रभूच्या एकाच सूत्रात गोवलेले आहेत. संसारातील सर्व जीवांची ही माला

अनेक प्रकाराने फिरत आहे पण त्यात त्या सर्वांत एक प्रभुरूपी सूत्र आहे. ज्याप्रमाणे माळेतील सूत्र काढून घेतले की सर्व मणी वेगवेगळे दिसू लागतात त्याप्रमाणे जीवांमधले प्रभूरूपी सूत्र काढून घेतले की जीव वेगवेगळे दिसू लागतात. ॥ ३ ॥ चारही युगात प्रभूने शरीरास आपले निवासस्थान केले आहे. त्या रहस्यमय घराला अनेक द्वारे आहेत. नानक सांगतात, की जेव्हा शोध घेत घेत योगी दशमद्वारापर्यंत आला, तेव्हा त्यास प्रभूचे निवासस्थान प्राप्त झाले. ॥ ४ ॥ अशा प्रकारे प्रभू परमात्म्याची अनुपम वीणा वाजत आहे. ती ऐकून योग्याला ती मधुर वाटली व योगी त्यात तल्लीन झाला. ॥ रहाउ दुसरा ॥ १ ॥ १२ ॥

॥ रामकली महला ५ ॥

तागा करि कै लाई थिगली ॥ लउ नाड़ी सूआ है असती ॥
अंभै का करि डंडा धरिआ ॥ किआ तू जोगी गरबहि परिआ ॥ १ ॥
जपि नाथु दिनु रैनाई ॥ तेरी खिंथा दो दिहाई ॥ १ ॥ रहाउ ॥
गहरी बिभूत लाइ बैठा ताड़ी ॥ मेरी तेरी मुंद्रा धारी ॥
मागहि टूका त्रिपति न पावै ॥ नाथु छोडि जाचहि लाज न आवै ॥ २ ॥
चल चित जोगी आसणु तेरा ॥ सिंडी वाजै नित उदासेरा ॥
गुर गोरख की तै बूझ न पाई ॥ फिरि फिरि जोगी आवै जाई ॥ ३ ॥,
जिस नो होआ नाथु क्रिपाला ॥ रहरासि हमारी गुर गोपाला ॥
नामै खिंथा नामै बसतरु ॥ जन नानक जोगी होआ असथिरु ॥ ४ ॥
इउ जपिआ नाथु दिनु रैनाई ॥ हुणि पाइआ गुरु गोसाई ॥१॥रहाउ दूजा॥२॥१३॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८६)

शब्दार्थ : दोरा घेऊन वस्त्र शिवले. भावनाड्यांच्या साहाय्याने हे शरीररूपी वस्त्र शिवले. **सुआ** – सुइ. **असती** – अस्थी. **अंभै** – पाणी, रक्त व वीर्य. **डेडा** – दंड, शरीररूपी दंड. **करि** – हातात. **धरिआ** – धारण केला. **किआ** – का. **गरबहि** – गर्वात. **नाथु** – नाथ, प्रभू परमात्मा. **खिंथा** – कांबळे, शरीररूपी वस्त्र. **दिहाई** – दिवसांचे. **ताडी** – समाधी. **मेरी तेरी** – द्वैतभाव. **मागहि** – मागतो. **टूका** – तुकडा, भाकरी. **जाचहि** – याचना. **चलचित** – दोलायमान चित्त. **उदासेरा** – उदास राहतो. **बूझ** – ज्ञान, समज. **रहरासि** – प्रार्थना. **बसतरु** – वस्त्र. **असथिरु** – स्थिर. **हुणि** – आता.

भावार्थ : ज्याप्रमाणे सुई दोऱ्याने कपडे शिवतात, त्याप्रमाणे हाडाची सुई व नाड्यांच्या दोऱ्याने हे शरीररूपी वस्त्र शिवले आहे. रक्तबिंदूंनी हे शरीर उभे केले आहे. अशा ह्या शरीराचा हे योगी तू कशाला गर्व करतोस? ॥१॥ हे योगी ! तुझी ही देहरूपी कांबळी दोन दिवसांची आहे. नश्वर आहे. तू रात्रंदिवस प्रभू परमात्म्याचे स्मरण कर.॥१॥ रहाउ ॥ हे योगी ! तू अंगभर विभूती फासून समाधी लावून बसला आहेस. पण तू आपपरभाव द्वैतभावाच्या मुद्रा घातल्या आहेस. लोकांकडे याचना करून भाकरतुकडा प्राप्त करतोस तरी तुला तृप्तता लाभत नाही. परमेश्वर सोडून दुसऱ्याकडे याचना करताना तुला लाज कशी वाटत नाही ? ॥ २ ॥ हे योगी ! तुझे मनरूपी आसन अस्थिर

आहे. तू उदास असल्याचे भासवतोस पण शिंग वाजवतोस. गुरू परमात्म्याचे रहस्य तू जाणलेच नाहीस त्यामुळे तू परत परत जन्ममृत्यूचे दु:ख भोगतोस. ॥ ३ ॥ आम्ही प्रभू परमात्म्याची प्रार्थना करतो. प्रभू ज्याच्यावर कृपा करतो, त्याचे प्रभुनाम हेच वस्त्र व प्रभुनाम हीच झोळी होते. सेवक नानक सांगतात, असा योगी स्थिर होतो. ॥४॥ अशा प्रकारे योग्याने रात्रंदिवस प्रभुनामाचा जप केला, त्यामुळे आता त्याला प्रभू परमात्मा प्राप्त झाला. ॥ १ ॥ रहाउ दुसरा ॥ २ ॥ १३ ॥

॥ रामकली महला ५ ॥

करन करावन सोई ॥ आन न दीसै कोई ॥
ठाकुरु मेरा सुघडु सुजाना ॥ गुरमुखि मिलिआ रंगु माना ॥ १ ॥
ऐसो रे हरि रसु मीठा ॥ गुरमुखि किनै विरलै डीठा ॥ १ ॥ रहाउ ॥
निरमल जोति अंम्रितु हरि नाम ॥ पीवत अमर भए निहकाम ॥
तनु मनु सीतलु अगनि निवारी ॥ अनद रूप प्रगटे संसारी ॥ २ ॥
किआ देवउ जा सभु किछु तेरा ॥ सद बलिहारि जाउ लख बेरा ॥
तनु मनु जीउ पिंडु दे साजिआ ॥ गुर किरपा ते नीचु निवाजिआ ॥ ३ ॥
खोलि किवारा महलि बुलाइआ ॥ जैसा सा तैसा दिखलाइआ ॥
कहु नानक सभु पड़दा तूटा ॥ हउ तेरा तू मै मनि वूठा ॥ ४ ॥ ३ ॥ १४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८६)

शब्दार्थ : **करन** – करणारा. **करावन** – करवणारा. **सुघड** – सुडौल. **सुजाना** – परमज्ञानी. **रंगु माना** – आनंद भोगतो. **डीठा** – पाहिला. **निहकाम** – निष्काम. **देवउ** – देऊ, अर्पण करू. **बेरा** – वेळा. **साजिआ** – सजवले. **निवाजिआ** – सन्मानित केले. **सा** – होता. **वूठा** – वसला, वास केला.

भावार्थ : सारे काही करणारा व करवून घेणारा तो एकमेव प्रभू परमात्माच आहे. अन्य कोणीच दिसत नाही. माझा प्रभू परमात्मा सुंदर व परमज्ञानी आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने मला तो प्राप्त झाला. आता मी आनंद उपभोगतो. ॥ १ ॥ हरिरस अत्यंत मधुर आहे. गुरूमार्गी होणाऱ्यासच त्याचा अनुभव येतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो निर्मळ ज्योतिस्वरूप आहे. हरिनाम अमृतासमान आहे. तो त्याचे प्राशन करतो. तो निष्काम होतो. तन, मन शांत होते. मायेचा तृष्णाग्नी शांत होतो. संसारात सर्वत्र आनंद होतो. ॥ २ ॥ ज्याने मला हे सर्व काही दिले आहे त्यास मी काय अर्पण करू ? त्याच्यावर मी लाख वेळा समर्पित होतो. त्यानेच हे तन, मन, प्राण निर्माण केले आहेत. गुरुकृपेने माझ्यासारख्या नीचाला त्याने सन्मानित केले. ॥ ३ ॥ त्याने माझ्या हृदयाची कवाडे उघडली. मला आपल्या महालात बोलावले व आपल्या सत्यस्वरूपाचे मला दर्शन घडवले. नानक सांगतात त्यामुळे त्याच्या व माझ्यामध्ये असलेला मायेचा पडदा दूर झाला. तो व मी एकरूप झालो. आता तो माझ्या अंत:करणात कायम वसला आहे. ॥ ४ ॥ ३ ॥ १४ ॥

॥ रामकली महला ५ ॥

सेवकु लाइओ अपुनी सेव ॥ अंम्रितु नामु दीओ मुखि देव ॥
सगली चिंता आपि निवारी ॥ तिसु गुर कउ हउ सद बलिहारी ॥ १ ॥
काज हमारे पूरे सतगुर ॥ बाजे अनहद तूरे सतगुर ॥ १ ॥ रहाउ ॥
महिमा जा की गहिर गंभीर ॥ होइ निहालु दे जिसु धीर ॥
जा के बंधन काटे राइ ॥ सो नरु बहुरि न जोनी पाइ ॥ २ ॥
जा कै अंतरि प्रगटिओ आप ॥ ता कउ नाही दूख संताप ॥
लालु रतनु तिसु पालै परिआ ॥ सगल कुटंब ओहु जनु लै तरिआ ॥ ३ ॥
ना किछु भरमु न दुबिधा दूजा ॥ एको एकु निरंजन पूजा ॥
जत कत देखउ आपि दइआल ॥ कहु नानक प्रभ मिले रसाल ॥ ४ ॥ ४ ॥ १५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८७)

शब्दार्थ : **काज** – कार्य. **निहाल** – प्रसन्न. **पालै** – पदरात. **दुबिधा** – द्विधा. **दूजा** – द्वैत. **रसाल** – सर्व रसांचे स्थान.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने मला आपल्या सेवेस लावले. माझ्या मुखात नामामृत घातले. प्रभूने स्वत: माझ्या सगळ्या चिंता दूर केल्या. ज्या सतगुरुकृपेने हे घडले त्या सतगुरुचरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ १ ॥ सतगुरूने माझे कार्य पूर्ण केले आहे. सतगुरुकृपेने माझ्या हृदयात अनाहत नाद वाजू लागला आहे. ॥ १ ॥ रहाउ॥ त्या प्रभू परमात्म्याचा महिमा गहन व गंभीर आहे. तो ज्याला धीर देतो तो प्रसन्न होतो. प्रभू परमात्म्याने ज्याची सर्व बंधने तोडून टाकली त्यास परत जन्म घ्यावा लागत नाही. ॥ २ ॥ ज्याच्या अंत:करणात प्रभू परमात्मा प्रगट होतो, त्याला कोणतेही दु:ख, संताप शिल्लक राहत नाही. त्याच्या पदरात प्रभुनामरूपी रत्ने पडतात. असा प्रभुसेवक स्वत: सर्व कुटुंबासह भवसागर तरून जातो. ॥ ३ ॥ त्याच्या मनात कोणताही भ्रम राहत नाही. त्याची द्विधा मन:स्थिती होत नाही. तो द्वैताच्या बंधनात पडत नाही. तो एकमेव निरंजन प्रभू परमात्म्याची पूजा करतो. जेथे कोठे पाहावे तेथे त्याला दयाळू प्रभू परमात्म्याचे दर्शन होते. नानक सांगतात, रसांचा राजा प्रभू परमात्मा मला प्राप्त झाला आहे. ॥ ४ ॥ ४ ॥ १५ ॥

॥ रामकली महला ५ ॥

तन ते छुटकी अपनी धारी ॥ प्रभ की आगिआ लगी पिआरी ॥
जो किछु करै सु मनि मेरै मीठा ॥ ता इहु अचरजु नैनहु डीठा ॥ १ ॥
अब मोहि जानी रे मेरी गई बलाइं ॥
बुझि गई त्रिसन निवारी ममता गुरि पूरै लीओ समझाइ ॥ १ ॥ रहाउ ॥
करि किरपा राखिओ गुरि सरना ॥ गुरि पकराए हरि के चरना ॥
बीस बिसुए जा मन ठहराने ॥ गुर पारब्रहम एकै ही जाने ॥ २ ॥

जो जो कीनो हम तिस के दास ॥ प्रभ मेरे को सगल निवास ॥
ना को दूतु नही बैराई ॥ गलि मिलि चाले एकै भाई ॥ ३ ॥
जा कउ गुरि हरि दीए सूखा ॥ ता कउ बहुरि न लागहि दूखा ॥
आपे आपि सरब प्रतिपाल ॥ नानक रातउ रंगि गोपाल ॥ ४ ॥ ५ ॥ १६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८७)

शब्दार्थ : **अपनी** – मी पणा, अहंकार. **छुटकी** – सुटका. **धारी** – धारण केले. **डीठा** – पाहिले. **मोहि** – मी, मला. **बलाइ** – पीडा. **त्रसन** – तृष्णा. **पकराए** – पकडावयास लावले. **बीस** – . **बिसुए** – . **दूतू** – परका. **बैराई** – वैरी. **रातउ** – रत झाला, रंगून गेला.

भावार्थ : जेव्हा जीवास प्रभू परमात्म्याची आज्ञा प्रिय वाटते, तेव्हा मनातील मीपणा, अहंकार निघून जातो. प्रभू जे काही करतो ते माझ्या मनाला गोड वाटते. प्रभूचा हा संसाररूपी आश्चर्यजनक खेळ मी प्रत्यक्ष पाहिला.॥१॥ मला पूर्णगुरूने ज्ञान दिले आहे त्यामुळे मला विश्वास उत्पन्न झाला आहे, की माझी सर्व संकटे दूर झाली आहेत. माझ्या मनातील मोहमायेची तृष्णा शांत झाली आहे. ममता नष्ट झाली आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरूने माझ्यावर कृपा करून आपल्याजवळ आश्रय दिला आहे. त्यानेच मला हरीचे चरण पकडावयास लावले आहे. मनात आता प्रभू परमात्म्याविषयी पूर्ण विश्वास उत्पन्न झाल्याने मन व इंद्रिये स्थिर झाली आहेत. आता मी हे जाणतो की सतगुरू व परब्रह्म एकच आहेत. अभिन्न आहेत. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्याने जो जो जीव निर्माण केला आहे त्या सर्वांचा मी दास आहे. कारण माझ्या प्रभू परमात्म्याचा सर्वांच्या ठायी निवास आहे. आता मला कोणी परका वाटत नाही. कोणीही माझा वैरी नाही. मी सर्वांना हृदयाशी धरून त्यांना माझे बंधू मानतो. ॥ ३ ॥ ज्यास प्रभुरूपी गरूने सुख प्रदान केले त्यास परत कधीही दुःख भोगावे लागत नाही. प्रभू परमात्मा स्वत: सर्व जीवांचा प्रतिपाळ करतो. नानक सांगतात, मी तर प्रभुभक्तीच्या रंगात रंगून गेलो आहे. ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥

॥ रामकली महला ५ ॥

मुख ते पड़ता टीका सहित ॥ हिरदै रामु नही पूरन रहत ॥
उपदेसु करे करि लोक द्रिड़ावै ॥ अपना कहिआ आपि न कमावै ॥ १ ॥
पंडित बेदु बीचारि पंडित ॥ मन का क्रोधु निवारि पंडित ॥ १ ॥ रहाउ ॥
आगै राखिओ सालगिरामु ॥ मनु कीनो दहदिस बिस्रामु ॥
तिलकु चरावै पाई पाइ ॥ लोक पचारा अंधु कमाइ ॥ २ ॥
खटु करमा अरु आसणु धोती ॥ भागठि ग्रिहि पड़े नित पोथी ॥
माला फेरै मंगै बिभूत ॥ इह बिधि कोइ न तरिओ मीत ॥ ३ ॥
सो पंडितु गुर सबदु कमाइ ॥ त्रै गुण की ओसु उतरी माइ ॥
चतुर बेद पूरन हरि नाइ ॥ नानक तिस की सरणी पाइ ॥ ४ ॥ ६ ॥ १७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८७)

शब्दार्थ : **पडता** – वाचतो. **टीका** – अर्थ. **हिरदै** – हृदयात. **रहत** – राहणी, आचरण. **द्रिडावै** – दृढ करतो, समजावतो. **कमावै** – कार्य करणे, आचरण करणे. **बेदु** – वेद. **बिचारि** – विचार. **आगै** – पुढे. **सालगिरामु** – शाळिग्राम. **चरावै** – लावतो. **पाई** – पाया. **पाइ** – पडतो. **पचारा** – देखावा. **अंध कमाइ** – पापाची कमाई. **खटु** – सहा. **आसणु** – योगासन. **धोती** – धौती, एक योग क्रिया. **भागठी** – श्रीमंत. **पड़ै** – वाचतो. **बिभूत** – विभूती, धनसंपत्ती. **आसु** – प्रभाव. **चतुर** – चार.

भावार्थ : पंडित अर्थासह धर्मग्रंथ वाचतो. पण त्याच्या हृदयात प्रभुरामास मात्र स्थान नसते. आचरणातही प्रभुभक्ती नसते. लोकांना मात्र उपदेश करून धर्म समजावून सांगतो पण स्वत:चे आचरण मात्र तसे नसते. तो पापाचीच कमाई करत असतो. ॥ १ ॥ पंडित वेदांचे ज्ञान सांगतात. पण मनातील क्रोध मात्र नष्ट करू शकत नाहीत. ॥ १ ॥ रहाउ ॥ पुढ्यात शाळिग्राम ठेवतो. पण त्याचे मन मात्र दाही दिशांना धावत असते. तो मस्तकी गंधाचा टिळा लावतो व वारंवार शाळिग्रामाच्या पाया पडतो. हा त्याचा सारा बाह्य देखावा असतो. अंधानुकरण असते. तो परमसत्याप्रती अंधच असतो. त्याला प्रभुप्राप्तीचा मार्ग कळलेलाच नसतो. ॥ २ ॥ तो योगमार्गातील सर्व षट्कर्मे करतो. योगासने करतो. धौती आदी योगिक क्रिया करतो. श्रीमंतांच्या घरी जाऊन धर्मग्रंथ वाचतो. त्याच्यासाठी जप करून त्यांच्याकडे धनसंपत्तीची याचना करतो. हे मित्रा ! अशा रीतीने ह्या मार्गाने कोणीही कधीही भवसागर तरून गेला नाही. ॥ ३ ॥ ज्या पंडिताने सतगुरूकडून प्रभूनामाची प्राप्ती, शब्दब्रह्माची प्राप्ती केली. त्याच्या मनावरील त्रिगुणामायेचा प्रभाव नष्ट होतो, हरिनाम हेच चारही वेदांचे सार आहे. नानक सांगतात, अशा प्रभू परमात्म्यास शरण जावे. ॥ ४ ॥ ६ ॥ १७ ॥

॥ रामकली महला ५ ॥

कोटि बिघन नही आवहि नेरि ॥ अनिक माइआ है ता की चेरी ॥
अनिक पाप ता के पानीहार ॥ जा कउ मइआ भई करतार ॥ १ ॥
जिसहि सहाई होइ भगवान ॥ अनिक जतन उआ कै सरंजाम ॥ १ ॥ रहाउ ॥
करता राखै कीता कउनु ॥ कीरी जीतो सगला भवनु ॥
बेअंत महिमा ता की केतक बरन ॥ बलि बलि जाईऐ ता के चरन ॥ २ ॥
तिन ही कीआ जपु तपु धिआनु ॥ अनिक प्रकार कीआ तिनि दानु ॥
भगतु सोई कलि महि परवानु ॥ जा कउ ठाकुरि दीआ मानु ॥ ३ ॥
साधसंगि मिलि भए प्रगास ॥ सहज सूख आस निवास ॥
पूरै सतिगुरि दीआ बिसास ॥ नानक होए दासनि दास ॥ ४ ॥ ७ ॥ १८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८८)

शब्दार्थ : **नेरि** – जवळ. **चेरि** – दासी. **पानीहार** – पाणक्या. **उआ** – त्याचा. **सरंजाम** – सफल. **कीरी** – क्षुद्र जीव. **केतक** – किती. **तिन** – त्यांनी. **परवानु** – स्वीकृत. **आस** – आशा. **बिसास** – विश्वास.

भावार्थ : ज्याच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते, कोटी कोटी विघ्ने त्याच्या जवळपासही फिरकत नाहीत.

सर्व प्रकारची मोहमाया त्याची दासी होते. नाना पापे त्याचे पाणके होतात. सर्वजण त्याची सेवा करतात. ॥ १ ॥ ज्यास स्वत: प्रभू परमात्मा साहाय्य करतो त्याचे सर्व प्रयत्न सफल होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा ज्याचा साहाय्यकर्ता होतो त्याचे कोणीही काहीही वाईट करू शकत नाही. तो कितीही क्षुद्र जीव असला तरी तो त्रिभुवन जिंकू शकतो. त्या प्रभू परमात्म्याचा महिमा अनंत आहे. त्याच्या चरणी जीवाने स्वत:स समर्पित करावे. ॥ २ ॥ ज्यास प्रभू परमात्मा स्वत: सन्मानित करतो, त्याने केलेला जप, तप, ध्यान, त्याने केलेल्या अनेक प्रकारच्या दानाचा प्रभू परमात्म्याकडून स्वीकार केला जातो. असा भक्त कलियुगात सर्वांकडून स्वीकारला जातो. ॥ ३ ॥ साधुसंतांच्या संगतीत राहिल्याने जीवाच्या मनात आत्मज्ञानाचा प्रकाश पसरतो. त्यास सहजावस्था प्राप्त होते. त्याच्या सर्व आशा पूर्ण होतात. नानक अशा सतगुरूचा दासानुदास होतो, की जो सतगुरू जीवाचे एकमात्र विश्वासाचे स्थान आहे. ॥ ४ ॥ ७ ॥ १८ ॥

॥ रामकली महला ५ ॥

दोसु न दीजै काहू लोग ॥ जो कमावनु सोई भोग ॥
आपन करम आपे ही बंध ॥ आवनु जावनु माइआ धंध ॥ १ ॥
ऐसी जानी संत जनी ॥ परगासु भइआ पूरे गुर बचनी ॥ १ ॥ रहाउ ॥
तनु धनु कलतु मिथिआ बिसथार ॥ हैवर गैवर चालनहार ॥
राज रंग रूप सभि कूर ॥ नाम बिना होइ जासी धूर ॥ २ ॥
भरमि भूले बादि अहंकारी ॥ संगि नाही रे सगल पसारी ॥
सोग हरख महि देह बिरधानी ॥ साकत इव ही करत बिहानी ॥ ३ ॥
हरि का नामु अंम्रित कलि महि ॥ एहु निधाना साधू पाहि ॥
नानक गुरु गोविदु जिसु तूठा ॥ घटि घटि रमईआ तिन ही डीठा ॥ ४ ॥ ८ ॥ १९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८८)

शब्दार्थ : **दोसु** – दोष. **काहू** – कोणाला. **कमावउ** – कमावले. **बंध** – बंधन. **धंध** – धंदा. **कलतु** – पत्नी. **बिसथार** – विस्तार, पसारा. **हैवर** – उत्तम घोडे. **गैवर** – उत्तम हत्ती. **चालनहारा** – नश्वर. **कूर** – असत्य, मिथ्या, भासमान. **धूर** – धूळ. **बादि** – नष्ट झाला. **बिरधानी** – वृद्ध झाले. **बिहानी** – व्यतीत. **निधाना** – संपत्ती. **पाहि** – पाशी. **तूठा** – प्रसन्न झाला. **डीठा** – पाहिले.

भावार्थ : हे जीवा ! उगाच कोणाला दोष देऊ नकोस. माणूस जे कमावतो तेच भोगतो. आपल्याच कर्माने आपण बंधनात पडतो. जन्ममरण हाच तर मायेचा धंदा आहे. ॥ १ ॥ संतजनांनी हे जाणले आहे, की सतगुरूच्या उपदेशाने अंत:करणात आत्मप्रकाश पसरतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तन, धन, स्त्री हा सारा मिथ्या पसारा आहे. हत्ती, घोडे हे सारे राजवैभव नश्वर आहे. राज्य, रंग, रूप सारे काही असत्य आहे. प्रभुनामाशिवाय सारे मातीमोल आहे.॥ २ ॥ जीव मोहमायेने भ्रमून अहंकारात बद्ध होतो. ह्या जगात जमा केलेला हा सारा पसारा अंती बरोबर येत नाही. हर्ष, शोक ह्यातच देह वृद्ध होतो. स्वेच्छाचारी जीव ह्याच प्रकारे आपले जीवन व्यतीत करतात. ॥ ३ ॥ कलियुगात प्रभुनाम हेच अमृत आहे. साधुसंतांची हीच संपत्ती आहे. नानक सांगतात, ज्याच्यावर प्रभू परमात्मा

प्रसन्न झाला त्याला प्रत्येक जीवाच्या ठायी प्रभू परमात्मा रममाण आहे हे दिसते. ॥ ४ ॥ ८ ॥ १९ ॥

॥ रामकली महला ५ ॥

पंच सबद तह पूरन नाद ॥ अनहद बाजे अचरज बिसमाद ॥
केल करहि संत हरि लोग ॥ पारब्रहम पूरन निरजोग ॥ १ ॥
सूख सहज आनंद भवन ॥
साध संगि बैसि गुण गावहि तह रोग सोग नही जनम मरन ॥ १ ॥ रहाउ ॥
ऊहा सिमरहि केवल नामु ॥ बिरले पावहि ओहु बिस्रामु ॥
भोजनु भाउ कीरतन आधारु ॥ निहचल आसनु बेसुमारु ॥ २ ॥
डिगि न डोलै कतहू न धावै ॥ गुर प्रसादि को इहु महलु पावै ॥
भ्रम भै मोह न माइआ जाल ॥ सुंन समाधि प्रभू किरपाल ॥ ३ ॥
ता का अंतु न पारावारु ॥ आपे गुपतु आपे पासारु ॥
जा कै अंतरि हरि हरि सुआदु ॥ कहनु न जाई नानक बिसमादु ॥ ४ ॥ ९ ॥ २० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८८)

शब्दार्थ : **पंच सबद** – पाच वाद्याचा ध्वनी. **बिसमाद** – विस्मय. **केल** – आनंद. **निरजोग** – निर्लेप. **बैसि** – बसून. **उहा** – तेथे. **बिरले** – विरळा. **बिश्रामु** – विश्राम. **बेसुमारु** – अनंत. **डिगि** – पडणे. **इहू** – ह्या. **गुपतु** – अव्यक्त. **सुआदु** – स्वाद.

भावार्थ : त्या प्रभूच्या घरी पंचवाद्यांचा पूर्ण नाद निनादत असतो. जेव्हा त्यातून अनाहत नाद निर्माण होतो तेव्हा विस्मयकारक आश्चर्य प्रगट होते. त्या हरिलोकात संतजन आनंद उपभोगतात. परब्रह्म परमात्मा मात्र पूर्णपणे निर्लेप आहे. ॥ १ ॥ संतसंगत हे सहजसुख व आनंदाचे स्थान आहे. साधुसंतांच्या संगतीत बसून प्रभू परमात्म्याचे गुण गाणाऱ्यास रोग, शोक व्यापत नाहीत. तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तेथे केवळ प्रभू परमात्म्याचे नामस्मरण केले जाते. कोणा विरळ्या प्रभुभक्तांसच ते विश्रामस्थान प्राप्त होते. भक्तिभाव हेच त्याचे भोजन असते व प्रभू परमात्म्याचे कीर्तन हाच त्याच्या जीवनाचा आधार असतो. त्या निश्चल स्थिरासनाचा महिमा अपार आहे. ॥ २ ॥ त्याचे मन यत्किंचितही डगमगत नाही. कोठेही इकडे तिकडे धावत नाही. सतगुरूकृपेने कोणी विरळा भक्त ते स्थान प्राप्त करतो. तेथे भ्रम, भय, मोह वा मायाजाल काहीही नसते. तेथे शून्य समाधी प्राप्त करून तो प्रभुकृपेस पात्र होतो. ॥ ३ ॥ प्रभू परमात्म्यास ना अंत ना पारावार. प्रभू परमात्मा अव्यक्त अहे. पण हा सृष्टीचा पसारा हेही त्याचेच रूप आहे. नानक सांगतात, ज्याने आपल्या अंतर्मनात प्रभुनामाचा स्वाद अनुभवला आहे त्याच्या त्या विस्मयकारक अवस्थेचे वर्णनही करणे अशक्य आहे. ॥४॥९॥२०॥

॥ रामकली महला ५ ॥

भेटत संगि पारब्रहमु चिति आइआ ॥ संगति करत संतोखु मनि पाइआ ॥
संतह चरन माथा मेरो पउत ॥ अनिक बार संतह डंडउत ॥ १ ॥

इहु मनु संतन कै बलिहारी ॥
जा की ओट गही सुखु पाइआ राखे किरपाधारी ॥ १ ॥ रहाउ ॥
संतह चरण धोइ धोइ पीवा ॥ संतह दरसु पेखि पेखि जीवा ॥
संतह की मेरै मनि आस ॥ संत हमारी निरमल रासि ॥ २ ॥
संत हमारा राखिआ पड़दा ॥ संत प्रसादि मोहि कबहू न कड़दा ॥
संतह संगु दीआ किरपाल ॥ संत सहाई भए दइआल ॥ ३ ॥
सुरति मति बुधि परगासु ॥ गहिर गंभीर अपार गुणतासु ॥
जीअ जंत सगले प्रतिपाल ॥ नानक संतह देखि निहाल ॥ ४ ॥ १० ॥ २१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८९)

शब्दार्थ : पउत – पडावा. ओट – आश्रय. गही – ग्रहण करणे. पीवा – प्राशन करणे. आस – आशा. पडदा – पर्वा. मोहि – मला. कडदा – दुःख. सहाइ – साहाय्याने. दइआल – दयाळू. गुणतासु – गुणसागर, निहाल प्रसन्न.

भावार्थ : संतांची संगत प्राप्त झाल्याने माझ्या मनात परब्रह्म परमात्म्याचा विचार आला. संतांशी संगत केल्याने माझ्या मनास संतोष प्राप्त झाला. माझे मस्तक संतांच्या चरणी विनम्र होते. मी संतांना अनेक वेळा नमस्कार करतो. ॥ १ ॥ ज्या संतांच्या चरणांचा आश्रय घेतल्याने सुखाची प्राप्ती होते, जे संत कृपापूर्वक जीवांचे रक्षण करतात, त्या संतांच्या चरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी संतांचे चरण धुवून ते तीर्थ प्राशन करतो. संतांच्या दर्शनाने मी जीवन जगतो. माझ्या मनाला संतांची आशा लागून राहिली आहे. संत हीच माझी निर्मळ संपत्ती आहे. ॥ २ ॥ संतांनी माझ्या अब्रूचे रक्षण केले. संतांच्या कृपेने माझी दुःखापासून मुक्तता झाली. त्या कृपामय प्रभू परमात्म्याने मला संतांची संगत प्राप्त करून दिली. तेव्हापासून दयाळू संत मला साहाय्यभूत होत आहेत. ॥ ३ ॥ संतांच्या कृपेने माझी मती, बुद्धी प्रकाशमान झाली. संत गहन गंभीर अपार गुणसागर आहेत. ते जगातील सर्व जीवजंतूंचा प्रतिपाळ करतात. नानक सांगतात, संतांच्या केवळ दर्शनाने मन प्रसन्न होते. ॥ ४ ॥ १० ॥ २१ ॥

॥ रामकली महला ५ ॥

तेरै काजि न ग्रिहु राजु मालु ॥ तेरै काजि न बिखै जंजालु ॥
इसट मीत जाणु सभ छलै ॥ हरि हरि नामु संगि तेरै चलै ॥ १ ॥
राम नाम गुण गाइ ले मीता हरि सिमरत तेरी लाज रहै ॥
हरि सिमरत जमु कछु न कहै ॥ १ ॥ रहाउ ॥
बिनु हरि सगल निरारथ काम ॥ सुइना रुपा माटी दाम ॥
गुर का सबदु जापि मन सुखा ॥ ईहा ऊहा तेरो ऊजल मुखा ॥ २ ॥
करि करि थाके वडे वडेरे ॥ किनही न कीए काज माइआ पूरे ॥
हरि हरि नामु जपै जनु कोइ ॥ ता की आसा पूरन होइ ॥ ३ ॥

हरि भगतन को नामु अधारु ॥ संती जीता जनमु अपारु ॥
हरि संतु करे सोई परवाणु ॥ नानक दासु ता कै कुरबाणु ॥ ४ ॥ ११ ॥ २२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८९)

शब्दार्थ : काजि – कामी, उपयोगी. बिखै – विषयविकार. इसट – इष्ट. जाणु – जाण. छलै – नश्वर. निरारथ – निरर्थक. सुइना – सुवर्ण. ईहा – इहलोकी. उहा – परलोकी.

भावार्थ : हे जीवा ! तुझे हे घरदार, राज्य, संपत्ती काहीही अंती कामी येणार नाही. हे विषयविकाराचे जंजाळही तुझ्या कामी येणार नाही. इष्ट मित्र, नातीगोती सारे काही नश्वर आहे, हे तू नीट जाण. अंतकाळी केवळ हरिनामच तुझ्याबरोबर येणार आहे. ॥ १ ॥ हे मित्रा ! तू सदैव रामनामाच्या साहाय्याने प्रभू परमात्म्याचे गुणगान कर. प्रभूच्या नामस्मरणाने तुझ्या प्रतिष्ठेचे रक्षण होईल. प्रभूचे स्मरण करणाऱ्यास काहीही बाधा पोहोचू शकत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ हरिनामाशिवाय सर्व कार्य निरर्थक आहे. सोने, रूपे हे सारे मृत्तिकेसमान आहे. शब्दगुरूचे स्मरण केल्याने मनास सुख प्राप्त होते. इहलोकी व परलोकी तुझे मुख उज्ज्वल होते. ॥ २ ॥ मोठमोठे लोक कार्य करून करून थकले. मायेने कोणाचेही कार्य पुरे होऊ दिले नाही. जे प्रभुसेवक प्रभुनामाचा जप करतात. त्याच्या सर्व आशा पूर्ण होतात. ॥ ३ ॥ प्रभुनाम हाच प्रभुभक्तांचा आधार आहे. संतांच्या कृपेने त्यांच्या जन्माचे सार्थक होते. हरीचे संत जे जे करतात त्याचा प्रभू स्वीकार करतो. नानक त्यांचा दास त्यांच्या चरणी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥ ४ ॥ ११ ॥ २२ ॥

॥ रामकली महला ५ ॥

सिंचही दरबु देहि दुखु लोग ॥ तेरै काजि न अवरा जोग ॥
करि अहंकारु होइ वरतहि अंध ॥ जम की जेवड़ी तू आगै बंध ॥ १ ॥
छाडि विडाणी तांति मूड़े ॥ ईहा बसना राति मूड़े ॥
माइआ के माते तै उठि चलना ॥ राचि रहिओ तू संगि सुपना ॥ १ ॥ रहाउ ॥
बाल बिवसथा बारिकु अंध ॥ भरि जोबनि लागा दुरगंध ॥
त्रितीअ बिवसथा सिंचे माइ ॥ बिरधि भइआ छोडि चलिओ पछुताइ ॥ २ ॥
चिरंकाल पाई दुलभ देह ॥ नाम बिहूणी होई खेह ॥
पसू परेत मुगध ते बुरी ॥ तिसहि न बूझै जिनि एह सिरी ॥ ३ ॥
सुणि करतार गोविंद गोपाल ॥ दीन दइआल सदा किरपाल ॥
तुमहि छडावहु छुटकहि बंध ॥ बखसि मिलावहु नानक जग अंध ॥ ४ ॥ १२ ॥ २३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८८९)

शब्दार्थ : सिंचहि – संचय. दरबु – द्रव्य. देहि – देऊन. तेरै – तुझ्या. काजि – कामी. अवरा – अन्य लोक. वरतही – व्यवहार. जेवडी – साखळी, दोरी. आगे – परलोकात. छाडी – सोड. विडाणी – परका. तांति – चिंता. मुडे – मूर्ख. बसना – मुक्काम. माते – मत्त. माइआ – माया. रचि – रममाण. बाल बिवसथा

– बाल्यावस्था. **अंध** – अज्ञानी. **सिंचै** – संचय. **बिरधि** – वृद्ध. **चिरंकाल** – . **खेह** – माती. **परेत** – प्रेत. **बुरी** – . **तिसहि** – त्याला, प्रभूला. **सिरी** – रचना केली.

भावार्थ : इतर लोकांना दु:ख देऊन तू संपत्ती गोळा करतोस. पण ही संपत्ती अंती तुझ्या काहीही कामी येणार नाही. ती इतरांच्याच हाती जाईल. तू अहंकाराने अंध होऊन सारे व्यवहार करतोस पण अंतकाळी यम तुला साखळदंडाने बांधून नेईल. ॥ १ ॥ हे मूर्ख माणसा ! तू इतरांचा मत्सर करणे सोडून दे. तू ह्या जगात फार थोड्या काळासाठी आला आहेस. मायेने मत्त झालेल्या जीवा तुला लवकरच येथून निघून जावे लागणार आहे. तू तर स्वप्नातच रंगून रममाण झाला आहेस. ॥ १ ॥ रहाउ ॥ बाल्यावस्थेत बालक अज्ञानी असते. भरजवानीत तो वाममार्गाला लागतो. तिसऱ्या, प्रौढ अवस्थेत माया गोळा करण्यात वेळ घालवतो व शेवटी वृद्धावस्थेत ही सारी संपत्ती येथेच सोडून पश्चात्ताप करीत ह्या जगातून निघून जातो. ॥ २ ॥ अनंतकाळानंतर हा दुर्लभ मानवदेह प्राप्त होतो. पण जीव प्रभुनामाविना तो मातीमोल करतो. नामविहीन जीव हा पशू, प्रेत, मूर्खाहूनही वाईट असतो. ज्याने त्यास निर्माण केले त्या प्रभू परमात्म्यासही तो जाणत नाही. ॥ ३ ॥ हे गोपाळा, हे गोविंदा, हे सृष्टीकर्त्या प्रभू ! माझी प्रार्थना ऐक. तू दीनांचा कैवारी आहेस. सदैव कृपा करणारा आहेस. तूच मला ह्या बंधनातून मुक्त कर. नानक म्हणतो, हे प्रभो ! माझ्यावर कृपा करून मला तुझ्याशी एकरूप करून घे. सारे जग तर अज्ञान, अंधकारात बुडून गेले आहे. ॥ ४ ॥ १२ ॥ २३ ॥

॥ रामकली महला ५ ॥

करि संजोगु बनाई काछि ॥ तिसु संगि रहिओ इआना राचि ॥
प्रतिपारै नित सारि समारै ॥ अंत की बार ऊठि सिधारै ॥ १ ॥
नाम बिना सभु झूठु परानी ॥
गोविद भजन बिनु अवर संगि राते ते सभि माइआ मूठु परानी ॥ १ ॥ रहाउ ॥
तीरथ नाइ न उतरसि मैलु ॥ करम धरम सभि हउमै फैलु ॥
लोक पचारै गति नही होइ ॥ नाम बिहूणे चलसहि रोइ ॥ २ ॥
बिनु हरि नाम न टूटसि पटल ॥ सोधे सासत्र सिम्रिति सगल ॥
सो नामु जपै जिसु आपि जपाए ॥ सगल फला से सूखि समाए ॥ ३ ॥
राखनहारे राखहु आपि ॥ सगल सुखा प्रभ तुमरै हाथि ॥
जितु लावहि तितु लागह सुआमी ॥ नानक साहिबु अंतरजामी ॥ ४ ॥ १३ ॥ २४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९०)

शब्दार्थ : **काछि** – मोजून मापून. **इआना** – अज्ञानी. **राचि** – रममाण. **समारै** – संभाळ करतो. **परानि** – प्राणी. **फैलु** – फैलाव, पसारा. **पचारे** – देखावा. **सोधे** – शोधणे. **जपाए** – जप करवणे.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने पंचतत्त्वांचा मेळ घालून नीट मोजून मापून हे मानवी शरीर निर्माण केले. त्याचे स्मरण करण्याऐवजी हा मूर्ख जीव त्या शरीराचे कोडकौतुक करण्यात रममाण होऊन गेला आहे. ह्या देहाचे

पोषण करणे, त्याचा सांभाळ करणे ह्यातच तो लिप्त होऊन राहिला आहे आणि शेवटी हे शरीर येथेच सोडून जातो. ॥ १ ॥ हे जीवा, प्रभुनामाशिवाय अन्य सर्व गोष्टी खोट्या आहेत. नश्वर आहेत. जो गोविंदाचे भजन करणे सोडून अन्य प्रापंचिक गोष्टीत रममाण होतो, तो मायेच्या जाळ्यात फसतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ केवळ तीर्थात स्नान केल्याने मनाचा मळ नष्ट होत नाही. कर्मकांड, धर्मकार्ये हा सारा अहंकाराचा पसारा आहे. लोकांना दाखवण्यापुरता देखावा आहे. त्याने मुक्ती प्राप्त होत नाही. नामविहीन जीव ह्या जगातून रडत निघून जातो. ॥ २ ॥ प्रभुनामाशिवाय मनावरील मोहमायेचा पडदा दूर होत नाही. सर्व शास्त्रे, स्मृतिग्रंथ शोधा, ते तुम्हास हेच सांगतील. ज्यास प्रभू परमात्मा नामस्मरण करण्याची बुद्धी देतो तोच नामस्मरण करतो व तोच सर्व फल प्राप्त करून अखेर प्रभूरूपात सामावून जातो. ॥ ३ ॥ हे रक्षणकर्ता प्रभू ! माझे रक्षण कर. सर्व सुख तुझ्याच हाती आहे. हे प्रभो ! तू जे कार्य मला करावयास लावशील तेच मी करीन. नानक सांगतात, तो प्रभू परमात्मा अंतर्ज्ञानी आहे. ॥ ४ ॥ १३ ॥ २४ ॥

॥ रामकली महला ५ ॥

जो किछु करै सोई सुखु जाना ॥ मनु असमझु साधसंगि पतीआना ॥
डोलन ते चूका ठहराइआ ॥ सति माहि ले सति समाइआ ॥ १ ॥
दूखु गइआ सभु रोगु गइआ ॥
प्रभ की आगिआ मन महि मानी महा पुरख का संगु भइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
सगल पवित्र सरब निरमला ॥ जो वरताए सोई भला ॥
जह राखै सोई मुकति थानु ॥ जो जपाए सोई नामु ॥ २ ॥
अठसठि तीरथ जह साध पग धरहि ॥ तह बैकुंठु जह नामु उचरहि ॥
सरब अनंद जब दरसनु पाईऐ ॥ राम गुणा नित नित हरि गाईऐ ॥ ३ ॥
आपे घटि घटि रहिआ बिआपि ॥ दइआल पुरख परगट परताप ॥
कपट खुलाने भ्रम नाठे दूरे ॥ नानक कउ गुर भेटे पूरे ॥ ४ ॥ १४ ॥ २५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९०)

शब्दार्थ : **असमझु** – नासमझ, असमंजस. **पतीआना** – रममाण होतो. **डोलन** – चंचलता. **वरताहै** – करतो, घडवतो. **थानु** – स्थान. **बिआपि** – व्यापून, व्याप्त. **कपट** – द्वार, कवाड. **खुलाने** – उघडले. **नाठे** – नष्ट.

भावार्थ : हे जीवा ! प्रभू परमात्मा जे काही करतो त्यातच सुख मान. मन असमंजस आहे. साधुसंतांच्या संगतीत मन गुंतवल्याने मनाची चंचलता थांबते व ते स्थिर होते. सत्यामध्ये सत्य सामावून जाते. ॥ १ ॥ जेव्हा जीव प्रभू परमात्म्याची आज्ञा शिरसावंद्य मानतो महापुरुषांची संगत त्यास आवडू लागते तेव्हा त्याचे सर्व दु:ख सर्व रोग नाहीसे होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा जे काही करतो ते चांगलेच असते. तो जेथे जीवास ठेवतो तेच त्याचे मुक्तिस्थान होय. तो जे जपावयास लावतो तेच प्रभूचे नाम. ॥ २ ॥ ज्या स्थानांना साधुसंतांचा पदस्पर्श झाला, तीच अडुसष्ट तीर्थस्थाने. जिथे प्रभुनामाचे उच्चारण होते तेच वैकुंठ. जेव्हा प्रभू परमात्म्याचे दर्शन होते तेव्हा सर्व प्रकारचा आनंद प्राप्त होतो. हे जीवा ! तू नित्य प्रभू परमात्म्याचे गुणगान कर. ॥ ३ ॥ तो प्रभू प्रत्येक

शरीरात वास करतो. त्या दयाळू परमपुरुषाचा प्रताप सर्वत्र प्रगट झाला आहे. नानक सांगतात, मला पूर्णगुरू प्रभू परमात्मा भेटला आहे. त्याने माझ्या हृदयाचे दरवाजे उघडले. त्यामुळे माझे सारे भ्रम नष्ट झाले. ॥४॥१४॥२५॥

॥ रामकली महला ५ ॥

कोटि जाप ताप बिस्राम ॥ रिधि बुधि सिधि सुर गिआन ॥
अनिक रूप रंग भोग रसै ॥ गुरमुखि नामु निमख रिदै वसै ॥ १ ॥
हरि के नाम की वडिआई ॥ कीमति कहणु न जाई ॥ १ ॥ रहाउ ॥
सूरबीर धीरज मति पूरा ॥ सहज समाधि धुनि गहिर गंभीरा ॥
सदा मुकतु ता के पूरे काम ॥ जा कै रिदै वसै हरि नाम ॥ २ ॥
सगल सूख आनंद अरोग ॥ समदरसी पूरन निरजोग ॥
माइ न जाइ डोलै कत नाही ॥ जा कै नामु बसै मन माही ॥ ३ ॥
दीन दइआल गोपाल गोविंद ॥ गुरमुखि जपीऐ उतरै चिंद ॥
नानक कउ गुरि दीआ नामु ॥ संतन की टहल संत का कामु ॥ ४ ॥ १५ ॥ २६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९०)

शब्दार्थ : **सुरगिआन** – दिव्यज्ञान. **निमख** – क्षणभर. **वडिआइ** – महती. **कीमति** – किंमत, मूल्य. **धीरज** – धैर्यवान. **निरजोरा** – निर्लेप. **चिंद** – चिंता. **टहल** – सेवा.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने ज्याच्या मनात क्षणभर प्रभुनामाचा वास होतो त्याला कोटी कोटी जप, तप केल्याचा आनंद प्राप्त होतो. त्यास ऋद्धी, सिद्धी, विवेकशील बुद्धी व आत्मज्ञान प्राप्त होते. तो अनेक रस, रंग, रूपांचा उपभोग घेतो. ॥ १ ॥ हरिनामाची ही महती आहे. त्याचे कोणीही मूल्यमापन करू शकत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याच्या हृदयात हरिनाम स्थिर झाले तो शूरवीर, धैर्यवान व पूर्णज्ञानी होतो. तो सहजसमाधीत तल्लीन होतो. त्यांच्या अंत:करणात अनाहत नाद निनादू लागतो. तो सदैव मुक्त असतो. त्याचे सर्व कार्य सफल होते. ॥ २ ॥ ज्याच्या मनात प्रभुनामाचा वास होतो तो सर्व प्रकारचे सुख, आनंद व आरोग्य उपभोगतो. तो संसारातील सर्व गोष्टींपासून निर्लिप्त राहतो व सर्वांकडे समदृष्टीने पाहतो. त्याचे मन विचलित होत नाही व तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. ॥ ३ ॥ सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे जो दीनदयाळू प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करतो तो सर्व चिंतांपासून मुक्त होतो. नानक सांगतात, गुरुस्वरूप प्रभू परमात्म्याने नाम प्रदान केले आहे. ह्या नामाचे स्मरण हीच संतसेवा व हेच संतकार्य. ॥ ४ ॥ १५ ॥ २६ ॥

॥ रामकली महला ५ ॥

बीज मंत्रु हरि कीरतनु गाउ ॥ आगै मिली निथावे थाउ ॥
गुर पूरे की चरणी लागु ॥ जनम जनम का सोइआ जागु ॥ १ ॥
हरि हरि जापु जपला ॥ गुर किरपा ते हिरदै वासै भउजलु पारि परला ॥ १ ॥ रहाउ ॥
नामु निधानु धिआइ मन अटल ॥ ता छूटहि माइआ के पटल ॥

गुर का सबदु अंम्रित रसु पीउ ॥ ता तेरा होइ निरमल जीउ ॥ २ ॥
सोधत सोधत सोधि बीचारा ॥ बिनु हरि भगति नही छुटकारा ॥
सो हरि भजनु साध कै संगि ॥ मनु तनु रापै हरि कै रंगि ॥ ३ ॥
छोडि सिआणप बहु चतुराई ॥ मन बिनु हरि नावै जाइ न काई ॥
दइआधारी गोविद गुोसाई ॥ हरि हरि नानक टेक टिकाई ॥ ४ ॥ १६ ॥ २७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९१)

शब्दार्थ : **बीज मंत्रू** – बीजमंत्र, एक ओंकार. **निथावे** – निराधार. **थाउ** – स्थान, आधार. **सोइआ** – झोपलेला, निद्रिस्त. **जागु** – जागा झाला. **परला** – पडला. **अटल** – स्थिर, निश्चल. **रापै** – रंगून जाणे. **जाइ** – ठिकाण, आश्रयस्थान. **टेक** – आश्रय.

भावार्थ : प्रभुनामरूपी बीजमंत्राच्या साहाय्याने हरीचे कीर्तन करा. असे केल्याने निराधारास प्रभू दरबारात स्थान प्राप्त होईल. पूर्णगुरूस शरण गेल्याने जन्मजन्मांतरी मोहनिद्रेत निद्रिस्त झालेला जागृत होतो. ॥ १ ॥ मी जेव्हा हरिनामाचा जप केला, तेव्हा गुरुकृपेने प्रभू परमात्म्याने माझ्या हृदयात वास केला. त्यामुळे मी भवसागर तरून गेलो. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे मना ! जर तू अटल प्रभू परमात्म्याच्या नाम भांडाराचे ध्यान केलेस तर त्यामुळे मायेचा पडदा नष्ट होईल. शब्दगुरूच्या अमृतरसाचे पान केल्याने मन निर्मल होते. ॥ २ ॥ तू नीट विचारपूर्वक शोध कर. तुला कळेल की हरिभक्तीशिवाय मोहमायेच्या बंधनातून मुक्तता नाही. म्हणून साधुसंतांच्या संगतीत हरिभजन करावे. त्यामुळे तन मन हरिरंगात रंगून जाते. ॥ ३ ॥ हे जीवा ! तू आपले शहाणपण व चतुराई सोड. हे मना ! प्रभुनामाशिवाय तुला अन्य कोणतेही आश्रयस्थान नाही. गुरुनानक सांगतात, की जेव्हा प्रभू परमात्म्याने माझ्यावर कृपा केली, तेव्हा मला हरिचरणी आश्रय प्राप्त झाला. ॥ ४ ॥ १६ ॥ २७ ॥

॥ रामकली महला ५ ॥

संत कै संगि राम रंग केल ॥ आगै जम सिउ होइ न मेल ॥
अहंबुधि का भइआ बिनास ॥ दुरमति होई सगली नास ॥ १ ॥
राम नाम गुण गाइ पंडित ॥
करम कांड अहंकारु न काजै कुसल सेती घरि जाहि पंडित ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि का जसु निधि लीआ लाभ ॥ पूरन भए मनोरथ साभ ॥
दुखु नाठा सुखु घर महि आइआ ॥ संत प्रसादि कमलु बिगसाइआ ॥ २ ॥
नाम रतनु जिनि पाइआ दानु ॥ तिसु जन होए सगल निधान ॥
संतोखु आइआ मनि पूरा पाइ ॥ फिरि फिरि मागन काहे जाइ ॥ ३ ॥
हरि की कथा सुनत पवित ॥ जिहवा बकत पाई गति मति ॥
सो परवाणु जिसु रिदै वसाई ॥ नानक ते जन ऊतम भाई ॥ ४ ॥ १७ ॥ २८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९१)

शब्दार्थ : केल – . काजै – कामाचे. कुशल – आनंद. साभ – सर्व. नाठा – नष्ट झाले. बिगासाइआ – विकसले. मागन – मागणे. बकत – उच्चारण.

भावार्थ : जे संतांच्या संगतीत प्रभुप्रेमरंगाचा खेळ खेळतात. ते अंती यमदूतांपासून वाचतात. अहंकाराचा नाश होतो. सर्व दुर्बुद्धी नष्ट होते. ॥ १ ॥ हे पंडित ! तू रामनामाच्या साहाय्याने प्रभूचे गुणगान कर. कर्मकांड, अहंकार तुझ्या काही कामी येणार नाही. रामनामाचे स्मरण केल्याने तू आनंदाने प्रभूच्या घरी जाशील. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्यास प्रभुयशरूपी भांडार प्राप्त झाले त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतात. दु:ख नष्ट होते. सुख आपोआप घरी येते. संतांच्या कृपाप्रसादाने त्याचे हृदयकमल विकसित होते. ॥ २ ॥ ज्याला प्रभू परमात्म्याकडून नामरत्नाचे दान प्राप्त झाले त्यास सर्व भांडारच प्राप्त झाले. त्यास संतोष प्राप्त होतो व त्याच्या अंतरात पूर्णपुरुष परमात्म्याचा वास होतो. असा जीव मग परत परत कुणाकडे कशाला याचना करील ? ॥ ३ ॥ हरीची कथा श्रवण केल्याने मन पवित्र होते. मुखावाटे प्रभुनामाचे उच्चारण केल्याने परमगती प्राप्त होते. ज्याच्या हृदयात प्रभू परमात्म्याचा वास आहे तो प्रभूकडून स्वीकृत होतो. नानक सांगतात, असे प्रभुसेवक उत्तम असतात. ते माझे बंधू असतात. ॥ ४ ॥ १७ ॥ २८ ॥

॥ रामकली महला ५ ॥

गहु करि पकरी न आई हाथि ॥ प्रीति करी चाली नही साथि ॥
कहु नानक जउ तिआगि दई ॥ तब ओह चरणी आइ पई ॥ १ ॥
सुणि संतहु निरमल बीचार ॥
राम नाम बिनु गति नही काई गुरु पूरा भेटत उधार ॥ १ ॥ रहाउ ॥
जब उसका कोई देवै मानु ॥ तब आपस ऊपरि सवै गुमानु ॥
जब उस कउ कोई मनि परहरै ॥ तब ओहु सेवकि सेवा करै ॥ २ ॥
मुखि बेरावै अंति ठगावै ॥ इकतु ठउर ओह कही न समावै ॥
उन मोहे बहुते ब्रहमंड ॥ राम जनी कीनी खंड खंड ॥ ३ ॥
जो मागै सो भूखा रहै ॥ इसु संगि राचै सु कछू न लहै ॥
इसहि तिआगि सत संगति करै ॥ वडभागी नानक ओहु तरै ॥ ४ ॥ १८ ॥ २९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९१)

शब्दार्थ : गुहु करि – . जउ – जेव्हा. तिआगि – त्याग केला. ओह – ती माया. देवै – देतो. मानु – मान. गुमानु – गर्व. मनि – . परहरै – . सेवकि – दासी. बेरावै – . इकतु – एका. ठउर – स्थान. उनि – त्या मायेने, तिने. कीनी – केले. खंड खंड – तुकडे तुकडे. राचै – रममाण झाला.

भावार्थ : मायेला जर जबरदस्तीने पकडण्याचा प्रयत्न केला तर ती हाती येत नाही. तिला प्रेमाने जवळ केले तरी ती हाती येत नाही. नानक सांगतात, जेव्हा तिचा त्याग करावा, तिला झिडकारावे, तेव्हा ती पायी लोळण घेते. ॥ १

॥ हे संतजनहो ! एक निर्मळ विचार ऐका. रामनामाशिवाय परमगती प्राप्त होत नाही व पूर्णगुरूशिवाय उद्धार होत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ ह्या मायेला जर कोणी मान दिला तर ती स्वत:च गर्वाने फुगून जाते. पण जो कोणी तिला आपल्या मनातून हाकलून देईल तर ती त्याची दासी बनून सेवा करते. ॥ २ ॥ सुरुवातीला ही माया तोंडदेखले गोड बोलते पण ती अंती जीवास ठकवते. ती कोठेही एका जागी स्थिर राहत नाही. तिने आपल्या प्रभावाने सर्व ब्रह्मांडास मोहिनी घातली आहे. पण रामाच्या सेवकांनी तिचे तुकडे तुकडे करून टाकले. ॥ ३ ॥ जो मायेकडे याचना करतो तो उपाशी राहतो. जो तिचे लांगूल चालन करतो त्यास ती कधीही प्राप्त होत नाही. नानक सांगतात, जे मायेचा त्याग करून संतांची संगत धरतात ते भाग्यवान भवसागर तरून जातात.॥४॥१८॥२९॥

॥ रामकली महला ५ ॥

आतम रामु सरब महि पेखु ॥ पूरन पूरि रहिआ प्रभ एकु ॥
रतनु अमोलु रिदे महि जानु ॥ अपनी वसतु तू आपि पछानु ॥ १ ॥
पी अंम्रितु संतन परसादि ॥
वडे भाग होवहि तउ पाईऐ बिनु जिहवा किआ जाणै सुआदु ॥ १ ॥ रहाउ ॥
अठदस बेद सुने कह डोरा ॥ कोटि प्रगास न दिसै अंधेरा ॥
पसू परीति घास संगि रचै ॥ जिसु नही बुझावै सो कितु बिधि बुझै ॥ २ ॥
जानणहाउ रहिआ प्रभु जानि ॥ ओति पोति भगतन संगानि ॥
बिगसि बिगसि अपुना प्रभु गावहि ॥ नानक तिन जम नेड़ि न आवहि ॥३॥१९॥३०॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९२)

शब्दार्थ : पेखु – पाहा. पछानु – ओळख. सुआदु – स्वाद. अठदस – अज्ञानाने अंध झालेल्यास. पसु – पशु. परीति – प्रीती. रचे – रममाण. जानणहारु – जाणणारा. रहिआ – . संगानि – सांगाती. गावहि – गातो.

भावार्थ : हे जीवा ! तू सर्वांमध्ये आत्मारामास पाहा. तो पूर्णपुरुष परमात्मा एकमेव सर्वत्र भरून राहिला आहे. प्रभुरूपी अमूल्यरत्न तुझ्या हृदयातच आहे हे जाण. आपली वस्तू तू आपणच ओळख. ॥ १ ॥ हे जीवा ! संतांच्या कृपेने तू नामामृत प्राशन कर. महाभाग्यानेच ते प्राप्त होते. पण भक्तिरूपी जिव्हा नसेल तर त्याचा स्वाद कसा प्राप्त होणार ? ॥ १ ॥ रहाउ ॥ मायापाशात गुंतलेला जीव चार वेद व अठरा पुराणे ऐकूनही बहिरा असतो. कोटी सूर्य प्रकाशत असूनही अज्ञानाने अंध झालेल्यास त्याचा प्रकाश दिसत नाही. जनावराला गवताबद्दलच प्रेम असते. पण जीव तरी बिचारा काय करणार ? प्रभू ज्यास ज्ञान देत नाही तो हे कसे जाणणार ?॥२॥ तो सर्व काही जाणणारा प्रभू सर्व काही जाणतो व तो सदैव भक्तांचा सांगाती असतो. नानक सांगतात, जो प्रभुसेवक विकसित मनाने प्रभूचे गुणगान करतो त्याच्या आसपासही यम फिरकत नाही.॥३॥१९॥३०॥

॥ रामकली महला ५ ॥

दीनो नामु कीओ पवितु ॥ हरि धनु रासि निरास इह बितु ॥
काटी बंधि हरि सेवा लाए ॥ हरि हरि भगति राम गुण गाए ॥ १ ॥
बाजे अनहद बाजा ॥
रसकि रसकि गुण गावहि हरि जन अपनै गुरदेवि निवाजा ॥ १ ॥ रहाउ ॥
आइ बनिओ पूरबला भागु ॥ जनम जनम का सोइआ जागु ॥
गई गिलानि साध कै संगि ॥ मनु तनु रातो हरि कै रंगि ॥ २ ॥
राखे राखनहार दइआल ॥ ना किछु सेवा ना किछु घाल ॥
करि किरपा प्रभि कीनी दइआ ॥ बुडत दुख महि काढि लइआ ॥ ३ ॥
सुणि सुणि उपजिओ मन महि चाउ ॥ आठ पहर हरि के गुण गाउ ॥
गावत गावत परम गति पाई ॥ गुरप्रसादि नानक लिव लाई ॥ ४ ॥ २० ॥ ३१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९२)

शब्दार्थ : **दीनो** – देऊन. **निरास** – निराश. **रसकि** – रसास्वाद घेऊन. **निवाजा** – सन्मानित केले. **पूरबला** – पूर्वकर्मानुसार. **भाग** – भाग्य. **गिलानि** – ग्लानी. **घाल** – परिश्रम. **उपजिओ** – उत्पन्न झाले. **चाउ** – आवड.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने मला आपल्या नामाचे दान देऊन पवित्र केले. प्रभुनामरूपी धनराशी प्राप्त झाल्यामुळे माया निराश होऊन माझ्यापासून दूर निघून गेली. प्रभूने माझी सर्व बंधने तोडून टाकून मला आपल्या सेवेस लावले. आता मी हरिभक्तीत रंगून रामाचे गुणगान गातो. ॥ १ ॥ प्रभूने आपल्या सेवकांवर कृपा करून त्यांना सन्मानित केले त्यामुळे त्यांच्या अंत:करणात अनाहत नाद निनादू लागला व ते रसिकपणे प्रभू परमात्म्याचे गुणगान गाऊ लागले. ॥ १ ॥ रहाउ ॥ पूर्वकर्मानुसार भाग्य उदयाला आले व जन्मजन्मांतरीचा निद्रिस्त जीव जागृत झाला. साधुसंतांच्या संगतीने त्याच्या मनाची ग्लानी दूर झाली. त्याचे तन, मन हरिनामात रंगून गेले.॥२॥ त्या रक्षणकर्त्या दयाळू प्रभू परमात्म्याने माझे रक्षण केले. मी त्याची काहीच सेवा केली नाही किंवा परिश्रमही केले नाहीत. त्यानेच स्वत:हून माझ्यावर कृपा केली. प्रभू परमात्म्याने दया केली. मला संसाराच्या दु:खात बुडताना त्यातून बाहेर काढले. ॥ ३ ॥ प्रभुनाम ऐकून ऐकून मनात आवड निर्माण झाली व मी अष्टौप्रहर हरीचे गुण गाऊ लागलो. गाता गाता परमगती प्राप्त झाली. नानक सांगतात, आता माझे मन प्रभुनामात एकाग्र झाले आहे.॥४॥२०॥३१॥

॥ रामकली महला ५ ॥

कउडी बदलै तिआगै रतनु ॥ छोडि जाइ ताहू का जतनु ॥
सो संचै जो होछी बात ॥ माइआ मोहिआ टेढउ जात ॥ १ ॥
अभागे तै लाज नाही ॥

सुख सागर पूरन परमेसरु हरि न चेतिओ मन माहि ॥ १ ॥ रहाउ ॥
अंम्रितु कउरा बिखिआ मीठी ॥ साकत की बिधि नैनहु डीठी ॥
कूड़ि कपटि अहंकारि रीझाना ॥ नामु सुनत जनु बिछूअ डसाना ॥ २ ॥
माइआ कारणि सद ही झूरै ॥ मनि मुखि कबहि न उसतति करै ॥
निरभउ निरंकार दातारु ॥ तिसु सिउ प्रीति न करै गवारु ॥ ३ ॥
सभ साहा सिरि साचा साहु ॥ वेहुमताजु पूरा पातिसाहु ॥
मोह मगन लपटिओ भ्रम गिरह ॥ नानक तरीऐ तेरी मिहर ॥ ४ ॥ २१ ॥ ३२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९२)

शब्दार्थ : **कउडी** – कवडी. **जतनु** – जतन करणे. **होछी** – तुच्छ. **ढेढउ** – वाकड्या मार्गास. **अभागे** – भाग्यहीन, दुर्दैवी. **चेतिआ** – चिंतीला, स्मरण केले. **कउरा** – कडू. **बिखिआ** – विष. **डीठी** – पाहिली. **कूडि** – असत्य. **कपटि** – कपट. **रिझाना** – आनंदित. **बिछुअ** – विंचू. **डसाना** – चावला. **झुरै** – झुरतात. **साहा** – सम्राट. **बेगुहताजु** – . **लपटिओ** – लिप्त होणे. **गिरह** – . **मिहर** – दया, कृपा.

भावार्थ : जीव मायारूपी कवडी प्राप्त करण्यासाठी प्रभुनामरूपी रत्नाचा त्याग करतो. जे सोडून जाणार आहे त्याचे जतन का करावे. जो तुच्छ गोष्टीत रममाण होतो तोच अशा नश्वर गोष्टींचा संचय करतो. जो मायेने मोहित होतो तो कुमार्गी होतो. ॥ १ ॥ अभागी माणसा तुला लाज कशी वाटत नाही ? सुखाचा सागर असलेल्या पूर्ण परमेश्वराची तुला कधी आठवणही झाली नाही. तू कधी त्याचे स्मरणही केले नाहीस. ॥ १ ॥ रहाउ ॥ तुला प्रभुनामामृत कडू लागते व मायारूपी विष गोड वाटते. प्रभूस विन्मुख झालेल्या शाक्ताचे हे लक्षण आहे. तो असत्याचरण, कपट अहंकार यांनी आनंदित होतो. प्रभूचे नाम ऐकून जणू काही विंचू चावलाय अशा त्यास वेदना होतात. ॥ २ ॥ तो सदैव मायेसाठी झुरत असतो. मनाने व मुखाने कधीही प्रभू परमात्म्याची स्तुती करत नाही. हा मूर्ख मनुष्य त्या निर्भय निराकार दयाळू प्रभू परमात्म्यावर कधीच प्रीती करत नाही. ॥ ३ ॥ राजांचा महाराज पातशहासुद्धा भ्रमाच्या गाठींनी बद्ध होऊन मोहात मग्न होऊन जातो. नानक सांगतात, हे प्रभो ! तुझ्याच कृपेने मी भवसागर तरून गेलो. ॥ ४ ॥ २१ ॥ ३२ ॥

॥ रामकली महला ५ ॥

रैणि दिनसु जपउ हरि नाउ ॥ आगै दरगह पावउ थाउ ॥
सदा अनंदु न होवी सोगु ॥ कबहू न बिआपै हउमै रोगु ॥ १ ॥
खोजहु संतहु हरि ब्रहम गिआनी ॥
बिसमन बिसम भए बिसमादा परमगति पावहि हरि सिमरि परानी ॥ १ ॥ रहाउ ॥
गनि मिनि देखहु सगल बीचारि ॥ नाम बिना को सकै न तारि ॥
सगल उपाव न चालहि संगि ॥ भवजलु तरीऐ प्रभ कै रंगि ॥ २ ॥
देहि धोइ न उतरै मैलु ॥ हउमै बिआपै दुबिधा फैलु ॥
हरि हरि अवखधु जो जनु खाइ ॥ ता का रोगु सगल मिटि जाइ ॥ ३ ॥

करि किरपा पारब्रहम दइआल ॥ मन ते कबहु न बिसरू गोपाल ॥
तेरे दास की होवा धूरि ॥ नानक की प्रभ सरधा पूरि ॥ ४ ॥ २२ ॥ ३३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९३)

शब्दार्थ : **रैणि** – रात्र. **दिनसु** – दिवस. **दरगह** – प्रभूचा दरबार. **सोगु** – शोक. **बिसमन** – आश्चर्यचकित. **बिसमादा** – विस्मय, आश्चर्य. **गनि** – गणना. **उपाव** – उपाय. **फैलु** – फैलाव, पसारा. **अवखधु** – औषध. **धूरि** – चरणधूळ.

भावार्थ : हे जीवा ! तू रांत्रदिवस प्रभुनामाचा जप कर व प्रभू दरबारात स्थान प्राप्त कर. त्यामुळे तू सदैव आनंद उपभोगशील. तुला कधीही शोक होणार नाही. अहंकाराचा रोग कधीही व्यापणार नाही. ॥ १ ॥ हे संत जनहो ! त्या ब्रह्मज्ञानी प्रभू परमात्म्याचा शोध घ्या. त्याला पाहून स्वतः विस्मयही विस्मयचकित होतो. जो जीव हरीचे स्मरण करतो त्यास परमगती प्राप्त होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! तू सर्वंकष विचार करून पाहा तुला कळून येईल की प्रभुनामाशिवाय कोणीही भवसागर तरून जाऊ शकले नाहीत. अन्य कोणत्याही उपायाने ते शक्य नाही. केवळ प्रभूच्या रंगात रंगून जाऊनच भवसागर तरून जाता येतो. ॥ २ ॥ देह धुतल्याने मनाचा मळ निघून जात नाही. त्यामळे उलट अहंकार व द्वैतभावाच्या रोगाचा अधिकच फैलाव होतो. जो प्राणी हरिनामरूपी औषधे घेईल त्याचे सर्व रोग बरे होतील. ॥ ३ ॥ हे दयाळू परब्रह्म परमात्मा ! माझ्यावर कृपा कर. माझ्या मनाला तुझा कधीही विसर पडू नये. मी तुझ्या दासांची चरणधूळ व्हावे. नानकाची प्रभू परमात्म्यावर पूर्ण श्रद्धा आहे.॥४॥२२॥३३॥

॥ रामकली महला ५ ॥

तेरी सरणि पूरे गुरदेव ॥ तुधु बिनु दूजा नाही कोइ ॥
तू समरथु पूरन पारब्रहमु ॥ सो धिआए पूरा जिसु करमु ॥ १ ॥
तरण तारण प्रभ तेरो नाउ ॥
एका सरणि गही मन मेरै तुधु बिनु दूजा नाही ठाउ ॥ १ ॥ रहाउ ॥
जपि जपि जीवा तेरा नाउ ॥ आगै दरगह पावउ ठाउ ॥
दूखु अंधेरा मन ते जाइ ॥ दुरमति बिनसै राचे हरि नाइ ॥ २ ॥
चरन कमल सिउ लागी प्रीति ॥ गुर पूरे की निरमल रीति ॥
भउ भागा निरभउ मनि बसै ॥ अंम्रित नाम रसना नित जपै ॥ ३ ॥
कोटि जनम के काटे फाहे ॥ पाइआ लाभु सचा धनु लाहे ॥
तोटि न आवै अखुट भंडार ॥ नानक भगत सोहहि हरि दुआर ॥ ४ ॥ २३ ॥ ३४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९३)

शब्दार्थ : **करम** – भाग्य. **ठाउ** – ठिकाण. **जीवा** – जीवन जगतो. **राचै** – रंगून जाणे. **भउ** – भय. **फाहे** – पाश. **लाहै** – लाभला. **अखटु** – अक्षय. **सोहहि** – शोभून दिसतो.

भावार्थ : हे पूर्ण गुरुदेव ! मी तुम्हाला शरण आलो आहे. तुमच्याशिवाय मला अन्य कोणी नाही. आपण समर्थ पूर्ण परब्रह्म आहात. ज्याचे भाग्य पूर्ण झाले तोच तुमचे स्मरण करतो. ॥ १ ॥ हे प्रभो ! तुझे नाव हे भवसागर तरून नेणारी नौका आहे. माझे मन त्या एकमेव प्रभू परमात्म्यास शरण गेले आहे. मला तुझ्याशिवाय अन्य कोणाचाही आधार नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ तुझे नामस्मरण करणाऱ्यास प्रभू दरबारात स्थान प्राप्त होते. त्याच्या मनातील सर्व दुःख व अज्ञान, अंधकार नष्ट होतो. त्याची दुर्बुद्धी नष्ट होते व तो हरिनामात रंगून जातो. ॥ २ ॥ पूर्णगुरूची कार्यपद्धती निर्मळ आहे. त्यामुळे जीवाच्या मनात प्रभूच्या चरणकमलाशी प्रीती जुळते. त्याच्या मनातील भय नष्ट होते व तेथे निर्भयता वास करते. त्याची रसना सदैव अमृतमधूर अशा प्रभुनामाचा जप करते. ॥ ३ ॥ कोटी कोटी जन्माचे पाश तुटून जातात. सत्यरूपी नामधनाचा लाभ प्राप्त होतो. प्रभू परमात्म्याचे भांडार अक्षय आहे. त्यात कधीच कमतरता येत नाही. नानक सांगतात, प्रभूचे भक्त प्रभूच्या दरबारात शोभून दिसतात.॥४॥२३॥३४॥

॥ रामकली महला ५ ॥

रतन जवेहर नाम ॥ सतु संतोखु गिआन ॥
सूख सहज दइआ का पोता ॥ हरि भगता हवालै होता ॥ १ ॥
मेरे राम को भंडारु ॥
खात खरचि कछु तोटि न आवै अंतु नही हरि पारावरु ॥ १ ॥ रहाउ ॥
कीरतनु निरमोलक हीरा ॥ आनंद गुणी गहीरा ॥
अनहद बाणी पूंजी ॥ संतन हथि राखी कूंजी ॥ २ ॥
सुंन समाधि गुफा तह आसनु ॥ केवल ब्रहम पूरन तह बासनु ॥
भगत संगि प्रभु गोसटि करत ॥ तह हरख न सोग न जनम न मरत ॥ ३ ॥
करि किरपा जिसु आपि दिवाइआ ॥ साधसंगि तिनि हरि धनु पाइआ ॥
दइआल पुरख नानक अरदासि ॥ हरि मेरी वरताणि हरि मेरी रासि ॥४॥२४॥३५॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९३)

शब्दार्थ : **पोता** – . **हवालै** – हवाली, ताब्यात. **निरमोलक** – अमूल्य. **कुंजी** – चावी. **गुफा** – . **बासनु** – वसतिस्थान. **गोसटि** – गोष्टी. **दिवाइआ** – दिला. **वरताणि** – व्यवहार. **रासि** – संपत्ती.

भावार्थ : प्रभुनाम हे रत्न आहे. जवाहर आहे. प्रभुनामाने सत्य, संतोष व ज्ञान प्राप्त होते. प्रभुनाम हे सुख, सहजावस्था व दया यांचा खजिना आहे. प्रभूने तो नामरूपी खजिना भक्तांच्या स्वाधीन केला आहे. ॥ १ ॥ माझ्या रामाचे हे नाम भांडार कितीही खाल्ले, खर्चिले तरी कमी होत नाही. त्याला अंत नाही. पारावार नाही.॥१॥ रहाउ ॥ हरीचे कीर्तन हा अमोल हिरा आहे. त्याच्या साहाय्यानं गुणगंभीर आनंद प्राप्त होतो. प्रभुनाम हा अनाहत नादाचा खजिना आहे. प्रभूने त्याची किल्ली संतांच्या हातात ठेवली आहे. संतजन निर्विकल्प समाधिरूपी गुहेत आसनस्थ बसले आहेत. तेथे केवळ ब्रह्माचाच निवास असतो. तेथे प्रभू परमात्मा भक्तांशी वार्तालाप करतो. तेथे हर्ष नसतो वा

शोक नसतो. जन्म नसतो व मरणही नसते. ॥ ३ ॥ ज्याच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते त्यास तो स्वत: प्रभुनाम देतो. साधुसंगतीत त्यास ते प्रभुनाम धन प्राप्त होते. दयाळू परमपुरुषापुढे नानक प्रार्थना करतात. हरी हाच माझा व्यवहार व हरी हीच माझी संपत्ती असावी. ॥ ४ ॥ २४ ॥ ३५ ॥

॥ रामकली महला ५ ॥

महिमा न जानहि बेद ॥ ब्रहमे नही जानहि भेद ॥
अवतार न जानहि अंतु ॥ परमेसरु पारब्रहम बेअंतु ॥ १ ॥
अपनी गति आपि जानै ॥ सुणि सुणि अवर वखानै ॥ १ ॥ रहाउ ॥
संकरा नही जानहि भेव ॥ खोजत हारे देव ॥
देवीआ नही जानै मरम ॥ सभ ऊपरि अलख पारब्रहम ॥ २ ॥
अपनै रंगि करता केल ॥ आपि बिछोरै आपे मेल ॥
इकि भरमे इकि भगती लाए ॥ अपणा कीआ आपि जणाए ॥ ३ ॥
संतन की सुणि साची साखी ॥ सो बोलहि जो पेखहि आखी ॥
नही लेपु तिसु पुंनि न पापि ॥ नानक का प्रभु आपे आपि ॥ ४ ॥ २५ ॥ ३६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९४)

शब्दार्थ : **बेअंतु** – अनंत. **अबर** – अन्य. **वखानै** – सांगतात. **संकरा** – शंकर. **भेव** – भेद, रहस्य. **मरम** – मर्म. **अलख** – अलक्ष्य, अदृश्य. **केल** – खेळ, क्रीडा. **बिछोरै** – वियोग घडवतो. **मेल** – मिलन घडवतो.

भावार्थ : वेदही प्रभू परमात्म्याचा महिमा यथार्थपणे जाणत नाहीत. ब्रह्मदेवही त्याचे रहस्य जाणत नाहीत. प्रभूचे अवतारही प्रभूचा अंत जाणत नाहीत. प्रभू परमेश्वर परब्रह्म हा अनंत आहे. ॥ १ ॥ त्याची गती केवळ तोच जाणतो. इतर लोक ऐकून ऐकून त्याचे वर्णन करतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ शंकरही प्रभू परमात्म्याचे रहस्य जाणत नाही. देवांनीही त्याला पूर्णांशाने जाणण्याचा प्रयत्न केला पण त्यांनाही हार पत्करावी लागली. देवींनाही त्याचे मर्म समजले नाही. तो अलक्ष्य परमात्मा सर्वांहून श्रेष्ठ आहे. ॥ २ ॥ प्रभू परमात्मा आपल्याच रंगात रंगून क्रीडा करत असतो. तोच जीवांचा वियोग घडवतो व तोच परत त्यांचे मिलन घडवतो. कोणाला तो मोहमायेच्या भ्रमात भ्रमत ठेवतो तर कोणाला तो भक्तिमार्गाला लावतो. तो जे काही करतो ते फक्त तोच जाणतो. ॥ ३ ॥ हे जीवा ! तू संतजनांचा सत्य उपदेश ऐक व त्याप्रमाणे आचरण कर. कारण ते प्रत्यक्ष अनुभूती घेऊनच बोलत असतात. प्रभू परमात्मा पाप वा पुण्य कशानेच लिप्त होत नाही. नानकांच्या प्रभूने आपणच आपल्यास प्रगट केले आहे. तो स्वयंभू आहे. ॥ ४ ॥ २५ ॥ ३६ ॥

॥ रामकली महला ५ ॥

किछहू काजु न कीओ जानि ॥ सुरति मति नाही किछु गिआनि ॥
जाप ताप सील नही धरम ॥ किछू न जानउ कैसा करम ॥ १ ॥
ठाकुर प्रीतम प्रभ मेरे ॥

तुझ बिनु दूजा अवरु न कोई भूलह चूकह प्रभ तेरे ॥ १ ॥ रहाउ ॥
रिधि न बुधि न सिधि प्रगासु ॥ बिखै बिआधि के गाव महि बासु ॥
करणहार मेरे प्रभ एक ॥ नाम तेरे की मन महि टेक ॥ २ ॥
सुणि सुणि जीवउ मनि इहु बिस्रामु ॥ पाप खंडन प्रभ तेरो नामु ॥
तू अगनतु जीअ का दाता ॥ जिसहि जणावहि तिनि तू जाता ॥ ३ ॥
जो उपाइओ तिसु तेरी आस ॥ सगल अराधहि प्रभ गुणतास ॥
नानक दास तेरै कुरबाणु ॥ बेअंत साहिबु मेरा मिहरवाणु ॥ ४ ॥ २६ ॥ ३७ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९४)

शब्दार्थ : **किछहु** – कोणतेही. **जानि** – जाणूनबुजून. **सुरति** – . **मति** – बुद्धी. **गिआनि** – ज्ञान. **सील** – शील. **भूलहि** – विसरतो. **चुकही** – चुकतो. **बिखै** – विषयविकार. **बिआधि** – व्याधी. **करणहार** – कर्ता. **टेक** – आधार. **जीवउ** – जीवन जगणे. **बिस्रामु** – विश्राम. **अगनतु** – अगणित. **जाता** – ज्ञाता. **गुणतास** – गुणसागर. **उपाइओ** – उत्पन्न केले. **तिसु** – त्याला. **आस** – आशा.

भावार्थ : हे प्रभो ! मी जाणून बुजून कोणतेही काम केले नाही. मला बुद्धी नाही. ज्ञान नाही. मी जप, तप, धार्मिक अनुष्ठान वगैरे केले नाही. माझ्याजवळ शीलही नाही. कर्म म्हणजे काय हेही मी जाणत नाही. ॥ १ ॥ माझा प्रभू माझा स्वामी आहे. प्रियतम आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही माझे नाही. मी मोहमायेला भुललो असेन. मी अनेक चुकाही केल्या असतील पण तरीही हे प्रभू मी तुझाच आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझ्यापाशी ऋद्धी, सिद्धी, बुद्धी काही नाही. माझ्यात कोणत्याही गुणाचा प्रकाश नाही. विषयविकारांच्या व्याधींच्या गावात माझा वास आहे. सर्व काही करणारा माझा केवळ एकमात्र प्रभू परमात्मा आहे. माझ्या मनाला हे प्रभो ! तुझ्या नामाचाच एकमेव आधार आहे. ॥ २ ॥ हे प्रभो ! हे ऐकून मनाला आनंद झाला की तुझे नाम हे पापांचा विनाश करणारे आहे. तू अनेक जीवांना जीवनदान दिले आहेस. ज्याला तू ज्ञान देतोस त्यासच ते प्राप्त होते. ॥ ३ ॥ तू ज्यांना निर्माण केलेस त्यांना तुझीच आशा वाटते. सारेजण त्या गुणसागर प्रभूची आराधना करतात. माझा स्वामी अनंत कृपा करणारा आहे. दास नानक त्याच्या चरणी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥ ४ ॥ २६ ॥ ३७ ॥

॥ रामकली महला ५ ॥

राखनहार दइआल ॥ कोटि भव खंडे निमख खिआल ॥
सगल अराधहि जंत ॥ मिलीऐ प्रभ गुर मिलि मंत ॥ १ ॥
जीअन को दाता मेरा प्रभु ॥
पूरन परमेसुर सुआमी घटि घटि राता मेरा प्रभू ॥ १ ॥ रहाउ ॥
ता की गही मन ओट ॥ बंधन ते होई छोट ॥
हिरदै जपि परमानंद ॥ मन माहि भए अनंद ॥ २ ॥
तारण तरण हरि सरण जीवन रूप हरि चरण ॥

संतन के प्राण अधार ॥ ऊचे ते ऊच अपार ॥ ३ ॥
सुमति सारु जितु हरि सिमरीजै ॥ करि किरपा जिसु आपे दीजै ॥
सुख सहज आनंद हरि नाउ ॥ नानक जपिआ गुर मिलि नाउ ॥ ४ ॥ २७ ॥ ३८ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९४)

शब्दार्थ : **निमख** – निमिष. **राता** – रमाण. **गही** – घेतली. **ओट** – आश्रय. **छोट** – सुटका. **सारु** – श्रेष्ठ.

भावार्थ : प्रभू परमात्मा सर्व जीवांचा रक्षणकर्ता आहे. त्याचे क्षणमात्र स्मरण केल्याने कोटी कोटी जन्माचा भवताप नष्ट होतो. सर्व जीव त्याची आराधना करतात. सतगुरूकडून मंत्र मिळाल्याने प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ १ ॥ माझा प्रभू जीवांना जीवन देतो. पूर्ण परमेश्वर साऱ्या जगाचा स्वामी प्रत्येक जीवाच्या अंतरात रमाण झाला आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझ्या मनाने त्याचाच आश्रय घेतला आहे व त्यामुळे माझे मन आनंदमय झाले. ॥२॥ हृदयात परमानंद स्वरूप प्रभूला शरण गेल्याने तो जीवास भवसागरातून तारून नेतो. हरिचरण हेच माझे जीवन आहे. संतांचा तो प्राणाधार आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे. ॥ ३ ॥ ती सुबुद्धी श्रेष्ठ ज्यामुळे प्रभू परमात्म्याचे स्मरण केले जाते. प्रभू परमात्मा ज्याच्यावर कृपा करतो त्यास तो अशी सुबुद्धी देतो. हरिनामामुळे सुख, सहजावस्था व आनंद प्राप्त होतो. नानक सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे सतगुरूकडून मिळालेल्या प्रभुनामाचा जप करतो.॥४॥२७॥३८॥

॥ रामकली महलास ५ ॥
सगल सिआनप छाडि ॥ करि सेवा सेवक साजि ॥
अपना आपु सगल मिटाई ॥ मन चिंदे सेई फल पाई ॥ १ ॥
होउ सावधान अपुने गुर सिउ ॥
आसा मनसा पूरन होवै पावहि सगल निधान गुर सिउ ॥ १ ॥ रहाउ ॥
दूजा नही जानै कोई ॥ सतगुरु निरंजनु सोई ॥
मानुख का करि रूपु न जानु ॥ मिलि निमाने मानु ॥ २ ॥
गुर की हरि टेक टिकाई ॥ अवर आसा सभ लाहि ॥
हरि का नामु मागु निधानु ॥ ता दरगह पावहि मानु ॥ ३ ॥
गुर का बचनु जपि मंतु ॥ एहा भगती सार ततु ॥
सतिगुर भए दइआल ॥ नानक दास निहाल ॥ ४ ॥ २८ ॥ ३९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९५)

शब्दार्थ : **छाडि** – सोड. **साजि** – बनून. **आपु** – अहंकार. **चिंदे** – इच्छिलेले. **सिउ** – कडून. **टेक** – आश्रय. **लाहि** – दूर कर. **मागु** – माग. **मंतु** – मंत्र.

भावार्थ : हे जीवा ! तू तुझे सर्व शहाणपण सोडून दे. प्रभूचा सेवक बनून प्रभूची सेवा कर. आपल्या मनातील सारा अहंकार नष्ट कर. तुला मनोवांछित फल प्राप्त होईल. ॥ १ ॥ आपल्या गुरूशी एकरूप हो. असे केल्याने तुझ्या

मनीच्या आशा पूर्ण होतील. गुरूकडून तुला सर्वनामरूपी खजिना प्राप्त होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ दुसरा कोणीही हे सत्य जाणत नाही कारण सतगुरू हा निरंजन प्रभूच आहे. सतगुरू हा देहधारी माणूस आहे असे मानू नकोस तर तो निराधारांना आधार देणारा प्रत्यक्ष प्रभू परमात्माच आहे असे मान. ॥ २ ॥ गुरू परमात्म्याच्या ठायी स्थिर आश्रय घे. मनातील अन्य साऱ्या आशा काढून टाक. गुरूकडे तू प्रभुनामाचा खजिना माग. असे केल्याने तुला प्रभू दरबारात सन्मान प्राप्त होईल. ॥ ३ ॥ सतगुरूने दिलेला उपदेश हा मंत्र जाणून त्याप्रमाणे आचरण कर. हेच भक्तीचे सारतत्त्व आहे. नानक सांगतात, सतगुरू दयाळू झाल्यामुळे मी पूर्ण आनंद भोगत आहे. ॥ ४ ॥ २८ ॥ ३९ ॥

॥ रामकली महला ५ ॥
होवै सोई भल मानु ॥ आपना तजि अभिमानु ॥
दिनु रैनि सदा गुन गाउ ॥ पूरन इही सुआउ ॥ १ ॥
आनंद करि संत हरि जपि ॥
छाडि सिआनप बहु चतुराई गुर का जपि मंतु निरमल ॥ १ ॥ रहाउ ॥
एक की करि आस भीतरि ॥ निरमल जपि नामु हरि हरि ॥
गुर के चरन नमसकारि ॥ भवजलु उतरहि पारि ॥ २ ॥
देवनहार दातार ॥ अंतु न पारावार ॥
जा कै घरि सरब निधान ॥ राखनहार निदान ॥ ३ ॥
नानक पाइआ एहु निधान ॥ हरे हरि निरमल नाम ॥
जो जपै तिस की गति होइ ॥ नानक करमि परापति होइ ॥ ४ ॥ २९ ॥ ४० ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९५)

शब्दार्थ : **होवै** – होते. **मानु** – मान. **आपना** – आपला. **इही** – हे. **सुआउ** – प्रयोजन. **देवनहारा** – देणारा. **निदान** – अंती. **पाइआ** – प्राप्त केले.

भावार्थ : जे काही होते आहे ते चांगलेच होत आहे असे मान. आपला अभिमान टाकून दे. रात्रंदिवस सदैव प्रभू परमात्म्याचे गुण गा. त्यामुळे अंती जीवनाचे प्रयोजन पूर्ण होईल. ॥ १ ॥ हे संतजनहो ! हरिनामाचा जप करा आणि आनंद उपभोगा. आपले सर्व शहाणपण, चतुराई सोडून द्या आणि सतगुरूने दिलेल्या निर्मळ नाममंत्राचा जप करा. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! अंत:करणात त्या एकमेव प्रभू परमात्म्याची आशा धर. निर्मळ हरिनामाचा जप कर. गुरुचरणांना वंदन कर. असे केल्याने तू भवसागर पार करून जाशील. ॥ २ ॥ तो देणारा दाता प्रभू परमात्मा आहे. त्याच्या दानाला ना अंत ना पारावार. त्याच्या घरी नामरूपी सर्व खजिना आहे तो प्रभूच अंती तुझा रक्षणकर्ता आहे. ॥ ३ ॥ नानक सांगतात, मी हा निर्मळ हरिनामाचा खजिना प्राप्त केला आहे. जो हरिनामाचा जप करतो त्यास परमगती प्राप्त होते. नानक सांगतात, भाग्यानेच त्याची प्राप्ती होते. ॥ ४ ॥ २९ ॥ ४० ॥

॥ रामकली महला ५ ॥

दुलभ देह सवारि ॥ जाहि न दरगह हारि ॥
हलति पलति तुधु होइ वडिआई ॥ अंत की बेला लए छडाई ॥ १ ॥
राम के गुन गाउ ॥
हलतु पलतु होहि दोवै सुहेले अचरज पुरखु धिआउ ॥ १ ॥ रहाउ ॥
ऊठत बैठत हरि जापु ॥ बिनसै सगल संतापु ॥
बैरी सभ होवहि मीत ॥ निरमलु तेरा होवै चीत ॥ २ ॥
सभ ते ऊतम इहु करमु ॥ सगल धरम महि स्त्रेसट धरमु ॥
हरि सिमरनि तेरा होइ उधारु ॥ जनम जनम का उतरै भारु ॥ ३ ॥
पूरन तेरी होवै आस ॥ जम की कटीऐ तेरी फास ॥
गुर का उपदेसु सुनीजै ॥ नानक सुखि सहजि समीजै ॥ ४ ॥ ३० ॥ ४१ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९५)

शब्दार्थ : दुलभ – दुर्लभ. सवारि – सावर, संभाळ. हारि – पराभूत होणे. हलति – इहलोकी. पलति – परलोकी. वडिआई – माहात्म्य. सुहेले – सुखदायक. चीत – चित्त. स्त्रेसट – श्रेष्ठ. सुनीजै – ऐक. समीजै – सामावून जा.

भावार्थ : हे जीवा ! तुला प्राप्त झालेल्या मानवदेहाचे सार्थक कर. प्रभू दरबारी जाताना पराभूत होण्याची पाळी येऊ देऊ नकोस. असे केलेस तर इह-परलोकी तुला महत्त्व प्राप्त होईल व अंतसमयी तो प्रभू परमात्मा तुला मुक्ती प्रदान करील. ॥ १ ॥ हे जीवा तू रामाचे गुणगान गा. असे केल्याने तू इह-परलोकी सुख उपभोगशील. त्या आश्चर्यजनक प्रभू परमात्म्याचे ध्यान कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ उठता-बसता सदा सर्वकाळ हरिनामाचा जप करावा. असे केल्याने सर्व दुःख नाश पावेल. सर्व शत्रू मित्र होतील. तुझे चित्त निर्मळ होईल. ॥ २ ॥ हरिनामाचे स्मरण करणे हेच सर्वश्रेष्ठ कर्म आहे. हाच सर्व धर्मात श्रेष्ठ धर्म आहे. हरीच्या स्मरणाने तुझा उद्धार होईल. जन्मजन्मांतरीचा पापाचा भार नष्ट होईल. ॥ ३ ॥ तुझ्या सर्व आशा पूर्ण होतील. तुझे यमाचे पाश तुटून जातील. नानक सांगतात, गुरूचा उपदेश ऐक व त्यानुसार आचरण कर. त्यामुळे तू सुखी होशील व सहजसमाधीत एकरूप होशील. ॥ ४ ॥ ३० ॥ ४१ ॥

॥ रामकली महला ५ ॥

जिस की तिस की करि मानु ॥ आपन लाहि गुमानु ॥
जिस का तू तिस का सभु कोइ ॥ तिसहि अराधि सदा सुखु होइ ॥ १ ॥
काहे भ्रमि भ्रमहि बिगाने ॥
नाम बिना किछु कामि न आवै मेरा मेरा करि बहुतु पछुताने ॥ १ ॥ रहाउ ॥
जो जो करै सोई मनि लेहु ॥ बिनु माने रलि होवहि खेह ॥

तिस का भाणा लागै मीठा ॥ गुर प्रसादि विरले मनि वूठा ॥ २ ॥
वेपरवाहु अगोचरु आपि ॥ आठ पहर मन ता कउ जापि ॥
जिसु चिति आए बिनसहि दुखा ॥ हलति पलति तेरा ऊजल मुखा ॥ ३ ॥
कउन कउन उधरे गुन गाइ ॥ गनणु न जाई कीम न पाइ ॥
बूडत लोह साध संगि तरै ॥ नानक जिसहि परापति करै ॥ ४ ॥ ३१ ॥ ४२ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९६)

शब्दार्थ : लाहि – नष्ट कर. गुमान – अहंकार, गर्व. बिगाने – मूर्ख, वेडा. मानि – मान्य कर. भाणा – आज्ञा. वूठा – वसला. बेपरवाहु – निश्चिंत. कीम – किंमत. लोह – लोखंड, कठोर व्यक्ती.

भावार्थ : हे जीवा ! ज्याने, ज्या प्रभूने तुला ही धनसंपत्ती, ऐश्वर्य दिले ते त्याचेच आहे. तुझे नाही असे मान. आपला गर्व, ताठा नष्ट कर. ज्या प्रभू परमात्म्याचा तू आहेस त्याचेच सर्व काही आहे. त्या प्रभूची आराधना कर. तू सदैव सुखी होशील. ॥ १ ॥ हे जीवा ! तू वेड्यासारखा भ्रमात भरकटत फिरत आहेस. प्रभूनामाशिवाय काहीही तुझ्या कामी येणार नाही. माझं माझं करून तुला खूप पश्चात्ताप करावा लागेल. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा जे जे करतो त्याचा तू स्वीकार कर. जर तू स्वीकार केला नाहीस तर तुझी राख होईल. हे जीवा ! प्रभूची आज्ञा तू गोड मान. सतगुरुकृपेने क्वचित कोणा व्यक्तीच्या अंतःकरणात प्रभू वास करतो. ॥ २ ॥ प्रभू स्वतः निश्चिंत व अव्यक्त आहे. हे मना ! तू अष्टौप्रहर त्या प्रभू परमात्म्याचा जप कर. ज्याच्या चित्तात प्रभूचा वास होतो त्याचे सर्व दुःख विनाश पावते. इह-परलोकी त्याचे मुख उजळ होते. ॥ ३ ॥ प्रभू परमात्म्याचे गुणगान गाऊन कोणाकोणाचा उद्धार झाला त्याची गणतीच करता येत नाही. त्याचे मोलही करता येत नाही. लोखंडासारखा कठोरहृदयी माणूसही साधुसंतांच्या संगतीने भवसागर तरून जातो. नानक सांगतात, प्रभू ज्याच्यावर कृपा करतो त्यासच ते प्राप्त होते. ॥ ४ ॥ ३१ ॥ ४२ ॥

॥ रामकली महला ५ ॥

मन माहि जापि भगवंतु ॥ गुरि पूरै इहु दीनो मंतु ॥
मिटे सगल भै त्रास ॥ पूरन होई आस ॥ १ ॥
सफल सेवा गुर देवा ॥
कीमति किछु कहणु न जाई साचे सचु अलख अभेवा ॥ १ ॥ रहाउ ॥
करन करावन आपि ॥ तिस कउ सदा मन जापि ॥
तिस की सेवा करि नीत ॥ सचु सहजु सुखु पावहि मीत ॥ २ ॥
साहिबु मेरा अति भारा ॥ खिन महि थापि उथापनहारा ॥
तिसु बिनु अवरु न कोई ॥ जन का राखा सोई ॥ ३ ॥
करि किरपा अरदासि सुणीजै ॥ अपणे सेवक कउ रसनु दीजै ॥
नानक जापी जपु जापु ॥ सभ ते ऊच जा का परतापु ॥ ४ ॥ ३२ ॥ ४३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९६)

शब्दार्थ : **भै** – भय. **साचु** – सत्यस्वरूप परमात्मा. **सचु** – सत्य. **अभेवा** – अभेद. **भारा** – भारी, महान. **थापिउ थापनहारा** – निर्माण– विनाश करणारा. **अरदासि** – प्रार्थना. **सुणिजै** – ऐक. **परतापु** – प्रताप. **जन** – सेवक.

भावार्थ : पूर्णगुरूने मला असा मंत्र दिला आहे, की मनात भगवंताचे स्मरण करावे. असे केल्याने सर्व भय व त्रास नाहीसा होतो व मनातील सर्व आशा पूर्ण होतात. ॥ १ ॥ अशा गुरुदेवाची केलेली सेवा सफल होते. गुरुदेवाचे मूल्य कोणीही करू शकत नाही. तो सत्यस्वरूप आहे. अलक्ष्य आहे. तो भेदातीत आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे मित्रा ! त्याची नित्य सेवा करावी. असे केल्याने सत्य, सुख व सहजावस्था प्राप्त होते. ॥ २ ॥ माझा प्रभू परमात्मा सर्वश्रेष्ठ आहे. तो क्षणात सृष्टीची रचना करतो तर क्षणात तिचा विनाशही करतो. त्याच्याशिवाय अन्य कोणीही असे करू शकणार नाही. तो सेवकाचे रक्षण करतो. ॥ ३ ॥ हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर. माझी प्रार्थना ऐक व मला– ह्या तुझ्या सेवकाला दर्शन दे. ज्याचा प्रताप सर्वांहून श्रेष्ठ आहे अशा प्रभूचा नानक जप करतात. ॥४॥३२॥४३॥

॥ रामकली महला ५ ॥

बिरथा भरवासा लोक ॥ ठाकुर प्रभ तेरी टेक ॥
अवर छूटि सभ आस ॥ अचिंत ठाकुर भेटे गुणतास ॥ १ ॥
एको नामु धिआइ मन मेरे ॥
कारजु तेरा होवै पूरा हरि हरि हरि गुण गाइ मन मेरे ॥ १ ॥ रहाउ ॥
तुम ही कारन करन ॥ चरन कमल हरि सरन ॥
मनि तनि हरि ओही धिआइआ ॥ आनंद हरि रूप दिखाइआ ॥ २ ॥
तिस ही की ओट सदीव ॥ जा के कीने है जीव ॥
सिमरत हरि करत निधान ॥ राखनहार निदान ॥ ३ ॥
सरब की रेण होवीजै ॥ आपु मिटाइ मिलीजै ॥
अनदिनु धिआईऐ नामु ॥ सफल नानक इहु कामु ॥ ४ ॥ ३३ ॥ ४४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९६)

शब्दार्थ : **बिरथा** – वृथा. **अवर** – अन्य. **ओही** – त्याचेच. **ओट** – आश्रय. **सदीव** – शाश्वत. **निदान** – अंती. **रेण** – धूळ.

भावार्थ : ह्या जगात अन्य लोकांचा भरवसा धरणे व्यर्थ आहे. हे प्रभो ! मला केवळ तुझाच आधार आहे. अन्य सर्व आशा सोडून दिल्यावर तो अचिंत गुणसागर प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ १ ॥ हे माझ्या मना ! त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे ध्यान कर. हे मना ! तू हरी हरी असे नामस्मरण करून प्रभूचे गुणगान गा. असे केल्याने तुझे कार्य सफल होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! तूच सर्व कार्याचे कारण आहेस व कार्य करणाराही तूच आहेस. मी तुझ्या चरणकमली शरण आलो आहे. मी त्या प्रभू परमात्म्याचे तनमनपूर्वक ध्यान केले व प्रभूने मला त्याचे आनंददायक स्वरूप दाखवले. ॥ २ ॥ त्याचा आश्रय हा शाश्वत आश्रय आहे. त्याने सर्व जीव निर्माण केले आहेत.

प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने सर्व निधी प्राप्त होतात. अंती तोच जीवांचे रक्षण करतो. ॥ ३ ॥ हे जीवा ! तू सर्वांच्या पदतली धूळ होऊन राहा. आपला अहंभाव टाकून देऊन प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जा. सदैव प्रभुनामाचे ध्यान कर. नानक सांगतात, हेच एक कर्म फलदायी आहे. ॥ ४ ॥ ३३ ॥ ४४ ॥

॥ रामकली महला ५ ॥

कारन करन करीम ॥ सरब प्रतिपाल रहीम ॥
अलह अलख अपार ॥ खुदि खुदाइ बड बेसुमार ॥ १ ॥
उों नमो भगवंत गुसाई ॥ खालकु रवि रहिआ सरब ठाई ॥ १ ॥ रहाउ ॥
जगंनाथ जगजीवन माधो ॥ भउ भंजन रिद माहि अराधो ॥
रिखीकेस गोपाल गुोविंद ॥ पूरन सरबत्र मुकंद ॥ २ ॥
मिहरबान मउला तूही एक ॥ पीर पैकांबर सेख ॥
दिला का मालकु करे हाकु ॥ कुरान कतेब ते पाकु ॥ ३ ॥
नाराइण नरहर दइआल ॥ रमत राम घट घट आधार ॥
बासुदेव बसत सभ ठाइ ॥ लीला किछु लखी न जाइ ॥ ४ ॥
मिहर दइआ करि करनैहार ॥ भगति बंदगी देहि सिरजणहार ॥
कहु नानक गुरि खोए भरम ॥ एको अलहु पारब्रहम ॥ ५ ॥ ३४ ॥ ४५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९६)

शब्दार्थ : **करीम** – कृपाळू प्रभू. **रहीम** – दयाळू प्रभू. **अलह** – अल्ला. **खुदि** – स्वत:. **खुदाइ** – खुदा (ईश्वर). **वड** – महान. **बेसुमार** – अनंत. **उों** – ओम्. **गुसाई** – . **खालकु** – सृष्टीचा रचनाकार. **रवि** – रममाण. **माधो** – माधव. **रिखीकेस** – हृषीकेश. **मिहरवान** – दयाळू. **मउला** – परमेश्वर, मालक. **पैकांबर** – पैगंबर, देवदूत. **सेख** – शेख. **दिला का** – हृदयाचा. **करे हाकु** – प्रेरणा देतो. **ते** – हून. **पाकु** – पवित्र. **लखी** – वर्णन करणे. **मिहर** – कृपा. **करनैहार** – रचनाकार प्रभू. **बंदगी** – . **सिरजणहार** – सृजन करणारा.

भावार्थ : सर्व काही करणारा तो प्रभू परमात्मा कृपाळू (करीम) आहे. सर्वांचा प्रतिपाळ करणारा प्रभू परमात्मा दयाळू आहे. (रहीम) तो अल्ला (परमेश्वर) अलक्ष्य व अपार आहे. तो स्वत:च स्वत:चा मालक (खुदा) आहे. सर्वश्रेष्ठ आहे. अनंत आहे. ॥ १ ॥ 'ओम नमो भगवते वासुदेवाय' हे ओंकारस्वरूप भगवंता पृथ्वीचा पालक परमेश्वरा तुला माझा नमस्कार असो. सृष्टीचा रचनाकार (खालकु) प्रभू सर्वव्याप्त आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जीवा ! त्या जगन्नाथाचे जगाला जीवन देणाऱ्या माधवाचे, भवभंजन करणाऱ्या प्रभू परमात्म्याचे, आपल्या हृदयात स्मरण कर. तो हृषीकेश, गोपाल गोविंद, मुकुंद सर्वत्र भरलेला आहे. ॥ २ ॥ हे दयाळू परमेश्वरा ! तू एकमेव आहेस. पीर पैगंबर शेख, हृदयेश्वर सारे काही तूच आहेस. तूच जीवांना कार्य करण्याची प्रेरणा देतोस. कुराण कतेब (मुस्लीम धर्मग्रंथ) यांच्याहून पवित्र आहेस. ॥ ३ ॥ तो नरहरी, नारायण दयाळू आहे. प्रत्येक जीवाचे ठायी रममाण असलेला राम सर्व जीवांचा आधार आहे. वासुदेवाचा सर्व ठायी वास आहे. त्याच्या लीलांचे वर्णनही करणे अशक्य आहे. ॥ ४ ॥ हे सृष्टीची रचना करणाऱ्या प्रभू, माझ्यावर दया कर. कृपा कर. हे सृजनहारा, मला तुझी भक्ती दे, दास्यत्व दे. नानक

सांगतात, सतगुरूने माझ्या मनातील भ्रम नष्ट केला आहे. अल्ला व परमेश्वर एकच आहेत.॥५॥३४॥४५॥

॥ रामकली महला ५ ॥

कोटि जनम के बिनसे पाप ॥ हरि हरि जपत नाही संताप ॥
गुर के चरन कमल मनि वसे ॥ महा बिकार तन ते सभि नसे ॥ १ ॥
गोपाल को जसु गाउ प्राणी ॥
अकथ कथा साची प्रभ पूरन जोती जोति समाणी ॥ १ ॥ रहाउ ॥
त्रिसना भूख सभ नासी ॥ संत प्रसादि जपिआ अबिनासी ॥
रैनि दिनसु प्रभ सेव कमानी ॥ हरि मिलणै की एह नीसानी ॥ २ ॥
मिटे जंजाल होए प्रभ दइआल ॥ गुर का दरसनु देखि निहाल ॥
परा पूरबला करमु बणि आइआ ॥ हरि के गुण नित रसना गाइआ ॥ ३ ॥
हरि के संत सदा परवाणु ॥ संत जना मसतकि नीसाणु ॥
दास की रेणु पाए जे कोइ ॥ नानक तिस की परमगति होइ ॥ ४ ॥ ३५ ॥ ४६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९७)

शब्दार्थ : बिकार – विकार, रोग. नसे – नष्ट होतो. सेव – सेवा. नीसानी – निशाणी, खूण. निहाल – आनंदित. परा – . करमु – भाग्य. बणिआइआ – सफल झाले. संताप – दुःख.

भावार्थ : प्रभुनामाचा जप केल्याने कोटी कोटी जन्माचे पाप नष्ट होते. सर्व दुःख नाहीसे होते. सतगुरुचरण हृदयात वसल्याने मनातील सर्व विकार दूर होतात. ॥ १ ॥ हे जीवा ! प्रभू परमात्म्याचे यशोगान गा. प्रभूची अवर्णनीय कथा सत्य आहे व अंती आत्मज्योत प्रभू परमात्म्याच्या परम ज्योतीत विलीन होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ संतांच्या कृपेने जो अविनाशी प्रभुनामाचा जप करतो, त्याची मायेची तृष्णा व विकारांची भूक नष्ट होते. प्रभुमिलनाची ही खूण आहे, की जीव रात्रंदिवस प्रभू परमात्म्याच्या सेवेत रत होतो. ॥ २ ॥ ज्या जीवावर प्रभू दया करतो त्याचे संसाराचे जंजाळ नष्ट होते व सतगुरुच्या दर्शनाने तो आनंदित होतो. माझ्या पूर्वजन्माचे भाग्य उदयाला आले आहे. आता माझी रसना सदैव प्रभू परमात्म्याचे गुणगान गाते. ॥ ३ ॥ प्रभू परमात्मा आपल्या संतजनांचा स्वीकार करतो. त्यांच्या ललाटी प्रभू, स्वीकृतीची निशाणी उमटवतो. नानक सांगतात, अशा संतांची जरी पायधूळ प्राप्त झाली, तरी जीवास परमगती प्राप्त होते. ॥ ४ ॥ ३५ ॥ ४६ ॥

॥ रामकली महला ५ ॥

दरसन कउ जाईऐ कुरबानु ॥ चरन कमल हिरदै धरि धिआनु ॥
धूरि संतन की मसतकि लाइ ॥ जनम जनम की दुरमति मलु जाइ ॥ १ ॥
जिसु भेटत मिट अभिमानु ॥
पारब्रहमु सभु नदरी आवै करि किरपा पूरन भगवान ॥ १ ॥ रहाउ ॥
गुर की कीरति जपीऐ हरि नाउ ॥ गुर की भगति सदा गुण गाउ ॥

गुर की सुरति निकटि करि जानु ॥ गुर का सबदु सति करि मानु ॥ २ ॥
गुर बचनी समसरि सुख दूख ॥ कदे न बिआपै त्रिसना भूख ॥
मनि संतोखु सबदि गुर राजे ॥ जपि गोबिंदु पड़दे सभि काजे ॥ ३ ॥
गुरु परमेसरु गुरु गोविंदु ॥ गुरु दाता दइआल बखसिंदु ॥
गुर चरनी जा का मनु लागा ॥ नानक दास तिसु पूरन भागा ॥ ४ ॥ ३६ ॥ ४७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९७)

शब्दार्थ : घूरि – धूळ. दुरमति – दुर्बुद्धी. नदरि – नजरेस येते. कीरति – कीर्ती. सुरति – ध्यान. समसरि – समसमान. बखसिंदू – क्षमाशील. भागा – भाग्य.

भावार्थ : प्रभुदर्शनासाठी प्राणाची कुरवंडी करावी. प्रभूचे चरणकमल हृदयी धारण करून ध्यान करावे. संतांची चरणधूळ मस्तकी धारण करावी. असे केल्याने जन्मजन्मांतरीची दुर्बुद्धी नष्ट होते. ॥ १ ॥ हे प्रभू ! मला अशा संतजनांची भेट घडव, की ज्यामुळे माझ्या मनातील अहंकार गळून पडेल. प्रभू परमात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन घडेल व माझ्यावर भगवंताची पूर्ण कृपा होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरूची कीर्ती ह्यात आहे की जीव प्रभुनामाचा जप करू लागतो. सतगुरूची भक्ती ह्यात आहे, की जीव सदैव प्रभूचे गुण गातो. गुरूची महती ह्यात आहे, की जीवास प्रभू जवळ असल्याची प्रचिती येते. हे जीवा ! गुरूचा शब्द हेच सत्य मान. ॥ २ ॥ सतगुरूच्या उपदेशाने जीव सुख व दुःख ह्यांना समान लेखतो. अशा जीवास मोहमायेची तृष्णा व विकारांची भूक कधीही त्रास देत नाही. सतगुरूच्या उपदेशाने मन संतुष्ट व तृप्त होते. प्रभू परमात्म्याचा जप केल्यामुळे जीवाचे सर्व विघ्नांपासून रक्षण होते. ॥ ३ ॥ गुरू हा परमेश्वर आहे. गुरू हा पृथ्वीचा मालक आहे. गुरू हा महान दाता आहे. दयाळू आहे व क्षमाशील आहे. नानक सांगतात, ज्या प्रभुसेवकाचे मन प्रभूशी एकरूप झाले त्याचे भाग्य पूर्ण झाले.॥४॥३६॥४७॥

॥ रामकली महला ५ ॥

किसु भरवासै बिचरहि भवन ॥ मूड़ मुगध तेरा संगी कवन ॥
रामु संगी तिसु गति नही जानहि ॥ पंच बटवारे से मीत करि मानहि ॥ १ ॥
सो घरु सेवि जितु उधरहि मीत ॥
गुण गोविंद रवीअहि दिनु राती साधसंगि करि मन की प्रीति ॥ १ ॥ रहाउ ॥
जनमु बिहानो अहंकारि अरु वादि ॥ त्रिपति न आवै बिखिआ सादि ॥
भरमत भरमत महा दुखु पाइआ ॥ तरी न जाई दुतर माइआ ॥ २ ॥
कामि न आवै सुकार कमावै ॥ आपि किजि आपे ही खावै ॥
राखन कउ दुसर नही कोई ॥ तउ निसतरै जउ किरपा होइ ॥ ३ ॥
पतित पुनीत प्रभ तेरो नामु ॥ अपने दास कउ कीजै दानु ॥
करि किरपा प्रभ गति करि मेरी ॥ सरणि गही नानक प्रभ तेरी ॥ ४ ॥ ३७ ॥ ४८॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९८)

शब्दार्थ : **किसु** – कोणाच्या. **भरवसै** – भरवशावर, विश्वासावर. **बिचरत** – विहार करणे. **कवन** – कोण. **बटवारे** – बदमाष, चोर. **रवीअह** – स्मरण कर. **बिहानो** – व्यतीत झाला. **वादि** – वाद, भांडणतंटा. **बिखिआ** – विषयविकार. **दुतर** – दुस्तर. **कार** – कार्य. **बीजि** – बी पेरतो. **राखन** – रक्षण.

भावार्थ : हे जीवा ! तू कोणाच्या भरवशावर ह्या जगात विहार करत आहेस ? अरे अडाण्या, मुर्खा ! तुझे सवंगडी कोण आहेत ? वास्तविक तो राम सदैव तुझा सांगाती आहे. पण तू मात्र ही वस्तुस्थिती जाणत नाहीस. तू मात्र कामक्रोधादी पंचविकाररूपी चोरांनाच आपले मित्र मानतोस. ॥ १ ॥ हे मित्रा ! ज्यामुळे तुझा उद्धार होईल अशा प्रभू परमात्म्याची तू सेवा कर. रात्रंदिवस गोविंदाचे गुणगान कर. हे मना तू साधुसंतांवर प्रेम कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ माणूस आपला सारा जन्म अहंकारात आणि वादविवाद करण्यात व्यतीत करतो. विषयविकारांचा उपभोग घेऊनही मन तृप्त होत नाही. माया गोळा करण्यासाठी भटक भटक भटकल्याने महादु:ख प्राप्त होते. असा जीव हा दुस्तर भवसागर तरून जाऊ शकत नाही. ॥ २ ॥ जीव आयुष्यभर असे कर्म करतो की जे अंती उपयोगी पडत नाही. स्वत: जसे पेरतो तसे फळ त्यास प्राप्त होते. त्याचे अन्य कोणीही रक्षण करू शकत नाही. जेंव्हा प्रभू परमात्म्याची कृपा होते, तेव्हाच त्याचा उद्धार होतो. ॥ ३ ॥ हे प्रभो ! मला तुझे नाम प्रदान कर. नानक म्हणतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर व मला मुक्ती दे. मी तुला शरण आलो आहे. ॥ ४ ॥ ३७ ॥ ४८ ॥

॥ रामकली महला ५ ॥

इह लोके सुखु पाइआ ॥ नही भेटत धरम राइआ ॥
हरि दरगह सोभावंत ॥ फुनि गरभि नाही बसंत ॥ १ ॥
जानी संत की मित्राई ॥
करि किरपा दीनो हरि नामा पूरबि संजोगि मिलाई ॥ १ ॥ रहाउ ॥
गुर कै चरणि चितु लागा ॥ धंनि धंनि संजोगु सभागा ॥
संत की धूरि लागी मेरै माथे ॥ किलविख दुख सगले मेरे लाथे ॥ २ ॥
साध की सचु टहल कमानी ॥ तब होए मन सुध परानी ॥
जन का सफल दरसु डीठा ॥ नामु प्रभू का घटि घटि वूठा ॥ ३ ॥
मिटाने सभि कलि कलेस ॥ जिस ते उपजे तिसु महि परवेस ॥
प्रगटे आनूप गोविंद ॥ प्रभ पूरे नानक बखसंद ॥ ४ ॥ ३८ ॥ ४९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९८)

शब्दार्थ : **धरमराय** – यम, मृत्यू. **फुनि** – परत. **जानी** – जाणले. **मित्राई** – मित्रता. **पुरबि** – पूर्वजन्मीचे. **सभागा** – सौभाग्य. **किलविख** – पाप. **लाथे** – नष्ट झाले. **टहल** – सेवा. **सुध** – शुद्ध. **डीठा** – पाहिले. **वूठा** – वास केला. **मिटाने** – मिटले, नष्ट झाले. **परवेस** – प्रवेश. **बखसिंद** – कृपा करणारा, क्षमा करणारा.

भावार्थ : ज्याने प्रभूचे नामस्मरण केले तो इहलोकी सुख भोगतो. त्याचा कर्मलेख स्वच्छ होतो. त्यामुळे परलोकात त्याची धर्मराज यमाशी गाठ पडत नाही. तो प्रभूच्या दरबारात शोभून दिसतो. त्याला परत गर्भवास भोगावा लागत

नाही. ॥ १ ॥ संतांशी मैत्री झाल्याची खूण म्हणजे ते जीवावर कृपावंत होऊन त्यास प्रभुनाम प्रदान करतात, पूर्वजन्मीच्या सुकृतामुळेच त्याच्याशी भेट होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे माझे भाग्य खरोखरच धन्य होय की ज्यामुळे माझे चित्त गुरूचरणी लीन झाले. संतांची चरणधूळ माझ्या भाळी लागली. माझे सारे पाप, सारे दु:ख नष्ट झाले. ॥ २ ॥ साधुसंतांची सेवा हेच सतकर्म होय. त्यामुळे जीवाचे मन शुद्ध होते. प्रभूच्या सेवकाचे सफल दर्शन प्राप्त झाल्यावर अशा जीवाच्या अंतरात प्रभू वास करतो. ॥ ३ ॥ जीवाचे सर्व पापताप नष्ट होते व ज्या प्रभू परमात्म्यापासून तो निर्माण झाला त्याच्यातच तो विलीन होतो. नानक सांगतात, अनुपम प्रभू परमात्मा प्रगट होतो व तो पूर्ण प्रभू जीवांना क्षमा करतो. ॥ ४ ॥ ३८ ॥ ४९ ॥

॥ रामकली महला ५ ॥

गऊ कउ चारे सारदूलु ॥ कउडी का लख हूआ मूलु ॥
बकरी कउ हसती प्रतिपाले ॥ अपना प्रभु नदरि निहाले ॥ १ ॥
क्रिपा निधान प्रीतम प्रभ मेरे ॥ बरनि न साकउ बहु गुन तेरे ॥ १ ॥ रहाउ ॥
दीसत मासु न खाइ बिलाई ॥ महा कसाबि छुरी सटि पाई ॥
करणहार प्रभु हिरदै वूठा ॥ फाथी मछुली का जाला तूटा ॥ २ ॥
सूके कासट हरे चलूल ॥ ऊचै थलि फूले कमल अनूप ॥
अगनि निवारी सतिगुर देव ॥ सेवकु अपनी लाइओ सेव ॥ ३ ॥
अकिरतघणा का करे उधारु ॥ प्रभु मेरा है सदा दइआरु ॥
संत जना का सदा सहाई ॥ चरन कमल नानक सरणाई ॥ ४ ॥ ३९ ॥ ५० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९८)

शब्दार्थ : **गउ** – गाय. **कउ** – ल. **चारे** – चारतो. **सारदूलु** – सिंह. **कउडी** – कवडी. **मूलु** – मूल्य. **हसती** – हत्ती. **प्रतिपाले** – पालन करणे. **बरनि** – वर्णन करणे. **साकउ** – शक्य. **मासु** – मांस. **बिलाई** – मांजर. **कसाबि** – कसाई. **सटि** – फेकली. **फाथी** – फसलेली. **सुके** – कोरडे, वाळके. **कासट** – लाकूड. **चलूल** – लाल. **ऊचै** – उच्च. **थाले** – स्थळी. **अकितर घणा** – कृतघ्न. **दइआरु** – दयाळू. **सहाई** – सहायक.

भावार्थ : अहंकाररूपी सिंह आपला क्रूरपणा टाकून इंद्रियरूपी गाईंचा संभाळ करतो. त्यामुळे वास्तविक कवडीमोल असलेला हा देह लाख मोलाचा झाला आहे. तनरूपी हत्ती विकाररूपी बकरी नियंत्रणात ठेवतो. ही सारी विपरित अशक्यप्राय घटना तेव्हाच शक्य होते जेव्हा प्रभूची जीवावर कृपा होते. ॥ १ ॥ माझा प्रिय प्रभू कृपेचा सागर आहे. त्याच्या अनंत गुणांचे कोणीही वर्णन करू शकत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ विषयविकाररूपी मांस समोर दिसत असूनही तृष्णारूपी मांजर त्याकडे पाहतही नाही. क्रोधरूपी कसायाच्या हातून सुरी गळून पडली. क्रोधी माणूस आता शांत झाला. सर्व काही करणाऱ्या प्रभू परमात्म्याचा अंत:करणात वास झाला की मायेच्या जाळ्यात फसलेला जीव मुक्त होतो. ॥ २ ॥ वाळलेल्या लाकडासारखे शुष्क कठोर हृदय आता प्रेमळ व कोमल

झाले आहे. जणू काही पहाडावर कमळ फुलले आहे. म्हणजे पाषाणरूपी हृदयात आत्मज्ञानरूपी कमळ फुलले आहे. प्रभू परमात्म्याने मायारूपी तृष्णाग्नी विझवून टाकून सेवकास प्रभुसेवेस लावले आहे. ॥ ३ ॥ कृतघ्न जीवांचाही प्रभूने उद्धार केला आहे. माझा प्रभू सदैव दयाळू आहे. संतजनांचा तो साहाय्यकर्ता आहे. नानक प्रभूच्या चरणकमलांना शरण गेला आहे. ॥ ४ ॥ ३९ ॥ ५० ॥

॥ रामकली महला ५ ॥

पंच सिंघ राखे प्रभि मारि ॥ दस बिघिआड़ी लई निवारि ॥
तीनि आवरत की चूकी घेर ॥ साध संगि चूके भै फेर ॥ १ ॥
सिमरि सिमरि जीवा गोविंद ॥
करि किरपा राखिओ दासु अपना सदा सदा साचा बखसिंद ॥ १ ॥ रहाउ ॥
दाझि गए त्रिण पाप सुमेर ॥ जपि जपि नामु पूजे प्रभ पैर ॥
अनद रूप प्रगटिओ सभ थानि ॥ प्रेम भगति जोरी सुख मानि ॥ २ ॥
सागरु तरिओ बाछर खोज ॥ खेदु न पाइओ नह फुनि रोज ॥
सिंधु समाइओ घटुके माहि ॥ करणहार कउ किछु अचरजु नाहि ॥ ३ ॥
जउ छूटउ तउ जाइ पइआल ॥ जउ काढिओ तउ नदरि निहाल ॥
पाप पुंन हमरै वसि नाहि ॥ रसकि रसकि नानक गुण गाहि ॥ ४ ॥ ४० ॥ ५१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९९)

शब्दार्थ : **पंचसिंध** – काम, क्रोध आदी पंचविकार. **बिघिआडी** – इंद्रिये. **तीनि अवरत** – सत्त्व, रज, तम हे तीन गुण. **अवरत** – आवर्त वादळ. **बखसिंद** – क्षमाशील. **दाझी** – दग्ध, जळणे. **त्रिण** – गवत. **जोरी** – जोडून. **मानि** – मान, भोग. **बाछर** – वासरू. **रोज** – शोक. **पइआल** – पाताळ, नरक.

भावार्थ : पंचविकाररूपी सिंहांना प्रभू परमात्म्याने मारून टाकले. दहा इंद्रियरूपी सिंहिणींना ताब्यात ठेवले. त्रिगुणाचे वादळ नष्ट केले. साधुसंतांच्या संगतीने सर्व प्रकारचे भय नष्ट झाले. ॥ १ ॥ हे जीवा ! तू सदैव प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. तो कृपावंत होऊन आपल्या सेवकांचे रक्षण करतो. तो सदैव क्षमाशील आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनामाचा जप केल्याने, प्रभुचरणांची पूजा केल्याने पापांचे डोंगर गवतासारखे जळून गेले. सर्वत्र आनंदी आनंद प्रगट झाला. प्रभूशी प्रेमभक्तीचे नाते जोडल्याने सुखाची प्राप्ती झाली. ॥ २ ॥ वासराच्या खुराने पडलेला पाण्याने भरलेला लहानसा खड्डा ज्या सहजतेने पार करता येतो त्याच सहजतेने प्रभुकृपेने संसारसागर तरून जाता येते. परत कधी खेद वा दुःख प्राप्त होत नाही. आता परमात्मारूपी सागर शरीररूपी घागरीत सामावला गेला पण ह्यात त्या सर्वकर्त्या प्रभूच्या दृष्टीने जराही आश्चर्य नाही. ॥ ३ ॥ जेव्हा जीव प्रभू कृपेस पारखा होतो तेव्हा तो नरकात जाऊन पडतो. जेव्हा प्रभूची कृपादृष्टी होते, तेव्हा जीवाला प्रसन्नता लाभते. नानक सांगतात, पाप-पुण्य ह्या गोष्टी आपल्या हाती नाहीत पण तरीही मी रसाळपणे प्रभू परमात्म्याचे गुण गातो. ॥ ४ ॥ ४० ॥ ५१ ॥

॥ रामकली महला ५ ॥

ना तनु तेरा ना मनु तोहि ॥ माइआ मोहि बिआपिआ धोहि ॥
कुदम करै गाडर जिउ छेल ॥ अचिंतु जालु कालु चक्रु पेल ॥ १ ॥
हरि चरन कमल सरनाइ मना ॥
राम नामु जपि संगि सहाई गुरमुखि पावहि साचु धना ॥ १ ॥ रहाउ ॥
ऊने काज न होवत पूरे ॥ कामि क्रोधि मदि सद ही झूरे ॥
करै बिकार जीअरे कै ताई ॥ गाफल संगि न तसूआ जाई ॥ २ ॥
धरत धोह अनिक छल जानै ॥ कउडी कउडी कउ खाकु सिरि छानै ॥
जिनि दीआ तिसै न चेतै मूलि ॥ मिथिआ लोभु न उतरै सूलु ॥ ३ ॥
पारब्रहम जब भए दइआल ॥ इहु मनु होआ साध रवाल ॥
हसत कमल लड़ि लीनो लाइ ॥ नानक साचै साचि समाइ ॥ ४ ॥ ४१ ॥ ५२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ८९९)

शब्दार्थ : **तोहि** – तुझे. **धोहि** – धोका. **कुदम** – . **गाडर** – . **छेल** – . **अचिंत** – अवचित, नकळत. **ऊने** – अपुरे, अर्धवट. **काज** – कार्य. **मदि** – मद. **झूरे** – झुरतो, व्याकूळ होतो. **विकार** – पाप. **गाफल** – . **तसूआ** – . **धोह** – . **खाकू** – राख. **छानै** – . **चेतै** – स्मरणे. **मूलि** – मुळीच. **सूलु** – शूळ, दुःख, पीडा. **लडि** – पकडणे.

भावार्थ : हे जीवा ! ना हे शरीर तुझे आहे ना मन तुझ्या ताब्यात. तू तर मोहमायेच्या छलकपटात पूर्णपणे फसला आहेस. ज्या प्रकारे बकरीबरोबर कोकरू बागडते आणि अकस्मात त्याच्यावर मृत्यूचा घाला येतो. तशीच तुझी गत होणार आहे. ॥ १ ॥ हे मना ! तू हरिचरणकमलाला शरण जा. रामनामाचा जप कर. तेच तुला संगत देऊन साहाय्य करील, सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून खरे धन प्राप्त कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ जोपर्यंत जीव काम, क्रोध, लोभाने व्याप्त आहे, जीवन व्यवहारासाठी अनेक विकारांचा अंगीकार करतो, तोपर्यंत त्याचे प्रभुनाम प्राप्तीचे कार्य अर्धवटच राहणार. हे बेसावध जीवा, तू ह्या जगात जे, जे साठवले आहेस त्यापैकी अंती तुझ्याबरोबर काहीही येणार नाही. ॥ २ ॥ असा जीव कवडी कवडी माया गोळा करण्यासाठी लोकांना धोका देतो. त्यांच्याशी कपट करतो व अपमानित जीवन जगतो. ज्या प्रभू परमात्म्याने त्याला हे जीवन दिले त्यास तो मुळीही स्मरत नाही. त्यामुळे त्याच्या मागची मिथ्या लोभाची पीडा कधीच नष्ट होत नाही. ॥ ३ ॥ अशा जीवावर परब्रह्म परमात्मा जेव्हा कृपा करतो तेव्हा त्याचे मन नम्र होऊन साधुसंतांच्या चरणांची धूळ होते. प्रभू परमात्मा त्यास आपल्या हस्तकमलाने धरून त्याचा उद्धार करतो. नानक सांगतात, अखेर तो सत्यरूप परमात्म्याशी एकरूप होतो. सत्यात सत्य मिसळून जाते. ॥४॥४१॥५२॥

॥ रामकली महला ५ ॥

राजा राम की सरणाइ ॥
निरभउ भए गोबिंद गुन गावत साध संगि दुखु जाइ ॥ १ ॥ रहाउ ॥

जा कै रामु बसै मन माही ॥ सो जनु दुतरु पेखत नाही ॥
सगले काज सवारे अपने ॥ हरि हरि नामु रसन नित जपने ॥ १ ॥
जिस कै मसतकि हाथु गुरु धरै ॥ सो दासु अदेसा काहे करै ॥
जनम मरण की चूकी काणि ॥ पूरे गुर ऊपरि कुरबाण ॥ २ ॥
गुरु परमेसरु भेटि निहाल ॥ सो दरसनु पाए जिसु होइ दइआलु ॥
पारब्रहमु जिसु किरपा करै ॥ साध संगि सो भवजलु तरै ॥ ३ ॥
अंम्रितु पीवहु साध पिआरे ॥ मुख ऊजल साचै दरबारे ॥
अनद करहु तजि सगल बिकार ॥ नानक हरि जपि उतरहु पारि ॥ ४ ॥ ४२ ॥ ५३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ८९९)

शब्दार्थ : रसन – मुखावाटे. अदेसा – चिंता. काणि – . निहाल – प्रसन्न. अनद – आनंद.

भावार्थ : हे जीवा ! रामरायाला शरण जा. प्रभू परमात्म्याचे गुणगान गायल्याने जीव निर्भय होतो. साधुसंतांच्या संगतीने दुःख नष्ट होतें. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याच्या मनात रामाचा वास आहे त्यास भवसागर पार करून जाण्यात कोणताही त्रास होत नाही. ज्याची रसना हरिनामाचा जप करते त्याचे सर्व कार्य सिद्धीस जाते.॥१॥ ज्याच्या मस्तकी गुरू वरदहस्त ठेवतो त्यास कोणतीही चिंता राहत नाही. जन्ममरणाच्या चक्रातून तो मुक्त होतो. तो आपल्या सतगुरुचरणी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥ २ ॥ गुरू परमेश्वर प्राप्त झाल्याने मन प्रसन्न होते. ज्याच्यावर प्रभू कृपा करतो तोच प्रभूचे दर्शन प्राप्त करतो. ज्याच्यावर परब्रह्म परमात्मा कृपा करतो, तो साधुसंगतीने भवसागर पार करतो. ॥ ३ ॥ हे साधुजनहो ! तुम्ही नामामृत प्राशन करा. त्यामुळे तुम्हास उजळ मुखाने सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या दरबारात स्थान प्राप्त होईल. हे जीवा ! सर्व विकारांचा त्याग करून आनंद उपभोग. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याचे स्मरण करून भवसागर पार कर. ॥ ४ ॥ ४२ ॥ ५३ ॥

॥ रामकली महला ५ ॥

ईंधन मे बैसंतरु भागै ॥ माटी कउ जलु दहदिस तिआगै ॥
ऊपरि चरन तलै आकासु ॥ घट महि सिंधु कीओ परगासु ॥ १ ॥
ऐसा संम्रथु हरि जीउ आपि ॥
निमख न बिसरै जीअ भगतन कै आठ पहर मन ता कउ जापि ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रथमे माखनु पाछै दूधु ॥ मैलू कीनो साबुनु सूधु ॥
भै ते निरभउ डरत फिरै ॥ होंदी कउ अणहोंदी हिरै ॥ २ ॥
हेदी गुपत बिदेही दीसै ॥ सगले साजि करत जगदीसै ॥
ठगनहार अणठगदा ठागै ॥ बिनु वखर फिरि फिरि उठि लागै ॥ ३ ॥
संत सभा मिलि करहु बखिआण ॥ सिंम्रिति सासत बेद पुराण ॥
ब्रहम बीचारु बीचारे कोइ ॥ नानक ता की परम गति होइ ॥ ४ ॥ ४३ ॥ ५४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९००)

शब्दार्थ : इंधन – लाकूड. बैसंतर – अग्नी. माटी – माती, धरती, जमीन. आपि – आपण स्वत:. निमख – क्षणभर. माखनु – लोणी. मैलु – मळ. साबुनु – साबण. सुधु – शुद्ध. होंदी – होणार. हीरै – हरला. देही – आत्मा. बिदेही – परमात्मा. साजी – निर्माण. टगणहार – फसणारा. अणठगदा – न फसणारा, आत्मा. ठागै – फसला. बखर – .

भावार्थ : प्रभू परमात्म्याच्या इच्छेने अनेक असंभव घटना घडतात. लाकडामध्ये गुप्तरूपाने अग्नी वास करत असूनही तो लाकूड जाळू शकत नाही. धरतीच्या चारही बाजूस पाणी असूनही ते धरतीला बुडवू शकत नाही. वृक्षाची मुळे आकाशात तर शाखा धरतीवर. हृदयरूपी छोट्याशा घड्यात प्रभूरूपी सागर भरला आहे काय हे आश्चर्य ! ॥ १ ॥ असले अफाट सामर्थ्य फक्त प्रभू परमात्म्याजवळच आहे. असा हा प्रभू आपल्या भक्तांना क्षणभरही विसरत नाही. हे मना ! तू अष्टौप्रहर त्याचे स्मरण कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ परमात्मारूपी लोणी प्रथम आले व संसाररूपी दूध नंतर निर्माण झाले. मलिनता साबणाला शुद्ध करते. भाव असा की मातेच्या रक्तापासून निर्माण झालेले दूध बालकाचे पोषण करते. निर्भयता भयाला घाबरते. भाव असा की निर्भय प्रभूचा अंश असलेला जीव संसारातील अडचणींना घाबरतो. जे निश्चित घडणार आहे ते अनिश्चिततेकडून हार पत्करते. भाव असा की प्रभुकृपेने कर्म फल बदलते. ॥ २ ॥ जोपर्यंत शरीर सचेतन आहे तोवर आत्मा गुप्त असतो. शरीर अचेतन झाल्यावर आत्मा प्रगट होतो. हे सारे चमत्कार प्रभू परमात्म्यानेच निर्माण केले आहेत. नेहमी फसणारी माया न फसणाऱ्या जीवास फसवते. प्रभुनामविहीन जीव वारंवार मायेत परत परत फसतो. ॥ ३ ॥ नानक सांगतात, जो जीव संतजनांच्या संगतीत बसून वेद, स्मृती, शास्त्रे, पुराणे यांचा अभ्यास करून ब्रह्मतत्त्वाचा विचार करतो, त्यास परमगती प्राप्त होते. ॥ ४ ॥ ४३ ॥ ५४ ॥

॥ रामकली महला ५ ॥

जो तिसु भावै सो थीआ ॥
सदा सदा हरि की सरणाई प्रभ बिनु नाही आन बीआ ॥ १ ॥ रहाउ ॥
पुतु कलत्रु लखिमी दीसै इन महि किछू न संगि लीआ ॥
बिखै ठगउरी खाइ भुलाना माइआ मंदरु तिआगि गइआ ॥ १ ॥
निंदा करि करि बहुतु विगूता गरभ जोनि महि किरति पइआ ॥
पुरब कमाणे छोडहि नाही जमदूति ग्रासिओ महा भइआ ॥ २ ॥
बोलै झूठु कमावै अवरा त्रिसन न बूझै बहुतु हइआ ॥
असाध रोगु उपजिआ संत दूखनि देह बिनासी महा खइआ ॥ ३ ॥
जिनहि निवाजे तिन ही साजे आपे कीने संत जइआ ॥
नानक दास कंठि लाइ राखे करि किरपा पारब्रहम मइआ ॥ ४ ॥ ४४ ॥ ५५ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९००)

शब्दार्थ : थिआ – झाले, घडले. बीआ – दुसरा. पुतु – पुत्र. कलत्रु – पत्नी. लखिमी – लक्ष्मी, धन. बिखै –

विषय. **ठगबुटी** – गुंगीचे औषध. **भुलाना** – विसरला. **मंदरु** – मंदिर, प्रभूचे घर. **विगुता** – दु:खी होतो. **किरति** – . **कमाणे** – कर्म. **बहुतु** – . **हइआ** – . **दुखनी** – दु:ख दिले, निंदा केली. **खइआ** – नष्ट झाला. **निवाजे** – उत्पन्न केले. **साजे** – सजवले. **जइआ** – जयजयकार. **मइआ** – कृपा.

भावार्थ : जे प्रभू परमात्म्यास आवडते तेच घडते. म्हणून सदैव प्रभू परमात्म्यास शरण जावे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही त्या योग्यतेचा नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे जे पुत्र, पत्नी, लक्ष्मी दिसते त्यापैकी काहीही अंती बरोबर येत नाही. विषयविकाररूपी झिंग आणणारी बुटी खाऊन जीव मायेला भुलला व त्याने प्रभू परमात्म्याच्या मंदिराचा त्याग केला. ॥ १ ॥ जो दुसऱ्यांची निंदा करून करून दु:ख भोगतो, तो सतत जन्ममृत्यूच्या चक्रात फिरत राहतो. त्याची पूर्वकर्मापासून सुटका होत नाही व महाभयाण काळ त्यास खाऊन टाकतो. ॥ २ ॥ हा जीव खोटे बोलतो. अन्य गोष्टीच्या तृष्णेने लज्जास्पद गोष्टी करतो. संतजनांची निंदा केल्याने त्यास असाध्य रोग जडतात व त्याचा देह नष्ट होतो. ॥ ३ ॥ प्रभू परमात्म्याने हा देह निर्माण केला. त्यानेच त्यास आत्मा देऊन सजवले व त्याच्याकडून संतजनांचा जयजयकार करवला. नानक सांगतात, त्या परब्रह्म परमात्म्याने कृपा करून आपल्या सेवकांना हृदयाशी धरून त्यांचे रक्षण केले. ॥ ४ ॥ ४४ ॥ ५५ ॥

॥ रामकली महला ५ ॥

ऐसा पूरा गुरदेउ सहाई ॥ जा का सिमरनु बिरथा न जाई ॥ १ ॥ रहाउ ॥
दरसनु पेखत होइ निहालु ॥ जा की धूरि काटै जम जालु ॥
चरन कमल बसे मेरे मन कै ॥ कारज सवारे सगले तन के ॥ १ ॥
जा कै मसतकि राखै हाथु ॥ प्रभु मेरो अनाथ को नाथु ॥
पतित उधारणु क्रिपा निधानु ॥ सदा सदा जाईऐ कुरबानु ॥ २ ॥
निरमल मंतु देइ जिसु दानु ॥ तजहि बिकार बिनसै अभिमानु ॥
एकु धआईऐ साध कै संगि ॥ पाप बिनासे नाम कै रंगि ॥ ३ ॥
गुर परमेसुर सगल निवास ॥ घटि घटि रवि रहिआ गुणतास ॥
दरसु देहि धारउ प्रभ आस ॥ नित नानकु चितवै सचु अरदासि ॥ ४ ॥ ४५ ॥ ५६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९००)

शब्दार्थ : **सहाउ** – साहाय्यकर्ता. **बिरथा** – व्यर्थ. **निहालु** – प्रसन्न. **धूरि** – धूळ. **सवारे** – सफल करतो. **चितवै** – चिंतन करतो.

भावार्थ : तो पूर्ण गुरूदेव जीवाचा सहायक आहे. त्याचे केलेले स्मरण कधी वाया जात नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्याच्या दर्शनाने मन प्रसन्न होते. त्याची चरणधूळ यमाचे पाश तोडून टाकते. त्या प्रभूचे चरणकमल माझ्या हृदयात वास करतात. त्यामुळे माझी सर्व कार्ये सफल होतात. ॥ १ ॥ माझा प्रभू ज्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवतो, त्या अनाथाचा तो नाथ होतो. तो पतितांना पावन करणारा कृपानिधान आहे. त्याच्यावर मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ २ ॥ ज्या जीवास सतगुरु निर्मल प्रभुनामाचा मंत्र देतो, तो जीव विकारांचा त्याग करतो. त्याचा

अहंकार नष्ट होतो. साधुसंतांच्या संगतीत बसून त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे ध्यान करावे. प्रभुनामाच्या प्रेमरंगाने सर्व पाप नष्ट होते. ॥ ३ ॥ परमेश्वर गुरू सर्वत्र वास करतो. तो गुणसागर प्रभू प्रत्येक जीवाच्या अंतरात रममाण होतो. नानक म्हणतात, हे प्रभो ! मला दर्शन दे. माझ्या मनाला तीच एक आशा लागली आहे. मी सदैव माझ्या चित्तात हीच प्रार्थना करतो. ॥ ४ ॥ ४५ ॥ ५६ ॥

रागु रामकली महला ५ घरु २ दुपदे

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

गावहु राम के गुण गीत ॥
नामु जपत परम सुखु पाईऐ आवागउणु मिटै मेरे मीत ॥ १ ॥ रहाउ ॥
गुण गावत होवत परगासु ॥ चरन कमल महि होइ निवासु ॥ १ ॥
संत संगति महि होइ उधारु ॥ नानक भवजलु उतरसि पारि ॥ २ ॥ १ ॥ ५७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०१)

शब्दार्थ : **आवागवणु** – जन्ममृत्यू. **परगासु** – प्रकाश. **उधारु** – उद्धार.

भावार्थ : हे माझ्या मित्रा ! तू रामाचे गुण गा. प्रभुनामाचा जप केल्याने परमसुख प्राप्त होते व जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूचे गुणगान केल्याने अंत:करणात आत्मज्ञानाचा प्रकाश पसरतो व प्रभूच्या चरणकमली निवास प्राप्त होतो. ॥ १ ॥ संतांच्या संगतीने उद्धार होतो. नानक सांगतात, असा जीव भवसागर पार करून जातो. ॥ २ ॥ १ ॥ ५७ ॥

॥ रामकली महला ५ ॥

गुरु पूरा मेरा गुर पूरा ॥
राम नाम जपि सदा सुहेले सगल बिनासे रोग कूरा ॥ १ ॥ रहाउ ॥
एकु अराधहु साचा सोइ ॥ जा की सरनि सदा सुखु होइ ॥ १ ॥
नीद सुहेली नाम की लागी भूख ॥ हरि सिमरत बिनसे सभ दूख ॥ २ ॥
सहजि अनंद करहु मेरे भाई ॥ गुरि पूरै सभ चिंत मिटाई ॥ ३ ॥
आठ पहर प्रभ का जपु जापि ॥ नानक राखा होआ आपि ॥ ४ ॥ २ ॥ ५८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०१)

शब्दार्थ : **सुहेले** – सुखी. **कूरा** – असत्य. **नीद** – झोप, निद्रा. **चिंत** – चिंता. **राखा** – रक्षक.

भावार्थ : माझा पूर्णगुरू सर्वांशाने पूर्ण आहे. प्रभुनामाचा जप केल्याने सुखाची प्राप्ती होते. सर्व मिथ्यारोग नष्ट होतात. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्या एकमेव सत्यरूप प्रभू परमात्म्याची आराधना करावी. त्याला शरण गेल्याने सर्व सुख प्राप्त होते. ॥ १ ॥ प्रभुनामाची भूक लागली की सुखाची झोप लागते. हरीचे स्मरण केल्याने सर्व दु:ख नष्ट

होते. ॥ २ ॥ त्यामुळे सहजसमाधीचा आनंद प्राप्त होतो. कारण पूर्णगुरूने सर्व चिंता नष्ट केली आहे. ॥ ३ ॥ नानक सांगतात, हे मित्रा ! तू अष्टौप्रहर प्रभुनामाचा जप कर. त्यामुळे प्रभू परमात्मा तुझा रक्षक होईल.॥४॥२॥५८॥

रागु रामकली महला ५ पड़ताल घरु ३

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

नर नरह नमसकारं ॥ जलन थलन बसुध गगन एक एकंकारं ॥ १ ॥ रहाउ ॥
हरन धरन पुन पुनह करन ॥ नह गिरह निरंहारं ॥ १ ॥
गंभीर धीर नाम हीर ऊच मूच अपारं ॥
करन केल गुण अमोल नानक बलिहारं ॥ २ ॥ १ ॥ ५९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०१)

शब्दार्थ : **नरनरह** – नरसिंह. **जलन** – जळी. **थलन** – स्थळी. **वसुध** – पृथ्वीवर. **हरन** – मारणारा. **धरण** – धारण करणारा. **करन** – करणारा. **गिरह** – घर. **निरंहार** – निराहार. **हीर** – हिरा. **मूच** – मोठा. **केल** – किडा, लीला.

भावार्थ : सर्व नरांमध्ये श्रेष्ठ अशा नरहरीस त्या नृसिंहास माझा नमस्कार असो. त्या एकमेव परमात्म्याचा जळी, स्थळी, आकाशी सर्वत्र वास आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो संहारकर्ता, पालनकर्ता व पुन: पुन्हा रचना करणारा आहे. त्याचे असे घर नाही व तो भोजनही करत नाही. ॥ १ ॥ तो गंभीर, धैर्यशील, नामवंत हिरा अत्यंत श्रेष्ठ व अपरंपार प्रभू आहे. अशा ह्या अमोल गुणी, लीला करणाऱ्या प्रभू परमात्म्यावर मी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥२॥१॥५९॥

॥ रामकली महला ५ ॥

रूप रंग सुगंध भोग तिआगि चले माइआ छले कनिक कामिनी ॥ १ ॥ रहाउ ॥
भंडार दरब अरब खरब पेखि लीला मनु सधारै ॥ नह संगि गामनी ॥ १ ॥
सुत कलत्र भ्रात मीत उरझि परिओ भरमि मोहिओ इह बिरख छामनी ।
चरण कमल सरन नानक सुखु संत भावनी ॥ २ ॥ २ ॥ ६० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०१)

शब्दार्थ : **दरब** – द्रव्य. **सधरे** – धैर्यवान होते. **नामनी** – जाणारे. **भ्रात** – बंधू. **उरझी** – अडवणे. **छागणी** – छाया. **भावनी** – श्रद्धा.

भावार्थ : माया, कनक, कांता यांच्याकडून छळला जाणारा जीव, त्यांच्या रूप, रंग, गंध याच्या भोगांना येथेच सोडून ह्या जगातून निघून जातो. ॥ १ ॥ रहाउ ॥ द्रव्याचे अनंत भांडार पाहून मनाला उत्साह वाटतो. पण ते द्रव्य अंती बरोबर येत नाही. ॥ १ ॥ पुत्र, पत्नी, बंधू, मित्र ह्यात जीव गुंतून पडतो. पण हा सारा मोह, भ्रम आहे. वृक्षाच्या छायेप्रमाणे क्षणभंगूर आहे. नानक सांगतात, संतजनांवर पूर्ण श्रद्धा व प्रभुचरणी शरण गेल्याने परमसुखाची प्राप्ती होते. ॥ २ ॥ २ ॥ ६० ॥

रागु रामकली महला ९ तिपदे

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

रे मन ओट लेहु हरि नामा ॥
जा कै सिमरनि दुरमति नासै पावहि पदु निरबाना ॥ रहाउ ॥
बडभागी तिह जन कउ जानउ जो हरि के गुन गावै ॥
जनम जनम के पाप खोइ कै फुनि बैकुंठी सिधावै ॥ १ ॥
अजामलु कउ अंत काल महि नाराइन सुधि आई ॥
जां गति कउ जोगीसुर बाछत सौ गति छिन महि पाई ॥ २ ॥
नाहिन गुनु नाहिन कछु बिदिआ धरमु कउनु गजि कीना ॥
नानक बिरदु राम का देखो अभै दानु तिही दीना ॥ ३ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०१)

शब्दार्थ : **ओट लेहु** – आश्रय घे, आसरा घे. **निरबाना** – निर्वाण, मोक्ष. **बडभागी** – भाग्यवान, महाभाग्य. **खोइकै** – नष्ट करून. **सिधावै** – जातो. **जोगी सुर** – महायोगी, योगिजन. **बाछत** – वांछितात, इच्छितात. **बिदिआ** – ज्ञान.

भावार्थ : हे मना ! तू हरिनामाचा आसरा घे. प्रभुनामाच्या स्मरणाने दुष्ट बुद्धी, पापे नष्ट होतात. आणि निर्वाणपद प्राप्त होते. ॥ रहाउ ॥ ज्याने हरीचे नामस्मरण केले तो मोठा भाग्यवंत होय, त्याच्या जन्मजन्मांतरीचे पाप नष्ट होते व तो सरळ वैकुंठास जाऊन पोहोचतो. ॥ १ ॥ त्या अजामलाचेच पाहा ना, अंतकाळी त्याला नारायणाच्या नामस्मरणाची बुद्धी झाली आणि ज्या पदाची महायोगी इच्छा धरतात, ते परमपद त्यास क्षणात प्राप्त झाले. ॥ २ ॥ त्या गजेंद्राचे उदाहरण पाहा ना ! अंगी कोणतेही गुण नाहीत, कोणतीही विद्या नाही, कुठलेही धर्मकर्म केले नाही, पण तरीही संकटकाळी देवाचा धावा केल्याने त्यास मोक्षप्राप्ती झाली. नानक म्हणतात, असा आहे प्रभुनामाचा महिमा ! ॥ ३ ॥ १ ॥

साधो कउनु जुगति अब कीजै ॥
जा ते दुरमति सगल बिनासै राम भगति मनु भीजै ॥ रहाउ ॥
मनु माइआ मे उरझि रहिओ है बुझै नह कछु गिआना ॥
कउनु नामु जग जा कै सिमरै पावै पदु निरबाना ॥ १ ॥
भए दएआल क्रिपाल संत जन तब इह बात बताई ॥
सरब धरम मानो तिह कीए जिह प्रभ कीरति गाई ॥ २ ॥
राम नामु नरि निसि बासुर महि निमख एक उर धारै ॥
जम को त्रासु मिटै नानक तिह अपुनो जनम सवारै ॥ ३ ॥ २ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९०२)

शब्दार्थ : उरझि – निमग्न. बुझै – समजणे. उर धारै – हृदयी धरतो.

भावार्थ : हे संतजनहो ! आता कोणती युक्ती करू की ज्यायोगे माझी सगळी दुर्बुद्धी नष्ट होऊन माझे मन रामभक्तीत रममाण होईल ? ॥ रहाउ ॥ माझे मन सदैव मायेत निमग्न झाले आहे. जराही शहाणपण आले नाही. सारे जग कोणाच्या नावाचे स्मरण करते की ज्यामुळे निर्वाण पद प्राप्त होते ? ॥ १ ॥ जेव्हा दयाळू होऊन संतजन कृपा करतात, तेव्हा हे रहस्य सांगतात की त्या प्रभू परमात्म्याचे गुणगान कर, त्याचीच स्तुती कर. ह्यात सर्व धर्म, कर्म समविष्ट आहेत. ॥ २ ॥ नानक सांगतात, ''अरे, ते एकमात्र रामनाम हृदयाशी धर. रात्रंदिवस त्या रामनामात निमग्न राहा म्हणजे तुझ्या गळ्याभोवतीचा यमाचा फास दूर होईल व तुझ्या जन्माचे सार्थक होईल. ॥ ३ ॥ २ ॥

रामकली महला ९

प्रानी नाराइन सुधि लेहि ॥
छिनु छिनु अउध घटै निसि बासुर, ब्रिथा जातु है देह ॥ रहाउ ॥
तरनापो बिखिअन सिउ खोइओ, बालपनु अगिआना ॥
बिरधि भइओ अजहु नहीं समझै, कउनु कुमति उरझाना ॥ १ ॥
मानस जनमु दीओ जिह ठाकुर, सो तै किउ बिसराइओ ॥
मुकतु होत नर जा कै सिमरे, निमख न ताको गाइओ ॥ २ ॥
माइआ को मदु कहा करतु है, संगि न काहु जाई ॥
नानक कहतु चेति चिंतामनि, होइ है अंति सहाई ॥ ३ ॥ ३ ॥ ८१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०२)

शब्दार्थ : सुधि – सुबुद्धी, विचार. लेह – लेहि. अउध – आयुष्य. तरनापो – तरुणपण. सिअु – त्यात. बालपनु – लहानपण, बालपण. बिरधि – वृद्ध, म्हातारा. अजहु – अजूनही. ठाकूर – परमेश्वर. सो – तो. तै – तू.

भावार्थ : हे मानवप्राण्या ! त्या प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. अरे क्षणोक्षणी तुझे आयुष्य संपत आहे. रात्रंदिवस तू हा नरजन्म वाया घालवत आहेस. ॥ १ ॥ रहाउ ॥ बालपण अज्ञानात गेले. तरुणपण विषयसुखात घालवलेस. आता म्हातारपण आले. अजून तुला काही शहाणपण सुचत नाही. अजूनही कोणत्या कुमतीत गुरफटून पडला आहेस? ॥ १ ॥ अरे ज्या परमेश्वराने तुला हा नरदेह दिला त्याला तू का विसरलास ? ज्याच्या स्मरणमात्रे माणूस ह्या भवपाशातून ह्या जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतो, त्या प्रभू परमात्म्याचे तू क्षणभरही गुणगान केले नाहीस. ॥ २ ॥ मायारूपी मदिरेने तू इतका धुंद झालास की तुझ्या हेही लक्षात आले नाही की शेवटी तुझ्याबरोबर काहीही येणार नाही. नानक सांगतात, अरे प्राण्या ! तुझ्या सर्व मनोकामना पूर्ण करणारा तो चेतनाचिंतामणी प्रभू परमेश्वरच अंती तुझ्या साहाय्यास धावून येणार आहे. त्याला शरण जा. त्याचेच सदैव स्मरण कर. ॥ ३ ॥ ३ ॥ ८१ ॥

॥ रामकली महला १ अस्टपदीआ ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

सोई चंदु चड़हि से तारे सोई दिनीअरू तपत रहे ॥
सा धरती सो पउणु झुलारे जुग जीअ खेले थाव कैसे ॥ १ ॥
जीवन तलब निवारि ॥
होवै परवाणा करहि धिङाणा कलि लखण विचारि ॥ १ ॥ रहाउ ॥
कितै देसि न आइआ सुणीऐ तीरथ पासि न बैठा ॥
दाता दानु करे तह नाही महल उसारि न बैठा ॥ २ ॥
जे को सतु करे सो छीजै तप घरि तपु न होई ॥
जे को नाउ लए बदनावी कलि के लखण एई ॥ ३ ॥
जिसु सिकदारी तिसहि खुआरी चाकर केहे डरना ॥
जा सिकदारै पवै जंजीरी ता चाकर हथहु मरणा ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०२)

शब्दार्थ : सोइ – तोच. चंदु – चंद्र. चडहि – उगवतो. दिनिअरु – दिनकर, सूर्य. तपत – प्रकाशतो. पवणु – वारा. झुलारे – वाहतो. तलब – तलफ, आसक्ती. धिङाणा – अत्याचार. लखण – लक्षण. देसि – देशात, प्रदेशात. सतु – सत्यधर्म. छिजे – क्षीण, कमजोर. बदनावी – अप्रतिष्ठा, अपमान. सिकदारी – सरदारकी. खुआरी – अपमान. डरणा – घाबरणे. हथहु – हाताने.

भावार्थ : ह्या जगात आजही तोच चंद्र उगवतो. तोच सूर्य प्रकाश देतो. तीच धरती आहे. तोच वारा वाहत आहे. सारे कसे जसे होते तसेच आहे आणि लोक मात्र म्हणतात, युग बदलले. हे कसे शक्य आहे ? (वास्तविक माणूस बदलला आहे. काळ नव्हे.) ॥ १ ॥ हे जीवा ! तू जीवनाची आसक्ती सोड. (कलियुग आपोआप नष्ट होईल.) कलियुगाचे हे लक्षण आहे की जो जुलूमजबरदस्ती करतो. त्याचाच लोक स्वीकार करतात. ॥ १ ॥रहाउ॥ असं काही ऐकिवात नाही की कली कोणत्या विशिष्ट प्रदेशात कोणत्या एका तीर्थक्षेत्री अवतरला आहे. दाता दान करतो तेथेही नाही. त्याने कोठे महाल बांधून त्यात तो राहतो असेही नाही. ॥ २ ॥ सत्याचरण करणारे हळूहळू कमी होत आहेत. तप करणाऱ्यांच्या घरीही आता तपाचरण होत नाही. जे नामभक्ती करतात त्यांची अप्रतिष्ठा होते. ही सारी कलियुगाची लक्षणे आहेत. ॥ ३ ॥ जे वरिष्ठ स्थान प्राप्त करतात ते अपमानित होतात व आपल्याच चाकराकडून मारले जातात. त्यांच्या सेवकांना मात्र कसलीच भीती नसते. नोकरच विश्वासघातकी होतात. हेच कलियुगाचे लक्षण आहे. ॥ ४ ॥

आखु गुणा कलि आईऐ ॥
तिहु जुग केरा रहिआ तपावसु जै गुण देहि त पाईऐ ॥१॥रहाउ॥
कलि कलवाली सरा निबेड़ी काजी क्रिसना होआ ॥

बाणी ब्रहमा बेदु अथरबणु करणी कीरति लहिआ ॥ ५ ॥
पति विणु पूजा सत विणु संजमु जत विणु काहे जनेऊ ॥
नावहु धोवहु तिलकु चड़ावहु सुच विणु सोच न होई ॥ ६ ॥
कलि परवाणु कतेब कुराणु ॥ पोथी पंडित रहे पुराण ॥
नानक नाउ भइआ रहमाणु ॥ करि करता तू एको जाणु ॥ ७ ॥
नानक नामु मिलै वडिआई एदू उपरि करमु नही ॥
जे घरि होदै मंगणि जाईऐ फिरि ओलामा मिलै तही ॥ ८ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०३)

शब्दार्थ : **आखु** – वर्णन कर. **तिहु** – तीनही. **केरा** – चा. **तपावसु** – न्याय. **कलवाली** – कष्टदायक. **सरा** – शरियत. **मुस्लीम** – न्यायशास्त्र. **क्रिसना** – कृष्ण. **अथरवणु** – अथर्ववेद. **करणी** – सत्कर्म. **जत** – पवित्रता. **सुच** – आंतरिक पवित्रता.

भावार्थ : हे जीवा ! कलियुग आले आहे. तू प्रभूच्या गुणांचे वर्णन करत राहा. प्रभुभक्ती कर. पहिल्या तीन युगांचा तप, संयम, न्याय आदी गुणांचा प्रभाव आता राहिला नाही. प्रभुनाम हाच आता एकमेव मार्ग आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ ह्या अत्यंत कष्टमय कलियुगात शरियतनुसार न्याय होतो आहे. काजीने कृष्णाचे स्थान घेतले आहे. आता केवळ अथर्ववेद हीच ब्रह्माची वाणी राहिली आहे. माणसास त्याच्या कर्मानुसार फलप्राप्ती होते. खऱ्या भक्तीशिवाय केलेली पूजा, सत्याशिवाय केलेला संयम व आंतरिक पवित्रतेशिवाय घातलेले जानवे काय कामाचे? केवळ त्रिकाल स्नानसंध्या, कपाळी गंधाचा टिळा लावून काही उपयोगाचे नाही. आंतरिक शुद्धतेविना पवित्रता येत नाही. ॥ ६ ॥ ह्या कलियुगात कतेब व कुराणाला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. पंडित व त्यांची पोथी पुराणे बाजूस पडली आहेत. नानक सांगतात, ह्या युगात प्रभुनाम हाच रहमान झाला आहे. तू केवळ हे सर्व काही करणारा एकमेव प्रभू परमात्मा आहे हे जाण. ॥ ७ ॥ नानक सांगतात, नामस्मरणासारखे अन्य कर्म नाही. नामस्मरणानेच महती प्राप्त होते. घरात वस्तू असताना दुसऱ्याकडे भीक मागणाऱ्याच्या पदरी अपमानच येतो. ॥ ८ ॥ १ ॥

॥ रामकली महला १ ॥

जगु परबोधहि मड़ी बधावहि ॥ आसणु तिआगि काहे सचु पावहि ॥
ममता मोहु कामणि हितकारी ॥ ना अउधूती ना संसारी ॥ १ ॥
जोगी बैसि रहहु दुबिधा दुखु भागै ॥ घरि घरि मागत लाज न लागै ॥ १ ॥ रहाउ ॥
गावहि गीत न चीनहि आपु ॥ किउ लागी निवरै परतापु ॥
गुर कै सबदि रचै मन भाइ ॥ भिखिआ सहज वीचारी खाइ ॥ २ ॥
भसम चड़ाइ करहि पाखंडु ॥ माइआ मोहु सहहि जम डंडु ॥
फूटै खापरु भीख न भाइ ॥ बंधनि बाधिआ आवै जाइ ॥ ३ ॥
बिंदु न राखहि जती कहावहि ॥ माई मागत त्रै लोभावहि ॥
निरदइआ नही जोति उजाला ॥ बूडत बूडे सरब जंजाला ॥ ४ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९०३)

शब्दार्थ : **परबोधहि** – उपदेश करणे, प्रबोधन करणे. **मडी** – स्मशान. **बधावहि** – . **आसणु** – आसन, मानसिक स्थैर्य. **हितकारी** – प्रेम करणारा. **अउधुती** – विरक्त. **दुबिधा** – द्विधा स्थिती. **चीनहि** – चिंतन. **रचै** – रममाण हो, रंगून जा. **सहहि** – सहन करणे. **खापरु** – खापर, भिक्षापात्र. **बिंदु** – वीर्य. **निरदइआ** – निर्दय.

भावार्थ : हे योगी ! तू लोकांना ब्रह्मज्ञान शिकवतोस पण पोटासाठी भीक मागून स्वत:च्या जीवनाचे स्मशान बनवतोस. मनाच्या स्थिरतारूपी आसनाचा त्याग करून तुला सत्यरूप परमात्मा कसा प्राप्त होणार ? अजूनही ममता, मोह, स्त्री तुला प्रिय वाटते. तू धड विरक्तही नाहीस आणि धड संसारीही नाहीस. ॥१॥ हे योगी ! जर तू आपले मन स्थिर केलेस तर तुझे द्विधा वृत्तीचे दु:ख नष्ट होईल. तुला दारोदारी भीक मागताना लाज कशी वाटत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ तू मुखाने प्रभूचे गीत गातोस पण तू स्वत:स अद्याप ओळखले नाहीस. अशा स्थितीत तुझ्या अंतरात असलेला परताप कसा दूर होणार ? हे बंधू ! तू जर आपले मन गुरूने दिलेल्या प्रभुनामात रममाण केलेस तर तुला आत्मज्ञानाची– परमज्ञानाची भिक्षा सहज प्राप्त होईल. ॥ २ ॥ अंगाला भस्म लावून तू पाखंड करतोस पण मोहमायेत गुंतून राहतोस म्हणून तुला यमदंडाचा मार खावा लागतो. तुझे हृदयरूपी भिक्षापात्र फुटके आहे. त्यात आत्मज्ञानाची भिक्षा प्राप्त होणार नाही. जो जीव मोहमायेच्या बंधनात बांधला गेला तो जन्ममरणाच्याच चक्रात फिरत राहतो. ॥ ३ ॥ तू वीर्य रक्षण करत नाहीस, ब्रह्मचर्य पाळत नाहीस आणि तरीही स्वत:स यती म्हणवतोस. त्रिगुणाच्या लोभात पडून माया मागत हिंडतोस. तू निर्दय आहेस. त्याचमुळे तुझ्या अंत:करणात परमज्योतीचा प्रकाश पसरू शकत नाही. त्यामुळेच तू संसार सागरात गटांगळ्या खात आहेस. ॥ ४ ॥

भेख करहि खिंथा बहु थटूआ ॥ झूठो खेलु खेलै बहु नटूआ ॥
अंतरि अगनि चिंता बहु जारे ॥ विणु करमा कैसे उतरसि पारे ॥ ५ ॥
मुंद्रा फटक बनाई कानि ॥ मुकति नही बिदिआ बिगिआनि ॥
जिहवा इंद्री सादि लुोभाना ॥ पसू भए नही मिटै नीसाना ॥ ६ ॥
त्रिबिधि लोगा त्रिबिधि जोगा ॥ सबदु वीचारै चूकसि सोगा ॥
ऊजलु साचु सु सबदु होइ ॥ जोगी जुगति वीचारे सोइ ॥ ७ ॥
तुझ पहि नउ निधि तू करणै जोगु ॥ थापि उथापे करे सु होगु ॥
जतु सतु संजमु सचु सुचीतु ॥ नानक जोगी त्रिभवण मीतु ॥ ८ ॥ २ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९०३)

शब्दार्थ : **भेख** – वेश. **खिंथा** – कफनी. **थटुआ** – थाटमाट. **नटुआ** – नट. **जारे** – जाळते. **करमा** – सत्कर्म. **मुद्रा** – कुंडले. **बिदिआ** – विद्या. **बिगिआनि** – विज्ञान. **निशाना** – खूण, चिन्ह, निशाणी. **त्रिबिधि** – तीन प्रकारचे, त्रिगुणात्मक. **जोगा** – योग. **सबदु** – शब्द, प्रभुनाम. **सोगा** – शोक. **जुगति** – युक्ती, मर्म, रहस्य. **सुचितु** – पवित्र हृदय.

भावार्थ : हे योगी ! तू नाना वेश परिधान करून खूप थाटमाट करतोस. जणू काही एखादा नट नाटकातील भूमिकाच करतोय. पण तुझ्या अंतरातील चिंतेचा अग्नी तुला जाळतो आहे. सत्कर्म केल्याशिवाय तू भवसागर कसा

पार करणार? ॥ ५ ॥ तू कानात स्फटिकाची कुंडले घालतोस पण आत्मज्ञान व ब्रह्मविज्ञानापासून वंचित राहिल्याने मुक्ती प्राप्त होत नाही. तू जीभ व इंद्रियांच्या स्वादास मोहित झाला आहेस. तुझ्यातील पशुत्वाच्या खुणा अजून पुसल्या गेल्या नाहीत. ॥ ६ ॥ इतर संसारी लोक तीन प्रकारचे (सात्विक, राजसिक व तामसिक) असतात त्याचप्रमाणे योगी ही त्रिगुणात्मय मायेत बद्ध झाले आहेत. पण ज्यास शब्दब्रह्माचे ज्ञान होते तो शोकापासून मुक्त होतो. कारण शब्द (प्रभुनाम) हेच परमसत्य आहे. ज्याने शब्दाचे (प्रभुनामाचे) ज्ञान प्राप्त केले त्यासच योगाचे मर्म कळते. ॥ ७ ॥ हे प्रभो ! तुझ्यापाशी नऊनिधी आहेत. तू सर्व काही करण्यास समर्थ आहेस. तू सृष्टी स्थापित करतोस. विस्थापितही करतोस. जे तू करतोस तेच होते. पवित्र हृदय हेच सत्य, संयम, यतित्व आहे. नानक सांगतात, असा योगी त्रिभुवनात मित्र होतो. ॥ ८ ॥ २ ॥

॥ रामकली महला १ ॥

खटु मटु देही मनु बैरागी ॥ सुरति सबदु धुनि अंतरि जागी ॥
वाजै अनहदु मेरा मनु लीणा ॥ गुर बचनी सचि नामि पतीणा ॥ १ ॥
प्राणी राम भगति सुखु पाईऐ ॥
गुरमुखि हरि हरि मीठा लागै हरि हरि नामि समाईऐ ॥ १ ॥ रहाउ ॥
माइआ मोहु बिन रजि समाए ॥ सतिगुरु भेटै मेलि मिलाए ॥
नामु रतनु निरमोलकु हीरा ॥ तितु राता मेरा मनु धीरा ॥ २ ॥
हउमै ममता रोगु न लागै ॥ राम भगति जम का भउ भागै ॥
जमु जंदारु न लागै मोहि ॥ निरमल नामु रिदै हरि सोहि ॥ ३ ॥
सबदु बीचारि भए निरंकारी ॥ गुरमति जागे दुरमति परहारी ॥
अनदिनु जागि रहे लिव लाई ॥ जीवन मुकति गति अंतरि पाई ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०३)

शब्दार्थ : **खटु** – षट, सहा चक्रे. **मूलाधार** – स्वाधिष्ठान. **मणी** – पूर, अनाहत विशुद्ध, आज्ञाचक्र. **मटु** – मठ. **बैरागी** – विरक्त. **सुरति** – . **लीणा** – लीन झाले. **पतीणा** – लीन होणे. **बिवरचि** – त्यागून. **धीरा** – धैर्य. **जंदारु** – दंडा. **परहारी** – नष्ट केली.

भावार्थ : षट्चक्र मंडित ह्या देहरूपी मठात विरक्त मन वास करते. माझ्या अंत:करणात शब्द (नाम) रूपी ध्वनी जागृत झाला. अनाहत नाद निनादू लागला व त्यात माझा आत्मा लीन झाला. सतगुरूच्या उपदेशाने माझे मन सत्यनामात विलीन झाले. ॥ १ ॥ हे प्राण्या ! रामभक्तीने सुख प्राप्त होते. गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्रभू परमात्म्याविषयी आवड उत्पन्न होते व जीव प्रभुनामात एकरूप होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ मोहमायेचा त्याग केल्यानेच प्रभू परमात्म्याशी एकरूप होता येते. सतगुरू भेटल्यावर तो जीवाचे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवतो. प्रभुनाम हा अमूल्य हिरा आहे. प्रभूनामात रममण झाल्याने माझ्या मनास धैर्य प्राप्त झाले. ॥ २ ॥ रामभक्ती केल्याने अहंकार व ममत्वाचा रोग होत नाही व मृत्यूचे भय नष्ट होते. आता मला यमाचा सोटा काहीही करू शकत नाही. कारण माझ्या मनात प्रभुरामाचे नाम शोभायमान झाले आहे. ॥ ३ ॥ शब्दाचे (नामाचे) चिंतन केल्याने

मी आता निराकाररूप झालो आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने माझी दुर्बुद्धी नष्ट झाली आहे व सतबुद्धी जागृत झाली आहे. आता मी रात्रंदिवस जागृत राहून प्रभुभक्तीत तल्लीन होतो. आता मी जीवनमुक्त झालो आहे. ॥ ४ ॥

अलिपत गुफा महि रहहि निरारे ॥ तसकर पंच सबदि संघारे ॥
पर घर जाइ न मनु डोलाए ॥ सहज निरंतरि रहउ समाए ॥ ५ ॥
गुरमुखि जागि रहे अउधूता ॥ सद बैरागी ततु परोता ॥
जगु सूता मरि आवै जाइ ॥ बिनु गुर सबद न सोझी पाइ ॥ ६ ॥
अनहद सबदु वजै दिनु राती ॥ अविगत की गति गुरमुखि जाती ॥
तउ जानी जा सबदि पछानी ॥ एको रवि रहिआ निरबानी ॥ ७ ॥
सुंन समाधि सहजि मनु राता ॥ तजि हउ लोभा एको जाता ॥
गुर चेले अपना मनु मानिआ ॥ नानक दूजा मेटि समानिआ ॥ ८ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०४)

शब्दार्थ : **अलिपत** – अलिप्त. **निरारे** – मोहरहित. **तसकर** – चोर. **संघारे** – संहार केला. **डोलाए** – दोलायमान. **अउधुता** – विरक्त. **ततु** – तत्त्व. **परोता** – धारण करणे. **सोझी** – समजणे. **जाती** – जाणणे. **जानी** – ज्ञानी. **जा** – जेव्हा. **हउ** – अहंकार. **दूजा** – द्वैतभाव.

भावार्थ : जो शरीररूपी गुहेत राहून मोहरहित होऊन अलिप्त राहतो, ज्याने शब्दाच्या (नामाच्या) माध्यामातून पंचविकाररूपी चोरांचा संहार केला आहे, जो एकमेव प्रभूस सोडून आपले मन दुसरीकडे दोलायमान होऊ देत नाही, तो निरंतर सहजावस्थेत सामावून राहातो. ॥ ५ ॥ गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा त्यागी व विरक्त बनून राहतो. हे सारे जग मोहमायेच्या निद्रेत निद्रिस्त झाले आहे. त्यामुळे ते जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहते. सतगुरूकडून प्रभुनामाची प्राप्ती झाल्याशिवाय आत्मज्ञान प्राप्त होत नाही.॥६॥ अंत:करणात अनाहत नाद सदैव निनादत असतो. गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा कोणी विरळाच अव्यक्त प्रभूचा हा स्वर ओळखतो. ज्यास प्रभुनामरूपी शब्दज्ञान प्राप्त झाले आहे तोच हे जाणतो की तो एकमेव अलिप्त प्रभू परमात्मा सर्वव्याप्त आहे. ॥ ७ ॥ असा जीव लोभ व अहंकाराचा त्याग करून शून्यसमाधीद्वारा सहजावस्था प्राप्त करतो. नानक सांगतात, प्रभू व सेवक जेव्हा एकरूप होतात, तेव्हा त्यांच्यातील द्वैतभाव नष्ट होतो. ॥ ८ ॥ ३ ॥

॥ रामकली महला १ ॥

साहा गणहि न करहि बीचारु ॥ साहे ऊपरि एकंकारु ॥
जिसु गुरु मिलै सोई बिधि जाणै ॥ गुरमति होइ त हुकमु पछाणै ॥ १ ॥
झूठु न बोलि पाडे सचु कहीऐ ॥ हउमै जाइ सबदि घरु लहीऐ ॥ १ ॥ रहाउ ॥
गणि गणि जोतकु कांडी कीनी ॥ पड़ै सुणावै ततु न चीनी ॥

सभसै ऊपरि गुर सबदु बीचारु ॥ होर कथनी बदउ न सगली छारु ॥ २ ॥
नावहि धोवहि पूजहि सैला ॥ बिनु हरि राते मैलो मैला ॥
गरबु निवारि मिलै प्रभू सारथि ॥ मुकति प्रान जपि हरि किरतारथि ॥ ३ ॥
वाचै वादु न बेदु बीचारै ॥ आपि डुबै किउ पितरा तारै ॥
घटि घटि ब्रहमु चीनै जनु कोइ ॥ सतिगुरु मिलै त सोझी होइ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०४)

शब्दार्थ : **साहा** – शुभमुहूर्त. **एकंकारु** – एकमेव प्रभू परमात्मा. **त** – तेव्हा. **लहीऐ** – ग्रहण केले. **कांडी** – पत्रिका. **बदउ** – सांगणे. **सैला** – दगड. **गरबु** – गर्व, अहंकार. **किरतारथि** – कृतार्थ.

भावार्थ : हे जीवा ! मुहूर्त वगैरे पाहू नकोस. त्याचा विचारही करू नकोस. कारण ह्या साऱ्या ग्रह गणिताहून तो एकमेव प्रभू परमात्मा श्रेष्ठ आहे. ज्यास सतगुरु प्राप्त झाला तोच जीवन जगण्याची योग्य रीत जाणतो. गुरूपदेशाप्रमाणे आचरण केल्याने ईश्वराची आज्ञा जाणता येते. ॥ १ ॥ हे पंडित ! तू असत्य बोलू नकोस. नेहमी सत्यच बोल. अहंकाराचा त्याग केला की मग प्रभुनाम (शब्द)रूपी वास्तविक घर प्राप्त होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ गणित करून करून ज्योतिषी कुंडली मांडतो. वाचून लोकांना ऐकवतो. पण त्याचे मूळ तत्त्व मात्र तो जाणत नाही. शब्दगुरूचा विचार हा सर्वश्रेष्ठ आहे. अन्य गोष्टी बोलणे व्यर्थ आहे. ॥ २ ॥ हे पंडित ! तू स्नान वगैरे करून शूचिर्भूत होऊन दगडाची पूजा करतोस. पण प्रभू परमात्म्याच्या रंगात रंगल्याशिवाय हे सारे मलिनच असते. हे जीवा ! तू अहंकाराचा त्याग केलास तर प्रभू परमात्मा तुझा सारथी होईल. जीवाला मुक्ती देणाऱ्या प्रभू परमात्म्याचा जप करून आपले जीवन कृतार्थ कर. ॥ ३ ॥ पंडित वेदांचे यथार्थ ज्ञान प्राप्त न करताच वादविवाद करत बसतात. तो स्वत:च भवसागरात बुडतो मग तो पितरांना काय तारणार ? कोणा विरळ्या प्रभुसेवकास गुरूकडून ज्ञान प्राप्त होते व तो हे जाणतो की प्रभू परमात्मा प्रत्येक जीवाचे ठायी वास करतो. ॥ ४ ॥

गणत गणीऐ सहसा दुखु जीऐ ॥ गुर की सरणि पवै सुखु थीऐ ॥
करि अपराध सरणि हम आइआ ॥ गुर हरि भेटे पुरबि कमाइआ ॥ ५ ॥
गुर सरणि न आईऐ ब्रहमु न पाईऐ ॥ भरमि भुलाईऐ जनमि मरि आईऐ ॥
जमदरि बाधउ मरै बिकारु ॥ ना रिदै नामु न सबदु अचारु ॥ ६ ॥
इकि पाधे पंडित मिसर कहावहि ॥ दुबिधा राते महलु न पावहि ॥
जिसु गुर परसादी नामु अधारु ॥ कोटि मधे को जनु आपारु ॥ ७ ॥
एकु बुरा भला सचु एकै ॥ बूझु गिआनी सतगुर की टेकै ॥
गुरमुखि विरली एको जाणिआ ॥ आवणु जाणा मेटि समाणिआ ॥ ८ ॥
जिन कै हिरदै एकंकारु ॥ सरब गुणी साचा बीचारु ॥
गुर कै भाणै करम कमावै ॥ नानक साचे साचि समावै ॥ ९ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०४)

शब्दार्थ : **सहसा** – संशय. **थीऐ** – होते. **बाधउ** – बंधित, बांधलेला. **पाधे** – पुरोहित. **मिसर** – मिश्र. **राते** – रममाण. **सचु** – सत्यस्वरूप परमात्मा. **टेकै** – आधाराने, द्वाराकडून.

भावार्थ : ग्रहांचे गणित मांडणारा सदैव संशयाने, शंकेने घेरलेला असतो. त्यामुळे त्यास दु:ख भोगावे लागते. सतगुरूला शरण गेल्याने सुखाची प्राप्ती होते. मी अनंत अपराध करून सतगुरूस शरण गेलो व माझ्या पूर्वकर्मानुसार सतगुरुकृपेने मला प्रभू परमात्मा प्राप्त झाला. ॥ ५ ॥ सतगुरूला शरण न जाणाऱ्या जीवास ब्रह्माची प्राप्ती होत नाही. तो मायेच्या भ्रमाने भ्रमित होऊन जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतो. तो विषयविकारांनी बद्ध होऊन यमाच्या द्वारी जाऊन पडतो. अशा जीवाच्या हृदयात प्रभुनामाचा वास नसतो व त्याचे आचरणही गुरूपदेशाप्रमाणे नसते. ॥ ६ ॥ कोणी स्वत:स पुरोहित, पंडित, मिश्र म्हणवतात. ते द्वैतात रममाण झाल्यामुळे त्यांना प्रभूच्या घरी स्थान प्राप्त होत नाही. ज्यास सतगुरुकृपेने प्रभुनामाचा आधार प्राप्त झाला असा कोटीमध्ये एखादाच. ॥ ७ ॥ तो एकमेव प्रभूच वाईट, चांगला व सत्यही आहे. हे ज्ञानी माणसा ! सतगुरूकडून तू हे समजावून घे. कोणी विरळा जीव गुरुमार्गी चालून त्या एकमेव प्रभूस जाणतो. असा जीव जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होऊन प्रभूशी एकरूप होतो. ॥ ८ ॥ ज्याच्या हृदयात एकमेव प्रभू परमात्मा आहे, तो सर्वगुणी व सद्विचारी असतो. तो प्रभूच्या इच्छेप्रमाणे कर्म करतो व सत्यरूप होऊन सत्यरूपात विलीन होतो. ॥ ९ ॥ ४ ॥

॥ रामकली महला ५ ॥

हठु निग्रहु करि काइआ छीजै ॥ वरतु तपनु करि मनु नही भीजै ॥
राम नाम सरि अवरु न पूजै ॥ १ ॥
गुरु सेवि मना हरि जन संगु कीजै ॥
जमु जंदारु जोहि नही साकै सरपनि डसि न सकै हरि का रसु पीजै ॥ १ ॥ रहाउ ॥
वादु पड़ै रागी जगु भीजै ॥ त्रैगुण बिखिआ जनमि मरीजै ॥
राम नाम बिनु दूखु सहीजै ॥ २ ॥
चाड़सि पवनु सिंघासनु भीजै ॥ निउली करम खटु करम करीजै ॥
राम नाम बिनु बिरथा सासु लीजै ॥ ३ ॥
अंतरि पंच अगनि किउ धीरजु धीजै ॥ अंतरि चोरु किउ सादु लहीजै ॥
गुरमुखि होइ काइआ गड़ु लीजै ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०५)

शब्दार्थ : **हठु** – हठयोग. **निग्रह** – इंद्रियनिग्रह. **छिजै** – क्षीण होते. **वरतु** – व्रत. **तपतु** – तपाचरण. **भीजे** – शांत होणे. **सरि** – समान. **अवरु** – अन्य. **संगु** – संग, संगत. **जंदारु** – भयानक. **जोहि** – पाहणे. **सरपनि** – सर्पिण. **डसि** – चावली. **बादु** – वादविवाद. **सहजै** – सहन करतो. **चाडसि पवनु** – श्वास घेणे. **निउली** – नौली, एक योग क्रिया. **खटु** – षट, सहा. **बिरथा** – वृथा. **सादु** – स्वाद. **गड़ु** – गड, किल्ला.

भावार्थ : हटयोगाने बलपूर्वक इंद्रिय निग्रह व इच्छांचे दमन केल्याने केवळ शरीर झिजते. व्रते, तप केल्यानेही मन शांत होत नाही. रामनामासारखी अन्य कोणतीही गोष्ट पूजनीय नाही. ॥ १ ॥ हे मना ! सतगुरूची सेवा कर व

प्रभुसेवकांची संगत धर. हरिरसप्राशन केल्याने तो भयानक यमही तुझ्याकडे दृष्टिक्षेप करू शकणार नाही.॥१॥ रहाउ ॥ सारा संसार नाना तऱ्हेच्या वादांनी त्रासला आहे व गाण्या बजावण्यात रंगून आपले मन प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतो. त्रिगुणात्मक मायेच्या विषाने बाधित झाल्याने जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतो व रामनामाविना दु:ख सहन करतो. ॥ २ ॥ योगी लोक श्वास रोखून धरून दशमद्वाररूपी सिंहासनावर आरूढ होऊन आनंद भोगतात. नौली क्रिया व षट्कर्मे करतात पण रामनामाशिवाय श्वास घेणेही (जीवन जगणेही) व्यर्थ आहे. ॥ ३ ॥ अंतरात पंचविकारांचा अग्नी जळत असताना मनास धैर्य कसे प्राप्त व्हावे ? अंतरात कामक्रोधादि चोर शिरलेले असताना जीवनाचा आस्वाद कसा घेणार? सतगुरुच्या उपदेशाप्रमाणे आचरण करूनच मनरूपी किल्ला जिंकता येतो. ॥ ४ ॥

अंतरि मैलु तीरथ भरमीजै ॥ मनु नही सूचा किआ सोच करीजै ॥
किरतु पइआ दोसु का कउ दीजै ॥ ५ ॥
अंनु न खाहि देही दुखु दीजै ॥ बिनु गुर गिआन त्रिपति नही थीजै ॥
मनमुखि जनमै जनमि मरीजै ॥ ६ ॥
सतिगुर पूछि संगति जन कीजै ॥ मनु हरि राचै नही जनमि मरीजै ॥
राम नाम बिनु किआ करमु कीजै ॥ ७ ॥
ऊंदर दूंदर पासि धरीजै ॥ धुर की सेवा रामु रवीजै ॥
नानक नामु मिलै किरपा प्रभ कीजै ॥ ८ ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०५)

शब्दार्थ : **सुचा** – पवित्र, शुद्ध. **सोच** – स्नान. **किरतु** – प्रारब्ध, पूर्वकर्मफल. **थी जै** – होणे. **राचै** – रममाण होणे. **उंदर** – उंदीर. **दुंदर** – . **पासि** – . **रवीजै** – स्मरण कर.

भावार्थ : हे मित्रा ! अंत:करणात मलिनता असताना तीर्थयात्रा करत भटकण्यात काय अर्थ आहे. मन शुद्ध नसताना शरीरशुद्धी करून पवित्रता कशी येणार ? वास्तविक पूर्वकर्मानुसार प्रत्येकास फळ प्राप्त होत असते. निष्कारण दुसऱ्यास का दोष द्यावा ? ॥ ५ ॥ लोक उपासतापास करून शरीरास क्लेश देतात. त्याने काहीही प्राप्त होत नाही. सतगुरूकडून आत्मज्ञान प्राप्त झाल्याशिवाय मन तृप्त होत नाही. स्वेच्छाचारी जीव जन्मतो आणि मरतो. ॥ ६ ॥ सेवकाने सतगुरूच्या उपदेशानुसार संगती करावी. ज्याचे मन प्रभुनामात रंगून गेले, त्याला जन्ममरणाचे दु:ख भोगावे लागत नाही. त्याला रामनाम स्मरणाशिवाय अन्य कामच उरत नाही. ॥ ७ ॥ मनाचे संकल्प-विकल्प मनास उंदराप्रमाणे कुरतडत असतात. त्यांना रोखून धर, मन स्थिर कर व पूर्वकर्मानुसार लिहिलेल्या कर्मलेखाप्रमाणे रामाचे स्मरण कर. नानक सांगतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर की ज्यामुळे मला नामाची प्राप्ती होईल. ॥ ८ ॥ ५ ॥

॥ रामकली महला १ ॥

अंतरि उतभुजु अवरु न कोई ॥ जो कहीऐ सो प्रभ ते होई ॥
जुगह जुगंतरि साहबु सचु सोई ॥ उतपति परलउ अवरु न कोई ॥ १ ॥

ऐसा मेरा ठाकुरु गहिर गंभीरु ॥
जिनि जपिआ तिन ही सुखु पाइआ हरि कै नामि न लगै जम तीरु ॥ १ ॥ रहाउ ॥
नामु रतनु हीरा निरमोलु ॥ साचा साहिबु अमरु अतोलु ॥
जिहवा सूची साचा बोलु ॥ घरि दरि साचा नाही रोलु ॥ २ ॥
इकि बन महि बैसहि डूगरि असथानु ॥ नामु बिसारि पचहि अभिमानु ॥
नाम बिना किआ गिआन धिआनु ॥ गुरमुखि पावहि दरगहि मानु ॥ ३ ॥
हठु अहंकारु करै नही पावै ॥ पाठ पड़ै ले लोक सुणावै ॥
तीरथि भरमसि बिआधि न जावै ॥ नाम बिना कैसे सुखु पावै ॥ ४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९०५)

शब्दार्थ : **उतभुजु** – वनसृष्टी. **परलउ** – प्रलय. **तीरु** – तीर, बाण. **अतुलु** – अतुल्य. **सूचि** – पवित्र. **रोलु** – असत्य. **असथानु** – स्थान. **पचहि** – जळत राहतात, दु:खी होतात. **भरमसि** – हिंडणे, भ्रमण करणे. **हठु** – हट्ट. **बिआधि** – व्याधी.

भावार्थ : वनस्पती आदी सर्व सृष्टीत प्रभू परमात्मा विराजमान आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणी नाही. जे प्रभू परमात्मा बोलतो तेच होते. युगानुयुगे तो सत्यरूप प्रभू परमात्मा विद्यमान आहे. उत्पत्ती व प्रलयही तोच घडवून आणतो. ॥ १ ॥ माझा मालक प्रभू परमात्मा गहन व गंभीर आहे. ज्याने त्याचा जप केला त्याने सुख प्राप्त केले. ज्याने प्रभुनामाचे स्मरण केले त्यास यमाचा बाण विद्ध करू शकत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनाम हे एक अनमोल रत्न आहे. हिरा आहे. प्रभू परमात्मा सत्य आहे. अमर आहे. अतुलनीय आहे. ज्याला हे प्रभुनामरत्न प्राप्त झाले त्याची जिव्हा पवित्र होते. तो नेहमी सत्यच बोलतो. त्याचे हृदयरूपी घरदार सारे काही सत्य असते, तेथे असत्याचा लवलेशही नसतो. ॥ २ ॥ कोणी प्रभुप्राप्तीसाठी वनात जातात तर कोणी डोंगरावर आसनस्थ होतात. पण त्यांना प्रभुनामाचा विसर पडतो त्यामुळे ते अहंकारात जळत राहतात. प्रभुनामाशिवाय ज्ञान, ध्यान व्यर्थ आहे. जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो त्यास प्रभू दरबारात सन्मान प्राप्त होतो. ॥ ३ ॥ हटयोगाने, बलपूर्वक वा अहंकाराने प्रभू परमात्मा प्राप्त होत नाही. धर्मग्रंथाचे पारायण करून वा ते लोकांना ऐकवून, तीर्थस्थानी यात्रा करून भवरोग नष्ट होत नाहीत. प्रभुनामाशिवाय सुखाची प्राप्ती कशी होणार ? ॥४॥

जतन करै बिंदु किवै न रहाई ॥ मनूआ डोलै नरके पाई ॥
जमपुरि बाधो लहै सजाई ॥ बिनु नावै जीउ जलि बलि जाई ॥ ५ ॥
सिध साधिक केते मुनि देवा ॥ हठि निग्रहि न त्रिपतावहि भेवा ॥
सबदु वीचारि गहहि गुर सेवा ॥ मनि तनि निरमल अभिमान अभेवा ॥ ६ ॥
करमि मिलै पावै सचु नाउ ॥ तुम सरणगति रहउ सुभाउ ॥
तुम ते उपजिओ भगती भाउ ॥ जपु जापउ गुरमुखि हरि नाउ ॥ ७ ॥
हउमै गरबु जाइ मन भीनै ॥ झूठि न पावसि पाखंडि कीनै ॥

बिनु गुर सबद नही घरु बारु ॥ नानक गुरमुखि ततु बीचारु ॥ ८ ॥ ६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९०६)

शब्दार्थ : **बिंदु** – वीर्य. **किवै** – कोणत्याही प्रकारे. **सजाई** – शिक्षा. **केते** – कितीतरी. **भेवा** – भेदभाव. **अभेवा** – अभेद. **करमि** – कृपेने. **सुभाउ** – सौभाग्यशाली. **उपजिओ** – उत्पन्न होतो. **भीनै** – अनुरक्त होते. **घरुबारु** – प्रभुधाम.

भावार्थ : अनेक यत्न करूनही विषयवासना ताब्यात ठेवता येत नाही. वीर्य रक्षण करता येत नाही. मन सदैव दोलायमान असते व अखेर जीव नरकात पडतो. यमपुरीमध्ये त्यास बांधून नेऊन शिक्षा होते. प्रभुनामाशिवाय जीव विकारांच्या अग्नीत जळत राहतो. ॥ ५ ॥ कितीतरी हठयोगी, सिद्ध, साधक, मुनीजन, देव हठयोगाने इंद्रियनिग्रह करूनही त्यांना आत्मतृप्ती प्राप्त झाली नाही. जे प्रभुनामाचे चिंतन करून सतगुरूच्या सेवेचा मार्ग ग्रहण करतात, त्यांचे तन, मन निर्मल होते व ते अभिमान सोडून सर्व अभेद आहे हे जाणतात. ॥ ६ ॥ प्रभू परमात्म्याच्या कृपेने सत्यनाम प्राप्त होते. त्याचा स्वभाव चांगला होतो व तो प्रभूस शरण जातो. हे प्रभो ! तुझ्यापासूनच जीवाच्या मनात भक्तिभाव उत्पन्न होतो व तो गुरूच्या उपदेशानुसार आचरण करून हरिनामाचा जप जपतो. ॥७॥ त्याच्या मनातील अहंकार, गर्व नष्ट होतो व मन प्रभुनामात तल्लीन होते. पाखंड करून वा असत्य मार्गाने प्रभू परमात्मा प्राप्त करता येत नाही. शब्दगुरूस विमुख होऊन प्रभुधाम प्राप्त होत नाही. नानक सांगतात, हे जीवा ! तू गुरुमार्गी होऊन परमतत्वाचा विचार कर. ॥ ८ ॥ ६ ॥

॥ रामकली महला १ ॥

जिउ आइआ तिउ जावहि बउरे जिउ जनमे तिउ मरणु भइआ ॥
जिउ रस भोग कीए तेता दुखु लागै नामु विसारि भवजलि पइआ ॥ १ ॥
तनु धनु देखत गरबि गइआ ॥
कनिक कामनी सिउ हेतु वधाइहि की नामु विसारहि भरमि गइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
जतु सतु संजमु सीलु न राखिआ प्रेत पिंजर महि कासटु भइआ ॥
पुंनु दानु इसनानु न संजमु साध संगति बिनु बादि जइआ ॥ २ ॥
लालचि लागै नामु बिसारिओ आवत जावत जनमु गइआ ॥
जा जमु धाइ केस गहि मारै सुरति नही मुखि काल गइआ ॥ ३ ॥
अहिनिसि निंदा तांति पराई हिरदै नामु न सरब दइआ ॥
बिनु गुर सबद न गति पति पावहि राम नाम बिनु नरकि गइआ ॥ ४ ॥
खिन महि वेस करहि नटूआ जिउ मेह पाप महि गलतु गइआ ॥
इत उत माइअ देखि पसारी मोह मइआ कै मगनु भइआ ॥ ५ ॥
करहि बिकार विथार घनेरे सुरति सबद बिनु भरमि पइआ ॥
हउमै रोगु महा दुखू लागा गुरमति लेवहु रोगु गइआ ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०६)

शब्दार्थ : **बउरे** – मूर्खा. **तेता** – तितका. **गरबि** – गर्व. **हेतु** – प्रेम. **वधाइआ** – वाढवले. **की** – का, काय. **जत** – यत, इंद्रियनिग्रह. **सीलु** – शील. **पिंजर** – पिंजरा. **कासटु** – काष्ठ, लाकूड. **पुंनु** – पुण्य. **बादि** – व्यर्थ. **लालचि** – लालसा. **धाइ** – धरून. **तांति** – . **गलतु** – . **विथार** – विस्तार.

भावार्थ : हे मूर्खा ! ज्याप्रमाणे तू ह्या जगात आलास त्याचप्रमाणे तुला येथून जावे लागेल. जसा जन्म आहे तसाच मृत्यूही आहे. हे जीवा ! तू जितका ह्या सांसारिक सुखांचा भोग घेतोस. तितके दुःख तुला भोगावे लागते. तू प्रभुनामाला विसरून भवसागरात रममाण झालास. ॥ १ ॥ तुझे हे शरीर व धनसंपदा पाहून तुझ्या मनात अहंकार निर्माण झाला. कनक आणि कामिनी यांच्याविषयी मनात प्रेमभाव वाढला व त्यामुळे तू प्रभुनामास विसरलास व भ्रमात पडून नष्ट झालास. ॥ १ ॥ रहाउ ॥ तुझ्या मनात सत्य, शील, संयम, इंद्रियनिग्रह यापैकी काहीही शिल्लक राहिले नाही. शरीररूपी पिंजऱ्यातील तू प्रेत बनून तुझे हृदय लाकडासारखे कठोर बनले आहे. तू पुण्य, दान स्नान काही केले नाहीस. साधुसंतांची संगतही केली नाहीस व जन्म व्यर्थ घालवलास. ॥ २ ॥ भौतिक सुखाची लालूच लागली व त्यामुळे तुला प्रभुनामाचा विसर पडला व जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहिलास. जेव्हा यम धावत येऊन तुला केसाला धरून तुला मार देईल, तेव्हा तुला मुकाट्याने काळाच्या स्वाधीन व्हावे लागेल. ॥ ३ ॥ तू रात्रंदिवस दुसऱ्याची निंदा करण्यात व त्याच्या मत्सर करण्यात जळत राहतोस. त्यामुळे तुझ्या मनात प्रभूचे नामही येत नाही किंवा इतरांवर दया करावी असेही तुला वाटत नाही. सतगुरूकडून नाम प्राप्त न झाल्याने तुला गत वा पत प्राप्त होत नाही. रामनामविहीन जीव नरकात पडतो. ॥ ४ ॥ असा जीव क्षणाक्षणाला वेश बदलतो व नटाप्रमाणे वेगवेगळ्या भूमिका वठवतो. मोह, पाप ह्यात सडत राहतो. इकडे तिकडे सर्वत्र मायेचा पसारा पाहून तो त्यात मग्न होऊन जातो. ॥ ५ ॥ तू अनेक विकारांच्या मोठ्या विस्तारात मग्न झाल्याने तुझे चित्त प्रभुनामाशिवाय भ्रमात पडले आहे. अहंकाराचा रोग हा महादुःखदायक आहे. गुरूच्या उपदेशाने हा रोग नष्ट होतो. ॥ ६ ॥

सुख संपति कउ आवत देखै साकत मनि अभिमानु भइआ ॥
जिस का इहु तनु धनु सो फिरि लेवै अंतरि सहसा दूखु पइआ ॥ ७ ॥
अंति कालि किछु साथि न चालै जो दीसै सभु तिसहि मइआ ॥
आदि पुरखु अपरंपारु सो प्रभु हरि नामु रिदै ले पारि पइआ ॥ ८ ॥
मूए कउ रोवहि किसहि सुणावहि भै सागर असरालि पइआ ॥
देखि कुटंबु माइआ ग्रिह मंदरु साकतु जंजालि परालि पइआ ॥ ९ ॥
जा आए ता तिनहि पठाए चाले तिनै बुलाइ लइआ ॥
जो किछु करणा सो करि रहिआ बखसणहारै बखसि लइआ ॥ १० ॥
जिनि एहु चाखिआ राम रसाइणु तिन की संगति खोजु भइआ ॥
रिधि सिधि बुधि गिआनु गुरू ते पाइआ मुकति पदारथु सरणि पइआ ॥ ११ ॥
दुखु सुखु गुरमुखि समकरि जाणा हरख सोग ते बिरकतु भइआ ॥

आपु मारि गुरमुखि हरि पाए नानक सहजि समाइ लइआ ॥ १२ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९०६)

शब्दार्थ : **साकत** – शाक्त, दुराचारी. **फिरिलेवै** – परत घेतो, काढून घेतो. **सहसा** – संशय. **सो** – तो. **असराल** – अजगर. **पराल** – नसती कामे. **तिनहि** – त्याने, प्रभूने. **पठाए** – पाठवले. **बखसणहारै** – क्षमाशील. **समकरि** – समान. **बिरकतु** – विरक्त.

भावार्थ : धनाचा लोभी माणूस घरात धनसंपत्ती येताना पाहून आनंदित होतो. ज्या प्रभू परमात्म्याने त्याला हे तन, धन दिले तो ते काढून घेतो तेव्हा मात्र मनात भय व दुःख भोगतो. ॥ ७ ॥ शेवटी काहीही बरोबर येत नाही. जे काही दिसते ती सारी त्या प्रभूचीच माया आहे. तो आदीपुरुष परमात्मा अपार आहे. त्याचे नाम हृदयात धारण केल्याने भवसागर पार होतो. ॥ ८ ॥ मेलेल्या माणसासाठी तू कोणाला रडून दाखवतोस ? हा संसार महाभयंकर अजगरासारखा आहे. तो सगळ्यांना गिळून टाकतो. पण तरीही जीव कुटुंब, धनसंपदा, घरदार पाहून मायेच्या जाळ्यात फसून व्यर्थ नकोत ती कामे करत राहतो. ॥ ९ ॥ जो आला त्याला प्रभूनेच पाठवले. जो गेला त्यास त्यानेच बोलावून घेतले. जे काही केले ते त्यानेच केले. तो क्षमाशील परमात्मा सर्व जीवांना क्षमा करतो. ॥ १० ॥ हे जीवा ! ज्याने राम रसायनाची गोडी चाखली आहे त्याची संगत धर. सतगुरुकडून ऋद्धी, सिद्धी, बुद्धी, ज्ञान प्राप्त होते. गुरूला शरण गेल्याने मुक्ती प्राप्त होते. ॥ ११ ॥ जो गुरुमार्गी चालतो तो सुख–दुःख समान मानतो. हर्ष, शोक आदीपासून विरक्त असतो. नानक सांगतात, गुरुमार्गी चालणारा साधक आपल्या मनातील अहंकार नष्ट करून सहजसमाधीत राहून प्रभू परमात्म्याशी एकरूप होतो. ॥ १२ ॥ ७ ॥

॥ रामकली दखणी महला १ ॥

जतु सतु संजमु साच द्रिड़ाइआ साच सबदि रसि लीणा ॥ १ ॥
मेरा गुरु दइआलु सदा रंगि लीणा ॥
अहिनिसि रहै एक लिव लागी साचे देखि पतीणा ॥ १ ॥ रहाउ ॥
रहै गगन पुरि द्रिसटि समैसरि अनहत सबदि रंगीणा ॥ २ ॥
सतु बंधि कुपीन भरिपुरि लीणा जिहवा रंगि रसीणा ॥ ३ ॥
मिलै गुर साचे जिनि रचु राचे किरतु वीचारि पतीणा ॥ ४ ॥
एक महि सरब सरब महि एका एह सतिगुरि देखि दिखाई ॥ ५ ॥
जिनि कीए खंड मंडल ब्रहमंडा सो प्रभु लखनु न जाई ॥ ६ ॥
दीपक ते दीपकु परगासिआ त्रिभवण जोति दिखाई ॥ ७ ॥
सचै तखति सच महली बैठै निरभउ ताड़ी लाई ॥ ८ ॥
मोहि गइआ बैरागी जोगी घटि घटि किंगुरी वाई ॥ ९ ॥
नानक सरणि प्रभू की छूटे सतिगुर सचु सखाई ॥ १० ॥ ८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०७)

शब्दार्थ : **जतु** – इंद्रियनिग्रह. **साचु** – . **लीणा** – लीन. **पतीणा** – . **गगनपुरि** – दशमद्वार. **रंगिणा** –

रंगला. **कुपीन** – कौपीन, कफनी. **लख** – दृश्यमान. **ताडी** – समाधी. **किंगुरी** – सारंगी, तारवाद्य, वीणा. **वाई** – वाजते. **छुटे** – मुक्त झाला. **सखाई** – सखा, मित्र.

भावार्थ : सत्यरूप प्रभूने इंद्रियनिग्रह, सत्य, संयम हे गुण माझ्या मनात दृढ केले. त्यामुळे मी प्रभुनामरसात लीन झालो. ॥ १ ॥ माझा प्रभू दयाळू आहे. तो मला सदैव त्याच्या रंगात रंगवून टाकतो. मी रात्रंदिवस प्रभुरूपात माझे मन एकाग्र करतो. प्रभू परमात्म्याच्या दर्शनाने माझे मन तृप्त झाले आहे. ॥ १ ॥ तो दशमद्वारी निवास करतो. तो पूर्णपणे समदृष्ट आहे. तो अनाहत ध्वनीत रंगून गेला आहे. ॥ २ ॥ गुरु सत्यरूप कौपीन धारण करून प्रभू परमात्म्यात लीन होऊन राहतो. त्याची जिव्हा सदैव प्रभुनामात रंगून राहते. ॥ ३ ॥ ज्या प्रभू परमात्म्याने ह्या सृष्टीची रचना केली, तो सत्यरूप प्रभू परमात्मा प्राप्त झाल्याने मी माझ्या सत्कर्माचा विचार करून तृप्त झालो आहे. ॥ ४ ॥ त्या एकमेव प्रभू परमात्म्यामध्ये सर्व काही आहे व सर्व गोष्टीत तो एकमेव प्रभू सामावलेला आहे. हे मला सतगुरूने दाखवले आहे. ॥ ५ ॥ ज्या प्रभू परमात्म्याने खंड, मंडल, ब्रह्मांड निर्माण केले तो प्रभू अदृश्य आहे.॥६॥ गुरुरूपी दीपकाने भक्ताच्या हृदयातील दीप प्रज्वलित केला व त्रैलोक्य प्रकाशित करणारी ती प्रभूची ज्योत दाखवली. ॥ ८ ॥ तो निर्भय प्रभू आपल्या सत्यरूप महालात सत्यरूप सिंहासनावर बसून समाधिस्त झाला आहे. ॥ ८ ॥ सर्व योगी, विरागी प्रभू परमात्म्याने मोहित केले आहेत. प्रभूच प्रत्येक जीवाच्या हृदयातील वीणा छेडीत आहे. ॥ ९ ॥ नानक सांगतात, की सतगुरुने सत्य सांगितले आहे की प्रभू परमात्म्यास शरण गेल्याने मुक्ती प्राप्त होते. ॥ १० ॥ ८ ॥

॥ रामकली महला १ ॥

अउहठि हसत मड़ी धरू छाइआ धरणि गगन कल धारी ॥ १ ॥
गुरमुखि केती सबदि उधारी संतहु ॥ १ ॥ रहाउ ॥
ममता मारि हउमै सोखै त्रिभवणि जोति तुमारी ॥ २ ॥
मनसा मारि मनै महि राखै सतिगुर सबदि वीचारी ॥ ३ ॥
सिंङी सुरति अनाहदि वाजै घटि घटि जोति तुमारी ॥ ४ ॥
परपंच बेणु तही मनु राखिआ ब्रहम अगनि परजारी ॥ ५ ॥
पंच ततु मिलि अहिनिसि दीपकु निरमल जोति अपारी ॥ ६ ॥
रवि ससि लउके इहु तनु किंगुरी वाजै सबदु निरारी ॥ ७ ॥
सिव नगरी महि आसणु अउधू अलखु अगंमु अपारी ॥ ८ ॥
काइआ नगरी इहु मनु राजा पंच वसहि वीचारी ॥ ९ ॥
सबदि रवै आसणि घरि राजा अदलु करे गुणकारी ॥ १० ॥
कालु बिकालु कहे कहि बपुरे जीवत मूआ मनु मारी ॥ ११ ॥
ब्रहमा बिसनु महेस इक मूरति आपे करता कारी ॥ १२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०७)

शब्दार्थ : **अउहठि** – हृदयात. **हसत** – स्थिर. **मडी** – शरीर. **छाइआ** – बनवले, घडवले. **कल** – शक्ती. **केती** – कितीतरी. **सबदि** – शब्द, प्रभुनाम. **सोखै** – सुकवणे. **मनसा** – मनीषा. **सिंङी** – शिंग(वाद्य).

सुरति – हृदय, आत्मा. **परपंच** – प्रपंच, संसार, जग. **परजारी** – . **रवि** – सूर्य. **ससि** – चंद्र. **लडके** – भोपळा. **किंगुरी** – वीणा, एकतारी वाद्य. **निदारी** – नाविन्यपूर्ण, निराळी. **अवधु** – विरक्त, योगी, अवधूत. **पंच** – पाच ज्ञानेंद्रिये. **अदलु** – न्याय. **कालु** – मरण. **विकालु** – जन्म.

भावार्थ : शरीर हे घर, हृदय हे हात मानून योगी, आकाश व पृथ्वी सर्वत्र आपली शक्ती धारण करणाऱ्या प्रभू परमात्म्याकडे भिक्षा मागत आहे. ॥ १ ॥ सतगुरूने दाखवलेल्या मार्गाने चालून प्रभुनामाने कित्येक संत उद्धरून गेले. ॥ १ ॥ रहाउ ॥ मनातून ममत्व नष्ट करून अहंकार काढून टाकल्यावर त्रिभुवनात सर्वत्र प्रभू परमात्म्याचा प्रकाश दिसू लागतो. ॥ २ ॥ योगी सतगुरूने दिलेल्या उपदेशाचा विचार करून मनातील आशा-आकांक्षा मनातच मारून टाकतो व मन सतगुरूत लीन करतो. ॥ ३ ॥ हे प्रभो ! प्रत्येक जीवाच्या हृदयात तू अनाहत नादाचे शिंग फुंकत आहेस. प्रत्येक जीवाच्या हृदयात तुझीच ज्योत वास करीत आहे. ॥ ४ ॥ योगी साऱ्या संसारास वेणू समजून त्यात मन गुंतवून आपल्या अंत:करणात ब्रह्मज्ञानरूपी अग्नी प्रज्वलित करतात.॥५॥ ह्या योग्यांनी पंचतत्त्वाचे हे शरीर प्राप्त करून त्यात अपार प्रभू परमात्म्याची ज्योती हृदयरूपी दिव्यात तेवत ठेवली आहे.॥६॥ चंद्र व सूर्य हे एकतारीचे भोपळे आहेत. योग्याचे शरीर हे प्रभुनामाचा ध्वनी निर्माण करणारे एक अनोखे तारवाद्य आहे. ॥ ७ ॥ हे योगी ! तू शिवभूमीचे म्हणजे आपल्या हृदयाचे आसन केले आहेस व त्यावर अलक्ष्य, अगम्य प्रभू परमात्मा आसनस्थ झाला आहे. ॥ ८ ॥ हे शरीर ही नगरी आहे. मन हा त्याचा राजा आहे. व तो आपल्या पंचज्ञानेंद्रियांद्वारे प्रभू परमात्म्याचा विचार करतो. ॥ ९ ॥ मनरूपी राजा हृदयरूपी आसनावर बसून प्रभूनामाचे उच्चारण करून सारासाराचा निवाडा करतो. ॥ १० ॥ ज्याने ह्या संसारातून आपले मन (आध्यात्मिकदृष्ट्या) मारून टाकले आहे, त्यास जन्ममरण आदी काहीही त्रास देऊ शकत नाहीत. ॥ ११ ॥ ब्रह्मा, विष्णू व महेश तो प्रभू परमात्माच आहे. सर्व काही करणारा तो एकमेव प्रभू परमात्माच आहे. ॥ १२ ॥

काइआ सोधि तरै भव सागरु आतम ततु वीचारी ॥ १३ ॥
गुर सेवा ते सदा सुखु पाइआ अंतरि सबदु रविआ गुणकारी ॥ १४ ॥
आपे मेलि लए गुण दाता हउमै त्रिसना मारी ॥ १५ ॥
त्रै गुण मेटे चउथै वरतै एह भगति निरारी ॥ १६ ॥
गुरमुखि जोग सबदि आतमु चीनै हिरदै एकु मुरारी ॥ १७ ॥
मनूआ असथिरु सबदे राता एहा करणी सारी ॥ १८ ॥
बेदु बादु न पाखंडु अउधू गुरमुखि सबदि बीचारी ॥ १९ ॥
गुरमुखि जोगु कमावै अउधू जतु सतु सबदि वीचारी ॥ २० ॥
सबदि मरै मनु मारे अउधू जोग जुगति वीचारी ॥ २१ ॥
माइआ मोहु भवजलु है अवधू सबदि तरै कुल तारी ॥ २२ ॥
सबदि सूर जुग चारे अउधू बाणी भगति वीचारी ॥ २३ ॥
एहु मनु माइआ मोहिआ अउधू निकसै सबदि वीचारी ॥ २४ ॥
आपे बखसे मेलि मिलाए नानक सरणि तुमारी ॥ २५ ॥ ९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०८)

शब्दार्थ : **काइआ** – शरीर. **सोधि** – शुद्ध करणे. **रविआ** – स्मरण. **चउथे** – चतुर्थावस्था, सहजावस्था. **वरतै** – . **निरारी** – निराळी. **मनुआ** – मन. **सारी** – श्रेष्ठ. **बादु** – वादविवाद. **सूर** – शूरवीर. **निकसै** – निघते, वाचते.

भावार्थ : आत्मतत्त्वाचा विचार करून जो आपल्या अंतरातच प्रभू परमात्म्याचा शोध घेतो, तो भवसागर तरून जातो. ॥ १३ ॥ सतगुरूच्या सेवेने सुखाची प्राप्ती होते व सतगुण निर्माण करणाऱ्या प्रभुनामात जीव रंगून जातो. ॥ १४ ॥ तो गुणदाता प्रभू साधकातील अहंकार व मायेची तृष्णा नष्ट करून त्यास आपल्याशी एकरूप करून घेतो. ॥ १५ ॥ ही एक निराळीच भक्ती आहे, की ज्यामुळे, साधक त्रिगुणात्मक मायेच्या पलीकडील चतुर्थावस्थेत, सहजावस्थेत पोहोचतो. ॥ १६ ॥ गुरूमार्गी चालणाऱ्याचा योग म्हणजे प्रभुनामाच्या माध्यमातून आत्मतत्त्वास ओळखणे व हृदयात एकमेव प्रभू परमात्म्यास धारण करणे. ॥ १७ ॥ मन स्थिर करून प्रभुनामात लीन होऊन राहणे हे सर्व कर्मात श्रेष्ठ कर्म आहे. ॥ १८ ॥ हे अवधूत ! जो गुरूमार्गी होऊन प्रभुनामाचे चिंतन करतो त्यास आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी वादविवाद वा पाखंडाची गरज वाटत नाही. ॥ १९ ॥ हे योगी ! गुरूमार्गी होऊन योग प्राप्त कर. प्रभुनामातच इंद्रियनिग्रह व सत्य सामावलेले आहे. ॥ २० ॥ हे अवधूत ! जो प्रभुनामाच्या माध्यमातून मोहमायेतून मुक्त होतो व आपल्या मनातील वासना विकार नष्ट करतो. तोच खरे योगाचे रहस्य जाणतो. ॥ २१ ॥ हे अवधूता ! हा भवसागर मोहमाया आहे. जो प्रभुनामाचे स्मरण करतो तो हा भवसागर पार करतोच एवढ्याचे सर्व कुलही पार होते. ॥ २२ ॥ हे योगी ! जो भक्तिमार्गी होऊन प्रभुनामाचे चिंतन करतो तो प्रभुनामामुळे चारही युगात शूरवीर गणला जातो. ॥ २३ ॥ हे अवधूत ! मोहमायेत मग्न झालेले हे मन प्रभुनामाचे चिंतन केल्याने त्यातून मुक्त होते. प्रभू परमात्मा स्वत: भक्तावर कृपा करतो व त्यास आपल्यात एकरूप करून घेतो. नानक म्हणतात, हे प्रभो ! मी तुला शरण आलो आहे. ॥ २५ ॥ ९ ॥

रामकली महला ३ असटपदीआ

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

सरमै दीआ मुंद्रा कंनी पाइ जोगी खिंथा करि तू दइआ ॥
आवणु जाणु बिभूति लाइ जोगी ता तीनि भवण जिणि लइआ ॥ १ ॥
ऐसी किंगुरी वजाइ जोगी ॥
जितु किंगुरी अनहदु वाजै हरि सिउ रहै लिव लाइ ॥ १ ॥ रहाउ ॥
सतु संतोखु पतु करि झोली जोगी अंम्रित नामु भुगति पाई ॥
धिआन का करि डंउा जोगी सिंङी सुरति वजाई ॥ २ ॥
मनु द्रिडु करि आसणि बैसु जोगी ता तेरी कलपणा जाई ॥
काइआ नगरी महि मंगणि चड़हि जोगी ता नामु पलै पाई ॥ ३ ॥
इतु किंगुरी धिआनु न लागै जोगी ना सचु पलै पाइ ॥
इतु किंगुरी सांति न आवै जोगी अभिमानु न विचहु जाइ ॥ ४ ॥

भउ भाउ दुइ पत लाइ जोगी इहु सरीरु करि डंडी ॥
गुरमुखि होवहि ता तंती वाजै इन बिधि त्रिसना खंडी ॥ ५ ॥
हुकमु बूझै सो जोगी कहीऐ एकस सिउ चितु लाए ॥
सहसा तूटै निरमलु होवै जोग जुगति इव पाए ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०८)

शब्दार्थ : **सरमै** – श्रमाची. **खिंथा** – गोधडी. **जिणि** – जिंकणे. **किंगुरी** – तारवाद्य, वीणा. **पतु** – पात्र. **भुगति** – भोजन. **सुरति** – . **कलपणा** – कल्पना. **चडहि** – . **पलै** – पदरात. **भउ** – भय. **भाउ** – भक्तिभाव, प्रेम. **पत** – भोपळा. **तंती** – तंतू, तार. **सहसा** – शंका.

भावार्थ : हे योगी ! तू कानात 'श्रम'रूपी मुद्रा घाल व 'दया'रूपी घोंगडी पांघर. जन्ममरणाचे रहस्य जाणणे ही विभूती मान. असे केल्याने तू तिन्ही लोकांवर विजय प्राप्त करशील. ॥ १ ॥ अशी वीणा वाजव की त्यातून अनाहत नाद उत्पन्न होईल व चित्त प्रभूशी एकरूप होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ तू सत्य व संतोष यास भोजनपात्र बनव व त्यात प्रभू परमात्म्याच्या अमृतनामाचे भोजन कर. ध्यानरूपी दंडा हाती घे व आपल्या आत्म्याचे शिंग फुंक.॥२॥ हे योगी ! दृढमनरूपी आसनावर बसल्याने तुझ्या मनातील संकल्प– विकल्प नष्ट होतील. ह्या देहरूपी नगरीतच तू प्रभुनामाची भिक्षा माग. तेथेच तुला प्रभुनाम प्राप्त होईल. ॥ ३ ॥ जी वीणा तुझ्या हातात आत्ता आहे त्याने तुला ध्यानही प्राप्त होणार नाही किंवा सत्याचीही प्राप्ती होणार नाही. ह्या वीणेने तुला शांतीही प्राप्त होणार नाही व मनातील अहंकारही नष्ट होणार नाही. ॥ ४ ॥ परमेश्वराबद्दलची आदरयुक्त भीती व त्याच्याविषयीचा भक्तिभाव हे तुझ्या वीणेचे दोन भोपळे कर. हे शरीर हा त्यांना जोडणारा दांडा कर. मग सतगुरुमार्गावर चाल म्हणजे तुझी वीणा वाजू लागेल व त्यातून निघणाऱ्या मधुर नादाने तुझ्या मनातील मोहमायेची तृष्णा नष्ट होईल. ॥ ५ ॥ जो प्रभू परमात्म्याची आज्ञा जाणतो तो खरा योगी. असा योगी प्रभू परमात्म्याच्या ठायी आपले चित्त एकाग्र करतो. त्याच्या मनातील सर्व संशय दूर होतात. मन निर्मळ होते व त्याला योगाचे खरे रहस्य समजते. ॥ ६ ॥

नदरी आवदा सभु किछु बिनसै हरि सेती चतु लाइ ॥
सतिगुर नालि तेरी भावनी लागै ता इह सोझी पाइ ॥ ७ ॥
एहु जोगु न होवै जोगी जि कुटंबु छोडि परभवणु करहि ॥
ग्रिह सरीर महि हरि हरि नामु गुर परसादी अपणा हरि प्रभु लहहि ॥ ८ ॥
इहु जगतु मिटी का पुतला जोगी इसु महि रोगु वडा त्रिसना माइआ ॥
अनेक जतन भेख करे जोगी रोगु न जाइ गवाइआ ॥ ९ ॥
हरि का नामु अउखधु है जोगी जिस नो मंनि वसाए ॥
गुरमुखि होवै सोई बूझै जोग जुगति सो पाए ॥ १० ॥
जोगै का मारगु बिखमु है जोगी जिस नो नदरि करे सो पाए ॥
अंतरि बाहरि एको वेखै विचहु भरमु चुकाए ॥ ११ ॥
विणु वजाई किंगुरी वाजै जोगी सा किंगुरी वजाइ ।

कहै नानकु मुकति होवहि जोगी साचे रहहि समाइ ॥ १२ ॥ १ ॥ १० ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९०८)

शब्दार्थ : **नदरी** – दृष्टीला. **सेती** – सह. **नालि** – सह. **भावनी** – श्रद्धा. **सोझी** – ज्ञान. **परभवणु** – भ्रमण. **लहहि** – प्राप्त कर. **जतन** – यत्न. **अउखधु** – औषध. **बुझै** – जाणतो. **बिखमु** – विषम. **वेखै** – पाहतो. **विचहु** – मधील, अंत:करणातील.

भावार्थ : हे योगी ! ह्या जगात जे जे काही दिसते ते ते नाशवंत आहे. म्हणून तू प्रभू परमात्म्याच्या ठायी आपले चित्त एकाग्र कर. सतगुरूवर तुझी दृढ श्रद्धा असू दे तरच तुला आत्मज्ञान प्राप्त होईल. ॥ ७ ॥ हे योगी ! कुटुंब सोडून रानावनात भ्रमण केल्याने योग प्राप्त होत नाही. ह्या शरीररूपी घरातच प्रभू व प्रभूचे नामही वास करते. गुरुकृपेने तू प्रभू प्राप्त करून घे. ॥ ८ ॥ हे योगी ! हे जग हे मायेचा पुतळा आहे. ह्यामध्ये मायेचा तृष्णारूपी रोग भरलेला आहे. नाना यत्न, नाना वेश केल्याने हा रोग नष्ट होत नाही. ॥ ९ ॥ हे योगी ! ह्या रोगावर प्रभुनाम हेच औषध आहे. म्हणून तू आपल्या चित्तात प्रभुनाम दृढ कर. जो गुरुमार्गी चालतो त्यास हे ज्ञान प्राप्त होते. त्यासच योगाचे रहस्य प्राप्त होते. ॥ १० ॥ योगमार्ग महाकठीण आहे. ज्याच्यावर प्रभूची कृपा होते त्यास तो प्राप्त होतो. त्याच्या अंत:करणातील भ्रम नष्ट होतात व त्यास अंतर्बाह्य सर्वत्र प्रभू परमात्माच दिसू लागतो.॥११॥ हे योगी ! तू अशी वीणा वाजव की जी न वाजवताही वाजेल. नानक सांगतात, असा योगी मुक्ती प्राप्त करतो व सत्यरूप परमात्म्यात सामावून जातो. ॥ १२ ॥ १ ॥ १० ॥

॥ रामकली महला ३ ॥

भगति खजाना गुरमुखि जाता सतिगुरि बूझि बुझाई ॥ १ ॥
संतहु गुरमुखि देइ चडिआई ॥ १ ॥ रहाउ ॥
सचि रहहु सदा सहजु सुखु उपजै कामु क्रोधु विचहु जाई ॥ २ ॥
आपु छोडि नाम लिव लागी ममता सबदि जलाई ॥ ३ ॥
जिस ते उपजै तिस ते बिनसै अंते नामु सखाई ॥ ४ ॥
सदा हजूरि दूरि नह देखहु रचना जिनि रचाई ॥ ५ ॥
सचा सबदु रवै घट अंतरि सचे सिउ लिव लाई ॥ ६ ॥
सतसंगति महि नामु निरमोलकु वडे भागि पाइआ जाई ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०९)

शब्दार्थ : **जाता** – जाणले. **हजूरि** – समक्ष, प्रत्यक्ष. **रवै** – रमाण. **निरमोलकु** – अमूल्य.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने भक्तिरूपी खजिना प्राप्त होतो. सतगुरूकडूनच त्याला ज्ञान प्राप्त होते. ॥ १ ॥ हे संतजनहो ! जो गुरुमार्गी चालतो. त्यास प्रभू महती प्राप्त करून देतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ जो सत्यमार्गावर चालतो त्यास सहजसमाधीचे सुख प्राप्त होते. त्यांच्या अंतरातील काम, क्रोध आदी विकार नष्ट होतात. ॥ २ ॥ हे योगी ! अहंकार सोड. प्रभुनामाच्या साहाय्याने ममत्वभावना जाळून टाक. व प्रभुनामात आपले चित्त एकाग्र कर. ॥ ३ ॥ ज्या प्रभू परमात्म्याने सृष्टी उत्पन्न केली तोच ती नष्टही करतो. शेवटी

प्रभूनाम सहायक होते. ॥ ४ ॥ हे योगी ! तो सृष्टीची रचना करणारा प्रभू परमात्मा प्रत्यक्ष तुझ्याजवळच आहे. तो दूर आहे असे समजू नकोस. ॥ ५ ॥ सत्यरूप प्रभू परमात्म्याशी चित्त एकाग्र केल्याने सत्यरूप प्रभूचा नामध्वनी अंत:करणात निनादू लागतो. ॥ ६ ॥ संतसंगतीमध्ये अमूल्य असे प्रभुनाम प्राप्त होते. ज्याच्या भाग्यात असेल त्यासच ते प्राप्त होते.॥ ७ ॥

भरमि न भूलहु सतिगुरु सेवहु मनु राखहु इक ठाई ॥ ८ ॥
बिनु नावै सभ भूली फिरदी बिरथा जनमु गवाई ॥ ९ ॥
जोगी जुगति गवाई हंढै पाखंडि जोगुन पाई ॥ १० ॥
सिव नगरी महि आसणि बैसै गुर सबदी जोगु पाई ॥ ११ ॥
धातुर बाजी सबदि निवारे नामु वसै मनि आई ॥ १२ ॥
एहु सरीरु सरवरु है संतहु इसनानु करे लिव लाई ॥ १३ ॥
नामि इसनानु करहि से जन निरमल सबदे मैलु गवाई ॥ १४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०९)

शब्दार्थ : **फिरदी** – फिरले. **हंढै** – भटकत फिरतो. **धातुरबाजी** – मायेचा खेळ. **सरीरु** – शरीर. **सरवरु** – सरोवर.

भावार्थ : हे योगी ! तू भ्रमात भटकू नकोस. सतगुरूची सेवा कर व मन एकठायी (प्रभूच्या ठायी) स्थिर कर. प्रभुनामाशिवाय सारे जीव भ्रमात भटकत आपला मानवजन्म वाया घालवत आहेत. ॥ ९ ॥ हे योगी ! तू रानावनात भटकण्यात आयुष्य घालवलेस. तुला योगाचे रहस्यच कळले नाही. पाखंड करून योग साध्य होत नाही. ॥ ११ ॥ मायेचे खेळ शब्दब्रह्माने बंद होतात व प्रभुनाम मनात वास करते. ॥ १२ ॥ शरीर हे एक सुंदर सरोवर आहे. प्रभूनामात लीन होऊन त्यात स्नान कर. ॥ १३ ॥ जे प्रभुसेवक प्रभुनामात स्नान करतात ते शब्दाच्या माध्यमातून मनाचा मळ नष्ट करून निर्मळ होतात. ॥ १४ ॥

त्रैगुण अचेत नामु चेतहि नाही बिनु नावै बिनसि जाई ॥ १५ ॥
ब्रहमा बिसनु महेसु त्रै मूरति त्रिगुणि भरमि भुलाई ॥ १६ ॥
गुरपरसादी त्रिकुटी छूटै चउथै पदि लिव लाई ॥ १७ ॥
पंडित पड़हि पड़ि वादु वखाणहि तिंना बूझ न पाई ॥ १८ ॥
बिखिआ माते भरमि भुलाए उपदेसु कहहि किसु भाई ॥ १९ ॥
भगत जना की ऊतम बाणी जुगि जुगि रही समाई ॥ २० ॥
बाणी लागै सो गति पाए सबदे सचि समाई ॥ २१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९०९)

शब्दार्थ : **अचेत** – अज्ञानी. **त्रकुटीने** – सत्त्व, रज, तम हे त्रिकूट. **तिना** – त्यांनी. **चउथै** – चतुर्थावस्था, सहजावस्था.

भावार्थ : त्रिगुणात फसलेला अडाणी जीव प्रभुनामाचे स्मरण करत नाही. असा हा नामविहीन जीव विनाश पावतो. ॥ १५ ॥ ब्रह्मा, विष्णू, महेश ह्या त्रिमूर्तीही त्रिगुणाच्या भ्रमास भुलल्या. ॥ १६ ॥ गुरुकृपेने ह्या त्रिगुणांच्या

त्रिपुटीतून सुटका होते व जीव चतुर्थावस्थेत म्हणजे सहजसमाधीत लीन होतो. ॥ १७ ॥ पंडित लोक धर्मग्रंथ वाचतात. त्यावर वादविवाद करतात, व्याख्या करतात पण त्यांनाही प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होत नाही.॥ १८॥ जे लोक विषयविकाराने मत्त होऊन, मोहमायेच्या भ्रमात प्रभू परमात्म्यास विसरले त्यांना कोण काय उपदेश करणार ? ॥ १९ ॥ भक्तजनांची वाणी उत्तम असते व ती प्रत्येक युगात प्रगट होत असते.॥ २०॥ जो ह्या वाणीशी एकरूप होतो त्यास परमगती प्राप्त होते. असा भक्त अंती सत्यात सामावून जातो.॥ २१॥

काइआ नगरी सबदे खोजे नामु नवं निधि पाई ॥ २२ ॥
मनसा मारि मनु सहजि समाणा बिनु रसना उसतति कराई ॥ २३ ॥
लोइण देखि रहे बिसमादी चितु अदिसटि लगाई ॥ २४ ॥
अदिसटु सदा रहै निरालमु जोती जोति मिलाई ॥ २५ ॥
हउ गुरु सालाही सदा आपणा जिनि साची बूझ बुझाई ॥ २६ ॥
नानकु एक कहै बेनंती नावहु गति पति पाई ॥ २७ ॥ २ ॥ ११ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९१०)

शब्दार्थ : **खोजे** – शोधा. **रसना** – जीभ. **उसतति** – स्तुती. **लोइण** – लोचन, नेत्र. **अदिसटि** – अदृष्य परमात्मा. **सालाही** – स्तुती करणे. **जिनि** – ज्याने. **बेनंती** – विनंती. **पति** – प्रतिष्ठा, पत. **निरालमु** – निरालंब, अलिप्त.

भावार्थ : जो आपल्याच शरीरात शब्दाचा शोध घेतो त्यास प्रभुनामरूपी नवनिधी प्राप्त होतात.॥ २२॥ असा जीव आपल्या मनाच्या सर्व आशा नष्ट करून सहजसमाधीत लीन होतो. तो तोंडावाटे शब्दही न उच्चारता प्रभू परमात्म्याची स्तुती करतो. ॥ २३ ॥ अशा भक्ताचे नेत्र आश्चर्यचकित होऊन प्रभुरूप पाहतात व त्या अदृश्य प्रभू परमात्म्याचे ठायी आपले चित्त एकाग्र करतात. ॥ तो प्रभू परमात्मा अदृश्य आहे, सदैव अलिप्त राहणारा आहे. भक्त आपली आत्मज्योत प्रभूच्या परमज्योतीत विलीन करतो. ॥ २५ ॥ ज्या माझ्या सतगुरूने मला सत्यरूप प्रभूचे ज्ञान दिले, त्या माझ्या सतगुरूची मी सदैव स्तुती करतो. ॥ २६ ॥ नानक विनंतीपूर्वक सांगतात, की प्रभुनामामुळे जीवास मुक्ती प्राप्त होते व इहलोकी प्रतिष्ठा प्राप्त होते. ॥ २७ ॥ २ ॥ १२ ॥

॥ रामकली महला ३ ॥

हरि की पूजा दुलंभ है संतहु कहणा कछू न जाई ॥ १ ॥
संतहु गुरमुखि पूरा पाई ॥ नामो पूज कराई ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि बिनु सभु किछु मैला संतहु किआ हउ पूज चड़ाई ॥ २ ॥
हरि साचे भावै सा पूजा होवै भाणा मनि वसाई ॥ ३ ॥
पूजा करै सभु लोकु संतहु मनमुखि थाइ न पाई ॥ ४ ॥
सबदि मरै मनु निरमलु संतहु एह पुजा थाइ पाई ॥ ५ ॥
पवित पावन से जन साचे एक सबदि लिव लाई ॥ ६ ॥

बिनु नावै होर पूज न होवी भरमि भुली लोकाई ॥ ७ ॥
गुरमुखि आपु पछाणै संतहु राम नामि लिव लाई ॥ ८ ॥
आपे निरमलु पूज कराए गुर सबदी थाइ पाई ॥ ९ ॥
पूजा करहि परु बिधि नही जाणहि दूजै भाइ मलु लाई ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१०)

शब्दार्थ : **किआ** – काय. **सा** – तीच. **भाणा** – आज्ञा. **एह** – ही. **थाइ** – स्थान. **होर** – अन्य. **लोकाई** – सर्व सृष्टी. **आपु** – स्वत:. **परु** – परंतु. **दुजैभाइ** – द्वैतभाव.

भावार्थ : हे संतजनहो ! प्रभूची पूजा अत्यंत दुर्लभ आहे. त्याविषयी काही सांगणेही अशक्य आहे. ॥ १ ॥ हे संतजनहो ! गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करूनच प्रभू परमात्मा प्राप्त करता येतो. प्रभुनामानेच प्रभूची पूजा करता येते. ॥ १ ॥ रहाउ ॥ संतजनहो ! प्रभुचरणी पूजा म्हणून मी काय अर्पण करू ? कारण एक प्रभू सोडून सारी सृष्टी मलिन आहे. ॥ २ ॥ प्रभूला सत्य आवडते मनात त्याची आज्ञा दृढपणे धारण करणे हीच त्याची खरी पूजा होय. ॥ ३ ॥ संतजनहो ! सर्व लोक पूजा करतात, पण स्वेच्छाचारी लोकांच्या अशा पूजेचा प्रभू स्वीकार करत नाही. ॥ ४ ॥ संतजनहो ! प्रभुनामाने मनातील सर्व आशा-आकांक्षा, संकल्प-विकल्प नष्ट करून मन निर्मल करणे हीच खरी पूजा. अशा पूजेचा प्रभू परमात्मा स्वीकार करतो. ॥ ५ ॥ जे प्रभुसेवक त्या एकमेव सत्यरूप प्रभुनामात आपले चित्त एकाग्र करतात ते परम पवित्र होतात. ॥ ६ ॥ प्रभुनामाचे स्मरण हीच खरी पूजा. अन्य कोणतीही पूजा ही पूजाच नव्हे. सर्व लोक भ्रमाने भुलले आहेत. ॥ ७ ॥ हे संतजनहो ! गुरूमार्गी चालून आपले आत्मस्वरूप जाणून घ्या व रामनामात आपले चित्त एकाग्र करा. ॥ ८ ॥ प्रभू परमात्मा स्वत: भक्तांकडून पूजा करवून घेतो. सतगुरूकडून शब्दाची (प्रभुनामाची) प्राप्ती झाल्यावर प्रभू दरबारात स्थान प्राप्त होते. ॥ ९ ॥ लोक पूजा तर करतात पण त्याचा खरा विधी, त्याचे खरे मर्म जाणत नाहीत. त्यामुळे द्वैतभावात फसून आपले मन मलिन करतात. ॥ १० ॥

गुरमुखि होवै सु पूजा जाणै भाणा मनि वसाई ॥ ११ ॥
भाणे ते सभि सुख पावै संतहु अंते नामु सखाई ॥ १२ ॥
अपणा आपु न पछाणहि संतहु कूड़ि करहि वडिआई ॥ १३ ॥
पाखंडी कीनै जमु नही छोडै लै जासी पति गवाई ॥ १४ ॥
जिन अंतरि सबदु आपु पछाणहि गति मिति तिन ही पाई ॥ १५ ॥
एहु मनूआ सुंन समाधि लगावै जोती जोति मिलाई ॥ १६ ॥
सुणि सुणि गुरमुखि नामु वखाणहि सत संगति मेलाई ॥ १७ ॥
गुरमुखि गावै आपु गवावै दरि साचै सेभा पाई ॥ १८ ॥
साची बाणी सचु वखाणै सचि नामि लिव लाई ॥ १९ ॥
भै भंजनु अति पाप निखंजनु मेरा प्रभु अंति सखाई ॥ २० ॥
सभु किछु आपे आपि वरतै नानक नामि वडिआई ॥ २१ ॥ ३ ॥ १२ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९१०)

शब्दार्थ : **सु** – तो. **अंते** – अंत:काळी. **कूडि** – असत्य, खोटी. **वडिआई** – बढाई. **कीने** – केल्याने. **सूंन** – शून्य. **निखजनु** – नष्ट करणे. **वरतै** – व्याप्त.

भावार्थ : जो गुरुमार्गी चालतो तोच पूजेचा खरा अर्थ जाणतो व परमेश्वरी आज्ञा शिरोधार्य मानतो.॥११॥ ईश्वरीय आज्ञेप्रमाणे आचरण करणाऱ्यास सर्व सुखाची प्राप्ती होते व अंत:काळी प्रभुनाम त्याचे सहायक होते.॥१२॥ हे संतजनहो ! जो स्वत:चे आत्मस्वरूप जाणत नाही तो स्वत:चा खोटाच बडेजाव मिरवत असतो. ॥ १३ ॥ पाखंड करणाऱ्यास यम सोडत नाही. असा जीव आपली प्रतिष्ठा गमावून ह्या जगातून जातो. ॥ १४ ॥ जो आपल्या अंतरात प्रभुनामाने स्वत:चे आत्मस्वरूप ओळखतो त्यास परमगती प्राप्त होते.॥१५॥ असा भक्त निर्विकल्प समाधीत मग्न होऊन आपली आत्मज्योत प्रभूच्या परमज्योतीत विलीन करतो. ॥ १६ ॥ गुरुमार्गी होऊन जो प्रभू परमात्म्याचे गुण गातो त्याचा अहंकार नष्ट होतो व तो सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या दरबारात शोभा प्राप्त करतो. ॥ १८ ॥ अशा प्रभुभक्ताची वाणी सत्य असते. त्याने केलेले प्रभू परमात्म्याचे वर्णनही सत्य असते व तो सत्यरूप प्रभुनामात लीन होतो. ॥ १९ ॥ माझा प्रभू परमात्मा भय नष्ट करणारा, महापाप निखंदून टाकणारा आहे. तोच अंतकाळी सहायक होतो. ॥ २० ॥ सर्व काही प्रभू परमात्माच आहे. तो सर्वव्याप्त आहे. नानक सांगतात, प्रभुनामाची ही महती आहे. ॥ २१ ॥ ३ ॥ १२ ॥

॥ रामकली महला ३ ॥

हम कुचल कुचील अति अभिमानी मिलि सबदे मैलु उतारी ॥ १ ॥
संतहु गुरमुखि नामि निसतारी ॥
सचा नामु वसिआ घट अंतरि करतै आपि सवारी ॥ १ ॥ रहाउ ॥
पारस परसे फिरि पारसु होए हरि जीउ अपणी किरपा धारी ॥ २ ॥
इकि भेख करहि फिरहि अभिमानी तिन जूऐ बाजी हारी ॥ ३ ॥
इकि अनदिनु भगति करहि दिनु राती राम नामु उरि धारी ॥ ४ ॥
अनदिनु राते सहजे माते सहजे हउमै मारी ॥ ५ ॥
भै बिनु भगति न होई कबही भै भाइ भगति सवारी ॥ ६ ॥
माइआ मोहु सबदि जलाइआ गिआनि तति बीचारी ॥ ७ ॥
आपे आपि कराए करता आपे बखसि भंडारी ॥ ८ ॥
तिस किआ गुणा का अंतु न पाइआ हउ गावा सबदि वीचारी ॥ ९ ॥
हरि जीउ जपी हरि जीउ सालाही विचहु आपु निवारी ॥ १० ॥
नामु पदारथु गुर ते पाइआ अखुट सचे भंडारी ॥ ११ ॥
अपणिआ भगता नो आपे तुठा अपणी किरपा करि कल धारी ॥ १२ ॥
तिन साचे नाम की सदा भूख लागी गावनि सबदि वीचारी ॥ १३ ॥
जीउ पिंडु सभु किछु है तिस का आखणु बिखमु बीचारी ॥ १४ ॥
सबदि लगे सेई जन निसतरे भउजलु पारि उतारी ॥ १५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१०)

शब्दार्थ : **कुचल** – दुराचारी. **कुचील** – वाईट, हीन. **करतै** – कर्त्याने, प्रभूने. **पारस** – परीस. **परसे** – स्पर्शाने. **सहजे** – सहजावस्थेत. **तूठा** – संतुष्ट, प्रसन्न. **कल** – शक्ती, बल. **बिखमु** – कठीण. **निसतरे** – पार झाले.

भावार्थ : आम्ही दुराचारी आहोत, दुष्ट आहोत, अति अहंकारी आहोत पण आम्हास प्रभुनाम प्राप्त झाल्याने आमची सारी मलिनता नष्ट झाली. ॥ १ ॥ हे संतजनहो ! गुरुमार्गी चालून प्रभुनामाच्या साहाय्याने भवसागर पार करता येतो. प्रभू परमात्म्याचे नाम हृदयात दृढ केल्यास प्रभू परमात्मा स्वत: भक्तास सावरून नेतो. ॥ १ ॥रहाउ॥ सतगुरूच्या परीसस्पर्शाने भक्ताचे रूपांतर परिसात होते. प्रभू परमात्मा स्वत: जीवावर कृपा करतो. ॥ २ ॥ कोणी संन्याशाचा वेश धारण करून रानावनात हिंडतात पण अहंकाराने ते जीवनाच्या खेळीत पराभूत होतात.॥३॥ काही लोक सदैव प्रभू परमात्म्याची भक्ती करतात. ते रात्रंदिवस प्रभुनाम आपल्या हृदयात धारण करतात. ॥४॥ ते रात्रंदिवस समाधीत मग्न होऊन राहतात. त्यामुळे सहजच त्यांचा अहंकार नष्ट होतो. ॥ ५ ॥ प्रभू परमात्म्याविषयी आदरयुक्त भीती असल्याशिवाय मनात भक्तिभाव निर्माण होत नाही. ही भीतीच मनात भक्तिभाव दृढ करते.॥६॥ असा जीव, प्रभुनामाच्या साहाय्याने मनातील मोहमाया मारून, आत्मज्ञान व परमतत्त्वाचा विचार करतो. ॥ ७ ॥ कर्ता प्रभू परमात्माच सर्व काही करतो. तोच जीवाला भक्तीचे भांडार प्रदान करतो. ॥ ८ ॥ त्या प्रभू परमात्म्याच्या गुणांचा पारावार कोणासही लागत नाही. मी केवळ प्रभुनामाच्या साहाय्याने त्याचे गुण गातो. ॥ ९ ॥ मनातील अहंकार नष्ट करूनच जीवाने हरिनामाचा जप करावा, हरीची स्तुती करावी. ॥ १० ॥ मी सतगुरूकडून हरिनाम प्राप्त केले. सत्यरूप प्रभूचे नामभांडार अक्षुण्य आहे. ॥ ११ ॥ प्रभू परमात्मा आपल्या भक्तांवर प्रसन्न होतो. त्याने जीवाच्या कल्याणार्थच शक्ती धारण केली आहे. ॥ १२ ॥ अशा भक्तास सत्यरूप प्रभुनामाची सदैव भूक लागलेली असते. तो सदैव प्रभुनामाचे चिंतन करून प्रभूचे गुण गातो.॥१३॥ हे शरीर, हा आत्मा सारे काही त्या प्रभूचेच आहे. त्याचे वर्णन करणेही कठीण आहे. ॥ १४ ॥ जे प्रभुसेवक प्रभुनामात लीन झाले ते भवसागर तरून पार गेले.॥ १५ ॥

बिनु हरि साचे को पारि न पावै बूझै को वीचारी ॥ १६ ॥
जो धुरि लिखिआ सोई पाइआ मिलि हरि सबदि सवारी ॥ १७ ॥
काइआ कंचनु सबदे राती साचै नाइ पिआरी ॥ १८ ॥
काइआ अंम्रिति रही भरपूरे पाईऐ सबदि वीचारी ॥ १९ ॥
जो प्रभ खोजहि सेई पावहि होरि फूटि मूए अहंकारी ॥ २० ॥
बादी बिनसहि सेवक सेवहि गुर कै हेति पिआरी ॥ २१ ॥
सो जोगी ततु गिआनु बीचारे हउमै त्रिसना मारी ॥ २२ ॥
सतिगुरू दाता तिनै पछाता जिस नो क्रिपा तुमारी ॥ २३ ॥
सतिगुरु न सेवहि माइआ लागे डूबि मूए अहंकारी ॥ २४ ॥
जिचरु अंदरि सासु तिचरु सेवा कीचै जाइ मिलीऐ राम मुरारी ॥ २५ ॥
अनदिनु जागत रहै दिनु राती अपने प्रिइ प्रीति पिआरी ॥ २६ ॥
तनु मनु वारी वारि घुमाई अपने गुर विटहु बलिहारी ॥ २७ ॥

माइआ मोहु बिनासि जाइगा उबरे सबदि वीचारी ॥ २८ ॥
आपि जगाए सेई जागे गुर कै सबदि वीचारी ॥ २९ ॥
नानक सेई मूए जि नामु न चतहि भगत जीवे वीचारी ॥ ३० ॥ ४ ॥ १३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९११)

शब्दार्थ : **धुरि** – प्राक्तन. **नाइ** – नाम. **होरि** – अन्य. **फूअि** – . **बादी** – वादविवाद. **बिनसहि** – नाश पावतात. **हेति** – प्रेम. **तिनै** – त्याने. **डूबि** – बुडतात. **जिचरु** – जोपर्यंत. **तिचरु** – तोपर्यंत. **वारी** – ओवाळून टाकणे, समर्पित करणे.

भावार्थ : त्या सत्यरूप प्रभूच्या कृपेशिवाय कोणीही हा भवसागर पार करू शकत नाही. कोणी विरळाच हे रहस्य जाणतो. ॥ १६ ॥ ज्याच्या प्रारब्धात जे लिहिले असेल तेच त्यास प्राप्त होते. हे जीवा ! तू प्रभुनामाच्या साहाय्याने हा भवसागर पार करून प्रभू परमात्म्याशी एकरूप हो. ॥ १७ ॥ प्रभुनामात रंगून गेलेला जीव सोन्यासारखा सुंदर व तेजस्वी होतो. त्याच्या मनात प्रभुनामाविषयी प्रेम असते. ॥ १८ ॥ शब्दब्रह्माचा विचार केल्याने हे शरीर प्रभुनामामृताने पुरेपूर भरून जाते. ॥ १९ ॥ जो प्रभू परमात्म्याचा आपल्या अंतरात शोध घेतो त्यास तो प्राप्त होतो. अन्य लोक अहंकारातच मरतात. ॥ २० ॥ जे वादविवाद घालत बसतात ते नष्ट होतात. सेवक प्रभूची सेवा करून प्रेमाने त्यास प्राप्त करतात. ॥ २१ ॥ खरा योगी तोच जो आपल्या मनातील अहंकाराचा व मोहमायेच्या तृष्णेचा नाश करून अमरतत्त्वाचा विचार करतो. ॥ २२ ॥ हे प्रभू ! ज्याच्यावर तुझी कृपा होते तो दानी सतगुरूस ओळखतो. ॥ २३ ॥ जो सतगुरूची सेवा करत नाही तो अहंकारी मोहमायेत बुडून मरतो. ॥१४॥ हे जीवा ! जोपर्यंत तुझा श्वासोच्छवास चालू आहे तोपर्यंत सतगुरूची सेवा कर. त्यामुळे तुला प्रभू परमात्मा प्राप्त होईल. ॥ २५ ॥ असा जीव रात्रंदिवस प्रभुप्रेमात जागृत राहतो. ॥ २६ ॥ तो आपले तन– मन सारे प्रभुचरणी अर्पण करतो व सदैव आपल्या गुरुचरणी स्वत:स समर्पित करतो. ॥ २७ ॥ त्याचे माया, मोह नष्ट होतात व शब्दाच्या (प्रभुनामाच्या) साहाय्याने तो भवसागरातून उद्धरून जातो. ॥ २८ ॥ ज्यास प्रभू परमात्मा जागृत करतो तोच जागृत होतो व सतगुरूकडून प्राप्त झालेल्या प्रभूनामाचे चिंतन करतो. ॥ २९ ॥ नानक सांगतात, जे प्रभुनामाचे चिंतन करत नाहीत ते मृत होत. प्रभूचे भक्त प्रभुनामाचे चिंतन करून जीवन जगतात.॥३०॥४॥१३॥

॥ रामकली महला ३ ॥

नामु खजाना गुर ते पाइआ त्रिपति रहे आघाई ॥ १ ॥
संतहु गुरमुखि मुकति गति पाई ॥
एकु नामु वसिआ घट अंतरि पूरे की वडिआई ॥ १ ॥रहाउ ॥
आपे करता आपे भुगता देदा रिजकु सबाई ॥ २ ॥
जो किछु करणा सो करि रहिआ अवरु न करणा जाई ॥ ३ ॥
आपे साजे स्रिसटि उपाए सिरि सिरि धंधै लाई ॥ ४ ॥
तिसहि सरेवहु ता सुखु पावहु सतिगुरि मेलि मिलाई ॥ ५ ॥
आपणा आपु आपि उपाए अलखु न लखणा जाई ॥ ६ ॥

आपे मारि जीवाले आपे तिस नो तिलु न तमाई ॥ ७ ॥
इक दाते इकि मंगते कीते आपे भगति कराई ॥ ८ ॥
से वडभागी जिनी एको जाता सचे रहे समाई ॥ ९ ॥
आपि सरूपु सिआणा आपे कीमति कहणु न जाई ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९११)

शब्दार्थ : **त्रिपति** – तृप्ती. **आघाई** – पूर्णत: तृप्त. **करता** – करणारा. **भुगता** – भोगणारा. **देदा** – देतो. **रिजकु** – अन्न पाणी. **सबाई** – सर्वांना. **साजे** – उत्पन्न केले. **सरेवहु** – सेवा कर. **जीवाले** – जिवंत करतो. **तमाई** – लालसा. **जाता** – जाणले. **सरूपु** – सुंदर. **सआणा** – शहाणा.

भावार्थ : मला सतगुरूकडून प्रभुनामाचा खजिना प्राप्त झाला. त्यामुळे मी पूर्णपणे तृप्त झालो.॥१॥ हे संतजनहो ! गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्यानेच मुक्ती प्राप्त होते. परमगती प्राप्त होते. सतगुरूमुळेच जीवाच्या अंत:करणात त्या एकमेव प्रभू परमात्म्याचा वास होतो. हीच तर सतगुरूची महती आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा स्वत: सर्व काही निर्माण करतो. तोच त्या सर्वांचा भोग घेतो. तो सर्व जीवांचे पालनपोषण करतो.॥२॥ त्यास जे करावेसे वाटते ते तो करतो. अन्य कोणी काही करू शकत नाही. ॥ ३ ॥ त्यानेच जीवांची उत्पत्ती केली. त्यानेच सृष्टी उत्पन्न केली. प्रत्येक जीवास त्याचे कार्य नेमून दिले. ॥ ४ ॥ जो प्रभू परमात्म्याची सेवा करतो त्यास सुख प्राप्त होते. सतगुरू त्याचे प्रभूशी मिलन घडवतो. ॥ ५ ॥ त्या प्रभू परमात्म्याने स्वत:च स्वत:ला उत्पन्न केले. तो अलक्ष्य आहे. त्यास कोणीही पाहू शकत नाही. ॥ ६ ॥ प्रभू स्वत:च जीवाला मरण देतो व तोच त्यास परत जन्मालाही घालतो. पण त्यास तिळमात्रही कसलीही लालसा नाही. ॥ ७ ॥ त्याने कोणास दाता केले तर कोणास याचक केले, तर कोणास त्याने भक्तिमार्गास लावले. ॥ ८ ॥ ते महाभाग्यवान, ज्यांनी प्रभुरूपास जाणले. ते सत्यरूप प्रभूत सामावून गेले. ॥ ९ ॥ हे प्रभू ! तू सुंदर आहेस. सुजाण आहेस. तुझे खरे मूल्य कोणीही करू शकत नाही.॥१०॥

आपे दुखु सुखु पाए अंतरि आपे भरमि भुलाई ॥ ११ ॥
वडा दाता गुरमुखि जाता निगुरी अंध फिरै लोकाई ॥ १२ ॥
जिनी चाखिआ तिना सादु आइआ सतिगुरि बूझ बुझाई ॥ १३ ॥
इकना नावहु आपि भुलाए इकना गुरमुखि देइ बुझाई ॥ १४ ॥
सदा सदा सालाहिहु संतहु तिस दी वडी वडिआई ॥ १५ ॥
तिसु बिनु अवरु न कोई राजा करि तपावसु बणत बणाई ॥ १६ ॥
निआउ तिसै का है सद साचा विरले हुकमु मनाई ॥ १७ ॥
तिस नो प्राणी सदा धिआवहु जिनि गुरमुखि बणत बणाई ॥ १८ ॥
सतिगुर भेटै सो जनु सीझै जिसु हिरदै नामु वसाई ॥ १९ ॥
सचा आपि सदा है साचा बाणी सबदि सुणाई ॥ २० ॥
नानक सुणि वेखि रहिआ विसमादु मेरा प्रभु रविआ स्रब थाई ॥ २१ ॥ ५ ॥ १४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९११)

शब्दार्थ : **जाता** – जाणतो. **निगुरी** – गुरुविना. **नावहु** – प्रभुनामाने. **सालाहिहु** – स्तुती करा. **तपावसु** – न्यायपूर्वक. **बाणत बानाई** – सृष्टीची रचना केली. **निआउ** – न्याय. **सीझै** – सफल होतो. **सब** – सर्व.

भावार्थ : तो प्रभू परमात्मा जीवास भ्रमात भुलवून सुख– दु:ख भोगावयास लावतो. ॥ ११ ॥ गुरूमार्गी चालून कोणी विरळा जीव त्या महान दात्या प्रभू परमात्म्यास जाणतो. ज्या लोकांना सतगुरू प्राप्त होत नाही. ते अज्ञान, अंधकारात भटकत राहतात. ॥ १२ ॥ ज्यांना सतगुरूने प्रभू परमात्म्याचे ज्ञान दिले आहे व ज्यांनी प्रभुनामामृत चाखले आहे तेच त्याचा स्वाद जाणतात. ॥ १३ ॥ काही लोकांना तो प्रभू परमात्मा, प्रभुनामापासून वंचित ठेवतो तर कोणाला सतगुरूकडून प्रभुनामाचे ज्ञान देतो. ॥ १४ ॥ हे संतजनहो ! त्या प्रभू परमात्म्याची सदैव स्तुती करा. त्याचे माहात्म्य फार थोर आहे. ॥ १५ ॥ तो साऱ्या सृष्टीचा राजा आहे. त्याच्याशिवाय ह्या जगाचा अन्य कोणीही शास्ता नाही. त्याने फार न्यायपूर्वक ह्या सृष्टीची रचना केली आहे. ॥ १६ ॥ त्याचा न्याय सदैव सत्य आहे. पण कोणा विरळ्या जीवासच तो आपली आज्ञा मानण्याची बुद्धी देतो. ॥ १७ ॥ हे जीवांनो ! त्या प्रभू परमात्म्याचे सदैव ध्यान करा. त्यानेच जीवाला गुरुद्वारा त्याची आज्ञा मानण्याची रीत निर्माण केली. ॥ १८ ॥ ज्यास सतगुरूची प्राप्ती होते त्याच्या मनात तो प्रभुनाम वसवतो. त्यामुळे त्याचे जीवन सफल होते. ॥ १९ ॥ तो प्रभू परमात्मा स्वत: सत्य आहे. तो सदैव सत्यच असतो. त्याची वाणीही सत्य आहे. ती वाणी शब्दाच्या (प्रभुनामाच्या) माध्यमातून ऐकू येते. ॥ २० ॥ नानक म्हणतात, हे सारे ऐकून व पाहून मी आश्चर्यचकित झालो आहे. माझा प्रभू सर्वव्याप्त आहे. ॥ २१ ॥ ५ ॥ १४ ॥

रामकली महला ५ असटपदिआ

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

किनही कीआ परविरति पसारा ॥ किनही कीआ पूजा बिसथारा ॥
किनही निवल भुइअंगम साधे ॥ मोहि दीन हरि हरि आराधे ॥ १ ॥
तेरा भरोसा पिआरे ॥ आन न जाना वेसा ॥ १ ॥ रहाउ ॥
किनही ग्रिहु तजि वणखंडि पाइआ ॥ किनही मोनि अउधूतु सदाइआ ॥
कोई कहतउ अनंनि भगउती ॥ मोहि दीन हरि हरि ओट लीती ॥ २ ॥
किनही कहिआ हउ तीरथ वासी ॥ कोई अंनु तजि भइआ उदासी ॥
किनही भवनु सभ धरती करिआ ॥ मोहि दीन हरि हरि दरि परिआ ॥ ३ ॥
किनही कहिआ मै कुलहि वडिआई ॥ किनही कहिआ बाह बहु भाई ॥
कोई कहै मै धनहि पसारा ॥ मोहि दीन हरि हरि आधारा ॥ ४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९१२)

शब्दार्थ : **किनही** – कोणी. **परविरति** – प्रवृत्ती, संसार. **विसधारा** – विस्तार. **निवल** – नौली (एक यौगिक क्रिया). **भुईअंगम** – कुंडलिनी योग. **वेसा** – वेश. **वनखंडि** – वनवास. **मोनि** – मौनी. **सदाइआ** –

म्हणवतात. **कहतउ** – म्हणतात. **अनंनि** – अन्न. **भगउती** – भक्त. **ओट** – आश्रय. **अनु** – अन्य. **दरि** – द्वारी. **बाह** – हात, बाहू.

भावार्थ : कोणी प्रवृत्तीमार्गी आहेत. ते संसारात रमतात. कोणी पूजापाठ करण्यात दंग होतात. कोणी नौली आदी क्रियांच्या द्वारे कुंडलिनी योग साधतात. मी दीन केवळ प्रभू परमात्म्याची आराधना करतो.॥१॥ हे प्रिय प्रभो ! मला केवळ तुझाच भरवसा वाटतो. मला अन्य कोणताही मार्ग माहीत नाही. ॥ १ । रहाउ ॥ कोणी घरदार सोडून संन्यासी होऊन वनात गेले. कोणी स्वत:स मौनी, अवधूत योगी म्हणवतात. कोणी म्हणतात मी अनन्य भक्त आहे. मी दीनाने केवळ प्रभू परमात्म्याचा आश्रय घेतला आहे. ॥ २ ॥ कोणी तीर्थक्षेत्री वास करतात. कोणी अन्न त्याग करून विरक्त होतात. कोणी सारी पृथ्वी हेच आपले घर मानून हिंडत राहतात. मी दीन आहे. मी हरीच्या दारी आश्रय घेतला आहे. ॥ ३ ॥ कोणी म्हणतात माझे घराणे उच्च आहे. कोणी म्हणतात मला माझ्या बांधवांचे पाठबळ आहे. कोणी म्हणतात, मला संपत्तीचा आधार आहे. मला दीनाला केवळ हरीचाच आधार आहे.॥४॥

किनही घूघर निरति कराई ॥ किनहू वरत नेम माला पाई ॥
किनही तिलकु गोपी चंदन लाइआ ॥ मोहि दीन हरि हरि हरि धिआइआ ॥ ५ ॥
किनही सिध बहु चेटक लाए ॥ किनही भेख बहु भाट बनाए ॥
किनही तंत मंत बहु खेवा ॥ मोहि दीन हरि हरि हरि सेवा ॥ ६ ॥
कोई चतुरु कहावै पंडित ॥ को खटु करम सहित सिउ मंडित ॥
कोई करै आचार सुकरणी ॥ मोहि दीन हरि हरि हरि सरणी ॥ ७ ॥
सगले करम धरम जुग सोधे ॥ बिनु नावै अहु भरमु न प्रबोधे ॥
कहु नानक जउ साध संगु पाइआ ॥ बूझी त्रिसना महा सीतलाइआ ॥ ८ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१३)

शब्दार्थ : **घुघर** – घुंगरू. **चेटक** – चेटूक, जादूटोणा. **तंत मंत** – तंत्र मंत्र. **खेवा** – करतात. **सिउ** – शिष. **मंडित** – पूजा. **आचार** – कर्मकांड. **सुकरणी** – सत्कर्म. **सरणी** – शरण. **सोधे** – शोधले. **प्रबोधे** – प्रबोधन. **जउ** – जेव्हा. **बुझी** – विझली. **सीतलाइआ** – शांतता.

भावार्थ : कोणी पायात घुंगरू बांधून नृत्य करतात, कोणी माळ घालतात, कोणी व्रत करतात, कोणी नेम करतात, कोणी कपाळी गोपीचंदनाचा टिळा लावतात. मी दीन केवळ हरीचे स्मरण करतो. ॥ ५ ॥ कोणी सिद्ध चेटूक करतात तर कोणी नाना वेश करून थाटमाट करतात. कोणी तंत्र- मंत्र करतात. मी दीन केवळ हरीची सेवा करतो. ॥ ६ ॥ कोणी स्वत:स चतुर पंडित म्हणवतो. कोणी षट्कर्मे करून शिवाची पूजा करतो. कोणी कर्मकांड करतो. कोणी सत्कर्म करतो. मी दीन मात्र हरीला शरण जातो. ॥ ७ ॥ मी सर्व युगांतील कर्म- धर्माचा शोध घेतला आहे. मला कळून आले आहे, की प्रभुनामाशिवाय मनाचे प्रबोधन होत नाही. नानक सांगतात, मी जेंव्हा साधुसंतांची संगत प्राप्त केली, तेव्हा मायेची तृष्णा विझली आणि मन शांत झाले. ॥ ८ ॥१॥

॥ रामकली महला ५ ॥

इसु पानी ते जिनि तू घरिआ ॥ माटी का ले देहुरा करिआ ॥
उकति जोति लै सुरति परीखिआ ॥ मात गरभ महि जिनि तू राखिआ ॥ १ ॥
राखनहारु सम्हारि जना ॥ सगले छोडि बीचार मना ॥ १ ॥ रहाउ ॥
जिनि दीए तुधु बाप महतारी ॥ जिनि दीए भ्रात पुत हारी ॥
जिनि दीए तुधु बनिता अरु मीता ॥ तिसु ठाकुर कउ रखि लेहु चीता ॥ २ ॥
जिनि दिआ तुधु पवनु अमोला ॥ जिनि दिआ तुधु निरु निरमोला ॥
जिनि दीआ तुधु पावकु बलना ॥ तिसु ठाकुर की रहु मन सरना ॥ ३ ॥
छतीह अंम्रित जिनि भोजन दीए ॥ अंतरि थान ठहरावन कउ कीए ॥
बसुधा दीओ बरतनि बलना ॥ तिसु ठाकुर के चिति रखु चरना ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१३)

शब्दार्थ : **पानी** – पाणी, वीर्य. **घरिआ** – घडला. **देहुरा** – शरीर. **करिआ** – केले. **उकती** – युक्ती. **सुरति** – ध्यान, ज्ञान. **परीखिआ** – परीक्षा केली, पारख केली. **महतारी** – माता. **भ्रात** – बंधू. **पुत** – पुत्र. **हारि** – प्रिय. **बनिता** – पत्नी. **मिता** – मित्र. **चीता** – चित्त. **नीरु** – पाणी. **पावकु** – अग्नी. **बलना** – इंधन. **थान** – स्थान. **ठहरावन** – राहण्यासाठी. **बसुधा** – पृथ्वी. **बलना** – सामान.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने माता-पित्याच्या रक्तबिंदुंपासून तुला घडवले, मातीपासून शरीर घडवले, विचारशक्ती, आत्मा व विवेकबुद्धी दिली. मातेच्या गर्भात तुझे रक्षण केले. ॥ १ ॥ त्या रक्षणकर्त्या प्रभूचे स्मरण कर. मनातील अन्य सारे विचार काढून टाक. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्या प्रभूने तुला माता-पिता दिले, ज्याने तुला प्रिय बंधू, पुत्र दिले. ज्याने तुला पत्नी व मित्र दिले. त्या प्रभू परमात्म्यास आपल्या हृदयात धारण कर. ॥ २ ॥ ज्याने तुला अमूल्य असा प्राणवायू दिला, निर्मल जल दिले, अग्नी दिला. जीवनास लागणारी अन्य सामग्री दिली. त्या प्रभू परमात्म्यास, हे मना, तू शरण जा. ॥ ३ ॥ ज्या प्रभूने तुला छत्तीस प्रकारचे सुग्रास भोजन दिले ते ठेवण्यासाठी पोट दिले. राहण्यासाठी पृथ्वी दिली, अन्य सर्व साधनसामग्री दिली. त्या प्रभू परमात्म्याच्या चरणी आपले चित्त एकाग्र कर.॥४॥

पेखन कउ नेत्र सुनन कउ करना ॥ हसत कमावन बासन रसना ॥
चरन चलन कउ सिरू कीनो मेरा ॥ मन तिसु ठाकुर के पूजहु पैरा ॥ ५ ॥
अपवित्र पवित्रु जिनि तु करिआ ॥ सगल जोनि महि तू सिरि धरिआ ॥
अब तू सीझु भावै नही सीझै ॥ कारजु सवरै मन प्रभु धिआईजै ॥ ६ ॥
ईहा ऊहा एकै ओही ॥ जत कत देखीऐ तत तत तोही ॥
तिसु सेवत मनि आलसु करै ॥ जिसु विसरीऐ इक निमख न सरै ॥ ७ ॥
हम अपराधी निरगुनीआरे ॥ ना किछु सेवा न करमारे ॥

गुरू बोहिथा वडभागी मिलिआ ॥ नानक दास संगि पाथर तरिआ ॥ ८ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१३)

शब्दार्थ : **पेखन** – पाण्यासाठी. **सुनन** – ऐकणे. **करना** – कान. **हसत** – हात. **बासन** – वास. **चलन** – चालणे. **सिरू** – मस्तक. **पैरा** – पाय. **सीझू** – सफल. **निरगुनीआरे** – गुणहीन. **बोहिथु** – जहाज.

भावार्थ : त्या प्रभू परमात्म्याने पाहण्यासाठी तुला डोळे दिले. ऐकण्यासाठी कान दिले. काम करण्यासाठी हात दिले. वास घेण्यासाठी नाक व स्वाद घेण्यासाठी जीभ दिली. चालण्यासाठी पाय दिले. सारासार विवेक बुद्धिसाठी मस्तक दिले आहे. हे मना ! अशा प्रभु परमात्म्याच्या चरणांची तू पूजा कर॥ ५॥ हे जीवा ! तुझ्यासारख्या अपवित्र जीवास ज्याने पवित्र केले. सर्व योनींमध्ये तुला श्रेष्ठ स्थान दिले. आता हा मानवजन्म सफल करायचा वा नाही हे तुझे तूच ठरव. तुझी सर्व कार्ये तो प्रभू पार पडतो. हे मना ! त्याचे स्मरण कर. ॥ ६ ॥ इहलोकात व परलोकात सर्वत्र तो प्रभू परमात्मा व्याप्त आहे. जिथे जिथे पाहावे तिथे तिथे तो भरून राहिला आहे. अशा प्रभू परमात्म्याची सेवा करण्यात मात्र मन आळस करते. हे जीवा ! तू त्यास क्षणभरही विसरणे योग्य नाही. ॥ ७ ॥ हे प्रभो ! मी गुणहीन आहे. अपराधी आहे. मी कधी तुझी सेवा केली नाही वा कोणते सत्कर्म केले नाही. माझ्या महत्भाग्याने मला गुरूरूपी जहाज प्राप्त झाले. नानक सांगतात, त्याच्या (गुरूच्या) संगतीने माझ्यासारखा दगड ही भवसागर पार करून गेला. ॥ ८ ॥ २ ॥

॥ रामकली महला ५ ॥

काहू बिहावै रंग रस रूप ॥ काहू बिहावै माइ बाप पूत ॥
काहू बिहावै राज मिलख वापारा ॥ संत बिहावै हरि नाम अधारा ॥ १ ॥
रचना साचु बनी ॥ सभ का एकु धनी ॥ १ ॥ रहाउ ॥
काहू बिहावै बेद अरु बादि ॥ काहू बिहावै रसना सादि ॥
काहू बिहावै लपटि संगि नारी ॥ संत रचे केवल नाम मुरारी ॥ २ ॥
काहू बिहावै खेलत जूआ ॥ काहू बिहावै अमली हूआ ॥
काहू बिहावै पर दरब चुोराए ॥ हरि जन बिहावै नाम धिआए ॥ ३ ॥
काहू बिहावै जोग तप पूजा ॥ काहू रोग सोग भरमीजा ॥
काहू पवन धार जात बिहाए ॥ संत बिहावै कीरतनु गाए ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१३)

शब्दार्थ : **बिहावै** – व्यतीत करणे. **काहू** – कोण. **अधारा** – आधार. **लपटि** – लिप्त. **चुोराए** – चोरणे. **भरमीजा** – भ्रमात. **धार** – धरून ठेवणे, रोखून धरणे.

भावार्थ : काही लोक आपले जीवन रूप, रंग, रस यांच्या उपभोगात व्यतीत करतात. तर काही लोक आपले जीवन आई, बाप व पुत्र यांच्यासाठी व्यतीत करतात. काही लोक राज्य, व्यापार व धनसंपत्ती प्राप्त करण्यासाठी आपले जीवन व्यतीत करतात. संतजन हरीनामाच्या आधारे आपले जीवन व्यतीत करतात. ॥ १ ॥ त्या सत्यरूप प्रभू परमात्म्याने ह्या सृष्टीची रचना केली. तो एकमेव ह्या सृष्टीचा धनी आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ काही वेदांच्या अभ्यासात व

त्यावर चर्चा करण्यात आयुष्य व्यतीत करतात. काही जिभेचे चोचले पुरवण्यात आयुष्य खर्च करतात. कोणी स्त्रीसंगात लिप्त होऊन आपले आयुष्य घालवतात. पण संत मात्र प्रभुनामात तल्लीन होऊन आपले जीवन सार्थकी लावतात.॥२॥ कोणी जुगार खेळण्यात आपले जीवन वाया घालवतात तर कोणी मद्य धुंद होऊन आयुष्य व्यतीत करतात. कोणी दुसऱ्याचे द्रव्य चोरण्यात आयुष्य व्यतीत करतात पण प्रभूचे भक्त प्रभुनामाचे ध्यान करण्यात आपले जीवन व्यतीत करतात. ॥ ३ ॥ काही लोक आपले जीवन योग, तप व पूजा करण्यात व्यतीत करतात तर काहींचे जीवन रोग, शोक व भ्रमात वाया जाते. कोणी प्राणायाम करण्यात आपले जीवन व्यतीत करतात. पण संतजन प्रभुकीर्तन करण्यात आपले जीवन व्यतीत करतात. ॥ ४ ॥

काहू बिहावै दिनु रैनि चालत ॥ काहू बिहावै सो पिडु मालत ॥
काहू बिहावै बाल पड़ावत ॥ संत बिहावै हरि जसु गावत ॥ ५ ॥
काहू बिहावै नट नाटिक निरते ॥ काहू बिहावै जीआ इह हिरते ॥
काहू बिहावै राज महि डरते ॥ संत बिहावै हरि जसु करते ॥ ६ ॥
काहू बिहावै मता मसूरति ॥ काहू बिहावै सेवा जरूरति ॥
काहू बिहावै सोधत जीवत ॥ संत बिहावै हरि रसु पीवत ॥ ७ ॥
जितु को लाइआ तित ही लगाना ॥ ना को मूडु नही को सिआना ॥
करि किरपा जिसु देवै नाउ ॥ नानक ता कै बलि बलि जाउ ॥ ८ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१४)

शब्दार्थ : **चालत** – हिंडणे, फिरणे. **पिडु मालक** – रणांगणात. **बाल** – लहान मुले. **पडावत** – शिकवण्यात. **जिआ** – जीव. **हिरते** – मारण्यात. **मता मसुरति** – सल्लामसलत. **जरूरति** – आवश्यक. **सोधत** – . **मूडु** – मूर्ख. **सिआना** – शहाणा.

भावार्थ : काही लोक हिंडण्या–फिरण्यात आपले जीवन व्यतीत करतात. काही रणांगणात लढण्यात आपले आयुष्य व्यतीत करतात. काही लोक मुलांना शिकवण्यात आयुष्य व्यतीत करतात. संत हरियश गाण्यात आपले जीवन व्यतीत करतात. ॥ ५ ॥ काही लोक नृत्य, नाटक करण्यात आपले जीवन व्यतीत करतात तर काही पशूंची शिकार करण्यात आयुष्य खर्च करतात. काही राज्यकारभाराच्या चिंतेत जीवन घालवतात पण संतजन हरीचे यशोगान गाण्यात आपले जीवन व्यतीत करतात. ॥ ६ ॥ काही लोक दुसऱ्यांना सल्ला देण्यात जीवन व्यतीत करतात तर काही लोक जीवनावश्यक सेवा करण्यात आपले जीवन खर्च करतात. काही लोक जीवनाचा खऱ्या अर्थाने शोध घेण्यात आपले आयुष्य कामी लावतात. संतजन हरिनामामृत प्राशन करण्यात जीवन व्यतीत करतात. ॥ ७ ॥ प्रभू परमात्म्याने ज्यास ज्या कामास लावले ते काम तो करतो. जगात कोणीही जीव मूर्ख नाही, कोणीही शहाणा नाही. तो ज्याच्यावर कृपा करतो त्यास नाम प्रदान करतो. अशा जीवांवर नानक स्वत:स समर्पित करतो. ॥ ८ ॥ ३ ॥

॥ रामकली महला ५ ॥

दावा अगनि रहे हरि बूट ॥ मात गरभ संकट ते छूट ॥
जा का नामु सिमरत भउ जाइ ॥ तैसे संत जना राखे हरिराइ ॥ १ ॥
ऐसे राखनहार दइआल ॥ जत कत देखउ तुम प्रतिपाल ॥ १ ॥ रहाउ ॥
जलु पीवत जिउ तिखा मिटंत ॥ धन बिगसै ग्रिहि आवत कंत ॥
लोभी का धनु प्राण अधारु ॥ तिउ हरि जन हरि हरि नाम पिआरु ॥ २ ॥
किरसानी जिउ राखै रखवाला ॥ मात पिता दइआ जिउ बाला ॥
प्रीतमु देखि प्रीतमु मिलि जाइ ॥ तिउ हरि जन राखै कंठि लाइ ॥ ३ ॥
जिउ अंधुले पेखत होइ अनंद ॥ गूंगा बकत गावै बहु छंद ॥
पिंगुल परबत परते पारि ॥ हरि कै नामि सगल उधारि ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१४)

शब्दार्थ : **दावा अगनि** – दावाग्नी, वणवा. **बूट** – . **तिखा** – तहान. **धन** – पत्नी. **बिगसै** – प्रसन्न होते. **किरसानी** – शेतकरी. **अंधुले** – अंधळा. **गुंगा** – मुका. **बकत** – बोलणे. **पिंगुल** – पांगळा.

भावार्थ : ज्याप्रमाणे वणवा पेटल्यावरही प्रभुकृपेने काही वृक्ष वाचतात, ज्याप्रमाणे मातेच्या उदरातील बालक प्रभुकृपेने गर्भाग्नीपासून सुरक्षित राहते, त्याप्रमाणे प्रभुनामाचे स्मरण कल्याने भवभय नष्ट होते. प्रभू परमात्मा संतजनांचे रक्षण करतो. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा दयाळू व सर्व जीवांचा रक्षणकर्ता आहे. जेथे कोठे पाहावे तेथे हे प्रभो तू जीवांचा प्रतिपाळ करतानाच दिसतोस. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याप्रमाणे पाणी पिण्याने तहान शमते, पती घरी आलेला पाहून पत्नीला आनंद होतो. लोभी माणसाला धन हाच प्राणाधार वाटतो, त्याप्रमाणे हरीच्या सेवकांना हरिनाम प्रिय वाटते. ॥ २ ॥ शेताचा राखणदार ज्याप्रमाणे शेताची राखण करतो. मातापिता ज्याप्रमाणे बालकावर प्रेम करतात. स्त्री आपल्या प्रियकरास पाहताच त्याच्याशी एकरूप होते. त्याप्रमाणे प्रभू परमात्मा आपल्या भक्तांना हृदयाशी धरतो. ॥ ३ ॥ ज्याप्रमाणे अंधळ्याला दृष्टी येताच आनंद होतो, मुक्याला बोलता येऊ लागल्यावर तो आनंदाने गाऊ लागतो, पांगळ्याला पर्वत चढून गेल्याचा आनंद होतो, त्याप्रमाणे प्रभुनामाने सर्व जीवांचा उद्धार होतो. ॥ ४ ॥

जिउ पावक संगि सीत को नास ॥ ऐसे प्राछत संतसंगि बिनास ॥
जिउ साबुनि कापर ऊजल होत ॥ नाम जपत सभु भ्रमु भउ खोत ॥ ५ ॥
जिउ चकवी सूरज की आस ॥ जिउ चात्रिक बूंद की पिआस ॥
जिउ कुरंक नाद करन समाने ॥ तिउ हरि नाम हरि जन मनहि सुखाने ॥ ६ ॥
तुमरी क्रिपा ते लागी प्रीति ॥ दइआल भए ता आए चीति ॥
दइआधारी तिनि धारणहार ॥ बंधन ते होई छुटकार ॥ ७ ॥
सभि थान देखे नैण अलोइ ॥ तिसु बिनु दूजा अवरु न कोइ ॥
भ्रम भै छूटे गुरपरसाद ॥ नानक पेखिओ सभु बिसमाद ॥ ८ ॥ ४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९१४)

शब्दार्थ : **पावक** – अग्नी. **सीत** – थंडी. **प्राछत** – प्रायश्चित्त, पाप. **कापर** – कपडे. **खोत** – नष्ट होतात. **चकवी** – चकोर. **चात्रिक** – चातक. **कुरंक** – हरिण. **दइआधारी** – दयाळू. **धारणहार** – धारण करणारा. **अलोई** – उघडून.

भावार्थ : ज्याप्रमाणे अग्नीमुळे थंडी नाश पावते, त्याप्रमाणे संतांच्या संगतीत पापांचा नाश होतो. ज्याप्रमाणे साबणाने कपडा उजळ होतो, त्याप्रमाणे नामजपाने सारे भ्रम व भवभय नष्ट होते व मन निर्मळ होते. ॥ ५ ॥ ज्याप्रमाणे चकवी सूर्योदयाची वाट पाहत असते, चकोराला स्वाती बिंदूची तहान असते, हरिणाचे कान नादासाठी आसुसलेले असतात, त्याप्रमाणे प्रभूच्या सेवकांचे मन प्रभुनामाने सुखी होते. ॥ ६ ॥ हे प्रभो ! तुझ्या कृपेनेच जीवाच्या मनात प्रभूविषयी प्रीती उत्पन्न होते. तू दया केलीस तर तू जीवाच्या हृदयात वास करतोस. जेव्हा त्या दया करणाऱ्या प्रभूने माझ्यावर दयेचे छत्र धारण केले, तेव्हा माझी सर्व बंधनातून सुटका झाली. ॥ ७ ॥ मी सर्व जागी डोळे सताड उघडे ठेवून सर्वत्र पाहिले. हे प्रभो ! तुझ्याशिवाय मला अन्य कोणीही दिसला नाही. सर्वत्र तू आणि एकमेव तूच दृष्टीस दिसलास. सतगुरुकृपेने माझे सर्व भ्रम व भय नष्ट झाले. नानकाने हे सारे आश्चर्य समक्ष पाहिले. ॥ ८ ॥ ४ ॥

॥ रामकली महला ५ ॥

जीअ जंत सभि पेखीअहि प्रभ सगल तुमारी धारना ॥ १ ॥
इहु मनु हरि कै नामि उधारना ॥ १ ॥ रहाउ ॥
खिन महि थापि उथापे कुदरति सभि करते के कारना ॥ २ ॥
कामु क्रोधु लोभु झूठु निंदा साधू संगि बिदारना ॥ ३ ॥
नामु जपत मनु निरमल होवै सूखे सूखि गुदारना ॥ ४ ॥
भगत सरणि जो आवै प्राणी तिसु ईहा ऊहा न हारना ॥ ५ ॥
सूख दूख इसु मन की बिरथा तुम ही आगे सारना ॥ ६ ॥
तू दाता सभना जीआ का आपन कीआ पालना ॥ ७ ॥
अनिक बार कोटि जन ऊपरि नानकु वंञै वारना ॥ ८ ॥ ५ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९१५)

शब्दार्थ : **धारना** – आश्रित. **कुदरति** – रचना, माया. **कारना** – कार्य. **बिदारना** – विदीर्ण केले, नष्ट केले. **गुदारना** – व्यतीत करणे. **हारना** – पराभव होणे. **बिरथा** – व्यथा, पीडा. **सारना** – सांगणे. **वंञै** – समर्पित.

भावार्थ : जगात जेवढे म्हणून जीवजंतू दिसतात ते सर्व तुझेच आश्रित आहेत. तूच त्यांचे पालन करतोस.॥१॥ प्रभुनामामुळेच ह्या मनाचा उद्धार होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सर्व कार्य करणारा तो प्रभू क्षणात सृष्टी निर्माण करतो तर क्षणात ती नष्ट करतो. ॥ २ ॥ काम, क्रोध, लोभ, असत्य, निंदा हे सारे विकार साधुसंतांच्या संगतीत विदीर्ण होतात. ॥ ३ ॥ प्रभुनामाचा जप केल्याने आयुष्य सुखात व्यतीत होते. ॥ ४ ॥ जो जीव प्रभूभक्तांना शरण जातो तो इहलोकी व परलोकी पराभूत होत नाही. ॥ ५ ॥ हे प्रभू ! सुख-दुःख ह्या मनाच्या व्यथा मी तुझ्याच पुढे सादर करत आहे. ॥ ६ ॥ हे प्रभो ! तू सर्व जीवांचा दाता आहेस. तूच सर्वांचा पालनकर्ता आहेस.॥७॥ नानक सांगतात, अशा प्रभुसेवकांच्या चरणी मी वारंवार, कोटी कोटी वेळा स्वत:स समर्पित करतो. ॥ ८ ॥ ५ ॥

रामकली महला ५ असटपदी

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकचआहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

दरसनु भेटत पाप सभि नासहि हरि सिउ देइ मिलाई ॥ १ ॥
मेरा गुरु परमेसरु सुखदाई ॥
पारब्रहम का नामु द्रिड़ाए अंते होइ सखाई ॥ १ ॥ रहाउ ॥
सगल दूख का डेरा भंना संत धूरि मुखि लाई ॥ २ ॥
पतित पुनीत कीए खिन भीतरि अगिआनु अंधेरु वंञाई ॥ ३ ॥
करण कारण समरथु सुआमी नानक तिसु सरणाई ॥ ४ ॥
बंधन तोड़ि चरन कमल द्रिड़ाए एक सबदि लिव लाई ॥ ५ ॥
अंध कूप बिखिआ ते काढिओ साच सबदि बणि आई ॥ ६ ॥
जनम मरण का सहसा चूका बाहुड़ि कतहु न धाई ॥ ७ ॥
नाम रसाइणि इहु मनु राता अंम्रितु पी त्रिपताई ॥ ८ ॥
संत संगि मिलि कीरतनु गाइआ निहचल वसिआ जाई ॥ ९ ॥
पूरै गुरि पूरी मति दीनी हरि बिनु आन न भाई ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१५)

शब्दार्थ : **अगिआनु** – अज्ञान. **वंञाई** – नष्ट केले. **द्रिडाए** – दृढ केले. **बिखिआ** – विषयविकार. **सहसा** – संशय, दुःख. **बाहुडि** – परत. **धाई** – धावणे. **राता** – रंगून गेला. **दीनी** – दिली.

भावार्थ : गुरूच्या दर्शनाने सर्व पापांचा नाश होतो. सतगुरू, सेवकाचे प्रभूशी मिलन घडवून आणतो. ॥ १ ॥ माझा गुरू परमेश्वर सुख देतो, परब्रह्म परमात्म्याचे नाम सेवकाच्या मनात दृढ करतो. की जे अंतकाळी सहायक होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ संतांची चरणधूळ मस्तकी धारण केल्याने सर्व दुःखाचा डेरा फुटून जातो. ॥ २ ॥ प्रभू परमात्मा क्षणात पतितांना पावन करतो आणि मनातील विषयविकार व अज्ञान, अंधकार नष्ट करतो. ॥ ३ ॥ प्रभू परमात्मा सर्व कार्य करण्यास समर्थ आहे. नानक त्यास शरण जातो. ॥ ४ ॥ सतगुरू भक्तांची सर्व बंधने तोडून प्रभूचे चरणकमल सेवकाच्या मनात दृढ करतो व त्याचे चित्त प्रभुनामात एकाग्र करतो. ॥ ५ ॥ विषयविकाराच्या अंधकारमय कूपातून त्यास बाहेर काढतो. त्याचे मन प्रभुनामात तल्लीन करतो. ॥ ६ ॥ त्याचे जन्म-मरणांचे दुःख नष्ट करतो व त्यास परत संसारात येऊन मोहमायेत भटकावे लागत नाही. ॥ ७ ॥ त्याचे मन राम रसायनात रंगून जाते व तो नामामृत प्राशन करून तृप्त होतो. ॥ ८ ॥ असा जीव संतसंगतीत बसून प्रभू परमात्म्याची कीर्ती गातो. त्यामुळे तो अढळपद प्राप्त करतो. ॥ ९ ॥ पूर्णगुरूने मला पूर्ण ज्ञान दिले आहे. त्यामुळे मला हे कळले की प्रभू परमात्म्याशिवाय आपला अन्य कोणीही साहाय्यकर्ता नाही. ॥ १० ॥

नामु निधानु पइआ वडभागी नानक नरकि न जाई ॥ ११ ॥
घाल सिआणप उकति न मेरी पूरै गुरू कमाई ॥ १२ ॥
जप तप संजम सुचि है सोई आपे करे कराई ॥ १३ ॥
पुत्र कलत्र महा बिखिआ महि गुरि साचै लाइ तराई ॥ १४ ॥
अपणे जीअ तै आपि सम्हाले आपि लीए लड़ि लाई ॥ १५ ॥
साच धरम का बेड़ा बांधिआ भवजलु पारि पवाई ॥ १६ ॥
बेसुमार बेअंत सुआमी नानक बलि बलि जाई ॥ १७ ॥
अकाल मूरति अजूनी संभउ कलि अंधकार दीपाई ॥ १८ ॥
अंतरजामी जीअन का दाता देखत त्रिपति अघाई ॥ १९ ॥
एकंकारु निरंजनु निरभउ सभ जलि थलि रहिआ समाई ॥ २० ॥
भगति दानु भगता कउ दीना हरि नानकु जाचै माई ॥ २१ ॥ १ ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१५)

शब्दार्थ : **घाल** – परिश्रम. **सिआणप** – शहाणपण. **उकती** – युक्ती, लबाडी. **सुचि** – पावित्र्य. **कलत्र** – पत्नी. **बिखिआ** – विष. **महि** – मध्ये. **लडिलाई** – . **बेडा** – तराफा. **अकाल** – कालातीत. **अजुनी** – अयोनी. **संभउ** – स्वयंभू. **कलि** – कलियुग. **जाचै** – याचना करतो. **माई** – माता.

भावार्थ : नानक सांगतात, ज्या भाग्यवंतास नामरूपी खजिना प्राप्त झाला तो कधीही नरकात जात नाही.॥११॥ हे नामधन प्राप्त करण्यात माणसाचे परिश्रम किंवा शहाणपण कामी येत नाही. हे सारे माझ्या पूर्णगुरूकडून मला प्राप्त झाले. ॥ १२ । जप, तप, संयम, पवित्रता आदी सारे प्रभूच आहे. तोच जीवांकडून हे सर्व करवून घेतो. ॥ १३ ॥ पुत्र, पत्नी आदी विषयविकारातून, भवसागरातून, माझ्या सत्यरूप गुरूने मला तारून नेले.॥१४॥ हे प्रभो ! आपल्या जीवांचा तूच संभाळ करतोस. तूच त्यांना आपल्या पदराखाली घेतोस. ॥ १५ ॥ सत्यधर्मरूपी तराफा बांधून तूच त्यांना भवसागरातून पार नेतोस. ॥ १६ ॥ तो प्रभू परमात्मा, अपार, अनंत सर्व जगाचा स्वामी आहे. नानक त्याच्या पायी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥ १७ ॥ तो प्रभू कालातीत अयोनी संभव व स्वयंभू आहे. कलियुगाच्या अंधारात तो दीपक आहे. ॥ १८ ॥ तो अंतर्ज्ञानी आहे. जीवन देणारा आहे. त्याच्या दर्शनाने मन पूर्णपणे तृप्त होते. ॥ १९ ॥ तो एकमेव अद्वितीय, निष्कलंक, निर्भय, जळी, स्थळी सर्वत्र भरून राहिला आहे. तो सर्वव्याप्त आहे. ॥ २० ॥ तो भक्तांना भक्तीचे दान देतो. नानक म्हणतात, हे माझ्या माते मीही त्याच दानाची याचना करतो. ॥ २१ ॥ १ ॥ ६ ॥

॥ रामकली महला ५ सलोकु ॥

सिखहु सबदु पिआरिहो जनम मरन की टेक ॥
मुख ऊजलु सदा सुखी नानक सिमरत एक ॥ १ ॥
मनु तनु राता राम पिआरे हरि प्रेम भगति बणि आई संतहु ॥ १ ॥
सतिगुरि खेप निबाही संतहु ॥

हरिनामु लाहा दास कउ दीआ सगली त्रिसन उलाही संतहु ॥ १ ॥ रहाउ ॥
खोजत खोजत लालु इकु पाइआ हरि कीमति कहणु न जाइ संतहु ॥ २ ॥
चरण कमल सिउ लागो धिआना साचै दरसि समाई संतहु ॥ ३ ॥
गुण गावत गावत भए निहाला हरि सिमरत त्रिपति अघाई संतहु ॥ ४ ॥
आतमरामु रविआ सभ अंतरि कत आवै कत जाई संतहु ॥ ५ ॥
आदि जुगादी है भी होसी सभ जीआ का सुखदाई संतहु ॥ ६ ॥
आपि बेअंतु अंतु नही पाईऐ पूरि रहिआ सभ ठाई संतहु ॥ ७ ॥
मीत साजन मालु जोबनु सुत हरि नानक बापु मेरी माई संतहु ॥ ८ ॥ २ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१६)

शब्दार्थ : **सिखहु** – शिक्षण. **टेक** – आधार. **राता** – रममाण. **खेप** – जन्ममरणाची खेप. **निबाही** – सफल. **लाहा** – लाभ. **उलाही** – नष्ट होणे. **लालु** – रत्न. **निहाला** – प्रसन्न, आनंदित. **आदि** – आद्य, सर्वांच्याही आधी. **जुगादी** – युगांच्याही आधी . **है भी** – आजही आहे. **होसी** – भविष्यातही असणार आहे. **बेअंतु** – अनंत. **साजन** – प्रियकर. **मालु** – धन. **जोबन** – तारूण्य. **सुत** – पुत्र. **बा** – बाप.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ हे माझ्या प्रियजनांनो ! सतगुरूकडून प्रभुनामाचा उपदेश प्राप्त करा. प्रभुनाम हाच जन्ममरणाचा आधार आहे. नानक सांगतात, त्या एकमेव प्रभूनामाचे स्मरण केल्याने मुख उज्ज्वल होते व जीव सदैव सुख प्राप्त करतो. ॥ १ ॥ हे संतजनहो ! जेव्हा तन, मन प्रिय रामात तल्लीन होते, तेव्हा आपले मन हरीच्या प्रेमभक्तीने हरीशी एकरूप होते. ॥ १ ॥ सतगुरूने माझे जीवन सफल केले. ह्या दासाला प्रभुनामाचा लाभ प्राप्त करून दिला त्यामुळे माझ्या मनातील मोहमायेची तृष्णा नष्ट झाली आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ खूप शोध घेतल्यानंतर मला हरिनामरूपी रत्न प्राप्त झाले. हे संतहो ! त्याची किंमत करताच येत नाही. ॥ २ ॥ हे संतजनहो ! प्रभूच्या चरणकमली माझे ध्यान लागले व त्या सत्यरूप प्रभूच्या दर्शनाने मी त्याच्याशी एकरूप होऊन गेलो.॥३॥ प्रभू परमात्म्याचे सदैव गुणगान केल्याने माझे मन प्रसन्न झाले. हे संतजनहो ! प्रभुनामाचे स्मरण केल्याने माझे मन पूर्णपणे तृप्त झाले. ॥ ४ ॥ हे संतजनहो ! तो आत्माराम सर्व जीवांच्या अंतरात रममाण झाला आहे, हे जाणल्यावर जीवास कोठे जावे लागत नाही वा कोठूनही यावे लागत नाही. तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. ॥ ५ ॥ तो प्रभू परमात्मा जेव्हा काहीही नव्हते, तेव्हाही अस्तित्वमान होता. सर्व युगांच्याही आधी तो अस्तित्वमान होता. आजही वर्तमानात तो विद्यमान आहे व पुढेही तो विद्यमान असणार आहे. हे संतजनहो ! तो प्रभूच सर्व जीवांना सुख प्रदान करतो. ॥ ६ ॥ हे संतजनहो ! तो प्रभू अनंत आहे. त्याचा अंत कोणासही लागला नाही. तो सर्व ठिकाणी पूर्णपणे भरून राहिला आहे. ॥ ७ ॥ नानक सांगतात, हे संतजनहो ! प्रभू परमात्माच माझा मित्र, सखा, धनसंपत्ती, यौवन, पुत्र, माता पिता सर्व काही तोच आहे. ॥ ८ ॥ २ ॥ ७ ॥

॥ रामकली महला ५ ॥

मन बच क्रमि राम नामु चितारी ॥
घूमन घेरि महा अति बिखड़ी गुरमुखि नानक पारि उतारी ॥ १ ॥ रहाउ ॥

अंतरि सूखा बाहरि सूखा हरि जपि मलन भए दुसटारी ॥ १ ॥
जिस ते लागे तिनहि निवारे प्रभ जीउ अपणी किरपा धारी ॥ २ ॥
उधरे संत परे हरि सरनी पचि बिनसे महा अहंकारी ॥ ३ ॥
साधू संगति इहु फलु पाइआ इकु केवल नामु अधारी ॥ ४ ॥
न कोई सूरु न कोई हीणा सभ प्रगटी जोति तुम्हारी ॥ ५ ॥
तुम्ह समरथ अकथ अगोचर रविआ एकु मुरारी ॥ ६ ॥
कीमति कउणु करे तेरी करते प्रभ अंतु न पारावारी ॥ ७ ॥
नाम दानु नानक वडिआई तेरिआ संत जना रेणारी ॥ ८ ॥ ३ ॥ ८ ॥ २२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१६)

शब्दार्थ : **बच** – वाचा. **क्रमि** – कर्म. **चितारि** – चित्तात स्मरण कर. **घूमन** – वादळ. **बिखडी** – अवघड मार्ग. **सुखा** – सुख. **मलन** – नाश. **पचि** – जळून. **हीणा** – नीच, कनिष्ठ. **रेणारी** – धूळ.

भावार्थ : हे जीवा ! तू काया, वाचा, मने प्रभुनामाचे चिंतन कर. नानक सांगतात, असे केल्याने महाकठीण अशा वादळात सापडलेली जीवननौका भवसागरातून सुखरूप पार होईल. हरिनामाचा जप केल्याने कामक्रोधादी दुष्ट शत्रू नाश पावतात व आंतरिक व बाह्यसुखाची प्राप्ती होते. ॥ १ ॥ ज्या प्रभू परमात्म्याने हे दुःख निर्माण केले तोच त्याचे निवारणही करतो. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्यास शरण गेल्याने संतांचा उद्धार झाला. महाअहंकारी जीव ह्या दुःखात जळून नष्ट झाले. ॥ ३ ॥ साधुसंतांच्या संगतीचे असे फळ मिळते की एकमेव प्रभू परमात्मा जीवाचा आधार होतो. ॥ ४ ॥ ह्या जगात कोणी शूर नाही, कोणी हीन नाही. साऱ्यांच्याच अंतरात हे प्रभो तुझीच परमज्योत प्रकाशत आहे. ॥ ५ ॥ हे प्रभो ! सर्व काही करण्यास एकमेव तूच समर्थ आहेस. तुझे वर्णन करणे जीवाच्या शक्यतेपलीकडे आहे. तू अदृष्य आहेस. पण सर्वत्र तो एकच प्रभू परमात्मा व्याप्त आहे. ॥ ६ ॥ तुझे मूल्य कोण करू शकणार ? कोणीही कितीही करण्याचा प्रयत्न केला तरी कोणासही त्याचा अंत वा पारावार लागत नाही.॥७॥ नानक म्हणतात, हे प्रभो ! तू दिलेले नाम हेच माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. मी तुझ्या संतजनांच्या चरणीची धूळ झालो आहे. ॥ ८ ॥ ३ ॥ ८ ॥ २२ ॥

राग रामकली महला ३ अनंदु

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने प्राप्त होतो.

अनंदु भइआ मेरी माए सतिगुरू मै पाइआ ॥
सतिगुरू त पाइआ सहज सेती मनि वजीआ वाधाईआ ॥
राग रतन परवार परीआ सबद गावण आईआ ॥
सबदो त गावहु हरी केरा मनि जिनी वसाइआ ॥
कहै नानकु अनंदु होआ सतिगुरु मै पाइआ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१७)

शब्दार्थ : **अनंदु** – आनंद. **भइआ** – झाला. **मेरी** – माझी. **माए** – माता. **पाइइआ** – प्राप्त झाला. **त** – तेव्हा. **सहज सेती** – स्वाभाविकपणे. **मनि** – मनात. **वजीआ वाधाईआ** – आनंदी वाद्ये वाजू लागली. **राग रतन** – सुंदर राग. **सबद** – शब्द, नाम. **गावण** – गाण्यासाठी. **आइआ** – आल्या. **सबदो** – शब्दांचे, नामाचे. **गावहु** – गायन करा. **केरा** – चा. **जिनी** – ज्यांनी. **वसाइआ** – वसवले (धारण केले). **कहै** – सांगतात. **होआ** – झाला.

भावार्थ : हे माते ! मला खरा सतगुरू भेटल्यामुळे आनंदीआनंद झाला आहे. सहजभावात राहून, प्रभुप्रेमात निमग्न झाल्याने मला सतगुरू प्राप्त झाला, त्यामुळे माझ्या मनात परमानंदाची वाद्ये वाजू लागली आहेत. मला असे वाटते आहे, की माझ्या मनात रत्नाप्रमाणे असे दैवी राग-रागिण्या गाण्यासाठी स्वर्गातून पऱ्या साथीदारांसह येऊन आनंदगीते गात आहेत. ज्यांनी आपल्या मनात प्रभू परमात्मा धारण केला आहे, ते सर्व येथे येऊन माझ्या बरोबर प्रभू परमात्म्याचे शब्दगान करत आहेत. नानक सांगतात, सतगुरूची प्राप्ती झाल्याने माझे मन आनंदविभोर झाले आहे. ॥ १ ॥

ए मन मेरिआ तू सदा रहु हरि नाले ॥
हरि नालि रहु तू मंन मेरे दूख सभि विसारणा ॥
अंगीकारु ओहु करे तेरा कारज सभि सवारणा ॥
सभना गला समरथु सुआमी सो किउ मनहु विसारे ॥
कहै नानकु मंन मेरे सदा रहु हरि नाले ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१७)

शब्दार्थ : **ए मन मेरिआ** – हे माझ्या मना. **नाले** – सह, जवळ. **मंन** – मना. **दूख** – दुःख. **सभि** – सर्व. **विसारणा** – विसरायला लावणारा. **अंगीकारु** – अंगीकार करणे (स्वीकार करणे). **ओहु** – तो, प्रभू (परमात्मा). **करे** – करेल. **तेरा** – तुझे. **कारज** – कार्य. **सवारणा** – सावरणारा. **सभना** – सर्व. **गला** – कार्य (गोष्टी). **समरथु** – समर्थ. **सुआमी** – स्वामी. **सो** – त्याला. **किउ** – कसे. **मनहु** – मनातून. **विसारे** – विसरावे. **रहु** – राहावे.

भावार्थ : हे माझ्या मना ! तू सदैव प्रभू परमात्म्याच्या प्रेमात रंगून राहा. माझ्या मना ! तू सदैव त्या सर्व दुःख दूर करणाऱ्या प्रभू परमात्म्याच्या भक्तीत रंगून राहा. असे केल्याने तो तुझा स्वीकार करील व तुझी सर्व कार्ये सिद्धीस नेईल, यशस्वी करील. जो प्रभू परमात्मा सर्व काही करण्यास समर्थ आहे अशा परमात्म्यास का बरे विसरावे? नानक सांगतात, हे माझ्या मना ! तू सदैव प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन राहा. ॥ २ ॥

साचे साहिबा किआ नाही घरि तेरै ॥
घरि त तेरै सभु किछु है जिसु देहि सु पावए ॥
सदा सिफति सलाह तेरी नामु मनि वसावए ॥
नामु जिन कै मनि वसिआ वाजे सबद घनेरे ॥
कहै नानकु सचे साहिब किआ नाही घरि तेरै ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१७)

शब्दार्थ : **साहिबा** – परमात्मा, स्वामी. **किआ** – काय. **नही** – नाही. **घरि** – घरात. **तेरै** – तुझ्या. **सभु किछु** – सर्व काही. **जिसु** – ज्याला. **देहि** – देतोस. **सु** – तो. **पावए** – प्राप्त करतो. **सिफति** – स्तुती. **सलाह** – गुणगान. **वसावए** – धारण करतो. **जिन** – ज्याच्या. **मनि वसिआ** – मनात वसले. **घनेरे** – पुष्कळ.

भावार्थ : हे सत्यरूप प्रभू परमात्मा ! तुझ्या घरी काय कमी आहे ? काहीही कमी नाही. तुझ्या घरी सर्व काही आहे. तू ज्याला जे देतोस तेच त्याला प्राप्त होते. अनेक लोक मनात तुझे नाम धारण करून सदैव तुझी स्तुती करतात, तुझे गुणगान करतात. ज्याच्या मनात तुझे नाम वसले आहे, त्यांच्या मनात अनेक आनंदाची वाद्ये वाजत आहेत. नानक सांगतात, सदैव अस्तित्वमान, सदा स्थिर प्रभू परमात्म्याच्या घरी काय कमी आहे? त्याच्याकडे तर सर्व काही उपलब्ध आहे. ॥ ३ ॥

साचा नामु मेरा आधारो ॥
साचु नामु अधारु मेरा जिनि भूखा सभि गवाईआ ॥
करि सांति सुख मनि आइ वसिआ जिनि इछा सभि पुजाईआ ॥
सदा कुरबाणु कीता गुरू विटहु जिस दीआ एहि वडिआईआ ॥
कहै नानकु सुणहु संतहु सबदि धरहु पिआरो ॥
साचा नामु मेरा आधारो ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१७)

शब्दार्थ : **साचा नामु** – सत्य नाम, प्रभूचे नाम. **आधारो** – आधार, भोजन. **जिनि** – ज्याने. **भूखा** – सर्व प्रकारची भूक. **गवाईआ** – घालवली, नष्ट केली. **करि** – केले. **सांति** – शांती. **आइ वसिआ** – येऊन वसली. **इछा** – मनोकामना, इच्छा. **सभि** – सर्व. **पुजाइआ** – पूर्ण केली. **कुरबाणु** – आत्मसमर्पण. **कीता** – केले. **गुरू विटहु** – गुरूवर. **जिस** – ज्याने. **दीआ** – दिले. **एहि** – ही. **वडिआईआ** – मोठेपणा, सुख आनंद. **सुणहु** – ऐका. **संतहु** – संतजनहो. **सबदि** – गुरुशब्द, उपदेश. **धरहु** – धारण करा. **पिआरो** – प्रिय बंधूंनो.

भावार्थ : प्रभू परमात्म्याचे नामस्मरण हाच माझ्या जीवनाचा आधार, भोजन आहे. प्रभुनामाने माझ्या सर्व वासनाविकारांची भूक नाहीशी केली. माझ्या मनात प्रभुनामाने वास केल्यामुळे माझ्या मनात सुख, शांती नांदू लागली. त्यामुळे माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या. ज्या सतगुरूचे ठायी एवढे मोठेपणा आहे, महानता आहे त्याच्यावर मी माझे प्राण ओवाळून टाकतो. नानक सांगतात, संतजनहो, ऐका ! आपल्या मनात सदैव भक्तीची कास धरा. प्रभुनाम हेच माझा आधार आहे. ॥ ४ ॥

वाजे पंच सबद तितु घरि सभागै ॥
घरि सभागै सबद वाजे कला जितु घरि धारिआ ॥
पंच दूत तुधु वसि कीते कालु कंटकु मारिआ ॥
धुरि करमि पाइआ तुधु जिन कउ सि नामि हरि कै लागे ॥
कहै नानकु तह सुखु होआ तितु घरि अनहद वाजे ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१७)

शब्दार्थ : **पंच सबद** – पाच प्रकारची वाद्ये. **वाजे** – वाजतात. **तितु** – त्याच्या. **घरि** – घरात, हृदयात. **सभागै** – भाग्यवान. **कला** – शक्ती. **जितु** – ज्याच्या. **धारीआ** – धारण केली. **पंच दूत** – पाच विकार (काम, क्रोध,

मोह, मद, मत्सर). **तुधु** – तू. **वसि** – वश. **कीते** – केली. **कालु** – काळ, मृत्यू. **कंटकु** – काटा, दु:ख. **मारिआ** – मारले (नष्ट केली). **धुरि** – कपाळी, भाग्यात. **जिन** – ज्याने. **तह** – तेथे. **सुखु** – सुख. **तितु** – त्या.

भावार्थ : भाग्यशाली जीवाच्या अंत:करणात पाच प्रकारच्या शब्दांचे ध्वनी निनादत आहेत. हे प्रभो ! ज्या भाग्यशाली जीवांच्या अंत:करणात तू आपली सत्ताशक्ती कार्यान्वित केली आहेस, त्याच्या अंत:करणात तुझ्या नामरूपी शब्दांची धून वाजत आहे. हे प्रभो ! तूच काम, क्रोध, मोह, मद, मत्सर वश करून काळरूपी कंटकाचा नाश केलास. ज्यांच्या भाग्यात हे प्रभो, तू प्रभुनाम स्थापित केले आहेस तेच प्रभुनामात लीन होऊन राहतात. नानक सांगतात, ज्यांच्या हृदयात प्रभू परमात्म्याचा अनाहत नाद, तो अमृत नाद निनादत राहतो, त्यांनाच परमसुख प्राप्त होते. ॥ ५ ॥

साची लिवै बिनु देह निमाणी ॥
देह निमाणी लिवै बाझहु किआ करे वेचारीआ ॥
तुधु बाझु समरथ कोइ नाही क्रिपा करि बनवारीआ ॥
एस नउ होरु थाउ नाही सबदि लागि सवारीआ ॥
कहै नानकु लिवै बाझहु किआ करे वेचारीआ ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१७)

शब्दार्थ : **साची** – खरी. **लिवै** – एकाग्रता. **बिनु** – शिवाय. **निमाणी** – बिचारी. **बाझहु** – शिवाय. **किआ** – काय. **वेचारीआ** – बिचारा जीव. **करि** – करणार. **तुधु** – तू, तुझ्या. **बाझु** – शिवाय. **समरथ** – समर्थ. **बनवारीआ** – वनमाळी. **एस** – ह्या. **नउ** – ला. **होरु** – इतर. **थाउ** – स्थान. **सबदि** – शब्दसाधना, नामसाधना. **सवारीआ** – सावरतो. **देह** – शरीर. **देह निमाणी** – बिचारा जीव.

भावार्थ : प्रभू परमात्म्याशी मन एकाग्र झाल्याशिवाय हा देह बिचारा काय करणार ? प्रभुप्राप्तीच्या कामी हा देह निरुपयोगी आहे. प्रभुपदी मन तल्लीन झाल्याशिवाय जीव बिचारा काय करणार ? काहीही करू शकणार नाही. हे प्रभो ! तुझ्याशिवाय अन्य कोण सामर्थ्यवान आहे ! हे प्रभो ! हे वनमाळी ! माझ्यावर कृपा कर. ह्या दुर्लभ जीवास तुझ्याशिवाय अन्य कोणताही आधार नाही. दुसरे कोणतेही स्थान नाही. मला प्रभुनामात लीन करून माझा ह्या जीवाचा उद्धार कर. नानक सांगतात, प्रभुपदी एकाग्र झाल्याशिवाय हा बिचारा जीव काय करू शकणार ? ॥ ६ ॥

आनंदु आनंदु सभु को कहै आनंदु गुरू ते जाणिआ ॥
जाणिआ आनंदु सदा गुर ते क्रिपा करे पिआरिआ ॥
करि किरपा किलविख कटे गिआन अंजनु सारिआ ॥
अंदरहु जिन का मोहु तुटा तिन का सबदु सचै सवारिआ ॥
कहै नानकु एहु अनंदु है आनंदु गुर ते जाणिआ ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१७)

शब्दार्थ : **आनंदु** – आनंद. **सभु** – सर्वजण. **जाणिआ** – जाणले. **गुर ते** – गुरूकडून. **क्रिपा** – कृपा. **पिआरिआ** – प्रिय. **किलविख** – पाप, किल्मिष. **कटे** – नष्ट केले, नाश पावले. **गिआन** – ज्ञान. **अंजनु** – अंजन. **सारिआ** – घातले. **अंदरहु** – अंत:करणातील. **मोहु** – मोह. **तुटा** – नाहीसा झाला. **तिन** – त्याचा. **सवारिआ** – सावरले. **एहु** – हा.

भावार्थ : आनंद ! आनंद ! सर्वच जण म्हणतात, आम्हाला आनंद प्राप्त झाला आहे; पण खरा आनंद कोणालाच प्राप्त झालेला नाही. ज्याला तो आनंद म्हणतो तो केवळ भौतिक सुखाचा आनंद आहे. आनंदाचा आभास आहे. खरा आनंद, परमानंद सतगुरूकडूनच प्राप्त होतो. सतगुरू जेव्हा आपल्या प्रिय शिष्यावर कृपा करतो तेव्हाच त्या शिष्याला खरा आनंद, आत्मिक आनंद प्राप्त होतो. सतगुरू कृपावंत होऊन शिष्याच्या मनातील पापवासना दूर करतो व त्याच्या डोळ्यात ज्ञानांजन घालून त्याला ज्ञानवान करतो. ज्याच्या अंत:करणातील मोहमायेचा पाश तुटला आहे, त्यालाच नामभक्तीचे रहस्य समजते. नानक सांगतात, खरा आनंद तोच जो सतगुरूकडून प्राप्त होतो. ॥ ७ ॥

बाबा जिसु तू देहि सोई जनु पावै ॥
पावै त सो जनु देहि जिस नो होरि किआ करहि वेचारिआ ॥
इकि भरमि भूले फिरहि दह दिसि इकि नामि लागि सवारिआ ॥
गुर परसादी मनु भइआ निरमलु जिना भाणा भावए ॥
कहै नानकु जिसु देहि पिआरे सोई जनु पावए ॥ ८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१८)

शब्दार्थ : **बाबा** – प्रभू परमात्मा. **जिसु** – ज्याला. **देहि** – देतोस. **सोई** – तोच. **जनु** – माणूस. **पावै** – प्राप्त करतो. **होरि** – अन्य, दुसरा. **किआ** – काय. **करहि** – करील. **वेचारिआ** – बिचारा. **इकि** – कित्येक. **भरमि** – भ्रमात. **भूले** – चुकलेले. **फिरहि** – भटकत राहतात. **दह दिसि** – दाही दिशांना. **लागि** – लागला. **सवारिआ** – सावरला. **गुर परसादी** – गुरूच्या कृपाप्रसादाने. **भइआ** – झाले. **भाणा** – आज्ञा. **भावए** – आवडली. **पिआरे** – प्रिय.

भावार्थ : हे परमात्म्या ! ज्यास तू आनंद देतोस तोच तो प्राप्त करतो. अन्य कोणीही काहीही करू शकत नाही. बहुतेक लोक मोहमायेच्या भ्रमात सापडून दश-दिशात भरकटत असतात, तर काही थोडे लोक प्रभुनामात लीन होऊन आपला जन्म सार्थकी लावतात. सतगुरुकृपेने ज्यांच्या मनाला परमेश्वरी आज्ञा भावली, त्याप्रमाणे जे वागले, त्यांची मने निर्मळ झाली. नानक सांगतात, हे प्रभो ! तुझी कृपादृष्टी ज्याच्यावर होते, तोच सेवक आनंद प्राप्त करतो. ॥ ८ ॥

आवहु संत पिआरिहो अकथ की करह कहाणी ॥
करह कहाणी अकथ केरी कितु दुआरै पाईऐ ॥
तनु मनु धनु सभु सउपि गुर कउ हुकमि मंनिऐ पाइऐ ॥
हुकमु मंनिहु गुरू केरा गावहु सची बाणी ॥

कहै नानकु सुणहु संतहु कथिहु अकथ कहाणी ॥ ९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१८)

शब्दार्थ : **आवहु** – या. **अकथ** – अवर्णनीय. **करह** – करावे. **कहाणी** – कथा. **केरी** – कसे, कोणत्या मार्गाने, युक्तीने. **सउपि** – सोपवून, अर्पण करून. **हुकमि** – आज्ञा. **मंनिए** – मानून. **गावहु** – गायन करा. **कथिहु** – सांगा.

भावार्थ : हे संतजनहो ! या ! त्या अवर्णनीय प्रभू परमात्म्याची कथा वर्णन करून सांगा. हेही सांगा की, तो प्रभू परमात्मा काय केल्याने, कोणत्या मार्गाने गेल्याने प्राप्त होईल ? हे बंधू ! तन, मन, धन हे सर्व काही सतगुरुचरणी अर्पण करून त्याच्या आज्ञेत राहिल्याने प्रभू परमात्मा प्राप्त होतो. पूर्णगुरूच्या आज्ञेप्रमाणे आचरण करून, सत्य प्रभू परमात्म्याचे गुणगान करा. नानक सांगतात, हे संत जनहो ! तुम्ही त्या अकथनीय प्रभू परमात्म्याची कथा एकाग्र चित्ताने ऐका व सांगा. ॥ ९॥

ए मन चंचला चतुराई किनै न पाइआ ॥
चतुराई न पाइआ किनै तू सुणि मंन मेरिआ ॥
एह माइआ मोहणि जिनि एतु भरमि भुलाइआ ॥
माइआ ते मोहणी तिनै कीती जिनि ठगउली पाईआ ॥
कुरबाणु कीता तिसै विटहु जिनि मोहु मीठा लाइआ ॥
कहै नानकु मन चंचल चतुराई किनै न पाइआ ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१८)

शब्दार्थ : **ए** – हे. **चंचला** – चंचल मना. **किनै** – कोणीही. **सुणि** – ऐक. **मंन** – मन. **मेरिआ** – माझ्या. **माइआ** – माया. **मोहणी** – मोहिनी. **जिनि** – ज्याने. **एतु** – ह्या. **भरमि** – भ्रमात. **भुलाइआ** – भुलवले. **तिनै** – त्याने, त्या परमेश्वराने. **कीती** – केली. **ठगउली** – ठकवणारी माया. **कुरबाणु** – आत्मसमर्पण. **कीता** – केले. **तिसै विटहु** – त्याच्यावरून. **लाइआ** – लावले.

भावार्थ : हे चंचल मना ! हे वेड्या मना ! कोणत्याही चतुराईने प्रभू परमात्मा प्राप्त होत नाही. प्रभुप्राप्तीच्या मार्गात कोणतीही चतुराई, बनवाबनवी उपयोगी पडत नाही. 'त्या' मोहमायेने सर्वांना मोहिनी घालून भ्रमात फसवून, भुलवून प्रभुप्राप्तीच्या मार्गापासून दूर नेले आहे. पण ही मोहमायासुद्धा प्रभूनेच निर्माण केली आहे. जे जीव ह्या मोहमायेच्या मिठास बोलण्याला दूर सारून प्रभुमार्गावर चालत राहतात त्यांच्यावर मी माझा जीव ओवाळून टाकतो. नानक सांगतात, हे चंचल मना ! चतुराई व शहाणपणाने कोणासही प्रभू परमात्मा प्राप्त होत नाही.॥१०॥

ए मन पिआरिआ तू सदा सचु समाले॥
एहु कुटंबु तू जि देखदा चलै नाही तेरै नाले ॥
साथि तेरे चलै नाही तिसु नालि किउ चितु लाईऐ॥
ऐसा कंमु मूले न कीचै जितु अंति पछोताइऐ ॥
सतिगुरू का उपदेसु सुणि तू होवै तेरै नाले ॥
कहै नानकु मन पिआरे तू सदा सचु समाले ॥ ११ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१८)

शब्दार्थ : **ए** – हे. **पिआरिआ** – प्रिय. **समाले** – स्मरण कर. **एहु** – हे. **जि** – जे. **देखदा** – पाहतोस. **चलै नाही** – येणार नाही. **तेरै** – तुझ्या. **नाले** – सह, बरोबर. **मूले न** – मुळीच नाही.

भावार्थ : हे प्रिय मना ! तू सदैव त्या सत्यरूप सदा अस्तित्वमान असलेल्या प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. हे जे तुझे कुटुंब, आप्त, गणगोत वगैरे तू पाहतोस, त्यातले कोणीही तुझ्याबरोबर येणार नाही. मग जे तुझ्याबरोबर येणार नाही त्यात तू आपले चित्त का गुंतवतोस ? असे कोणतेही काम करू नकोस की ज्यामुळे तुला नंतर पश्चात्ताप करावा लागेल. तू सतगुरूचा उपदेश ऐक, त्याप्रमाणे आचरण कर. तेच तुला गुरूमार्गावर नेईल. तेच तुझ्याबरोबर येणार आहे. नानक सांगतात, हे प्रिय मना, तू सदासर्वदा त्या प्रभू परमात्म्याचे स्मरण कर॥ ११॥

अगम अगोचरा तेरा अंतु न पाईआ ॥
अंतो न पाइआ किनै तेरा आपणा आपु तू जाणहे ॥
जीअ जंत सभि खेलु तेरा किआ को आखि वखाणए ॥
आखहि त वेखहि सभु तू है जिनि जगतु उपाइआ ॥
कहै नानकु तू सदा अंगमु है तेरा अंतु न पाइआ ॥ १२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१८)

शब्दार्थ : **अगम** – अगम्य, न कळणारा. **अगोचरा** – न दिसणारा. **तेरा** – तुझा. **अंतु** – शेवट, पारावार. **पाईआ** – सापडला. **किनै** – कोणीही. **आपणा आपु** – आपणच आपल्याला. **तू** – स्वत:. **जाणहे** – जाणतोस. **जीअ** – जीव. **जंत** – जंतु. **खेलु** – खेळ. **किआ** – कोण. **आखि** – मोजमाप, कोण काय सांगणार. **वखाणए** – खुलासा करून सांगणे. **आखहि** – मोजमाप करणारा. **वेखहि** – संभाळ करणारा. **जिनि** – ज्याने. **जगतु** – जग. **उपाइआ** – उत्पन्न केले.

भावार्थ : हे प्रभो ! तू अगम्य आहेस, अगोचर आहेस. तुझे पूर्ण ज्ञान कोणासही झाले नाही. तुला चर्मचक्षुद्वारा पाहता येत नाही. तुझ्या सामर्थ्याचा अंत कोणासही लागला नाही. फक्त तूच तुला जाणतोस. हे सारे जीवजंतू तूच निर्माण केले आहेस. ही सारी सृष्टी, सारा खेळ तुझाच आहे. तुझे वर्णन कोण करू शकणार? कोणातही ते सामर्थ्य नाही. सर्व काही करणारा, सांगणारा, पाहणारा, संभाळ करणारा तूच आहेस. हे सर्व जग तूच निर्माण केले आहेस. नानक सांगतात, तू सदैव अगम्य आहेस. तुझा कोणासही ठाव लागला नाही. ॥ १२ ॥

सुरि नर मुनि जन अंम्रितु खोजदे सु अंम्रितु गुर ते पाइआ ॥
पाईआ अंम्रितु गुरि क्रिपा कीनी सचा मनि वसाइआ ॥
जीअ जंत सभि तुधु उपाए इकि वेखि परसणि आइआ ॥
लबु लोभु अहंकारु चूका सतिगुरू भला भाइआ ॥
कहै नानकु जिस नो आपि तुठा तिनि अंम्रितु गुर ते पाइआ ॥ १३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९१८)

शब्दार्थ : **सुरि** – देव. **नर** – मानव. **मुनि जन** – ऋषी मुनी. **अंम्रितु** – अमृत, अमरत्व. **खोजदे** – शोधतात. **पाइआ** – प्राप्त होते. **कीनी** – केली. **सचा** – सत्यस्वरूप परमात्मा. **मनि** – मनात. **वसाइआ** – वसवला. **जीअ** – जीव. **जंत** – जंतू. **सभि** – सगळे. **तुधु** – तूच. **उपाए** – उत्पन्न केले. **वेखि** – पाहून. **परसणि** – शरण जातो. **लबु** – लालच, हाव. **अहंकारु** – अहंकार. **चूका** – (चुकला) नाहीसा झाला. **भला** – चांगला. **भाइआ** – वाटला, आवडला, प्राप्त झाला. **तिनि** – त्याने. **जिस** – ज्याच्यावर. **तुठा** – संतुष्ट झाला, प्रसन्न झाला.

भावार्थ : देवता, मानव, ऋषी व मुनी ज्या दैवी गुणांना प्राप्त करण्यासाठी धडपडत असतात, ते अमरत्व सतगुरूद्वारा प्राप्त होते व ज्यांनी सतगुरूकडून हे अमृतनाम प्राप्त केले, त्यांच्या हृदयात प्रभू परमात्मा वास करतो. हे प्रभो, सर्व जीव तूच निर्माण केलेस पण ज्यांना तू प्रेरणा देतो तेच सतगुरूला शरण जातात. जे सतगुरूला शरण जातात त्यांच्या मनातील हाव, लालूच, लोभ, अहंकार आदी सर्व विकार नष्ट होतात व त्यांना सतगुरूची संगत आवडू लागते. नानक सांगतात, ज्याच्यावर प्रभू परमात्मा संतुष्ट होतो, ते भाग्यवंत होऊन त्यांना सतगुरूकडून प्रभूचे अमृतरूपी नाम प्राप्त होते. ॥ १३ ॥

भगता की चाल निराली ॥
चाला निराली भगताह केरी बिखम मारगि चलणा ॥
लबु लोभु अहंकारु तजि त्रिसना बहुतु नाही बोलणा ॥
खंनिअहु तिखी वालहु निकी एतु मारगि जाणा ॥
गुर परसादी जिनी आपु तजिआ हरि वासना समाणी ॥
कहै नानकु चाल भगता जुगहु जुगु निराली ॥ १४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१८)

शब्दार्थ : **भगतता** – भक्तांची. **निराली** – वेगळी, निराळी. **बिखम** – कठीण. **मारगि** – मार्ग. **चलणा** – चालणे. **तजि** – त्यागली. **त्रिसना** – तृष्णा. **बहुतु** – खूप. **बोलणा** – बोलणे. **खंनिअहु** – तलवारीहून. **तिखी** – तीक्ष्ण. **वालहु** – केसापेक्षा. **निकी** – बारीक, सूक्ष्म. **एतु** – हा. **समाणी** – सामावून गेली. **जुगु** – युगात. **चाल** – वागणे.

भावार्थ : ईश्वरभक्तांचे बोलणे, चालणे, वागणे काही निराळेच असते. असा ह्या आगळ्या वेगळ्या ईश्वरभक्तांचा जीवनमार्ग खडतर असतो. त्यांनी लोभ, मोह, अहंकार आदी विषयविकारांच्या तृष्णेचा त्याग केलेला असतो. ते फार कमी बोलतात. जीवनमर्यादिचे असे भक्त जे मार्ग चालत असतात तो मार्ग केसाहूनही सूक्ष्म व तलवारीच्या पात्याहूनही तीक्ष्ण असतो. ज्या भक्तांनी सतगुरुकृपेने अहंभावाचा त्याग केला आहे, त्यांच्या साऱ्या मनोकामना पूर्ण होऊन ते प्रभू परमात्म्यात विलीन होतात. नानक सांगतात, प्रभुभक्तांची चाल युगानुयुगे अशी वेगळीच असते. ॥ १४ ॥

जिउ तू चलाइहि तिव चलह सुआमी होरु किआ जाणा गुण तेरे ॥
जिव तू चलाइहि तिवै चलह जिना मारगि पावहे ॥
करि किरपा जिन नामि लाइहि सि हरि हरि सदा धिआवहे ॥

जिस नो कथा सुणाइहि आपणी सि गुर दुआरै सुखु पावहे ॥
कहै नानकु सचे साहिब जिउ भावै तिवै चलावहे ॥ १५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१९)

शब्दार्थ : **जिउ** – ज्याप्रमाणे. **चलाइहि** – चालवतोस. **तिव** – त्याप्रमाणे. **चलह** – चालतो. **सुआमी** – स्वामी, परमेश्वरा. **होरु** – अन्य, इतर. **किआ** – काय. **जिव** – ज्याप्रमाणे, जसे. **जिना** – ज्यांना. **मारगि** – सन्मार्ग. **पावहे** – प्राप्त होतो. **नामि** – नामसाधनेस. **लाइहि** – लावतो. **सि** – ते. **धिआवहे** – ध्यान करतात. **जिस** – ज्यास. **सुणाइहि** – ऐकवतो. **गुर दुआरै** – गुरूच्या द्वारे.

भावार्थ : हे प्रभो ! तू जसा चालवतोस तसेच सर्व जीव चालतात. आम्हास तुझ्या कोणत्याही गुणाची माहिती नाही. जसे तू चालवतोस तसेच चालायचे एवढेच आम्हास कळते. हे प्रभो ! ज्यांच्यावर तू कृपावंत होऊन त्यांना प्रभुनामाच्या मार्गावर आणलेस ते सदैव हरी हरी करत तुझ्या नामस्मरणात तल्लीन होऊन राहतात. हे प्रभो ! ज्यांना तू तुझी कथा ऐकवतोस ते भक्त सतगुरुद्वारा सुख प्राप्त करतात. नानक सांगतात, हे प्रभो ! तुला जसे योग्य वाटेल तसेच तू आम्हा सर्व जीवांना चालवतोस. ॥ १५ ॥

एहु सोहिला सबदु सुहावा ॥
सबदो सुहावा सदा सोहिला सतिगुरू सुणाइआ ॥
एहु तिन कै मंनि वसिआ जिन धुरहु लिखिआ आइआ ॥
इकि फिरहि घनेरे करहि गला गली किनै न पाइआ ॥
कहै नानकु सबदु सोहिला सतिगुरू सुणाइआ ॥ १६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१९)

शब्दार्थ : **एहु** – हे. **सोहिला** – मंगलगान, आरती. **सबदु** – उपदेश. **सुहावा** – सुंदर. **सुणाइआ** – ऐकवले. **तिन** – त्यांचे. **मंनि** – मनात. **वसिआ** – वसला (वसतो). **जिन** – ज्याच्या. **धुरहु** – कपाळी, भाग्यात, (प्राक्तनात). **लिखिआ** – लिहिलेले. **आइआ** – आला. **इकि** – अनेक. **फिरहि** – फिरतात. **घनेरे** – (खूप), असंख्य. **गला** – गप्पा. **गली** – बोलण्याने. **किनै** – कोणीही.

भावार्थ : हे मंगलगान, हे प्रभूचे यशोगान, मनास आनंद देणारे आहे. तेच त्याला प्रिय वाटते. प्रभुनामाचे मंगलगीत, जे प्रभू परमात्म्यास प्रिय वाटते, ते सतगुरूनेच मला शिकवले आहे. प्रभू परमात्म्याने ज्यांच्या भाग्यात हे मंगलगान आधीच लिहून ठेवले असेल, त्यांच्याच मनात ते वास करते व ते सदैव अधिकच दृढ होत जाते. ते नुसत्या गप्पा मारून प्राप्त होत नाही. नानक सांगतात, हे शब्दब्रह्म, हेच आनंदाचे गीत आहे. सतगुरूनेच ते आम्हास सांगितले आहे.॥१६॥

पवितु होए से जना जिनी हरि धिआइआ ॥
हरि धिआइआ पवितु होए गुरमुखि जिनी धिआइआ ॥
पवितु माता पिता कुटुंब सहित सिउ पवतु संगति सबाईआ ॥
कहदे पवितु सुणदे पवितु से पवितु जिनी मंनि वसाइआ ॥

कहै नानकु से पवितु जिनी गुरमुखि हरि हरि धआइआ ॥ १७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१९)

शब्दार्थ – **पवितु** – पवित्र. **होए** – होतो, झाले. **से** – ते. **जना** – लोक. **जिनी** – ज्यांनी. **धिआइआ** – ध्यान केले, स्मरण केले. **कुटुंब** – कुटुंब. **सहित** – आप्तगण. **सिउ** – सह. **संगति** – बरोबरचे, सोबती. **सबाईआ** – सर्वजण. **कहदे** – सांगणारे. **सुणदे** – ऐकणारे. **मंनि** – मनात. **वसाइआ** – वसवला.

भावार्थ – जे प्रभू परमात्म्याचे स्मरण करतात, ते मनाने पवित्र होतात. ज्यांनी गुरुमार्गी होऊन प्रभू परमात्म्याचे ध्यान केले त्यांचेही जीवन पवित्र होते. ज्या भक्तांनी प्रभू परमात्म्याचे स्मरण केले ते तर पवित्र होतातच एवढेच नव्हे तर त्यांचे माता, पिता, कुटुंब, आप्त, गणगोत सारे सारे पवित्र होतात. प्रभुनामाचे स्मरण करणारे, प्रभुनाम ऐकणारेही पवित्र होतात. ज्यांनी प्रभुनाम आपल्या मनात धारण केले आहे तेही पवित्र होतात. नानक सांगतात, ज्या साधकांनी सतगुरूच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रभुनामाचे ध्यान केले ते नक्कीच पवित्र होतात.॥१७॥

करमी सहजु न ऊपजै विणु सहजै सहसा न जाइ ॥
नह जाइ सहसा कितै संजमि रहे करम कमाए ॥
सहसै जीउ मलीणु है कितु संजमि धोता जाए ॥
मंनु धोवहु सबदि लागहु हरि सिउ रहहु चितु लाइ ॥
कहै नानकु गुर परसादी सहजु उपजै इहु सहसा इव जाइ ॥ १८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१९)

शब्दार्थ – **करमी** – कर्मकांडाने. **सहजु** – ब्रह्मज्ञान, प्रभू परमात्म्याचे ज्ञान. **न ऊपजै** – उत्पन्न होत नाही. **विणु** – विना, शिवाय. **सहसा** – संयम, शक्ती. **कितै** – कोणत्याही. **संजमि** – संयमाने. **रहे** – होत नाही. **मलीणु** – मलिन. **धोता जाए** – धुतले जातात. **लागहु** – लागा, स्मरण करा. **इहु** – हा.

भावार्थ – कर्मकांड केल्याने प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होत नाही. गुरुद्वारा प्रभू परमात्म्याचे ज्ञान झाल्याशिवाय मनातील संशय, शंका-कुशंका नाहीशा होत नाहीत. मनातील संशय कोणत्याही कर्मकांडाने नष्ट होत नाही. इंद्रिय संयमाने नष्ट होत नाही. संशयाने मलिन झालेले मन कोणत्या मार्गाने स्वच्छ होईल ? मनाला सतगुरूकडून प्राप्त झालेल्या प्रभुनाम जलाने धुऊन प्रभू परमात्म्याचे ध्यान लावल्याने मन संशयापासून स्वच्छ होईल. नानक सांगतात, सतगुरुकृपेने प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होते व मनातील सारे संशय, साऱ्या शंका-कुशंका सहज दूर होतात. ॥ १८ ॥

जीअहु मैले बाहरहु निरमल ॥
बाहरहु निरमल जीअहु त मैले तिनी जनमु जूऐ हारिआ ॥
एह तिसना वडा रोगु लगा मरण मनहु विसारीआ ॥
वेदा महि नामु उतमु सो सुणहि नाही फिरहि जिउ बेतालिआ ॥

कहै नानकु जिन सचु तजिआ कूड़े लागे तिनी जनमु जुऐ हारिआ ॥ १९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९१९)

शब्दार्थ : **जीअहु** – आतून, अंत:करणातून. **बाहरहु** – बाहेरून. **जनमु** – जन्म. **जूऐ** – जुगार. **एह** – ही. **तिसना** – तृष्णा. **वडा** – मोठा. **विसारीआ** – विसर पडणे. **वेदा** – वेद. **महि** – मध्ये. **उतमु** – उत्तम, श्रेष्ठ. **तजिआ** – त्याग केला. **कूडे** – असत्य, पाप.

भावार्थ : जे लोक आतून मलिन असतात पण केवळ बाह्य शरीर स्वच्छ करतात, ज्यांची मने मलिन असतात, त्यांनी आपला जन्म व्यर्थ घालवला. तृष्णेसारखा हा फार मोठा रोग त्यांना जडला आहे असे समजावे. त्यामुळे त्यांना मरणाचाही विसर पडला आहे. वेदात अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यातील सर्वांत उत्तम गोष्ट म्हणजे प्रभुनामाचे स्मरण, ते करण्याचे सोडून लोक अन्य कर्मकांडात भ्रमित होऊन वेताळासारखे इकडे तिकडे इतस्तत: भटकत राहतात. नानक सांगतात, ज्याने सत्याचा त्याग केला, प्रभुनामाचा त्याग केला, ते असत्याच्या मार्गाने जाऊन पापाचरणात मग्न होऊन जीवन व्यर्थ घालवतात. ॥ १९ ॥

जीअहु निरमल बाहरहु निरमल ॥
बाहरहु त निरमल जीअहु निरमल सतिगुर ते करणी कमाणी ॥
कूड़ की सोइ पहुचै नाही मनसा सचि समाणी ॥
जनमु रतनु जिनी खटिआ भले से वणजारे ॥
कहै नानकु जिन मंनु निरमलु सदा रहहि गुर नाले ॥ २० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१९)

शब्दार्थ : **जीअहु** – आतून, अंत:करणातून, मनातून. **निरमल** – निर्मळ. **बाहर हु** – बाहेरून. **करणी** – आचरण. **कमाणी** – कमावले, प्राप्त केले. **कूड** – पाप, असत्य. **सोइ** – जाणीव, सूचना. **पहुचै** – पोहोचणे. **समाणी** – सामावणे. **खटिआ** – कमावले. **भले** – चांगले. **से** – ते. **वणजारे** – व्यापारी. **नाले** – सह, बरोबर.

भावार्थ : ज्यांचे अंत:करण निर्मळ आहे व बाह्य आचरणही निर्मळ आहे, ते अंतर्बाह्य निर्मळ असलेल्या सतगुरूच्या उपदेशानुसार आपले जीवन व्यतीत करतात. असत्य, पाप तेथे पोहचू शकत नाही. त्यांचे मन सत्याशी, प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जाते. ज्यांना अशा तऱ्हेचे जीवनरत्न प्राप्त झाले तेच उत्तम प्रभूमार्गी आहेत. ज्यांचे मन सदैव गुरुचरणी एकरूप झालेले असते, त्यांचे जीवनच सार्थ होते. ॥ २० ॥

जे को सिखु गुरू सेती सनमुखु होवै ॥
होवै त सनमुखु सिखु कोई जीअहु रहै गुर नाले ॥
गुर के चरन हिरदै धिआए अंतर आतमै समाले ॥
आपु छडि सदा रहै परणै गुर बिनु अवरु न जाणै कोए ॥
कहै नानकु सुणहु संतहु सो सिखु सनमुखु होए ॥ २१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९१९)

शब्दार्थ : **जे** – जो. **को** – कोणी. **सिखु** – शिष्य. **सेती** – सह, बरोबर. **सनमुखु** – सन्मुख, सामोरे. **होवै** –

होतो. **जीअहु** – अंत:करण, मन. **नाले** – जवळ. **हिरदै** – हृदयात. **धिआए** – ध्यान करतो. **अंतर** – अंत:करणात. **आतमै** – आत्मा. **समाले** – स्मरण करतो. **आपु** – अहंभाव. **छडि** – सोडून. **परणै** – आश्रित. **बिनु** – विना. **अवरु** – अन्य. **कोए** – कोणासही. **न जाणै** – जाणत नाही. **सुणहु** – ऐका. **सो** – तो.

भावार्थ : जो कोणी खरा शिष्य असतो तो नेहमी आपल्या सतगुरूच्या सांगण्याप्रमाणे वागतो. अशा, सतगुरू सन्मुख झालेल्या शिष्याचे मन सदैव प्रभूच्या चरणी लीन होऊन राहते. तो सदैव गुरूच्या सान्निध्यात राहातो. त्याचा आत्मा सदैव सतगुरूचे ध्यान करतो. तो शिष्य आपल्या हृदयात, गुरूवचन दृढपणे धारण करतो व आपल्या अंत:करणात सतत त्याचेच स्मरण करत असतो. असा शिष्य आपला अहंभाव टाकून देतो व आपल्या सतगुरूशिवाय अन्य कोणाच्याही आश्रयास जात नाही. नानक सांगतात, हे संतजनहो ऐका ! जो शिष्य सदैव सतगुरू सन्मुख होतो, तोच खरा शिष्य होय. ॥ २१ ॥

जे को गुर ते वेमुखु होवै बिनु सतिगुर मुकति न पावै ॥
पावै मुकति न होर थै कोई पुछहु बिबेकीआ जाए ॥
अनेक जूनी भरमि आवै विणु सतिगुर मुकति न पाए,
फिरि मुकति पाए लागि चरणी सतिगुरू सबदु सुणाए ॥
कहै नानकु वीचारि देखहु विणु सतिगुर मुकति न पाए ॥ २२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२०)

शब्दार्थ : **जे** – जर. **को** – कोणी. **वेमुखु** – विमुख, दूर जाईल. **होवै** – होईल. **बिनु** – विना. **मुकति** – मुक्ती. **न पावै** – प्राप्त होत नाही. **होर थै** – दुसरे ठिकाण. **पुछहु** – विचारा. **बिबेकीआ** – विवेकी लोकांना, ज्ञानी लोकांना. **जाए** – जाऊन. **जूनी** – योनीतून. **भरमि** – फिरून, भ्रमण करून. **आवै** – आल्यावर. **सबदु** – शब्द, प्रभुनाम, उपदेश. **वीचारि** – विचार करून. **देखहु** – पाहा. **विणु** – विना.

भावार्थ : जो कोणी सतगुरूपासून दूर जाईल त्याला मुक्ती प्राप्त होत नाही. सतगुरूला शरण गेल्याशिवाय मुक्ती प्राप्त होत नाही. कोणा विवेकी, विचारी पुरुषाला विचारून पाहा, तो हेच सांगेल की सतगुरूखेरीज अन्य कोणीही तुम्हास मुक्तीचा मार्ग दाखवू शकत नाही. अनेक योनीत भटकून आल्यावरही मानवी जन्मात सतगुरूशिवाय मुक्ती नाही. सतगुरूच्या चरणी लीन झाल्यावर सतगुरू त्यास प्रभुनामाचा उपदेश देतो व तेव्हाच त्यास सतगुरूकडून मुक्तिमार्ग प्राप्त होतो. नानक सांगतात, नीट विचार करून निरखून पाहिल्यावर तुमच्या ध्यानात येईल की सतगुरूशिवाय मुक्ती प्राप्त होणे शक्य नाही. ॥ २२ ॥

आवहु सिख सतिगुरू के पिआरिहो गावहु सची बाणी ॥
बाणी त गावहु गुरू केरी बाणीआ सिरि बाणी ॥
जिन कउ नदरि करमु होवै हिरदै तिना समाणी ॥
पीवहु अंम्रितु सदा रहहु हरि रंगि जपिहु सारिगपाणी ॥
कहै नानकु सदा गावहु एह सची बाणी ॥ २३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२०)

शब्दार्थ : **आवहु** – या. **सिख** – शिष्य, मित्र. **पिआरिहो** – प्रिय जन. **गावहु** – गा. **सची बाणी** – सत्यप्रभूची

वाणी. **केरी** – ची. **सिरि** – श्रेष्ठ. **जिन** – ज्या. **कउ** – कोणाला. **नदरि** – कृपादृष्टी. **करमु** – भाग्यात. **होवै** – असेल. **हिरदै** – हृदयात. **तिना** – त्याच्या. **समाणी** – सामावणे, वास करणे. **पीवहु** – प्या. **रहहु** – राहतो. **जपिहु** – जप करा. **सारिगपाणी** – शारंगपाणी.

भावार्थ : या, शिष्यांनो या ! सतगुरूच्या प्रिय शिष्यांनो या ! सगळे मिळून सतगुरूने दिलेली सत्यवाणी, प्रभुनाम, त्याचे गायन करा. सतगुरूकडून प्राप्त झालेल्या वाणीचे सदैव गायन करा. कारण हीच वाणी सर्वांत श्रेष्ठ आहे. प्रभुनाम सर्वश्रेष्ठ आहे. ज्याच्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो त्याच्या हृदयात प्रभुनाम वास करते. त्याच्या हृदयात ते सामावून जाते, एकरूप होते. सदैव प्रभुनामाचे अमृत पीत राहावे. हरिनामाच्या रंगात रंगून जाऊन प्रभू परमात्म्याचा जप करावा. नानक सांगतात, सदैव एकमात्र सत्यवाणी – प्रभुनाम, त्याचे गायन करा. हीच वाणी सत्य आहे. ॥ २३ ॥

सतिगुरू बिना होर कची है बाणी ॥
बाणी त कची सतिगुरू बाझहु होर कची बाणी ॥
कहदे कचे सुणदे कचे कचीं आखि वखाणी ॥
हरि हरि नित करहि रसना कहिआ कछू न जाणी ॥
चितु जिन का हिरि लइआ माइआ बोलनि पए रवाणी ॥
कहै नानकु सतिगुरू बाझहु होर कची बाणी ॥ २४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२०)

शब्दार्थ : **होर** – अन्य. **कची** – कच्ची, व्यर्थ, अप्रामाणिक, निष्क्रिय, खोटी. **बाझहु** – सोडून, शिवाय. **कहदे** – सांगणारे. **सुणदे** – ऐकणारे. **आखि** – बोलणारे. **वखाणी** – दाखवणारे. **करहि** – उच्चार करतात. **कहिआ** – सांगितलेले. **जिन** – ज्या. **बोलनि** – बोलतात. **रवाणी** – पोपटपंची.

भावार्थ : सतगुरूकडून प्राप्त झालेल्या प्रभुनामाखेरीज अन्य सारे खोटे आहे. अन्य कोणतीही वाणी खोटी आहे. सतगुरूकडून प्राप्त झालेली वाणीच फक्त खरी वाणी आहे. अन्य वाणी खोटी आहे, ती वाणी सांगणारे खोटे आहेत. ऐकणारे खोटे आहेत. त्याची व्याख्या करणारे, त्यांच्यावर प्रवचन करणारे खोटे आहेत. ते सर्व मुखाने हरी हरी म्हणतात पण प्रभुनामाचे रहस्य ते जराही जाणत नाहीत. ते मायेच्या प्रभावाखाली असतात. त्यांची जीभ जरी प्रभ नाम उच्चारत असली, तरी मनात मात्र ते भौतिक गोष्टींचा, धनदौलतीचा विचार करत असतात. नानक सांगतात, सतगुरूमुखाशिवाय निघालेली सर्व वाणी खोटीच आहे. ॥ २४ ॥

गुर का सबदु रतंनु है हीरे जितु जड़ाउ ॥
सबदु रतनु जितु मंनु लागा एहु होआ समाउ ॥
सबद सेती मनु मिलिआ सचै लाइआ भाउ ॥
आपे हीरा रतनु आपे जिस नो देइ बुझाइ ॥
कहै नानकु सबदु रतनु है हीरा जितु जड़ाउ ॥ २५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२०)

शब्दार्थ : **सबदु** – शब्द, नाम, उपदेश. **रतनु** – रत्नासारखे. **जितु** – ज्यात. **जडाउ** – जडवले. **मनु** –

मनाला. **लागा** – लागला, आवडला. **एहु** – त्यात. **मिलिआ** – मिळाले, एकरूप झाले. **जिस नो** – ज्याला. **बुझाइ** – समजावून सांगितले, ज्ञान दिले.

भावार्थ : सतगुरूचा शब्द, दिलेला उपदेश, नाम हे रत्नासारखे अमूल्य आहे. त्याला प्रभुकीर्तीरूपी हिरे जडवलेले आहेत. ज्याच्या मनात हे शब्दरत्न भरले, तो त्या शब्दाशी, प्रभुनामाशी एकरूप होऊन जातो. प्रभुनामाचे व मनाचे मिलन झाले की सत्यरूप प्रभू परमात्म्याशी प्रेमभाव उत्पन्न होतो. वास्तविक प्रभू परमात्माच स्वत: हिरा आहे, रत्न आहे. पण हे त्यालाच समजते ज्याला प्रभू परमात्माच ते ज्ञान देतो. नानक सांगतात, प्रभुनामरूपी रत्नांशी आपले चित्त जोडा. ॥ २५ ॥

सिव सकति आपि उपाइ कै करता आपे हुकमु वरताए ॥
हुकमु वरताए आपि वेखै गुरमुखि किसै बुझाए ॥
तोड़े बंधन होवै मुकतु सबदु मंनि वसाए ॥
गुरमुखि जिस नो आपि करे सु होवै एकस सिउ लिव लाए ॥
कहै नानकु आपि करता आपे हुकमु बुझाए ॥ २६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२०)

शब्दार्थ : **सिव** – शिव, आत्मा. **सकति** – शक्ती, माया, स्त्री. **आपि** – परमेश्वराने. **उपाइ** – निर्माण केली, उत्पन्न केली. **करता** – कर्तापुरुष, प्रभू परमात्मा. **आपे** – आपल्या, प्रभूच्या. **वरताए** – आचरण करतात, वर्तन करतात. **वेखै** – पाहतो. **गुरमुखि** – गुरूकडून. **किसै** – कोणास. **बुझाए** – समजावले. **तोडे** – तोडले. **होवै** – झाला. **मुकतु** – मुक्त. **जिस** – ज्याला. **एकस** – एकमेव. **सिउ** – शी. **लिव लाए** – एकाग्र झाला, एकरूप झाला.

भावार्थ : पुरुष आणि प्रकृती, चैतन्य आणि शक्ती यांना प्रभू परमात्म्यानेच निर्माण केले आहे. त्यांना तो आपल्या आज्ञेच्या बंधनात ठेवून कार्यान्वित करतो. सर्व जीव प्रभू परमात्म्याच्या आज्ञेप्रमाणेच वागतात. त्यातील काहींना सतगुरूकडून हे ज्ञान प्राप्त होते. ज्या साधकाने प्रभुनाम आपल्या चित्तात दृढ केले; त्याची मोहमायेची सर्व बंधने गळून पडतात व तो मुक्त होतो. हे प्रभो ! तू स्वत: ज्यास गुरूच्या उपदेशाप्रमाणे वागण्याची प्रेरणा देतोस, तो साधक त्या एकमेव प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. नानक सांगतात, तो अकालपुरुष सर्व गोष्टींचा कर्ता आहे व त्याच्याच आज्ञेने सृष्टीचे सारे व्यवहार घडत असतात. ॥ २६ ॥

सिम्रिति सासत्र पुंन पाप बीचारदे ततै सार न जाणी ॥
ततै सार न जाणी गुरू बाझहु ततै सार न जाणी ॥
तिही गुणी संसारु भ्रमि सुता सुतिआ रैणि विहाणी ॥
गुर किरपा ते से जन जागे जिना हरि मनि वसिआ बोलहि अंम्रित बाणी ॥
कहै नानकु सो ततु पाए जिस नो अनदिनु हरि लिव लागै जागत रैणि विहाणी ॥ २७ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९२०)

शब्दार्थ : **सिम्रिति** – स्मृती. **सासत्र** – शास्त्र. **पुंन** – पुण्य. **बीचारदे** – विचार करतो. **ततै** – तत्त्व. **बाझहु** –

शिवाय. तिही – तीनही. **सुतिआ** – झोपून. **रैणि** – रात्र. **विहाणी** – घालवली, व्यतीत केली. **गुर** – गुरू. **किरपा** – कृपा. **से** – तेच. **जिना** – ज्यांच्या. **वसिआ** – वसले आहे. **बोलहि** – बोलतात. **अंम्रित** – अमृत. **अनदिनु** – दररोज. **जागत** – जागृत राहून, चैतन्य.

भावार्थ : सर्व लोक स्मृती, शास्त्रे, पाप, पुण्य ह्याविषयी बोलत असतात, विचार करत असतात, पण त्याचे सारतत्त्व मात्र कोणीही जाणत नाही. सतगुरूशिवाय अन्य कोणीही ह्या सारतत्त्वाचे ज्ञान देऊ शकत नाही. सारा संसार त्रिगुणात्मक मोहमायेत भ्रमण करत राहिला आहे. अज्ञान, अंधकारात जीवनरूपी रात्र घालवत आहे. ज्यांनी सतगुरुकृपेने आपल्या मनात प्रभुनाम दृढ केले, तेच लोक जागृत राहून सतत प्रभुनामरूपी अमृत वाणीचा उच्चार करतात. नानक सांगतात, जे जीवनरूपी रात्री जागृत राहून सतत प्रभू परमात्म्याचे ध्यान करतात त्यालाच परमतत्त्वाचे ज्ञान प्राप्त होते. ॥ २७ ॥

माता के उदर महि प्रतिपाल करे सो किउ मनहु विसारीऐ ॥
मनहु किउ विसारीऐ एवडु दाता जि अगनि महि आहारू पहुचावए॥
ओस नो किहु पोहि न सकी जिस नउ आपणी लिव लावए ॥
आपणी लिव आपे लाए गुरमुखि सदा समालिऐ ॥
कहै नानकु एवडु दाता सो किउ मनहु विसारीऐ ॥ २८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२०)

शब्दार्थ : **उदर** – पोट. **महि** – मध्ये. **प्रतिपाल** – सांभाळ. **करे** – करतो. **सो** – तो प्रभू. **विसरीऐ** – विसरलास. **एवडु** – एवढा मोठा. **जि** – जा. **अगनि** – अग्नी. **आहारू** – आहार, भोजन. **ओस** – तो प्राणी. **पहुचावए** – पोहोचवतो. **किहु** – काहीही. **पोहि** – पोचणे, स्पर्श करणे. **जिस** – ज्याला. **समालीऐ** – स्मरण करणे.

भावार्थ : हे जीवा ! ज्या प्रभू परमात्म्याने, तू मातेच्या उदरात असताना, तुझे रक्षण केले. त्याचे तुला कसे विस्मरण झाले ? त्या महादात्याने तू मातेच्या उदरात असताना तुझे पालनपोषण केले. उदराग्नीपासून तुझे रक्षण केले. त्याला तू कसा विसरतोस ? प्रभू परमात्मा ज्याचे मन आपल्यात एकरूप करतो, त्याला मोहमायादी विकार स्पर्शही करू शकत नाहीत. ज्याला प्रभू परमात्म्याने प्रभुभक्तीत रत केले त्याची भक्ती तोच सतगुरुद्वारा चिरस्थायी करतो. नानक सांगतात, एवढ्या मोठ्या दात्याचा तुझ्या मनाला का विसर पडला ? सदैव त्याचे ध्यान कर. ॥ २८ ॥

जैसी अगनि उदर महि तैसी बाहरि माइआ ॥
माइआ अगनि सभ इको जेही करतै खेलु रचाइआ ॥
जा तिसु भाणा ता जंमिआ परवारि भला भाइआ ॥
लिव छुड़की लगी त्रिसना माइआ अमरु वरताइआ ॥
एह माइआ जितु हरि विसरै मोहु उपजै भाउ दूजा लाइआ ॥

कहै नानकु गुर परसादी जिना लिव लागी तिनी विचे माइआ पाइआ ॥ २९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२१)

शब्दार्थ : **जैसी** – जसा, जशी. **अगनि** – अग्नी. **उदर** – पोट. **तैसी** – तसा, तशी. **बाहरि** – बाहेर. **माइआ** – माया. **सभ** – सगळे. **इको** – एका. **जेही** – सारखी. **करतै** – कर्ता. **खेलु** – खेळ. **रचाइआ** – रचला. **तिसु** – त्याला. **जा** – जेव्हा. **ता** – तेव्हा. **जंमिआ** – जन्मला. **परवारि** – परिवारात. **भला** – आनंद. **भाइआ** – वाटला. **लिव** – एकाग्रता. **छुडकी** – तुटली. **लगी** – लागली. **त्रिसना** – तृष्णा. **माइआ** – माया. **अमरु** – हुकूम, आज्ञा. **एह** – ही. **जितु** – ज्यामुळे. **विसरै** – विसरला. **मोहु** – मोह. **उपजै** – उत्पन्न झाला. **भाउ दूजा** – द्वैतभाव, दूजाभाव. **जिना** – ज्याने. **तिनी** – त्याने.

भावार्थ : जीवाला मातेच्या उदरात असताना जसा उदराग्नीचा ताप सहन करावा लागतो तसा बाहेर आल्यावर मोहमायेचा ताप सहन करावा लागतो. माया आणि उदराग्नी दोन्ही सारखेच तापदायक आहेत. हा सारा प्रभू परमात्म्याचाच खेळ आहे. जेव्हा प्रभू परमात्म्यास इच्छा झाली तेव्हा जीवाचा जन्म झाला व साऱ्या परिवारास आनंदी आनंद झाला. पण मातेच्या उदरात असताना त्या जीवाची जी प्रभू परमात्म्याशी एकाग्रता होती ती बाहेर येताच तुटली व जीव मोहमायेने व्यापला गेला. ह्या मायेच्या प्रभावामुळेच जीव प्रभू परमात्म्यास विसरतो, जीवाच्या मनात ह्या संसाराचा मोह उत्पन्न होतो. तो द्वैतभावात रममाण होतो. नानक सांगतात, गुरुकृपेने ज्याचे चित्त प्रभुनामात एकाग्र झाले तो मोहमायेत राहूनही, प्रपंचात राहूनही प्रभू परमात्मा प्राप्त करतो. ॥ २९ ॥

हरि आपि अमुलकु है मुलि न पाइआ जाइ ॥
मुलि न पाइआ जाइ किसै विटहु रहे लोक विललाइ ॥
ऐसा सतिगुरू जे मिलै तिस नो सिरु सउपीऐ विचहु आपु जाइ ॥
जिस दा जीउ तिसु मिलि रहै हरि वसै मनि आइ ॥
हरि आपि अमुलकु है भाग तिना के नानका जिन हरि पलै पाइ ॥ ३० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२१)

शब्दार्थ : **आपि** – स्वतः. **अमुलकु** – अमूल्य. **मुलि** – मूल्य. **किसै** – कोणी. **विटहु** – कडून. **विललाइ** – विलाप. **ऐसा** – असा. **जे** – ज्याला, जर. **तिस** – त्याला. **सिरु** – शिर. **सउनीऐ** – अर्पण करणे. **विचहु** – आतून. **जिस दा** – ज्याचा. **जीउ** – जीव. **तिसु** – त्याला. **मिलि** – मिळतो, प्राप्त होतो. **वसै** – वसतो. **भाग** – भाग्य. **तिना** – त्याचे. **जिन** – ज्याच्या. **पलै** – पदरात. **पाइ** – प्राप्त होतो.

भावार्थ : प्रभू परमात्मा अमूल्य आहे. त्याचे मोल कोणीही करू शकत नाही. त्याला प्राप्त करण्यासाठी लोक व्याकूळ होऊन विलाप करतात. वाटेल ते मोल देण्यास तयार असतात. पण कोणतेही मोल देऊन त्याला प्राप्त करता येत नाही. जर जीवास सतगुरु प्राप्त झाला व जीवाने त्याचे चरणी आपले सर्वस्व अर्पण केले, तर त्याच्या मनातील अहंभाव नष्ट होतो. असे झाल्यावर जीवास आपल्या मूळ स्वरूपाचे ज्ञान प्राप्त होते व त्याच्या मनात प्रभू परमात्म्याचा वास होतो. नानक सांगतात, तो प्रभू परमात्मा अमूल्य आहे. ज्यांना प्रभू परमात्मा आपल्याजवळ

आश्रय देऊन प्रभुनाम देतो ते जीव खरोखर परम भाग्यवान होत. ॥ ३० ॥

हरि रासि मेरी मनु वणजारा ॥
हरि रासि मेरी मनु वणजारा सतिगुर ते रासि जाणी ॥
हरि हरि नित जपिहु जीअहु लाहा खटिहु दिहाड़ी ॥
एहु धनु तिना मिलिआ जिन हरि आपे भाणा ॥
कहै नानकु हरि रासि मेरी मनु होआ वणजारा ॥ ३१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२१)

शब्दार्थ : **रासि** – भांडवल. **मेरी** – माझी. **मनु** – मन. **वणजारा** – व्यापारी. **जाणी** – जाणले. **नित** – नेहमी. **जपिहु** – जप करा. **जीअहु** – हे जीवा. **लाहा** – लाभ. **खटिहु** – कमाई. **दिहाडी** – प्रत्येक दिवशी. **एहु** – हे. **धनु** – धन. **तिना** – त्याला. **मिलिआ** – प्राप्त होते. **जिन** – ज्याने. **आपे** – स्वतः. **भाणा** – आवडला.

भावार्थ : माझे मन हे त्या हरिनामाचे व्यापारी आहे. प्रभुनाम हे माझे भांडवल आहे. प्रभुनाम ही माझी पुंजी आहे व माझे मन रामनामाचे व्यापारी आहे. ह्या माझ्या प्रभुनामरूपी राशीचे रहस्य मला माझ्या सतगुरूकडूनच प्राप्त झाले आहे. हे माझ्या मना ! तू सदैव हरिनामाचा जप कर. तू दिन-प्रतिदिन रामनामाची कमाई कर. प्रभू परमात्म्यास जो आवडला त्यासच ही प्रभुनामाची पुंजी प्राप्त होते. नानक सांगतात, नाम हीच माझी पुंजी, हेच माझे भांडवल आणि माझे मन त्याचाच व्यापार करत आहे. ॥ ३१ ॥

ए रसना तू अन रसि राचि रही तेरी पिआस न जाइ ॥
पिआस न जाइ होरतु कितै जिचरु हरि रसु पलै न पाइ ॥
हरि रसु पाइ पलै पीऐ हरि रसु बहुड़ि न त्रिसना लागै आइ ॥
एहु हरि रसु करमी पाईऐ सतिगुरु मिलै जिसु आइ ॥
कहै नानकु होरि अन रस सभी वीसरे जा हरि वसै मनि आइ ॥ ३२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२१)

शब्दार्थ : **ए** – हे. **रसना** – जीभ, जिव्हा. **अन** – अन्य. **रसि** – रसात. **राचि रही** – रममाण झालीस. **तेरी** – तुझी. **पिआस** – तहान. **होरतु** – अन्य. **कितै** – कुठे. **जिचरु** – जोपर्यंत. **पलै** – पदरात. **न पाइ** – प्राप्त होत नाही. **पीऐ** – पिऊन. **बहुडि** – परत. **त्रिसना** – तृष्णा. **एह** – हा. **करमी** – कर्माने. **पाईऐ** – प्राप्त होते. **आइ** – येऊन. **सभि** – सर्व. **वीसरे** – विसरतात. **जा** – जेव्हा.

भावार्थ : हे जिव्हे ! प्रभुनाम न घेता तू अन्य सांसारिक रसांचा आस्वाद घेण्यात रंगून गेलीस, त्यामुळे तुझी तहान भागली नाही. ही कधीही न संपणारी पिपासा, विषयविकारांची तहान जोपर्यंत तू प्रभूनाम रसाची चव चाखत नाहीस, तोपर्यंत शमणार नाही. एकदा प्रभुनामरसाची गोडी चाखलीस की अन्य विषयविकाराची तुला तहानच लागणार नाही. पण हे हरिनामरसामृत कर्मानेच एखाद्यास सतगुरूकडून प्राप्त होते. नानक सांगतात, जेव्हा मनात प्रभू परमात्मा वास करतो, तेव्हा मोहमायेचा, विषयविकारांचा व सर्व रसांचा विसर पडतो. ॥ ३२ ॥

ए सरीरा मेरिआ हरि तुम महि जोति रखी ता तू जग महि आइआ ॥
हरि जोति रखी तुधु विचि ता तू जग महि आइआ ॥
हरि आपे माता आपे पिता जिनि जीउ उपाइ जगतु दिखाइआ ॥
गुर परसादी बुझिआ ता चलतु होआ चलतु नदरी आइआ ॥
कहै नानकु स्त्रिसटि का मूलु रचिआ जोति राखी ता तू जग महि आइआ ॥ ३३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९२१)

शब्दार्थ : **ए** – हे. **सरीरा** – शरीरा. **मेरिआ** – माझ्या. **महि** – मध्ये. **जोति** – ज्योत. **रखी** – ठेवली. **ता** – तेव्हा. **आइआ** – आलास. **तुधु** – तुझ्यात. **विचि** – मध्ये. **जिनि** – ज्याने. **जीउ** – जीव. **उपाइ** – उत्पन्न केले. **दिखाइआ** – दाखवले. **परसादी** – कृपेने. **बुझिआ** – जाणले. **चलतु** – लीला. **नदरी** – दृष्टीस, नजरेस. **स्त्रिसटि** – सृष्टी. **मूलु** – मूळ. **रचिआ** – रचला.

भावार्थ : हे माझ्या शरीरा ! त्या प्रभू परमात्म्याने तुझ्या हृदयात आत्मज्योत ठेवून तुला जगात जन्म दिला. प्रभू परमात्म्याचा अंश तुझ्यात घेऊन तू या जगात आलास. ज्या प्रभू परमात्म्याने सर्व जीवांना उत्पन्न करून हे जग दाखवले तोच तुझी माता, तोच तुझा पिता आहे. तो साऱ्या जीवांचा मातापिता आहे. सतगुरुकृपेने हे ज्ञान प्राप्त झाले की, त्याने उत्पन्न केलेले जग, त्यात उत्पन्न केलेले सारे जीवजंतू हा त्याचा खेळ आहे, हा एक चमत्कार आहे, हे लक्षात येते. नानक सांगतात, त्या प्रभू परमात्म्याने मुळात या सृष्टीची रचना केली. त्यात आपली आत्मज्योत स्थापित केली. मगच त्याने तुला या जगात आणले. तेव्हाच तू या जगात आलास. ॥ ३३ ॥

मनि चाउ भइआ प्रभ आगमु सुणिआ ॥
हरि मंगलु गाउ सखी ग्रिहु मंदरु बणिआ ॥
हरि गाउ मंगलु नित सखीए सोगु दूखु न विआपए ॥
गुर चरन लागे दिन सभागे आपणा पिरु जापए ॥
अनहत बणी गुर सबदि जाणी हरि नामु हरि रसु भोगो ॥
कहै नानकु प्रभु आपि मिलिआ करण कारण जोगो ॥ ३४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२१)

शब्दार्थ : **मनि** – मनात, मनाला. **चाउ** – आवड, चव, गोडी. **भइआ** – झाला. **आगमु** – आगमन. **सुणिआ** – ऐकले. **मंगलु** – मंगलगीत. **गाउ** – गावे. **ग्रिहि** – घर. **मंदरु** – मनमंदिर. **बणिआ** – बनले. **सोगु** – शोक. **दूखु** – दुःख. **विआपए** – व्यापणे. **दिन** – दिवस. **सभागे** – सौभाग्य. **आपणा** – आपला. **पिरु** – प्रियतम. **जापए** – दिसू लागतो. **भोगो** – भोगतो. **जोगे** – योग्य, समर्थ. **मिलिआ** – मिळाले. **करण कारण** – कार्य करणारा, कार्य करण्यास समर्थ.

भावार्थ : माझ्या हृदयी प्रभू परमात्म्याचे आगमन झाल्याचे ऐकून माझे मन आनंदविभोर झाले. माझ्या मनात प्रभुनामाचे आगमन झाल्याने माझे मन उल्हसित झाले आहे. या सख्यांनो, सतसंगी सख्यांनो या. प्रभूची मंगलगीते गाऊ या. आता हे माझे घर (शरीर) प्रभूचे मंदिर झाले आहे. सख्यांनो ! सदैव प्रभू परमात्म्याची मंगलगीते गायल्याने

मनाला दुःख, शोक व्यापत नाहीत, मन सदैव प्रफुल्लित राहते. सतगुरूच्या चरणांपाशी लीन झाल्याने दिवस आनंदात जातो, सौभाग्य प्राप्त होते, प्रभू परमात्म्याची अनुभूती प्राप्त होते. सतगुरूचा उपदेश जाणल्याने प्रभू परमात्म्याचा अनाहत नाद हृदयात निनादू लागतो. प्रभुनाम रसपानाचा उपभोग प्राप्त होतो. नानक सांगतात, मग सर्व काही करणारा, सर्व काही करण्यास समर्थ असणारा, तो प्रभू परमात्मा आपोआप प्राप्त होतो. ॥ ३४ ॥

ए सरीरा मेरिआ इसु जग माहि आइ कै किआ तुधु करम कमाइआ ॥
कि करम कमाइआ तुधु सरीरा जा तू जग महि आइआ ॥
जिनि हरि तेरा रचनु रचिआ सो हरि मनि न वसाइआ ॥
गुर परसादी हरि मंनि वसिआ पूरबि लिखिआ पाइआ ॥
कहै नानकु एहु सरीरु परवाणु होआ जिनि सतिगुर सिउ चितु लाइआ ॥ ३५ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९२२)

शब्दार्थ : **इसु** – या. **कै** – काय. **किआ** – केले. **तुधु** – तू. **कि** – काय. **कमाइआ** – कमावले, केले. **जा** – जेव्हा. **जिनि** – ज्याने, ज्या प्रभूने. **रचिआ** – रचना केली, निर्माण केले. **वसाइआ** – वसवले. **गुर परसादी** – गुरुकृपेने. **पूरबि** – पूर्वी, पूर्वजन्मापासून. **एहु** – हे. **परवाणु** – स्वीकार. **सिउ** – शी, बरोबर.

भावार्थ : हे माझ्या शरीरा ! या जगात येऊन तू काय सत्कर्म केलेस ? जेव्हापासून तू या जगात आलास, तेव्हापासून तू इतर कर्मे केलीस. नामस्मरण का केले नाहीस ? प्रभू परमात्म्यास तू आपल्या हृदयात का स्थापित केले नाहीस ? पूर्वसुकृताने आता तुला सतगुरू लाभला आहे व त्याच्या कृपेने तुझ्या चित्तात प्रभू परमात्मा वसला आहे. नानक सांगतात, ज्याने सतगुरुचरणी आपले चित्त लीन केले आहे. त्याचे शरीर सार्थकी लागले. ॥ ३५ ॥

ए नेत्रहु मेरिहो हरि तुम महि जोति धरी हरि बिनु अवरु न देखहु कोई ॥
हरि बिनु अवरु न देखहु कोई नदरी हरि निहालिआ ॥
एहु विसु संसारु तुम देखदे एहु हरि का रूपु है हरि रूपु नदरी आइआ ॥
गुर परसादी बुझिआ जा वेखा हरि इकु है हरि बिनु अवरु न कोई ॥
कहै नानकु एहि नेत्र अंध से सतिगुरि मिलिऐ दिब द्रिसटि होई ॥ ३६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९२२)

शब्दार्थ : **ए नेत्रहु** – हे नेत्रांनो. **मेरिहो** – माझ्या. **महि** – मध्ये. **जोति** – ज्योत. **धरी** – ठेवली. **अवरु** – अन्य. **देखहु** – पाहाणे. **कोई** – कोणासही. **पिहालिआ** – आनंदित केले. **नदरी** – नजरेने, कृपेने. **विसु** – विष. **देखदे** – पाहतोस. **बुझिआ** – जाणले, समजले. **जा** – जेव्हा. **वेखा** – पाहिले. **अंध** – अंधळे. **दिब** – दिव्य. **द्रिसटि** – दृष्टी.

भावार्थ : हे माझ्या डोळ्यांनो ! प्रभू परमात्म्याच्या ज्योतीने तुम्ही प्रकाशित झाला आहात. त्याच्याशिवाय तुम्ही अन्य काहीही पाहू नका. हे डोळ्यांनो ! तुम्ही केवळ त्या प्रभू परमात्म्यासच पाहा, अन्य कोणाकडेही तुमची

दृष्टी वळवू नका. हा जो सारा संसार तुम्ही पाहत आहात ते त्या प्रभू परमात्म्याचेच सगुण रूप आहे. ह्या संसारात असलेल्या प्रभू परमात्म्यास तुम्ही आपल्या नजरेने पाहा. सतगुरूकडून हे ज्ञान प्राप्त झाले की, सर्वत्र तो एकमात्र प्रभू परमात्मा भरून राहिला आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही नाही. नानक सांगतात, माझे हे नेत्र मायेच्या अंधकाराने अंधळे झाले होते, पण सतगुरू प्राप्त झाल्यामुळे मला आता दिव्यदृष्टी प्राप्त झाली आहे. त्यामुळे मला आता सर्वत्र तो केवळ प्रभू परमात्माच दिसत आहे. ॥ ३६ ॥

ए स्रवणहु मेरिहो साचै सुनणै नो पठाए ॥
साचै सुनणै नो पठाए सरीरि लाए सुणहु सति बाणी ॥
जितु सुणी मनु तनु हरिआ होआ रसना रसि समाणी ॥
सचु अलख विडाणी ता की गति कही न जाए ॥
कहै नानकु अंम्रितु नामु सुणहु पवित्र होवहु साचै सुनणै नो पठाए ॥ ३७ ॥.

(श्री गु. ग्रं. सा. ९२२)

शब्दार्थ : **ए स्त्रवणहु** – हे कानांनो. **मेरिहो** – माझ्या. **साचै** – सत्य. **सुनणै** – ऐकणे. **नो** – करिता. **पठाए** – पाठवले. **सरीरि** – शरीराला. **लाए** – लावले. **जितु** – जे. **सुणी** – ऐकून. **मनु** – मन. **तनु** – तन. **हरिआ** – प्रसन्न. **होआ** – झाले. **रसना** – जिव्हा, जीभ. **रसि** – प्रभुनामरसात. **समाणी** – सामावली. **सचु** – सत्यस्वरूप, परमात्मा. **अलख** – अलक्ष्य, अदृष्ट, न दिसणारा. **विडाणी** – आश्चर्यजनक. **ता की** – त्याची. **गति** – दशा, अवस्था, गत. **होवहु** – होऊन.

भावार्थ : हे माझ्या कानांनो ! तुम्हाला त्या सत्यस्वरूप परमात्म्याचे बोल ऐकण्याकरिता या जगात पाठवले आह. सत्यस्वरूप प्रभू परमात्म्याचे नाम ऐकण्यासाठी या शरीरास जोडले आहे. तुम्ही सत्यशब्द ऐका. प्रभू परमात्म्याचे बोल ऐकल्याने तन, मन प्रसन्न होते, जिव्हाही हरिनाम रसात सामावून जाते. हे एक आश्चर्य आहे, की तो प्रभू परमात्मा अलक्ष्य आहे, अगोचर आहे, चर्मचक्षूंना दिसत नाही. त्याची गती, त्याचे वर्णन कोणी करू शकत नाही. नानक सांगतात, हे कानांनो, तुम्हास प्रभूचे बोल ऐकण्यासाठी येथे पाठवले आहे म्हणून तुम्ही प्रभूचे अमृत मधुर नाम ऐका व पवित्र व्हा. ॥ ३७ ॥

हरि जीउ गुफा अंदरि रखि कै वाजा पवणु वजाइआ ॥
वजाइआ वाजा पउण नउ दुआरे परगटु कीए दसवा गुपतु रखाइआ ॥
गुरदुआरै लाइ भावनी इकना दसवा दुआरु दिखाइआ ॥
तह अनेक रूप नाउ नव निधि तिस दा अंतु न जाइ पाइआ ॥
कहै नानकु हरि पिआरै जीउ गुफा अंदरि रखि कै वाजा पवणु वजाइआ ॥ ३८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२२)

शब्दार्थ : **जीउ** – जीव, प्राण. **गुफा** – शरीररूपी गुहा. **अंदरि** – आत. **रखि** – ठेवले. **वाजा** – बाजा. **पवणु** – प्राण, श्वास. **वजाइआ** – वाजवतो. **नउ दुआरे** – नऊ द्वारातून. **परगटु** – प्रगट. **कीए** – केले. **दसवा** – दहावा. **गुपतु** – गुप्त. **रखाइआ** – ठेवले. **गुरदुआरै** – गुरूकडून, गुरुद्वारा. **भावनी** – श्रद्धा, भक्ती, प्रेम. **इकना** – कित्येकांना. **दसवा दुआरु** – दशम द्वार. **दिखाइआ** – दाखवले. **तह** – तेथे. **तिस दा** – त्याचा. **अंतु** – अंत. **पाइआ** – प्राप्त होणे. **पिआरै** – प्रिय.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने जीवास शरीररूपी गुहेत ठेवून श्वास प्रश्वासाचा बाजा वाजवला, म्हणजे बोलण्याची शक्ती दिली. नवीन जन्माला आलेल्या जीवाने श्वासोच्छ्वासाची क्रिया सुरू केली. श्वासोच्छ्वासातून नाक, कान, डोळे यांच्याद्वारे प्रभू परमात्मा प्रकट होतो. दहावे द्वार (ब्रह्मरंध्र) मात्र गुप्त ठेवले. सतगुरूवर निष्ठा ठेवून त्याच्या सांगण्याप्रमाणे आचरण करणाऱ्याचे दशमद्वार (ब्रह्मरंध्र) उघडले जाते व जीवाचे प्रभू परमात्म्याशी संधान जुळते. तेथे दशमद्वारात नानारूपी, नानानामी, नवनिधीसंपन्नता दिसू लागते. त्या प्रभू परमात्म्याचा अंत लागत नाही. नानक सांगतात, अशा रीतीने प्रिय प्रभू परमात्म्याने शरीररूपी गुहेत आत्म्याची स्थापना करून श्वासरूपी मंगलवाद्य वाजवून जीवास चालना दिली. ॥ ३८ ॥

एहु साचा सोहिला साचै घरि गावहु ॥
गावहु त सोहिला घरि साचै जिथै सदा सचु धिआवहे ॥
सचो धिआवहि जा तुधु भावहि गुरमुखि जिना बुझावहे ॥
इह सचु सभना का खसमु है जिसु बखसे सो जनु पावहे ॥
कहै नानकु सचु सोहिला सचै घरि गावहे ॥ ३९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२२)

शब्दार्थ : **एहु** – हे. **साचा** – खरे. **सोहिला** – मंगलगीत. **साचै घरि** – सत्याचे घरी, संतसंगतीत. **गावहु** – गा. **जिथै** – जेथे. **सदा** – नेहमी. **सचु** – प्रभू परमात्मा. **धिआवहे** – स्मरण केले जाते, ध्यान केले जाते. **जा** – जेव्हा. **तुधु** – तुला. **भावहि** – आवडेल. **गुरमुखि** – गुरूकडून. **जिना** – ज्यांना. **बुझावहे** – समजावणे, ज्ञान प्राप्त होणे. **इहु** – हे. **सभना** – सर्वांचा. **खसमु** – स्वामी, पती, प्रभू. **जिसु** – ज्याला. **बखसे** – कृपा करतो. **सो** – तो. **पावहे** – प्राप्त करतो.

भावार्थ : सत्यरूप प्रभू परमात्म्याचे मंगलगीत आपल्या अंत:करणात सदैव गावे. संतसंगतीत जेथे सदैव प्रभुनामाचे स्मरण होत असते. तेथे प्रभूचे मंगलगीत सतत गायले जाते. ज्याला सतगुरूकडून हे ज्ञान प्राप्त होते त्याला सत्यरूप परमात्म्याचे ध्यान करणे आवडते. तो सत्यरूप परमात्मा जीवमात्रांचा स्वामी आहे. तो ज्याच्यावर कृपा करतो त्यासच तो प्राप्त होतो. नानक सांगतात, हे जीवा ! आपल्या सत्यरूप अंत:करणात तू सत्यरूप प्रभू परमात्म्याचे मंगलगान गात राहा. ॥ ३९ ॥

अनदु सुणहु वडभागीहो सगल मनोरथ पूरे ॥
पारब्रहमु प्रभु पाइआ उतरे सगल विसूरे ॥
दूख रोग संताप उतरे सुणी सची बाणी ॥
संत साजन भए सरसे पूरे गुर ते जाणी ॥

सुणते पुनीत कहते पवितु सतिगुरू रहिआ भरपूरे ॥
बिनवंति नानकु गुर चरण लागे वाजे अनहद तूरे ॥ ४० ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२२)

शब्दार्थ : **अनदु** – आनंद. **सुणहु** – ऐका. **वडभागीहो** – महाभाग्यवान लोकहो. **सगळ** – सगळे. **पूरे** – पूर्ण. **पारब्रहमु** – परब्रह्म. **पाइआ** – प्राप्त झाला. **उत्तरे** – दूर होतात. **विसूरे** – दुःख, कष्ट. **साजन** – सज्जन. **सरसे** – प्रसन्न, चांगले गुणवान. **पूरे गुर** – पूर्णगुरू. **जाणी** – जाणतो. **पुनित** – पवित्र. **सुणते** – ऐकल्याने. **कहते** – बोलताना. **बिनवंति** – विनयशील.

भावार्थ : हे महा भाग्यशाली जीवांनो ! ही आनंद वाणी ऐकणाऱ्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतात. परब्रह्म प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ही सत्यवाणी ऐकल्याने ऐकणाऱ्याचे सर्व दुःख, रोग, संताप दूर होतात व त्यांना आत्मिक आनंद प्राप्त होतो. ही वाणी पूर्णगुरूकडूनच समजावून घ्यावी. ही वाणी पूर्णगुरूकडून जाणून घेऊन संतसज्जन प्रभुतल्लीन होतात. जे कोणी ही वाणी ऐकतात ते पवित्र होतात. जे ही वाणी सांगतात तेही पवित्र होतात. ही वाणी सांगणाऱ्यांना व ऐकणाऱ्यांना हे ज्ञान प्राप्त होते की प्रभू परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे. तो सर्वव्याप्त आहे. नानक विनयपूर्वक सांगतात, की जे सतगुरुचरणी लीन होतात ते परम आनंद प्राप्त करतात. त्यांच्या हृदयात प्रभू परमात्म्याचा अनाहत नाद निनादत राहतो. ॥ ४० ॥ १ ॥

रामकली सदु

हे पद रामकली रागामध्ये निबद्ध असून सहा कडव्यांचे आहे. याची रचना, तिसरे गुरू श्री गुरू अमदारसजी यांच्या वैकुंठागमनाच्या वेळी त्यांचे पणतू, बाबा सुंदरजी यांनी केली. 'सदु' हा एक काव्यप्रकार आहे. यामध्ये गुरू अमरदासजींनी आपल्या भक्तांना व कुटुंबीयांना केलेला उपदेश समाविष्ट केला आहे.

एक ओंकार सतिगुरू प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. तो सतगुरुकृपेने प्राप्त होतो.

जगि दाता सोइ भगति वछलु तिहु लोइ जीउ ॥
गुर सबदि समावए अवरू न जाणै कोइ जीउ ॥
अवरो न जाणहि सबदि गुर कै एकु नामु धिआवहे ॥
परसादि नानक गुरू अगंद परम पदवी पावहे ॥
आइआ हकारा चलणवारा हरि राम नामि समाइआ ॥
जगि अमरु अटलु अतोलु ठाकरू भगति ते हरि पाइआ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२३)

शब्दार्थ : **सदु** – प्रभूकडील बोलावणे, शब्द, वचन, गीत–विषेश. **जगि** – जगात, संसारात. **सोइ**– तोच. **भगति वछलु** – भक्तवत्सल. **तिहु** – तीन. **लोइ** – लोक. **सबदि** – नाम. **समावए** – सामावणे. **अवरू** – अन्य. **धिआवहे** – ध्यान करणे, आराधना करणे. **परसादि** – कृपेच्या द्वारे. **आइआ** – आला. **हकारा** – हाकारा, बोलाविणे. **चलवणारा** – चलण्याचा. **नामि समाइआ** – नामात सामावून गेला. **भगति** – भक्तिद्वारे.

भावार्थ : संसाराचा दाता प्रभू परमात्मा हा तिन्ही लोकांत भक्तवत्सल म्हणून ओळखला जातो. सतगुरूच्या वचनाशिवाय त्यास कोणी जाणू शकणार नाही. जो केवळ एकमात्र प्रभू परमात्म्याच्या नामाचे स्मरण करतो त्यासच सतगुरूच्या उपदेशाच्या रूपाने प्रभूचे नाम प्राप्त होते. असा भक्त प्रभू परमात्म्याशिवाय अन्य कोणालाही जाणत नाही. श्री गुरू अंगददेव यांना श्री गुरू नानकदेव यांच्या कृपेने प्रभुनाम प्राप्त झाले आणि ते परमपदास पोहोचले. प्रभूचे बोलावणे आल्यावर ते प्रभुनामात विलीन झाले. अशा रीतीने श्री गुरू अमरदासजींनी आपल्या अनन्य सेवा व भक्तीने अटल, अमर, अतुलनीय अशा प्रभू परमात्म्यास प्राप्त केले. ॥ १ ॥

हरि भाणा गुर भाइआ गुरू जावै हरि प्रभ पासि जीउ ॥
सतिगुरू करे हरि पहि बेनती मेरी पैज रखहु अरदासि जीउ ॥
पैज राखहु हरि जनह केरी हरि देहु नाम निरंजनो ॥
अंति चलदिआ होइ बेली जमदूत कालु निखंजनो ॥
सतिगुरू की बेनती पाई हरि प्रभि सुणी अरदासि जीउ ॥
हरि धारि किरपा सतिगुरू मिलाइआ धनु धनु कहै साबासि जीउ ॥ २ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९२३)

शब्दार्थ : **भाणा** – इच्छा, आज्ञा. **गुरू भाइआ** – गुरूला आवडली. **पासि**– जवळ. **देहु** – दे, प्रदान कर. **निरंजनो** – मायातीत. **अंति** – अंतिम समयी. **बेली** – सहायक. **जमदूत** – यमदूत. **निखंजनो** – विनाश करणारा. **सतिगुरू** – सतगुरू. **बेनति** – विनंती. **अरदासि** – प्रार्थना. **धनु धनु** – धन्य, धन्य. **साबासि** – शाबासकी.

भावार्थ : श्री गुरू अमरदासजींनी प्रभू परमात्म्याची आज्ञा स्वीकारली आणि ते प्रभू परमात्म्याकडे जाण्यासाठी तयार झाले. सतगुरू प्रभूस विनंती करत आहेत की, ''हे प्रभू ! माझे रक्षण कर. आपल्या भक्तमंडळींचेही रक्षण कर. हे मायातीत प्रभू ! मला तुझे नाम प्रदान कर. कारण यमरूपी काळाचा विनाश करणारे तुझे हे नामच हे जग सोडताना शेवटी सहायक होईल. ''सतगुरूने केलेली ही प्रार्थना प्रभू परमात्म्याने ऐकली आणि त्यांना प्रेमपूर्वक आपल्यामध्ये सामावून घेतले. हे पाहून त्यासमयी उपस्थित असणाऱ्या सर्व लोकांनी ''धन्य, धन्य'' असा जयजयकार करणारा जयघोष केला.॥ २ ॥

मेरे सिख सुणहु पुत भाईहो मेरै हरि भाणा आउ मै पासि जीउ ॥
हरि भाणा गुरू भाईआ मेरा हरि प्रभू करे साबासि जीउ ॥
भगतु सतिगुरू पुरखु सोई जिसु हरि प्रभ भाणा भावए ॥
आनंद अनहद वजहि वाजे हरि आपि गलि मेलावए ॥

तुसी पुत भाई परवारु मेरा मनि वेखहु करि निरजासि जीउ ॥
धुरि लिखिआ परवाणा फिरै नाही गुरू जाइ हरि प्रभ पासि जीउ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२३)

शब्दार्थ : **सुणहु** – ऐका. **पुरखु** – परमपुरूष, परमात्मा. **अनहद** – अनाहद. **वजहि** – वाजतात. **गलि मेलावए** – आलिंगन देणे. **तुसी** – तुम्ही. **वेखहु** – पाहाणे. **निरजासि** – निर्णय. **धूरि** – भाग्यात. **परवाणा** – आदेश, हुकूम, आज्ञा. **फैरि नाही** – टळत नाही.

भावार्थ : गुरू अमरदासजी महणाले ''हे माझ्या शिष्यांनो, मुलांनो, बंधूंनो ! माझ्या प्रभू परमात्म्याची अशी आज्ञा आहे, की मी त्याच्याकडे जावे. प्रभूची ही आज्ञा मला प्राप्त झाली आहे, की माझ्याजवळ ये.'' प्रभूचा आदेश गुरूजींना आवडला. अशांना प्रभू परमात्मा शाबासकी देतो. खरा भक्त तोच की जो सतगुरू आणि कर्तापुरुष प्रभू परमात्म्याची आज्ञा शिरोधार्य मानतो. प्रभुमिलनाच्या समयी भक्तांच्या हृदयात आनंदाची अनाहत वाद्ये वाजू लागतात. प्रभू परमात्मा स्वत: त्यास आलिंगन देतो. ''तुम्ही सर्वजण माझी लेकरं आहात; तुम्हीच माझे कुटुंबीय आहात; तुम्ही मनाशी एक खूणगाठ नक्की बांधा की प्रभू परमात्म्याच्या दरबारी लिहिलेला आदेश कधीही टाळता येत नाही आणि म्हणूनच मी त्याच्याकडे जात आहे.'' ॥ ३ ॥

सतिगुरि भाणै आपणै बहि परवारु सदाइआ ॥
मत मै पिछे कोई रोवसी सो मै मूलि न भाईआ ॥
मितु पैझै मितु बिगसै जिसु मित की पैज भावए ॥
तुसी वीचारि देखहु पुत भाई हरि सतिगुरू पैनावए ॥
सतिगुरू परतखि होदै बहि राजु आपि टिकाइआ ॥
सभि सिख बंधप पुत भाई रामदास पैरी पाईआ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२३)

शब्दार्थ : **बहि** – बसून. **सदाइआ** – बोलाविले. **रोवसी** – रडणे. **मूलि** – मुळीच, बिलकुल, अजिबात. **मितु** – मित्र. **पैझै** – सन्मान. **बिगसै** – विकसित होणे, प्रसन्न होणे. **पैज** – प्रतिष्ठा. **पैनावए** – सन्मान वस्त्र घालतात. **परतखि** – प्रत्यक्ष. **होदै** – होणार. **राजु** – राज्य, गादी, गुरू-पद. **टिकाइआ** – प्रदान केली. **बंधप** – बांधव. **पैरी पाईआ** – पाया पडणे.

भावार्थ : सतगुरू अमरदासांनी आपल्या इच्छेनुसार आपल्या कुटुंबाला जवळ बोलावून घेतले आणि सांगितले की, ''माझ्या पश्चात कोणीही रडलेलं मला अजिबात आवडणार नाही. ज्याचं मित्रावर प्रेम असते तो त्या मित्राची प्रतिष्ठा वाढल्यावर आनंदी होतो. मला प्रभू परमात्मा आपल्याजवळ बोलावून जणू माझा सन्मानच करत आहे म्हणून सतगुरूच्या सुहृदांनी म्हणजे तुम्ही रडण्याच्या ऐवजी प्रसन्नच झाले पाहिजे.'' सतगुरू पुढे म्हणतात, ''हे माझ्या मुलांनो आणि बंधूंनो ! तुम्ही एकदा विचार करून पाहा की तो प्रभू परमात्मा तुमच्या सतगुरूला (म्हणजे मला) सन्मानाचे महावस्त्र प्रदान करत आहे.'' असा उपदेश करून सतगुरू अमरदासांनी गुरू रामदासांना गुरूपदी

विराजित केले. उपस्थित सर्व शिष्य, सर्व जण, बंधू, मुले-बाळे या नव्यानेच गुरूपदी बसलेल्या सतगुरू रामदासांच्या पाया पडू लागले. ॥ ४ ॥

अंते सतिगुरू बोलिआ मै पिछे कीरतनु करिअहु निरबाणु जीउ ॥
केसो गोपाल पंडित सदिअहु हरि हरि कथा पड़हि पुराणु जीउ ॥
हरि कथा पड़िऐ हरि नामु सुणीऐ बेबाणु हरि रंगु गुर भावए ॥
पिंडु पतलि किरिआ दीवा फुल हरि सरि पावए ॥
हरि भाइआ सतिगुरू बोलिआ हरि मिलिआ पुरखु सुजाणु जीउ ॥
रामदास सोढी तिलकु दीआ गुर सबदु सचु नीसाणु जीउ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२३)

शब्दार्थ : **कीरतनु** – कीर्तन. **निरबाणु** – निर्वाण. **केसो गोपाल पंडित** – भक्त मंडळी किंवा संतजन. **सदिअहु** – बोलावून घ्या. **बेबाणु** – विमान, तिरडी. **पिंडु** – पिंड, शरीर. **पतलि** – पत्रावळ. **किरिआ** – क्रियाकर्म करणे. **दीवा** – दिवा. **सरि** – सरोवर. **पावए** – वाहिले. **तिलकु दीआ** – टिळा लावणे, वारस म्हणून नेमणे. **नीसाणु** – निशाणी.

भावार्थ : अखेरीस सतगुरू अमरदासजींनी सांगितले, ''माझ्या पश्चात प्रभू परमात्म्याचे गुणगान केले जावे. परमेश्वराच्या संतजनांना बोलावून घ्या. ते हरीचे कथा-कीर्तन करतील.'' हरिपाठाचे वाचन करतील, हरीचे नाम ऐकवतील. श्री गुरू सांगतात, मला प्रभु प्रेमरूपी वाहनातून न्या. तेच मला आवडेल. पत्रावळीवर पिंडदान करणे, दिवा लावणे, फूल वाहणे इ. कर्मकांडापेक्षा प्रभुनामरूपी सरोवरात डुंबणे म्हणजेच सतसंगात तल्लीन होणे अधिक महत्त्वाचे आहे. जे प्रभू परमात्म्यास भावते तेच सतगुरूंनी सांगितले. त्यांना सुजाण, आदिपुरुष असा प्रभू परमात्मा प्राप्त झाला. त्यांनी गुरू रामदास सोढींना आपला उपदेशरूपी टिळा लावून त्यांना गुरूपदी स्थापित केले व स्वत:चे वारस म्हणून नेमले. ॥ ५ ॥

सतिगुरू पुरखि जि बोलिआ गुरसिखा मंनि लई रजाइ जीउ ॥
मोहरी पुतु सनमुखु होईआ रामदासै पैरी पाइ जीउ ॥
सभ पवै पैरी सतिगुरू केरी जिथै गुरू आपु रखिआ ॥
कोई करि बखीली निवै नाही फिरि सतिगुरू आणि निवाइआ ॥
हरि गुरहि भाणा दीई वडिआई धुरि लिखिआ लेखु रजाइ जीउ ॥
कहै सुंदरु सुणहु संतहु सभु जगतु पैरी पाइ जीउ ॥ ६ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२४)

शब्दार्थ : **गुरसिखा** – गुरूच्या शिष्यांनी. **रजाइ** – आज्ञा. **मोहरी पुतु** – गुरू अमरदासांचा पुत्र मोहरी. **सनमुखु** – समक्ष, सन्मुख. **पैरी** – पायांवर. **आपु** – आपण स्वत:. **रखिआ** – ठेवले. **बखीली** – ईर्षा, द्वेषबुद्धी. **निवै** – झुकलेला, नतमस्तक झालेला. **आणि** – आणून. **निवाइआ** – शरण येण्यास लावले, विनम्र बनवले.

वडिआई – मोठेपणा, सन्मान. **लिखिआ** – भाग्यलेख, ललाटलेख.

भावार्थ : सतगुरू महापुरुषाने (अमरदासजींनी) जो उपदेश केला त्याचा शिष्यांनी आज्ञा म्हणून स्वीकार केला. त्यांनी आपला पुत्र मोहरीला बोलावून त्याला गुरू रामदासांना प्रणाम करायला सांगितले. जिथे सतगुरूंनी गुरू रामदासांना गुरूपदी बसवले होते, तिथेच सर्वजण गुरू रामदासांच्या पाया पडले. कोणी ईर्षा भावनेने नतमस्तक होण्यास नकार दिला. त्यालाही सतगुरूंनी आपल्या प्रेमाने शरण येण्यास भाग पाडले. प्रभू परमात्म्यानेही गुरूंच्या इच्छेचा मान राखून त्यांना मोठेपणा प्रदान केला आणि त्यांच्या वचनांना ललाटलेखांचा दर्जा दिला. बाबा सुंदरजी सांगतात, ''ऐका संत–सज्जनहो आता सर्व जग गुरू रामदासांच्या चरणी लीन झाले आहे !'' ॥ ६ ॥१॥

रामकली महला ५ छंत

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

साजनड़ा मेरा साजनड़ा निकटि खलोइअड़ा मेरा साजनड़ा ॥
जनीअड़ा हरि जानीअड़ा नैण अलोइअड़ा हरि जानीअडा ॥
नैण अलोइआ घटि घटि सोइआ अति अंम्रित प्रिअ गूड़ा ॥
नालि होवंदा लहि न सकंदा सुआउ न जाणै मूड़ा ॥
माइआ मदि माता होछी बाता मिलणु न जाई भरम धड़ा ॥
कहु नानक गुर बिनु नाही सूझै हरि साजनु सभ कै निकटी खड़ा ॥ १ ॥
गोबिंदा मेरे गोबिंदा प्राण अधारा मेरे गोबिंदा ॥
किरपाला मेरे किरपाला दान दातारा मेरे किरपाला ॥
दान दातारा अपर अपारा घट घट अंतरि सोहनिआ ॥
इक दासी धारी सबल पसारी जीअ जंत लै मोहनिआ ॥
जिस नो राखै सो सचु भाखै गुर का सबदु बीचारा ॥
कहु नानक जो प्रभ कउ भाणा तिसही कउ प्रभु पिआरा ॥ २ ॥
माणो प्रभ माणो मेरे प्रभ का माणो ॥
जाणो प्रभु जाणो सुआमी सुघडु सुजाणो ॥
सुघड़ सुजाना सद परधाना अंम्रितु हरि का नामा ॥
चाखि अघाणे सारिगपाणे जिन कै भाग मथाना ॥
तिन ही पाइआ तिनहि धिआइआ सगल तिसै का माणो ॥
कहु नानक थिरू तखति निवासी सचु तिसै दीबाणो ॥ ३ ॥
मंगला हरि मंगला मेरे प्रभ कै सुणीऐ मंगला ॥
सोहिलड़ा प्रभ सोहि लड़ा अनहद धुनीऐ सोहिलड़ा ॥
अनहद वाजे सबद अगाजे नित नित जिसहि वधाई ॥

सो प्रभु धिआईऐ सभु किछु पाईऐ मरै न आवै जाई ॥
चूकी पिआसा पूरन आसा गुरमुखि मिलु निरगुनीऐ ॥
कहु नानक घरि प्रभ मेरे कै नित नित मंगलु सुनीऐ ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२४)

शब्दार्थ : **साजगडा** – प्रिय सजणा. **खलोइअडा** – उभा आहे. **जानीअडा** – प्राणाहून प्रिय. **अलोइडा** – पाहिला . **सोइअडा** – झोपलेला, गुप्त स्वरूपात वास करणारा. **गुडा** – गोड. **होवंदा** – असणारा. **नालि** – सह,जवळ. **सकंदा** – शक्य होणे. **लहि** – घेणे, प्राप्त करणे. **सुआउ** – प्रयोजन, हेतू. **मुडा** – मूर्ख. **होछी** – तुच्छ. **बाता** – गप्पा. **घडा** – . **सुझै** – सुचणे, जाणणे. **सोहनिआ** – सुशोभित. **भाखै** – बोलतो, सांगतो. **माणो** – मान, गौरव. **सुघडु** – सुडौल. **अघाणे** – तृप्त. **सारिगपाणे** – शारंगपाणी. **भाग** – भाग्य. **मथाना** – माथी, कपाळी. **थिरू** – स्थिर. **तखति** – तख्त, सिंहासन. **दिबाणो** – दरबार. **अगाजे** – प्रगट झाले. **वधाई** – . **चूकी** – चुकली, नष्ट झाली. **पिआसा** – तृष्णा, तहान. **पूरन** – पूर्ण.

भावार्थ : सजणा, माझा सजणा, माझा सजणा (प्रभू) माझ्या जवळच उभा आहे. प्राणप्रिय, प्राणाहून प्रिय माझ्या प्राणप्रिय हरीस मी माझ्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिला. प्रत्येक जीवात, शरीरात अन्य स्वरूपात वास करत असलेला माझा हरी, अमृताहून गोड मत्प्रिय हरी मी डोळ्यांना साक्षात पाहिला. पण मूढव्यक्ती, परमात्मा जवळ असूनही त्यास प्राप्त करू शकत नाही. कारण त्यास मानवजन्माचे प्रयोजनच समजलेले नसते. तो मोहमायेत मत्त होऊन तुच्छ गोष्टीतच आनंद मानतो. भ्रमात भटकणारा हा जीव प्रभू परमात्म्यास प्राप्त करण्याचा प्रयत्नही करत नाही. नानक सांगतात, सतगुरुशिवाय, प्रभू परमात्मा आपल्या जवळच उभा आहे. हे ज्ञान जीवास प्राप्त होत नाही. ॥ १ ॥ गोविंदा, माझ्या गोविंदा माझ्या प्राण आधार गोविंदा ! कृपाळा, माझ्या कृपाळा, दान देणाऱ्या माझ्या कृपाळा. तो सर्वांना दान देणारा माझा प्रभू परमात्मा अपारच अपार आहे. अपरंपार आहे. प्रत्येक जीवाच्या अंतरात तो शोभून दिसतो. पण त्याच्या एका दासीने– त्या मायेने– तिने आपल्या सामर्थ्याने सर्व जीवांना मोहून टाकले आहे. प्रभू परमात्मा ज्यांचे मोहमायेपासून रक्षण करतो तो सतगुरूकडून प्राप्त झालेल्या शब्दाचे (प्रभुनामाचे) चिंतन करतो. त्याची वाचा सदैव सत्यवचन बोलते. नानक सांगतात, जो प्रभू परमात्म्याच्या इच्छेनुसार आचरण करतो त्यासच प्रभू प्रिय वाटतो. ॥ २ ॥ अभिमान वाटतो. प्रभू परमात्म्याचा अभिमान वाटतो. माझ्या प्रभूचा मला अभिमान वाटतो. माझ्या प्रभूचा मला अभिमान वाटतो. जाणतो, प्रभू जाणतो. तो सुडौल स्वामी सुजाण आहे. तो सुडौल, सुजाण प्रभू सदैव सर्वश्रेष्ठ आहे. प्रभूचं नाम अमृतमधूर आहे. ज्याच्या भाळी उज्ज्वल भाग्यरेषा आहे तो प्रभुनामामृताची गोडी चाखून तृप्त होतो. तेच त्यास प्राप्त करतात, तेच त्याचे ध्यान करतात. हा सगळा मान त्यास प्राप्त होतो. नानक सांगतात, तो प्रभू परमात्मा आपल्या सिंहासनावर आसनस्थ झाला आहे. त्याचा दरबारही सत्य आहे. ॥ ३ ॥ मंगल आहे. माझा प्रभू परमात्मा मंगल आहे. जनहो माझ्या परमात्म्याचे मंगलगीत ऐका. हे स्तुतीपर गीत आहे. प्रभूच्या स्तुतीचे गीत आहे. अनाहत नादातून प्रभूचे स्तुतिगीत निनादत आहे. अनाहत नादातून प्रभुनामाचा ध्वनी प्रगट होत आहे व तो नित्य वर्धमान होत आहे. अशा प्रभूचे ध्यान करा. सर्व काही प्राप्त होईल. जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त व्हाल. तृष्णा नष्ट झाली. आशा पूर्ण झाली. गुरुद्वारा त्या निर्गुण प्रभूची प्राप्ती झाली. नानक सांगतात (तो प्रभू माझ्या हृदयात वास करतो.) माझ्या प्रभूच्या घरी सदैव मंगल गीतच ऐकू येते.॥४॥१॥

॥ रामकली महला ५ ॥

हरि हरि धिआइ मना खिनु न विसारीऐ ॥
राम राम राम रमा कंठि उरधारीऐ ॥
उरधारि हरि हरि पुरखु पूरनु पारब्रहमु निरंजनो ॥
भै दूरि करता पाप हरता दुसह दुख भव खंडनो ॥
जगदीस ईस गुोपाल माधो गुण गोविंद वीचारिऐ ॥
बिनवंति नानक मिलि संगि साधू दिनसु रैणि चितारीऐ ॥ १ ॥
चरन कमल आधारु जन का आसरा ॥
मालु मिलख भंडार नामु अनंत धरा ॥
नामु नरहर निधानु जिन कै रस भोग एक नराइणा ॥
रस रूप रंग अनंत बीठल सासि सासि धिआइणा ॥
किलविख हरणा नाम पुनहचरणा नामु जम की त्रास हरा ॥
बिनवंति नानक रासि जन की चरन कमलह आसरा ॥ २ ॥
गुण बेअंत सुआमी तेरे कोइ न जानई ॥
देखि चलत दइआल सुणि भगत वखानई ॥
जीअ जंत सभि तुझु धिआवहि पुरख पति परमेसरा ॥
सरब जाचिक एकु दाता करुणामै जगदीसरा ॥
साधू संतु सुजाणु सोई जिसहि प्रभ जी मानई ॥
बिनवंति नानक करहु किरपा सोइ तुझहि पछानई ॥ ३ ॥
मोहि निरगुण अनाथु सरणी आइआ ॥
बलि बलि बलि गुरदेव जिनि नामु द्रिड़ाइआ ॥
गुरि नामु दीआ कुसलु थीआ सरब इछा पुंनीआ ॥
जलने बुझाई सांति आई मिले चिरी बिछुंनिआ ॥
आनंद हरख सहज साचे महा मंगल गुण गाइआ ॥
बिनवंति नानक नाम प्रभु का गुर पूरे ते पाइआ ॥ ४ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२५)

शब्दार्थ : **खिनु** – क्षण. **विसरीऐ** – विसरणे. **रमा** – सुंदर. **कंडी** – गळ्यात. **उरधारिऐ** – हृदयात धारण कर. **दुसह** – दुःसह. **चतारीऐ** – चित्तात धारण कर. **मिलख** – मुलुख. **बिठल** – विठ्ठल. **रासि** – पुंजी, संपत्ती. **चलत** – कौतुक लीला. **वखानइ** – सांगतो. **जाचिक** – याचक. **करुणामै** – करुणामय. **मानई** – स्वीकार करतो. **पछानई** – ओळखतो. **कुसलु** – आनंद, सुख, कुशल. **पुंनीआ** – पूर्ण झाल्या. **जलने** – आग. **बिझुनिआ** – वांछित, इच्छिलेले. **साचे** – सत्यस्वरूप परमात्मा.

भावार्थ : हे मना ! तू सदैव हरी हरी जप कर. क्षणभरही त्या प्रभू परमात्म्यास विसरू नकोस. सर्व जीवांमध्ये

रमण करणाऱ्या रामाला, त्या सुंदर रामाला सदैव आपल्या कंठी, आपल्या हृदयाशी धर. त्या पूर्ण परब्रह्म, निरंजन परमपुरुषास, हरीस तू आपल्या हृदयात धारण कर. त्या भय दूर करणाऱ्या, पाप नष्ट करणाऱ्या अत्यंत दुःसह दुःख नष्ट करणारा, भवताप खंडन करणारा जगदीश ईश्वर गोपाल माधव गोविंद याच्या गुणांचे चिंतन कर. नानक सांगतात, हे जीवा ! तू साधुसंतांच्या संगतीत बसून रात्रंदिवस त्या प्रभूचे आपल्या चित्तात चिंतन कर.॥१॥ प्रभू परमात्म्याच्या चरणकमलांचा आधार हाच प्रभुसेवकांचा आसरा आहे. प्रभूची अनंत नामे हीच खरी मिळकत व मालमत्ता आहे ती प्राप्त कर. त्या नरहरीचे नाम हीच खरी संपत्ती आहे. त्याचा उपभोग घेणाराही प्रभूच आहे. विश्वातील अनंत रंग, रस, रूप सारे काही तो प्रभूच आहे. हे जीवा ! प्रत्येक श्वासागणिक त्याचे स्मरण कर. प्रभुनाम पापांचा नाश करते. वारंवार नामस्मरणाने यमाचा त्रास नाहीसा होतो. नानक विनयपूर्वक सांगतात, की प्रभुनाम हीच प्रभुसेवकांची संपत्ती आहे. त्यांना प्रभूच्या चरणकमलांचा आसरा आहे. ॥ २ ॥ हे स्वामी ! तुझे गुण अनंत आहेत. कोणासही त्याचे पूर्ण ज्ञान नाही. तुझे भक्त तुझ्या दयाळूपणाच्या लीला पाहून, ऐकून त्याचे वर्णन करतात. हे पुरुषोत्तमा ! पति परमेश्वरा सर्व जीव तुझेच स्मरण करतात. हे करुणामय परमेश्वरा ! तूच एकमेव दाता आहेस. बाकी सर्वजण याचक आहेत. प्रभू परमात्मा ज्यांचा स्वीकार करतो तेच खरे साधू, संत व सुजाण व्यक्ती होत. नानक विनंती करतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर म्हणजे मी तुला जाणू शकेन. ॥ ३ ॥ हे प्रभो ! मी गुणहीन आहे. अनाथ आहे. मी तुला शरण आलो आहे. हे गुरुदेव ज्यांनी माझ्या मनात प्रभुनाम दृढ केले त्यांच्या चरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. गुरूने मला प्रभुनाम दिले त्यामुळे माझे मंगल झाले. माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या. माझ्या मनातील विकारअग्नी विझून गेला. मन शांत झाले. चिरवांछित फल (मुक्ती) प्राप्त झाले. प्रभू परमात्म्याचे मंगलगान गायल्याने, गुणगान केल्याने मला हर्ष, आनंद व सहजावस्था प्राप्त झाली. नानक विनयपूर्वक सांगतात की मला पूर्णगुरूकडून प्रभुनाम प्राप्त झाले. ॥ ४ ॥ २ ॥

॥ रामकली महला ५ ॥

रुणझुणो सबदु अनाहतु नित उठि गाईऐ संतन कै ॥
किलविख सभि दोख बिनासनु हरि नामु जपीऐ गुर मंतन कै ॥
हरि नामु लीजै अमिउ पीजै रैणि दिनसु अराधीऐ ॥
जोग दान अनेक किरिआ लगि चरण कमलह साधीऐ ॥
भाउ भगति दइआल मोहन दूख सगले परहरै ॥
बिनवंति नानक तरै सागरु धिआइ सुआमी नरहरै ॥ १ ॥
सुख सागर गोबिंद सिमरणु भगत गावहि गुण तेरे राम ॥
अनद मंगल गुर चरणी लागे पाए सूख घनेरे राम ॥
सुख निधानु मिलिआ दूख हरिआ क्रिपा करि प्रभि राखिआ ॥
हरि चरण लागा भ्रमु भउ भागा हरि नामु रसना भाखिआ ॥
हरि एकु चितवै प्रभु एकु गावै हरि एकु द्रिसटी आइआ ॥
बिनवंति नानक प्रभि करी किरपा पूरा सतिगुरु पाइआ ॥ २ ॥

मिलि रहीऐ प्रभ साध जना मिलि हरि कीरतनु सुनीऐ राम ॥
दइआल प्रभू दामोदर माधो अंतु न पाईऐ गुनीऐ राम ॥
दइआल दुखहर सरणि दाता सगल दोख निवारणो ॥
मोह सोग विकार बिखड़े जपत नाम उधारणो ॥
सभि जीअ तेरे प्रभू मेरे करि किरपा सभ रेण थीवा ॥
बिनवंति नानक प्रभ मइआ कीजै नामु तेरा जपि जीवा ॥ ३ ॥
राखि लीए प्रभि भगत जना अपणी चरणी लाए राम ॥
आठ पहर अपना प्रभु सिमरह एको नामु धिआए राम ॥
धिआइ सो प्रभु तरे भवजल रहे आवण जाणा ॥
सदा सुखु कलिआण कीरतनु प्रभ लगा मीठा भाणा ॥
सभ इछ पुंनी आस पूरी मिले सतिगुर पूरिआ ॥
बिनवंति नानक प्रभि आपि मेले फिरि नाही दूख विसूरिआ ॥ ४ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२५)

शब्दार्थ : **अमिउ** – अमृत. **रैणि** – रात्र. **किरिया** – क्रिया. **परहरै** – नष्ट होतात, परिहार होतो. **अनद** – आनंद. **घनेरे** – पुष्कळ. **रसना** – जिव्हा. **भाखिअ** – बोलते. **चितवै** – चिंतन करणे. **गुनीऐ** – गुणांची. **दोख** – दोष. **बिखडे** – विषम, कठीण. **भवजल** – भवसागर. **भाणा** – इच्छा, आज्ञा. **वसूरिआ** – चिंता, काळजी.

भावार्थ : हे जीवा ! प्रात:काळी उठून संतांच्या संगती प्रभूचे गीत गा. त्यामुळे तुझ्या अंत:करणात अनाहताचा मंजूळ नाद निर्माण होईल. सतगुरूच्या संगतीत बसून पापनाशक, दोषनाशक प्रभुनामाचा जप कर. रात्रंदिवस हरिनाम घे व अमृत प्राशन कर व प्रभू परमात्म्याची आराधना कर. प्रभू परमात्म्याच्या चरणी लीन झाल्याने योग, दान, नाना क्रिया साध्य होतात. दयाळू प्रभू प्रेम व भक्ती केल्याने सगळे दु:ख दूर करतो. नानक सांगतात, त्या नरहरीचे, प्रभू परमात्म्याचे ध्यान केल्याने जीव भवसागर तरून जातो. ॥ १ ॥ हे सुखसागर प्रभू ! तुझे भक्त तुझे स्मरण करतात व तुझे गुण गातात. आनंद मंगलदायी सतगुरूच्या चरणी लीन झाल्याने खूप सुख प्राप्त होते. प्रभू त्यांच्यावर कृपा करतो त्यामुळे त्यांना सुखाचे भांडार प्राप्त होते. त्यांचे सारे दु:ख नाश पावते व प्रभू त्यांचे रक्षण करतो. हरिचरणी लीन झाल्याने भ्रम व भय नष्ट होतात व जिव्हा प्रभुनाम उच्चारू लागते. असा भक्त एकमेव प्रभूचे चिंतन करतो. एकमात्र हरीचे गुण गातो व त्यास सर्वत्र एकच प्रभू परमात्मा दिसू लागतो. नानक सांगतात, अशा भक्तावर प्रभू परमात्मा कृपा करतो व त्यास सतगुरू प्राप्त होतो. ॥ २ ॥ संतसंगतीत राहून हरिकीर्तन ऐका. त्याने प्रभू प्राप्त होतो. तो प्रभू दयाळू आहे. मायेचा स्वामी (माधव) आहे. तो अनंत आहे. त्याच्या गुणांचा अंतच लागत नाही. अशा दयाळू, दु:खाचा नाश करणाऱ्या दात्या प्रभूस शरण गेल्याने सर्व दोष नष्ट होतात. प्रभूनामाचा जप केल्याने मनातील मोह, शोक, विकार नष्ट होतात व जीवाचा उद्धार होतो. हे प्रभो ! सर्व जीव तुझेच आहेत. माझ्यावर कृपा कर व मला त्यांच्या चरणांची धूळ कर. नानक विनंती करतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर म्हणजे मी तुझ्या नामाचा जप करत जीवन जगेन. ॥ ३ ॥ प्रभू परमात्म्याने आपल्या भक्तजनांचे रक्षण करून

त्यांना भक्तिमार्गास लावले. असे भक्त अष्टौप्रहर प्रभूचे नामस्मरण करतात व त्या एकमेव प्रभूचे ध्यान करतात. प्रभू परमात्म्याचे ध्यान करणारे ते भक्तजन भवसागर तरून जातात व त्यांची जन्ममरणाच्या चक्रातून मुक्ती होते. ज्यास प्रभू परमात्म्याच्या कीर्तनाची गोडी लागते. प्रभूची आज्ञा गोड वाटते ते सदैव सुख व कल्याण भोगतात. सतगुरू प्राप्त झाल्याने त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. सर्व आशा पूर्ण होतात. नानक सांगतात, प्रत्यक्ष प्रभू परमात्मा प्राप्त झाल्यावर मग कोणतेही दु:ख, कोणतीही चिंता शिल्लक राहत नाही. ॥ ४ ॥ ३ ॥

॥ रामकली महला ५ छंत ॥

॥ सलोकु ॥ चरन कमल सरणागती अनद मंगल गुण गाम ॥
नानक प्रभु आराधीऐ बिपति निवारण राम ॥ १ ॥
॥ छंतु ॥ प्रभ बिपति निवारणो तिसु बिनु अवरु न कोइ जीउ ॥
सदा सदा हरि सिमरीऐ जलि थलि महीअलि सोइ जीउ ॥
जलि थलि महीअलि पूरि रहिआ इक निमख मनहु न वीसरै ॥
गुरचरन लागे दिन सभागे सरब गुण जगदीसरै ॥
करि सेव सेवक दिनसु रैणी तिसु भावै सो होइ जीउ ॥
बलि जाइ नानकु सुखह दाते परगासु मनि तनि होइ जीउ ॥ १ ॥
॥ सलोकु ॥ हरि सिमरत मनु तनु सुखी बिनसी दुतीआ सोच ॥
नानक टेक गुोपाल की गोविंद संकट मोच ॥ १ ॥
॥ छंतु ॥ भै संकट काटे नाराइण दइआल जीउ ॥
हरि गुण आनंद गाए प्रभ दीना नाथ प्रतिपाल जीउ ॥
प्रतिपाल अचुत पुरखु एको तिसहि सिउ रंगु लागा ॥
कर चरन मसतकु मेलि लीने सदा अनदिनु जागा ॥
जीउ पिंडु ग्रिहु थानु तिस का तनु जोबनु धनु मालु जीउ ॥
सद सदा बलि जाइ नानक सरब जीआ प्रातेपाल जीउ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२६)

शब्दार्थ : **गाम** – गावे, गायन करावे. **बिपति** – विपत्ती. **सभागे** – भाग्यवान. **तिसु** – त्याला, प्रभूला. **परगासु** – प्रकाश. **दुतीआ** – द्वैतभाव. **सोच** – चिंता. **मोच** – मुक्त.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ हे जीवा ! प्रभुचरणकमलांना शरण जाऊन त्याचे आनंद मंगलदायक गुण गा. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याची आराधना केल्याने सर्व विपत्तींचे निवारण होते. ॥ १ ॥ छंत ॥ प्रभू परमात्मा विपत्तींचे निवारण करतो. त्याच्याशिवाय अन्य कोणातही ते सामर्थ्य नाही. जळी, स्थळी, आकाशी सर्वत्र भरून राहिलेल्या प्रभू परमात्म्याचे स्मरण करत जीवन जग. त्या जळी, स्थळी, आकाशी भरून राहिलेल्या प्रभू परमात्म्यास हे मना, क्षणभरही विसरू नकोस. तो जगदीश्वर प्रभू सर्वगुणसंपन्न आहे. ज्या दिवशी मी प्रभुचरणी लीन होतो तो दिवस भाग्यशाली होय. हे प्रभुसेवका ! तू रात्रंदिवस प्रभू परमात्म्याची सेवा कर. त्याच्या इच्छेप्रमाणेच सर्व काही होते. नानक सांगतात, त्या प्रभू परमात्म्याच्या चरणी स्वत:स समर्पित केल्याने मनामनात त्या सुखदात्या प्रभूचा प्रकाश

पसरतो. ॥ १ ॥ श्लोक ॥ हरीचे स्मरण केल्याने तन, मन सुखी होते. मनातील द्वैतभाव व चिंता दूर होतात. नानक सांगतात, की मला त्या प्रभू परमात्म्याचाच आसरा आहे. तो जीवांना सर्व संकटांतून मुक्त करतो. ॥ १ ॥ छंत ॥ त्या दयाधन परमेश्वराने माझे सर्व भय व संकट नष्ट केले आहे. मी आनंदाने त्या सर्व जीवांचा प्रतिपाळ करणाऱ्या दीनानाथ प्रभूचे गुण गातो. त्या एकमेव कर्तापुरुष प्रतिपालक अच्युतात्याच्या प्रेमरंगात मी रंगून गेलो आहे. मी प्रभुचरणी माझे हात व मस्तक टेकवून लीन झालो आहे. आता मी सदैव मोहमायेपासून सावध राहतो. माझे हे तन, मन, धन, घरदार संपत्ती सारे काही त्या प्रभूचे आहे. नानक सांगतात, त्या सर्व जीवांचा प्रतिपाळ करणाऱ्या प्रभू परमात्म्यावर मी मला सदैव समर्पित करतो. ॥ २ ॥

॥ सलोकु ॥ रसना उचरै हरि हरे गुण गोविंद वखिआन ॥
नानक पकड़ी टेक एक परमेसरु रखै निदान ॥ १ ॥
॥ छंतु ॥ सो सुआमी प्रभु रखको अंचलि ता कै लागु जीउ ॥
भजु साधू संगि दइआल देव मन की मति तिआगु जीउ ॥
इक ओट कीजै जीउ दीजै आस इक धरणीधरै ॥
साध संगे हरि नाम रंगे संसारु सागरु सभु तरै ॥
जनम मरण बिकार छुटे फिरि न लागै दागु जीउ ॥
बलि जाइ नानकु पुरख पूरन थिरु जा का सोहागु जीउ ॥ ३ ॥
॥ सलोकु ॥ धरम अरथ अरु काम मोख मुकति पदारथ नाथ ॥
सगल मनोरथ पूरिआ नानक लिखिआ माथ ॥ १ ॥
॥ छंतु ॥ सगल इछ मेरी पुंनीआ मिलिआ निरंजन राइ जीउ ॥
अनदु भइआ वडभागीहो ग्रिहि प्रगटे प्रभ आइ जीउ ॥
ग्रिहि लाल आए पुरबि कमाए ता की उपमा किआ गणा ॥
बेअंत पूरन सुख सहज दाता कवन रसना गुण भणा ॥
आपे मिलाए गहि कंठि लाए तिसु बिना नही जाइ जीउ ॥
बलि जाइ नानकु सदा करते सभ महि रहिआ समाइ जीउ ॥ ४ ॥ ४ ॥
॥ रागु रामकली महला ५ ॥ रण झुंझनड़ा गाउ सखी हरि एकु धिआवहु ॥
सतिगुरू तुम सेवि सखी मनि चिंदिअड़ा फलु पावहु ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२६)

शब्दार्थ : **वखिआन** – वर्णन करणे. **निदान** – अंतकाळी. **रखको** – रक्षक. **भजु** – भजन कर. **ओट** – आश्रय. **आस** – . **बिकार** – विकार. **दागु** – डाग, कलंक. **माथ** – मस्तक. **ग्रिहि** – घर, अंत:करण. **पुरबि** – पूर्वजन्मीची. **रणझुंझनडा** – मधुर गीत, स्तुतीगीत. **चिंदिअडा** – इच्छिलेले.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ माझी जिव्हा प्रभू परमात्म्याचे गुण गाते. त्याचे वर्णन करते. मी अंतकाळी रक्षण करणाऱ्या एकमेव परमेश्वराचा आश्रय घेतला आहे. ॥ १ ॥ छंत ॥ हे जीवा ! तो प्रभू परमात्मा सर्व जीवांचा रक्षक आहे. त्याच्या पदराचा आश्रय घे. हे जीवा ! मनाच्या प्रेरणेचा त्याग करून साधुसंतांच्या संगतीत बसून त्या दयाळू प्रभू

परमात्म्याचे भजन कर. हे जीवा ! त्या एकमेव प्रभू परमात्म्याचा आश्रय घे. त्या धरणीधर प्रभूवर सर्व आशा समर्पित कर. सर्व जीव साधुसंतांच्या संगतीत प्रभुनामात रंगून जाऊन संसारसागर तरून जातात. अशा जीवांची जन्ममरण व विकार यापासून सुटका होते. मग जीवास मोहमायेचा किंचितही कलंक लागत नाही. नानक ज्याचे भाग्य स्थिर आहे शाश्वत आहे अशा पूर्णपुरुष परमात्म्याच्या चरणी स्वत:स समर्पित करतो. ॥ ३ ॥ श्लोक ॥ जीवन सफल करणाऱ्या चार गोष्टी म्हणजे धर्म, अर्थ, काम व मोक्ष. ही सारी त्या प्रभू परमात्म्याची उपलब्धी, निर्मिती आहे. नानक सांगतात, ज्याच्या भाग्यात असेल त्याचे सर्व मनोरथ तो प्रभू परमात्मा पूर्ण करतो. ॥ १ ॥ छंत ॥ तो निरंजन प्रभू प्राप्त झाल्याने माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या. माझ्या महाभाग्याने प्रभू परमात्मा माझ्या हृदयात प्रगट झाल्याने मला आनंद झाला. माझ्या पूर्वजन्मीच्या कर्माचे फळ म्हणून मला प्रभुरूपी रत्न प्राप्त झाले. त्याला कोणतीही उपमा देणे शक्य नाही. त्या सहज अवस्था प्राप्त करून देणाऱ्या, अनंत, पूर्णपुरुष प्रभू परमात्म्याचे गुणगान कोणत्या शब्दात करू ? तो प्रभू स्वत: आपल्या भक्तास आपल्या हृदयाशी धरून त्यास आपल्याशी एकरूप करून घेतो. त्याच्याशिवाय जीवाला अन्य आधारच नाही. त्या सर्वत्र सामावून राहिलेल्या, सर्व काही करणाऱ्या कर्त्या प्रभू परमात्म्याला नानक स्वत:चे सर्वस्व समर्पित करतात. ॥ ४ ॥ ४ ॥ हे सखी ! मनात झंकार उत्पन्न करणारे प्रभूचे गीत गा. त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे ध्यान कर. हे सखी ! तू सतगुरूची सेवा कर. मनात इच्छिलेले फळ तुला प्राप्त होईल.

रामकली महला ५ रुती सलोकु

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

करि बंदन प्रभ पारब्रहम बाछउ साधह धूरि ॥
आपु निवारि हरि हरि भजउ नानक प्रभ भरपूरि ॥ १ ॥
किलबिख काटण भै हरण सुख सागर हरि राइ ॥
दीन दइआल दुख भंजनो नानक नीत धिआइ ॥ २ ॥
॥ छंतु ॥ जसु गावहु वडभागीहो करि किरपा भगवंत जीउ ॥
रुती माह मूरत घड़ी गुण उचरत सोभावंत जीउ ॥
गुण रंगि राते धंनि ते जन जिनी इक मनि धिआइआ ॥
सफल जनमु भइआ तिन का जिनी सो प्रभू पाइआ ॥
पुंन दान न तुलि किरिआ हरि सरब पापा हंत जीउ ॥
बिनवंति नानक सिमरि जीवा जनम मरण रहंत जीउ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२७)

शब्दार्थ : **बाछउ** – इच्छा करतो, मागतो. **साधह** – साधुसंतांची. **आपु** – अहंकार. **किलबिख** – पाप. **जसु** – यश. **रुती** – ऋतू. **माह** – मास, महिना. **मूरत** – मुहूर्त. **घडि** – घटका. **धंनि** – धन्य. **हंत** – नष्ट करणे. **रहंत** – समाप्त होते.

भावार्थ : मी परब्रह्म परमात्म्यास वंदन करून साधुसंतांच्या चरणधुळीची याचना करतो. नानक सांगतात, मी माझ्या मनातील अहंभावाचा त्याग करून हरीचे भजन करतो. तो प्रभू परमात्मा सर्वव्याप्त आहे. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा पापांचा नाश करणारा, भय नष्ट करणारा सुखाचा सागर आहे. त्या दीनांवर दया करणाऱ्या दुःख दूर करणाऱ्या प्रभू परमात्म्याचे नानक नित्य ध्यान करतात. ॥ २ ॥ छंत ॥ हे भाग्यवंतांनो ! कृपा करणाऱ्या भगवंताचे यशोगान गा. हे सौभाग्यशाली जीवांनो ! प्रत्येक ऋतूत, महिन्यात, मुहूर्तावर, घटकेत प्रभू परमेश्वराच्या गुणांचा उच्चार करा. प्रभूच्या गुणरंगात रंगून जाणारे ते जीव ज्यांनी एकाग्रचित्ताने प्रभूचे ध्यान केले ते धन्य होत. ज्यांना प्रभू परमात्मा प्राप्त झाला त्यांचा जन्म सफल झाला. हरिनाम सर्व पापांचा नाश करते. पुण्यकर्म, दानकर्म ह्या कशाचीही प्रभुनामाशी तुलनाच होऊ शकत नाही. नानक विनंतीपूर्वक सांगतात, की हे जीवांनो ! प्रभू परमात्म्याचे स्मरण करा. त्याने तुमची जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होईल. ॥ १ ॥

॥ सलोक ॥

उदमु अगमु अगोचरो चरन कमल नमसकार ॥
कथनी सा तुधु भावसी नानक नाम अधार ॥ १ ॥
संत सरणि साजन परहु सुआमी सिमरि अनंत ॥
सूके ते हरिआ थीआ नानक जपि भगवंत ॥ २ ॥
॥ छंतु ॥ रूति सरस बसंत माह चेतु वैसाख सुख मासु जीउ ॥
हरि जीउ नाहु मिलिआ मउलिआ मनु तनु सासु जीउ ॥
घरि नाहु निहचलु अनदु सखीए चरन कमल प्रफुलिआ ॥
सुंदरू सुघडु सुजाणु बेता गुण गोविंद अमुलिआ ॥
वडभागि पाइआ दुखु गवाइआ भई पूरन आस जीउ ॥
बिनवंति नानक सरणि तेरी मिटी जम की त्रास जीउ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२७)

शब्दार्थ : **उदमु** – उद्योग. **कथनी** – कथा, गोष्ट. **सुके** – सुकलेले. **हरिआ** – हिरवे. **सरस** – आनंददायक. **बसंत** – वसंत. **चेतु** – चैत्र. **नाहु** – नाथ. **मउलिआ** – प्रफुल्लित. **सासु** – श्वास. **अनदु** – आनंद. **बेता** – ज्ञाता. **अमुलिआ** – अमूल्य. **भई** – झालो. **मिटी** – नाहीसा झाला.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ ज्या उद्योगामुळे प्रभू परमात्म्याच्या चरणी मन लीन होईल तो उद्योग परमेश्वरासारखा अगम्य अगोचर होय. तेच शब्द उच्चारा, की जे प्रभू परमात्म्यास आवडतील. नानक सांगतात सर्व जीवांना प्रभुनाम हाच आधार आहे. ॥ १ ॥ हे माझ्या सज्जन मित्रांनो ! त्या अनंत प्रभूचे स्मरण करा व संतांना शरण जा. नानक सांगतात, प्रभुनामाचा जप केल्याने रुक्ष जीवनही प्रफुल्लित होते. ॥ २ ॥ छंत ॥ सर्वांत आनंददायक ऋतू म्हणजे वसंत ऋतू. चैत्र व वैशाख हे सुख मास होत. ह्या महिन्यात जर प्रभुरूपी प्रियकर भेटला तर तन, मन, श्वास (प्राण) प्रफुल्लित होतात. हे सखी माझ्या हृदयात निश्चल आनंददायी प्रभूने प्रवेश केला आहे. त्याच्या चरणकमलांनी माझा देह प्रफुल्लित झाला आहे. तो प्रभू सुंदर, सुडौल, सूज्ञ व अनमोल गुणवेत्ता आहे. महाभाग्याने

तो मला प्राप्त झाला आहे. त्यामुळे माझे दुःख लयाला गेले आहे व माझ्या सर्व आशा आकांक्षा पूर्ण झाल्या आहेत. नानक विनयपूर्वक सांगतात, की प्रभू परमात्म्यास शरण गेल्याने जीव यमाच्या त्रासातून मुक्त होतो. ॥ २ ॥

॥ सलोक ॥

साध संगति बिनु भ्रमि मुई करती करम अनेक ॥
कोमल बंधन बाधीआ नानक करमहि लेख ॥ १ ॥
जो भाणे से मेलिआ विछोड़े भी आपि ॥
नानक प्रभ सरणागती जा का वड परतापु ॥ २ ॥
॥ छंतु ॥ ग्रीखम रूति अति गाखड़ी जेठ अखाड़ै घाम जीउ ॥
प्रेम बिछोहु दुहागणी द्रिसटि न करी राम जीउ ॥
नह द्रिसटि आवै मरत हावै महा गारबि मुठिआ ॥
जल बाझु मछुली तड़फड़ावै संगि माइआ रूठिआ ॥
करि पाप जोनी भै भीत होई देइ सासन जाम जीउ ॥
बिनवंति नानक ओट तेरी राखु पूरन काम जीउ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२८)

शब्दार्थ : **साधु** – साधुसंत. **बाधीआ** – बांधलेले. **भाणे** – आवडले. **विछोडे** – वियुक्त करणे, दूर लोटणे. **परतापु** – प्रताप. **ग्रीखम** – ग्रीष्म. **गाखडी** – कठीण. **अखाडै** – आषाढ. **घाम** – उष्ण. **दुहागणी** – परित्यक्ता. **नह** – नाथ, पती. **गारबि** – गर्वाने. **मूठिआ** – लुटली गेलेली. **बाझु** – विना. **रूठीआ** – रुष्ट झाली, कोपली, रागवली. **साशन** – शासन. **ओट** – आश्रय.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ मी संतसंगतीविना भ्रमाने अनेक कर्मकांडे करत मरून गेले. नानक सांगतात मी माझ्या पूर्वकर्मानुसार मायेच्या कोमल बंधनात बांधले गेले. ॥ १ ॥ ज्या त्याला– प्रभुपतीला– आवडल्या त्यांना त्याने आपल्याशी एकरूप करून घेतले. तोच इतरांना दूरही लोटतो. नानक सांगतात मी प्रभुपतीस शरण गेले आहे त्याचा प्रताप महान आहे. ॥ २ ॥ छंत ॥ ग्रीष्मऋतू महाकठीण ! ज्येष्ठ आषाढात खूप उष्णता असते. ही इतकी कष्टदायक असते. की जणू परित्यक्ता, जिच्याकडे तिचा पती जराही पाहत नाही. पतिविरहाने ती अशी तडफडते जशी पाण्याविना मासळी तडफडते. पण त्यालाही कारणीभूत तीच असते. ती गर्वाने फुगून जाते व मायेच्या संगतीने प्रभुपतीवर रुष्ट होऊन कष्ट भोगत राहते. ती पापकर्म केल्याने नाना योनीत भटकत फिरते व यम तिला वारंवार शासन करतो. नानक विनंती करतात, की हे प्रभो ! मला तुझ्या चरणी आश्रय दे. माझे रक्षण कर व माझ्या मनोकामना पूर्ण कर. ॥ ३ ॥

॥ सलोक ॥

सरधा लागी संगि प्रीतमै इकु तिलु रहणु न जाइ ॥
मन तन अंतरि रवि रहे नानक सहजि सुभाइ ॥ १ ॥
करू गहि लीनी साजनहि जनम जनम के मीत ॥

चरनह दासी करि लई नानक प्रभ हित चीत ॥ २ ॥
॥ छंतु ॥ रुति बरसु सुहेलीआ सावण भादवे आनंद जीउ ॥
घण उनवि वुठे जल थल पूरिआ मकरंद जीउ ॥
प्रभ पूरि रहिआ सरब ठाई हरि नाम नवनिधि ग्रिह भरे ॥
सिमरि सुआमी अंतरजामी कुल समूहा सभि तरे ॥
प्रिअ रंगि जागे नह छिद्र लागे क्रिपालु सद बखसिंदु जिउ ॥
बिनवंति नानक हरि कंतु पाइआ सदा मनि भावंदु जीउ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२८)

शब्दार्थ : **सरधा** – श्रद्धा, प्रेम. **रवि** – रममाण होणे. **करू** – हात. **चरनह** – चरणाची. **हित** – प्रेम. **चीत** – चित्त, हृदय. **बरसु** – वर्षा. **सुहेलीआ** – सुखदायक. **सावण** – श्रावण. **भादवे** – भाद्रपद. **घण** – मेघ. **उनवी** – ओथंबून. **वुठे** – वर्षाव. **मकरंद** – सुवास. **छिद्र** – दोष. **बखसिंदु** – क्षमाशील, कृपासिंधु. **भावंदु** – आवडता.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ माझ्या मनात माझ्या प्रियकराविषयी (प्रभूविषयी) प्रेमभाव जागृत झाला. आता त्याच्याशिवाय एक क्षणभरही मी राहू शकत नाही. नानक सांगतात, आता सहज स्वाभाविकपणे तो प्रभू माझ्या तनमनात, अंत:करणात रममाण झाला आहे. ॥ १ ॥ माझ्या जन्मजन्मांतरीच्या मित्राने, माझ्या प्रियकराने (प्रभू परमात्म्याने) माझा हात ग्रहण करून मला (जीवात्मारूपी स्त्रीस) आपल्या चरणाची दासी केले. नानक सांगतात, माझ्या चित्तात प्रभूचे प्रेम भरले आहे. ॥ २ ॥ छंत ॥ वर्षाऋतू आनंददायी असतो. श्रावण भाद्रपद हे महिने जीवाला आनंद देतात. मेघ आकाशात ओथंबून येतात व धरणीवर वर्षाव करतात. सर्वत्र एक सुगंध दरवळतो. प्रभू परमात्मा सर्वत्र पूर्णपणे भरून राहतो व हृदय हरिनामाच्या नवनिधीने भरून जाते. त्या अंतर्ज्ञानी प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने संपूर्ण कुल भवसागर तरून जाते. प्रियकराच्या (प्रभूच्या) प्रेमरंगात रंगून आत्मिक जागृती प्राप्त झाल्याने जीव सर्व दोषांतून मुक्त होतो व त्या क्षमाशील प्रभू परमात्म्याची सदैव कृपा प्राप्त करतो. नानक विनयपूर्वक सांगतात, प्रभुपती प्राप्त झाल्याने माझ्या मनास तो फार आवडू लागला आहे. ॥ ४ ॥

॥ सलोक ॥

आस पिआसी मै फिरउ कब पेखउ गोपाल ॥
है कोई साजनु संत जनु नानक प्रभ मेलणहार ॥ १ ॥
बिनु मिलबे सांति न ऊपजै तिलु पलु रहणु न जाइ ॥
हरि साधह सरणगती नानक आस पुजाइ ॥ २ ॥
॥ छंतु ॥ रुति सरद अडंबरो असू कतके हरि पिआस जीउ ॥
खोजंती दरसनु फिरत कब मिलीऐ गुणतास जीउ ॥
बिनु कंत पिआरे नह सूख सारे हार कंङण ध्रिगु बना ॥
सुंदरि सुजाणि चतुरि बेती सास बिनु जैसे तना ॥

ईत उत दहदिस अलोकन मनि मिलन की प्रभ पिआस जीउ ॥
बिनवंति नानक धारि किरपा मेलहु प्रभ गुणतास जीउ ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९२८)

शब्दार्थ : **फिरउ** – फिरते. **पेखउ** – पाहू. **मेलणहार** – भेटवणारा. **सांति** – शांती. **पुजाइ** – पूर्ण कर. **सरद** – शरद. **अडंबरो** – अवडंबर, नटून थटून. **असु** – आश्विन. **कतके** – कार्तिक. **खोजंती** – शोधत. **नह** – नाही. **ध्रिगु** – धिक्कार. **सुजाणि** – सुजाण स्त्री. **बेती** – ज्ञाती. **अलोकन** – पाहणे. **धारि** – धारण कर.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ मी आशेने व्याकूळ होऊन गोपाळाच्या, प्रभू परमात्म्याच्या दर्शनासाठी केंव्हापासून फिरत आहे. दास नानक विचारतात कोणी संतसज्जन आहे का जो माझे प्रभूपतीशी मिलन घडवून आणील ?॥१॥ प्रभुपतीशी मिलन झाल्याशिवाय मनास शांती लाभणार नाही. प्रभुपतीशिवाय मी एक क्षणभरही राहू शकणार नाही. मी हरिरूपी साधूस शरण आले आहे. नानक सांगतात, हे हरी माझी आशा पूर्ण कर. ॥ २ ॥ छंत ॥ शरद ऋतू नटून थटून आला आहे. आश्विन कार्तिक महिने प्रभुमिलनाची आस अधिकच वाढवतात. मी प्रभुदर्शनासाठी शोध घेत हिंडत अहे. मला तो गुणसिंधू प्रभू केव्हा भेटेल ? प्रिय पतीशिवाय सुख नाही. हार, काकणे सारा शृंगार व्यर्थ आहे. मी सुंदर आहे. सुजाण आहे. चतुर ज्ञानी आहे. पण प्रभुशिवाय जगणे म्हणजे श्वासाशिवाय शरीर. मी प्रभूला इकडे तिकडे दाही दिशांना पाहत आहे. शोधत आहे. माझ्या मनाला प्रभुमिलनाची तहान लागली आहे. नानक विनंती करतात, की हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर. माझे गुणसिंधू परमात्म्याशी मिलन घडव. ॥ ५ ॥

॥ सलोक ॥

जलणि बुझी सीतल भए मनि तनि उपजी सांति ॥
नानक प्रभ पूरन मिले दुतीआ बिनसी भ्रांति ॥ १ ॥
साध पठाए आपि हरि हम तुम ते नाही दूरि ॥
नानक भ्रम भै मिटि गए रमण राम भरपूरि ॥ २ ॥
॥ छंतु ॥ रुति सिसीअर सीतल हरि प्रगटे मंघर पोहि जीउ ॥
जलनि बुझी दरसु पाइआ बिनसे माइआ ध्रोह जीउ ॥
सभि काम पूरे मिलि हजूरे हरि चरण सेवकि सेविआ ॥
हार डोर सीगार सभि रस गुण गाउ अलख अभेविआ ॥
भाउ भगति गोविंद बांछत जमु न साकै जोहि जीउ ॥
बिनवंति नानक प्रभी आपि मेली तह न प्रेम बिछोह जीउ ॥ ६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९२८)

शब्दार्थ : **जलणि** – आग. **दुतीआ** – द्वैतभाव. **पठाए** – पाठवले. **सिसिअर** – शिशिर. **मंघर** – मार्गशीर्ष. **पोहि** – पौष. **ध्रोह** – छह. **हजुरे** – प्रत्यक्ष. **डोर** – एक दागिना. **सीगार** – शृंगार. **अलख** – अलक्ष्य, अदृश्य. **अभेविआ** – अभेद्य. **वांछत** – इच्छा करतो. **बिछोह** – वियोग.

भावार्थ : विरहाची आग विझून गेली. मनाला शीतलता आली. तनामनात शांती उत्पन्न झाली. नानक सांगतात, पूर्ण प्रभू परमात्म्याशी मिलन झाल्याने मनातील द्वैतभाव व भ्रांती नष्ट झाली. ॥ १ ॥ प्रभूने स्वत: साधुसंतांना पाठवून मला हे ज्ञान दिले की प्रभू माझ्यापासून दूर नाही. नानक सांगतात सर्वत्र रमण करणाऱ्या रामाने माझ्या मनातील भ्रम व भय नष्ट केले. ॥ २ ॥ छंत ॥ शिशिर ऋतूत मार्गशीर्ष व पौष महिन्यात थंडीच्या रूपाने प्रभू परमात्मा प्रगट झाला. त्याच्या दर्शनाने द्वैतभावाचा ताप नष्ट झाला व मोहमायेचा छळ नष्ट झाला. हरिचरणांची सेवा केल्याने सेवकाचे प्रत्यक्ष प्रभूशी मिलन झाले व त्याचे सर्व कार्य सिद्धीस गेले. तो अलक्ष्य अभेद प्रभुपती प्राप्त झाल्याने जीवात्मारूपी स्त्रीस रत्नहार, डोरले आदी शृंगार केल्याप्रमाणे आनंद प्राप्त होऊन ती त्याचे गुण गाऊ लागली. प्रभूविषयी भक्तिभाव इच्छिणाऱ्याकडे यम दृष्टिक्षेप करू शकत नाही. नानक विनयपूर्वक सांगतात, की ज्यास प्रभू स्वत: आपल्याशी एकरूप करून घेतो त्यास परत कधीही त्याच्या प्रेमाचा वियोग सहन करावा लागत नाही. ॥ ६ ॥

॥ सलोक ॥

हरि धनु पाइआ सोहागणी डोलत नाही चीत ॥
संत संजोगी नानका ग्रिहि प्रगटे प्रभ मीत ॥ १ ॥
नाद बिनोद अनंद कोड प्रिअ प्रीतम संगि बने ॥
मन बांछत फल पाइआ हरि नानक नाम भने ॥ २ ॥
॥ छंतु ॥ हिमकर रुति मनि भावती माघु फगणु गुणवंत जीउ ॥
सखी सहेली गाउ मंगलो ग्रिहि आए हरि कंत जीउ ॥
ग्रिहि लाल आए मनि धिआए सेज सुंदरि सोहीआ ॥
वणु त्रिणु त्रिभवण भए हरिआ देखि दरसन मोहीआ ॥
मिले सुआमी इछ पुंनी मनि जपिआ निरमल मंत जीउ ॥
बिनवंति नानक नित करहु रलीआ हरि मिले स्त्रीधर कंत जीउ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२९)

शब्दार्थ : **कोड** – कौतुक. **भने** – सांगतात. **हिमकर** – हेमंत. **माघु** – माघ. **फागणु** – फाल्गुन. **सेज** – शेज, शय्या. **सोहीआ** – सुखदायक. **वणु** – वन. **त्रिणु** – तृण, गवत. **हरिआ** – हिरवे, प्रसन्न. **रलिआ** – आनंद.

भावार्थ : ज्या सुवासिनीने प्रभुपतीरूपी धन प्राप्त केले आहे तिचे चित्त इकडे तिकडे भटकत नाही. नानक सांगतात, संतजनांशी संयोग झाल्याने प्रभूरूपी मित्र जीवाच्या हृदयातच प्रगट होतो. ॥ १ ॥ प्रियतमाच्या संगतीतच आनंद, विनोद, संगीत आदी कौतुकांचा उपभोग प्राप्त होतो. नानक सांगतात, प्रभुनामाचे स्मरण केल्याने मनोवांछित फल प्राप्त होते. ॥ २ ॥ छंत ॥ माघ आणि फाल्गुन महिन्यात हेमंत ऋतू येतो. हे सख्यांनो, मैत्रिणींनो ! माझ्या हृदयरूपी घरात प्रभुपती आला आहे. त्याचे मंगलगीत गा. माझ्या हृदयरूपी घरात ज्याचे मी ध्यान केले तो माझा लाल आला. त्यामुळे माझी शय्या सुंदर व सुखकर झाली. मी प्रभुपतीस पाहून त्याच्या दर्शनाने मोहित झाले आहे. त्याच्या

आगमनाने तिन्ही लोक, वन, सर्व वृक्ष वल्लरी हिरव्यागार व टवटवीत दिसू लागल्या. प्रभुपतीशी मीलन झाल्याने माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या. आता मी त्याचा निर्मल नाममंत्र मनात जपते. नानक सांगतात, की परमात्मा पतीशी मिलन झाल्याने जीवात्मा स्त्री आता सदैव त्याच्या रंगात रंगून जाते. ॥ ७ ॥

॥ सलोक ॥

संत सहाई जीअ के भवजल तारणहार ॥
सभ ते ऊचे जाणीअहि नानक नाम पिआर ॥ १ ॥
जिन जानिआ सेई तरे से सूरे से बीर ॥
नानक तिन बलिहारणै हरि जपि उतरे तीर ॥ २ ॥
॥ छंतु ॥ चरण बिराजित सभ ऊपरे मिटिआ सगल कलेसु जीउ ॥
आवण जावण दुख हरे हरि भगति कीआ परवेसु जीउ ॥
हरि रंगि राते सहजि माते तिलु न मन ते बिसरै ॥
तजि आपु सरणी परे चरनी सरब गुण जगदीसरै ॥
गोविंद गुण निधि स्त्रीरंग सुआमी आदि कउ आदेसु जीउ ॥
बिनवंति नानक मइआ धारहु जुगु जुगो इक वेसु जीउ ॥ ८ ॥ १ ॥ ६ ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२९)

शब्दार्थ : **सहाइ** – सहायक. **भवजल** – भवसागर. **जाणअहि** – ओळखले जातात. **बिराजित** – स्थापित. **कलेसु** – क्लेश. **परवेसु** – प्रवेश. **आपु** – अहंकार. **आदेसु** – प्रणाम, नमस्कार.

भावार्थ : जीवाला भवसागर तारून नेण्यासाठी संतसज्जन साहाय्य करतात. नानक सांगतात, प्रभुनामावर प्रेम करणारा सर्वश्रेष्ठ गणला जातो. ॥ १ ॥ ज्यांनी हे जाणले ते भवसागर तरून गेले. ते शूर होत. ते वीर होत. नानक म्हणतात, जे प्रभुनामाच्या जपाने भवसागर तरून गेले, त्यांच्या चरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो.॥२॥ छंत ॥ सर्वांहून श्रेष्ठ असलेल्या प्रभू परमात्म्यास आपल्या अंत:करणात विराजमान केल्याने सर्व क्लेश नष्ट होतात. ज्यांच्या मनात हरिभक्तीने प्रवेश केला त्याचे जन्ममरणाचे दु:ख नाश पावते. जो हरिरंगात रममाण झाला तो सहजावस्थेत मत्त होतो. तो क्षणभरही प्रभूस विसरत नाही. आता जीव अहंभावाचा त्याग करून सर्वगुणसंपन्न जगदीश्वराचे चरणी शरण जातो. गोविंद गुणनिधी श्रीरंग स्वामी प्रभू परमात्म्यास नमस्कार असो. नानक विनंती करतात, हे प्रभो ! तू युगानुयुगे एकच वेश धारण करतोस. माझ्यावर कृपा कर. ॥ ८ ॥ १ ॥

रामकली महला १ ॥ दखणी ओअंकारु

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. गुरुकृपेने जो प्राप्त होतो.

ओअंकारि ब्रहमा उतपति ॥ ओअंकार किआ जिनि चिति ॥
ओअंकारि सैल जुग भए ॥ ओअंकारि बेद निरमए ॥
ओअंकारि सबदि उधरे ॥ ओअंकारि गुरमुखि तरे ॥
ओनम अखर सुणहु बीचारु ॥ ओनम अखरु त्रिभवण सारु ॥ १ ॥
सुणि पाडे किआ लिखहु जंजाला ॥ लिखु राम नाम गुरमुखि गोपाला ॥ १ ॥ रहाउ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९२९)

शब्दार्थ : **ओअंकारि** – ओंकारातून. **उतपति** – उत्पत्ती. **जिनि** – ज्याने. **चिति** – चित्तात, अंत:करणात. **सैल** – पर्वत. **जुग** – युग. **भए** – झाली. **निरमए** – निर्माण झाले. **सबदि** – शब्दाने. **उधरे** – उद्धार, वाचवणे. **गुरमुखि** – श्रेष्ठ साधक. **ओनम** – ओंकार. **सुणहु** – ऐक. **बीचारु** – विचार. **सुणि** – ऐका. **पाडे** – पंडित. **किआ** – का, कशाला. **लिखहु** – लिहिता. **जंजाळ** – अवघड, व्यर्थ, निरुपयोगी. **गोपाला** – सर्व जगाचे पालन करणारा.

भावार्थ : ओंकारापासून ब्रह्माची उत्पत्ती झाली. त्या ब्रह्माने आपल्या अंत:करणात ओंकारास धारण केले. ओंकारापासूनच सृष्टीची निर्मिती झाली. युगांचीही निर्मिती ओंकारापासूनच झाली. ओंकारापासूनच वेद निर्माण झाले. ओंकाराच्या शब्दोच्चाराने साधकाचा संसारतापातून उद्धार होतो. श्रेष्ठ साधक ओंकाराच्या साहाय्याने भवसागर तरून गेले. आता ह्या ओम् अक्षराचा भावार्थ ऐका. ओम् हे अक्षर त्रिभुवनाचे, साऱ्या चराचर सृष्टीचे सार आहे. ॥ १ ॥ हे पंडित जनहो ! तुम्ही ह्या संसारातील व्यर्थ गोष्टी कशाला लिहिता ? गुरुमुख होऊन साऱ्या सृष्टीचे पालन करणाऱ्या, सर्व सृष्टीत रममाण झालेल्या त्या प्रभू परमात्म्याचे रामाचे नाम लिहा. ॥ १ ॥ रहाउ ॥

ससै सभु जगु सहजि उपाइआ तीनि भवन इक जोती ॥
गुरमुखि वसतु परापति होवै चुणि लै माणक मोती ॥
समझै सूझै पड़ि पड़ि बूझै अंति निरंतरि साचा ॥
गुरमुखि देखै साचु समाले बिनु साचे जगु काचा ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३०)

शब्दार्थ : **ससै** – 'स' ह्या अक्षराचा अर्थ. **सभु** – सर्व. **सहजि** – सहजपणे, स्वाभाविकपणे. **उपाइआ** – उत्पन्न झाले. **तीनि** – तीनही पूर्ण. **वसतु** – वस्तू, प्रभुनाम. **परापति** – प्राप्ती. **चुणिलै** – वेचून घे. **समझै** – समजते. **बुझै** – कळते. **पड़ि पड़ि** – अभ्यास करून. **अंति** – अंत:करणात. **निरंतरि साचा** – सत्यरूप प्रभू परमात्मा. **समाले** – प्राप्त करतो, स्मरण करतो. **काचा** – कच्चा, अपूर्ण.

भावार्थ : 'स' ह्या अक्षरावरून असा बोध होतो की सारा संसार सहज स्वाभाविकपणे त्या प्रभू परमात्म्याने उत्पन्न केला. तीनही लोकात त्या प्रभू परमात्म्याची ज्योत विराजमान आहे. त्याच्याच प्रकाशाने तिन्ही लोक प्रकाशित झाले आहेत. सतगुरुच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने साधकास प्रभुनामाची प्राप्ती होते व तो हे माणीक–मोती वेचून घेतो. प्रभुनामाचे वारंवार स्मरण केल्याने साधकास हे समजून येते की प्रत्येक वस्तूच्या अंतरात त्या प्रभू परमात्म्याचा निरंतर वास आहे. जो गुरुमुख होऊन हे पाहतो, सत्यरूप परमात्म्याचे स्मरण करतो, त्यास हे कळून येते की सत्यरूप परमेश्वराशिवाय संसार व्यर्थ आहे. ॥ २ ॥

धधै धरमु धरे धरमा पुरि गुणकारी मनु धीरा ॥
धधै धूलि पड़ै मुखि मसतकि कंचन भए मनूरा ॥
धनु धरणीधरु आपि अजोनी तोलि बोलि सचु पूरा ॥
करते की मिति करता जाणै कै जाणै गुरू सूरा ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३०)

शब्दार्थ : **धधै** – 'ध' ह्या अक्षराचा बोध. **धरमु** – धर्म. **धरे** – धर. **धरमा पुरि** – धर्मपुरी, सत्संग. **मनु** – मन. **धीरा** – धैर्यवान. **धूलि** – धूळ, चरणाची धूळ. **कंचन** – सोने. **मनुरा** – राख. **धनु** – धन्य. **धरणीधरु** – धरणीधर, जगाची धारण करणारा, प्रभू. **सचु** – सत्य. **पूरा** – पूर्ण. **मिति** – मर्यादा, सीमा, अंत. **सुरा** – परिपूर्ण गुरू.

भावार्थ : 'ध' ह्या अक्षराचा बोध श्री गुरू नानकदेवजी खालीलप्रमाणे सांगतात – धर्मपुरीत, म्हणजे सत्संगात, जीवात्मा स्थिर होतो. जीव कर्तव्यनिष्ठारूपी धर्माचे पालन करतो. ते लाभदायक असते. त्यामुळे मनास धैर्य प्राप्त होते. संतसज्जनाची चरणधूळ सर्व देहावर, मस्तकावर पडल्याने जीवनाचे सोने होते. तो प्रभू परमात्मा धन्य आहे. तो कोणत्याही योनीतून जन्मला नसून स्वयंभू आहे. तो सर्व प्रकारे पूर्ण व सत्य आहे. त्याचा न्याय सत्य आहे. त्याचे वचनही सत्य व पूर्ण आहे. हे ज्ञान सतगुरुकडून प्राप्त होते. त्या कर्त्याची (प्रभूची) करणी तोच जाणतो किंवा पूर्णगुरु जाणतो. ॥ ३ ॥

ङिआनु गवाइआ दूजा भाइआ गरबि गले बिखु खाइआ ॥
गुर रसु गीत बाद नही भावै सुणीऐ गहिर गंभीरु गवाइआ ॥
गुरि सचु कहिआ अंम्रितु लहिआ मनि तनि साचु सुखाइआ ॥
आपे गुरमुखि आपे देवै आपे अंम्रितु पीआइआ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३०)

शब्दार्थ : **ङिआनु** – गुरुज्ञान. **गवाइआ** – घालवले. **दूजा** – द्वैतभाव. **गरबि** – गर्व. **गरबि गले** – गर्वाचे विष भिनले. **बिखु** – विष. **खाइआ** – खातो. **बाद** – व्यर्थ. **भावै** – आवडते. **सुणीऐ** – ऐकणे. **गहिर** – अगाध.

पीआइआ – पाजतो. **कहिआ** – सांगितले. **सचु** – सत्य. **अंम्रितु** – अमृत. **लहिआ** – प्राप्त केले.

भावार्थ : 'ङ' ह्या अक्षराचा बोध.

द्वैतभाव मनात उत्पन्न झालेल्या जीवास प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होत नाही. त्यामुळे त्याच्या मनात अहंकाराचे, गर्वाचे विष पुरेपूर भिनते व तेच त्याला गोड वाटते, आवडू लागते. त्यातच तो सडत राहतो. सतगुरूने केलेला प्रभुनामाचा उपदेश, प्रभूचे गुणगान करणारी गीते त्यास आवडत नाहीत. त्यामुळे असा जीव त्या अगाध गंभीर प्रभू परमात्म्याच्या कृपेस वंचित होतो. सतगुरूच्या मुखातून ज्याने सत्यरूप प्रभू परमात्म्याचे नामरूपी अमृत प्राप्त केले, अशा जीवास खऱ्या सुखाची प्राप्ती होते. असा जीव मग इतरांनाही गुरुमुखी बनवून, त्यांना प्रभुनामाचे स्मरण करण्यास प्रवृत्त करतो व त्यांना नामामृत पाजतो. ॥ ४ ॥

एको एकु कहै सभु कोई हउमै गरबु विआपै ॥
अंतरि बाहरि एकु पछाणै इउ घरु महलु सिञापै ॥
प्रभु नेड़ै हरि दूरि न जाणहु एको स्रिसटि सबाई ॥
एकंकारु अवरु नही दूजा नानक एकु समाई ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३०)

शब्दार्थ : **एको एकु** – एकमेव, अद्वितीय. **कहै** – म्हणतात. **सभु** – सर्वजण. **हउमै** – अहंकारात. **गरबु** – गर्वात. **बिआपै** – व्याप्त. **अंतरि** – आत, अंत:करणात. **बाहरि** – बाहेर. **पछाणै** – ओळखले. **इउ** – अशा प्रकारे. **घरु** – प्रभू परमात्म्याचे स्वरूप. **महलु** – प्रभू परमात्म्याचे वसतिस्थान. **सिञापै** – ओळखतो. **नेडै** – निकट, जवळ. **दुरि** – दूर. **जाणहु** – जाणतो, मानतो. **स्रिसटि** – सृष्टी. **सबाई** – संपूर्ण. **एकंकारु** – एक ओंकार. **अवरु** – अन्य. **दूजा** – दुसरा. **एकु** – एकमेव परमात्मा. **समाई** – सामावलेला.

भावार्थ : सर्वच जण म्हणतात की, तो प्रभू परमात्मा एकमेव आहे. त्याच्यासारखा अन्य कोणीही नाही. पण सर्वच जण आपापल्या अहंकारात, गर्वात बुडून गेलेले असतात. पण जो जीव आंतरबाह्य सर्वत्र भरून राहिलेल्या प्रभू परमात्म्यास ओळखतो, त्यास प्रभू परमात्म्याचे घर, त्याचा महाल ह्याचेही ज्ञान प्राप्त होते. तो प्रभू परमात्मा तुझ्या अगदी निकट आहे. तो दूर आहे असे समजू नकोस. ह्या संपूर्ण सृष्टीत तो प्रभू परमात्मा सर्वत्र भरून राहिलेला आहे. नानक सांगतात, तो सर्वव्याप्त प्रभू परमात्मा, तो एक 'ओंकार' सर्वत्र सामावलेला आहे. त्याच्याशिवाय अन्य दुसरा कोणी नाही. त्याच्याशी एकरूप होऊन जाणे हेच प्रत्येकाचे इति कर्तव्य आहे. ॥ ५ ॥

इसु करते कउ किउ गहि राखउ अफरिओ तुलिओ न जाइ ॥
माइआ के देवाने प्राणी झूठि ठगउरि पाई ॥
लबि लोभि मुहताजि विगूते इब तब फिरि पछुताई ॥
एकु सरेवै ता गति मिति पावै आवणु जाणु रहाई ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३०)

शब्दार्थ : **इसु** – त्या. **करते** – कर्ता. **किउ** – कसे. **गहि राखउ** – पकडून, धरून ठेवणे. **अफरिओ** – पकडला जाणारा. **तुलिओ** – तुलना, मोजमाप करणे. **माइआ** – माया. **देवाने** – वेडे झालेले. **झूठि** – खोटी. **ठगउरि** – नशा आणणारी मुळी. **लबि** – लालसा. **लोभि** – लोभ. **मुहताजि** – अधीन होणे, वश होणे. **विगूते** – खराब होतात, अपमानित होतात. **इब तब** – नेहमी. **फिरि** – नंतर. **पछुताई** – पश्चात्ताप करतात. **एकु** – एकमेव प्रभू परमात्मा. **सरेवै** – सेवा. **ता** – तेव्हा. **गति मिति** – गतिविधी. **पावै** – प्राप्त करतात. **आवणु** – येणे, जन्मणे. **जाणु** – जाणे, मरणे. **रहाई** – समाप्त होते.

भावार्थ : त्या कर्त्या प्रभू परमेश्वरास मी माझ्या हृदयात कसे काय बांधून ठेवू शकेन ? त्याला कोणीही पकडू शकत नाही. त्याचे तोल मोलही करता येत नाही. मोहमायेने वेडेपिसे झालेले जीव, विषयविकारी नशा आणणाऱ्या मुळीचे सेवन करणारे जीव, त्यातच गुंतून पडल्याने हीन जिणे जगतात. विषयविकारांची लालसा, धन व कंचनाच्या लोभाच्या अधीन होऊन पश्चात्ताप पावून अखेर त्यातच नष्ट होतात. जो जीव, त्या एकमात्र प्रभू परमात्म्याची सेवा करतो, त्यास प्रभू परमात्म्याची प्राप्ती होते. त्यास सत्गती प्राप्त होते व त्याची जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होते. ॥ ६ ॥

एकु अचारु रंगु इकु रूपु ॥ पउण पाणी अग्नी असरूपु ॥
एको भवरु भवै तिहु लोइ ॥ एको बूझै सूझै पति होइ ॥
गिआनु धिआनु ले समसरि रहै ॥ गुरमुखि एकु विरला को लहै ॥
जिस नो देइ किरपा ते सुखु पाए ॥ गुर दुआरै आखि सुणाए ॥ ७ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३०)

शब्दार्थ : **एकु** – एकमेव प्रभू परमात्मा. **अचारु** – आचरण. **इकु** – एकमेव. **पउण** – पवन, वायू. **असरूपु** – स्वरूप. **भवरु** – भ्रमर. **भवै** – झाला आहे. **तिहु** – तीन. **लोइ** – लोक. **बूझै** – जाणतो. **सूझै** – समजतो. **पति** – पत, प्रतिष्ठा. **गिआनु** – ज्ञान. **धिआनु** – ध्यान. **समसरि** – समभाव. **गुरमुखि** – सतगुरूच्या उपदेशाने वागणारा. **लहै** – प्राप्त करतो. **जिसनो** – ज्याला. **देइ** – देतो. **किरपा** – कृपा. **ते** – तो. **सुखु** – सुख. **पाए** – प्राप्त करतो. **दुआरै** – द्वारे. **आखि** – बोलतो. **सुणाए** – ऐकवतो.

भावार्थ : त्या एकमेव प्रभू परमात्म्यास स्वत:चा असा कोणताही आकार, रंग, रूप नाही. तरीही साऱ्या चराचर सृष्टीतील आचरण, रंग, रूप ह्यामध्ये तोच क्रियान्वित झालेला आहे. पवन, पाणी, अग्नी ही त्याचीच रूपे आहेत. तीनही लोकांत तो भ्रमराप्रमाणे सदैव भ्रमण करत आहे. ज्याने प्रभू परमात्म्याचे हे रहस्य जाणले, त्यास सर्वत्र सन्मान प्राप्त होतात. असा साधक गुरुकृपेने सदैव प्रभू परमात्म्याच्या ज्ञानात ध्यान– मग्न राहतो व समदर्शी होतो. ज्या एखाद्या व्यक्तीवर प्रभू परमात्म्याची कृपा होते, तो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून सुखी होतो. अशा साधकाच्या अंगी गुरूच्या माध्यमातून लोकांना प्रभू परमात्म्याचे गुण सांगण्याचे व समजावण्याचे सामर्थ्य येते. ॥ ७ ॥

ऊरम धूरम जोति उजाला ॥ तीनि भवण महि गुर गोपाला ॥
ऊगविआ असरूपु दिखावै ॥ करि किरपा अपुनै घरि आवै ॥
ऊनवि बरसै नीझर धारा ॥ ऊतम सबदि सवारणहारा ॥
इसु एके का जाणै भेउ ॥ आपे करता आपे देउ ॥ ८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३०)

शब्दार्थ : **ऊरम** – उर्वी, पृथ्वी. **धूरम** – आकाश. **जोति** – ज्योत. **उजाला** – उजेड, प्रकाश. **गुर गोपाला** – प्रभू परमात्मा. **ऊगविआ** – प्रकट होतो. **असरूपु** – स्वरूप. **दिखावै** – दाखवतो. **अपुनै** – आपल्या. **घरि** – हृदयात. **आवै** – येतो. **ऊनवि** – खाली झुकून. **बरसै** – वर्षाव. **नीझर** – संतत. **धारा**– धार. **ऊतम** – उत्तम. **सबदि** – शब्दाने, उपदेशाने. **सवारणहारा** – सावरणारा. **इसु** – अशा. **भेउ** – भेद, रहस्य. **एके** – परमात्मा. **आपे** – आपण स्वत:. **देउ** – प्रकाशरूप, देव.

भावार्थ : पृथ्वी, आकाश सर्वत्र त्या प्रभू परमात्म्याची ज्योत प्रकाशमान आहे. साऱ्या त्रिभुवनात तोच गोपाल भरून राहिला आहे. त्याच प्रभू परमात्म्याची ज्योत सतगुरूच्या कृपेने साधकास प्राप्त होते. तो साधक ती ज्योत आपल्या हृदयात घट्टपणे धरून ठेवतो. प्रभू परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे हे ज्ञान त्या साधकास प्राप्त होते व त्याचे मन प्रभू परमात्म्याचे ठायी स्थिर होते. ज्याप्रमाणे जलाने भरलेले ढग खाली उतरून पृथ्वीवर पावसाच्या संततधारेचा वर्षाव करतात, त्याप्रमाणे असा साधक विनम्र बनून, प्रभुनामाच्या माध्यमातून साऱ्या संसारास, साऱ्या जीवांना मार्गदर्शन करतो. तो स्वत: कर्त्या प्रभू परमात्म्याप्रमाणे देवत्व प्राप्त करतो.॥८॥

उगवे सुरु असुर संघारै ॥ ऊचउ देखि सबदि बीचारै ॥
उपरि आदि अंति तिहु लोइ ॥ आपे करै कथै सुणै सोइ ॥
ओहु बिधाता मनु तनु देइ ॥ ओहु बिधाता मनि मुखि सोइ ॥
प्रभु जगजीवनु अवरु न कोइ ॥ नानक नामि रते पति होइ ॥ ९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३०)

शब्दार्थ : **उगवे** – उगवतो. **सुरु** – सूर्य. **असुर** – दैत्य, राक्षस. **संघारै** – संहार करतो. **ऊचउ** – उच्च. **देखि** – पाहून. **बीचारै** – विचार करतो. **उपरि** – वर. **आदि** – आधी. **अंति** – शेवटी. **तिहु** – तिन्ही. **लोइ** – लोक. **आपे** – स्वयं प्रभू परमात्मा. **करै** – करतो. **कथै**– सांगतो. **सुणै** – ऐकतो. **सोइ** – तोच. **ओहु** – तो. **अवरु** – अन्य, दुसरा. **नामि रते** – प्रभूनामात रंगून जातो. **पति** – पत, प्रतिष्ठा.

भावार्थ : जेव्हा साधकाच्या मनात प्रभुनामरूपी सूर्याचा उदय होतो, तेव्हा तो आपल्या मनातील कामक्रोधादी विकाररूपी दैत्यांचा नाश करतो. जेव्हा तो सूक्ष्म दृष्टीने खोलवर प्रभुनामाचा विचार करतो, तेव्हा त्याला कळून येते की, तिन्ही लोकांच्या आदी व अंतामध्ये तो एकमेव प्रभू परमात्माच आहे. तोच सर्वांचा कर्ता आहे. सर्व काही बोलणारा, सांगणारा, ऐकणाराही तोच आहे. जीवाला तन, मन, सर्व काही देणारा तोच विधाता आहे. मनात व मुखात तोच विराजमान आहे. साऱ्या संसाराचे जीवनही तोच आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही नाही. तोच एकमेव सर्व काही आहे. नानक सांगतात, जो प्रभुनामात रंगून जातो त्यासच प्रतिष्ठा प्राप्त होते.॥९॥

राजन राम रवै हितकारि ॥ रण महि लूझै मनूआ मारि ॥
राति दिनंति रहै रंगि राता ॥ तीनि भवन जुग चारे जाता ॥
जिनि जाता सो तिस ही जेहा ॥ अति निरमाइलु सीझसि देहा ॥
रहसी रामु रिदै इक भाइ ॥ अंतरि सबदु साचि लिव लाइ ॥ १० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३१)

शब्दार्थ : **रवै** – स्मरण करतो. **हितकारि** – प्रेमपूर्वक. **रण** – संसाररूपी युद्धभूमी. **लूझै** – लढतो, झुंजतो. **मनुआ** – मनातील विकार. **राति दिनंति** – रात्रंदिवस. **तीनि भवन** – त्रिभुवनात. **जुग चारे** – चारही युगात. **जाता** – प्रसिद्ध. **जिनि** – ज्याने. **जाता** – जाणले. **सो** – तो. **तिस ही** – त्याच्यासारखा. **जेहा** – सारखा. **सीझसि**– सफल. **रहसी** – राहतो. **रिदै** – हृदयात. **अंतरि** – अंतरात, हृदयात. **लिव लाइ** – तल्लीन होणे.

भावार्थ : जो राजारामाचे प्रेमपूर्वक स्मरण करतो, ह्या संसाराच्या रणभूमीवर दृढपणे लढून मनातील विकारांना मारतो, तो रात्रंदिवस सदासर्वदा प्रभुनामाच्या रंगात रंगून जातो. असा साधक त्रिभुवनात चारही युगात विख्यात होतो. जो प्रभू परमात्म्यास जाणतो, तो त्याच्यासारखा होतो. तो अत्यंत निर्मळ होतो. त्याचे जीवन सफल होते. तो प्रभू परमात्म्यास आपल्या हृदयात धारण करून त्याच्याशी एकरूप होऊन जातो. त्याच्या अंत:करणात प्रभुनाम सदैव गुंजत राहते व तो सत्यरूप परमेश्वराशी एकरूप होऊन जातो. ॥ १० ॥

रोसु न कीजै अंम्रितु पीजै रहणु नही संसारे ॥
राजे राइ रंक नही रहणा आइ जाइ जुग चारे ॥
रहण कहण ते रहै न कोई किसु पहि करउ बिनंती ॥
एकु सबदु राम नाम निरोधरु गुरु देवै पति मती ॥ ११ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३१)

शब्दार्थ : **रोसु** – रोष, राग. **अंम्रितु** – अमृत. **पीजै** – पी. **रहणु** – राहणे. **राइ** – श्रीमंत. **आइ जाइ** – येतो–जातो, जन्मतो– मरून जातो. **कहण** – सांगणे. **किसु एहि** – कोणाला, कोणाकडे. **बिनंती** – विनंती. **निरोधरु** – निरोध करणारा, थांबवणारा. **देवै** – देतो.

भावार्थ : हे जीवा ! तू प्रभू परमात्म्यावर रागवू नकोस. सदैव प्रभुनामाचे अमृत पीत राहा. कारण ह्या जगात कोणीही कायम राहणार नाहीये. भले तो राजा असो वा रंक असो. तो येथे कायम राहणार नाही. त्याला हे जग, हा संसार सोडून जावेच लागेल. युगानुयुगे हीच परिपाठी चालत चाली आहे. कोणी कितीही, काहीही म्हणो, त्याला येथून जावेच लागेल. पण असे असूनही प्रत्येक जण ह्या नश्वर संसारास घट्ट धरून बसतो. हे दु:ख मी कोणाला सांगू ? ह्या दुनियेच्या मोहातून सोडवण्याची विनंती मी कोणास करू ? 'राम' हा एकच शब्द असा आहे की जो कधीही प्रभावहीन होणार नाही. सतगुरू साधकास प्रभुनाम प्रदान करतो. त्यामुळे साधकाची बुद्धी स्थिर होते व साधकास प्रतिष्ठा प्राप्त होते. ॥ ११ ॥

लाज मरंती मरि गई घूघटु खोलि चली ॥
सासु दिवानी बावरी सिर ते संक टली ॥
प्रेमि बुलाई रली सिउ मन महि सबदु अनंदु ॥
लालि रती लाली भई गुरमुखि भई निचिंदु ॥ १२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३१)

शब्दार्थ : **लाज** – लोकलज्जा. **मरंती** – मरणारी. **मरि गई** – मरून गेली. **सासु** – अविद्यारूपी सासू. **दिवानी बावरी** – वेडीपिशी. **सिर** – डोके. **संक** – शंका. **प्रेमि** – प्रेमस्वरूप परमात्मा. **रली सिउ** – हौसेने,

मौजेने. सबदु अनंदु – प्रभुनामाचा आनंद. **लालि रती** – प्रेमरंगात रंगून. **भइ** – झाले. **निचिंदु** – निश्चिंत.

भावार्थ : लोकलज्जा, लोक काय म्हणतील, हा विचार मी आता सोडून दिला आहे. घुंघट टाकून देऊन मी आता उजळ माथ्याने जीवन जगत आहे. पूर्वी मी लोकलज्जेस्तव मोहमयी सांसारिक जीवन जगत होते पण तो माझ्या आध्यात्मिक प्रगतीत अडथळा आहे हे लक्षात आल्यावर त्या मोहमायेस मी मारून टाकून आता मी उजळ माथ्याने प्रभुभक्ती करत आहे. त्यामुळे अविद्यारूपी माझी सासू वेडीपिशी झाली आहे. आता माझ्या मनातील तिची भीती दूर झाली आहे. माझ्या प्रभूने, पती परमेश्वराने प्रेमाने मला जवळ बोलावले आहे. माझ्या मनात आता प्रभुनामाचा आनंदीआनंदच भरून राहिला आहे. आता मी प्रभुप्रेमाच्या रंगात रंगून गेले आहे व गुरुमुखी झाल्यामुळे मी आता निश्चिंत झाले आहे. ॥ १२ ॥

लाहा नामु रतनु जपि सारू ॥ लबु लोभु बुरा अहंकारू ॥
लाड़ी चाड़ी लाइतबारू ॥ मनमुखु अंधा मुगधु गवारू ॥
लाहे कारणि आइआ जगि ॥ होइ मजूरू गइआ ठगाइ ठगि ॥
लाहा नामु पूंजी वेसाहु ॥ नानक सची पति सचा पातिसाहु ॥ १३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३१)

शब्दार्थ : **लाहा** – प्राप्त होणे, लाभणे. **सारू** – सारतत्व. **लबु** – लालसा. **लोभु** – लोभ. **बुरा** – वाईट. **लाडी चाडी** – स्तुती-निंदा. **लाइतबारू** – चुगली करणारा. **मुगधु** – मुग्ध, मूर्ख. **गवारू** – अडाणी. **लाहे कारणि** – प्राप्त होण्यासाठी. **आइआ** – आला. **होइ मजूरू** – मजूर होऊन. **गइआ** – गेला. **वेसाहु** – वास्तविक, खरा.

भावार्थ : नामरत्न प्राप्त होणे हा खरा लाभ आहे. साऱ्या जीवनाचे जे सारतत्त्व आहे, त्या प्रभुनामाचा जप कर. लालसा, लोभ व अहंकार ह्या वाईट गोष्टी आहेत. त्या जीवाला प्रभू परमात्म्यापासून दूर नेतात. खोटी स्तुती करणे, दुसऱ्याची निंदानालस्ती करणे , चुगली करणे ही स्वेच्छाचारी माणसाची लक्षणे होत. अशी माणसे अज्ञानी, मूर्ख व अडाणी होत. जीवाचा जन्म, लाभ कमवण्याकरिता, प्रभुनाम प्राप्त करण्यासाठी झाला आहे. पण तो प्रपंचात अडकून हमालासारखा राब राब राबतो व मोहमायेकडून फसवला जातो. प्रभुनामाची पुंजी साठव. ते खरे धन आहे. नानक सांगतात, प्रभुनामाच्या स्मरणाने खरी प्रतिष्ठा प्राप्त होते व त्यालाच प्रभू परमात्माही प्राप्त होतो.॥१३॥

आइ विगूता जगु जम पंथु ॥ आई न मेटण को समरथु ॥
आथि सैल नीच घरि होइ ॥ आथि देखि निवै जिसु दोइ ॥
आथि होइ ता मुगधु सिआना ॥ भगति बिहूना जगु बउराना ॥
सभ महि वरतै एको सोइ ॥ जिस नो किरपा करे तिसु परगटु होइ ॥ १४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३१)

शब्दार्थ : **आइ** – आला, जन्म घेतला. **विगुता** – नष्ट. **आई** – माया. **मेटण** – मिटविणे, नष्ट करणे.

आथि – धन. **निवै** – झुकतात, नम्र होतात. **जिसु** – ज्याच्यापुढे. **दोइ** – दोघे. **बिहूना** – विहीन. **बउराना** – वेडा, बावरलेला. **सभ** – सर्व. **महि** – मध्ये. **वरतै** – वास करतो. **एको** – एकमात्र परमेश्वर. **सोइ** – तोच.

भावार्थ : हे पंडित ! हा संसार नश्वर आहे. जीव ह्या संसारात जन्म घेऊन मरणाचीच वाट चालत असतो. जन्माला आलेल्या कोणत्याही जीवामध्ये मायेचा प्रभाव तोडण्याचे सामर्थ्य नाही. एखाद्या नीच माणसाकडे धनाचा डोंगर असेल तर सर्व लोक त्याला शहाणा, श्रेष्ठ समजतात. त्याच्यापुढे नम्र होतात. वास्तविक प्रभू परमात्म्याच्या भक्तीशिवाय जीवन व्यर्थ आहे. ह्या साऱ्या चराचरात तो एकमेव प्रभू परमात्मा भरून राहिला आहे. ज्याच्यावर त्या प्रभू परमात्म्याची कृपा होते त्यालाच प्रभू परमात्मा सर्वात व्याप्त दिसतो. ॥ १४ ॥

जुगि जुगि थापि सदा निरवैरु ॥ जनमि मरणि नही धंधा धैरु ॥
जो दिसै सो आपे आपि ॥ आपि उपाइ आपे घट थापि ॥
आपि अगोचरु धंधै लोई ॥ जोग जुगति जगजीवनु सोई ॥
करि आचारु सचु सुखु होई ॥ नाम विहूणा मुकति किव होई ॥ १५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३१)

शब्दार्थ : **जुगि जुगि** – प्रत्येक युगात. **थापि** – स्थापित, निर्माण करून. **निरवैरू** – निर्वैर. **धंधा** – धंदा. **धैरू** – धावपळ. **दीसै** – दिसते. **उपाइ** – उत्पन्न केले, निर्माण केले. **करि** – करून. **आचारू** – सदाचरण. **सचु** – सत्य. **सुखु** – सुख. **विहुणा** – विहीन, शिवाय. **मुकति** – मुक्त. **किव** – कसे.

भावार्थ : युगानुयुगे तो प्रभू परमात्मा स्थिर व अस्तित्वमान आहे. त्याचे कोणाशीही वैर नाही. तो जन्मतही नाही आणि मरतही नाही. तो कोणत्याही सांसारिक धंद्यासाठी धावाधाव करत नाही. जे जे काही आपणांस दिसते ती त्याचीच रूपे आहेत. तो सर्वत्र विराजमान आहे. त्यानेच त्याला उत्पन्न केले आहे व प्रत्येक जीवाच्या ठायी त्याने स्वत:स स्थापित केले आहे. तो स्वत: कोणास दिसत नाही पण त्यानेच सर्व जीवांना प्रापंचिक धंद्यात गुंतवून ठेवले आहे. प्रभूशी एकरूप होण्याचा मार्गही तोच आहे. हे पांडे ! तू सत्याचरण कर. सदाचरणाने वाग. तरच तुला खरे सुख प्राप्त होईल. तू जर प्रभुनामाचा स्वीकार केला नाहीस तर तुला मुक्ती कशी प्राप्त होणार ? नामाशिवाय मुक्ती नाही. ॥ १५ ॥

विणु नावै वेरोधु सरीर ॥ किउ न मिलहि काटहि मन पीर ॥
वाट वटाऊ आवै जाइ ॥ किआ ले आइआ किआ पलै पाइ ॥
विणु नावै तोटा सभ थाइ ॥ लाहा मिलै जा देइ बुझाइ ॥
वणजु वापारु वणजै वापारी ॥ विणु नावै कैसी पति सारी ॥ १६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३१)

शब्दार्थ : **विणु** – विना, शिवाय. **नावै** – प्रभुनाम. **वेरोधु** – विरोधी, विरुद्ध. **सरीर** – शरीर. **किउ** – का. **काटहि** – नष्ट कर. **पीर** – पीडा. **वाट वटाऊ** – वाटसरू. **आवै** – येतो. **जाइ** – जातो. **किआ** – काय. **ले** – घेऊन. **पलै** – पदरात. **पाइ** – प्राप्त झाले. **सभ** – सर्व. **थाइ** – स्थान. **लाहा** – लाभ. **मिलै** – मिळतो. **जा** –

जेव्हा. **बुझाइ** – समजावून. **वणजु** – धंदा. **वापारु** – व्यापार. **वणजै** – व्यापार करतो. **वापारी** – व्यापारी. **पति** – पत, प्रतिष्ठा. **सारी** – श्रेष्ठ, सर्व.

भावार्थ : प्रभुनाम अंत:करणात नसेल तर जीव कुकर्माकडे ओढला जातो. अशा रीतीने आपले शरीर आपलेच वैरी बनते, मोहमायेकडे ओढले जाते. हे जीवा ! तू प्रभुनामाचा आसरा का घेत नाहीस ? प्रभुनामामुळे मनाची पीडा नष्ट होते. हा जीव ह्या जगात एखाद्या वाटसरूप्रमाणे येतो आणि जातो. तो येताना काय घेऊन येतो ? जाताना शेवटी पदरात काय लाभ घेऊन जातो ? प्रभुनामाशिवाय ह्या संसारात त्याच्या पदरात तोटाच तोटा पडतो. प्रभू परमात्मा ज्या जीवावर कृपा करून त्यास ज्ञान देतो त्यालाच प्रभुनामाचा लाभ होतो. ह्या संसाररूपी बाजारात खरा साधक प्रभुनामाचा व्यापार करतो. नामाशिवाय खरी प्रतिष्ठा कशी प्राप्त होणार ? ॥ १६ ॥

गुण वीचारे गिआनी सोइ ॥ गुण महि गिआनु परापति होइ ॥
गुणदाता विरला संसारि ॥ साची करणी गुर वीचारि ॥
अगम अगोचरु कीमति नही पाइ ॥ ता मिलीऐ जा लए मिलाइ ॥
गुणवंती गुण सारे नीत ॥ नानक गुरमति मिलीऐ मीत ॥ १७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३१)

शब्दार्थ : **वीचारे** – विचार करतो. **गिआनी** – ज्ञानी. **सोइ** – तोच. **महि** – मध्ये. **गिआनु** – ज्ञान. **परापति** – प्राप्ती. **होइ** – होईल. **गुणदाता** – गुण देणारा. **अगम** – अगम्य. **अगोचरु** – डोळ्यांना न दिसणारा, अदृश्य. **कीमति** – किंमत. **सारे** – सर्व. **नीत** – नित्य. **गुरमति** – सतगुरू विचार, उपदेश. **मीत** – मित्र.

भावार्थ : जो साधक प्रभू परमात्म्याच्या गुणांचे स्मरण, मनन, चिंतन करतो तोच खरा ज्ञानी होय. प्रभू परमात्म्याच्या गुणगानातूनच ज्ञानाची प्राप्ती होते. अशा ह्या ज्ञानी पुरुषातून क्वचित कोणी प्रभुगुणांचे दान करण्याची क्षमता प्राप्त करतो. साधकाने सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे सदाचरण करावे. तो प्रभू परमात्मा अगम्य व अगोचर आहे. त्याचे यथायोग्य मूल्यमापन कोणीही करू शकत नाही. प्रभू परमात्मा ज्याला योग्य समजतो त्यालाच प्रभू परमात्म्याची प्राप्ती होते. तो साधक प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. नानक सांगतात, गुणवान आत्मा सदैव प्रभू परमात्म्याचे गुणगान करतो आणि सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून आपल्या प्रिय सख्याशी प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. ॥ १७ ॥

कामु क्रोधु काइआ कउ गालै ॥ जिउ कंचन सोहगा ढालै ॥
कसि कसवटी सहै सु ताउ ॥ नदरि सराफ वंनी सचड़ाउ ॥
जगतु पसू अहं कालु कसाई ॥ करि करतै करणी करि पाई ॥
जिनि कीती तिनि कीमति पाई ॥ होर किआ कहीऐ किछु कहणु न जाई ॥ १८ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३२)

शब्दार्थ : **कामु** – कामवासना. **क्रोधु** – क्रोध. **काइआ** – काया, शरीर. **गालै** – झिजवतात, नष्ट करतात. **जिउ** – ज्याप्रमाणे. **सोहगा** – सोन्याला शुद्ध करणारा पदार्थ. **ढालै** – गाळतो. **कसि** – कस. **कसवटी** – सोन्याची पारख करणारा दगड. **सहै** – सहन करतो. **ताउ** – जाप, ताव, उष्णता. **नदरि** – कृपादृष्टी. **वंनी** – कसोटीवर, चांगले रंग. **सचडाउ** – शुद्ध. **पसु** – पशू. **अहं** – अहंकार. **कालु** – काळ. **करतै** – कर्त्याने. **करि** – हात, **कर. जिनि** – ज्याने, परमेश्वराने. **कीती** – निर्माण केले. **तिनि** – तोच. **होर** – आणखी.

भावार्थ : ज्याप्रमाणे सोनार सोने भट्टीत घालून तापवतो, त्याप्रमाणे काम, क्रोध शरीराला जाळत असतात. ज्याप्रमाणे अग्नीचा ताप सहन केल्यावर शुद्ध झालेले सोने सराफाच्या कसोटीला उतरते, त्याप्रमाणे जेव्हा साधक संसाराचा ताप सहन करून प्रभुनामाने स्वत:तील सर्व अवगुण, विषयविकारांचे हीण जाळून टाकतो तेव्हाच तो प्रभू परमात्म्याच्या कृपेस पात्र ठरतो. त्याच्या कसोटीला शुद्ध ठरतो. हा संसार पशू आहे. अहंकार हा जीवाचा घास घेणारा कसाई आहे. प्रभू परमात्म्याने ही सृष्टी उत्पन्न केली. त्यात जीवांना जन्मास घातले व ह्या जगात कसे आचरण करावे हे त्या जीवावर सोपवले. जो जसे आचरण करेल तसे त्यास फल प्राप्त होईल. मोहमायेच्या, विषयविकारांच्या विळख्यात अडकला तर काळ त्याच्यावर झडप घालील व त्यास वारंवार जन्ममरणाच्या चक्रात अडकून दु:ख भोगावे लागेल. प्रभुनामाचा आश्रय घेऊन, गुरुमुखी होऊन सदाचरण करेल तर प्रभू परमात्म्यास प्राप्त करेल. ज्या प्रभू परमात्म्याने ही सृष्टी निर्माण केली तोच त्याचे रहस्य जाणतो. दुसऱ्या कोणासही त्याचे मूल्यांकन करता येणार नाही. कारण अन्य कोणी काहीच करू शकत नाही. ॥ १८ ॥

खोजत खोजत अंम्रितु पीआ ॥ खिमा गही मनु सतगुरि दीआ ॥
खरा खरा आखै सभु कोइ ॥ खरा रतनु जुग चारे होइ ॥
खात पीअंत मूए नही जानिआ ॥ खिन महि मूए जा सबदु पछानिआ ॥
असथिरु चीतु मरनि मनु मानिआ ॥ गुर किरपा ते नामु पछानिआ ॥ १९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३२)

शब्दार्थ : **खोजत** – शोध घेता घेता. **खिमा** – क्षमा. **गही** – ग्रहण. **आखै** – सांगतात, वर्णन करतात. **सभु** – सर्वजण. **जुग** – युग. **पीअंत** – खाणे पिणे. **मुए** – मेला. **जानिआ** – जाणले. **खिन** – क्षण. **जा** – ज्याने. **असथिरु** – स्थिर. **मानिआ** – मान्य केले, आवडले. **पछानिआ** – ओळखले.

भावार्थ : खूप प्रयत्न करून, निरंतर शोध घेऊन अखेर ज्याने प्रभुनामरूपी अमृत प्राशन केले, जेव्हा त्याने आपल्या मनाला क्षमाशील बनवले, तेव्हाच सतगुरूकडून त्याला प्रभुनामरूपी अमृताची प्राप्ती झाली. सर्व लोक प्रभुनामाला खरे खरे रत्न मानतात. चारही युगात प्रभूनाम हे खरे रत्न आहे. बहुतेक लोक प्रभुनामास न जाणता संसाराच्या मोहपाशात अडकून खाणे–पिणे–मौजमजा करण्यातच आपले जीवन वाया घालवतात. पण ज्याने प्रभुनाम जाणले त्याचा अहंकार क्षणात नष्ट झाला. खऱ्या साधकास अहंकार मेल्याचा आनंदच वाटतो. कारण त्यामुळे त्याचे मन प्रभुनामात स्थिर होते. सतगुरुकृपेनेच अशा साधकास प्रभुनाम प्राप्त होते. ॥ १९ ॥

गगन गंभीरु गगनंतरि वासु ॥ गुण गावै सुख सहजि निवासु ॥
गइआ न आवै आइ न जाइ ॥ गुरपरसादि रहै लिव लाइ ॥
गगनु अगंमु अनाथु अजोनी ॥ असथिरु चीतु समाधि सगोनी ॥
हरि नामु चेति फिरि पवहि न जूनी ॥ गुरमति सारु होर नाम बिहूनी ॥ २० ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३२)

शब्दार्थ : **गगन** – आकाश. **गंभीरु** – गंभीर. **गगनंतरि** – हृदयरूपी आकाश. **वासु** – वास. **गावै** – गातो. **गइआ** – गेल्यावर. **न आवै** – परत येत नाही. **गुर परसादि** – सतगुरूच्या कृपाप्रसादाने. **रहै** – राहतो. **लिव लाइ** – एकाग्रचित्ताने. **अगंमु** – अगम्य. **अनाथु** – ज्याचा कोणी नाथ नाही, पण जो स्वत: सर्वांचा नाथ आहे असा परमात्मा. **अजोनी** – अयोनी, जो कोणत्याही योनीतून जन्मला नाही असा, स्वयंभू. **असथिरु** – स्थिर. **चीतु** – चित्त. **सगोनी** – सगुण. **चेति** – स्मरण. **जूनी** – योनी. **सारु** – श्रेष्ठ. **होर** – अन्य.

भावार्थ : जेव्हा आकाशासारख्या अनंत, गंभीर, सर्वव्याप्त प्रभू परमात्म्याने साधकाच्या हृदयाकाशात वास केला, तेव्हा साधकास प्रभू परमात्म्याचे गुणगान करून सुखाची व सहजानंदाची प्राप्ती झाली. तो प्रभू परमात्मा जन्मतही नाही आणि मरतही नाही. साधक सतगुरुकृपेने अशा प्रभू परमात्म्याच्या चिंतनात चित्त एकाग्र करतो. तो प्रभू परमात्मा आकाशासारखा विशाल, अगम्य, सर्व जीवांचा पालनकर्ता स्वयंभू आहे. अशा प्रभू परमात्म्याच्या ठिकाणी चित्त स्थिर करणे म्हणजे सगुण समाधी होय. जो साधक त्या हरिनामात आपले चित्त एकरूप करतो, तो कोणत्याही योनीत परत जन्म घेत नाही. सतगुरूने दाखवलेला मार्ग हाच सर्वश्रेष्ठ मार्ग होय. प्रभुनामाशिवाय अन्य कोणताही मार्ग काहीही कामाचा नाही. ॥ २० ॥

घर दर फिरि थाकी बहुतेरे ॥ जाति असंख अंत नही मेरे ॥
केते मात पिता सुत धीआ ॥ केते गुर चेले फुनि हूआ ॥
काचे गुर ते मुकति न हूआ ॥ केती नारि वरु एकु समालि ॥
गुरमुखि मरणु जीवणु प्रभ नालि ॥ दह दिस ढूढि घरै महि पाइआ ॥
मेलु भइआ सतिगुरू मिलाइआ ॥ २१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३२)

शब्दार्थ : **फिरि** – फिरले. **थाकी** – थकले, दमले. **बहुतेरे** – अनेक. **जाति** – जीवांचे प्रकार, योनी. **असंख** – असंख्य. **मेरे** – माझ्या. **केते** – कितीतरी. **सुत** – पुत्र. **धीआ** – कन्या. **फुनि** – पुन्हा. **हूआ** – झाले. **काचे गुर** – कच्चा गुरू. **वरु** – वर, पती. **समालि** – संभाळ करतो. **नालि** – सह. **मेलु** – मिलन. **मिलाइआ** – मिलन घडवले.

भावार्थ : प्रभू परमात्म्याशी मिलन व्हावे म्हणून प्रयत्न करणारा जीव आपले अनुभव सांगताना म्हणतो – मी प्रभुप्राप्तीसाठी अनेक वेळा अनेक योनीत जन्म घेऊन घेऊन पार थकून गेलो आहे. मी किती जीव जातीत जन्म घेतला त्याला अंतच नाही. मी आजवर कित्येकांचा माता, पिता, पुत्र, कन्या झालो याची गणतीही करता येत नाही. मी परत परत किती गुरूंचा चेला झालो त्याचाही अंत नाही. पण कच्च्या गुरूकडून (ज्याची मोहमायेतून सुटका झाली नाही, मन स्थिर झाले नाही अशा गुरूकडून) मुक्ती प्राप्त होत नाही. अनंत जीव हे जणू पत्नी आहेत व तो प्रभू परमात्मा त्यांचा एकमेव पती आहे. तो एकटा सर्व जीवांचा संभाळ करतो. सारे जीव आपापल्या हृदयात त्या प्रभुपतीचे स्मरण करतात. जो साधक सतगुरूच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण करतो, त्याचे जीवन-मरण सार-सर्वस्व प्रभू परमात्म्याशी एकरूप झालेले असते. प्रभूस प्राप्त करण्यासाठी दाही दिशांना शोध घेत फिरल्यानंतर लक्षात येते, की तो प्रभू परमात्मा अन्य कोठेही नसून साधकाच्या हृदयातच वास करत आहे.

सतगुरूशी मिलन झाल्यावर सतगुरुच जीवाचे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवून आणतो. ॥ २१ ॥

गुरमुखि गावै गुरमुखि बोलै ॥ गुरमुखि तोलि तुलावै तोलै ॥
गुरमुखि आवै जाइ निसंगु ॥ परहरि मैलु जलाइ कलंकु ॥
गुरमुखि नाद बेद बीचारु ॥ गुरमुखि मजनु चजु अचारु ॥
गुरमुखि सबदु अंम्रितु है सरु ॥ नानक गुरमुखि पावै पारु ॥ २२ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३२)

शब्दार्थ : **गुरमुखि** – सतगुरूच्या सांगण्याप्रमाणे आचरण करणारा, श्रेष्ठ साधक. **गावै** – प्रभूचे गुण गातो. **बोलै** – प्रभुनामाचा उच्चार करतो. **तोलै** – पारख करतो. **तुलावै** – पारख करवून घेतो. **निसंगु** – नि:संग, विरक्त. **परहरि** – दूर करतो, धुवून टाकतो. **मैलु** – मळ. **जलाइ** – जाळून टाकतो. **कलंकु** – कलंक. **बीचारु** – विचार. **मजनु** – तीर्थस्नान. **चजु अचारु** – शुभ आचार. **सारु** – श्रेष्ठ. **पावै पारु** – भवसागर पार करतो.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा श्रेष्ठ साधक प्रभू परमात्म्याचे गुण गातो. सदैव प्रभूचेच बोल बोलतो. मुखाने प्रभुनामाचाच उच्चार करतो. अशा गुरुमुखी साधकाची प्रभू परमात्मा स्वत: पारख करतो. असा साधक इतरांनाही प्रभुप्राप्तीचा मार्ग दाखवितो. श्रेष्ठ साधक नि:संग बनून जीवन जगतो. श्रेष्ठ साधक आपल्या मनातील मायेचा, कुविचारांचा मळ धुऊन टाकतो. विषयविकारांचा कलंक जाळून नष्ट करून टाकतो. अशा साधकास सतगुरूची वाणी हाच वेदविचार असतो. सतगुरूचा उपदेश हा साधकास तीर्थस्नानाइतका पुण्यप्रद वाटतो व सतगुरूच्या सांगण्याप्रमाणे आचरण करणे हेच तो सर्वश्रेष्ठ सदाचरण मानतो. सतगुरूचा शब्द हा श्रेष्ठ साधकास अमृतासमान वाटतो. गुरुमुखी झालेला साधक हा नामाच्या साहाय्याने भवसागर पार करून जातो.॥२२॥

चंचलु चीतु न रहई ठाइ ॥ चोरी मिरगु अंगूरी खाइ ॥
चरन कमल उर धारे चीत ॥ चिरू जीवनु चेतनु नित नीत ॥
चिंतत ही दीसै सभु कोइ ॥ चेतहि एकु तही सुखु होइ ॥
चिति वसै राचै हरि नाइ ॥ मुकति भइआ पति सिउ घरि जाइ ॥ २३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३२)

शब्दार्थ : **चंचलु** – चंचल. **चितु** – चित्ते. **न रहइ** – राहत नाही. **ठाइ** – एका जागी. **चोरी** – चोरून. **मिरगु** – मृग. **अंगूरी** – अंकुर. **खाइ** – खातो. **उर धारे** – हृदयात धरतो. **चिरूजीवनु** – चिरंतन जीवन, चिरजीवन. **चेतनु** – चैतन्य. **नित नीत** – सदैव. **चिंतत** – चिंतामग्न, चिंतातुर. **एकु** – एकमेव परमेश्वर. **राचै** – एकरूप होणे. **चेतहि** – स्मरण करतात.

भावार्थ : हे चंचल मन एका जागी कधीही स्थिर राहत नाही. जीवरूपी हरण मोहमायेने मोहित होऊन विषयविकाररूपी कोवळे गवत चोरून खातो. पण जर जीवाने आपल्या चित्तात प्रभुनाम दृढपणे धारण केले तर त्यास चिरजीवन प्राप्त होते व तो सदैव चैतन्ययुक्त बनून राहतो. ह्या जगात सर्व जीव चिंतेने चिंतामग्न झालेले

असतात. पण जो जीव त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे चिंतन करतो तो सुखी होतो. जेव्हा तो प्रभू परमात्मा चित्तात वास करतो, तेव्हा साधक प्रभुनामात तल्लीन होऊन जातो. असा साधक मुक्त होतो व सन्मानपूर्वक प्रभू परमात्म्याच्या दरबारात स्थान प्राप्त करतो. ॥ २३ ॥

छीजै देह खुलै इक गंढि ॥ छेआ नित देखहु जगि हंढि ॥
धूप छाव जे सम करि जाणै ॥ बंधन काटि मुकति घरि आणै ॥
छाइआ छूछी जगतु भुलाना ॥ लिखिआ किरतु धुरे परवाना ॥
छीजै जोबनु जरूआ सिरि कालु ॥ काइआ छीजै भई सिबालु ॥ २४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३२)

शब्दार्थ : **छीजै** – तुटणे, नष्ट होणे, कमकुवत. **खुलै** – मोकळ्या होतात. **गढिं** – गाठी. **छेआ** – नश्वर, नाशवंत. **नित** – नित्य, नेहमी. **देखहु** – पाहतो. **हंढि** – फिरून. **धूप** – ऊन. **छाव** – सावली. **काटि** – तोडून. **आणै** – आणतो. **छाइआ** – दुःख. **छूछी** – तुच्छ. **जगतु** – जगाला. **भुलाना** – भुलवणे. **लिखिआ** – लिहिलेले. **किरतु** – कर्म. **धुरे** – मूळ स्थानी. **परवान** – अधिकार पत्र. **छीजै** – क्षीण होणे, हळूहळू नाश पावणे. **जोबनु** – यौवन. **जरूआ** – वृद्धत्व, म्हातारपण. **सिरि** – शिरावर. **कालु** – काळ. **काइआ** – काया देह. **भइ** – झाला. **सिबालु** – शेवाळ.

भावार्थ : जेव्हा मरणाने शरीराचे पतन होते, तेव्हा शरीराच्या बांधलेल्या गाठी ढिल्या पडतात. सर्व अवयव ढिले पडतात. चैतन्यहीन होतात. संपूर्ण जगभर हिंडून पाहा, तुम्हाला सर्वत्र क्षय आणि मृत्यूचे तांडव दिसेल. सारा संसार हळूहळू नाश पावत आहे असे दिसेल. जो साधक सुख-दुःखाला ऊन सावलीचा खेळ समजून त्याकडे समदृष्टीने तटस्थपणे पाहील तो संसारातील सर्व बंधने तोडून मुक्ती प्राप्त करील. प्रत्येक जीवाचा भाग्यलेख नियतीने आधीच लिहून ठेवलेला आहे. क्षणाक्षणाला यौवनाचा नाश होत असून म्हातारपण येऊन काळ शिरावर येऊन बसणार आहे. सारे शरीर क्षीण होऊन शेवाळासारखे लिबलिबीत होणार आहे. ॥ २४ ॥

जापै आपि प्रभू तिहु लोइ ॥ जुगि जुगि दाता अवरु न कोइ ॥
जिउ भावै तिउ राखहि राखु ॥ जसु जाचउ देवै पति साखु ॥
जागतु जागि रहा तुधु भावा ॥ जा तू मेलहि ता तुझै समावा ॥
जै जै कारु जपउ जगदीस ॥ गुरमति मिलीऐ बीस इकीस ॥ २५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३३)

शब्दार्थ : **जापै** – असे समजतात. **आपि** – स्वतः. **तिहु** – तीनही. **लोइ** – लोक. **जुगि जुगि** – प्रत्येक युगात. **अवरु** – अन्य. **जिउ** – जसे. **भावै** – वाटेल, आवडेल. **तिउ** – तसे. **राखु** – रक्षण कर. **जसु** – यश. **जाचउ** – याचना करतो. **देवै** – देतो. **पति** – पत, प्रतिष्ठा. **साखु** – विश्वसनीयता. **जागतु** – जागृत होऊन. **तुधु** – तुला. **भावा** – आवडेन. **जा** – जेव्हा. **तू** – तेव्हा. **मेलहि** – मिलाप होतो. **तुझै** – तुझ्यात. **समावा** – सामावतो. **जै जै** – जयजयकार. **जपउ** – जपतो. **गुरमति** – गुरूच्या उपदेशाने. **मिलीऐ** – प्राप्त होतो, मिळतो. **बीस इकीस** – एकमेवाद्वितीय प्रभू परमात्मा.

भावार्थ : श्रेष्ठ साधकाला तिन्ही लोकांत एकमात्र प्रभू परमात्म्याशिवाय अन्य कोणीही दिसत नाही. त्याला सर्वत्र प्रभू परमात्माच भरून राहिला आहे असा साक्षात्कार होतो. युगानुयुगे, प्रत्येक युगात तो एकमेव प्रभू परमात्मा दाता आहे. अन्य कोणीही काहीही देऊ शकत नाही. त्या प्रभू परमात्म्यास जसे योग्य वाटते तसे तो सर्वांचे रक्षण करतो. जेव्हा साधक त्या प्रभू परमात्म्याचे यशोगान करतो, तेव्हा तो प्रभू परमात्मा त्या साधकास प्रतिष्ठा व आत्मविश्वास प्रदान करतो. जो साधक सतत जागृत राहून मोहमायेस दूर ठेवतो, तो प्रभूस प्रिय होतो. अशा साधकांस तो आपल्या स्वरूपाशी एकरूप करतो व तो साधक प्रभुरूपात लीन होतो. असा साधक प्रभू परमात्म्याचा सदैव जयजयकार करतो व सतगुरुकृपेने तो प्रभुरूपात निश्चित विलीन होतो. ॥ २५ ॥

झखि बोलणु किआ जग सिउ वादु ॥ झुरि मरै देखै परमादु ॥
जनमि मूए नही जीवण आसा ॥ आइ चले भए आस निरासा ॥
झुरि झुरि झखि माटी रलि जाइ ॥ कालु न चांपै हरि गुण गाइ ॥
पाई नवनिधि हरि कै नाइ ॥ आपे देवै सहजि सुभाइ ॥ २६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३३)

शब्दार्थ : **झखि बोलणु** – झक मारणे, व्यर्थ बोलणे. **सिउ** – सह, बरोबर. **वादु** – वादविवाद. **झुरि** – झुरून. **मरै** – मरतो. **परमादु** – वेडेपणा. **जनमि** – जन्मतो. **मुए** – मरतो. **आस** – आशा. **आइ** – आला. **चलै** – गेला. **भइ** – झाली. **निरासा** – निराशा. **माटी** – माती. **रलि जाइ** – मिसळून जातो. **कालु न चांपै** – काळ खाऊ शकत नाही. **पाई** – प्राप्त करतो. **नवनिधि** – नऊनिधि. **आपे** – प्रभू स्वतः. **देवै** – देतो. **सहजि** – सहज. **सुभाइ** – स्वाभाविकपणे.

भावार्थ : जीव मायेच्या मोहात पडून निष्कारण संसाराच्या वादविवादात अडकून पडतो. पण जेव्हा त्यास आपली चूक कळून येते, तेव्हा तो पश्चात्तापाने झुरून मरून जातो. तो वारंवार जन्मतो व वारंवार मरतो. जन्ममरणाच्या चक्रात अडकूनही त्याची जीवनाबद्दलची आशा, आसक्ती सुटत नाही. दर वेळी तो आशा घेऊन जन्माला येतो व निराश होऊन निघून जातो. अशा रीतीने झुरून झुरून मातीत मिसळून जातो. पण जर त्याने जन्मास येऊन प्रभू परमात्म्याचे गुणगान केले तर काळ त्याला खात नाही. त्याला प्रभुनामाने नऊनिधी प्राप्त होतात. तो प्रभू परमात्मा स्वतः अगदी स्वाभाविकपणे त्याला ऋद्धी-सिद्धी प्रदान करतो. ॥ २६ ॥

त्रिआनो बोलै आपे बूझै ॥ आपे समझै आपे सूझै ॥
गुर का कहिआ अंकि समावै ॥ निरमल सूचे साचो भावै ॥
गुरु सागरु रतनी नही तोट ॥ लाल पदारथ साचु अखोट ॥
गुरि कहिआ सा कार कमावहु ॥ गुर की करणी काहे धावहु ॥
नानक गुरमति साचि समावहु ॥ २७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३३)

शब्दार्थ : **त्रिआनो** – ज्ञान. **बूझै** – समजते, कळते. **समझै** – समजतो. **सूझै** – जाणतो. **अंकि समावै** – हृदयात सामावणे. **सूचे** – पवित्र. **साचो** – सत्यस्वरूप प्रभू परमात्मा. **भावै** – आवडतो. **तोट** – तोटा. **अकोट** – अक्षय, अक्षुण्य, कधीही न संपणारा. **लाल पदारथ** – माणीक, मोती, हिरे आदी मौल्यवान वस्तू.

भावार्थ : प्रभू परमात्म्याकडून ज्ञान प्राप्त झाल्यावर जीव स्वत:चे सत्यस्वरूप जाणतो. जेव्हा त्याला हे समजते, तेव्हा त्याला साऱ्या गोष्टी आपोआप सुचू लागतात. तो सतगुरूचा उपदेश मनोभावे स्वीकारतो. त्याप्रमाणे आचरण करतो. त्यामुळे त्याची मती निर्मल व पवित्र होते. तो प्रभू परमात्म्यास प्रिय होतो. सतगुरू हा रत्नांचा सागर आहे. त्याच्याजवळ प्रभुभक्तीची हिरे, माणके, लाल आदी रत्नांची रेलचेल आहे. प्रभुप्रेमाचा अलोट साठा आहे. हे जीवा ! सतगुरू जसे सांगेल तसे आचरण कर. सतगुरू काय करतो त्याचा विचार करू नकोस कारण ते तुझ्या समजण्यापलीकडे आहे. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जा. ॥ २७ ॥

टूटै नेहु कि बोलहि सही ॥ टूटै बाह दुहू दिस गही ॥
टूटि परीति गई बुर बोलि ॥ दुरमति परहरि छाडी ढोलि ॥
टूटै गंठि पड़ै वीचारि ॥ गुर सबदी घरि कारजु सारि ॥
लाहा साचु न आवै तोटा ॥ त्रिभवण ठाकूरु प्रीतमु मोटा ॥ २८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३३)

शब्दार्थ : **टूटै** – तुटते. **नेहु** – प्रेम. **सही** – सत्य, खरे. **बाह** – हात. **दुहू** – दोन्ही. **दिस** – दिशा. **गही** – धरली. **परीति** – प्रीती. **बुर** – वाईट. **बोलि** – बोलणे. **दुरमति** – दुर्बुद्धी. **परहरि** – त्याग करणे, सोडून देणे. **छाडी** – सोडून दिले. **ढोलि** – पती. **गंठि** – गांठ. **पडै वीचारि** – विचार करून परत जोडता येते. **कारजु**– कार्य. **सारि** – साध्य कर. **लाहा** – लाभ. **साचु** – सत्यनाम. **त्रिभवन** – त्रिभुवन. **मोटा** – मोठा, महान.

भावार्थ : तोंडावर स्पष्टपणे बोलल्याने मैत्री तुटते. हात दोनही बाजूंनी ओढला तर निश्चित तुटतो त्याचप्रमाणे वाईट बोलण्याने प्रीती तुटते. कुबुद्धीवाल्या स्त्रीस तिचा पती सोडून देतो. त्याचप्रमाणे कुबुद्धीने मोहमायेत रममाण झालेल्या जीवापासून प्रभू परमात्मा दूर जातो. पण जर नीट विचार करून झालेल्या चुका दुरुस्त करून चांगले आचरण केले, तर तुटलेली नाती परत जोडता येतात. त्या प्रभू परमात्म्याचे प्रेम परत संपादन करता येते. म्हणून जीवाने सतगुरूच्या सांगण्याप्रमाणे आचरण करून आपले इच्छित कार्य– प्रभुप्राप्ती– साध्य करावे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने सत्यरूप प्रभू परमात्मा प्राप्त होतो. सत्य जीवन लाभते. मग साधकाला जीवनात काहीही कमी पडत नाही. अदृश्य असलेला त्रिभुवनाचा स्वामी प्रभू परमात्मा स्थूलरूपाने प्रत्यक्ष दृश्यमान होतो.॥२८॥

ठाकहु मनूआ राखहु ठाइ ॥ ठहकि मुई अवगुणि पछुताइ ॥
ठाकुरु एकु सबाई नारि ॥ बहुते वेस करे कूड़िआरि ॥
पर घरि जाती ठाकि रहाई ॥ महलि बुलाई ठाक न पाई ॥
सबदि सवारी साचि पिआरी ॥ साई सुोहागणि ठाकुरि धारी ॥ २९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९३३)

शब्दार्थ : **ठाकहु** – थांबवा, काबूत ठेवा. **मनुआ** – मनाला. **राखहु** – स्थिर करा. **ठाइ** – एका जागी. **ठहकि** – आपसांत लढून भांडून. **मुई** – मेले. **अवगुणि** – दुर्गुणी. **पछुताई** – पश्चात्ताप. **ठाकुरु** – स्वामी. **सबाई** – सर्व. **नारि** – स्त्रिया. **बहुते** – अनेक, नाना. **वेस** – वेश. **कुडिआरि** – खोटे, मायेत अडकून पडलेले. **पर घरि** – परक्या घरी. **जाती** – जातात. **ठाकि रहाई**– थांबून ठेवणे, रोखून धरणे. **महलि** – महालात, प्रभूच्या महालात. **बुलाई** – बोलावले. **ठाक न पाई** – रोखू शकत नाही. **सबदि** – सतगुरूचा उपदेश, प्रभुनाम. **सवारी** – सावरले. **साचि** – सत्य. **पिआरी** – प्रेम. **साई** – तीच. **सुोहागणि** – सौभाग्यवती. **ठाकुरि** – पती परमेश्वर. **धारी** – धारण करणे.

भावार्थ – हे स्त्रीजीवा ! तुझ्या ह्या इतस्तत: भटकणाऱ्या मनाला काबूत ठेव. प्रभुनामात स्थिर कर. ह्या संसारात माणसे आपापसात वाद घालून मरून जातात. अवगुणी स्त्रीवर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. तो प्रभू परमात्मा एकमेव पतिपरमेश्वर आहे व सर्व जीव त्याच्या स्त्रिया आहेत. ह्या स्त्रिया (जीव) नाना परीचा साजश्रृंगार करून म्हणजे कर्मकांड करून प्रभुपतीस आपलासा करण्यासाठी व्यर्थ प्रयत्न करत आहेत. अन्य दुसऱ्या मार्गाकडे वळण्यापासून ह्या जीवांना (स्त्रियांना) रोखले गेले आहे. पण पतिपरमेश्वराच्या महालात प्रवेश करण्यापासून त्यांना कोणी रोखू शकत नाही. जी स्त्रीजीव प्रभुनामात रत होऊन मोहमायेपासून स्वत:स दूर ठेवते तिचा प्रभुपती स्वीकार करतो. अशा जीवास प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ २९ ॥

डोलत डोलत हे सखी फाटे चीर सीगार ॥
डाहपणि तनि सुखु नही बिनु डर बिणठी डार ॥
डरपि मुई घर आपणै डीठी कंति सुजाणि ॥
डरु राखिआ गुरि आपणै निरभउ नामु वखाणि ॥
डूगरि वासु तिखा घणी जब देखा नही दूरि ॥
तिखा निवारी सबदु मंनि अंम्रितु पीआ भरपुरि ॥
देहि देहि आखै सभु कोइ जै भावे तै देइ ॥
गुरू दुआरै देवसी तिखा निवारै सोइ ॥ ३० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३३)

शब्दार्थ : **डोलत डोलत** – हिंडता हिंडता. **चीर** – वस्त्र. **सीगार** – शृंगार. **डाहपणि** – ईर्षेने, असूयेने. **तनि** – तन, शरीर. **बिणठी** – नष्ट झाली. **डार** – पक्ष्यांचा थवा. **डरपि** – घाबरणे. **मुई** – मरण. **डीठी** – पाहिले. **कंति** – कांत, पती, परमेश्वर. **सुजाणि** – सुजाण, ज्ञानी. **राखिआ** – रक्षण केले, रोखले. **निरभउ** – निर्भय. **वखाणि** – व्याख्या, ज्ञान. **डूगरि** – डोंगरावर. **वासु**– निवास. **तिखा** – तृष्णा. **घणि** – खूप. **निवारी** – निवारण केली. **मंनि** – मनात. **अंम्रितु** – अमृत. **देहि** – दे. **आखै** – सांगतात, म्हणतात. **सभु कोइ** – सर्वजण. **जै** – जो, ज्याला. **तै** – त्याला. **देवसी** – देतो. **निवारै** – निवारण करतो. **सोइ** – तो, प्रभू परमात्मा.

भावार्थ : हे सखी ! पती परमेश्वरास भेटण्यासाठी मी इकडे तिकडे खूप हिंडले. त्यामुळे माझे हे शरीररूपी वस्त्र फाटून गेले. सारा साजशृंगार विरून गेला. माझ्या मनात ईर्षा, असूया जागृत झाल्याने शरीरास जराही सुख लाभले नाही. प्रभू परमात्म्याच्या भीतीशिवाय सारे प्रयत्न फोल ठरले. जेंव्हा जीवरूपी स्त्रीने दुनियेच्या भीतीने मरणप्राय यातना भोगल्या, तेव्हा त्या सुजाण प्रभू परमात्म्याने कृपा केली. सतगुरूकडून अशा जीवास निर्भय प्रभू

परमात्म्याचे नामरूपी ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे साधकाच्या मनातील संसाराची भीती दूर होते. जेव्हा साधकाच्या मनात खूप अहंकार होता, तेव्हा त्याच्या मनात विकारांची तीव्र तृष्णा होती. त्यामुळे पतिप्रभू खूप दूर आहे असे त्यास वाटत असे. पण जेव्हा सतगुरूकडून ज्ञान प्राप्त झाले तेव्हा लक्षात आले की तो प्रभू परमात्मा जवळच आहे, आपल्या हृदयातच वास करत आहे. जेव्हा साधकाने प्रभुनामाचा स्वीकार केला, तेव्हा मनातील विषयविकाराची तृष्णा नष्ट झाली व साधकाने प्रभुनामरूपी अमृताचे भरपूर प्राशन केले. सगळेच लोक प्रभुनामाच्या प्राप्तीसाठी याचना करत असतात. पण प्रभू परमात्म्यास जो आवडतो त्यालाच तो सतगुरुद्वारा नाम देतो व तोच प्रभू परमात्मा साधकाची विषयविकाराची तृष्णा दूर करतो. ॥ ३० ॥

ढंढोलत ढूढत हउ फिरी ढहि ढहि पवनि करारि ॥
भारे ढहते ढहि पए हउले निकसे पारि ॥
अमर अजाची हरि मिले तिन कै हउ बलि जाउ ॥
तिन की धूड़ि अघुलीऐ संगति मेलि मिलाए ॥
मनु दीआ गुरि आपणै पाइआ निरमल नाउ ॥
जिनि नामु दीआ तिसु सेवसा तिसु बलिहारै जाउ ॥
जो उसारे सो ढाहसी तिसु बिनु अवरू न कोइ ॥
गुर परसादि तिसु संम्हला ता तनि दूखु न होउ ॥ ३१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३३)

शब्दार्थ : **ढंढोलत** – शोधता. **हउ** – मी. **फिरी** – फिरलो. **ढहि पवनि** – पडतात. **करारि** – अलीकडे. **भारे** – भार, बोजा, पापाचा बोजा. **हउले** – हलका. **अजाची** – संतुष्ट. **तिन कै** – त्याचेवर. **धुडि** – धूळ, चरणरज. **अघुलीऐ** – पार करते. **उसारे** – उत्पन्न करतो. **ढाहसी** – नष्ट करतो. **तिसु** – त्या (परमेश्वराचे). **अवरू** – अन्स. **संम्हला** – स्मरण केले.

भावार्थ : मी प्रभू परमेश्वराच्या शोधात भटक भटक भटकले. पण प्रत्येक वेळी ह्या संसारसागराच्या किनाऱ्यावरच येऊन पडले. प्रभुप्राप्तीसाठी अनेक कर्मकांड, व्रतवैकल्ये केली पण काहीही उपयोग झाला नाही. मला प्रभू प्राप्त झाला नाही. मी होते तेथेच राहिले. ज्याच्या डोक्यावर पापाचा भारा आहे, ते ह्या संसारसागरात त्या ओझ्यामुळे बुडतात. ज्यांच्या डोक्यावर पापाचा भारा नाही ते मात्र हा संसारसागर पार करतात. ज्यांना न मागताही प्रभू परमात्मा प्राप्त होतो अशा भाग्यवानांचे चरणी मी स्वतःस समर्पित करते. अशा श्रेष्ठ साधकाच्या चरणधुळीनेही मोक्ष प्राप्त होतो. अशांच्या संगतीत राहिल्याने प्रभू परमात्म्याशी मिलन होते. ज्या साधकाने सतगुरूला आपले मन समर्पित केले त्यास सतगुरूकडून निर्मळ प्रभुनामाची प्राप्ती होते. ज्या सतगुरूकडून मला प्रभुनामाची प्राप्ती झाली त्याची मी सेवा करते. त्याच्यावर माझा जीव ओवाळून टाकते. ज्या परमेश्वराने ही सृष्टी उत्पन्न केली तोच ती नष्टही करतो. त्याच्याशिवाय अन्य कोणीही तसे करू शकत नाही. जो जीव सतगुरुकृपेने त्या प्रभू परमात्म्याचे स्मरण करतो त्याची सर्व दुःखापासून मुक्तता होते. ॥ ३१ ॥

णा को मेरा किसु गहि णा को होआ न होगु ॥
आवणि जाणि विगूचीऐ दुबिधा विआपै रोगु ॥
णाम विहूणे आदमी कलर कंध गिरंति ॥
विणु नावै किउ छूटिऐ जाइ रसातलि अंति ॥
गणत गणावै अखरी अगणतु साचा सोइ ॥
अगिआनी मतिहीणु है गुर बिनु गिआनु न होइ ॥
तूटी तंतु रबाब की वाजै नही विजोगि ॥
विछुड़िआ मेलै प्रभू नानक करि संजोग ॥ ३२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३४)

शब्दार्थ : **णा** – 'ण' ह्या अक्षराचा बोध. **को** – कोणीही. **आवणि** – जन्माला येणे. **जाणि** – मरून जाणे. **विगूचीऐ** – दुःखी. **दुबिधा** – द्वैत. **विआपै** – व्यापते. **णाम** – प्रभुनाम. **कलर कंध** – वाळूची भिंत. **गिरंति** – ढासळून पडते. **किउ** – कसे. **छुटीऐ** – सुटका. **जाइ** – जातो. **रसातलि** – नरकात. **गणत** – मोजणी, गणती. **गणावै** – गणती करणे. **अखरी** – अक्षरात. **अगणतु** – गणती करता येत नाही असा प्रभू परमात्मा. **अगिआनी** – अज्ञानी. **मतिहीणु** – मतिहीन, बुद्धिहीन. **तूटी** – तुटली. **तंतु** – तार. **रबाब** – एकतारीसारखे तंतुवाद्य. **वाजै** – वाजते. **विजोगि** – वियोग. **बिछुडिआ** – दूर गेलेला. **मेलै** – मिलन, भेट घडविणे.

भावार्थ : 'ण' ह्या अक्षराचा बोध खालीलप्रमाणे – ह्या जगात माझे कोणीही नाही. प्रभू परमात्म्याशिवाय मी कोणाचा आसरा मागू ? त्याच्याशिवाय अन्य कोणतेही आश्रयस्थान कधी नव्हते. पुढेही अन्य कोणी होणार नाही. प्रत्येक जीव जन्म-मरणाच्या चक्रात अडकून पडला आहे आणि द्वैतभावामुळे ह्या जगात दुःख भोगत आहे. प्रभुनामाशिवाय जीवन म्हणजे वाळूची भिंत. केव्हा कोसळून पडेल त्याचा नेम नाही. प्रभुनामाशिवाय मोहमायेपासून जीवाची सुटका होऊ शकत नाही व जीव अखेर नरकात जाऊन पडतो. असा जीव प्रभूचे गुण अक्षरात, शब्दात मोजू पाहतो. पण प्रभू परमात्मा शब्दात मोजता येत नाही. तो सर्व प्रकारच्या मोजमापाच्या पलीकडे आहे. असा प्रयत्न करणारा जीव अडाणी आहे, बुद्धिहीन आहे. सतगुरूवाचून प्रभू परमात्म्याचे ज्ञान होऊ शकत नाही. परमात्म्यापासून दूर गेलेला जीव म्हणजे तार तुटलेल्या एकतारीसारखा आहे. जोपर्यंत मनाची तार प्रभू परमात्म्याच्या तारेशी जुळत नाही, तोपर्यंत त्याच्या जीवनात प्रभू परमात्म्याचे सूर उमटू शकत नाहीत. नानक सांगतात, काही संयोगाने प्रभू परमात्म्याची अशा जीवावर कृपा झाली तरच त्यास प्रभू परमात्मा प्रभुमिलनाचे सुख प्राप्त करून देतो. ॥ ३२ ॥

तरवरु काइआ पंखि मनु तरवरि पंखी पंच ॥
ततु चुगहि मिलि एकसे तिन कउ फास न रंच ॥
उडहि त बेगुले ताकहि चोग घणी ॥
पंख तुटे फाही पड़ी अवगुणि भीड़ बणी ॥
बिनु साचे किउ छूटीऐ हरि गुण करमि मणी ॥
आपि छडाए छूटीऐ वडा आपि धणी ॥

गुरपरसादी छूटीऐ किरपा आपि करेइ ॥
अपणै हाथि वडाईआ जै भावै तै देइ ॥ ३३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३४)

शब्दार्थ : **तरवरु** – वृक्ष. **पंखि** – पक्षी. **पंच** – पाच ज्ञानेंद्रिये. **ततु** – तत्त्व. **चुगहि** – खातो, ग्रहण करतो. **मिलि** – मिळतो. **एकसे** – एकत्रित. **फास** – पाश. **रंच** – जरासा. **उडहि** – उडतात. **बेगुले** – त्वरेने, घाईने. **चोग** – खाणे. **घणी** – खूप. **फाही** – पाश. **पडी** – सापडतात, अडकतात. **भीड बणी** – संकटात सापडतो. **छूटीऐ** – सुटका. **करमि** – कृपा प्राप्त करतो. **छडाए** – सोडवतो. **वडा** – मोठा. **वडाईआ** – मोठेपण. **जै** – जेव्हा. **तै** – तेव्हा.

भावार्थ : मानवी शरीर हे वृक्षासारखे आहे. मन हे त्यावर बसलेला पक्षी आहे. मानवाची पंचज्ञानेंद्रिये हे अन्य पक्षी त्या झाडावर बसले आहेत. ही पाच ज्ञानेंद्रिये जेव्हा परमतत्त्वरूपी दाणे टिपतात, तेव्हा ते कोणत्याही तऱ्हेच्या पाशात सापडत नाहीत. पण ज्यांचे मन परमतत्त्वाचे भक्षण करण्याऐवजी जास्त दाणे प्राप्त करण्यासाठी, जास्त भौतिक सुख प्राप्त करण्यासाठी घाईने इकडून तिकडे उडत राहतात त्यांच्या पंखातील बळ संपून जाते व असे जीव मोहमायेच्या पाशात अडकतात. मायावी सुखाच्या लालसेच्या अवगुणांमुळे संकटात सापडतात. सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या नामाचा आश्रय घेतल्याशिवाय ते ह्या मायापाशातून सुटू शकत नाहीत. प्रभू परमात्म्याच्या कृपेने प्रभुनामरूपी रत्न साधकास प्राप्त होते. त्या प्रभू परमात्म्याची इच्छा होईल त्या साधकास तो स्वत: मोहपाशातून मुक्त करतो. हे प्रभो ! तूच सर्वांहून श्रेष्ठ आहेस. जेव्हा साधकावर तो प्रभू परमात्मा स्वत: कृपा करतो, तेव्हा तो साधक सतगुरुकृपेने संसारातून मुक्त होतो. प्रभू परमात्म्याची इच्छा सर्वश्रेष्ठ आहे. तो सर्वशक्तिमान आहे. त्यास योग्य वाटेल त्या साधकास तो स्वत: ते मोठेपण प्रदान करतो. ॥ ३३ ॥

थर थथर कंपै जीअड़ा थान विहूणा होइ ॥
थानि मानि सचु एकु है काजु न फीटै कोइ ॥
थिरु नाराइणु थिरु गुरू थिरु साचा बीचारु ॥
सुरि नर नाथह नाथु तू निधारा आधारु ॥
सरबे थान थनंतरी तू दाता दातारु ॥
जह देखा तह एकु तू अंतु न पारावरु ॥
थान थनंतरि रवि रहिआ गुर सबदी वीचारि ॥
अणमंगिआ दानु देवसी वडा अगम अपारु ॥ ३४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३४)

शब्दार्थ : **कपै** – कापतात. **जिअडा** – जीव. **थान** – स्थान. **विहूणा** – विहीन. **काजु** – कार्य. **फीटै** – बिघडणे. **थिरु** – स्थिर. **साचा बीचारु** – सत्यरूप प्रभू परमात्म्याचा विचार. **सुरि** – देव. **निधारा** – निराधार. **सरबे** – सर्व. **दातारु** – दान देणारा. **जह** – जेथे. **तह** – तेथे. **रवि रहिआ** – पसरलेला, व्यापून टाकतो. **अणमंगिआ** – न मागता. **दानु** – दान. **देवसी** – देतो. **वडा** – मोठा, श्रेष्ठ.

भावार्थ : जेव्हा जीव स्थानविहीन होतो, अस्थिर होतो, तेव्हा तो भीतीने थरथर कापू लागतो. सदैव एकाच

स्थानावर सन्मानपूर्वक स्थिर असणारा एकमेव प्रभू परमात्माच आहे. अशा ह्या प्रभू परमात्म्याचे ठायी मन स्थिर करणाऱ्या जीवाची सर्व कार्ये यशस्वी होतात. त्यास कोठेही अपयश येत नाही. तो प्रभू परमात्मा स्थिर आहे व सतगुरू स्थिर आहे. सत्यरूप प्रभू परमात्म्याचा उच्च आध्यात्मिक विचार स्थिर आहे. हे प्रभो ! तू सर्व देवांचा, माणसांचा, नाथांचा नाथ आहेस. तू निराधारांचा आधार आहेस. सर्व ठिकाणी सर्वांना दान देणारा तू दाता आहेस. हे प्रभू, जिकडे पाहावे तिकडे तूच आहेस. तू अनंत आहेस, अपार आहेस. तू सर्वत्र व्यापून राहिला आहेस. अशा ह्या सर्वव्यापक प्रभू परमात्म्याचे ज्ञान सतगुरूच्या उपदेशातून प्राप्त होते. हे प्रभो ! न मागता तू दान देतोस. तू अगम्य आहेस. तुझा महिमा अपार आहे. तू सर्वश्रेष्ठ आहेस. ॥ ३४ ॥

दइआ दानु दइआलु तू करि करि देखणहारु ॥
दइआ करहि प्रभ मेलि लैहि खिन महि ढाहि उसारि ॥
दाना तू बीना तुही दाना कै सिरि दानु ॥
दालद भंजन दुख दलण गुरमुखि गिआनु धिआनु ॥ ३५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३४)

शब्दार्थ : **दइआ** – दया. **दानु** – दान. **करि** – करून. **देखणहारु** – देखभाल करणारा, पालन करणारा. **मेलि** – मिलन. **लैहि** – घडवितो. **खिन महि** – क्षणात. **ढाहि** – नष्ट करतो. **उसारि** – निर्माण करणे. **दाना** – ज्ञाता. **बीना** – द्रष्टा, पाहणारा. **तुही** – तूच. **दादल** – दारिद्र्य. **भंजन** – नष्ट करणारा. **दलन** – चिरडून टाकणारा.

भावार्थ : हे प्रभो ! सर्वांवर दया करणारा, दान देणारा, सर्व काही करणारा तूच आहेस. सर्वांचे पालन करणाराही तूच आहेस. तुझी दया झाली तर क्षणात तू जीवास आपल्यात विलीन करून घेतोस. सर्व काही निर्माण करणारा आणि विनाश करणाराही तूच आहेस. तूच सर्व काही जाणणारा ज्ञाता आहेस. सर्व काही पाहणारा द्रष्टाही तूच आहेस. दात्यांचाही दाता महादाताही तूच आहेस. हे प्रभो ! सतगुरूच्या मुखातून प्राप्त होणारे ज्ञान, ध्यान, सारे सारे काही तूच आहेस. ॥ ३५ ॥

धनि गइऐ बहि झूरीऐ धन महि चीतु गवार ॥
धनु विरली सचु संचिआ निरमलु नामु पिआरि ॥
धनु गइआ ता जाण देहि जे राचहि रंगि एक ॥
मनु दीजै सिरु सउपीऐ भी करते की टेक ॥
धंधा धावत रहि गए मन महि सबदु अनंदु ॥
दुरजन ते साजन भए भेटे गुर गोविंद ॥
बनु बनु फिरती ढूढती बसतु रही घरि बारि ॥
सतिगुरि मेली मिलि रही जनम मरण दुखु निवारि ॥ ३६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३४)

शब्दार्थ : **धनि** – धन, द्रव्य. **गइआ** – गेले. **बहि** – बसणे. **झूरीऐ** – झुरतो, दु:ख करतो. **महि** – मध्ये. **चीतु** – चित्त. **गवार** – मूर्ख, अडाणी. **विरली** – क्वचित एखादा, विरळा. **सचु** – सत्य. **संचिआ** – संचय

करणे. **पिआरि** – प्रेम. **ता** – ते. **जाण देहि** – जाऊ दे. **राचहि** – रंगून जाणे. **रंगि** – रंग. **मनु** – मन. **दीजै** – दे. **सिरु** – शिर, मस्तक. **सउपीऐ** – सोपव, अर्पण कर. **भी** – तरीही. **करते** – कर्ता, परमेश्वर. **टेक** – आश्रय, आधार. **धावत** – धावपळ. **रहि गए** – थांबली. **सबदु** – नामसाधना. **अनंदु** – आनंद. **भए** – झाला. **भेटे** – भेटला. **बनु बनु** – रानावनात. **ढूढती** – शोधत. **बसतु** – वस्तू, नाम.

भावार्थ : माणसाला त्याच्या जवळचे धन गेले की अपार दु:ख हाते. मूर्ख माणसाचे सारे चित्त त्याच्या धनातच गुंतलेले असते. एखादा विरळा जीव मात्र प्रभुनामरूपी निर्मळ धनाचा संचय करतो. हे जीवा ! धन गेले तर जाऊ दे, तू एकमेव प्रभू परमात्म्याच्या रंगात रंगून जा. त्या प्रभू परमात्म्याचे चरणी तू तुझे तन मन अर्पण कर. त्याचे चरणी तुझे शिरकमलही अर्पण कर. त्याच्या ठायी आश्रय घे. असे केल्याने या व्यावहारिक जगातील जीवाची धावपळ थांबते व मनाला शब्दब्रह्माचा आनंद प्राप्त होतो. सतगुरूरूपी प्रभू परमात्म्याची भेट झाल्याने दुर्जन माणूसही सज्जन होतो. त्या दुर्लभ गोष्टीचा, प्रभू परमात्म्याचा, शोध घेण्यासाठी रानावनात हिंडल्यानंतर सतगुरुकृपेने लक्षात येते, की तो प्रभू परमात्मा आपल्या अगदी जवळच, आपल्या अंत:करणातच आहे. सतगुरूच्या कृपेने जीवाचे प्रभू परमात्म्याशी मिलन होते व जीवाची जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होते. ॥३६॥

नाना करत न छूटीऐ विणु गुण जम पुरि जाहि ॥
ना तिसु एहु न ओहु है अवगुणि फिरि पछुताहि ॥
ना तिसु गिआनु न धिआनु है ना तिसु धरमु धीआनु ॥
विणु नावै निरभउ कहा किआ जाणा अभिमानु ॥
थाकि रही किव अपड़ा हाथ नही ना पारु ॥
ना साजन से रंगुले किसु पहि करी पुकार ॥
नानक प्रिउ प्रिउ जे करी मेले मेलणहारु ॥
जिनि विछोड़ी सो मेलसी गुर कै हेति अपारि ॥ ३७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३४)

शब्दार्थ : **नाना** – अनेक. **छुटीऐ** – सुटका. **विणु** – विना. **जाहि** – जाईल, जातो. **एहु** – ह्या, इहलोक. **ओहु** – तो, परलोक. **तिसु** – त्यास. **किआ** – काय. **थाकि** – दमला. **किव** – कसे. **अपडा** – पोचणे. **हाथ** – हात. **किसु** – कोण. **पहि** – जवळ. **प्रिउ** – प्रिय. **जिनि** – ज्याला. **विछोडी** – वियुक्त, विभक्त. **हेति अपारि** – अनंत प्रेमाद्वारा.

भावार्थ : नाना प्रकारची कर्मकांडे केली तरी मुक्ती प्राप्त होत नाही. गुणविहीन, भक्तिविहीन जीव अखेर यमपुरीतच जातो. जन्ममरणाच्या चक्रातच अडकून राहतो. अशा जीवास इहलोकांत सुख मिळत नाही आणि परलोकही प्राप्त होत नाही. त्याच्यावर केवळ पश्चात्ताप करण्याची पाळी येते. अशा जीवास सत्यरूप प्रभू परमात्म्याचे यत्किंचितही ज्ञान नसते. तो प्रभू परमात्म्याचे ध्यानही करत नाही. त्याला धर्मही कळत नाही. प्रभू परमात्म्याच्या नामाशिवाय कोणी निर्भय कसा होऊ शकेल ? अहंकारामुळे प्राप्त होणारे दु:खही असा जीव समजू शकत नाही. त्यामुळे तो इकडे तिकडे फिरत राहून नाना कर्मकांडे करत राहतो व अखेर थकून जातो. अशा

जीवास प्रभू परमात्म्याबद्दल प्रेम नसते. मग तो संकटकाळी कोणाला बरे हाक मारील ? कारण सर्व संकटे दूर करील असा एकमेव प्रभू परमात्माच आहे. अन्य कोणी नाही. नानक सांगतात, जीव अत्यंत व्याकूळ होऊन प्रभू परमात्म्यास आर्त स्वराने हाका मारील तर तो प्रभू परमात्मा त्या जीवास आपल्या स्वरूपाशी एकरूप करील. ज्या प्रभू परमात्म्याने जीवास त्याच्यापासून वेगळे केले, तोच प्रभू परमात्मा सतगुरूच्या परमकृपेने जीवास आपल्यात समाविष्ट करून घेईल. ॥ ३७ ॥

पापु बुरा पापी कउ पिआरा ॥ पापि लदे पापे पासारा ॥
परहरि पापु पछाणै आपु ॥ ना तिसु सोगु विजोगु संतापु ॥
नरकि पड़ंतउ किउ रहै किउ बंचै जमकालु ॥
किउ आवण जाणा विसरै झूठु बुरा खै कालु ॥
मनु जंजाली वेड़िआ भी जंजाला माहि ॥
विणु नावै किउ छूटीऐ पापे पचहि पचाहि ॥ ३८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३५)

शब्दार्थ : **पापु** – पाप. **बुरा** – वाईट. **पिआरा** – प्रिय. **लदे** – लादणे. **पासारा** – प्रसार, पसारा. **परहरि** – सोडून, त्याग करून. **पछाणै** – ओळखणे. **आपु** – स्वत:ला. **तिसु** – त्याला. **सोगु** – शोक. **विजोगु** – वियोग. **संतापु** – दु:ख, पीडा. **पउंतउ** – पडणे. **किउ** – कसे. **बंचै** – वाचणे. **आवण जाणा** – येणे जाणे, जन्म-मरण. **विसरै** – विसरेल. **झूठु** – खोटे. **खैकालु** – विनाशक काळ. **मनु** – मन. **जंजाली** – जंजाळ. **बेडिआ** – वेढला. **भी** – परत. **पचहि पचहि** – सडत कुजत राहतो.

भावार्थ : पाप हे वाईट आहे, हे माहीत असूनही पापी माणसास पाप करणे आवडते. तो पाप करतच राहतो. एवढेच नव्हे तर इतरांनाही पापाचरण करण्यास प्रवृत्त करतो. जर जीवाने पापाचरण करणे सोडून देऊन आपल्या स्वस्वरूपास, आपल्या आत्मस्वरूपास जाणले तर त्यास कोणत्याही प्रकारचा शोक वा दु:ख भोगावे लागत नाही. प्रभू परमात्म्याचा वियोग सहन करावा लागत नाही. पापी माणूस नरकात पडण्यावाचून कसा वाचेल ? मृत्यूपासून कसा वाचेल ? जन्ममरणाच्या चक्रातून त्याची कशी सुटका होईल ? कारण त्याचे पाप कर्मत्व त्याला मरणाकडे घेऊन जाते. जोपर्यंत त्याच्या हृदयात जीवनाला नष्ट करणारे खोटे विचार स्थिर आहेत, तोपर्यंत जीवाची सुटका होत नाही. त्यामुळेच त्याचे मन सांसारिक जंजाळातच गुंतून पडते. प्रभुनामाशिवाय त्याची सुटका कशी होणार ? पापी जीव अखेर पापातच सडत कुजत राहणार. ॥ ३८ ॥

फिरि फिरि फाही फासै कउआ ॥ फिरी पछुताना अब किआ हूआ ॥
फाथा चोग चुगै नही बूझै ॥ सतगुरू मिलै त आखी सूझै ॥
जिउ मछुली फाथी जम जालि ॥ विणु गुर दाते मुकति न भालि ॥
फिरि फिरि आवै फिरि फिरि जाइ ॥ इक रंगि रचै रहै लिव लाइ ॥
इव छूटै फिरि फास न पाइ ॥ ३९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३५)

शब्दार्थ : **फिरि फिरि** – परत परत. **फाही फासै** – पाशात अडकतो, फसतो. **कउआ** – कावळा. **फाथा**

– पाशात अडकलेला पक्षी. **चोग** – दाणे. **चुगै** – खातो, वेचतो. **बुझै** – समजणे. **आखी सुझै** – डोळे उघडतात, ज्ञानचक्षु उघडतात, ज्ञान होते. **जिउ** – जसे. **मछुली** – मासोळी. **भालि** – शोध. **इव** – अशाप्रकारे.

भावार्थ : कावळ्यासारखा चाणाक्ष असलेला हा जीव परत परत संसाराच्या मोहपाशात पापात अडकतो. नंतर मग पश्चात्ताप करतो. पण आता त्याचा काय उपयोग ? संसारातील मोहरूपी दाणे टिपताना आपण पाशात अडकतो आहोत हे कळले नाही पण सतगुरू भेटल्यावर ज्ञानचक्षू उघडले. जसा मासा जाळ्यात सापडला की तो मरणारच, तसा मोहमायेने जीव यमाच्या जाळ्यात सापडून मरतो. सतगुरूशिवाय जीवास मुक्ती प्राप्त होत नाही. असा जीव परत परत जन्माला येतो व परत परत मरून जातो. ह्या जन्ममरणाच्या चक्रात फिरतच राहतो. जो जीव गुरूला शरण जाऊन एकमेव प्रभू परमात्म्याच्या रंगात रंगून प्रभुनामात तल्लीन झाला तोच ह्या जन्ममरणाच्या चक्रातून सुटतो. परत तो ह्या संसाराच्या, यमाच्या पाशात अडकत नाही. तो मुक्त होतो. ॥३९॥

बीरा बीरा करि रही बीर भए बैराइ ॥
बीर चले घरि आपणै बहिण बिरहि जलि जाइ ॥
बाबुल कै घरि बेटड़ी बाली बालै नेहि ॥
जे लोड़हि वरू कामणी सतिगुरू सेवहि तेहि ॥
बिरलो गिआनी बूझणउ सतिगुरू साचि मिलेइ ॥
ठाकुर हाथि वडाईआ जै भावै तै देइ ॥
बाणी बिरलउ बीचारसी जे को गुरमुखि होइ ॥
इह बाणी महा पुरख की निज घरि वासा होइ ॥ ४० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३५)

शब्दार्थ : **बीरा** – हे भाऊ. **बीर** – भाऊ. **बैराइ** – परका. **बिरहि** – विरह, वियोग. **बाबुल** – पिता. **बेटडी** – मुलगी, कन्या. **बाली बालै** – बाल, बालके देह आणि आत्म्याने. **नेहि** – प्रेम, देह आणि आत्म्याचे प्रेम. **जे** – जर. **लोडहि** – गरज. **वरू** – वर, पती. **बिरलो** – विरळा. **बूझणउ** – समजतो, जाणतो. **साचि** – सत्यरूप परमात्मा. **ठाकुर** – परमेश्वर. **वडाईआ** – मोठेपणा. **जै** – जे. **तै** – ते. **बिरलउ** – विरळा. **बिचारसी** – विचार करतो. **इह** – ही.

भावार्थ : ह्या पदात श्री गुरुनानकदेवजींनी आत्म्यास भाऊ म्हणून संबोधले आहे व देहास बहीण म्हटले आहे. नानक सांगतात–मेल्यावर आत्मा शरीरास सोडून जातो. तेव्हा शरीररूपी बहीण भाऊ भाऊ म्हणून आक्रोश करते. पण आत्मारूपी भाऊ केव्हाच शरीरास सोडून निजधामास गेलेला असतो. परका झालेला असतो. शरीर मात्र विरहाने जळून जाते. बापाच्या घरी म्हणजे ह्या संसारात जीवरूपी मुलगी विवाहयोग्य मुलगी असते. ही मुलगी प्रभू परमात्मारूपी वराशी विवाह करण्यास उत्सुक झालेली असते. ती त्याच्या प्रेमात मग्न झाली आहे व तो प्राप्त व्हावा म्हणून ती सतगुरूची सेवा करते. कोणी एखादा विरळा ज्ञानी हे जाणतो की सतगुरु जीवाचे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवून आणतो. सारे मोठेपण प्रभू परमात्म्याच्या हाती आहे. जी जीवस्त्री त्याला आवडते तिची मनोकामना तो पुरी करतो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारी कोणी एखादीच जीवस्त्री गुरुवाणीचा

विचार समजू शकते. जी त्या सतगुरू महापुरुषाची वाणी योग्य प्रकारे जाणते. तीच आपल्या आत्मरूपात मग्न होते. ॥ ४० ॥

भनि भनि घड़ीऐ घड़ि घड़ि भजै ढाहि उसारै उसारे ढाहै ॥
सर भरि सोखै भी भरि पोखै समरथ वेपरवाहै ॥
भरमि भुलाने भए दिवाने विणु भागा किआ पाईऐ ॥
गुरमुखि गिआनु डोरी प्रभि पकड़ी जिन खिंचै तिन जाइऐ ॥
हरि गुण गाइ सदा रंगि राते बहुड़ि न पछोताईऐ ॥
भभै भालहि गुरमुखि बुझहि ता निज घरि वासा पाईऐ ॥
भभै भउजलु मारगु विखड़ा आस निरासा तरीऐ ॥
गुर परसादी आपो चीन्है जीवतिआ इव मरीऐ ॥ ४१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३५)

शब्दार्थ : **भनि भनि** – तोडून, मोडून. **घडिऐ** – घडवतो. **घडि** – घडवलेले. **भजै** – मोडतो. **ढाहि** – खाली खेचतो. **उसारे** – निर्माण करतो. **सर** – संसारसागर. **सोखै** – कोरडे करतो. **भी** – परत. **पोखै** – पुष्ट करतो, सुकवितो. **समरथ** – समर्थ. **वेपरवाहै** – बेपर्व, निष्काळजी. **भरमि** – भ्रम. **भुलाने** – भुलवलो. **भए** – झाला. **दिवाने** – वेडे. **भागा** – भाग्य. **किआ** – काय. **पाईऐ** – प्राप्त होते. **डोरी** – दोरी, लगाम. **प्रभि** – प्रभूने. **पकडी** – पकडली, धरून ठेवली. **जिन** – जिकडे. **खिंचै** – खेचतो. **तिन** – तिकडे. **बहुडि** – परत. **पछोताईऐ** – पश्चात्ताप. **भालहि** – शोध घेणे. **बुझहि** – जाणतो. **ता** – तो. **भउजलु** – भवसागर, संसारसागर. **विखडा** – कठीण, अवघड. **आस** – आशा. **निरासा** – निराशा. **आपो** – स्वत:. **चीन्है** – ओळखतो. **जीवतिआ** – जिवंत असताना. **मरीऐ** – मरावे.

भावार्थ : प्रभू परमात्मा सर्जन आणि विसर्जन दोन्ही गोष्टी करतो. संसारातील गोष्टी तो तोडून मोडून टाकतो. त्यातून पुन्हा नवीन गोष्टी निर्माण करतो. वर चढलेल्यांना खाली खेचतो. पददलितांना उच्चस्थानी नेऊन ठेवतो. पाण्याने भरलेला सागर क्षणात शुष्क करतो. तर कोरडा पडलेला जलाशय काठोकाठ भरून टाकतो. इतके सामर्थ्य असलेला प्रभू परमात्मा निश्चिंत असतो. ह्या संसारात जीवांना जन्माला घालून त्यांचे पालनपोषणही तोच करतो. पण जीवांना हे समजत नाही. ते मोहमायेच्या भ्रमात सापडून ह्या संसारात वेड्यासारखे भ्रमत राहतात. अशा भाग्यहीन जीवांना ह्या जगात काहीच प्राप्त होत नाही. जो जीव सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो त्यास कळून येते, की कर्तुम अकर्तुम शक्ती त्या एकमात्र प्रभू परमात्म्याच्याच ठायी आहेत. सर्व जीवांचे दोर त्या प्रभू परमात्म्याच्या हातात आहेत. तो जिकडे लगाम खेचेल तिकडेच जीवाला वळावे लागते. प्रभू परमात्म्याच्या इच्छेप्रमाणेच सारे काही घडत असते. हे ज्ञान प्राप्त झालेला जीव मग सदैव प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणात रंगून जातो. त्याचे सदैव गुणगान करतो व त्यातच तल्लीन होऊन जातो. अशा साधकास परत कधीही पश्चात्ताप करावा लागत नाही. सतगुरूच्या कृपेने त्यास प्रभू परमात्म्याची ओळख पटते व त्यास प्राप्त करून तो त्याच्याशी एकरूप हाऊन जातो. हा संसारसागर पार करण्याचा मार्ग फार कठीण आहे. सुख–दु:खाने, आशा–निराशेने भरलेला आहे. जो जीव ह्या द्वंद्वास समान मानून प्रभुनामात तल्लीन होतो तोच हा भवसागर पार

करून जातो. गुरुकृपेने त्यास स्वत:च्या सत्यस्वरूपाचे ज्ञान होते तेव्हा तो मुक्त होतो. तो लौकिक अर्थाने जीवित असला, तरी त्याच्या मनातील मोहमाया, विषयविकार मरून गेलेले असतात. तो प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. ॥ ४१ ॥

माइआ माइआ करि मुए माइआ किसै न साथि ॥
हंसु चलै उठि डुमणो माइआ भूली आथि ॥
मनु झूठा जमि जोहिआ अवगुण चलहि नालि ॥
मन महि मनु उलटो मरै जे गुण होवहि नालि ॥
मेरी मेरी करि मुए विणु नावै दुखु भालि ॥
गड़ मंदर महला कहा जिउ बाजी दीबाणु ॥
नानक सचे नाम विणु झूठा आवण जाणु ॥
आपे चतुरु सरूपु है आपे जाणु सुजाणु ॥ ४२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३५)

शब्दार्थ : **माइआ** – माया. **मुए** – मेले. **किसै** – कोणीही. **हंसु** – आत्मा, प्राण. **डुमणो** – दुविधा . **आथि** – येथे, ह्या संसारात. **जमि** – यमाने. **जोहिआ** – पाहिले. **चलहि** – चालतात, येतात. **नालि** – बरोबर. **मरै** – मरते. **जे** – जर. **मेरी मेरी** – माझे माझे, अहंकार. **करि मुए** – करत मेले. **भालि** – प्राप्त होते. **गड** – किल्ला. **जिउ** – जसे. **बाजी** – खेळ. **दीवाणु** – कचेरी. **सचे** – सत्यरूप प्रभू.

भावार्थ : सारे लोक पैसा पैसा करत मायेच्या मागे धावून मरतात पण माया मात्र कोणाबरोबर जात नाही. प्राणपाखरू, आत्मा दु:खी होऊन ह्या जगातून निघून जातो. पण माया मात्र इथेच ह्या संसारात राहून जाते. मन फार खोटे आहे. ते मायेच्या नादाने अवगुण प्राप्त करून दु:खी होते व मेल्यावर ते अवगुण त्या जीवाबरोबर येतात. पण जर साधकाने आपले मन अवगुणांकडून पालटून सद्गुणांकडे वळवले तर मरणानंतर ते सद्गुण जीवाबरोबर येतात. जो जीव माझे माझे म्हणत अहंकारात राहून प्रभुनामाचे स्मरण करत नाही तो दु:खी होऊन मरून जातो. त्याने बांधलेले गडकोट, महाल, माड्या, भव्य प्रासाद सारे काही खेळातल्या खेळण्यांसारखे नष्ट होऊन जातात. ह्यापैकी काहीही बरोबर येत नाही. नानक सांगतात, त्या सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणाशिवाय हे जीवन व्यर्थ आहे. ह्या जन्ममरणाच्या येरझाऱ्या व्यर्थ आहेत. तो प्रभू परमात्मा खूप चतुर आहे, सुस्वरूप आहे, सुजाण आहे, तो सारे काही जाणतो. ॥ ४२ ॥

जो आवहि से जाहि फुनि आइ गए पछुताहि ॥
लख चउरासीह मेदनी घटै न वधै उताहि ॥
से जन उबरे, जिन हरि भाइआ ॥
धंधा मुआ, विगूती माइआ ॥
जो दीसै सो चालसी किस कउ मीतु करेउ ॥
जीउ समपउ आपणा तनु मनु आगै देउ ॥

असथिरु करता तू धणी तिस ही की मै ओट ॥
गुण की मारी हउ मुई सबदि रती मनि चोट ॥ ४३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३६)

शब्दार्थ : **आवहि** – येतात, जन्मतात. **जाहि** – जातो, मरतो. **फुनि** – पुन्हा. **पछुताहि** – पस्तावतो. **मेदनी** – पृथ्वी. **घटै** – कमी होणे. **वधै** – वाढते. **उताहि** – वाढ. **उबरे** – उद्धार. **भाइआ** – आवडला, प्रिय झाला. **विगूती** – गतिहीन, प्रभावहीन. **दीसै** – दिसते. **चालसी** – नश्वर. **मीतु** – मित्र. **जीउ** – जीव. **समपउ** – समर्पण. **आपणा** – आपला. **आगै देउ** – त्याच्यापुढे समर्पित करावे. **असथिरु** – स्थिर. **धणी** – धनी, मालक. **ओट** – आधार. **हउ** – अहंकार. **चोट** – आघात, ठोकर.

भावार्थ : ह्या जगात जो जन्माला येतो, तो एक दिवस मरून जातो. जन्मलेल्या प्रत्येक जीवास मरण अटळ आहे. तो ह्या जीवन मरणाच्या चक्रात अडकून दु:खच भोगतो. ह्या जगात चौऱ्याऐंशी लक्ष योनी आहेत. त्यात वाढही होत नाही व कमीही होत नाही. प्रत्येक जीवास ह्या योनीतून फिरावेच लागते. ज्या जीवांना प्रभू परमात्म्याबद्दल आवड उत्पन्न झाली, त्यांचा प्रभू उद्धार करतो. ज्या साधकाने व्यवहारी जगातून लक्ष काढून घेतले व प्रभुनामात तल्लीन केले तो मायेच्या प्रभावातून मुक्त होतो. त्याच्यावर मोहमाया आपला प्रभाव पाडू शकत नाही. ह्या जगात जे जे काही दिसते ते सारे नष्ट होते. मग ह्या जगात कोणाशी मैत्री करावी ? कोणाशी स्नेह जोडावा ? कोणाला आपले जीवन समर्पित करावे ? कोणाला आपले तन मन समर्पित करावे ? हे प्रभो ! तूच कर्ता आहेस, तूच सदैव स्थिर आहेस. मला तुझाच आधार आहे. तुझ्याच चरणी मी माझे तन, मन, माझे सर्वस्व समर्पित करतो. प्रभू परमात्म्याचे गुणगान केल्याने अहंकार नष्ट होतो. जेव्हा मानवी बुद्धी गुरूपदेशात लीन होते, जेव्हा मनावर नामाचा संस्कार होतो तेव्हा साधक प्रभुनामात लीन होतो. ॥ ४३ ॥

राणा राउ न को रहै रंगु न तुंगु फकीरु ॥
वारी आपो आपणी कोइ न बंधै धीर ॥
राहु बुरा भीहावला सर डूगर असगाह ॥
मै तनि अवगण झुरि मुई विणु गुण किउ घरि जाह ॥
गुणीआ गुण ले प्रभ मिले किउ तिन मिलउ पिआरि ॥
तिन ही जैसी थी रहां जपि जपि रिदै मुरारि ॥
अवगुणी भरपूर है गुण भी वसहि नालि ॥
विणु सतगुर गुण न जापनी जिचरु सबदि न कर बीचारु ॥ ४४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३६)

शब्दार्थ : **राणा** – राजा. **राउ** – राव. **रंगु** – रंक, कंगाल. **तुंगु** – अमीर. **फकीरु** – फकीर. **वारी** – बारी, आपला नंबर. **राहु** – मार्ग. **भीहावला** – भयानक, भीतीदायक. **सर** – सरोवर. **डूगर** – डोंगर, पर्वत. **असगाह** – अथांग. **मै** – माझ्या. **झुरि** – झुरून. **मुई** – मरतो. **विणु** – विना. **गुणीआ** – गुणवान. **किउ** – कसे. **तिन** – त्याला. **मिलउ** – प्राप्त करू. **पिआरि** – प्रेम. **रिदै** – हृदयात. **वसहि** – वसतो. **नालि** – सह, बरोबर. **न जापनी** – समजत नाही. **जिचरु** – जोपर्यंत.

भावार्थ : ह्या जगात मरण हे अटळ आहे. तो राजा असो, रंक असो, अमीर असो वा फकीर असो. प्रत्येकजणास आपापली वेळ आली की मरावेच लागते. येथे कोणीही कायम राहू शकत नाही. मृत्यूचा मार्ग फार भयानक आहे. वाटेत उंच उंच पर्वत आहेत. अथांग जलाशय आहेत. माझे जीवन तर अवगुणांनी भरलेले आहे. त्यामुळेच मी चिंतेत पडलो आहे. कारण सतगुणांशिवाय मोक्ष प्राप्त होत नाही. गुणी लोक आपल्या सतगुणांसह प्रभू परमात्म्यास भेटतात. मी काय करू की ज्यामुळे मी प्रभू परमात्म्यावर प्रेम करून त्याला प्राप्त करू शकेन ? हे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा मी प्रभू परमात्म्याचे सतत स्मरण करून, जप करून त्या गुणवानांच्या रांगेत जाऊन बसेन. सतगुरूशिवाय प्रभुनामाचे सतगुण प्राप्त होऊ शकत नाहीत. ॥ ४४ ॥

लसकरिआ घर संमले आए वजहु लिखाइ ॥
कार कमावहि सिरि घणी लाहा पलै पाइ ॥
लबु लोभु बुरिआईआ छोडे मनहु विसारि ॥
गड़ि दोही पातिसाह की कदे न आवै हारि ॥
चाकरु कहीऐ खसम का सउहे उतर देइ ॥
वजहु गवाए आपणा तखति न बैसहि सेइ ॥
प्रीतम हथि वडिआइआ जै भावे तै देइ ॥
आपि करे किसु आखीऐ अवरु न कोइ करेइ ॥ ४५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३६)

शब्दार्थ : **लसकरीआ** – सैनिक. **संमले** – संभाळले. **वजहु** – पगार, वेतन. **कार कमावहि** – कर्म करतात. **घणी** – मालक. **लाहा** – लाभ. **लबु** – हाव, जिभेचे लाड. **लोभु** – लोभ. **बुरि आइआ** – दुर्गुण. **छोडे** – सोडून. **विसारि** – विसरणे. **गडि** – गड, किल्ला. **दोही** – स्मरण, प्रार्थना. **कदे** – कधीही. **हारि** – पराभूत. **चाकरु** – चाकर. **खसम** – प्रभू परमात्मा. **सउहे** – समक्ष. **उतर** – उत्तर. **तखति** – सिंहासनावर. **प्रीतम** – प्रिय, प्रभू. **हथि** – हातात. **वडिआइआ** – मोठेपणा, अधिकार. **आपि** – प्रभू स्वत:. **किसु** – कसे. **आखीऐ** – सांगावे. **अवरु** – दुसरा.

भावार्थ : ह्या जगरूपी रणक्षेत्रात जीवरूपी सैनिक आपापले मोर्चे संभाळत आहेत. ते आपापले कर्म करत असताना त्यांच्या भाग्यात प्रभू परमात्म्याने लिहून ठेवलेले प्राप्तव्य प्राप्त करतात. त्याशिवायही इतर खूप लाभ प्राप्त करतात. त्यांच्या मनातील राग, लोभादी विकार नष्ट होतात. जे जीव मानवी शरीररूपी किल्ल्यात बसून प्रभूचे नामस्मरण करून त्याची प्रार्थना करतात, ते जीवनात असफल होत नाहीत. काही सैनिक स्वत:स मालकाचे चाकर म्हणवतात पण प्रत्यक्षात ते आपल्या मालकास दुरुत्तरे देतात. ते मालकाचा विश्वास गमावून बसतात. सारे काही प्रभू परमात्म्याच्या हाती आहे. त्यास योग्य वाटेल त्यासच तो मोठेपण देतो. सर्व काही करणारा तो एकमेव प्रभू परमात्माच आहे. अन्य कोणी काहीही करू शकत नाही.

ह्या पदाचा भावार्थ असा की, प्रभू परमात्म्याने प्रत्येक जीवास जन्मास घालताना त्याच्यासाठी काही कर्म योजून ठेवलेले असते. त्याच्या योगक्षेमाचीही व्यवस्था करून ठेवलेली असते. जो जीव प्रभूची आठवण

ठेवून आपली विहीत कर्म मनापासून करतो त्यास प्रभू परमात्मा त्याच्या भाग्यात असलेले सर्व काही देतो. एवढेच नव्हे तर त्या जीवाला आपल्या जीवनात आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी मार्गदर्शन करतो. त्याच्या मनातील राग, लोभ आदी विकार नष्ट होतात. अशा जीवाने प्रभुनामाचे स्मरण केल्यास, त्याची प्रार्थना केल्याने जीवनाच्या लढाईत तो कधीही असफल होत नाही. काही जीव वरकरणी प्रभूची भक्ती करण्याचा देखावा करतात पण मनात प्रभू परमात्म्याविषयी भाव नसतो. असा जीव प्रभू परमात्म्यापासून विमुख झाल्याने प्रभू परमात्म्याच्या कृपेस वंचित होतो. तो मोहमायेतच अडकून राहतो. सारे काही प्रभू परमात्म्याच्या हाती आहे. त्यास जो आवडतो त्यास तो मोठेपणा देतो. सर्व काही करणारा तो एकमेव प्रभू परमात्माच आहे. अन्य कोणीही काहीही करू शकत नाही.॥४५॥

बीजउ सुझै को नही बहै दुलीचा पाइ ॥
नरक निवारणु नरह नरु साचउ साचै नाइ ॥
वणु त्रिणु ढूढत फिरि रही मन महि करउ बीचारु ॥
लाल रतन बहु माणकी सतिगुर हाथि भंडारु ॥
ऊतमु होवा प्रभू मिलै इक मनि एकै भाइ ॥
नानक, प्रीतम रसि मिले लाहा लै परथाइ ॥
रचना राचि जिनि रची जिनि सिरिआ आकारु ॥
गुरमुखि बेअंतु धिआईऐ अंतु न पारावारु ॥ ४६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३६)

शब्दार्थ : **बीजउ** – दुसरा कोणी. **सुझै** – दिसणे, समजणे. **बहै** – वसतो. **दुलीचा** – आसन. **निवारणु** – निवारण. **नरह नरु** – नरश्रेष्ठ, प्रभू. **साचउ** – सत्यस्वरूप. **साचै नाइ** – सत्यनाम. **वणु** – वन. **त्रिणु** – तण, गवत. **ढुढत** – शोधत. **महि** – मध्ये. **करउ** – करतो. **बीचारु** – विचार. **बहु** – खूप. **हाथि** – हातात. **भंडारु** – भांडार. **उतमु** – उत्तम, चांगले. **होवा** – झाले. **प्रीतम** – प्रिय प्रभू. **रसि** – प्रेमाने. **लाहा** – लाभ. **परथाई** – परलोकात. **राचि** – रचून, करून. **जिनि** – ज्याने. **सिरिआ** – सृजन केले, उत्पन्न केले. **आकारु** – सृष्टी. **बेअंतु** – अपार, ज्याला अंत नाही असा. **धिआईऐ** – ध्यान करा, स्मरण करा. **पारावारु** – पारावार, अनंत.

भावार्थ : ह्या सृष्टीचा कारभार समर्थपणे चालवील असा प्रभू परमात्म्याशिवाय अन्य कोणीही असणे शक्य नाही. तो एका जागी स्थिर बसून सर्व जगाचा कारभार पाहतो. जीवांची सर्व दु:खे दूर करणारा तोच एकमेव नरश्रेष्ठ, सर्व काही करणारा सत्यस्वरूप प्रभू परमात्मा आहे. त्याला शोधण्यासाठी मी रानावनात भटकलो. मनात सतत त्याचाच विचार करत राहिलो. प्रभू परमात्म्याचा नामरूपी रत्नांचा खजिना तर सतगुरूच्या हाती आहे. जर जीव जीवनात उत्तम सतगुण प्राप्त करून सदाचरणाने वागून एकचित्त होऊन परमात्म्याचे नामस्मरण करील तर त्यास प्रभू परमात्मा प्राप्त होईल. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याची प्राप्ती केवळ प्रेमानेच होते. प्रेमानेच परलोकाचा मार्ग सुकर होतो. ज्या प्रभू परमात्म्याने ही सृष्टी निर्माण केली. त्यानेच सर्व जीवांची उत्पत्ती केली व त्यांचा संभाळही तोच करतो. पण त्याचा पारावार मात्र कोणासही लागला नाही. त्या अनंत प्रभू परमात्म्यास सतगुरूच्या सान्निध्यात राहून नामस्मरणात तल्लीन होऊन प्राप्त करता येते. ॥ ४६ ॥

ड़ाड़ै रूड़ा हरि जीउ सोई ॥ तिसु बिनु राजा अवरु न कोई ॥
ड़ाड़ै गारुड़ु तुम सुणहु हरि वसै मन माहि ॥
गुर परसादी हरि पाईऐ मतु को भरमि भुलाहि ॥
सो साहु साचा जिसु हरि धनु रासि ॥
गुरमुखि पूरा तिसु साबासि ॥
रुड़ी बाणी हरि पाइआ गुर सबदी बीचारि ॥
आपु गइआ दुखु कटिआ हरि वरु पाइआ नारि ॥ ४७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३६)

शब्दार्थ : **डाडै** – ड अक्षराचा उपदेश. **रूडा** – सुंदर. **सोई** – तो परमेश्वर. **तिसु** – त्या. **गारुडु** – गरुड मंत्र, ह्या मंत्राने सापाचे विष उतरते, गुरुमंत्र. **सुणहु** – ऐका. **मतु** – नका. **सो** – तो. **साहु** – सावकार. **रासि** – संपत्तीची रास. **साबासि** – शाबासकी. **आपु** – अहंकार. **कटिआ** – नष्ट झाले.

भावार्थ : 'ड' हे अक्षर प्रभू परमात्म्याच्या सौंदर्याचे प्रतीक आहे. ह्या विश्वात त्याच्याइतका श्रेष्ठ, सुंदर अन्य कोणी नाही. सर्पाचे विष उतरविण्यासाठी गारुडी जसा 'गारुडी मंत्र' वापरतात, त्याचप्रमाणे सतगुरूकडून प्राप्त झालेल्या प्रभुनाममंत्राचे स्मरण केल्याने मोहमायेचे विष नष्ट होऊन, मन शांत होऊन, मनात प्रभू परमात्म्याचा वास होतो. सतगुरूच्या प्रसादाने प्रभू परमात्मा प्राप्त होतो. मन सर्व भ्रमापासून मुक्त होते. प्रभू परमात्मा हा महान सावकार आहे. त्याच्याजवळ प्रभुनामरूपी धनाची खूप मोठी संपत्ती आहे. जो जीव सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो तो प्रशंसेस प्राप्त होतो. सुंदर पवित्र वाणीच्या सतगुरूची कृपा व प्रभुनामाचे सतत स्मरण यामुळे प्रभू परमात्मा प्राप्त होतो. अहंकार नष्ट झाल्यावर सर्व दु:खेही नष्ट होतात व जीवरूपी स्त्रीस प्रभू परमात्मारूपी पती प्राप्त होतो. ॥ ४७ ॥

सुइना रुपा संचीऐ धनु साचा बिखु छारु ॥
साहु सदाए संचि धनु दुबिधा होइ खुआरु ॥
सचिआरी सचु संचिआ साचउ नामु अमोलु ॥
हरि निरमाइलु ऊजलो पति साची सचु बोलु ॥
साजनु मीतु सुजाणु तू तू सरवरु तू हंसु ॥
साचउ ठाकुरु मनि वसै हउ बलिहारी तिसु ॥
माइआ ममता मोहणी जिनि कीती सो जाणु ॥
बिखिआ अंम्रितु एकु है बूझै पुरखु सुजाणु ॥ ४८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३७)

शब्दार्थ : **सुइना** – सोने. **रुपा** – चांदी. **संचीऐ** – साठवले. **काचा** – कच्चे, खोटे. **बिखु** – विष. **छारु** – राख, तुच्छ. **साहु** – सावकार. **सदाए** – म्हणवतो. **धनु** – धन. **दुबिधा** – द्वैत. **खुआरु** – अपमानित. **सचिआरा** – सत्यवान, सत्यप्रभू, सत्यमार्गी. **सचु** – सत्यस्वरूप परमात्मा. **संचिआ** – संचयलेला, साठवला. **साचउ** – सत्य. **अमोलु** – अमूल्य. **निरमालु** – निर्मळ, मळरहित. **उजलो** – उज्ज्वल. **पति** – पत, प्रतिष्ठा. **बोलु** – वाणी. **साजनु** – पती. **मीतु** – मित्र. **सुजाणु** – सुजाण, ज्ञानी. **सरवरु** – सरोवर. **ठाकूर** – परमात्मा. **हउ** – मी. **तिसु** – त्याच्यावर. **माइआ** – माया. **मोहणी** – मोहिनी. **जिनि** – ज्याने. **कीती** – उत्पन्न केली. **सो** – तो. **जाणु** – जाणतो. **बिखिआ** – विष. **अंम्रितु** – अमृत. **एकु** – एक. **बुझै** – जाणतो.

भावार्थ : सोने, चांदी साठवणे म्हणजे खोटे धन साठवणे होय. ते विष आहे, तुच्छ आहे. असले धन संचय करणारा स्वत:ला सावकार म्हणवतो, श्रीमंत म्हणवतो. तो द्वैतात सापडून भ्रमात भटकत राहतो व शेवटी त्याच्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. सत्यमार्गी लोक सत्याचा संग्रह करतात. प्रभू परमात्म्याचे नाम हाच खरा अमूल्य ठेवा होय. तेच खरे धन ! तो प्रभू परमात्मा निर्मळ आहे, पवित्र आहे, उज्ज्वल आहे. त्याचा सन्मान, त्याची वाणी, सत्य आहे. हे हरी, तूच माझा प्रियकर, तूच माझा मित्र, तूच सर्वज्ञानी आहेस. तूच सरोवर आहे व त्यात विहार करणारा हंसही तूच आहेस. ज्या साधकाच्या मनात तो सत्यस्वरूप प्रभू परमात्मा विराजमान आहे, त्याच्या चरणी मी माझे सर्वस्व अर्पण करतो. ज्या प्रभू परमात्म्याने माया, ममता, मोह निर्माण केले तोच त्याचे रहस्य जाणतो. पण जो साधक प्रभू परमात्म्यास जाणतो तो विष व अमृत, सुख आणि दु:ख समान मानतो. तो द्वंद्वातून मुक्त होतो. ॥ ४८ ॥

खिमा विहूणे खपि गए खूहणि लख असंख ॥
गणत न आवै किउ गणी खपि खपि मुए बिसंख ॥
खसमु पछाणै आपणा खूलै बंधु न पाइ ॥
सबदि महली खरा तू खिमा सचु सुख भाइ ॥
खरचु खरा धनु धिआनु तू आपे वसहि सरीरि ॥
मनि तनि मुखि जापै सदा गुण अंतरि मनि धीर ॥
हउमै खपै खपाइसी बीजउ वथु विकारु ॥
जंत उपाइ विचि पाइअनु करता अलगु अपारु ॥ ४९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३७)

शब्दार्थ : **खिमा** – क्षमा. **विहुणे** – विहीन, विना. **खपि** – संपले, मेले. **खुहणि** – अक्षोहणि सेना, असंख्य. **लख** – लक्ष. **असंख** – असंख्य. **बिसंख** – असंख्य. **खसमु** – पती परमेश्वर. **पछाणै** – ओळखले. **खुलै** – सुटले. **बंधु** – बंधन. **महली** – प्रभूचा महाल. **सुख** – आनंद. **खरचु** – खर्च. **आपे** – स्वस्वरूप. **धिआनु** – ध्यान. **जापै** – जप करतो. **हउमै** – अहंकार. **खपै** – मेले. **जंत** – जीव. **उपाइ** – उत्पन्न केले. **वथु** – वस्तू.

भावार्थ : ज्याच्या हृदयात क्षमाभाव नाही अशी माणसे या जगात दु:ख, संतापाच्या अग्नीत जळून मरतात. अशा जीवांची गणती करणेही शक्य नाही. असे असंख्य लोक दु:ख, संतापाने मरून जातात. पण ज्याच्या हृदयात क्षमाभाव आहे असा साधक प्रभू परमात्म्यास ओळखतो व त्यामुळे त्याची सर्व बंधने गळून पडतात. प्रभुनामाच्या माध्यमातून जीव पवित्र व सदाचरणी बनून प्रभू दरबारात प्रवेश करण्यास पात्र होतो. क्षमा व सत्याचरण हा त्याचा स्वभावच बनून जातो. हे पंडित ! तू ध्यानरूपी सत्य धन खर्च कर म्हणजे तो प्रभू परमात्मा तुझ्या अंतरात वास करील व त्यामुळे तुझे तन, मन प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जाईल. तुझ्या मुखातून सदैव

प्रभुनामाचा जप होत राहील. तुझ्या मनात धैर्य उत्पन्न होईल. अहंकारी जीव सदैव दु:ख भोगतो. सदैव विषयविकारातच बुडून जातो. प्रभुनामाशिवाय अन्य सर्व गोष्टी विकारच उत्पन्न करतात. प्रभू परमात्म्याने सारे जीव उत्पन्न केले आहेत व त्यात स्वत:स स्थापित केले आहे. पण तरीही तो अपार प्रभू परमात्मा सर्वांपासून अलिप्त आहे. ॥ ४९ ॥

सिसटे भेउ न जाणै कोइ ॥ सिसटा करै सु निहचउ होइ ॥
संपै कउ ईसरु धिआईऐ ॥ संपै पुरबि लिखे की पाईऐ ॥
संपै कारणि चाकर चोर ॥ संपै साथि न चालै होर ॥
बिनु साचे नही दरगह मानु ॥ हरि रसु पीवै छुटै निंदानि ॥ ५० ॥(श्री गु. ग्रं. सा. ९३७)

शब्दार्थ : **सिसटे** – सृष्टीचा निर्माता. **भेउ** – भेद, रहस्य. **सिसटा** – सृष्टा, सृष्टी उत्पन्न करणारा, प्रभू परमात्मा. **निहचउ** – निश्चित. **संपै** – संपत्ती. **कउ** – करता. **इसरू** – ईश्वर. **धिआईऐ** – ध्यान करतात, आराधना करतात. **पुरबि** – पूर्वसंचित, भाग्य. **चालै** – बरोबर येणे. **होर** – इतर. **निदानि** – शेवटी अंती.

भावार्थ : ही सृष्टी उत्पन्न करणाऱ्या प्रभू परमात्म्याचे रहस्य कोणासही माहीत नाही. कोणीही ते जाणू शकत नाही . तो सृष्टा जे ठरवील ते निश्चितपणे होतेच. काही लोक संपत्ती मिळावी म्हणून परमेश्वराची आराधना करतात. पण जीवास त्याच्या भाग्यात लिहिली असेल तेवढीच संपत्ती प्राप्त होते. संपत्ती प्राप्त करण्यासाठी कोणी दुसऱ्याची चाकरी करतो, तर कोणी चोर बनून दुसऱ्याच्या संपत्तीची चोरी करतो. पण हे सर्व करून साठवलेली संपत्ती परलोकात बरोबर येत नाही. ती येथेच सोडून जावी लागते. सत्याचरणाशिवाय प्रभूच्या दरबारात सन्मान प्राप्त होत नाही. शेवटी ज्याने प्रभुरसाचे पान केले त्याचीच मोहमायेची सर्व बंधने तुटून जातात व तो जीव मुक्त होतो. ॥ ५० ॥

हेरत हेरत हे सखी होइ रही हैरानु ॥
हउ हउ करती मै मुई सबदि रवै मनि गिआनु ॥
हार डोर कंकन घणे करि थाकी सीगारु ॥
मिलि प्रीतम सुखु पाइआ सगल गुणा गलि हारु ॥
नानक गुरमुखि पाईऐ हरि सिउ प्रीति पिआरु ॥
हरि बिनु किनि सुखु पाइआ देखहु मनि बीचारि ॥
हरि पड़णा हरि बुझणा हरि सिउ रखहु पिआरु ॥
हरि जपीऐ हरि धिआईऐ हरि का नामु अधारु ॥ ५१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३७)

शब्दार्थ : **हेरत हेरत** – शोधत शोधत, पाहत पाहत. **हैरानु** – आश्चर्यचकित. **हउ हउ** – मी मी. **मै** – अहंभावना. **मुई** – मेली. **रवै** – स्मरण. **हार** – कंठा. **डोर** – डोरले. **कंकन** – कंकण, बांगडी. **घणे** – खूप. **करि** – करून. **थाकी** – थकले. **सीगारु** – शृंगार. **मिलि** – मिळाला, प्राप्त झाला. **प्रीतम** – प्रियकर. **सगल** – सगळे. **गलिहारु** – गळ्यातील हार, कंठा. **सिउ** – सह. **किनि** – कोणी. **देखहु** – पाहा. **पडना** – वाचन करणे. **बुझना** – समजणे. **अधारु** – आधार.

भावार्थ : हे सखी, मी माझ्या प्रियकराची, त्या प्रभू परमात्म्याची वाट पाहून पाहून बेचैन झाले आहे. माझ्यातील मी मी म्हणणारा माझा अहंभाव नष्ट झाला आहे. आता मला प्रभुनामाचे स्मरण केल्याने ज्ञान प्राप्त झाले आहे. प्रियकर परमात्म्याच्या प्राप्तीसाठी मी नाना प्रकारे शृंगार करता करता थकून गेले. भाव असा की प्रभुप्राप्तीसाठी नाना तऱ्हेची कर्मकांडे व्रत वैकल्ये करून करून मी दमले आहे. त्याचा काहीही उपयोग झाला नाही. पण प्रभुनामाच्या साहाय्याने मला प्रभू परमात्मा, माझा प्रियकर भेटला. त्यामुळे मी सुखी आनंदी झाले आहे. आता मी त्याला आवडणाऱ्या आध्यात्मिक गुणांचे नामस्मरण, सत्याचरण आदी गुणांचे हार गळ्यात घालते. पती प्रियकरास आवडणारे सर्व गुण धारण करते. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्यास प्रभू परमात्म्याशी प्रेमाचे नाते जोडता येते. प्रभुनामाशिवाय कधी कोणी सुखी झाला आहे का, याचा तू नीट विचार करून पाहा. हे जीवा ! तू हरीचे विचार वाच. हरीचे ध्यान कर. हरीला जाण. हरीवर प्रेम कर. प्रभू परमात्म्याचा जप कर. प्रभू परमात्म्याचे ध्यान कर. प्रभूचीच आराधना कर. त्या प्रभू परमात्म्याचे नाम हाच तुझा जीवनाचा आधार होऊ दे. ॥ ५१ ॥

लेखु न मिटई हे सखी जो लिखिआ करतारि ॥
आपे कारणु जिनि कीआ करि किरपा पगु धारि ॥
करते हथि वडिआईआ बूझहु गुर बीचारि ॥
लिखिआ फेरि न सकीऐ जिउ भावी तिउ सारि ॥
नदरि तेरी सुखु पाइआ नानक सबदु विचारि ॥
मनमुख भूले पचि मुए उबरे गुर बीचारि ॥
जि पुरखु नदर न आवई तिस का किआ करि कहिआ जाइ ॥
बलिहारी गुण आपणे जिनि हिरदे दिता दिखाइ ॥ ५२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३७)

शब्दार्थ : **लेखु** – कर्मलेख. **मिटई** – पुसणे, मिटवून टाकणे. **करतारि** – कर्ता, परमेश्वर. **आपे** – स्वत:, परमेश्वराने. **कारणु** – सृष्टी. **पगु** – चरण, पाय. **धारि** – धारण करतो. **हथि** – हातात. **वडिआईआ** – अधिकार. **बुझहु** – जाण. **जिउ** – ज्याप्रमाणे. **भावी** – वाटेल. **तिउ** – त्याप्रमाणे. **सारि** – रक्षण कर. **नदरि** – कृपादृष्टी. **मनमुख** – स्वेच्छाचारी, मनाला वाटेल तसे वागणारा. **पाचे मुए** – दु:खी होऊन मेला. **उबरे** – उद्धार केला, वाचवले. **जि** – जो. **पुरखु** – पुरुष. **किआ** – कसे. **करि** – म्हणून. **महिआ जाइ** – सांगता येईल. **जिनि** – ज्याने. **दिता** – दिले. **दिखाइ** – दाखवणे.

भावार्थ : हे सखी ! प्रभू परमात्म्याने जो कर्मलेख जीवाच्या भाग्यात लिहिला आहे तो कोणीही पुसू शकत नाही. ह्या समुच्च सृष्टीचा जो मूल कारण, प्रभू परमात्मा, त्यानेच हे सारे घडवले आहे. त्यानेच कृपापूर्वक प्रत्येकाच्या हृदयात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. कोणास महत्त्व द्यायचे हे त्या प्रभू परमात्म्याच्याच हातात आहे. सतगुरूचा हा विचार तू नीट समजून घे. प्रभू परमात्म्याने लिहिलेला कर्मलेख कोणीही बदलू शकत नाही. हे प्रभो ! तुला योग्य वाटेल तसा तू जीवांचा सांभाळ कर. नानक सांगतात, त्या प्रभू परमात्म्याच्या कृपाकटाक्षानेच सुख प्राप्त होते. म्हणून जीवाने सदैव प्रभुनामाचे स्मरण करावे. स्वेच्छाचारी जीव प्रभूची आठवण न ठेवता आपल्या मनाला वाटेल तसे वागून मोहमायेला भुलून दु:खाचे जिणे जगतो पण असा मनमुख जीव प्रभुनामाचे स्मरण केल्याने उद्धरून जातो. जो प्रभू परमात्मा दिसतच नाही, त्या प्रभू परमात्म्याचा

महिमा काय सांगावा ? ज्या सतगुरूने माझ्या हृदयातच वसणाऱ्या प्रभू परमात्म्याचे मला दर्शन घडविले त्याच्यावर मी माझे प्राण ओवाळून टाकतो.॥५२॥

पाधा पड़िआ आखीऐ बिदिआ बिचरै सहजि सुभाइ ॥
बिदिआ सोधै ततु लहै राम नाम लिव लाइ ॥
मनमुखु बिदिआ बिक्रदा बिखु खटे बिखु खाइ ॥
मूरखु सबदु न चीनई सूझ बूझ नह काइ ॥ ५३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३७)

शब्दार्थ : **पाधा** – पंडित, शिक्षक. **पडिआ** – शिकलेला. **आखीऐ** – सांगावे, म्हणावे. **बिदिआ** – विद्या. **बिचरे** – विहार करणे, जीवन जगणे. **सहजि सुभाइ** – सहज, स्वाभाविकपणे. **सोधै** – जीवनाचे मूळ शोधतो. **ततु** – तत्त्व, सार. **लहै** – प्राप्त करतो. **मनमुखु** – स्वेच्छाचारी. **बिकदा** – विकतो. **बिखु** – विष. **खटे** – प्राप्त करतो. **खाइ** – खातो. **मूरखु** – मूर्ख. **चीनई** – ओळखणे, जाणणे. **सूझ बूझ** – सुज्ञ विचार. **काइ** – थोडीशी, थोडी सुद्धा.

भावार्थ : खरा पंडित तो, की जो आपण शिकलेल्या विद्येचा सहज स्वाभाविकपणे विचार करून त्या विद्येच्या द्वारा स्वत:चे संशोधन करून अंतिम तत्त्व जो प्रभू परमात्मा, त्याला जाणतो व त्या प्रभू परमात्म्यात एकचित्त होऊन राहतो. पण मनमुखी जीव, स्वेच्छाचारी माणूस विद्येची विक्री करून, विद्येचा दुरुपयोग करून, विकाररूपी विष कमावतो व त्यातच रममाण होतो. मूर्ख माणूस प्रभुनामाचे महत्त्व जाणत नाही. त्याच्या मनात कोणताही सुज्ञ विचार, प्रभू परमात्म्याचा विचार, येत नाही. ॥ ५३ ॥

पाधा गुरमुखी आखीऐ चाटड़िआ मति देइ ॥
नामु समालहु नामु संगरहु लाहा जग महि लेइ ॥
सची पटी सचु मनि पड़ीऐ सबदु सु सारु ॥
नानक सो पड़िआ सो पंडितु बीना रामनामु गलि हारु ॥ ५४ ॥ १ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३८)

शब्दार्थ : **पाधा** – पंडित. **आखीऐ** – म्हणावे. **चाटडिआ** – शिष्यांना. **समालहु** – संभाळतो. **संगरहु** – संग्रह करा. **लाहा** – लाभ. **लेइ** – घ्या, प्राप्त करा. **सची** – सत्य. **पटी** – पाटी. **पडीऐ** – शिकणे. **सारु** – श्रेष्ठ. **सो** – तो. **पडिआ** – शिक्षित. **बीना** – द्रष्टा. **जिसु** – ज्याने. **गलि** – गळ्यात. **हारु** – हार, माळ.

भावार्थ : त्यालाच खरा पंडित म्हणावे जो गुरू उपदेशाप्रमाणे आचरण करून आपल्या शिष्यांना सुमती प्रदान करतो. तो आपल्या शिष्यांना आपल्या हृदयात प्रभुनाम संभाळून ठेवण्यास, प्रभुनामरूपी धनसंग्रह करण्यास शिकवतो. ह्या संसारात प्रभुनाम हाच खरा लाभ आहे असे सांगतो. मनात सत्याची धारणा करावी असे समजावतो. हेच खरे शिक्षण. सर्व जगात प्रभुनाम हेच सर्वश्रेष्ठ आहे. सत्याचरणाच्या पाटीवर प्रभुनामरूपी सारतत्त्व लिहावे. नानक सांगतात, ज्याने प्रभुनामरूपी हार कंठात धारण केला आहे, तोच खरा सुशिक्षित, खरा द्रष्टा पंडित होय.॥५४॥१॥

रामकली महला १ सिघ गोसटि

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

परमेश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

सिघ सभा करि आसणि बैठे संत सभा जैकारो ॥
तिसु आगै रहरासि हमारी साचा अपर अपारो ॥
मसतकु काटि धरी तिसु आगै तनु मनु आगै देउ ॥
नानक संतु मिलै सचु पाईऐ सहज भाइ जसु लेउ ॥ १ ॥
किआ भवीऐ सचि सूचा होइ ॥
साच सबद बिनु मुकति न कोइ ॥ १ ॥ रहाउ ॥
(श्री गु. ग्रं. सा.९३८)

शब्दार्थ : **जैकारो** – नमस्कार. **तिसु** – त्याच्या. **रहरासि** – प्रार्थना आराधना. **साचा** – सत्य. **अपर अपारो** – अपरंपार. **मसतकु** – मस्तक. **धरी** – भेट करीन. **भाइ** – भाव. **लेउ** – मिळते, प्राप्त होते. **भवीऐ** – भटकणे. **सचि** – सत्य. **साचु** – पवित्र. **साच** – सत्य. **शबद** – प्रभुनाम. **कोइ** – कोणी.

भावार्थ : सिद्ध योगी सभेमध्ये बसले होते. तेथे श्रीगुरू नानकदेवजी आले. त्यांनी संतजनांना नमस्कार केला व म्हणाले, त्या अपरंपार प्रभू परमात्म्यास माझा नमस्कार असो. त्या प्रभू परमेश्वरास मी माझे तन, मन सर्व काही अर्पण करावे, त्याच्यावरून माझा जीव ओवाळून टाकावा हीच माझी इच्छा आहे. नानक सांगतात, संतसज्जन भेटल्याने त्यांच्याद्वारे प्रभू परमात्म्याची प्राप्ती होते. मी सहजभावात राहून प्रभू परमात्म्याचे यशोगान गाईन. प्रभूचे नामस्मरण करीत राहीन. ॥ १ ॥ काय रानावनात भटकल्याने, कर्मकांड केल्याने चित्त शुद्ध होते? प्रभू परमात्म्याची प्राप्ती होते ? प्रभुनामाचा अंगीकार केल्याशिवाय मुक्ती प्राप्त होत नाही. ॥रहाउ॥१॥

कवन तुमे किआ नाउ तुमारा कवनु मारगु कउनु सुआओ ॥
साचे कहउ अरदासि हमारी हउ संत जना बलि जाओ ॥
कह बैसहु, कह रहीऐ बाले कह आवहु कह जाहो ॥
नानकु बोलै सुणि बैरागी किआ तुमारा राहो ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३८)

शब्दार्थ : **कवन** – कोण. **तुमे** – तुम्ही. **किआ** – काय. **नाउ** – नाव. **मारगु** – मार्ग, पंथ. **सुआओ** – ध्येय, प्रयोजन. **कहउ** – सांगतो. **अरदासि** – विनंती, प्रार्थना. **हउ** – मी. **बैसहु** – वसतिस्थान. **रहिऐ** – राहतोस. **बाळे** – बालक. **आवहु** – येतोस. **जाहो** – जातोस.

भावार्थ : चरपट योग्यांनी विचारले, तुम्ही कोण आहात ? तुमचे नाव काय ? तुमचा पंथ कोणता ? तुमचे येथे येण्याचे प्रयोजन काय ? नानक सांगतात, मी खरे सांगतो, माझी प्रार्थना आहे की मी संतजनांवर माझा जीव

ओवाळून टाकावा. चरपट योगी म्हणतात, हे बालका ! तू कोणती साधना करतोस ? कोठे राहतोस ? कोठून आलास ? कोठे जाणार ? नानक म्हणतात, त्यांनी मला वैरागी म्हणून संबोधून माझा पंथ कोणता ते विचारले.॥२॥

घटि घटि बैसि निरंतरि रहीऐ चालहि सतिगुर भाए ॥
सहजे आए हुकमि सिधाए नानक सदा रजाए ॥
आसणि बैसणि थिरु नाराइणु ऐसी गुरमति पाए ॥
गुरमुखि बुझै आपु पछाणै सचे सचि समाए ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३८)

शब्दार्थ : **घटि घटि** – प्रत्येक हृदयात. **बैसि** – बसला आहे. **चालहि** – चालतो. **भाए** – दाखवलेला. **सिधाए** – निघून जाईन. **रजाए** – आज्ञेत. **हुकमि** – परमेश्वराच्या आज्ञेने. **थिरु** – स्थिर. **पाए** – प्राप्त केले. **गुरमुखि** – गुरुमुखातून, गुरूकडून. **बुझै** – समजले. **समाए** – एकरूप झालो, सामावून गेलो.

भावार्थ : नानकांनी उत्तर दिले, सतगुरूकडून मला ज्ञान प्राप्त झाले आहे की, तो प्रभू परमात्मा प्रत्येक शरीरात बसलेला आहे. त्याच्या स्मरणातच मी माझे जीवन सदैव व्यतीत करतो. हा नानक अगदी सहजपणे प्रभूच्याच प्रेरणेने येथे आला आहे व त्याची आज्ञा होईल तेव्हा तो येथून निघून जाईल. गुरूकडून मी हे जाणले आहे की तो एकमेव परमात्मा सदैव स्थिर आहे. गुरुकृपेनेच हे ज्ञान प्राप्त होते. अशी व्यक्ती स्वत:चे आत्मस्वरूप जाणते व त्या अस्तित्वमान असलेल्या सदा सत्य परमेश्वरात लीन होऊन जाते. ॥ ३ ॥

दुनीआ सागरु दुतरु कहीऐ किउ करि पाइऐ पारो ॥
चरपटु बोलै अवधू नानक देहु सचा बीचारो ॥
आपे आखै आपे समझै तिसु किआ उतरु दीजै ॥
साचु कहहु तुम पारगरामी तुझु किआ बैसणु दीजै ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३८)

शब्दार्थ : **दुतरु** – दुस्तर, पार करण्यास अवघड. **कहिऐ** – सांग. **किउ करि** – कशाप्रकारे, काय केल्याने. **पाइऐ पारो** – पार केला जाईल. **चरपटु** – चरपट नाथ, सिद्धयोग्यांचा गुरू. **अवधू** – अवधूत. **देहू** – दे, सांग. **बिचारो** – विचार करून. **आपे** – आपण. **आखै** – सांगतो. **समझै** – समजतो. **तिसु** – त्याचे, त्याला. **किआ** – काय, कसे. **उतरु** – उत्तर. **साचु कहहु** – सत्य सांगतो. **पारगरामी** – पलीकडे गेलेले. **बैसणु** – चर्चा करणे. **तुझु** – तुम्हाला, तुमच्या पंथाला.

भावार्थ : चरपटनाथ नानकांना विचारतात – हा भवसागर दुस्तर आहे असे म्हणतात. तो कसा पार करून जाता येईल याबद्दलचे तुमचे खरे खरे विचार सांगा. नानक म्हणाले : हे योगिजनहो ! तुम्ही सर्व काही जाणता, आणि जाणून बुजून तुम्ही हा प्रश्न मला विचारता आहात. मी कसे काय उत्तर देऊ ? सत्य सांगतो, तुम्ही तर भवसागर पार करण्याचा मार्ग जाणता मग त्यावर अधिक चर्चा कशाला करावी ? ॥ ४ ॥

जैसे जल महि कमलु निरालमु मुरगाई नै साणे ॥
सुरति सबदि भव सागरु तरीऐ नानक नामु वखाणे ॥

रहहि इकांति एको मनि बसिआ आसा माहि निरासो ॥
अगमु अगोचरु देखि दिखाए नानकु ता को दासो ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३८)

शब्दार्थ : **महि** – मध्ये. **निरालमु** – निर्मळ, निर्लेप. **मुरगाई** – पाणपक्षी. **नै** – नदी. **साणे** – जसे. **सुरति** – रममाण होऊन. **सबदि** – प्रभुनामात. **रहहि** – राहून. **इकांति** – एकांतात. **एको** – एकमात्र परमेश्वर. **बसिआ** – वसतो. **आसा** – आशा. **निरासो** – निराशा.

भावार्थ : नानक पुढे सांगतात – जसे कमळ चिखलात राहते पण ते निर्मळ असते. पाणपक्षी सदैव पाण्यात असतो पण त्याचे पंख यत्किंचितही ओले होत नाहीत. तसे साधकाने ह्या भवसागरात, संसारात राहूनही सर्व तऱ्हेच्या मायामोहापासून अलिप्त असले पाहिजे. जो एकांतात राहून त्या एकमात्र परमेश्वरास आपल्या चित्तात दृढपणे धारण करतो व अनासक्त जीवन जगतो, तो त्या अगम्य, अगोचर प्रभू परमात्म्यास पाहतो व दुसऱ्यासही त्याचे दर्शन घडवतो, हा नानक त्याचा दास आहे. ॥ ५ ॥

सुणि सुआमी अरदासि हमारी पूछउ साचु बीचारो ॥
रोसु न किजै उतरु दीजै किउ पाइऐ गुर दुआरो ॥
इहु मनु चलतउ सचि घरि बैसे नानक नामु अधारो ॥
आपे मेलि मिलाए करता लागै साचि पिआरो ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३८)

शब्दार्थ : **सुणि** – ऐका. **सुवामी** – स्वामी. **रोसु** – रोष, राग. **गुर दुआरो** – गुरूच्या द्वारा. **इहु** – हे. **चलतउ** – चंचल. **मेलि मिलाए** – मिलन घडवून आणतो.

भावार्थ : योगिजन नानकांना म्हणतात – हे स्वामी ! आमची प्रार्थना ऐका. आम्ही सत्य जाणून घेण्यासाठी आपणास प्रश्न विचारत आहोत. कृपा करून राग मानू नका. आम्हाला सांगा, काय केल्याने गुरुद्वारा परमेश्वर प्राप्त होईल ? नानक सांगतात – हे चंचल मन प्रभुनामाचे साहाय्याने त्या सत्य स्वरूप परमेश्वराशी दृढ धरा म्हणजे मग तो प्रभू परमात्मा स्वत:च तुमचे त्याच्याशी मिलन घडवून आणेल. मग तुम्हास सत्य प्रिय वाटू लागेल.॥६॥

हाटी बाटी रहहि निराले रुखि बिरखि उदिआने ॥
कंद मूलु अहारो खाईऐ अउधू बोले गिआने ॥
तीरथि नाईऐ सुखु फलु पाइऐ मैलु न लागै काई ॥
गोरख पूतु लोहारीपा बोलै जोग जुगति बिधि साई ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३८)

शब्दार्थ : **हाटी** – बाजार. **बाटी** – मार्ग. **रुखि** – वृक्ष. **बिरखि** – वृक्ष. **उदिआने** – जंगल. **अउधू** – अवधूत (नाथ पंथी). **गिआने** – ज्ञान. **नाइऐ** – स्नान. **गोरखपूतु** – गोरखनाथांचा चेला. **लोहारीपा** – नाव आहे.

भावार्थ : गोरखनाथांचे शिष्य लोहारिपा म्हणाले – बाजारहाटापासून, ह्या दुनियादारीपासून, ह्या प्रपंचापासून

दूर जंगलात वृक्षवल्लरींच्या जंगलात आम्ही विरक्त जीवन जगतो. कंदमुळे खाऊन आम्ही उदरनिर्वाह करतो व अवधूतांकडून ज्ञान प्राप्त करतो. तीर्थामध्ये स्नान करतो. सुख प्राप्त करतो. त्यामुळे आम्हास विषयविकारांचा यत्किंचितही मळ लागत नाही. ही आमची योगिक जीवन पद्धती आहे. ॥ ७ ॥

हाटी बाटी नीद न आवै पर घरि चितु न डुोलाई ॥
बिनु नावै मनु टेक न टिकई नानक भूख न जाई ॥
हाटु पटणु घरु गुरू दिखाइआ सहजे सचु वापारो ॥
खंडित निद्रा अलप अहारं नानक ततु बिचारो ॥ ८ ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३९)

शब्दार्थ : **नीद** – निद्रा, झोप. **डुोलई** – दोलायमान. **बिनु** – विना. **नावै** – परमेश्वराचे नाव. **टेक** – स्थिर. **भूख** – हाव, तृष्णा.

भावार्थ : नानक सांगतात – हे योगिजनहो ! ह्या संसारात राहूनही अविद्येच्या घोर निद्रेपासून दूर राहिले पाहिजे. दुसऱ्याची धनदौलत पाहूनही मन यत्किंचितही विचलित होता कामा नये. प्रभुनामाशिवाय हे मन स्थिर होत नाही. हे योगिजनहो ! माझ्या गुरूने मला दिलेल्या शिकवणीमुळे ह्या संसारात राहूनही मी सत्याचे ज्ञान प्राप्त करू शकतो. ह्या नानकाने जीवनाचे मूलतत्त्व जाणले आहे. त्यामुळे माझ्यातील अविद्यारूपी निद्रा खंडित झाली आहे. विषयविकारांची हावही शमली आहे. ॥ ८ ॥

दरसनु भेख करहु जोगिंद्रा मुंद्रा झोली खिंथा ॥
बारह अंतरि एकु सरेवहु खटु दरसन इक पंथा ॥
इन बिधि मनु सझाईऐ पुरखा बाहुड़ि चोट न खाईए ॥
नानकु बोलै गुरमुखि बूझै जोग जुगति इव पाईऐ ॥ ९ ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३९)

शब्दार्थ : **दरसन** – मार्ग. **भेख** – वेश. **करहु** – करा. **बारह** – योग्यांचे बारा संप्रदाय. **सरेवहु** – स्मरण कर. **खटु** – सहा, षट्. **समझाईए** – समजवा. **बाहुडि** – पुन:. **चोट** – धोका, इजा. **मुंद्रा** – मुद्रा. **झोली** – झोळी. **खिंथा** – कांबळे.

भावार्थ : योगिजनांनी नानकांना सांगितले – हे योगिंद्रा ! तू आमच्यासारखा मुंद्रा झोळी कांबळे असा बाह्य वेश धारण कर, आमच्या बारा पंथापैकी व षड्दर्शनापैकी एक जे योगशास्त्र त्याचा तू अंगीकार कर. नानक सांगतात– मनाला समजावले तर मन परत मोहमायेच्या पाशात अडकत नाही. हे योगिजनहो सतगुरुकृपेने योगाचे रहस्य जाणले जाते. ॥ ९ ॥

अंतरि सबदु निरंतरि मुद्रा हउमै ममता दूरि करी ॥
कामु क्रोधु अहंकारु निवारै गुर कै सबदि सु समझ परी ॥
खिंथा झोली भरिपुरि रहिआ नानक तारै एकु हरी ॥
साचा साहिबु साची नाई परखै गुर की बात खरी ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा.९३९)

शब्दार्थ : **अंतरि** – अंत:करणात, हृदयात. **हउमै** – अहंकार. **भरिपुरि** – परिपूर्ण. **नाई** – मोठेपणा. **निरंतर** – सदैव.

भावार्थ : माझ्या अंतरात निरंतर प्रभूचे नाम मी धारण केले आहे, हीच मुद्रा होय. त्यामुळे अहंकार व ममता माझ्या मनातून निघून गेली आहे. गुरूकडून प्राप्त झालेल्या नामामुळेच माझ्यातील काम, क्रोध, मोह, अहंकार आदी सर्व विकार नष्ट झाले आहेत. सर्वत्र परिपूर्ण भरून राहिलेला प्रभू परमात्मा हीच माझी झोळी, कांबळे आहे. नानक सांगतात, तो एकमेव हरी माझा रक्षणकर्ता आहे. तो प्रभू परमेश्वर सत्य आहे. त्याचा न्याय सत्य आहे आणि पारखून घेतलेली गुरूची वाणी खरी आहे. ॥ १० ॥

ऊंधउ खपरु पंच भू टोपी ॥ कांइआ कड़ासणु मनु जागोटी ॥
सतु संतोखु संजमु है नालि ॥ नानक गुरमुखि नामु समालि ॥ ११ ॥
(श्री गु. ग्रं. सा.९३९)

शब्दार्थ : **उंघउ** – उलटा. **पंच भू** – पंचमहाभूते, पाच मूलतत्त्वे. **कांइआ** – शरीर. **कडासणु** – गवताचे आसन, चटई. **जागोटी** – लंगोटी. **सतु** – सत्य. **संतोखु** – संतोष. **संजमु** – संयम. **नालि** – बरोबर. **समालि** – संभाळ.

भावार्थ : सांसारिक विषयविकारांपासून परावृत्त झालेले माझे मन हेच माझे 'खापर' आहे. ज्यापासून हा संसार निर्माण झाला त्या पंचतत्त्वांचे दैवी गुण हीच माझी टोपी आहे. सजग, सावध शरीर हेच माझे कडासन आहे. मन ताब्यात ठेवणे ही माझी लंगोटी आहे. सत्य, संतोष, संयम हे माझे सहकारी आहेत. नानक म्हणतात, सतगुरूस शरण गेल्यामुळे प्राप्त झालेले प्रभुनाम मी मनात दृढ धरून ठेवले आहे. ॥ ११ ॥

कवनु सु गुपता कवनु सु मुकता ॥ कवनु सु अंतरि बाहरि जुगता ॥
कवनु सु आवै कवनु सु जाइ ॥ कवनु सु त्रिभवणि रहिआ समाइ ॥१२॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३९)

शब्दार्थ : **गुपता** – गुप्त. **मुकता** – मुक्त. **अंतरि** – आत. **बाहरि** – बाहेर. **जुगता** – जोडलेला. **आवै** – येतो. **जाइ** – जातो. **त्रिभवणि** – त्रिभुवनात. **समाइ** – सामावून.

भावार्थ : योगी विचारतात – गुप्त कोण आहे व मुक्त कोण आहे ? असा कोण आहे की तो बाहेरून व अंतरातून त्या प्रभू परमात्म्याशी जोडलेला आहे. कोण येतो आणि कोण जातो ? त्रिभुवनात सामावून राहिलेला कोण आहे ? ॥ १२ ॥

घटि घटि गुपता गुरमुखि मुकता ॥ अंतरि बाहरि सबदि सु जुगता ॥
मनमुखि बिनसै आवै जाइ ॥ नानक गुरमुखि साचि समाइ ॥ १३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३९)

शब्दार्थ : **घटि** – शरीर. **गुपता** – गुप्त. **मुकता** – मुक्त. **अंतरि** – आंत, अंत:करणात. **बाहरि** – बाहेर.

सबदि – शब्दब्रह्म. **जुगता** – युक्त. **मनमुखि** – स्वेच्छाचारी. **बिनसै** – विनाश. **आवै** – येतो, जन्मतो. **जाइ** – जातो, मरतो. **साचि** – सत्यरूप परमेश्वर. **समाइ** – सामावून जातो.

भावार्थ : नानक सांगतात – जो प्रभू परमात्मा प्रत्येक शरीरात आहे तो गुप्त आहे व जो गुरुकृपेस पात्र झाला तो मुक्त झाला. असा मुक्त साधकच प्रभूनामाने प्रभू परमात्म्याशी अंतरबाह्य जोडलेला आहे. तो मनाच्या इच्छेप्रमाणे वागतो तो जन्ममरणाच्या चक्रात अडकतो. तोच येतो आणि जातो. जो गुरुकृपेस पात्र झाला तो त्रिभुवनात सामावला जातो. नानक सांगतात, तोच सत्यरूप परमेश्वरात सामावून जातो. ॥ १३ ॥

किउ करि बाधा सरपनि खाधा ॥ किउ कारि खोइआ किउ कारि लाधा ॥
किउ करि निरमलु किउ कारि अंधिआरा ॥ इहु ततु बीचारै सु गुरु हमारा ॥ १४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३९)

शब्दार्थ : **किउ कारि** – कशामुळे. **बाधा** – बांधला गेला. **खाधा** – खाल्ले. **सरपनि** – सर्पिणी. **खोइआ** – हरवून गेला. **लाधा** – प्राप्त केला. **निरमलु** – निर्मळ. **अंधिआरा** – अंधार. **बीचारै** – सांगेल. **सु** – तो.

भावार्थ : योगिजन विचारतात – हा जीव कशामुळे बंधनात अडकतो ? याला मायरूपी सर्पिण कशामुळे खाऊन टाकते ? कशामुळे हा जीव आपल्या मूळ स्वरूपास विसरतो ? कशामुळे तो पुन्हा स्वस्वरूप जाणतो ? स्वस्वरूपास प्राप्त करतो ? कशामुळे तो निर्मळ होतो ? कशामुळे तो तमात बुडून जातो ? ह्या सर्वांमागचे जे मूळतत्त्व आहे ते जे कोणी आम्हास समजावून सांगेल तोच आमचा गुरू. त्यालाच आमचा नमस्कार. ॥ १४ ॥

दुरमति बाधा सरपनि खाधा ॥ मनमुखि खोइआ गुरमुखि लाधा ॥
सतिगुरु मिलै अंधेरा जाइ ॥ नानक हउमै मेटि समाइ ॥ १५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९३९)

शब्दार्थ : **हउमै** – अहंकार. **मेटि** – त्याग करून, सोडून देऊन.

भावार्थ : नानक सांगतात, हा जीव कुबुद्धीने, वाईट वासनेने बांधला जातो. त्यामुळे मायारूपी सर्पिणी त्याला गिळून टाकते. जो चंचल मनाच्या सांगण्याप्रमाणे वागतो, तो प्रभू परमात्म्यास हरवून बसतो. जो गुरूची कृपा प्राप्त करतो त्याला परमेश्वराची प्राप्ती होते. ज्याला सतगुरु भेटला त्याचा अज्ञान, अंधकार नष्ट होतो. नानक सांगतात, अहंकाराचा त्याग केल्याने जीव सत्यरूप परमेश्वराशी एकरूप होतो. ॥ १५ ॥

सुंन निरंतरि दीजै बंधु ॥ उडै न हंसा पड़ै न कंधु ॥
सहज गुफा घरु जाणै साचा ॥ नानक साचे भावै साचा ॥ १६ ॥(श्री गु. ग्रं. सा.९३९)

शब्दार्थ : **सुंन** – शून्य समाधी, निर्विकल्प समधी. **निरंतरि** – सदैव. **दीजै** – द्या. **उडै** – भरकटतो, मृत्यू पावतो. **हंसा** – प्राणरूपी हंस. **कंधु** – शरीर. **गुफा** – गुंफा. **घरु** – घर, मूळ स्वरूप.

भावार्थ : साधक जर मनास निर्विकल्प समाधीत निरंतर बांधून ठेवू शकला, तर जीवरूपी हंस उडून जात नाही, मरण येत नाही. जीव सहजावस्थेप्रत पोहोचल्यावर आपल्या हृदयरूपी गुंफेत परमेश्वर स्थित आहे हे सत्य समजते. नानक सांगतात, असा साधक सत्यस्वरूप परमात्म्याच्या स्वरूपाशी एकरूप होतो. ॥१६॥

किसु कारणि ग्रिहु तजिओ उदासी ॥ किसु कारणि इहु भेखु निवासी ॥
किसु वखर के तुम वणजारे ॥ किउ करि साथु लंघावहु पारे ॥ १७ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३९)

शब्दार्थ : **किसु** – कोणत्या. **ग्रिह** – गृह, घर. **तजिओ** – त्यागले. **भेखु** – वेश. **निवासी** – धारण केला. **वखर** – माल, वस्तू. **वणजारे** – व्यापारी. **किउ करि** – काय म्हणून, कशासाठी. **साथु** – बरोबरचे लोक, साथी. **लंघावहु पारे** – पार करून नेणारे.

भावार्थ : योगी विचारतात, हे विरक्त पुरुषा ! तू कोणत्या कारणाने आपल्या घरादाराचा त्याग केलास? कशाकरिता वैराग्याचा वेश परिधान केलास ? तू कोणत्या वाणाचा व्यापार करतोस ? तुझ्या बरोबरच्या लोकांना तू कशाप्रकारे हा संसारसागर पार करून नेणार आहेस ? ॥ १७ ॥

गुरमुखि खोजत भए उदासी ॥ दरसन कै ताई भेख निवासी ॥
साच वखर के हम वणजारे ॥ नानक गुरमुखि उतरसि पारे ॥ १८ ॥
(श्री गु. ग्रं. सा.९३९)

शब्दार्थ : **गुरमुखि** – गुरुमार्गी. **खोजत** – शोधत. **भए** – झाले. **उदासी** – विरक्त. **कै** – करण्यासाठी. **दरसन** – दर्शन. **ताई** – त्याचे. **साच** – सत्य.

भावार्थ : नानक सांगतात, गुरुमार्गी झालेल्या व्यक्तीच्या शोधात मी विरक्त झालो व त्याच्याच दर्शनासाठी हा वेश मी धारण केला आहे. मी 'सत्य' ह्या वाणाचा व्यापार करतो. गुरुमार्गी झालेली व्यक्ती आपोआप प्रभुनामाच्या साहाय्याने हा भवसागर तरून जातो. ॥ १८ ॥

कितु बिधि पुरखा जनमु वटाइआ ॥ काहे कउ तुझु इहु मनु लाइआ ॥
कितु बिधि आसा मनसा खाई ॥ कितु बिधि जोति निरंतरि पाई ॥
बिनु दंता किउ खाइऐ सारु ॥ नानक साचा करहु बीचारु ॥ १९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९३९)

शब्दार्थ : **कितु** – कोणत्या. **बिधि** – मार्गाने, प्रकाराने. **वटाइआ** – बदललेस. **काहे कउ** – कशाकरिता व कशारीतीने. **लाइआ** – स्थिर केलेस. **आसा** – आशा. **खाई** – नष्ट केली. **सारु** – लोखंड.

भावार्थ : योगी विचारतात, हे श्रेष्ठ पुरुषा ! तू तुझे आयुष्य, तुझे जीवन कोणत्या मार्गाने, कशा प्रकारे बदललेस ? तू तुझे मन कसे स्थिर केलेस ? तू तुझे मन प्रभुभक्तीकडे कसे वळवलेस ? तुझ्या मनातील आशा–आकांक्षा, विषयविकारांची तृष्णा कशी नष्ट केलीस ? त्यांच्यावर कसा विजय प्राप्त केलास ? त्या निरंतर प्रकाशत राहणाऱ्या प्रभू परमात्मारूपी ज्योतीस तू कसे प्राप्त केलेस ? दाताशिवाय हे लोखंडाचे चणे तू कसे भक्षण केलेस ? ह्या बद्दलचे तुझे खरे खरे विचार तू आम्हाला सांग. ॥ १९ ॥

सतिगुर कै जनमे गवनु मिटाइआ ॥ अनहति राते इहु मनु लाइआ ॥
मनसा आसा सबदि जलाई ॥ गुरमुखि जोति निरंतर पाई ॥
त्रै गुण मेटे खाइऐ सारु ॥ नानक तारे तारणहारु ॥ २० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४०)

शब्दार्थ : **सतिगुरु कै जनमे** – गुरुशरणद्वारा. **गवनु** – जन्ममरण. **मिटाइआ** – मिटवलेस. **राते** – रममाण होणे, रंगून जाणे. **मनसा** – मनाची. **आसा** – आशा. **सबदि** – प्रभुनाम. **जलाई** – जाळून टाकले. **त्रैगुण** – सत्त्व, रज, तम हे तीन गुण. **मेटे** – मिटवले, नष्ट केले. **सारु** – लोखंड.

भावार्थ : मला सतगुरू भेटल्यामुळे मी जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त झालो. माझे मन त्या अनाहत नादाशी एकरूप झाले. प्रभू परमात्म्याच्या नामामुळे माझ्या मनातील सर्व विकार नष्ट झाले आहेत. गुरुकृपेने मला प्रभुपरमात्म्याची ज्योत प्राप्त झाली. तीनही (सत्त्व, रज, तम) गुणांच्या अतीत गेल्याने मी भवतापरूपी लोखंडाचे चणे पचवून टाकले. नानक सांगतात, तो तारणहार प्रभू परमात्माच तुम्हास ह्या भवसागरातून तारून नेतो. ॥२०॥

आदि कउ कवनु बीचारु कथीअले सुंन कहा घर वासो ॥
गिआन की मुद्रा कवन कथिअले घटि घटि कवन निवासो ॥
काल का ठीगा किउ जलाईअले किउ निरभउ घरि जाइऐ ॥
सहज संतोख का आसणु जाणै किउ छेदे बैराइऐ ॥
गुर कै सबदि हउमै बिखु मारै ता निज घरि होवै वासो ॥
जिनि रचि रचिआ तिसु सबदि पछाणै नानकु ता का दासो ॥ २१ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९४०)

शब्दार्थ : **आदि** – सृष्टी निर्माण होण्यापूर्वी. **कथीअले** – सांग. **सुंन** – प्रभू परमात्मा. **गिआन** – ज्ञान. **ठीगा** – दंडा. **आसणु** – आसन. **बैराईआ** – वैरी, पंचविकाररूपी शत्रू. **छेदे** – नाश करतो, तोडून टाकतो. **विखु** – विष. **पछाणै** – ओळखतो. **मुद्रा** – योगात पाच मुद्रा सांगितल्या आहेत, त्या अशा खेचरी, भूचार, चेवार, गोचरी, उन्मनी.

भावार्थ : योगी विचारतात – ही सृष्टी वगैरे होण्यापूर्वी कोण होते ? सांगा बरे त्यावेळी तो प्रभू परमात्मा कोठे राहत होता ? ज्ञान प्राप्तीची मुद्रा कोणती ते सांगा ? प्रत्येक जीवांचे ठायी कोण निवास करतो ? काळाचा, मृत्यूचा दंडा कसा टाळता येईल ? निर्भय पद कसे प्राप्त करता येईल ? सहज संतोषाची बैठक कशी प्राप्त करता येईल ? ते पंचविकार (काम, क्रोध, मोह, मद, मत्सर) कसे नष्ट करता येतील ?

नानक ह्या सर्व प्रश्नाचे एकच उत्तर देतात – जो साधक गुरूकडून प्राप्त झालेल्या नामाच्या साहाय्याने आपल्या अंत:करणातील अहंकाराचे विष नष्ट करतो, तो आपल्या मूळ स्वरूपास प्राप्त करतो. ज्याने नामाच्या साहाय्याने त्या सृष्टीच्या रचनाकारास जाणले त्याचा नानक दास आहे. ॥ २१ ॥

कहा ते आवै कहा इहु जावै कहा इहु रहै समाई ॥
एसु सबद कउ जो अरथावै तिसु गुर तिलु न तमाई ॥

किउ ततै अविगतै पावै गुरमुखि लगै पिआरो ॥
आपे सुरता आपे करता कहु नानक बीचारो ॥
हुकमे आवै हुकमे जावै हुकमे रहै समाई ॥
पूरे गुर ते साचु कमावै गति मति सबदे पाई ॥२२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४०)

शब्दार्थ : **कहा** – कोठून. **इहु** – हा जीव. **इसु** – ह्या. **अरथावै** – अर्थ सांगेल. **तिळु** – तिळ. **तमाई** – लालसा. **ततै** – त्या. **अविगतै** – अव्यक्त. **पावै** – प्राप्त करतो. **पिआरो** – प्रेम. **सुरता** – श्रोता. **करता** – कर्ता.

भावार्थ : योगी विचारतात – हा जीव कोठून येतो ? कोठे जातो ? कशात सामावून राहतो ? ह्या प्रश्नाचे जो योग्य उत्तर देईल त्यालाच आम्ही गुरू समजू, त्यात तिळमात्र लालसा, लोभ नाही,

त्या अव्यक्त परमेश्वरास कसे प्राप्त करता येईल ? काय केले असता, सतगुरूचे प्रेम प्राप्त करता येईल ? तो प्रभू परमात्मा स्वत:च श्रोता, स्वत:च कर्ता आहे असे म्हणतात. त्याचा अर्थ, हे नानक तुम्ही विचार करून सांगा. नानक म्हणतात, हा जीव प्रभू परमात्म्याचा आज्ञेने ह्या जगात येतो, त्याच्याच आज्ञेने ह्या जगातून जातो व अंति त्या प्रभू परमात्म्याच्या गतिविधीचे ज्ञान प्राप्त होते. ॥ २२ ॥

आदि कउ बिसमादु बिचारु काथिअले सुंन निरंतरि वासु लीआ ॥
अकलपत मुद्रा गुर गिआनु बिचारीअले घटि घटि साचा सरब जीआ ॥
गुर बचनी अविगति मसाईऐ ततु निरंजन सहजि लहै ॥
नानक दूजी कार न करणी सेवै सिखु सु खोजि लहै ॥
हुकमु बिसमादु हुकमि पछाणै जीअ जुगति सचु जाणै सोई ॥
आपु मेटि निरामलु होवै अंतरि साचु जोगी कहीऐ सोई ॥ २३ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९४०)

शब्दार्थ : **बिसमादु** – विस्मयकारक. **वासु** – वसत होता. **अकलपत** – असली. **बिचारीअले** – विचार. **अविगति** – अव्यक्त. **लहै** – प्राप्त करतो. **ततु** – तत्त्व. **दुजी** – दुसरा. **कार** – कार्य. **सु** – तो. **हुकमु** – आज्ञा. **हुकमी** – आज्ञा करणारा. **जीअ** – जीवन. **जुगति** – युक्ती. **आपु** – अहंकार. **मेटि** – नष्ट केला. **निरालमु** – निरालंब, विरक्त.

भावार्थ : हे योगीजनहो, सृष्टीची रचना होण्यापूर्वीची स्थिती तर अत्यंत विस्मयकारक होती. त्या वेळी तो शून्यस्वरूप, इच्छारहित प्रभू परमात्मा शून्यातच वास करत होता. त्या वेळेच्या त्याच्या स्वरूपाची कल्पनाही करता येत नाही. प्रत्येक जीवाच्या ठायी सत्यस्वरूपात वसणारा प्रभू परमात्मा गुरुरूपी ज्ञानाच्या स्वरूपात ओळखला जात होता. सतगुरूच्या उपदेशानेच त्या अव्यक्त प्रभू परमात्म्याशी एकरूप झाल्यानेच तो निरंजन प्रभू परमात्मा प्राप्त होतो. नानक सांगतात, त्याला जाणण्यासाठी अन्य कोणतेही कर्मकांड करण्याची आवश्यकता नाही. त्याचा सच्चा सेवक नामस्मरणाच्या आधारे त्यास प्राप्त करतो. त्याची इच्छा, आज्ञा अनाकलनीय आहे. जो ती ओळखतो तोच त्याच्या आज्ञेप्रमाणे वागून जीवन जगण्याची युक्ती प्राप्त करतो व प्रभू परमात्म्याचे सत्यस्वरूप जाणतो. जो

तोच त्याच्या आज्ञेप्रमाणे वागून जीवन जगण्याची युक्ती प्राप्त करतो व प्रभू परमात्म्याचे सत्यस्वरूप जाणतो. जो जीव अहंभावातून मुक्त होऊन संसारापासून विरक्त झाला व ज्याच्या अंतरात सत्यरूप परमात्म्याचा वास आहे तोच खरा योगी. ॥ २३ ॥

अविगतो निरमाइलु उपजे निरगुण ते सरगुणु थीआ ॥
सतिगुर परचै परम पदु पाईऐ साचै सबदि समाइ लीआ ॥
एके कउ सचु एका जाणै हउमै दूजा दूरी किआ ॥
सो जोगी गुर सबदु पछाणै अंतरि कमलु प्रगासु थीआ ॥
जिवतु मरै ता सभु किछु सुझै अंतरि जाणै सरब दइआ ॥
नानक ता कउ मिलै वडाई आपु पछाणै सरब जीआ ॥ २४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४०)

शब्दार्थ : **अविगतो** – अव्यक्त. **निरमाइलु** – निर्मळ. **निरगुण** – निर्गुण. **सरगुण** – सगुण. **थीआ** – झाले. **परचै** – ओळखणे. **एके** – एकमेव परमात्मा. **हउमै** – अहंकार. **पछाणै** – ओळखणे. **प्रगासु** – प्रकाशतो. **ता** – तेव्हा. **दइआ** – दया. **ता कउ** – त्याला. **मिलै** – मिळते, प्राप्त होते. **वडाइ** – महानता.

भावार्थ : त्या अव्यक्त प्रभू परमात्म्यापासून निर्मलता उत्पन्न झाली. निर्गुणापासून सगुणरूप उत्पन्न झाले. ज्या जीवास सतगुरूकडून प्रभू परमात्म्याचा बोध प्राप्त झाला तो जीव परमपद प्राप्त करतो व तो सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या नामात तल्लीन होऊन जातो. असा साधक आपला अहंकार व द्वैतभाव नष्ट करून त्या एकमेव प्रभू परमात्म्यास निराकार स्वरूपात जाणतो. असा योगी शब्दगुरूस ओळखतो. त्याचे हृदयकमल प्रभुतेजाने प्रकाशित होते. जो साधक व्यावहारिकदृष्ट्या जिवंत असतो पण मोहमायेतून, विषयविकारांपासून मुक्त असतो, त्याला सर्व ज्ञान प्राप्त होते. त्याच्या हृदयात सर्व जीवांबद्दल दयाभाव जागृत असतो. नानक सांगतात, जो सर्व जीवांमध्ये प्रभूला पाहतो तोच श्रेष्ठ पुरुष गणला जातो. ॥ २४ ॥

साचौ उपजै साचि समावै साचे सूचे एक मइआ ॥
झूठे आवहि ठवर न पावहि दूजै आवा गउणु भइआ ॥
आवा गउणु मिटै गुर सबदी आपे परखै बखसि लइआ ॥
एका बेदन दुजै बिआपी नामु रसाइणु वीसरिआ ॥
सो बूझै जिसु आपि बुझाए गुर कै सबदि सु मुकतु भइआ ॥
नानक, तारे तारणहारा हउमै दुजा परहरिआ ॥ २५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४०)

शब्दार्थ : **साचौ** – सत्यापासून, परमेश्वरापासून. **साचि** – सत्यात, परमेश्वरात. **समावै** – सामावून जाणे. **साचे** – सत्य. **सूचे** – शुद्धता, पवित्रता, निर्मलता. **झूठे** – खोटे. **आवहि** – (ह्या संसारात) येतात. **ठवर** – स्थान. **दूजै** – दूजा भाव, द्वैतभाव. **परखै** – पारखतो. **बखसि लइआ** – कृपा करतो. **बेदन** – वेदना. **बिआपी** – व्यापते, प्रभावित करते. **बूझै** – जाणतो, समजतो. **सो** – तो. **जिसु** – ज्याला. **आपि** – स्वत: परमेश्वर. **बुझाए** – समजावतो, जाणीव करून देतो.

भावार्थ : असा गुरुमुख झालेला साधक त्या सत्यरूप परमसत्यापासून उत्पन्न होऊन, सत्यातच सामावून जातो व सत्याशी पवित्रतेशी एकरूप होऊन जातो. इतर खोटी माणसे ह्या जगात येतात. पण द्वैतात बद्ध झाल्याने स्थिर होऊ शकत नाहीत व जन्ममरणाच्या चक्रात अडकून पडतात. गुरूच्या उपदेशाने ह्या जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होते. अशांची स्वयं परमात्मा पारख करतो व त्यांना क्षमा करतो. जेव्हा सर्व दु:खहरण करणाऱ्या प्रभुनामरूपी औषधाचा विसर पडतो, तेव्हा द्वैतभावाच्या प्रभावाने व्यक्तीस दु:ख व पीडा प्राप्त होते. पण हे ज्ञान त्यालाच प्राप्त होते, ज्याला तो प्रभू परमात्मा स्वयं तशी बुद्धी देतो, अशी व्यक्ती गुरूच्या उपदेशाने मुक्त होते. नानक सांगतात, अशा व्यक्तीस तो तारणहार प्रभू परमात्मा ह्या भवसागरातून तारून नेतो व त्याच्या मनातील द्वैतभाव, अहंकार नष्ट करतो. ॥ २५ ॥

मनमुखि भूलै जम की काणि ॥ पर घरु जोहै हाणे हाणि ॥
मनमुखि भरमि भवै बेबाणी ॥ वेमारगि मूसै मंत्रि मसाणि ॥
सबदु न चीनै लवै कुबाणि ॥ नानक साचि रते सुखु जाणि ॥ २६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **मनमुखि** – स्वेच्छाचारी. **भुलै** – भुलतो. **जम** – यम. **काणि** – शिकार, मोहाजालात फसतो. **पर घरु** – दुसऱ्याचे धन. **हाणे हाणि** – नुकसानच नुकसान. **भरमि** – भ्रमाने भटकतो. **भवै** – भटकतो. **बेबाणी** – उजाड जागा. **विमारगि** – कुमार्गी. **मूसै** – जातो. **मसाणि** – स्मशान. **चीनै** – ओळखणे. **कुबाणि** – वाईट वाणी. **साचि रते** – सत्यात रंगला.

भावार्थ : जो मनाच्या सांगण्याप्रमाणे भरकटत जातो, तो ह्या संसारचक्रात अडकून पडतो. त्याची नजर दुसऱ्याच्या धनदौलतीवर व परस्त्रीवर असते. त्यामुळे त्याचे नुकसानच नुकसान होते. त्याचे अध:पतन होते. मनाच्या सांगण्याप्रमाणे भरकटत जाऊन तो जादूटोण्याच्या मागे लागतो. कुमार्गाला लागून स्मशानात जाऊन जारण-मारणाच्या मंत्रांचा जप करतो. त्याला परमेश्वराचे नाव आवडत नाही. त्याच्या मुखातून नेहमी अपशब्दच बाहेर पडतात. नानक सांगतात जो सत्यात रंगला तो सुखी झाला. ॥ २६ ॥

गुरमुखि साचे का भउ पावै ॥ गुरमुखि बाणी अघडु घड़ावै ॥
गुरमुखि निरमल हरि गुण गावै ॥ गुरमुखि पवित्रु परम पदु पावै ॥
गुरमुखि रोमि रोमि हरि धिआवै ॥ नानक गुरमुखि साचि समावै ॥ २७ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **गुरमुखि** – गुरूच्या उपदेशाप्रमाणे वागणारा. **साचे** – परमात्मा. **बाणी** – वाणी. **भउ** – भय. **पावै** – प्राप्त होते. **अघडु** – अघटित. **घडावै** – घडवतो, साध्य होते. **निरमल** – निर्मळ. **पवित्रु** – पवित्र. **रोमि रोमि** – रोमरोमात. **धिआवै** – ध्यान करतो. **समावै** – सामावून जातो.

भावार्थ : जो साधक गुरूच्या उपदेशाप्रमाणे वागतो त्याच्या मनात प्रभू परमात्म्याबद्दल आदरयुक्त भीती असते. त्यामुळे त्याच्या हातून वाईट कर्म घडत नाही. गुरुमुखी झालेला साधक गुरूच्या उपदेशाने मनाची असाध्य अशी चंचल अवस्था नष्ट करून मनास ताब्यात ठेवतो. गुरुमुखी झालेला साधक निर्मळ प्रभू परमात्म्याचे गुणगान

गातो. जो गुरुमुखी झाला तो साधक परमपद–मोक्ष प्राप्त करतो. तो सर्व अंगप्रत्यंगाने प्रभू परमात्म्याचे ध्यान करतो. नानक सांगतात, गुरुमुखी साधक अखेर प्रभू परमात्म्याशी एकरूप होतो. ॥ २७ ॥

गुरमुखि परचै बेद बीचारी ॥ गुरमुखि परचै तरीऐ तारी ॥
गुरमुखि परचै सु सबदि गिआनी ॥ गुरमुखै परचै अंतर बिधि जानी ॥
गुरमुखि पाईऐ अलख अपारु ॥ नानक गुरमुखि मुकति दुआरु ॥ २८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **परचै** – परिचय. **बेद** – वेद. **बीचारि** – विचार करून. **तरीऐ** – तरून जातो. **तारी** – भवसागर. **सु** – तो. **अंतर बिधि** – शरीर व मनाच्या आतील घडामोडी. **पाईऐ** – प्राप्त करतो. **अलख** – अलक्ष्य. **अपारु** – अपार. **मुकति** – मुक्ती. **दुआरु** – द्वार, दार.

भावार्थ : ग्रंथांचा अभ्यास करून जे ज्ञान साधकास प्राप्त होते तेच ज्ञान सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागणाऱ्या साधकास प्राप्त होते. सतगुरूच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागणारा भवसागर तरून जातो. सतगुरूच्या शब्दाप्रमाणे वागणाऱ्यास प्रभू परमात्म्याच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान होते. सतगुरूच्या आदेशाप्रमाणे वागणाऱ्या साधकास शरीराच्या अंतरंगातील सर्व गतिविधींचे ज्ञान होते. गुरुपदेशाप्रमाणे वागणाऱ्यास मोक्षाचे दार उघडले जाते. गुरुमुखी होणे हाच मुक्तीचा मार्ग आहे. ॥ २८ ॥

गुरमुखि अकथु कथै बीचारि ॥ गुरमुखि निबहै सपरवारि ॥
गुरमुखि जपीऐ अंतरि पिआरि ॥ गुरमुखि पाईऐ सबदि अचारि ॥
सबदि भेदि जाणै जाणाई ॥ नानक हउमै जालि समाई ॥ २९ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **अकथु** – ज्याचे वर्णन करता येत नाही असे, अकथनीय. **कथै** – सांगतो. **बीचारि** – विचार. **निबहै** – निर्वाह. **सपरवारि** – परिवारासह. **जपीऐ** – जप करतो. **अंतरि** – अंत:करण. **पिआरि** – प्रेम. **पाईऐ** – प्राप्त होते. **सबदि** – प्रभुनाम. **अचारि** – आचरण. **जाणै** – जाणतो. **जाणाई** – दुसऱ्यास समजावून सांगतो. **हउमै** – अहंकार. **जालि** – जाळतो. **समाई** – प्रभू परमात्म्यात सामावून जातो.

भावार्थ : जो साधक सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागतो तो आपल्या विवेकविचाराने शब्दांच्या पलीकडे असलेल्या प्रभू परमात्म्याचे वर्णन करू शकतो. असा गुरुमुखी साधक प्रपंचात राहूनही परमार्थ साधू शकतो. साधकाने गुरुमुखी होऊन हृदयात प्रेम धारण करून प्रभू परमात्म्याचे स्मरण करावे कारण सतगुरूच्या मार्गदर्शनानेच प्रभुनामाची प्राप्ती होते व साधकाचे आचरण योग्य मार्गाने होते. प्रभुनामाचे द्वाराच तो साधक प्रभू परमात्म्याचे सत्यस्वरूप जाणू शकतो व इतरांनाही ते समजावून देण्याची पात्रता त्यास प्राप्त होते. नानक सांगतात, असा साधक आपला अहंभाव जाळून टाकून प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. ॥ २९ ॥

गुरमुखि धरती साचै साजी ॥ तिस महि ओपति खपति सु बाजी ॥
गुर कै सबदि रपै रंगु लाइ ॥ साचि रतउ पति सिउ घरि जाइ ॥

साच सबद बिनु पति नही पावै ॥ नानक बिनु नावै किउ साचि समावै ॥ ३० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **धरती** – पृथ्वी, जग. **साचै** – प्रभू परमात्म्याने. **साजी** – निर्माण केली. **ओपति** – उत्पत्ती. **खपति** – विनाश. **सु** – तो. **बाजी** – खेळ. **रपै** – रंगून जातो. **रतउ** – रंगून गेला. **पति** – पत, प्रतिष्ठा. **सिउ** – त्याच्या. **साच** – सत्य. **सबद** – नाम. **बिनु** – विना, शिवाय. **किउ** – कसे.

भावार्थ : त्या प्रभू परमात्म्याने गुरुपदेशाप्रमाणे वागण्यासाठी ही धरती निर्माण केली आहे. त्यात तो जीवांना जन्माला घालतो व त्यांना मारूनही टाकतो. जन्म–मरण ही सारी त्या प्रभू परमात्म्याचीच क्रीडा आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागणारा साधक प्रभुनामात रंगून जातो. सत्यरूप प्रभू परमात्म्यात रंगून गेल्यामुळे असा साधक सन्मानपूर्वक परमेश्वराच्या घरी प्रवेश करतो. कोणताही जीव प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणाखेरीज असा सन्मान प्राप्त करू शकत नाही. म्हणून नानक सांगतात, प्रभूच्या नामस्मरणाशिवाय प्रभू परमात्म्याची प्राप्ती अशक्य आहे. ॥ ३० ॥

गुरमुखि असट सिधी सभि बुधी ॥ गुरमुखि भवजलु तरीऐ सच सुधी ॥
गुरमुखि सर अपसर बिधि जाणे ॥ गुरमुखि परविरति नरविरति पछाणै ॥
गुरमुखि तारे पारि उतारे ॥ नानक गुरमुखि सबदि निसतारे ॥ ३१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **असट** – अष्ट, आठ. **सभि** – सर्व. **बुधी** – ज्ञान. **भवजलु** – भवसागर. **तरीऐ** – तरून जातो. **सच सुधी** – सत्य ज्ञान. **सर** – सत्य, चांगले. **अपसर** – खोटे, वाईट. **परविरति** – प्रवृत्ती. **नरविरति** – निवृत्ती. **पछाणै** – ओळखतो, जाणतो. **निसतारे** – मुक्त करतो.

भावार्थ – जो साधक सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो, त्यास अष्टसिद्धी प्राप्त होतात व सर्वप्रकारे सत्याची जाण होते. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्यास परमेश्वराच्या सत्यस्वरूपाचे ज्ञान होते व त्यामुळे तो भवसागर पार करून जातो. गुरुमुखी झालेल्या साधकास चांगले काय, वाईट काय, योग्य काय, अयोग्य काय व कोणत्या परिस्थितीत कसे वागावे हे कळते. गुरुमुखी झाल्याने त्या साधकास प्रवृत्ती म्हणजे काय व निवृत्ती म्हणजे काय, काय ग्रहण करावे, काय टाकून द्यावे याचे ज्ञान होते. असा गुरुमुखी झालेला साधक स्वत: तर भवसागर तरून जातोच पण इतरांनाही भवसागर तरून जाण्यास साहाय्य करतो. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागणाऱ्यास प्रभुनामामुळेच हे सारे शक्य होते. ॥ ३१ ॥

नामे राते हउमै जाइ ॥ नामि रते सचि रहे समाइ ॥
नामि रते जोग जुगति बिचारु ॥ नामि रते पावहि मोख दुआरु ॥
नामि रते त्रिभवण सोझी होइ ॥ नानक नामि रते सदा सुखु होइ ॥ ३२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **नामे** – प्रभुनामात. **राते** – रंगल्याने. **हउमै** – अहंकार. **सचि** – सत्यरूप परमेश्वर. **राहे** – राहतो. **समाइ** – सामावून जाणे, एकरूप होणे. **जोग** – योग. **जुगति** – युक्ती. **बिचारु** – विचार. **पावहि** – प्राप्त होणे. **त्रिभवण** – त्रिभुवन. **सोझी** – समज, ज्ञान. **सुखु** – सुख.

भावार्थ : जो साधक हरिनामाच्या रंगात रंगून जातो त्याचा अहंकार गळून पडतो, अहंभाव नष्ट होतो. प्रभुनामात रंगून गेल्याने साधक सत्यरूप परमात्म्याशी तादात्म पावतो. नामात रंगून गेल्याने योगाद्वारे प्राप्त होणाऱ्या सर्व गोष्टी, सर्व ज्ञान साधकास प्राप्त होते. हरिनामात तल्लीन झालेल्या साधकास मोक्षाचे दार उघडते. प्रभुनामात मग्न झालेल्या साधकास स्वर्ग, पाताळ, पृथ्वी ह्या त्रैलोक्याचे ज्ञान प्राप्त होते. नानक सांगतात, हरिनामात रंगून गेलेल्या साधकास सर्व सुखे प्राप्त होतात. ॥ ३२ ॥

नामि रते सिध गोसटि होइ ॥ नामि रते सदा तपु होइ ॥
नामि रते सचु करणी सारु ॥ नामि रते गुण गिआन बीचारु ॥
बिनु नावै बोलै सभु वेकारु ॥ नानक नामि रते तिन कउ जैकारु ॥ ३३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **सिध** – सिद्ध. **गोसटि** – गोष्टी. **तपु** – तप. **सचु** – सत्य. **सारू** – श्रेष्ठ. **गुण** – सतगुण. **गिआन** – ज्ञान. **बीचारु** – विवेक विचार. **बिनु** – विना. **बोलै** – बोलणे. **सभु** – सर्व. **वेकारु** – व्यर्थ. **तिन** – त्याला. **जैकारु** – नमस्कार.

भावार्थ : जो साधक प्रभुनामात रममाण झाला त्याच्या सर्व गोष्टी सिद्धीस जातात, सफल होतात. नामात सदैव तल्लीन होणे म्हणजे सदैव तपाचरण केल्यासमान आहे. प्रभूनामात तल्लीन होणे हेच सत्याचरणाचे सार आहे. हरिनामात तल्लीन झाल्याने सर्व सतगुण, सर्व ज्ञान प्राप्त होते. प्रभुनामाशिवाय अन्य बोलणे ही निरर्थक बडबड आहे. नानक सांगतात, लोकहो ! जे नामात तल्लीन झाले अशा साधकांना माझा नमस्कार ॥ ३३ ॥

पूरे गुर ते नामु पाइआ जाइ ॥ जोग जुगति सचि रहै समाइ ॥
बारह महि जोगी भरमाए संनिआसी छिअ चारि ॥
गुर कै सबदि जो मरि जीवै सो पाए मोख दुआरु ॥
बिनु सबदै सभि दूजै लागे देखहु रिदे बीचारि ॥
नानक वडे से वडभागी जिनी सचु रखिआ उरधारि ॥ ३४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४१)

शब्दार्थ : **पूरे** – पूर्ण. **जोग** – योग. **जुगति** – युक्ती. **बारह** – बारा. **महि** – मध्ये. **भरमाए** – भ्रमण करतात, फिरत राहतात. **संनिआसी** – संन्यासी. **छिअ** – सहा. **मरि** – मरून. **जीवै** – जगतो. **सो** – तो. **पाए** – प्राप्त करतो. **मोख** – मोक्ष. **दुआरु** – द्वार. **दूजै** – द्वैतभाव. **देखहु** – पाहा. **वडे** – मोठा. **वडभागी** – महाभाग्यवान. **जिनी** – ज्याने. **सचु** – सत्यरूप परमेश्वर. **रिदै** – हृदयात. **बीचारि** – विचार. **उर** – हृदय. **धारि** – धारण करतो.

भावार्थ : पूर्ण गुरूकडून प्रभुनामाचे रहस्य प्राप्त होते. प्रभू परमात्म्याच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान होते. सत्यरूप प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जाणे हाच खरा योग आहे. योग्यांचे बारा संप्रदाय, संन्याशांचे दहा संप्रदाय आपल्या पद्धतीने प्रभू परमात्म्यास प्राप्त करण्यासाठी भटकत असतात. पण खरी गोष्ट अशी आहे, की जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागून, संसारात राहूनही त्यापासून अलिप्त राहतो, तोच मोक्षाच्या द्वारात जाउन पोहोचतो. हे योगीजन हो ! ह्या गोष्टींचा आपल्या हृदयात विचार करून पाहा. प्रभुनामास पारखे झालेले जीव द्वैतभावात अडकून पडतात. नानक सांगतात, ज्यांनी आपल्या हृदयात प्रभू परमात्म्याचे नाम दृढपणे धारण केले आहे. तेच खरे भाग्यवान होत. ॥ ३४ ॥

गुरमुखि रतनु लहै लिव लाइ ॥ गुरमुखि परखै रतनू सुभाइ ॥
गुरमुखि साची कार कमाइ ॥ गुरमुखि साचे मनु पतीआइ ॥
गुरमुखि अलखु लखाए तिसु भावै ॥ नानक गुरमुखि चोट न खावै ॥ ३५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **रतनु** – रत्न. **लहै** – प्राप्त करतो. **लिव लाइ** – मन एकाग्र करणे. **परखै** – पारख करतो. **सुभाइ** – स्वाभाविकपणे. **साची** – खरी, सत्याची. **कार** – कर्म. **कमाइ** – कमाई. **मनु** – मन. **पतीआइ** – समाधान, तृप्त. **अलखु** – अलक्ष, डोळ्यांना न दिसणारा. **लखाए** – दिसतो. **तिसु** – त्याला. **भावै** – आवडतो. **चोट** – संकट, अडथळे.

भावार्थ : गुरूच्या उपदेशाप्रमाणे वागणारा आपले मन प्रभुनामात एकाग्र करतो. त्यामुळे त्यास प्रभुनामरूपी रत्न प्राप्त होते. गुरुमुखी झालेल्या साधकास नामरत्नाची सहज प्राप्ती होते. गुरुमुखी साधक सदैव सत्याचरण करतो व त्याचे मन सत्यरूप प्रभू परमात्म्याचे चिंतन करून संतोष प्राप्त करते. जेव्हा गुरुमुखी साधक प्रभू परमात्म्यास आवडू लागतो, तेव्हा तो अदृश्य प्रभू परमात्मा त्या साधकास आपले सत्यस्वरूप दाखवतो. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा कधीही यमपाशाच्या संकटात सापडत नाही. ॥ ३५ ॥

गुरमुखि नामु दानु इसनानु ॥ गुरमुखि लागै सहज धिआनु ॥
गुरमुखि पावै दरगह मानु ॥ गुरमुखि भउ भंजनु परधानु ॥
गुरमुखि करणी कार कराए ॥ नानक गुरमुखि मेलि मिलाए ॥ ३६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **नामु** – प्रभुनाम. **दानु** – दान. **इसनानु** – स्नान. **लागै** – लागते. **धिआनु** – ध्यान. **पावै** – प्राप्त करतो. **दरगह** – परमेश्वराचा दरबार. **भउ** – भय. **भंजनु** – भंजन, तोडणे. **परधानु** – प्रधान, प्रमुख. **करणी कार** – कार्य. **कराए** – करवून घेतो. **मेलि** – मिळतो. **मिलाए** – एकरूप होतो, मिळून जातो.

भावार्थ : गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्यास नामजपाचे, दानाचे, तीर्थस्नानाचे पुण्य प्राप्त होते. गुरुमुखी साधक सहजभावाने समाधीमग्न होतो. गुरुमुखी झालेल्या साधकास प्रभू दरबारात सन्मान प्राप्त होतो. गुरुमुखी साधक सर्व तऱ्हेच्या भयाचा नाश करून श्रेष्ठ पुरुष बनतो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्या

साधकाकडून प्रभू परमात्मा योग्य ते कार्य करून घेतो. नानक सांगतात, सतगुरूच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण करणाऱ्यास प्रभू परमात्मा प्राप्त होतो व अंति तो प्रभू परमात्याशी एकरूप होऊन जातो. ॥ ३६ ॥

गुरमुखि सासत्र सिम्रिति बेद ॥ गुरमुखि पावै घटि घटि भेद ॥
गुरमुखि वैर विरोध गवावै ॥ गुरमुखि सगली गणत मिटावै ॥
गुरमुखि राम नाम रंगि राता ॥ नानक गुरमुखि खसमु पछाता ॥ ३७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **सासत्र** – शास्त्र. **सिम्रिति** – स्मृती. **बेद** – वेद. **पावै** – प्राप्त करतो. **घटि घटि** – प्रत्येक माणसाचे अंत:करण. **भेद** – फरक. **गवावै** – घालवतो. **सगली** – सर्व, सगळी. **गणत** – गणना. **मिटावै** – नष्ट करतो. **रंगि** – रंगात. **खसमु** – परमेश्वर. **पछाता** – ओळखतो.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागणाऱ्या साधकास सर्व शास्त्र, स्मृती व वेदात सांगितलेले ज्ञान अवगत होते. प्रत्येक जीवाच्या अंत:करणातील भाव तो जाणू शकतो. तो अंतर्ज्ञानी होतो. गुरुमुखी झालेल्या साधकाचे अंत:करण वैर, विरोध आदी भावनांपासून मुक्त होते. तो कोणाशी वैर धरत नाही वा कोणास विरोध करत नाही. सतगुरूच्या सांगण्याप्रमाणे आचरण करणाऱ्या साधकाच्या मनात व्यावहारिक प्रपंचातील लाभहानीचा विचारही येत नाही. गुरुमुखी झालेला साधक रामनामाच्या रंगात रंगून जातो. नानक सांगतात, गुरुमुखी साधकास प्रभू परमात्म्याच्या सत्यरूपाचे ज्ञान होते. ॥ ३७ ॥

बिनु गुर भरमै आवै जाइ ॥ बिनु गुर घाल न पवई थाइ ॥
बिनु गुर मनूआ अति डोलाइ ॥ बिनु गुर त्रिपति नही बिखु खाइ ॥
बिनु गुर बिसीअरु डसै मरि वाट ॥ नानक गुर बिनु घाटे घाट ॥ ३८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **बिनु** – विना. **भरमै** – भ्रम. **आवै** – येतो, जन्मतो. **जाइ** – जातो, मरतो. **घाल** – श्रम. **थाइ** – स्थान. **पवई** – पडते. **मनूआ** – मन. **अति** – खूप, अतिशय. **डोलाइ** – डोलते, अस्थिर राहते. **त्रिपति** – तृप्त. **बिखु** – विष, विषयविकार. **खाइ** – उपभोग घेतो. **बिसीअरु** – साप, विषयविकाररूपी साप. **घाटे घाट** – तोटाच तोटा.

भावार्थ : ज्या जीवास सतगुरू भेटत नाही असा जीव जन्मभर मोहमायेच्या भ्रमात फिरत राहतो व जन्ममरणाच्या चक्रात अडकून पडतो. सतगुरू प्राप्तीशिवाय प्रभुप्राप्तीसाठी जीवाने केलेले श्रम वाया जातात. ते सफल होत नाहीत, त्याला परमेश्वर प्राप्त होत नाही. सतगुरूचे मार्गदर्शन नसल्याने मन नेहमी अस्थिर असते. सतगुरू प्राप्त न झालेला जीव विषयविकारात गुंतून सदैव अतृप्तच राहतो. सतगुरू प्राप्त न झालेल्या जीवास विषयविकाररूपी साप डसतो व त्यानेच तो मरून जातो. नानक सांगतात, सतगुरू प्राप्त न झाल्याने सर्व प्रकारे तोटाच तोटा होतो. ॥ ३८ ॥

जिसु गुरु मिलै तिसु पारि उतारै ॥ अवगण मेटै गुणि निसतारै ॥
मुकति महा सुख गुर सबदु बीचरि ॥ गुरमुखि कदे न आवै हारि ॥
तनु हटड़ी इहु मनु वणजारा ॥ नानक सहजे सचु वापारा ॥ ३९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **जिसु** – ज्याला. **मिले** – मिळाला, प्राप्त झाला. **तिसु** – तो, त्याला. **पारि** – पार, पलिकडे. **उतारै** – नेतो. **निसतारै** – उद्धार करतो. **मेटै** – नष्ट करतो. **मुकति** – मुक्ती. **गुर सबदु** – सतगुरूचा उपदेश. **बीचरि** – विचार. **कदे** – कधीही. **आवै** – येतो. **हारि** – पराभव. **हटडी** – बाजार. **इहु** – हे. **मनु** – मन. **वणजारा** – व्यापारी. **सहजे** – सहजपणे, स्वाभाविकपणे. **सचु** – सत्य. **वापारा** – व्यापार.

भावार्थ : ज्या साधकास सतगुरू प्राप्त झाला तो जीव सतगुरुकृपेने भवसागर पार करून जातो. त्याचे सर्व अवगुण नष्ट होतात व सतगुण प्राप्त होतात. त्या सतगुणाच्या जोरावर त्याचा उद्धार होतो. सतगुरूच्या उपदेशाचा विचार करून त्याप्रमाणे आचरण करणाऱ्यास महासुख व मुक्ती प्राप्त होते. जो साधक सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो त्याचा जीवनात कधीही पराभव होत नाही. तो सदैव यशस्वी होतो. नानक सांगतात, शरीर हा बाजार आहे, मन हा व्यापारी आहे. साधक ह्या बाजारात स्वाभाविकपणे सत्याचाच व्यापार करतो. ॥ ३९ ॥

गुरमुखि बांधिओ सेतु बिधातै ॥ लंका लूटी दैत संतापै ॥
रामचंदि मारिओ अहि रावणु ॥ भेदु बभीखण गुरमुखि परचाइणु ॥
गरुमुखि साइरि पाहण तारे ॥ गुरमुखि कोटि तेतीस उधारे ॥ ४० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **बांधिओ** – बांधला. **सेतु** – पूल. **बिधातै** – विधात्याने. **लंका** – देहरूपी लंका. **दैत** – कामादी विकाररूपी दैत्य. **संतापै** – संतापले. **रामचंदि** – रामचंद्र. **मारिओ** – मारले. **अहि रावणु** – अहंकाररूपी रावण. **बभीखण** – बिभीषण. **परचाइणु** – भेद, रहस्य. **साइरि** – सागर. **पाहण** – पाषण. **तारे** – तरंगले. **तेतीस** – तेहेतीस. **उधारे** – उद्धार केला.

भावार्थ : (ह्या पदात नानकदेवांनी रामायणातील लंकेवरील स्वारीच्या रूपकातून आध्यात्मिक मूल्यांचा उपदेश केला आहे.) गुरुपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्या साधकाने त्याचे प्रभुप्राप्तीचे लक्ष साध्य करता यावे म्हणून नामरूपी सेतू बांधला. त्याच नामरूपी सेतूच्या आधारे साधकाने मोहमायारूपी लंकेवर विजय प्राप्त केला व काम-क्रोध आदी विकाररूपी दैत्यांचा नाश केला. गुरुमुखी झालेल्या साधकरूपी रामचंद्राने अहंकाररूपी रावणाचा वध केला. गुरुमुखी बिभीषणाने प्रभू रामचंद्राशी मैत्री करून रावणाचा भेद सांगितला. गुरुमुखी झाल्याने दगडासारखा चैतन्यहीन साधक भवसागरावर तरंगू लागला. त्याला प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त झाले. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केलेल्या कोटी कोटी गुरुमुखी साधकांचा उद्धार झाला. ॥ ४० ॥

गुरुमुखि चूकै आवण जाणु ॥ गुरमुखि दरगह पावे माणु ॥
गुरमुखि खोटे खरे पछाणु ॥ गुरमुखि लागै सहज धिआनु ॥

गुरमुखि दरगह सिफति समाइ ॥ नानक गुरमुखि बंधु न पाई ॥ ४१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **चूकै** – चुकते. **आवण** – येणे, जन्म घेणे. **जाणु** – जाणे, मरण पावणे. **दरगह** – परमेश्वराचा दरबार. **पावै** – प्राप्त करतो. **माणु** – मान, सन्मान. **पछाणु** – जाणतो. **लागै** – लागते. **धिआनु** – ध्यान. **सिफति** – स्तुती. **समाइ** – सामावून जातो. **बंधु** – बंधने, अडचणी.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्या साधकाचे जन्ममरणाचे फेरे चुकतात. गुरुमुखी साधकास प्रभू परमात्म्याच्या दरबारात सन्मान प्राप्त होतो. गुरुमुखी साधक खरे काय व खोटे काय, शाश्वत काय व नश्वर काय हे ओळखतो. गुरुमुखी झालेल्या साधकाचे सहजावस्थेत ध्यान लागते. प्रभू परमात्म्याची स्तुती करता करता गुरुमुखी झालेला साधक परमात्म्याच्या रूपात एकरूप होऊन जातो. नानक सांगतात, गुरुमुखी झालेला साधक कोणत्याही बंधनात अडकत नाही. कोणतेही मायापाश त्याला बांधून ठेवू शकत नाहीत. कुठल्याही कार्यात त्याला अडचणी निर्माण होत नाहीत. ॥ ४१ ॥

गुरमुखि नामु निरंजन पाए ॥ गुरमुखि हउमै सबदि जलाए ॥
गुरमुखि साचे के गुण गाए ॥ गुरमुखि साचै रहे समाए ॥
गुरमुखि साचि नामि पति ऊतम होइ ॥
नानक गुरमुखि सगल भवण की सोझी होइ ॥ ४२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **नामु** – प्रभुनाम. **निरंजन** – मायारहित, मायातीत. **पाए** – प्राप्त करतो. **हउमै** – अहंकार. **सबदि** – नामाद्वारा, उपदेशाद्वारा, प्रभुनामाने. **जलाए** – जाळून टाकतो. **साचे** – सत्यरूप परमेश्वर. **रहै** – राहतो. **समाए** – सामावून. **पति** – पत प्रतिष्ठा. **ऊतमु** – उत्तम. **सगल** – सगळ्या. **भवण** – भुवन.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा साधक प्रभुनामाच्या साहाय्याने मायातीत प्रभू परमात्म्यास प्राप्त करतो. गुरुमुखी झालला साधक सतगुरूच्या उपदेशाने प्रभुनामाच्या साहाय्याने अहंकारास जाळून टाकतो. गुरुमुखी झालेला साधक सदैव प्रभू परमात्म्याचे गुणगान करतो. तो सत्यरूप प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. गुरुमुख झालेल्या साधकास प्रभुनामात रममाण झाल्यामुळे प्रतिष्ठा, सन्मान प्राप्त होतो. नानक सांगतात, गुरुमुखी झालेल्या साधकास सर्व त्रिभुवनाचे ज्ञान प्राप्त होते. ॥ ४२ ॥

कवण मूलु कवण मति वेला ॥ तेरा कवणु गुरू जिस का तू चेला ॥
कवण कथा ले रहहु निराले ॥ बोलै नानकु सुणहु तुम बाले ॥
एसु कथा का देइ बीचारु ॥ भवजलु, सबदि लंघावणहारु ॥ ४३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४२)

शब्दार्थ : **कवण** – कोणता. **मूलु** – मूळ, आरंभ. **मति** – शिक्षणज्ञान. **वेला** – वेळ. **तेरा** – तुझा. **कवणु** – कोण. **कथा** – कारण. **रहहु** – राहतोस. **निराले** – अलिप्त. **बोलै** – सांगतात. **सुणहु** – ऐका. **बाले** – बालका. **एसु** – ह्या. **देइ बीचारु** – उत्तर दे. **भवजलु** – संसारसागर, भवसागर. **सबदि** – गुरू उपदेश. **लंघावण हारू** – पार करण्याचे सामर्थ्य असलेला.

भावार्थ : सिद्ध योग्यांनी नानकांना परत प्रश्न केला ह्या जीवनाचा आरंभ कोठून झाला ? ज्ञानप्राप्तीसाठी कोणती वेळ योग्य आहे ? तुझा गुरू कोण ? तू कोणाचा शिष्य आहेस ? कोणत्या विचारांचा स्वीकार केल्यामुळे तू विरक्त होऊन राहातोस ? हे नानका बाळा ह्या सर्व प्रश्नांचा नीट विचार करून तू उत्तर दे. तू जे म्हणतोस की शब्दद्वारा, प्रभुनामाच्या साहाय्याने, संसारसागर पार करता येतो. त्याचाही अधिक खुलासा कर. ॥ ४३ ॥

पवन अरंभु सतिगुर मति वेला ॥ सबदु गुरू सुरति धुनि चेला ॥
अकथ कथा ले रहउ निराला ॥ नानक जुगि जुगि गुर गोपाला ॥
एकु सबदु जितु कथा वीचारी ॥ गुरमुखि हउमै अगनि निवारी ॥ ४४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **पवन** – प्राण. **अरंभु** – आरंभ, सुरुवात. **सतिगुर** – सतगुरु. **मति वेला** – ज्ञानप्राप्तीची वेळ. **सबदु** – शब्द, प्रभुनाम. **सुरति** – मन एकाग्र करणे. **धुनि** – ध्यान. **चेला** – शिष्य. **अकथ** – अवर्णनीय, शब्दात वर्णन करता येत नाही असा. **ले** – घेऊन. **रहउ** – राहतो. **निराला** – अलिप्त. **जुगि जुगि** – युगानुयुगे. **एकु** – एकमेव. **जितु** – ज्याचा. **हउमै** – अहंकार. **अगनि** – अग्नी. **निवारी** – नष्ट करणे.

भावार्थ : योग्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना श्रीगुरूनानक देव म्हणतात – जीवनाचा आरंभ प्राणापासून झाला आहे व मानवी जन्म ही सतगुरूकडून ज्ञान प्राप्त करण्याची योग्य वेळ आहे. सतगुरूकडून प्रभुनामाची प्राप्ती करून नामात चित्त एकाग्र करणे म्हणजे सतगुरूचा शिष्य होणे होय. मी त्या परमात्म्यास हृदयात धारण केल्यामुळे संसारात राहूनही संसारापासून अलिप्त आहे. नानक पुढे सांगतात, युगानुयुगे या पृथ्वीवरील चराचरांचे पालन करणारा प्रभू हाच माझा गुरू आहे. एकमात्र प्रभूनामाच्या साहाय्यानेच प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होते. गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्यानेच अहंकाराचा अग्नी नष्ट होतो. ॥ ४४ ॥

मैण के दंत किउ खाईऐ सारु ॥ जितु गरबु जाइ सु कवणु आहारु ॥
हिवै का घरु मंदरु अगनि पिराहनु ॥ कवन गुफा जितु रहै अवाहनु ॥
इत उत किस कउ जाणि समावै ॥ कवन धिआनु मनु मनहि समावै ॥ ४५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **मैण** – मेण. **सारु** – लोखंड. **जितु** – ज्यामुळे. **गरबु** – गर्व, अहंकार. **जाइ** – जातो, नष्ट होतो. **सु** – तो. **कवणु** – कोणता. **आहारु** – आहार. **हिवै** – हिम, बर्फ. **मंदरु** – मंदिर. **पिराहनु** – पेहेराव, पोशाख. **कवन** – कोणती. **जितु** – जेथे. **अवाहनु** – स्थिर. **इत** – इकडे. **उत** – तिकडे. **किस** – कोणास. **कउ** – ला. **जाणि** – जाणून. **कवन** – कोणाचे. **धिआनु** – ध्यान. **मनु** – मन. **मनहि** – मनात. **समावै** – सामावून जाते.

भावार्थ : योगी पुन्हा नानकांना विचारतात – मेणाच्या दातांनी लोखंड कसे खाता येईल ? भाव असा की

जीवात्मा हा मेणासारखा मऊ आहे. पंचविकार हे लोखंडासारखे शमविण्यास कठीण आहेत म्हणून हा जीवात्मा विकारांना कसे नष्ट करील ? कोणता आहार घेतला असता कोणत्या मार्गाने अहंकार नष्ट होईल ? हे शरीर तर बर्फासारखे आहे. थोडीशीही आच लागली की बर्फ विरघळून जाते. त्याप्रमाणे शरीरही नश्वर आहे. पण त्यात तामस वृत्तीच्या अग्नीचा पोशाख केलेले मन आहे. हे कसे ? अशी कोणती गुहा आहे की जेथे मन स्थिर राहते ? इकडे तिकडे चोहीकडे असा कोण आहे की ज्याच्यात हे मन सामावून जावे ? कोणाचे ध्यान केल्याने मन मनात सामावून जाईल ?॥४५॥

हउ हउ मै मै विचहु खोवै ॥ दूजा मेटै एको होवै ॥
जगु करड़ा मनमुखु गावारु ॥ सबदु कमाईऐ खाईऐ सारु ॥
अंतरि बाहरि एको जाणै ॥ नानक अगनि मरै सतिगुर कै भाणै ॥ ४६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **हउ हउ** – अहंकार. **मै मै** – मी पणा, अहंपणा. **विचहु** – मधून. **खोवै** – दूर करतो. **दूजा** – द्वैतभाव. **मेटै** – नष्ट करतो. **एको** – एकरूप. **होवै** – होऊन. **जगु** – जग, संसार. **करडा** – कठीण. **मनमुखु** – मनाला वाटेल तसे वागणारा. **गावारु** – गावंढळ, अडाणी. **सबदु** – प्रभूनाम. **कमाईऐ** – कमवा, प्राप्त करा. **खाईऐ** – खा. **सारु** – लोखंड. **एको** – एकमेव प्रभू परमात्मा. **भाणै** – आज्ञा, उपदेश, विचाराप्रमाणे.

भावार्थ : योग्यांच्या प्रश्नांना गुरू नानकदेव उत्तर देतात, प्रथम मनातील अहंकार, मीपणाची भावना काढून टाका. द्वैतभाव मिटवून टाका व त्या एकमेव प्रभू परमात्म्याशी एकरूप व्हा. अंतरबाह्य सर्वत्र विराजमान असलेल्या त्या एकमात्र प्रभू परमात्म्यास ओळखा. असे केल्याने प्रभूनाम प्राप्त होते. मग अडाणी, स्वेच्छाचारी व्यक्तीसुद्धा हे संसाररूपी कठीण लोखंड सहजपणे पचवू शकतो. नानक सांगतात, सतगुरूच्या आज्ञेनुसार आचरण केल्यास वासनेचा अग्नी विझून जातो. ॥ ४६ ॥

सच भै राता गरबु निवारै ॥ एको जाता सबदु विचारै ॥
सबदु वसै सचु अंतरि हीआ ॥ तनु मनु सीतलु रंगि रंगीआ ॥
कामु क्रोधु बिखु अगनि निवारे ॥ नानक नदरी नदरी पिआरे ॥ ४७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **सच** – परमेश्वर. **भै** – भीती. **गरबु** – गर्व, अहंकार. **निवारै** – नष्ट होतो. **एको** – एकमेव प्रभू परमात्मा. **जाता** – जाणणे. **सबदु** – प्रभूनाम. **विचारै** – चिंतन. **वसै** – वास करतो. **हीआ** – हृदय. **सीतलु** – शीतल, शांत. **रंगि** – रंगात. **रंगिआ** – रंगून जाणे. **बिखु** – विष, वासना. **निवारे** – दूर करणे. **नदरि** – कृपा. **पिआरे** – प्रिय प्रभू.

भावार्थ : सत्यरूप प्रभू परमात्म्याविषयी मनात आदरयुक्त भीती बाळगून त्याच्या चरणी लीन झाल्याने गर्वाचे, अहंकाराचे निवारण होते. त्या एकमेव प्रभू परमात्म्यास जाणून, प्रभुनामाचे चिंतन केल्याने प्रभू परमात्मा प्रभुनामातच वसतो हे कळते. एवढेच नव्हे तर तो प्रभू परमात्मा आपल्या अंतरात, आपल्या हृदयातच आहे असा साक्षात्कार

प्राप्त होतो. तन मन शांत होते. काम, क्रोध विषयविकाररूपी अग्नी विझून जातो. नानक सांगतात, अशा जीवावर प्रभू परमात्म्याची कृपा होते. ॥ ४७ ॥

कवन मुखि चंदु हिवै धरु छाइआ ॥ कवन मुखि सूरजु तपै तपाइआ ॥
कवन मुखि कालु जोहत नित रहै ॥ कवन बुधि गुरमुखि पति रहै ॥
कवन जोधु जो कालु संघारै ॥ बोलै बाणी नानकु बीचारै ॥ ४८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **कवन** – कोणत्या. **चंदु** – चंद्र. **हिवै** – बर्फ. **सूरजु** – सूर्य. **तपै** – प्रकाश. **तपाइआ** – प्रचंड प्रकाशतो. **कालु** – काळ, मृत्यू. **जोहत रहे** – पाहण्यास मुकतो. **बुधि** – वृद्धी. **पति** – प्रतिष्ठा, पत. **जोधु** – योद्धा. **संघारै** – संहार करते. **संघारे** – संहार.

भावार्थ : योगी पुन्हा विचारतात – काय केले असता मनात चंद्राचे शीतल चांदणे पसरेल ? काय केले असता मनात ज्ञानरवीचा प्रखर प्रकाश पसरून मनातील तमाचा नाश होईल ? काय केले असता जीवाचा कालपुरूषापासून, मृत्यूपासून बचाव होईल ? काय केले असता मन सतगुरूच्या शिकवण्याप्रमाणे आचरण करून सुप्रतिष्ठित होईल ? असा कोण शूरवीर आहे जो प्रत्यक्ष कळीकाळाचा संहार करू शकेल ? नानका, ह्या प्रश्नांची नीट विचारपूर्वक उत्तरे दे. ॥ ४८ ॥

सबदु भाखत ससि जोति अपारा ॥ ससि घरि सूरु वसै मिटै अंधिआरा ॥
सुखु दुखु सम करि नामु अधारा ॥ आपे पारि उतारणहारा ॥
गुरु परचै मनु साचि समाई ॥ प्रणवति नानकु कालु न खाइ ॥ ४९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **सबदु** – प्रभुनाम. **भाखत** – उच्चार. **ससि** – चंद्र. **नामु** – प्रभुनाम. **आपे** – प्रभू परमात्मा. **उतारणहारा** – तारून नेणारा. **परचै** – समाधान. **मनु** – मन. **साचि** – प्रभू परमात्मा. **प्रणवति** – विनंती करतो, विनम्र होऊन.

भावार्थ : योग्यांच्या प्रश्नाला गुरू नानकदेव उत्तर देतात – प्रभुनामाचे सतत स्मरण केल्याने मनाचे संकल्प थांबून मन शांत व स्थिर होते. जणू पौर्णिमेच्या चंद्राचे शीतल चांदणे मनात सर्वत्र पसरते. प्रभुनाम घेणाऱ्या साधकाच्या मनात ज्ञानरवीचा प्रकाश पडतो व त्याच्या मनातील अज्ञानाचा, मोहमायेचा, अंधकार नाहीसा होतो. असा साधक प्रभुनामाच्या आधारे सुख-दु:ख समान लेखू लागतो. तो प्रभू परमात्माच स्वत: जीवांना तारून नेतो. सतगुरूच्या कृपेने असा साधक परमेश्वराच्या स्वरूपाशी एकरूप होऊन जातो. मग अशा साधकास कळीकाळ हातही लावू शकत नाही, असे नानक नम्रतापूर्वक सांगतात. ॥ ४९ ॥

नाम ततु सभ ही सिरि जापै ॥ बिनु नावै दुखु कालु संतापै ॥
ततो ततु मिलै मनु मानै ॥ दुजा जाइ इकतु घरि आनै ॥
बोलै पवना गगनु गरजै ॥ नानक निहचलु मिलणु सहजै ॥ ५० ॥(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **ततु** – तत्त्व, सार. **सभ** – सर्व. **सिरि** – श्रेष्ठ, उंच. **जापै** – समज येते. **संतापै** – संताप देतात. **ततो ततु** – परमतत्त्व नाम. **मनु** – मन. **मानै** – मानतो. **दुजा** – द्वैतभाव. **इकतु** – एकच, एकमेव प्रभू परमात्मा. **बोलै** – बोलतो. **निहचलु** – निश्चल, स्थिर. **मिलणु** – मिलन. **सहजै** – सहजतेने.

भावार्थ : प्रभू परमात्म्याचे नाम सर्व शिरोमणी, सर्वश्रेष्ठ आहे. जो जीव प्रभुनामास पारखा होतो त्यास काळाचे दु:ख व ताप सहन करावा लागतो. जेव्हा जीवात्म्याचे परमात्म्याशी मिलन होते तेव्हा मन स्थिर व संतुष्ट होते. द्वैतभाव गळून पडतो व जीव प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. त्या वेळी प्राण उल्हसित होतो व दशमद्वार उत्तेजित होते. मन स्थिर होते व सहजसमाधी प्राप्त होऊन जीवाशिवाचे मिलन होते. ॥ ५० ॥

अंतरि सुंनं बाहरि सुंनं त्रिभवण सुंन मसुंनं ॥
चउथे सुंनै जो नरु जाणै ता कउ पापु न पुंनं ॥
घटि घटि सुंन का जाणै भेउ ॥ आदि पुरखु निरंजन देउ ॥
जो जनु नाम निरंजन राता ॥ नानक सोई पुरखु बिधाता ॥ ५१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **अंतरि** – अंतरात, हृदयात. **सुंनं** – शून्य परब्रह्म. **सुंन मसुंनं** – निर्गुण प्रभू. **चउथे** – चतुर्थपद, तूर्यावस्था. **घटि घटि** – प्रत्येक शरीरात. **जाणै** – जाणतो. **भेउ** – भेद, रहस्य. **देउ** – देव, परमात्मा. **राता** – रंगून गेला, तल्लीन झाला. **सोई** – तो.

भावार्थ : प्रत्येक जीवाच्या अंतरात तो शून्यरूप प्रभू परमात्मा वास करतो. जीवाच्या बाहेरही तो शून्यरूप प्रभू परमात्मा भरून राहिला आहे. संपूर्ण त्रिभुवनातही शून्यरूप परब्रह्म वास करते. पण जो त्या सर्वांपलीकडील चौथ्या शून्यास जाणतो, जो चतुर्थावस्था – तूर्यावस्था प्राप्त करतो, त्याला पाप, पुण्य, काहीही स्पर्शू शकत नाही. तो त्याच्याही पलीकडे जाऊन पोहोचतो. जो साधक प्रत्येक जीवाच्या ठायी वास करीत असलेल्या प्रभू परमात्म्याचे रहस्य जाणतो. तो आदिपुरुष मायारहित व प्रकाशरूप आहे. जो साधक त्या निरंजन प्रभू परमात्म्याच्या नामात तल्लीन होऊन जातो तो प्रत्यक्ष विधाता प्रभूचेच रूप होऊन जातो. ॥ ५१ ॥

सुंनो सुंनु कहै सभू कोई ॥ अनहत सुंनु कहा ते होई ॥
अनहत सुंनि रते से कैसे ॥ जिस ते उपजे तिस ही जैसे ॥
ओइ जनमि न मरहि न आवहि जाहि ॥ नानक गुरमुखि मनु समझाहि ॥ ५२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **अनहत सुंनु** – निर्गुण निराकार परब्रह्म. **रते** – रंगून जाणे, तदाकार होणे. **जिस** – ज्या पासून. **तिस** – त्यासारखे. **ओइ** – तो. **आवहि** – जन्मणे. **जावहि** – मरणे. **मनु** – मन. **समझाहि** – समजावतो.

भावार्थ : सर्वच लोक त्या शून्याची म्हणजे निर्गुण निराकार अरूपा प्रभू परमात्म्याची चर्चा करतात. पण तो प्रभू परमात्मा कसा प्राप्त होईल ? सदैव स्थिर शून्य अवस्था कशी प्राप्त होईल ? ज्याच्यापासून तो (आत्मा) उत्पन्न

झाला त्याच्यासारखाच तो होतो. तो जन्मतही नाही आणि मरतही नाही. नानक सांगतात, सतगुरूच्या मार्गदर्शनाप्रमाणे जीव मनास योग्य दिशा देऊन ही गोष्ट समजू शकतो. ॥ ५२ ॥

नउ सर सुभर दसवै पूरे ॥ तह अनहत सुंन बजावहि तूरे ॥
साचै राचै देखि हजूरे ॥ घटि घटि साचु रहिआ भरपूरे ॥
गुपती बाणी परगटु होइ ॥ नानक परखि लए सचु सोइ ॥ ५३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४३)

शब्दार्थ : **सर** – इंद्रिये. **सुभर** – पूर्ण भरलेले. **पूरे** – पूर्ण समाधानी. **तह** – तेथे. **अनहत** – परब्रह्म. **बजावहि** – वाजवतो. **तूरे** – तुतारी. **साचै** – सत्यरूप परमेश्वर. **राचै** – रंगून जाणे. **देखि** – पाहतो. **हजूरे** – प्रत्यक्ष परमेश्वर. **गुपती** – गुप्त. **परगटु** – प्रकट. **परखिलए** – ज्ञान प्राप्त होते, जाणतो. **सोइ** – तो.

भावार्थ : जेव्हा शरीराची नऊ इंद्रिये तृप्त होतात, दशमद्वारही पूर्णपणे तृप्त होते, भरले जाते, म्हणजे जेव्हा सर्व ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये पूर्णपणे ताब्यात येतात, तेव्हा मन दहाव्या द्वारात ब्रह्मरंध्राशी स्थिर होते व तेथे अनाहत नाद उत्पन्न होतो. असा साधक प्रभू परमात्म्यास प्रत्यक्ष जाणू लागतो व त्याच्या ठायी साधकाचे मन एकाग्र होते. प्रत्येक शरीरात प्रभू परमात्मा वास करतो हे तो जाणतो व प्रभू परमात्म्याचे रहस्य त्याच्यापुढे प्रकट होते. नानक सांगतात, अशा साधकास सत्यरूप प्रभू परमात्म्याचे पूर्ण ज्ञान प्राप्त होते. ॥ ५३ ॥

सहज भाइ मिलीऐ सुखु होवै ॥ गुरमुखि जागै नीद न सोवै ॥
सुंन सबदु अपरंपरि धारै ॥ कहते मुकतु सबदि निसतारे ॥
गुर की दीखिआ से सचि राते ॥ नानक आपु गवाई मिलण नही भ्राते ॥ ५४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४४)

शब्दार्थ : **सहज भाइ** – सहजावस्था. **मिलीऐ** – प्राप्त झाल्याने. **सुखू होवै** – सुखी होतो. **नीद** – झोप, अज्ञानरूपी निद्रा. **अपरंपरि** – ज्याचा पार लागत नाही असा, अपार. **धारै** – धारण करतो, एकरूप होतो. **दीखिआ** – दीक्षा, शिकवण. **राते** – तल्लीन होतो. **आपु** – अहंभाव, अहंकार. **गवाई** – घालवला. **मिलण** – मिलन. **भ्राते** – भ्रांती, भ्रम, शंका.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागणारा साधक सहजावस्था प्राप्त करून सुखी होतो. असा साधक अज्ञानरूपी निद्रा टाकून देऊन मोहमाया, विषयविकार आपणास स्पर्शही करणार नाहीत ह्यासाठी म्हणून सदैव सावध असतो. शून्य शब्द म्हणजे अनाहत नाद साधकाच्या मनास त्या अपरंपार प्रभू परमात्म्याशी एकरूप करतो. प्रभुनामाच्या साहाय्याने साधक हा भवसागर पार करून जातो व मुक्त होतो. सतगुरूने दिलेल्या दीक्षेमुळे तो सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या ध्यानात रंगून जातो. नानक सांगतात, अशा साधकाचा अहंभाव नष्ट झाल्यामुळे त्याचे प्रभू परमात्म्याशी मिलन होते. मग त्याच्या मनात कोणताही भ्रम शिल्लक राहत नाही. मोहमाया त्यास भ्रमात पाडू शकत नाही. ॥ ५४ ॥

कुबुधि चवावै सो कितु ठाइ ॥ किउ ततु न बुझै चोटा खाइ ॥
जम दरि बाधे कोइ न राखै ॥ बिनु सबदै नाही पति साखै ॥
किउ करि बुझै पावै पारु ॥ नानक मनमुखि न बुझै गवारु ॥ ५५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४४)

शब्दार्थ : **कुबुधि** – वाईट बुद्धी. **चवावै** – दूर करतो. **सो** – तो. **कितु** – कोणते. **ठाइ** – स्थान. **किउ** – का. **बुझै** – समजून घेणे. **चोटा** – कष्ट, आपत्ती, पीडा. **जमदरि** – यमाचे द्वार. **बाधे** – बांधलेले. **कोइ** – कोणीही. **राखै** – रक्षण करणे. **बिनु सबदै** – प्रभुनामाशिवाय. **पति** – पत प्रतिष्ठा. **साखै** – प्रसिद्धी, सन्मान. **पावै पारु** – पार होतो. **मनमुखि** – मनाला वाटेल तसे वागणारा दुष्ट प्रवृत्तीचा, स्वेच्छाचारी. **गवारु** – अडाणी, मूर्ख.

भावार्थ : सिद्ध योगी नानक देवांना प्रश्न करतात – जे लोक दुष्ट बुद्धीने वागतात, बोलतात. त्यांची काय गत होते ? ते परमतत्त्व का समजावून घेत नाहीत व वारंवार ह्या भवसागरात का बरे ठेचा खातात ? नानक सांगतात – असे लोक यमाच्या पाशाने बांधले जातात. त्यापासून त्यांचे कोणीही रक्षण करू शकत नाही. असे लोक प्रभू परमात्म्याच्या नामास पारखे झाल्याने त्यांना प्रतिष्ठा लाभत नाही. कोणीही त्यांच्यावर विश्वास ठेवीत नाही. असे लोक परमतत्त्वास जाणत नाहीत व त्यामुळे भवसागर पार करू शकत नाहीत. नानक म्हणतात, असे स्वेच्छाचारी, परमतत्त्व न समजल्याने कायम अडाणीच राहातात. ॥ ५५ ॥

कुबधि मिटै गुर सबदु बीचारि ॥ सतिगुरु भेटै मोख दुआर ॥
ततु न चीनै मनमुखु जलि जाइ ॥ दुरमति विछुड़ि चोटा खाइ ॥
मानै हुकमु सभे गुण गिआन ॥ नानक दरगह पावै मानु ॥ ५६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४४)

शब्दार्थ : **कुबुधि** – दुष्ट बुद्धी. **मिटै** – नष्ट होते. **भेटै** – भेटल्याने. **मोख** – मोक्ष. **ततु** – परमतत्त्व. **चीनै** – ओळखले, जाणले. **जलि जाइ** – जळून जाते. **दुरमति** – वाईट बुद्धी. **विछुडि** – दूर गेला, वेगळा झाला. **चोटा** – ठेचा. **मानै** – मानतो. **हुकमु** – परमेश्वरी आज्ञा. **सभे** – सर्व. **गिआन** – ज्ञान. **दरगह** – प्रभूचा दरबार. **पावै** – प्राप्त करतो. **मानु** – मान, सन्मान.

भावार्थ : प्रभुनामाच्या चिंतनाने वाईट विचारांचा नाश होतो. सतगुरूच्या भेटीनेच मोक्षाचे दार उघडते. स्वेच्छाचारी माणूस परमतत्त्व न ओळखल्याने भवतापाने जळून जातो. दुर्मतीच्या आहारी गेल्याने तो प्रभू परमात्म्यापासून दूर जातो. त्यामुळे त्याला ह्या संसारात वारंवार ठेचा खाव्या लागतात. जर तो प्रभू परमात्म्याच्या आज्ञेप्रमाणे वागेल तर त्याच्या अंगी सर्व गुण येतील. त्याला सत्यरूप प्रभू परमात्म्याचे ज्ञान होईल. नानक सांगतात, असा साधक प्रभू परमात्म्याच्या दरबारात सन्मान प्राप्त करतो. ॥ ५६ ॥

साचु वखरु धनु पलै होइ ॥ आपि तरै तारे भी सोइ ॥
सहजि रता बूझै पति होइ ॥ ता की कीमति करै न कोइ ॥

जह देखा तह रहिआ समाइ ॥ नानक पारि परै सच भाइ ॥ ५७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४४)

शब्दार्थ : **साचु** – सत्य. **वखरु** – वस्तू. **धनु** – धन. **पलै** – पदरी. **आपि** – आपण स्वत:. **तरै** – तरून जातो. **तारे** – तारतो. **भी** – सुद्धा. **सोई** – तो. **सहजि** – सहजावस्था, तूर्यवस्था. **रता** – रंगून जाणे. **बूझै** – जाणतो, समजतो. **पति** – पत, प्रतिष्ठा. **ता की** – त्याची. **कीमति** – किंमत. **कोइ** – कोणी. **जह** – जेथे. **तह** – तेथे. **पारि** – पार. **परै** – पडतो.

भावार्थ : जो जीव सत्यरूप प्रभुनामाचा व्यापार करतो व प्रभुनामाचे धन आपल्या पदरी जमा करतो तो स्वत: तर भवसागर तरून जातोस पण इतरांनाही तो तारून नेतो. जो सहजावस्थेत प्रभुनामात रंगून जातो त्यास प्रभू परमात्म्याचे ज्ञान होते व त्यास सर्वत्र प्रतिष्ठा प्राप्त होते. अशा व्यक्तीचे मोल कोणीही करू शकत नाही. त्याला सर्वत्र प्रभू परमात्मा भरून राहिला आहे ह्याचा साक्षात्कार होतो. नानक सांगतात, सत्यरूप प्रभू परमात्म्यावर प्रेम करणारा, त्याचे नामस्मरण करणारा, भवसागर पार करून जातो. ॥ ५७ ॥

सु सबद हा कहा वासु कथीअले जितु तरीऐ भवजलु संसारो ॥
त्रै सत अंगुल वाई कहिऐ तिसु कहु कवनु अधारो ॥
बोलै खेलै असथिरु होवै किउ करि अलखु लखाए ॥
सुणि सुआमी सचु नानकु प्रणवै आपणे मन समझाए ॥
गुरमुखि सबदे सचि लिव लागै करि नदरी मेलि मिलाए ॥
आपे दाना आपे बीना पुरै भागि समाए ॥ ५८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४४)

शब्दार्थ : **सु** – तो. **सबद** – प्रभूनाम. **कहा** – कोठे. **वासु** – वास. **कथिअले** – सांगितले जाते. **जितु** – ज्यामुळे. **तरिऐ** – तरून जातो. **त्रै सत** – दहा. **अंगुल** – बोटे. **वाइ** – वायू. **कहिऐ** – सांगतात. **तिसु** – त्याचा. **कहु** – सांग. **कवनु** – कोणता. **अधारो** – आधार. **बोलै** – बोलते. **खेलै** – खेळते. **असथिरु** – स्थिर. **किउ करि** – काय केले असता. **अलखु** – अदृश्य. **लखाए** – दिसेल. **सुणि** – ऐका. **सुआमी** – स्वामी. **सचु** – सत्य. **प्रणवै** – नम्रतापूर्वक. **आपणे** – आपल्या. **समझाए** – समजावले. **करि** – करतो. **नदरि** – कृपा. **मेलि मिलाए** – मिलन घडते. **दाना** – ज्ञाता, जाणणारा. **बीना** – दृष्टा, पाहणारा. **पुरै** – पूर्ण. **भागि** – भाग्य.

भावार्थ : सिद्धयोगी विचारतात – ज्याच्या आधारे हा भवसागर पार करता येतो, त्या सुंदर प्रभुनामाचे वास्तव्य कोठे आहे ? ह्या दहा बोटे बाहेर पडणाऱ्या श्वासाला कोणाचा आधार आहे ते सांगा. जी सत्ता अंतरात बोलते, खेळते, लीला करते, त्यास कसे स्थिर करता येईल. त्या अदृश्य प्रभू परमात्म्यास दृश्य स्वरूपात कसे पाहता येईल ? नानक नम्रतापूर्वक उत्तर देतात की, हे स्वामी ऐका, मी माझ्या अनुभवावरून सांगतो की सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या नामात मन तल्लीन होते व प्रभू परमात्म्याची कृपा झाल्यावर जीवात्मा व परमात्मा ह्यांचे मिलन होते. तो प्रभू परमात्मा सर्व काही पाहतो, सर्व काही जाणतो, ज्याचे भाग्य पूर्ण उजळते त्यास तो आपल्यात सामावून घेतो. ॥ ५८ ॥

सु सबद कउ निरंतरि वासु अलखं जह देखा तह सोइ ॥
पवन का वासा सुनं निवासा अकल कला धर सोई ॥
नदरि करे सबदु घट महि वसै विचहु भरमु गवाए ॥
तनु मनु निरमलु निरमल बाणी नामु मंनि वसाए ॥
सबदि गुरू भव सागरु तरीऐ इत उत एको जाणै ॥
चिहनु वरनु नही छाइआ माइआ नानक सबदु पछाणै ॥ ५९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४४)

शब्दार्थ : **निरंतरि** – सर्वत्र. **अलखं** – अदृश्य. **जह** – जेथे. **देखा** – पाहावे. **तह** – तेथे. **सोई** – तोच. **पवन** – वायू. **अकल** – शक्तिरहित. **नदरि** – कृपादृष्टी. **विचहु** – मधून. **नामु** – प्रभुनाम. **इत उत** – इकडे तिकडे. **चिहनु** – चिन्ह. **माइआ** – माया. **पछाणै** – जाणणे, ओळखणे.

भावार्थ : हे प्रभुनाम सदैव सर्वत्र वास करते. ते सर्वव्याप्त आहे. तो प्रभू परमात्मा चर्मचक्षूंनी दिसत नसला तरी जिकडे पाहाल तिकडे त्याचे अस्तित्व आहे. ज्याप्रमाणे वायू दिसत नाही पण त्याचे अस्तित्व चराचर सृष्टीत सर्वत्र जाणवते. त्याप्रमाणे प्रभू परमात्मा आपल्या सर्व शक्तीसह सर्वत्र आहे. जर निराकार प्रभू परमात्म्याची कृपा झाली तर साधकाच्या हृदयात प्रभुनामाची ज्योत प्रकाशित होते व साधकाच्या मनातील सर्व भ्रम दूर होतात. प्रभुनाम अंत:करणात स्थापित झाल्यावर साधकाचे तन-मन सर्व काही निर्मळ होते. शब्दगुरूच्या प्राप्तीने प्रभू परमात्मा इकडे, तिकडे, चोहिकडे भरून राहिला आहे हे ज्ञान प्राप्त होते व साधक भवसागर तरून जातो. प्रभू परमात्म्याची कोणतीही खूण दिसत नाही. त्याला कोणताही रंग नाही. तो निर्गुण निराकार आहे. त्याच्यावर मायेची सावलीसुद्धा पडत नाही. तो निष्कलंक आहे. केवळ नामानेच त्याचे ज्ञान प्राप्त होते असे नानक सांगतात.॥५९॥

त्रे सत अंगुल वाई अउधू सुंन सचु आहारो ॥
गुरमुखि बोलै ततु बिरोलै चीनै अलख अपारो ॥
त्रे गुण मेटै सबदु वसाए ता मनि चूकै अहंकारो ॥
अंतरि बाहरि एको जाणै ता हरि नामि लगै पिआरो ॥
सुखमना इड़ा पिंगुला बुझै जा आपे अलखु लखाए ॥
नानक, तिहु ते उपरि साचा सतिगुर सबदि समाए ॥ ६० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४४)

शब्दार्थ : **त्रे सत** – दहा. **अंगुल** – बोट. **वाई** – वायू, प्राणवायू. **अउधू** – अवधूत. **सुंन** – शून्य. **आहारो** – आहार. **बिरोलै** – मंथन करणे, घुसळणे. **बोलै** – बोलतो. **चीनै** – ओळखणे. **त्रे गुण** – सत्त्व, रज, तम हे तीन गुण. **मेटे** – मिटवून टाकणे, नाहीसे करणे. **ता** – तेव्हा. **चुकै** – चुकतो, नष्ट होतो. **सुखमना** – सुषुम्ना. **बुझै** – जाणतो. **जा** – जेव्हा. **तिहु** – त्याहून.

भावार्थ : हे योगिजनहो ! ह्या बाहेर पडणाऱ्या दहा बोटे प्रश्वासातून प्रभुनामाचा जप करणे व सत्यचन बोलणे हाच श्वासाचा आधार आहे. गुरूच्या उपदेशाप्रमाणे वागून परमतत्त्वाचे मंथनातून त्या अदृष्य प्रभू परमात्म्याचे

साक्षात दर्शन होते. ज्ञान प्राप्त होते. सत्त्व, रज, तम ह्या त्रिगुणाच्या पलिकडे जाऊन हरिनामाचा आसरा घेतल्याने मनातील अहंकार नष्ट होतो. प्रभू परमात्मा आत-बाहेर सर्वत्र आहे ह्याचे ज्ञान झाल्याने मनात प्रभुनामाबद्दल प्रेम निर्माण होते. जेव्हा या अदृश्य प्रभू परमात्म्याचे दर्शन होते तेव्हा इडा, पिंगला, सुषुम्ना ह्या नाड्यांचे योगमार्गाने होणारे ज्ञान सहज विनासायास प्राप्त होते. नानक सांगतात, तो प्रभू परमात्मा तिन्ही नाड्यांच्या साधनेच्या पलीकडे आहे व सतगुरूकडून प्राप्त झालेल्या नामामुळे त्या प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जाता येते. ॥६०॥

मन का जीउ पवनु कथिअले पवनु कहा रसु खाई ॥
गिआन की मुद्रा कवन अउधू सिध की कवन कमाई ॥
बिनु सबदै रसु न आवै अउधू हउमै पिआस न जाई ॥
सबदि रते अंम्रित रसु पाइआ साचे रहे अघाई ॥
कवन बुधि जितु असथिरु रहिऐ कितु भोजनि त्रिपतासै ॥
नानक दुखु सुख सम करि जापै सतिगुर ते कालु न ग्रास ॥ ६१ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९४४)

शब्दार्थ : **जीउ** – जीव. **कथिअले** – सांगतात. **कहा** – कोठून. **रसु** – रस. **खाई** – प्राप्त करतो, खातो. **गिआन** – ज्ञान. **अउधू** – अवधूत. **सिध** – सिद्ध. **हउमै** – अहंकार. **पिआस** – तहान. **साचे** – सत्यरूप परमात्मा. **अघाई** – तृप्ती. **कवन** – कोणाची. **जितु** – ज्यामुळे. **असथिरु** – स्थिर. **कितु** – कोणत्या. **त्रिपतासै** – तृप्त होतो. **जापै** – जाणतो, मानतो. **कालु** – काळ. **ग्रासै** – खातो.

भावार्थ : योगी पुन्हा विचारतात, जीवाचा आधार वायू आहे असे तुम्ही सांगता, पण हा वायू काय भक्षण करतो ? अवधूत विचारतात, ज्ञानाच्या मर्यादा काय आहेत ? ज्ञानप्राप्तीचे साधन कोणते ? सिद्ध व्यक्तींची वास्तविकता काय आहे ? गुरू नानक उत्तर देतात – हे योगिजनहो, प्रभुनामाशिवाय प्रभुरूपी रस प्राप्त होत नाही. मनातील अहंकारही नष्ट होत नाही. प्रभुनामात तल्लीन झाल्याने प्रभू परमात्मारूपी अमृतरस प्राप्त होतो आणि साधक सत्यस्वरूप परमात्म्यात एकरूप होऊन तृप्त होतो. योगी पुन्हा विचारतात – ज्यामुळे मन स्थिर होईल असा कोणता विचार आहे ? कोणत्या आचरणाने मन तृप्त होईल ? नानक सांगतात, सुख-दु:ख दोनही समान वाटू लागले की सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे मन स्थिर होते. मग अशा साधकास काळही ग्रासू शकत नाही. ॥६१॥

रंगि न राता रसि नही माता ॥ बिनु गुर सबदै जलि बलि ताता ॥
बिंदु न राखिआ सबदु न भाखिआ ॥ पवनु न साधिआ सचु न अराधिआ ॥
अकथ कथा ले सम करि रहै ॥ तउ नानक आतम राम कउ लहै ॥ ६२ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९४५)

शब्दार्थ : **रंगि** – प्रेमरंगात. **न राता** – रंगून गेला नाही. **माता** – उन्मत्त. **जलि** – जाळतो. **बलि** – जळणे. **ताता** – दु:खी. **बिंदु** – वीर्य. **भाखिआ** – उच्चार करणे. **सचु** – परमेश्वर. **अराधिआ** – आराधना. **अकथ** – अकथनीय, परमेश्वर. **सम करि रहै** – सुख-दु:ख समान मानून राहतो. **तउ** – तेव्हा. **आतम राम** – प्रभू

परमात्मा. **लहै** – प्राप्त करणे.

भावार्थ : जो जीव प्रभूच्या प्रेमरंगाने रंगला नाही, प्रभुरसात मस्त होऊन गेला नाही, असा जीव सतगुरूकडून प्रभुनामाची प्राप्ती न झाल्याने भवतापात सदैव जळत राहतो. ज्याने प्रभू परमात्म्याची आराधना केली नाही त्याला आपल्या कामविकारावर ताबा मिळवता येत नाही, त्याला आपल्या श्वासावरही ताबा ठेवता येत नाही व सत्याची आराधनाही साधत नाही. नानक सांगतात, जर तो प्रभू परमात्म्याचे विचाराचा स्वीकार करून सुखदु:ख समान मानण्यास शिकेल तर त्यास प्रभू परमात्मा प्राप्त होईल. ॥ ६२ ॥

गुरु परसादी रंगे राता ॥ अंम्रितु पीआ साचे माता ॥
गुर वीचारी अगनि निवारी ॥ अपिउ पीओ आतम सुखु धारी ॥
सचु अराधिआ गुरमुखि तरु तारी ॥ नानक बूझै को वीचरि ॥ ६३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४५)

शब्दार्थ : **परसादी** – प्रसादाने, कृपेने. **अंम्रितु** – अमृत. **साचे माता** – प्रभू परमात्म्याच्या स्मरणात मग्न होतो. **अगनि** – अग्नी. **निवारी** – दूर केली. **अपिउ** – अमृत. **धारी** – धारण केले, प्राप्त केले. **सचु** – परमेश्वर. **अराधिआ** – आराधना केली. **तरु** – होडी. **तारी** – पार करण्यासाठी. **बूझै** – समजतो, जाणतो. **को** – कोणी विरळा. **वीचारि** – विचार करतो. **तारी** – पार करण्यासाठी.

भावार्थ : जीव सतगुरूच्या कृपाप्रसादाने प्रभूच्या प्रेमात रंगून जातो व प्रभुनामामृताचे पान करून सत्यरूप परमात्म्यात लीन होऊन जातो. सतगुरूच्या उपदेशाने विषयविकरांचा अग्नी विझतो. प्रभुनामामृत प्राशन केल्याने त्याला आत्मिक सुख प्राप्त होते. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभू परमात्म्याची आराधना केल्याने तो भवसागर पार करून जातो. गुरु नानकदेवजी सांगतात, हे विचार कोणी विरळा साधकच जाणतो. ॥ ६३ ॥

इहु मनु मैगलु कहा बसीअले कहा बसै इहु पवना ॥
कहा बसै सु सबदु अउधू ता कउ चूकै मन का भवना ॥
नदरि करे ता सतिगुरु मेले ता निज घरि वासा इहु मनु पाए ॥
आपै आपु खाइ ता निरमलु होवै धावतु वरजि रहाए ॥
किउ मूलु पछाणै आतमु जाणै किउ ससि घरि सूरु समावै ॥
गुरमुखि हउमै विचहु खोवै तउ नानक सहजि समावै ॥ ६४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४५)

शब्दार्थ : **इहु** – हे. **मैगलु** – मस्त हत्ती. **कहा** – कोठे. **बसीअले** – राहते, वस्ती करते. **पवना** – श्वास. **सबदु** – नाम, शब्द. **अउधू** – अवधूत. **ता कउ** – त्याचा. **भवना** – भटकणे. **नदरि** – कृपा. **ता** – त्यास. **मेले** – मिळतो. **निजघरि** – स्वगृही, स्वस्वरूप. **आपै** – आपण स्वत:. **आपु** – अहंकार. **धावतु** – धावणाऱ्या. **वरजि** – वर्ज्य करणे, सोडून देणे. **किउ** – कसे. **मूलु** – मूळ स्वरूप. **पछाणै** – ओळखणे. **आतमु** – आत्मा. **ससि** – चंद्र. **सूरु** – सूर्य. **हउमै** – अहंकार. **खोवै** – नष्ट होणे. **तउ** – तेव्हा. **सहजि** – सहजावस्था.

भावार्थ : सिद्ध योगी विचारतात – हा मनरूपी मस्त हत्ती कोठे राहतो ? हा प्राण कोठे राहतो ? नामाचा कोठे वास आहे ? हे अवधूत नानक ! ज्या प्रभुनामाच्या साहाय्याने मनाची चंचलता थांबते ते नाम कोठे राहते ? नानक उत्तर देतात – प्रभू परमात्म्याच्या कृपेने सतगुरूची प्राप्ती होते व त्याच्या उपदेशाने मन आपले मूळ स्वरूप जाणते. जेव्हा हे मन आपला अहंकार नष्ट करते तेव्हा मन निर्मळ होते. त्याचे इतस्तत: भटकणे थांबते व ते स्थिर होते. सिद्धयोगी पुन्हा विचारतात – जीव आपले मूळ स्थान कसे ओळखतो ? आपले आत्मस्वरूप कसे जाणतो ? चंद्राच्या घरात सूर्य कसा प्रकाशेल म्हणजे अज्ञानरूपी चंद्राच्या जागी ज्ञानरूपी सूर्याचा प्रकाश कसा पसरेल ? नानक उत्तर देतात – जेव्हा सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून जीव आपल्या अहंकाराचा त्याग करील, तेव्हा तो आपली सहजावस्था प्राप्त करील व त्यातच तो लीन होऊन जाईल. ॥ ६४ ॥

इह मनु निहचलु हिरदै बसीअले गुरमुखि मूलु पछाणि रहै ॥
नाभि पवनु घरि आसणि बैसे गुरमुखि खोजत ततु लहै ॥
सु सबदु निरंतरि निज घरि आछै त्रिभवण जोति सु सबदि लहै ॥
खावै दूख भूख साचे की साचे ही त्रिपतासि रहै ॥
अनहद बाणी गुरमुखि जाणी बिरलो को अरथावै ॥
नानकु आखै सचु सुभाखै सचि रपै रंगु कबहू न जावै ॥ ६५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४५)

शब्दार्थ : **इह** – हे. **निहचलु** – निश्चल. **हिरदै** – हृदयात. **बसीअले** – वसले आहे. **नाभी** – बेंबी. **आसणि** – आसन. **खोजत** – शोधणे. **ततु** – तत्त्व. **सु** – ते. **आछै** – आहे. **खावै** – खातो, गिळून टाकतो. **त्रिपतासि** – तृप्त. **बिरले** – विरळा. **अरथावै** – अर्थ जाणतो. **आखै** – सांगणे. **रपै** – रंगून गेला. **सुभाखै** – बोलतो. **कबहु** – केव्हाही, कधीही. **जावै** – जाणे.

भावार्थ : हे मन निश्चल होऊन हृदयात स्थिर होते तेव्हा सतगुरूच्या उपदेशाने आपले मूळ स्वरूप जाणते. श्वास हा नाभीच्या घरात आसनस्थ बसला आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्यास मूलतत्त्वाचा शोध लागतो. जेव्हा तो सर्वत्र वास करणाऱ्या प्रभू परमात्म्याचे नाम आपल्या हृदयात धारण करतो, तेव्हा त्या प्रभुनामाचे साहाय्याने त्रिभुवनात प्रकाशणारी प्रभू परमात्म्याची परमज्योत त्यास प्राप्त होते. जेव्हा जीवास सत्यरूप परमात्म्याच्या प्राप्तीची तीव्र भूक लागते, तेव्हा भवसागरातील सर्व दु:खे नष्ट होतात व तो सत्यरूपात तृप्त होऊन राहतो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागूनच प्रभू परमात्म्याची अनाहत वाणी, प्रभुनाम प्राप्त होते. एखादा विरळा जीवच ह्याचा अर्थ जाणतो. नानक सांगतात, मी सत्य बोलतो की सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या रंगात रंगून गेल्यावर तो रंग कधीही पुसला जात नाही. जीव सदैव प्रभुरंगातच रंगून राहतो. प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन जातो. ॥ ६५ ॥

जा इहु हिरदा देह न होती तउ मनु कैठै रहता ॥
नाभि कमल असथंभु न होतो ता पवनु कवन घरि सहता ॥
रूपु न होतो रेख न काई ता सबदि कहा लिव लाई ॥
रकतु बिंदु की मड़ी न होती मिति कीमति नही पाई ॥

वरनु भेखु असरूपु न जापी किउ करि जापसि साचा ॥
नानक नामि रते बैरागी इब तब साचो साचा ॥ ६६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४५)

शब्दार्थ : **जा** – जेव्हा. **इहु** – हे. **हिरदा** – हृदय. **तउ** – तेव्हा. **कैठै** – कोठे. **असथंभु** – स्तंभ. **रूपु** – आकार. **रेख** – रेषा. **लिव लाई** – तल्लीन होणे, एकाग्र होणे. **रकतु** – रक्त. **बिंदु** – वीर्य. **मडी** – संयोगाने निर्माण झालेले शरीर. **मिति कीमति** – गतिविधी. **वरनु** – वर्ण. **भेखु** – वेश. **असरूपु** – स्वरूप, आकार. **जापी** – जप. **इब** – आत्ता. **तब** – तेव्हा.

भावार्थ : योगिजन प्रश्न करतात – जेव्हा हे शरीरही नव्हते, हृदयही नव्हते तेव्हा मन कोठे रहात होते ? जेव्हा नाभीकमलाचा आधारही नव्हता तेव्हा प्राण कोठे राहत होता ? ज्या ठिकाणी प्रभुनाम, शब्द, एकाग्र करावे अशी कोणतीही रूपरेषासुद्धा नव्हती. कोणताही आकार नव्हता. तेव्हा हा शब्द, हे नाम कोठे रहात होते ? जेव्हा मातेचे रक्त व पित्याच्या वीर्याच्या संयोगातून निर्माण झालेले हे शरीरही नव्हते तेव्हा शब्दरूप प्रभू परमात्म्याची गतिविधी कशी जाणली जात असे ? जेव्हा कोणताही वर्ण, वेश, स्वरूपच नव्हते तेव्हा त्या प्रभू परमात्म्याचा जप कसा केला जात होता ? नानक सांगतात, प्रभुनामात तल्लीन होणाऱ्यास प्रभू परमात्म्याच्या गुणांवर प्रेम करणाऱ्यास तो प्रभू परमात्मा सदैव सर्वत्र दिसू लागतो. ॥ ६६ ॥

हिरदा देह न होती अउधू तउ मनु सुंनि रहै बैरागी ॥
नाभि कमलु असथंभु न होतो ता निज घरि बसतउ पवनु अनरागी ॥
रूपु न रेखिआ जाति न होती तउ अकुलीणि रहतउ सबदु सु सारु ॥
गउनु गगनु जब तबहि न होतउ त्रिभवण जोति आपे निरंकारु ॥
वरनु भेखु असरूपु सु एको एको सबदु विडाणी ॥
साच बिना सूचा को नाही नानक अकथ कहाणी ॥ ६७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४५)

शब्दार्थ : **हिरदा** – हृदय. **तउ** – तेव्हा. **सुंनि** – शून्य. **बैरागी** – विरक्त. **ता** – तेव्हा. **अनरागी** – अनुरक्त. **अकुलीणि** – कुलरहित, परब्रह्म. **रहतउ** – राहातो. **गउनु** – पृथ्वी. **गगनु** – आकाश. **जब** – जेव्हा. **तबहि** – तेव्हा. **होतउ** – होते. **त्रिभवण** – त्रिभुवन. **जोति** – ज्योती. **आपे** – प्रभू परमात्मा. **निरंकारु** – निराकार. **सु** – तो. **एको एको** – एकमेव. **विडाणी** -- आश्चर्य. **साच** – सत्यरूप परमात्मा. **सुचा** – पवित्र. **अकथ** – अवर्णनीय. **कहाणी** – गोष्ट.

भावार्थ : जेव्हा हृदय आणि शरीर नव्हते तेव्हा मन विरक्त होऊन निराकार शून्य परब्रह्मात राहत होते. नाभीकमलाचा आधार नव्हता तेव्हा श्वासरूपी प्राण प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन आपल्या स्वगृही राहत होता. जेव्हा कोणतीही रूपरेषा, जात काहीही नव्हते तेव्हा तत्त्वरूप शब्द कुलरहित प्रभू परमात्म्यात विलीन होऊन रहात होता. जेव्हा पृथ्वी, आकाश आदी काहीही नव्हते तेव्हाही तो त्रिभुवनाचा स्वामी ज्योतिस्वरूपात सर्वत्र प्रकाशमान होता. वर्ण, वेश, रूप आदी सर्व काही त्या सत्यरूप शब्दब्रह्माला जाणल्याशिवाय कोणीही पवित्र व सत्यरूप होऊ शकत नाही. ह्या गोष्टीही शब्दाने वर्णन करता येत नाही. ॥ ६७ ॥

कितु कितु बिधि जगु उपजै पुरखा कितु कितु दुखि बिनसि जाई ॥
हउमै विचि जगु उपजै पुरखा नामि विसरिऐ दुखु पाई ॥
गुरमुखि होवै सु गिआनु ततु बीचारै हउमै सबदि जलाए ॥
तनु मनु निरमलु निरमल बाणी साचै रहे समाए ॥
नामे नामि रहै बैरागी साचु रखिआ उरि धारे ॥
नानक बिनु नावै जोगु कदे न होवै देखहु रिदै बीचारे ॥ ६८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४६)

शब्दार्थ : **कितु कितु** – कोणकोणत्या. **बिधि** – विधी. **उपजै** – उत्पत्ति. **दुखि** – दु:ख. **बिनसि** – विनाश. **नामि** – प्रभुनाम. **विसरिऐ** – विसरल्याने. **पाई** – प्राप्त होते. **गुरमुखि** – गुरूच्या आज्ञेप्रमाणे आचरण करणारा. **होवै** – होणारा. **गिआनु** – ज्ञान. **ततु** – तत्त्व. **बिचारै** – विचार करतो. **हउमै** – अहंकार. **सबदि** – शब्दाने, प्रभुनामाने. **जलाए** – जाळतो. **नामे** – प्रभुनामात. **रखिआ** – राखतो. **उरि** – हृदयाशी. **धारे** – धारण करतो. **बिनु नावै** – प्रभुनामाशिवाय. **जोगु** – योग. **कदे** – कधीही. **न होवै** – होत नाही. **देखहु** – पाहा.

भावार्थ : योगी नानकांना प्रश्न करतात – हे महापुरुषा ! सांग बरं हा संसार कोणकोणत्या गोष्टींनी उत्पन्न झाला ? कोणकोणत्या प्रकाराने ह्या संसारातील दु:ख नष्ट होते ? नानक उत्तर देतात, हे योगिजन हो ! अहंकारातून हे जग उत्पन्न झाले आहे. प्रभुनामाचा विसर पडल्याने जीव दु:ख भोगतो. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागून जीव मूलतत्त्वाचा, प्रभू परमात्म्याचा विचार करतो. प्रभुनामाच्या उच्चाराने अहंकारास जाळून टाकतो. त्यामुळे त्याचे तन-मन निर्मळ होते व वाणीही निर्मळ होते. असा जीव सत्यस्वरूप परमात्म्यात सामावून जातो. प्रभुनामात तल्लीन झाल्याने तो संसारिक मोहपाशातून विरक्त होतो. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणाशिवाय प्रभुमिलाप पूर्ण होत नाही ह्याचा विचार करा. ॥ ६८ ॥

गुरमुखि साचु सबदु बीचारै कोइ ॥ गुरमुखि सचु बाणी परगटु होइ ॥
गुरमुखि मनु भीजै विरला बूझै कोइ ॥ गुरमुखि, निज घरि वासा होइ ॥
गुरमुखि जोगी जुगति पछाणै ॥ गुरमुखि नानक एको जाणै ॥ ६९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९४६)

शब्दार्थ : **साचु** – सत्य. **बीचारै** – विचार करतो. **सचु** – सत्य. **बाणी** – वाणी. **परगटु** – प्रगट. **भीजै** – एकरूप होणे. **विरला** – क्वचित कोणी. **बुझै** – जाणतो. **वासा** – वास. **जोगी** – योगी. **जुगती** – युक्ती. **पछाणै** – जाणतो. **एको** – एकमेव प्रभू परमात्मा. **जाणै** – जाणतो.

भावार्थ : सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागणारा एखादा साधक सत्यशब्दाचे चिंतन करतो. गुरुमुखी साधकाच्या मनात गुरुद्वारा सत्य प्रभुनाम प्रकट होते व तो त्यात पूर्णपणे एकरूप होऊन जातो. त्याचे मन सत्यवाणीने ओतप्रोत भरून जाते पण हे कोणी विरळाच जाणतो. गुरुमुखी झालेला साधक आपल्या स्वगृही, प्रभू परमात्म्यापाशी वास करतो. गुरुमुखी झालेला साधक त्या एकमेव प्रभू परमात्म्यास ओळखतो. ॥ ६९ ॥

बिनु सतिगुर सेवे जोगु न होई ॥ बिनु सतिगुर भेटे मुकति न कोई ॥

बिनु सतिगुर भेटे नामु पाइआ न जाइ ॥ बिनु सतिगुर भेटे महा दुखु पाइ ॥
बिनु सतिगुर भेटे महा गरबि गुबारि ॥ नानक बिनु गुर मुआ जनमु हारि ॥ ७० ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४६)

शब्दार्थ : **बिनु** – विना, शिवाय. **जोगु** – योग. **मुकति** – मुक्ती. **पाइआ जाइ** – प्राप्त होते. **महादुख**– मोठे दु:ख. **महा गरबि** – महा अहंकारी. **गुबारि** – अंधकार. **मुआ** – मरण. **जनमु** – जन्म. **हारि** – व्यर्थ जातो.

भावार्थ : सतगुरूच्या सेवेशिवाय योग प्राप्त होत नाही. सतगुरू भेटल्याशिवाय मुक्ती प्राप्त होत नाही. सतगुरू भेटल्याशिवाय प्रभुनामाची प्राप्ती होत नाही. जर सतगुरू भेटला नाही तर महादु:ख प्राप्त होते. सतगुरू न भेटल्याने जीवन अहंकारी व अंधकारमय होते. नानक सांगतात, सतगुरूशिवाय जीवन म्हणजे साक्षात मरणच होय. सतगुरू भेटल्याशिवाय हे जीवन व्यर्थ आहे. ॥ ७० ॥

गुरमुखि मनु जीता हउमै मारि ॥ गुरमुखि साचु रखिआ उर धारि ॥
गुरमुखि जगु जीता जमकालु मारि बिदारि ॥ गुरमुखि दरगह न आवै हारि ॥
गुरमुखि मेलि मिलाए सो जाणै ॥ नानक गुरमुखि सबदि पछाणै ॥ ७१ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४६)

शब्दार्थ : **मनु** – मन. **जीत** – जिंकले. **हउमै** – अहंकार. **मारि** – मारून. **साचु**– सत्यरूप प्रभू परमात्मा. **रखिआ** – राखतो. **उर** – हृदय. **धारि** – धारण करतो. **जगु** – जग. **जमकालु** – यमराज. **बिदारि** – विदीर्ण. **दरगह** – प्रभू परमात्म्याचा दरबार. **आवै** – येतो. **हारि** – पराभव, हार. **मेलि मिलाए** – प्रभू परमात्म्याशी एकरूप होतो. **सो** – त्यास. **जाणै** – जाणतो. **सबदि** – शब्दब्रह्म.

भावार्थ : गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा साधक मन जिंकतो व अहंकार नष्ट करतो. गुरुमुखी झालेला साधक सत्यरूप प्रभू परमात्म्यास आपल्या हृदयात धारण करतो. गुरुमुखी झालेला साधक सत्यरूप प्रभू परमात्म्यास आपल्या हृदयात धारण करतो. गुरुमुखी झालेला साधक जग जिंकतो. जगातील मोहमायेवर विषयविकारांवर विजय प्राप्त करतो. यमराजास विदीर्ण करतो. गुरुमुखी साधक प्रभू परमात्म्याच्या दरबारात अपमानित होत नाही. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने प्रभू परमात्म्याशी मिलन होते व तो त्याचे रहस्य जाणतो. नानक सांगतात, गुरुमुखी झालेला साधक प्रभुनामाचे स्मरण केल्याने स्वस्वरूपास व प्रभू परमात्म्यासही ओळखतो. ॥ ७१ ॥

सबदै का निबेडा सुणि तू अउधू बिनु नावै जोगु न होइ ॥
नामे राते अनदिनु माते नामै ते सुखु होई ॥
नामै ही ते सभु परगटु होवै नामे सोझी पाई ॥
बिनु नावै भेख करहि बहुतेरे सचै आपि खुआई ॥
सतिगुर ते नामु पाईऐ अउधू जोग जुगति ता होई ॥

करि बीचारु मनि देखहु नानक बिनु नावै मुकति न होई ॥ ७२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४६)

शब्दार्थ : **निबेडा** – निवाडा, निर्णय. **सुणि** – ऐक. **अउधू** – अवधूत. **बिनु नावै** – प्रभुनामाशिवाय. **जोगु** – योग. **नामे राते** – नामप्राप्ती, प्रभुप्राप्ती, साधनेत रंगून. **माते** – मस्त. **सभु** – सर्व. **परगटु** – प्रगट. **होवै** – होते. **सोझी** – ज्ञान. **भेख** – वेश. **बहुतेरे** – नाना प्रकारचे. **खुआई** – दूर ठेवतो. **सचै** – प्रभू परमात्मा. **आपि** – स्वत:. **पाइऐ** – प्राप्त होते. **ता** – तेव्हा. **करि** – कर. **बीचारु** – विचार. **मनि** – मनात.

भावार्थ : हे अवधूता, प्रभुनामाचा महिमा ऐक. प्रभुनामाशिवाय प्रभू प्राप्त होत नाही, योग पूर्णत्वास जात नाही. जो साधक प्रभुनामात रंगून गेला, प्रभूनामात मस्त झाला. त्याला प्रभुनामामुळे सुख प्राप्त होते. प्रभुनामाने सर्व काही प्रगट होते. प्रभुनामाने ज्ञान प्राप्त होते, समज येते. लोक प्रभुनामाशिवाय (साधना) नाना प्रकारचे वेश करून फिरतात. पण त्यांना प्रभू परमात्मा प्राप्त होत नाही. प्रभू स्वत:च अशा लोकांना दूर ठेवतो. हे अवधूता ! ज्याला सतगुरूकडून प्रभुनामाची प्राप्ती होते त्यालाच योगाचे रहस्य प्राप्त होते. नानक सांगतात, हे अवधूता ! तू आपल्या मनात विचार करून पहा. प्रभुनामाशिवाय मुक्ती प्राप्त होत नाही. ॥ ७२ ॥

तेरी गति मिति तू है जाणहि किआ को आखि वखाणै ॥
तू आपे गुपता आपे परगटु आपे सभि रंग माणै ॥
साधिक सिध गुरू बहु चेले खोजत फिरहि फुरमाणै ॥
मागहि नामु पाइ इह भिखिआ तेरे दरसन कउ कुरबाणै ॥
अबिनासि प्रभि खेलु रचाइआ गुरमुखि सोझी होई ॥
नानक सभि जुग आपे वरतै दूजा अवरु न कोइ ॥ ७३ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४६)

शब्दार्थ : **गति** – अवस्था. **मिति** – परिमाण, मोजमाप. **जाणहि** – जाणतोस. **किआ** – कसे. **को** – कोणी. **वखाणै** – व्याख्या. **गुपता** – गुप्त. **परगटु** – प्रगट. **सभी** – सर्व. **माणै** – भोगतोस. **साधिक** – साधक. **सिध** – सिद्ध. **खोजत** – शोधत. **फुरमाणै** – आज्ञेने. **मागहि** – मागणे. **इह** – ही. **पाइ** – प्राप्त झाली. **भिखिआ** – भिक्षा. **कुरबाणै** – समर्पित. **अबिनासी** – शाश्वत. **खेलु** – खेळ. **रचाइआ** – रचना केली. **सोझी** – समज, ज्ञान. **वरतै** – विद्यमान. **दूजा** – दुसरा. **अवरु** – अन्य.

भावार्थ : हे प्रभो ! तुझी गतिविधी केवळ तूच जाणतोस. तुझ्या निर्मितीचे कोण कसे वर्णन करणार ? स्वत: तू अव्यक्त आहेस आणि प्रगटही तूच आहेस. सर्व रंगाचा उपभोग तूच घेतोस. अनेक साधक, अनेक सिद्ध त्यांचे अनेक गुरू व त्यांचे अनेकानेक शिष्य तुझ्याच आज्ञेने तुझ्या शोधात हिंडत असतात. ते तुझ्या नामप्राप्तीची भिक्षा मागतात. तुझे दर्शन प्राप्त व्हावे म्हणून सर्वस्व समर्पण करतात. हे अविनाशी प्रभू ! हा सारा तूच मांडलेला खेळ आहे. हे ज्ञान सतगुरुद्वाराच प्राप्त होते. हे प्रभू ! एकमेव तूच सर्वत्र क्रियाशील आहेस. तुझ्याशिवाय अन्य कोणीही नाही. ॥ ७३ ॥ १ ॥

रामकली की वार महला ३

जोधै वीरै पुरबाणी की धुनी

जोधै वीरै पुरबाणीच्या चालीवर म्हणावे.

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

॥ सलोकु म. ३ ॥

सतिगुरू सहजै दा खेतु है जिस नो लाए भाउ ॥
नाउ बीजे नाउ उगवै नामे रहै समाइ ॥
हउमै एहो बीजु है सहसा गइआ विलाइ ॥
ना किछु बीजे न उगवै जो बखसे सो खाइ ॥
अंभै सेती अंभु रलिआ बहुड़ि न निकसिआ जाइ ॥
नानक गुरमुखि चलतु है वेखहु लोका आइ ॥
लोकु कि वेखै बपुड़ा जिस नो सोझी नाहि ॥
जिसु वेखाले सो वेखै जिसु वसिआ मन माहि ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ मनमुखु दुख का खेतु है दुखु बीजे दुखु खाइ ॥
दुख विचि जंमै दुखि मरै हउमै करत विहाइ ॥
आवणु जाणु न सुझई अंधा अंधु कमाइ ॥
जो देवै तिसै न जाणई दिते कउ लपटाइ ॥
नानक पूरबि लिखिआ कमावणा अवरु न करणा जाइ ॥ २ ॥
॥ म. ३ ॥ सतिगुरि मिलिऐ सदा सुखु जिस नो आपे मेले सोइ ॥
सुखै एहु बिबेकु है अंतरु निरमलु होइ ॥
अगिआन का भ्रमु कटीऐ गिआनु परापति होइ ॥
नानक एको नदरी आइआ जह देखा तह सोइ ॥ ३ ॥
॥ पउड़ी ॥ सचै तखतु रचाइआ बैसण कउ जांई ॥
सभु किछु आपे आपि है गुर सबदि सुणाई ॥
आपे कुदरति साजीअनु करि महल सराई ॥
चंदु सूरजु दुइ चानणे पूरी बणत बणाई ॥
आपे वेखै सुणे आपि गुर सबदि धिआई ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४७)

शब्दार्थ : **जिसनो** – ज्याच्यावर. **भाउ** – प्रेम, विश्वास. **एहो** – हे. **सहसा** – संशय, शंका. **विलाय** – विलयाला. **अंभै** – पाणी. **रलिआ** – मिळून गेले, एकरूप झाले. **निकसिआ** – काढून घेणे. **चलतु** – खेळ,

लीला. **बपुडा** – बापडा, बिचारा. **सोझी** – ज्ञान, समज. **वेखाले** – दाखवले. **विहाय** – व्यतीत. **सुझई** – समजणे. **कमाणा** – कमावतो, प्राप्त करतो. **जांई** – जागा, स्थान. **कुदरति** – सृष्टी. **सजीअनु** – निर्माण केली. **चानणे** – प्रकाश.

भावार्थ : सतगुरू सहजावस्था प्राप्त करून देणारे शेत आहे. ज्याच्या मनात तो हा भाव उत्पन्न करतो त्याच्या मनात तो प्रभुनामाची बी पेरतो व प्रभुनामाचेच पीक उत्पन्न करतो. असा जीव प्रभुनामात सामावून जातो. अहंकार हे असे बी आहे की त्यातून संशयच निर्माण होते. म्हणून गुरुमार्गी चालणारा भक्त अहंकाराचे बी आपल्या मनात पेरत नाही वा त्याला आपल्या मनात उगवू देत नाही. जे काही प्रभुकृपेने प्राप्त होते तो ते भोगतो. पाण्यात पाणी मिसळले की ते त्यात पूर्णांशाने एकरूप होते. ते परत वेगळे करता येत नाही. त्याप्रमाणे प्रभुसेवक प्रभू परमात्म्याशी एकरूप झाला की परत वियुक्त होत नाही. गुरुमार्गी चालणाऱ्या प्रभुसेवकाची ही लीला सर्व लोक पाहतात. पण लोकांना काय समजणार ? त्या बिचाऱ्यांना त्याचे ज्ञानच नसते. ज्यांना प्रभू परमात्मा ती दृष्टी देतो तेच ही लीला पाहतात व त्यांच्या मनात प्रभू परमात्म्याचा वास होतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ स्वेच्छाचार ही दु:खाची शेती आहे. स्वेच्छाचारी जीव त्यात दु:खाचे बीज पेरतो व दु:खच प्राप्त करतो. तो अहंकारात आपले जीवन व्यतीत करतो. त्यामुळे तो दु:खात जन्मतो व दु:खातच मरतो. त्यास जन्ममरणाचा खरा अर्थच कळत नाही. त्यामुळे अज्ञानात राहून अज्ञानच प्राप्त करतो. जो प्रभू त्याला सर्व काही देतो त्यास तो ओळखत नाही व त्याने दिलेल्या गोष्टीतच केवळ लिप्त होऊन राहतो. नानक सांगतात, प्रत्येक जीवाच्या भाग्यात त्याच्या पूर्वकर्मानुसार प्रभू परमात्म्याने जे लिहिले आहे तेच तो प्राप्त करतो. तो अन्य काही करूच शकत नाही. ॥ २ ॥ म. ३ ॥ ज्याची प्रभू परमात्मा स्वत: भेट घडवतो त्यासच सतगुरू भेटतो व त्याच्याकडून त्यास सुखाची प्राप्ती होते. सुख म्हणजेच विवेक, त्याच्याच बळावर भक्ताचे अंत:करण निर्मळ होते. अज्ञानाचा भ्रम नष्ट होतो व ज्ञानाची प्राप्ती होते. नानक सांगतात, अशा भक्तास सर्वत्र एकमेव प्रभूच दिसतो. तो जिकडे पाहतो तिकडे त्यास प्रभूच दिसतो. ॥ ३ ॥ पउडी ॥ प्रभू परमात्म्याने जीवास आसनस्थ होण्यासाठी सत्यरूप सिंहासन निर्माण केले. सतगुरूच्या उपदेशाने हे कळून येते की सर्व काही प्रभू परमात्मा स्वत:च आहे. प्रभू परमात्म्यानेच ही सृष्टी निर्माण केली. त्यानेच महाल व धर्मशाळा बनवल्या. त्या सर्वांत त्याचाच वास असतो. प्रकाश देण्यासाठी चंद्र व सूर्य हे दोन प्रकाशगोल निर्माण केले व आपल्या कार्यास पूर्णता आणली. प्रभू परमात्मा स्वत:च पाहतो, स्वत: ऐकतो. गुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभुनामाचे ध्यान केल्याने तो प्राप्त होतो. ॥ १ ॥

वाहु वाहु सचे पातिसाह तू सची नाई ॥ १ ॥ रहाउ ॥
॥ सलोकु ॥ कबीर महिदी करिकै घालिआ आपु पीसाइ पीसाइ ॥
तै सह बात न पुछीआ कबहू न लाई पाइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ नानक महिदी करि कै रखिआ सो सहु नदरि करेइ ॥
आपे पीसै आपे घसै आपे ही लाइ लएइ ॥
इहु पिरम पिआला खसम का जै भावै तै देइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ वेकी स्रिसटि उपाईअनु सभ हुकमि आवै जाइ समाही ॥

आपे वेखि विगसदा दूजा को नाही ॥
जिउ भावै तिउ रखु तू गुर सबदि बुझाही ॥
सभना तेरा जोरु है जिउ भावै तिवै चलाही ॥
तुधु जेवडु मै नाहि को किसु आखि सुणाई ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४७)

शब्दार्थ : **वाहुवाहु** – वाहवा, धन्य धन्य. **पातिसाह** – सम्राट. **नाई** – नाम. **महिदी** – मेंदी. **घालिआ** – परिश्रम. **पिसाई** – घासले. **घसै** – घासणे. **पिरम** – प्रेम. **पिआला** – पेला. **खसम** – प्रभू. **वेकी** – नाना प्रकारची. **विगसदा** – विकसित होतो. **दूजा** – दुसरा. **जोरु** – आश्रय. **चलाही** – चालव. **जेवडु** – जेवढा.

भावार्थ : हे सत्यस्वरूप सम्राट प्रभू ! तू धन्य आहेस. तुझे नामही सत्य आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ श्लोक ॥ कबीर म्हणतात, हे प्रभो ! मी मेंदीप्रमाणे स्वत:स घासून घासून खूप परिश्रम करून तुझे प्रेम प्राप्त करण्याचा प्रयत्न केला पण तू तर माझी साधी वास्तपुस्तही केली नाहीस. मला कधी तुझ्या चरणी आश्रयही दिला नाहीस. ॥ १ ॥ म. ३ ॥ नानक सांगतात, मी पण माझे जीवन घोटून मेंदी बनवून त्याच्या चरणी ठेवले आहे. तो प्रभू जेव्हा माझ्यावर कृपा करील, तेव्हा तो स्वत: ती मेंदी घासून, घोटून स्वत:च लावून घेईल. प्रभुनामाचा पेला प्रभुपाशीच आहे. त्याला वाटेल त्याच जीवास तो, तो, देईल. ॥ २ ॥ पउडी ॥ नाना परीची ही सृष्टी प्रभूपरमात्म्याने उत्पन्न केली. सर्व जीव त्याच्याच इच्छेने ह्या जगात येतात व त्याच्याच इच्छेने निघून जातात. प्रभू स्वत: ते पाहून त्याचा आनंद उपभोगतो. त्याच्याशिवाय असे करणारा अन्य कोणीही नाही. हे प्रभो ! तुला जसे वाटते तसे तू जीवांना ठेवतोस व त्यांना सतगुरूच्या उपदेशातून ज्ञान देतोस. हे प्रभो ! सर्व जीव तुझ्याच आज्ञेत असतात. तुझ्या इच्छेप्रमाणे तू त्यांना चालवतोस. हे प्रभो ! मी काही तुझ्यासारखा श्रेष्ठ नाही. मी तुला काय सांगणार ? ॥ २ ॥

॥ सलोकु म. ३ ॥

भरमि भुलाई सभु जगु फिरी फावी होई भालि ॥
सो सहु सांति न देवई किआ चलै तिसु नालि ॥
गुर परसादी हरि धिआईऐ अंतरि रखीऐ उर धारि ॥
नानक घरि बैठिआ सहु पाइआ जा किरपा कीती करतारि ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ धंधा धावत दिनु गइआ रैणि गवाई सोइ ॥
कूडु बोलि बिखु खाइआ मनमुखि चलिआ रोइ ॥
सिरै उपरि जम डंडु है दूजै भाइ पति खोइ ॥
हरि नामु कदे न चेतिओ फिरि आवण जाणा होइ ॥
गुर परसादी हरि मनि वसै जम डंडु न लागै कोइ ॥
नानक सहजे मिलि रहै करमि परापति होइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ इकि आपणी सिफती लाइअनु दे सतिगुर मती ॥
इकना नो नाउ बखसिओनु असथिरु हरि सती ॥
पउणु पाणी बैसंतरो हुकमि करहि भगती ॥

एना नो भउ अगला पूरी बणत बणती ॥
सभु इको हुकमु वरतदा मंनिऐ सुखु पाई ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४७)

शब्दार्थ : **फावी** – शोधता शोधता. **भालि** – थकलो. **सहु** – पती, परमात्मा. **करतारि** – कर्ता प्रभू. **चेतिओ** – चिंतन केले. **सहजे** – सहजावस्था, स्वाभाविकपणे. **सिफती** – स्तुती. **बखसिओनु** – प्रदान केले. **सती** – सत्यस्वरूप. **बैसंतरो** – अग्नी. **एना नो** – ह्या सर्वांना. **भउ** – भय. **अगला** – खूप.

भावार्थ : हे प्रभो ! सारे जग भ्रमात भुलले आहे. मी तुला शोधत शोधत खूप हिंडून आता थकलो आहे. जोपर्यंत तो प्रभुपती जीवास शांती प्रदान करत नाही, तोपर्यंत त्याच्यापुढे काही इलाजही चालत नाही. सतगुरूच्या कृपेनेच प्रभूचे ध्यान केले जाते व त्यास अंत:करणात धारण करता येते. नानक सांगतात, जेव्हा त्या कर्त्या प्रभूने कृपा केली, तेव्हा त्याने स्वत: माझ्या अंत:करणात स्थान ग्रहण केले. ॥ १ ॥ म. ३ ॥ धंद्यामागे धावण्यात दिवस गेला. रात्र झोपण्यात घालवली. असत्य बोलून विष खाल्ले. अशा रीतीने स्वेच्छाचारी जीव विलाप करत ह्या जगातून निघून जातो. त्याच्या डोक्यावर यमाचा दंडा पडतो व तो द्वैतभावात गुंतून आपली पत घालवून बसतो. त्याने कधीही हरिनामाचे चिंतन केले नाही त्यामुळे तो जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतो. सतगुरुकृपेने प्रभू परमात्म्याचा हृदयात वास होतो. मग त्यास यमदंडाचा त्रास सोसावा लागत नाही. नानक सांगतात, असा जीव सहजावस्थेत लीन होतो. पण हे सारे प्रभू परमात्म्याच्या कृपेनेच प्राप्त होते. ॥ २ ॥ पउडी ॥ प्रभू परमात्मा स्वत: काही लोकांना सतगुरूच्या माध्यमातून प्रभूची स्तुती करण्याची बुद्धी देतो. त्यांना भक्तीमार्गास लावतो. काही लोकांना तो प्रभू स्वत: आपले नाम प्रदान करून सत्यात स्थिर करतो. पवन, पाणी, अग्नी सारे जण त्याच्याच आज्ञेत प्रभूची भक्ती करतात. ह्या सर्वांच्या मनात प्रभूविषयी आदरयुक्त भीती वास करते. प्रभू परमात्म्यानेच ह्या सृष्टीची अशा प्रकारची रचना केली आहे. सर्वजण त्या एकमेव प्रभूच्या आज्ञेतच आपापले व्यवहार करतात. प्रभूची आज्ञा मान्य केल्यानेच सुखाची प्राप्ती होते. ॥ ३ ॥

॥ सलोकु ॥

कबीर कसउटी राम की झूठा टिकै न कोइ ॥
राम कसउटी सो सहै जो मरजीवा होइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ किउ करि इहु मनु मारीऐ किउ करि मिरतकु होइ ॥
कहिआ सबदु न मानई हउमै छडै न कोइ ॥
गुर परसादी हउमै छुटै जीवन मुकतु सो होइ ॥
नानक जिस नो बखसे तिसु मिलै तिसु बिघनु न लागै कोइ ॥ २ ॥
॥ म. ३ ॥ जीवत मरणा सभु को कहै जीवन मुकति किउ होइ ॥
भै का संजमु जे करे दारू भाउ लाएइ ॥
अनदिनु गुण गावै सुख सहजे बिखु भवजलु नामि तरेइ ॥
नानक गुरमुखि पाईऐ जा कउ नदरि करेइ ॥ ३ ॥
॥ पउड़ी ॥ दूजा भाउ रचाइओनु त्रै गुण वरतारा ॥

ब्रहमा बिसनु महेसु उपाइअनु हुकमि कमावनि कारा ॥
पंडित पड़दे जोतकी ना बूझहि बीचारा ॥
सभु किछु तेरा खेलु है सचु सिरजणहारा ॥
जिसु भावै तिसु बखसि लैहि सचि सबदि समाई ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४८)

शब्दार्थ : **कसउटी** – कसोटी, सोन्याची शुद्धता पारखण्याचा दगड. **सहै** – सहन करतो. **मरजीवा** – मोहमायेप्रती मृत होऊन जीवन जगतो. **कहिआ** – सांगितलेला. **छडै** – सोडतो. **बखसे** – कृपा करतो. **किउ** – कशी, कशाप्रकारे. **दारू** – औषध. **भाउ** – प्रेम, श्रद्धा. **दूजा** – द्वैतभाव. **वरतारा** – प्रसार, व्यवहार. **कारा** – कार्य. **जोतकी** – ज्योतिष.

भावार्थ : कबीर सांगतात, प्रभू परमात्म्याच्या कसोटीवर असत्य टिकाव धरू शकत नाही. तोच प्रभूच्या कसोटीवर टिकतो, जो मोहमायेस मारुन टाकून आपले जीवन जगतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ हे मना ! मनातील विकार वासना कशा माराव्यात ? मोहमायेप्रती मृत कसे व्हावे ? कारण कोणीही सतगुरूचा उपदेश मानत नाही. आपला अहंकार सोडत नाही. सतगुरुकृपेने ज्याचा अहंकार नष्ट झाला तो जीवनमुक्त होतो. नानक सांगतात, ज्याच्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो त्यासच हे साध्य होते. मग त्याच्या मार्गात कोणताही अडथळा येत नाही. ॥ २ ॥म. ३॥ जिवंत राहून मायेप्रती मरण्याच्या गोष्टी सर्वजण करतात. पण जीवनमुक्त कसे होता येईल? जो मनात प्रभूविषयी आदरयुक्त भीती बाळगेल, संयमित वर्तन करेल, प्रभू परमात्म्याबद्दलचे भक्तिभावरूपी औषध घेईल, सदैव प्रभूचे गुणगान करील तो सहजावस्था प्राप्त करून सुखी होईल व प्रभुनामाच्या साहाय्याने हा भवसागर तरून जाईल. नानक सांगतात, ज्याच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होईल तो गुरूच्या उपदेशाप्राणे आचरण करून मुक्ती प्राप्त करील. ॥ ३ ॥ पउडी ॥ द्वैतभावाची रचना प्रभू परमात्म्यानेच केली आहे. त्यानेच सत्त्व, रज, तम ह्या त्रिगुणांना व्यवहारात कार्यशील केले आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश यांनाही त्यानेच उत्पन्न करून आपल्या आज्ञेनुसार कार्य करावयास लावले आहे. पंडित व ज्योतिषी मोठमोठे धर्मग्रंथ वाचतात पण त्यांना त्यांचे मुख्य मर्मच कळत नाही. हे सृजनकर्ता सत्यरूप प्रभू ! ही सारी तुझीच लीला आहे. जे तुला आवडतात त्यांच्यावर तू कृपा करतोस व त्यांना सत्य शब्दात लीन करू घेतोस व मुक्त करतोस. ॥ ४ ॥

॥ सलोकु म. ३ ॥
मन का झूठा झूठु कमावै ॥ माइआ नो फिरै तपा सदावै ॥
भरमे भूला सभि तीरथ गहै ॥ ओहु तपा कैसे परमगति लहै ॥
गुर परसादी को सचु कमावै ॥ नानक सो तपा मोखंतरू पावै ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ सो तपा जि इहु तपु घाले ॥ सतिगुर नो मिलै सबदु समाले ॥
सतिगुर की सेवा इहु तपु परवाणु ॥
नानक सो तपा दरगहि पावै माणु ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ राति दिनसु उपाइअनु संसार की वरतणि ॥
गुरमती घटि चानणा आनेरु बिनासणि ॥

हुकमे ही सभ सजीअनु रविआ सभ वणि त्रिणि ॥
सभु किछु आपे आपि है गुरमुखि सदा हरि भणि ॥
सबदे ही सोझी पई सचै आपि बुझाई ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४८)

शब्दार्थ : **तपा** – तपस्वी. **सदावै** – म्हणवतो. **गहै** – स्नान करतो. **मोखंतरु** – मोक्ष, मुक्ती. **समाले** – स्मरण करतो. **उपाइअनु** – उत्पन्न केले. **वरतणि** – वर्तन, व्यवहार. **चानणा** – प्रकाश. **आनेरु** – अज्ञान, अंधकार. **साजीअनु** – निर्माण केले. **रविआ** – व्याप्त. **भणि** – बोलतो. **सोझी** – ज्ञान.

भावार्थ : ज्याच्या मनात असत्य आहे त्याचे आचरणही असत्य असते. तो मायेतच गुरफटलेले असतो पण स्वत:स तपस्वी म्हणवतो. तो भ्रमाने भरकटत तीर्थयात्रा करत हिंडतो. अशा तपस्व्यास परमगती कशी प्राप्त होणार ? नानक सांगतात, सतगुरुकृपेने ज्याला सत्याची प्राप्ती होते, त्या तपस्व्यासच मोक्ष प्राप्त होतो. ॥१॥म.३॥ तोच खरा तपस्वी जो असे परिश्रम करतो की ज्यामुळे सतगुरूची भेट होऊन त्याच्याकडून प्रभुनामाची प्राप्ती होईल. ते नाम तो आपल्या हृदयात जपून ठेवील व सदैव नामस्मरणात तल्लीन होऊन राहील. सतगुरूची सेवा हेच खरे तप होय. तेच प्रभू दरबारी स्वीकृत होते. नानक सांगतात, असा तपस्वी प्रभू दरबारात सन्मान प्राप्त करतो. ॥ २ ॥ त्या प्रभूने रात्र व दिवस निर्माण केले. त्यानुसार जगातील सारे व्यवहार चालतात. सतगुरूच्या उपदेशाने अंत:करणात आत्मज्ञानाचा प्रकाश पसरतो अज्ञान, अंधकार नष्ट होतो. प्रभूने आपल्या इच्छेनुसार सारी सृष्टी निर्माण केली व तो त्यात, वनात, तृणात, साऱ्या सृष्टीत भरून राहिला आहे. सर्व काही तो प्रभूच आहे. हे जीवा ! तू गुरुमार्गी चालून सदैव प्रभुनामाचा जप कर. शब्दब्रह्माच्या माध्यमातून प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होते. प्रभू परमात्माच जीवास ते ज्ञान देतो. ॥ ५ ॥

॥ सलोक म. ३ ॥
अभिआगत एहि न आखीअनि जिन के चित महि भरमु ॥
तिस दै दितै नानका तेहो जेहा धरमु ॥
अभै निरंजनु परम पदु ता का भूखा होइ ॥
तिस का भोजनु नानका विरला पाए कोइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ अभिआगत एहि न आखीअनि जि पर घरि भोजनु करेनि ॥
उदरै कारणि आपणे बहले भेख करेनि ॥
अभिआगत सेई नानका जि आतम गउणु करेनि ॥
भालि लहनि सहु आपणा निज घरि रहणु करेनि ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ अंबरु धरित विछोड़िअनु विचि सचा असराउ ॥
घरू दरू सभो सचु है जिसु विचि सचा नाउ ॥
सभु सचा हुकमु वरतदा गुरमुखि सचि समाउ ॥
सचा आपि तखतु सचा बहि सचा करे निआउ ॥
सभु सचो सचु वरतदा गुरमुखि अलखु लखाई ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४९)

शब्दार्थ : **अभिआगत** – अभ्यागत, साधू. **अखिअनी** –जाणावा, म्हणावा. **तिस** – त्याने. **दै** – दिलेले. **दितै** – दान. **तेहो** – तसेच. **जेहा** – जसा. **अभै** – अभय. **बहले** – नाना प्रकारचे. **गउणु** – गुणांचा शोध. **भालि** – शोध. **सहु** – पती, प्रभू. **अंबरू** – आकाश. **विछोडिअनु** – विभक्त करणे. **विचि** – मध्ये. **अखराउ** – आश्रय. **बहि** – बसून. **निआउ** – न्याय. **अलखु** – अलक्ष. **लखाई** – दाखवले.

भावार्थ : ज्याच्या मनात भ्रम आहे त्याला साधू म्हणू नये. नानक सांगतात, त्यास दिलेल्या दानाचा परिणामही तसाच होतो, म्हणजे देणाऱ्याच्या मनातही भ्रम पैदा होतो. खरा साधू तो, जो निर्भय, निरंजन अशा परमपदाचा भुकलेला असतो. नानक सांगतात, असे भोजन एखाद्या विरळ्या माणसासच प्राप्त होते. ॥ १ ॥ जो दुसऱ्याच्या घरी भोजन करतो त्यास साधू म्हणू नये. असे साधू आपल्या पोटापाण्यासाठी नाना वेश परिधान करतात. नानक सांगतात तोच खरा साधू जो आत्म्याचा शोध घेतो. तो आपल्या प्रभुपतीस शोधून काढून आत्मस्वरूपात लीन होऊन राहतो. ॥ २ ॥ पउडी ॥ ह्या सृष्टीचे, प्रभू परमात्म्याने आकाश व धरती असे दोन भाग केले आहेत. ह्या दोनही भागातील प्रत्येक वस्तूत प्रभू परमात्म्याचाच आश्रय असतो. ज्या ठिकाणी सत्यरूप प्रभूचे नाम उच्चारले जाते ते घर–दार सत्य आहे. सर्व काही प्रभूच्या आज्ञेनेच चालते. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करण्यातच सत्य सामावलेले असते. तो सत्यरूप परमात्मा सत्यरूप सिंहासनावर बसून सत्य न्याय करतो. सर्व काही तो सत्यस्वरूप परमात्माच आहे. त्याचे सारे व्यवहार ही सत्य आहेत. तो सर्वव्याप्त आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने तो अदृश्य परमात्मा दृष्यमान होतो. ॥ ६ ॥

॥ सलोकु म. ३ ॥

रैणाइर माहि अनंतु है कूड़ि आवै जाइ ॥
भाणै चलै आपणै बहुती लहै सजाइ ॥
रैणाइर महि सभु किछु है करमी पलै पाइ ॥
नानक नउनिधि पाईऐ जे चलै तिसे रजाइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ सहजे सतिगुरू न सेविओ विचि हउमै जनमि बिनासु ॥
रसना हरि रसु न चखिओ कमलु न होइओ परगासु ॥
बिखु खाधी मनमुखु मुआ माइआ मोहि विणासु ॥
इकसु हरि के नाम विणु धिगु जीवणु धिगु वासु ॥
जा आपे नदरि करे प्रभु साचा ता होवै दासनि दासु ॥
ता अनदिनु सेवा करे सतिगुरू की कबहि न छोडै पासु ॥
जिउ जल महि कमलु अलिपतो वरतै तिउ विचे गिरह उदासु ॥
जन नानक करे कराइआ सभु को जिउ भावै तिव हरि गुणतासु ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ छतीह जुग गुबारु सा आपे गणत कीनी ॥
आपे स्रिसटि सभ साजीअनु आपि मति दीनी ॥
सिम्रिति सासत साजिअनु पाप पुंन गणत गणीनी ॥

जिसु बुझाए सो बुझसी सचै सबदि पतीनी ॥
सभु आपे आपि वरतदा आपे बखसि मिलाई ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९४९)

शब्दार्थ : **रैणाइर** – सागर, संसार. **माहि** – मध्ये. **कुडी** – असत्य. **भाणे** – इच्छा. **सजाइ** – शिक्षा. **करमी** – कृपा. **सहजे** – सहजभावाने. **बिखु** – वीण. **खाधी** – खातो. **विणासु** – विनाश. **पासु** – संगत. **अलिपती** – अलिप्त, निर्लेप. **गिरह** – गृहस्थी. **छतीह** – छत्तीस. **गुबारु** – अंधकार. **साजीअनु** – उत्पन्न केली. **मति** – बुद्धी. **पतीनी** – लीन होणे.

भावार्थ : ह्या संसार सागरात त्या अनंत प्रभू परमात्म्याचा वास आहे व जन्ममरणाच्या चक्रात फिरणारी ही सृष्टी मिथ्या आहे. ही नाशवंत सृष्टी आपल्या इच्छेने चालते म्हणून ती अनंत यातना भोगते. वास्तविक ह्या संसारात सर्व काही आहे. पण ते सर्व प्रभुकृपेने प्राप्त होते. नानक सांगतात, जे प्रभू परमात्म्याच्या इच्छेप्रमाणे आचरण करतात त्यांना सर्व, नऊनिधी प्राप्त होतात. ॥ १ ॥ म. ३ ॥ जो जीव सहजभावाने सतगुरूची सेवा करत नाही तो आपला जन्म अहंकारात वाया घालवतो. ज्याच्या जिव्हेने हरिप्रेमामृत चाखले नाही त्याचे हृदयकमल विकसित होत नाही. स्वेच्छाचारी जीव विषयविकाररूपी वीष खाऊन आपल्या मरणाने मरतात. मोहमायेत गुंतून नष्ट होतात. एकमेव प्रभू परमात्म्याच्या नामाशिवाय जीवन व्यर्थ होय. अशा जीवाच्या ह्या जगातील वासही व्यर्थ होय. ज्याच्यावर सत्यरूप प्रभूची कृपा होते तो त्याचा दासानुदास होतो. तो सदैव प्रभू परमात्म्याची सेवा करतो व कधीही सतगुरूची साथ संगत सोडत नाही. ज्याप्रमाणे पाण्यात राहूनही कमळ पाण्यापासून अलिप्त असते, त्याप्रमाणे असा जीव संसारात राहूनही संसारापासून अलिप्त असतो. दास नानक सांगतात, असा प्रभुभक्त तेच करतो व करवतो जे त्या गुणनिधी प्रभू परमात्म्यास आवडेल. ॥ २ ॥ पउडी ॥ युगानुयुगे सर्वत्र दाट अंधार होता. मग प्रभूने स्वत:स प्रगट केले मग त्याने सृष्टी निर्माण केली व त्याने जीवांना विवेकबुद्धी दिली. मग त्याने स्मृती, शास्त्रे निर्माण केली. पापपुण्याचा हिशोब त्यांच्यामागे लावला. तो प्रभू ज्यास ज्ञान देतो तोच हे रहस्य जाणतो व तो सत्यनामात लीन होतो. प्रभू परमात्माच सर्व काही आहे. तो सर्वव्याप्त आहे. ज्याच्यावर तो कृपा करतो त्यास तो आपल्याशी एकरूप करून घेतो. ॥ ७ ॥

॥ सलोक म. ३ ॥

इहु तनु सभो रतु है रतु बिनु तंनु न होइ ॥
जो सहि रते आपणै तिन तनि लोभ रतु न होइ ॥
भै पइऐ तनु खीणु होइ लोभ रतु विचहु जाइ ॥
जिउ बैसंतरि धातु सुधु होइ तिउ हरि का भउ दुरमति मैलु गवाइ ॥
नानक ते जन सोहणे जो रते हरि रंगु लाइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ रामकली रामु मनि वसिआ ता बनिआ सीगारु ॥
गुर कै सबदि कमलु बिगसिआ ता सउपिआ भगति भंडारु ॥
भरमु गइआ ता जागिआ चूका अगिआन अंधारु ॥
तिस नो रूपु अति अगला जिसु हरि नालि पिआरु ॥

सदा रवै पिरु आपणा सोभावंती नारि ॥
मनमुखि सीगारु न जाणनी जासनि जनमु सभु हारि ॥
बिनु हरि भगती सीगारु करहि नित जंमहि होइ खुआरु ॥
सैसारै विचि सोभ न पाइनी अगै जि करे सु जाणै करतारु ॥
नानक सचा एकु है दुहु विचि है संसारु ॥
चंगै मंदै आपि लाइअनु सो करनि जि आपि कराए करतारु ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९४९)

शब्दार्थ : रतु - रक्त. रते - अनुरक्त, रममाण. खिणु - क्षीण. सोहणे - सुंदर. सीगारु - शृंगार. सउपिआ - सोपवले, दिले. चूका - नष्ट झाला. खै - भोगतो, रममाण होतो. सोभ - शोभा. जासनि - जाते. सैसारे - संसारात. दुहु - द्वैत. चंगै - शुभ. मंदै - अशुभ.

भावार्थ : हे मानवी शरीर रक्ताचे बनले आहे. रक्ताशिवाय शरीर शक्यच नाही. जो प्रभू परमात्म्यावर अनुरक्त झाला त्याच्या शरीरातील लोभरूपी रक्त नाहीसे होते. ज्याप्रमाणे अग्नीमध्ये धातू शुद्ध होतो त्याप्रमाणे प्रभूच्या भयाने मनातील दुर्मतीचा मळ जळून जातो. प्रभूविषयी आदरयुक्त भीती मनात उत्पन्न झाल्याने जीव क्षीण होतो. शरीरातील लोभरूपी रक्त जळून जाते. नानक सांगतात, जो हरिरंगात रंगून गेला तो प्रभुसेवक सुंदर दिसतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ रामकली रागात प्रभू परमात्म्याचे केलेले गुणगान मनात दृढपणे धारण करणे हाच खरा शृंगार होय. सतगुरूच्या उपदेशाने हृदयकमल विकसित होते, तेव्हा प्रभू परमात्मा सेवकाचे हाती भक्ती भांडार सोपवतो. जेव्हा जीवाच्या मनातील अज्ञान, अंधकार नष्ट होऊन तो जागृत होतो त्याच्या मनातील अज्ञान, अंधकार नष्ट होतो. ज्याच्या मनात प्रभूविषयी प्रेम उत्पन्न झाले त्याचे रूप अत्यंत वेगळे दिसते. ती जीवस्त्री सदैव आपल्या प्रियकराशी, प्रभू परमात्म्याशी, रममाण होते. स्वेच्छाचारी जीव असा शृंगार जाणत नाही त्यामुळे तो आयुष्यात पराभूत होतो. हरिभक्तीशिवाय शृंगार करणारे सदैव जन्ममरणाचे दु:ख भोगतात. ह्या संसारात त्यांना सन्मान प्राप्त होत नाहीच पण पुढे परलोकात त्यांची काय गत होते, ते तो प्रभू परमात्माच जाणे. नानक सांगतात, तो एकमेव प्रभू परमात्माच सत्य आहे. बाकी सारा संसार द्वैतभावात अडकलेला आहे. शुभाशुभ कर्मे प्रभूनेच निर्माण केली आहेत. तो जे कर्म करावयास लावतो तेच जीवास करावे लागते. ॥ २ ॥

॥ सलोकु म. ३ ॥
बिनु सतिगुर सेवे सांति न आवई दूजी नाही जाइ ॥
जे बहुतेरा लोचीऐ विणु करमा पाइआ न जाइ ॥
अंतरि लोभ विकारु है दूजै भाइ खुआइ ॥
तिन जंमणु मरणु न चुकई हउमै विचि दुखु पाइ ॥
जिनी सतिगुर सिउ चितु लाइआ सो खाली कोई नाहि ॥
तिन जम की तलब न होवई ना ओइ दुख सहाहि ॥
नानक गुरमुखि उबरे सचै सबदि समाहि ॥ ३ ॥

॥ पउड़ी ॥ आपि अलिपतु सदा रहै होरि धंधै सभि धावहि ॥
आपि निहचलु अचलु है होरि आवहि जावहि ॥
सदा सदा हरि धिआईऐ गुरमुखि सुखु पावहि ॥
निज घरि वासा पाईऐ सचि सिफति समावहि ॥
सचा गहिर गंभीरु है गुर सबदि बुझाई ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९५०)

शब्दार्थ : बहुतेरा - खूप. लोचीऐ - इच्छिले. करमा - कृपा. सिउ - शी, बरोबर, सह. खाली - कमतरता. तलब - बोलावणे. सहाही - सहन करणे. होरि - अन्य. अचलु - नश्वर. सिफति - स्तुती.

भावार्थ : सतगुरूची सेवा केल्याशिवाय मनास शांती लाभत नाही. मनातील द्वैतभाव जात नाही. कितीही इच्छा केली तरी प्रभुकृपेशिवाय काहीही प्राप्त होत नाही. ज्यांच्या मनात लोभरूपी विकार आहे ते द्वैतभावात अडकून भटकत राहतात. त्यांचे जन्ममरण चुकत नाही. ते अहंकारात बुडून दु:ख प्राप्त करतात. ज्यांनी आपले चित्त सतगुरूच्या सेवेस लावले त्यास कोणत्याही गोष्टीची कमतरता राहत नाही. त्याला यमाचे बोलावणे येत नाही वा त्याला दु:खही सोसावे लागत नाही. नानक सांगतात, गुरुमार्गी चालून अशा जीवाचा उद्धार होतो व तो सत्यनामात एकरूप होतो. ॥ ३ ॥ पउडी ॥ प्रभू स्वत: सर्व गोष्टींपासून अलिप्त असतो. इतर सारे जीव मात्र धंद्यासाठी सदैव धावपळ करत असतात. प्रभू स्वत: निश्चल राहतो बाकी सर्व गोष्टी मात्र नश्वर आहेत. त्या येतात आणि जातात. हे जीवा ! तू सदासर्वदा प्रभू परमात्याचे स्मरण कर व गुरुमार्गी चालून सुख प्राप्त कर. असा जीव आपल्या आत्मस्वरूपात वास करतो व सत्यरूप प्रभूच्या गुणस्तुतीत तल्लीन होतो. प्रभू परमात्मा सत्य आहे. गहन गंभीर आहे. शब्दगुरूच्या माध्यमातून त्याचे ज्ञान प्राप्त होते. ॥ ८ ॥

॥ सलोक म. ३ ॥
सचा नामु धिआइ तू सभो वरतै सचु ॥
नानक हुकमै जो बुझै सो फलु पाए सचु ॥
कथनी बदनी करता फिरै हुकमु न बूझै सचु ॥
नानक हरि का भाणा मंने सो भगतु होइ विणु मंने कचु निकचु ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ मनमुख बोलि न जाणनी ओना अंदरि कामु क्रोधु अहंकारु ॥
ओइ थाउ कुथाउ न जाणनी उन अंतरि लोभु विकारु ॥
ओइ आपणै सुआइ आइ बहि गला करहि ओना मारे जमु जंदारु ॥
अगै दरगह लेखै मंगिऐ मारि खुआरु कीचहि कुड़िआर ॥
एह कूड़ै की मलु किउ उतरै कोइ कढहु इहु वीचारु ॥
सतिगुरु मिलै ता नामु दिड़ाए सभि किलविख कटणहारु ॥
नामु जपे नामो आराधे तिसु जन कउ करहु सभि नमसकारु ॥
मलु कूड़ी नामि उतारीअनु जपि नामु होआ सचिआरु ॥
जन नानक जिस दे एहि चलत हहि सो जीवउ देवणहारु ॥ २ ॥

॥ पउड़ी ॥ तुधु जेवडु दाता नाहि किसु आखि सुणाईऐ ॥
गुर परसादी पाइ जिथहु हउमै जाईऐ ॥
रस कस सादा बाहरा सची वडिआईऐ ॥
जिस नो बखसे तिसु देइ आपि लए मिलाईऐ ॥
घट अंतरि अंम्रितु रखिओनु गुरमुखि किसै पिआई ॥ ९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५०)

शब्दार्थ : **वरते** – व्याप्त. **कथनी** – सांगून. **बदनी** – बोलणे. **भाणा** – आज्ञा, इच्छा. **कचु निकचु** – कच्च्याहून कच्चा. **कीचहि** – . **थाहु** – स्थान. **कुथाउ** – वाईट स्थान. **सुआइ** – स्वार्थ. **गला** – गोष्टी, गप्पा. **ओना** – त्यांना. **कीचहि** – . **कुडिआर** – असत्य. **कढहु** – प्रगट. **कटनहार** – नष्ट करणारा. **उतरीअनु** – दूर करणारा. **चलत** – कौतुक. **जिवहु** – जेथून, त्याचा.

भावार्थ : हे जीवा ! तू सदैव सत्यरूप प्रभुनामाचे स्मरण कर. तो सत्यरूप प्रभू सर्वव्याप्त आहे. नानक सांगतात, जो प्रभू परमात्म्याची आज्ञा जाणतो, त्यासच फल प्राप्त होते. जो नुसता गप्पा मारत फिरतो त्यास सत्यरूप प्रभूची आज्ञा समजत नाही. नानक सांगतात, जो प्रभूची आज्ञा शिरसावंद्य मानतो तो प्रभू परमात्म्याचा भक्त होतो. जो प्रभूची आज्ञा मान्य करत नाही त्याचे जीवन व्यर्थ होते. ॥ १ ॥ म. ३ ॥ स्वेच्छाचारी जीवास त्याचे (प्रभूचे) बोलणे कळतच नाही कारण त्याचे अंत:करण काम, क्रोध व अहंकार याने भरलेले असते. त्याला चांगले काय व वाईट काय हे सुद्धा कळत नाही. कारण त्यांच्या अंत:करणात लोभ विकार प्रबल असतो. तो आपल्या स्वार्थापुरता इतरांशी गोड बोलतो. त्यास यम दंडा मारतो. त्याच्याकडे प्रभू दरबारात परलोकात त्याच्या कर्माचा जाब मागितला जातो. वाईट कर्म केल्याबद्दल त्यास खूप मार देऊन परत पाठवले जाते. हा असत्याचा मळ कसा निघून जाईल ते कोणी मला प्रगट करून सांगेल का ? जर सतगुरू प्राप्त झाला तर ती जीवाच्या मनात, सर्व पापांचा नाश करणारे प्रभुनाम दृढ करतो. जो सदैव प्रभुनामाचा जप करतो, प्रभुनामाची आराधना करतो अशा प्रभुसेवकास सर्वजण नमस्कार करतात. प्रभुनामाने असत्याचा मळ नष्ट होतो. प्रभुनामाचा जप करणारा सत्याचरणी होतो. दास नानक सांगतात, ज्या प्रभू परमात्म्याची ही सारी लीला आहे, त्या जीवन देणाऱ्या प्रभूमध्ये लीन होऊन जावे. ॥ २ ॥ पउडी ॥ हे प्रभो ! तुझ्यासारखा महान दाता कोणी नाही. तुझ्याशिवाय अन्य कोणाकडे मी याचना करू ? सतगुरुकृपेने त्याची (प्रभूची) प्राप्ती होते. त्यामुळे मनातील अहंकार नष्ट होतो. तो प्रभू सर्व रसांच्या व सर्व विषयांच्याही पलीकडे आहे. प्रभू परमात्म्याची हीच महती आहे. ज्याच्यावर त्याची कृपा होतो त्यास तो आत्मज्ञान देतो व त्यास आपल्याशी एकरूप करून घेतो. प्रभू परमात्म्याने प्रत्येक जीवाच्या अंतरात प्रभुनामामृत ठेवले आहे पण जो गुरुमार्गी चालतो त्यासच हे कळते व तोच प्रभुनामामृत प्राशन करतो. ॥ ९ ॥

॥ सलोक म. ३ ॥
बाबाणीआ कहाणीआ पुत सपुत करेनि ॥
जि सतिगुर भावै सु मंनि लैनि सेई करम करेनि ॥
जाइ पुछहु सिम्रिति सासत बिआस सुक नारद बचन सभ स्रिसटि करेनि ॥
सचै लाए सचि लगे सदा सचु समालेनि ॥

नानक आए से परवाणु भए जि सगले कुल तारेनि ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ गुरू जिना का अंधुला सिख भी अंधे करम करेनि ॥
ओइ भाणै चलनि आपणै नित झूठो झूठु बोलेनि ॥
कूडु कुसतु कमावदे पर निंदा सदा करेनि ॥
ओइ आपि डुबे पर निंदका सगले कुल डोबेनि ॥
नानक जितु ओइ लाए तितु लगे उइ बपुड़े किआ करेनि ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ सभ नदरी अंदरि रखदा जेती सिसटि सभ कीती ॥
इकि कूड़ि कुसति लाइअनु मनमुख विगूती ॥
गुरमुखि सदा धिआईऐ अंदरि हरि प्रीती ॥
जिन कउ पोतै पुंनु है तिन्ह वाति सिपीती ॥
नानक नामु धिआईऐ सचु सिफति सनाई ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५१)

शब्दार्थ : **बाबाणीआ** – पूर्वजांच्या. **कहाणिआ** – गोष्टीचरीचे. **सपुत** – सुपुत्र. **करेनि** – करतात, सांगतात. **बिआस** – व्यास. **सुक** – शुकमुनी. **बचन** – उपदेश. **समालेनि** – स्मरण करतात, सांभाळतात. **अंधुला** – अंधळा. **कुसतु** – असत्य. **डोबेनि** – बुडवतात. **जेती** – जितकी. **सिसटी** – सृष्टी. **पोतै** – पदरात. **वाति** – मुखात. **सिपीती** – स्तुती. **सिफति** – स्तुती. **सनाई** – प्रशंसा बढाई.

भावार्थ : जे पुत्र सुपुत्र असतात ते आपल्या वाडवडिलांची कीर्ती गातात. जे सतगुरूचे लाडके असतात ते सतगुरूची आज्ञा मान्य करतात व त्याप्रमाणे आपले आचरण करतात. सर्व सृष्टीला ज्ञान देणारे वेद, स्मृती हे ग्रंथ तसेच व्यास, शुकमुनी, नारद आदी श्रेष्ठ पुरुषांना जाऊन विचारा तेही तुम्हाला हेच सांगतील. सत्यात लीन झाल्याने सत्यच प्राप्त होते व जीव सत्यात सामावून जातो. नानक सांगतात, अशा भक्तांचे जीवन सफल होते. प्रभू त्यांचा स्वीकार करतो व त्यांच्या कुलाचाही उद्धार होतो. ॥ १ ॥ म. ३ ॥ ज्याचा गुरू अंधळा (मोहमोयेने अंध झालेला) त्याचा शिष्यही अंधळाच होतो. मोहमायेतच गुंतून पडतो. तो आपल्या मर्जीनुसार वागतो व नेहमी खोटेच वागतो व खोटेच बोलतो. तो जीवनभर असत्य आचरण करतो व दुसऱ्याची निंदा करतो त्यामुळे तो स्वत: तर बुडतोच पण आपले सर्व कुटुंबच बुडवतो. नानक सांगतात, तो बिचारा तरी काय करणार ? परमेश्वर त्यास जे करावयास लावतो तेच तो करतो. ॥ २ ॥ पउडी ॥ ज्या प्रभू परमात्म्याने ही सारी सृष्टी निर्माण केली तोच तिला आपल्या नियंत्रणात ठेवतो. तो ज्यांना असत्य व कुमार्गाला लावतो, ते स्वेच्छाचारी बनून नष्ट होतात. ज्यांना तो गुरुमार्गी करतो ते सदैव प्रभू परमात्म्याचे ध्यान करतात. त्यांच्या मनात सदैव प्रभू परमात्म्याविषयी प्रेम वास करते. ज्याच्या पदरी पुण्य आहे त्याची वाचा सदैव प्रभूचे गुणगान गाते. नानक सांगतात, प्रभुनामाचे ध्यान करणारा प्रभूची स्तुती, प्रभूची महती गाण्यात तल्लीन होतो. ॥ १० ॥

॥ सलोकु म. १ ॥
सती पापु करि सतु कमाहि ॥ गुर दीखिआ घरि देवण जाहि ॥
इसतरी पुरखै खटिऐ भाउ ॥ भावै आवउ भावै जाउ ॥

सासतु बेदु न मानै कोइ ॥ आपो आपै पूजा होइ ॥
काजी होइ कै बहै निआइ ॥ फेरे तसबी करे खुदाइ ॥
वढी लै कै हकु गवाए ॥ जे को पुछै ता पड़ि सुणाए ॥
तुरक मंत्रु कनि रिदै समाहि ॥ लोक मुहावहि चाड़ी खाहि ॥
चउका दे कै सुचा होइ ॥ ऐसा हिंदू वेखहु कोइ ॥
जोगी गिरही जटा बिभूत ॥ आगै पाछै रोवहि पूत ॥
जोगु न पाइआ जुगति गवाई ॥ कितु कारणि सिरि छाई पाई ॥
नानक कलि का एहु परवाणु ॥ आपे आखणु आपे जाणु ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५१)

शब्दार्थ : **सति** – दानी लोक. **दीखिआ** – दीक्षा. **देवण** – देण्यासाठी. **इसतरी** – स्त्री. **खटिऐ** – एकत्र करणे. **बहै** – बसतो. **फेरे** – फिरवतो. **तसबी** – जपमाळ. **वढी** – लाच. **मुहावहि** – लुटतात. **चाडी** – चुगली. **चउका** – स्वयंपाकघर. **देकै** – सारवून. **बिभूत** – विभूती. **जुगति** – युक्ती. **छाई** – राख.

भावार्थ : तथाकथित दानी लोक पापाने कमावलेले धन दान म्हणून देतात. धनासाठी गुरु, शिष्याच्या घरी दीक्षा देण्यासाठी जातात. स्त्री, पुरुषावर त्याने कमावलेल्या धनासाठी प्रेम करते. जर पुरुष कमाई न करील तर दोघांचे मार्ग वेगळे होतात. वेद व शास्त्र यांचे यथार्थ ज्ञान कोणालाच नसते. सर्वच जण अपल्या स्वार्थाचीच पूजा करतात. काजी न्यायदानाचे ढोंग करतो. हातात जपमाळ फिरवतो व मुखाने 'खुदा' 'खुदा' असा उच्चार करतो. लाच खाऊन खोटा न्याय देतो जर कोणी विचारलेच तर त्यांना तो शरीयतची सोयीस्कर कलमे वाचून दाखवतो. हिंदू लोकही तुर्कांचे मंत्र जपतात व चुगली करून धन कमावतात. घरी मात्र स्वयंपाकघर सारवून शुद्ध करतो. खरा पवित्र हिंदू कोणी पाहिला आहे का ? योगी म्हणवणारे संसारांचा उपभोग घेतात पण बाह्यवेष जटा व विभूती धारण करून स्वत: योगी आहोत असे भासवतो. त्याचे पुत्र त्याच्या मागे पुढे फिरत रडत असतात. त्यांना योगही प्राप्त होत नाही वा योगाचे मर्मही कळत नाही. तरीही ते कशाकरिता डोक्यात राख घालून घेतात कुणास ठाऊक ? नानक सांगतात, कलियुगांचा हाच धर्म आहे. जो सांगतो तोच ते जाणतो व स्वत: मोठा समजतो. ॥ १ ॥

॥ म. १ ॥ हिंदू के घरि हिंदू आवै ॥ सूतु जनेऊ पड़ि गलि पावै ॥
सूतु पाइ करे बुरिआई ॥ नाता धोता थाइ न पाई ॥
मुसलमानु करे वडिआई ॥ विणु गुर पीरै को थाइ न पाई ॥
राहु दसाइ ओथै को जाइ ॥ करणी बाझहु भिसति न पाइ ॥
जोगी कै घरि जुगति दसाई ॥ तितु कारणि कनि मुंद्रा पाई ॥
मुंद्रा पाइ फिरै संसारि ॥ जिथै किथै सिरजणहारु ॥
जेते जीअ तेते वाटाऊ ॥ चीरी आई ढिल न काऊ ॥
एथै जाणै सु जाइ सिञाणै ॥ होरु फकड़ु हिंदू मुसलमाणै ॥
सभना का दरि लेखा होइ ॥ करणी बाझहु तरै न कोइ ॥
सचो सचु वखाणै कोइ ॥ नानक अगै पुछ न होइ ॥ २ ॥

॥ पउड़ी ॥ हरि का मंदरु आखीऐ काइआ कोटु गड़ु ॥
अंदरि लाल जवेहरी गुरमुखि हरि नामु पड़ु ॥
हरि का मंदरु सरीरु अति सोहणा हरि हरि नामु दिड़ु ॥
मनमुख आपि खुआइअनु माइआ मोह नित कड़ु ॥
सभना साहिबु एकु है पूरै भागि पाइआ जाई ॥ ११ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५१)

शब्दार्थ : **सूतु** – सूत्र, धागा. **जनेउ** – जानवे. **पडि** – वाचून. **गलि** – मंत्र. **थाइ** – स्थान. **राहु** – मार्ग. **ओथै** – तेथे. **करणी** – कर्म. **बाझहु** – शिवाय. **भिसति** – स्वर्ग. **जुगति** – युक्ती. **तितु** – त्या. **जिथै** – जेथे. **किथै** – कोठे. **सिरजणहारु** – सृजन करणारा प्रभू. **जेते** – जितके. **तेते** – तितक्या. **वाटाउ** – मार्ग. **चीरी** – चिठ्ठी, मृत्यूचे बोलावणे. **ढिल** – वेळ, उशीर. **होरु** – अन्य. **फकड** – निरर्थक. **दरि** – दारी. **गड़ु** – गड. **दिड** – दृढ. **खुआइनु** – अपमानित. **अगै** – परलोक. **कड़ु** – कुढणे.

भावार्थ : हिंदूच्या घरी हिंदू ब्राह्मण जातो. काही मंत्र म्हणून हिंदूच्या गळ्यात सुताचे जानवे घालतो. असा हा हिंदू जानवे घालूनही कुकर्म करतो. त्याने नंतर कितीही वेळा स्नान केले तरी तो शुद्ध होत नाही. त्याला प्रभूच्या घरी स्थान प्राप्त होत नाही. मुसलमान आपल्या धर्माचा बडेजाव मिरवतो. पण त्यांनाही गुरूशिवाय अल्लाच्या घरी स्थान प्राप्त होत नाही. कोणी विरळाच योग्य मार्ग धरू तिथपर्यंत (प्रभूच्या घरी) पोहोचतो. सत्कर्म केल्याशिवाय स्वर्ग प्राप्त होत नाही. कोणी योगाचे रहस्य जाणण्यासाठी योग्याकडे जातात. कानात मुद्रा घालतात व जगभर फिरतात. पण प्रभू परमात्मा तर इथे तिथे सर्वत्र भरून राहिला आहे. जितके जीव आहेत तितके मार्ग आहेत. जो तो आपापल्या मार्गाने जात असतो. पण मृत्यूचे बोलावणे यायला वेळ लागत नाही. जो ह्या जगात असतानाच प्रभू परमात्म्यास जाणतो त्यास परलोकातही प्रभूची ओळख पटते. अन्य सारे हिंदू व मुसलमानांचे जन्म वाया जातात. प्रभू दरबारी सर्वांना आपल्या कर्माचा हिशोब द्यावाच लागतो. सत्कर्म केल्याशिवाय कोणीही हा भवसागर तरून जात नाही. नानक सांगतात, जो सत्यरूप प्रभूमध्ये लीन होऊन प्रभूचे नामस्मरण करील, सत्याचरण करील अशा जीवास आपल्या कर्माचा हिशोब द्यावा लागत नाही. ॥ २ ॥ पउडी ॥ शरीर हे प्रभू परमात्म्याचे मंदिर आहे. तो प्रभूचा गडकोट आहे. त्यामध्ये प्रभुनामरूपी लाल जवाहर भरलेले आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे जो आचरण करतो त्यास प्रभुनामाचे ज्ञान प्राप्त होते. हे शरीररूप हरिमंदिर अति सुंदर आहे. हे जीवा ! तू आपल्या मनात प्रभुनाम दृढपणे धारण कर. स्वेच्छाचारी जीव मोहमायेत सापडून दु:खी होऊन कुढत बसतो. सर्व जीवांचा स्वामी तो एकमेव प्रभू परमात्मा आहे. ज्याच्या भाग्यात असेल त्यास तो प्राप्त होतो. ॥११॥

॥ सलोक म. १ ॥
ना सति दुखीआ ना सति सुखीआ ना सति पाणी जंत फिरहि ॥
ना सति मूंड मुडाई केसी ना सति पड़िआ देस फिरहि ॥
ना सति रुखी बिरखी पथर आपु तछावहि दुख सहहि ॥
ना सति हसती बधे संगल ना सति गाई घाहु चरहि ॥
जिसु हथि सिधि देवै जे सोई जिस नो देइ तिसु आइ मिलै ॥

नानक ता कउ मिलै वडाई जिसु घट भीतरि सबदु रवै ॥
सभि घट मेरे हउ सभना अंदरि जिसहि खुआई तिसु कउणु कहै ॥
जिसहि दिखाला वाटड़ी तिसहि भुलावै कउणु ॥
जिसहि भुलाई पंध सिरि तिसहि दिखावै कउणु ॥ १ ॥ म. १ ॥
सो गिरही जो निग्रहु करै ॥ जपु तपु संजमु भीखिआ करै ॥
पुंन दान का करे सरीरु ॥ सो गिरही गंगा का नीरु ॥
बोलै ईसरु सति सरूपु ॥ परम तंत महि रेख न रूपु ॥ २ ॥ म. १ ॥
सो अउधूती जो धूपै आपु ॥ भिखिआ भोजनु करै संतापु ॥
अउहठ पटण महि भीखिआ करै ॥ सो अउधूती सिव पुरि चड़ै ॥
बोलै गोरखु सति सरूप ॥ परम तंत महि रेख न रूप ॥ ३ ॥
॥ म. १ ॥ सो उदासी जि पाले उदासु ॥ अरध उरध करे निरंजन वासु ॥
चंद सूरज की पाए गंढि ॥ तिसु उदासी का पड़ै न कंधु ॥
बोलै गोपीचंदु सति सरूपु ॥ परम तंत महि रेख न रूपु ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५२)

शब्दार्थ : दुखीआ – दु:खी. सुखीआ – सुखी. मूंड – डोके. मुडाई – वपन. केसी – केस. पडिआ – वाचून. रूखी – रूक्ष. बिरखी – वृक्ष. तछावहि – देहत्याग. हसती – हत्ती. संगल – साखळी. घाहु – गवत. हथि – हाती. खुआइ – पथभ्रष्ट केले. सिरि – आरंभापासून, जन्मापासून. गिरहि – गृहस्थ. भिखिआ – भिक्षा. तंत – तत्त्व. अवधुती – विरक्त. धुपै – जाळतो. अउहठ – . चंद सुरज – उडा पिंगळा ह्या नाड्या. गंढी – गांठ. कंधु – शरीर.

भावार्थ : दु:ख भोगून सत्याची प्राप्ती होत नाही. सुखाचा उपभोग घेऊन सत्याची प्राप्ती होत नाही. जीवजंतूप्रमाणे सतत पाण्यात बुड्या मारूनही सत्याची प्राप्ती होत नाही. डोक्याचे मुंडण केल्याने सत्य प्राप्त होत नाही किंवा विद्या संपादन करून वा देशाटन केल्याने सत्य प्राप्त होत नाही. दगडाप्रमाणे किंवा वठलेल्या वृक्षाप्रमाणे रूक्ष जीवन जगत शारीरिक क्लेश व दु:ख सहन करण्याने सत्य प्राप्त होत नाही. गाईगुरांप्रमाणे इकडे तिकडे चरत हिंडल्यानेही सत्य प्राप्त होत नाही. वास्तविक ज्याच्या हाती सत्य देण्याची क्षमता आहे तो प्रभू परमात्मा स्वत: जेव्हा देईल व ज्यास तो ते देईल त्यासच ते प्राप्त होते. नानक सांगतात, ते माहात्म्य त्यासच मिळते, ज्याच्या अंत:करणात प्रभुनाम वास करते. प्रभू म्हणतात, सारे जीव माझेच आहेत. मी सर्वांच्याच अंतरात वास करतो. पण प्रभूच ज्यास हे विसरावयास लावतो त्यास कोण काय सांगणार ? व ज्यास प्रभू स्वत: सन्मार्गाला लावतो त्यास कोण भुलवणार? ज्यांना त्याने प्रथमपासूनच पथभ्रष्ट केले आहे त्यास कोणीही सन्मार्गावर आणू शकत नाही. ॥ १ ॥ म. १ ॥ तो खरा 'गृहस्थ' जो मनाचा निग्रह करतो. जप, तप, संयम ह्यांची भिक्षा मागतो. पुण्य व दान यांनाच आपले शरीर मानतो. असा गृहस्थ गंगेच्या पाण्याप्रमाणे पवित्र असतो. तो ईश्वरासच सत्यस्वरूप मानतो. वास्तविक परमतत्त्वास कोणतेही रूप अगर आकार नसतो. परब्रह्म निर्गुण निराकार आहे. ॥ २ ॥ खरा अवधूत (विरक्त) तोच होय जो आपला अहंभाव जाळून टाकतो. आपले कष्ट हीच भिक्षा मागून कष्टाने प्राप्त केलेल्या अन्नाचे भोजन करतो.

तो आपल्या हृदयरूपी नगरात आत्मज्ञानाची भिक्षा मागतो. असा अवधूत प्रभू परमात्म्याच्या दारी पोहोचतो. गोरख (पृथ्वीचे रक्षण करणारा प्रभू) यांसच सत्यस्वरूप परमात्मा मानतो. वास्तविक प्रभू परमात्म्यास आकारही नाही व रूपही नाही. तो निराकार निर्गुण आहे. ॥ ३ ॥ म. १ ॥ तोच खरा उदासीन जो मनातील आशा आकांक्षाप्रती पूर्णपणे उदास (विरक्त) असतो व जो आकाश पाताळ सर्वत्र एकाच निरंजन प्रभू परमात्म्याचा वास आहे हे अनुभवतो, तो आपल्या हृदयात एकाच वेळी ज्ञानाचा प्रकाश व आत्मशांतीची शीतलता अनुभवतो, अशा उदासीन व्यक्तीस आत्मिक मृत्यू येत नाही. योगी सांगतात, सत्यस्वरूप परमात्म्यास कोणतेही रूप नाही, कोणताही आकार नाही. तो निर्गुण निराकार आहे. ॥ ४ ॥

॥ म. १ ॥ सो पांखडी जि काइआ पखाले ॥ काइआ की अगनि ब्रहमु परजाले ॥
सुपनै बिंदु न देई झरना ॥ तिसु पाखंडी जरा न मरणा ॥
बोलै चरपटु सति सरूपु ॥ परम तंत महि रेख न रूपु ॥ ५ ॥
॥ म. १ ॥ सो बैरागी जि उलटे ब्रहमु ॥ गगन मंडल महि रोपै थंमु ॥
अहिनिसि अंतरि रहै धिआनि ॥ ते बैरागी सत समानि ॥
बोलै भरथरि सति सरूपु ॥ परम तंत महि रेख न रूपु ॥ ६ ॥
॥ म. १ ॥ किउ मरै मंदा किउ जीवै जुगति ॥ कंन पड़ाइ किआ खाजै भुगति ॥
आसति नासति एको नाउ ॥ कउणु सु अखरु जितु रहै हिआउ ॥
धूप छाव जे सम करि सहै ॥ ता नानकु आखै गुरु को कहै ॥
छिअ वरतारे वरतहि पूत ॥ ना संसारी ना अउधूत ॥
निरंकारि जो रहे समाइ ॥ काहे भीखिआ मंगणि जाइ ॥ ७ ॥
॥ पउड़ी ॥ हरि मंदरु सोई आखीऐ जिथहु हरि जाता ॥
मानस देह गुर बचनी पाइआ सभु आतम रामु पछाता ॥
बाहरि मूलि न खोजीऐ घर माहि बिधाता ॥
मनमुख हरि मंदर की सार न जानणी तिनी जनमु गवाता ॥
सभ महि इकु वरतदा गुर सबदी पाइआ जाई ॥ १२ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५२)

शब्दार्थ : पाखंडी – पापाचे खंडन करणारा. पखाले – प्रक्षालन. परजाले – प्रज्वलित करतो. सुपनै – स्वप्नातही. जरा – वृद्धत्व. बैरागी – विरक्त. रोपै – . थंभु – स्तंभ, आधार. मंदा – वाईट. कंन – कान. पडाइ – फाडून. आसति – . नासति – . कवणु – कोणते. अखरु – अक्षर. हिआठ – हृदय. धूप – उन. छाव – सावली. छिअ – सहा. बरतारे – व्यवहार करतात. पूत – पुत्र, शिष्य. जाता – जाणते. सार – वार्ता, खबर.

भावार्थ : तोच खरा पाखंडी (पापखंडन करणारा) जो शरीराचे पापापासून क्षालन करतो, पाप धुवून टाकतो तो शरीरातील तृष्णारूपी अग्नीतून ब्रह्मतत्त्व प्रज्वलित करतो. तो स्वप्नातही वीर्यस्खलन होऊ देत नाही. अशा पाखंडी व्यक्तीस वृद्धत्व वा मृत्यू येत नाही. चरपटयोगी, परमात्मा सतयस्वरूप आहे असे म्हणतात. परमतत्वाला

रूप नाही, आकारही नाही. ॥ ५ ॥ म. १ ॥ तो खरा विरक्त जो आपले चित्त संसारापासून परावृत्त करून ब्रह्मतत्त्वाकडे वळवतो व गगन मंडळात म्हणजे दशमद्वारात आपले चित्त दृढतापूर्वक धारण करतो. तो रात्रंदिवस आपल्या अंतरात प्रभुनामाच्या स्मरणात तल्लीन होऊन जातो व सत्यात सामावून जातो. भरथरी सांगतात तो प्रभू परमात्मा सत्य स्वरूप आहे. परमतत्त्वास आकार नाही, रूप नाही. ॥ ६ ॥ म. १ ॥ कान फाडून योग्याप्रमाणे वेष करून भीक मागून भोजन करण्यात काय अर्थ आहे ? अशाने मनातील कुविचार थोडेच नष्ट होणार आहेत ? योगाचा अर्थ थोडाच कळणार ? तो आस्तिक असो वा नास्तिक, कोणते अक्षर आहे की जे मनात दृढपणे धारण करावे की ज्यामुळे मन शांत होईल ? ऊनसावली दोनही समान वाटेल ? असे अक्षर म्हणजे प्रभुनाम. ज्याने मनात प्रभुनाम धारण केले आहे, तो गुरू जे सांगतो तसे वागतो. योग्याचे चेले सहा प्रकारे व्यवहार करतात. ते धड संसारी नसतात वा धड विरक्त नसतात. तोच खरा विरक्त जो निराकार प्रभूत एकरूप होऊन जातो. तो कोणाकडे कशाला भिक्षा मागायला जाईल ? प्रभू परमात्माच त्याचा सांभाळ करतो. ॥ ७ ॥ पउडी ॥ जेथे प्रभू परमात्म्याचे ज्ञान होते तेच खरे प्रभुमंदिर. गुरुकृपेने मानवदेहातच त्याचे (प्रभूचे) ज्ञान प्राप्त होते व तो प्रभू परमात्मा सर्वांच्या देहात आत्मस्वरूपात वास करतो असे त्यास समजते. हे जीवा तू प्रभूस मुळीच शोधू नकोस. तो विधाता तुझ्याच देहात आहे. स्वेच्छाचारी प्रभुमंदिराचे हे रहस्य जाणत नाही व त्यामुळे तो आपला जन्म वाया घालवतो. तो प्रभू परमात्मा सर्वव्याप्त आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून प्राप्त होतो. ॥ १२ ॥

॥ सलोक म. ३ ॥

मूरखु होवै सो सुणै मूरख का कहणा ॥
मूरख के किआ लखण है किआ मूरख का करणा ॥
मूरखु ओहु जि मुगधु है अहंकारे मरणा ॥
एतु कमाणै सदा दुखु दुख ही महि रहणा ॥
अति पिआरा पवै खूहि किह संजमु करणा ॥
गुरमुखि होइ सु करे वीचारू ओसु अलिपतो रहणा ॥
हरि नामु जपै आपि उधरै ओसु पिछै डुबदे भी तरणा ॥
नानक जो तिसु भावै सो करे जो देइ सु सहाणा ॥ १ ॥
॥ म. १ ॥ नानकु आखै रे मना सुणीऐ सिख सही ॥
लेखा रबु मंगेसिआ बैठा कढि वहि ॥
तलबा पउसनि आकीआ बाकी जिना रही ॥
अजराईलु फरेसता होसी आइ तई ॥
आवणु जाणु न सुझई भीड़ी गली फही ॥
कूड़ निखुटे नानका ओड़कि सचि रहि ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ हरि का सभु सरीरू है हरि रवि रहिआ सभु आपै ॥
हरि की कीमति ना पवै किछु कहणु न जापै ॥

गुर परसादी सालाहीऐ हरि भगती रापै ॥
सभु मनु तनु हरिआ होइआ अहंकारु गवापै ॥
सभु किछु हरि का खेलु है गुरमुखि किसै बुझाई ॥ १३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५३)

शब्दार्थ : **कहणा** – सांगणे. **सुगधु** – अज्ञानी. **किआ** – काय. **लखण** – लक्षण. **करणा** – कृत्य, कार्य. **खुहि** – विहीर. **ओसु** – त्यापासून. **तिसु** – त्यास, प्रभूस. **सिख** – शिक्षण, उपदेश. **रबु** – ईश्वर. **मंगेसीआ** – मागेल. **तलबा** – वही. **पउसनि** – पाहून. **अजराईलु** – मृत्यू. **फरेसता** – दूत. **तई** – तयार. **निखुटे** – नाद्य. **ओडकी** – अंती. **किमती** – किंमत, मूल्य. **सालीहीऐ** – स्तुती कर. **रापै** – रंगून जाणे.

भावार्थ : मूर्ख माणूस मूर्ख माणसाचे म्हणणे ऐकतो. मूर्ख माणसाचे लक्षण काय ? मूर्ख माणसाचे वागणे कसे असते ? मूर्ख तो की जो अडाणी आहे आणि अहंकारात बुडालेला असतो. आपल्या कर्माने तो दुःख कमावतो व सदैव दुःखी जिणेच जगतो. जर आपला अत्यंत प्रिय व्यक्ती खड्ड्यात पडत असेल तर त्यास काही तरी उपाय शोधलेच पाहिजेत. अशावेळी गुरूच्या उपदेशानुरूप विचार केला पाहिजे व ज्यामुळे आपला प्रियजन खड्डात पडला त्या कारणापासून अलिप्त रहावे. जो प्रभुनामाचा जप करतो तो स्वतःचा उध्दार करतो व इतर बुडणाऱ्यांनाही वाचवतो. नानक सांगतात, जे प्रभूस आवडते तेच करावे व तो जे देईल त्याचा स्वीकार करावा. ॥ १ ॥ म. १ ॥ नानक सांगतात, हे मना ! तू चांगला उपदेश ग्रहण कर. परलोकात गेल्यावर तुझ्या कर्माचा हिशोब प्रभू तुझ्याकडे मागेल. तो आपल्या वहीत पाहून तुझ्याकडे जी बाकी निघेल त्यासाठी यमदूत परत तुझ्या पाठी लागेल. मग तू आणखीनच अडचणीत सापडशील आणि यातून सुटणे कठीण होईल. नानक सांगतात, अंततः त्याचा नाश होतो व सत्यामुळेच जीवाचे रक्षण होते. ॥ २ ॥ सर्व शरीरे ही प्रभूचीच रूपे आहेत व सर्व शरीरात प्रभू परमात्मा रममाण होऊन राहतो. प्रभूचे खरे मूल्य कोणीही जाणत नाही. त्याचे कोणी वर्णनही करू शकत नाही. सतगुरूच्या कृपेने जीव प्रभू परमात्म्याच्या भक्तीत रंगून जातो. प्रभू परमात्म्याचे गुणगान केल्याने मन उत्साहित होते व मनातील अहंकार नष्ट होतो. ह ा सारी त्या प्रभू परमात्म्याची लीला आहे. क्वचित कोणी गुरुमार्गी चालणाऱ्यास त्याचे ज्ञान होते. ॥ १३ ॥

॥ सलोकु म. १ ॥

सहंसर दान दे इंद्रु रोआइआ ॥ परसरामु रोवै घरि आइआ ॥
अजै सु रोवै भीखिआ खाइ ॥ ऐसी दरगह मिलै सजाइ ॥
रोवै रामु निकाला भइआ ॥ सीता लखमणु विछुड़ि गइआ ॥
रोवै दहसिरु लंक गवाइ ॥ जिनि सीता आदी डउरू वाइ ॥
रोवहि पांडव भए मजूर ॥ जिन कै सुआमी रहत हदूरि ॥
रोवै जनमेजा खुइ गइआ ॥ एकी कारणि पापी भइआ ॥
रोवहि सेख मसाइक पीर ॥ अंति कालि मतु लागै भीड़ ॥
रोवहि राजे कंन पड़ाइ ॥ घरि घरि मागहि भीखिआ जाइ ॥
रोवहि किरपन संचहि धनु जाइ ॥ पंडित रोवहि गिआनु गवाइ ॥

बाली रोवै नाहि भतारु ॥ नानक दुखीआ सभु संसारु ॥
मंने नाउ सोई जिणि जाइ ॥ अउरी करम न लेखै लाइ ॥ १ ॥
॥ म. २ ॥ जपु तपु सभु किछु मंनिऐ अवरि कारा सभि बादि ॥
नानक मंनिआ मंनीऐ बुझीऐ गुर परसादि ॥२ ॥
॥ पउड़ी ॥ काइआ हंस धुरि मेलु करतै लिखि पाइआ ॥
सभ महि गुपतु वरतदा गुरमुखि प्रगटाइआ ॥
गुण गावै गुण उचरै गुण माहि समाइआ ॥
सची बाणी सचु है सचु मेलि मिलाइआ ॥
सभु किछु आपे आपि है आपे देइ वडिआई ॥ १४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५३)

शब्दार्थ : सहंसर – हजार. इंद्रु – इंद्र. परसरामु – परशराम. अजै – अज राजा. लखमणु – लक्ष्मण. विछडि – वियोग. दहसिरु – दशानन, रावण. डउरू – डमरू. वाइ – वाजवला. हदुरि – जवळ. जनमेजा – जनमेजय. सुइ गइआ – पथभ्रष्ट झाला. सेख – शेख. मसाइक – . पीर – . भीड – आपत्ती. कंन – कान. किरपन – कृपण. बाली – युवती, तरूणी. मंने – मानतो, स्वीकारतो. जिणि – जिंकतो. अवरि – अन्य. कारा – कर्म. बादि – व्यर्थ. धुरि – भाग्यात, नशिबात.

भावार्थ : दुराचारामुळे इंद्राच्या अंगास हजारो क्षते पडली व त्यास दु:ख भोगावे लागले. परशुरामास गर्व झाल्याने त्यास रामाचे हातून पराभूत होऊन दु:ख भोगावे लागले. अज राजासही आपल्यांच कर्माचे फळ म्हणून भीक मागत हिंडावे लागले. अशा रीतीने प्रभू दरबारात जो तो आपापल्याच कर्मानुसार शिक्षा भोगतो. श्रीरामाला वनवास भोगावा लागला. सीताला राम लक्ष्मणाचा वियोग सहन करावा लागला. दशानन रावणास लंकेस मुकावे लागले व दु:ख भोगावे लागले कारण त्याने बैराग्याचे रूप घेऊन सीतेचे हरण केले. प्रत्यक्ष श्रीकृष्ण जवळ असूनही पांडवांनाही दुसऱ्याचे दास व्हावे लागले. राजा जनमेजय सुद्धा पथभ्रष्ट झाल्याने त्यास दु:ख भोगावे लागले. एका पापाचीही शिक्षा त्यास भोगावी लागली. मोठमोठे शेख पीर हेही शेवटी अल्लाच्या दरबारात शिक्षा भोगावी लागेल ह्या भयाने दु:खित असतात. भतृहरीसारखा राजा राजयोगी बनून कान फाडून घेऊन भीक मागू लागला. कृपण मनुष्य साठवलेले धन जाइल म्हणून चिंता करतो. तर पंडित लोक आपले ज्ञान जाईल म्हणून चिंता करतात. युवती जवळ पती नाही म्हणून रडते. नानक सांगतात, सारा संसार दु:खाने भरलेला आहे. जो प्रभूनामाचा जप करतो तोच ह्या जीवनात यशस्वी होतो. प्रभुनामाशिवाय अन्य कर्म, कर्मलेखात लिहिले जात नाही. ॥ १ ॥ म. २ ॥ प्रभूच्या नामस्मरणातच जप, तप, संयम आदी निहीत आहे. इतर सर्व कार्ये व्यर्थ आहेत. ज्याने प्रभूनामाचा स्वीकार केला आहे तोच गुरूकृपेने प्रभू दरबारी स्वीकृत होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ प्रभू परमात्म्याने प्रथमपासूनच शरीर व आत्मा यांचा संयोग लिहून ठेवला आहे. सर्व जीवांच्या अंत:करणात प्रभू परमात्मा गुप्तपणे वास करतो. गुरूकृपेने तो प्रकट होतो. जो प्रभू परमात्म्याच्या गुणांचा उच्चार करतो, जो त्याचे गुण गातो, तो प्रभूच्या गुणात सामावून जातो. प्रभुरूप होतो. तो गुरूच्या उपदेशाने स्वत: सत्यरूप होतो व इतरांनाही सत्यरूप प्रभूशी मिलन घडवतो. प्रभू परमात्मा स्वत: सर्वेसर्वा आहे व तोच जीवांना महती देतो. ॥ १४ ॥

॥ सलोक म. २ ॥
नानक अंधा होइ कै रतना परखण जाइ ॥
रतना सार न जाणई आवै आपु लखाइ ॥ १ ॥
॥ म. २ ॥ रतना केरी गुथली रतनी खोली आइ ॥
वखर तै वणजारिआ दुहा रही समाइ ॥
जिन गुणु पलै नानका माणक वणजहि सेइ ॥
रतना सार न जाणनी अंधे वतहि लोइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ नउ दरवाजे काइआ कोटु है दसवै गुपतु रखीजै ॥
बजर कपाट न खुलनी गुर सबदि खुलीजै ॥
अनहद वाजे धुनि वजदे गुर सबदि सुणीजै ॥
तितु घट अंतरि चानणा करि भगति मिलीजै ॥
सभ महि एकु वरतदा जिनि आपे रचन रचाई ॥ १५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५४)

शब्दार्थ : सार – मूल्य, महत्त्व. केरी – . गुथली – गाठोडे. खोली – उघडणे. वखर – . तै – . वणजारिआ – . दुहा – दोन्ही. जिन – ज्याने. पलै – पदरात. वणजहि – खरेदी. वतहि – भटकतात. बजर – वज्र. चानणा – प्रकाश.

भावार्थ : नानक सांगतात, अंधळा मनुष्य रत्नाची पारख कशी करणार ? तो रत्नाचे वास्तव मूल्य जाणूच शकत नाही. तसे करण्याचा त्याने प्रयत्न केला तर त्याचे अज्ञानच प्रगट होईल. भावार्थ असा की मोहमायेने अंध झालेला मनुष्य प्रभूनामरूपी रत्नाची पारख करूच शकणार नाही कारण त्या प्रभूनामाचे माहात्म्यच कळत नाही. ॥ १ ॥ म. २ ॥ रत्नाचे गाठोडे खोलल्यावर त्याचे मूल्य जवाहरच जाणू शकेल. भाव, नामरूपी रत्नांचे मूल्य सतगुरूच जाणू शकेल. प्रभुनामाचा व्यापार केवळ सतगुरूच करू शकतात व गुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा, गुरुमार्गी चालणाराच प्रभुनामाचे महत्त्व जाणू शकतो. ज्यांना नामरूपी रत्नाचे महत्त्वच कळत नाही, ते मोहमायेने अंध झालेले लोक संसारात भटकत राहतात. ॥ २ ॥ पउडी ॥ ह्या शरीररूपी दुर्गास नऊ दरवाजे आहेत व दहावा दरवाजा गुप्त आहे. हे दहावे द्वार उघडावयास वज्रासारखे कठीण आहे. केवळ गुरूकडून नाम प्राप्त झाल्यानेच तो दहावा दरवाजा उघडतो. असे झाल्यावर म्हणजे दशमद्वार उघडले गेल्यावर अंत:करणात अनाहत नाद गुंजारव घालू लागतो व गुरूच्या उपदेशाने तो ऐकू येतो. अशा जीवाच्या अंतरात आत्मज्ञानाचा प्रकाश पसरतो व तो प्रभूभक्तीत तल्लीन होतो. तो प्रभू परमात्मा ज्याने ह्या सर्व सृष्टीची निर्मिती केली तो सर्वव्याप्त आहे. ॥ १५ ॥

॥ सलोक म. २ ॥
अंधै कै राहि दसिऐ अंधा होइ सु जाइ ॥
होइ सुजाखा नानका सो किउ उझड़ि पाइ ॥
अंधे एहि न आखीअनि जिन मुखि लोइण नाहि ॥

अंधे सेई नानका खसमहु घुथे जाहि ॥ १ ॥ ,
॥ म. २ ॥ साहिबि अंधा जो कीआ करे सुजाखा होइ ॥
जेहा जाणै तेहो वरतै जे सउ आखै कोइ ॥
जिथै सु वसतु न जापई आपे वरतउ जाणि ॥
नानक गाहकु किउ लए सकै न वसतु पछाणि ॥ २ ॥
॥ म. २ ॥ सो किउ अंधा आखीऐ जि हुकमहु अंधा होइ ॥
नानक हुकमु न बुझई अंधा कहीऐ सोइ ॥ ३ ॥
॥ पउड़ी ॥ काइआ अंदरि गड़ु कोटु है सभि दिसंतर देसा ॥
आपे ताड़ी लाईअनु सभ महि परवेसा ॥
आपे स्रिसटि साजीअनु आपि गुपतु रखेसा ॥
गुर सेवा ते जाणिआ सचु परगटीएसा ॥
सभु किछु सचो सचु है गुरि सोझी पाई ॥ १६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५४)

शब्दार्थ : **राहि** – मार्ग. **दसिऐ** – दाखवलेला. **सुजाखा** – चांगली दृष्टी असलेला, सुजाण. **उझडि** – कुमार्ग. **घुथे** – . **खउ** – शंभर. **वसतु** – वस्तू, प्रभू. **जापइ** – जाणणे. **आपे** – अहंकार. **ग्राहकु** – ग्राहक. **हुकमहु** – प्रभू आज्ञा. **दिसंतर** – देशांतर. **ताडी** – समाधी.

भावार्थ : अंधळ्याने दाखविलेल्या मार्गावर अंधळाच चालतो. भाव असा की अज्ञानी माणसाने दाखवलेल्या मार्गाने अज्ञानी माणूसच जातो. नानक सांगतात, ज्याला ज्ञानचक्षू प्राप्त झाले आहेत तो का म्हणून कुमार्गाने जाईल ? चेहऱ्यावर चर्मचक्षू नाहीत त्यास अंधळे म्हणू नये. जे प्रभुमार्गापासून भ्रष्ट होतात तेच खरे अंधळे. ॥ १ ॥ म. २ ॥ ज्याला प्रभू परमात्म्याने मोहमायेने अंध केले, जर प्रभूची कृपा झाली तर तोच त्याला ज्ञानचक्षू प्रदान करतो. मोहमायेने अंध झालेली व्यक्ती, त्याला कितीदाही समजावून सांगितले तरी तो आपल्याच वाटेने म्हणजे मोहमायेच्या वाटेने जातो. जो आपल्या मूळ स्वरूपास, आत्मस्वरूपास जाणत नाही, तो अहंकारी आहे असे जाणावे. नानक सांगतात, एखादा ग्राहक जी वस्तू त्यास माहीतच नाही ती कशाला घेईल ? ॥ २ ॥ जो प्रभू परमात्म्याच्या इच्छेनेच अंध झाला आहे त्यास अंधळा कसे बरे म्हणावे ? नानक सांगतात, जो प्रभूची आज्ञा मानत नाही तोच खरा अंधळा. ॥ ३ ॥ पउडी ॥ ह्या मानवी शरीरात अनेक दुर्ग, अनेक देश–प्रदेश आहेत. प्रभू परमात्मा स्वत: समाधीमग्न असूनही सर्वत्र भरून राहिला आहे. त्यानेच सर्व सृष्टी निर्माण केली आहे. पण स्वत:स मात्र सर्वांपासून अलिप्त ठेवले आहे. सतगुरूच्या सेवेच्या माध्यमातूनच त्यास जाणता येते. गुरूसेवेनेच सत्यरूप प्रभू परमात्मा अंतरात प्रगट होतो. गुरूकडूनच हे ज्ञान प्राप्त होते. सर्वत्र प्रभू परमात्म्याचा वास असल्याने सर्व काही सत्यच आहे. ॥ १६ ॥

॥ सलोक म. १ ॥

सावणु राति अहाड़ु दिहु कामु क्रोधु दुइ खेत ॥
लबु वत्र दरोगु बीउ हाली राहकु हेत ॥

हलु बीचारु विकार मण हुकमी खटे खाइ ॥
नानक लेखै मंगिऐ अउतु जणेदा जाइ ॥ १ ॥
॥ म. १ ॥ भउ भुइ पवितु पाणी सतु संतोखु बलेद ॥
हलु हलेमी हाली चितु चेता वत्र वखत संजोगु ॥
नाउ बीजु बखसीस बोहल दुनीआ सगल दरोग ॥
नानक नदरी करमु होइ जावहि सगल विजोग ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ मनमुखि मोहु गुबारु है दूजै भाइ बोलै ॥
दूजै भाइ सदा दुखु है नित नीरु विरोलै ॥
गुरमुखि नामु घिआईऐ मथि ततु कढोलै ॥
अंतरि परगासु घटि चानणा हरि लघा टोलै ॥
आपे भरमि भुलाइदा किछु कहणु न जाई ॥ १७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५५)

शब्दार्थ : **सावणु** – श्रावण. **अहाड** – आषाढ. **दिहु** – दिवस. **लबु** – लोभ. **वत्र** – वापसा. **दरोगु** – असत्य. **हाली** – नांगऱ्या. **राहकु** – शेतकरी. **हेत** – मोह. **बीचारु** – कुविचार. **मण** – खळे. **हुकमी** – मनाच्या इच्छेप्रमाणे. **अउतु** – पुत्रहीन. **जणेदा** – जन्म देणारा, पिता. **जाइ** – जातो. **भउ** – भीती. **पवितु** – पवित्रता. **बलेद** – बैल. **हलेमी** – नम्रता. **चितु** – चित्त. **चेता** – चिंतन. **वखत** – योग्य वेळ. **बखसीस** – कृपा. **बोहल** – अन्नाची रास, धान्याची रास. **दरोग** – असत्य. **विजोग** – वियोग. **गुबार** – अंधकार. **विरोलै** – घुसळतो. **मथि** – मन्थन. **ततु** – तत्त्व, सार, लोणी. **कढौलै** – काढतो. **टोलै** – शोधून.

भावार्थ : श्रावण व आषाढ हे रात्र व दिवसासारखे आहेत. त्यात काम व क्रोध यांची शेती होते. त्यात लोभाचे, असत्याचे बी पेरले जाते. मोह हा नांगऱ्या होतो. विकृत विचाराच्या खळ्यात प्रभुइच्छेने कर्म फळ प्राप्त करतो. नानक सांगतात, असा हा स्वेच्छाचारी शेतकरी अखेर प्रभूकडून हिशोब मागितल्यावर तो मागे काहीही सत्कृत्य नसल्यामुळे निपुत्रकाच्या व्यथा भोगतो. ॥ १ ॥ म. १ ॥ प्रभू परमात्म्याविषयी आदरयुक्त भीती ही भूमी, मनाची पवित्रता हे पाणी, सत्य व संतोषरूपी बैल विनम्रता हा नांगर, चित्त हा नांगऱ्या व प्रभुनामाचे चिंतनाच्या वाफश्यावर प्रभूनामाच्या बीजाची पेरणी करावी. सर्व संसार असत्य आहे हे जाणून प्रभूनामाचे बीज पेरले तर प्रभुकृपेची धान्याची रास पदरात पडते. नानक सांगतात, अशा प्रभुभक्तावर प्रभूची कृपादृष्टी होते. त्याचा प्रभुवियोग संपून तो प्रभूशी एकरूप होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ मनमुख व्यक्तीच्या अंत:करणात मोहाचा घोर अंधकार असतो म्हणून तो नेहमी द्वैताचेच बोल बोलतो. त्याचे सारे परिश्रमही पाणी घुसळण्यासारखे व्यर्थ होतात. जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो त्याच्या नामस्मरणरूपी घुसळण्यातून त्यास परमतत्त्वरूपी लोणी प्राप्त होते. त्यास प्रभू परमात्म्याचा शोध लागतो व त्याच्या अंत:करणात आत्मतत्त्वाचा प्रकाश पसरतो. पण तोपर्यंत प्रभू परमात्माच जीवास मोहमायेच्या भ्रमात भटकावयास लावतो. प्रभू परमात्म्याच्या लीलेबद्दल कोण काय सांगू शकणार ?॥१७॥

॥ सलोक म. २ ॥

नानक चिंता मति करहु चिंता तिस ही हेइ ॥
जल महि जंत उपाइअनु तिना भि रोजी देइ ॥

ओथै हटु न चलई ना को किरस करेइ ॥
सउदा मूलि न होवई ना को लए न देइ ॥
जीआ का आहारु जीअ खाणा एहु करेइ ॥
विचि उपाए साइरा तिना भि सार करेइ ॥
नानक चिंता मत करहु चिंता तिसही हेइ ॥ १ ॥
॥ म. १ ॥ नानक इहु जीउ मछुली झीवरु त्रिसना कालु ॥
मनूआ अंधु न चेतई पड़े अचिंता जालु ॥
नानक चितु अचेतु है चिंता बधा जाइ ॥
नदरि करे जे आपणी ता आपे लए मिलाइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ से जन साचे सदा सदा जिनी हरि रसु पीता ॥
गुरमुखि सचा मनि वसै सचु सउदा कीता ॥
सभु किछु घर ही माहि है वडभागी लीता ॥
अंतरि त्रिसना मरि गई हरि गुण गावीता ॥
आपे मेलि मिलाइअनु आपे देइ बुझाई ॥ १८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५५)

शब्दार्थ : हेइ – असते. ओथै – तेथे. हटु – बाजार. किरस – शेती. सउदा – खरेदी, विक्री, सौदा. एहू – तोच. साइरा – सागर. सार – संभाळ. झिवरु – कोळी. चेतइ – स्मरण करणे. अचिंता – अचानक. अचेतु – बेसावध. बधा – बद्ध. पीता – प्राशन केले. कीता – केला. लीता – प्राप्त केला.

भावार्थ : नानक सांगतात, लोकहो ! कशाचीही चिंता करू नका. तो प्रभू परमात्मा सर्वांची काळजी वाहतो. तो पाण्यात जीवजंतू निर्माण करतो. त्यांना अन्नपाणीही तोच देतो. तेथे काही बाजार भरत नाही किंवा कोणी शेती करत नाही. तेथे कोणी कुठला व्यापार करत नाही किंवा कशाची देवाणघेवाणही होत नाही. तो प्रभू परमात्माच त्या जीवांची देखभाल करतो. त्यांना अन्न देतो. समुद्रात उत्पन्न होणाऱ्या जीवांचाही तो संभाळ करतो. म्हणून नानक सांगतात, लोकहो ! कशाचीही चिंता करू नका. त्या प्रभू परमात्म्यास सर्व जीवांची काळजी आहे. ॥ १ ॥ म. १ ॥ नानक सांगतात, ह्या भवसागरात माणूस हा मासा आहे व मायेची तृष्णा हा काळरूपी कोळी आहे. जीवरूपी माशांचे अंधळे मन बेसावध राहिल्याने तो अवचित काळाच्या जाळ्यात सापडतो. नानक सांगतात, ह्या बेसावधानपणामुळेच मानवी मन चिंतेने बद्ध होते. ज्यांच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते, तो प्रभूशी एकरूप होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ ज्या जीवांनी प्रभुनामरूपी अमृत प्राशन केले ते सदैव सत्यरूप प्रभूमध्ये लीन होऊन राहतात. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्याच्या मनात सत्याचा वास होतो. कारण त्यांनी सत्याचाच सौदा केलेला असतो. सर्व काही ह्या मानवदेहातच आहे. पण कोणी भाग्यशाली जीवच ते प्राप्त करू शकतो. प्रभू परमात्म्याचे गुणगान गायल्याने मनातील मायेची तृष्णा नष्ट होते. तो प्रभूच जीवाला आपल्यात एकरूप करून घेतो व तोच त्यास स्वस्वरूपाचे ज्ञान देतो.॥ १८॥

॥ सलोक म. १ ॥
वेलि पिंञाइआ कति वुणाइआ ॥
कटि कुटि करि खुंबि चड़ाइआ ॥
लोहा वढे दरजी पाड़े सूई धागा सीवै ॥
इउ पति पाटी सिफती सीपै नानक जीवत जीवै ॥
होइ पुराणा कपड़ु पाटै सूई धागा गंढै ॥
माहु पखु किहु चलै नाही घड़ी मुहतु किछु हंढै॥
सचु पुराणा होवै नाही सीता कदे न पाटै ॥
नानक साहिबु सचो सचा तिचरु जापी जापै ॥ १ ॥
॥ म. १ ॥ सच की काती सचु सभु सारु ॥ घाड़त तिस की अपर अपार ॥
सबदे साण रखाई लाइ ॥ गुण की थैकै विचि समाइ ॥
तिस दा कुठा होवै सेखु ॥ लोह लबु निकथा वेखु ॥
होइ हलालु लगै हकि जाइ ॥ नानक दरि दीदारि समाइ ॥ २ ॥
॥ म. १ ॥ कमरि कटारा बंकुड़ा बंके का असवारु ॥
गरबु न कीजै नानका मतु सिरि आवै भारु ॥ ३ ॥
॥ पउड़ी ॥ सो सतसंगति सबदि मिलै जो गुरमुखि चलै ॥
सचु धिआइनि से सचे जिन हरि खरचु धनु पलै ॥
भगत सोहनि गुण गावदे गुरमति अचलै ॥
रतन बीचारु मनि वसिआ गुर कै सबदि भलै ॥
आपे मेलि मिलाइदा आपे देइ वडिआई ॥ १९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५५)

शब्दार्थ : बेलि – . पिंञाइआ – पिंजून. कति – कातून. बुणाइआ – विणणे. कटि कुटि – आपटून, धोपटून. खुंबि – भट्टी. लोहे – लोखंडाची कात्री. वढे – . दरजी – शिंपी. पाडे – फाडतो. सिवै – शिवतो. इउ – ह्या. पति – प्रकारे. पाटी – फाटलेले. सिफती – . सीपै – . माहे – महिना. पखु – पंधरवडा. हंढै – . तिचरु – तोपर्यंत. काती – कात्री. सारु – लोखंड. घाडत – घडवलेली. साण – सहाण, धार लावण्याचा दगड. थकै – म्यानात. लोहु – रक्त. लब – लोभ. निकथा – निघून जाते. हलालु – हळूहळू चिरणे. हकि – प्रभूकृपा. दीदार – स्थान. कटार – कट्यार. बंकुडा – बाकदार, सुंदर. बंके – . गरबु – गर्व. सोहनि – शोभादायक.

भावार्थ : प्रथम कापूस पिंजून, कातून त्यापासून कापड बनवतात. मग ते कापड आपटून धोपटून धुऊन भट्टीत उकडतात. मग कात्रीने कापून शिंपी त्याचे तुकडे करतो. मग ते तुकडे सुई दोऱ्याने शिवून कपडे बनवतो. नानक सांगतात, त्याचप्रमाणे जीवनातला गेलेला सन्मान प्रभूच्या गुणगानरूपी सुई-दोऱ्याने शिवून परत प्राप्त करता येतो व जीवन जगता येते. कपडा जीर्ण होऊन फाटला तर सुई-दोऱ्याने त्यास शिवता येते पण असा

कपडा फार काळ टिकत नाही. पण सत्य कधीही जीर्ण होत नाही व त्यास कधी परत परत शिवावे लागत नाही. प्रभू परमात्मा सत्य, सदैव शाश्वत सत्यच असतो व सत्यरूप प्रभूचा जप करून त्यास प्राप्त करून घेता येते. ॥ १ ॥ म. १ ॥ सत्यरूप लोखंडापासून सत्यरूप सुरी बनवली तर त्याची सुंदरता अपार असते. अशा सुरीस (प्रभुनाम) शब्दाच्या सहाणेवर घासून धार लावली व त्यास सगुणरूपी म्यानात ठेवले जाते. जर कोणी शेखाने त्या सुरीने कापून स्वत:स हलाल (हळूहळू कापणे) केले तर त्याच्या मनातून लोभरूपी रक्त निघून जाऊन, नानक सांगतात, तो प्रभुचरणी समर्पित होऊन प्रभूकडून स्वीकृत होऊन प्रभूशी एकरूप होतो व त्यास प्रभू दरबारात स्थान प्राप्त होते. ॥ २ ॥ म. १ ॥ कमरेला तलवार बांधून सुंदर घोड्यावर एखादा स्वार झाला तरी त्याने गर्व करू नये. नानक सांगतात, गर्व केल्याने त्याच्या माथ्यावरील पापाचा बोजा आणखी वाढतो. ॥ ३ ॥ पउडी ॥ जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो त्यास सतसंगती प्राप्त होते व तो नामात लीन होतो. ज्यांच्याजवळ प्रभुनामरूपी धन आहे ते सत्यरूप प्रभूचे ध्यान करून सत्यरूप होतात. भक्त सतगुरूच्या उपदेशाला दृढतापूर्वक धारण करतात व ते प्रभुगुण गाऊन शोभायमान होतात. प्रभुनामरूपी रत्नाचा विचार त्याच्या मनात वास करतो व शब्दगुरूत लीन होऊन तो एक चांगला माणूस बनतो. प्रभू परमात्मा अशा जीवास आपल्याशी एकरूप करून घेऊन त्यास मोठेपणा देतो. ॥ १९ ॥

॥ सलोक म. ३ ॥

आसा अंदरि सभु को कोइ निरासा होइ ॥
नानक जो मरि जीविआ सहिला आइआ सोइ ॥ १ ॥
॥ म. ३ ॥ ना किछु आसा हथि है केउ निरासा होइ ॥
किआ करे एह बपुड़ी जां भुलाए सोइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ धिगु जीवणु संसार सचे नाम बिनु ॥ प्रभू दाता दातार निहचलु एहु धनु ॥
सासि सासि आराधे निरमलु सोइ जनु ॥ अंतरजामी अगमु रसना एकु भनु ॥
रवि रहिआ सरबति नानकु बलि जाई ॥ २० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५६)

शब्दार्थ : **निरासा** – आशारहित, विरक्त, अलिप्त. **सहिला** – सफल. **हथि** – हातात. **भुलाए** – भुलविले. **सोई** – त्याने, प्रभूने. **भनु** – उच्चार कर.

भावार्थ : ॥ श्लोक ॥ म. ३ ॥ सारा संसार आशेमध्ये गुरफटला आहे. क्वचित कोणी आशेपासून अलिप्त, आशारहित असतो. नानक सांगतात, ज्याने मनातील सर्व आशा, आकांक्षा नष्ट केल्या त्याचेच जीवन सफल होते. वास्तविक आशेच्या हाती काही नाही. मग निराश होणेही व्यर्थ आहे. सारे काही प्रभूच्या हाती आहे. त्यानेच जर जीवास आशेत गुंतवले तर तो जीव बिचारा काय करणार ? ॥ २ ॥ पउडी ॥ प्रभुनामाशिवाय सारा संसार, सारे जिणे धिक्कारार्ह आहे. तो सर्वांना दान देणारा प्रभू परमात्मा हेच एकमेव शाश्वत धन आहे. प्रत्येक श्वासागणिक त्याचे ध्यान करणारा प्रभुसेवक पवित्र होतो. निर्मळ होतो. तो अंतर्ज्ञानी प्रभू परमात्मा अगम्य आहे. हे जिव्हे ! सदैव प्रभुनामाचा उच्चार कर. तो प्रभू परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे. नानक त्या प्रभूचे चरणी आपले सर्वस्व समर्पित करतो. ॥ २० ॥

॥ सलोकु म. १ ॥

सरवर हंस धुरे ही मेला खसमै एवै भाणा ॥
सरवर अंदरि हीरा मोती सो हंसा का खाणा ॥
बगुला कागु न रहई सरवरि जे होवै अति सिआणा ॥
ओना रिजकु न पइओ ओथै ओन्हा होरो खाणा ॥
सचि कमाणै सचो पाईऐ कूड़ै कूड़ा माणा ॥
नानक तिन कौ सतिगुरु मिलिआ जिना धुरे पैया परवाणा ॥ १ ॥
साहिबु मेरा उजला जे को चिति करेइ ॥
नानक सोई सेवीऐ सदा सदा जो देइ ॥
नानक सोई सेवीऐ जितु सेविऐ दुखु जाइ ॥
अवगुण वंञनि गुण रवहि मनि सुखु वसै आइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ आपे आपि वरतदा आपि ताड़ी लाईअनु ॥
आपे ही उपदेसदा गुरमुखि पतीआईअनु ॥
इकि आपे उझड़ि पाइअनु इकि भगती लाइअनु ॥
जिसु आपि बुझाए सो बुझसी आपे नाइ लाईअनु ॥
नानक नामु धिआईऐ सची वडिआई ॥ २१ ॥ १ ॥ सुधु ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५६)

शब्दार्थ : **सरवर** – सरोवर, सतगुरूरूपी सरोवर. **हंस** – गुरुमार्गी चालणारा. **धुरे** – पूर्वीपासून. **खसमै** – प्रभूने. **एवै** – असा, अशाप्रकारे. **भाणा** – बनवला आहे. **रिजकु** – अन्नपाणी. **ओथै** – तेथे. **ओन्हा** – त्यांचे. **होरो** – अन्य. **खाणा** – खाद्य. **माणा** – मान. **परवाणा** – परवाना, आज्ञापत्र, भाग्यलेख. **वंञनि** – नष्ट. **वरतदा** – व्याप्त. **ताडी** – समाधी. **पतीआईअनु** – विश्वास. **उझडि** – कुमार्ग. **पइअन्** – नेतो.

भावार्थ : सतगुरूरूपी सरोवर व गुरुमार्गी चालणारा शिष्यरूपी हंस ह्याचा मेळ प्रभू परमात्म्याने आधीपासूनच घालून ठेवला आहे. सतगुरूरूपी सरोवरात असलेले प्रभुनामरूपी हिरे मोती हे शिष्यरूपी हंसाचे अन्न असते. जे अतिशहाणे असतात ते बगळे व कावळे (स्वेच्छाचारी व दुराचारी) सतगुरूरूपी सरोवराजवळ राहत नाहीत कारण त्यांचे अन्नपाणी वेगळेच असते ते त्यांना तेथे (सतगुरूरूपी सरोवरात) प्राप्त होत नाही. सत्याची कमाई करणाऱ्यास सत्याची प्राप्ती होते. असत्याची कमाई करणाऱ्यास असत्यच प्राप्त होते. नानक सांगतात, ज्यांच्या भाग्यात प्रभूनेच आधीपासून तशी योजना करून ठेवली आहे त्यासच सतगुरूची प्राप्ती होते. ॥ १ ॥ माझा प्रभू परमात्मा उज्ज्वल आहे. जर मनात त्याचे स्मरण केले तर ती उज्ज्वलता आपल्याही मनात प्रज्वलित होते. नानक सांगतात, जो सदैव जीवास दान देतो त्या प्रभू परमात्म्याची सेवा करावी. नानक सांगतात, त्याची (प्रभूची) सेवा करावी की त्यामुळे दु:ख नष्ट होते, अवगुण नष्ट होतात, मनात सतगुण वास करतात व सुखाची प्राप्ती होते.॥२॥ पउडी ॥ प्रभू परमात्मा सर्वांपासून अलिप्त राहून समाधिस्त आहे पण तरीही तो सर्वव्याप्त आहे. तोच स्वत: सतगुरूच्या मुखातून गुरुमार्गी चालणाऱ्यास उपदेश देऊन त्याच्या मनात विश्वास जागृत करतो. काही जीवांना

तोच पथभ्रष्ट करतो तर तोच काहींना भक्तिमार्गी लावतो. ज्यास तो आत्मज्ञान देतो तोच परमज्ञान प्राप्त करतो व तोच त्यांना प्रभुनामात लीन करतो. नानक सांगतात, ज्याचे माहात्म्य थोर आहे अशा प्रभू परमात्म्याच्या नामाचे ध्यान करावे. ॥ २१ ॥ १ ॥ शुद्ध ॥

रामकली की वार महला ५

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने तो प्राप्त होतो.

॥ सलोक म. ५ ॥

जैसा सतिगुरु सुणीदा तैसो ही मै डीठु ॥
विछुड़िआ मेले प्रभू हरि दरगह का बसीठु ॥
हरि नामो मंत्रु द्रिड़ाइआ कटे हउमै रोगु ॥
नानक सतिगुरु तिना मिलाइआ जिना धुरे पइआ संजोगु ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ इकु सजणु सभि सजणा इकु वैरी सभि वादि ॥
गुरि पूरै देखालिआ विणु नावै सभ बादि ॥
साकत दुरजन भरमिआ जो लगे दूजै सादि ॥
जन नानकि हरि प्रभू बुझिआ गुर सतिगुर कै परसादि ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ थटणहारै थातु आपे ही थटिआ ॥ आपे पूरा साहु आपे ही खटिआ ॥
आपे करि पासारु आपे रंग रटिआ ॥ कुदरति कीम न पाइ अलख ब्रहमटिआ ॥
अगम अथाह बेअंत परै परटिआ ॥ आपे वड पातिसाहु आपि वजीरटिआ ॥
कोइ न जाणै कीम केवडु मटिआ ॥ सचा साहिबु आपि गुरमुखि परगटिआ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९५७)

शब्दार्थ : **सुणीदा** – ऐकले. **डिठु** – पाहिले. **बसिठु** – मध्यस्थ. **तिना** – त्याला. **सजणु** – मित्र. **सजणु** – सज्जन. **वादि** – भांडणारे. **साकत** – शाक्त. **सादि** – स्वाद, आवड. **थटणहारै** – निर्माणकर्ता. **साहु** – सावकार, श्रीमंत. **खटिआ** – कमावले, मिळविले. **पासारु** – पसारा, प्रसार. **रटिआ** – रंगला. **कीम** – किंमत. **ब्रहमटिआ** – ब्रह्म. **परै परटिआ** – परात्पर. **पातिसाहु** – सम्राट. **वजीरटिआ** – वजीर, मुख्यमंत्री. **मटिआ** – मठ, वसतिस्थान. **परगटिआ** – प्रगट होतो.

भावार्थ : मी सतगुरूबद्दल जसे ऐकले होते तसाच तो मला दिसला. तो प्रभूपासून दूर गेलेल्याचा प्रभूशी संयोग घडवून आणतो. तो प्रभूच्या दरबारात भक्तांसाठी मध्यस्थाचे काम करतो. तो भक्ताच्या मनात प्रभुनाम दृढ करतो व मनातील अहंकाररूपी रोग नष्ट करतो. नानक सांगतात, ज्यांच्या भाग्यात प्रभूने आधीच लिहून ठेवलेले असते त्यासच तो सतगुरूची भेट घडवतो. ॥ १ ॥ म. ५ ॥ तो प्रभू जेव्हा जीवाचा मित्र बनतो, तेव्हा त्या जीवास सर्व लोक सज्जनच दिसू लागतात. पण जर जीवास प्रभूच शत्रू वाटू लागला तर त्याला सगळे लोक त्याचे

शत्रू, वादी वाटू लागतात. सतगुरूने मला हे ज्ञान दिले आहे, की जगात एका प्रभुनामाशिवाय बाकी सारे काही व्यर्थ आहे. शाक्त, दुर्जन द्वैतात गुंतल्याने मायेच्या भ्रमात फिरत राहतात. दास नानकाने सतगुरूच्या कृपेने प्रभू परमात्म्यास जाणले आहे. ॥ २ ॥ पउडी ॥ त्या निर्माण करणाऱ्या प्रभू परमात्म्यानेच ही सर्व सृष्टी निर्माण केली आहे. प्रभू स्वत: मोठा सावकार आहे व त्यानेच सर्व काही एकत्र गोळा केले आहे. त्यानेच हा सर्व पसारा निर्माण करून त्याच्याच रंगात तो रंगून गेला आहे. त्या प्रभू परमात्म्याच्या शक्तीचे मूल्यमापन करणे कोणासही शक्य नाही. तो अलक्ष आहे. प्रत्यक्ष परब्रह्म आहे. तो अगम्य आहे. अथांग आहे. अनंत आहे. परात्पर आहे. तो स्वत: सम्राटांचा सम्राट आहे व तोच त्याचा मंत्रीही आहे. त्याचे स्थान व त्याचे मूल्य कोणीही जाणत नाही. तो सर्व सृष्टीचा मालक सत्य आहे व गुरुमार्गी चालणाऱ्या भक्ताच्या हृदयात तो प्रगट होतो. ॥ १ ॥

॥ सलोकु म. ५ ॥

सुणि सजण प्रीतम मेरिआ मै सतगुरू देहु दिखालि ॥
हउ तिसु देवा मनु आपणा नित हिरदै रखा समालि ॥
इकसु सतिगुर बाहरा धिगु जीवणु संसारि ॥
जन नानक सतिगुरु तिना मिलाइओनु जिन सद ही वरतै नालि ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ मेरै अंतरि लोचा मिलण की किउ पावा प्रभ तोहि ॥
कोई ऐसा सजणु लोड़ि लहु जो मेले प्रीतमु मोहि ॥
गुरि पूरै मेलाइआ जत देखा तत सोइ ॥
जन नानक सो प्रभू सेविआ तिसु जेवडु अवरु न कोइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ देवणहारु दातारु कितु मुखि सालाहीऐ ॥
जिसु रखै किरपा धारि रिजकु समाहीऐ ॥
कोइ न किसही वसि सभना इक धर ॥
पाले बालक वागि दे कै आपि कर ॥
करदा अनद बिनोद किछू न जाणीऐ ॥
सरब धार समरथ हउ तिसु कुरबाणीऐ ॥
गाईऐ राति दिनंतु गावण जोगिआ ॥
जो गुर की पैरी पाहि तिनी हरि रसु भोगिआ ॥ २॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५७)

शब्दार्थ : **सजण** – सज्जन, सजणा. **प्रीतम** – प्रियतम. **मेरिआ** – माझ्या. **देहू** – दे. **दिखाली** – दाखवून. **देवा** – देईन. **हिरदै** – हृदयात. **समालि** – संभाळून. **इकसु** – एकमात्र. **बाहरा** – शिवाय. **तिना** – त्याला. **मिलाइओनु** – प्राप्त होतो. **लोचा** – इच्छा. **तोहि** – तुला. **लोडि** – शोधून. **कितु** – कोणत्या. **सालाहीऐ** – स्तुती करणे. **समाहोऐ** – पोचवतो. **वागि** – समान. **करदा** – करतो. **धार** – धारण करणे. **दिनंतु** – दिवसा. **गावण** – गाण्या. **जोगिआ** – योग्य. **पैरी पाहि** – पाया पडला.

भावार्थ : हे माझ्या सजणा, प्रियतम प्रभू ! माझी विनंती ऐक. मला सतगुरूची भेट घडव. मी त्यास मन अर्पण करीन. त्यास आपल्या हृदयात संभाळून ठेवीन. एकमात्र सतगुरूशिवाय संसारात जगणे तिरस्करणीय होय. दास नानक सांगतात, ज्याला सतगुरू प्राप्त झाला तो सदैव त्याच्या संगतीत राहतो. ॥ १ ॥ म. ५ ॥ हे प्रभो ! माझ्या मनात तुझ्या मिलनाची तीव्र इच्छा आहे. प्रभो ! मी तुला कसा प्राप्त करू शकेन ? मी असा कोणी सज्जन शोधून काढीन की जो माझे माझ्या प्रियकराशी, प्रभू परमात्म्याशी मिलन घडवून आणील. पूर्णगुरूने माझे प्रभूशी मिलन घडवून आणले. आता मी जिकडे पाहतो तिकडे मला तोच दिसतो. दास नानक सांगतात, प्रभू परमात्म्याची सेवा करावी त्याच्याएवढा अन्य कोणी नाही. ॥ २ ॥ पउडी ॥ त्या दात्या प्रभूची स्तुती मी कोणत्या तोंडाने करू ? तो ज्याच्यावर कृपा धारण करतो त्यास तो अन्नपाणी पोचवतो. कोणाच्याही ताब्यात काहीही नाही. सर्व जीवांचे आश्रयस्थान तो एकमेव प्रभू परमात्माच आहे. तो सर्व जीवांना हाती धरून त्यांचा बालकासमान प्रतिपाळ करतो. तो त्यांच्याशी नाना प्रकारे आनंद विनोद करतो. त्याच्या लीलांबाबत कोणीही काहीही जाणत नाही. सर्व जीवांना त्या समर्थ प्रभूचाच आधार आहे. मी त्याच्यावर माझे सर्वस्व समर्पित करतो. त्याचे मी रात्रंदिवस गुणगान गातो. कारण तसे करण्यास तोच योग्य आहे. जो सतगुरूचरणी शरण जातो तो प्रभूरसाचा आनंद उपभोगतो. ॥२॥

॥ सलोक म. ५ ॥

भीड़हु मोकलाई कीतीअनु सभ रखे कुटंबै नालि ॥
कारज आपि सवारिअनु सो प्रभ सदा सभालि ॥
प्रभु मात पिता कंठि लाइदा लहुड़े बालक पालि ॥
दइआल होए सभ जीअ जंत्र हरि नानक नदरि निहाल ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ विणु तुधु होरु जि मंगणा सिरि दुखा कै दुख ॥
देहि नामु संतोखीआ उतरै मन की भुख ॥
गुर वणु तिणु हरिआ कीतिआ नानक किआ मनुख ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ सो ऐसा दातारु मनहु न वीसरै ॥ घड़ी न मुहतु चसा तिसु बिनु ना सरै ॥
अंतरि बाहरि संगि किआ को लुकि करै ॥ जिसु पति रखै आपि सो भवजलु तरै ॥
भगतु गिआनी तपा तिसु किरपा करै ॥ सो पूरा परधानु जिसनो बलु धरै ॥
जिसहि जराए आपि सोई अजरु जरै ॥ तिसही मिलिआ सचु मंत्रु गुर मनि धरै ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९५७)

शब्दार्थ : **भीडहु** - भिडेने, दु:खापासून, नाइलाजाने. **मोकलाई** - मुक्त करणे. **कितीअनु** - केले. **कुटुंबैनालि** - सपरिवार. **लहुडे** - लहान. **निहाल** - प्रसन्न. **संतोखिआ** - संतुष्ट झालो. **उतरै** - नष्ट झाली. **मनुख** - मनुष्य. **चसा** - क्षण. **लुकि** - गुप्त, लपविणे, लपणे. **जिसु** - ज्याची. **पति** - पत, प्रतिष्ठा. **तपा** - तपस्वी. **बलु** - बल, शक्ती. **धरै** - प्रदान करतो. **जराए** - . **अजरु** - . **जरै** - .

भावार्थ : हे प्रभो ! तूच मला सर्व दु:खापासून मुक्त केलेस व परिवारासह माझे रक्षण केलेस. तो जीवाची सर्व कार्ये संपन्न करतो. अशा प्रभू परमात्म्याचे सदा स्मरण करावे. प्रभू परमात्मा जीवास माता-पित्याप्रमाणे हृदयाशी

धरतो व लहान मुलाप्रमाणे जीवाचा प्रतिपाळ करतो. नानक सांगतात, जेव्हा प्रभू जीवावर कृपा करतो, तेव्हा इतर सर्व जीवजंतूही त्याच्याशी प्रेमाने वागतात. ॥ १ ॥ म. ५ ॥ हे प्रभो ! तुझ्याकडे तुझ्या नामाशिवाय अन्य काही मागणे म्हणजे डोक्यावर दु:खाचा भार वाढवून घेणेच होय. हे प्रभो ! मला फक्त तुझे नाम दे. मी त्यावर संतोष पावेन. तुझ्या नामामुळे माझ्या मनातील विकारांची भूक नष्ट होईल. नानक सांगतात, त्या प्रभूने सर्व वन, तृण हिरवेगार केले आहे. त्यास माणसाला प्रफुल्लित करण्यास किती़सा वेळ लागेल ? ॥ २ ॥ पउडी ॥ हे जीवा अशा प्रभूस तू मनातून मुळीच विसरू नकोस. एक घटका, मुहूर्त, क्षणभरही प्रभूशिवाय सरत नाही. अंतरात व बाहेरही सर्वत्र तुझ्याजवळच असलेल्या प्रभूपासून लपवून, गुप्तपणे तू काहीही करू शकत नाही. प्रभू ज्याच्या पत-प्रतिष्ठेचे स्वत: रक्षण करतो. तो भवसागर तरून जातो. ज्याच्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो तो प्रभुभक्त ज्ञानी व तपस्वी होतो. ज्यास प्रभु शक्ती प्रदान करतो तो सर्वश्रेष्ठ होतो. ज्यास तो सहन करण्याची शक्ती देतो तो असह्य गोष्टीही सहन करतो. जो सतगुरूकडून प्राप्त झालेला नाममंत्र हृदयात धारण करतो त्यास सत्यरूप प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ ३ ॥

॥ सलोकु म. ५ ॥

धंनु सु राग सुरंगड़े आलापम सभ तिख जाइ ॥
धंनु सु जंत सुहावड़े जो गुरमुखि जपदे नाउ ॥
जिनि इक मनि इकु अराधिआ तिन सद बलिहारै जाउ ॥
तिन की धूड़ि हम बाछदे करमी पलै पाइ ॥
जो रते रंगि गोविद कै हउ तिन बलिहारै जाउ ॥
आखा बिरथा जीअ की हरि सजणु मेलहु राइ ॥
गुरि पूरै मेलाइआ जनम मरण दुखु जाइ ॥
जन नानक पाइआ अगम रूपु अनत न काहू जाइ ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ धंनु सु वेला घड़ी धंनु धनु मूरतु पलु सारु ॥
धंनु सु दिनसु संजोगड़ा जितु डिठा गुर दरसारु ॥
मन कीआ इछा पूरीआ हरि पाइआ अगम अपारु ॥
हउमै तुटा मोहड़ा इकु सचु नामु आधारु ॥
जनु नानकु लगा सेव हरि उघरिआ सगल संसारु ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ सिफति सलाहणु भगति विरले दितीअनु ॥
सउपे जिसु भंडार फिरि पुछ न लीतीअनु ॥
जिस नो लगा रंगु से रंगि रतिआ ॥
ओना इको नामु अधारु इका उन भतिआ ॥
ओना पिछै जगु भुंचै भोगई ॥
ओना पिआरा रबु ओनाहा जोगई ॥
जिसु मिलिआ गुरू आइ तिनि प्रभु जाणिआ ॥
हउ बलिहारी तिन जि खसमै भाणिआ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९५८)

शब्दार्थ : **सुरंगडे** – सुंदर. **तिख** – तृष्णा. **जंत** – प्राणी. **सुहावडे** – सुंदर, शोभनीय. **धुछि** – धूळ. **बाछदे** – वांछितो. **करमी** – कृपेने. **आखा** – वर्णन करणे. **सारू** – श्रेष्ठ. **संजोगडा** – संयोग, समय. **जितु** – जेव्हा. **डिठा** – पाहिले. **दरसारू** – दर्शन. **मोहडा** – मोह. **सेव** – सेवा. **सिफति** – स्तुती. **सलाहणु** – प्रशंसा. **दितीअनु** – प्रदान केली. **सउपे** – सोपवले. **लीतीअनु** – करणे. **ओनो** – त्यांना. **भातिआ** – भोजन. **भुंचै** – खातो, उपभोग घेतो. **रबु** – परमेश्वर. **जोगई** – योग्य. **खसमै** – प्रभूस. **भाणिआ** – आवडले.

भावार्थ : तोच राग सुंदर आहे जो आळवल्याने सर्व तृष्णा समाप्त होतात. धन्य तो जीव जो गुरुमार्गी चालून प्रभुनामाचा जप करतो. ज्यांनी एकाग्रचित्ताने प्रभू परमात्म्याचे स्मरण केले त्यांच्या चरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. मी त्यांच्या चरणरजांची इच्छा धरतो. जी केवळ प्रभुकृपेनेच प्राप्त होते..जो प्रभू परमात्म्याच्या रंगात रंगून गेला त्याच्यापायी मी स्वत:स समर्पित करतो. त्यांना मी माझ्या मनीच्या व्यथा सांगून त्यांना प्रभुप्राप्तीचा मार्ग विचारतो. त्यामुळे मला प्रभू परमात्मा प्राप्त होईल व माझे जन्म मरणाचे दु:ख नष्ट होईल. दास नानकाने त्या अगम्यरूपी अनंतास, प्रभू परमात्म्यास प्राप्त केले आहे. आता त्याचे मन अन्यत्र कोठेही जात नाही. ॥ १ ॥ म.५॥ मला जेव्हा प्रभू परमात्म्याचे दर्शन झाले ती वेळ, ती घटका, तो मुहूर्त, तो क्षण, तो दिवस धन्य धन्य होय. मनात जी इच्छा केली होती ती पूर्ण झाली. तो अगम्य, अपार प्रभू परमात्मा मला प्राप्त झाला. मनातील अहंकार, मोह नष्ट झाला. आता मला त्या एकमेव प्रभू परमात्म्याच्या नामाचा आधार प्राप्त झाला आहे. दास नानक सांगतात की प्रभू परमात्म्याच्या सेवेस लागल्याने सारा संसार भवसागर तरून जातो. ॥ २ ॥ पउडी ॥ प्रभूची स्तुती करण्याची, प्रशंसा करण्याची, भक्ती करण्याची बुद्धी फार विरळ्या लोकांनाच दिली आहे. त्यांना प्रभूने नामभांडार देऊन टाकले. मग तो त्यांना परत हिशोब मागत नाही. ज्यांच्या मनात प्रभू परमात्म्याविषयी प्रेम निर्माण झाले ते त्याच्या प्रेमरंगात रंगून जातात. प्रभूनाम हाच त्यांचा आधार व प्रभुनाम हेच त्यांचे भोजन. त्यांच्यामुळे सारे जग प्रभुनामाचा उपभोग घेते. त्यांच्याही मनात प्रभू परमात्म्याविषयी प्रेम उत्पन्न होते व तेही प्रभुकृपेस पात्र होतात. ज्यास सतगुरू प्राप्त झाला त्यास प्रभू परमात्म्याचे ज्ञान होते. जे प्रभू परमात्म्यास प्रिय झाले त्यांच्या चरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ ४ ॥

॥ सलोक म. ५ ॥

हरि इकसै नालि मै दोसती हरि इकसै नालि मै रंगु ॥
हरि इको मेरा सजणो हरि इकसै नालि मै संगु ॥
हरि इकसै नालि मै गोसटे मुहु मैला करै न भंगु ॥
जाणै बिरथा जीअ की कदे न मोड़ै रंगु ॥
हरि इको मेरा मसलती भंनण घड़न समरथु ॥
हरि इको मेरा दातारु है सिरि दातिआ जग हथु ॥
हरि इकसै दी मै टेक है जो सिरि सभना समरथु ॥
सतिगुरि संतु मिलाइआ मसतकि धरि कै हथु ॥
वडा सहिबु गुरू मिलाइआ जिनि तारिआ सगल जगतु ॥

मन कीआ इछा पूरीआ पाइआ धुरि संजोग ॥
नानक पाइआ सचु नामु सद ही भोगे भोग ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ मनमुखा केरी दोसती माइआ का सनबंधु ॥
वेखदिआ ही भजि जानि कदे न पाइनि बंधु ॥
जिचरु पैननि खावन्हे तिचरु रखनि गंढु ॥
जितु दिनि किछु न होवई तितु दिनि बोलनि गंधु ॥
जीअ की सार न जाणनी मनमुख अगिआनी अंधु ॥
कूड़ा गंढु न चलई चिकड़ि पथर बंधु ॥
अंधे आपु न जाणनि फकड़ु पिटनि धंधु ॥
झूठै मोहि लपटाइआ हउ हउ करत बिहंधु ॥
क्रिपा करे जिसु आपणी धुरि पूरा करमु करेइ ॥
जन नानक से जन उबरे जो सतिगुर सरणि परे ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ जो रते दीदार सेई सचु हाकु ॥
जिनी जाता खसमु किउ लभै तिना खाकु ॥
मनु मैला वेकारु होवै संगि पाकु ॥
दिसै सचा महलु खुलै भरम ताकु ॥
जिसहि दिखाले महलु तिसु न मिलै धाकु ॥
मनु तनु होइ निहालु बिंदक नदरि झाकु ॥
नउ निधि नामु निधानु गुर कै सबदि लागु ॥
तिसै मिलै संत खाकु मसतकि जिसै भागु ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५८)

शब्दार्थ : **इकसै** – एकमेव. **मै** – माझी. **गोसठे** – गोष्टी, गप्पा. **कदे** – कधीही. **मोडै** – मोडणे, अनादर करणे. **मसलती** – सल्लागार. **भंनण** – भग्न करणे, नष्ट करणे. **केरी** – शी. **सनबंधु** – संबंध. **वेखदिआ** – पाहताच. **जिचरु** – जोपर्यंत. **पैननि** – परिधान करणे. **खावन्हे** – खाणे. **तिचरु** – तोपर्यंत. **गंढु** – मित्रता. **गंधु** – वाईट. **चिकडि** – चिखल. **फकड** – व्यर्थ. **बिहंधु** – व्यतीत करणे. **से** – ते. **उबरे** – वाचतात, उद्धार होतो. **दीदार** – . **बिरथा** – व्यथा. **जाता** – जाणला. **खसमु** – परमेश्वर. **खाकु** – चरणधूळ. **जिसहि** – ज्याला. **तिसु** – त्याला. **धाकु** – धक्का, हकलून देणे. **निहालु** – प्रसन्न. **बिंदक** – क्षणभर. **झाकु** – पाहणे.

भावार्थ : त्या एकमेव प्रभू परमात्म्याशी माझी मैत्री आहे. त्या एकमेव प्रभूवर माझे प्रेम आहे. तो एकमात्र हरी माझा साजण आहे व त्याच्याशीच मी एकनिष्ठ आहे. त्या एकमेव प्रभूशीच मी गप्पागोष्टी करतो. तो कधीही माझ्यापासून दूर जात नाही. माझ्यावर कधी रुसत नाही. तो माझ्या हृदयाची व्यथा जाणतो. तो माझ्या प्रेमाचा कधीही अस्वीकार करत नाही. तो प्रभू परमात्माच माझा एकमेव सल्लागार आहे. सर्व काही घडवण्यास व मोडण्यास तो समर्थ आहे. माझा प्रभू हाच एकमेव दाता आहे. जगातील सर्व दानी लोकांच्या मस्तकी त्याचाच वरदहस्त

असतो. तोच एकमेव सर्वश्रेष्ठ व सर्व समर्थ आहे. संतजनरूपी सतगुरूने माझे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवून आणले व प्रभूने माझ्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला आहे. ज्याने सर्व जगाला तारले आहे अशा प्रभूशी गुरूने माझे मिलन घडवून आणले. माझ्या प्रारब्धातच तसा योग होता. त्यामुळे माझी प्रभुमिलनाची मनोकामना पूर्ण झाली. नानक सांगतात, मला प्रभू परमात्म्याचे सत्यनाम प्राप्त झाले आहे. त्यामुळे मी प्रभुमिलनाचा आनंद उपभोगतो. ॥ १ ॥ म. ५ ॥ स्वेच्छाचारी जीवाशी मैत्री म्हणजे मोहमायेशी संबंध जोडणे होय. असा मनमुखी जीव पाहता पाहता प्रभूपासून दूर जातो. प्रभूशी असलेले नाते विसरून जातो. जोपर्यंत त्याला अन्न–वस्त्र निर्वेधपणे मिळत असते तोपर्यंत तो इतरांशी मैत्री ठेवतो. जेव्हा अन्नवस्त्राची ददात निर्माण होते तेव्हा तो इतरांना दोष देऊ लागतो. मनमुख व्यक्तीस, स्वेच्छाचारी जीवास जीवनाचा मूळ उद्देशच कळलेला नसतो. कारण तो मायेमुळे अज्ञान, अंधकारात बुडालेला असतो. ज्याप्रमाणे एक दगड दुसऱ्या दगडाशी चिखलाने एकत्र बांधून ठेवता येत नाही त्याचप्रमाणे स्वेच्छाचारी जीव अन्य कोणाशीही कायमस्वरूपी बांधला जात नाही. तो मोहमायेने अंध झाल्याने आपल्या आत्मस्वरूपास जाणत नाही व मोहमायेमुळे व्यर्थ उद्योगधंद्यात अडकून पडतो. तो त्याच्या मोहात अडकून अहंकाराने मी मी करत आपले जीवन व्यतीत करतो. ज्याच्यावर प्रभू परमात्मा कृपा करतो त्यास तो आधीच कर्मबंधनातून मुक्त करतो. नानक सांगतात, जे सतगुरूस शरण जातात त्यांचाच उद्धार होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ जे प्रभुभक्तीत लीन होतात त्यांनाच सत्याचरणी म्हणावे. ज्यांनी प्रभू परमात्म्यास जाणले आहे अशा प्रभुभक्तांची चरणधूळ कशी प्राप्त होईल ? अशांच्या, सत्यचरणी लोकांच्या, संगतीने विकारांनी मलिन झालेले मन पवित्र होते. त्याचे सर्व भ्रम नष्ट होऊन त्यास प्रभूच्या महालाचे दर्शन होते. ज्यास प्रभू परमात्मा आपल्या घरी स्थान देतो त्यास तो कधीही दूर लोटत नाही. जर प्रभू परमात्म्याने जीवाकडे क्षणभरही आपली कृपादृष्टी वळवली तरी जीवास आनंद वाटतो. त्याचे मन प्रसन्न होते. सतगुरूच्या उपदेशाने प्रभुनामरूपी नऊनिधी प्राप्त होतात. ज्याच्या भाग्यात तसे लिहिले असेल त्यासच संतांच्या चरणरजाची प्राप्ती होते. ॥ ५ ॥

॥ सलोक म. ५ ॥

हरणाखी कू सचु वैणु सुणाई जो तउ करे उधारणु ॥
सुंदर बचन तुम सुणहु छबीली पिरु तैडा मन साधारणु ॥
दुरजन सेती नेहु रचाइओ दसि विखा मै कारणु ॥
ऊणी नाही झूणी नाही नाही किसै विहूणी ॥
पिरु छैलु छबीला छडि गवाइओ दुरमति करति विहूणी ॥
ना हउ भुली ना हउ चुकी ना मै नाही दोसा ॥
जितु हउ लाई तितु हउ लगी तू सुणि सचु संदेसा ॥
साई सुोहागणि साई भागणि जै पिरि किरपा धारी ॥
पिरि अउगण तिस के सभि गवाए गल सेती लाइ सवारी ॥
करमहीण धन करै बिनंती कदि नानक आवै वारी ॥
सभि सुहागणि माणहि रलीआ इक देवहु राति मुरारी ॥ १ ॥

॥ म. ५ ॥ काहे मन तू डोलता हरि मनसा पूरणहारु ॥
सतिगुरु पुरखु धिआइ तू सभि दुख विसारणहारु ॥
हरि नामा आराधि मन सभि किलविख जाहि विकार ॥
जिन कउ पूरबि लिखिआ तिन रंगु लगा निरंकार ॥
ओनी छडिआ माइआ सुआवड़ा धनु संचिआ नामु अपारु ॥
अठे पहर इकतै लिवै मंनेनि हुकमु अपारु ॥
जनु नानकु मंगै दानु इकु देहु दरसु मनि पिआरु ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ जिसु तू आवहि चिति तिस नो सदा सुख ॥
जिसु तू आवहि चिति तिसु जम नाहि दुख ॥
जिसु तू आवहि चिति तिसु कि काड़िआ ॥
जिस दा करता मित्रु सभि काज सवारिआ ॥
जिसु तू आवहि चिति सो परवाणु जनु ॥
जिसु तू आवहि चिति बहुता तिसु धनु ॥
जिसु तू आवहि चिति सो वड परवारिआ ॥
जिसु तू आवहि चिति तिनि कुल उधारिआ ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९५९)

शब्दार्थ : **हरणाखी** – मृगनयना. **कु** – ला, तुला. **वैणु** – गोष्ट. **छबेली** – सुंदरी. **पिरु** – प्रिय पती, प्रभू. **तैडा** – तुझा. **साधरणु** – खरा आधार. **नेहु** – स्नेह. **दसि** – दाखव, सांग. **ऊणी** – उणीव, न्यून, दोष. **झुणी** – . **विहुणी** – विहीन, वैगुण्य. **किसै** – कोणतेही, कोणत्याही प्रकारचे. **करमि** – भाग्य. **साई** – तीच. **भागणि** – भाग्यवती. **गवाए** – नष्ट केले. **गल** – गळा. **धन** – स्त्री. **वारी** – वेळ. **रलिआ** – भोगतात. **किलविख** – पाप. **जाहि** – जाते, नष्ट होते. **ओनी** – त्यांनी. **सुआवडा** – आस्वाद. **मंनेनि** – मान्य करणे, स्वीकारणे. **मंगै** – मागतो. **पिआरु** – प्रेम. **काडिआ** – काळजी, चिंता.

भावार्थ : हे मृगनयने (जीवस्त्री) ! मी तुला एक सत्यवचन सांगतो की ज्यामुळे तूझा उद्धार होईल. हे सुंदरी, ते सुंदर वचन ऐक ! तो तुझा प्रियकर (प्रभू परमात्मा) हाच तुझ्या मनाचा खरा आधार आहे. तू दुर्जनांशी स्नेह का जोडला आहेस ? मला त्याचे कारण तरी सांग ? (जीवस्त्री उत्तर देते) वास्तविक माझ्यात काहीही उणीव नाही. काही न्यून नाही. काहीही कमी नाही. पण तरीही मी माझ्या दुर्बुद्धीमुळे, दुर्भाग्यामुळे माझ्या सुंदर प्रभुपती पासून दूर गेले आहे. मी आपणहून कोणतीही चूक केलेली नाही. माझा ह्यात काहीही दोष नाही. त्याने मला ज्या मार्गाने जाण्यास लावले त्याच मार्गाने मी चालले. मी सत्य तेच सांगत आहे. त्याच्या आज्ञेनुरूपच मी वागले आहे. जिच्यावर प्रभुकृपा करतो तीच भाग्यवती, खरी सुवासिनी होय. प्रिय प्रभू स्वत: तिच्यातील दोष दूर करतो व तिला आलिंगन देऊन तिचे जीवन सफल करतो. नानक म्हणतात, मी भाग्यहीन स्त्रीजीव माझी वेळ केव्हा येते व माझ्यावर प्रभुपती कृपा करतो त्याची मी उत्कंठेने वाट पाहात आहे. सर्व सुवासिनी प्रभुपतीच्या संगतीत आनंद उपभोगत आहेत. हे प्रभुपती ! मलाही एक रात्र का होईना तुझ्या संगतीचा लाभ घडू दे. ॥ १ ॥ म.५॥ हे मना ! तू का

विचलित होतोस तो प्रभू परमात्मा सर्व मनीषा पूर्ण करणारा आहे. तू सतगुरुरूपी पूर्णपुरुष परमात्म्याचे स्मरण कर. तो तुला तुझ्या सर्व दु:खांचा विसर पाडील. हे मना ! तू प्रभुनामाची आराधना कर. ते तुझी सर्व पापांपासून, सर्व विकारांपासून मुक्तता करील. ज्यांच्या भाग्यात पूर्वीच तसे लिहिले असेल त्यासच प्रभू परमात्म्याचे प्रेम प्राप्त होते. असा जीव मायेचा त्याग करतो व प्रभुनामरूपी अपार धनाचा संचय करतो. तो अष्टौप्रहर प्रभुनामात तल्लीन होऊन राहतो व प्रभू परमात्म्याची आज्ञा शिरोधार्य मानतो. दास नानक केवळ एकच दान मागतो. हे प्रभो ! मला तुझे दर्शन व्हावे व माझ्या मनात सदैव तुझे प्रेम वसू दे. ॥ २ ॥ पउडी ॥ हे प्रभू परमात्म्या ज्याच्या हृदयात तू प्रगट होतोस तो सदैव सुख प्राप्त करतो. ज्याच्या चित्तात तू वास करतोस त्यास यम दु:ख देऊ शकत नाही. ज्याच्या मनात तू वास करतोस त्यास कसली चिंता ? हे प्रभो ! तू ज्याच्याशी मैत्री करतोस त्याची सर्व कार्ये सफल होतात. ज्यांच्या चित्तात तू वास करतोस त्यांचा तू स्वीकार करतोस. ज्याच्या मनात तुझा वास आहे ते समृद्ध जीवन जगतात. त्याचा परिवारही सुखी होतो. ज्याच्या हृदयात तू वास करतोस त्याचा कुलाचा उद्धार होतो.॥६॥

॥ सलोक म. ५ ॥

अंदरहु अंना बाहरहु अंना कूडी कूडी गावै ॥
देही धोवै चक्र बणाए माइआ नो बहु धावै ॥
अंदरि मैलु न उतरै हउमै फिरि फिरि आवै जावै ॥
नींद विआपिआ कामि संतापिआ मुखहु हरि हरि कहावै ॥
बैसनो नामु करम हउ जुगता तुह कुटे किआ फलु पावै ॥
हंसा विचि बैठा बगु न बणई नित बैठा मछी नो तार लावै ॥
जा हंस सभा वीचारु करि देखनि ता बगा नालि जोडु कदे न आवै ॥
हंसा हीरा मोती चुगणा बगु डडा भालण जावै ॥
उडरिआ वेचारा बगुला मतु हावै मंञु लखावै ॥
जितु का लाइआ तित ही लागा किसु दोसु दिचै जा हरि एवै भावै ॥
सतिगुरु सरवरु रतनी भरपूरे जिसु प्रापति सो पावै ॥
सिख हंस सरवरि इकठे होए सतिगुर कै हुकमावै ॥
रतन पदारथ माणक सरवरि भरपूरे खाइ खरचि रहे तोटि न आवै ॥
सरवर हंसु दूरि न होई करते एवै भावै ॥
जन नानक जिस दै मसतकि भागु धुरि लिखिआ सो सिखु गुरू पहि आवै ॥
आपि तरिआ कुटंब सभि तारे सभा स्रिसटि छडावै ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६०)

शब्दार्थ : **अंदरहु** – अंत:करणात. **अंना** – अंध, अज्ञानी. **कूडी** – असत्य. **निंद** – झोप, मोहमायेची निद्रा. **बैसनो** – वैष्णव. **तुह** – तूस (भाताचे फोल). **बणई** – बनणे, होणे. **तार** – ध्यान. **चुगणा** – खातो. **डडा** – बेडूक. **मंञु** – खोटेपणा. **एवै** – असाच. **हुकमावै** – आज्ञेत. **करते** – कर्तापुरुष, प्रभू. **एवै** – असाच. **हुकमावै** – आज्ञेत. **एवै** – हेच. **भावे** – आवडले. **पहि** – पाशी, जवळ.

भावार्थ : जो जीव अंतर्बाह्य मोहमायेने अंध झाला आहे तो प्रभू परमात्म्याची खोटी व वरपांगी स्तुतिगीते गातो. तो स्नानादी बाह्य कर्मे करून कपाळी टिळा वगैरे लावून प्रभुभक्तीचा देखावा करतो पण तो सदैव मायेच्या मागेच धावत असतो. त्याच्या अंत:करणातील दुर्विचाराचा मळ मुळीच नष्ट झालेला नसतो व अहंकारामुळे तो जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतो. वास्तविक तो मोहनिद्रेत व्यग्र असतो. कामादि विकारांनी तडफडत असतो. पण तोंडाने मात्र हरिनामाचा उच्चार करत असतो. तो स्वत:स वैष्णव म्हणवतो. पण त्याचे सर्व कर्म अहंकाराने प्रेरित असते. हा प्रकार म्हणजे तूस कुटण्यासारखे आहे. त्यातून तांदूळ थोडाच मिळणार ! अशा कर्माने प्रभू प्राप्त होऊ शकत नाही. आत्मज्ञान प्राप्त होत नाही. पाण्यात हंसांसोबत बगळा बसला तरी त्याचे सारे ध्यान पाण्यातील माशांवरच खिळलेले असते. हंस व बगळा यांचा एकत्र विचार केला तर त्यांच्यात खूपच फरक दिसतो. ते कधीही एकमेकांसारखे दिसत नाहीत. हंस हिरे मोती खातात तर बगळ्यांना बेडूक आवडतात. अशा वेळी बगळा हंसांच्या घोळक्यातून उडून दूर जातो. नाहीतर त्याचे खोटेपणा उघडे पडेल. काय करणार प्रभू परमात्म्याने ज्यास ज्या मार्गास लावले त्या मार्गाने तो जातो. जर हरीचीच तशी इच्छा असेल तर उगाच कशाला कोणी दोष द्यावा? सतगुरु हे रत्नाने भरलेले सरोवर आहे. ज्यास सतगुरु प्राप्त होतो त्यासच ते प्रभूनामरूपी रत्न प्राप्त होते. सतगुरुच्या आज्ञेने शिष्य सतगुरुरूपी सरोवरात एकत्र येतात. सतगुरु सरोवरातून भरपूर नामरूपी रत्ने गोळा करतात, खातात. कितीही खर्च केली तरी कमी पडत नाहीत. त्यामुळे शिष्यरूपी हंस सतगुरुरूपी सरोवरापासून जराही दूर जात नाहीत. प्रभू परमात्म्यासही हेच आवडते. नानक सांगतात, ज्याच्या ललाटी प्रभूने आधीपासूनच तसा भाग्यलेख लिहिला आहे तोच शिष्य गुरूपाशी येतो. असा शिष्य स्वत: तर भवसागर तरून जातोच पण आपल्या कुटुंबास एवढेच नव्हे तर सर्व संसारास तारून नेतो. ॥ १ ॥

॥ म. ५ ॥ पंडितु आखाए बहुती राही कोरड़ मोठ जिनेहा ॥
अंदरि मोहु नित भरमि विआपिआ तिसटसि नाही देहा ॥
कूड़ी आवै कूड़ी जावै माइआ की नित जोहा ॥
सचु कहै ता छोहो आवै अंतरि बहुता रोहा ॥
विआपिआ दुरमति कुबुधि कुमूड़ा मनि लागा तिसु मोहा ॥
ठगै सेती ठगु रलि आइआ साथु भि इको जेहा ॥
सतिगुरु सराफु नदरी विचदो कढै तां उघड़ि आइआ लोहा ॥
बहुतेरी थाई रलाइ रलाइ दिता उघड़िआ पड़दा अगै आइ खलोहा ॥
सतिगुर की जे सरणी आवै फिरि मनूरहु कंचनु होहा ॥
सतिगुरु निरवैरु पुत्र सत्र समाने अउगण कटे करे सुधु देहा ॥
नानक जिसु धुरि मसतकि होवै लिखिआ तिसु सतिगुर नालि सनेहा ॥
अंम्रित बाणी सतिगुर पूरे की जिसु किरपालु होवै तिसु रिदै वसेहा ॥
आवण जाणा तिस का कटीऐ सदा सदा सुखु होहा ॥ २ ॥
॥पउड़ी॥ जो तुधु भाणा जंतु सो तुधु बुझई ॥ जो तुधु भाणा जंतु सु दरगह सिझई ॥
जिस नो तेरी नदरि हउमै तिसु गई ॥ जिस नो तू संतुसटु कलमल तिसु खई ॥

जिस कै सुआमी वलि निरभउ सो भई ॥ जिस नो तू किरपालु सचा सो थिअई ॥
जिस नो तेरी मइआ न पोहै अगनई॥ तिस नो सदा दइआलु जिनि गुर ते मति लई॥७॥
(श्री गु. ग्रं. सा. ९६०)

शब्दार्थ : **अखाए** – म्हणवतात. **राही** – मार्गावर चालतात. **कोरड मोठ** – कठोर हृदयी. **मोठ** – कुचर. **चहाड** – न शिजणारा कडधान्याचा दाणा. **तिसटसि** – स्थिर. **जोहा** – ओठ. **छोहो** – क्रोध, राग. **कुमूडा** – महामूर्ख. **विचदो कढै** – पारख करतो, वेचून काढतो. **बहुतेरी** – अनेक. **थाइ** – स्थान, ठिकाण. **खलोहा** – वास्तविकता. **मनुरहु** – गंजलेले लोखंड. **सत्र** – शत्रू. **सनेहा** – स्नेह, प्रेम. **सुधु** – शुद्ध. **बसेहा** – वास करतो. **सिझई** – सफल होतो. **संतुसटु** – संतुष्ट. **कलमल** – पाप. **खई** – नष्ट होणे. **वलि** – रक्षक. **ओहै** – पोहोचणे, स्पर्श करणे. **अगनई** – अग्नी.

भावार्थ : अनेक शास्त्रांचा अभ्यास केलेली व्यक्ती स्वत:स पंडित म्हणवते. पण ज्ञानाच्या अहंकाराने त्याचे हृदय कठोर होते. जणू कडधान्यातले कुचर. त्यांचे हृदय नित्य मोहाने व भ्रमाने व्यापलेले असते. त्याच्या देहास मुळीच स्थिरता नसते. ते मिथ्या येतात व जातात व मायेच्या संगतीतच रममाण होतात. खरे बोलले तर त्याला राग येतो. आतल्या आत तो रुष्ट होतो. त्याचे मन दुर्मती व कुबुद्धीने व्यापलेले असते. तो महामूर्ख सदैव मायेच्याच मागे लागलेला असतो. तो विकाररूपी ठगाच्या संगतीने विकारी बनतो. व त्यातच रममाण होतो. सतगुरूरूपी सराफाची जेव्हा त्याच्यावर नजर जाते, तेव्हा तो ते लोखंड बरोबर वेचून बाहेर काढतो. त्याने स्वत:स अन्यान्य ठिकाणी मिसळले तरी अखेर त्याचे वास्तव स्वरूप उघडे पडतेच. पण जे सतगुरूला शरण जातात ते गंजलेले लोखंड असले तरी त्याचे सोने होते. सतगुरू निर्वैर असतात. त्यांना पुत्र व शत्रू समान वाटतात. त्यांचे अवगुण दूर करून ते त्यांना शुद्ध करतात. नानक सांगतात, ज्याच्या ललाटी प्रभूने आधीपासूनच तसा भाग्यलेख लिहिला असेल त्याच्याच मनात सतगुरूबद्दल प्रेमभाव निर्माण होतो. पूर्ण सतगुरूची वाणी अमृतासमान असते. ज्याच्यावर त्याची कृपा होते त्याच्या हृदयात तो वास करतो. त्याची जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका होते व तो सदैव सुखी होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ जो जीव तुला (प्रभूला) आवडला तोच तुला जाणतो. जो जीव तुला आवडला त्याचे जीवन सफल झाले. त्यास प्रभू परमात्म्याच्या दरबारात स्थान प्राप्त होते. ज्याच्यावर तुझी कृपादृष्टी झाली त्याचा अहंकार नष्ट झाला. ज्याच्यावर तू प्रसन्न झालास त्याचे पाप लयाला गेले. प्रभू परमात्मा ज्याच्या पाठीशी उभा आहे तो निर्भय होतो. ज्याच्यावर तुझी कृपा होते तो सत्यस्वरूप होऊन जातो. ज्याच्यावर तू दया करतोस, विकाररूपी अग्नी त्यास स्पर्शही करत नाही. जो सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करतो त्याच्यावर प्रभू परमात्मा दया करतो. ॥ ७ ॥

॥ सलोक म. ५ ॥

करि किरपा किरपाल आपे बखसि लै ॥
सदा सदा जपी तेरा नामु सतिगुर पाइ पै ॥
मन तन अंतरि वसु दूखा नासु होइ ॥
हथ देइ आपि रखु विआपै भउ न कोइ ॥

गुण गावा दिनु रैणि एतै कंमि लाइ ॥
संत जना कै संगि हउमै रोगु जाइ ॥
सरब निरंतरि खसमु एको रवि रहिआ ॥
गुर परसादी सचु सचो सचु लहिआ ॥
दइआ करहु दइआल अपणी सिफति देहु ॥
दरसनु देखि निहाल नानक प्रीति एह ॥१॥
॥ म. ५ ॥ एको जपीऐ मनै माहि इकस की सरणाइ ॥
इकसु सिउ करि पिरहड़ी दूजी नाही जाइ ॥
इको दाता मंगीऐ सभु किछु पलै पाइ ॥
मनि तनि सासि गिरासि प्रभु इको इकु धिआइ ॥
अंम्रितु नामु निधानु सचु गुरमुखि पाइआ जाइ ॥
वडभागी ते संत जन जिन मनि वुठा आइ ॥
जलि थलि महीअलि रवि रहिआ दूजा कोई नाहि ॥
नामु धिआई नामु उचरा नानक खसम रजाइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ जिस नो तू रखवाला मारे तिसु कउणु ॥
जिस नो तू रखवाला जिता तिनै भैणु ॥
जिस नो तेरा अंगु तिसु मुखु उजला ॥
जिस नो तेरा अंगु सु निरमली हूं निरमला ॥
जिस नो तेरी नदरि न लेखा पुछीऐ ॥
जिस नो तेरी खुसी तिनि नउ निधि भुंचीऐ ॥
जिस नो तू प्रभ वलि तिसु किआ मुहछंदगी ॥
जिस नो तेरी मिहर सु तेरी बंदिगी ॥ ८ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९६१)

शब्दार्थ : **बखसि** – क्षमा. **हथ** – हात. **एह** – हीच. **पिरहडी** – प्रेम. **मगीऐ** – माग. **उचरा** – उच्चार करणे. **भैणु** – भुवन, जग. **अंगु** – साहाय्य, पक्ष, बाजू. **खुसि** – प्रसन्नता. **भूंचिऐ** – उपभोग घेतो. **वलि** – रक्षक. **मुहछंदगी** – मिंधेपणा. **मिहर** – कृपा. **बंदिगी** – भक्ती, सेवा.

भावार्थ : हे कृपानिधे प्रभू परमात्मा ! माझ्यावर कृपा कर व माझे अपराध क्षमा कर. मी सतगुरूच्या चरणाशी लीन होऊन सदैव तुझ्या नामाचा जप करतो. माझ्या तन–मनात तुझा वास होवो. त्यामुळे माझ्या सर्व दु:खाचा नाश होईल. हे प्रभो ! तू मला हाती धरून माझे रक्षण कर म्हणजे मला कोणतेही भय व्यापू शकणार नाही. मी रात्रंदिवस तुझेच गुण गात राहीन. हेच काम तू मला दे. संतसज्जनांच्या संगतीने माझा अहंकार दूर व्हावा. प्रभू परमात्मा सर्वव्याप्त आहे. सर्व जीवांच्या अंतरातही तोच भरून राहिला आहे. सतगुरूकृपेने मला सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान झाले. हे प्रभो ! माझ्यावर दया कर व मला तुझी स्तुती करण्याची बुद्धी दे. नानक सांगतात, हे प्रभो ! मला ह्याच गोष्टीत रस आहे की मला तुझ्या दर्शनाचा आनंद प्राप्त व्हावा. ॥ १ ॥

म.५॥ हे जीवा ! तू त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे आपल्या मनात स्मरण कर व त्या प्रभू परमात्म्यास शरण जा. त्या एकमेव प्रभूवर प्रेम कर. अन्य दुसरी कोणतीही जागा नाही. त्या एकमेव प्रभूपाशी तुला जे हवे त्याची याचना कर. सर्व काही तुझ्या पदरात पडेल. हे जीवा ! तन, मनाने प्रत्येक श्वासागणिक, प्रत्येक घासागणिक त्या एकमेव प्रभूचे तू ध्यान कर. प्रभूचे अमृतनाम सत्याचे भांडार आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण केल्याने ते प्राप्त होते. ज्यांच्या मनात प्रभू परमात्मा वास करतो ते संतजन महाभाग्यवान होत. तो प्रभू परमात्मा जळी, स्थळी, अंतराळी सर्वत्र भरून राहिला आहे. ह्या सृष्टीत त्याच्याशिवाय अन्य कोणीही नाही. नानक सांगतात, प्रभूच्या आज्ञेत राहूनच प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करावे व नामाचा उच्चार करावा. ॥ २ ॥ पउडी ॥ हे प्रभू ! तू ज्याचे रक्षण करतोस तो त्रिभुवन जिंकतो. तू ज्याचा पाठीराखा होतोस तो सर्वत्र उजळ मुखाने वावरतो. तू ज्याच्यासंगे असतोस तो पवित्राहून पवित्र होतो. ज्याच्यावर तुझी कृपादृष्टी असते त्यास धर्मराज त्याच्या कर्माचा हिशोब मागत नाही. ज्याच्यावर तू प्रसन्न होतोस तो नवनिधींचा उपभोग घेतो. हे प्रभो ! तू ज्याचा पाठीराखा होतोस त्याला अन्य कोणाचीही मिन्नतवारी करावी लागत नाही. तू ज्याच्यावर कृपा करतोस तो तुझ्या भक्तीत, सेवेत रममाण होतो. ॥ ८ ॥

॥ सलोक महला ५ ॥

होहु क्रिपाल सुआमी मेरे संतां संगि विहावे ॥
तुधहु भुले सि जमि जमि मरदे तिन कदे न चुकनि हावे ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ सतिगुरु सिमरहु आपणा घटि अवघटि घट घाट ॥
हरि हरि नामु जपंतिआ कोइ न बंधै वाट ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ तिथै तू समरथु जिथै कोइ नाहि ॥
ओथै तेरी रख अगनी उदर माहि ॥
सुणि कै जम के दूत नाइ तेरै छडि जाहि ॥
भउजलु बिखमु असगाहु गुर सबदी पारि पाहि ॥
जिन कउ लगी पिआस अंम्रितु सेइ खाहि ॥
कलि महि एहो पुंनु गुण गोविंद गाहि ॥
सभसै नो किरपालु सम्हाले साहि साहि ॥
बिरथा कोइ न जाइ जि आवै तुधु आहि ॥ ९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६१)

शब्दार्थ : विहावे – व्यतीत होणे. हावे – दु:ख. बंधे – अवरुद्ध करणे, अडवणे, अडथळा निर्माण करणे, रोखणे. नाइ – नाम. छडि – सोडून. जाहि – जातो. बिखमु – कठीण. असगाहु – अथांग, दुस्तर. गाही – गावे. सम्हाले – संभाळ करतो. साहि साहि – प्रत्येक श्वासागणिक. आहि – स्वेच्छेने, इच्छा करून.

भावार्थ : हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर व माझे सारे जीवन संतांच्या संगतीत व्यतीत होईल असे कर. जे तुला विसरतात ते सदैव जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहतात. ते कधीही दु:खमुक्त होत नाहीत. ॥ १ ॥म. ५॥ हे जीवा ! तू आपल्या सतगुरूचे स्मरण कर. जीवनमार्ग सुकर असो वा दुष्कर असो, सदैव प्रभुनामाचे स्मरण कर.

असे केल्याने तुझी वाट कोणीही अडवू शकणार नाही. ॥ २ ॥ जेथे कोणाचे काही चालत नाही तेथे, हे प्रभू तू समर्थपणे उभा असतोस. मातेच्या उदरात असताना उदराग्नीपासून तूच जीवाचे रक्षण करतोस. यमाचे दूत तुझे नाव ऐकताच जीवास सोडून पळून जातात. हा भवसागर कठीण आहे. दुस्तर आहे. अथांग आहे. सतगुरूकडून प्राप्त झालेल्या प्रभुनामाने तो तरून जाता येतो. ज्यास प्रभुनामाची तीव्र ओढ लागली आहे तोच प्रभुनामामृत प्राशन करतो. कलियुगात प्रभुनामाचे स्मरण करणे हेच एकमात्र पुण्यकर्म आहे. तो कृपाळू प्रभू परमात्मा सर्व जीवांचा प्रत्येक श्वासाश्वासागणिक संभाळ करतो. जो तुला श्रद्धापूर्वक शरण येतो त्याचे जीवन कधीच व्यर्थ जात नाही. ॥ ९ ॥

॥ सलोक म. ५ ॥

दूजा तिसु न बुझावहु पारब्रहम नामु देह आधारु ॥
अगमु अगोचरु साहिबो समरथु सचु दातारु ॥
तू निहचलु निरवैरु सचु सचा तुधु दरबारु ॥
कीमति कहणु न जाईऐ अंतु न पारावारु ॥
प्रभ छोडि होरु जि मंगणा सभु बिखिआ रस छारु ॥
से सुखीए सचु साह से जिन सचा बिउहारु ॥
जिना लगी प्रीति प्रभ नाम सहज सुख सारु ॥
नानक इकु आराधे संतन रेणारु ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ अनद सूख बिस्राम नित हरि का कीरतनु गाइ ॥
अवर सिआणप छाडि देहि नानक उधरसि नाइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ ना तू आवहि वसि बहुतु घिणावणे ॥ ना तू आवहि वसि बेद पड़ावणे ॥
ना तू आवहि वसि तीरथि नाइऐ ॥ ना तू आवहि वसि धरती धाइऐ ॥
ना तू आवहि वसि कितै सिआणपै ॥ ना तू आवहि वसि बहुता दानु दे ॥
सभु को तेरै वसि अगम अगोचरा ॥ तू भगता कै वसि भगता ताणु तेरा ॥ १० ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९६२)

शब्दार्थ : दूजा – अन्य. बुझाइहु – समजावणे. देहु – दिला. होरु – अन्य. बिखिआ – विष. छारु – राख, भस्म. साह – सावकार. बिउहारु – व्यवहार. सारु – प्राप्त करणे. अवर – अन्य. नाइ – नाम. घिणावणे – घृणा करणे. घाईऐ – धावणे. ताणु – बल, शक्ती, आश्रय.

भावार्थ : हे प्रभो ! ज्यास तू तुझ्या नामाचा आश्रय देतोस त्यास नंतर दुसरीकडे जाऊ देऊ नकोस. हे प्रभो ! तू अगम्य व अगोचर आहेस. तू समर्थ आहेस. खरा दाता आहेस. तू अचल आहेस, अढळ आहेस. निर्वैर आहेस. तू सत्य आहे. तुझा दरबारही सत्य आहे. तुझे मोल कोणीही करू शकत नाही. तुला अंतही नाही. पारावारही नाही. प्रभू सोडून अन्य काहीही मागितले तरी ते विष, राखेसमान होय. ज्यांचा व्यवहार सत्य आहे तोच खरा सुखी व श्रीमंत होय. ज्याच्या मनात प्रभुनामाविषयी प्रेम उत्पन्न झाले त्यास सहज सुख प्राप्त होते. नानक एकमेव प्रभू परमात्म्याचे ध्यान करतो व संतजनांची चरणधूळ होण्यात धन्यता मानतो. ॥ १ ॥ म.५॥ नित्य हरीची कीर्ती

गायल्याने आनंद, सुख व विश्राम प्राप्त होतो. नानक सांगतात, हे जीवा ! तू अन्य शहाणपण सोडून दे. प्रभुनामाचे स्मरण कर. तेच तुझा उद्धार करील. ॥ २ ॥ पउडी ॥ केवळ संसाराची घृणा केल्याने हे प्रभू परमात्मा तू वश होत नाहीस किंवा वेदाध्ययन केल्यानेही तू प्राप्त होत नाहीस. तीर्थात स्नान केल्याने तू प्राप्त होत नाहीस किंवा जगभर वणवण हिंडण्यानेही तू वश होत नाहीस. अन्य कोणतेही चातुर्य दाखवून तुला प्राप्त करून घेता येत नाही. खूप दान देऊनही तुला वश करता येत नाही. हे प्रभो ! तू अगम्य, अगोचर आहेस. सारी सृष्टी तुझ्याच आज्ञेत आहे. पण तू मात्र भक्तांच्या आज्ञेत राहतोस. तूच भक्तांचे सामर्थ्य आहेस. ॥ १० ॥

॥ सलोक म. ५ ॥

आपे वैदु आपि नाराइणु ॥ एहि वैद जीअ का दुखु लाइण ॥
गुर का सबदु अंम्रित रसु खाइण ॥
नानक जिसु मनि वसै तिस के सभि दूख मिटाइण ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ हुकमि उछलै हुकमे रहै ॥ हुकमे दुखु सुखु सम करि सहै ॥
हुकमे नामु जपै दिनु राति ॥ नानक जिस नो होवै दाति ॥
हुकमि मरै हुकमे ही जीवै ॥ हुकमे नान्हा वडा थीवै ॥
हुकमे सोग हरख आनंद ॥ हुकमे जपै निरोधर गुरमंत ॥
हुकमे आवणु जाणु रहाए ॥ नानक जा कउ भगती लाए ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ हउ तिसु ढाढी कुरबाणु जि तेरा सेवदारु ॥
हउ तिसु ढाढी बलिहार जि गावै गुण अपार ॥
सो ढाढी धनु धंनु जिसु लोड़े निरंकारु ॥
सो ढाढी भागठु जिसु सचा दुआर बारु ॥
ओहु ढाढी तुधु धिआइ कलाणे दिनु रैणार ॥
मंगै अंम्रित नामु न आवै कदे हारि ॥
कपडु भोजनु सचु रहदा लिवै धार ॥
सो ढाढी गुणवंतु जिस नो प्रभ पिआरी ॥ ११ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६२)

शब्दार्थ : **वैदु** – वैद्य. **उछले** – उसळतो, अहंकार करतो. **सहै** – सहन करतो. **नान्हा** – लहान, छोटा. **थीवै** – होतो. **निरोधर** – अचूक, अमोघ. **ढाढी** – गुण गाणारा गायक, शाहीर. **लोडे** – आवडतो. **भागठु** – भाग्यवान. **बारु** – आश्रय. **कलाणे** – स्तुती करणे.

भावार्थ : प्रभू परमात्माच खरा वैद्य आहे. इतर वैद्य आत्म्यास दुःखी करतात. सतगुरूकडून प्राप्त झालेले प्रभूनाम हेच अमृत आहे. त्याचेच भोजन करावे. नानक सांगतात, ज्याच्या मनात प्रभुनाम वास करते त्याचे सर्व दुःख नष्ट होते. ॥ १ ॥ म. ५ ॥ प्रभू परमात्म्याच्या इच्छेनेच मन इकडे तिकडे उड्या मारते. अहंकार उसळतो व प्रभूच्या आज्ञेनेच जीव सुखदुःख समान मानतो व तो रात्रंदिवस प्रभुनामाचा जप करतो. ज्यास प्रभूकडून तसे ज्ञान प्राप्त होते तोच असे करू शकतो. प्रभू आज्ञेनेच जीवास मरण येते. प्रभू आज्ञेनेच तो जीवन जगतो. प्रभूच्या

इच्छेनेच जीव लहान वा मोठा होतो. प्रभूच्या आज्ञेनेच जीव हर्ष, शोक, आनंद उपभोगतो. प्रभूच्या आज्ञेनेच जीव गुरूकडून प्राप्त झालेला अमोघ असा नामरूपी मंत्र जपतो. प्रभूच्या आज्ञेनेच जीव जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. नानक सांगतात, ज्या कोणास प्रभू परमात्मा भक्तिमार्गास लावतो त्याच्याच बाबतीत हे सर्व घडते. ॥ २ ॥ पउडी ॥ जे प्रभुसेवक शाहीर बनून तुझे गुण गातात त्यांच्याचरणी मी माझे सर्वस्व समर्पित करतो. मी त्या शाहिरांवर समर्पित होतो जे अपार अशा प्रभू परमात्म्याचे गुण गातात. जो निराकार प्रभू परमात्म्यास प्रिय होतो तो शाहीर धन्य होय. ज्या शाहिरास प्रभू दरबारात स्थान प्राप्त झाले तो शाहीर भाग्यवान होय. तोच शाहीर रात्रंदिवस प्रभूचे गुणगान गातो व प्रभूकडे त्याच्या नामाची याचना करतो. असा शाहीर जीवनात कधीच पराभूत होत नाही. परमसत्य हेच त्याचे अन्न, वस्त्र. तो सदैव प्रभुनामात तल्लीन होऊन राहतो. ज्याच्या हृदयात प्रभू परमात्म्याविषयी नितांत प्रेम असते तोच शाहीर खरा गुणवंत होय. ॥ ११ ॥

॥ सलोक म. ५ ॥

अंम्रित बाणी अमिउ रसु अंम्रितु हरि का नाउ ॥
मनि तनि हिरदै सिमरि हरि आठ पहर गुण गाउ ॥
उपदेसु सुणहु तुम गुरसिखहु सचा इहै सुआउ ॥
जनमु पदारथु सफलु होइ मन महि लाइहु भाउ ॥
सूख सहज आनदु घणा प्रभ जपतिआ दुखु जाइ ॥
नानक नामु जपत सुखु ऊपजै दरगह पाईऐ थाउ ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ नानक नामु धिआइऐ गुरु पूरा मति देइ ॥
भाणै जप तप संजमो भाणै ही कढि लेइ ॥
भाणै जोनि भवाईऐ भाणै बखस करेइ ॥ भाणै दुखु सुख भोगीऐ भाणै करम करेइ ॥
भाणै मिटी साजि कै भाणै जोति धरेइ ॥ भाणै भोग भागाइदा भाणै मनहि करेइ ॥
भाणै नरकि सुरगि अउतारे भाणै धरणि परेइ ॥
भाणै ही जिसु भगती लाए नानक विरले हे ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ वडिआई सचे नाम की हउ जीवा सुणि सुणे ॥
पसू परेत अगिआन उधारे इक खणे ॥
दिनसु रैणि तेरा नाउ सदा सद जापीऐ ॥ त्रिसना भुख विकराल नाइ तेरै धापीऐ ॥
रोगु सोगु दुखु वंञै जिसु नाउ मनि वसै ॥ तिसहि परापति लालु जो गुर सबदी रसै ॥
खंड ब्रहमंड बेअंत उधारणहारिआ ॥ तेरी सोभा तुधु सचे मेरे पिआरिआ ॥१२॥
(श्री गु. ग्रं. सा. ९६३)

शब्दार्थ : **अमिउ** – अमृत. **रसु** – स्वाद. **सुआउ** – प्रयोजन. **भाउ** – भाव, प्रेम. **भाणै** – प्रभूच्या इच्छेने, आज्ञेने. **कढि** – काढून. **भवाइऐ** – फिरवतो. **बखस** – क्षमा, कृपा. **मिटि** – शरीर. **जोति** – आत्मारूपी ज्योत. **अउतारे** – टाकतो, भोगावयास लावतो. **परेत** – प्रेत. **खणे** – क्षणात. **वञै** – दूर होते. **लालु** – लाल, प्रभू.

उधारणहारिआ – उद्धारकर्ता.

भावार्थ : प्रभूची वाणी अमृतमय आहे. त्याचा स्वादही अमृतमधुर आहे. प्रभू परमात्म्याचे नाम हेच अमृत आहे. हे जीवा ! तू तन, मन अंत:करणपूर्वक अष्टौप्रहर हरीचे स्मरण कर. त्याचे गुण गा. गुरूच्या शिष्यांनो तुम्ही हा उपदेश ध्यानपूर्वक ऐका की प्रभुनामाचे स्मरण हेच जीवनाचे खरे प्रयोजन आहे. मनात प्रभू परमात्म्याविषयी भक्तिभाव धारण केल्यानेच मानवीजन्माचे सार्थक होते. प्रभुनामाचा जप केल्याने दु:ख नष्ट होते, सहज सुख व परमनंदाची प्राप्ती होते. नानक सांगतात, प्रभुनामाचा जप केल्याने सुखाची प्राप्ती होते. व प्रभूच्या दरबारात स्थान प्राप्त होते. ॥ १ ॥ म. ५ ॥ नानक सांगतात, पूर्णगुरू हाच उपदेश करतात की प्रत्येक जीवाने प्रभुनामाचे ध्यान करावे. प्रभूच्या इच्छेनेच जीव जप, तप, संयम यांचे आचरण करतो व तोच जीवास ह्या कर्मकांडाच्या बंधनामून मुक्त करतो. प्रभूच्या इच्छेनेच जीव नामयोनीत फिरत राहतो व त्याच्याच इच्छेने तो जीवास क्षमा करतो. त्याच्याच इच्छेने जीव सुख वा दु:ख भोगतो व त्याच्याच इच्छेने जीव कर्म करतो. प्रभूने त्याच्या इच्छेनेच हे शरीर निर्माण केले व त्यात आत्मज्योत स्थापित केली. प्रभूच्या इच्छेनेच जीव भोग भोगतो व तोच आपल्या आज्ञेने जीवास त्यापासून परावृत्तही करतो. प्रभूच्या इच्छेनेच जीव स्वर्ग व नरकवास भोगतो तर त्याच्याच इच्छेने तो धरणीवर येतो व नष्टही होतो. नानक सांगतात त्याच्या इच्छेने तो फार थोड्या लोकांनाच भक्तिमार्गावर आणतो. ॥ २ ॥ पउडी ॥ सत्यरूप प्रभुनामाची महती ऐकून ऐकूनच तर मी माझे जीवन जगत आहे. प्रभुनामाचे स्मरण केल्यानेच पशू, प्रेत, अज्ञानी जीवांचा क्षणात उद्धार होतो. हे प्रभू ! रात्रंदिवस मी तुझ्या नामाचा जप करतो. हे प्रभो ! तुझ्या नामाने मायेची, तृष्णा व विकारांची भूक नष्ट होते. ज्याच्या मनात प्रभुनामाचा वास होतो, त्याचे रोग, शोक, दु:ख सारे दूर होतात. जो गुरूच्या उपदेशात रंगून जातो. त्यास प्रभू परमात्मारूपी लाल प्राप्त होतो. हे प्रभू तू सर्वच जीवांचा उद्धार करतोस. तुझे खंड ब्रह्मांडेही अनंत आहेत. हे माझ्या प्रिय प्रभू ! तुझी शोभा, तुझी महती तूच जाणतोस. ॥ १२ ॥

॥ सलोक म. ५ ॥

मित्रु पिआरा नानक जी मै छडि गवाइआ रंगि कसुंभै भुली ॥
तउ सजण की मै कीम न पउदी हउ तुधु बिनु अदु न लहदी ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ ससु विराइणि नानक जीउ ससुरा वादी जेठो पउ पउ लूहै ॥
हभे भसु पुणेदे वतनु जा मै सजणु तू है ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ जिसु तू वुठा चिति तिसु दरदु निवारणो ॥
जिसु तू वुठा चिति तिसु कदे न हारणो ॥
जिसु मिलिआ पूरा गुरू सु सरपर तारणो ॥
जिस नो लाए सचि तिसु सचु सम्हालणो ॥
जिसु आइआ हथि निधानु सु रहिआ भालणो ॥
जिस नो इको रंगु भगतु सो जानणो ॥
ओहु सभना की रेणु बिरही चारणो ॥
सभि तेरे चोज विडाण सभु तेरा कारणो ॥ १३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६३)

शब्दार्थ : **छडि** – सोडून. **पउदी** – प्राप्त झाली, समजली. **अदु** – अर्धी कवडी. **ससु** – सासु. **विराइणि** – वैरिणी. **वादी** – भांडकुदळ, खाष्ट. **जेठ** – ज्येष्ठ दीर. **लुहै** – जाळतो. **हभे** – . **भसु** – . **पुणेदे** – भटकणे. **वुठा** – वास केला. **हारणि** – पराजय. **सरपर** – संसारसागर. **तारणो** – तरून जातो. **रेणु** – धूळ. **बिरही** – प्रेमी. **चारणो** – चरणांचा. **चोज** – कौतुक. **विडाण** – आश्चर्यजनक. **करणो** – कार्य.

भावार्थ : नानक सांगतात, अशाश्वत अशा मायेला भुलून मी माझ्या प्रिय मित्राला, प्रभू परमात्म्याला सोडून दिले. त्या माझ्या सजणाची किंमत मी जाणली नाही. हे प्रभू ! तुझ्याशिवाय मी कवडीमोलही नाही. ॥ १ ॥ म. ५॥ अविद्यारूपी सासू माझी वैरीण आहे. माझा देह हा माझा खाष्ट सासरा आहे. यमराज हा माझा ज्येष्ठ दीर मला वारंवार दु:ख देतो. हे प्रभो ! जर तू माझा मित्र झालास तर हे सगळे उकिरडे फुंकत हिंडले तरी मला त्याची पर्वा नाही. ॥ २ ॥ पउडी ॥ ज्याच्या चित्तात तू वास करतोस त्याचे दु:ख नष्ट होते. ज्याच्या अंत:करणात तुझा वास आहे तो कधी पराभूत होत नाही. ज्यास पूर्णगुरू प्रभू परमात्मा प्राप्त झाला तो निश्चितपणे संसारसागर तरून जातो. ज्यास तू सत्यात लीन करतोस तो सदैव सत्यरूप प्रभूचे स्मरण करतो. ज्यास प्रभुनामरूपी खजिना प्राप्त झाला त्याचे मायेच्या मोहाने भटकणे थांबते. तोच खरा भक्त, की जो एकमेव प्रभूच्या प्रेमरंगात रंगून जातो. तो सर्वांची चरणधूळ होतो. विनम्र होतो व प्रभुचरणी लीन होतो. हे प्रभो ! हे सारे तुझेच आश्चर्यजनक कौतुक आहे. ही सारी तुझीच करणी आहे.

॥ सलोक म. ५ ॥

उसतति निंदा नानक जी मै हभ वजाई छोड़िआ हभु किझु तिआगी ॥
हभे साक कुड़ावे डिठे तउ पलै तैडै लागी ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ फिरदी फिरदी नानक जीउ हउ फावी थीई बहुतु दिसावर पंधा ॥
ता हउ सुखि सुखाली सुती जाग गुर मिलि सजणु मै लधा ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ सभे दुख संताप जां तुधहु भुलीऐ ॥
जे कीचनि लख उपाव तां कही न घुलीऐ ॥
जिस नो विसरै नाउ सु निरधनु कांढीऐ ॥
जिस नो विसरै नाउ सु जोनी हांढीऐ ॥
जिसु खसमु न आवै चिति तिसु जमु डंडु दे ॥
जिसु खसमु न आवै चिति रोगी से गणे ॥
जिसु खसमु न आवी चिति सु खरो अहंकारिआ ॥
सोई दुहेला जगि जिनि नाउ विसारीआ ॥ १४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६३)

शब्दार्थ : उसंतति – स्तुती. **वजाई** – दूर करणे. **हभी** – सर्व. **साक** – नाती. **कुडावे** – असत्य. **तेडै** – तुझे. **फावी** – व्याकूळ. **थीई** – झाले. **दिसावर** – परदेशात. **पंधा** – मार्ग. **ता** – तेव्हा. **सुती** – झोपते. **जा** – जेव्हा. **तुघहु** – तुला. **भुलीऐ** – विसरले. **कीचनि** – केले. **जे** – जेव्हा. **उपाव** – उपाय. **घुलीऐ** – सुटका. **कांढीऐ** – म्हणावे, ओळखला जातो. **हांढीऐ** – भटकतो. **खरो** – महान. **दुहेला** – दु:खी.

भावार्थ : नानक सांगतात, मी दुसऱ्याची स्तुती, निंदा करणे सोडून दिले आहे. सर्वच गोष्टींचा त्याग करून संपूर्णपणे विरक्त झालो आहे. मी अहंकारही सोडला आहे. मला माझे सर्व नातेवाईक, संबंधी सारे असत्य वाटू लागले, तेव्हा मी तुझ्या चरणांचा आश्रय घेतला. ॥ १ ॥ सर्वत्र हिंडून हिंडून मी वेडीपिशी झाले आहे. मी देश-देशांतरीही हिंडले आहे. नाना मार्ग चोखाळले पण जेव्हा सतगुरूने माझे माझ्या प्रियकराशी मिलन घडवले तेव्हाच मी सुखाने झोपले. ॥ २ ॥ पउडी ॥ जेव्हा जीव प्रभू परमात्म्यास विसरतो, तेव्हा त्याला दु:ख, क्लेश भोगावे लागतात. लाखो उपाय केले तरी त्यातून सुटका होत नाही. जो प्रभुनाम विसरला त्यास निर्धन म्हणावे. जो प्रभुनाम विसरला त्यास नाना योनीतून फिरावे लागते. ज्याच्या अंतरात प्रभू परमात्मा नाही त्यास यमदंड भोगावा लागतो. ज्याच्या चित्तास प्रभू परमात्म्याची आठवण होत नाही तो रोगी म्हणावा. ज्याच्या चित्तास प्रभू परमात्म्याची आठवणही होत नाही तो महाअहंकारी होय. ज्या जीवस्त्रीच्या चित्तास प्रभुनामाचा विसर पडला ती दु:ख भोगते.॥१४॥

॥ सलोक म. ५ ॥

तैडी बंदसि मै कोइ न डिठा तू नानक मनि भाणा ॥
घोलि घुमाई तिसु मित्र विचोले जै मिलि कंतु पछाणा ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ पाव सुहावे जां तउ धिरि जुलदे सीसु सुहावा चरणी ॥
मुखु सुहावा जां तउ जसु गावै जीउ पइआ तउ सरणी ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ मिलि नारी सतसंगि मंगलु गावीआ ॥
घर का होआ बंधानु बहुड़ि न धावीआ ॥
बिनठी दुरमति दुरतु सोइ कुड़ावीआ ॥
सीलवंति परधानि रिदै सचावीआ ॥
अंतरि बाहरि इकु इक रीतावीआ ॥
मनि दरसन की पिआस चरण दासावीआ ॥
सोभा बणी सीगारु खसमि जां रावीआ ॥
मिलीआ आइ संजोगि जां तिसु भावीआ ॥ १५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६४)

शब्दार्थ : **तैडी** – तुझा. **बंदसि** – सारखा. **डिठा** – पाहिला. **भाणा** – आवडला. **घोली घुमाई** – समर्पित होणे. **विचोले** – मध्यस्थ. **पझाणा** – ओळखले. **पाव** – पाय. **सुहावे** – सुंदर. **धिरि** – . **जलदे** – . **सीसु** – मस्त. **नारी** – जीवस्त्री. **घर** – मन, देह. **बंधानु** – बद्ध, स्थिर. **बिनठी** – नष्ट. **दुरतु** – दुरित, पाप. **कुडाविआ** – असत्य गोष्टी. **रिदै** – हृदयात. **सचाविआ** – दासी.

भावार्थ : नानक सांगतात, हे प्रभो ! तुझ्यासारखा मी अन्य कोणीही पाहिला नाही. तूच मला आवडला आहेस. ज्या सतगुरुरूपी मध्यस्थामुळे मी तुला माझ्या पतीस जाणले त्याच्या चरणी मी माझे सर्वस्व समर्पित करते. ॥ १ ॥ म. ५ ॥ जे प्रभुमार्गी चालतात तेच पाय सुंदर होत. जे मस्तक तुझ्या (प्रभूच्या) चरणी लीन होते ते मस्तक सुंदर होय. ते मुख सुंदर जे सदैव प्रभूचे यशोगान गाते. तोच जीव सुंदर जो प्रभुचरणी शरण जातो. ॥ २ ॥

पउडी ॥ जीवस्त्री संतसंगतीत प्रभुपतीचे मंगलगीत गाते. त्यामुळे तिचे चित्त स्थिर होते. ते अन्यत्र कुठे भटकत नाही. तिची दुर्मती, दुर्विचार, पाप सारे काही नष्ट झाले. आता तिच्या मनाला असत्य स्पर्शही करत नाही. आता ती चारित्र्यवान झाली आहे. शीलवान झाली आहे. तिच्या हृदयात आता सत्यरूप प्रभूचा वास आहे. तिचे अंतर्बाह्य वर्तन एकसमान असते. मनात प्रभुदर्शनाची आस धरून ती प्रभुचरणाची दासी झाली आहे. जेव्हा प्रभुपती तिच्याशी रममाण होतो तेव्हा तिचे सौंदर्याचे शृंगाराचे सार्थक होते. जेव्हा जीवस्त्री प्रभुपतीस आवडली, तेव्हाच तिला प्रभुमिलनाचा योग प्राप्त झाला. ॥ १५ ॥

॥ सलोक म. ५ ॥

हभि गुण तैडे नानक जीउ मै कु थीए मै निरगुण ते किआ होवै ॥
तउ जेवडु दातारु न कोई जाचकु सदा जाचोवै ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ देह छिजंदड़ी ऊण मझूणा गुरि सजणि जीउ धराइआ ॥
हभे सुख सुहेलड़ा सुता जिता जगु सबाइआ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ वडा तेरा दरबारु सचा तुधु तखतु ॥
सिरि साहा पातिसाहु निहचलु चउरू छतु ॥
जो भावै पारब्रहम सोई सचु निआउ ॥ जे भावै पारब्रहम निथावे मिले थाउ ॥
जो किन्ही करतारि साई भली गल ॥ जिन्ही पछाता खसमु से दरगाह मल ॥
सही तेरा फुरमानु किनै न फेरीऐ ॥ कारण करण करीम कुदरति तेरीऐ ॥ १६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९६४)

शब्दार्थ : **हाभि** – सर्व. **तुडै** – तुझे. **जाचोवै** – याचना करतात. **छिजंदडी** – क्षीण होणे, झिजणे. **ऊण** – शिवाय, न्यून. **मझूणा** – उदास. **धराइआ** – धैर्य दिले. **सुहेलडा** – सुखी. **जिता** – जिंकले. **चउरू** – चवरी, चामर. **छतु** – छत्र. **निथावे** – निराधार. **किन्ही** – केले. **करतारि** – कर्त्याप्रभूने. **गल** – गोष्ट. **पछाता** – ओळखले, जाणले. **मल** – मिळाले. **फुरमानु** – आज्ञा. **किनै** – कोणीही. **फेरिऐ** – फिरवणे, बदलणे, टाकणे. **करीम** – कृपाळू. **कुदरति** – शक्ती. **तेरीऐ** – तुझीच.

भावार्थ : गुरू नानक सांगतात, हे प्रभो ! माझ्या अंगी जे गुण आहेत ते सारे तूच दिले आहेस. नाहीतर माझ्यासारखा गुणहीन जीव काय करणार ? तुझ्याएवढा महान दाता अन्य कोणीही नाही. सगळेजण याचक बनून तुझ्याकडेच याचना करतात. ॥ १ ॥ म. ५ ॥ हे प्रभू ! तुझे दर्शन न झाल्याने माझे शरीर क्षीण झाले आहे. मन उदास झाले आहे. सुन्न झाले आहे. सतगुरूने माझे सांत्वन केले त्यामुळे मला सुखाने झोप लागली व मी सर्व जग जिंकले. ॥ २ ॥ तुझा दरबार श्रेष्ठ आहे. तुझे सिंहासनही सत्य आहे. तू सर्व सम्राटात श्रेष्ठ सम्राट आहेस. तुझे छत्रचामर अढळ आहे. जे त्या परब्रह्म परमात्म्यास आवडते, योग्य वाटते तोच खरा न्याय. प्रभूची इच्छा झाल्यास निराश्रितास आश्रय प्राप्त होतो. तो कर्ताप्रभू जे काही करतो ती गोष्ट योग्यच असते. ज्यांनी प्रभूस ओळखले, त्यास जाणले त्यास प्रभूच्या दरबारात स्थान प्राप्त होते. तुझी आज्ञा योग्यच असते ती कोणीही बदलू शकत नाही. हे प्रभो ! सर्व कर्त्यांचा तूच कर्ता आहेस. तू कृपासागर आहेस सारी सृष्टी तुझीच आहे. तूच निर्माण केली आहेस. ॥ १६ ॥

॥ सलोक म. ५ ॥

सोइ सुणदंड़ी मेरा तनु मनु मउला नामु जपंदड़ी लाली ॥
पंधि जुलंदड़ी मेरा अंदरू ठंढा गुर दरसनु देखि निहाली ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ हठ मंझाहू मै माणकु लधा ॥ मुलि न घिधा मै कू सतिगुरि दिता ॥
ढूंढ वञाई थीआ थिता ॥ जनमु पदारथु नानक जिता ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ जिस कै मसतकि करमु होइ सो सेवा लागा ॥
जिसु गुर मिलि कमलु प्रगासिआ सो अनदिनु जागा ॥
लगा रंगु चरणारबिंद सभु भ्रमु भउ भागा ॥
आतमु जिता गुरमती आगंजत पागा ॥
जिसहि घिआइआ पारब्रहमु सो कलि महि तागा ॥
साधू संगति निरमला अठसठि मजनागा ॥
जिसु प्रभु मिलिआ आपणा सो पुरखु सभागा ॥
नानक तिसु बलिहारणै जिसु एवड भागा ॥ १७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६४)

शब्दार्थ : **सोइ** – तुझी . **सुणदंडी** – कीर्ती. **मउला** – प्रसन्न, टवटवीत. **जंपदडी** – जप. **पंधि** – मार्ग, पथ. **जुलदंडी** – चालून. **अंदरु** – अंतःकरण. **ठंढा** – थंड, शीतल. **निहाली** – प्रसन्न, आनंदित. **मंझाहु** – हृदयात, अंतरात. **मुलि** – . **घिधा** – . **ढूंढ** – शोधाशोध. **वञाई** – नष्ट झाली. **थिआ** – झालो. **थिता** – स्थिर. **जिता** – जिंकला. **कमलु** – हृदयकमल. **रंगु** – प्रेम. **आगंजत** – अविनाशी प्रभू. **पागा** – प्राप्त झाला. **तागा** – स्थिर. **अठसठि** – अडुसष्ट तीर्थ. **मजनागा** – स्थान करणे. **सभागा** – भाग्यवान. **एवड** – एवढे.

भावार्थ – हे प्रभो ! तुझा महिमा ऐकून माझे मन प्रसन्न झाले. तुझ्या नामाचा जप केल्याने माझ्या मुखास प्रभू प्रेमाची लाली आली. तुझ्या मार्गावर चालल्याने माझे हृदय शांत झाले आहे. सतगुरूच्या दर्शनाने मी प्रसन्न झालो आहे. ॥ १ ॥ म. ५ ॥ मी माझ्या हृदयातच प्रभुरूपी माणीक प्राप्त केले आहे. पण त्यासाठी मी कोणतेही मोल मोजले नाही. माझ्या सतगुरूनेच मला ते प्रदान केले. आता प्रभुप्राप्तीसाठीची माझी शोधाशोध संपली आहे व मला स्थैर्य प्राप्त झाले. नानक सांगतात, अशा रीतीने मी माझे जीवन यशस्वी केले आहे. माझ्या जीवनाची लढाई मी जिंकली आहे. ॥ २ ॥ पउडी ॥ ज्याच्या ललाटी तसा कर्म लेख लिहिला असेल तोच प्रभूची सेवा करू लागतो. ज्यास सतगुरू प्राप्त होतो त्याचे हृदयकमल विकसित होते व तो मोहमायेपासून विकारांपासून सावध राहतो. ज्याच्या मनात प्रभू परमात्म्याच्या चरणकमलांबद्दल प्रेम उत्पन्न झाले त्याचे सर्व भ्रम व भय नष्ट होते. सतगुरूच्या उपदेशाने ज्याने आपले मन जिंकले त्यास अविनाशी प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ज्याने परब्रह्म परमात्म्याचे ध्यान केले तो कलियुगातही स्थिर राहतो. साधुसंतांच्या संगतीत राहणारा अडुसष्ट तीर्थात स्नान केल्याप्रमाणे पवित्र असतो. ज्यास प्रभू परमात्मा प्राप्त झाला तो खरा भाग्यशाली होय. नानक सांगतात, अशा थोर भाग्यवंतावर मी माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ १७ ॥

जां पिरु अंदरि तां धन बाहरि ॥ जां पिपरू बाहरि तां धन माहरि ॥
बिनु नावै बहु फेर फिराहरि ॥ सतिगुरि संगि दिखाइआ जाहरि ॥
जन नानक सचे साचि समाहरि ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ आहर सभि करदा फिरै आहरू इकु न होइ ॥
नानक जितु आहरि जगु उधरै विरला बूझै कोइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ वडी हू वडा अपारू तेरा मरतबा ॥ रंग परंग अनेक न जापन्हि करतबा ॥
जीआ अंदरि जीउ सभु किछु जाणला ॥ सभु किछु तेरै वसि तेरा घरु भला ॥
तेरै घरि आनंदु वधाई तुधु घरि ॥ माणु महता तेजु आपणा आपि जरि ॥
सरब कला भरपूरु दिसै जत कता ॥ नानक दासनि दासु तुधु आगै बिनवता ॥ १८ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९६५)

शब्दार्थ : **जां** – जेव्हा. **पिरु** – प्रिय. **तां** – तेव्हा. **धन** – स्त्री, पत्नी, माया. **माहरि** – प्रमुख. **फिराहरि** – फिरवते. **जाहरि** – प्रत्यक्ष. **समाहरि** – एकरूप झाली. **आहर** – उद्योग. **इकु** – एकमेव प्रभू. **मरतबा** – स्थान. **करतबा** – कौतुक, कार्य. **जापन्हि** – जाणणे. **जाणला** – जाणतोस. **माणु** – मान, सन्मान. **जरि** – . **कला** – शक्ती. **बिनवता** – विनंती करतो.

भावार्थ : जेव्हा प्रिय प्रभू हृदयात वास करत होता, तेव्हा माया बाहेर निघून गेली. जेव्हा प्रभू हृदयातून बाहेर गेला (जीव प्रभूला विसरला) तेव्हा मायानेच अधिकार गाजवावयास सुरुवात केली. प्रभुनामास पारखा झाल्याने जीव मायेच्या नादाने भटकत राहिला. नानक सांगतात जेव्हा सतगुरूने अंतरात गुप्तपणे वास करणाऱ्या प्रभू परमात्म्यास प्रत्यक्ष दाखवले, तेव्हा जीव सत्यरूप परमात्म्याशी एकरूप होऊन गेला. ॥ २ ॥ म. ५ ॥ सर्वच जण पोटापाण्यासाठी सतत उद्योग करतात. पण एकमेव प्रभू परमात्मा प्राप्त व्हावा म्हणून मात्र कोणी उद्योग करत नाही. नानक सांगतात, ज्या उद्योगाने (प्रभूनामाचा जप) साऱ्या जगाचा उद्धार होतो असा उद्योग कोणी विरळाच जाणतो. ॥ २ ॥ पउडी ॥ हे प्रभो ! तू सर्वश्रेष्ठ व अपार आहेस. ही सारी रंगीबेरंगी दुनियाही तूच निर्माण केली आहेस. हीच तुझी लीला आहे. तूच सर्व जीवांमध्ये आत्मा स्वरूपात राहून त्यांना काय हवे, काय नको ते सारे जाणतोस .सारे जीव तुझ्याच आज्ञेत कार्य करतात. हा संसार तुझे घर आहे. जेथे तुझा वास आहे. तेही चांगलेच आहे. तुझ्या ह्या घरात सर्वत्र आनंदीआनंद आहे. येथे सर्वत्र तुझाच मानसन्मान व तेज भरून राहिले आहे आणि त्याचा आस्वादही तूच घेतोस. तू सर्व शक्तिमान आहेस. जिकडे पाहावे तिकडे तुझाच प्रभाव दिसतो. म्हणून हे प्रभू ! तुझा हा नानक तुझ्या दासांचा दास तुला नम्रपणे विनंती करतो. ॥ १८ ॥

॥ सलोक म. ५ ॥

छतड़े बाजार सोहनि विचि वपारिए ॥
वखरु हिकु अपारु नानक खटे सा धणी ॥ १ ॥
॥ महला ५ ॥ कबीरा हमरा को नही हम किस हू के नाहि ॥

जिनि इह रचनु रचाइआ तिस ही माहि समाहि ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ सफलिउ बिरखु सुहावड़ा हरि सफल अंम्रिता ॥
मनु लोचै उन्ह मिलण कउ किउ वंञै घिता ॥
वरना चिहना बाहरा ओहु अगमु अजिता ॥
ओहु पिआरा जीअ का जो खोल्है भिता ॥
सेवा करी तुसाड़ीआ मै दसिहु मिता ॥
कुरबाणी वंञा वारणै बले बलि किता ॥
दसनि संत पिआरिआ सुणहु लाइ चिता ॥
जिसु लिखिआ नानक दास तिसु नाउ अंम्रितु सतिगुरि दिता ॥ १९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९६५)

शब्दार्थ : **छतड़** – छत, ब्रह्मांडरूपी छत. **वखरू** – माल. **हिकु** – प्रभू. **खटै** – खरेदी करणे. **धणी** – श्रीमंत. **बिरखु** – वृक्ष. **लोचै** – इच्छा. **घिता** – प्राप्त करणे. **वरना** – वर्ण. **चिहना** – चिन्ह. **अजिता** – अजिंक्य. **खोल्हे** – उघड करणे. **भिता** – रहस्य. **तुसाडीआ** – तुझी. **दसिहु** – दाखव. **वारणे** – समर्पण करणे. **बले** – वारंवार.

भावार्थ : आकाशरूपी छताने अवगुंठित ह्या जगाच्या बाजारात प्रभुभक्त प्रभुनामाचा व्यापार करीत आहेत. येथे प्रभुनाम ही एकच वस्तू खरेदी-विक्री केली जाते. त्याचा लाभ जो घेतो तोच खरा श्रीमंत. ॥ १ ॥ म. ५ ॥ कबीर सांगतात, जगरूपी बाजारात माझे कोणीही नाही. मी कोणाचाही नाही. ज्याने ही सारी रचना केली त्या प्रभू परमात्म्यातच अंती सर्वांना लीन व्हावयाचे आहे. ॥ २ ॥ पउडी ॥ तो प्रभू परमात्मा एक सुंदर वृक्ष आहे. त्याला प्रभुनामरूपी अमृतफळे लागली आहेत. मनात अशी इच्छा उत्पन्न झाली आहे की ते नामामृत फळ आपणास प्राप्त व्हावे. पण ते प्रभुनाम कसे प्राप्त होणार ? तो प्रभू परमात्मा वर्ण, चिन्ह ह्यापलीकडे आहे. तो अगम्य व अजेय आहे. जो सर्व रहस्ये प्रगट करतो असा प्रभू परमात्मा जीवास अत्यंत प्रिय आहे. हे प्रभो ! मी तुझी मन:पूर्वक सेवा करतो. हे मित्रा ! मला तुझे दर्शन दे. मी तुझ्यावर समर्पित होतो. वारंवार माझे सर्वस्व तुझ्या चरणी समर्पित करतो. हे जीवा हे संतसज्जन प्रभुप्राप्तीचा मार्ग तुला सांगत आहेत. नीट ध्यान देऊन ऐक. नानक सांगतात, प्रभुनामरूपी फल ज्यास द्यावे असे प्रभूस वाटते त्यासच ते प्राप्त होते. ॥ १९ ॥

॥ सलोक महला ५ ॥

कबीर धरती साध की तसकर बैसहि गाहि ॥
धरती भारि न बिआपई उन कउ लाहू लाहि ॥ १ ॥
॥ महला ५ ॥ कबीर चावल कारणे तुख कउ मुहली लाइ ॥
संगि कुसंगी बैसते तब पूछे धरमराइ ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ आपे ही वड परवारु आपि इकातीआ ॥
आपणी कीमति आपि आपे ही जातीआ ॥

सभु किछु आपे आपि आपि उपंनिआ ॥
आपणा कीता आपि आपि वरंनिआ ॥
धंनु सु तेरा थानु जिथै तू वुठा ॥
धंनु सु तेरे भगत जिन्ही सचु तूं डिठा ॥
जिस नो तेरी दइआ सलाहे सोइ तुधु ॥
जिसु गुर भेटे नानक निरमल सोई सुधु ॥ २० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६५)

शब्दार्थ : **तुख** – तूस. **मुहली** – मुसळाने कुटणे. **परवारु** – परिवार. **इकातीआ** – एकटा, अलिप्त. **जातीआ** – ज्ञाता, जाणतोस. **उपंनिआ** – उत्पन्न केले. **वरंनिआ** – वर्णन करणे. **वुठा** – बसतोस, वास करतोस. **डिठा** – दर्शन. **सलाहे** – स्तुती. **तुधु** – तुला. **निरमल** – निर्मळ, पवित्र. **सुधु** – शुद्ध.

भावार्थ : कबीर सांगतात, साधुसंतांच्या संगतीत चोरही येऊन बसतात. संतांच्या बैठकीला त्यापासून काहीच उपद्रव होत नाही पण चोराला मात्र लाभच लाभ प्राप्त होतो. (भाव – त्याचे मन प्रभूकडे वळते.) ॥ १ ॥ कबीर सांगतात, तांदूळ प्राप्त होण्यासाठी तुसासही मुसळाचे घाव सोसावे लागतात. (भाव – प्रभुप्राप्तीसाठी भक्तालाही खूप कष्ट सहन करावे लागतात.) हे जीवा ! कुसंगतीत पडलास तर धर्मराज तुला त्याचा जाब विचारील. ॥ २ ॥ पउडी ॥ हे जग हा प्रभू परमात्म्यानेच उत्पन्न केलेला त्याचा महापरिवार आहे. पण तरीही तो एकाकी आहे. ह्या सर्वांपासून तो अलिप्त आहे. हे प्रभो ! तूच तुझे मूल्य जाणतोस. सर्व काही तूच उत्पन्न केले आहेस. तूच करतोस व त्याचे वर्णनही तूच करतोस. जेथे बसून तू हा सारा कारभार पाहातोस ते स्थान धन्य आहे. धन्य ते भक्त ज्यांना तुझ्या सत्यस्वरूपाचे दर्शन झाले. ज्यांच्यावर तू दया करतोस तेच तुझी स्तुती करतात. नानक सांगतात, ज्यांना प्रभू परमात्मा प्राप्त होतो ते पवित्र व शुद्ध होत. ॥ २० ॥

॥ सलोक म. ५ ॥

फरीदा भूमि रंगावली मंझि विसूला बागु ॥
जो नर पीरि निवाजिआ तिन्हा अंच न लाग ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ फरीदा उमर सुहावड़ी संगि सुवंनड़ी देह ॥
विरले केई पाईअन्हि जिन्हा पिआरे नेह ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ जपु तपु संजमु दइआ धरमु जिसु देहि सु पाए ॥
जिसु बुझाइहि अगनि आपि सो नामु धिआए ॥
अंतरजामी अगम पुरखु इक द्रिसटि दिखाए ॥
साध संगति कै आसरै प्रभ सिउ रंगु लाए ॥
अउगण कटि मुखु उजला हरि नामि तराए ॥
जनम मरण भउ कटिओनु फिरि जोनि न पाए ॥
अंध कूप ते काढिअनु लड़ु आपि फड़ाए ॥

नानक बखसि मिलाइअनु रखे गलि लाए ॥ २१ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६६)

शब्दार्थ : **रंगावली** – रंगतदार, सुंदर. **मंझि** – मध्ये. **विसुला** – विषारी. **निवाजिआ** – सन्मानित केले. **अंच** – आच, झळ, दुःख. **सुहावडी** – सुंदर. **सुवंनडी** – सुंदर. **पाईअन्हि** – प्राप्त करतात. **देहि** – देतो. **बुझाइहि** – विझवली. **आसरै** – आसरा, आश्रय. **लडु** – पदर.

भावार्थ : हे फरीद ! हे जग रंगतदार व सुंदर आहे. पण त्यात मायेची विकारी बाग आहे. ज्या जीवावर प्रभू परमात्म्याची कृपा आहे त्यास त्याची झळ पोहोचत नाही. ॥ १ ॥ हे फरीदा ! हे आयुष्य सुंदर आहे. त्याचबरोबर प्राप्त झालेला मानवदेहही सुंदर आहे. ज्यांच्या मनात आपल्या प्रिय प्रभूविषयी प्रेम आहे अशा विरळ्या लोकांनाच तो प्राप्त होतो. ॥ २ ॥ पउडी ॥ जप, तप, संयम, दया, धर्म हे सारे सतगुण ज्यास प्रभू देतो तेच प्राप्त करतात. प्रभूने ज्याच्या मनातील मायेचा विकाररूपी अग्नी विझवला तोच प्रभू परमात्म्याचे ध्यान करतो. ज्या जीवावर प्रभू परमात्मा आपल्या कृपादृष्टीचा एक कटाक्ष टाकतो, तो जीव साधुसंतांच्या संगतीने प्रभुप्रेमात दंग होतो. त्याचे सारे अवगुण दूर होतात. मुख उज्ज्वल होते व हरिनामाच्या साहाय्याने तो हा भवसागर तरून जातो. त्याचे जन्ममरणाचे भय नष्ट होते व त्यास परत कोणत्याही योनीत जन्म घ्यावा लागत नाही. प्रभू परमात्मा स्वत: त्यास आपल्या पदराचा आश्रय देऊन मायेच्या अंधकारमय खाईतून बाहेर काढतो. नानक सांगतात, अशा जीवास प्रभू परमात्मा आपल्या हृदयाशी धरून त्यास आपल्याशी एकरूप करून घेतो. ॥ २१ ॥

॥ सलोक म. ५ ॥

मुहबति जिसु खुदाइ दी रता रंगि चलूलि ॥
नानक विरले पाईअहि तिसु जन कीम न मूलि ॥ १ ॥
॥ म. ५ ॥ अंदरु विधा सचि नाइ बाहरि भी सचु डिठोमि ॥
नानक रविआ हभ थाइ वणि त्रिणि त्रिभवणि रोमि ॥ २ ॥
॥ पउड़ी ॥ आपे कीतो रचनु आपे ही रतिआ ॥ आपे होइओ इकु आपे बहु भतिआ ॥
आपे सभना मंझि आपे बाहरा ॥ आपे जाणहि दूरि आपे ही जाहरा ॥
आपे होवहि गुपतु आपे परगटीऐ ॥ कीमति किसै न पाइ तेरी थटीऐ ॥
गहिर गंभीरु अथाहु अपारु अगणतु तूं ॥
नानक वरतै इकु इको इकु तूं ॥ २२ ॥ १ ॥ २ ॥ सुधु ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६६)

शब्दार्थ : **मुहबति** – प्रेम. **विधा** – बद्ध. **डिठोमी** – दिसतो. **हभ** – सर्व. **रोमि** – रोमरोमात. **रतिआ** – रममाण. **भतिआ** – प्रकारे, रूपात. **जाहरा** – प्रगट, प्रत्यक्ष. **थटीऐ** – थाटलेली, निर्माण केलेली. **वरतै** – व्याप्त.

भावार्थ : ज्याच्या मनात प्रभू परमात्म्याविषयी प्रेम उत्पन्न झाले तो प्रभुभक्तीच्या लाल रंगात रंगून जातो. पण असे भक्त फार विरळे असतात. त्यांचे मूल्य करता येत नाही. ॥ १ ॥ म. ५ ॥ तो अंत:करणात सत्यरूप प्रभुनामाने बद्ध झाला आहे. त्यास बाहेरही सर्वत्र सत्यरूप प्रभू परमात्माच दिसतो. नानक सांगतात, प्रभू परमात्मा सर्व

ठिकाणी, वनात, तृणात, त्रिभुवनात रोमरोमात सर्वत्र तोच रममाण झाला आहे. ॥ २ ॥ पउडी ॥ ह्या सृष्टीची रचना त्यानेच केली आहे व त्यात तो स्वत: रममाण झाला आहे. तो एकमेव आहे व त्यानेच नाना रूपे धारण केली आहेत. तो सर्व जीवांमध्ये वास करतो व बाहेरही सर्वत्र त्याचाच वास आहे. तो सर्वांपासून अलिप्त आहे. पण सर्वांमध्ये प्रगट स्वरूपातही तोच आहे. तो गुप्त आहे व प्रगट होणाराही तोच आहे. नानक सांगतात, हे प्रभो तूच एकमेव सर्वत्र व्याप्त आहेस. ॥ २२ ॥ १ ॥ शुद्ध ॥

रामकली की वार राइ बलवंडि तथा सतै डूमि आखी

रामकली रागातील राग बलबंड सत्ता डोंब लिखित वार

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

नाउ करता कादरु करे किउ बोलु होवै जोखीवदै ॥
दे गुना सति भैण भराव है पारंगति दानु पड़ीवदै ॥
नानकि राजु चलाइआ सचु कोटु सताणी नीवदै ॥
लहणे धरिओनु छतु सिरि करि सिफती अंम्रितु पीवदै ॥
मति गुर आतम देव दी खड़गि जोरि पराकुइ जीअदै ॥
गुरि चेले रहरासि कीई नानकि सलामति थीवदै ॥
सहि टिका दितोसु जीवदै ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६६)

शब्दार्थ : **कादरु** – स्वामी. **नाउ** – न्याय. **जोखीवदै** – जोखणे, मोल करणे. **देगुणा** – दिव्य गुण. **भैण** – बहीण. **भराव** – भाऊ. **पारंगति** – परमगती. **पडीवदे** – पडते, प्राप्त होते. **कोटु** – किल्ला. **जीवदै** – पाया घातला. **लहणे** – श्रीगुरू अंगददेव यांचे नाव. **धरीओनु** – धारण केले. **छतु** – छत्र. **सिफति** – स्तुती. **आतम** – आत्मा, परमात्मा. **जोरि** – बलपूर्वक. **पराकुइ** – प्रदान केले. **रहरासि** – प्रार्थना, नमस्कार. **सलामति** – जीवनकालात. **थिवदै** – . **टिका** – तिलक, टिळा. **फेराइऐ** – महती. **खटिऐ** – कमाई. **ओहा** – त्याची. **झुलै** – झुलते. **मलि** – . **हटीऐ** – दुकान. **सिल** – शिळा. **अलुणी** – अळणी. **चटीऐ** – चाटतात. **लंगरु** – लंगर. **खहदी** – खातो. **खैरि** – दान. **दबटीऐ** – वाटतात.

(ह्या वारास एक पार्श्वभूमी आहे. राय बलदंड व सत्ता हे श्री गुरू अर्जुनदेवांच्या दरबारी कीर्तन करीत असत. एकदा अहंकारवश त्यांनी गुरुजींचा अपमान केला. पुढे पश्चात्ताप पावून त्यांनी हा वार रचला. ह्यात आठ पउड्या आहेत. त्यापैकी पहिल्या पाच अंगद देवांबद्दल असून पुढील तीन इतर गुरूंबद्दल आहेत. अशा रीतीने गुरुस्तुती करणारा हा वार आहे म्हणून यास श्री गुरुग्रंथ साहिबमध्ये स्थान प्राप्त झाले आहे.)

भावार्थ – जेव्हा प्रभू परमात्मा स्वत: न्याय करतो, तेव्हा त्याचे मूल्यांकन कोणीही करू शकत नाही. दैव व गुण खरे बहीण–भाऊ आहेत. ज्यास ईश्वर सफलता देतो त्यासच ती प्राप्त होते. श्री गुरू नानक देवांनी राज्य चालवले. सत्यरूपी किल्ल्याचा भक्कम पाया घातला. नंतर त्यांनी लहाणीजींच्या डोक्यावर छत्र धरून त्यास वंदन करून

त्यांचे हातून अमृत प्राशन केले. परमात्मारूपी गुरूने आत्मज्ञानरूपी खड्ग श्री गुरू अंगद देवांना प्रदान केले. श्री गुरू नानकदेवांनी आपल्या जीवनकालातच आपल्या शिष्यास टिळा लावून गुरूपद प्रदान करून त्याचे चरणी मस्तक ठेवून त्यास नमस्कार केला. ॥ १ ॥

लहणे दी फेराईऐ नानका दोही खटीऐ ॥
जोति ओहा जुगति साइ सहि काइआ फेरि पलटिऐ ॥
झुलै सु छतु निरंजनी मलि तखतु बैठा गुर हटीऐ ॥
करहि जि गुर फुरमाइआ सिल जोगु अलूणी चटीऐ ॥
लंगरू चलै गुर सबदि हरि तोटि न आवी खटीऐ ॥
खरचे दिति खसंम दी आप खहदी खैरी दबटीऐ ॥
होवै सिफति खसंम दी नूरू अरसहु कुरसहु झटीऐ ॥
तुधु डिठे सचे पातिसाह मलु जनम जनम दी कटीऐ ॥
सचु जि गुरि फुरमाइआ किउ एदू बोलहु हटीऐ ॥
पुत्री कउलु न पालिओ करि पीरहु कंन्ह मुरटीऐ ॥
दिलि खोटै आकी फिरन्हि बंन्हि भारु उचाइन्हि छटीऐ ॥
जिनि आखी सोई करे जिनि कीती तिनै थटीऐ ॥
कउणु हारे किनि उवटीऐ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६६)

शब्दार्थ : **नूर** – प्रकाश. **अरसहु** – आकाश. **कुरसहु** – ईश्वरी प्रकाश. **झटीऐ** – झरतो. **डिठे** – दर्शन. **फुरमाइआ** – आज्ञा केली. **एदु** – त्याचे. **हटीऐ** – मागे हटणे. **पुत्री** – पुत्रांनी. **कउलु** – गुरुवचन. **कन्ह** – कान. **मुरटीऐ** – मुरडले, दुर्लक्ष केले. **आकी** – . **फिरन्हि** – फिरतात. **बंन्हि** – बांधून. **उचाइन्हि** – उचलून. **छटीऐ** – . **थटीऐ** – स्थापित केले. **उवटीऐ** – जिंकले.

भावार्थ : श्री गुरू नानकदेवांच्या जागी आता लहणाजींची (श्री गुरू अंगद देवांची) द्वाही फिरवण्यात आली. श्री गुरू अंगददेवांच्या अंतरात श्री गुरू नानकदेवांचीच आत्मज्योत प्रकाशत होती. दोघांचाही व्यवहार उपदेश देणे एकसारखेच होते. फक्त देह वेगळे. गुरूच्या उपदेशाच्या दुकानात श्री गुरू अंगददेव सिंहासनरूढ झाले आहेत. त्याच्या मस्तकावर निरंजन प्रभूचे छत्र झुलत आहे. श्री गुरू नानकांनी जी आज्ञा केली त्याप्रमाणेच श्री गुरू अंगददेव कार्य करीत आहेत. प्रभूशी जीवांचा मिलाप घडविण्याचे अत्यंत कठीण व निरस काम ते गुरू आज्ञेनुरूप करत आहेत. प्रभूच्या आज्ञेप्रमाणे ते प्रभुनामाचे अन्नछत्र (लंगर) चालवत आहेत. ह्या अन्नछत्रात कितीही वाटप केले तर तोटा येत नाही. कधीही काहीही कमी पडत नाही. प्रभू परमात्म्याने श्री गुरू नानकांकरवी त्यांना (श्री गुरू अंगददेव) जे दिले ते (प्रभूनाम) ते खातात, खर्च करतात व इतरांनाही मुक्त हस्ते वाटप करतात. त्यांच्या दरबारात सदैव प्रभू परमात्म्याचे गुणगान होत असते. आकाशातील सूर्य–चंद्र त्यांच्यावर ईश्वरीय प्रकाशाची बरसात करतात. हे सम्राटा ! तुझ्या दर्शनाने जन्मजन्मांतरीचा मळ नष्ट होतो. जेव्हा सतगुरूने (श्री गुरू नानकदेवांनी) सत्यरूप परमात्म्याची आज्ञा

(की गुरू अंगददेव हे आता गुरू झाले) घोषित केली त्याची कोण अवहेलना करणार ? श्री गुरू नानक देवांच्या मुलांनी मात्र ती आज्ञा अमान्य केली व त्याकडे दुर्लक्ष करून निघून गेले. ते खोट्या दिलाचे आपल्या डोक्यावर पापाचा बोजा उचलून फिरत राहिले. श्री गुरू अंगददेव श्री गुरू नानक देवांच्या आज्ञेप्रमाणे कार्य करत राहिले म्हणून ते गुरूपदी स्थापित झाले. पाहा बरं अखेर कोण हरले व कोण जिंकले ? ॥ २ ॥

जिनि कीती सो मंनणा को सालु जिवाहे साली ॥
धरमराइ है देवता लै गला करे दलाली ॥
सतिगुरु आखै सचा करे सा बात होवै दरहाली ॥
गुर अंगद दी दोही फिरी सचु करतै बंधि बहाली ॥
नानकु काइआ पलटु करि मलि तखतु बैठा सैडाली ॥
दरु सेवे उमति खड़ी मसकलै होइ जंगाली ॥
दरि दरवेसु खसंम दै नाइ सचै बाणी लाली ॥
बलवंड खीवी नेक जन जिसु बहुती छाउ पत्राली ॥
लंगरि दउलति वंडीऐ रसु अंम्रितु खीरि घिआली ॥
गुरसिखा के मुख उजले मनमुख थीए पराली ॥
पए कबूलु खसंम नालि जां घाल मरदी घाली ॥
माता खीवी सहु सोइ जिनि गोइ उठाली ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६७)

शब्दार्थ : **मंनणा** – माननीय, सर्वमान्य. **को** – कोण. **सालु** – श्रेष्ठ. **जिवाहे** – . **साली** – . **सा** – ती. **दरहाली** – शीघ्र. **दोही** – द्वाही. **बंधि बहाली** – पुष्टी केली. **मलि** – अधिकारपूर्वक. **सैडाली** – शेकडो शाखांनी. **उमति** – संप्रदाय, शिष्य समूह. **मसकलै** – पवित्र. **जंगाली** – पापी, अपवित्र. **खोवी** – श्री गुरू अंगद देवांच्या पत्नीचे नाव. **पत्रालि** – तुपाची. **पराली** – कोमेजणे, फिक्के पडणे. **पए कबुलु** – मान्य केले. **घाल** – परिश्रम. **मरदी** – मर्दाप्रमाणे. **सहु** – पती. **गोइ** – पृथ्वी.

भावार्थ : ज्याने श्री गुरू नानकदेवांच्या आज्ञेप्रमाणे कार्य केले ते श्री गुरू अंगददेव सर्वमान्य झाले. तांदूळ व तुस ह्यात श्रेष्ठ कोण ह्याचे उत्तर उघड आहे. त्याप्रमाणे श्री गुरू नानकदेव यांचे पुत्र पृथ्वीचंद व श्री गुरू अंगददेव ह्यात श्रेष्ठ कोण हे सांगणे सहज सोपे आहे. श्री गुरू अंगददेव हेच श्रेष्ठ होत. धर्मराज हे असे दैवत आहे की जो दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून तर्कसंगत व योग्य असाच निर्णय देतो. सतगुरू श्री गुरू अंगददेव जे बोलतात ते त्यांचे वचन प्रभू परमात्मा पूर्ण करतो. श्री गुरू अंगददेवांच्या नावे द्वाही होताच प्रभू परमात्म्याने तिची पुष्टी केली. श्री गुरू नानकच स्वत: शरीर बदलून श्री गुरू अंगददेवांच्या दरबारात आता शेकडो शिष्यसमुदाय प्रभुसेवेसाठी उभे राहून स्तुतिगीते गात आहेत व दुराचारी लोकांच्या मनातील मळ नष्ट होत आहे. त्यांचे जीवन उजळत आहेत. आता ते आपल्या स्वामीच्या दारात प्रभूनामाचे दान मागत आहेत. सत्यरूप प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणाने श्री गुरू अंगददेवांच्या मुखावर प्रभुप्रेमाची लाली चढली आहे. भाई बलवंड राय म्हणतात, खीवीजी (श्री गुरू अंगददेवांची पत्नी) ह्या खूप चांगल्या आहेत. त्यांच्या सहवासात शेकडो शाखा असलेल्या वृक्षाच्या छायेत बसल्यासारखे वाटते. श्री गुरू

अंगददेवांच्या लंगरमध्ये प्रभुनामाची दौलत, तुपात केलेल्या खिरीप्रमाणे अमृतनाम वाटले जात आहे. जे सतगुरूचे शिष्य आहेत त्यांचे मुख उजळ झाले आहे. तर स्वेच्छाचारी जीवांचे मुख इर्षेने पांढरेफटक पडले आहे. जेव्हा गुरू अंगदाने एखाद्या मर्दाप्रमाणे मर्दुमकी गाजवली, तेव्हा ते प्रभुद्वारी स्वीकारले गेले. माता खिवींचे पती श्री गुरू अंगददेव हे इतके समर्थ आहेत की ते साऱ्या पृथ्वीचा भार पेलू शकतात.॥३॥

होरिंओ गंग वहाईऐ दुनिआई आखै कि किओनु ॥
नानक ईसरि जगनाथि उचहदी वैणु विरिकिओनु ॥
माधाणा परबतु करि नेत्रि बासकु सबदि रिड़किओनु ॥
चउदह रतन निकालिअनु करि आवा गउणु चिलकिओनु ॥
कुदरति अहि वेखालीअनु जिणि ऐवड पिड ठिणकिओनु ॥
लहणे धरिओनु छत्रु सिरि असमानि किआड़ा छिकिओनु ॥
जोति समाणी जोति माहि आपु आपै सेती मिकिओनु ॥
सिखां पुत्रां घोखि कै सभ उमति वेखहु जि किओनु ॥
जां सुधोसु तां लहणा टिकिओनु ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६७)

शब्दार्थ : होरिंओ – उलटी. इसरि – . उचहदी – अत्युच्च. वैणु – वचन. विरिकिआनु – उच्चारले. माधाणा – मंदार पर्वत. बासकु – वासुकी नाग. रिडकिओनु – समुद्र मंथन. नेत्री – दोरी. चिलकिओनु – प्रकाशमान. कुदरति – शक्ती. बेखालिअनु – दाखवली. ऐवड – एवढे. पिड – शरीर. ठिणकिओनु – ठाकून ठोकून. धरिओनु – धरले. किआडा – . छिकिओनु – . मिकिओनु – एकरूप. घोखी – पारख करून. उमति – सतसंग. वेखहु – पाहा. जि – जे. सुधोसु – शुद्ध केले. टिकिओनु – टिळा लावला.

भावार्थ : सारे जग म्हणू लागले नानकाने तर गंगा उलटीच फिरवली. शिष्याच्या माथी गुरूपदाचा टिळा लावला व त्याच्या चरणी माथा टेकवला. नानकाने ईश्वर जगन्नाथापेक्षाही उच्चतर वचन उच्चारले. शिष्याच्या नावे द्वाही फिरविली. त्याने आत्मारूपी मंदार पर्वताची रवी केली. मनरूपी वासुकीची दोरी करून शब्दरूपी सागराचे घुसळण केले. त्यातून चौदा रत्ने निघाली व ह्या जन्ममृत्यूत फिरणाऱ्या दुनियेस चकित केले. त्यांनी एक नवलच घडवले. प्रथम त्यांनी लहाणास नीट ठाक ठोकून त्याची पारख केली व मग त्याच्या मस्तकी छत्र धरले. मग त्याने (लहणाने) हे राज्य गगनाला नेऊन भिडवले. श्री गुरू नानकदेवांनी आपली आत्मज्योत श्री गुरू अंगददेवांच्या शरीरात प्रविष्ट केली. अशा प्रकारे दोघेही एकरूप होऊन गेले. सर्व सतसंगी जनहो पाहा, अशा रीतीने श्री गुरू नानकदेवांनी आपले पुत्र व शिष्य यांची नीट पारख करून योग्य त्यासच म्हणजे लहाणीजींना गुरूपदाचा तिलक लावला. ॥ ४ ॥

फेरि वसाइआ फेरुआणि सतिगुरि खाडूरु ॥
जपु तपु संजमु नालि तुधु होरु मुचु गुरूरु ॥
लबु विणाहे माणसा जिउ पाणी बूरु ॥ वर्हिऐ दरगह गुरू की कुदरती नूरु ॥
जितु सु हाथ न लभई तूं ओहु ठरूरु ॥ नउनिधि नामु निधानु है तुधु विचि भरपूरु ॥

निंदा तेरी जो करे सो वंञै चूरु ॥ नेड़ै दिसै मात लोक तुधु सूझै दूरु ॥
फेरि वसाइआ फेरुआणि सतिगुरि खाडूरु ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६७)

शब्दार्थ : फेरी – परत. वसाइआ – वसवले, वास केला. फेरू – श्री गुरू अंगदांचे वडील. खाडूरु – गावाचे नाव. होरु – अन्य. मुचु – . गुरूरु – अभिमान. लबु – लोभ, लालसा. बूरु – खराब. वरिहऐ – पावसाने. कुदरति नूर – दिव्य प्रकाश. ठरूर – . वंञै – नष्ट होतो. नेडै – जवळ. मात लोक – मृत्युलोक, जगातले लोक. सुझै – सुचते, कळते.

भावार्थ : फेरूचा पुत्र श्री गुरू अंगददेवांनी खडूर गावी परत निवास केला. बाकी सारे जग अहंकाराने फुलून जाते पण हे गुरू तुझ्या जप, तप, संयमाने तू मात्र अचल व नम्र राहिलास. ज्याप्रमाणे शेवाळे पाणी खराब करते त्याप्रमाणे लालसा माणसाला बिघडवते. गुरूच्या दरबारात प्रभुनामाचा वर्षाव झाल्याने सर्वत्र प्राकृतिक सौंदर्याची झळाळी पसरली आहे. हे गुरू ! ज्याचा कोणासही थांग लागत नाही असा तू शांतिसागर आहेस. तुझ्या अंतरात प्रभुनामरूपी नऊ निधींचा भरपूर साठा आहे. जो तुझी निंदा करतो तो पूर्णपणे नष्ट होतो. मर्त्य लोकातील जीवांना फक्त पायापुरते दिसते. पण तुझी दृष्टी दूरच्या भविष्याचा वेध घेते. म्हणूनच फेरूपुत्र अंगददेवांनी परत खडूर नगरीत निवास केला. ॥ ५ ॥

सो टिका सो बैहणा सोई दीबाणु ॥
पियू दादे जेविहा पोता परवाणु ॥
जिनि बासकु नेत्रै घतिआ करि नेही ताणु ॥
जिनि समुंदु विरोलिआ करि मेरु मधाणु ॥
चउदह रतन निकालिअनु कीतोनु चानाणु ॥
घोड़ा कीतो सहज दा जतु कीओ पलाणु ॥
धणखु चड़ाइओ सत दा जस हंदा बाणु ॥
कलि विचि धू अंधारु सा चड़िआ रैभाणु ॥
सतहु खेतु जमाइओ सतहु छावाणु ॥
नित रसोई तेरीऐ घिउ मैदा खाणु ॥
चारे कुंडां सुझीओसु मन महि सबदु परवाणु ॥
आवा गउणु निवारिओ करि नदरि नीसाणु ॥
अउतरिआ अउतारु लै सो पुरखु सुजाणु ॥
झखड़ि वाउ न डोलई परबतु मेराणु ॥
जाणै बिरथा जीअ की जाणी हू जाणु ॥
किआ सालाही सचे पातिसाह जां तु सुघडु सुजाणु ॥
दानु जि सतिगुर भावसी सो सते दाणु ॥
नानक हंदा छत्रु सिरि उमति हैराणु ॥

सो टिका सो बैहणा सोई दीबाणु ॥
पियू दादे जेविहा पोत्रा परवाणु ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६८)

शब्दार्थ : **बैहणा** – सिंहासन, गादी. **दीबाणु** – दरबार. **पियु** – पिता श्री गुरू अंगददेव. **दादा** – आजोबा श्री गुरू नानक. **जेविहा** – जेवढा, समान, तुल्य. **पोता** – नातू. **बासकु** – वासुकी नाग. **नेत्रे** – रस्सी, दोरी. **नेही** – चौरंग. **विरोलिआ** – घुसळला. **मेरु मधाणु** – मेरू पर्वताची रवी. **पलाणु** – काठी. **जतु** – ब्रह्मचर्य. **धणखु** – धनुष्य. **जस** – यश. **हंदा** – . **धु** – धूर, पाप. **रैभाणु** – सूर्यकिरण. **छावणु** – छाया. **सुझीओसु** – ज्ञान प्राप्त झाले. **अउतरिआ** – अवतरला. **झखडि** – वादळ. **भावसी** – आवडते. **उमति** – शिष्य समुदाय. **हैराणु** – आश्चर्यचकित.

भावार्थ : तोच तिलक, तेच सिंहासन, तोच दरबार, पिता (श्री गुरू अंगददेव) आजोबा (श्री गुरू नानक देव) यांच्याप्रमाणेच नातू (श्री गुरू अमरदासजी) ही सन्माननीय व पूज्य झाला. त्यानेही आध्यात्मिक बलरूपी वासुकी नागासारखी दोरी केली. अत्युच्च बुद्धिरूपी मेरू पर्वतरूपी रवी करून प्रभुनामरूपी सागराचे मंथन केले. त्यातून चौदा रत्ने निघाली व त्याने आध्यात्मिक जीवनाचा प्रकाश सर्वत्र पसरला. त्याने सहजसमाधीरूपी घोड्यावर स्वार होऊन हातात इंद्रियनिग्रहाची काठी घेतली. सत्यरूपी धनुष्यावर यशरूपी बाण चढवला. कलियुगातील मायेच्या घोर अंधारात श्री गुरू अमरदास सूर्याप्रमाणे तळपू लागले. त्यांनी सत्याच्या शेतात सत्याचीच छाया धारण केली. त्याच्या पाकगृहात सदैव नामरूपी तूप, मैदा आदींनी युक्त सुग्रास भोजन प्राप्त होते. ज्याने आपल्या मनात तुझा उपदेश धारण केला त्यास सर्वांगीण ज्ञान प्राप्त होते. तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. त्याच्या मस्तकी प्रभुकृपेचे चिन्ह उमटते. तो परमपुरुष परमात्मा स्वत: श्री गुरू अमरदासांच्या रूपाने अवतरला आहे. तो ह्या विकाररूपी वादळात मेरू पर्वताप्रमाणे अचल राहतो. तो अंतर्ज्ञानी गुरू सर्व जीवांच्या व्यथा जाणतो. हे सतगुरू तू सर्वज्ञानी आहेस. तू सत्यरूप सम्राट आहेस. मी पामर तुझी काय स्तुती करणार? सतगुरूला जे देणे योग्य वाटते तेच सत्यदान होय. श्री गुरू नानकदेवांनी, श्री गुरू अंगददेवांनी धारण केला होता तोच तिलक, तेच सिंहासन, तोच दरबार. पिता, पितामह इतकाच पौत्रही पूज्य झाला. ॥ ६ ॥

धंनु धंनु रामदास गुरु जिनि सिरिआ तिनै सवारिआ ॥
पूरी होई करामाति आपि सिरजणहारै धारिआ ॥
सिखी अतै संगती पारब्रहमु करि नमसकारिआ ॥
अटलु अथाहु अतोलु तू तेरा अंतु न पारावारिआ ॥
जिन्ही तूं सेविआ भाउ करि से तुधु पारि उतारिआ ॥
लबु लोभु कामु क्रोधु मोहु मारि कढे तुधु सपरवारिआ ॥
धंनु सु तेरा थानु है सचु तेरा पैसकारिआ ॥
नानकु तू लहणा तू है गुरू अमरु तू वीचारिआ ॥
गुरु डिठा तां मनु साधारिआ ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६८)

शब्दार्थ : **सिरिआ** – सृजन केले, उत्पन्न केले. **सवारिआ** – संभाळ केला. **कारामति** – चमत्कार. **अतै** – आणि.

लबु – लालसा. **थानु** – स्थान. **पैसकारिआ** – प्रसार, फैलाव, पसारा. **विचारिआ** – ओळखणे, जाणणे. **साधारिआ** – साधार.

भावार्थ : श्री गुरू रामदास हे धन्य होत. ज्यांनी, ज्या प्रभू परमात्म्याने, त्यांना निर्माण केले त्यानेच त्यांना सन्मान प्रदान केला. त्या सृजनकार प्रभूचा चमत्कार तुम्हाला निर्माण करून पूर्ण झाला. सर्व शिष्य आणि संतसंगतीतील लोक तुम्हाला प्रत्यक्ष परमात्मा मानून तुम्हास नमस्कार करतात. तुम्ही अढळ, अथांग, अतुल्य आहात. तुमचा कोणासच अंत वा पार लागत नाही. ज्यांनी मनोभावे तुमची सेवा केली त्यांचा तुम्ही उद्धार केलात. लालसा, लोभ, काम, क्रोध, मोह आदी विकारांना तुम्ही नष्ट केलेत. तुमचे ते स्थान धन्य आहे. तुमचा पसाराही सत्य आहे. तुम्हीच नानक आहात, लहणा आहात व गुरू अमरदासजीही तुम्हीच आहात. ह्या सर्वांचे तेज तुमच्या अंगी आहे. गुरुरुपातील तुमच्या दर्शनाने माझ्या मनास आधार प्राप्त झाला आहे. ॥ ७ ॥

चारे जागे चहु जुगी पंचाइणु आपे होआ ॥
आपीन्है आपु साजिओनु आपे ही थंम्हि खलोआ ॥
आपे पटी कलम आपि आपि लिखणहारा होआ ॥
सभ उमति आवण जावणी आपे ही नवा निरोआ ॥
तखति बैठा अरजन गुरू सतिगुर का खिवै चंदोआ ॥
उगवणहु तै आथवणहु चहु चकी कीअनु लोआ ॥
जिन्ही गुरू न सेविओ मनमुखा पइआ मोआ ॥
दूणी चउणी करामाति सचे का सचा ढोआ ॥
चारे जागे चहु जुगी पंचाइणु आपे होआ ॥ ८ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६८)

शब्दार्थ : **चारे** – चार, पहिले चार गुरू. **पंचाइणु** – पाचवा गुरू श्री अरजनदेवजी. **थंम्हि** – स्तंभ. **खलोआ** – खडा, उभा. **उमती** – सृष्टी. **निरोआ** – नवीन, निराळा. **चंदोआ** – चंद्रमा. **उगवणहु** – उगवती, पूर्व. **अथावणहु** – मावळती, पश्चिम. **चकी** – दिशा. **चहू** – चारही. **लोआ** – प्रकाश. **मोआ** – मृत्यू. **दूणी** – दुप्पट. **चउणी** – चौपट. **ढोआ** – उपहार.

भावार्थ : पहिल्या चार गुरूंनी आपापल्या कार्यकालात सर्व जग प्रकाशमान केले. आता पाचवे गुरू श्री अरजनदेवजीही त्यांचेच रूप आहे. त्यांनी (पहिल्या चार गुरूंनी) आपल्या गुणांनी, आपल्या परिश्रमाने स्वत:चे स्थान निर्माण केले. तेच पाटी बनले. तेच लेखणी बनले. लिहिणारेही तेच होते. सारी सृष्टी नश्वर आहे. जन्ममृत्यूच्या फेऱ्यात अडकली आहे. तुम्ही मात्र ह्या सर्वांहून निराळे आहात. नित्यनूतन अजरामर आहात. श्री गुरू अरजनदेव सिंहासनाधिष्ठित झाले आहेत. त्यामुळे सतगुरूचे शीतल चांदणे सर्वत्र पसरले आहे. पूर्वेला, पश्चिमेला, चारही दिशांना त्याचा प्रकाश पसरला आहे. ज्यांनी गुरूची सेवा केली नाही. ते स्वेच्छाचारी जीव मृत्युमुखी पडले. सत्यरूप प्रभू परमात्म्याकडून हा सत्यरूप उपहार प्राप्त झाला आहे की गुरूंची कीर्ती दुप्पट चौपट झाली आहे. पहिल्या चार गुरूंनी आपल्या जीवन काळात सारा संसार प्रकाशित केला व आता पाचवे गुरू श्री अरजनदेवजी ह्यांनीही त्यांचेच रूप धारण केले आहे. ॥ ८ ॥

रामकली बाणी भगता की ॥ कबीर जीउ

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूच्या कृपेने तो प्राप्त होतो.

काइआ कलालनि लाहनि मेलउ गुर का सबदु गुड़ु कीनु रे ॥
त्रिसना कामु क्रोध मद मतसर काटि काटि कसु दीनु रे ॥ १ ॥
कोई है रे संतु सहज सुख अंतरि जाकउ जपु तपु देउ दलाली रे ॥
एक बूंद भरि तनु मनु देवउ जो मदु देइ कलाली रे ॥ १ ॥ रहाउ ॥
भवन चतुर दस भाठी कीन्ही ब्रहम अगनि तनि जारी रे ॥
मुद्रा मदक सहज धुनि लागी सुखमन पोचनहारी रे ॥ २ ॥
तीरथ बरत नेम सुचि संजम रवि ससि गहनै देउ रे ॥
सुरति पिआल सुधा रसु अंम्रितु एहु महा रसु पेउ रे ॥ ३ ॥
निझर धार चुऐ अति निरमल इह रस मनूआ रातो रे ॥
कहि कबीर सगले मद छूछे इहै महा रसु साचो रे ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६८)

शब्दार्थ : **काइआ** – शरीर. **कलालनि** – कलाल (दारू गाळणारी भट्टी). **लाहनि** – दारू तयार करण्यासाठी लागणारी सामग्री. **मेलउ** – एकत्र केली. **गुड** – गूळ. **किनू** – केली. **मतसर** – मत्सर. **काटिकाटि** – कापून कापून. **दीनू** – दिले. **जाकउ** – ज्याला. **भरि** – भर. **देवउ** – देईन. **भवनचतुरदस** – चौदा भवने, समस्त ब्रह्मांड. **भाठी** – भट्टी. **किन्हि** – केली. **जारि** – जाळली, पेटवली. **मुद्रा** – तोंड. **मद्रक** – सवे, सह. **सुखमन** – मनाला सुख देणारी अवस्था. **मोचनहारी** – पोचवणारी नळी.

भावार्थ : (असे म्हणतात की प्रभू परमात्म्याची भक्ती, प्रभुनाम ही सुद्धा एक नशा आहे. ह्या पदात कबीर ही मदिरा–प्रभुनामाची मदिरा कशी तयार करावी हे सांगत आहे.) शरीर हीच प्रभुनामरूपी मदिरा बनवण्याची भट्टी आहे. त्यात दारू बनवण्याची अन्य सामग्री घाला. त्यात सतगुरूचा उपदेशरूपी गूळ घाला. मोहमायेचे – तृष्णा, काम, क्रोध, मद, मत्सर आदी साऱ्या विकाररूपी शत्रूंचे तुकडे तुकडे करून त्यात टाका. त्यातून निर्माण होणाऱ्या मदिरेची नशा, प्रभुनामाची नशा, काही आगळी वेगळीच असते. ॥ १ ॥ असा कोणी संत आहे का की ज्याने प्रभुनामाची मदिरा पिऊन सहजसमाधी प्राप्त केली आहे ? असा संत जर मला भेटला व त्याने मला एक घोटभर जरी ती प्रभुनामरूपी मदिरा पाजली तर त्यास मी आजपर्यंत केलेले जपतप, सारी तपश्चर्या, मोबदला म्हणून देईन. सारे तन मन त्याच्या चरणी अर्पण करीन. ॥ १ ॥ रहाउ ॥ सर्व चौदा भवनाची – साऱ्या ब्रह्मांडाची भट्टी केली. शरीरात ब्रह्माग्नी पेटवला. मदिरा तयार करण्यासाठी शरीररूपी भट्टी सहजसमाधीच्या झाकणाने बंद केली. त्यातून मग प्रभुनामरूपी सुंदर मदिरा निर्माण होईल. ॥ २ ॥ ही प्रभुनामरूपी मदीरा प्राशन करण्यासाठी मी माझ्या प्रभू चरणाशी एकरूप झालेल्या मनाचा पेला बनविला असून त्यातून मी नामामृत प्राशन करतो. प्रभूनाम हाच महारस श्रेष्ठ रस आहे. ही प्रभुनामाची मदिरा प्राप्त करण्यासाठी मी जन्मभर केलेल्या तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, पावित्र्य, संयम, योगिक क्रिया, सारे सारे काही

समर्पण करण्यास तयार आहे. प्रभुनामाची मदिरा भरून मी तिचे प्राशन करतो. ॥ ३ ॥ ह्या प्रभुनामरूपी मदिरेच्या वाहणाऱ्या संतत धारेत, अत्यंत निर्मल धारेत, माणसाचे मन रंगून जाते. कबीर सांगतात, अन्य सर्व मदिरा खोट्या आहेत. त्यांची नशा कधी ना कधी उतरतेच. पण ही प्रभुनामाची महामदिरा हीच एकमेव खरी मदिरा आहे कारण एकदा ही नशा चढली की ती कधीच उतरत नाही. ही कायम राहणारी नशा आहे. ॥ ४ ॥ १ ॥

गुड़ु करि गिआनु धिआनु करि महूआ भउ भाठी मन धारा ॥
सुखमन नारी सहज समानी पीवै पीवनहारा ॥ १ ॥
अवधू मेरा मनु मतवारा ॥
उनमद चढा मदन रसु चाखिआ त्रिभवन भइआ उजिआरा ॥ १ ॥ रहाउ ॥
दुइ पर जोरि रसाई भाठी पीउ महा रसु भारी ॥
कामु क्रोधु दुइ कीए जलेता छूटि गई संसारी ॥ २ ॥
प्रगट प्रगास गिआन गुर गंमित सतिगुर ते सुधि पाई ॥
दासु कबीरु तासु मद माता उचकि न कबहू जाई ॥ ३ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६९)

शब्दार्थ : **गुड़ु** – गूळ. **गिआनि** – ज्ञान. **महुआ** – महुआची फुले (ज्यापासून दारू बनवतात). **भउ** – भय, परमश्वराचे भय. **भाठी** – भट्टी. **सुखमन** – सुषुम्ना नाडीरूपी नळी. **पीतै** – पितो. **पीवनहारा**– पिणारा. **अवधु** – अवधूत, योगी. **मतवारा** – मस्तीत रंगलेला. **उनमद्** – उन्माद, नशा, धुंदी. **चढा** – चढली. **त्रिभवन** – त्रिभुवन. **भइआ** – झाले. **उजिआरा** – प्रकाशित. **दुइ** – दोन्ही. **जलेता** – सरपण, जळण. **सुधि** – समज, जाण, शुद्धज्ञान. **मदमाता** – नशेत चूर होऊन, नशेत मस्त होऊन. **उचक** – उतरणे. **गंमित** – पोहचणारा.

भावार्थ : आत्मज्ञानरूपी गूळ, प्रभू पमरात्म्याचे ध्यान ही मोहाची फुले, मनात परमेश्वराबद्दलची भीतीरूपी भट्टीत घातल्याने त्यातून निरंतर वाहणारी नामरूपी मदिरा प्राशन केल्याने प्रभू परमात्म्याच्या भक्तीने सहजसमाधी प्राप्त होते. ॥ १ ॥ माझे संपूर्ण मन ह्या प्रभुनामाच्या नशेने मस्त झाले आहे. प्रभुनामाच्या ह्या मद्याने मला प्रभुभक्तीचा उन्माद चढला आहे. पण त्याने मन सैरभैर न होता. उलट मला तिन्ही लोकांच्या वास्तवरूपाचे ज्ञान झाले आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ पृथ्वी व आकाश त्या दोन्हीची म्हणजे साऱ्या सृष्टीची भट्टी बनवली म्हणजेच ह्या सृष्टीचे सत्यरूप, ही सारी सृष्टी प्रभू परमात्म्याचेच रूप आहे हे जाणले. त्यात वर वर्णन केलेले सारे रसायन प्रभू आत्मज्ञान, प्रभुनाम व प्रभुभक्तीचे रसायन घातले. काम, क्रोधादी सर्व विकार इंधन करून जाळून टाकले. त्यामुळे माझी ह्या संसाराच्या मोहबंधनातून सुटका झाली. ॥ २ ॥ सतगुरूच्या संगतीने, त्याने दिलेल्या उपदेशानुसार आचरण केल्याने माझ्या मनात ज्ञानाचा प्रकाश पसरला. कबीर म्हणतात, मी आता प्रभुभक्तीच्या मदिरेने धुंद झालो आहे आणि ही नशा आता कधीही उतरणे शक्य नाही. ॥ ३ ॥ २ ॥

तूं मेरो मेरु परबतु सुआमी ओट गही मै तेरी ॥
ना तुम डोलहु ना हम गिरते रखि लीनी हरि मेरी ॥ १ ॥
अब तब जब कब तुही तुही ॥
हम तुअ परसादि सुखी सद ही ॥ १ ॥ रहाउ ॥

तोरे भरोसे मगहर बसिओ मेरे तन की तपति बुझाई ॥
पहिले दरसनु मगहर पाइओ फुनि कासी बसे आई ॥ २ ॥
जैसा मगहरु तैसी कासी हम एकै करि जानी ॥
हम निरधन जिउ इहु धनु पाइआ मरते फूटि गुमानी ॥ ३ ॥
करै गुमानु चुभहि तिसु सूला को काढन कउ नाही ॥
अजै सु चोभ कउ बिलल बिलाते नरके घोर पचाही ॥ ४ ॥
कवनु नरकु किआ सुरगु बिचारा संतन दोऊ रादे ॥
हम काहू की काणि न कढते अपने गुर परसादे ॥ ५ ॥
अब तउ जाइ चढे सिंघासनि मिले है सारिंगपानी ॥
राम कबीरा एक भए है होइ न सकै पछानी ॥ ६ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६९)

शब्दार्थ : **मेरु** – सुमेरू पर्वत. **परबतु** – पर्वत. **सुआमी** – स्वामी. **ओट** – आधार, आश्रय. **गहि** – घेतला. **डोलहु** – डोलणे, विचलित होणे. **गिरते** – पडणे. **रखि**– रक्षण करणे. **रखि लीनी** – रक्षण केले. **अब** – आत्ता. **तब** – तेव्हा. **कब** – केव्हा. **तुही तुही** – तूच तू. **तुअ** – तुझ्या. **तोरे** – तुझ्या. **भरोसे** – भरवसा. **मगहर** – एक स्थळ, जिथे मृत्यू आल्यास पुढील जन्म गाढवाचा येतो असे समज. **बसिओ** – वास केला, राहिलो. **तपति** – ताप. **बुझाई** – विझला, शांत झाला. **फुनि** – नंतर. **कासी** – काशीक्षेत्र. **एकै** – एकरूप. **इहु** – हे प्रभुनाम. **गुनामी** – अहंकारी. **फूटि** – दु:खाने होऊन. **चुभहि** – टोचतात. **तिसु** – त्याला. **सुला** – काटे. **काढन** – काढणे,काढणारा. **कउ** – कोणीही. **अजै** – आजही, ह्या जन्मातही. **सू** – ते, ती. **चोभ** – बोच. **बिलल बिलाते** – तडफडून. **पचेही** – पडतात. **कवनु** – कोणता. **किआ** – कसला. **दोऊ** – दोन्ही. **रादे** – रद्द, अमान्य, खोटे, निरर्थक. **काहू** – कोणाचे. **काणि** – मेहेरबानी, कणव, कृपा. **अब** – आता. **तउ** – तर. **सिंघसनि** – सिंहासनावर, अति उच्च आध्यात्मिक अधिष्ठानावर. **सारंगपाणी** – शारंगपाणी, प्रभू परमात्मा. **एक भए है** – एकरूप झाले आहेत. **सकै पछानी** – ओळखू शकणे.

भावार्थ : हे प्रभो परमात्मन ! तू माझा सुमेरु पर्वत आहेस ! माझ्या स्वामी ! मी तुझ्या आश्रयाला आलो आहे. तू अविचल आहेस. स्थिर आहेस. त्यामुळे माझे चित्तही स्थिर होईल. माझे पतन होणार नाही. हे प्रभो माझे रक्षण कर. ॥ १ ॥ आता मी जिकडे पाहतो तिकडे तूच दिसतोस. सर्वत्र तू आणि तूच भरून राहिला आहेस. आम्ही तुझ्याच कृपाप्रसादामुळे सदैव सुख भोगतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तुझ्याच भरवशावर निर्भर राहून 'मगहर'मध्ये वास करूनही माझ्या मनातील सर्व वासनारूपी अग्नी पूर्णपणे विझून गेला आहे. प्रथम मी मगहरमध्ये वास केला व नंतर काशी क्षेत्री वास करीत आहे. ॥ २ ॥ मला मगहर आणि काशी ह्यात काहीच फरक वाटत नाही. माझ्या दृष्टीने दोन्ही सारखेच. कारण मला निर्धनला असे काही धन– प्रभुनाम– प्राप्त झाले आहे, की त्यामुळे माझ्या मनातील अहंभाव नष्ट झाला आहे. ॥ ३ ॥ ज्याच्या चित्तात अहंकार आहे त्याला विषयविकाररूपी काटे टोचतात. हे काटे असे खोलवर रुततात की ते कोणीही काढून टाकू शकत नाही. अशा ह्या काट्यांची बोच जन्मभर छळ छळ छळते. अनंत यातना भोगाव्या लागतात. असा अहंकारी माणूस अखेर नरकातच पिचत पडतो. ॥ ४ ॥ कसला आला

आहे नरक ? कसला आला आहे स्वर्ग ? संतजनांच्या दृष्टीने सारे निरर्थक आहे. आम्ही ह्या जगात कोणाच्या मेहेरबानीवर जगत नाही. आम्ही आमच्या सतगुरूच्या कृपाशीर्वादाने आमचे जीवन जगत आहोत.॥५॥ आता तर मी अशा आध्यात्मिक श्रेष्ठ पदाला जाऊन पोहोचलो आहे, की मला प्रत्यक्ष प्रभू परमात्मा प्राप्त झाला आहे. आता राम आणि कबीर एकरूप होऊन गेले आहेत. दोघे अभिन्न आहेत. राम कोण आणि कबीर कोण हे कोणीही ओळखू शकणार नाही. राम तोच कबीर व कबीर तोच राम, दोघेही एकच. ॥ ६ ॥ ३ ॥

संता मानउ दूता डानउ इह कुटवारी मेरी ॥
दिवस रैनि तेरे पाउ पलोसउ केस चवर करि फेरी ॥ १ ॥
हम कुकर तेरे दरबारि । भउकहि आगै बदनु पसारि ॥ १ ॥ रहाउ ॥
पूरब जनम हम तुमरे सेवक अब तउ मिटिआ न जाई ॥
तेरे दुआरै धुनि सहज की माथै मेरे दगाई ॥ २ ॥
दागे होहि सु रन महि जूझहि बिनु दागे भगि जाई ॥
साधू होइ सु भगति पछानै हरि लए खजानै पाई ॥ ३ ॥
कोठरे महि कोठरी परम कोठी बीचारि ॥
गुरि दीनी बसतु कबीर कउ लेवहु बसतु सम्हारि ॥ ४ ॥
कबिरी दीई संसार कउ लीनी जिसु मसतकि भागु ॥
अंम्रित रसु जिनि पाइआ थिरु ता का सोहागु ॥ ५ ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९६९)

शब्दार्थ : **मानउ** – सन्मान करतो, आदर करतो. **कुटवारी** – कोतवाली. **दूता डानउ** – दुष्ट लोकांना दंड देतो. **रैनि** – रात्री. **पाउ** – पाय. **पलोसउ** – चेपतो. **चवर** – चवरी. **फेरी** – ढाळतो. **करि** – करून. **कुकर** – कुत्रा. **भउकहि** – भुंकतो. **बदनु** – तोंड. **पसारि** – पसरून, वासून. **पूरब** – पूर्वीच्या. **अब** – आता, ह्या जन्मी. **मिटिआ** – सोडून देणे. **दुआरै** – दारी. **धुनि** – ध्वनी. **माथै** – कपाळावर. **दगाई** – कोरली आहे, डाग आहे. **दागे होहि** – ज्याच्या कपाळी सेवक हा शब्द कोरला आहे असा सच्चा सेवक. **सू** – तोच. **जूझहि** – झुंजतो, लढतो. **बिनु दागे** – ज्याच्या कपाळी सेवक असा शिक्का नाही, ढोंगी सेवक. **भगि** – पळून. **जाई** – जातो. **कोठरी** – खोली, कोठार, शरीररूपी कोठार. **महि** – मध्ये. **कोठरी** – कोठी, हृदयरूपी कोठी. **बिचारि** – विचार. **दीनी** – दिलेली. **बसतु** – वस्तू, प्रभुनाम. **कउ** – ला. **सम्हारि** – संभाळली. **लेवहु** – घेऊन. **दीई** – दिलेली. **लीनी** – घेतली. **जिसु** – ज्याच्या. **थिरु** – स्थिर. **सुहाग** – सौभाग्य.

भावार्थ : हे प्रभो ! मी तुझ्या दरबारातील कोतवाल आहे. संतसज्जनांचा सन्मान करणे, आदर करणे, दुष्ट दुर्जनांना शासन करणे हीच माझी कोतवाली आहे. रात्रंदिवस मी तुझी चरणसेवा करतो, पाय चेपतो, माझ्या केसांची चवरी तुझ्या मस्तकावर ढाळतो. हे प्रभो ! मी तुझ्या दारातील कुत्रा आहे. तोंड वासून मी भुंकत राहतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी गेल्या जन्मी तुझा सेवक होतो. आता मी तुझ्यापासून दूर जाणे शक्य नाही. तुझ्या दारी सहजध्वनी निनादत आहे. अनाहत ध्वनी गुंजत आहे. माझ्या कपाळी तुझा सेवक असल्याची मुद्रा गोंदली गेली आहे. ॥ २ ॥ जे सच्चे सेवक असतात ते आपल्या स्वामीच्या कार्यार्थ पाय रोवून लढत असतात. खरे भक्त कितीही बिकट

परिस्थिती आली तरी प्रभूचरण सोडीत नाहीत. पण ढोंगी भक्त मात्र बिकट परिस्थिती येताच पळ काढतात. खरा साधू, खरा भक्त आपल्या भक्तिभावाने वेगळा उठून दिसतो. त्याच्या भक्तीने प्रसन्न होऊन प्रभू परमात्माही त्याला आपल्यात सामावून घेतो. ॥ ३ ॥ शरीररूपी तिजोरीच्या आत हृदय, अंत:करणरूपी एक कप्पा आहे. त्यात प्रभू परमात्म्याचा वास असतो. सदसदविवेकबुद्धीच्या साहाय्याने, प्रभुनामाने तो कप्पा उघडून त्या प्रभू परमात्म्याचे दर्शन होते. कबीर म्हणतात, मला माझ्या सत्गुरूने प्रभुनामरूपी चावी दिली आहे. ही वस्तू मी प्राणपणाने जपून ठेवली आहे. कबीराने ही बहुमोल वस्तू, हे प्रभुनाम साऱ्या जगाला वाटले आहे. ज्यांच्या भाग्यात असेल तेच हे ग्रहण करतात. ज्यांना हा प्रभुनामरूपी अमृतरस प्राप्त झाला त्यांचे सौभाग्य सदा स्थिर राहते. स्वामी प्रभू परमात्म्यापासून त्यांची कधीही फारकत होत नाही. ॥ ५ ॥ ४ ॥

जिह मुख बेदु गाइत्री निकसै सो किउ ब्रहमनु बिसरु करै ॥
जा कै पाइ जगतु सभु लागै सो किउ पंडितु हरि न कहै ॥ १ ॥
काहे मेरे ब्राहमन हरि न कहहि । रामु न बोलहि पाडे दोजकु भरहि ॥ १ ॥ रहाउ ॥
आपन उच्च नीच घरि भोजनु हठे करम करि उदरु भरहि ॥
चउदस अमावस रचि रचि मांगहि कर दीपकु लै कूपि परहि ॥ २ ॥
तू ब्रहमनु मै कासीक जुलहा मुहि तोहि बराबरी कैसे कै बनहि ॥
हमरे राम नाम कहि उबरे बेद भरोसे पांडे डूबि मरहि ॥ ३ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७०)

शब्दार्थ : **जिह** – ज्याच्या. **बेदु** – वेद. **गाइत्री** – गायत्री मंत्र. **निकसै** – निघाले. **सो** – त्याला. **बिसरु** – विसरलास. **जाकै** – ज्याच्या. **पांडे** – पंडित. **दोजकु** – नरक. **भरहै** – भोगतो. **हठ** – (हटयोग) हट्टाने. **चौदस** – चतुर्दशी. **अमावस** – अमावास्या, अवस. **मांगहि** – मागतो. **कर** – हात. **दीपकु** – दीप, दिवा. **लै** – घेऊन. **कूपि** – विहिरीत. **परहि** – पडतो. **ब्रहमनु** – ब्राह्मण. **कासिक** – काशीचा. **जुलहा** – विणकर, कोष्टी. **मुहि** – माझी. **मुहि** – तुझ्याशी. **हमरे** – आम्ही, आमचा. **कहि** – म्हणून. **उबरे** – उद्धार झाला. **डूबि मरहि** – बुडून मरतात.

भावार्थ : ब्राह्मण म्हणतात, की प्रत्यक्ष परमात्म्याच्या मुखातून वेद, गायत्री मंत्र बाहेर पडले. मग, त्या प्रभू परमात्म्यास ते कसे काय विसरतात? अरे पंडिता ! त्या हरीचे, त्या प्रभू परमात्म्याचे तू नामस्मरण का करीत नाहीस ? ॥ १ ॥ रहाउ ॥ हे ब्राह्मण ! तू हरीचे नामस्मरण का करीत नाहीस ? रामनामाचा उच्चार न करणारा पंडित अखेर नरकवास भोगतो. ॥ १ ॥ तू स्वत:ला उच्चकुलीन समजतोस आणि नीचा घरी भोजन करतोस, हा तुझा केवळ पोट भरण्याचा अट्टहास आहे. आज काय शिवरात्र आहे. आज काय अमावास्या आहे असे सांगून तू दान मागत हिंडत असतोस. अरे तुझ्या हातात ज्ञानाचा दिवा असूनही तू अंधळेपणाने ह्या संसाररूपी विहिरीत पडून मरतोस. ॥ २ ॥ तू उच्चवर्णीय ब्राह्मण, मी काशीचा नीच कुलीन विणकर. तुझी माझी बरोबरी कशी होणार. रामनामाच्या उच्चाराने मी हा संसारसागर ओलांडून गेलो. पण हे पंडित, तू मात्र वेदांवर अवलंबून राहून संसारसागरात बुडून मेलास. ॥ ३ ॥ ५ ॥

तरवरु एकु अनंत डार साखा पुहप पत्र रस भरीआ ॥
इह अंम्रित की बाड़ी है रे तिनि हरि पूरै करीआ ॥ १ ॥
जानी जानी रे राजा राम की कहानी ॥
अंतरि जोति राम परगासा गुरमुखि बिरलै जानी ॥ १ ॥ रहाउ ॥
भवरु एकु पुहप रस बीधा बारह ले उरधरिआ ॥
सोरह मधे पवनु झकोरिआ आकासे फरु फरिआ ॥ २ ॥
सहज सुंनि इकु बिरवा उपजिआ धरती जलहरु सोखिआ ॥
कहि कबीर हउ ता का सेवकु जिनि इहु बिरवा देखिआ ॥ ३ ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७०)

शब्दार्थ : **तरवरु** – वृक्ष. **एकु** – एक. **डार साखा** – फांद्या, उपफांद्या. **पुहप** – पुष्प. **पत्र** – पाने. **रस भरिआ** – रसभरित. **वाडी** – उद्यान, बाग. **तिनी** – ते सर्व. **पूरै करिआ** – निर्माण केली. **अंतरि जोति** – अंत:करणातील आत्मज्योत. **परगासा** – प्रकाशित केली. **बिरलै** – विरळा. **भवरु** – भ्रमर, भुंगा. **बिधा** – वद्ध. **बारह** – बारा. **उरधारीआ** – हृदयात धारण केले. **सोरह** – सोळा. **पवनु** – वायू. **झकोरिआ** – आनंद घेणे. **फरुफरिआ** – उडाला. **सहज सुंनि** – सहजावस्था, शून्यावस्था. **बिरवा** – रोपटे. **उपजिआ** – उत्पन्न झाला. **धरती** – जमीन. **जलहरु** – मेघ. **सोखिया** – सुकवले, कोरडे केले. **हउ** – मी. **ता** – तुझा. **जिनि** – ज्याने. **इहु** – हा.

भावार्थ : संसार हा एक वृक्ष आहे. हे अनंत जीव ह्या त्याच्या शाखा, उपशाखा, पाने, फुले व रसदार फळे आहेत. त्या प्रभू परमात्म्यानेच हे अमृतमय उद्यान (संसार) निर्माण केले आहे. ॥ १ ॥ ज्या भक्ताने त्या प्रभू परमात्म्यास व त्याच्या सर्व लीला ओळखल्या आहेत, त्या भक्ताच्या अंतरात त्या प्रभू परमात्म्याची परमज्योत प्रकाशित होते. सतगुरूच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण करणाऱ्या क्वचित कोणा साधकास हे ज्ञान प्राप्त होते. ॥१॥ रहाउ ॥ जीवरूपी भ्रमर आत्मज्ञानरूपी ब्रह्मरस चाखण्यासाठी बारा पाकळ्यांच्या हृदयरूपी कमळाभोवती रुंजी घालतो. असा जीव ह्या प्रभू परमात्मारूपी कमळात बद्ध होतो. मग हा जीव श्वासाद्वारे सोळा पाकळ्यांच्या दशमद्वारातून आकाशात भरारी घेऊन मुक्त होतो व परमानंद प्राप्त करतो. ॥ २ ॥ सहजावस्थेत, निर्विकल्प समाधीत अंत:करणात प्रभुप्रेमरूपी वृक्ष उत्पन्न होतो. ज्याप्रमाणे तापलेल्या जमिनीवर मेघ बरसला की जमिनीतील उष्णता नष्ट होऊन जमीन थंड होते, त्याप्रमाणे अंत:करणातील प्रभुप्रेमाने मनातील विषयविकाराचा ताप नष्ट होऊन मन शांत होते. कबीर म्हणतात, ज्याने हा वृक्ष पाहिला आहे त्याचा मी सेवक आहे. ॥ ३ ॥ ६ ॥

मुंद्रा मोनि दइआ करि झोली पत्र का करहु बीचारु रे ॥
खिंथा इहु तनु सीअउ अपना नामु करउ आधारु रे ॥ १ ॥
ऐसा जोग कमावहु जोगी । जप तप संजमु गुरमुखि भोगी ॥ १ ॥ रहाउ ॥
बुधि बिभूति चढावउ अपुनी सिंगी सुरति मिलाई ॥

करि बैरागु फिरउ तनि नगरी मन की किंगुरी बजाई ॥ २ ॥
पंच ततु लै हिरदै राखहु रहै निरालम ताड़ी ॥
कहतु कबीरु सुनहु रे संतहु धरमु दइआ करि बाड़ी ॥ ३ ॥ ७ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९७०)

शब्दार्थ : **मुंद्रा** – मुद्रा. **मोनि** – मौन. **दइआ** – दया. **पत्र** – पात्र, भिक्षापात्र. **बिचारु** – विचार. **खिंथा** – गोधडी. **इहु** – ह्या. **तनु** – शरीर. **सीअउ** – शीव. **नामु** – प्रभूचे नाम. **आधारु** – आधार. **बुधि** – अक्कल. **बिभूति** – भस्म. **चढावउ** – चढव, लाव. **सुरति** – विचार, तंद्री, ध्यान. **बैरागु** – वैराग्य. **किंगुरी** – वीणा. **पंचतत्तु** – पाच तत्त्वे. **निरालम** – निरलेप. **ताडी** – समाधी. **बाडी** – बाग.

भावार्थ : हे योगी ! तू चित्त शांत करून मौनरूपी मुद्रा धारण कर. दयारूपी झोळी खांद्याला लटकव. विवेक–विचाररूपी भिक्षापात्र हातात घे. विषयविकारांची त्यागरूपी गोधडी अंगाभोवती लपेट आणि प्रभुनामाचा आधार धे. ॥ १ ॥ हे योगी ! तू असा योग आचरण कर म्हणजे गुरुकृपेने तुला जप, तप, संयम सारे काही प्राप्त होईल. ॥१॥ रहाउ ॥ अहंकाररूपी बुद्धीला जाळून त्याची विभूती अंगाला फास. अंगभर लाव. प्रभुनामाशी एकरूप झालेल्या विचारांचे शिंग वाजव. वैराग्य धारण करून मनाची वीणा वाजवीत शरीररूपी नगरीत संचार कर. ॥ २ ॥ पंचतत्त्वांच्या स्वाभाविक गुणांनी युक्त बनून त्यांना आपल्या हृदयात धारण करून निरालंब समाधी धारण कर. कबीर सांगतात, हे संतजनहो ! आपल्या अंतरात दया– धर्माची बाग फुलवा. अशा प्रकारे आपले आध्यात्मिक जीवन प्रफुल्लित करा. ॥ ३ ॥ ७ ॥

कवन काज सिरजे जग भीतरि जनमि कवन फलु पाइआ ॥
भवनिधि तरन तारन चिंतामनि इक निमख न इह मनु लाइआ ॥ १ ॥
गोबिंद हम ऐसे अपराधी ॥
जिनि प्रभि जीउ पिंडु था दिआ ॥
तिस की भाउ भगति नही साधी ॥ १ ॥ रहाउ ॥
परधन परतन परती निंदा पर अपबादु न छूटै ॥
आवागवनु होतु है फुनि फुनि अहु परसंगु न तूटै ॥ २ ॥
जिह घरि कथा होत हरि संतन इक निमख न किन्हो मै फेरा ॥
लंपट चोर दूत मतवारे तिन संगि सदा बसेरा ॥ ३ ॥
काम क्रोध माइआ मद मतसर ए संपै मो माही ॥
दइआ धरमु अरु गुर की सेवा ए सुपनंतरि नाही ॥ ४ ॥
दीन दइआल क्रिपाल दमोदर भगति बछल भै हारी ॥
कहत कबीर भीर जन राखहु हरि सेवा करउ तुम्हारी ॥ ५ ॥ ८ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९७०)

शब्दार्थ : **कवन** – कोणते. **काज** – काम. **सिरजे** – जन्माला घातले, सृजन केले. **तरन तारन** – तारून

नेणारा. चिंतामनी – सर्व चिंता दूर करणारा. **भवन निधि** – संसारसागर. **निमख** – निमि, क्षणभर. **मनु लाइआ** – मनात आठवला, स्मरण केले. **परतन** – परस्त्री. **परतीतन** – दुसऱ्याची, परस्त्रीची. **न छुटै** – सुटली नाही. **परसंग** – प्रसंग, जन्ममरणाचे चक्र. **किन्हो** – कधीही. **फिरो** – फिरतो, जातो. **लंपट** – विषयासक्त, कामी, चोर. **चोर दूत** – जुगारी, वाईट माणूस. **मतवारे** – नशा करणारे. **तिन** – त्याची. **बसेरा** – निवास, राहणे. **संपै** – संपत्ती. **मोमाहि** – माझ्यात. **अरु** – आणि. **ए** – ही. **सुपनंतरि** – स्वप्नातही. **भै** – भय. **भीर** – संकट.

भावार्थ : कबीर आत्मचिंतन करताना म्हणतात – हे बंधू ! ह्या जगात जन्माला येऊन आपण काय काम केले ? ह्या जन्माची फलप्राप्ती काय ? तो भवसागर पार करून नेणारा, सर्व चिंता दूर करणारा प्रभू ! त्याची सबंध जन्मात आठवणसुद्धा आली नाही इतके आपण मोहमायेत अडकून पडलो. ॥ १ ॥ हे प्रभो परमात्मान ! आम्ही असे शतश: अपराधी आहोत. ज्या प्रभू परमात्म्याने आम्हाला हे शरीर दिले, नरदेह दिला, त्याची आम्ही भावभक्ती केली नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ सारा जन्म परधनाचा लोभ, परस्त्रीची कामना, परनिंदा करण्यात व्यर्थ घालवला. एक क्षणभरही त्याशिवाय मी कशाचा विचार केला नाही. वारंवार ह्या जगात यायचं जायचं आणि हेच करायचं त्यामुळे मरणाच्या चक्रातच मी अडकून पडलो. ॥ २ ॥ ज्या घरात संत सज्जन हरिकथा गातात तेथे एक क्षणभरही मी फिरकलो नाही. लंपट पुरुष, चोर लुटारू, जुगारी, व्यसनी अशांच्या संगतीतच मी कायम रमलो.॥३॥ जन्माला येऊन काम, क्रोध, माया, मद, मत्सर हीच सारी संपत्ती मी जमा केली. दया, धर्म गुरूची सेवा ह्याचा कधी स्वप्नातही मी विचार केला नाही. ॥ ४ ॥ तो प्रभू परमात्मा, दीनांचा दयाळू, कृपाळू सर्व अपराध पोटात घालणारा भक्तवत्सल, भयहरण करणारा आहे. कबीर सांगतात, हे प्रभो ! माझे ह्या संकटातून रक्षण कर. मी तुझ्या पाया पडतो. तुझी सेवा करतो. ॥ ५ ॥ ८ ॥

जिह समरनि होइ मुकति दुआर ॥ जाहि बैकुंठि नही संसारि ॥
निरभउ कै घरि बजावहि तूर ॥ अनहत बजहि सदा भरपूर ॥ १ ॥
ऐसा सिमरनु करि मन माहि ॥ बिनु सिमरन मुकति कत नाहि ॥ १ ॥ रहाउ ॥
जिह सिमरनि नाही ननकारु ॥ मुकति करै उतरै बहु भारु ॥
नमसकारु करि हिरदै माहि ॥ फिरि फिरि तेरा अवनु नाहि ॥ २ ॥
जिह सिमरनु करहि तू केल ॥ दीपकु बांधि धरिओ बिनु तेल ॥
सो दीपकु अमरकु संसारि ॥ काम क्रोध बिखु काढीले मारि ॥ ३ ॥
जिह सिमरनि तेरी गति होइ ॥ सो सिमरनु रखु कंठि परोइ ॥
सो सिमरनु करि नहि राखु उतारि ॥ गुरपरसादी उतरहि पारि ॥ ४ ॥
जिह सिमरनि नाहि तुहि कानि ॥ मंदरि सोवहि पटंबर तानि ॥
सेज सुखाली बिगसै जीउ ॥ सो सिमरनु तू अनदिनु पीउ ॥ ५ ॥
जिह सिमरन तेरी जाइ बलाइ ॥ जिह सिमरनि तुझु पोहै न माइ ॥
सिमरि सिमरि हरि हरि मनि गाईऐ ॥ इहु सिमरनु सतिगुर ते पाईऐ ॥ ६ ॥
सदा सदा सिमरि दिनु राति ॥ ऊठत बैठत सासि गिरासि ॥

जागु सोइ, सिमरन रस भोग ॥ हरि सिमरनु पाइऐ संजोग ॥ ७ ॥
जिह सिमरनि नाही तुझु भार ॥ सो सिमरनु राम नाम अधारु ॥
कहि कबीर जा का नहि अंतु ॥ तिस के आगे तंतु न मंतु ॥ ८ ॥ ९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७१)

शब्दार्थ : **जिह** – ज्याच्या. **सिमरनि** – स्मरणाने. **होइ** – प्राप्त होते. **जाहि** – जातो. **निरभउ** – निर्भय. **बजावहि** – वाजतात. **तूर** – तुतारी, भेरी. **अनहद** – अनाहत. **ऐसा** – असे. **मनमाहि** – मनात. **कत** – कधीही. **ननकारु** – नकार. **हिरदै** – हृदयात. **फिरि** – परत, फिरून. **केल** – खेळ, क्रीडा, आनंद. **सो** – तो. **अमरकु** – अमर करणारा. **बिखु** – विष. **काढीले मारि** – मारून काढले, नष्ट केले. **कंठि** – गळ्यात. **परोइ** – परिधान. **तुहि** – तुला. **कानि** – गरज. **मंदरि** – मंदिरात. **सोवहि** – झोपतो. **पटंबर** – भारी कपडे, पीतांबर. **तानी** – ओढून. **सेज** – शय्या. **सुखाली** – सुखाची. **बिगसै** – विकसित होते, प्रसन्न होते. **जीउ** – जीव, जीवाला. **पीउ** – प्राशन कर, पी. **बलाइ** – संकट, पीडा. **तुझु** – तुला. **पोहै** – स्पर्श करणे. **गाइऐ** – गा, गायन कर. **पाइऐ** – प्राप्त कर. **सासि** – प्रत्येक श्वासागणिक. **गिरासि** – घासाबरोबर. **जागु** – जागेपणी. **सोइ** – झोपेत. **संयोग** – भाग्याने. **भार** – पापांचा भार. **अधारु** – आधार. **तंतु न मंतु** – तंत्र न मंत्र.

भावार्थ : ह्या पदात नामस्मरणाचे महत्त्व वर्णन करताना कबीर सांगतात, ज्याच्या स्मरणाने तुला मुक्तीचे द्वार उघडेल, वैकुंठाची प्राप्ती होईल. परत जन्म घ्यावा लागणार नाही, तू त्या निर्भय प्रभू परमात्म्याच्या घरी अनाहद शब्दाचे वाद्य वाजवशील. तुझ्या अंत:करणात सदैव प्रभूनामाचा एकरस ध्वनी निनादत राहील. ॥ १ ॥ हे जीवा ! अशा प्रभू परमात्म्याचे तू तुझ्या मनात सदैव स्मरण कर. नामस्मरणाशिवाय कधीही मुक्ती प्राप्त होणे शक्य नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याच्या स्मरणाने सर्व अडथळे दूर होतात, पापांचा भार नष्ट होतो आणि मुक्ती प्राप्त होते, अशा प्रभू परमात्म्यास तू अंत:करणपूर्वक नमस्कार कर. म्हणजे तुझी जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होईल. ॥ २ ॥ त्याच्या स्मरणाने तू आनंद उपभोगशील. त्याच्या स्मरणाने तुझ्या अंतरात असा ज्ञानरूपी दीप प्रज्वलित होईल, की ज्याला अन्य कोणत्याही बाह्य तेलाची, आधाराची गरज उरणार नाही. त्या ज्ञानदीपाने संसारात राहून तू अमरपद प्राप्त करशील. अंत:करणातील कामक्रोधादी विकार दूर पळून जातील. ॥ ३ ॥ ज्याच्या स्मरणाने तुला परमगती प्राप्त होते, त्या प्रभू परमात्म्याचे स्मरण सदैव तुझ्या कंठी असू दे. ते नामस्मरण तुझ्या कंठातून कधीही दूर करू नकोस. असे केल्याने सतगुरूच्या कृपेने तू हा संसारसागर पार करून जाशील. ॥ ४ ॥ ज्याच्या स्मरणाने तुला कोणतीही विवंचना राहणार नाही. तू तुझ्या शयनमंदिरात निश्चिंतपणे झोपू शकशील. सुखाची झोप झाल्यावर तू प्रसन्नचित्त होशील अशा नामस्मरणाचे तू सदैव प्राशन कर. ॥ ५ ॥ ज्याच्या स्मरणाने तुझी सर्व संकटे, इडा पिडा दूर होतात, त्याच्या स्मरणाने तुला मोहमाया स्पर्शही करू शकणार नाही. असे हे प्रभूचे नामस्मरण तू सतत गात राहा. ॥ ६ ॥ सदासर्वदा दिवसा–रात्री, उठता–बसता, घास गिळताना, जागृतीत–स्वप्नात, जागेपणी–झोपेतही तू नामस्मरणरूपी रसाचा स्वाद घे. त्या प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने तुझे भाग्य उदयाला येईल. ॥ ७ ॥ ज्याच्या स्मरणाने तुझा पापांचा भार नष्ट होईल, त्या रामनामाचे स्मरण हाच तुझा खरा आधार आहे. कबीर सांगतात, त्या प्रभू परमात्म्याचा अंत कोणासही

लागला नाही. तो अनंत आहे. त्या प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणापुढे सर्व मंत्र, तंत्र तुच्छ होत. स्मरणाशिवाय इतर प्रकारे प्रभू प्राप्त होत नाही. ॥ ८॥९॥

रामकली घरु २ बाणी कबीर जी की

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

बंधचि बंधनु पाइआ ॥ मुकतै गुरि अनलु बुझाइआ ॥
जब नख सिख इहु मनु चीन्हा ॥ तब अंतरि मजनु कीन्हा ॥ १ ॥
पवनपति उनमनि रहनु खरा ॥ नही मिरतु न जनमु जरा ॥ १ ॥ रहाउ ॥
उलटी ले सकति सहारं ॥ पैसीले गगन मझारं ॥
बेधिअले चक्र भुअंगा ॥ भेटीअले राइ निसंगा ॥ २ ॥
चूकिअले मोह मइआसा ॥ ससि कीनो सूर गिरासा ॥
जब कुंभकु भरिपुरि लीणा ॥ तह बाजे अनहद वीणा ॥ ३ ॥
बकतै बकि सबदु सुनाइआ ॥ सुनतै सुनि मंनि बसाइआ ॥
करि करता उत्तरसि पारं ॥ कहै कबीरा सारं ॥ ४ ॥ १ ॥ १० ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९७१)

शब्दार्थ : **बंधचि** – बांधणारा मोह. **बंधनु** – बंधन. **मुक्तै** – मुक्त झालेला. **अनलु** – अग्नी. **बुझाइला** – विझवली. **जब** – जेव्हा, **नखसिख** – नखशिखांत, पायाच्या नखापासून शेंडीच्या टोकापर्यंत. **चिन्हा** – जाणीव. **मजनु** – स्नान. **किन्हा** – केले. **पवनपति** – हवेसारखे चंचल मन. **उनमनि** – आनंदमयी. **रहनु** – राहणे. **मिरतु** – मृत्यू. **जनमु** – जन्म. **जरा** – वृद्धत्व, म्हातारपण. **सकति** – शक्ती. **पैसिले** – प्रवेशिले, प्रवेश केला. **गगन मझारं** – दशम द्वारात. **बधिअले** – भेदिले, तोडले, भेदलेला. **चक्र भुअंगा** – कुंडलिनी. **भेटिअले** – भेटला. **राइ** – परमेश्वर. **निसंगा** – नि:संग. **चुकीअले** – दूर झाले, चुकवले. **मइआसा** – मायेची आशा. **ससि** – शशी, चंद्र आत्मिक शांती. **सूर निरासा** – सूर्य विषयविकाराचा ताप. **कुंभकु** – श्वास रोखून धरणे, प्राणायामातील एक अवस्था. **लीणा** – घेतली. **तह** – तेव्हा. **बाजे** – वाजतो. **अनहत** – अनाहत. **बकतै** – वक्ता, बोलणारा. **बकि** – बोलला. **सबद** – शब्द, उपदेश. **सुनाइआ** – ऐकवले, ऐकले. **सुनतै** – ऐकणारा. **सुनि** – ऐकून. **मंनि** – मनात. **करि करता** – नामस्मरण करून. **उतरसि पार** – पार करून जातो. **सारं** – सार, सत्त्व, सारांश, अर्थ, भेद.

भावार्थ : मी मायेच्या बंधनाने बांधला गेलो होतो. पण सतगुरूने (जो स्वत: बंधमुक्त होता) माझ्या मनातील हा मायेचा वणवा शांत केला. त्याने माझ्या मनाला परमेश्वराचे परिपूर्ण ज्ञान प्राप्त करून दिले. तेव्हा अंत:करण स्वच्छ झाले, निर्मळ झाले. मन उन्मनी अवस्थेत जाऊन पोहोचले. ॥ १ ॥ वाऱ्यासारखे चंचल असलेले मन उन्मनि अवस्थेत स्थिर झाले आणि माझी जन्म, मृत्यू, वृद्धत्व यातून सुटका झाली. ॥ १ ॥ रहाउ ॥ मोहमायेपासून माझे मन परावृत्त झाले. मन दशमद्वारात जाऊन पोहोचले. सर्पिणी कुंडलिनीचे चक्र भेदून जीवात्मा, नि:संग प्रभू

परमात्म्याशी एकरूप झाला. ॥ २ ॥ माझे मन मायेपासून मुक्त झाले. जणू चंद्राने सूर्याला गिळले. भाव असा, की मनातील मोहमायेचा, विषयविकाराचा ताप प्रभुभक्तीच्या शांतगुणांनी नष्ट केला. ॥ ३ ॥ जेव्हा मनात प्रभुभक्ती पूर्णपणे भरून घेतली तेव्हा अंत:करणात प्रभू परमात्म्याचा अनाहत स्वर गुंजन करू लागला.॥४॥१॥१०॥

चंदु सूरजु दुइ जोति सरूपु ॥ जोती अंतरि ब्रहमु अनूपु ॥ १ ॥
करू रे गिआनी ब्रह्म बिचारु ॥ जोती अंतरि धरिआ पसारु ॥ १ ॥ रहाउ ॥
हीरा देखि हीरे करउ आदेसु ॥ कहै कबीर निरंजन अलेखु ॥ २ ॥ २ ॥ ११ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७२)

शब्दार्थ : **चंदु** – चंद्र. **सूरजु** – सूर्य. **दुइ** – दोघे, दोन. **जोति सरूपु** – ज्योतिस्वरूप, प्रकाशस्वरूप. **अंतरि** – आत. **गिआनि** – ज्ञान. **पसारु** – पसारा, विश्वाचा पसारा. **आदेसु** – नमस्कार. **निरंजन** – शुद्ध, पवित्र, मायारहित परमप्रकाश. **आलेखु** – अवर्णनीय.

भावार्थ : हे चंद्रसूर्य आपल्याला ज्योतिस्वरूप आहेत. पण ब्रह्म हे त्या ज्योतीतील प्रकाश आहे, म्हणून हे ज्ञानी माणसा, तू ब्रह्मतत्त्वाचा विचार कर. ह्या ज्योतीतून, ह्या ब्रह्मतत्त्वातूनच साऱ्या सृष्टीचा पसारा निर्माण झाला आहे. हिऱ्याचे हिरेपण, ती चमक त्या ब्रह्मप्रकाशामुळेच आहे. कबीर सांगतात – त्या परब्रह्म परमात्म्यास, त्या शुद्ध, मायारहित प्रभू परमात्म्यास, त्या अवर्णनीय परमतत्त्वास माझा नमस्कार असो. ॥ २ ॥ २ ॥ ११ ॥

दुनीआ हुसीआर बेदार जागत मुसीअत हउ रे भाई ॥
निगम हुसिआर पहरुआ देखत जमु ले जाई ॥ १ ॥ रहाउ ॥
नींबु भइओ आंबु, आंबु भइओ नींबा केला पाका झारि ॥
नालीएर फलु सेबरि पाका मूरख मुगध गवार ॥ १ ॥
हरि भइओ खांडु रेतु महि बिखरिओ हसंती चुनिओ न जाई ॥
कहि कमीर कुल जाति पांति तजि चीटी होइ चुनी खाई ॥ २ ॥ ३ ॥ १२ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७२)

शब्दार्थ : **हुसिआर** – सावध व्हा. **बेदार** – सुचित. **मुसिअत** – संकट, लुटणे. **निगम** – वेद. **पहरुआ** – पहारेकरी. **देखत** – समक्ष, समोर. **जमु** – यम. **निंबु** – कडुलिंब वृक्ष. **आंबु** – आंबा. **केला** – केळी. **पाका** – पिकले. **झारि** – झाडीवर. **नालिएर** – नारळ. **सेबरि** – शेवरी. **कमीर** – कबीर. **खांडू** – साखर. **रेतु** – वाळू, रेती. **बिखरिओ** – विखुरलेली. **हसति** – हत्ती, मत्त. **तजि** – त्याग करून. **चीटी** – मुंगी. **चुनि** – निवडून. **खाइ** – खावी.

भावार्थ : हे दुनियेतील समस्त लोक हो ! सावध व्हा, जागे व्हा. अरे तुमच्या डोळ्यादेखत तुम्ही मायेकडून लुटले जात आहात. अरे, वेदांसारखे दक्ष पहारेकरी असून देखील भक्ती न केल्याने त्यांच्यादेखत यम जीवांना ओढून नेत आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ संसारात, मोहमायेत, विषयविकारात रमलेल्या जीवाला आंबा कडुलिंबासारखा वाटतो तर कडुलिंब आंब्यासारखा वाटतो. केळीचा घड हा काट्यासारखा वाटतो. नारळ सिंबळ (एक निरुपयोगी फळ) सारखे

वाटते. भाव असा, की प्रभुभक्ती, जी जीवाला उन्नतीकडे घेऊन जाते ती आवडत नाही पण विषयविकार जे जीवास अधोगतीकडे घेऊन जातात ते चांगले वाटतात. प्रभुनामरूपी पिकलेली केळी काट्याप्रमाणे त्रासदायक वाटतात. नारळ ज्यापासून शरीरास अमृतमधुर पाणी व मुलायम खोबरे मिळते ते सिंबाळच्या निरुपयोगी फळासारखे वाटते. भाव असा, की प्रभुसेवेमुळे प्राप्त होणारे गोड फळ न आवडता विषयविकारच आवडतात. ॥ १ ॥ तो प्रभू परमात्मा रेतीत मिसळलेल्या साखरेच्या कणासारखा आहे. त्यास प्राप्त करावयाचे असेल तर तुमच्या मनातील कुल, जात, पात आदी उच्च–नीचतेच्या भावनांचा त्याग करा. अहंकारच्या भावनेचा त्याग करा. अत्यंत नम्रभाव धारण करा. क्षुद्र मुंगीचे रूप धारण करा आणि प्रभुनामाची गोडी प्राप्त करा. असे कबीर सांगतात. ॥ २ ॥ ३ ॥ १२ ॥

बाणी नामदेव जी की
राग रामकली घरु १

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओअंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

आनीले कागदु काटीले गूडी आकास मधे भरमीअले ॥
पंच जना सिउ बात बतऊआ चीतु सु डोरी राखीअले ॥ १ ॥
मनु राम नामा बेधीअले ॥ जैसे कनिक कला चितु मांडिअले ॥ १ ॥ रहाउ ॥
आनीले कुंभु भराईले ऊदक राजकुआरि पुरंदरीए ॥
हसत बिनोद बीचार करती है चीतु सु गागरि राखीअले ॥ २ ॥
मंदरू एकु दुआर दस जा के गऊ चरावन छाडीअले ॥
पांच कोस पर गऊ चरावत चीतु सु बछरा राखीअले ॥ ३ ॥
कहत नामदेउ सुनहु तिलोचन बालकु पालन पउढीअले ॥
अंतरि बाहरि काज बिरूधी चीतु सु बारिक राखीअले ॥ ४ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७२)

शब्दार्थ : **आनिले** – आणले. **बुडी** – पतंग. **चीतु** – चित्त, मन. **डोरी** – दोरा. **बातउआ** – गप्पागोष्टी. **बेधिअले** – वेधले. **कनिक** – सोने. **कुआरि** – कुमारी, युवती. **पुरंदरीए** – शहरातून. **मंदरू** – मंदिर, शरीर. **दुआर** – दार. **पउढीअले** – पाळण्याकडे. **काजबिरुधी** – कामात रुंजलेली. **बारिक** – बालक.

भावार्थ : लहान मुलगा कागद कापून सुंदर पतंग बनवतो व आकाशात उडवतो. पतंग आकाशात उडत असताना तो मुलगा आपल्या सवंगड्यांबरोबर गप्पागोष्टी करत असतो. पण त्याचे चित्त मात्र पतंगाकडे असते. जसे सोनार सोन्याचा अलंकार घडवीत असताना गिऱ्हाइकाशी, आल्या–गेल्याशी बोलत असतो पण त्याचे चित्त मात्र आपण घडवित असलेल्या दागिन्याकडेच सदैव असते. तसे माझे सारे मन त्या प्रभूच्या नामात, रामनामात गुंगून गेलेले असते. मुली शहरातून आपले कुंभ पाण्याने भरून डोईवर ठेवतात आणि घरी जाताना मैत्रिणींशी हसत, गप्पा मारीत,

विनोद करीत जात असतात, पण त्यांचे सारे लक्ष त्या कुंभातील जलाकडे असते. एक थेंबही सांडू देत नाहीत. एक गाईंचा गोठा आहे. त्याला दहा दारे आहेत. गाई त्या दहा दारांतून मोकाट सुटतात. दूर पाच कोस चरायला जातात. पण त्यांचे चित्त मात्र गोठ्यात असलेल्या आपल्या वासरांकडे गुंतलेले असते. देह हे एक मंदिर आहे, त्यात प्रभू परमात्मा वास करत आहे. माणसाची दहाही इंद्रिये दैनंदिन व्यवहारासाठी दहाही दिशांना भटकत असतात पण जो खरा भक्त असतो तो सारे व्यवहार करीत असतानाही त्याचे सारे चित्त त्या हृदयमंदिरात असलेल्या प्रभू परमात्म्याकडेच सदैव लागलेले असते. नामदेव त्रिलोचनला सांगतात – आणखी ऐक– घरातली माता सदैव कामासाठी आतबाहेर करीत असते पण तरीही तिचं चित्त मात्र सदैव पाळण्यात झोपलेल्या आपल्या बाळाकडे असते. तसे माझे मन सदैव रामनामात गुंग झालेले असते. ॥ ४ ॥ १ ॥

बेद पुरान सासत्र आनंता गीत कबित न गावउगो ॥
अखंड मंडल निरंकार महि अनहद बेनु बजावउगो ॥ १ ॥
बैरागी रामहि गावउगो ॥
सबदि अतीत अनाहदि राता आकुल कै घरि जाउगो ॥ १ ॥ रहाउ ॥
इड़ा पिंगुला अउरू सुखमना पउनै बंधि रहाउगो ॥
चंदु सूरजु दुई सम करि राखउ ब्रहम जोति मिलि जाउगो ॥ २ ॥
तीरथ देखि न जल महि पैसउ जीअ जंत न सतावउगो ॥
अठसठि तीरथ गुरू दिखाए घट ही भीतरि न्हाउगो ॥ ३ ॥
पंच सहाई जन की सोभ भलो भलो न कहावउगो ॥
नामा कहै चितु हरि सिउ राता सुंन समाधि समाउगो ॥ ४ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७२)

शब्दार्थ : **अनंता** – अनेक, असंख्य. **न गावउगो** – गात नाही. **बेनु** – वेणू, मुरली, बासरी. **बजावउगो** – वाजवतो. **बैरागी** – विरक्त होऊन. **राता** – एकरूप झालेला, रंगलेला. **आकुल** – कुलरहित, परमेश्वर. **इडा पिंगुला सुखमना** – इडा, पिंगळा, सुषुम्ना ह्या तीन नाड्या. यांचे योगशास्त्रात फार महत्त्व. यांच्या नियमनाने व या नाड्यांच्या जागृतीने मानवी शरीरातील मूलाधार चक्रात सुरक्षाव्यवस्थेत असलेली चैतन्यशक्ती, ब्रह्मरंध्रापर्यंत पोहोचते व माणूस मुक्त होतो असे योगशास्त्र सांगते. **पउनै** – पवन, वायू. **पैसउ** – राहणाऱ्या, (पडणार).

भावार्थ : वेद, पुराणे, शास्त्रे, देवादिकांची स्तवन गीते मी गात नाही. कुठल्याही कर्मकांडात मी रस घेत नाही. अखंड मंडलाकार सृष्टीचा जो स्वामी त्या मायातीत निर्गुण–निराकार परब्रह्माच्या अनाहत वेणुनादातच मी तल्लीन होऊन जातो. मी वितरागी होऊन कशातही लिप्त न होता निर्लेप मनाने त्या प्रभू परमात्म्याचे, त्या रामाचे गुणगान करतो. त्रिगुणाने लिप्त, शब्दांपासून दूर राहून अनाहत नादात तल्लीन होऊन सर्व भेदाभेदापलीकडे असलेल्या त्या परब्रह्माशी एकरूप होऊन जातो. योग शास्त्रातील प्राणायाम, बंध आदींच्या साहाय्याने इडा, पिंगळा, सुषुम्ना या नाड्यांतून चैतन्य–शक्ती प्रभावित करण्यापेक्षा; चंद्रनाडी, सूर्यनाडीस समान लेखून त्या

सर्वांपलीकडे असणाऱ्या त्या आत्मरूपी परब्रह्मज्योतीत मी विलीन होतो. तीर्थस्थानी जाऊन तीर्थात स्नान करण्यात मला मुळीच रुची नाही. त्या पाण्यात डुबक्या मारून त्यात शांतपणे विहरणाऱ्या जीवजंतूंना निष्कारण त्रास देणे मला आवडत नाही. माझ्या गुरूकडून मी जाणले आहे की, सर्व अडुसष्ट तीर्थे आपल्या अंतरातच सामावलेली आहेत. त्या अंतरातील तीर्थातच मी स्नान करतो. नामदेव म्हणतात – नानाविध कर्मकांडात लिप्त राहून पंचविकारांनी वेढलेल्या जनसामान्यांकडून भलावण करून घेणे मला आवडत नाही. मला त्याची जरूरीही नाही. त्यापेक्षा मी माझे चित्त हरिनामात लीन करून निर्विकल्प समाधीमध्ये स्थित राहीन.॥४॥२॥

माइ न होती बापु न होता करमु न होती काइआ ॥
हम नही होते तुम नही होते कवनु कहां ते आइआ ॥ १ ॥
राम कोइ न किस ही केरा ॥ जैसे तरवरि पंखि बसेरा ॥ १ ॥ रहाउ ॥
चंदु न होता सूरु न होता पानी पवनु मिलाईआ ॥
सासतु न होता बेदु न होता करमु कहा ते आइआ ॥ २ ॥
खेचर भूचर तुलसी माला गुरपरसादी पाइआ ॥
नामा प्रणवै परम ततु है सतिगुर होइ लखाइआ ॥ ३ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९७३)

शब्दार्थ : **काइआ** – शरीर. **कवनु** – कोण. **कहां ते** – कोठून. **आइआ** – आले. **किसहीकेरा** – कोणाचा. **तरवर** – झाडावर. **बसेरा** – विश्रामस्थळ. **चंदु** – चंद्र **सूर** – सूर्य. **पवनु** – हवा. **मिलाइआ** – परमेश्वर स्वरुपात मिळून गेले होते. **सासतु** – शास्त्रे. **खेचर** – खेचरी मुद्रा. **भूचर** – भूचरी मुद्रा, खेचरी व भूचरी ह्या योगशास्त्रातील मुद्रा आहेत. ज्यांच्याद्वारे प्राणाचे नियमन करून साधक प्रभुपद प्राप्त करतो असे सांगतात. **तुलसीमाला** – दाखविले, समजाविले.

भावार्थ : ज्या वेळी आई नव्हती, बाप नव्हता. हे मानवी शरीरही नव्हते, मी नव्हतो, तुम्ही नव्हतात, मग कोण, कोठून, कसे आले ? ही सृष्टी कशी निर्माण झाली ? हे प्रभुरामा, ह्या जगात कोणी कोणाचे नाही. जशी फुलपाखरं विश्रांती घेण्यासाठी थोडावेळ झाडावर बसतात आणि मग भुर्रकन उडून जातात त्याप्रमाणे हा सृष्टीचा पसारा आहे. माणसे ह्या जगात काही काळासाठी येतात आणि निघूनही जातात. कोणी कोणाचे नाही हेच खरं. जेव्हा चंद्रही नव्हता, सूर्यही नव्हता, जल–वायू सर्व काही प्रभू परमात्म्यातच लीन झालेले होते. जेव्हा कोणतीही शास्त्रे नव्हती, वेद नव्हते, काही काही सुद्धा नव्हते तेव्हा हे प्रभो हे कर्मकांड कोठून आले ? खेचरी, भूचरी इत्यादी योग प्रकाराने होणारे ज्ञान, तुळशीमाळा घेऊन जप–तप केल्याने होणारे ज्ञान, सारे काही मला गुरुकृपेने प्राप्त झाले आहे. नामदेव म्हणतात, ते परमतत्त्व, साऱ्या सृष्टीचे मूळतत्त्व तो प्रणव ओंकार आहे. त्याच्या नामस्मरणानेच मुक्ती प्राप्त होते. हे ज्ञान सद्गुरुकडूनच समजते.

बानारसी तपु करै उलटि तीरथ मरै अगनि दहै काइआ कलपु कीजै ॥
असुमेध जगु कीजै सोना गरभ दानु दीजै राम नाम सरि तऊ न पूजै ॥ १ ॥
छोडि छोडि रे पाखंडी मन कपटु न कीजै ॥
हरि का नामु नित नितहि लीजै ॥ १ ॥ रहाउ ॥
गंगा जउ गोदावरि जाईए कुंभि जउ केदार न्हाईऐ गोमती सहस गऊ दानु कीजै ॥
कोटि जउ तीरथ करै तनु जउ हिवाले गारै राम नाम सरि तऊ न पूजै ॥ २ ॥
असु दान गज दान सिहजा नारी भुमि दान ऐसो दानु नित नितहि कीजै ॥
आतम जउ निरमाइलु कीजै आप बराबरि कंचनु दीजै राम नाम सरि तऊ न पूजै ॥ ३ ॥
मनहि न कीजै रोसु जमहि न दीजै दोसु निरमल निरबाण पदु चीन्हि लीजै ॥
जसरथ राइ नंदु राजा मेरा रामचंदु प्रणवै नामा, ततु रसु अंम्रितु पीजै ॥ ४ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७३)

शब्दार्थ : **उलटी** – उलट लटकून. **दहै** – दहन. **काईआ कलपु** – कायाकल्प. **असुमेध जगु** – अश्वमेध यज्ञ. **गरभदानु** – गुप्तदान. **असुदान** – अश्वदान. **गजदान** – हत्तींचे दान. **सहस** – सहस्र. **हिवाले गारै** – बर्फात गाडून घेणे. **सिहजा नारी** – नारीसह शय्या. **आतम** – स्वत:. **निरमाइलु** – निर्माल्य. **रोसु** – रोष, राग, क्रोध, तक्रार. **दोस** – दोष. **जसरथ** – दशरथ. **सरि** – बरोबरी.

भावार्थ : हे प्राण्या ! तू वाराणशी क्षेत्रात जाऊन स्वत:ला उलटे टांगून तपश्चर्या कर, तीर्थस्थानी मरण यावे म्हणून तेथे वास कर. स्वत:चा देह अग्नीत जाळून घे, कायाकल्प करून घे, अश्वमेध यज्ञ कर, गुप्तपणे सुवर्णदान कर, पण रामनामाची सर ह्या कशालाही नाही. हे मना ! हे सारे पाखंड सोडून दे. मनातले कपट काढून टाक आणि सदासर्वदा त्या हरिनामात निमग्न राहा. गंगाकाठी जा, गोदावरी काठी जा किंवा केदारनाथला कुंभमेळ्यात जाऊन तीर्थस्नान कर, गोमतीकाठी जाऊन हजार गायींचे दान कर, अरे, कोटी कोटी तीर्थांत स्नान कर किंवा शरीर हिमालयाच्या बर्फात गाडून घे, कशाकशाचा काहीही उपयोग नाही. ह्यापैकी कोणतेही कृत्य रामनामाची बरोबरी करू शकत नाही. अश्वदान कर, गजदान कर, नारीसह शय्यादान कर, भूमिदान कर, सदासर्वदा अशी दाने कर, स्वत:चा जीव ओवाळून टाक, प्राणाचे निर्माल्य कर, सुवर्णतुला करून स्वत:च्या वजनाइतके भारंभार सोने दान कर, पण ह्या कशाचीही रामनामाची बरोबरी होऊच शकत नाही. हे मना ! एवढे सगळे केले तरी यमाचा फास काही चुकत नाही. म्हणून तू रागराग करू नकोस. तो त्याचे काम करीतच राहणार. अरे त्या निर्मल निर्वाणरूपी प्रभू परमात्म्याच्या पदचिन्हांचा आश्रय घे. प्रभूचे नाम हाच माझा दशरथनंदन राम आहे, तोच नामदेवाचा प्रभू आहे. त्याला शरण जा आणि त्या प्रणव ओंकाररूपी मूळतत्त्वाचे रसामृत प्राशन कर. ॥ ४ ॥ ४ ॥

निंदकाबद्दल खूप खोलवर विचार केल्यानंतर असे निश्चित झाले आहे, की हे पापी लोक अखेर परक्याच वाटेनेच जातात. ॥ ४ ॥ २ ॥ ११ ॥ ७ ॥ २ ॥ ४९ ॥

रामकली बाणी रविदास जी की

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

पड़ीऐ गुनीऐ नामु सभु सुनीऐ अनभउ भाउ न दरसै ॥
लोहा कंचनु हिरन होइ कैसे जउ पारसहि न परसै ॥ १ ॥
देव संसै गुंठि न छूटै ॥
काम क्रोध माइआ मद मत्सर इन पंचहु मिलि लुटै ॥ १ ॥ रहाउ ॥
हम बड कबि कुलीन हम पंडित हम जोगी संनिआसी ॥
गिआनी गुनी सूर हम दाते इह बुधि कबहि न नासी ॥ २ ॥
कहु रविदास सभै नहि समझसि भूलि परे जैसे बउरे ॥
मोहि अधारु नामु नाराइन जीवन प्रान धन मोरे ॥ ३ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९७३)

शब्दार्थ : **पडीऐ** – वाचतात. **गुनीऐ** – विचारतात. **सभु** – सर्वत्र. **सुनीऐ** – ऐकतात. **अनभउ** – . **भाउ** – . **दरसै** – दर्शन. **लोहा** – लोखंड. **कंचनु** – कांचन. **हिरन** – सोने. **कैसे** – कसे. **जउ** – जर. **पारसहि** – परिस. **परसै** – स्पर्श. **संसै** – संशयाची. **गाठि** – गाठ. **छुटै** – सुटते. **माइआ** – माया. **मतसर** – मत्सर. **इन** – हे. **पंचहु** – पाचही. **मिलि** – मिळून. **लूटै** – लुटतात. **बड** – मोठे, **बडे. जोगी** – योगी. **संनिआसी** – संन्यासी. **गिआनी** – ज्ञानी. **सूर** – शूर. **इह** – अशी, ही. **बुधि** – बुद्धी. **कबहि** – कधीही. **नासि** – नष्ट होणे, नाहीशी होणे. **सभै** – सर्व जीव. **समझसि** – समजणे. **भूलि परे** – भूल पडली. **जैसे** – जसे. **बउरे** – वेडे. **मोहि** – माझा. **अधारू** – आधार. **मोरे** – माझे. **नामु नाराइन** – नारायणाचे नाम, प्रभुनाम.

भावार्थ : केवळ वाचण्याने, चिंतन केल्याने, प्रभुनाम ऐकल्याने प्रेमस्वरूप, ज्ञानस्वरूप प्रभू परमात्म्याचे दर्शन होत नाही. जर लोखंडाला परिसाचा स्पर्शच झाला नाही तर त्याचे सोने कसे होणार. सतगुरूच्या प्राप्तीशिवाय प्रभू परमात्म्याचे दर्शन होणे शक्य नाही. ॥ १ ॥

हे देवा ! माझ्या मनातील संशयाच्या गाठी अजूनही सुटत नाहीत. काम, क्रोध, माया, मद, मत्सर ह्या पंच विकारांनी मला लुटले आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी श्रेष्ठ, मी कवी, मी कुलीन, मी पंडित, मी योगी, मी संन्यासी, ज्ञानी मुनी, मी शूरवीर, मी दाता, हा माझ्यातला मी पणा ही अहंभाव बुद्धी अजूनही नष्ट झाली नाही.॥ २॥ भक्त रविदास हे सर्वांना ओरडून सांगतात, की बाबांनो अहंभाव नष्ट झाल्याशिवाय प्रभूदर्शन शक्य नाही. पण कोणीही हे समजून घेण्यास तयार नाहीत. सर्वजण मोहमायेच्या पाशात अडकून वेड्यासारखे इतस्तत: भटकत आहेत. प्रभुनाम हाच माझा आधार. हाच माझा प्राण, हेच माझे धन, जीवन. सारे सारे काही प्रभुनामच आहे.॥ ३॥ १॥

बाणी बेणी जीउ की
राग रामकली

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने प्राप्त होतो.

इड़ा पिंगुला अउर सुखमना तीनि बसहि इक ठाई ॥
वेणी संगमु तह पिरागु मनु मजनु करे तिथाई ॥ १ ॥
संतहु तहा निरंजन रामु है ॥ गुर गमि चिनै विरला कोइ ॥
तहा निरंजनु रमईआ होइ ॥ १ ॥ रहाउ ॥
देव सथानै किआ नीसाणी ॥ तह बाजे सबद अनाहत बाणी ॥
तह चंदु न सूरजु पवणु न पाणी ॥ साखी जागी गुरमुखि जाणी ॥ २ ॥
उपजै गिआनु दुरमति छीजै ॥ अंम्रित रसि गगनंतरि भीजै ॥
एसु कला जो जाणै भेउ ॥ भेटे तासु परम गुरदेउ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९७४)

शब्दार्थ : **अउर** – आणि. **इडा पिंगळा सुखमना** – इडा पिंगळा व सुषुम्ना ह्या तीन नाड्या माकड हाडापासून मणक्यातून मस्तकापर्यंत गेलेल्या आहे. चैतन्यरूप प्राणशक्ती तळात माकडहाडापाशी सुप्तावस्थेत असते. योगी लोक योगद्वारे तिला जागृत करून इडा पिंगळा व सुषुम्ना नाड्यांतून मस्तकात ब्रह्मरंध्रापर्यंत नेतात असे सांगतात. **बसहि** – वसतात. **इक** – एक. **ठाई** – जागी. **वेणी संगमु** – त्रिवेणी संगमावर गंगा यमुना सरस्वती यांच्या संगमावर. **पिरागु** – प्रयाग क्षेत्री. (इडा पिंगळा सुषुम्ना ह्या तीन नाड्यांचा संगम जेथे झाला आहे त्या ब्रह्मरंध्रास येथे प्रयाग क्षेत्र म्हटले आहे.) **मजनु** – स्नान. **तिथाई** – तेथे. **गमि** – द्वारा, कडून. **चिनै** – ओळखणे. **देव सथानै** – देवस्थानी. **किआ** – . **निसाणि** – . **तह** – तेथे. **बाजे** – वाजते. **चंदु** – चंद्र. **सूरजु** – सूर्य. **पउणु** – पवन, वारा. **साखी** – ज्ञान. **जाणी** – जाणले. **उपजै** – उत्पन्न झाले. **गिआनु** – ज्ञान. **दुरमति** – दुष्ट बुद्धी. **छीजै** – नष्ट झाली. **गगनांतरी** – मस्तकात, दशमद्वार. **भीजै** – भिजते. **एसु** – अशा. **भेउ** – भेद, रहस्य. **तासु** – त्याला.

भावार्थ : इडा, पिंगळा व सुषुम्ना नाड्या जेथे एकत्र येतात त्यांच्या संगमावर म्हणजे दशमद्वाररूपी प्रयाग क्षेत्री मनाने स्नान केले म्हणजे दशमद्वारात मनाच्या सर्व शक्ती केंद्रित केल्यास गंगा– यमुना– सरस्वतीच्या संगमस्थानी, प्रयाग क्षेत्री स्नान केल्यासारखे आहे. ॥ १ ॥ हे संतजनहो ! तो निरंजन प्रभू परमात्मा येथेच म्हणजे प्रत्येकाच्या अंत:करणातच आहे. कोणी विरळाच साधक सतगुरुकृपेने हे जाणतो. तो निष्कलंक प्रभू परमात्मा तेथेच रमला आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ देवाचे स्थान कोठे आहे हे ओळखण्याची खूण काय ? जेथे प्रभू परमात्म्याचा वास असेल तेथे सतत, अनाहत नाद गुंजत असतो. तेथे चंद्र, सूर्य, पवन, पाणी काही काही नसते. एक नीरव शांतता नांदत असते. जो साधक गुरुमुख होऊन सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे वागतो त्याला गुरुमुखातून हे ज्ञान प्राप्त होते. ॥ २ ॥ ज्ञान प्राप्त झाल्यामुळे दुर्मती नष्ट होते. मन निर्मळ होते. असा साधक दशमद्वारात प्रभुनामरूपी अमृताचे पान करतो. अमृतरसात चिंब भिजतो. ज्याने हे रहस्य जाणले त्याला गुरुकृपेने प्रभू परमात्मा प्राप्त होतो. ॥ ३ ॥

दसम दुआरा अगम अपारा परम पुरख की घाटी ॥
उपरि हाटु हाट परि आला आले भीतरि थाती ॥ ४ ॥
जागतु रहै सु कबहु न सोवै ॥ तीनि तिलोक समाधि पलोवै ॥
बीज मंत्रु लै हिरदै रहै ॥ मनूआ उलटि सुंन महि गहै ॥ ५ ॥
जागतु रहै न अलीआ भाखै ॥ पाचउ इंद्री बसि करि राखै ॥
गुर की साखी राखै चीति ॥ मनु तनु अरपै क्रिसन परीति ॥ ६ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९७४)

शब्दार्थ : **अगम** – अगम्य. **अपारा** – अपार, ज्याचा पार लागत नाही असा. **परम पुरुख** – परम पुरुष, प्रभू परमात्मा. **घाटी** – निवासस्थान. **उपरि** – सर्वांत वरच्या स्तरावर. **हाटु** – . **हाट** – . **परि** – . **आला** – आलय, वसतिस्थान, घर. **आले भीतरि** – त्या घरात. **थाती** – स्थान. **जागतु** – जागृत. **सु** – तो. **कबहु** – कधीही. **सोवै** – झोपतो. **तीनि** – तीन गुण (सत्त्व, रज, तम). **तिलोक** – त्रिलोक. **पलोवै** – समाप्त होतो. **हिरदै** – हृदयात. **मनुआ** – मन. **उलटी** – विरुद्ध. **गहै** – . **जागतु** – जागृत. **अलीआ** – खोटे, असत्य. **भाखै** – बोलणे. **पाचउ** – पाच. **इंद्रि** – इंद्रिय. **बसि** – वश. **साखी** – उपदेश. **चीति** – चित्तात. **अरपै** – अर्पण करणे. **परीति** – प्रीती.

भावार्थ : हे दशमद्वार अगम्य व अपार आहे. हेच प्रभू परमात्म्याचे वसतिस्थान आहे .सर्व प्राणिसृष्टीत मनुष्यप्राणी सर्वश्रेष्ठ आहे आणि मानवी शरीरात मस्तक सर्वांत उच्च स्थानी विराजमान आहे. तेथूनच सारे व्यवहार चालतात. त्या मस्तकाच्या आत त्या परमपुरुषाचे वसतिस्थान आहे. ॥ ४ ॥ जो साधक ज्ञानवान बनून सावध, दक्ष राहतो . कधीही आळसात वेळ घालवीत नाही. केव्हाही बेसावध राहत नाही त्याच्या समाधी अवस्थेत त्रिगुणात्मक प्रकृती त्याच्यावर आपला काहीही प्रभाव पाडू शकत नाही. तो आपल्या हृदयात प्रभुनामरूपी बीजमंत्र दृढपणे धारण करतो. त्यामुळे त्याचे चित्त संसारातील मोहमायेपासून, विषयविकारापासून परावृत्त होऊन शून्य समाधीत मग्न होतो. ॥ ५ ॥ असा साधक सदैव सावध असतो. तो कधीही असत्य बोलत नाही. पाचही इंद्रिये आपल्या ताब्यात ठेवतो. सतगुरूपासून प्राप्त झालेले ज्ञान चित्तात दृढपणे धारण करतो. आपले तन मन सर्व काही प्रभूच्या प्रेमात अर्पण करतो. ॥ ६ ॥

कर पलव साखा बीचारे ॥ अपना जनमु न जूऐ हारे ॥
असुर नदी का बंधै मूलु ॥ पछिम फेरि चड़ावै सूरु ॥
अजरु जरै सु निझरु झरै ॥ जगंनाथ सिउ गोसटि करै ॥ ७ ॥
चउमुख दीवा जोति दुआर ॥ पलू अनत मूलु बिचकारि ॥
सरब कला ले आपे रहै ॥ मनु माणकु रतना महि गुहै ॥ ८ ॥
मसतकि पदमु दुआलै मणी ॥ माहि निरंजनु त्रिभवण धणी ॥
पंच सबद निरमाइल बाजे ॥ ढुलके चवर संख धन गाजे ॥
दलि मलि दैतहु गुरमुखि गिआनु ॥ बेणी जाचै तेरा नामु ॥ ९ ॥ १ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९७४)

शब्दार्थ : कर – हात. पलव – पान. बीचारे – विचार कर. जुऐ – जुगार. असुरनदी – चंद्रनाडी, अपान वायू. पछिम – . फेरि – फिरवून. चडावै – चढवणे. सूरु – . अजरु – . जरै – . निझरु – . झरै – . जगंनाथ – जगन्नाथ, जगाचा नाथ, प्रभू परमात्मा. गोसटि – गोष्टी. चाउमुख – चार मुखे असलेला. जोति – प्रकाश. दुआर – द्वार. पलु – पाने, बाह्य सृष्टी. मूलु – मूळ. बिचकारि – मध्य. सरब – सर्व. आपे – प्रभू. रहै – राहतो. गुहै – लीन कर. मसतकि – डोक्यावर. पदमु – कमळ. दुआलै – चारही बाजूस. माहि – मध्ये. निरंजनु – मायातीत, निष्कलंक. निरमाइल – निर्मळ, पवित्र. ढुलके – ढाळतात. घन – खूप. गाजे – गरजतात. दलि – . मलि – . दैतहु – दैत्य. जाचै – याचना करतो.

भावार्थ : जो प्रभुसेवक आपले हात ही प्रभुरूपी वृक्षाची पाने आहेत, व शरीर हे त्या वृक्षाचे खोड आहे असे समजतो. भाव असा की– हे शरीर हे प्रभुचीच निर्मिती आहे असे समजून आपले जीवन व्यवहार करतो तो जीवनात कधीही पराभूत होत नाही. जो प्रभुसेवक आपल्या मनातील असुर प्रवृत्तींना त्याच्या उगमस्थानीच बांधून टाकतो व त्यास त्यापासून परावृत्त करून संसारिक मोहपाशातून मुक्त होतो, तोच सदैव वहात राहणाऱ्या आत्मानंदरूपी आनंदात मग्न होऊन राहतो व प्रभू परमात्म्याशी एकरूप होतो. ॥ ७ ॥ दशम द्वारात ब्रह्मरंध्रात प्रभू परमात्म्याचा चारी दिशा प्रकाशित करणारा दीप तेवत आहे. वर दुसऱ्या बाजूस संसाररूपी पल्लवाचा विस्तार आहे व मधोमध अनंत परमात्मा स्थित आहे. तोच सर्व शक्तिमान प्रभूच सर्व काही आहे हे जो जाणतो तोच प्रभुनामरूपी माणिक प्राप्त करतो. ॥ ८ ॥ माणसाच्या मस्तकात सहस्त्रदल कमल असून त्याच्या चारही बाजूस प्रभुनामरूपी रत्ने आहेत. अशा कमळात त्रिभुवनाचा स्वामी, निरंजन प्रभू, वास करतो. तेथूनच पंचस्वरांचा नाद निनादत आहे. तेथे आत्मिक आनंदरूपी चौरी ढाळली जात आहे व शंख घनगर्जना करीत आहे. गुरुच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्यास हे ज्ञान प्राप्त होते व तो विकाररूपी दैत्याचे निर्दालन करतो. हे प्रभो ! हा तुझा दास वेणी तुझ्या नामाचीच याचना करतो.॥९॥१॥

रागु नटनारायण

रागु नट नाराइन महला ४

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाम सत्य आहे. तो कर्तापुरुष आहे. तो निर्भय आहे. तो निर्वैर आहे. तो कालातीत आहे. तो अयोनीसंभव स्वयंभू आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

मेरे मन जपि अहिनिसि नामु हरे ॥
कोटि कोटि दोख बहु कीने सभ परहरि पासि धरे ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि हरि नामु जपहि आराधहि सेवक भाइ खरे ॥
किलबिख दोख गए सभ नीकरि जिउ पानी मैलु हरे ॥ १ ॥

खिनु खिनु नरु नाराइनु गावहि मुखि बोलहि नर नरहरे ॥
पंच दोख असाध नगर महि इकु खिनु पलु दूरि करे ॥ २ ॥
वडभागी हरि नामु धिआवहि हरि के भगत हरे ॥
तिन की संगति देहि प्रभ जाचउ मै मूड़ मुगध निसतरे ॥ ३ ॥
क्रिपा क्रिपा धारि जगजीवन रखि लेवहु सरनि परे ॥
नानकु जनु तुमरी सरनाई हरि राखहु लाज हरे ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९७५)

शब्दार्थ : दोख – दोष. किलबिख – पाप. आरध – . देहि – प्रदान कर, दे. जाचउ – याचना करतो. सरनाई – शरण आलो. रखि – रक्षा.

भावार्थ : हे माझ्या मना सदैव रात्रंदिवस तू प्रभुनामाचा जप कर. तुझे कोटी कोटी दोष प्रभू परमात्मा दूर करील ॥ १ ॥ रहाउ ॥ जे सदैव हरिनामाचा जप करतात, प्रभू परमात्म्याची आराधना करतात ते खरे सेवक होत. ज्याप्रमाणे पाण्यामुळे कपडे स्वच्छ होतात, त्याप्रमाणे प्रभुनाम जपाने सर्व दोष व पाप निघून जाते. ॥ १ ॥ जो जीव, क्षणोक्षणी मुखाने प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करतो. त्याच्या शरीरातील असाध्य असे पंचदोष (कामक्रोधादी विकार) एका क्षणात प्रभू दूर करतो. ॥ २ ॥ भाग्यवान जीवच हरिनामाचे ध्यान करतात. असे हरिभक्तच नामभक्तीचा आनंद उपभोगतात. हे प्रभो ! अशा हरिभक्तांची संगत मला प्राप्त होऊ दे. अशी मी याचना करतो. मी मूढ आहे. मूर्ख आहे. माझा उद्धार कर. ॥ ३ ॥ जगाला जीवन देणाऱ्या प्रभो मी तुला शरण आलो आहे. माझ्यावर कृपाकर व माझे रक्षण कर. ॥ ४ ॥ १ ॥

॥ नट महला ४ ॥

राम जपि जन रामै नामि रले ॥
राम नामु जपिओ गुर बचनी हरि धारी हरि क्रिपले ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि हरि अगम अगोचरु सुआमी जन जपि मिलि सलल सलले ॥
हरि के संत मिलि राम रसु पाइआ हम जन कै बलि बलले ॥ १ ॥
पुरखोतमु हरि नामु जनि गाइओ सभि दालद दुख दलले ॥
विचि देहि दोख असाध पंच धातू हरि कीए खिन परले ॥ २ ॥
हरि के संत मनि प्रीति लगाई जिउ देखै ससि कमले ॥
उनवै घनु घन घनिहरु गरजै मनि बिगसै मोर मुरले ॥ ३ ॥
हमरै सुआमी लोच हम लाई हम जीवह देखि हरि मिले ॥
जन नानक हरि अमल हरि लाए हरि मेलहु अनद भले ॥ ४ ॥ २ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९७५)

शब्दार्थ : रलै – तल्लीन होणे. क्रिपले – कृपाळू. सलल – पाणी. बलि बलले – समर्पित होणे. पुरखोतमु – पुरुषोत्तम. दालद – दारिद्र्यता. दलले – नष्ट केले. असाध – असाध्य. परले – नष्ट केले. ससि – शशी, चंद्र. घनु – मेघ. घन – खूप. घनिहारु – गरजतात. बिगसै – प्रसन्न होणे. मुरले – मोराची पिल्ले. लोच –

इच्छा. **अमल** – नशा. **अनद** – आनंद.

भावार्थ : हे प्रभुसेवकांनो प्रभुनामाचा जप करा व प्रभुनामात तल्लीन व्हा. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभुनामाचा जप करा त्यामुळे प्रभूची कृपा होईल. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभू परमात्मा अगम्य व अगोचर आहे. तो सर्व जगाचा स्वामी आहे. प्रभुसेवक त्याचे स्मरण करून जसे पाणी पाण्यात मिसळून जाते, तसा प्रभूशी एकरूप होऊन जातो. संतजन संगतीत एकत्र येऊन प्रभुप्रेमरस प्राशन करतात. मी अशा प्रभुसेवकांवर माझे सर्वस्व समर्पित करतो. ॥ १ ॥ जो प्रभुसेवक पुरुषोत्तम प्रभूचे नामस्मरण करतो त्याचे दारिद्र्य, दुःख तो प्रभू दूर करतो. ह्या देहात असलेले सर्व दोष, असाध्य असे पंचविकार प्रभू परमात्मा क्षणात दूर करतो. ॥ २ ॥ ज्याप्रमाणे चंद्राला पाहून कमल विकसित होते, त्याप्रमाणे संतजनांना पाहून माझ्या मनात प्रभूविषयी प्रेम जागृत झाले. ज्याप्रमाणे आकाशात मेघ गोळा होऊन गर्जू लागले की मोर आनंदाने नाचू लागतात, त्याप्रमाणे प्रभुकृपेचे मेघ पाहून माझे मन आनंदाने नाचू लागले आहे. ॥ ३ ॥ माझ्या प्रभू परमात्म्याने माझ्या मनात अशी तीव्र इच्छा निर्माण केली आहे, की आता मी प्रभु मिलनाशिवाय जगूच शकत नाही. दास नानक सांगतात, प्रभूने माझ्या मनात प्रभुनामाची नशाच उत्पन्न केली आहे. हे प्रभो ! मला तुझ्याशी एकरूप करून घे. ॥ ४ ॥ २ ॥

॥ नट महला ४ ॥

मेरे मन जपि हरि हरि नामु सखे ॥
गुर परसादी हरि नामु धिआइओ हम सतिगुर चरन पखे ॥ १ ॥ रहाउ ॥
कृतम जगंनाथ जगदीसुर हम पापी सरनि रखे ॥
तुम वड पुरख दीन दुख भंजन हरि दीओ नामु मुखे ॥ १ ॥
हरि गुन ऊच नीच हम गाए गुर सतिगुर संगि सखे ॥
जिउ चंदन संगि बसै निंमु बिरखा गुन चंदन के बसखे ॥ २ ॥
हमरे अवगन बिखिआ बिखै के बहु बार बार निमखे ॥
अवगनिआरे पाथर भारे हरि तारे संगि जनखे ॥ ३ ॥
जिन कउ तुम हरि राखहु सुआमी सभ तिन के पाप क्रिखे ॥
जन नानक के दइआल प्रभ सुआमी तुम दुसट तारे हरणखे ॥ ४ ॥ ३ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७५)

शब्दार्थ : **सखे** – सखा, मित्र. **पखे** – धुणे. **दिओ** – दिले. **निंबु** – कडुलिंब. **बिरखा** – वृक्ष. **बसखे**– प्राप्त करतो. **बिखिआ** – विष. **बिखै** – विषयविकार. **निमखे** – . **जनखे** – सेवकांना. **क्रिखे** – दूर झाले, नष्ट झाले. **हरणखे** – हिरण्यकश्यपू.

भावार्थ : हे मना ! त्या हरिरूपी मित्राचे नामस्मरण कर. प्रभुनामाची आराधना कर. सतगुरुकृपेनेच हरीची आराधना प्राप्त होते म्हणून मी सतगुरूची चरणसेवा करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो जगन्नाथ, जगदीश्वर प्रभू सर्वोत्तम आहे. हे प्रभो ! मी पापी तुला शरण आलो आहे. माझे रक्षण कर. हे प्रभो ! तू महापुरुष आहेस. तू दीनांचे दुःख दूर

करतोस. हे प्रभो ! मला तुझ्या नामाचा उच्चार करण्याचे सामर्थ्य दे. ॥ १ ॥ मी संतसंगतीत राहून मला जमले तसे चांगल्या वा वाईट प्रकारे संतसंगतीने मला प्रभुभक्तीचा गुण प्राप्त झाला आहे. ॥ २ ॥ माझे सर्व अवगुण मायेच्या विषाने प्रेरित होते. मी वारंवार विषयविकारात लिप्त होत असे. मी अवगुणाने भरलेला एक मोठा दगडच होतो पण प्रभुसेवकांच्या संगतीने मी भवसागर तरून गेलो. ॥ ३ ॥ हे प्रभू ! तू ज्यांचे रक्षण करतोस त्यांचे पाप नष्ट करतोस. दास नानक सांगतात, तो स्वामी प्रभू परमात्मा दयाळू आहे. हे प्रभो ! तू हिरण्यकश्यपूसारख्या दुष्टांनाही तारलेस. ॥४॥३॥

॥ नट महला ४ ॥

मेरे मन जपि हरि हरि राम रंगे ॥
हरि हरि क्रिपा करी जगदीसुरि हरि धिआइओ जन पगि लगे ॥ १ ॥ रहाउ ॥
जनम जनम के भूल चूक हम अब आए प्रभ सरनगे ॥
तुम सरणागति प्रतिपालक सुआमी हम राखहु वड पापगे ॥ १ ॥
तुमरी संगति हरि को को न उधरिओ प्रभ कीए पतित पवगे ॥
गुन गावत छीपा दुसटारिओ प्रभि राखी पैज जनगे ॥ २ ॥
जो तुमरे गुर गावहि सुआमी हउ बलि बलि बलि तिनगे ॥
भवन भवन पवित्र सभि कीए जह धूरि परी जन पगे ॥ ३ ॥
तुमरे गुन प्रभ कहि न सकहि हम तुम वड वड पुरख वडगे ॥
जन नानक कउ दइआ प्रभ धारहु हम सेवह तुम जन पगे ॥ ४ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७६)

शब्दार्थ : **पगि** – चरण, पाय. **सरनगे** – शरण. **पवगे** – पावन. **छीपा** – नामदेव शिंपी. **भवन** – घर, स्थान, मंदिर. **धूरि**– धूळ.

भावार्थ : हे मना ! तू प्रभुप्रेमाच्या रंगात रंगून प्रभुनामाचे स्मरण कर. प्रभू परमात्म्याने माझ्यावर कृपा केली त्यामुळे मी प्रभुसेवकांच्या चरणी लीन होऊन प्रभू परमात्म्याचे ध्यान केले. ॥ १ ॥ रहाउ ॥ जन्मजन्मांतरापासून पथभ्रष्ट झालेला मी आता प्रभू परमात्म्यास शरण गेलो आहे. हे प्रभो ! तू शरणागताचे रक्षण करतोस अशी तुझी ख्याती आहे. माझे, ह्या महापाप्याचे रक्षण कर. ॥ १ ॥ हे प्रभो ! तुझ्या संगतीने कोण कोण हा भवसागर पार करून गेले नाहीत ? (सर्वच पार करून गेले.) प्रभो ! तू पतितांना पावन करतोस. प्रभूचे नामस्मरण करणाऱ्या नामदेवास दुष्ट म्हणून लोकांनी हेटाळले पण प्रभू परमात्म्याने आपल्या सेवकाची प्रतिष्ठा राखली. ॥ २ ॥ हे प्रभो ! जे तुझे गुण गातात त्यांच्यावर मी माझे प्राण ओवाळून टाकतो. जेथे जेथे प्रभुसेवकांच्या पायांची धूळ पडते ते प्रत्येक स्थान पवित्र होते. ॥ ३ ॥ हे प्रभो ! तू इतका महान आहेस, महापुरुष आहेस की मी तुझे गुण गाऊच शकत नाही. हे प्रभो ! ह्या तुझ्या सेवकावर नानकावर दया कर की ज्यामुळे मी तुझ्या सेवकांची चरणसेवा करू शकेन. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ नट महला ४ ॥

मेरे मन जपि हरि हरि नामु मने ॥
जगंनाथि किरपा प्रभि धारी मति गुरमति नाम बने ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि जन हरि जसु हरि हरि गाइओ उपदेसि गुरू गुर सुने ॥
किलबिख पाप नाम हरि काटे जिव खेत क्रिसानि लुने ॥ १ ॥
तुमरी उपमा तुमही प्रभ जानहु हम कहि न सकहि हरि गुने ॥
जैसे तुम तैसे प्रभ तुम ही गुन जानहु प्रभ अपुने ॥ २ ॥
माइआ फास बंध बहु बंधे हरि जपिओ खुल खुलने ॥
जिउ जल कुंचरु तदूऐ बांधिओ हरि चेतिओ मोख मुखने ॥ ३ ॥
सुआमी पारब्रहम परमेसरु तुम खोजहु जुग जुगने ॥
तुमरी थाह पाई नही पावै जन नानक के प्रभ वडने ॥ ४ ॥ ५ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९७६)

शब्दार्थ : **गुरमति** – गुरू उपदेश. **जसु** – यश. **लुनै** – कापतो. **निंदणी** – करतो. **फास** – पाश. **कुचरु**– हत्ती. **तदूऐ** – मगरीने. **मोख** – मुक्त. **खोजहू** – शोधतो. **थाह** – थांग, अंत. **वडने** – महान, बडा.

भावार्थ : हे माझ्या मना ! तू प्रभू परमात्म्यावर श्रद्धा ठेवून त्याचे स्मरण कर. जगन्नाथाने माझ्यावर कृपा केली. गुरूच्या उपदेशामुळे माझे मन प्रभुनामाकडे वळले. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरूचा उपदेश ऐकून प्रभुसेवकांनी प्रभू परमात्म्याचे यशोगान गायले. ज्याप्रमाणे शेतकरी शेतातील तण उपटून टाकतो, त्याप्रमाणे प्रभुनामाने पापाचा नायनाट होतो. ॥ १ ॥ हे प्रभो ! तुझा महिमा तूच जाणतोस. तुझे गुण गाण्याची माझ्यात क्षमता नाही. हे प्रभो ! तुझ्यासारखा तूच आहेस. तुझे गुण तूच जाणतोस. ॥ २ ॥ जीव मायेच्या बंधनात घट्टपणे जखडला गेला आहे. पण ज्याप्रमाणे गजेंद्राचा पाय मगरीने धरल्यावर त्याने प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करताच मगरीच्या जबड्यातून त्याची मुक्तता झाली, त्याप्रमाणे प्रभुनामाची आराधना केल्याने जीवाची मायेच्या बंधनातून मुक्तता होते. ॥ ३॥ हे परब्रह्म परमात्म्या ! मी युगानुयुगे तुझा शोध घेत आहे. दास नानक सांगतात, हे प्रभो ! तू इतका अथांग आहेस की कोणीही कितीही प्रयत्न केले तरी तुझा थांग लागत नाही. हे प्रभो ! तू खरोखर महान आहेस. ॥ ४ ॥ ५ ॥

॥ नट महला ४ ॥

मेरे मन कलि कीरति हरि प्रवणे ॥
हरि हरि दइआलि दइआ प्रभ धारी लगि सतिगुर हरि जपणे ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि तुम वड अगम अगोचर सुआमी सभि धिआवहि हरि रुड़णे ॥
जिन कउ तुम्हरे वड कटाख है ते गुरमुखि हरि सिमरणे ॥ १ ॥
इहु परपंचु कीआ प्रभ सुआमी सभु जगजीवनु जुगणे ॥
जिउ सललै सलल उठहि बहु लहरी मिलि सललै सलल समणे ॥ २ ॥

जो प्रभ कीआ सु तुम ही जानहु हम नह जाणी हरि गहणे ॥
हम बारिक कउ रिद उसतति धारहु हम करह प्रभू सिमरणे ॥ ३ ॥
तुम जलनिधि हरि मान सरोवर जो सेवै सभ फलणे ॥
जनु नानकु हरि हरि हरि हरि बांछै हरि देवहु करि क्रिपणे ॥ ४ ॥ ६ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९७६)

शब्दार्थ : **रुडणे** – सुंदर. **कटाख** – कटाक्ष, कृपाकटाक्ष. **जुगणे** – जोडलेले. **सलल** – पाणी. **समणे** – सामावून जाणे. **गहणे**– गहन. **बारिक** – बालक. **रिद** – हृदय. **फलणे** – सफल होते. **बांछै** – इच्छितो. **क्रिपणे** – कृपा कर.

भावार्थ : हे माझ्या मना ! कलियुगात प्रभू परमात्म्याची कीर्ती गाणे हेच स्वीकारार्ह आहे. त्या दयाळू प्रभूने तुझ्यावर आपल्या कृपेचे छत्र धारण केले आहे. तू सतगुरूच्या चरणी लागून प्रभुनामाचे स्मरण कर. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा अगम्य व अगोचर आहे. सर्वजण त्या सुंदर प्रभूचे ध्यान करतात. हे प्रभो ! ज्याच्यावर तू कृपाकटाक्ष टाकतो तो गुरूमार्गी होऊन प्रभू परमात्म्याचे स्मरण करतो. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्याने हा प्रपंच निर्माण केला. तो सर्वांना जीवन देतो व सर्व जीवांच्या अंतरात तोच वास करतो. ज्याप्रमाणे पाण्यावर पाण्याच्याच लाटा उठतात व अखेर पाण्यातच एकरूप होतात, त्याप्रमाणे हे जग प्रभू परमात्म्यापासून उत्पन्न झाले व अंती ते प्रभू परमात्म्यातच विलीन होते. ॥ २ ॥ हे प्रभो ! तू जे काही करतोस ते तूच जाणतोस. मी सामान्य जीव तुझी गहनता जाणू शकत नाही. हे प्रभो ! मी बालक आहे, अजाण आहे. तूच माझ्या हृदयात तुझ्याविषयी प्रेम उत्पन्न कर की ज्यामुळे हे प्रभू मी तुझे स्मरण करीन. ॥ ३ ॥ हे प्रभू ! तू विशाल जलनिधी मानसरोवर आहेस जो तुझी सेवा करतो त्याचे जीवन सफल होते. दास नानक तर सदैव प्रभुदर्शनाचीच इच्छा करतो. हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर व मला दर्शन दे.॥४॥६॥

नट नाराइन महला ४ पड़ताल

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरूकृपेने त्यास प्राप्त करता येते.

मेरे मन सेव सफल हरि घाल ॥ ले गुर पग रेन रवाल ॥
सभि दालिद भंजि दुख दाल ॥ हरि हो हो हो नदरि निहाल ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि का ग्रिहु हरि आपि सवारिओ हरि रंग रंग महल बेअंत लाल लाल हरि लाल ॥
हरि आपनी क्रिपा करी आपि ग्रिहि आइओ हम हरि की गुर कीई है
बसीठी हम हरि देखे भई निहाल निहाल निहाल निहाल ॥ १ ॥
हरि आवते की खबरि गुरि पाई मनि तनि आनदो आनंद भए
हरि आवते सुने मेरे लाल हरि लाल ॥

जनु नानकु हरि हरि मिले भए गलतान हाल निहाल निहाल ॥२॥१॥७॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७७)

शब्दार्थ : **घाल** – कर्म, परिश्रम. **दालिद** – दारिद्र्य, गरिबी. **भंजि** – नष्ट करणे. **दाल** – दूर करणे. **ग्रिहु** – घर. **सवारिओ** – संभाळतो. **बसीठी** – मध्यस्तता. **आवते** – येण्याची. **आनदो** – आनंद. **गलतान** – मग्न. **हाल** – गत, अवस्था.

भावार्थ : हे मना ! तू हरीची सेवा कर. त्याने तुझे परिश्रम सार्थकी लागतील. तू सतगुरूचे चरणरज प्राप्त कर. त्याने तुझे सारे दारिद्र्य दूर होईल. सर्व दु:ख नष्ट होईल. हे प्रभू परमात्मा माझ्यावर कृपा कर. त्याने मला प्रसन्नता लाभेल. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे माझे शरीर हे प्रभूचे घर आहे. त्याचा संभाळही तोच करतो. प्रभूने त्यात अनेक हिरे– माणके लपवून ठेवली आहेत. सतगुरूने माझ्या वतीने मध्यस्थी केल्याने प्रभूने माझ्यावर कृपा केली व त्याने माझ्या शरीरात वास केला. प्रभूला पाहून मला परमानंद झाला. ॥ १ ॥ प्रभू परमात्मा येत असल्याची वार्ता ऐकून माझ्या मनाला आनंदच आनंद झाला. दास नानक सांगतात, प्रभू परमात्म्याशी मिलन झाल्याने मी त्याच्या चिंतनात मग्न झालो व मी पूर्ण आनंदाची अवस्था प्राप्त केली. ॥ २ ॥ १ ॥ ७ ॥

॥ नट महला ४ ॥

मन मिलु संत संगति सुभवंती ॥ सुनि अकथ कथा सुखवंती ॥
सभ किलबिख पाप लहंती ॥ हरि हो हो हो लिखतु लिखंती ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि कीरति कलजुग विचि ऊतम मति गुरमति कथा भंजती ॥
जिनि जनि सुणी मनी है जिनि जनि तिसु जन कै हउ कुरबानंती ॥ १ ॥
हरि अकथ कथा का जिनि रसु चाखिआ तिसु जन सभ भूख लहंती ॥
नानक जन हरि कथा सुणि त्रिपते जपि हरि हरि हरि होवंती ॥ २ ॥ २ ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७७)

शब्दार्थ : **सुभवंती** – शुभ गुणांनी युक्त. **सुखवंती** – सुखदायक. **लहंती** – नाश करणारे. **लिखंती** – लिहिणारी, शुभभाग्य लिहिणारी. **भजंती** – भजन करणे, उच्चारणे, सांगणे. **चाखिआ**– चाखली. **त्रिपते** – तृप्त होणे.

भावार्थ : हे मना ! तू शोभादायक अशा संतसंगतीत जाऊन बस व तेथे प्रभू परमात्म्याची अवर्णनीय कथा ऐक. संतसंगतीत राहिल्याने सर्व पापांचा नाश होतो. पण ज्यांच्या भाग्यात तसे लिहिले असेल त्यासच ती प्राप्त होते. ॥ १ ॥ रहाउ ॥ कलियुगात सर्वांत उत्तम गोष्ट म्हणजे प्रभू परमात्म्याची कीर्ती गावी व सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभुकथा श्रवण करावी. ज्यांनी, ज्या प्रभुसेवकांनी प्रभुकथा श्रवण केली व त्याचे मनन केले त्यांचे चरणी मी माझे सर्वस्व वाहतो. ॥ १ ॥ ज्या प्रभुसेवकांनी अवर्णनीय अशा प्रभुकथेचा स्वाद उपभोगला, ज्या प्रभुसेवकांनी हरिकथा श्रवण केली, ते तृप्त होऊन हरीरूप झाले. ॥ २ ॥ २ ॥ ८ ॥

॥ नट महला ४ ॥

कोई आनि सुनावै हरि की हरि गाल ॥ तिस कउ हउ बलि बलि बाल ॥
सो हरि जनु है भल भाल ॥ हरि हो हो हो मेलि निहाल ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि का मारगु गुर संति बताइओ गुरि चाल दिखाई हरि चाल ॥
अंतरि कपटु चुकावहु मेरे गुर सिखहु निहकपट कमावहु
हरि की हरि घाल निहाल निहाल निहाल ॥ १ ॥
ते गुर के सिख मेरे हरि प्रभि भाए जिना हरि प्रभु जानिओ मेरा नालि ॥
जन नानक कउ मति हरि प्रभि दीनी देखि निकटि
हदूरि निहाल निहाल निहाल निहाल ॥ २ ॥ ३ ॥ ९ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७७)

शब्दार्थ : **आनि** – येऊन. **गाल** – वार्ता, कथा. **भल भाल** – चांगल्या भाग्याचा. **निहाल** – प्रसन्न. **चाल** – चाल, रीत, प्रथा. **चुकावह**– दूर कर. **निहकपट** – निष्कपट. **कमावहु** – प्राप्त करणे. **घाल** – परिश्रम, सेवा. **भाए** – आवडले. **जानिओ** – जाणले. **हदूरि** – प्रत्यक्ष.

भावार्थ : कोणीतरी येऊन मला हरिकथा ऐकवा हो. त्याच्यावर मी माझे सर्वस्व ओवाळून टाकेन. तोच प्रभू भक्त खरा भाग्यवंत होय. ॥ १ ॥ रहाउ ॥ कोणी संत सतगुरूच प्रभूप्राप्तीचा मार्ग दाखवू शकतो व त्या मार्गावर चालावयास शिकवतो. हे गुरूच्या शिष्यांनो ! आपल्या मनातील कपट काढून टाका व निष्कपट बुद्धीने सदाचरणाचा मार्ग स्वीकारा. हीच खरी प्रभुसेवा तुम्हास परमानंद प्राप्त करून देईल. ॥ १ ॥ ज्यांनी प्रभू परमात्म्यास जाणले आहे ज्यांना प्रभू परमात्मा सदैव आपल्या आसपासच आहे ह्याची प्रचिती प्राप्त झाली आहे, असे प्रभुभक्तच प्रभू परमात्म्यास आवडतात. दास नानकास प्रभू परमात्म्यानेच अशी बुद्धी दिली, की नानक प्रभू परमात्मा सदैव आपल्या जवळच आहे हे जाणतो व आनंद उपभोगतो. ॥ २ ॥ ३ ॥ ९ ॥

रागु नट नाराइन महला ५

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

राम हउ किआ जाना किआ भावै ॥ मनि पिआस बहुतु दरसावै ॥ १ ॥ रहाउ ॥
सोई गिआनी सोई जनु तेरा जिसु ऊपरि रुच आवै ॥
क्रिपा करहु जिसु पुरख बिधाते सो सदा तुधु धिआवै ॥ १ ॥
कवन जोग कवन गिआन धिआना कवन गुनी रीझावै ॥
साई जनु साई निज भगता जिसु ऊपरी रंगु लावै ॥ २ ॥
साई मती साई बुधि सिआनप जितु निमख न प्रभु बिसरावै ॥
संत संगि लगि एहु सुखु पाइओ हरि गुन सद ही गावै ॥ ३ ॥
देखिओ अचरजु महा मंगल रूप किछु आन नही द्रिसटावै ॥

कहु नानक मोरचा गुरि लाहिओ तह गरभ जोनि कह आवै ॥ ४ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७८)

शब्दार्थ : **दरसावे** – दर्शनाची. **रुच** – रुची, कृपा. **कवन** – कोण. **रिझावे** – प्रसन्न करणे, आनंदित करणे. **बिसरावै** – विस्मरण होणे. **मोरचा**– जंगल.

भावार्थ : हे प्रभो तुला काय आवडते ? काय केले असता तुला प्राप्त करता येईल हे मला काहीच माहिती नाही. माझ्या मनात तुझ्या दर्शनाची तीव्र ओढ लागली आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्याच्यावर तुझी कृपा होते तोच ज्ञानी, तोच तुझा सेवक होतो. हे विधात्या परमपुरुषा ! ज्याच्यावर तू कृपा करतोस तो सदासर्वदा तुझे ध्यान करतो. ॥ १ ॥ असा कुठला योगमार्ग, ध्यानमार्ग, ज्ञानमार्ग आहे, की ज्या मार्गाने जाऊन तुला प्रसन्न करून घेता येईल ? ज्याच्यावर तू प्रेम करतोस तेच सेवक तुझे भक्त बनतात. ॥ २ ॥ जी बुद्धी, जे शहाणपण जीवाला क्षणभरही प्रभूचे विस्मरण होऊ देत नाही तीच खरी बुद्धी, तेच खरे शहाणपण. संतांच्या संगतीत राहून सदैव प्रभूचे गुणगान केल्याने सुखाची प्राप्ती होते. ॥ ३ ॥ त्यामुळे त्या परम आश्चर्यकारक, महन्मंगल अशा प्रभू परमात्म्याचे दर्शन प्राप्त होते. मग त्यानंतर सर्वत्र त्या प्रभूशिवाय अन्य काहीच दिसत नाही. नानक सांगतात, जेव्हा सतगुरू स्वत: जीवास मोहमायेच्या, विषयविकाराच्या जंगलातून बाहेर काढतो, तेव्हा तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. ॥ ४ ॥ १ ॥

नट नाराइन महला ५ दुपदे

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

उलाहनो मै काहू न दीओ ॥ मन मीठ तुहारो कीओ ॥ १ ॥ रहाउ ॥
आगिआ मानि जानि सुखु पाइआ सुनि सुनि नामु तुहारो जीओ ॥
ईहां ऊहा हरि तुम ही तुम ही इहु गुर ते मंत्रु द्रिड़ीओ ॥ १ ॥
जब ते जानि पाई एह बाता तब कुसल खेम सभ थीओ ॥
साध संगि नानक परगासिओ आन नाही रे बीओ ॥ २ ॥ १ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७८)

शब्दार्थ : **उलाहना** – तक्रार. **मीठ** – गोड. **तुहारो** – तू. **किओ** – केलेस. **जानि** – जाणून. **जीओ**– जीवन जगलो. **ईहां** – इहलोकात. **ऊहा** – परलोकात. **मंत्रू** – मंत्र, उपदेश. **आन** – अन्य. **बीओ** – दुसरा.

भावार्थ : मी कधीच कोणाबद्दल तक्रार केली नाही. कोणाला दोष दिला नाही. तू जे करतोस ते मी सदैव गोड मानत आलो आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ तुझी आज्ञा शिरसावंद्य मानून, त्याप्रमाणे आचरण करून मी सुख प्राप्त केले आहे. तुझे नाम श्रवण करूनच मी माझे जीवन जगत आहे. इकडे, तिकडे सर्वत्र तू आणि तूच आहेस. तुझ्याशिवाय दुसरा अन्य कोणीही नाही. सतगुरूने हा मंत्र माझ्या मनात दृढ केला. ॥ १ ॥ ही गोष्ट जेव्हा मला समजली, तेव्हापासूनच माझे सर्व क्षेमकुशल आहे. नानक सांगतात, साधुसंतांच्या संगतीतच प्रभू परमात्मा अंत:करणात

प्रगट होतो. ह्या साऱ्या सृष्टीत प्रभूशिवाय अन्य दुसरा कोणीही नाही. सारे काही प्रभुमयच आहे.॥२॥१॥२॥

॥ नट महला ५ ॥

जा कउ भई तुमारी धीर ॥
जम की त्रास मिटी सुखु पाइआ निकसी हउमै पीर ॥ १ ॥ रहाउ ॥
तपति बुझानी अंम्रित बानी त्रिपते जिउ बारिक खीर ॥
मात पिता साजन संत मेरे संत सहाई बीर ॥ १ ॥
खुले भ्रम भीति मिले गोपाला हीरै बेधे हीर ॥
बिसम भए नानक जसु गावत ठाकुर गुनी गहीर ॥ २ ॥ २ ॥ ३ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९७८)

शब्दार्थ : **जा** – ज्याला. **धीर** – आधार, आश्रय. **निकसी** – निघून गेली. **पीर** – पीडा. **तपति** – ताप, आग. **जिउ**– ज्याप्रमाणे. **खीर** – दूध. **बीर** – बंधू.

भावार्थ : हे प्रभो ! ज्याला तुझा आश्रय लाभला त्याची यमाची भीती नष्ट झाली. अहंकाराची पीडा दूर झाली व त्यास सुख प्राप्त झाले. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनामरूपी अमृतवाणीने त्याच्या मनातील विषयविकाराचा अग्नी शांत झाला. ज्याप्रमाणे बालक दुधाने तृप्त होते, त्याप्रमाणे प्रभुनामाने जीव तृप्त होतो. साधुसंत हेच माझे माता, पिता, बंधू सारे काही आहेत. ॥ १ ॥ प्रभू प्राप्त झाल्याने माझ्या मनातील मायेच्या भ्रमाची कवाडे उघडली. ज्याप्रमाणे हिऱ्यानेच हिरा फोडता येतो त्याप्रमाणे माझे कठोर हृदय प्रभुनामानेच विद्ध झाले. नानक सांगतात, गुणगंभीर प्रभू परमात्म्याचे गुण गाऊन मी विस्मयित झालो. ॥ २ ॥ २ ॥ ३ ॥

॥ नट महला ५ ॥

अपना जनु आपहि आपि उधारिओ ॥
आठ पहर जन कै संगि बसिओ मन ते नाहि बिसारिओ ॥ १ ॥ रहाउ ॥
बरनु चिहनु नाही किछु पेखिओ दास का कुलु न बिचारिओ ॥
करि किरपा नामु हरि दीओ सहजि सुभाइ सवारिओ ॥ १ ॥
महा बिखमु अगनि का सागरु तिस ते पारि उतारिओ ॥
पेखि पेखि नानक बिगसानो पुनह पुनह बलिहारिओ ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७९)

शब्दार्थ : **बरनु** – वर्ण. **चिहनु** – चिन्ह, खूण. **बिचारिओ** – विचार केला. **सवारिओ** – सावरले, संभाळले. **बिखमु** – कठीण. **बिगसानो** – विकसित झाला, प्रसन्न झाला.

भावार्थ : हे प्रभो ! तुझ्या सेवकाचा तूच उद्धार करतोस. तुझा सेवक अष्टौप्रहर साधुसंतांच्या संगतीत राहतो व प्रभूही त्यास कधी आपला विसर पडू देत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूने आपल्या सेवकाचा वर्ण, जात काहीही पाहिले नाही. त्याच्या कुलाचाही कधी विचार केला नाही. त्यांच्यावर कृपा करून त्यांना नाम प्रदान केले व

सहजभावाने त्यांचा संभाळ केला. ॥ १ ॥ ह्या संसाररूपी महाकठीण अशा विषयविकाराच्या सागरातून त्यांना पार केले. अशा ह्या प्रभू परमात्म्याच्या दर्शनाने नानकाचे मन प्रफुल्लित झाले. नानक त्या प्रभुचरणी आपले सर्वस्व अर्पण करतो. ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥

॥ नट महला ५ ॥

हरि हरि मन महि नामु कहिओ ॥
कोटि अप्राध मिटहि खिन भीतरि ता का दुखु न रहिओ ॥ १ ॥ रहाउ ॥
खोजत खोजत भइओ बैरागी साधू संगि लहिओ ॥
सगल तिआगि एक लिव लागी हरि हरि चरन गहिओ ॥ १ ॥
कहत मुकत सुनते निसतारे जो जो सरनि पइओ ॥
सिमरि सिमरि सुआमी प्रभु अपुना कहु नानक अनद भइओ ॥ २ ॥ ४ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७९)

शब्दार्थ : **महि** – मध्ये. **लहिओ** – प्राप्त झाला, लाभला, सापडला. **गहिओ** – ग्रहण केले, धरले.

भावार्थ : हे जीवा ! मनामध्ये प्रभूचे नाम उच्चारल्याने क्षणभरातच कोटी कोटी अपराध नष्ट होतात. नंतर मनात कोणतेही दुःख शिल्लकच उरत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी प्रभू परमात्म्यास शोधता शोधता बेजार झालो. अखेर मला तो साधुसंतांच्या संगतीत प्राप्त झाला. मग मी हरीचे चरण धरले व इतर सर्व गोष्टींचा त्याग करून प्रभुनामात तल्लीन झालो. ॥ १ ॥ जो प्रभूस शरण जाऊन प्रभुनामाचा उच्चार करतो तो मुक्त होतो. जो प्रभुनामाचे श्रवण करतो, तो भवसागर तरून जातो. नानक सांगतात, मी आपल्या प्रभूचे सतत स्मरण करून आनंदित झालो. ॥ २ ॥ ४ ॥ ५ ॥

॥ नट महला ५ ॥

चरन कमल संगि लागी डोरी ॥ सुख सागर करि परम गति मोरी ॥ १ ॥ रहाउ ॥
अंचला गहाइओ जन अपुने कउ मनु बीधो प्रेम की खोरी ॥
जसु गावत भगति रसु उपजिओ माइआ की जाली तोरी ॥ १ ॥
पूरन पूरि रहे किरपा निधि आन न पेखउ होरी ॥
नानक मेलि लीओ दासु अपुना प्रीति न कबहू थोरी ॥ २ ॥ ५ ॥ ६ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७९)

शब्दार्थ : **डोरी** – एकतानता. **मोरी** – माझी. **अंचला** – पदर. **गहाइओ** – धरावयास लावला. **बिधो** – विद्ध केले. **खोरी** – नशेने. **तोरी** – तोडली.

भावार्थ : मी माझे मन प्रभूच्या चरणकमलाशी एकरूप केले. त्या सुखसागर प्रभू परमात्म्याने मला परमगती (मुक्ती) प्रदान केली. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्या प्रभूने आपल्या सेवकांना आपल्या पदरात घेतले व त्यांची मने प्रेमाच्या

नशेने आपल्याशी बांधून टाकली. प्रभू परमात्म्याचे यशोगान गायल्याने मनात भक्तिप्रेम उत्पन्न होते व मायेचे जाळे तुटते. ॥ १ ॥ तो कृपानिधी प्रभू परमात्मा पूर्णपणे सर्वत्र भरून राहिला आहे. आता मी अन्यत्र कोणा दुसऱ्याकडे पाहतही नाही. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याने आपल्या सेवकांना आपल्याशी एकरूप केले. आता प्रभुप्रेम कधीही कमी होत नाही. ॥ २ ॥ ५ ॥ ६ ॥

॥ नट महला ५ ॥

मेरे मन जपु जपि हरि नाराइण ॥
कबहू न बिसरहु मन मेरे ते आठ पहर गुन गाइण ॥ १ ॥ रहाउ ॥
साधू धूरि करउ नित मजनु सभ किलबिख पाप गवाइण ॥
पूरन पूरि रहे किरपा निधि घटि घटि दिसटि समाइणु ॥ १ ॥
जाप ताप कोटि लख पूजा हरि सिमरण तुलि न लाइण ॥
दुइ कर जोड़ि नानकु दानु मांगै तेरे दासनि दास दसाइणु ॥ २ ॥ ६ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७९)

शब्दार्थ : **धूरि** – चरणधूळ. **तुलि** – तुलना.

भावार्थ : माझ्या मना ! तू प्रभू परमात्म्याचा जप कर. हे माझ्या मना ! तू कधीही प्रभू परमात्म्यास विसरू नकोस. अष्टौप्रहर त्याचे गुणगान कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ तू सदैव साधुसंतांच्या चरणधुळीने स्नान कर. त्यामुळे मनातील सर्व किल्मिष, पाप नष्ट होईल. तो कृपानिधी प्रभू परमात्मा पूर्णपणे सर्वत्र व्याप्त आहे व तो प्रत्येक जीवामध्ये सामावलेला दिसतो. ॥ १ ॥ लाखो वेळा जप केला, लाखो वेळा तप केले, लक्ष लक्ष वेळा पूजा केली, तरी नामस्मरणाची सर त्या कशासही येणार नाही. नानक प्रभुचरणी एकच दान मागतो, की हे प्रभो ! मला तुझ्या दासांच्या दासांचा दास बनव. ॥ २ ॥ ६ ॥ ७ ॥

॥ नट महला ५ ॥

मेरै सरबसु नामु निधानु ॥
करि किरपा साधू संगि मिलिओ सतिगुरि दीनो दानु ॥ १ ॥ रहाउ ॥
सुखदाता दुख भंजनहारा गाउ कीरतनु पूरन गिआनु ॥
कामु क्रोधु लोभु खंड खंड कीन्हे बिनसिओ मूड़ अभिमानु ॥ १ ॥
किआ गुण तेरे आखि वखाणा प्रभ अंतरजामी जानु ॥
चरन कमल सरनि सुख सागर नानकु सद कुरबानु ॥ २ ॥ ७ ॥ ८ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९७९)

शब्दार्थ : **सरबसु** – सर्वस्व. **कीन्हे** – केली. **बिनसिआ** – नष्ट केला. **आखी** – उच्चारण करून. **वखाणा** – वर्णन करणे. **जानु** – जाण.

भावार्थ : प्रभुनामरूपी संपत्ती हेच माझे सर्वस्व आहे. प्रभूने कृपा केली व मला साधुसंतांच्या संगतीत हे नामधन प्राप्त झाले. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो प्रभु सुख प्रदान करतो. दु:खाचा नाश करतो. अशा ह्या पूर्णज्ञानी प्रभू परमात्म्याच्या कीर्तीचे गायन करावे. त्याचे गुणगान गायल्याने मनातील कामक्रोध आदी विकारांचे तुकडे तुकडे झाले व मूर्ख अभिमान नष्ट झाला. ॥ १ ॥ हे अंतर्ज्ञानी, सर्वज्ञ प्रभू ! मी तुझे वर्णन कोणत्या शब्दात करू ? हे सुखसागर प्रभू हा नानक तुझ्या चरणकमली शरण येऊन तुझ्या पायी सर्वस्व समर्पण करत आहे.॥२॥७॥८॥

॥ नट महला ५ ॥

हउ वारि वारि जाउ गुर गोपाल ॥ १ ॥ रहाउ ॥
मोहि निरगुन तुम पूरन दाते दीनानाथ दइआल ॥ १ ॥
ऊठत बैठत सोवत जागत जीअ प्रान धन माल ॥ २ ॥
दरसन पिआस बहुतु मनि मेरै नानक दरस निहाल ॥ ३ ॥ ८ ॥ ९ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९८०)

शब्दार्थ : **वारि वारि** – वारंवार. **मोहि** – मला. **निरगुन** – गुणहीन.

भावार्थ : हे गुरू, हे गोपाल ! मी वारंवार तुझ्यावर माझे बलिदान करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभो ! मी गुणहीन आहे. तू परिपूर्ण आहेस. महान दाता आहेस. दीनांचा संभाळकर्ता आहेस. दयाळू आहेस. ॥ १ ॥ हे प्रभो ! उठता-बसता, झोपेत- जागृतावस्थेत तूच माझे सर्वस्व आहेस. माझे जीवन, माझे प्राण, धन सारे काही तूच आहेस. नानक म्हणतात, हे प्रभो ! मला तुझ्या दर्शनाची तीव्र ओढ लागली आहे. हे प्रभो ! मला तुझ्या दर्शनाचा लाभ देऊन आनंदित कर.

नट पड़ताल महला ५

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥
ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

कोऊ है मेरो साजनु मीतु ॥ हरि नामु सुनावै नीत ॥
बिनसै दुखु बिपरीति ॥ सभु अरपउ मनु तनु चीतु ॥ १ ॥ रहाउ ॥
कोई विरला आपन कीत ॥ संगि चरन कमल मनु सीत ॥
करि किरपा हरि जसु दीत ॥ १ ॥
हरि भजि जनमु पदारथु जीत ॥ कोटि पतित होहि पुनीत ॥
नानक दास बलि बलि कीत ॥ २ ॥ १ ॥ १० ॥ १९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८०)

शब्दार्थ : **कोऊ** – कोणी. **साजणु** – सज्जन, सजणा. **मीतु** – मित्र. **बिनसै** – नष्ट होते. **बिपरीति** – विपरीत. **चीतु** – चित्त. **कीत** – केले. **सीत** – शिवणे.

भावार्थ : कोणी माझा सज्जन मित्र मला सदैव प्रभूनाम ऐकवील काय ? त्यामुळे माझ्या विपरीत करणीमुळे

प्राप्त झालेले दु:ख नष्ट होईल. अशा सज्जन मित्रास मी माझे तन, मन, चित्त सर्व काही अर्पण करीन. ॥ १ ॥ रहाउ ॥ असा कोणी विरळाच जीव असतो की ज्याने आपणास प्रभुचरणाशी शिवून टाकले आहे. प्रभू परमात्म्याच्या चरणकमली एकरूप करून टाकले आहे. ॥ १ ॥ हरिभजन केल्यानेच मानवी जीवनाचे सार्थक होते. हरिभजनाने कोटी कोटी पतित लोक पवित्र होतात. नानक तर त्या प्रभू परमात्म्याचा दास होऊन वारंवार त्याने स्वत:स प्रभुचरणी समर्पित केले आहे. ॥ २ ॥ १ ॥ १० ॥ १९ ॥

नट असटपदीआ महला ४

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥
ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

राम मेरे मनि तनि नामु अधारे ॥
खिनु पलु रहि न सकउ बिनु सेवा मै गुरमति नामु सम्हारे ॥ १ ॥ रहाउ ॥
हरि हरि हरि हरि हरि मनि धिआवहु मै हरि हरि नामु पिआरे ॥
दीन दइआल भए प्रभ ठाकुर गुर कै सबदि सवारे ॥ १ ॥
मधसूदन जगजीवन माधो मेरे ठाकुर अगम अपारे ॥
इक बिनउ बेनती करउ गुर आगै मै साधू चरन पखारे ॥ २ ॥
सहस नेत्र नेत्र है प्रभ कउ प्रभु एको पुरखु निरारे ॥
सहस मूरति एको प्रभु ठाकुर प्रभु एको गुरमति तारे ॥ ३ ॥
गुरमति नामु दमोदरु पाइआ हरि हरि नामु उरि धारे ॥
हरि हरि कथा बनी अति मीठी जिउ गूंगा गटक सम्हारे ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८०)

शब्दार्थ : **सम्हारे**- स्मरण करतो. **सवारे** – सावरतो, संभाळ करतो. **माधो** – माधक. **पखारे** – प्रक्षालन करणे, धुणे. **निरारे** – निराळा. **सहस** – सहस्र, हजारो. **भूंगा** – मुका.

भावार्थ : हे राम ! प्रभूनाम हेच माझ्या तन, मनाचा आधार आहे. सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे मी सदैव तुझ्या नामाचे स्मरण करतो. तुझ्या सेवेशिवाय मी क्षणभरही राहू शकत नाही. ॥ १ ॥ रहाउ ॥ मला प्रभुनामच प्रिय आहे. मी मनात सदैव प्रभुनामाचे ध्यान करतो. त्या दीनदयाळ प्रभू परमात्म्याने माझ्यावर कृपा केली व गुरूच्या उपदेशाने मला सावरले. ॥ १ ॥ माझा ईश्वर, मधुसूदन जगजीवन परमेश्वर अगम्य अपार आहे. मी प्रभुचरणी विनयपूर्वक विनंती करतो, की हे प्रभो ! मला साधुसंतांची चरणसेवा लाभू दे. ॥ २ ॥ प्रभू परमात्मा हा एकमेव निराळा पुरुष आहे. त्यास हजारो नेत्र आहेत. त्या प्रभू परमात्म्याची हजारो रूपे आहेत व तोच गुरूच्या उपदेशाद्वारे जीवांचा उद्धार करतो. ॥ ३ ॥ गुरूच्या उपदेशाप्रमाणे मला प्रभुनाम प्राप्त झाले. ते प्रभुनाम आता मी हृदयात धारण केले आहे. आता मला प्रभू अत्यंत गोड वाटतो. ज्या प्रमाणे माणूस गोड वस्तूचा आनंद उपभोगतो पण त्याचे वर्णन तो करू शकत नाही, त्याप्रमाणेच मीही प्रभुनामाचा आनंद उपभोगतो पण तो आनंद व्यक्त करणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे. ॥ ४ ॥

रसना साद चखै भाइ दूजै अति फीके लोभ बिकारे ॥
जो गुरमुखि साद चखहि राम नामा सभ अनरस साद बिसारे ॥ ५ ॥
गुरमति राम नामु धनु पाइआ सुणि कहतिआ पाप निवारे ॥
धरमराइ जमु नेड़ि न आवै मेरे ठाकुर के जन पिआरे ॥ ६ ॥
सास सास सास है जेते मै गुरमति नामु सम्हारे ॥
सासु सासु जाइ नामै बिनु सो बिरथा सासु बिकारे ॥ ७ ॥
क्रिपा क्रिपा करि दीन प्रभ सरनी मोकउ हरि जन मेलि पिआरे ॥
नानक दासनि दासु कहतु है हम दासन के पनिहारे ॥ ८ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८०)

शब्दार्थ : **साद**- स्वाद. **चखै** - चाखते. **अनरस** - अन्य रस. **बिसारे** - विसरतात. **कहतिआ** - कथन करून. **सास** - श्वास. **जेते** - जितके. **सम्हारे** - स्मरण करणे. **पनिहारे** - पाणक्या.

भावार्थ : जीव द्वैतभावामुळे अन्य रसांचा आस्वाद घेतो पण ते फिके असतात व मनात अन्य विकार उत्पन्न करतात. पण जेव्हा जीव सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून रामनामाचा स्वाद घेतो तेव्हा त्यास अन्य सारे रस तुच्छ वाटू लागतात. ॥ ५ ॥ सतगुरूच्या उपदेशाने रामनाम धन मला प्राप्त झाले आहे. त्या प्रभुनामाच्या उच्चाराने व श्रवणाने सर्व पाप नष्ट होते. माझ्या ठाकुरास जे भक्तजन प्रिय होतात, त्याच्या आसपासही धर्मराज (यम) फिरकत नाहीत. ॥ ६ ॥ माझे जितके म्हणून श्वास-प्रश्वास आहेत त्या प्रत्येक श्वासागणिक मी गुरू उपदेशाने प्राप्त झालेल्या प्रभुनामाचे स्मरण करतो. जो श्वास प्रभुनामाशिवाय जातो तो निष्फळ व व्यर्थ जातो. ॥ ७ ॥ हे कृपाळू प्रभू ! माझ्यावर कृपा कर. मला प्रभुसेवकांची भेट घडव. दासानुदास नानक सांगतात, की हे प्रभो ! मी दासानुदासांच्या दासांचा पाणक्या आहे. ॥ ८ ॥ १ ॥

॥ नट महला ४ ॥

राम हम पाथर निरगुनीआरे ॥
क्रिपा क्रिपा करि गुरू मिलाए हम पाहन सबदि गुर तारे ॥ १ ॥ रहाउ ॥
सतिगुर नामु द्रिड़ाए अति मीठा मैलागरु मलगारे ॥
नामै सुरति वजी है दह दिसि हरि मुसकी मुसक गंधारे ॥ १ ॥
तेरी निरगुण कथा कथा है मीठी गुरि नीके बचन समारे ॥
गावत गावत हरि गुन गाए गुन गावत गुरि निसतारे ॥ २ ॥
बिबेकु गुरू गुरू समदरसी तिसु मिलीऐ संक उतारे ॥
सतिगुर मिलिऐ परम पदु पाइआ हउ सतिगुर कै बलिहारे ॥ ३ ॥
पाखंड पाखंड करि करि भरमे लोभु पाखंडु जगि बुरिआरे ॥
हलति पलति दुखदाई होवहि जम कालु खड़ा सिरि मारे ॥ ४ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९८१)

शब्दार्थ : **पाथर** - पत्थर, दगड, कठोरहृदयी. **मैलागरु** - अत्यंत सुवासिक चंदन, मलयगिरीवरील चंदन.

वजी - पसरली. **मुसकी** - सुगंध. **निके** - सुंदर. **संक** - शंका. **बुरिआरे** - वाईटपणाचे आगर.

भावार्थ : हे प्रभो ! मी तर गुणविहीन पत्थर आहे. जेव्हा तुझ्या कृपेने मला गुरू प्राप्त झाला, तेव्हा गुरूच्या उपदेशाने मी पाषाण असूनही भवसागर तरून गेलो. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरूने माझ्या मनात प्रभुनाम दृढ केले. जे अत्यंत मधुर व मलयगिरीच्या चंदनाहून अधिक सुगंधित आहे. प्रभुनामामुळे माझी मती दशदिशात पसरली. मला सारे ज्ञान प्राप्त झाले आहे व त्याचा चंदनी सुगंध सर्वत्र दरवळला. ॥ १ ॥ हे गुणातीत प्रभो ! तुझी कथा अत्यंत मधुर आहे. गुरूच्या सुंदर वचनांनी मी ती माझ्या हृदयात संभाळून ठेवली आहे. ती कथा गाता गाता मी त्यातून प्रभूचे गुणगान गायले. प्रभुरूपी गुरूने माझा उद्धार केला. ॥ २ ॥ गुरू हा विवेकी असतो. समदर्शी असतो. त्याच्या भेटीने मनातील सर्व शंकांचे निरसन होते. सतगुरू प्राप्त झाल्यामुळे मला त्याच्या मार्गदर्शनाने परमपद प्राप्त झाले. अशा ह्या सतगुरूवर मी माझे सर्वस्व अर्पण करतो. ॥ ३ ॥ सर्व लोक पाखंड करतात. सर्व जगच पाखंड करून लोभात बुडून गेले आहे. त्यामुळे त्यांना इहलोकात व परलोकात दुःख भोगावे लागते व शेवटी यमाकडून मृत्युदंड सोसावा लागतो. ॥ ४ ॥

उगवै दिनसु आलु जालु सम्हालै बिखु माइआ के बिसथारे ॥
आई रैनि भइआ सुपनंतरु बिखु सुपनै भी दुख सारे ॥ ५ ॥
कलरु खेतु लै कूडु जमाइआ सभ कूड़ै के खलवारे ॥
साकत नर सभि भूख भुखाने दरि ठाढे जम जंदारे ॥ ६ ॥
मनमुख करजु चड़िआ बिखु भारी उतरै सबदु वीचारे ॥
जितने करज करज के मंगीए करि सेवक पगि लगि वारे ॥ ७ ॥
जगंनाथ सभि जंत्र उपाए नकि खीनी सभ नथहारे ॥
नानक प्रभु खिंचै तिव चलीऐ जिउ भावै राम पिआरे ॥ ८ ॥ २ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९८१)

शब्दार्थ : **दिनसु** - दिवस. **आलु** - घर. **जालु** - कामधंदा. **बिखु** - विष. **बिसथारे** - विस्तार, पसारा. **सुपनतरु** - स्वप्नात. **कलरु** - ओसाड. **जमाइआ** - पेरले, जमवले. **खलवारे** - खळे. **साकत** - शाक्त. **ठाढे** - उभे राहतात. **जंत्र** - जंतू. **नाके** - नाक. **खीनी** - . **खिंचै** - खेचतो.

भावार्थ : दिवस उगवला की माणूस घरच्या आणि बाहेरच्या उद्योगात रममाण होऊन जातो व विषारी मायेचा अधिकच पसारा वाढवतो. रात्रीही स्वप्नातही मायेच्याच दुःखात चूर होतो. ॥ ५ ॥ शरीररूपी उजाड भूमीत असत्याचे बीज पेरले की त्याला असत्याचेच पीक येणार. स्वेच्छाचारी जीव सदैव विकारांच्या भुकेने वखवखलेले असतात. त्यामुळे ते यमाच्या दारात उभे राहतात. ॥ ६ ॥ स्वेच्छाचारी जीवावर मोहमायेचे विकाररूपी कर्ज वाढतच राहते. पण प्रभुनामाच्या चिंतनाने ते उतरते. जेवढे म्हणून कर्ज आहे आणि कर्जाची फेड मागणारे आहेत त्या सर्वांना प्रभूने आपले सेवक बनवले आहे. ॥ ७ ॥ त्या जगन्नाथाने, त्या प्रभू परमात्म्याने, सर्व जीव उत्पन्न केले व सर्वांच्या नाकात वेसण घालून त्यांना आपल्या ताब्यात ठेवले आहे. नानक सांगतात, तो प्रभू वेसण खेचून जिकडे वळवतो तिकडे प्रभूच्या इच्छेनुरूप जीवास चालावे लागते. ॥ ८ ॥ २ ॥

॥ नट महला ४ ॥

राम हरि अंम्रित सरि नावारे ॥
सतिगुरि गिआनु मजनु है नीको मिलि कलमल पाप उतारे ॥ १ ॥ रहाउ ॥
संगति का गुनु बहुतु अधिकाई पड़ि सूआ गनक उधारे ॥
परस नपरस भए कुबिजा कउ लै बैकुंठि सिधारे ॥ १ ॥
अजामल प्रीति पुत्र प्रति कीनी करि नाराइण बोलारे ॥
मेरे ठाकुर कै मनि भाइ भावनी जम कंकर मारि बिदारे ॥ २ ॥
मानुखु कथै कथि लोक सुनावै जो बोलै सो न बीचारे ॥
सतसंगति मिलै त दिड़ता आवै हरि राम नामि निसतारे ॥ ३ ॥
जब लगु जीउ पिंडु है साबतु तब लगि किछुन समारे ॥
जब घर मंदरि आगि लगानी कढि कूपु कढै पनिहारे ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८१)

शब्दार्थ : नावा – स्नान करणें. मजनु – स्नान करणे. नीको – . कलमल – पाप. पडि – पढवणे. सूआ – पोपट. गनक – गणिका, वेश्या. परस – स्पर्श. नपरस – अस्पृश्य. बोलारे – बोलला. भाइ – . भावनी – . बिदारे – फाडले. दिडता – दृढता. साबतु – शाबूत. आगि – आग. लगानी – लागली. पनीहारे – पाणक्या.

भावार्थ : प्रभू परमात्म्याने मला नामरूपी सरोवरात स्नान घातले. सतगुरूने ज्ञानाचे पवित्र स्नान घातले. त्यामुळे माझे पाप नष्ट झाले. ॥ १ ॥ रहाउ ॥ संगतीचे फार महत्त्व आहे. गणिकेच्या संगतीत राहणारा पोपटही रामनामाचा उच्चार केल्याने मुक्त झाला. श्रीकृष्णाच्या स्पर्शाने अस्पृश्य कुब्जेने वैकुंठ प्राप्त केला. ॥ १ ॥ अजामिळ राजा ईश्वरद्वेष्टा होता पण आपल्या पुत्राच्या नारायणाच्या नामोच्चाराने तो प्रभूस प्रिय झाला व त्याने यमदूतांना हकलून लावले व अजामिळ अमर झाला. ॥ २ ॥ माणूस बोलतो, बोलून लोकांना ऐकवतो पण स्वत: जे बोलतो त्याचा विचार मात्र करत नाही. संतांच्या संगतीत राहिल्याने मनास दृढता येते व प्रभुनामाने त्याचा उद्धार होतो.॥३॥ माणसाचे शरीर व प्राण जोपर्यंत चांगले आहेत, तोपर्यंत त्यास प्रभू परमात्म्याचे स्मरणही होत नाही. पण जेव्हा घररूपी मंदिरास आग लागते, तेव्हा तो विहीर खोदू लागतो. (भाव :– शरीर जर्जर झाल्यावर जीवास प्रभूचे स्मरण होते.) ॥ ४ ॥

साकत सिउ मन मेलु न करीअहु जिनि हरि हरि नामु बिसारे ॥
साकत बचन बिछूआ जिउ डसीऐ तजि साकत परै परारे ॥ ५ ॥
लगि लगि प्रीति बहु प्रीति लगाई लगि साधू संगि सवारे ॥
गुर के बचन सति सति करि माने मेरे ठाकुर बहुतु पिआरे ॥ ६ ॥
पूरबि जनमि परचून कमाए हरि हरि हरि नामि पिआरे ॥
गुरप्रसादि अंम्रित रसु पाइआ रसु गावै रसु वीचारे ॥ ७ ॥

हरि हरि रूप रंग सभि तेरे मेरे लालन लाल गुलारे ॥
जैसा रंगु देहि सो होवै किआ नानक जंत विचारे ॥ ८ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८१)

शब्दार्थ : साकत – शाक्त. सिउ – बरोबर. मेलु – मिलन. बिसारे – विसरले. बिछुआ – विंचू. परचून – संचित. गुलाले – गुलालासारखा लाल.

भावार्थ : हे जीवा ! शाक्तांशी मैत्री करू नकोस कारण ते हरिनाम विसरले आहेत. शाक्तांचे विचार इतके वाईट असतात की ते ऐकून विंचू चावल्याच्या वेदना होतात . म्हणून शाक्तांचा त्याग करून त्यांना स्वत:पासून दूर दूर ठेव. ॥ ५ ॥ हे जीवा ! तुझ्या मनात संसाराविषयी प्रीती उत्पन्न झाली आहे पण जर तू साधुसंतांची संगत धरशील तर तुझा उद्धार होईल. सतगुरूचे वचन हे सत्य आहे असे मान. असा जीव प्रभू परमात्म्यास प्रिय होतो.॥६॥ माझ्या पूर्वकर्माच्या आधारे मला प्रिय हरिनाम प्राप्त झाले. सतगुरुकृपेने मी नामामृत प्राशन केले. आता मी सदैव प्रभुनामच गातो. सदैव प्रभुनामाचेच चिंतन करतो. ॥ ७ ॥ हे प्रभू ! हे रूप, रंग सारे काही तुझेच आहे. प्रभुप्रेमाचा लाल रंग गुलालासारखा लाल आहे. हे प्रभो ! तू जीवाला जसा रंग देतोस तसा रंग त्यास प्राप्त होतो. नानक म्हणतात, बिचाऱ्या जीवाच्या हाती काही नाही. ॥ ८ ॥ ३ ॥

॥ नट महला ४ ॥

राम गुर सरनि प्रभू रखवारे ॥
जिउ कुंचरु तदूऐ पकरि चलाइओ करि उपरु कढि निसतारे ॥ १ ॥ रहाउ ॥
प्रभ के सेवक बहुतु अति नीके मनि सरधा करि हरि धारे ॥
मेरे प्रभि सरधा भगति मनि भावै जन की पैज सवारे ॥ १ ॥
हरि हरि सेवकु सेवा लागै सभु देखै ब्रहम पसारे ॥
एकु पुरखु इकु नदरी आवै सभ एका नदरि निहारे ॥ २ ॥
हरि प्रभु ठाकुरु रविआ सभ ठाई सभु चेरी जगतु समारे ॥
आपि दइआलु दइआ दानु देवै विचि पाथर कीरे कारे ॥ ३ ॥
अंतरि वासु बहुतु मुसकाई भ्रमि भूला मिरगु सिंङ्हारे ॥
बनु बनु ढूढि ढूढि फिरि थाकी गुरि पूरै घरि निसतारे ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८२)

शब्दार्थ : कुंचर – हत्ती. तदूऐ – मगर. करि – सोंड. निके – चांगले. सरधा – श्रद्धा. नदरी – दिसतो. रविआ – व्याप्त. चेरी – दासी. समारे – संभाळतो. वासु – सुगंध. मुसकाई – दरवळ. सिंङ्हारे – हुंगत फिरतो. ढूढि – शोधणे.

भावार्थ : जो प्रभुरूपी गुरूस शरण जातो त्याचे प्रभू रक्षण करतो. ज्याप्रमाणे सुसरीने पकडलेल्या गजेंद्रास प्रभूने मुक्त केले त्याप्रमाणे प्रभू आपल्या सेवकांचे रक्षण करतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूचे सेवक चांगले असतात. त्यांच्या मनात प्रभू परमात्म्याविषयी दृढ श्रद्धा असते. माझ्या प्रभू परमात्म्यास असे श्रद्धायुक्त अंत:करणाचे भक्तच

आवडतात. तो त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करतो. ॥ १ ॥ जे प्रभुसेवक प्रभुसेवेत तल्लीन होतात त्यांना सर्वत्र तो परब्रह्म परमात्माच पसरलेला दिसतो. त्याला सर्वत्र एकमेव प्रभू परमात्माच दिसतो. तो सर्वांना समदृष्टीने पाहतो.॥२॥ तो प्रभू परमात्मा सर्वव्याप्त आहे. साऱ्या जगास तो आपले सेवक मानून त्यांचा संभाळ करतो. तो प्रभू अत्यंत दयाळू आहे. दगडात लपलेल्या जीवाचाही तोच संभाळ करतो. ॥ ३ ॥ हरिणाच्या नाभीतच कस्तुरी वास करते. त्याचा सुगंध सर्वत्र दरवळतो. पण हरिण मात्र त्या सुगंधाच्या शोधात इकडे तिकडे शिंग ढोसतो. मीही प्रभू परमात्म्यास शोधत रानावनात हिंडलो पण पूर्णगुरूने प्रभू परमात्मा माझ्या अंतरातच आहे हे दाखवून माझा उद्धार केला. ॥ ४ ॥

बाणी गुरू गुरू है बाणी विचि बाणी अंम्रितु सारे ॥
गुरु बाणी कहै सेवकु जनु मानै परतखि गुरू निसतारे ॥ ५ ॥
सभु है ब्रहमु ब्रहमु है पसरिआ मनि बीजिआ खावारे ॥
जिउ जन चंद्रहांसु दुखिआ ध्रिसटबुधी अपुना घरु लूकी जारे ॥ ६ ॥
प्रभ कउ जनु अंतरि रिद लोचै प्रभ जन के सास निहारे ॥
क्रिपा क्रिपा करि भगति द्रिड़ाए जन पीछै जगु निसतारे ॥ ७ ॥
आपन आपि आपि प्रभु ठाकुरु प्रभु आपे स्रिसटि सवारे ॥
जन नानक आपे आपि सभु वरतै करि क्रिपा आपि निसतारे ॥ ८ ॥ ४ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९८२)

शब्दार्थ : **सारे** – सर्वव्याप्त, सामावलेले. **परतखि** – प्रत्यक्ष. **बीजिआ** – पेरलेले. **खावारे** – भोगावयास लावतो. **चंद्रहास** – राजा सुधर्माचा पुत्र चंद्रहास. **ध्रिष्टबुधी** – धृष्टबुद्धी (नाव). **लूकी जारे** – जाळून टाकले. **लोचै** – इच्छितो.

भावार्थ : वाणी हाच गुरू आहे आणि गुरू हिच वाणी आहे. शब्दरूपी वाणीतच अमृत साठवलेले आहे. गुरू ही शब्दरूपी वाणी उच्चारतो. प्रभुसेवक त्याचा स्वीकार करतो. अशा सेवकांचा प्रभू परमात्मा स्वत: उद्धार करतो.॥५॥ सर्व काही ब्रह्म आहे. जग हा सारा ब्रह्माचाच पसारा आहे. जीव जसे कर्म करतो तशी फळे भोगतो. धृष्टबुद्धीने चंद्रहासाचा दुष्टावा करून त्यास मारण्यासाठी कट केला. त्यात त्याचेच घर जळाले व तो नाश पावला.॥६॥ प्रभू परमात्म्याचे सेवक आपल्या हृदयात प्रभुप्राप्तीचीच कामना धरतात व प्रभू परमात्मा आपल्या सेवकाचे प्रत्येक श्वासागणिक रक्षण करतो. तो भक्तांवर कृपा करून त्यांच्या हृदयातील प्रभुभक्ती अधिक दृढ करतो. अशा प्रभुसेवकांमुळेच जगाचा उद्धार होतो. ॥ ७ ॥ प्रभू परमात्मा स्वयंभू आहे. तोच स्वत:चा स्वामी आहे व तोच साऱ्या सृष्टीचा संभाळ करतो. दास नानक सांगतात, तो प्रभू परमात्माच सर्वत्र कार्यशील आहे. तोच सर्वांवर कृपा करून सर्वांचा उद्धार करतो. ॥ ८ ॥ ४ ॥

॥ नट महला ४ ॥

राम करि किरपा लेहु उबारे ॥
जिउ पकरि द्रोपती दुसटां आनी हरि हरि लाज निवारे ॥ १ ॥ रहाउ ॥
करि किरपा जाचिक जन तेरे इकु मागउ दानु पिआरे ॥
सतिगुर की नित सरधा लागी मोकउ हरि गुरु मेलि सवारे ॥ १ ॥
साकत करम पाणी जिउ मथीऐ नित पाणी झोल झुलारे ॥
मिलि सत संगति परमपदु पाइआ कढि माखन के गटकारे ॥ २ ॥
नित नित काइआ मजनु कीआ नित मलि मलि देह सवारे ॥
मेरे सतिगुर के मनि बचन न भाए सभ फोकट चार सीगारे ॥ ३ ॥
मटकि मटकि चलु सखी सहेली मेरे ठाकुर के गुन सारे ॥
गुरमुखि सेवा मेरे प्रभ भाई मै सतिगुर अलखु लखारे ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८२)

शब्दार्थ : **उबारे** – उद्धार कर, रक्षण कर. **द्रोपती** – द्रौपदी. **जाचिक** – याचक. **मथीऐ** – मंथन. **झोल झुलारे** – वारंवार मंथन करणे. **गटकारे** – मटकावतो. **फोकट** – व्यर्थ. **चार** – सुंदर. **लखारे** – दर्शन दिले.

भावार्थ : ज्याप्रमाणे दुष्टांनी द्रौपदीला ओढीत आणून तिची विटंबना करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा, हे हरी, तूच तिची लाज राखलीस; त्याप्रमाणे हे रामा ! तू माझ्यावर कृपा कर आणि माझा उद्धार कर. ॥ १ ॥रहाउ॥ हे प्रभो ! मी तुझा सेवक तुझ्याकडे याचना करतो. एक दान मागतो. माझ्या मनात सतगुरूविषयी श्रद्धा वसू दे. सतगुरू माझे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवून आणील व त्यामुळे माझे जीवन सार्थ होईल. ॥ १ ॥ शाक्त लोक कर्मकांडरूपी पाणी घुसळतात. पण त्यातून त्यांच्या हाती पाण्याशिवाय अन्य काहीच लागत नाही. माझ्या मनात सतगुरूविषयी श्रद्धा जागृत झाली. त्याच्या उपदेशाने मी संत संगतीत प्रभुनामाचे घुसळण करून परमपदरूपी लोणी मटकावले. ॥ २ ॥ सदैव स्नान करून देह स्वच्छ केला. सदैव देह रगडून मी साफ ठेवला. पण जोपर्यंत माझे कर्म माझ्या सतगुरूस आवडणार नाही, तोपर्यंत मी हा केलेला शृंगार व्यर्थ होय. ॥ ३ ॥ हे माझ्या सखे, मैत्रिणी ! माझ्या स्वामीचे प्रभू परमात्म्याचे गुणगान गात गात अशीच मटक मटक करून केलेली सेवा माझ्या प्रभूस आवडली. सतगुरूने मला त्या अलक्ष्य प्रभू परमात्म्याचे दर्शन घडवले. ॥ ४ ॥

नारी पुरखु पुरखु सभ नारी सभु एको पुरखु मुरारे ॥
संत जना की रेनु मनि भाई मिलि हरि जन हरि निसतारे ॥ ५ ॥
ग्राम ग्राम नगर सभ फिरिआ रिद अंतरि हरि जन भारे ॥
सरधा सरधा उपाइ मिलाए मोकउ हरि गुर गुरि निसतारे ॥ ६ ॥
पवन सूतु सभु नीका करिआ सतिगुरि सबदु वीचारे ॥
निज घरि जाइ अंम्रित रसु पीआ बिनु नैना जगतु निहारे ॥ ७ ॥
तउ गुन ईस बरनि नही साकउ तुम मंदर हम निक कीरे ॥

नानक क्रिपा करहु गुर मेलहु मै रामु जपत मन धीरे ॥ ८ ॥ ५ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९८३)

शब्दार्थ : **नारी** – प्रकृती. **पुरूष** – परमात्मा. **भारे** – प्राप्त केले. **पवन** – वायू, श्वास. **सूतु**– सूत्र. **निजघरि** – आत्मस्वरूप. **तउ** – तुझे. **कीरे** – किडे. **धिरे** – धैर्य.

भावार्थ : प्रभू परमात्माच सर्व जीवरूपी स्त्रियांचा स्वामी आहे. सर्व जीवरूपी स्त्रिया प्रभू परमात्म्याच्या पत्नी आहेत. एकमात्र प्रभू परमात्माच सर्व काही आहे. नारी प्रकृती हीच पुरुषपरमात्मा आहे. परमात्मा पुरुषच नारी स्वरूप प्रकृती आहे. प्रभू परमात्माच सर्व काही आहे. संतजनांची चरणधूळ मला आवडली. प्रभुसेवकांशी मिलन झाल्याने प्रभू परमात्म्याने माझा उद्धार केला. ॥ ५ ॥ त्या प्रभू परमात्म्याच्या प्राप्तीसाठी मी गावोगावी, नगरानगरात हिंडलो. अखेर प्रभुसेवकांनी तो माझ्या अंतरातच वास करत असल्याचे मला दाखवून दिले. व प्रभूगुरूनेच माझा उद्धार केला. ॥ ६ ॥ सतगुरूच्या उपदेशाचे चिंतन केल्याने माझे श्वास, प्राणसूत्र सुंदर झाले माझे जीवन सफल झाले. मी माझे आत्मस्वरूप ओळखले. प्रभुप्रेमामृत प्राशन केल्याने चर्मचक्षूशिवाय म्हणजे ज्ञानचक्षूच्या साहाय्याने अंतर्ज्ञानाने सारे जग जाणले. ॥ ७ ॥ हे प्रभो ! तुझ्या महान गुणांचे मी वर्णनही करू शकत नाही. तुझ्या घरचा मी एक क्षुद्र जीव आहे. नानक सांगतात, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर. माझे सतगुरूशी मिलन घडव. म्हणजे मी हरिनामाचा जप करून धैर्य प्राप्त करीन. ॥ ८ ॥ ५ ॥

॥ नट महला ४ ॥

मेरे मन भजु ठाकुर अगम अपारे ॥
हम पापी बहु निरगुणीआरे करि किरपा गुरि निसतारे ॥ १ ॥ रहाउ ॥
साधू पुरख साध जन पाए इक बिनउ करउ गुर पिआरे ॥
राम नामु धनु पूजी देवहु सभु तिसना भुख निवारे ॥ १ ॥
पचै पतंगु म्रिग भ्रिंग कुंचर मीन इक इंद्री पकरि सघारे ॥
पंच भूत सबल है देही गुरु सतिगुरु पाप निवारे ॥ २ ॥
सासत्र बेद सोधि सोधि देखे मुनि नारद बचन पुकारे ॥
राम नामु पड़हु गति पावहु सत संगति गुरि निसतारे ॥ ३ ॥
प्रीतम प्रीति लगी प्रभ केरी जीव सुरजु कमलु निहारे ॥
मेर सुमेर मोरु बहु नाचै जब उनवै घन घनहारै ॥ ४ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८३)

शब्दार्थ : **बिनउ** – विनंती, प्रार्थना. **पूजी** – पुंजी. **तिसना** – तृष्णा. **निवारे** – दूर करणे. **पचे**– जळून जाते. **भ्रिंग** – भुंगा. **कुचर** – हत्ती. **इंद्री** – इंद्रिये. **सिधारे** – नष्ट झाले. **देही** – देहात. **सासत्र** – शास्त्र. **निहारे** – पाहातो. **मेर** – मेरू पर्वत. **सुमेर** – सुमेरु पर्वत. **मोरु** – मोर. **उनवै** – खाली झुकतात.

भावार्थ : हे माझ्या मना त्या अगम्य अपार प्रभू परमात्म्याची उपासना कर. भजन कर. हे प्रभो ! मी महापापी आहे. गुणहीन आहे. माझ्यावर कृपा कर. प्रभुरूपी गुरूने माझा उद्धार केला. ॥ रहाउ ॥ ज्या साधुजनांनी साधुपुरुष

परमात्मा प्राप्त केला आहे अशा माझ्या प्रिय गुरू मी तुला एक प्रार्थना करतो. मला रामनामधनाची पुंजी द्या. त्यामुळे माझ्या मनातील मायेची तहान व विकारांची भूक नष्ट होईल. ॥ १ ॥ पतंग, मृग, भ्रमर, हत्ती व मासा एका एका इंद्रियाच्या वासनेत अडकून नष्ट झाले. ह्या देहात तर सर्व पंचविकार भरलेले आहेत. त्यांच्या पापांचे निवारण सतगुरूच करू शकतो. ॥ २ ॥ सर्व शास्त्रे, वेद यांचे अध्ययन करून नारदमुनी उच्चरवाने हेच सांगतात, की प्रभुनामाच्या सतत चिंतनाने व सतसंगतीने जीव भवसागर पार करून जातो व त्यास परमगती प्राप्त होते. ॥ ३ ॥ ज्याप्रमाणे कमल सदैव सूर्याकडेच पाहते, त्याप्रमाणे माझ्या मनात प्रभूविषयी प्रीती उत्पन्न झाली आहे. जेंव्हा मेघ वर्षण्यासाठी ओथंबतात, तेव्हा मोर पर्वतावर आनंदाने थुई थुई नाचतो. त्याप्रमाणे माझे मन प्रभुप्रेमाने आनंद विभोर होते. ॥ ४ ॥

साकत कउ अंम्रित बहु सिंचहु सभ डाल फूल बिसुकारे ॥
जिउ जिउ निवहि साकत नर सेती छेड़ि छेड़ि कढै बिखु खारे ॥ ५ ॥
संतन संत साध मिलि रहीऐ गुण बोलहि परउपकारे ॥
संतै संतु मिलै मनु बिगसै जिउ जल मिलि कमल सवारे ॥ ६ ॥
लोभ लहरि सभु सुआनु हलकु है हलकिओ सभहि बिगारे ॥
मेरे ठाकुर कै दीबानि खबरि होई गुरि गिआनु खड़गु लै मारे ॥ ७ ॥
राखु राखु राखु प्रभ मेरे मै राखहु किरपा धारे ॥
नानक मै धर अवर न काई मै सतिगुरु गुरु निसतारे ॥ ८ ॥ ६ ॥ छका १ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९८३)

शब्दार्थ : **बिसुकारे** – विषारी. **निवहि** – नम्र होतो, वाकतो. **छेड** – भांडण. **बिखु** – विष. **खारे** – ओकतो. **बिगसे** – विकसित होते. **सुआनु** – कुत्रा. **हलकु** – पिसाळलेला. **बिगारे** – बिघडवतो. **दीबानि** – दरबार. **काई** – कोणीही.

भावार्थ : ज्याप्रमाणे विषारी झाडाला विषारी फळे येतात तसे, शाक्तावर कितीही अमृत शिंपडले तरी शाक्त त्या अमृताचे विषच करतो. शाक्त माणसापुढे तुम्ही कितीही नम्रतापूर्वक वागा तो छेड काढून तुमच्याशी विषारी बोलच बोलणार. ॥ ५ ॥ हे जीवा ! तू संतांचे संत असलेल्या साधुपुरुषांच्या संगतीत राहा. तेथे नित्य परोपकाराचेच गुण गायले जातात. ज्याप्रमाणे पाण्याच्या संगतीत कमल विकसित होते, त्याप्रमाणे संतांच्या संगतीत राहिल्याने मनाचा विकास होतो. ॥ ६ ॥ लोभाची लहर ही पिसाळलेल्या कुत्र्यासारखी आहे. ज्याप्रमाणे पिसाळलेले कुत्रे चावले की ज्यास तो चावतो तोही पिसाळतो, त्याप्रमाणे लोभाने माणूस बिघडतो. जेव्हा माझ्या प्रभूच्या दरबारात ही वार्ता पोहोचली, तेव्हा गुरूने ज्ञानरूपी खड्ग उपसून त्यास ठार मारले. ॥ ७ ॥ हे प्रभो ! माझे रक्षण कर. माझ्यावर कृपा कर व मला वाचव. नानक सांगतात, हे प्रभो ! मला तुझ्याशिवाय अन्य कोणाचाही आधार नाही. हे सतगुरू प्रभू तूच माझा उद्धार कर. ॥ ८ ॥ ६ ॥ छता १ ॥

॥ राग माली गउड ॥

१ ओअंकार सतिनामु करतापुरखु निरभउ निरवैरु अकाल मूरति अजूनी सैभं गुरप्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाम सत्य आहे. तो कर्तापुरुष आहे. निर्भय निर्वैर आहे. तो कालातीत आहे. तो अयोनीसंभव आहे. स्वयंभू आहे. सतगुरूच्या कृपेने तो प्राप्त होतो.

रागु माली गउडा महला ४

अनिक जतन करि रहे हरि अंतु नाही पाइआ ॥
हरि अगम अगम अगाधि बोधि आदेसु हरि प्रभ राइआ ॥ १ ॥ रहाउ ॥
कामु क्रोधु लोभ मोहु नित झगरते झगराइआ ॥
हम राखु राखु दीन तेरे हरि सरनि हरि प्रभि आइआ ॥ १ ॥
सरणागती प्रभ पालते हरि भगति वछलु नाइआ ॥
प्रहिलादु जनु हरनाखि पकरिआ हरि राखि लीओ तराइआ ॥ २ ॥
हरि चेति रे मन महलु पावण सभ दूख भंजनु राइआ ॥
भउ जनम मरन निवारि ठाकुर हरि गुरमती प्रभु पाइआ ॥ ३ ॥
हरि पतित पावन नामु सुआमी भउ भगत भंजनु गाइआ ॥
हरि हारु हरि उरि धारिओ जन नानक नामि समाइआ ॥ ४ ॥ १ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९८४)

शब्दार्थ : **अनिक** – अनेक. **जतन** – यत्न. **बोधि** – ज्ञान, बोध. **आदेसु** – नमस्कार. **झगरते** – झगडतात. **पालते** – पालन करतो. **नाइआ** – नाव. **प्रहिलादु** – प्रल्हाद. **हरनाखि** – हिरण्यकश्यपू. **पकरिआ** – पकडले. **चेति** – चिंतन, स्मरण. **महलु** – प्रभूचे घर. **भउ** – भय. **गाइआ** – गायन केले.

भावार्थ : अनेक यत्न करूनही प्रभू परमात्म्याचा अंत सापडला नाही. प्रभू अगम्य आहे. त्याचे ज्ञान अगाध आहे. त्या प्रभू परमात्म्यास नमस्कार असो. ॥ १ ॥ रहाउ ॥ काम, क्रोध, मोह, लोभ ह्यामुळेच झगडे उत्पन्न होतात व जीव सदैव आपापसात झगडत राहतात. हे प्रभो ! मी दीन तुला शरण आलो आहे. माझे रक्षण कर. ॥ १ ॥ हे प्रभो ! तू शरण आलेल्याचे पालन करतोस. तुझे नावच भक्तवत्सल आहे. तुझा सेवक प्रल्हाद यास जेंव्हा हिरण्यकश्यपूने पकडले, तेव्हा तूच प्रल्हादाचे रक्षण करून हिरण्यकश्यपूस मारलेस. । २ ॥ हे मना ! प्रभू दरबारात स्थान प्राप्त करण्यासाठी तू त्या दुःख नष्ट करणाऱ्या प्रभू परमात्म्याचे नामस्मरण कर. सतगुरूच्या उपदेशाने प्रभू प्राप्त होतो व तो जीवाचे जन्ममरणाचे भय नष्ट करतो. ॥ ३ ॥ प्रभूचे नाव पतितपावन आहे. भक्तांनी भय

नष्ट व्हावे म्हणून प्रभूचे गुणगान केले. नानकाने प्रभुनामरूपी माला हृदयात धारण केली आहे व तो प्रभुनामात सामावून गेला. ॥ ४ ॥ १ ॥

॥ माली गउड़ा महला ४ ॥

जपि मन राम नामु सुखदाता ॥
सत संगति मिलि हरि सादु आइआ गुरमुखि ब्रहमु पछाता ॥ १ ॥ रहाउ ॥
वडभागी गुर दरसनु पाइआ गुरि मिलिऐ हरि प्रभु जाता ॥
दुरमति मैलु गई सभ नीकरि हरि अंम्रिति हरि सरि नामा ॥ १ ॥
धनु धनु साध जिन्ही हरि प्रभु पाइआ तिन्ह पूछउ हरि की बाता ॥
पाइ लगउ नित करउ जुदरीआ हरि मेलहु करमि बिधाता ॥ २ ॥
लिलाट लिखे पाइआ गुरु साधू गुर बचनी मनु तनु राता ॥
हरि प्रभु आइ मिले सुखु पाइआ सभ किलविख पाप गवाता ॥ ३ ॥
राम रसाइणु जिन्ह गुरमति पाइआ तिन्ह की ऊतम बाता ॥
तिन की पंक पाईऐ वडभागी जन नानकु चरनि पराता ॥ ४ ॥ २ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९८४)

शब्दार्थ : **सादु** – स्वाद. **पछाता** – ओळखले. **जाता** – जाणले. **नीकरि** – काढून टाकली. **सरि** – सरोवर. **नाता** – स्नान करणे. **जुदरीआ** – आर्जव, विनंती. **करमि** – कृपा. **लिलाट** – ललाट, कपाळ. **पंक** – चरणधूळ. **पराता** – पडतो.

भावार्थ : हे मना ! त्या सुखदात्या रामनामाचा जप कर. संत संगतीत बसून हरिरसाचा स्वाद घे. गुरुमार्गी चालून ब्रह्म जाणता येते. ॥ १ ॥ रहाउ ॥ महाभाग्यानेच गुरूचे दर्शन प्राप्त होते व गुरूची प्राप्ती झाल्यावर प्रभू परमात्मा जाणता येतो. त्यामुळे दुर्बुद्धीचा मळ नष्ट होतो व हरिनामामृताच्या सरोवरात स्नान करता येते. ॥ १ ॥ ज्या साधुसंतांनी प्रभू परमात्मा प्राप्त केला ते धन्य होत. त्यांनाच प्रभुप्राप्तीचा मार्ग विचारावा. त्यांच्या पायी लीन व्हावे. त्यांना नित्य विनंती करावी, की कृपा करून माझी त्या विधात्या प्रभू परमात्म्याशी भेट घडवा. ॥ २ ॥ ललाटलेखात लिहिल्यानुसार मला सतगुरू लाभला. सतगुरुच्या वचनात माझे तन, मन रत झाले. त्यामुळे प्रभू परमात्मा स्वत: येऊन मला भेटला. मला सुख प्राप्त झाले. माझ्या मनातील सर्व किल्मिष सर्व पाप नष्ट झाले.॥३॥ ज्यांनी सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे आचरण करून रामरूपी रसायन प्राप्त केले त्यांचे बोलणे सर्वश्रेष्ठ होय. दास नानक त्यांच्या चरणी नत होतो. महाभाग्याने अशा प्रभुसेवकांची चरणधूळ प्राप्त होते. ॥ ४ ॥ २ ॥

॥ माली गउड़ा महला ४ ॥

सभि सिध साधिक मुनि जना मनि भावनी हरि धिआइओ ॥
अपरंपरो पारब्रहमु सुआमी हरि अलखु गुरू लखाइओ ॥ १ ॥ रहाउ ॥
हम नीच मधिम करम कीए नही चेतिओ हरि राइओ ॥

हरि आनि मेलिओ सतिगुरू खिनु बंध मुकति कराइओ ॥ १ ॥
प्रभि मसतके धुरि लीखिआ गुरमति हरि लिव लाइओ ॥
पंच सबद दरगह बाजिआ हरि मिलिओ मंगलु गाइओ ॥ २ ॥
पतित पावनु नामु नरहरि मंदभागीआं नही भाइओ ॥
ते गरभ जोनी गालीअहि जिउ लोनु जलहि गलाइओ ॥ ३ ॥
मति देहि हरि प्रभ अगम ठाकुर गुर चरन मनु मै लाइओ ॥
हरि राम नामै रहउ लागो जन नानक नामि समाइओ ॥ ४ ॥ ३ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९८५)

शब्दार्थ : भावनी – श्रद्धेने. **लखाइओ** – दाखवला. **मधिम** – मध्यम. **पंच** – पाच. **बाजिआ** – वाजले. **मंदभागीआ** – अभागी, दुर्भागी. **गालिअहि** – दु:खी होतात. **लोनु** – मीठ. **गलाइओ** – विरघळते.

भावार्थ : सर्व सिद्ध, साधक, मुनी, प्रभुसेवक सर्वजण श्रद्धापूर्वक प्रभू परमात्म्याचे ध्यान करतात. तो अलक्ष्य, अपार परब्रह्म परमात्मा सतगुरूने मला दाखवला. ॥ १ ॥ रहाउ ॥ मी नीच, मध्यमकर्मी जीवाने कधीही प्रभू परमात्म्याचे चिंतन केले नाही. प्रभूने माझी सतगुरूशी भेट घडवली व त्याने मला क्षणात बंधमुक्त केले. ॥ १ ॥ प्रभू परमात्म्याने आधीच माझा ललाटलेख लिहून ठेवला होता, त्याप्रमाणे सतगुरूच्या उपदेशाने मी प्रभू परमात्म्याच्या चरणी लीन झालो. प्रभू दरबारात पंच वाणी प्रगट झाली व मी हरिमिलनाची मंगलगीते गाऊ लागलो.॥२॥ प्रभू परमात्म्याचे नाम हे पतिताला पावन करणारे आहे पण अभागी जीवांना ते आवडत नाही. जसे पाण्यात मीठ विरघळून पाण्याशी एकरूप होते त्याप्रमाणे असे भाग्यहीन लोक गर्भयोनीतच फिरत राहून दु:ख भोगतात. ॥ ३ ॥ हे अगम्य प्रभू परमात्मा ! मला अशी बुद्धी दे की ज्यामुळे मी माझे मन गुरुचरणी एकरूप करीन. नानक सांगतात, हे प्रभो ! माझे मन सदैव रामनामात मग्न होऊन राहावे व मी नामाशी एकरूप होऊन जावे.॥४॥३॥

॥ माली गउड़ा महला ४ ॥

मेरा मनु राम नामि रसि लागा ॥
कमल प्रगासु भइआ गुरू पाइआ हरि जपिओ भ्रमु भउ भागा ॥ १ ॥ रहाउ ॥
भै भाइ भगति लागो मेरा हीअरा मनु सोइओ गुरमति जागा ॥
किलबिख खीन भए सांति आई हरि उर धारिओ वडभागा ॥ १ ॥
मनमुख रंगु कसुंभु है कचूआ जिउ कुसम चारि दिन चागा ॥
खिन महि बिनसि जाइ परतापै डंडु धरमराइ का लागा ॥ २ ॥
सत संगति प्रीति साध अति गूड़ी जिउ रंगु मजीठ बहु लागा ॥
काइआ कापरु चीर बहु फारे हरि रंगु न लहै सभागा ॥ ३ ॥
हरि चार्हिओ रंगु मिलै गुरु सोभा हरि रंगि चलूलै रांगा ॥
जन नानकु तिन के चरन पखारै जो हरि चरनी जनु लागा ॥ ४ ॥ ४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९८५)

शब्दार्थ : हीआरा – हृदय. **सोइओ** – निद्रिस्त. **भए** – झाले. **सांति** – शांत. **कचुका** – कच्चा. **चारि** – चार. **चागा** – चांगले. **परतापै** – दु:खी. **गूडी** – गाढ. **कापरू** – कापड. **चीर** – वस्त्र. **फारे** – फाटले. **चार्हिओ** – चढवला. **पखारै** – धुतो.

भावार्थ : माझे मन रामनामाच्या प्रेमात रंगून गेले तेव्हा माझे हृदयकमल विकसित झाले. प्रसन्न झाले. सतगुरू प्राप्त झाल्याने मी हरिनामाचा जप केला. त्यामुळे माझ्या मनातील भ्रम व भय पळून गेले. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभूविषयीच्या आदरयुक्त भीतीने व भक्तिभावाने माझे निद्रिस्त मन गुरूच्या उपदेशाने जागृत झाले. माझे पाप क्षणात नष्ट झाले व माझे मन शांत झाले. महाभाग्याने मी प्रभू परमात्म्यास हृदयात धारण केले. ॥ १ ॥ स्वेच्छाचारी जीव हा कुसुंबाच्या फुलाप्रमाणे आहे. त्याचा रंग त्वरित फिका होतो व ते चार दिवस सुंदर दिसते पण लवकरच कोमेजून जाते. त्याप्रमाणे स्वेच्छाचारी जीव यमाकडून दंडित होऊन नाश पावतात. ॥ २ ॥ साधुसंतांच्या संगतीने उत्पन्न होणाऱ्या प्रभू भक्तीचा रंग गडद लाल असतो. अशा प्रभुभक्तांचे शरीररूपी वस्त्र कितीही जीर्ण झाले तरी त्यावरील प्रभू भक्तीचा रंग कधीही फिका होत नाही. ॥ ३ ॥ प्रभुभक्तीचा हा रंग प्रभुकृपेनेच प्राप्त होतो. सतगुरूच्या माध्यमातूनच हा रंग चढतो व तो गाढ रंगाने शोभून दिसतो. दास नानक जे हरिचरणी लीन झाले त्यांचे चरणप्रक्षालन करतो. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ माली गउड़ा महला ४ ॥

मेरे मन भजु हरि हरि नामु गुपाला ॥
मेरा मनु तनु लीनु भइआ राम नामै मति गुरमति राम रसाला ॥ १ ॥ रहाउ ॥
गुरमति नामु धिआईऐ हरि हरि मनि जपीऐ हरि जप माला ॥
जिन्ह कै मसतकि लीखिआ हरि मिलिआ हरि बनमाला ॥ १ ॥
जिन्ह हरि नामु धिआइआ तिन्ह चूके सरब जंजाला ॥
तिन्ह जमु नेड़ि न आवई गुरि राखे हरि रखवाला ॥ २ ॥
हम बारिक किछू न जाणहू हरि मात पिता प्रतिपाला ॥
करू माइआ अगनि नित मेलते गुरि राखे दीन दइआला ॥ ३ ॥
बहु मैले निरमल होइआ सभ किलबिख हरि जसि जाला ॥
मनि अनदु भइआ गुरु पाइआ जन नानक सबदि निहाला ॥ ४ ॥ ५ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९८५)

शब्दार्थ : लिनु – लीन. **रसाला** – रसाळ. **वनमाला** – विष्णू, वनमाळी. **जंजाळ** – मायेचे बंधन. **किछु** – काहीही. **करु** – हात. **निहाला** – प्रसन्न.

भावार्थ : हे माझ्या मना ! त्या गोपालाचे, त्या प्रभू परमात्म्याचे भजन कर. सतगुरूच्या उपदेशाने माझे तन, मन रामनामात लीन झाले. ॥ १ ॥ रहाउ ॥ सतगुरूच्या उपदेशाप्रमाणे प्रभुनामाचे ध्यान करावे. मनरूपी जपमाळ घेऊन प्रभुनामाचा जप करावा. ज्याच्या भाग्यात तसे प्रभूने आधीच लिहून ठेवले असेल त्यासच तो वनमाळी प्रभू

परमात्मा प्राप्त होतो. ॥ १ ॥ ज्याने हरिनामाचे ध्यान केले तो मोहमायेच्या वासनाविकारांच्या जंजाळातून मुक्त होतो. प्रभू परमात्मा रक्षक होऊन त्याचे रक्षण करतो. यम त्याच्या जवळपासही फिरकत नाही. ॥ २ ॥ मी तर अजाण बालक आहे. मला काहीही कळत नाही. पण हरीने माझे मातापित्याप्रमाणे प्रतिपाळ केला. मी सदैव विकाराच्या अग्नीने जळत होते पण दीनदयाळ प्रभू परमात्म्याने माझे त्यापासून रक्षण केले. ॥ ३ ॥ हरीचे यशोगान गायल्याने माझे अत्यंत मलिन झालेले मन निर्मळ झाले आहे. माझ्या मनातील सर्व किल्मिष, पाप नष्ट झाले आहे. दास नानक सांगतात, प्रभुमिलनामुळे माझ्या मनास आनंद झाला आहे. प्रभूच्या शब्दाने माझा जीव प्रसन्न झाला आहे. ॥ ४ ॥ ५ ॥

॥ माली गउड़ा महला ४ ॥

मेरे मन हरि भजु सभ किलबिख काट ॥
हरि हरि उरधारिओ गुरि पूरै मेरा सीसु कीजै गुर वाट ॥ १ ॥ रहाउ ॥
मेरे हरि प्रभ की मै बात सुनावै तिसु मनु देवउ कटि काट ॥
हरि साजनु मेलिओ गुरि पूरै गुर बचनि बिकानो हटि हाट ॥ १ ॥
मकर प्रागि दानु बहु कीआ सरीरु दीओ अध काटि ॥
बिनु हरिनाम को मुकति न पावै बहु कंचनु दीजै कटि काट ॥ २ ॥
हरि कीरति गुरमति जसु गाइओ मनि उधरे कपट कपाट ॥
त्रिकुटी फोरि भरमु भउ भागा लज भानी मटुकी माट ॥ ३ ॥
कलजुगि गुरु पूरा तिनि पाइआ जिन धुरि मसतकि लिखे लिलाट ॥
जन नानक रसु अंम्रितु पीआ सभ लाथी भूख तिखाट ॥ ४ ॥ ६ ॥ छका १ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९८६)

शब्दार्थ : **सीसु** – मस्तक. **देवउ** – देईन. **मकर** – मकर संक्रांत. **प्राग** – प्रयाग. **कंचनु** – सोने. **उधरे** – उघडले. **त्रिकुटी** – त्रिगुणात्मक संसार. **फोरि** – फोडून. **लज** – लोकलज्जा. **भानी** – . **मटुकी** – मडके. **माट** – मानी. **लाथी** – दूर. **तिखाट** – तृष्णा.

भावार्थ : हे माझ्या मना ! प्रभू परमात्म्याचे भजन कर. त्यामुळे मनातील सर्व किल्मिष नष्ट होईल. मी प्रभू परमात्म्यास हृदयात धारण केले आहे व माझे मस्तक पूर्णगुरूच्या मार्गी समर्पित केले आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ जो मला माझ्या प्रभू परमात्म्याची कथा सांगेल, त्याच्या चरणी मी माझे मन समर्पित करीन. गुरूनेच माझे माझ्या साजण प्रभूशी मिलन घडवले. पूर्णगुरूच्या वचनासाठी मी स्वत:स विकून टाकले आहे. मी त्याचा दास झालो आहे. ॥ १ ॥ मकर संक्रांतीच्या पर्वावर प्रयाग क्षेत्री खूप दानधर्म केला. काशी क्षेत्री जाऊन शरीराचे तुकडे तुकडे केले. खूप सुवर्णदान केले तरीही ह्या कशानेही मुक्ती प्राप्त होत नाही. हरिनामाशिवाय कोणासही मुक्ती प्राप्त होत नाही. ॥ २ ॥ सतगुरूच्या उपदेशानुसार हरिकीर्तीचे गायन केल्याने मनाची कवाडे उघडली जातात. त्रिगुणात्मक सृष्टीचा भ्रम नष्ट करून मी माझ्या मनातील भ्रम व भय नष्ट केले व लोकलज्जारूपी मातीचे मडके फोडून टाकले. ॥ ३ ॥ कलियुगात ज्याच्या भाग्यात तसे लिहिले असेल त्यास पूर्णगुरू प्रभू परमात्मा प्राप्त होतो.

दास नानक सांगतात, मी प्रभुनामरसामृत प्राशन केले त्यामुळे माझी मायेची तृष्णा व विकारांची भूक संपूर्ण नष्ट झाली. ॥ ४ ॥ ६ ॥ छक्का १ ॥

माली गउड़ा महला ५

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

रे मन टहल हरि सुख सार ॥
अवर टहला झूठीआ नित करै जमु सिरि मार ॥ १ ॥ रहाउ ॥
जिना मसतकि लीखिआ ते मिले संगार ॥
संसारु भउजलु तारिआ हरि संत पुरख अपार ॥ १ ॥
नित चरन सेवहु साध के तजि लोभ मोह बिकार ॥
सभ तजहु दूजी आसड़ी रखु आस इक निरंकार ॥ २ ॥
इकि भरमि भूले साकता बिनु गुर अंध अंधार ॥
धुरि होवना सु होइआ को न मेटणहार ॥ ३ ॥
अगम रूपु गोबिंद का अनिक नाम अपार ॥
धनु धंनु ते जन नानका जिन हरि नामा उरिधार ॥ ४ ॥ १ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८६)

शब्दार्थ : **टहल** – सेवा. **सार** – श्रेष्ठ. **अवर** – अन्य. **संगार** – सतसंग. **तजि** – त्यागून. **आसडी** – आशा, आधार. **होवना** – होणारे. **मेटनहार** – पुसून टाकणारा. **अनिक** – अनेक.

भावार्थ : हे मना ! हरीच्या सेवेतच श्रेष्ठ सुख साठवलेले आहे. अन्य कोणाचीही सेवा व्यर्थ आहे. त्यामुळे यमाचा दंडा सदैव डोक्यावर टांगता राहतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ ज्यांच्या भाग्यात तसे लिहिले असेल त्यास सतसंग प्राप्त होतो. ते अपार प्रभू परमपुरुष संत भवसागर पार करून नेतात. ॥ १ ॥ लोभ मोह आदी विकारांचा त्याग करून सदैव साधुसंतांची चरणसेवा करावी. अन्य दुसऱ्या कोणाच्याही आधाराचा त्याग कर व त्या एकमेव निराकार प्रभूचा आश्रय घे. ॥ २ ॥ शाक्त लोक प्रभूपासून दूर गेल्याने मोहमायेच्या भ्रमात भटकत राहतात. सतगुरूशिवाय सर्वत्र अंधारच अंधार आहे. प्रत्येक जीवाच्या संचितात जे व जसे लिहिले असेल ते व तसेच होते. ते कोणीही बदलू शकत नाही. ॥ ३ ॥ त्या गोविंदाचे, प्रभू परमात्म्याचे रूप अगम्य आहे. तो अपार प्रभू अनेक नावांनी ओळखला जातो. नानक सांगतात, ज्यांनी आपल्या हृदयात प्रभुनाम धारण केले आहे ते प्रभुसेवक धन्य होत. ॥ ४ ॥ १ ॥

॥ माली गउड़ा महला ५ ॥

राम नाम कउ नमसकार ॥ जासु जपम होवत उधार ॥ १ ॥ रहाउ ॥
जा कै सिमरनि मिटहि धंध ॥ जा कै सिमरनि छूटहि बंध ॥
जा कै सिमरनि मूरख चतुर ॥ जा कै सिमरनि कुलह उधर ॥ १ ॥
जा कै सिमरनि भउ दूख हरै ॥ जा कै सिमरनि अपदा टरै ॥

जा कै सिमरनि मुचत पाप ॥ जा कै सिमरनि नही संताप ॥ २ ॥
जा कै सिमरनि रिद बिगास ॥ जा कै सिमरनि कवला दासि ॥
जा कै सिमरनि निधि निधान ॥ जा कै सिमरनि तरे निदान ॥ ३ ॥
पतित पावनु नामु हरी ॥ कोटि भगत उधारू करी ॥
हरि दास दासा दीनु सरन ॥ नानक माथा संत चरन ॥ ४ ॥ २ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८६)

शब्दार्थ : **धंध** – सांसारिक उद्योग. **कुलह** – कुळाचा. **अपदा** – आपत्ती. **टरै** – टळते, नष्ट होते. **मुचत** – दूर होते. **संताप** – दु:ख. **रिद** – हृदय. **बिगास** – विकास. **बवला** – कमला, लक्ष्मी. **निधान** – खजिना. **निदान** – .

भावार्थ : रामनाम वंदनीय आहे. रामनामाचा जप केल्याने जीवाचा उद्धार होतो. ॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनामाच्या स्मरणाने सांसारिक चिंता नष्ट होतात. प्रभुनामाच्या स्मरणाने जीव सर्व बंधनातून मुक्त होतो. प्रभुनामाच्या स्मरणाने मूर्ख मनुष्यही चतुर होतो. प्रभूच्या नामस्मरणाने जीव पापांपासून मुक्त होतो. त्याच्या स्मरणाने सर्व दु:ख नष्ट होते. ॥ २ ॥ प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणाने हृदय विकसित होते. प्रभूच्या नामस्मरणाने लक्ष्मीरूपी माया दासी होते. प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणाने सर्व निधींचा खजिना प्राप्त होतो. प्रभूच्या नामस्मरणाने जीव भवसागर पार करून जातो. प्रभूचे नाम पतितास पावन करते. प्रभुनामाने कोटी कोटी भक्तांचा उद्धार होतो. नानक सांगतात, मी दीन, प्रभूच्या दासांच्या दासास शरण गेलो आहे. माझे मस्तक सदैव संतांच्या चरणी विनम्र झाले आहे. ॥ ४ ॥ २ ॥

॥ माली गउड़ा महला ५ ॥

ऐसो सहाई हरि को नाम ॥ साध संगति भजु पूरन काम ॥ १ ॥ रहाउ ॥
बूडत कउ जैसे बेडी मिलत ॥ बूझत दीपक मिलत तिलत ॥
जलत अगनी मिलत नीर ॥ जैसे बारिक मुखहि खीर ॥
जैसे रण महि सखा भ्रात ॥ जैसे भूखे भोजन मात ॥
जैसे किरखहि बरस मेघ ॥ जैसे पालन सरनि सेंघ ॥ २ ॥
गरुड़ मुखि नही सरप त्रास ॥ सूआ पिंजरि नही खाइ बिलासु ॥
जैसो आंडो हिरदे माहि ॥ जैसो दानो चकी दराहि ॥ ३ ॥
बहुतु ओपमा थोर कही ॥ हरि अगम अगम अगाधि तुही ॥
ऊच मूचौ बहु अपार ॥ सिमरत नानक तरे सार ॥ ४ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८६)

शब्दार्थ : **सहाई** – सहायक. **बेडी** – नौका. **तिलक** – तेल. **सखा** – सहायक, बंधू. **किरखहि** – कृषी, शेती. **सेंघ** – सिंह. **त्रास** – त्रास, भय. **सूआ** – पोपट. **बिलासु** – मांजर. **आंडो** – अंडे. **चकी** – चक्की. **ओपमा** – उपमा. **मूचौ** – सर्वश्रेष्ठ. **सार** – लोखंड.

भावार्थ : प्रभुनाम हे असे सहायक आहे की साधुसंगतीत प्रभुनामाचे भजन केल्याने सर्व कार्य सिद्धीस जाते.

॥ १ ॥ रहाउ ॥ प्रभुनाम हे असे सहायक आहे की जशी बुडत्याला नौका प्राप्त व्हावी. विझणाऱ्या दिव्यास तेल प्राप्त व्हावे. आगीने जळणाऱ्यास पाणी प्राप्त व्हावे, भुकेल्या बालकास दूध मिळावे. ॥ १ ॥ ज्याप्रमाणे युद्धात बंधू सहायभूत होतो, उपाशी जीवास मातेकडून सुग्रास भोजन प्राप्त होते, जसे शेतावर मेघ बरसावा जसे सिंहाला (शूर पुरुषाला) शरण गेल्याने रक्षण होते त्याप्रमाणे प्रभुनाम जीवास सहायक होते. ॥ २ ॥ गरुडमंत्राच्या उच्चाराने सर्पापासून बचाव होतो. पिंजऱ्याचे संरक्षण लाभलेल्या पोपटास मांजराचा उपद्रव होत नाही. क्रौच पक्षिणी अंड्यांना हृदयाशी धरून त्यांना कोणाचाही उपद्रव पोहोचू देत नाही. जात्यात बाकी दाणे भरडले जात असले तरी जात्याच्या मधल्या खुंट्याशी असलेले दाणे त्या खुट्याच्या साहाय्याने सुरक्षित राहतात. त्याप्रमाणे प्रभुनाम जीवास सहायक होते. ॥ ३ ॥ प्रभुनामाच्या साहाय्यास आणखीही अनेक उपमा देता येतील. हे प्रभू ! तुझ्या नामाचा महिमा अनुपमेय आहे. मी येथे फारच थोड्यांचा उल्लेख केला आहे. तो प्रभू परमात्मा अगम्य, अगाध आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे. अपार आहे. नानक सांगतात, प्रभुनामाच्या स्मरणाने, पापाने लोहाप्रमाणे जड झालेला जीव, भवसागर पार करून जातो. ॥ ४ ॥ ३ ॥

॥ माली गउड़ा महला ५ ॥

इही हमारै सफल काज ॥ अपुने दास कउ लेहु निवाजि ॥ १ ॥ रहाउ ॥
चरन संतह माथ मोर ॥ नैनि दरसु पेखउ निसि भोर ॥
हसत हमरे संत टहल ॥ प्रान मनु धनु संत बहल ॥ १ ॥
संत संगि मेरे मन की प्रीति ॥ संत गुन बसहि मेरै चीति ॥
संत आगिआ मनहि मीठ ॥ मेरा कमलु बिगसै संत डीठ ॥ २ ॥
संत संगि मेरा होइ निवासु ॥ संतन की मोहि बहुतु पिआस ॥
संत बचन मेरे मनहि मंत ॥ संत प्रसदि मेरे बिखै हंत ॥ ३ ॥
मुकति जुगति एहा निधान ॥ प्रभ दइआल मोहि देवहु दान ॥
नानक कउ प्रभ दइआ धारि ॥ चरन संतन के मेरे रिदे मझारि ॥ ४ ॥ ४ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९८७)

शब्दार्थ : **इही** – हे. **काज** – कार्य. **निवाजि** – कृतार्थ. **माथ** – मस्तक. **मोर** – माझे. **भोर** – दिवस. **हसत** – हात. **टहल** – सेवा. **बहल** – अर्पण. **डीठ** – दर्शन. **बिखै** – विकार.

भावार्थ : हे प्रभो ! तू तुझ्या ह्या दासाला आपल्या चरणी शरण देऊन कृतार्थ कर. हे माझे कार्य सफल कर. ॥ १ ॥ रहाउ ॥ माझे मस्तक सदैव संतांच्या चरणी लीन होवो. माझे नेत्र रात्रंदिवस त्यांचेच दर्शन करीत राहोत. माझे हात सदैव संतांची सेवा करण्यात रत होवोत. माझे तन, मन, धन प्राण सर्वस्व संतचरणी अर्पण होवोत. ॥१॥ माझे मन संतांच्या प्रेमात रत व्हावे. माझ्या चित्तात संतांचे गुण वास करोत. संतांची आज्ञा माझ्या मनास गोड वाटो. संतांच्या दर्शनाने माझे हृदयकमल विकसित होवो. मला संतांच्या संगतीची तीव्र ओढ लागली आहे. संतांचे वचन हाच माझ्या मनाचा उपदेश आहे. मंत्र आहे. संतांच्या कृपेने माझ्या मनातील विषयविकार नष्ट झाले आहेत. ॥ ३ ॥ संतसंगत हेच माझ्या मुक्तीचे द्वार आहे. हाच माझ्या मुक्तीचा मार्ग आहे. हे प्रभो ! हे दयाळू परमात्मा ! मला हे दान दे. नानक म्हणतात, प्रभू परमात्मा माझ्यावर दया कर. माझ्या हृदयात संतचरण दृढपणे वास करोत. ॥ ४ ॥ ४ ॥

॥ माली गउड़ा महला ५ ॥

सभ कै संगी नाही दूरि ॥ करन करावन हाजरा हजूरि ॥ १ ॥ रहाउ ॥
सुनत जीओ जासु नामु ॥ दूख बिनसे सुख कीओ बिस्रामु ॥
सगल निधि हरि हरि हरे ॥ मुनि जन ता की सेव करे ॥ १ ॥
जा कै घरि सगले समाहि ॥ जिस ते बिरथा कोइ नाहि ॥
जीअ जंत्र करे प्रतिपाल ॥ सदा सदा सेवहु किरपाल ॥ २ ॥
सदा धरमु जा कै दीबाणि ॥ बेमुहताज नही किछु काणि ॥
सभ किछु करना आपन आपि ॥ रे मन मेरे तू ता कउ जापि ॥ ३ ॥
साध संगति कउ हउ बलिहार ॥ जासु मिलि होवै उधारु ॥
नाम संगि मन तनहि रात ॥ नानक कउ प्रभि करी दाति ॥ ४ ॥ ५ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९८७)

शब्दार्थ : **हाजरा हजुरि** – सर्वत्र परिव्याप्त. **समाहि** – सामावलेले. **दिबाणि** – दरबार. **बेमुहताज** – निष्काळजी. **काणि** – काळजी. **उधारु** – उद्धार.

भावार्थ : तो प्रभू परमात्मा सर्व जीवांच्या जवळ आहे. तो जराही दूर नाही. तो प्रभू परमात्माच सर्व काही करणारा व करवणारा आहे. तो सदैव सर्वत्र उपस्थित असतो व तो सर्वव्याप्त आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ त्याचे नाम ऐकूनच मी जीवन जगतो. त्या प्रभू परमात्म्याच्या नामाने दु:ख नष्ट होते, सुख व विश्राम प्राप्त होतो. हरिनामातच सर्व संपत्ती साठवलेली आहे. मुनिजन अशा प्रभू परमात्म्याची सेवा करतात. ॥ १ ॥ त्या प्रभू परमात्म्याच्या अंत:करणात सर्व काही सामावलेले आहे. त्याच्याविना काहीही नाही. तो प्रभू परमात्मा सर्व जीवजंतूंचे पालनपोषण करतो. अशा ह्या कृपाळू प्रभू परमात्म्याची मी सदैव सेवा करतो. ॥ २ ॥ त्या प्रभू परमात्म्याचा दरबार सदैव धर्मावर आधारलेला आहे. त्यामुळे तो सदैव निष्काळजी आहे. त्याच्याकडे कशाचीही उणीव नाही. तो प्रभू जे काही करावयाचे ते स्वत: करतो. हे माझ्या मना तू सदैव त्याचे स्मरण कर. ॥ ३ । मी संतसंगतीवर स्वत:स समर्पित करतो. कारण संतसंग प्राप्त झाल्याने उद्धार होतो. माझे मन प्रभुनामात रंगून गेले आहे. दास नानक सांगतात, मला प्रभू परमात्म्याने हे दान कृपापूर्वक दिले आहे. ॥ ४ ॥ ५ ॥

माली गउड़ा महला ५ दुपदे

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

हरि समरथ की सरना ॥
जीउ पिंडु धनु रासि मेरी प्रभ एक कारन करना ॥ १ ॥ रहाउ ॥
सिमरि सिमरि सदा सुखु पाईऐ जीवणै का मूलु ॥

रवि रहिआ सरबत ठाई सूखमो असथूल ॥ १ ॥
आल जाल बिकार तजि सभि हरि गुना निति गाउ ॥
कर जोड़ि नानकु दानु मांगै देहु अपना नाउ ॥ २ ॥ १ ॥ ६ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८७)

शब्दार्थ : **जीवणै** – जीवनाचे. **सुखमो** – सूक्ष्म. **असथूल** – स्थूल. **आल** – घरचे व्यवहार.

भावार्थ : मी समर्थ प्रभू परमात्म्यास शरण गेलो आहे. सर्व काही कर्ताकरविता तो प्रभू परमात्मा माझे तन, मन, धन, प्राण सर्व काही आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ तो प्रभू परमात्माच जीवनाचा मूलाधार आहे. सदैव त्याचे स्मरण केल्याने सुख प्राप्त होते. तो सर्व ठिकाणी आहे. कोठे सूक्ष्म रूपाने तर कोठे स्थूल रूपाने तो वास करतो. ॥ १ ॥ संसारातील सर्व व्याप, सर्व विकार यांचा त्याग करून नित्य प्रभू परमात्म्याचे गुण गावेत. नानक दोन्ही कर जोडून प्रभू परमात्म्याकडे दान मागतो, की हे प्रभो ! मला तुझे नाम दे. ॥ २ ॥ १ ॥ ६ ॥

॥ माली गउड़ा महला ५ ॥

प्रभ समरथ देव अपार ॥
कउनु जानै चलित तेरे किछु अंतु नाही पार ॥ १ ॥ रहाउ ॥
इक खिनहि थापि उथापदा घड़ि भंनि करनैहारु ॥
जेत कीन उपारजना प्रभु दानु देइ दातारु ॥ १ ॥
हरि सरनि आइओ दासु तेरा प्रभ ऊच अगम मुरारु ॥
कढि लेहु भउजल बिखम ते जनु नानकु सद बलिहार ॥ २ ॥ २ ॥ ७ ॥

(श्री गु. ग्रं. सा. ९८८)

शब्दार्थ : **चलित** – कौतुक, लीला. **घडि** – घडवतो. **भंनि** – बनवतो. **जेन** – जितके. **उपारजना** – चारापाणी. **कढि** – काढून. **बिखम** – कठीण.

भावार्थ : हे प्रभो ! तू समर्थ व अपार आहेस. तुझ्या लीला कोण जाणतो ? तुझ्या लीलांना ना अंत ना पार ॥ १ ॥ रहाउ ॥ तू एक क्षणात स्थापित करतोस व क्षणात विस्थापित करतोस. एक क्षणात बनवतो, बिघडवतो. हे प्रभो ! तूच ह्या सृष्टीत जीव उत्पन्न करतोस. त्या साऱ्यांच्या चाऱ्या-पाण्याचीही सोय तूच करतोस. सर्वांना दान देणारा प्रभू तूच आहेस. ॥ १ ॥ हे प्रभो ! तुझे दास तुला शरण येतात. तू श्रेष्ठ आहेस. अपार आहेस. दास नानक तुझ्या चरणी सर्वस्व समर्पण करतो. त्यास ह्या कठीण अशा भवसागरातून बाहेर काढ. ॥२॥२॥७॥

॥ माली गउड़ा महला ५ ॥

मनि तनि बसि रहे गोपाल ॥
दीन बांधव भगति वछल सदा सदा क्रिपाल ॥ १ ॥ रहाउ ॥
आदि अंते मधि तू है प्रभ बिना नाही कोइ ॥

पूरि रहिआ सगल मंडल एकु सुआमी सोइ ॥१॥
करनि हरि जसु नेत्र दरसनु रसनि हरि गुन गाउ ॥
बलिहारि जाए सदा नानकु देहु अपणा नाउ ॥ २ ॥ ३ ॥ ८ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८८)

शब्दार्थ : **मंडल** – विश्व. **रसनि** – जिव्हा.

भावार्थ : माझे तन, मनात तो प्रभू परमात्मा वास करतो. जो दीनबंधू, भक्तवत्सल व सदैव कृपा करणारा आहे. ॥ १ ॥ रहाउ ॥ हे प्रभू ! सृष्टीच्या आधी, मध्ये व अंति तू आणि तूच आहेस. प्रभू परमात्म्याशिवाय अन्य कोणीही नाही. तो एकमेव प्रभू परमात्मा पूर्ण विश्वात सगळीकडे पूर्णपणे भरून राहिला आहे. ॥ १ ॥ मी कानांनी हरीचे यशोगान ऐकतो. डोळ्यांनी प्रभू परमात्म्याचे दर्शन घेतो. जिव्हेने हरीचे गुण गातो. हे प्रभो ! नानक तुझ्या चरणी सर्वस्व अर्पण करतो. त्याला तुझे नाम दे. ॥ २ ॥ ३ ॥ ८ ॥

राग माली गउड़ा
बाणी भगत नामदेव जी की ॥

१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.

धनि धंनि ओ राम बेनु बाजै ॥ मधुर मधुर धुनि अनाहत गाजै ॥ १ ॥ रहाउ ॥
धनि धनि मेघा रोमावली ॥ धनि धनि क्रिसन ओढै कांबली ॥ १ ॥
धनि धनि तू माता देवकी ॥ जिह ग्रिहि रमइआ कवलापती ॥
धनि धनि बन खंड बिंद्राबना ॥ जह खेलै स्री नाराइना ॥ ३ ॥
बेनु बजावै गोधनु चरै ॥ नामे का सुआमी आनद करै ॥ ४ ॥ १ ॥(श्री गु. ग्रं. सा. ९८८)

शब्दार्थ : **रोमावली** – लोकर. **मेघा** – मेंढा. **ओढै** – पांघरतो. **कवलापती** – लक्ष्मीपती, विष्णू. **आनद** – आनंद.

भावार्थ : त्या प्रभू परमात्म्याचे बासरीवादन ऐकून धन्य झाल्यासारखे वाटते. त्यातून निघणारा तो दिव्य अनाहत नाद मधुर मधुर वाटतो. ज्या लोकरीचे कांबळे श्रीकृष्णाने पांघरले आहे, ती लोकर धन्य होय. तो श्रीकृष्णही धन्य होय. जिच्या घरी तो भगवान विष्णू रमला आहे, ती माता देवकी धन्य आहे. जिथे भगवान श्री नारायण क्रीडा करीत आहे, ते वृंदावनही धन्य आहे. नामदेवाचा स्वामी वेणू वाजवीत, गाई चारत आनंदात रममाण झाला आहे. ॥ ४ ॥ १ ॥

मेरो बापु माधउ तू धनु केसौ सांवलीओ बीठुलाइ ॥ १ ॥ रहाउ ॥
कर धरे चक्र बैकुंठ ते आए गज हसती के प्रान उधारीअले ॥
दुहसासन की सभा द्रोपती अंबर लेत उबारीअले ॥ १ ॥
गोतम नारि अहलिआ तारी पावन केतक तारीअले ॥

ऐसा अधमु अजाति नामदेउ तउ सरनागति आइअले ॥ २ ॥ २ ॥
(श्री गु. ग्रं. सा. ९८८)

शब्दार्थ : **केसौ** – केशव. **सावलीओ** – सावळा. **अंबर** – वस्त्र. **लेत** – उतरविणे. **उबारीअले** – रक्षण केलेस. **केतक** – कित्येक.

भावार्थ : हे माझ्या बापा, तारणहारा, माधवा, केशवा, सावळ्या विठ्ठला ! तू धन्य आहेस. त्या गजेंद्राला संकटमुक्त करण्यासाठी तू हाती चक्र घेऊन वैकुंठाहून ह्या भूलोकी येऊन त्यास तारलेस. दु:शासन जेव्हा भर दरबारात द्रौपदीचे वस्त्रहरण करीत होता, तेव्हा तूच तिचे लज्जारक्षण केलेस. गौतमपत्नी अहल्या, जी शिळा होऊन पडली होती, तिचाही उद्धार केलास. आणखी कितीतरी पातक्यांना पावन करून त्यांचा उद्धार केलास. क्षुद्र, हीन-कुलीन असा हा नामदेव तुला शरण आला आहे. हे प्रभो ! माझे रक्षण कर, माझा उद्धार कर. ॥ २ ॥ २ ॥

सभै घट रामु बोलै रामा बोलै ॥ राम बिना को बोलै रे ॥ १ ॥ रहाउ ॥
अेकल माटी कुंजर चीटी भाजन है बहु नाना रे ॥
असथावर जंगम कीट पतंगम घटि घटि रामु समाना रे ॥ १ ॥
एकल चिंता राखु अनंता अउर तजहु सभ आसा रे ॥
प्रणवै नामा भए निहकामा को ठाकूर को दासा रे ॥ २ ॥ ३ ॥ (श्री गु. ग्रं. सा. ९८८)

शब्दार्थ : **कुंजर** – हत्ती. **चीटी** – मुंगी. **असथावर** – स्थावर, वृक्ष, दगड आदी पदार्थ, न हलणारे. **निहकामा** – निष्काम. **को** – कोण. **नान्हा** – अनेक प्रकारचे. **जंगम** – जीवजंतू.

भावार्थ : प्रत्येक जीवाच्या ठायी तो प्रभुरामच आहे. प्रत्येक मुखातून रामच बोलतो आहे. रामाशिवाय अन्य कोण बोलणार ? अजस्त्र हत्तीपासून क्षुद्र मुंगीपर्यंत नाना प्रकारचे जीवजंतू एकाच मातीचे बनले आहेत. स्थावर, जंगम, कीटक, पतंग सर्व देहांच्या ठायी तो प्रभुरामच भरून राहिला आहे. बाकी सर्वांचा त्याग करून हा नामदेव एकमात्र तुला शरण आला आहे. नामदेव म्हणतात, हे प्रणव ओंकाररूपी प्रभो परमात्मा ! मी निष्काम बनून तुझ्याकडे आलो आहे. आता कोण परमेश्वर आणि कोण त्याचा दास ? दोघेही एकरूप झालो आहोत. ॥ २ ॥ ३ ॥

परिशिष्ट

भक्तांची चरित्रे

१. बाबा शेख फरीद

बाबा शेख फरीद हे बाराव्या शतकातील पंजाबमधील एक थोर सूफी मुस्लीम संत होते. त्यांच्या रचनांचा श्रीगुरुग्रंथसाहिबमध्ये समावेश केला गेला आहे.

पार्श्वभूमी :

अकराव्या शतकात गजनी व काबूल येथील मुस्लीम राजकर्त्यांमध्ये सदैव लढाया होत असत. त्याचा त्रास गरीब बिचाऱ्या शांतता प्रिय सामान्य जनतेला भोगावा लागे. ह्या त्रासाला कंटाळून गजनीच्या राजपरिवारातील शेख शईब हे आपल्या कुटुंब कबिल्यासह भारतात आश्रयार्थ आले व ते पंजाब प्रांतातील मुलतान या शहरी स्थायिक झाले. त्याच सुमारास महंमद पैगंबर यांच्या आप्तांपैकी काबूलचे एक मुल्ला मुलतान जवळच्या करोर ह्या गावी आश्रयार्थ आले. त्यांच्या बरोबर महंमद पैगंबरांच्या वंशातील एक मुलगी 'मरिअम' ही सुद्धा भारतात आश्रयार्थ आली. पुढे शेख शईबचा मोठा मुलगा 'जमालउद्दिन' याच्याशी 'मरिअम'चा विवाह झाला. जमालउद्दिन व मरिअम यांचा दुसरा पुत्र म्हणजेच 'बाबा शेख फरीद' होत.

जन्म व बालपण

शेख फरीद यांचा जन्म हिजरी ५६९ मध्ये रमजान महिन्याच्या पहिल्या दिवशी झाला. (इ.स. ११७३) रमजान महिन्यात मुसलमान लोक महिनाभर रोजे (उपास) करतात. चंद्र दर्शन झाल्यावर उपास सोडतात. पण ज्या दिवशी फरीदचा जन्म झाला त्या दिवशी आभाळ मेघांनी झाकून गेले होते. चंद्र दर्शन होणे अशक्य होते. मग रोजा केव्हा सोडायचा असा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा तेथील मौलवीने सांगितले, ''मरिअमच्या पोटी आजच एक दिव्य बालक जन्मास आले आहे. ते जेव्हा स्तनपान करील तेव्हा आपण उपवास सोडू.'' मौलवीने असे सांगण्याचे कारण असे होते, की त्या बालकाने जन्मल्यापासून आईच्या स्तनास तोंडही लावले नव्हते. पण एक नवल घडले. रात्र झाली. चंद्रोदयाचा समय झाला अगदी त्याच वेळी बालकाने स्तनपान केले. लोकांना आनंद झाला. उपवास सुटला. असे म्हणतात, की त्या बाळाने संपूर्ण रमजानचे महिन्यात कधीही दिवसा स्तनपान केले नाही. रात्री चंद्रोदयानंतरच स्तनपान केले. ह्यामुळे लोकांची खात्रीच पटली, की हे मूल जणू ईश्वरी अवतारच आहे. पुढे योग्य वेळी मुलाचे 'फरीदउद्दिन मसौद' असे नामकरण करण्यात आले. हेच बालक पुढे 'बाबा शेख फरीद' ह्या नावाने विख्यात झाले.

शक्करगंज

बाळ फरीद हळूहळू मोठा होऊ लागला. बोलू चालू लागला. त्याला ईश्वरभक्तीची गोडी लागावी म्हणून त्याची आई मरिअम त्याला भक्तिगीते शिकवू लागली. नमाज शिकवू लागली. पण बाळ फरीदने आईस विचारले, ''आई प्रार्थना कशाला करायची? नमाज कशाकरिता म्हणायचा?'' त्याची समजूत काढण्यासाठी आई म्हणाली,

''बाळ प्रार्थना केल्याने अल्लाह आपल्यावर प्रसन्न होतो. तो आपल्याला चांगले फळ देतो. मिठाई देतो.'' हे मुलाला खरे वाटावे म्हणून आईने तो ज्या आसनावर प्रार्थनेस बसे त्याच्या खाली साखरेची पुडी ठेवली. प्रार्थना झाल्यावर आसनाखाली साखरेची पुडी पाहून बाळ फरीदचा आईच्या सांगण्यावर विश्वास बसला. एक दिवस फरीदची आई साखर ठेवावयास विसरली. फरीद व मित्र आपापल्या आसनावर बसून प्रार्थना म्हणू लागले. प्रार्थना संपली. फरीदने आपले आसन उचलले पण आज त्याखालून साखरेऐवजी मातीचे ढेकूळ निघाले. फरीदने त्याचा एक तुकडा आपल्या जिभेवर ठेवला. तो गोड लागला. त्याने आपल्या मित्रांनाही त्या मातीच्या ढेकळाचा प्रसाद दिला. त्यांनाही तो साखरेसारखा गोड लागला. तेव्हापासून मुलांनी त्यास 'शक्करगंज' म्हणावयास सुरुवात केली. ही दंतकथा सोडली तर फरीदची वाणीच इतकी मिठास होती की त्याने केलेला उपदेश इतका गोड असे की जणू साखरेचे कोठार 'शक्करगंज' म्हणूनच त्यांच्या नावामागे शक्करगंज ही उपाधी लागली असावी.

धार्मिक शिक्षण

वयाच्या सोळाव्या वर्षी फरीद आपल्या माता पित्यांसह 'हजयात्रे'स गेला. तेथून परत येताना फरीदच्या पित्याने फरीदला काबूल येथे इस्लाम धर्माच्या शिक्षणासाठी ठेवले. तेथे काही वर्षे राहून फरीदने इस्लाम धर्मतत्त्वांचा सखोल अभ्यास केला. शिक्षण पूर्ण करून तो मुलतानला परत आला. त्याच वेळी दिल्लीहून 'ख्वाजा कुतुबुद्दिन बख्तीयार उशी' हे सूफी संत मुलतान येथे आले होते. फरीद त्यांच्या प्रवचनास जाऊ लागला. त्यांच्या सहवासात फरीद पूर्णपणे रममाण झाला व त्याने त्यांचे शिष्यत्व पत्करले. ख्वाजा कुतुबुद्दिनही त्याच्या कुशाग्रबुद्धीवर, प्रगाढ श्रद्धेवर खूष झाले व ते त्यास आपल्याबरोबर दिल्लीस घेऊन गेले. तेथे त्यांच्या मार्गदर्शनाखाली फरीदची अध्यात्मिक साधना सुरू झाली. फरीदची योग्य ती अध्यात्मिक प्रगती झाली अशी खात्री झाल्यावर कुतुबुद्दिन बख्तीयार यांनी फरीदला हांसी व सरसा ह्या गावात इस्लाम धर्माच्या प्रचारार्थ पाठविले. ख्वाजा कुतुबुद्दिन बख्तीयार उशी हे पैगंबरवासी झाल्यावर शेख फरीद पाकपट्टण येथे स्थायिक झाले व त्यांनी आपल्या गुरुंचे कार्य पुढे चालू ठेवले.

काही प्रसंग व कथा

शेख फरीद यांच्याबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत. त्यांपैकी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची दर्शक अशी एक कथा.

एकदा शेख फरीद व त्यांची आई रात्री झोपले असता त्यांच्या घरात चोरी करण्याच्या उद्देशाने एक इसम हळूच घुसला. त्याने काही माल उचलला व तो परत जाण्यासाठी मागे वळला आणि एक आश्चर्य घडले. एकाएकी त्याची दृष्टीच गेली. डोळ्यांना काही दिसेनासे झाले. तो भीतीने किंचाळला. घरातले सर्व लोक जागे झाले. नोकराने त्या चोरास पकडले. चोराने आपला गुन्हा कबूल केला. माता मरिअमने त्यास असले वाईट धंदे सोडून देण्यास व सन्मार्गाने चालण्यास सांगितले. मरिअमचा तो उपदेश ऐकून चोरास आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. त्याने क्षमायाचना केली. फरीदने त्यास जवळ घेतले. त्याच्या डोळ्यांवरून प्रेमाने हात फिरवला. त्याच क्षणी त्या चोरास परत स्वच्छ दिसू लागले. त्याने फरीद व मरिअमच्या पायावर डोके ठेवले व खाली मान घालून

तो निघून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळीच तो चोर आपल्या बायका-मुलांना घेऊन फरीद यांच्या घरी आला. येताना त्याने दुधाचा पेला आणला होता. तो त्याने मरिअमच्या चरणी ठेवला व नमस्कार करून म्हणाला, माताजी ! माझे अपराध पोटात घाला. मला क्षमा करा व मला आणि माझ्या कुटुंबाला सन्मार्ग दाखवा. बाबा शेख फरीद यांनी त्यास उपदेश केला. त्यांना इस्लाम धर्माची दीक्षा दिली व त्यास आपल्याजवळ ठेवून घेतले. पुढे त्या कुटुंबाने शेख फरीद यांच्या शिकवणुकीप्रमाणे जगून आपले जीवन सार्थकी लावले.

काठ की रोटी

बाबा शेख फरीद यांनी आपल्या साधनेच्या काळात वासना व विकार यांना जिंकण्यासाठी अनेक घोर उपाय केले. असे सांगतात, की त्यांनी काही दिवस स्वत:स उलटे टांगून घोर तपश्चर्या केली तसेच क्षुधेची वासना मारण्यासाठी ते आपल्याजवळ एक लाकडाची चकती ठेवत व भूक लागली की ते चघळीत. पण ह्या साऱ्या गोष्टी केवळ दंतकथा असून शेख फरीद यांच्या वचनांचा केवळ विपर्यास होय असे म्हणणे योग्य होईल. वास्तविक जंगलात जाऊन तपस्या वगैरे करण्यास त्यांचा अत्यंत विरोध होता. ते म्हणतात,

फरीदा जंगलु किआ भवहि वणि कंडा मोडेहि॥
वसी रबु हिआलीऐ जंगलु किआ ढूढेह॥ १९ ॥ (श्री गु. ग्रं. सा. १३७८)

फरीद सांगतात, अरे ईश्वरप्राप्तीसाठी रानावनात कशाला हिंडतोस. ईश्वराला जंगलात कशाला शोधत फिरतोस. अरे (रब) ईश्वर तर तुझ्या हृदयातच आहे. उगाच वनात जाऊन पायात काटे मात्र मोडतील.

'काठ की रोटी' बद्दल असाच विपर्यास झालेला दिसतो. फरीद म्हणतात-

फरीदा रोटी मेरी काठ की लावणु मेरी भूख॥
जिना खाधी चोपडी घणे सहनिगेदूख ॥ २८॥
रुखी सुखी खाइ कै ठंढा पाणी पीउ॥
फरीदा देखि पराई चोपडी ना तरसाए जीउ॥ २९॥ (श्री गु.ग्रं.सा. १३७९)

ह्या दोन श्लोकांवरून असे दिसते, की फरीद शिळीपाकी लाकडासारखी कडक झालेली भाकरी व थोडेसे तोंडी लावणे एवढ्यावर समाधानी होते. स्वादिष्ट रुचकर भोजनाने व्याधी उत्पन्न होऊन दु:खच सोसावे लागते. पुढे ते लोकांना उपदेश करताना सांगतात- अरे जीवा ! तू शिळीपाकी भाकरी खा. त्यावर थंड पाणी पी. त्यातच समाधान मान. आपली कष्टाची भाकरीच बरी. दुसऱ्याच्या स्वादिष्ट व भरपूर तूप चोपडलेल्या अन्नाकडे पाहून स्वत:चा जीव दु:खी करू नकोस.

शेख महंमद यांची शिकवण

बाबा शेख फरीद यांच्या उपदेशानुसार जीवाने परमेश्वरास आपल्या अंत:करणातच शोधावे. बाहेर अन्यत्र फिरण्याचे कारण नाही. प्रभू परमात्मा जे देईल त्यात समाधान मानावे. सतत प्रभू परमात्म्याचे स्मरण

करावे. मोहमायेपासून सावध राहावे. सर्व जीवांप्रती प्रेमभाव मनात बाळगून त्यांची सेवा करावी. कोणाही जीवास दु:ख देऊ नये. असे केल्याने परमेश्वर प्राप्त होईल.

अशा प्रकारे लोकांना सन्मार्गावर आणणारे बाबा शेख फरीद वयाच्या ९४ व्या वर्षी इ.स. १२६६ मध्ये मोहरम महिन्याच्या पाचव्या दिवशी अल्लाला प्यारे झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो !

श्री गुरु ग्रंथ साहिब व फरीद वाणी

श्री गुरु नानक देव हे बाबा शेख फरीद यांच्यानंतर २०० वर्षांनी जन्मले. श्री गुरु नानक देव यांची आपल्या तिसऱ्या उदासीच्या (परिभ्रमण) काळात शेख फरीद यांच्या धर्मपीठावर पीठासीन असलेल्या शेख ब्रह्म म्हणजेच शेख फरीद दुसरे यांची भेट झाली व त्यांचेकडून बाबा शेख फरीद यांची वाणी त्यांना प्राप्त झाली. त्यापैकी ११२ श्लोकांचा व ४ पदांचा समावेश श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये करण्यात आला आहे.

२. श्री संत रविदास

श्री संत रविदास हे स्वामी रामानंदांच्या अत्यंत श्रेष्ठ अशा बारा अंतरंग शिष्यांपैकी एक महान संत होते. त्यांचा जन्म काशी क्षेत्रापासून जवळच असलेल्या मंडूर या गावी झाला. ते रई दास, रैदास व रोहिदास अशा विविध नावांनी ओळखले जातात. त्यांच्या जन्माबद्दल एक कथा सांगितली जाते-

काशी क्षेत्राजवळच श्री गोवर्धनपूर येथे रघुराम व कर्मादेवी हे एक धर्मकार कुटुंब राहत असे. कच्चे चामडे कमवून त्यापासून जोडे, चाबुक, लगाम, जीन आदी विविध वस्तू बनवून विकणे हा त्यांचा पिढीजात व्यवसाय होता.

एक दिवस दूरच्या एका गावाहून साहित्य विक्री करून सायंकाळी परत येत असताना वाटेत एक जंगल होते. त्यास 'मृगवन' म्हणत, तेथे एका बुद्ध विहाराच्या खिंडारात रघुरामास एक साधू ध्यानस्थ बसलेले दिसले. रघुरामाने त्यास नमस्कार करून आशीर्वाद मागितला. साधूने त्याच्याकडे खिरीच्या भोजनाची इच्छा व्यक्त केली. दुसऱ्या दिवशी रघुराम व कर्मादेवी खिरीसह सर्व भोजन घेऊन साधूकडे आले व त्यांनी त्यास तातीत भोजन वाढले. साधू तृप्त झाले. त्याने रघुरामास वर मागण्यास सांगितले. लग्न होऊन बरेच दिवस होऊनही त्यांना मूलबाळ नव्हते. त्यांनी आपली ही व्यथा साधूपुढे व्यक्त केली. साधूने, 'तुम्हास लवकरच एक पुत्र होईल व तो तुमच्या कुलाचे नाव अजरामर करील.' असा आशिर्वाद दिला. त्या आशीर्वादाप्रमाणे त्यांना एक पुत्ररत्न प्राप्त झाले. त्यांचा जन्म मांडूर येथेच झाला असे सांगणारा एक श्लोक रैदास रामायण ग्रंथात दिला आहे, तो असा-

काशी ढिग मांडूर स्थाना, शुद्ध वरण करत गुजराना॥
मांडूरनगर लीन औतार रविदास तुभनाम हमारा॥

रविदासांचा जन्म माघ शु १५ संवत १४३३ ह्या दिवशी झाला. त्याबद्दल 'रविदास की भक्तिसाधना' ह्या ग्रंथात

चोदह सौ तैंतीस की, माघ सुदी पंद्रास।
दु:खियो के कल्याणहित प्रगटे श्री रविदास॥

मूल जन्माला आले पण काही केल्या ते स्तनपान करीना. सगळ्यांना चिंता पडली. कर्मादेवी रामानंदांच्या सतसंगास जात असे. तिची रामानंदांवर श्रद्धा होती. तिने रामानंदांना बोलावले. रामानंदांनी रामाचे चरणामृत बाळास पाजले व ताबडतोब बाळ दूध पिऊ लागला. बाळाचा जन्म रविवारी झाला म्हणून त्याचे नाव 'रविदास' असे ठेवण्यात आहे.

रविदासांचे माता पिता सात्त्विक वृत्तीचे होते. भक्तिपरायण होते. हेच संस्कार घेऊन रविदास जन्मास आले होते. त्यामुळे लहान वयातच ते रामभक्ती करू लागले. रविदास जस जसा वाढू लागला तस तसा त्याचे रामभक्तीचे वेड वाढतच गेले. तो वारंवार पंचघाटावर स्वामी रामानंदांच्या प्रवचनास जाऊ लागला. वयाच्या सातव्या वर्षीच रविदास बहुश्रुत व विद्वान झाला. त्याबद्दल रविदास दर्शन ग्रंथात खालीलप्रमाणे उल्लेख आहे-

दिन दिन वडो भयो रविदासा मन मैं है हरि का विसवासा।
वरस सात कौ भयो है जब ही नौधा भगति दिढाई तव ही।

रविदासांच्या मनातील प्रभुभक्तीची ओढ दिवसेंदिवस वाढतच होती. ईश्वरप्राप्तीचा मार्ग सापडावा म्हणून गुरु करणे आवश्यक आहे हे जाणून ते स्वामी रामानंदांकडे गेले. पण रामानंद आपणास स्वीकारतील का ही शंका त्यांच्या मनात होती व तसे त्याने रामानंदांना सांगितलेही. रामानंद त्यास म्हणाले, ''अरे कसली जात घेऊन बसलास? तू चांभार नाहीस. तू शूद्र नाहीस. तू तर माझा बंधू आहेस. सहोदर आहेस.'' ह्यावर रविदास आनंदित झाला व त्याने रामानंदांना त्यास अनुग्रह देऊन आपला शिष्य करून घ्यावे अशी प्रार्थना केली. रामानंदांनीही त्यास विधिवत दीक्षा देऊन त्यास ''ॐ रामायनम:'' हा षडाक्षरी मंत्र दिला. ह्यासंबंधी भक्त रत्नावलीमध्ये खालीलप्रमाणे उल्लेख आढळतो.

रामानंद मोहि गुरु मिल्यो माया ब्रह्म विसास।
राम नाम अमि रस पियौ रविदासहि भयौ पलास॥
रं (ऊं) राम मुहि गुरु रामा दिन्हौ नहि इह मंत्र विसाराउ॥

आता रविदास पूर्णपणे राममय झाला. त्याने धंद्यात लक्ष घालावे, नीट संसार करावा म्हणून रघुरामांनी रविदासाचे लग्न 'लोना' ह्या सुस्वरूप व शालीन मुलीशी लावून दिले व दुकानात बसावयास लावले. रविदासही दुकान चालवू लागले. जोडे शिकवू लागले. मुखाने प्रभुनामाचा उच्चार करावा व हाताने काम करावे असा नित्यनेम सुरू झाला. ते जोडे घेणारा ग्राहक जे दाम देईल ते घेत असत. एवढेच नव्हे तर रस्त्याने कोणी साधू बैरागी अनवाणी दिसला तर त्यास ते दुकानात घेऊन येऊन त्याच्या पायात जोडे घालीत. त्याचे ते पैसेही घेत

नसत. ह्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. धंदा आतबट्ट्यात जाऊ लागला. अखेर वडिलांनी त्यांना घरातून बाहेर काढले. रविदास व लोना आता जवळच एका झोपडीत राहू लागले. आता तर त्यांना सर्व दिशा मोकळ्या झाल्या. त्यांची ईश्वरभक्ती दिन प्रतिदिन वाढतच गेली.

एकदा एक साधू रविदासांकडे आला. त्याचे अठरा विश्वे दारिद्र्य पाहून त्याला रविदासाची कीव आली. त्याने त्यास परीस देऊ केला. रविदासाने तो घेण्याचे साफ नाकारले. रविदासांनी सांगितले, ''मी आहे ह्यात सुखी आहे. मला सोन्या-नाण्याची गरज नाही. मला सतगुरूरूपी परीस प्राप्त झाला आहे. माझ्या मानवजन्माचे सोने झाले आहे.'' ते म्हणतात, **''माधव पारसमणो लइ जाउ। मोहे सोनेका नही चाऊ॥ परम पारस गुरु भेटिओ पुरब लिंपत लिलाट॥** शेवटी त्या साधूने तो परीस रविदासांच्या झोपडीच्या वळचणीस खोचून ठेवला. पुढे कित्येक महिने उलटून गेले. तो साधू परत रविदासाकडे आला. पाहतो तो काय रविदासाची स्थिती होती तशीच होती व परीसही जेथे होता तेथेच होता. साधू परीस घेऊन गेला. पण दुसरे दिवसापासून एक नवीनच प्रकार सुरू झाला. रविदासांच्या देवघरातून देवाच्या आसनाखाली रोज पाच सुवर्णमुद्रा निघू लागल्या. रविदास बावचळून गेले. पण एक दिवस त्यांना स्वप्नात प्रत्यक्ष भगवंतांनी दर्शन देऊन त्यांनी रविदासास त्या मोहोरा स्वीकारण्याचा आदेश दिला. रविदासांनी ईश्वरी आदेश मानला पण आपल्या प्रपंचासाठी ते त्यातला एक पैसाही खर्च करत नसत. आपल्या चरितार्थासाठी त्यांनी आपला जोडे शिवण्याचा धंदा चालूच ठेवला व निघणाऱ्या मोहरा सार्वजनिक कार्यार्थ खर्च करण्यास सुरुवात केली. त्या धनातून त्यांनी एक सुंदर मंदिर बांधले. त्यालगत एक सत्संग भवन निर्माण केले व तेथे साधु-संतांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था केली. ह्या गोष्टीमुळे रविदासांची कीर्ती दूरवर पसरली व त्यांच्या सतसंगास अलोट गर्दी जमू लागली.

रविदासांची ही लोकप्रियता उच्चवर्णीयांना बोचू लागली. त्यांनी काशीराजाकडे तक्रार केली. राजाने न्यायसभा बोलावली. ब्राह्मण म्हणाले, ''रविदास चांभार आहे. त्यास ईश्वरभक्ती करण्याचा वा ईश्वरपूजा करण्याचा अधिकार नाही.'' त्यावर रविदास शांत चित्ताने उत्तरले, ''महाराज सारे जीव ईश्वराचीच लेकरे आहेत ना ? मग त्यात हा उच्च, हा नीच असा भेदभाव करणे बरोबर आहे का ? साऱ्यांचीच शरीरे पंचमहाभूतांपासून बनली आहेत ना ? मग त्यात भेदाभेद का ? सूर्य सर्वांनाच प्रकाश देतो. वायू सर्वांसाठी वाहत असतो. माझ्या गुरूने मला असे शिकवले आहे की, प्रभू दरबार सर्वांसाठी खुला आहे. यजुर्वेदात सांगितलं आहे की, शूद्राची उत्पत्ती प्रभुचरणातून झाली. त्याचे चरणामृत आपण प्राशन करतो मग केवळ चर्मकाराचे पोटी जन्म घेतला म्हणून मी अपवित्र कसा ? नीच कसा ? वास्तविक जो रामनामाचा उच्चार करत नाही तोच नीच होय.''

रविदासांचे हे सडेतोड व विद्वत्तापूर्ण भाषण ऐकून काशीराजा प्रभावित झाला व त्याने रविदासास आपल्या शेजारी उच्चासनावर बसण्याची विनंती केली. नंतर शास्त्रार्थ सुरू झाला. ब्राह्मणांच्या प्रत्येक मुद्याचे रविदासाने यशस्वीपणे खंडन केले. पण ब्राह्मण आपली हार मान्य करीनात. आता त्यांनी नवीनच मुद्दा काढला. ते म्हणाले, ''रविदास स्वत:स श्रेष्ठ भगवत् भक्त म्हणवतो ना? मग त्याने भगवंताची प्रार्थना करून त्यास येथे प्रत्यक्ष प्रगट करून दाखवावे. असे केल्यास आम्ही त्याची पालखी वाहू. तसे न केल्यास त्याने आपली भगवत्

भक्ती सोडून आमची सेवा करावी.''

रविदास नम्रतेने म्हणाले, ''हे पंडितहो ! तुम्ही सर्वज्ञ आहात असा हट्ट धरू नका. असे करणे म्हणजे माझी परीक्षा नव्हे तर प्रत्यक्ष भगवानाचीच सत्त्वपरीक्षा पाहण्यासारखे आहे.'' तरीही ब्राह्मण आपला हट्ट सोडीनात. शेवटी रविदासांनी ईश्वराची प्रार्थना करावयास सुरुवात केली. ''हे प्रभू ! तुला भक्तवत्सल म्हणतात. तूच भक्तांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करतोस असे म्हणतात. आता तूच तुझे हे ब्रीद सांभाळ.'' एवढे बोलून ते प्रभुभजनात रंगून गेले. त्यांना देहभान राहिले नाही. ते प्रार्थनेत प्रभूशी एकरूप झाले आणि इकडे चमत्कार झाला. प्रत्यक्ष भगवंत राज दरबारात प्रगट झाले. त्यांचे प्रखर तेज पाहून सगळ्यांचे डोळे दिपले. ब्राह्मणांनी हार पत्करली. रविदासांचा जयजयकार केला व पालखीत बसवून काशीनगरीत त्यांची मिरवणूक काढण्यात आली. स्वत: काशीराजाने पालखी वाहून नेली. आता रविदासांची कीर्ती दशदिशात पसरली.

चितोडच्या राणासंग यांची पत्नी राणी 'झाली' अत्यंत धार्मिक वृत्तीची होती. गुरुशिवाय ज्ञान नाही. गुरुविणा साधना अपूर्ण आहे. हे जाणून गुरुप्राप्तीच्या इच्छेने ती काशीक्षेत्री आली. तेथे तिने रविदासांचा महिमा ऐकला. रविदासांच्या दर्शनासाठी ती गोपाळ मंदिरात गेली. तेथे रविदासांचे कीर्तन ऐकून तिला अध्यात्मिक आनंद झाला. हेच आपले गुरु अशी तिची मनोमन खात्री पटली. तिने त्यांच्या पाया पडून आपणास शिष्य करून घेण्याची विनंती केली. रविदासांनी तिला आपल्या पतीची परवानगी घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे राणीने राणासंगाची अनुज्ञा प्राप्त केल्यावर 'देवठणी एकादशी' ह्या दिवशी तिला विधिवत दीक्षा देऊन रविदासांनी तिचा आपली शिष्या म्हणून स्वीकार केला. (इ.. १५१०)

काही काळ गेल्यावर राणी झालीच्या आग्रहावरून रविदास चितोडला गेले. राणीने त्यांचे राजवैभवाला साजेल असे स्वागत केले. गुरुच्या स्वागतासाठी एक खास भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला. पण ब्राह्मणांनी चांभाराच्या पंक्तीस बसण्याचे साफ नाकारले. तडजोड म्हणून ब्राह्मणांची पंगत वेगळी वाढण्यात आली. भोजन सुरू झाले आणि नवल घडले. ब्राह्मणांच्या पंक्तीत प्रत्येक बाह्मणाशेजारी रविदास भोजन करताना दिसू लागले. ब्राह्मण बावचळून गेले. खात्री करून घेण्यासाठी त्यांनी दुसऱ्या पंक्तीत डोकावून पाहिले. तेथेही त्यांना राणासंग व राणी झाली यांच्याबरोबर रविदास भोजन करताना दिसले. त्यांना रविदासजींचा अधिकार कळून आला. ते रोहिदासास शरण गेले.

राणासंग व राणी झाली यांचा ज्येष्ठ पुत्र कुवरसिंह यांच्याशी मीराचा विवाह झाला. (इ.स. १५१६) व तीही रविदासांची शिष्या झाली.

रविदासांची कीर्ती दिल्लीचा बादशहा सिकंदर लोदीच्या कानावर गेली. 'रविदास इस्लाम धर्मावरही टीका करतो. त्यामुळे इस्लाम धर्म धोक्यात आला आहे. काहीतरी जालीम उपाय करा' असाही दरबारी लोकांनी व मुल्ला मौलवींनी लकडा लावला. रविदासांना कैद करून दिल्लीस नेण्यात आले व बादशहाने त्यास मुसलमान होण्यास सांगितले. रविदासांनी त्यास साफ नकार दिला. बादशहा म्हणाला, ''अरे गोसावड्या, माझी सत्ता साऱ्या जगावर चालते. माझ्या हुकमाची अवज्ञा करतोस. पाहतोच तुला कोण वाचवतो.'' रविदास म्हणाले,

''महाराज साऱ्या जगावर आपली सत्ता चालते हा आपला भ्रम आहे. साऱ्या जगावर माझ्या प्रभू परमात्म्याची सत्ता चालते. तोच माझे रक्षण करील.'' बादशहा संतापला. त्याने रविदासांस हाल हाल करून ठार मारण्याचा हुकूम फरमावला. रविदासांना तुरुंगात डांबण्यात आले. रविदास आसनस्थ होऊन प्रभुनामात दंग होऊन गेले.

इकडे नमाजाची वेळ आली. बादशहा व त्याचे मुसलमान सरदार नमाज पढू लागले. तेव्हा त्यांना सर्वत्र रविदास दिसू लागले. सिंदर लोदी फार घाबरला. तोच आकाशवाणी झाली, ''हे अज्ञानी दुष्ट राजा ! माझ्या श्रेष्ठ भक्तास, रविदासास, तू का छळत आहेस. त्यास शरण जा. नाहीतर मी तुझा सर्वनाश करीन. ताबडतोब त्याला सोडून दे.'' राजा रविदासांच्या पाया पडला व त्याने त्यास मुक्त केले.

संत रविदास चितोडगडावर गेले. आता ते वृद्ध झाले होते. आपले जीवितकार्य पूर्ण झाले आहे असा त्यांना साक्षात्कार झाला. वयाच्या १५१ व्या वर्षी संवत १५८४ (इ.स. १५२७) मध्ये चितोडगड येथे त्यांनी आपला देह ठेवला व त्यांचा आत्मा परमात्म्यात एकरूप झाला. काहींच्या मते ते काशीमध्येच समाधिस्त झाले.

संत रविदासांची शिकवण

रविदासांच्या मते हा मानवजन्म पूर्वपुण्याईने प्राप्त होतो. मानवजन्माचा उद्देश परमेश्वर प्राप्ती हा आहे पण माणूस ते विसरून सांसारिक विषयभोगात दंग होऊन आपले आयुष्य वाया घालवतो. ज्याच्यावर प्रभूची कृपा होते, तो प्रभुभक्तीत रंगून जातो व जन्ममरणाच्यशा चक्रापासून मुक्त होतो.

रविदास सांगतात,

जनम जात मत पूछिऐ का जात अरु पात।
रविदास पूत सभ प्रभ के कोउ नहिं जात कुजात॥
जात प्रांत के फेर भंहि उरझि सहइ सभ लोग।
मानुषता कुं खात हइ रविदास जात कर रोग॥

कोणासही तू कोणत्या जातीचा आहेस हे विचारू नकोस. अरे कसली आहे जात अन् पात. सारे जण त्या एकमात्र प्रभू परमात्म्याचीच लेकरे आहेत. कोणीही उच्च जातीचा वा नीच जातीचा नाही.

रविदास ब्राह्मण मति पूजिए जउ होवै गुनहीन।
पूजिही चरन चांडाल के जउ होवै गुन परवीन॥
पंचदोष तजि जो रहई संत चर लवलीन।
रविदास ते ही नर जानई ऊंचह अरू कुलीन॥

रविदास सांगतात, गुणहीन भ्रष्ट ब्राह्मणाची पूजा करू नका. गुणवान चारित्र्यसंपन्न जरी तो चांडाळ हीनकुलात जन्मलेला असला तरी त्याची पूजा करा. ज्याने पंचदोषांचा त्याग केला आहे, जो संतचरणी लीन

झाला आहे तोच खरा उच्च जातीचा व कुलीन समजावा. जन्माने कोणीही हीन व उच्च कुलीन नसतो.

ईश्वरप्राप्तीसाठी रानावनात जाण्याची आवश्यकता नाही. तो सर्वव्यापी राम प्रत्येकाच्या हृदयातच आहे. तेथे त्याचा शोध घ्या.

गिरी बन काहे खोजन जाई घट अभि अन्तर भोजहु भाई।

ज्याप्रमाणे फुलातच सुगंध वास करतो त्याप्रमाणेच सर्व जीवांचे ठाई राम वास करतो.

पुहुप मधे ज्युं बास बसत है त्युं सब घट रमहि रघूराई॥

रविदासांनी बाह्य देखावा, कर्मकांड आदी गोष्टींवरही खूप टीका केली आहे व अशाने परमेश्वर प्राप्ती होत नाही असेही ठणकावून सांगतात : ते म्हणतात–

देता रहे हज्जार बरस मुल्ला चाहे अजान
रविदास खुदा नंह मिल सकइ जौ लौं मन शैतान।
माथे तिलक हाथ जप माला जग ठगने कूं स्वांग बनाया।
मारग छांडी कुमारग डहकै सांची प्रीत बिनु राम न पाया॥

हे मुल्ला तू हजार वर्षे जरी नमाज आदा केलास, तरी जोपर्यंत तुझ्या मनात कपट कारस्थानरूपी सैतान वास करत आहे तोपर्यंत तुला खुदा भेटणार नाही. अरे पंड्या ! तू कपाळी टिळा लावून, हाती जपमाळ घेऊन भक्तीचे ढोंग करून जगास फसवू शकशील पण खरी श्रद्धायुक्त अंत:करणाने भक्ती केल्याशिवाय तुला राम प्राप्त होणार नाही.

जसे जीव कर्म करतो तसे फळ प्राप्त करतो. म्हणून सत्कर्म करा. वासना सोडून हरिभजन करा. रविदास पुढे सांगतात– **'हरि के नाम बिनु झूठे सगल पसारे।'** प्रभुनामाखेरीज अन्य सारे कर्मकांड खोटे आहे. म्हणून जीवाने अहर्निश, रात्रंदिवस नामस्मरण केले पाहिजे. मनाला प्रभूपासून दूर नेणाऱ्या सर्व गोष्टींचा त्याग केला पाहिजे. जेव्हा मन प्रभूच्या नामस्मरणात एकरूप एकरस होऊन जाते, तेव्हा त्याच्या अंतरातील प्रभुपरमात्म्याची परमज्योत प्रकाशमान होते. प्रभुप्राप्तीसाठी साधुसंतांची संगत धरावी. रविदास सांगतात, **''चलत–हलत–बैठत– उठत धरि हुं तुमरी ध्यान''** हे प्रभू ! सदा येता–जाता– उठता– बसता– मी तुझेच ध्यान करतो. अखेरीस रविदास सांगतात–

पीआ राम रसु पीआरे ॥ टेक ॥
पीवत पीवत आपा जग भुला हरि रस माहि बौरानारे।

मी रामनामरूपी अमृत प्राशन केल्याने मला सांसारिक मोहमायेचा विसर पडला व मी हरिरसात गुंगून गेलो. एकरूप झालो.

अशा या महान प्रभुभक्ताबद्दल संत कर्मदास म्हणतात,

सुमंत्र रविदास वचनं कोटि दोष विनाशनम।

रविदासचरणं ध्यान धरणं कुल समूह उद्धारणम्॥

रविदासांचे प्रत्येक वचन हे सुमंत्रासमान आहे. हे मंत्र कोटी कोटी दोषांचा विनाश करणारे आहेत. जो रविदासांच्या चरणांचे ध्यान करतो, त्याच्या संपूर्ण कुळाचा उद्धार होतो. अशा ह्या रविदासांच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम.

३. भक्त धन्ना

भक्त धन्ना यांचा जन्म एका गरीब जाट कुटुंबात सन १४१५ मध्ये झाला. त्यांचे वडील शेती करून आपल्या कुटुंबाचे भरण पोषण करत. धन्नाचे आईवडील धार्मिक वृत्तीचे होते. सकाळी उठून देवदर्शन करून, साधुसंतांचे दर्शन करून आपापल्या उद्योगाला लागत. हेच संस्कार बाल धन्नावर होत होते. त्यामुळे तोही धार्मिक वृत्तीचा झाला होता.

एकदा लहानग्या धन्नाने एका ब्राह्मणास शाळिग्रामाची पूजा करताना पाहिले. त्याने ब्राह्मणाकडे पूजेसाठी शाळिग्राम मागितला. मुलाची समजूत काढण्यासाठी त्याने शेजारी पडलेला एक दगड धन्नास दिला. धन्नाला खूप आनंद झाला. दगड घेऊन तो घरी आला. एका कोपऱ्यात एका झाडाखाली त्याने त्याची शाळिग्राम म्हणून स्थापना केली. जवळच्याच झाडाची पाने तुळशीपत्रे म्हणून तो त्या दगडावर वाहत असे. त्यास भाकरीचा नैवेद्य दाखवत असे. पण दगडाचा देव भाकरी थोडाच खाणार. तो देवाला मनोभावे आळवू लागला, ''हे देवा ! तू माझा नैवेद्य का भक्षण करत नाहीस ? मी लहान म्हणून ? की मी हीन जातीचा म्हणून ? काहीही असो. तू माझा नैवेद्य भक्षण केल्याशिवाय मीही अन्नग्रहण करणार नाही.'' त्याने जेवणखाण सोडले. सतत तो नामस्मरणात दंग होऊन राहिला. तो हळूहळू क्षीण होऊ लागला. आईवडिलांना काळजी वाटू लागली. अखेर परमेश्वराला त्याची दया आली. एक दिवस शाळिग्राम त्याच्यासमोर प्रगट झाले. त्याने त्याच्याकडून भाकरी घेऊन खाण्यास प्रारंभ केला. अर्धीअधिक भाकरी खाऊन झाली आणि एक नवल घडले. धन्नाने भगवंताचा हात धरला व म्हणाला, 'देवा किती रे तू अप्पलपोटा ! तू माझा नैवेद्य स्वीकारावास म्हणून मी इतके दिवस उपाशी राहिलो पण आत्ता भाकरी खाताना तुला माझी दया आली नाही ना? मलाही दोन घास भरवावेत असे सुद्धा तुला वाटले नाही ना?'' धन्नाची ही अनन्य भक्ती पाहून देव प्रसन्न झाला. त्याने उरलेली भाकरी धन्नास आपल्या हाताने भरवली. धन्य तो भक्त व धन्य त्याची भक्ती. आता भक्त व देव मित्र झाले. एकमेकांचे सखे झाले. आनंदाने एकमेकांच्या संगतीत नाचू बागडू लागले.

एकदा धन्नाच्या वडिलांनी धन्नास जवळच असलेल्या शेतात पेरण्यासाठी गव्हाची मोटळी देऊन त्यास पेरणी करण्यास जाण्यास सांगितले. धन्ना निघाला. वाटेत त्याला साधुसंतांचा जथा दिसला. त्यांनी त्याच्याकडे भिक्षेची याचना केली. धन्नाने आपल्या जवळची गव्हाची मोटळी त्या साधूंना देऊन टाकली व पुढे निघाला. शेतात पोहोचला. पाभर जुंपली पण पेरावयास गहू कोठे होते? त्याने परमेश्वराचे नाव घेतले व पाभर हकली. संपूर्ण

शेतांत मोकळी पाभर फिरवून तो घरी आला. आणि इकडे नवल घडले. शेतात गव्हाचे पीक तरारून उगवून आले. वाऱ्यावर डोलू लागले. त्या वेळी त्या शेतातून धन्नाच्या वडिलांना कधी आले नव्हते इतके अमाप उत्पन्न प्राप्त झाले. पुण्य कर्माचे परमेश्वराने दिलेले हे फळ.

धन्ना आता मोठा झाला. एक दिवस भगवंत धन्नास म्हणाले, ''धन्ना ! आता तू मोठा झालास. तुझ्या निरागस भक्तीने मी प्रसन्न झालो. आजवर तुझ्याशी खेळलो, बागडलो पण एवढे पुरेसे नाही. पुढील प्रगतीसाठी ज्ञान आवश्यक आहे. गुरुशिवाय ज्ञान नाही. ज्ञानाशिवाय मुक्ती नाही. जा. गुरु कर. काशीक्षेत्री माझा भक्त रामानंद आहे. त्याच्याकडे जा. त्याचे शिष्यत्व पत्कर. तोच तुला पुढील मार्ग दाखवेल.''

धन्ना काशीक्षेत्री आला. रामानंदाच्या चरणी त्याने लोटांगण घातले व त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांच्याच उपदेशाने बालभक्त धन्नाचा साक्षात्कारी संतश्रेष्ठ धन्ना झाला. पुढे संत धन्नाने संपूर्ण राजस्थानात रामभक्तीचा प्रचार व प्रसार केला व लोकांच्या अध्यात्मिक जीवनास एक वेगळेच वळण दिले. वेगळी दिशा दिली.

धन्नाची शिकवण

धन्नाच्या अध्यात्मिक जीवनाची सुरुवात सगुण उपासनेपासून, मूर्तिपूजेपासून झाली असली तरी रामानंदांच्या सहवासाने त्यांच्या लक्षात आले की ईश्वर फक्त मूर्तीत नसून तो सर्व विश्वात भरून राहिला आहे. तोच विश्वविधाता आहे. विश्वंभर आहे. तोच सर्वेसर्वा आहे. कर्ता करविता आहे. जीवाने अनन्यभावाने त्यास शरण जावे. आपल्या अंतरात त्याचा शोध घ्यावा.

संत धन्ना सांगत, लोक हो ! ईश्वरप्राप्तीसाठी पूजा, अर्चा, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा आदी गोष्टींची जरुरी नाही. तो प्रभुपरमात्मा तुमच्या अंतरातच आहे. त्याचे मनोभावे नामस्मरण करा. त्याचा आपल्या अंत:करणातच शोध घ्या.

पुरोहितांनी निर्माण केलेल्या स्पृश्यास्पृश्यतेवर जातिभेदावर उच्चनीचतेवर ते कडाडून हल्ला करताना म्हणत– प्रत्येक जीवाच्या अंतरात त्या परमात्म्याचीच परमज्योत वास करीत आहे तर कोणी उच्च तर कोणी नीच कसा ? सारे एकसारखे. सारेच भगवंताच्या मूर्ती.

त्यांची गुरुनिष्ठा अनन्यसाधारण होती. परमेश्वरप्राप्तीसाठी गुरुचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक आहे. अशी त्यांची धारणा होती.

श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये धन्नाजींच्या ४ रचनांचा समावेश केलेला आहे.

४. संत श्री सेना महाराज

संत श्री सेना महाराज यांच्या विषयी अनेक मते आहेत. काहींच्या मते ते उत्तर प्रदेशात जन्मले व

रामानंदांचे शिष्य होते. तर काहींच्या मते ते मूळचे मध्य प्रदेशातील असून तेथून ते महाराष्ट्रात आले. काहींच्या मते ते बांधवगडच्या नरेशांचे सेवक होते तर काहींच्या मते ते बिदरच्या सुलतानाचे नाभिक होते. पण ते मूळचे महाराष्ट्रातीलच असावेत असे मानण्यास खूप वाव आहे. कारण एका अभंगात ते म्हणतात, **'ही माझी मिरासी। पांडुरंग पायापासी॥'** ह्यावरून सेना महाराजांच्या घराण्यातच विठ्ठल भक्ती चालत आली असावी असा तर्क करता येतो.

संत सेना बिदरच्या सुलतानाचे नाभिक होते हेही खरे असावे कारण त्याबद्दलची एक कथा महाराष्ट्रात प्रचलित आहे.

नित्य प्रात:काळी उठावे. स्नानादी नित्यकर्मे उरकून देवपूजा व ध्यानधारणा करावी व मगच धोकटी घेऊन व्यवसायार्थ बाहेर पडावे असा सेनांचा नित्यक्रम होता. त्यात ते कधीही कोणत्याही कारणाने बदल होऊ देत नसत. पण एकदा ते देवपूजेस बसले असता सुलतानाचा सांगावा घेऊन दूत आला. पण सेनाने आपला पण सोडला नाही. नित्यनेमाप्रमाणे आपला पूजा-अर्चा, ध्यान-धारणा हा आपला क्रम चालूच ठेवला. इकडे नवल घडले. प्रत्यक्ष पांडुरंगाने सेनाचे रूप घेऊन सुलतानाकडे जाऊन सेनाचे काम पूर्ण केले. ह्या विषयी सेना आपल्या अभंगात म्हणतात–

जाणुनी संकट श्री हरी। धोकटी घेतली खांद्यावरी।
त्वरे आला राजदरबारी। देखुनि हरी क्रोध निमाला।
राया सन्मुख बैसोनी। हाती दिधलें दर्पण।
मुख पाहे अवलोकून। मूर्ती दिसे चतुर्भुज।

पण ह्या प्रसंगानंतर संत सेनांना फार वाईट वाटले. आपल्यासाठी प्रत्यक्ष पांडुरंगाला धोकटी न्यावी लागली याचे त्यांना खूप वैषम्य वाटले. त्यांनी धंदा सोडला, प्रपंच सोडला व पूर्ण विरक्त होऊन आपले जीवन पांडुरंगचरणी समर्पित केले ह्याचे वर्णन करताना सेना महाराज म्हणतात, **'म्हणोनि लागलो सरणासी। संसारासी त्यागिले।'**

पंढरीची वारी करण्यास त्यांना अत्यंत आनंद वाटत असे. ते म्हणतात– **'जाता पंढरीसी सुख वाटे जीवा। आनंदे केशवा भटतांचि॥'**

सेना महाराजांनी सर्व तीर्थांच्या यात्रा केल्या होत्या. पण त्यांना सर्व तीर्थक्षेत्रांपेक्षा पंढरपूर क्षेत्रच आवडले होते. ते म्हणतात, **''या सुखाची उपमा नाही त्रिभुवनी। पाहिली शोधोनी अवधी तीर्थे।''**

सेना महाराजांना पांडुरंगाचे प्रत्यक्ष दर्शन झाले होते. ते म्हणतात,

बहु जन्मी केला लाग। सेना देखे पांडुरंग॥
धन्य धन्य दिन। तुमचे झाले दरषण॥

ईश्वरप्राप्तीचा सर्वांत सोपा, सुलभ मार्ग म्हणजे नामभक्ती. योग, तपाचरण, व्रताचरण, तीर्थयात्रा ह्या सर्वांपेक्षा नामोच्चारण, नामस्मरण हाच एकमेव श्रेष्ठ मार्ग आहे असे सांगताना सेना महाराज सांगतात–

म्हणा हरि हरि। अवघे सकल नर नारी॥
तीही लोकी श्रेष्ठ। नामवरिष्ठ सेवी हे ॥

पण तरीही सर्व लोक मायापाशात अडकून संसारात रममाण झालेले पाहून त्यांचा सात्त्विक संताप C \ $ m i ¥ ` ४ **''नाम घेता विठोबाचे। काय तुझ्या बा चे जाते॥''**

पण नामसंकीर्तनास संतसंगाचीही जोड हवी. ईश्वरप्राप्तीचा मार्ग संतच जीवाला दाखवतात. म्हणून सेना महाराज म्हणतात, **'शरण जाईन संतांस।'** संतांच्या उपदेशानेच आपल्या जीवनाचे सार्थक झाले हे सांगताना सेना महाराज सांगतात–

संते सांगितले काही। ते म्या हृदयी धरले॥

संतांमुळेच माझा उद्धार झाला, हे सांगताना व त्यांच्याविषयी आपल्या मनातला कृतज्ञता भाव व्यक्त करताना सेना महाराज म्हणतात–

उदार तुम्ही मायबाप कृपावंत । केवढा केला उपकार।
काय वाणूं मी पामर। जड जीवा उद्धार केला।
मार्ग सुपंथ दाविला। सेना म्हणे उतराई।
होता न दिसे काही॥

सेना महाराज स्वत:स पामर समजतात व सांगतात, की ''माझ्यासारखा पामर जर भवसागर तरुन गेला तर मग जो कोणी जीव मी गेलेल्या मार्गाने जाईल त्याचा नक्कीच उद्धार होईल. ते म्हणतात,

स्वहिता कारणे सांगतसे तुज। अंतरीचे गूज होते काही॥
करा हरी भजन तराल भवसागर। उतरील पैलतीर पांडुरंग॥
कृपा नारायणे केली मजवरी। तुम्हालागी हरी विसंबेना॥

पण त्यासाठी चित्त शुद्ध करणे आवश्यक आहे व द्वैतभावाचाही त्याग करणे आवश्यक आहे हे सांगताना ते म्हणतात–

चित्त शुद्ध करा। न देई दुजियासी थारा।
हेच शस्त्र निर्वाणीचे सेना म्हणे धरा साचे॥

बहुतेक संत जन्म-मृत्यूच्या येरझाऱ्या चुकाव्यात म्हणून परमेश्वराकडे मागणे मागतात. पण संत सेना महाराज पांडुरंगाजवळ मागणे मागताना म्हणतात–

सुखे घाली जन्मासी। हेचि बरे की मानसी॥
वारी करीन पंढरीची। जोडी ही माझी साची॥
हरिदासाची करीन सेवा। तेणे सुख थोर जीवा॥
सेना म्हणे सर्व संग। केला त्याग यासाठी।

संत सेना महाराज हे बांधवगडचे होते असेही म्हटले जाते व त्यांचा जन्म वैशाख व. द्वादशी संवत १३५७ रविवार रोजी सांगितला जातो. त्यांच्या पित्याचे नाव देविदास व मातेचे नाव प्रेमकुवर असे होते. त्यांचे नाव 'सैण' असे होते. पण 'सैण' हे 'सेना' ह्या शब्दाचेच रूप आहे असेही म्हणतात.

संत सेना महाराज यांचा रेवा संस्थानात बांधवगड येथे बरेच दिवस मुक्काम होता व तेथील राजा वीरसिंह यांचे ते नाभिक होते व त्याबद्दलही आधी लिहिल्याप्रमाणे कथा सांगितली जाते. पण तेथून ते काशीक्षेत्री गेले व तेथे ते स्वामी रामानंदांच्या संपर्कात आले व त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. रामानंद यांचे अन्य दोघे शिष्य संत कबीर व संत रोहिदासाशी त्यांचे विशेष सख्य होते. त्या तिघात अनेक वेळा पारमार्थिक विषयावर चर्चा होत असत. त्या चर्चा ऐकण्याची संधी ज्यास मिळाली ते खरोखर भाग्यवान होत.

५. भक्त पीपाजी

संत पीपाजींचा जन्म एका रजपूत राजघराण्यात झाला. ते राजपदी विराजमान झाले. एक बलाढ्य राजा म्हणून त्याचा संपूर्ण राजस्थानात लौकिक होता. 'गागरौन' ही त्यांची राजधानी. ते धार्मिक वृत्तीचे होते. पण त्यांच्या अंगी थोडा अहंकारही होता. एकदा त्याच्या गागरौन नगरीत साधुसंतांचा एक जथा आला. राजाने आपल्या अधिकाऱ्यांद्वारा त्यांचा सत्कार केला. पण तो संतांच्या दर्शनास मात्र गेला नाही. साधुसंत नाराज झाले. त्यांनी ईश्वराची पार्थना केली, ''देवा, ह्या राजाच्या मनातील अहंकार दूर कर'' असे म्हणून त्यांनी गागरौनचा त्याग केला.

महाराज पीपाजींना साधुसंत नाराज होऊन आपले नगर सोडून गेल्याची वार्ता समजली. ते अंतर्मुख झाले. आपले काय चुकले ह्याचा ते विचार करु लागले. रात्री त्यांचे आराध्य दैवत श्रीदेवी त्याच्या स्वप्नात आली. तिने त्यास सांगितले, ''हे राजा ! तुझ्या अंगी धार्मिक वृत्ती आहे. अनेक सद्‌गुण आहेत. पण तुझ्या अंगी आपण बलाढ्य राजे आहोत ह्याचा अहंकार आहे तो सोड. गुरु कर. त्यास मनोभावे शरण जा. त्यानेच तुझा उद्धार होईल. तुझा गुरु रामानंद काशीक्षेत्री वास करीत आहे तेथे जा.''

महाराज पीपाजींनी दुसऱ्या दिवशी काशीस जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. यथावकाश ते काशीस पोहोचले. शुचिर्भूत होऊन राजवस्त्रे परिधान करून ते रामानंदांचे निवासस्थानी आले. पण रामानंदांनी त्यास भेट देण्याचे नाकारले. त्यांनी निरोप दिला की, ''मी राजे महाराजे यांची भेट घेत नाही. जो प्रभुप्राप्तीची आस धरून

विनम्रभावाने माझ्याकडे येतो, त्याच्याचसाठी माझे दार सदैव उघडे असते.'' महाराज पीपाजींना आपली चूक कळली. त्यांनी राजवस्त्रांचा त्याग केला. साधी श्वेतवस्त्रे धारण केली व रामानंदांना शरण गेले व म्हणाले, ''महाराज, मी आपणास शरण आलो आहे. माझा स्वीकार करा व मला आपला शिष्य करून घ्या.'' रामानंद म्हणाले, ''राजा माझा शिष्य होणे इतके सोपे नाही. ईश्वरप्राप्तीचा मार्ग हा काट्याकुट्यांनी भरलेला आहे. त्यासाठी केवळ वेश पालटून भागत नाही. अग्निदिव्य करावे लागते. आहे तुझी तयारी ?'' क्षणाचाही विलंब न करता पीपाजी उद्गारले, ''स्वामीजी काय वाटेल ते दिव्य करावयास सांगा. हा आपला दास ते करण्यास सिद्ध आहे.'' त्यावर रामानंद त्यांना म्हणाले, ''जा पलिकडच्या विहिरीत जाऊन जीव दे'' पीपाजी आता पूर्ण बदलले होते. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता विहिरीकडे धाव घेतली. आता ते विहिरीत उडी मारणार इतक्यात रामानंदांच्या इतर शिष्यांनी त्यास अडवले व रामानंदांपुढे आणून उभे केले. पीपाजी आपल्या कसोटीस पूर्ण उतरला आहे ह्याची रामानंदांना खात्री पटली व त्यांनी पीपाजींचा शिष्य म्हणून स्वीकार केला. आता महाराज पीपाजींचे भक्त पीपामध्ये रूपांतर झाले.

रामानंदांकडे काही दिवस राहिल्यावर त्यांच्याच आज्ञेने ते गागरौनला परत गेले. आता पीपाजी पूर्ण बदलले होते. ते आपला राज्यकारभार उत्तम प्रकारे करतच होते. पण आता ते साधुसंतांची सेवाही जातीने करू लागले. तरीही त्यांच्या चित्तास समाधान नव्हते. गुरुच्या विरहाने त्यांचा जीव कासावीस होत असे. त्याने तसे रामानंदांना कळवले व त्यांना गागरौनला येण्याचे आमंत्रण दिले. शिष्याची ही इच्छा पूर्ण करण्यासाठी रामानंद गागरौनला जाण्यासाठी निघाले. त्या वेळी त्यांचेबरोबर कबीर, रविदास आदि त्यांचे शिष्यही होते. गागरौनच्या वेशीपाशी पीपाजींनी त्यांचे भव्य स्वागत केले. त्यांना पालखीत बसवून ती पालखी स्वत:च्या खांद्यावर वाहून त्यांना आपल्या राजवाड्यात घेऊन गेले.

काही दिवस राहिल्यावर रामानंदांनी द्वारकेस जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. पीपाजीही त्यांच्या बरोबर निघाले. त्यांच्या बरोबर त्यांची राणी सीतादेवीही निघाल्या. पुढे रामानंदांनी काशीकडे प्रयाण केले पण पीपाजी व सीतादेवी मात्र काही काळ द्वारकेतच राहिले. एक दिवस भगवान श्रीकृष्ण व देवी रुक्मिणी यांचे प्रत्यक्ष दर्शन व्हावे म्हणून त्या दोघांनी समुद्रात स्वत:स समर्पित केले. पण आख्यायिका असे सांगते, की सात दिवसांनंतर ते दोघे समुद्रातून बाहेर आले. तेव्हा दोघांचे कपडे कोरडे होते.

आता पीपाजींना विदेही अवस्था व पूर्ण वैराग्य प्राप्त झाले होते. असे सांगतात, की त्यांच्या सहवासात येणारे वाघ सिंहादी हिंस्र प्राणीही पूर्णपणे अहिंसक बनत.

पीपाजी सांगत, 'जे ब्रह्मांडी ते सारे पिंडी (मानवी शरीरात) सामावलेले आहे. म्हणून पूजेसाठी, ईश्वरप्राप्तीसाठी कोणत्याही बाह्य साधनाची गरज नाही. मनाने मनातच परमेश्वराची आराधना करावी.''

'ईश्वर निर्गुण निराकार असून सर्वव्याप्त व सदैव अस्तित्वमान आहे. सर्व जीव हे त्यानेच निर्माण केले असून तो सर्व चराचरांचा एकमात्र स्वामी आहे.

'ईश्वरप्राप्तीसाठी सतगुरुचे मार्गदर्शन आवश्यक आहे. गुरुशिवाय ईश्वरप्राप्ती नाही. मनोभावे गुरुसेवा केली तरच मोक्षाचे दार उघडते. सतसंग हा परीसस्पर्शाप्रमाणे आहे. सतसंगाने आयुष्य सार्थकी लागते. ईश्वरप्राप्तीसाठी नामस्मरणासारखा सहज सोपा मार्ग नाही. सारी ईश्वराचीच लेकरे त्यामुळे कोणी उच्च नाही. कोणी नीच नाही. सारे समान हा पीपाजींचा शिकवणीचा गाभा होय.

बारमेर जिल्ह्यातील समदडी गावी त्यांचे भव्य मंदिर आहे. दरवर्षी चैत्र महिन्याच्या पौर्णिमेस मोठी जत्रा भरते.

श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये त्यांच्या एका रचनेचा समावेश आहे.

६. भक्त सूरदास

भक्त सूरदास हे हिंदी साहित्यातील थोर कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी कृष्णभक्तीपर अनेक रचना केल्या आहेत व ते श्रेष्ठ कृष्णभक्त म्हणून जगविख्यात आहेत. ते जन्मांध होते.

सूरदासांचा जन्म संवत १५३५ (इ.स. १४७७) मध्ये उत्तर प्रदेशातील सीही (सीरी) नावाच्या एका लहान खेडेगावात एका गरीब ब्राह्मण कुटुंबात झाला. असेही सांगितले जाते की सूरदास हा राजा पृथ्वीराज चौहान याच्या राजसभेतील राजकवीचा वंशज होता.

लहानपणापासूनच ह्याला कृष्णभक्तीची आवड लागली व तो पूर्वजांकडून लाभलेल्या काव्यप्रतिभेमुळे कृष्णभक्तीपर काव्य करू लागला. त्याला ईश्वरकृपेने सुमधुर आवाजही प्राप्त झाला होता. त्यामुळे तो भक्तिरंगात रंगून पदे गात असे व ती ऐकणारे श्रोतेही भक्तिरसात तल्लीन होत.

घरी अठरा विश्वे दारिद्र्य व त्यातून हा जन्मांध. त्यामुळे तो आईबाबास भार वाटू लागला. ही वस्तुस्थिती जाणून त्याने लहान वयातच घराचा त्याग केला व सारा भार श्रीकृष्णावर टाकून तो भक्तिगीते गात निघाला. वाटेत तो एका कोरड्या विहिरीत पडला. तेथे तो सात दिवस अन्न पाण्यावाचून पडून होता. पण त्याचेही त्यास काही वाटले नाही. तो अखंड कृष्णभक्तीत रंगून गेला. त्याची ही दृढभक्ती पाहून भगवान श्रीकृष्ण त्यास प्रसन्न झाले. प्रत्यक्ष प्रकट होऊन त्यांनी त्यास विहिरीतून बाहेर काढले व त्यास दृष्टीही प्रदान केली. भगवान श्रीकृष्णाचे ते मनोहारी रूप पाहून सूरदास तृप्त झाला. आपल्या भक्तीचे सार्थक झाले असे त्यास वाटले. त्याने ते रूप आसुसल्या नजरेने आपल्या हृदयात साठवून ठेवले व ते उद्गारले, ''हे प्रभो ! आपण मला दृष्टी दिलीत. ह्या डोळ्यांनी मी आपले मनोहारी रूप पाहिले. ह्याशिवाय जगात अन्य पाहण्यासारखे उरले तरी काय आहे ? मला अन्य काहीही बघण्याची इच्छा नाही. माझ्यावर कृपा करा व मला परत अंध करा. आपले रूप हृदयात साठवून मी पुढील आयुष्य व्यतीत करीन माझ्यावर आपली अशीच सदैव कृपा राहो.''

तेथून तो पुढे निघाला व एका खेडेगावात झोपडी बांधून राहू लागला. ईश्वरीकृपेने त्यास शकुन व भविष्य सांगण्याची सिद्धी प्राप्त झाली. त्यामुळे त्या व आसपासच्या गावातील लोक त्याला शकुन विचारायला व भविष्य जाणून घेण्यासाठी जमू लागले. येताना ते धान्य, पैसे, कपडा आणू लागले. त्यामुळे सुबत्ता नांदू लागली. त्यामुळे त्याच्या कृष्णभक्तीत मात्र व्यत्यय येऊ लागला. तो वैतागला. त्याने ते गाव सोडले व इतस्तत: भटकू लागला. वयाच्या अठराव्या वर्षी तो मथुरेस गेला पण तेथेही भविष्य जाणून घेण्यासाठी त्याच्याभोवती गर्दी जमू लागली. त्याने मथुरेचाही त्याग केला व तीर्थाटन करत यमुना किनारी गौघाटावर त्याने आपला मुक्काम ठोकला. त्या ठिकाणी त्याने बारा वर्षे एकांतात राहून तो कृष्णभक्तीत रममाण झाला.

संवत १५६७ (इ.स. १५०९) मध्ये स्वामी वल्लभाचार्य तीर्थयात्रेसाठी वृंदावनास आले. 'हे दक्षिणेतील 'शुद्धाद्वैत' मताचे प्रवर्तक होते. तेथे त्यांची व सूरदासांची भेट झाली. त्याच्या भावपूर्ण काव्यावर व मधुर आवाजावर ते प्रसन्न झाले. पण सूरदासाच्या पदांमध्ये नैराश्याचाच सूर पाहून त्यांना वाईट वाटले. ते म्हणाले, ''अरे तुझ्या नावात 'सूर' (म्हणजे 'शूर') आहे. तर मग असे रडगाणे का गातोस ? मर्दासारखा पुढे हो. भगवंताची लीला अगाध आहे. सर्व दु:ख दूर करणारी आहे. मनाला आनंद देणारी आहे. त्याची लीला गा. बघ तुला कसा आत्मिक आनंद मिळतो ते.'' सूरदास म्हणाले, ''महाराज, आजपर्यंत मी सतत दु:खच भोगत आलो आहे. भगवंताच्या त्या आनंददायी लीला मला कधी कळल्याच नाहीत. मी तुम्हाला शरण आलो आहे. मला आपला शिष्य म्हणून स्वीकारा व मला मुक्तीचा मार्ग दाखवा.

श्रीमत् वल्लभाचार्यांनी त्यास मधुराभक्तीचे रहस्य उलगडून सांगितले. व त्यास आपला शिष्य करून घेतले. त्यास पुष्टीमार्गाची दीक्षा दिली. (वैशाख कृष्ण एकादशी संवत १५६७) व त्याची श्रीनाथजी मंदिराचा कीर्तनकार म्हणून नेमणूक केली. तेव्हापासून जीवनाच्या अंतापर्यंत सूरदास तेथेच कीर्तन करीत राहिले.

आता सूरदासाची कीर्ती सर्व भारतभर पसरली. तानसेनही त्याची पदे गाऊ लागला. असेच एक पद ऐकून अकबराने त्या पदाच्या रचनाकाराबद्दल तानसेनकडे विचारणा केली. तानसेनाने अंध कवी सूरदासांची सविस्तर माहिती दिली. अकबराची जिज्ञासा जागृत झाली व तानसेनास घेऊन तो श्रीनाथजी मंदिरात सूरदासांना भेटण्यासाठी आला. त्या वेळी सूरदास कृष्णलीला वर्णन करणारे पद गाण्यात तल्लीन होऊन गेले होते. अकबर ते पद ऐकून बेहद्द खूष झाला. त्याने सूरदासांना खूप मोठे द्रव्य व काही गावे इनाम देऊ केली व त्यास स्वत: अकबराची स्तुती करणारे पद रचण्याची विनंती केली. सूरदासांनी ते द्रव्य व इनाम घेण्याचे तत्क्षणी नाकारले. सूरदास म्हणाले, ''हे बादशहा ! हा सूरदास श्रीकृष्णाशिवाय अन्य कोणाचीही स्तुती करत नाही. ह्या जिव्हेने आजपर्यंत कृष्णाशिवाय अन्य कशाचाच उच्चार केलेला नाही. तू येथून ताबडतोब निघून जा. परत मला तुझे तोंडही दाखवू नकोस.'' असे होते सूरदास शूर व बाणेदार !

आता सूरदास वृद्ध झाले होते. आपले आयुष्य संपत आल्याचा त्यांना साक्षात्कार झाला. त्यांनी शांतपणे श्रीनाथ मंदिराचा निरोप घेतला व श्रीकृष्णाने जेथे रासलीलेचे सौख्य अनुभवले त्या पारसौलीच्या चंद्रसरोवराच्या तीरी आले व समाधी लावून बसले. तो दिवस होता माघ शुद्ध २ संवत १६४० (इ.स. १५८२). वय होते १०५ वर्षे. ह्या दिवशी सूरदासांनी आपली इहलोकीची यात्रा संपवून ते कृष्णरूपाशी एकरूप झाले.

७. भक्त जयदेव

भक्त जयदेव हे बाराव्या शतकात होऊन गेलेले थोर संस्कृत कवी व महान कृष्णभक्त होत. त्यांचे 'गीत 'गोविंद' हे प्रदीर्घ काव्य सुप्रसिद्ध आहे.

जयदेव यांचा जन्म ओरिसा प्रांतातील प्राची नदीच्या खोऱ्यात वसलेल्या 'केंद्रबिल्व' ह्या गावी झाला. ह्यास 'केंदुबिल्व' असेही म्हणतात. हे गाव आता 'केंदुली सासन' ह्या नावाने ओळखले जाते. हे गाव जगन्नाथपुरीजवळ आहे. त्यांच्या पित्याचे नाव भोजदेव व मातेचे नाव वामदेवी असे असून ते जातीने ब्राह्मण होते. त्या काळी केंदुबिल्व हे वैष्णव पंथाचे महत्त्वाचे केंद्र होते. जयदेव शिक्षणाच्या वयाचा झाल्यावर त्याला कोनार्कजवळ 'कुर्मपट्टक' येथे शिक्षणासाठी गुरुगृही पाठविण्यात आले. तेथे त्याने संस्कृत भाषेचे व वैष्णव पंथाचे शिक्षण घेतले. त्यांचा विवाह पद्मावती ह्यांच्याशी झाला. पद्मावती ह्या कोनार्कच्या मंदिरातील नर्तिका होत्या.

केंदुबिल्व सोडून जयदेव जगन्नाथपुरी येथे आले. तेथील भक्तिमय वातावरणात ते रंगून गेले. ते कृष्णभक्त झाले व तेथेच त्यांना 'गीत गोविंद' हे महाकाव्य स्फुरले. ह्या काव्यात प्रामुख्याने निम्बार्काचार्यांच्या वैष्णव मताचा व राधा-कृष्ण भक्तीचा ऊहापोह केला आहे.

भक्त जयदेव ह्यांच्या चरित्राबद्दल फारच थोडी माहिती प्राप्त आहे.

लिंगराज मंदिर, मधुकेश्वर मंदिर व सिंहाचल मंदिर येथील शिलालेखावरून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार भक्त जयदेव यांनी 'कुर्मपट्टक' येथे संस्कृत बरोबरच काव्यशास्त्र, संगीत व नृत्यशास्त्राचेही शिक्षण घेतले होते.

जयदेवांच्या एका पदाचा समावेश श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये करण्यात आला आहे.

८. स्वामी रामानंद

स्वामी रामानंदांचा जन्म इ.स. १२९९ मध्ये श्रीक्षेत्र प्रयागच्या जवळच असलेल्या 'मालको' ह्या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पुण्यसदन तर आईचे नाव सुशीलादेवी असे होते. स्वामी रामानंदांचे मूळ नाव रामदत्त असे हाते. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे रामदत्ताची वयाच्या आठव्या वर्षी मुंज करण्यात आली व त्यांना शिक्षणासाठी गुरुगृही पाठवण्यात आले. रामदत्त अत्यंत कुशाग्र बुद्धीचा असल्याने त्याने केवळ चार वर्षांत बहुतेक सर्व शास्त्रांचा अभ्यास पूर्ण केला. वयाच्या बाराव्या वर्षी त्यास पुढील शिक्षणासाठी काशीक्षेत्री पाठविण्यात आले. तेथे त्यांनी स्वामी राघवानंद याच्याकडे पुढील शिक्षणास सुरुवात केली. राघवानंद हे दक्षिणेतील 'विशिष्टाद्वैत' तत्त्वज्ञानाचे उद्‌गाते रामानुनुजार्य यांचे शिष्य होते. स्वामी राघवानंदांना रामानंद हा अत्यंत हुशार, प्रखर बुद्धीमत्तेचा विद्यार्थी असल्याचे जाणवले व थोड्याच दिवसात तो त्यांचा पट्टशिष्य झाला.

शिक्षण पूर्ण झाल्यावर राघवानंदांनी रामानंदास संपूर्ण भारत भ्रमण करून, सर्व तीर्थांची यात्रा करून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे रामानंद यात्रा करत करत बद्रीनाथ येथे पोहोचला. तेथे त्याने बराच काळ तपश्चर्या केली व पुढे गंगेच्या काठाकाठाने प्रवास करत गंगा जेथे सागरास मिळते त्या गंगासागर तीर्थावर येऊन पोहोचले. तेथेही त्यांनी बराच काळ ओंकाराचे ध्यान केले. ते ठिकाण कपिल मुनींचे तपस्थान असल्याचा त्यांना दृष्टांत झाला. तेथे त्यांनी कपिल मुनींचे मंदिर बांधले. संपूर्ण भारताचे भ्रमण करून रामानंद काशीक्षेत्री परत आले.

भारत भ्रमणाचे काळात त्यांना अनेक अनुभव प्राप्त झाले. अनेक सिद्धी प्राप्त झाल्या. त्यांच्या असे लक्षात आले, की सर्व भारतवासी यांच्या मनात एकच सांस्कृतिक विचारधारा वाहत आहे पण जातिभेदाने, वर्णभेदाने, उच्चनीच ह्या भेदामुळे ती सांस्कृतिक विचारधारा क्षीण झाली असून हिंदू समाज विस्कळीत झाला आहे. सारे भेदाभेद नष्ट करून सारा हिंदू समाज एकसंध करण्याची गरज आहे.

राघवानंदांकडे परत आल्यावर त्यांनी आपली मते विचार स्पष्टपणे त्यांच्यापुढे व आपल्या इतर गुरुबंधूंपुढे मांडले. पण ते त्यांना रुचले नाहीत. पचले नाहीत. अत्यंत जड अंत:करणाने रामानंदांनी आपल्या गुरुंना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेऊन ते आपल्या वेगळ्या वाटेने निघाले.

आता त्यांनी आपला वेगळा पंथ निर्माण केला. त्यास 'रामावतपंथ' असे म्हणतात. तर रामानंदांच्या अनुयायांना 'रामानंदी' असे म्हणतात.

रामानंदांची शिकवण

रामानंदांच्या मते ईश्वरप्राप्ती हेच मानवजन्माचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळे ईश्वरभक्ती करण्याचा अधिकार सर्वच मानवांना आहे. त्यात स्त्री, पुरुष असा भेद करता कामा नये. तसेच तो माणूस कोणत्याही वर्णाचा असो, जातीचा असो. सर्व जाती वर्णाच्या लोकांना ईश्वरभक्ती करण्याचा पूर्ण अधिकार आहे असे ते सांगत.

ईश्वरभक्तीसाठी कोणत्याही कर्मकांडाची आवश्यकता नाही. आवश्यक आहे प्रभू परमात्म्याबद्दल 'आत्यंतिक प्रेम'.

केवळ प्रभुनामाच्या सतत उच्चारानेच माणसाची अध्यात्मिक उन्नती होते व ईश्वरप्राप्ती होते. 'हरी मुखे बोला' 'हरी मुखे बोला' हीच त्यांची शिकवण होती.

त्यांनी आपल्या १११ वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात मोगली अत्याचाराचे भीषण प्रकार पाहिले होते व समाज जिवंत राहायचा असेल तर हाती शस्त्र घेतल्याशिवाय गत्यंतर नाही म्हणून त्यांनी 'कोदंडधारी राम' हा समाजापुढे आदर्श ठेवला. 'इदं ब्रह्म इदं क्षात्र' ही त्यांची शिकवण होती. म्हणूनच त्यांनी सर्वत्र आखाडे निर्माण केले. तेथे ब्रह्मविद्येबरोबरच शस्त्रविद्याही दिली जात असे. स्वामी रामानंदांचे प्रमुख सात आखाडे होते. ते आपल्या शिष्यांना सांगत. जात पात विसरून जा. जातीचा नामोल्लेखही करू नका. आपण सारे त्या सर्वत्र रममाण असलेल्या प्रभुरामाचे नाव घ्या व नामभक्तीत रंगून जा.

त्यांच्या ह्या शिकवणीमुळे त्यांना सर्व जातींतील स्त्री-पुरुष शिष्य म्हणून लाभले. त्यातील प्रमुख शिष्य असे- १) अनंतानंद, २) सुखानंद, ३) सुरसुरानंद ४) नरहर्यानंद, ५) भावानंद, ६) पीपा, ७) कबीर, ८) सेना, ९) धन्ना, १०) रैदास म्हणजेच रविदास किंवा रोहिदास. ह्याबरोबरच दोन महिला शिष्या होत्या. १) पद्मावती, २) सुरसरी ही सुरसुरानंद ह्यांची पत्नी होती.

स्वामी रामानंद हे सर्वार्थाने क्रांतदर्शी महापुरुष होते व गुरुकृपेने त्यांना दीर्घायुष्यही लाभले होते. त्यांच्या कार्याने भक्तिसाधनेची एक प्रचंड लाट संपूर्ण उत्तर भारतात पसरली. त्या लाटेतील मेरुमणी म्हणजे रामचरित मानस लिहिणारे थोर कवी संत तुळशीदास होत.

आपले जीवितकार्य पूर्ण झाले आहे असे लक्षात आल्यावर वयाच्या १११ व्या वर्षी स्वामी रामानंदांनी आपल्या देहाचा त्याग केला व त्यांचा आत्मा रामरूपात विलीन झाला.

त्यांच्या एका पदाचा श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये समावेश करण्यात आला आहे.

९. भक्त परमानंद

भक्त परमानंद हे संत नामदेव महाराज यांचे समकालीन मराठी संत होते. ते जातीने तेली होते. ते महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील बार्शी ह्या गावाचे रहिवासी होते. त्यांना जोगा परमानंद असे म्हणत व बार्शी गावातील भगवंत मंदिरातील भगवंताचे ते उपासक होते. रोज सकाळी उठून घरापासून लोटांगण घालत बरोबर आरतीच्या वेळी भगवंताच्या मंदिरात पोहोचायचे असा त्यांचा नित्यक्रम होता. हा नेम त्यांनी अनेक वर्षे पाळला.

त्यांच्या ह्या भक्तीमुळे एका श्रीमंत गृहस्थांच्या मनात भक्तिभाव जागृत झाला व त्याने त्यांना अत्यंत मौल्यवान असा रेशमी पितांबर नेसवला. त्या पितांबरामुळे त्या दिवशी त्यांचे चित्त दोलायमान झाले. पितांबर मळू नये म्हणून ते अत्यंत जपून दंडवत घालू लागले. परिणामी ते मंदिरापाशी पोहोचले तोपर्यंत आरती होऊन गेली होती. आपण य:कश्चित पितांबरापायी भगवंताच्या आरतीस मुकलो ह्याचे त्यांना फार वाईट वाटले. खऱ्या भगवत भक्ताने काम, क्रोध, मोह, मद, मत्सर व दंभ ह्या षडरिपूंपासून सदैव सावध राहिले पाहिजे ह्याचे त्यांना स्मरण झाले. त्यांनी तेथल्या तेथे तो रेशमी पितांबर फाडून चिंध्या करून तेथेच टाकून ते घरी गेले.

आता ते पूर्ण विरक्त झाले व भगवंत भक्तीत पूर्णपणे रंगून गेले. अखेर संसाराचा त्याग करून ते उत्तरेकडे निघून गेले. सखोल चिंतनाअखेर त्यांच्या लक्षात आले, की ईश्वर केवळ मूर्तीत नसून तो सर्व विश्वात, चराचरात भरलेला आहे. आता मूर्तिपूजक परमानंद 'विश्वंभरा'चा, निर्गुण निराकार प्रभु परमात्म्याचा उपासक बनला. लवकरच परमानंद बार्शी सोडून उत्तरेत गेले. तेथे त्यांनी भक्तिमार्गाचा प्रचार व प्रसार केला. त्यांचे एक पद श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट केले गेले आहे.

आयुष्याच्या अखेरच्या काळात ते बार्शीस परत आले व भगवंत मंदिराशेजारी ते समाधिस्त झाले.

१०. भक्त त्रिलोचन

भक्त त्रिलोचनजींचा जन्म पंढरपूर येथे सन १२६७ मध्ये झाला. हे नामदेवांच्या समकालीन संत होते. त्रिलोचन म्हणजे तीन डोळे असलेला. दोन चर्म व तिसरा ज्ञानचक्षू. त्रिलोचन याचा अर्थ परमज्ञानी. संत त्रिलोचनजी परमज्ञानी होते म्हणून त्यांचे नाव त्रिलोचन असे विख्यात झाले. श्री गुरु ग्रंथ साहिबामधील संत नामदेवांच्या पदामध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख आढळतो. भाई गुरुदासजी यांच्या रचनेतही त्यांचा व नामदेवांचा उल्लेख केला गेला आहे. भक्त रविदासांच्या रचनांमध्येही भक्त त्रिलोचनजींचा अत्यंत आदरपूर्वक उल्लेख केलेला आढळतो.

त्रिलोचनजींच्या वाणीवरून त्यांच्या भक्तिमार्गाच्या पूर्ण ज्ञानाचा परिचय होतो.

ते सांगतात– परमेश्वर प्राप्तीसाठी कर्मकांड, तीर्थयात्रा, भक्तीचा बाह्य देखावा, भस्म लावणे वगैरेची आवश्यकता नाही. हे सर्व पाणी घुसळल्यासारखे निरर्थक आहे. प्रभुप्राप्तीसाठी अंत:करण शुद्ध असणे आवश्यक आहे. प्रभुनामाचे उच्चारण, मनन, चिंतन हाच प्रभुप्राप्तीचा साधा सोपा मार्ग आहे, असे ते सांगत. त्यासाठी सतगुरूची आवश्यकता आहे.

मायेच्या मोहात पडून मनुष्य प्रभूपासून दूर जातो पण ही माया नश्वर आहे. प्रभुनाम हेच एकमेव शाश्वत धन आहे.

माणूस आपल्या कर्मानुसार फल प्राप्त करतो. ते कोणीही चुकवू शकत नाही असे हे सांगतात.

जन्ममरण ह्याची कर्माशी सांगड आहे ह्याकडे लक्ष वेधून माणसाने आपले मन प्रभुनामाशी एकरूप करावे असे ते सांगतात. परमात्म्याशी एकरूप होणे हीच एकमेव उत्तम अवस्था आहे, असे त्यांचे सांगणे होते.

श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये त्यांच्या चार पदांचा समावेश करण्यात आला आहे.

११. भक्त सधना

भक्त सधना हे प्रेमाभक्ती पंथाचे अनुयायी होते. पंडित तारासिंघजींच्या मते सधना कसाई जन्माने मुसलमान असूनही व्यवसाय सोडून हिंदू धर्मातील भक्तिपंथाकडे वळले. त्यामुळे मुसलमान त्यांना काफीर म्हणत. काजी लोकांनी बादशहाकडे त्याच्याविषयी तक्रार केली, की ह्यास कडक शासन करावे नाही तर हा मुसलमानांना हिंदू मताकडे वळवील.

ते सिंधमधील 'सिहवा' गावचे रहिवासी होते. नामदेवांचे समकालीन. ते व्यवसायाने कसाई होते.

त्यांच्या श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट असलेल्या पदामध्ये एकही शब्द उर्दू वा फारशी नाही ह्यावरून प्रो. साहिब सिंग सधना हिंदू होता असे मानतात. ते पुढे असेही सांगतात, की सधना कसाई होता व मांसाचे वजन करताना तो ज्या दगडाचा वापर करीत असे तो दगड नसून शाळिग्राम होता. एकदा एका आत्मसाक्षात्कारी साधूच्या ते लक्षात आले. त्याने सधनास उपदेश केला व त्यामुळे सधनास आपली चूक कळून आली व त्याला उपरती झाली. त्याने आपला व्यवसायच नव्हे तर संसाराचाही त्याग करून तो प्रभुभक्तीकडे वळला. आता तो प्रभुनामात पूर्णपणे रंगून गेला होता.

भक्त सधना खरोखरच विरक्त झाला आहे की नाही पाहण्यासाठी प्रभूने एक माया केली. एक सुंदर स्त्री त्यांच्याकडे आली व 'माझा स्वीकार करा' अशी त्यास विनंती करू लागली. तिने नाना प्रयत्न केले पण सधनाचे चित्त जराही विचलित झाले नाही. तो आपल्या ध्येयावर दृढ राहिला. हावभावाने सधना वश होत नाही असे पाहिल्यावर तिने, सधनाने तिच्या पतीचा वध केला, असा त्याच्यावर आळ घेतला. धमकावून आपल्याशी संबंध ठेवण्यासाठी आग्रह करू लागली. आता सधना मोठ्या संकटात सापडला. पण तो आपल्या निश्चयापासून तसूभरही ढळला नाही व त्याने प्रभूची प्रार्थना सुरु केली. सधना म्हणतात, ''हे प्रभू ! तू भक्ताच्या प्रतिष्ठेचे रक्षण करतोस अशी तुझी ख्याती आहे. मी अनंत योनीतून जन्ममरणाच्या चक्रात फिरून थकून गेलो आहे. ज्याप्रमाणे चातक स्वाती नक्षत्राच्या एका थेंबाकरिता आसुसलेला असतो त्याप्रमाणे मी तुझ्या कृपेसाठी आसुसलो आहे. मी ह्या संकटात, भवसागरात बुडत आहे. मला वाचव. मला तार. ह्या जगात माझे असे काहीही नाही सारे काही मी तुलाच अर्पण केले आहे. आता माझी लाज तुझ्या हाती. हे प्रभो ! माझी लाज राख ! हीच माझी तुझ्या चरणी प्रार्थना.'' (श्री गु.ग्रं.सा. ८५८)

परमेश्वराच्या कृपेने सधनाचे संकट दूर झाले. तो प्रभू परमात्म्याच्या कसोटीस पूर्ण उतरला व प्रभूने त्याचा स्वीकार केला. सरहिंदजवळ तो प्रभुरुपात विलीन झाला.

१२. भक्त भीखनजी

भक्त भीखनजींची दोन पदे श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट केली गेली आहेत.

भीखनजी जन्माने मुसलमान होते. त्यांचा जन्म इ.स. १४८० मध्ये उत्तर प्रदेशात 'पकैनी' येथे झाला. ते मुस्लीम शरियतचे जाणगार विद्वान होते. त्यांना संपूर्ण कुराण मुखोद्गत होते व ते कुराणाचा पाठ सात वेगवेगळ्या प्रकारे करीत असत. ते स्वत: सूफी संत होते व त्यांनी अनेक सूफी संतांना कुराणाचा अर्थ समजावून सांगितला होता.

भीखनजी जन्माने मुसलमान असले, तरी त्यांनी हिंदू धर्मग्रंथांचा अभ्यास केला होता व त्यामुळे त्यांच्या चिंतनावर हिंदू तत्त्वज्ञानाचा फार मोठा प्रभाव जाणवतो.

प्रा. साहिबसिंघ यांच्या मते शेख भीखन हे अकबराच्या दरबारी नोकरीस होते.

वयाच्या ९३व्या वर्षी इ.स. १५७४मध्ये त्यांची जीवनज्योत परमज्योतीत एकरूप झाली.

१३. भक्त वेणीजी

भक्त वेणीजींच्या तीन पदांचा श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये समावेश केला गेला असला तरी त्यांच्याविषयी कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

भक्त वेणीजी हे इतर संतांच्याही आधी होऊन गेले असावेत असा तर्क करण्यात येतो. त्यांची जन्मभूमी व कर्मभूमी बिहार होती असे म्हणतात.

टीप :

परिशिष्टात दिलेल्या भक्तांच्या, संतांच्या चरित्र लेखनासाठी खालील ग्रंथांचा आधार घेतला आहे. त्या ग्रंथकर्त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

१) भक्तिकोश खंड २, भारतीय संत – लेखक– विद्यावाचस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर, प्रकाशक– आदित्य प्रकाशन, पुणे.

२) भक्तिकोश खंड ३, भारतीय संप्रदाय – लेखक– विद्यावाचस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर, प्रकाशक– आदित्य प्रकाशन, पुणे.

३) संत रोहिदास चरित्र आणि वाङ्मय – लेखक दलित मित्र श्री. मा. अ. कारंडे, प्रकाशक– महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

४) सत्य सांगे रविदास – लेखक– गोपाळ ज्ञानेश्वर ननवरे, प्रकाशक – श्री गुरु रविदास जन्मस्थान चॅरिटेबल ट्रस्ट, श्री गुरु रविदास मंदिर (तिसरे धाम) कात्रज पुणे.

५) संत रोहिदास– ले.– काशिनाथ उपाध्याय, प्रकाशक– राधास्वामी सत्संग, बिआस

६) श्री सेना महाराज चरित्र. लेखक – प्रा. र. रा. गोसावी व सौ. वीणा र. गोसावी. प्रकाशक – सारथी प्रकाशन

७) संत नामदेव : ले. – जे. आर. पुरी व व्ही के. सेठ, प्रकाशक – राधा स्वामी सत्संग, बिआस

८) संत नामदेव चरितावली. ले. कृ. गो.वानखेडे गुरूजी प्रकाशक संत नामदेव शोध संस्थान नई दिल्ली.

९) श्री नामदेव चरितावली. द्वितीय, तृतीय व चतुर्थभाग (हिंदी) लेखक स्व. बाबू बलदेव प्रसाद भैक. प्रकाशक – पं. रामकृष्ण पाण्डेय, बिलासपूर.

१०) श्री नामदेव – बंशावली ले. व प्रकाशक – नन्हेलाल वर्मा (हिंदी) जबलपूर.

११) श्लोक फरीदजी टीका (हिंदी), लेखक – प्रो. साहिब सिंघ. प्रकाशक – सिंघ ब्रदर्स, अमृतसर.

१२) भारतेर साधक लेखक – शंकरनाथ रॉय. प्रकाशक – नामाचरण मुखोपाध्याय. करूणा प्रकाशनी कोलकाता.

१३) मासिक गुरमति प्रकाश (पंजाबी) भक्त साहिबान विशेष अंक (जून १९९३) श्री अमृतसर.

॥ हरी ओत तत् सत् ॥

– विनायक लिमये

(०२०) २६९६२९०९